
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २२२५

# फुले
# समग्र वाङ्मय

REFBK-0017315



महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृति
महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य

महात्मा फुले

समग्र वाङ्मय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ........ दि:
क्रमांक ........ २२२५ नों: दि: ८।५।७३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७०३९४
संग्र. शाखा

२०१३९
२२२५
निबन्ध



महात्मा जोतीराव गोविंदराव फुले

# महात्मा फुले

## समग्र वाङ्मय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...२०९३७ दि: ...
क्रमांक ...२२२५... नों. दि ...

संपादक

धनंजय कीर

स. गं. मालशे

REFBK-0017315

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ

© १९६९, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ

**किंमत ८ रुपये**

प्रकाशक
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई ३२

मुद्रक :
विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# प्रस्तावना

"म. फुले : समग्र वाङ्मय" वाचकांच्या हाती देण्यास आम्हास आनंद वाटतो. म. जोतिराव फुले यांच्या एक दोन पुस्तकांखेरीज बाकीची पुस्तके किंवा पुस्तिका बरीच वर्षे दुर्मिळ झाल्या होत्या. "गुलामगिरी" व "सार्वजनिक सत्यधर्म" पुस्तक यात जोतिराव फुले यांचे धर्म, संस्कृती, इतिहास, हिंदुधर्मावरील प्रखर हल्ला, नवी मानवतावादी ध्येये, बहुजन समजाची दुःस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचे उपाय, सर्व मानवव्यापी सत्यधर्माचा विचार आणि मानवाचे मौलिक व अंतिम ऐक्य या सर्व मुद्यांचे विवरण सापडते. त्यांची काव्यरचना ही मुख्यतः वर उल्लेखिलेल्या विचारांच्या प्रचारार्थच निर्माण झालेली आहे. "छत्रपति शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा" डफाच्या धुमाळीत उठावदार दिसेल इतका चांगला असला तरी त्यातही वरील मुद्यांच्या प्रचारांचा उद्देश दुसऱ्या कडव्यामध्ये कडव्या भाषेत प्रकट झालेला आहे. "सत्यशोधक समाजोक्त पूजाविधी" व "इशारा" या पुस्तिका जुन्या ग्रंथालयातील जुन्या पुस्तकात मिळत होत्या. परंतु "ब्राह्मणी कसब", "शेतकऱ्याचा आसूड", "सत्सार" (अंक १ व २), "हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन" हे साहित्य फार प्रयासाने मिळवावे लागले. "अखंडादि काव्यरचना" थोड्याबहुत प्रमाणात "सार्वजनिक सत्यधर्म" पुस्तकाच्या अखेरीस छापल्यामुळे वाचवयास मिळत असे.

जोतिराव फुले यांच्या चरित्राची अनेक पुस्तके अनेकांनी लिहिली आहेत. त्यातील श्री. धनंजय कीर यांच्या "फुलेचरित्रा" शिवाय इतर पुस्तके चरित्राबरोबरच प्रचाराच्या उद्देशाने लिहिली गेली आहेत. काही चरित्रकारांनीं ब्राह्मणेतरवादाच्या मुळाशी असलेला अंतिम ध्येयवाद बराचसा डोळ्याआड केल्यामुळे त्या चळवळीला १९१९च्या सुमारास स्वराज्य चळवळीच्या विरोधीही वळण लागले होते. "महात्मा फुले : समग्र वाङ्मय" हा संग्रह त्याच्या मूलभूत ध्येयवादाकडे वाचकांचे लक्ष वेधील अशी आम्हांस आशा आहे. विसाव्या शतकाच्या मध्यकालात निर्माण झालेल्या भारतीय प्रजासत्ताक राज्याचे अधिष्ठान म्हणून आवश्यक असलेल्या आणि मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर निर्माण झालेल्या नव्या भारतीय समाजरचनेच्या स्थापनेस आवश्यक असलेली, मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि जातिभेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचारसरणी जोतिबारावांनी आवेशाने सांगितली. या गोष्टीला आज महत्त्व आहे.

जोतिराव फुले यांचे इंग्रजी शिक्षण शाळांत परीक्षेपलीकडे गेले नव्हते. इंग्रजी विद्यारूपी वाघिणीचे दूध जन्मतः जे वाघ नाहीत त्यांना कितीही मिळाले तरी त्यांचे नरव्याघ्र बनू शकत नाहीत. इंग्रजी विद्येमध्ये पारंगत झालेले व विद्यापीठामध्ये उच्च पदव्या संपादन केलेले

शकडो सुशिक्षित भारतात झाले. परंतु ते जन्मतः नरव्याघ्र नव्हते. त्यात थोडेच नरव्याघ्र होते. त्यांनीच आधुनिक युगाला आवाहन देणारे आणि परंपरागत मध्ययुगीन समाजरचनेला उखडून टाकणारे समाजक्रांतीचे विचार, एकाकी राहण्याची पर्वा न करता, घोषित केले. या नरव्याघ्रांच्या घोषणांनी एकोणिसावे शतक हादरत होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्वातंत्र्याच्या स्थापनेनंतर ती जुनी समाजरचना आता त्याच विचारांच्या शक्तीमुळे खिळखिळी होऊन कोलमडू पाहत आहे. या पहिल्या नरव्याघ्रांचे जोतिराव फुले हे अग्रणी म्हणून शोभतात.

जोतिरावांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा विचार होता हे रहस्य त्यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील नेत्यांना फारच उशिरा उमगले. "गुलामगिरी" या त्यांच्या पुस्तकाची अर्पणपत्रिका त्यांचा उद्देश सूचित करते. "गुलामगिरी" या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीची अर्पणपत्रिका पाहावी. निग्रो गुलामांना मुक्त करण्याकरिता आत्मार्पणपूर्वक आंदोलन चालविणाऱ्या लोकांना "गुलामगिरी" हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे.

भारतातील परम्परागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष म्हणजे जोतिबा फुले. होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली? भारतातील परम्परावादी समाजसंस्थांची व या समाजसंस्थांच्या नियमधर्मांची पकड हजारो वर्षे येथील जनमनांत पक्की बसलेली होती. या ठिकाणी सामाजिक जन्मसिद्ध उच्चनीच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसांच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत, म्हणून यांच्या विरुद्ध प्रयत्न करणे, हे महापाप आहे अशी समजूत होती. या महापापाची म्हणजेच अपवित्रतेची भीती येथील जनमानसात कायम घर करून बसली होती. ही खोलपणे सहस्रावधी वर्षे रुजलेली भीति घालविणारी जबरदस्त प्रेरणा ज्योतिबा फुले यांना कुठून मिळाली? जोतिबा फुले यांच्या महात्मतेचे रहस्य जाणण्याकरिता या प्रश्नाचा उलगडा करणे, ही आज अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. जोतिबा फुले यांना जी भयंकर सामाजिक बंधने दिसली, ती तोडण्याचे जबरदस्त शिक्षण त्यांना कुठून प्राप्त झाले, याचे उत्तर शोधणे म्हणजेच त्यांच्या महात्मतेच्या रहस्याचा शोध घेणे होय. नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय, परम्परागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही. केवळ विनाशाकरिता विनाश, म्हणून विनाशाकरिता प्रवृत्त होणे हे विध्वंसक अतएव विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. जोतिबा फुले यांची मनोरचना अत्यंत निरामय होती, शाश्वत नैतिक सत्याच्या आधारावर त्यांची विचारसरणी अधिष्ठित होती. त्यांना उच्चतर सामाजिक विकासाला कारणीभूत होणाऱ्या चिरंतर मूल्यांचा प्रत्यय आला होता. ज्योतिबा हे "सत्यशोधक" होते. हे सत्य मानवी जीवनाचे नैतिक सत्य होते. त्या चिरंतन सत्याचे स्वरूप म्हणजे विश्वमानवाच्या मुक्ततेचा सिद्धान्त. हा सिद्धान्त त्यांना आधुनिक पश्चिमी संस्कृतीने दिला व तो त्यांच्या काळी त्यांच्यासारख्या थोड्यांनाच घेता आला. इतरांना नाही.

सत्यशोधक जोतिबा यांनी अनेक पुस्तके व निबन्ध लिहिले. सत्यशोधक समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचा प्रयत्न केला. या आंदोलनाच्या मुळाशी काही विधायक स्वरूपाच्या ध्येयाचा विचार होता. हा विचार म्हणजेच मूलभूत मानवी हक्कांचा विचार होय.

समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय. "गुलामगिरी" व सार्वजनिक सत्यधर्म ही दोन मूलभूत पुस्तके एकत्र वाचली म्हणजेच त्यांच्या वैचारिक मूल्यांची जाणीव होते. "गुलामगिरी" मधील विचार हे मुख्यतः विध्वंसक होत. या विध्वंसक विचारातून उत्पन्न झालेल्या प्रश्नांचे उत्तर त्यांच्या विधायक विचारांत, म्हणजेच "सार्वजनिक सत्यधर्म" या पुस्तकात मिळते. "गुलामगिरी" हे पुस्तक वाचले म्हणजे सत्याचा अर्धा भाग मिळतो. अर्धसत्य हे नेहमीच धोकादायक असते. "गुलामगिरी" तील संदेश आपणास भारतातील परंपरागत, ब्राह्मण–प्रधान, धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरुद्ध उठाव करण्यास प्रेरित करतो. परंतु समोर असलेल्या परंपरागत समाजसंस्था नष्ट करून त्या जागी स्थानापन्न करावयाच्या सामाजिक संस्था ह्या ज्या तत्त्वांवर आधारलेल्या असल्या पाहिजेत, ती तत्त्वे त्यांनी "सार्वजनिक सत्यधर्म" या पुस्तकात विशद करून सांगितली आहेत. ती तत्त्वे म्हणजे आधुनिक मानवी स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही होत. ही तत्त्वे गृहीत धरली म्हणजे जोतिबांना दिसलेल्या सत्याचे पूर्ण स्वरूप दृष्टीसमोर येते.

"सार्वजनिक सत्यधर्म" या पुस्तकाचे योग्य व आवश्यक तितके मूल्यमापन केल्याशिवाय, जीवनातले जे सत्य शोधण्यासाठी जोतिबा जीवनसंग्राम चालवीत होते, त्याचा खराखुरा अर्थ कळणे अशक्य आहे. हे पुस्तक जोतिबांनी अर्धांगाचा झटका आल्यानंतर उजवा हात लुळा झाल्यावर, शरीरातील व्यथा सहन करीत, डाव्या हाताने लिहून पुरे केले आहे. "गुलामगिरी" मध्ये जे सत्य दाखविले आहे, ते अर्धसत्य आहे, त्याची दुसरी बाजू लक्षात घेतली नाही तर ते भयानक ठरेल, अशी त्यांची भूमिका होती. म्हणून शारीरिक व्यथा सहन करीत त्यांनी हे पुस्तक लिहून पार पाडले. जोतिबांच्या विश्व–कुटुंबवादाचा "सार्वजनिक सत्यधर्म" हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विशद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे. "सार्वजनिक सत्यधर्मा"मध्ये ज्योतिबांच्या महात्मतेचे तेजोवलय पूर्ण प्रकट झाले आहे. या तेजोवलयाचे तीन भाग आपल्या दृष्टीसमोर पडतात. ते म्हणजे मूलभूत मानवी हक्क, त्यांवर आधारलेला विश्वकुटुंबवाद आणि जीवनाचे व विश्वाचे सत्यस्वरूप प्रकट करणारा बुद्धिवाद हे होत. पश्चिमेकडून म्हणजे आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून जोतिबांना या तीन प्रेरणा मिळाल्या. या तीन प्रेरणांतच त्यांची लोकशाही जीवन-दृष्टि सिद्ध होते.

मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर विश्व-कुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा-प्रकारचा वर्तनक्रम व कशा प्रकारची वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे यासंबंधी "सार्वजनिक सत्यधर्मा"मध्य ३३ कलमी नियम मांडले आहेत.

जोतिबा म्हणतात,

"स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व गांवाचे, प्रांताचे, देशाचे व खंडाचे संबंधांत, अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधांत, स्त्री आणि पुरुष या उभयतांनीं, अथवा सर्व स्त्रियांनीं अथवा पुरुषांनी, एकमेकांत, एकमेकांची कोणत्याहि प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करतां या भूखंडावर आपलें एक कुटुंब समजून एकमतानें एकजुटीनें एकमेकांशीं सत्य वर्तन करून रहावें.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने, एकंदर सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करते वेळी, मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यांस आपआपसांत सारख्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने, एकंदर सर्व स्त्रियांस अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांविषयी, आपल्यास पाहिजे तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु या विचारांपासून, मतांपासून कोणत्याही प्रकारे नुकसान मात्र होऊ नये अशी खबरदारी ठेवावी. त्यास सत्य वर्तन म्हणतात.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने, एकंदर सर्व स्त्रीपुरुषांस, एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एकादा मानव अथवा काही मानवांची टोळी, एखाद्या व्यक्तीवर जबर करू शकत नाही व त्याप्रमाणे जबर न करणाऱ्यास सत्य वर्तन करणारे म्हणातात.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने, सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान देत नाही, अथवा जो कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देत नाही त्याला सत्य वर्तन करणारा म्हणतात.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्यास संतोष देण्यासाठीं केलेले वर्तन याला सार्वजानिक सत्य म्हणतात. जो कोणी इतर मानव बंधूबरोबर सत्य आचरण करील ती नीती म्हणावी, मग ती स्त्री असो पुरुष असो, तो कोणीही मानव आसे, सत्यशोधक समाजसेवक असो, अथवा एखादा गावठेकर असो.

"या पृथ्वीच्या पृष्ठभागात जेवढी म्हणून मानवांनी पुस्तके लिहिली आहेत त्यापैकी काही ग्रंथांत आरंभापासून शेवटपर्यंत सर्व सार्वजनिक सत्य होय, असे प्रत्येक धर्मपुस्तकात म्हटले आहे. काही व्यक्तींनी त्यावेळच्या प्रसंगास अनुसरून हेकटपणा दाखवून जे धर्मग्रंथ लिहिले ते एकंदर सर्व मानवी प्राण्यांना सारखे हितकारक न होता साहजिकच यामध्ये अनेक भेद निर्माण करून ठेवले. ते एकमेकाचे मनापासून हेवा व द्वेष करतात. प्रत्येक व्यक्तीस मानवी अधिकारांचा यथायोग्य उपयोग घेता यावा.

"आपल्या या सूर्य मंडळासहित पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे तर तिजवरील अनेक देशांतील लोकांचे एकमेकांचे वैरभाव माजवून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजविले आहे? त्याचप्रमाणे या पृथ्वीवरील अनेक देशांतील सर्व नद्या महासागरात मिळत असतात, त्यांपैकी एका देशातील नदी तेवढी पवित्र कशी होऊ शकेल? या पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून त्यांपैकी काही लोक पिढीजात पवित्र बनतात. ते श्रेष्ठ कसे होऊ शकतील? सर्वांना सारखे जन्म-मरण असून ते सर्वांप्रमाणे सद्गुणाने व दुर्गुणाने निपुण नाहीत का? कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता, एकंदर सर्व मानवांपैकी जे कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करताना जगाच्या कल्याणासाठी सतत कर्म करीत असतात ते आर्य असो, अथवा अमेरिकेतील असो, अथवा ज्याला तुम्ही नीच मानता असा एखादा (चांडाळ) मृतप असो, ते अन्नदान घेण्यास पात्र आहेत. त्यालाच अन्नदान केल्याने निर्मिकाला आनंद होणार आहे."

वरील विचार वाचले म्हणजे विचक्षण वाचकांच्या ध्यानात येते की हे विचार भारतातील लोकशाही क्रान्तीच्या अग्रदूताचे विचार होत. सर्व मानवांचे जे जीवन व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता यांनी भरले आहे, ते सामाजिक जीवन हेच पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य होय. अशा तऱ्हेचा निर्वाळा जोतिबा अनेक ठिकाणी देतात. पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य ही कल्पना ज्योतिबांना ख्रिश्चन धर्मापासून मिळाली असावी असे स्पष्ट दिसते. आदर्श लोकशाही-जीवनपद्धती आणि विश्व-कुटुंब यांस पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य असे जोतिबा म्हणतात. ख्रिश्चन कल्पनेवर ज्योतिबांनी नव्या मानवी मूल्यांच्या कल्पनेचा संस्कार करून ख्रिश्चन धर्माच्या कल्पनेहून निराळे पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य आदर्श म्हणून आपल्यापुढे ठेवले आहे. जोतिबा राष्ट्रवादी नव्हते. परंतु "राष्ट्र" म्हणून संबोधन करताना त्यांच्या मताप्रमाणें "स्वातंत्र्य आणि समता यांच्यावर आधारलेला प्रादेशिक समाज" असा राष्ट्र याचा अर्थ होता. जातीजातींत व धर्माधर्मांत निबद्ध झालेल्या समाजाची गाठोडी म्हणजे राष्ट्र नव्हे असे ते अनेक ठिकाणी सांगतात. त्यांच्या मताने कोणताही प्रादेशिक समाज हा विश्वसमाजाचा एक घटक म्हणूनच राहिला पाहिजे. मानवांना धर्मसंस्थांनी एकमेकां-पासून विभक्त व एकेकांचे शत्रू बनवून ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी भेद पाडले आहेत. हे भेद भयानक धर्मकल्पनांवर आधारलेले आहेत असे ते वारंवार सांगतात. धर्मग्रंथ हे ईश्वरप्रणीत किंवा ईश्वरी प्रेरणेने निर्माण केले आहेत, असे म्हणणाऱ्या धर्मसंस्थांचा त्यांनी निषेध केला. धर्मात जे जे काही सांगितलेले असते ते सत्य होय, ही अंधश्रद्धा नाहीशी झाली पाहिजे, असाही ते वारंवार इशारा देतात. जगातील सर्व धर्म हे गैरसमजांवर व अंधश्रद्धेवर उभारले आहेत, यांच्यामध्ये जे जे काही सांगितले आहे ते सत्य आहे असे आपण म्हणता कामा नये, असे ते म्हणतात.

"निर्मिक म्हणजे ईश्वर." जोतिबांनी विश्वनिर्माणकर्त्यास "निर्मिक" हा नवीन शब्द वापरला आहे. याचे कारण जगातील सर्व ईश्वरवाचक जे जे प्रचलित शब्द आहेत, त्या शब्दांच्या पाठीमागे आराधना, भक्ती किंवा पूजा करण्याचे एक निरनिराळे कर्मकांड आहे, ते सर्व कर्मकांड व्यर्थ व मानवांच्या मध्ये सामाजिक फूट पाडणारे आहे, असे त्यांचे मत आहे. म्हणून त्यांनी ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म इत्यादी ईश्वरवाचक रूढ शब्द काढून टाकले. मानवांची सेवा किंवा मानवी समतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पूजा होय असे ते म्हणतात.

जोतिबांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीचे रूपांतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात झाले. त्यांना जोतिबांच्या बुद्धिवादाचा व विश्वमानवतावादाचा स्पर्श झालेला नाही असे दिसते. सत्यशोधक चळवळीचा विपर्यास म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होय. हा विपर्यास कसा होय हे दाखविण्याची ही वेळ आहे. भारताला परकीय आक्रमणापेक्षा यादवीयुद्धाचा अधिक धोका आहे. नकारात्मक आंदोलन कायम राखल्यास हे यादवी युद्ध अधिक तीव्र स्वरूप धारण करील. यादवी युद्धाच्या आगमनाची चिन्हे दिसू लागली आहेत. जोतिबांनी सांगितलेले अर्धसत्यच या चळवळी-मध्ये अजून प्रभाव गाजवीत आहे. यामध्ये ब्राह्मण-प्रधान जातिवाद जाऊन त्या ठिकाणी नवा जातिवाद उभा होण्याचा संभव आहे. जोतिबांनी सांगितलेले विचार जातिभेदातीत व धर्म-भेदातीत होते, हे लक्षात घेतले तरच ज्योतिबांच्या सत्याचे संपूर्ण स्वरूप लक्षात आले असे होईल.

पृथ्वीवर देवाचे राज्य यावे याकरिता एखादा द्रष्टा एकदम प्रकट होतो व तो एका मंगल सत्याचे बीज देऊन जातो. त्या सत्याचे ते संपूर्ण बीज रोवले तर त्यातून देवाचे राज्य पृथ्वीवर निर्माण होऊ शकते. परंतु असे कधीं झाले नाही. कारण अनुयायी त्या सत्याचा अर्धाच भाग स्वीकारतात व नरकाचा थोका निर्माण होतो. अंतर्गत यादवी हा सामाजिक नरक होय.

गुलामगिरी किंवा सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या दोन पुस्तकातील जोतिराव फुले यांची भारताच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक इतिहासाची उपपत्ति ही एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील युरोपीय व इंग्लिश इतिहासकारांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या आधारे जोतिबांनी सांगितली आहे हे त्यांच्या "शेतकऱ्याचा आसूड" या निबंधाच्या तळातील टिपण्यांवरून उघडकीस येते. इंग्रजी शिक्षण बेताबेताचे होते तरी इंग्लिश लिहू शकत होते व महत्त्वाचे उच्च दर्जाचे ग्रंथ समजून वाचू शकत होते ही गोष्टही यावरून निदर्शनास येते. अलीकडे, गेल्या शंभर वर्षांत, प्राचीन भारतीय इतिहासाचे जे मौलिक संशोधन झाले आहे त्या संशोधनाचे पूर्वीच्या संशोधकांचे बरेचसे निर्णय काही बाबतीत चुकीचे ठरले आहेत व काही बाबतीत अंशतः काल्पनिक ठरले आहेत. मत्स्यावतारापासून परशुराम अवतारापर्यंतच्या अवतारांचा जोतिरावांनी केलेला ऐतिहासिक अर्थ वामन व परशुराम वगळल्यास केवळ काल्पनिक आहे असे मानावे लागते. विशेषतः भारतीय विषम व ब्राह्मणप्रधान समाज रचनेस बाहेरून आलेले ऋग्वेदिक आर्य हे मूलतःच कारण होत या विधानाला आता विशेष पुष्टी मिळू शकत नाही. ऋग्वेदिक आर्य संख्येने अत्यल्प होते व कायम पगडा बसवितील इतके बलवानही नव्हते. विषम समाजरचनेची निर्मिती ही समाजाच्या आंतरिक सामाजिक शक्तींच्या आर्थिक व राजकीय बलामुळे निर्माण होत असते व ती परिवर्तन पावत असते हा सामाजिक विकासाचा सिद्धान्त मान्य करावा लागतो.

आर्यपूर्व अवैदिक भारत हा विकसित अशा द्रविडी संस्कृतीने व्यापला होता व वर्तमान हिंदू धर्म हा त्याच संस्कृतीचा परिवर्तित आविष्कार आहे ही उपपत्ति आता सर्वमान्य झाली आहे. काही विद्यमान आधुनिक संस्कृतिशास्त्रज्ञ तर जातिभेद हा आर्यपूर्व संस्कृतीत भारताच्या दक्षिण प्रदेशाला वाढीस लागला व तो वैदिक आर्यांना स्वीकारावा लागला असेही म्हणू लागले आहेत. जोतिरावांनी "गुलामगिरी" या पुस्तकात दाखविलेल्या आर्यपूर्व ज्योतिबा, खंडोबा, म्हसोबा, बहिरोबा, बाणासुर इ. देवता व त्यांचे पूजासंप्रदाय हे आर्यपूर्व लोकांचे होते हे जोतिरावांनी स्वतःच सांगितले आहे. येथील द्राविडी संस्कृतीला आसुरी संस्कृती असे म्हणता येते ही गोष्ट जोतिरावांनीही सुचविली आहे व त्यात बरेच तथ्य आहे. त्याच संस्कृतींतील मोठा व मूळचा पुरोहितवर्ग हाच विद्यमान भारतातील बहुसंख्य ब्राह्मण वर्ग ही गोष्टही जोतिरावांना मान्य झाली असती असे सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाच्या (पृ. ३९७) टिपणीवरून लक्षात येते. येथील देशस्थ ब्राह्मण शूद्र व अतिशूद्र यांच्यापैकीच आर्यीकरण झालेले ब्राह्मण होत असे जे त्यांनी विधान केले आहे त्यावरून सूचित होते. सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पनेवर ज्योतिरावांनी कडाडून हल्ला केला आहे व सोवळ्या-ओवळ्याची ही कल्पना आर्यांनी वर्चस्व प्रस्थापित करण्याकरिता आर्येतरांवर लादली व ती त्यांनी मुकाट्याने पत्करली असे जे ज्योतिरावांनी जागोजागी

विधान केले आहे ते आधुनिक मानवजातिशास्त्रज्ञांना मान्य नाही. सोवळ्या-ओवळ्याची कल्पना प्राथमिक मानवसमाजांमध्ये जगात सर्वत्र होती व वर्तमान कालापर्यंत कमीजास्त प्रमाणांत अद्ययावत किंवा आधुनिक पश्चिमी समाज सोडल्यास सर्वत्र कमीजास्त प्रमाणात आहे हे शास्त्रज्ञांच्या गेल्या दीडशे वर्षांतील जागतिक संशोधनावरून सिद्ध होते. "टाबू" (Taboo) आणि "माना" (Mana) या मौलिक अशा मानवजातिशास्त्रज्ञांनी स्वीकारलेल्या कल्पना आहेत. त्या जादूटोणा व विविध धार्मिक रूढी यांचा अर्थ उमगण्यास उपयोगी पडतात. प्राथमिक व मध्ययुगीन सर्व मानवसमाजांच्या धार्मिक चालीरीती, मंत्रतंत्र, जादूटोणा इत्यादी व्यवहारांचा "टाबू" व "माना" या कल्पनांच्या साहाय्याने मानव जाति-शास्त्रज्ञांना करता येतो. "टाबू" म्हणजे निषिद्ध पापशक्ती व "माना" म्हणजे विधायक पुण्यशक्ती होय. उदा. गोमांस भक्षण हे महापाप मानणे, मृतांच्या नातेवाईकांना अस्पृश्य मानणे म्हणजे सुतक पाळणे, प्रेताला अपवित्र मानणे, डुकराचे मांस निषिद्ध मानणे इत्यादी प्रकारच्या निषेधात्मक चालीरिती आर्य व आर्येतर या सर्वांच्याच मध्ये पडतात. गोमांस भक्षण हे पाप आहे ही कल्पना मूळची आर्यांची नव्हे. ती आर्येतरांची आहे व ती कालांतराने आर्यांनी स्वीकारली ही कल्पना ज्योतिरावांनाही मान्य झाली असती; हे, वैदिक आर्य गोमांसभक्षक होते असे त्यांनी वारंवार केलेल्या विधानांवरून स्पष्ट होते. मृतांच्या नातेवाईकांची अस्पृश्यता म्हणजे सुतक पाळण्याची चाल ही आर्येतरांपासून आर्यांनी स्वीकारली ही गोष्ट स्मृतींवरून अनुमानता येते. शूद्रांनी सुतक एक महिना पाळावे असे विधान स्मृतींत आढळते. स्मृतींमध्ये भक्ष्याभक्ष्यविषयक किंवा स्पृश्यास्पृश्यविषयक सांगितलेल्या चालीरीती या परंपरागत असलेल्या त्या त्या जमातींच्या चालीरीती होत, नव्या कायद्याने निर्माण केलेल्या चालीरीती नव्हेत, ही गोष्ट स्मृतींच्या आधुनिक अभ्यासकांना नव्याने सांगण्याची गरज नाही.

बऱ्याचशा अनुयायांना व चाहत्यांना न मानवणारे असे अनेक मौलिक विचार जोतिरावांनी मांडले आहेत. उदा. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी व अन्य संतप्रणीत ग्रंथ शूद्र अतिशूद्रांना फसविण्या-करिता व ब्राह्मणांचे आधिपत्य दृढ करण्याकरिता निर्माण केलेले कारस्थान आहे असे जोतिराव अनेक ठिकाणी बजावतात. विष्णू व पंढरीचा विठ्ठल यांची ज्योतिरावांनी खूप थट्टा उडविली आहे हे महाराष्ट्रांतील त्यांच्या चाहत्यांना व अनुयायांना कितपत पचले असेल याची वानवा आहे. हिंदुधर्मांतील मूर्तिपूजा हे ब्राह्मणांनी पोट भरण्याकरिता काढलेले थोतांड आहे, तीर्थयात्रा, श्राद्ध इत्यादी विधी हा लबाडपणाचा धंदा आहे, एकेश्वरवादी खिस्तीधर्म व मुसलमानधर्म हे हिंदुधर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ धर्म आहेत, इत्यादी जोतिरावांची विधाने चाहत्यांनी व अनुयायांनी मनन करण्यासारखी आहेत. महंमदावर (पृ. ४८९ व ४९०) एक उत्कृष्ट प्रशंसापर कविता ज्योतिरावांनी लिहिली आहे. ती या संदर्भात वाचावी. खिस्ती व मुसलमान लोकांनी येथील हिंदूंना बाटविण्याचे पूर्वी केलेले प्रयत्न ज्योतिरावांस स्वागतार्ह वाटतात. त्याबद्दलची पोटदुखी केवळ ऐतखाऊ ब्राह्मणांनाच बाधते, असे त्यांनी वारंवार म्हटले आहे. उदा. पंडिता रमाबाई यांनी खिस्ती धर्म पत्करून केलेल्या खिस्ती धर्मप्रसाराची ज्योतिबांनी प्रशंसा केली आहे

(सत्सार : पृ. २८६). मात्र याचा अर्थ असा नव्हे की हिंदूंनी मुसलमान वा खिस्ती व्हावे असे ज्योतिरावांचे मत होते. पवित्रग्रंथनिष्ठ सर्वच धर्म हे मानवा मानवात फूट पाडणारे असल्यामुळे अयोग्य होत असा त्यांचा अंतिम निर्णय होता. तुलनात्मकदृष्टीने विचार करता, प्रचलित हिंदू धर्मापेक्षा मुसलमान वा ख्रिश्चन धर्म कैक पटीने श्रेष्ठ होत एवढेच त्यांना सांगावयाचे होते. खरा धर्म सर्व मानवांचा एकच आहे. सर्व धर्मनिष्ठ सामाजिक भेद हे मिथ्या भेद होत, असा त्यांनी काढलेला अंतिम निष्कर्ष होता.

हिंदुधर्मावरील विशेषतः ब्राह्मणप्रधान हिंदुसमाजरचनेवरील व ब्राह्मणप्रधान संस्कृतीवरील त्यांचा हल्ला एका तत्कालीन ऐतिहासिक विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितीची तीव्र प्रतिक्रिया होती व ती तीव्र प्रतिक्रिया तटस्थरीतीने पाहणाऱ्या आधुनिक विचारवंतास मर्यादित अर्थाने समर्थनीयच वाटेल यात शंका नाही व ती समर्थनीय आहेच. अव्यवस्थित व बेजबाबदार उत्तर पेशवाईत व अव्वल इंग्रजीमध्ये ब्राह्मणांचे महाराष्ट्रात प्रस्थ वाढले व सामाजिक विषमतेची धार अधिक तीक्ष्ण झाली ही गोष्ट लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, आगरकर इत्यादी आधुनिक विचारवंतांना देखील खंत व उद्वेग उत्पन्न करणारी होती ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. उत्तर पेशवाई बेजबाबदार व हीनदर्जाची होती असेच लो. टिळकांचेही मत होते. लोकहितवादींची शतपत्रेही या गोष्टीची साक्ष देतात. ही शतपत्रे म्हणजे ब्राह्मणी विद्यांवर व ब्राह्मणी संस्कृतीवर उगारलेली बुद्धिवादी शतशस्त्रेच होत. ती अजूनपर्यंत गंजलेली नाहीत, त्यांचे तेज अजूनही तळपत आहे. वर्तमान परंपरावादी विद्यापीठीय अनेक सुशिक्षितांना, विशेषतः मराठी प्राध्यापकांना, त्यांच्यापासून मिळणारा इशारा अजूनही लक्षात आलेला नाही. परंतु आता स्वातंत्र्योत्तर काळात ब्राह्मणेतर वाद हा जीर्ण झाला असून त्यातील अभिनिवेश जर कायम राहिला, तर तो अधोगतीचे एक लक्षण ठरेल, याची दखल आधुनिक लोकशाही शक्तींनी स्पष्टपणे घेतली पाहिजे. ज्या परंपरागत संस्कृतीवर जोतिरावांनी हल्ला केला त्या संस्कृतीचेच एक प्रत्यंतर म्हणजे लोकशाही भारतातील ब्राह्मणेतर वाद व जातिवाद होय. ज्योतिराव हे ब्राह्मण जमातींवर जितका कडाडून हल्ला करीत तितकेच उलट अंतरंगातून अत्यंत मऊ आहेत हेही त्यांच्या प्रत्यक्ष वर्तनावरून दिसून येते. ज्या ज्या ब्राह्मणांनी सहकार्य वा अल्पस्वरूप वा मोठी मदत सत्यशोधक समाजास केली तिची पावती अत्यंत नम्रपणे व प्रेमळ बंधुत्वाने त्यांनी दिलेली आहे ही गोष्ट या "म. फुले : समग्र वाङ्मय संग्रहा"त अनेक ठिकाणी दिसून येईल. **त्यांचा हल्ला पद्धतीवर होता, विशिष्ट जातीतील माणसांवर नव्हता. हा विवेक त्यांच्या हृदयात सतत जागृत होता.** हा विवेक त्यांच्या चाहत्यांमध्ये जर जागृत राहिला तर आगामी यादवी टाळण्याचे श्रेय पदरात पडू शकेल.

श्री. धनंजय कीर व डॉ. स. गं. मालशे यांनी साक्षेपाने हा संग्रह संपादित केला, याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ त्यांचे मनःपूर्वक आभारी आहे.

वाई.
मकर संक्रमण.
दिनांक १४ जानेवारी १९६९

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
साहित्य व संस्कृति मंडळ.

# संपादकांचे निवेदन

मराठी जनतेच्या इच्छेला मान देऊन महाराष्ट्र शासनाचे साहित्य आणि संस्कृति मंडळ महात्मा जोतीराव फुले यांचे समग्र वाङ्मय प्रसिद्ध करीत आहे, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. जोतीरावांच्या काळी ब्रिटिशांची राजवट चालू होती. त्या राजवटीत अधिकारावर असलेल्या महाराष्ट्रीय व्यक्तींनी त्यांच्या वाङ्मयाविषयी कोणत्याही तऱ्हेची, रेसभरसुद्धा सहानुभूती दाखविली नाही; उलटपक्षी त्यांची उपेक्षा करता करता जेव्हा कधी उल्लेख केला, तेव्हा त्यावर कुत्सित टीकाच केली. तथापी, स्वतंत्र भारतामधील महाराष्ट्र शासनाने, धर्मातीत लोकशाहीच्या या अग्रदूताच्या विचारप्रवर्तक, बुद्धिवादी आणि क्रांतिप्रवण तत्त्वज्ञानाचे दर्शन घडवावे, म्हणून त्यांच्या वाङ्मयाचे पुनर्मुद्रण करण्याचे ठरविले, ही ऐतिहासिक दृष्टया मोठी उचित अशी घटना घडलेली आहे.

जोतीरावांचे वाङ्मय वाचताना विचारवंत वाचकांनी, त्यांचा कालखंड आणि त्यातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिस्थितीचे भान राखणे हे जसे आवश्यक आहे, तद्वतच वाङ्मयीन टीकाकारांनी त्यांच्या वाङ्मयातील अभिव्यक्तीच्या बहिरंगाकडे न पाहता, त्यांतील आशयाच्या अंतरंगाकडे पाहणे आवश्यक आहे. जोतीराव हे कोणी साहित्याचार्य नव्हते, ते भाषाशास्त्रज्ञ नव्हते, इतिहासकार नव्हते की मोठे धर्मवेत्तेही नव्हते. ते होते कृतिशील तत्त्वचिंतक ! प्रत्येक शतकात न्याय, नीती आणि मानवता या शाश्वत तत्त्वांची जाणीव करून देऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा मार्ग दाखविणारे जे मूलाधार असे महापुरुष अवतरत असतात, त्यांपैकी जोतीराव एक होते. त्यांच्या शेतकरी भट्टीच्या मुशीतून ज्या तप्त स्वरूपात भाषा बाहेर पडली, त्या स्वरूपातच ती ग्रंथामधून प्रसिद्ध झालेली आहे.

ब्रिटिश राजसत्तेबरोबर भारतात आलेले नवे ज्ञान, बुद्धिवाद, यंत्रयुग आणि विज्ञान यांच्या प्रकाशात ब्राह्मणी धर्माची, जुन्या पोथ्यापुराणांची, जुन्या धर्मग्रंथांची आणि त्यांनी घडविलेल्या सामाजिक मूल्यांची परीक्षा करण्यासाठी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास जे विचारवंत पुढे सरसावले, त्यांत जोतीरावांना अग्रमान देणें क्रमप्राप्तच आहे. टॉमस पेन या महान बंडखोर विचारवंताच्या ‘मानवाचे हक्क’ (Rights of Man) या ग्रंथाचा फार मोठा परिणाम जोतीरावांच्या मनावर विद्यार्थिदशेतच झाला. आणि त्यातून त्यांच्या जीवितकार्याची दिशाच ठरल्यासारखी झाली. त्यांनी आपले सर्व जीवित मानवी स्वातंत्र्यासाठी समर्पित केले, त्यासाठी अविरत त्याग केला, लोकक्षोभाला जुमानले नाहीं, संकटांना धैर्याने तोंड दिले, अक्षरशः दिव्य केले !

समाजात, शब्दप्रामाण्य, जुने आचारविचार, जुन्या रूढी, कर्मकांड, जपजाप्य, पूर्वसंचित,

पूर्वजन्म, ईश्वरी संकेत, स्वर्ग-नरक इत्यादी कल्पना प्रसृत करणाऱ्या आणि मानवी कर्तृत्व दास्यशृंखलांत बद्ध करून टाकणाऱ्या भोळ्या समजुतींवर जोतीरावांना सतत आघात करावे लागत होते. थंड गोळ्यासारखा पडलेला बहुजनसमाज जोवर हालत नव्हता, तोवर त्यांना पुन्हापुन्हा कंठरवाने तेच तेच सांगावे लागत होते. 'ती ती पदे नित्य फिरून येती । त्या त्याच अर्थाप्रति दाविताती' हे ह्याच्या प्रचारकाला चुकत नाही. जोतीरावांच्या वाङ्मयातील पुनरुक्तीचे हे एक मर्म ध्यानात ठेवावयास पाहिजे.

हे मर्म ध्यानात ठेवून सारग्रहण करणाराला त्यांच्या वाङ्मयात मूलगामी विचारांचा ठेवाच हाती लागल्यासारखे वाटेल.

**निर्मीकें निर्मीला मानव पवित्र । कमीजास्त सूत्र । बुद्धीमध्यें ॥**
**पिढीजादा बुद्धी नाहीं सर्वांमधीं । शोध करा आधीं । पुर्तेपणीं ॥**

असा त्यांचा दृढ विश्वास होता नि तो त्यांनी वारंवार प्रकट केलेला आहे. मनुष्य जन्माने, जातीने वा धनाने श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नसून, तो आपल्या कर्माने श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत असतो, तो स्वतःच आपल्या भाग्याचा नियंता आहे, अशी त्यांची धारणा होती. तदनुसार त्यांनी जातिसंस्थेविरुद्ध बंड पुकारले आणि बुद्धिप्रामाण्य, समता नि मानवता यांवर अधिष्ठित अशा सामाजिक पुनर्रचनेचे निशाण फडकावले.

कोणताही धर्म ईश्वरप्रणीत नाही, कोणताही धर्मग्रंथ देवनिर्मित नाही, या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी निर्मिलेली धर्मपुस्तके आहेत, त्यांपैकी एकाही पुस्तकात आरंभापासून शेवटपर्यंत सार्वजनिक सत्य नाही, चातुर्वर्ण्य वा जातिभेद ह्या संस्था देवनिर्मित नाहीत, त्या मनुष्यनिर्मित आहत, ही सत्ये त्यांनी त्या काळी मोठ्या धैर्याने पुढे मांडली.

**धर्म राज्य भेद मानवा नसावे । सत्यानें वागावें । ईशासाठीं ॥**
**ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी । धरावे पोटाशीं । बंधूपरी ॥**
**निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणें अनेक । कशासाठीं ? ॥**

असा प्रश्न करून "सत्यावीण नाही अन्य धर्म", "मानवांचा धर्म । सत्यनीती हीच", असे खऱ्या धर्माचे रहस्य त्यांनी उपदेशिले. त्यांची ही धर्मातीत विचारसरणी त्यांच्या काळात खरोखर अशक्य कोटीतली होती.

देवाला त्यांनी 'निर्मीक' म्हटलेले आहे, ते त्याला अन्य कोणत्याही नावाने संबोधीत नाहीत. विश्व अनंत आहे, ते अथांग आहे. विश्वाच्या आणि देवाच्या शोधामागे लागून मानवाने आपले आयुष्य व्यर्थ घालवू नये, हे बरे, असे त्यांचे सांगणे आहे.

**कोठें आहे स्वर्ग । पाहिलें ते कोणी । भिऊं नका मनीं ॥**

असा त्यांनी सामान्य माणसाला धीर दिला आहे. जपानुष्ठानाने पाऊस पडत नाही, मंत्राने

अपत्यप्राप्ती होत नाही, देवाला कोणी पाहिलेले नाही, त्याला नारळ, कोंबडी, बकरी यांच्या नैवेद्याची आवश्यकता नाही, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. अवतारकल्पना, आत्मसाक्षात्कार, दैवी चमत्कार या गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या. देव म्हणजे कोणी अद्भुत, कोणी अदृश्य विभूती नव्हे, आपण राहतो, ती सृष्टी निसर्गाच्या नियमांनी बांधलेली आहे, देव ही एक निर्गुण, निराकार अशी विश्वाची शक्ती आहे, असेच त्यांनी मानले आहे. भौतिकवाद्यांना आणि समाजवाद्यांनाही पटावे, असे हे जोतीरावांचे तत्त्वज्ञान आहे. मात्र जोतीरावांच्या तत्त्वज्ञानांत सामाजिक नीतिमत्तेवर मुख्य भर आहे, हे विसरून चालणार नाही.

किंबहुना नीती हाच मुळी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. धर्माच्या नावावर चालत आलेल्या रूढींची नीतीशी झालेली फारकत हिंदु धर्माने खपवून घेतलेली होती, त्याची त्यांना मनस्वी चीड होती. अनीतिमान ब्राह्मणांवर त्यांनी जितक्या कठोरपणे कोरडे ओढले आहेत, तितक्याच कठोरतेने अनीतिमान ब्राह्मणेतरांनाही धारेवर धरले आहे. मद्यपानाच्या अनिष्ट प्रचाराला आळा घालावा, म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले.

**थोडे दीन तरी मद्य वर्ज करा। तोच पैसा भरा। ग्रंथासाठीं॥**
**ग्रंथ वाचताना मनीं शोध करा। देऊं नका थारा। वैरभावा॥**

असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. चांगल्या कार्यासाठी वाईट उपाय योजू नयेत, हे साधनशुचितेचे त्यांनी घातलेले बंधन त्यांच्या मूलग्राही नैतिक अधिष्ठानाचे निदर्शक आहे.

खिस्तधर्मी आपला पवित्र ग्रंथ जगात कोठेही वाचू शकतात; मुसलमान आपले कुराण कोठेही वाचू शकतात; मग ब्राह्मणांनी आपला वेद आणि मनुसंहिता का लपवावी, असा मूलभूत प्रश्न त्यांनी विचारला आहे. या बिनतोड प्रश्नाने शूद्रातिशूद्रांनी हिंदू धर्मग्रंथ वाचू नयेत, असे म्हणणे किती अन्यायाचे आहे, हे तर दिसतेच, पण त्याचबरोबर त्या लपवाछपवीतच या धर्माची गोम आहे, हेही उघड होते. आणि जोतीरावांच्या टीकेची यथार्थता पटते.

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा जोतीरावांचा ग्रंथ त्यांच्या 'मानवविषयक संकल्पने'चे (Concept of Man) समग्र दर्शन घडवितो. हा ग्रंथ म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामाच आहे, जणू विश्वकुटुंबवादाची ती एक गाथाच आहे, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या प्रेरणेस नि बुद्धीस योग्य वाटेल तो धर्म स्वीकारून गुण्यागोविंदाने नांदावे, असे उपदेशिणारी विशाल धर्मसहिष्णुतेची ती जणू नवगीताच आहे! धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता ही मूल्ये या ग्रंथाची मूलाधारप्रेरणा आहे. मानव हीच सामाजिक मूल्यांची आणि समाजधारणेची मापकाठी असावी, हा विचार त्यात प्राणभूत आहे. सर्व भूखंडावरील लोकांनी एकजुटीने, एकमताने, सर्वांचे सारखे हक्क मान्य करून, देशाभिमान आणि धर्माभिमान यांच्या पलीकडे पाहावे, ही या ग्रंथाची प्रमुख शिकवण आहे. हा ग्रंथ अनेक विधायक सूचनांनी ओतप्रोत भरलेला आहे. 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून जोतीरावांनी जुन्या समाजरचनेवर, जुन्या अवतारकल्पनांवर, जुन्या मूल्यांवर घणाघाती हल्ला चढविला आणि सत्यशोधक चळवळीचा पाया

घातला, तर 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' लिहून त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानमंदिरावर विधायक स्वरूपाचा कळस चढविला.

जोतीरावांनी त्या विषम काळात अस्पृश्यांचे दुःख ज्या आत्मीयतेने वेशीवर टांगले, ती आत्मीयता खरोखर असामान्य म्हटली पाहिजे. जोतीराव हे अस्पृश्य वर्गापैकी नव्हते; ते माळी समाजातले होते. त्या काळच्या मानाने त्यांचे शिक्षणही व्यवस्थित झालेले होते. चार लब्ध-प्रतिष्ठितांप्रमाणे लोकक्षोभाला भिऊन त्यांनी मध्यमक्रम स्वीकारला असता, तर समाजाने त्यांना डोक्यावर घेतले असते. पण शतकानुशतके माणुसकीला पारख्या झालेल्या समाजाविषयीची त्यांची करुणा जातिवंत होती. अस्पृश्यांना आणि अन्य पददलितांना ते आपल्या कुटुंबातलेच, आपल्या रक्तामांसाचे मानीत. जातिभेद आणि चातुर्वर्ण्य या संस्था त्यांना सर्वस्वी अमान्य होत्या. त्यामुळे अस्पृश्यांची अस्पृश्यता काढून टाकून, त्यांना पंचम वर्ग म्हणावे; की दुसरे काही नाव द्यावे, असा पर्याय वा पळवाट त्यांच्या समानतेच्या तत्त्वज्ञानात बसण्यासारखी नव्हती.

जोतीरावांनी अंगिकारलेल्या कित्येक सुधारणा आज समाजाने स्वीकारल्या आहेत. स्त्रीशिक्षणाविषयी आता मतभेद राहिलेले नाहीत. पतित स्त्रियांचा उद्धार आणि अनाथ अर्भकांचे संवर्धन यांविषयी त्यांनी घालून दिलेला आदर्श आज समाजाने पचवून टाकलेला आहे. केशवपनाचा प्रश्न आज गतार्थ झाला आहे. पण त्या काळी त्यांना नापितांकडून केशवपनाविरुद्ध बंड करवावे लागले नि त्याचे पडसाद लंडनमध्येही उमटले. विधवाविवाहाला उत्साहाने उत्तेजन देतांना त्यांना लोकनिंदा सहन करावी लागली. त्या काळच्या सुशिक्षित सुधारकांना जोतीरावांचा पाठिंबा असे. पण कृतीची वेळ येताच बहुतेक प्रसंगी ते लोक कचखाऊ ठरत, म्हणून त्यांच्याविरुद्ध जोतीरावांचा विशेष कटाक्ष दिसतो. जातिभेदाबाबत त्यांची भूमिका सडेतोड होती, उच्च वर्णीय सुधारक या प्रश्नाला प्रायः बगल देत; वा त्याची उपेक्षा करीत. जोतीरावांची अशी भूमिकाच होती की, जातिभेदाचे निर्मूलन झाल्याशिवाय तत्कालीन राष्ट्रसभेने पुढे ठेवलेले एकराष्ट्रीयत्वाचे (One Nation) ध्येय प्रत्यक्षात उतरणे सुतराम् अशक्य आहे. जो आपल्या धर्मबांधवांना आणि देशबांधवांना समान मानीत नाही, तो देशभक्त कसला, असा त्यांचा मूलभूत सवाल होता.

भारतात कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासाठी त्यांनीच प्रथम टाहो फोडला. स्त्रीशूद्रांच्या शिक्षणाची सुधारलेल्या इंग्रजी राज्यांतही परवड होत आहे, हे त्यांनीच प्रथम मांडले. शिक्षण हे वरिष्ठ वर्गातून झिरपत झिरपत कनिष्ठ वर्गापर्यंत पोहोचेल, या तत्त्वाला त्यांचा विरोध होता. तसेच स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे, 'गुरूणां माता गरीयसी,' या वचनाची थोरवी त्यांना पटलेली होती. भारतीय परंपरेने स्त्रीशूद्रांना एकाच दावणीत बांधून स्त्रियांना शिक्षणापासून वंचित केले होते, त्यांना अज्ञानांधकारात पिचत ठेवले होते. जोतीरावांनी भारतीय स्त्रीशूद्रांस शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावे, म्हणून सर्वप्रथम जिवाचे रान केले. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत जोतीरावांनी जे युगप्रवर्तक कार्य केले, त्याविषयी तत्कालीन परकी सरकारनेही त्यांचा सत्कार केला. हे त्यांनी १८५२ साली केले, हे येथे ध्यानात घेणे, अवश्य आहे. तेव्हा न्या. रानडे हे केवळ दहा वर्षांचे होते. सामाजिक सुधारणेचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर आणि स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे

यांच्यासारख्या अबलोन्नतीसाठी पुढील काळात झटलेल्या सुधारकांचा तेव्हा जन्मही झालेला नव्हता. उभ्या भारतात स्त्रीशूद्रांच्या उद्धारकार्याचा श्रीगणेशा जोतीरावांनीच केला. समाज-सुधारणेचा असा हा गजर प्रथम महाराष्ट्रात झाला. त्यांच्या या कार्यारंभाने महाराष्ट्रात नवयुगाची सुप्रभात झाली; एवढेच नव्हे, तर त्यांतूनच भारतीय समाजक्रांतीला प्रारंभ झाला, असे म्हणणे भाग आहे.

शूद्रातिशूद्रांवर विद्या शिकण्याबाबत जी आटोकाट बंदी शतकानुशतके घालण्यात आलेली होती, ती त्यांच्या दुरवस्थेचे आदिकारण होय, असे जोतीरावांचे विचारपूर्वक बनलेले मत होते. इंग्रजी राज्यामुळे या शतकानुशतकांच्या अन्यायाचे परिमार्जन होण्याची संधि प्राप्त झाली होती. पूर्वीच्या सामाजिक चौकटींत ज्या प्रकारची धार्मिक पिळवणूक, सामाजिक विषमता नि अन्याय ही अंगभूत होती, तशी ती नव्या राजवटीत नव्हती. नव्या राजवटीत समानसंधीला वाव होता, शूद्रातिशूद्रांना स्वतःची उन्नती करून घेण्याची आशा निर्माण झाली होती. त्यामुळे इंग्रजी राज्याविषयीची कृतज्ञता त्यांनी अनेकदा व्यक्त केलेली आहे. मात्र त्यावरून जोतीराव हे इंग्रजधार्जिणे होते, असे मुळीच म्हणता येणार नाही. ब्रिटिश राज्य आज ना उद्या जाणार आहे, असे त्यांनी स्पष्टपणे म्हणून ठेविले आहे. ब्रिटिश महाराज्यपालाच्या भेटीप्रीत्यर्थ पुणे नगरपालिकेने खर्च करू नये, असे विरोधी मत, एकंदर बत्तीस सभासदांपैकी एकट्या जोतिरावांनीच व्यक्त केलेले होते. मंडईच्या नव्या इमारतीस 'रेमार्केट' असे तत्कालीन राज्यपालांचे नाव देण्यात आले, तरीसुद्धा त्या इमारतीस असलेला जोतीरावांचा सक्त विरोध थांबला नाही; त्यामुळे ब्रिटिश अधिकारी त्यांच्यावर रुष्ट व्हायचे, ते झालेच. तेव्हा निस्पृहता आणि निर्भयता हे त्यांच्या आंगचे गुण ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बाबतीतही कसे अबाधित होते, याची साक्ष पटल्यावाचून राहात नाही. ड्यूक ऑफ कनॉट यांच्या सत्कारप्रसंगी त्यांनी केलेले भाषण संस्मरणीय आहे. "आपल्यासमोर रेशमी कपडे नि अलंकार परिधान केलेले श्रीमंत, सरदार नि जहागिरदार पाहून रयतेविषयी आपण मत बनवू नये. खरा हिंदुस्थान पहावयाचा असेल, तर मजबरोबर खेड्यात चला," असे त्यांनी युवराजांना स्पष्टपणे सांगितले.

जोतीरावांनी जातिसंस्था, परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक, आणि आर्थिक विषमता यांविरुद्धच कार्य केले, असे नाही; तर शिक्षणक्षेत्रातही त्यांनी मोलाचे कार्य केले. हंटर-शिक्षण-आयोगाला त्यांनी जे निवेदन सादर केले, त्यांत त्यांची शैक्षणिक मते स्पष्ट झालेली आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे, ही मागणी करणारे जोतीराव हे पहिले भारतीय होत. प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनात वाढ करावी, कनिष्ठ वर्गीयांतील शिक्षक तयार करावे, खेड्यांतील मुलांना शेतकीचे आणि तांत्रिक शिक्षण द्यावे, शेतकीच्या प्रत्यक्ष शिक्षणासाठी 'आदर्श शेता'ची योजना आंखावी, अशा मौलिक सूचना या निवेदनात त्यांनी केलेल्या आहेत. आपल्या राष्ट्राच्या भाषेचा प्रश्नही त्यांच्या दूरदृष्टीतून सुटलेला नव्हता. मातृभाषा (मराठी), हिंदी आणि इंग्रजी, असा त्रिभाषासूत्राचाच तोडगा त्यांनी सुचविलेला होता.

'शेतकऱ्याचा असूड' हा जोतीरावांचा ग्रंथ अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्याच्या अवनतस्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्या अवनतस्थितीची मूलगामी मीमांसा

घातला, तर 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' लिहून त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानमंदिरावर विधायक स्वरूपाचा कळस चढविला.

जोतीरावांनी त्या विषम काळात अस्पृश्यांचे दुःख ज्या आत्मीयतेने वेशीवर टांगले, ती आत्मीयता खरोखर असामान्य म्हटली पाहिजे. जोतीराव हे अस्पृश्य वर्गापैकी नव्हते; ते माळी समाजातले होते. त्या काळच्या मानाने त्यांचे शिक्षणही व्यवस्थित झालेले होते. चार लब्ध-प्रतिष्ठितांप्रमाणे लोकक्षोभाला भिऊन त्यांनी मध्यमक्रम स्वीकारला असता, तर समाजाने त्यांना डोक्यावर घेतले असते. पण शतकानुशतके माणुसकीला पारख्या झालेल्या समाजाविषयीची त्यांची करुणा जातिवंत होती. अस्पृश्यांना आणि अन्य पददलितांना ते आपल्या कुटुंबातलेच, आपल्या रक्तामांसाचे मानीत. जातिभेद आणि चातुर्वर्ण्य या संस्था त्यांना सर्वस्वी अमान्य होत्या. त्यामुळे अस्पृश्यांची अस्पृश्यता काढून टाकून, त्यांना पंचम वर्ग म्हणावे; की दुसरे काही नाव द्यावे, असा पर्याय वा पळवाट त्यांच्या समानतेच्या तत्त्वज्ञानात बसण्यासारखी नव्हती.

जोतीरावांनी अंगिकारलेल्या कित्येक सुधारणा आज समाजाने स्वीकारल्या आहेत. स्त्रीशिक्षणा-विषयी आता मतभेद राहिलेले नाहीत. पतित स्त्रियांचा उद्धार आणि अनाथ अर्भकांचे संवर्धन यांविषयी त्यांनी घालून दिलेला आदर्श आज समाजाने पचवून टाकलेला आहे. केशवपनाचा प्रश्न आज गतार्थ झाला आहे. पण त्या काळी त्यांना नापितांकडून केशवपनाविरुद्ध बंड करवावे लागले नि त्याचे पडसाद लंडनमध्येही उमटले. विधवाविवाहाला उत्साहाने उत्तेजन देतांना त्यांना लोकनिंदा सहन करावी लागली. त्या काळच्या सुशिक्षित सुधारकांना जोतीरावांचा पाठिंबा असे. पण कृतीची वेळ येताच बहुतेक प्रसंगी ते लोक कचखाऊ ठरत, म्हणून त्यांच्याविरुद्ध जोतीरावांचा विशेष कटाक्ष दिसतो. जातिभेदाबाबत त्यांची भूमिका सडेतोड होती, उच्च वर्णीय सुधारक या प्रश्नाला प्रायः बगल देत; वा त्याची उपेक्षा करीत. जोतीरावांची अशी भूमिकाच होती की, जातिभेदाचे निर्मूलन झाल्याशिवाय तत्कालीन राष्ट्रसभेने पुढे ठेवलेले एकराष्ट्रीयत्वाचे (One Nation) ध्येय प्रत्यक्षात उतरणे सुतराम् अशक्य आहे. जो आपल्या धर्मबांधवांना आणि देशबांधवांना समान मानीत नाही, तो देशभक्त कसला, असा त्यांचा मूलभूत सवाल होता.

भारतात कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासाठी त्यांनीच प्रथम टाहो फोडला. स्त्रीशूद्रांच्या शिक्षणाची सुधारलेल्या इंग्रजी राज्यांतही परवड होत आहे, हे त्यांनीच प्रथम मांडले. शिक्षण हे वरिष्ठ वर्गा-तून झिरपत झिरपत कनिष्ठ वर्गापर्यंत पोहोचेल, या तत्त्वाला त्यांचा विरोध होता. तसेच स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे, 'गुरूणां माता गरीयसी,' या वचनाची थोरवी त्यांना पटलेली होती. भारतीय परंपरेने स्त्रीशूद्रांना एकाच दावणीत बांधून स्त्रियांना शिक्षणापासून वंचित केले होते, त्यांना अज्ञानांधकारात पिचत ठेवले होते. जोतीरावांनी भारतीय स्त्रीशूद्रांस शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावे, म्हणून सर्वप्रथम जिवाचे रान केले. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत जोतीरावांनी जे युगप्रवर्तक कार्य केले, त्याविषयी तत्कालीन परकी सरकारनेही त्यांचा सत्कार केला. हे त्यांनी १८५२ साली केले, हे येथे ध्यानात घेणे, अवश्य आहे. तेव्हा न्या. रानडे हे केवळ दहा वर्षांचे होते. सामाजिक सुधारणेचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर आणि स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे

यांच्यासारख्या अबलोन्नतीसाठी पुढील काळात झटलेल्या सुधारकांचा तेव्हा जन्मही झालेला नव्हता. उभ्या भारतात स्त्रीशूद्रांच्या उद्धारकार्याचा श्रीगणेशा जोतीरावांनीच केला. समाज-सुधारणेचा असा हा गजर प्रथम महाराष्ट्रात झाला. त्यांच्या या कार्यारंभाने महाराष्ट्रात नवयुगाची सुप्रभात झाली; एवढेच नव्हे, तर त्यांतूनच भारतीय समाजक्रांतीला प्रारंभ झाला, असे म्हणणे भाग आहे.

शूद्रातिशूद्रांवर विद्या शिकण्याबाबत जी आटोकाट बंदी शतकानुशतके घालण्यात आलेली होती, ती त्यांच्या दुरवस्थेचे आदिकारण होय, असे जोतीरावांचे विचारपूर्वक बनलेले मत होते. इंग्रजी राज्यामुळे या शतकानुशतकांच्या अन्यायाचे परिमार्जन होण्याची संधि प्राप्त झाली होती. पूर्वीच्या सामाजिक चौकटीत ज्या प्रकारची धार्मिक पिळवणूक, सामाजिक विषमता नि अन्याय ही अंगभूत होती, तशी ती नव्या राजवटीत नव्हती. नव्या राजवटीत समानसंधीला वाव होता, शूद्रातिशूद्रांना स्वतःची उन्नती करून घेण्याची आशा निर्माण झाली होती. त्यामुळे इंग्रजी राज्याविषयीची कृतज्ञता त्यांनी अनेकदा व्यक्त केलेली आहे. मात्र त्यावरून जोतीराव हे इंग्रजधार्जिणे होते, असे मुळीच म्हणता येणार नाही. ब्रिटिश राज्य आज ना उद्या जाणार आहे, असे त्यांनी स्पष्टपणे म्हणून ठेविले आहे. ब्रिटिश महाराज्यपालाच्या भेटीप्रीत्यर्थ पुणे नगरपालिकेने खर्च करू नये, असे विरोधी मत, एकंदर बत्तीस सभासदांपैकी एकट्या जोतिरावांनीच व्यक्त केलेले होते. मंडईच्या नव्या इमारतीस 'रेमार्केट' असे तत्कालीन राज्यपालांचे नाव देण्यात आले, तरीसुद्धा त्या इमारतीस असलेला जोतिरावांचा सक्त विरोध थांबला नाही; त्यामुळे ब्रिटिश अधिकारी त्यांच्यावर रुष्ट व्हायचे, ते झालेच. तेव्हा निस्पृहता आणि निर्भयता हे त्यांच्या आंगचे गुण ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बाबतीतही कसे अबाधित होते, याची साक्ष पटल्यावाचून राहात नाही. ड्यूक ऑफ कनॉट यांच्या सत्कारप्रसंगी त्यांनी केलेले भाषण संस्मरणीय आहे. "आपल्यासमोर रेशमी कपडे नि अलंकार परिधान केलेले श्रीमंत, सरदार नि जहागिरदार पाहून रयतेविषयी आपण मत बनवू नये. खरा हिंदुस्थान पहावयाचा असेल, तर मजबरोबर खेड्यात चला," असे त्यांनी युवराजांना स्पष्टपणे सांगितले.

जोतीरावांनी जातिसंस्था, परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक, आणि आर्थिक विषमता यांविरुद्धच कार्य केले, असे नाही; तर शिक्षणक्षेत्रातही त्यांनी मोलाचे कार्य केले. हंटर-शिक्षण-आयोगाला त्यांनी जे निवेदन सादर केले, त्यांत त्यांची शैक्षणिक मते स्पष्ट झालेली आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे, ही मागणी करणारे जोतीराव हे पहिले भारतीय होत. प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनात वाढ करावी, कनिष्ठ वर्गीयांतील शिक्षक तयार करावे, खेड्यांतील मुलांना शेतकीचे आणि तांत्रिक शिक्षण द्यावे, शेतकीच्या प्रत्यक्ष शिक्षणासाठी 'आदर्श शेता'ची योजना आंखावी, अशा मौलिक सूचना या निवेदनात त्यांनी केलेल्या आहेत. आपल्या राष्ट्राच्या भाषेचा प्रश्नही त्यांच्या दूरदृष्टीतून सुटलेला नव्हता. मातृभाषा (मराठी), हिंदी आणि इंग्रजी, असा त्रिभाषासूत्राचाच तोडगा त्यांनी सुचविलेला होता.

'शेतकऱ्याचा असूड' हा जोतीरावांचा ग्रंथ अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्याच्या अवनतस्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्या अवनतस्थितीची मूलगामी मीमांसा

केली आहे आणि ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजनाही सुचविली आहे. जमिनींची सुधारणा कशी करावी, धरणे, पाट-बंधारे कोठे बांधावे, गुरांची उत्तम निपज कशी करावी, जमिनींची धूप थांबविण्यास काय करावे, शांततेच्या काळात शेतीसुधारणेच्या विधायक कार्यासाठी सैनिकांचा उपयोग कसा करता येईल, अन्य सुधारलेल्या राष्ट्रांत शेती कशी केली जाते, याचे शिक्षण देऊन भारतीय शेतकऱ्यांच्या मुलांना परदेशात पाठवून आणणे कसे अगत्याचे आहे, शेतकीची वार्षिक प्रदर्शने भरवून उत्तम पीक काढणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिके देणे कसे उपकारक ठरणारे आहे, यांसारख्या विधायक सूचनांबरोबरच, शेतांतून चोऱ्या झाल्यास पोलिसांना दंड का केला पाहिजे, वाढीदिढी करणाऱ्या सावकार-व्यापाऱ्यांवर करडी नजर कशी ठेवली पाहिजे, ब्रिटिश भांडवलदारांचे अवाच्या सवा व्याज का बंद केले पाहिजे, शेतीस अवश्य असलेल्या पशुधनाच्या रक्षणासाठी गोवधबंदी कशी आवश्यक आहे, शेतकऱ्यांच्या मुलांचा नैतिक अधःपात होऊ नये, म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत, अशांसारख्या संरक्षक सूचनाही या ग्रंथात अनेक आहेत. या सूचनांतील अनुभवी सूक्ष्मपणा ध्यानात घेतला, म्हणजे जोतीरावांच्या पारदर्शक दृष्टीचा पुरेपूर प्रत्यय येतो.

सर्वस्वी कंगाल बनलेल्या शेतकऱ्यात असंतोष माजू नये, म्हणून शेतकऱ्याला संरक्षण देण्याच्या दृष्टीने इंग्रज सरकार जे कायदे करीत होते, त्यांचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा, म्हणून जोतीराव जागरूक असत. तत्कालीन सार्वजनिक सभेसारख्या संस्था आणि प्रागतिक वृत्तपत्रे, एकीकडे शेतकऱ्यांविषयी शाब्दिक सहानुभूती दर्शवीत; पण प्रत्यक्षात मात्र सावकार आणि जमीनदार यांच्या बाजूचेच समर्थन करीत. हार्ट डेव्हिसने पुढे मांडलेल्या 'इन्सॉल्व्हन्सी' विधेयकावर प्रागतिक इंदुप्रकाशने विरोधी टीकाच केली होती. या प्रागतिक म्हणविणाऱ्या मंडळींनाही अशा कायद्यांमधून समाजवादाचे भूत भेडसावीत होते. भारतीय शेतकऱ्याच्या दुःखाला जोतीरावांनी वाचा फोडली. त्यांनी कामगारवर्गाचे दुःखही वेशीवर टांगले. जोतीरावांच्या तालमीत तयार झालेल्या सत्यशोधक समाजाच्या पुढाऱ्यांनीच भारतीय कामगारचळवळीस प्रारंभ केला, हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

सत्यशोधक चळवळ हीच भारतातील खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेली पहिली चळवळ होती, हेही सत्य इतिहासाला नमूद करावे लागेल. ही चळवळ म्हणजे खेडुतांना शिक्षण नि ज्ञान देऊन, त्यांच्या ठायी वसत असलेली अज्ञानाची नि पूर्वग्रहांची जळमटे झटकून टाकून, आधुनिक संस्कृतीचे आणि ज्ञानाचे लोण त्यांच्यापर्यंत पोहोचविणारी एक सामाजिक प्रबोधिनी होती. जोतीरावांच्या काळी सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप नव्हते. जोतीरावांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केला नाही. शासनसंस्था, आर्थिक व्यवहारांची साधने, सामाजिक आणि धार्मिक सत्ता ही सर्व ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे त्या चळवळीचे स्वरूप वरवर पाहता ब्राह्मणेतरी आहे, असे दिसे. जोतीरावांच्या काळानंतर अनेक वर्षांनी त्या चळवळीला ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

जोतीरावांची भाषा रांगडी आणि तिखट आहे. पल्लेदार आणि गुंतागुंतीची वाक्ये लीलेने पेलीत आणि जळजळीत विशेषणांचे चमकारे ओढीत ती घोडदौड करीत पुढे जाते. त्यांच्या कार्याच्या क्रांतिकारकत्वाची आणि लेखणीच्या बोचक धारदारपणाची प्रतिक्रिया आपणास निबंधमालाकारांच्या त्यांच्यावरच्या टीकेत पाहायला सांपडते. मालाकारांच्या लेखणीचे कर्तृत्व आणि स्फूर्तिदायकत्व अजोड

होते. त्यामुळे त्यांच्या जोतीरावांवरील टीकेचीच छाप काही काळपर्यंत महाराष्ट्राच्या मनावर बसलेली होती आणि साहजिकच जोतीरावांच्या कार्याविषयीचे गैरसमज वाढीस लागलेले होते. परंतु मालकारांच्या विचारसरणीत सामाजिक दृष्टिकोणाचा आणि मानवी मूल्यांचा अभाव होता, ही गोष्ट आता उघड झालेली आहे. मालाकारांवर जोतीरावांनी फारसे काही लिहिलेले नाही, त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी जो एकमेव उल्लेख जोतीरावांच्या लेखनात येतो, तो त्यांना भलेपणा देणाराच आहे, ही गोष्ट येथे स्पष्ट केली पाहिजे.

जोतीरावांनी पददलितांची सुखदुःखे आपली मानली. त्यांच्या राहणीशी ते समरस झाले. त्यांनी शेतकरी आणि नापितांचे संप घडवून आणले. त्यांच्यामध्ये मिळून मिसळून त्यांच्यात जागृती केली. दलितांमध्ये जातीने जीवन कंठण्यास जाण्याची त्यांची सिद्धता, सत्यमेव जयते हा त्यांचा घोष, अस्पृश्यतेच्या निर्मूलनाचा त्यांनी उचललेला विडा, हातातील काठी, साधे कपडे यांवरून ते काही बाबतीत महात्मा गांधींचे अग्रगामी होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सारांश, जोतीराव हे महारमांगादी अस्पृश्य गणल्या गेलेल्या पददलितांचे पहिले उद्धारक, पाच हजार वर्षांच्या भारताच्या इतिहासात मुलींसाठी शाळा स्थापन करणारे पहिले भारतीय म्हणून भारतीय स्त्रीशिक्षणाचे जनक, स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आणि हक्कांचे उद्गाते, शेतकरी नि कामकरी यांच्या दुःखाचे नि दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे पहिले पुढारी आणि चातुर्वर्ण्य आणि जातिभेद या संस्थांवर कडाडून हल्ला चढवून, मानवी समानतेची घोषणा करणारे पहिले लोकनेते होते. आधुनिक भारताचे ते पहिले महात्मा आणि 'सत्यमेव जयते' या दिव्य तेजाने भारलेले पहिले सत्यशोधक होत. अशा या नररत्नाचा गौरव म. गांधींनी 'खरा महात्मा' म्हणून करावा, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना 'समाजक्रांतिकारक' म्हणून प्रशंसावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध नि कबीर यांच्याबरोबर त्यांना गुरुत्वाची पदवी अर्पण करावी, यांतच त्यांच्या थोरवीची भव्यता दिसून येते. 'भारतीय समाजक्रांतीचे जनक' आणि 'भारतातील सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेषित' असा त्यांचा थोडक्यात पण सार्थ उल्लेख करता येईल.

जोतीराव हे एक महान ध्येय आहे, महान स्वप्न आहे. लोकशाही ही मानवी समानतेवर, बंधुतेवर आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित असली पाहिजे. जसजसे मानवी समानतेचे तत्त्व भारतीय समाजाच्या अंगी बाणेल, तसतशी भारतीय लोकशाही अभेद्य आणि अभंग होईल. मला जे अधिकार आहेत, ते माझ्या अन्य देशबांधवांनाही असलेच पाहिजेत, असे जेव्हा भारतीय जनपद म्हणू लागेल, तेव्हाच जोतीरावांच्या समग्र ग्रंथात त्यांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले, असे यथार्थपणे म्हणता येईल.

काही किरकोळ गोष्टींचे स्पष्टीकरण येथे केले पाहिजे. जोतीराव हे आपले नाव 'जोतीराव' असेच लिहीत, ग्रंथांवरही तसेच प्रसिद्ध करीत. त्यांनी 'ज्योतीराव' किंवा 'ज्योतीबा' अशी स्वाक्षरी

केल्याचे आढळत नाही. ते मॅट्रिक झाले होते, असा उल्लेख केला जातो; पण तो बरोबर नाही. मॅट्रिकची परीक्षा घेणारे मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले. जोतीरावांनी १८४८ सालीच विद्यार्जन संपवून आपल्या जीवितकार्याला प्रारंभ केलेला होता. जोतीरावांची जन्मतिथी उपलब्ध नाही. त्यांच्या नातलगांपैकी एक वृद्धा सांगत असे, "जोतिबा म्हणत असत की, शनिवारवाडा जळाला, त्याच्या आदल्या दिवशी आपण जन्मलो." ही माहिती खरी असेल, तर त्यांचा जन्मदिन २० फेब्रुवारी १८२८ हा असावा, असे मानता येईल. पुढेमागे कोणा संशोधकास अधिकृत पुरावा मिळाल्यास त्याला दुजोरा मिळेल, म्हणून हे येथे ग्रंथित करून ठेवण्यात येत आहे. परिशिष्ट म्हणून दिलेल्या कालपटात अधिकृत पुराव्याच्या अभावी आम्ही १८२७ हे रूढ जन्मवर्ष गृहीत धरले आहे. या समग्र वाङ्मयातील शिवाजी महाराजांचा 'पवाडा', जोतीरावांनी 'परमहंस सभेचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्ण राणे' यांना अर्पण केलेला आहे. परंतु त्यांचे नाव, राम बाळकृष्ण 'जयकर' असे होते. तेव्हा 'राणे' हे आडनाव चुकीने पडलेले दिसते. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथनामात 'आसूड' असे प्रचलित रूप नाही. याचे कारण त्या ग्रंथाच्या हस्तलिखितावर मोठ्या अक्षरात 'असूड' असे शीर्षकवजा लिहिलेले आहे आणि मामा परमानंद यांना लिहिलेल्या पत्रातही तसाच उल्लेख आहे. जोतीराव आपल्या अभंगांना 'अखंड' म्हणून संबोधतात. त्यांची काही पद्यरचना शाहिरी धर्तीची असली, तरी बरीचशी स्फुट रचना मराठी संतपरंपरेतील 'अभंग' वृत्तातच आहे. मात्र मानवता, सद्विवेक, सदाचार, समता यांतून सार्वजनिक सत्य सांगणारा आपला वेगळा आशय स्पष्ट व्हावा, म्हणून वेगळीक सुचविणारे 'अखंड' असे अन्वर्थक अभिधान त्यांनी योजिलेले दिसते.

जोतीराव फुल्यांच्या समग्र वाङ्मयापैकी काही ग्रंथ पुनर्मुद्रित झालेले असल्यामुळे आम्हाला उपलब्ध होते. तथापि, ते मूळ स्वरूपात पुनर्मुद्रित झालेले नव्हते. त्यामुळे शक्यतो त्यांच्या ग्रंथांच्या पहिल्या आवृत्त्या मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कामी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे मराठी संशोधनमंडळ आणि पुणे येथील प्रादेशिक ग्रंथालय यांचे आम्हाला बहुमोल साहाय्य झाले. या उभय संस्थांच्या ग्रंथपालांचे आम्ही आभारी आहो. म. फुले यांच्या चरित्राची जुळवाजुळव करीत असताना पुष्कळशी सामग्री आणि साधने श्री. धनंजय कीर यांनी कष्टपूर्वक गोळा करून जतन करून ठेवली होती. या साधनांपैकी काही श्री. पंढरीनाथ सीताराम पाटील यांच्यासारख्या थोर जोतिबाभक्ताने पुरविली होती. विशेषतः त्यांच्या साहाय्याविना जोतीरावांच्या अखंडांतील अमोल बोल अबोलच राहिले असते. तेव्हा श्री. पंढरीनाथ पाटील यांचे ऋण आम्ही प्रकटपणे मान्य करतो. त्याचबरोबर हा ग्रंथ खराखुरा 'समग्र' व्हावा, यासाठी नामदार बाळासाहेब देसाई यांनी दाखविलेली कळकळ आम्ही विसरू शकत नाही. प्रा० गं० बा० सरदार आणि प्रा० राम पटवर्धन यांनी अनुक्रमे 'सत्सार क्र. १ (अपूर्ण)' आणि 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधि' ह्या स्वतःपाशी असलेल्या दुर्मिळ पुस्तिका आम्हाला आनंदाने उपलब्ध करून दिल्या, त्याबद्दल आम्ही त्यांचेही ऋणी आहोत. महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृति मंडळ या संस्थेचे प्रमुख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या ग्रंथाच्या प्रकाशनासंबंधी जी प्रथमपासून आस्था दाखविली, तीबद्दल त्यांचे आभार मानणे आमचे कर्तव्यच आहे. मौज मुद्रणालयाचे

श्री. विष्णुपंत भागवत आणि त्यांचे सहकारी यांनी मुद्रणाच्या बाबतीत दाखविलेल्या आपुलकीबद्दल त्यांचेही आभार मानावे तेवढे थोडेच.


महात्मा फुले यांच्या जीवनाचा कालपट, त्यांचे हस्ताक्षर, त्यांच्या अद्याप अनुपलब्ध राहिलेल्या वाङ्मयाची माहिती, निवडक संदर्भसूची आणि शब्दसूची देऊन या ग्रंथाचे संपादन, सर्वसामान्य वाचक आणि विशेष अभ्यासक या उभयतांनाही उपयुक्त व्हावे, असा आम्ही यथाशक्ती प्रयत्न केलेला आहे. ग्रंथसंहिता मूळची ठेविली आहे. अर्थबोधाच्या दृष्टीने अडचण पडू नये म्हणून विरामचिन्हांबाबत मात्र आम्ही स्वातंत्र्य घेतले आहे. क्वचित एखाददुसरा शब्द चौपटी कसात देऊन न्यून पूर्ण करून घ्यावे लागले आहे.


ज्ञानेश्वर, तुकाराम, महात्मा गांधी यांच्यासारख्यांचे ग्रंथ हे समाजाचे विचारधन आहे, असे मानून ते जनतेला स्वल्पात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम महाराष्ट्र शासनाने चालविलेला आहे. जोतीराव फुले यांचे ग्रंथही समाजाचे विचारधन आहे, असे मानून पुनर्मुद्रित केल्याबद्दल मराठी जनतेला संतोषच वाटेल. जनताजनार्दनासाठी आरंभिलेल्या या स्तुत्य उपक्रमात सहभागी होता आले, याविषयी आम्हाला कृतज्ञता आणि कृतार्थता वाटत आहे.

**धनंजय कीर**

**स. गं. मालशे**

## म० फुले यांचे मोडी हस्ताक्षर





मामा परमानंद यांस लिहिलेले पत्र (पृ० ३२५-३२६)

# अनुक्रमणिका

| | | पृ० |
|---|---|---|
| १. | छत्रपति शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा | १–३८ |
| २. | ब्राह्मणांचें कसब | ३९–६३ |
| ३. | गुलामगिरी | ६४–१५० |
| ४. | सत्यशोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकीगत | १५१–१६४ |
| ५. | दुष्काळविषयक विनंतीपत्रक | १६५–१६६ |
| ६. | हंटर–शिक्षणआयोगापुढे सादर केलेलें निवेदन | १६७–१८२ |
| ७. | शेतकऱ्याचा असूड | १८३–२७२ |
| ८. | ग्रामजोश्यांसंबंधीं जाहीर खबर | २७३–२७६ |
| ९. | सत्सार, अंक १ | २७७–२८८ |
| १०. | सत्सार, अंक २ | २८९–३०४ |
| ११. | मराठी ग्रंथकारसभेस पत्र | ३०५–३०८ |
| १२. | इशारा | ३०९–३२२ |
| १३. | मामा परमानंद यांस पत्र | ३२३–३२६ |
| १४. | सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजाविधि | ३२७–३३९ |
| १५. | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक | ३४१–४४२ |
| १६. | अखंडादि काव्यरचना | ४४३–५०२ |
| १७. | परिशिष्टे | |
| | *क्र. १ : महात्मा फुले यांचे अनुपलब्ध लेखन* | ५०५–५०७ |
| | *क्र. २ : हंटर–शिक्षणआयोगापुढे सादर केलेले निवेदन (मराठी भाषांतर)* | ५०८–५१८ |
| | *क्र. ३ : कै. जोतीराव गोविंदराव फुले यांच्या चरित्राचा कालपट* | ५१९–५२० |
| | *क्र. ४ : निवडक संदर्भसूची* | ५२१–५३२ |
| | *क्र. ५ : निवडक शब्दांचा कोश* | ५३३–५४८ |

१

# छत्रपति शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ वि: ........
क्रमांक ........................ नोंद दि: ........

# LIFE OF SHIVAJI,

## IN POETICAL METRE.

BY

JOTIBA GOVINDRAO PHULE.

# पवाडा

## छत्रपति शिवाजी राजे भोसले

यांचा,

जोती गोविंदराव फुले यांनी

लोकहितार्थ केला;

तो

मुंबईंत

" ओरिएन्टल " छापखान्यांत छापिला.

सन १८६९.

हें पुस्तक मुंबईंत रा० वासुदेव बाबाजी नवरंगे, नंबर २९, काळबादेवीचा रस्ता, यांच्या दुकानीं, व पुण्यांत वेताळ पेठेंत पुस्तककर्त्याच्या दुकानीं मिळतें. किंमत साहा आणे.

[ प्रथमावृत्तींतील मुखपृष्ठाचें यथामूल मुद्रण]

TO THE MEMORY

OF

RAO BAHADUR RAMCHANDRA BALKRISHNAJI

President of Param Hans Sabha,

Late Assistant Commissioner of Customs

and

Justice of the Peace,

This small book is inscribed,

As a mark of Profound Respect

And a Testimony of Sincere

Affection

by

The Author

[पहिल्या आवृत्तींतील इंग्रजी अर्पणपत्रिका]

कैलासवासी रावबहादूर

# रामचंद्र बाळकृष्णजी राणे

परमहंस सभेचे अध्यक्ष,

कस्टम खात्याचे माजी असिस्टंट कमिशनर,

आणि

मुंबईचे जस्टिस आफ दी पीस

ह्याच्या स्मरणार्थ

हा लहानसा पवाडा

त्यांच्या कर्त्याने

परम प्रीतीने व आदराने

अर्पण केला

असे.

मुक्काम पुणें,

ज्यून, सन १८६९.

[पहिल्या आवृत्तीची अर्पणपत्रिका]

## अभंग

अति महारथी क्षत्रियाचा बाळ ॥ यवनाचा काळ त्रेतायुगीं ॥ १ ॥

स्वभावें तो शूर रणीं भीडणार ॥ लढे अनिवार देशासाठीं ॥ २ ॥

परशरामासीं झोंबें महाबळी ॥ एकवीस वेळीं लागोपाठ ॥ ३ ॥

अशा महावीरा ह्मणे महाअरी ॥ धाकें थरथरी द्विजसूत ॥ ४ ॥

बोधी शिऊं नका मोड झाल्यावर ॥ ह्मणा माहाआर मांग त्यास ॥ ५ ॥

भित्रा सूड घेई जिंकिल्या शत्रूचा ॥ पूत कृतघ्नाचा सर्प जैसा ॥ ६ ॥

चिरंजीव आहे आणा पाचारूनी ॥ पाहा तपासूनी जोतीपुढें ॥ ७ ॥

# प्रस्तावना

शिवाजीराजाच्या ह्या पवाड्याचे आठ भाग केले आहेत. दरएक भागांत विषयांतर होऊं नये ह्या भयास्तव सर्व भाग एकसारखे केले नाहींत. अति जुनाट यवनी व मेसर्स ग्रांडफ, मरी वगैरे इंग्रज लोकांच्या बहुतेक लेखी आधारावरून हा पवाडा केला आहे. कुणबी, माळी, माहार, मांग वगैरे पाताळीं घातलेल्या क्षत्र्यांच्या उपयोगीं हा पवाडा पडावा असा माझा हेतु आहे. लांबच लांब मोठाले संस्कृत शब्द मुळींच घातले नाहींत. व जेथें माझा उपाय चालेना तेथें मात्र लहानसहान शब्द निर्वाहापुरते घेतले आहेत. माळी कुणब्यांस समजण्याजोगी सोपी भाषा होण्याविषयीं फार श्रम करून त्यांस आवडण्याजोग्या चालीनें रचना केली आहे. जगत्कर्ता भगवान सर्व जगाचा चाळक आणि तोच सर्वांचा बुद्धिदाता आहे. त्यालाच आह्मा शूद्रांची दया आल्यावरून त्यानें आपल्या परमप्रिय इंग्रज लेंकरास राजा करून आह्मां क्षत्रियांस ब्रह्मराक्षसाच्या दाढेंतून ओढून काढण्याकरितां हिंदुस्थानांत पाठविलें आहे. व हे दयाळु इंग्रज लोक आम्हा गांजलेल्या अज्ञानी लोकांस खरें ज्ञान शिकवूं लागल्यामुळें ब्राह्मणानीं बनविलेल्या मतलबी कूटापासून स्वतंत्र होण्याचे नेहमीं आमच्या मनांत डोहळे होऊं लागले आहेत. ब्राह्मणाच्या कूटाविषयीं थोडासा येथें मासला लिहितों; तो येणेंप्रमाणें—

ह्या जगांतील सर्व देशांचे इतिहास एकमेकांसीं ताडून पाहातां या हिंदुस्थानांत मात्र ब्राह्मणांनीं आपल्यास मोठ्या दिमाखानें उंच मानून परभू, कुणबी, माळी, मांग आणि महार इत्यादि, जातीचे हाडवैरी असल्याप्रमाणें त्यांचा मनापासून द्वेष करून त्यांस इतकें नीच मानण्यांचें कारण काय असावें असें माझ्या मनांत नेहमी घोळत होतें. याविषयीं इतर भाषेंतील ग्रंथांवरून व ब्राह्मणाच्या एकंदर शूद्रांसीं आचरणावरून असें सिद्ध होतें कीं, ब्राह्मण लोकांचा या देशासीं कांहींच संबंध नसतां ब्राह्मणांनीं केवळ लोभानें या देशांत एकाएकीं लागोपाठ हल्ले करून ज्या ज्या वेळीं जे जे लोक या क्षेत्रीं हल्ल्यामध्यें सांपडले त्यांस कैद करून ब्रह्मराजानें त्या सर्वांचे दास केले व त्यांनीं तसेंच चिरकाळ ब्राह्मणांच्या दास्यत्वांत रहावें ह्मणून पुन्हा त्याच ब्रम्ह्यानें सत्तेच्या मदानें कायदे करून त्यांचीं अनेक पुस्तकें करून त्यांत अनेक तऱ्हेचे भेद करून ठेवले. नंतर कांहीं दिवसांनीं वेळ पाहून त्यांस भेद ह्मणण्याचें सोडून वेद ह्मणण्याचा प्रचार घातला असावा. ब्रह्मराजा मरतांच बाकीच्या उरल्या क्षत्रियांनीं ब्राह्मणांच्या हातीं सांपडलेल्या बांधवांस ब्राह्मणांच्या दास्यत्वापासून सोडविण्याविषयीं परशरामासीं एकवीस वेळां इतके निकरानें लढले कीं त्यांचें अखेर महाअरी असें नांव पडलें व त्या शब्दाचा पुढें महार असा अपभ्रंश झाला व त्या महाअरी क्षत्रियांसीं लढतां लढतां परशरामाचे इतके लोक मारले गेले कीं, ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मण विधवा यांचा इतका भरणा वाढला कीं त्यांची नीट रीतीनें व्यवस्था कसी ठेवावी

त्याची मोठी पंचाईत येऊन पडली. शेवटीं अखेरीस ब्राह्मण स्त्रियांचा पुनर्विवाह अगदींच बंद केला तेव्हां थोडेसें लागीं लागल्यासारखें झालें. नंतर दास केलेल्या व महाअरी क्षत्रियांचा अमर्याद द्वेष करून पहिल्यास भेद वाचून पाहाण्याची मनाई व दुसऱ्याचा स्पर्श होऊं न देण्याची वहिवाट चालू करून मनूसारख्या इतर क्रूर राजांनीं मनास मानेल तसीं सूड घेण्याजोगीं ज्यांत ब्राह्मणांचें फक्त हित असीं नवीं नवीं कलमें घरांतल्या घरांत बनवून ग्रंथांचे पोटांत कोंबून कांहीं कालानंतर दास केलेल्या सर्व क्षत्रियांस लटकेंच उठविलें कीं, हे ग्रंथ स्वतां देवाने लिहून ठेविले असे दाखवून मोठा धार्मिकपणाचा डौल घालून त्या दासांच्या मनांत तेंच उत्तरोत्तर विंबविण्याची सुरुवात केली. एवढेंच करून स्वस्थ राहिले असें नाहीं, पण त्यांनीं अखेरीस राहिलेल्या शेषद्वेषाचा सर्प कल्पून त्याचा बिछाना करून त्यावर सच्चिदानंद नारायणाच्या मूर्तीस उताणें पाडून त्याचे बेंबीचा देंठ बाहेर ओढून काढून त्यांचें शेवटीं कमळ करून त्यावर चार तोंडाचा ब्रम्ह्या बसवून हा देवाचा लेंक त्यानें हे सर्व भेद केले, देवाच्या लेंकापुढें कोणाचें काय चालणार अशा नाना प्रकारच्या थोतांडी खोट्या गोष्टी बनवून दास केलेल्या क्षत्रियांस इलुहलु हे ईश्वरदत्त आहेत म्हणून, भासवून शिकवून त्या सर्व क्षत्रियांचीं धर्माच्या थापींनें असीं मानसाचीं कणसें करून टाकलीं आहेत हें सर्वांस माहीतच आहे. यापुढें जनाची तर नाहींच, परंतु मनाचीसुद्धां काडीमात्र लाज न धरितां शूद्र ब्रम्ह्याच्या पायापासून जन्म पावले असें कोठें कोठें ग्रंथांत कोंबून लिहिलें आहे. काय पायापासून शूद्र पुत्र प्रसविणें ही गोष्ट लहान अचंब्याची आहे असें माझ्यानें ह्मणवत नाहीं! परंतु जन्म देणें हा स्त्रियांचा धर्म असून शुद्ध ब्रह्मपुरुषाच्या पायापासून मूल जन्मविण्यानें या जगांत सर्वत्र जो सृष्टिक्रम चालत आला आहे त्याला बाध येतो. तसेंच चालण्याचें काम पायाचें असून त्या पायापासून शुद्र पुत्र जन्मविला व त्याचप्रमाणें ब्रम्ह्याच्या मुखापासून ब्राह्मण जन्मविला असें जर खरें आहे तर ब्रम्ह्याचें मुख इतर दुसरे तत्संबंधी व्यापार करीत होतें असें त्याच्या शिष्यमंडळीस कबूल करावें लागेल. यावरून असें साफ सिध्द होतें कीं चार घरच्या चार पोरी मिळून घरांतल्या घरकुंडांत बराच लटक्यामुटक्यांचा खेळ खेळल्या. असो, याविषयीं जास्ती चिकित्सा करून फटफजीती करीत बसणें त्यापेक्षां त्यांची क्षमा करून बाकीचें सर्व सुज्ञ वाचकांकडे सोपितों. हा लहानसा प्रयत्न सुज्ञ जनांस आवडल्यास आणखी याच मासल्याचे, पाताळीं घातल्यापूर्वीं क्षत्रियांमध्यें महासुभ्या (म्हसोवा) सारखे महावीर होऊन गेले यांचे पवाडे मोठ्या उल्हासानें सादर केले जातील.

हा पवाडा एकंदर तयार करते वेळीं माझे लहानपणचे मित्र भंडारकर यानी इतर दुसऱ्या लोकांसारखा पायांत पाय न घालतां मला या कामांत नेहमीं हिंमत देऊन वारंवार माझ्या कल्पना नीट जुळाव्यात ह्मणून बरीच मदत दिली. यास्तव मी त्यांचा ऋणी आहें. व रे० बाबा पदमनजी व गंगाधरशास्त्री या उभयतानी शुद्ध करण्याविषयीं मदत केली सबब त्यांचा आभारी आहें.

# शिवाजीचा पवाडा

ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र.

कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥

लंगोट्यांस देई जानवीं पोषींदा कूणब्यांचा ।
काळ तो असे यवनांचा ॥
शिवाजीचा पिता शाहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जाहगिरीचा ॥
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासीं आलें ॥
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ॥
हातापायांचीं नख बोट शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यानीं कमळा लाजिवलें ॥
वर खालीं टिऱ्या पोटऱ्या गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ॥
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ॥
राजहौंसीं उंच मान माघें मांदे दोंदीलें ।
जसा का फणीवर डोले ॥
एकसारखे शुभ्र दंत चमकूं लागले ।
मोतीं लडीं गुतिवलें ॥
रक्तवर्ण नाजूक होटीं हासूं छपिवलें ।
म्हणोन बोबडें बोले ॥
सरळ नीट नाक विशाळ डोळ्यां शोभले ।
विषादें मृग वनीं गेले ॥
नेत्र तीखे बाणी भवया कमटे ताणीले ।
ज्यांनीं चंद्रा हाटिवलें ॥

सुंदर विशाळ भाळवटी जावळ लोंबलें ।
कुरळे केंस मोघीले ॥
आजानबाहू पायांपेक्षां हात लांबलेले ।
चिन्ह गादिचें दिसलें ॥
जडावाचीं कडीं तोडे सर्व अळंकार केले ।
धाकव्या बाळा लेविवले ॥
किनखाबी टंकोचें मोतीं घोसानें जडले ।
कलाबतुचे गोंडे शोभले ॥
लहान कुंची पैरण विरडी बंद लावले ।
डाग लाळीचे पडलेले ॥
हातापायांचे आंगठे चोखी मुखामधी रोळे
पायीं घुगरूं खुळखुळे ॥
मारी लागोपाठ लाथाबुक्या आकाश शोभलें
खेळण्यावर डोळे फिरीवले ॥
मजवर हा कसा खेळणा नाहीं आवडलें ।
चिन्ह पाळणीं दिसलें ॥
टाहीपेटे रडूं लागला सर्व घाबरले ।
पाळण्या हालवूं लागले ॥
धन्य जिजाबाई जिनें जो जो जो जो जो केले
गातों गीत तिनें केलें ॥

॥ चाल ॥

जो जो जो जो जो जो गाऊं, जी जी जी जी जिजी गाऊं
चला वेरूळास जाऊं, दौलताबादा पाहूं ॥
मूळ बाबाजीस ध्याऊं, कीर्ति आनंदाने गाऊं ।
सरदारांत उमराऊ, सोबतीस जाधवराऊ ॥
पाटील होते गांवोगाऊ, पुत्रावरी अती जीऊ ।
थोर विठोजी नांव घेऊं, सान मालोजी त्याचा भाऊ ।
दीपाबाई त्यास देऊं, छंदाजोगा गिती गाऊं ॥

॥ चाल ॥

मालोजी राजा । तुझा बा आजा ॥
यवनी काजा । पाळिल्या फौजा ॥

लाविल्या ध्वजा । मारिल्या मौजा ॥
वेळेस मुक्का । साधल्या बुक्का ॥
विचारी पक्का । जाधवा धक्का ॥
शेशाप्पा नायका । ठेविचा पैका ॥
द्रव्याची गर्दी । चांभारगोंदी ॥
देवळें बांधी । तळीं ती खांदी ॥
आगळी बुद्धी । गुणानें निधि ॥
लिहिलें विधि । लोकांस बोधी ॥
संधान साधी । जसा पारधी ॥
भविषी भला । कळलें त्याला ॥
सांगोनी गेला । गादी बा तुला ॥
उपाय नाहीं जाणोन चाकर झाला यवनाचा ।
शिपाई होता बाणीचा ॥
खोट्या दैवा कोण खोडी बेत देवाजीचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ १ ॥

*   *   *

वडील बंधु संभाजीनें लळे पुरवीले ।
धाकटयासवें खेळले ॥
उभयतांचें एकचित्त तालमींत गेले ।
फरीगद्ग्या शिकले ॥
आवडीनें खमठोकी कुस्ती पेंचानें खेळे ।
पवित्रे दस्तीचे केले ॥
द्वादशवर्षीं उमर आली नाहीं मन धालें ।
घोडी फिरवूं लागले ॥
आट्टल घोडेस्वार भाला बोथाटी शीकले ।
गोळी निशाण साधले ॥
कन्या वीर जाधवाची जिनें भारथ लावलें ।
पुत्रा नीट ऐकिवलें ॥
अल्पवयाचे असतां शिकार करूं लागले ।
माते कौतुक वाटलें ॥

नित्य पतीचा आठव डोंगर दुःखाचे झाले ।
घर सवतीनें घेतले ॥
छाती कोट करून सर्व होतें साटिवलें ।
मुखमुद्रेने फसिवले ॥
चतुर शिवाजीनें आईचें दुःख ताडिले ।
पित्यास मनीं त्यागिले ॥
पुत्राचे डोळे फिरले मातें भय पडलें ।
हीत उपदेशा योजिले ॥
मनीं पतिभक्ति पुता बागेमधीं नेलें ।
वृक्षाछायीं बसीवलें ॥
पूर्वजांचें स्मरण करून त्यास न्याहाळीलें ।
नेत्रीं पाणी टपटपलें ॥
या क्षेत्राचे धनी कोणकोणी बुडविले ।
सांगतें मुळीं कसें झालें ॥
क्षेत्रवासी ह्मणोन नांव क्षत्रिय धरले ।
क्षेत्रीं सुखी राहिले ॥
अन्यदेशिंचे दंगेखोर हिमालयीं आले ।
होते लपून राहिले ॥
पाठीं शत्रुभीती झाडी किती उपासीं मेले ।
गोमासा भाजून घाले ॥
पाला फळें खात आखेर ताडपत्रा नेसले ।
झाडी उल्लंघून आले ॥
लेखणीचा धड शीपाया सैनापति केलें ।
मुख्य ब्रम्ह्या नेमलें ॥
बेफाम क्षेत्रिय होते अचूक टोळ उतरले ।
कैदी सर्वांस केलें ॥
सर्व देशीं चाल त्याचें गुलाम बनीवले ।
डौलानें क्षुद्र म्हणाले ॥
मुख्य ब्रह्म राजा झाला जानें कायदे केले ।
त्याचे पुढें भेद केले ॥
ब्रह्मा मेल्यावर परशराम पुंड माजले ।
उरल्या क्षत्रिया पिडीले ॥

माहारमांग झाले किती देशोधडी केले ।
ब्राह्मण चिरंजीव झाले ॥

देश निक्षत्रिय झाल्यामुळें यवना फावलें ।
सर्वांस त्यांहीं पिडीलें ॥

शुद्र म्हणती तुम्हा हृदयीं बाण टोचले ।
आज बोधाया फावलें ॥

गाणें गातें ऐक बाळा तुझ्या आजोळीं शिकले ।
बोलीं नाहीं मन घालें ॥

॥ चाल ॥

क्षेत्र क्षत्रियांचें घर, तुझे पितृ माहावीर ।
सुखा नसे त्यांच्या पार, आल्यागेल्याचें माहेर ॥
शीखराकार डोंगर, नानावल्ली तरूवर ॥
दरीं खोरीं वाहे नीर खळखळे निरंतर ।
झाडा फुलें झाला भार, सुगंधी वाहे लहर ।
पक्षी गाती सोळा स्वर, मंजूळ वाणी मनोहर ॥
नदी नाले सरोवर, शोभे कमळांचा भार ।
भूमी अती काळसर, क्षेत्र देई पीका फार ॥
धाव घेती दंगेखोर, दिला क्षेत्रियास मार ।
दास केले निरंतर, ब्रह्मा झाला मनीं गार ॥
लोभी मेले येथें फार, विध्वा झाल्या घरोघर ।
उपाय नाहीं लाचार, स्त्रिया बंदी पाटावर ॥
दुसरा झाला शीरजोर, परशा तोबा कठोर ।
मार त्याचा अनीवार, केला क्षत्रियां संव्हार ॥
क्षत्रिय केले जरजर, भये कांपे थरथर ।
दुःखा नाहीं त्यांच्या पार, ठाव नाहीं निराधार ॥
बहु केले देशापार, बाकी राहि मांगमाहार ।
निःक्षेत्री झाल्यावर, म्लेंच्छें केलें डोकें वर ॥
आले सिंधुनदावर, स्वाऱ्या केल्या वारोंवार ।
गातें कटावांत सार, लक्ष देई अर्थावर ॥

॥ चाल ॥

काबुला सोडी । नदांत उडी ॥
ठेवितो दाढी । हिंदूस पीडी ॥
बामना बोडी । इंद्रियें तोडी ॥
पींडीस फोडी । देऊळें पाडी ॥
चित्रास तोडी । लेण्यास छेडी ॥
गौमांसीं गोडी । डुकरां सोडी ।'
खंड्यास ताडी । जेजूरी गडीं ॥
मुंग्यास सोडी । खोडीस मोडी ॥
मूर्तीस काढी । काबूला धाडी ॥
झाडीस तोडी । लुटलीं खेडीं ॥
गडांस वेढी । लावली शीडी ॥
हींदुस झोडी । धर्मास खोडी ॥
राज्यास बेडी । कातडी काढी ॥
गर्दना मोडी । कैलासा धाडी ॥
देऊळें फोडी । बांधीतो माडी ॥
उडवी घोडी । कपाळा आढी ॥
मीजास बडी । ताजीम खडी ॥
बुरखा सोडी । पत्नीस पीडी ॥
गायनीं गोडी । थैलींतें सोडी ॥
माताबोध मनीं ठसतां राग आला यवनांचा ।
बेत मग केला लढण्याचा ॥
तान्हाजी मालुसरे बाजी फसलकराचा ।
स्नेह येशजी कंकाचा ॥
मित्रां आधीं ठेवी जमाव केला मावळ्याचा ।
पूर करी हत्यारांचा ॥
मोठ्या युक्तीनें सर केला किल्ला तोरण्याचा ।
रोविला झेंडा हिंदूचा ॥
राजगड नवा बांधला उंच डोंगराचा ।
भ्याला मनीं विजापुरचा ॥
दुसरा भ्याला मेला बेत नव्हता पूर्वींचा ।
दादोजी कोंडदेवाचा ॥

मासा पाणीं खेळे गुरू कोण असे त्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ २ ॥

* * *

जाहागीरचा पैसा सारा लावी खर्चास ।
चाकरी ठेवी लोकांस ॥
थाप देऊन हातीं घेई चाकण किल्ल्यास ।
मुख्य केले फिर्डोजीस ॥
थोड्या लोकांसहीत छापा घाली सुप्यास ।
कैद पाहा केलें मामास ॥
सुप्या सोबत हातीं घेतलें तीनशें घोड्यास ।
करामत केली रात्रीस ॥
मुसलमानां लांच देई घेई कोंडाण्यास ।
सिंहगड नांव दिलें त्यास ॥
पुरंधरी जाई जसा भला माणूस न्यायास ।
कैद पाहा केलें सर्वांस ॥
गांव इनाम देऊन सर्वां ठेवी चाकरीस
मारलें नाहीं कोणास ॥
वाटेमधीं छापा घालून लुटी खजीन्यास ।
सांठवी राजगडास ॥
राजमाचीं लोहगडीं लढे घेई तिकोण्यास
बाकी चार किल्ल्यांस ॥
मावळ्यांस धाडी कोकणीं गांव लुटायास ।
धूर्त योजी फितूरास ॥
सन्मान कैद्यां देई पाठवि वीजापूरास ॥
मुलान्या सुभेदारास ॥
विजापुरीं मुसलमाना झाला बहु त्रास ।
योजना केली कपटास ॥
करनाटकीं पत्र पाठवी बाजी घोरपड्यास ।
कैद तुम्ही करा शहाजीस ॥
भोजनाचें निमित्य केलें नेलें भोसल्यास ।
दग्यानें कैद केलें त्यास ॥

॥ चाल ॥

काबुला सोडी । नदांत उडी ॥
ठेवितो दाढी । हिंदूस पीडी ॥
बामना बोडी । इंद्रियें तोडी ॥
पींडीस फोडी । देऊळें पाडी ॥
चित्रास तोडी । लेण्यास छेडी ॥
गौमांसीं गोडी । डुकरां सोडी ।'
खंड्यास ताडी । जेजूरी गडीं ॥
भुंग्यास सोडी । खोडीस मोडी ॥
मूर्तीस काढी । काबूला धाडी ॥
झाडीस तोडी । लुटलीं खेडीं ॥
गडांस वेढी । लावली शीडी ॥
हींदुस झोडी । धर्मास खोडी ॥
राज्यास वेडी । कातडी काढी ॥
गर्दना मोडी । कैलासा धाडी ॥
देऊळें फोडी । बांधीतो माडी ॥
उडवी घोडी । कपाळा आढी ॥
मीजास बडी । ताजीम खडी ॥
बुरखा सोडी । पत्नीस पीडी ॥
गायनीं गोडी । थैलीतें सोडी ॥
माताबोध मनीं ठसतां राग आला यवनांचा ।
बेत मग केला लढण्याचा ॥
तान्हाजी मालुसरे बाजी फसलकराचा ।
स्नेह येशजी कंकाचा ॥
मित्रां आधीं ठेवी जमाव केला मावळ्याचा ।
पूर करी हत्यारांचा ॥
मोठ्या युक्तीनें सर केला किल्ला तोरण्याचा ।
रोविला झेंडा हिंदूचा ॥
राजगड नवा बांधला उंच डोंगराचा ।
भ्याला मनीं विजापुरचा ॥
दुसरा भ्याला मेला बेत नव्हता पूर्वीचा ।
दादोजी कोंडदेवाचा ॥

मासा पाणीं खेळे गुरू कोण असे त्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ २ ॥

* * *

जाहागीरचा पैसा सारा लावी खर्चास ।
चाकरी ठेवी लोकांस ॥
थाप देऊन हातीं घेई चाकण किल्ल्यास ।
मुख्य केले फिर्डोजीस ॥
थोड्या लोकांसहीत छापा घाली सुप्यास ।
कैद पाहा केलें मामास ॥
सुप्या सोबत हातीं घेतलें तीनशें घोड्यास ।
करामत केली रात्रीस ॥
मुसलमानां लांच देई घेई कोंडाण्यास ।
सिंहगड नांव दिलें त्यास ॥
पुरंधरी जाई जसा भला माणूस न्यायास ।
कैद पाहा केलें सर्वांस ॥
गांव इनाम देऊन सर्वां ठेवी चाकरीस
मारलें नाहीं कोणास ॥
वाटेमधीं छापा घालून लुटी खजीन्यास ।
सांठवी राजगडास ॥
राजमाचीं लोहगडीं लढे घेई तिकोण्यास
बाकी चार किल्ल्यांस ॥
मावळ्यांस धाडी कोकणीं गांव लुटायास ।
धूर्त योजी फितूरास ॥
सन्मान कैद्यां देई पाठवि वीजापूरास ॥
मुलान्या सुभेदारास ॥
विजापुरीं मुसलमाना झाला बहु त्रास ।
योजना केली कपटास ॥
करनाटकीं पत्र पाठवी बाजी घोरपड्यास ।
कैद तुम्ही करा शहाजीस ॥
भोजनाचें निमित्य केलें नेलें भोसल्यास ।
दग्यानें कैद केलें त्यास ॥

थेट शहाजी कैदी आणिला विजापूरास ।
खुशी मग झाली यवनास ॥
चिरेबंदी कोठडीमध्यें बंद केलें त्यास ।
टेविलें भोक वाऱ्यास ॥
शाहाजीला पिडा दीली कळलें शिवाजीस ।
ऐकून भ्याला बातमीस ॥
पिताभक्ति मनीं लागला शरण जायास ।
विचारी आपल्या स्त्रियेस ॥
साजे नांव सईबाई स्त्री सुचवी पतीस ।
ताडा दंडीं दुसमानास ॥
स्त्रीची सुचना सत्य भासली लिहिलें पत्रास ।
पाठवी दिल्ली मोगलास ॥
चाकर झालों तुमचा आतां येतों चाकरीस
सोडवा माझ्या पित्यास ॥
मोगल थैली गेली थेट मुसलमानास ।
टेविले किल्ल्यावर त्यास ॥
बाजी शामराज कां लाजला जात सांगायास
धरुं पाही शिवाजीस ॥
धेड ह्मणावा नाक नाहीं द्यावा कोणास ।
अडचण झाली बखरीस ॥
सिद्धिस बेत गेला नाहीं अंतीं भ्याला जिवास ।
काळें केलें महाडास ॥
शाहाजीचा बाजी आखेर घेईल बक्षीस ।
हा पाजी मुकला जातीस ॥
करनाटकीं आज्ञा झाली शाहाजीस ।
यवन भ्याला सिंहास ॥
वर्षें चार झालीं शिवला नाहीं कबजास ।
पिताभक्ति पुत्रास ॥
चंद्रराव मोऱ्यास मारी घेई जावळीस ।
दुसरे वासोट्या किल्ल्यास ॥
प्रतापगड बांधी पेशवा केला एकास ।
नवे योजी हुद्यास ॥

आपली बाकी काढी धाडी पत्र तगाद्यास ।
चलाखी दावी मोंगलास ॥
रात्रीं जाऊन एकाएकीं लुटी जुन्नरास ।
पाठवि गडी लुटीस ॥
आडमार्गे करी हळूच गेला नगरास ।
लुटी हत्तीघोड्यांस ॥
उंच वस्त्रें, रत्नें होन कमती नाहीं द्रव्यास ।
चाकरी ठेवि बारगिरांस ॥
समुद्रतीरीं किल्ले घेई पाळी गलबतांस ।
चाकरी ठेवि पठाणास ॥
सिद्दि पेशव्या आपेश देई घेई यशास ।
उदासी लाभ शिवाजीस ॥
आवजूलखान शूर पठाण आला वांईस ।
शोभला मोठा फौजेस ॥
हत्ती बारा हजार घोडा त्याचे दिमतीस ।
कमी नाहीं दारूगोळीस ॥
कारकुनाला वचनीं दिलें हिंवरें बक्षीस ।
फितिवले लोभी ब्राह्मणांस ॥
गोपीनाथ फसवी पठाणा आणी एकांतास ।
चुकला नाहीं संकेतास ॥
माते पायीं डोई ठेवी, लपवी हत्यारास ।
बरोबर आला बेतास ॥
समीप येतां शिवाजी जसा भ्याला व्याघ्रास ।
कमी करी आपल्या चालीस ॥
गोपीनाथ सुचना देई भोळ्या यवनास ।
भ्याला तुमच्या शिपायांस ॥
त्या अधमाचें ऐकुन शिपाई केला बाजूस ।
लागला भेटूं शिवाजीस ॥
वर भेटभाव वाघनख मारीं पोटास ।
भयभित केलें पठाणास ॥
पोटीं जखम सोसी केला वार शिवाजीस ।
झोंबती एकमेकांस ॥

हातचलाखी केली बिचवा मारी शत्रूस ।
पठाण मुकला प्राणास ॥
स्वामीभक्ती धाव घेई कळले शिपायास ।
राहिला उभा लढण्यास ॥
त्याची धोप घेई शिवाजी बचवी आपल्यास
तान्हाजी भिडे बाजूस ॥
दांतीं दाढी चावी तोडी घेई धनी सूडास ।
घाबरें केलें दोघांस ॥
नांव सय्यदबंधू साजे शोभा आणी बखरीस ।
लाथाळी जीवदानास ॥
तान्हाजिला हूल देई मारी हात शिवाजीस ।
न्याहाळी प्रेतीं धण्यास ॥
उभयतांसीं लढतां मुकला आपल्या प्राणास ।
गेला जन्नत स्वर्गास ॥
छापा घाली मारी करी कैद बाकी फौजेस ।
पठाणपुत्र खाशा स्त्रियेस ।
चार हजार घोडा लूट कमी नाहीं द्रव्यास ।
दुसऱ्या सरंजामास ॥
अलंकार वस्त्रें देई सर्व कैदी जखम्यांस ॥
पाठवि विजापूरास ॥
वचनीं साचा शिवाजी देई हिवरें बक्षीस ।
फितुऱ्या गोपीनाथास ॥
नाचत गात सर्व गेले प्रतापगडास ।
उपमा नाहीं आनंदास ॥

॥ चाल ॥

॥ शिवाचा गजर जयनामाचा झेंडा रोविला ॥
॥ क्षेम्याचा मेळा मावळ्याचा शिकार खेळला ॥
माते पायीं ठेवी डोई गर्व नाहीं काडीचा ।
आशिर्वाद घेई आईचा ॥
आलाबला घेई आवडता होता जिजीचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥

कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ ३ ॥

*   *   *

लढे रांगणीं विशाळगडीं घेई पन्हाळ्यास ।
केले मग शुरु खंडणीस ॥
रुस्तुल जमाना आज्ञा झाली विजापूरास ।
नेमिला कोल्हापूरास ॥
स्वार तीन हजार घेई थोड्या पायदळास ।
आला थेट पन्हाळ्यास ॥
मार देत शिवाजी पिटी कृष्णा पैलतडीस ।
अती जेर केलें त्यास ॥
खंडणी घेत गेला भिडला विजापुरास ।
परत मग आला गडास ॥
राजापुर दाभोळ लुटी भरी खजीन्यास ।
मात गेली विजापुरास ॥
सिद्दी जोहरा नेमी मोठी फौज दिमतीस ।
सावंत सिद्दी कुमकेस ॥
बंदोबस्त करी शिवाजी राही पन्हाळ्यास ।
करी मग जमा बेगमीस ॥
वारंवार छापे घाली लुटी भौंती मुलखास ।
केलें महाग दाण्यास ॥
त्रासानें खवळून वेढा घाली शिवाजीस ।
कोंडिलें गडीं फौजेस ॥
चार मास लोटले शिवाजी भ्याला वेढ्यास ।
योजना करी उपायास ॥
कोंकणामधीं सिद्दी झोडी रघुनाथास ।
उपद्रव झाला रयतेस ॥
फासलकर बाजीराव पडले वाडीस ।
दुःख मग झालें शिवाजीस ॥
सिद्दि जोहरा निरोपानें गोंवी वचनास ।
खुशाल गेला भेटीस ॥
वेळ करून गेला उरला नाहीं आवकास ।
कच्चा मग ठेवी तहास ॥

सिद्दीस लाडी गोडी मधीं मान डुकलीस ।
गेला थाप देऊन गडास ॥
सिद्द्या पोटीं खुष्याली जाई झोपीं सावकास ।
हयगय झाली जप्तीस ॥
तों शिवाजी पळून गेला घेई पाठी रात्रीस ।
फसविलें मुसलमानास ॥
सिद्दि सकाळीं खाई मनीं लाडू चुरमुऱ्यास ।
स्वारदळ लावी पाठीस ॥
चढत होता खींड शिवाजी गांठलें त्यास ।
बंदुका लावी छातीस ॥
बाजीपरभु मुख्य केला टेवि मावळयास ।
एकटा गेला रांगण्यास ॥
स्वस्वामीला वेळ दिला बाजी भिडला शत्रूस ।
हरवी नित्य मोगलास ॥
दोन प्रहर लढे वाट दिली नाहीं त्यास ।
धन्य त्याच्या जातीस ॥
मोठी मोगल फौज दाखल झाली साह्यास ।
खवळला बाजी युद्धास ॥
अर्धे लोक उरले सरला नाहीं पाउलास ।
पडला परभू भूमीस ॥
तो शिवाजी सुखी पोहंचला कान सुचनेस ।
अंती मनीं हाच ध्यास ॥
बार गडीं ऐकून सुखी ह्मणे आपल्यास ।
नीघून गेला स्वर्गास ॥
सय्यद मागें सरे जागा देई बाजीरावास ।
पाहून स्वामीभक्तीस ॥
विजापुरीं मुसलमान करी तयारीस ।
खासा आला लढण्यास ॥
कराडास डेरे दिले घेई बहू किल्ल्यांस ॥
वश करी त्याचे लोकांस ॥
दळव्यासीं लढून घेई शृंगारपुरास ।
मारलें पाळेगारांस ॥

लोकप्रीतिकरितां करी गुरु रामदासास ।
राजगडीं स्थापी देवीस ॥
मिष्ट अन्नभोजन दिलें सर्वां बक्षीस ।
केली मग मोठी मजलस ॥
तानसैनी भले गवय्या बसवी गायास ।
कमी नाहीं तालस्वरास ॥

॥ चाल ॥

जीधर उधर मुसलमानी । बीसमिलाहि हिंमानी ॥
सच्चा हरामी शैतान आया । औरंगजीब नाम लिया ॥
छोटे भाइकूं हूल दिया । बडे भाइकी जान लिया ॥
छोटेकूंबी कैद किया । लोक उसके फितालिया ॥
मजला भाई भगादिया । आराकानमें मारा गया ॥
सगे बापकूं कैद किया । हुकमत सारी छिनलीया ॥
भाईबंदकूं इजा दिया । रयत सब ताराज किया ॥
मार देके जेर किया । खाया पिया रंग उडाया ॥
आपण होके बेलगामी । शिवाजीकू कहे गुलामी ॥
आपण होके ऐशआरामी । शिवाजीकूं कहे हरामी ॥
बेर हुवा करो सलामी । हिंदवाणी गाव नामी ॥

॥ चाल ॥

आदी आतंन । सर्वां कारण ॥
जन्ममरण । घाली वैरण ॥
तोच तारण । तोच मारण ॥
सर्व जपून । करी चाळण ॥
नित्य पाळण । लावी वळण ॥
भूतीं पाहून । मनीं ध्याइन ॥
नांव देऊन । जगजीवन ॥
सम होऊन । करा शोधन ॥
सार घेऊन । तोडा बंधन ॥
सरनौबती डंका हुकूम पालेकराचा ।
घेई मुजरा शाई[रा]चा ॥

सुखसोहळे होतां तरफडे सावंत वाडीचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ ४ ॥

* * *

सावंत पत्र लिही पाठवी विजापूरास ।
मागे फौज कुमकेस ॥
बाजी घोरपडा बल्लोळखान येती साह्यास ।
शिवाजी करी तयारीस ॥
त्वरा करून गेला छापा घाली मुधोळास ।
मारिलें बाजी घोरपड्यास ॥
भाऊबंद मारिले बाकी शिपाइ लोकांस ।
घेतलें बापसूडास ॥
सावंताची खोड मोडून ठेवी चाकरीस ।
धमकी देई पोर्च्युग्यास ॥
नवे किल्ले बांधी डागडुजी केली सर्वांस ।
बांधिलें नव्या जाहजास ॥
जळीं सैनापती केले ज्यास भीती पोर्च्युगीस ।
शोभला हुद्दा भंडाऱ्यास ॥
विजापूरचा वजीर गुप्त लिही शिवाजीस ।
उभयतां आणलें एकीस ॥
व्यंकोजी पुत्रा घेइ शाहाजी आला भेटीस ।
शिवाजी लागे चरणास ॥
शाहाजीचे सद्गुण गाया नाहीं आवकास ।
थोडेसे गाऊं अखेरीस ॥
सुखसोहळे झाले उपमा लाजे मनास ।
उणें स्वर्गीं सुखास ॥
अपूर्व वस्तू घेऊन जाई विजापूरास ।
भेट मग देई यवनास ॥
पराक्रमी शिवाजी पाळी पाऊण लक्षास ।
साजे यवनी स्नेहास ॥
विजापूरचा स्नेह होता लढे मोगलास ।
घेतले बहूतां किल्ल्यांस ॥

सर्व प्रांतीं लूट धुमाळी आणिलें जेरीस ।
घाबरें केलें सर्वांस ॥
संतापानें मोंगल नेमी शाइस्तेखानास ।
जलदि केली घेई पुण्यास ॥
चाकणास जाऊन दावी भय फिर्गोजीस ।
फुकट मागे किल्ल्यास ॥
मास दोन लढला घेऊन सर्व फौजेस ।
खान खाई मनास ।
आखेर दारू घालून उडवी एका बुर्जास ।
वाट केली आंत जायास ॥
वारोंवार हल्ले गर्दी करु पाहे प्रवेश ।
शाईस्ता पठाण पाठीस ॥
मार्गे पळति सर्व कोणी मानिना हुकूमास ।
भीति आंतल्या मर्दास ॥
लागोपाठ मार देत हटवि पठाणास ।
खचला खान हिंमतीस ॥
प्रातःकाळीं संतोषानें खालीं केलें किल्ल्यास ।
देई मुसलमानास ॥
फिर्गोजीला भेट देतां खुषी झाली यवनास ।
देऊन मान सोडी सर्वांस ॥
शिवाजीची भेट घेतां सन्मान दिला त्यास ।
वाढवी मोठ्या पदवीस ॥
फिर्गोजीचें नांव घेतां मनीं होतो उल्हास ।
पीढीजाद चाकरीस ॥
येशवंतशिंग आले घेऊन मोठ्या फौजेस ।
मदत शाईस्तेखानास ॥
सरनौबत भौंती लुटी नगरी मुलखास ।
जाळून पाडिला ओस ॥
पाठी लागून मोंगल मारी त्याच्या स्वारांस ।
जखमा केल्या नेटाजीस ॥
राजगड सोडून राहीला सिंव्हगडास ।
पाहून मोगलसेनेस ॥

जिजीबाईचे मुळचें घर होतें पुण्यास ।
खान राही तेथें वस्तीस ॥
मराठ्यास चौकी बंदी गांवांत शिरण्यास ।
होता भीत शिवाजीस ॥
लग्नवऱ्हाडी घुसे केला पुण्यांत प्रवेश ।
मावळे सोबत पंचवीस ॥
माडीवर जाऊन फोडी एका खिडकीस ।
कळालें घरांत स्त्रीयांस ।
शाइस्त्यास कळतां दोर लावी कठड्यास ।
लागला खालीं जायास ॥
शिवाजीनें जलदी गांठून वार केला त्यास ।
तोडीलें एका बोटास ॥
स्त्रिपुत्रां सोडून पळे पाठ दिली शत्रूस ।
भित्रा जपला जिवास ॥
आपल्या पाठिस देणें उणें शिपायगिरीस ।
उपमा नाहीं हिजड्यास ॥
सर्व लोकांसहित मारिलें खानपुत्रास ।
परतला सिंहगडास ॥
डौलानें मोंगल भौती फिरवी तरवारीस ।
दावी भय शिवाजीस ॥
समीप येऊं दिले हुकूम सरबत्तीस ।
शत्रू पळाला भिऊन मारास ॥
करनाटकीं बदली धाडी शाइस्तेखानास ।
मुख्य केलें माजमास ॥
राजापुरीं जाई शिवाजी जमवी फौजेस ।
दावी भय पोर्च्युग्यास ॥
सर्व तयारी केली निघाला नाशिक तीर्थास ।
हुल कसी दिली सर्वांस ॥
मध्यरात्रीं घेई बरोबर थोड्या स्वारांस ।
दाखल झाला सुर्तेस ॥
यथासांग साहा दिवस लुटी शहरास ।
सुखी मग गेला गडास ॥

बेदनूराहून पत्र आलें देई वाचायास ।
आपण बसे ऐकायास ॥
शिपायाचे बच्चे शाहाजी गेले शिकारीस ।
लागले हरणापाठीस ॥
घोड्या ठेंच लागे उभयतां आले जमीनीस ।
शाहाजी मुकला प्राणास ॥
पती कैलासा गेले कळालें जिजीबाईस ।
पार मग नाहीं दुःखास ॥
भुमी धडपडे बैसे रडून गाई गुणांस ।
घेई पुढें शिवाजीस ॥

॥ चाल ॥

अतीरूपवान बहु आगळा ।
जैसा रेखला चित्रीं पूतळा ॥
सवतीवर लोटती बाळा ।
डाग लाविला कुणबी कुळा ॥
सवतीला कसें तरी टाळा ।
कज्जा काढला पती मोकळा ॥
खऱ्या केंसानें कापि का गळा ।
नादीं लागला शब्द कोकिळा ॥
मूख दुर्बळ राही वेगळा ।
अती पिकला चिंतेचा मळा ॥
झाला शाहाजी होता सोहळा ।
मनीं भूलला पाहूनी चाळा ॥
बहुचका घेती जपमाळा ।
जाती देऊळा दाविती मोळा ॥
थाट चकपाक नाटकशाळा ।
होती कोमळा जशा निर्मळा ॥
खऱ्या डंखिणी घाली वेटोळा ।
विषचुंबनीं देती गरळा ॥
झाला संसारीं अती घोटाळा ।
करी कंटाळा आठी कपाळा ॥

मनी भिऊन पित्याच्या कुळा ।
पळ काढला गेले मातुळा ॥
छातीवर ठेवल्या शिळा ।
नाहीं रुचला सवत सोहळा ॥

॥ चाल ॥

कमानीवर । लावले तीर ॥
नेत्रकटार । मारी कठोर ॥
सवदागर । प्रीत व्यापार ॥
लावला घोर । सांगतें सार ॥
शिपाई शूर । जुना चाकर ॥
मोडक्या धीर । राखी नगर ॥
आमदानगर । विजापूरकर ॥
मंत्रि मुरार । घेई विचार ॥
वेळनसार । देई उत्तर ॥
धूर्त चतुर । लढला फार ॥
छाती करार । करी फीतूर ॥
गुणगंभीर । लाविला नीर ॥
होता लायक । पुंडनायक ॥
स्वामीसेवक । खरा भाविक ॥
सिंहगडावर गेला बेत केला क्रियेचा ॥
बजावला धर्म पुत्राचा ॥
रायगडीं जाई राही शोक करी पित्याचा ।
शत्रु होता आळसाचा ॥
दुःखामधीं सुख बंदोबस्त करी राज्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ॥
छत्रपती शिवाजीचा ॥ ५ ॥

* * *

सर्व तयारी केली राजपद जोडी नांवास ।
शिक्का सुरू मोर्तबास ॥
अमदानगरी नटून पस्त केलें पेठेस ।
भीती औरंगाबादेस ॥

विजापूरची फौज करी बहुत आयास।
घेई कोकणपटीस ॥
सावध शिवाजी राजे आले घेऊन फौजेस।
ठोकून घेई सर्वांस ॥
जळीं फौज लढे भौती मारी गलबतास।
दरारा धाडी मक्केस ॥
मालवणीं घेऊन गेला अवचित फौजेस।
पुकारा घेतो मोगलास ॥
जाहाजावर चढवी फौज गेला गोव्यास।
लुटलें बारशिलोरास ॥
जलदी जाऊन गोकर्णीं घेइ दर्शनास।
लुटलें मोंगल पेठांस ॥
पायवाटेनें फौज पाठवी बाकी लुटीस।
आज्ञा जावें रायगडास ॥
स्वतां खासी स्वारी आज्ञा लोटा जाहाजास।
निघाला मुलखीं जायास ॥
मोठा वारा सुटला भ्याला नाहीं तुफानास।
लागले अखेर कडेस ॥
औरंगजीब पाठवी राजा जयशिंगास।
दुसरे दिलीरखानास ॥
ठेवले मोगल अमीर येऊन पुण्यास।
वेढिलें बहुतां किल्ल्यांस ॥
मानकरी शिवाजी घेई बसे मसलतीस।
सुचेना कांहीं कोणास ॥
बाजी परभू भ्याला नाहीं दिलीरखानास।
सोडिलें नाहीं धैर्यास ॥
हेटकरी मावळे शिपाई होते दिमतीस।
संभाळी पुरंधरास ॥
चातुर्यानें लढे गुंतवी मोगल फौजेस।
फुरसत दिली शिवाजीस ॥
फार दिवस लोटले पेटला खान इर्षेस।
भिडला किल्ल्या माचीस ॥

बुर्जांखालीं गेला लागे सुरंग पाडायास ॥
योजी अखेर उपायास ।
हेटकरी मावळे जाती छापे घालण्यास ।
पिडीलें फार मोगलास ॥
मोगलाने श्रम केले बेत नेला सिद्धीस ।
काबीज केलें माचीस ॥
यशस्वी भासले लागले निर्भय लुटीस ।
चुकले सावधपणास ॥
हेटकऱ्यांचा थाट नीट मारी लुटाऱ्यास ।
मोगल हटले नेटास ॥
बाजी मावळ्यां जमवी हातीं घेई खांड्यास ।
भिडून मारी मोगलास ॥
मोगल पळ काढी पाठ दिली मावळ्यास ।
मर्द पाहा भ्याले उंद्रास ॥
लाजे मनीं दिलीरखान जमवी फौजेस ।
धीर काय देई पठाणास ॥
सर्व तयारी पुन्हा केली परत हल्ल्यास ।
जाऊन भिडला मावळ्यास ॥
बाजी मार देई पठाण खचले हिमतीस ।
हटती पाहून मर्दास ॥
पराक्रम बाजीचा पाही खान खोच मनास ।
लावीला तीर कमानीस ॥
नेमानें तीर मारी मुख्य बाजी परभूस ।
पाडिला गबरू धरणीस ॥
सय्यद बाजी ताजीम देती घेती बाजूस ।
भोगिती स्वर्गीं मौजेस ॥
बाजी स्वर्गीं बसे मावळे हटले बाजूस ।
सरले बालेकिल्ल्यास ॥
मोगल चढ करती पुन्हा घेती माचीस ।
धमकी देती मावळ्यास ॥
हेटकरी मारी गोळी फेर हटवि शत्रूस ।
पळवी इशानी कोणास ॥

वज्रगडाला शिडी लाविली आहे बाजूस ।
वरती चढवी तोफांस ॥
चढला मोगल मारी गोळे बालेकिल्ल्यास ।
आणले बहु खराबीस ॥
हेटकरी मावळे भ्याले नाहीं भडिमारास ।
मोगल भ्याला पाऊसास ॥
मोगल सल्ला करी शिवाजी नेती मदतीस ।
घेती यवनी मुलखास ॥
कुलद्रोही औरंगजीब योजी कपटास ।
पाठवि थैली शिवाजीस ॥
शिवाजीला वचन देऊन नेई दिल्लीस
नजरकैद करी त्यास ॥
धाडी परत सर्व मावळे घोडेस्वारांस ।
ठेविलें जवळ पुत्रास ॥
दरबाऱ्यां घरीं जाई देई रत्न भेटीस ।
जोडिला स्नेह सर्वांस ॥
दुखणें बाहणा करी पैसा भरी हाकीमास ।
गूल पाहा औरंगजीबास ॥
आराम करून दावी शुरू दानधर्मास ।
देई खाने फकीरास ॥
मोठे टोकरे रोट भरी धाडी मशीदीस ।
जसा का मुकला जगास ॥
दानशूर बनला हटवि हातिमताईस ।
चुकेना नित्यनेमास ॥
औरंजीबा भूल पडली पाहुन वृत्तीस ।
विसरला नीट जप्तीस ॥
निरास कैदी झाला शिवाजी भास मोगलास
चढला मोठ्या दिमाखास ॥
पितापुत्र निजती टोकरी बदली रोटास
बाकी सोपी चाकरास ॥
जलदी करीती चाकर नेती टोकरास ।
करामत केली रात्रीस ॥

दिल्ली बाहेर गेले खुलें केलें शिवाजीस
नेली युक्ती सिद्धीस ॥
मोगल सकाळीं विचकी दांत खाई होटांस ।
लावि पाठी माजमास ॥

॥ चाल ॥

औरंगजीवा धूर दीला । पुत्रासवें घोडा चढला ॥
मधींच ठेवी पुत्राला । स्वतां गोसावी नटला ॥
रात्रिचा दिवस केला । गाठलें रायगडाला ॥
माते चरणीं लागला । हळूच फोडी शत्रूला ॥
स्नेह मोगलाचा केला । दरारा देई सर्वांला ॥

॥ चाल ॥

हैद्राबादकर । विजापूरकर ॥
कापे थरथर । देती करभार ॥
भरी कचेरी । बसे विचारी ॥
कायदे करी । निट लष्करी ॥
शिवाजीचा बेत पाहून जागा झाला गोव्याचा ।
बंदोबस्त केला किल्ल्याचा ॥
वेढा घालून जेर केला सिद्दी जंजिऱ्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ ६ ॥

* * *

शिवाजी तों मसलत देई मित्र तान्हाजीला ।
बेत छाप्याचा सुचवीला ॥
तान्हाजीनें भाऊ धाकटा सोबत घेतला ।
मावळी हजार फौजेला ॥
सुन्या रात्रीं सिंहगड पायीं जाऊन ठेपला ।
योजिलें दोर शिडीला ॥
दोरीची शिडी बांधली शिपाई कमरेला ।
हळुच वर चढवीला ॥

थोडी चाहूल कळली सावध उदेबानाला ।
करी तयार लोकांला ॥
थोड्या लोकांसवें तान्हाजी त्यांवर पडला ।
घाबरा गडकरी केला ॥
रणीं तान्हाजी पडे मावळे पळती बाजूला ।
सूर्याजी येऊन ठेपला ॥
धीर मोडक्या देई परत नेई सर्वांला ।
उगवी बंधु सूडाला ॥
उदेबान मारिला बाकिच्या रजपुताला ।
घेतलें सिंहगडाला ॥
गड हातीं लागला तान्हाजी बळी घेतला ।
झालें दुःख शिवाजीला ॥
सिंहगडीं मुख्य केलें धाकट्या सुर्याजीला ।
रुप्याचीं कडीं मावळ्याला ॥
पुरंधर माहूली घेई वरकड किल्ल्याला ।
पिडा जंजिरी सिद्दयाला ॥
सुरत पुन्हां लुटी मार्गीं झाडी मोगलाला ।
मोगल जेरदस्त केला ॥
कैद करी शिवाजी बाकी उरल्या फौजेला ।
त्यांमधीं अनेक स्त्रीयांला ॥
सुंदर स्त्रीया परत पाठवी नाहीं भाळला ।
लाजवी औरंगजीबाला ॥
सरनौबत वीर पाठवी खानदेशाला ।
शुरू केलें चौथाईला ॥
जलदी मोगल धाडी मोहबतखानाला ।
देई मोठ्या फौजेला ॥
औंढापट्टा घेऊन वेढी साल्हेर किल्ल्याला ।
धिंगाणा दक्षिणेंत केला ॥
गुजर उडी घाली सामना शत्रूचा केला ।
मोरोबा पठाण पंक्तीला ॥
लढतां पळ काढी दावी भ्याला मोगलाला ।
जसा खरा मोड झाला ॥

तों मराठे पळती मोगल गर्वानें फुगला ।
आळसानें ढिला पडला ॥
गुजर संधी पाहून परत मुरडला ।
चुराडा मोगलाचा केला ॥
बेत्रीस उमराव पाडले रणभूमीला ।
नाहीं गणती शिपायांला ॥
लहान मोठे कैदी बाकी सर्व जखम्यांला ।
पाठवी रायगडला ॥
मोगल वेढा झोडून मार देत पिटीला ।
खिदाडी औरंगाबादेला ॥
रायगडीं नित्य शिवाजी घेई खबरीला ।
गोडबोल्या गोवी ममतेला ॥
एकसारखें औषध पाणी देई सर्वांला ।
निवडलें नाहीं शत्रूला ॥
जखमा बऱ्या होतां खुलासा सर्वांचा केला ।
राहिले ठेवी चाकरीला ॥
शिवाजीची कीर्ति चौमुलखीं डंका वाजला ।
शिवाजी धनी आवडला ॥
मोगल यवनी शिपायी सोडी चाकरीला ।
हाजरी देती शिवाजीला ॥
पोर्चुग्यास धमकी देई मागे खंडणीला ।
बंदरी किल्ला वेढीला ॥
मधींच इंग्रज भ्याला जपे मुंबै किल्ल्याला ।
बनया धर्मा आड झाला ॥
दिल्लीस परत नेलें सुलतान माजूमाला ।
दुजें मोहबतखानाला ॥
उभयतांचा बदली खानजाहान आला ।
मुख्य दक्षणेचा केला ॥
मोगलाला धूर देऊन लुटलें मुलखाला ।
गोवळकुंडीं उगवला ॥
मोठी खंडणी घेई धाकीं धरी निजामाला ।
सुखें मग रायगडीं गेला ॥

मोगलाचे मुलखीं धाडी स्वार लुटायाला ।
लुटलें हुबळी शहराला ॥
समुद्रकांठीं गांवें लुटी घेई जाहाजांला ।
केले खुलें देसाईला ॥
परळी सातारा किल्ले घेई पांडवगडला ।
आणिक चार किल्ल्यांला ॥

॥ चाल ॥

हुकूम विजापुरी झाला । सोडिलें बहुत फौजेला ॥
द्यावा त्रास शिवाजीला । घ्यावें त्याचे मुलखाला ॥
शिवाजी सोडी गुजराला । कोंडी आबदुल करीमाला ।
केला माहग दाण्याला । शत्रु अती जेर केला ॥
आर्जव करणें शिकला । भोंदिलें सैनापतीला ॥
निघून विजापुरीं गेला । क्रोध शिवाजीस आला ॥
रागाऊन लिहिलें पत्राला । निषेधी प्रतापरावाला ॥
गुजर मनांत लाजला । निघून वराडांत गेला ॥

॥ चाल ॥

आबदुल्यानें । बेशर्म्यांनें ॥
फौज घेऊन । आला निघून ॥
राव प्रताप । झाला संताप ॥
आला घाईने । गाठी बेतानें ॥
घुसे स्वताने । लढे त्वेषानें ॥
घेई घालून । गेला मरून ॥
प्रतापराव पडतां मोड फौजेचा झाला ।
पाठलाग मराठ्याचा केला ॥
तोफ गोळ्या पोटीं दडती भिडती पन्हाळ्याला ।
गेले नाहीं शरण शत्रूला ॥
अकस्मात हंसाजी मोहिता प्रसंगीं आला ।
हल्ला शत्रूवर केला ॥
गुजर दळ मागें फिरून मारी यवनाला ।
पळीवलें विजापुराला ॥

शिवाजीनें हंसाजीला सरनौबत केला ।
मोठा अधिकार दिला ॥
हंबिरराव पद जोडलें त्याच्या नांवाला ।
शिवाजी मनीं सुखी झाला ॥
सेनापतींचे गुण मागें नाहीं विसरला ।
पोशी सर्व कुटुंबाला ॥
प्रतापराव–कन्या सून केली आपल्याला ।
व्याही केलें गुजराला ॥
काशीकर गंगाभट घाली डौल धर्माचा ।
केला खेळ गारूड्याचा ॥
लुटारू शिवाजी लुटला धाक गृह फौजेचा
खर्च नको दारूगोळीचा ॥
बहुरूपी सोंग तूलादान सोनें घेण्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ ७ ॥

विश्वासू चाकर नेमी मुलखीं लुटायाला ।
शिवाजी कोकणांत गेला ॥
छोटे मोठे गड घेई बांधी नव्या किल्ल्याला ।
जमाव फौजेचा केला ॥
गोंवळकुंडीं जाई मागून घेई तोफांला ।
फितीवलें कसें निजामाला ॥
करनाटकीं गेला भेटे सावत्रभावाला ।
वाटणी मागे व्यंकोजीला ॥
लोभी व्यंकोजी हिस्सा देईना बळासी आला ।
आशेनें फिरवी पगडीला ॥
बंधू आज्ञा मोडून गर्वानें हट्टीं पेटला ।
बिऱ्हाडीं रागाउन गेला ॥
शिवाजीला राग आला कोट छातीचा केला ।
कैदी नाहीं केलें भावाला ॥
तंजोर बाकी टेवी घेई सर्व मुलखाला ।
खडा कानाला लावला ॥

दासीपुत्र संताजी बंधु होता शिवाजीला ।
करनाटकीं मुख्य केला ॥
हंबीरराव सेनापती हाताखालीं दीला ।
निघाला परत मुलखाला ॥
वाटेमधीं लढून घेई बिलरि किल्ल्याला ।
तेथें ठेवी सुमंताला ॥
शिवाजीचे मागें व्यंकोजीनें छापा घातला ।
घेतलें स्वतां अपेशाला ॥
जेर झाला व्यंकोजी देई उरल्या हिश्याला ।
शिवाजी रायगडीं गेला ॥
विजापूरचा साह्य नेई राजे शिवाजीला ।
मोगल मुलखीं सोडला ॥
मुलखीं धिंगाणा धुळीस देश मिळीवला ।
सोडिलें नाहीं पिराला ॥
वाटेमधीं मोगल गांठी राजे शिवाजीला ।
घाबरा अतिशय केला ॥
भिडला शिवाजी मोगल मागें हाटीवला ।
वाट पुढें चालूं लागला ॥
दुसरी फौज आडवी माहाराज राजाला ।
थोडसें तोंड दिलें तिजला ॥
काळ्या रात्रीं हळुच सुधरी आडमार्गाला ।
धुळ नाहीं दिसली शत्रूला ॥
फौजसुद्धां पोहंचला पटा किल्ल्याला ।
फसिवलें आयदी मोगलाला ॥
विजापूरचा आर्जव करी धाडी थैलीला ।
आश्रय मागे शिवाजीला ॥
हांबीरराव मदत पाठवी विजापुराला ।
बरोबर देई फौजेला ॥
नऊ हजार मोंगलांचा पराभव केला ।
ज्यानी मार्ग अडीवला ॥
विजापुरीं जाऊन जेर केलें मोंगलाला ।
केला महाग दाण्याला ॥

शत्रूला पिडा होतां त्रासून वेढा काढला ।
मोगल भिऊन पळाला ॥
दिल्लीचा परत बोलवी दिलीरखानाला ।
पाठवी शाहाजाहानाला ॥
जलदी करुन शिवाजी वळवी पुत्राला ।
लाविला नीट मार्गाला ॥
तह करून शिवाजी नेती विजापुरला ।
यवन घेती मसलतीला ॥
शिवाजीचें सोवळें रुचलें नाहीं भावाला ।
व्यंकोजी मनीं दचकला ॥
निरास मनीं होऊन त्यागी सर्व कामाला ।
निरा संन्यासी बनला ॥
शिवाजीनें पत्र लिहीलें बंधु व्यंकोजीला ।
लिहितों पत्र अर्थाला ॥
वीरपुत्र ह्मणवितां गोसावी कसे बनला !
हिरा कां भ्याला कसाला ॥
आपल्या पित्याचा ठसा कसा जलदी वीटला ।
मळावांचून काटला ॥
कनिष्ठ बंधु माझ्या लाडक्या पाठी साह्याला ।
तुम्ही कां मजवर रूसला ॥
बोध घ्या तुम्ही माझा लागा प्रजापालनाला
त्यागा ढोंगधतोऱ्याला ॥
मन उत्तम कामीं जपा आपल्या फौजेला ।
संभाळा मुळ आब्रूला ॥
कीर्ति तुझी ऐकूं यावी ध्यास माझ्या मनाला
नित्य जपतों या जपाला ॥
कमी पडतां तुह्मी कळवा माझ्या लोकांला ।
सोडा मनच्या आढीला ॥
सुबोधाचें पत्र ऐकतां शुध्धीवर आला ।
व्यंकोजी लागे कामाला ॥
शिवाजीला रायगडीं गुडघी रोग झाला ।
रोगानें अती जेर केला ॥

त्याचे योगें नष्ट ज्वर फारच खवळला ।
शिवाजी सोसी दुःखाला ॥
यवनीं विरास भिडतां नाहीं कुचमला ।
शिवाजी रोगाला भ्याला ॥
सतत सहा दिवस सोसी तापदहाला ।
नाहीं जरा बरळला ॥
सातव्या दिवशीं शिवाजी करी तयारीला ।
एकटा पुढें आपण झाला ॥
काळाला हूल देऊन स्वतां गेला स्वर्गाला ।
पडले सुख यवनाला ॥
कूळवाडी मनीं खचले करती शोकाला ।
रडून गाती गुणांला ॥

॥ चाल ॥

महाराज आझासीं बोला । धरला कां तुह्मी अबोला ॥
मावळे गडी सोबतीला । शिपाई केले उघड्याला ॥
सोसिलें उन्हातान्हाला । भ्याला नाही पाउसाला ॥
डोंगर कंगर फिरला । यवन जेरीस आणला ॥
लुटलें बहुत देशांला । वाढवी आपुल्या जातीला ॥
लढवी अचाट बुद्धीला । आचंबा भुमीवर केला ॥
बाळगी जरी संपत्तीला । तरी बेतानें खर्च केला ॥
वांटणी देई शिपायांला । लोभ द्रव्याचा नाहीं केला ॥
चतुर सावधपणाला । सोडिलें आधीं आळसाला ॥
लहान मोठ्या पागेला । नाहीं कधीं विसरला ॥
राजा क्षेत्र्यांमध्यें पहिला । नाहीं दुसरा उपमेला ॥
कमी नाहीं कारस्तानीला । हळूच वळवी लोकांला ॥
युक्तीनें बचवी जीवाला । कधीं भिईना संकटाला ॥
चोरघरती घेई किल्ल्याला । तसेंच बाकी मुलखांला ॥
पहिला झटे फितुराला । आखेर करी लढाईला ॥
युद्धीं नाहीं विसरला । लावी जीव रयतेला ॥
टळेना रयत सुखाला । बनवी नव्या कायद्याला ॥
दाद घेई लहानसानाची । हयगय नव्हती कोणाची ॥

आकृती वामनमुर्तीची । बळापेक्षां चपळाईची ॥
सुरेख ठेवण चेहऱ्याची । कोंदिली मुद्रा गुणरत्नाची ॥

॥ चाल ॥

भिडस्त भारी । सावडा घरीं ॥
प्रिय मधुरी । भाषण करी ॥
मोठा विचारी । वर्चड करी ॥
झटून भारी । कल्याण करी ॥
आप्तसोयरीं । ठेवी पदरीं ॥
लाडावरी । रागावे भारी ॥
इंग्लीश ज्ञान होतां ह्मणे मी पुत्र क्षेत्र्याचा ।
उडवी फट्टा ब्रम्ह्याचा ॥
जोतीराव फुल्यानें गाईला पुत क्षुद्राचा ।
मुख्य धनी पेशव्याचा ॥
जिजीबाईचा बाळ काळ झाला यवनाचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥ ८ ॥

— समाप्त —

## अभंग

सत्ता तुझी राणीबाई । हिंदुस्थानीं जागृत नाहीं ॥ १ ॥
जिकडे तिकडे ब्राह्मणशाई । डोळे उघडूनी पाहीं ॥ २ ॥
खेडेगांवीं कुळकर्णी । आहे लेखणीचा धणी ॥ ३ ॥
माहालामध्यें महालकरी । जसा अष्ट अधिकारी ॥ ४ ॥
यमवत मामलेदार । शुद्रा शिक्षा अनीवार ॥ ५ ॥
धूर्त चिटणिसांचे पुढें । काय कलकट्टर बापुडें ॥ ६ ॥
रेविन्युची दप्तरदारी । ब्राह्मण किती अधिकारी ॥ ७ ॥
चहूंकडे भटभाई । कुणब्याची दाद नाहीं ॥ ८ ॥
जोती ह्मणे धाव घेई । दुष्टापासूनी सोडवीं ॥ ९ ॥

— समाप्त —

# २

# ब्राह्मणांचें कसब

# PRIESTCRAFT EXPOSED

*By*

**JOTI GOVINDRAO FULE**

# ब्राह्मणांचें कसब

हें ल्हानसें पुस्तक

**जोति गोविंदराव फुले**

यांनीं

लोकहितार्थ केलें आहे.

" तूं सागर करुणेचा देवा तुजलाचि दुःख सांगावें । "
" तुजवांचुन इतरातें दिनमुख पसरोनि काय मागावें । "

**मुंबईंत**

इंदुप्रकाश छापखान्यांत छापिलें

१८६९

(पुण्यांत वेताळपेठेंत पुस्तककर्त्यांच्या दुकानीं विकत मिळतें.)

**किंमत दोन आणे**

[प्रथमावृत्तीचें मुखपृष्ठ]

महाराष्ट्र देशांतील

कुणबी, माळी, मांग, महार

यांस

हें पुस्तक

ग्रंथकर्त्यानें

परम प्रीतीनें

नजर केलें असे.

# प्रस्तावना

ह्या लहानशा चोपडीला मोठी प्रस्तावना लिहिण्याची गरज नाहीं. आमच्या देशांत ब्राह्मणांचें महत्त्व किती आहे व ते धर्माच्या मिषानें लोकांवर केवढा जुलूम करितात हें प्रसिद्धच आहे. असें असतां कोणी ह्मणतील कीं, हें पुस्तक रचण्याचें कारण काय? तर त्यास असें उत्तर आहे कीं, ब्राह्मण आपला कावा सर्व जातींच्या लोकांसीं सारखा चालवीत नाहींत. कुणबी, माळी वगैरे शुद्र लोकांत त्यांचें भटपण फार चालतें, आणि तें इतर जातीच्या व विशेषेंकरून सांप्रतकाळच्या सुधारलेल्या लोकांस फारसें ठाऊक नाहीं. जे विद्या शिकून सुधारले आहेत त्यांच्यामध्यें भटजीबुवांचें महात्म्य दिवसानुदिवस कमी होत चाललें आहे; परंतु अशी गोष्ट शुद्र जातींत नाहीं. तेथें अद्यापि बाजीरावाच्या वेळची भटशाई राज्य करीत आहे. अशा लोकांस त्यांच्या बंधनांतून सोडवावें म्हणून रा० जोतिबांनीं हा अल्प प्रयत्न केला आहे. त्यांचा दुसरा एक हेतु हा आहे, कीं, आमच्या समदृष्टि इंग्लीश सरकारनें आपल्या प्रजेंतील ह्या अतिउपयोगी वर्गास विद्या शिकवावी व तिच्या योगें त्यांचे डोळे उघडून त्यांस भटांच्या दास्यत्वांतून मुक्त करावें. हे हेतु सिद्धीस गेले असतां ग्रंथकर्त्यांचे श्रम सफळ होतील.

B. P.

**हिंदुस्थानांत** ब्राह्मण सत्ताधारी होण्यापूर्वी या पुण्यक्षेत्रीं कोण कोण व कसकसे अधिकारी कोठकोठें होते व ब्राह्मणांनीं हा देश काबीज करून लढाईत मोड होऊन सांपडलेल्या लोकांस दास करून बाकीच्या उरल्या माहा आरींतून परशरामानें कित्येकांस देशोधडी करून बाकी उरलेल्या सर्व माहा आरींस पाताळीं घालून आद्यापि त्यांस कसे गांजीत आहेत याविषयीं पवाडा.

१

सत्ता नऊ खंड ॥ होती अखंड ॥
दाहावी तशीच काशीस ॥
जपले बहुत एकीस ॥

गुणगंभीर ॥ रणामधीं शूर ॥
नेमिले प्रत्येक खंडास ॥
खंडोबा नांव दिलें त्यास ॥

वीरप्रचंड ॥ उभे मार्तंड ॥
मुख्य केले काळबैहिरिस ॥
वागवी नऊ खंडोबास ॥

देश आभंड ॥ सुभे उदंड ॥
योजिले पाहून खाशास ॥
मानिती सर्व नवलोबास ॥

मुख्य माहा सुभा[१] ॥ पाठिशीं उभा ॥
कमी नाहीं खबरदारीस ॥
दुय्यम काळबैहिरिस ॥

न्याय चौकशी ॥ सोपी सुज्ञाशी ॥
नेमिले बहुत मदतनीस ॥
मुख्य नव[२] खंडच्या न्यायास ॥

---

१. ह्मसोबा. २. नवखणची जाणाई

अनेक पायदळ ॥ घोड्याचें बळ ॥
कमी नाहीं तिरंदाजांस ॥
भिडविले भाले खांद्यास ॥

राजनितीने ॥ लढति शरतीनें ॥
झोंबती मल्ल ते युद्धास ॥
जपले बहुत एकीस ॥ १ ॥

लघु रजवाडे ॥ पडतां कोडें ॥
धावून येती कुमकेस ॥
घेऊन सात[1] आश्रयास ॥

पाऊस पाणी ॥ आबादानी ॥
भोगिती सत्ता सावकाश ॥
लाजवी स्वर्गी सुखास ॥

रत्नागिरी ॥ डोंगरावरी ॥
जात होते हवा खाण्यास ॥
पाहून थंड्या जाग्यास ॥

गड जेजुरी ॥ जाइ मल्लअरी ॥
बरोबर घेई प्रधानास ॥
नित्यशा बसे मसलतीस ॥

अती रंगेल ॥ नादीं लागले ॥
गुंतले ऐष आरामास ॥
कळाले परकी लोकांस ॥

दंगेखोरांनीं ॥ कट करुनी ॥
योजिले मुख्य ब्रह्म्यास ॥
लागले लुट धुमाळीस ॥

मार देऊन ॥ जेर करून ॥
दास बा केले बहुतांस ॥
ओळखुन पाहा या शुद्रास ॥

---

१. सातीं आसरा

बाकी उरले ॥ लेश राहिले ॥
भिडले परशरामास ॥
जपले बहुत एकीस ॥ २ ॥

देशनात्याची ॥ प्रीत बंधूची ॥
मारिले बहुता उपऱ्यांस ॥
प्रतिज्ञा सोडऊं शुद्रास ॥

परशरामास ॥ झाला बहु त्रास ॥
पाहून विधवा बहिणीस ॥
झोडीले माहा आरीस ॥

नित्य भिडून ॥ मोड करून ॥
सोडिले नाहीं गर्भिणीस ॥
उपजल्या मारी बाळास ॥

द्विजवैरी ॥ माहा जो आरी ॥
आखेर आणला जेरीस ॥
पाताळीं घातले त्यास ॥

शोध काढिले ॥ नित्य वधिले ॥
पळविले परक्या भूमीस ॥
ओळख दे आतां परभूस ॥

उरले सुरले ॥ अति पीडिले ॥
ह्मणती मांग महा आरीस ॥
भेट ह्या जुन्या क्षेत्र्यास ॥

कुरकुर पुरे ॥ मन चुरचुरे ॥
सोड सुडाची आतां आस ॥
सांगतो नीट तुला खास ॥

नित्य विनवितों ॥ तुला सुचवितों ॥
भोगशील अखेर गोत्यास ॥
जपले बहुत एकीस ॥ ३ ॥

केली धुळधानी ॥ शिवेना कोणीं ॥
सहज बंदी उदमांस ॥
ठेविना कोणी चाकरीस ॥

दाण्याला रे माहाग ॥ पोटाची रे आग ॥
सोई नाहीं पोट भरण्यास ॥
खाती मेल्या जनावरांस ॥

भूक माईना ॥ कळ साहिना
हातामधीं घेती कचकुलास ॥
धडाका उष्टें मागण्यास ॥

माईसाहेब ॥ भाईसाहेब ॥
हाका मारिती सर्वांस ॥
घरांत आल्यागेल्यास ॥

चांडाळास ॥ उष्टें देण्यास ॥
मनाई धर्मीं ब्राह्मणांस ॥
पाप जोडे देतां तुम्हास ॥

दारीं बसू नका ॥ मारूं नका हाका ॥
त्रासलों पाहून तोंडांस ॥
उठांना मारीन दगडास ॥

काय तुझा धर्म ॥ कळूं दे रे वर्म ।
भिक्षा शुद्राची खातोस ॥
कोणता धर्म तुझा खास ॥

सोड गर्वास ॥ लाग मार्गास ॥
जाळ ह्या खोट्या धर्मास ॥
जपले बहुत एकीस ॥ ४ ॥

धन्य राणीबाई ॥ झोप कसी घेई ॥
आहेस मोच्यांची धणीन खास ॥
सोडवी दीन बंधूस ॥

सर्व जगाला ॥ धडा त्वां दिला ॥
बंद केले गुलाम करण्यास ॥
लागेल बट्टा कीर्तीस ॥

नांव ऐकून ॥ आलों धांवून ॥
कधीं तूं येतीस पाहाणीस ? ॥
गांजिले मांगा माहारास ।

गोरे कामगार ॥ मोठा दरबार ॥
सोपिती सर्व ब्राह्मणास ॥
मनामधीं भीति फार त्यांस ॥

माहीती थोडी ॥ मिजाज बडी ॥
भोगिती नित्य आरामास ॥
पुरविती हक्क पेनशनीस ॥

मांग माहाआरी ॥ जेर झाले भारी ॥
विसरले आपल्या महत्वास ॥
उमजेना शत्रुकाव्यास ॥

सूड घेतला ॥ नीच मानिला ॥
शिवतां जाती आंघोळीस ॥
शिकवितो कोण लिहिण्यास ॥

शोध स्वताचा ॥ जोतिरावाचा ॥
कळवितो राणीबाईस ॥
सोडवी गुलाम केल्यांस ॥ ५ ॥

## २

ब्राह्मण जोशी शूद्राच्या घरीं मूल जन्मलें म्हणजे येऊन कसा पैसा उपटितो याविषयीं.

॥ अभंग ॥

सोहोम कोहोम नाद इतक्यांत ॥
आला गृहतात जोशीबुवा ॥ १ ॥

पुसे जन्मकाळ राशीचक्र मांडी ॥
चाळी बोटें कांडीं वेडा जैसा ॥ २ ॥

न्याहाळुनी सर्व भोळ्या पित्या बोले ॥
मुळावरी आलें बाळ तुझ्या ॥ ३ ॥

कृत्रिम्याचे बोल पडतांच कानीं ॥
घाबरले मनीं विद्याहीन ॥ ४ ॥

माता बाळाकडे पाहुनिया रडे ॥
सर्व केले वेडे पाखांड्यानें ॥ ५ ॥

पाहून ही संधि उपाय सुचवी ॥
जपास बसवी ब्राह्मणास ॥ ६ ॥

अनुष्ठानीं दान ब्राह्मणांस करा ॥
आलें विघ्नवारा बसूं नका ॥ ७ ॥

ग्रहधाक पीडा ह्मणे कर्ज काढूं ॥
भांडीकुंडी मोडूं सुखासाठीं ॥ ८ ॥

जप अनुष्ठान यथाविधि केला ॥
मूढ नागविला ग्रहमीषें ॥ ९ ॥

ताप येऊनीया तान्हे घाबरलें ॥
मृत्युपंथीं गेलें लागलेंच ॥ १० ॥

पुत्र उत्साहाच्या सुखसोहळ्याचा ॥
आनंद मुलीचा भंग केला ॥ ११ ॥

पोटें जाळूं नका लोकां फसवूनी ॥
देवा रागऊनी जोती म्हणे ॥ १२ ॥

## ३

ब्राह्मण जोशी शूद्राच्या लग्नांत त्यास कसा बुचाडतो याविषयीं.

### ॥ अभंग ॥

मागणीच्या वेळीं जोशीबुवा येई ॥
राशीबळ पाही दिमाखानें ॥ १ ॥

स्वहिताची आस न्यून कल्पोनियां ॥
ग्रह योजूनिया जप स्थापी ॥ २ ॥

लग्न वर्तवितां दुकान मांडलें ॥
गणपती केले सुपारीचे ॥ ३ ॥

खारका खोबरें नैवेद्याचा भार ॥
दक्षिणा रीतसर पैसालूट ॥ ४ ॥

टिपी कागदांत तिथी नेमिलेल्या ॥
कुंकें शोभविल्या हातीं दिल्या ॥ ५ ॥

वर्ण वय गूण तोलून पाहाणी ॥
नाहीं येत मनीं ज्याच्या लेश ॥ ६ ॥

लग्नाचे आधीं मोठी गडबड ॥
धावे दुडदुड दोहींकडे ॥ ७ ॥

सुरवात केली वरा वस्त्रें देई ॥
भाळीं टिळा लावी देऊळांत ॥ ८ ॥

उठे झडकरी मांडवांत जाई ॥
बोले लवलाहीं त्वरा करा ॥ ९ ॥

हातीं शस्त्रें देई पाठराखे केले ॥
मामा नेमियेले परस्पर ॥ १० ॥

मध्यें उभा राहे हातीं अंतरपाट ॥
मंगळाचा पाठ सुरू केला ॥ ११ ॥

टाळ्यांच्या गोंधळीं वाद्यांचा दणाण ॥
म्हणे शुभ लग्न सावधान ॥ १२ ॥

वधूवर दोघे बिचारे अज्ञानी ॥
दिलें गुंतवूनी जन्मभर ॥ १३ ॥

अगांतुक बाकी धांदलीनें येती ॥
हात पसरिती पैशासाठीं ॥ १४ ॥

सूत गुंडाळूनी वधूवरां कोंडी ॥
दक्षिणा ती तोंडी बीजमंत्र ॥ १५ ॥

काड्यामुड्या जाळी लज्जाहोम केला ॥
नाही मनीं घाला लज्जाहीन ॥ १६ ॥

उभयतांच्या काळ तेलसाडी देतां[1] ॥
नाक मुरडलां वेळ जाई ॥ १७ ॥

फार थोडी ह्मणे मांडवखंडणी ॥
घेई तो भांडूनी अखेरीस ॥ १८ ॥

परजातीवर तुह्मी सोपूं नका ॥
बुडवितां फुका धर्ममीषें ॥ १९ ॥

वडील धाकुटे स्नेही उभयतांचे ॥
पंच स्वजातीचे निवडुनी ॥ २० ॥

१. साड्याच्या दिवसीं धर्माच्या हिमाईतीनें शूद्रापासून आडवून पैसा फार घेतात.

वर्ष वय गुण प्रित परस्पर ॥
पाहा सारासार तपासूनी ॥ २१ ॥

देवा प्रार्थूनिया घालवावी माळ ॥
मेळऊनी मेळ आनंदाचा ॥ २२ ॥

ब्राह्मणांचें येथें नाहीं प्रयोजन ॥
द्यावे हाकलून जोती म्हणे ॥ २३ ॥

## ४

ब्राह्मण जोशी शूद्राच्या घरांत ऋतुशांतीच्या वेळीं अनुष्ठान वगैरे करून तूप-पोळ्यांची चंगळ कशी उडवितो व दक्षिणा कशी घेऊन जातो याविषयीं

॥ अभंग ॥

ऋतु प्राप्त होतां साधिती बा वेळ
साहिना ती कळ उभा दारीं ॥ १ ॥

दाविती उल्हास बोलून मंजूळ
पोटीं तळमळ द्रव्यलोभ ॥ २ ॥

सोडूनीया लाज विचारीती काळ ॥
पाही राशीबळ पंचांगांत ॥ ३ ॥

जप अनुष्ठान स्थापिती निवळ ॥
झटती केवळ जसे स्नेही ॥ ४ ॥

ब्राह्मणभोजन तूप चळचळ ॥
दक्षिणा तुंबळ आधीं बोली ॥ ५ ॥

फुकटचे खाती दाटविती नळ ॥
करी मळमळ पाणी पीतां ॥ ६ ॥

धनी जेवतांना उठे पोटशूळ ॥
गुळवणी गूळ पाणी घाला ॥ ७ ॥

भोंदिती अज्ञानी गृह पाठवळ ॥
इहलोकीं काळ पोटबाबू ॥ ८ ॥

आप्तसोयऱ्यांचा मेळवूनी मेळ ॥
त्यागावें समूळ पाखांड्यास ॥ ९ ॥

प्रार्थना देवाची भोजन निर्मळ ॥
सदा सर्वकाळ जोती म्हणे ॥ १० ॥

## ५

ब्राह्मण जोशी शूद्रानें घर बांधलें म्हणजे घरभरणीच्या वेळीं आपण ताजा स्वयंपाक खाऊन उरलेला शिळा पाक घरधण्यास ठेवून कसा जातो याविषयीं.

### ॥ अभंग ॥

पाया उन्हामध्यें बिगारी खांदिती ॥
टोपली वाहाती मलम्याची ॥ १ ॥

गगनीं पाहाडीं गवंडी चढती ॥
विटा त्या मांडिती गाऱ्यामध्यें ॥ २ ॥

माकडाचेपरी सुतार वेंगती ॥
लांकडें जोडिती कळाशीनें ॥ ३ ॥

पोटासाठीं सर्व यातना भोगिती ॥
नाहीं पोटीं भीती कामकऱ्या ॥ ४ ॥

घामाचे पाझर थेंब टबकती ॥
सर्वदा झटती दया फुटे ॥ ५ ॥

श्रम पाहूनिया धनी खुष होती ॥
वचन बा देती जेवणाचें ॥ ६ ॥

अशा जेवणास वास्तु नांव देती ॥
खुशामती येती अखेरीस ॥ ७ ॥

देऊन मुहूर्त दिवस नेमिती ॥
नादीं लाविताती घरधनी ॥ ८ ॥

ब्राह्मणभोजन होम करविती ॥
ढाला उभारीती निशाणांच्या ॥ ९ ॥

थाप देऊनिया भोजन सारिती ॥
दक्षिणा ती घेती यथासांग ॥ १० ॥

संध्याकाळ झाला आशीर्वाद देती ॥
बुडवूनी जाती अज्ञान्याला ॥ ११ ॥

धनी कामगार तोंडाकडे पहाती ॥
शिळा पाक खाती सावकाश ॥ १२ ॥
भोळ्या भाविकाला ठक फसविती ॥
अधोगती जाती जोती म्हणे ॥ १३ ॥

॥ अभंग ॥

जळो जळो तुमचें जिणें ॥
उद्योग्या आधीं ताजें खाणें ॥ १ ॥
हे बा कृत्य लाजिरवाणें ॥
समजोत कपटी शहाणें ॥ २ ॥
घ्यावी घ्यावी माझी भाक ॥
जरी कां सांगेन अनेक ॥ ३ ॥
स्वकष्टानें पोटें भरा ॥
जोती शिकवी फजितखोरा ॥ ४ ॥

६

ब्राह्मण शूद्राच्या घरीं पोथी वाचायाचे निमित्तानें शिरुन त्याच्या संसार खटल्यांत हात घालून त्यास कसा बुडवितो याविषयीं.

॥ पवाडा ॥

बामनी कावा ॥ समजुन घ्यावा ॥
आहेत आकलेचे खबरदार ॥
शहाणे ठक आरपार ॥
ऋषिमंडळ ॥ धर्माचें बळ ॥ वेद सबळ ॥
कडक बिजली आपाचें घर ॥
देवा[१] लाथ छातीवर ॥
शिपायी क्रूर ॥ लेखणिस धार ॥
दास बा केले महा वीर ॥
ब्रह्म्या मुख्य शिरावर ॥

---

१. भृगुनामक ऋषीनें विष्णूच्या छातीवर लाथ मारली होती.

रणीं रणशूर ॥ घुसे बेशीर ॥
तिराचा मार अनीवार ॥
परशरामाचें लष्कर ॥

विद्याहीन ॥ शुद्र पाहून ॥
हळूच कसा गांठितां त्याला
लागतो पोथ्या वाचायाला ॥

बोध करितो ॥ महत्व शिकवितो ॥
चुकेना नित्य नेमाला ॥
गरीबी दावी भोळ्याला ॥

अट्टल धूर्त ॥ पाहून मुहूर्त
समाप्ति दिवस नेमिला ॥
उपटी शालदुशाल्याला ॥

गोडी लावून ॥ होई कारकुन ॥
आटपी सर्व कारभार ॥
शहाणा ठक आरपार ॥ १ ॥

उघडी दप्तर ॥ पाही सत्वर ॥
रोखे निवडी प्रतवार ॥
तगादे धाडी घरोघर ॥

पैसा उगवी ॥ नोक दाखवी ॥
हुशारी छाप धन्यावर ॥
अर्ज्या दांड कुळावर ॥

निऱ्या सोडिती ॥ फिरे कोडतीं[1] ॥
माठला अर्जी वाचणार ॥
ठराव पाती बरोबर ॥

कुळा घरीं जाई ॥ सूचना देई ॥
अर्जी केली तुजवर ॥
सांगतो फेड उपकार ॥

---

१. कोडतांत

माझी समजुत ॥ काढ एकांत ॥
घेवितो तुमची तकरार ॥
करिवतो हसे मुकरर ॥

करुन फितुर ॥ मुठ केली गार ॥
धन्याची समजूत वरवर ॥
उभयतां देई गाजर ॥

फिरून भागला ॥ खरा श्रमला
झोंप आली आंगी सुरसुर ॥
आंगमोडे देई वारंवार ॥

कामाचा नीर ॥ पोशिला धूर ॥
घराला जाई सूत्रधार ॥
शहाणा ठक आरपार ॥ २ ॥

पाडवा गुढी ॥ ढाल फडफडी ॥
रामजन्माचा पसार ॥
काढी हनुमंत पाठीवर ॥

आषाढमासी ॥ एकादशी ॥
बाकी चार सोमवार ॥
पूजवितो बैल बेंदूर ॥

नागपंचमी ॥ कृष्ण अष्टमी ॥
ब्राह्मणभोजनाचा भार ॥
चंगील तूप पोळीवर ॥

पिंड मांडितो ॥ पाया पडवितो ॥
भादवी भक्ति व्यापार ॥
माजला तट्टू गुलजार ॥

विजय दशमीस ॥ पुजवी घोडयांस ॥
फराळ धनतेरस वर ॥
लक्ष्मी–पूजन वहीवर ॥

तुळशी लग्नांत ॥ मकरसंक्रांत ॥
वाचितो वर्षफळ सार ॥
मजुरी घेतो हातावर ॥

पैसा उडाला ॥ शुद्र बुडाला ॥
उरला होळी संवस्कार ॥
मारवी बोंब आखेर ॥
मनीं कल्पिलें ॥ ग्रहण योजिलें ॥
दानधर्मांचा भडिमार ॥
शहाणा ठक आरपार ॥ ३ ॥

हिशेबी घोळ ॥ सर्व गोंधळ ॥
वाढवी कर्ज डोईवर ॥
आंतून होई सावकार ॥
पैशावर जीव ॥ येईना कींव ॥
अर्ज्या करवी धन्यावर ॥
पैसा देई गाहाणावर ॥
वेळ पाहून ॥ संधि साधून ॥
मागणी नेट त्याजवर ॥
तगादा धाडी पाठीवर ॥
दाम दुप्पट ॥ सर्व एकवट ॥
नोंदिती गहाणखतावर ॥
दुमाला पुस्त रजिष्टर ॥
संध्या सोवळें ॥ भस्म टळटळे ।
कडकली मर्जी धन्यावर ॥
निंदितो खर्चिक हा फार ॥
वर्जिलें घर ॥ घरीं व्यापार ॥
चालवी हात गाहणावर ॥
जाळितो पोट व्याजावर ॥
हातावर देई ॥ लेहून घेई ॥
वायदा आट स्टांपावर ॥
ठोकली अर्जी आखेर ॥
धन्यावर जीव ॥ केली मोठी कींव ॥
बक्षिस बीनभाडे घर ॥
शहाणा ठक आरपार ॥ ४ ॥

घालुनी फासा ॥ कोंडिला खासा ॥
मोहरा हिमतीचा फार ॥
कपाळ टेंकी हातावर ॥

तडजोड केली ॥ खातीं चढावेली ॥
वेढावा वतनावर ॥
केला शेवट उपकार ॥

उपाय खुंटला ॥ ताप पेटला ॥
झाला तुरंगी वतनदार ॥
स्त्रियेवर पडला संवसार ॥

घर नाहीं दार ॥ वाढला आहार ॥
आखेर पोट दळणावर ॥
भोंवतीं पोरें जोजार ॥

बाईस जाऊं द्या ॥ पोट भरूं द्या ॥
गाईन दुसऱ्या मधीं सार ॥
टाळी देतो हातावर ॥

राणीबाई ॥ शोधून पाही ॥
पाप हें तुझ्या शिरावर ॥
काय ! तूं जबाब देणार ? ॥

समज कांहीं धरीं ॥ उमज अंतरीं ॥
कर विद्येचा प्रसार ॥
सोडूं नये कर्तव्य सार ॥

जोतीराव ॥ कसा देई डाव ॥
गवसून राजनीती वर ॥
शहाणा ठक आरपार ॥ ५ ॥

## ७

शूद्राच्या अंतकाळीं ब्राह्मण वैद्य भटजी व कारटा बनून त्याच्या बायकोस क्रुरपणें कसा नाडितो याविषयीं.

### ॥ पोवाडा ॥

शूद्र जर्जर ॥ चाले काठीवर ॥
तीन पायाचे पशू बनले ॥
तगादे यम दारीं बसले ॥

करी तळमळ ॥ बुद्धिला बळ ॥
मन संसारीं अती रिझलें ॥
मायाजंजाळीं किती रुतले ॥

झाला घाबरा ॥ पडे पसारा ॥
लष्कर वैद्याचें हललें ॥
कैदी पडद्यामधीं केले ॥

नाड्या पहाती ॥ मात्रा योजिती ॥
औषध किमतिचें दिलें ॥
पैसे धांदलिनें नेले ॥

वार्ता ऐकून ॥ आला धावून ॥
पंख कागाचे फडफडले ॥
सोंग भट्टाचें मधीं आलें ॥

चित्ता उडाला ॥ डाव मांडिला ॥
भडभड पुराण वाचिलें ॥
दानधर्मास सुरू केलें ॥

दुखणें जड ॥ मधीं बडबड ॥
ऐकतां कानठाळ बसले ॥
रोगी ऐकेना बोले ॥

दान मागे दान ॥ पशु गोदान ।
अखेर जोडे घेतले ॥
तगादे यम दारीं बसले ॥ १ ॥

स्त्री गरगर ॥ घार जसी फिरे ॥
अश्रुपातांचा लोट चाले ॥
हृदयीं काळीज होरपळे ॥

मनाला खाई ॥ भिरभिर पाही ॥
पतिकडे नीट न्याहाळीलें ॥
जसें का आकाश कोसळलें ॥

उठे लवलाही ॥ पोराकडे जाई ॥
उचलून कडेवर घेतलें ॥
दुध वाईनें पाजिलें ॥

सोडी झटकुन ॥ येई परतून ॥
ब्राह्मण मधीं आडवे पडले ॥
बोलणें स्त्रीचें बंद केलें ॥

जीव तरफडे ॥ रोंख पतिकडे ॥
खालीं हनवटिला धरलें ॥
मुके वोटाला हाळूच दिले ॥

दान करूं द्या ॥ स्वस्थ मरूं द्या ॥
क्लेश संसार पुरे झाले ॥
आमंत्रण देवाचें आलें ॥

पुरे कर आतां ॥ खोटी ममता ॥
फुसफुस पुराण लाविलें ॥
व्यर्थ हें जन्म दवडिलें ॥

द्विज हयगई ॥ करतां सोई नाहीं ।
कैक पाहा आधोगती गेले ॥
तगादे यम दारीं बसले ॥ २ ॥

अती व्यापिला ॥ प्राण त्यागिला ॥
वेटुळें ममतेचें पडलें ॥
भट्टाला मधीच कोंडिलें ॥

हळूच निघाला ॥ घरीं पोंहचला ॥
भोजन यथासांग केलें ॥
कारटे स्मशानीं बनले ॥

मनीं योजून ॥ ग्रह धुंडून ॥
त्रिपादा शोधून काढलें ॥
मन भौताचे खचविले ॥

विधी सुरू केले ॥ मंत्र बोलिले ॥
पिठाचे पुतळे करविले ॥
दर्भ तीर्थानें स्थापिले ॥

द्रव्य घेवून ॥ अग्नि देऊन ॥
नाडून घरीं परत गेले ॥
डोम कागानें अंतीं पिडले ॥

आप्त उरले ॥ स्वस्थ बसले ॥
बाईला समजाऊं लागले ॥
मुलानें पोटासीं धरिलें ॥

कंवटी फुटली ॥ सर्व उठलीं ॥
कंबर बाईची खचली ॥
घरीं मित्रांनीं पोहचविली ॥

कारटा येई ॥ हळूच सुचवी ॥
बेत विधीचे ठरविले ॥
तगादे यम दारीं बसले ॥ २ ॥

वडील पुत्राला ॥ जीन घातला ॥
गरूडपुराण नाचविले ॥
विधी नऊ दिवस करविले ॥

दाहावा दिवस ॥ जमवी सर्वांस
भाताचे उंडे मांडीवले ॥
कावळ्या भोजन देविवलें ॥

भांडीं कुंडीं दान ॥ छत्री निदान ॥
मन काठीवर बसलें ॥
शेवटीं जोड्यानें तृप्त झाले ॥

धूर्त अट्टल ॥ केला सट्टल ॥
भट्टानें शूद्रा ठकविलें ॥
ज्ञान सर्वांचें कसें खुंटलें ॥

कर्जबाजारी ॥ झाला बहुपरी ॥
धर्म थापिनें किती लुटले ॥
त्राण तेराव्या नाहीं उरलें ॥

भट्ट धनको ॥ शुद्र ऋणको ॥
कर्ज शेतावर काढिलें ॥
भोजन जातीला दिलें ॥

थोड्या दिवसांत ॥ व्याज मुद्लांत ॥
गहाणखत चोख नवें केलें ॥
मिराशी भट्ट वारस झाले ॥

निमकहरामी ॥ मोठा गुलामी ॥
चाकरी यजमाना ठेवलें ॥
तगादे यम दारीं बसले ॥ ४ ॥

गवत काढिती ॥ मदत करिती ॥
बाईचे सुखसोहळे गेले ॥
वेळेला तुकडा ना मिळे ॥

वित्त उडालें ॥ दांत पडले ॥
कोरडी भाकर ना गिळे ॥
मुलाकडे पाहून तळमळे ॥

पोटाने गेली ॥ मरुं घातली ॥
भट्टा भेटिला बोलिवले ॥
अती गरीबी म्हणोन त्यजिले ॥

बाई वारली ॥ शेतीं पुरली ॥
गरुडपुराण कोठें लपलें ॥
भट्टानें तोंड केलें काळें ॥

राणीबाई ॥ लक्ष देई ॥
दुःख हें रडून गाईलें ॥
द्विजांनीं शुद्रा गांजिलें ॥

शिकिव शुद्राला ॥ पंगु बंधुला ॥
दास ब्रह्म्यानें मुळीं केलें ॥
ज्ञान देण्याचें बंद ठेवले ॥

किर्ती ऐकून ॥ आलों धावून ॥
जगामधीं दास सोडविले ॥
धडे त्वां कैकाला दिले ॥

राव जोतिचे ॥ मार फुलांचे ॥
ओळखून शत्रु झोडिले ॥
तगादे यम दारीं बसले ॥ ५ ॥

## ८

### ब्राह्मण शुद्रास प्रतिवर्षी भाद्रपदमासीं पक्षांत व वर्षातील साधारण सणावारांत व सूर्यचंद्राच्या ग्रहणकाळीं कशा भुलथापी देऊन बुडवितो याविषयीं.

॥ अभंग ॥

शेती दास केला सोडीना शुद्राला ॥
कर बसविला वर्षासन ॥ १ ॥

वसुलाचा थाट भाद्रपद मासीं ॥
सोडीना पुत्रासीं जन्मभर ॥ २ ॥

संक्रांती पाडवा भोके सर्व सणीं ॥
लाज नाहीं मनीं वाटोळ्याच्या ॥ ३ ॥

तीर्थयात्रेठायीं बगळ्याचे परी
द्रव्यहीन करी भाविकास ॥ ४ ॥

व्यतिपात पुत रिकामक्या वेळीं ॥
फिरे आळोमाळीं भीकमाग्या ॥ ५ ॥

ग्रह आकाशीचें सोंग उभें केलें ॥
ललितीं आणिलें द्रव्यलोभें ॥ ६ ॥

लाथाबुक्क्या बाकी[1] दान सर्व घेई ॥
बुडवूनी जाई कुणब्यास ॥ ७ ॥

तगाद्याची तुम्ही वाट पाहूं नका ॥
मारा बोंबा हाका जोशा नांवें ॥ ८ ॥

व्याजबट्ट्यासुद्धां नाटक्याची बाकी ॥
फेडा बीनचुकी रोखारोखी ॥ ९ ॥

आतां तरी तुम्ही शुद्रा भोंदुं नका ॥
जोतीबाचा ठोका ऐकुनिया ॥ १० ॥

---

१. शिवाय.

## ९

ब्राह्मणाचे साधारण गुण व कामें—यांचा अति लोभ व तो तृप्त करून घेण्यासाठीं जी ठकबाजी करितो याविषयीं.

### ॥ अभंग ॥

उत्तम ब्राह्मण जन्म हिंदुस्थानीं ॥
दिसे शुद्रावाणी अखंडीत ॥ १ ॥

दोरा घालुनीया शुद्र द्विज केला ॥
नाहीं पालटला जरा कोठे ॥ २ ॥

द्वाड खोडकर स्वभाव देहाचा ॥
जाईना मुळीचा वज्रलेप ॥ ३ ॥

स्नान संध्या नित्य टिळाटोपीवर ॥
घेती मांडीवर जारीणीस ॥ ४ ॥

नेसुनी सोवळें विटाळसा झाला ॥
शिवेना शूद्राला शुद्ध कैसा ॥ ५ ॥

श्रवण वेदाचें शुद्रा बंद केलें ॥
मुळीं शिकवीलें इंग्लिशांना ॥ ६ ॥

भूदेव होवूनी पायां पडविती ।
पायथीं पडती रांडांच्या हो ॥ ७ ॥

शूद्राला भोजन दुरून वाढिती ।
मद्यपान घेती शाक्तमिषें ॥ ८ ॥

पायधुववणी शूद्रा तीर्थ देती ॥
मुखरस पिती यवनीचा ॥ ९ ॥

विद्याहीन शूद्र लज्जाहीन झाला ॥
जोडा सांभाळीला ब्राह्मणाचा ॥ १० ॥

हातांतील जोडे मधीं टाकूं नका ॥
शोध करा नीका जोती म्हणे ॥ ११ ॥

समाप्त

३

# गुलामगिरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८०१३१ वि: निबंध
क्रमांक २२२५ नों: दि: २/१/६५

# SLAVERY.

*(IN THE CIVILISED BRITISH GOVERNMENT UNDER THE CLOAK OF BRAHMANISM)*

EXPOSED BY

JOTIRAO GOVINDRAW FULE

(ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यांत)

# गुलामगिरी.

(सुधारल्या इंग्लिश राज्यांत.)

हें लहानसें पुस्तक

जोतीराव गोविंदराव फुले

यांनी

लोक हितार्थ केलें

तें

पुणें येथें "पुना सिटी प्रेस" छापखान्यांत छापलें.

किंमत १२ आणे

गरीब शूद्रादिअतिशूद्रांस ६ आणे

(All Rights Reserved.)

[१८७३ मध्यें प्रकाशित झालेल्या प्रथमावृत्तीतील मुखपृष्ठाचें यथामूल मुद्रण]

# DEDICATED

TO

## THE GOOD PEOPLE OF THE UNITED STATES

AS A TOKEN OF ADMIRATION FOR THIR
*SUBLIME DISINTERESTED AND SELFSACRIFICING DEVOTION,*
in the cause of Negro Slavery; and with an earnest desire, that my countrymen may take their noble example as their guide in the emancipation of their Sudra Brothern from the trammels of Brahmin thraldom.

THE AUTHOR

(प्रथमावृत्तीतील अर्पणपत्रिका)

युनैटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांनीं
गुलामांस दास्यत्वापासून मुक्त कर-
ण्याच्या कामांत औदार्य,
निरापेक्षता, व परोपकार
बुद्धी दाखविली या-
स्तव त्यांच्या
सन्मानार्थ

हें लहानसें पुस्तक

त्यांस परम
प्रीतिनें नजर
करितों, आणि माझे देश
बांधव त्यांचा त्या स्तुत्य कृत्याचा
कित्ता, आपले शूद्रबांधवांस ब्राह्मणलो-
कांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या
कामांत घेतील अशी अशा बाळगतों.

ग्रंथकर्ता.

(प्रथमावृत्तीतील अर्पणपत्रिका)

# PREFACE

" The day that reduces a man to slavery takes from him the half of his virtue, " —Homer.

" Our system of Government in India is not calculated to raise the character of those subject to it, nor is the present system of education one to do more than *over-educate the few,* leaving the mass of the people as ignorant as ever and still mere at the mercy of the few learned ; in fact, it is an extension of the demoralizing Brahmin-ridden policy, which, perhaps, has more retarded the progress of civilization and improvement in India generally than anything else."

Col. G. J. Haly —*On Fisheries in India.*

" Many ages have elapsed since peculiar resources were afforded to the Brahmins; but the most considerate cosmopolite would hesitate to enroll them amongst the benefactors of the world. They boast of vast stores of ancient learning. They have amassed great riches, and been invested with unbounded power, but to what good end ? They have cherished the most degrading superstitions and practised the most shameless impostures. They have arrogated to themselves the possession and enjoyment of the rarest gifts of fortune and perpetuated the most revolting system known to the world. It is only from a diminution of their abused power that we can hope to accomplish the great work of national regeneration. "

Mead's *Sepoy Revolt.*

Recent researches have demonstrated beyond a shadow of doubt that the Brahmans were not the aborigines of India. At some remote period of antiquity, probably more than 3000 years ago, the Aryan progenitors of the present Brahmin Race descended upon the plains of Hindoostan from regions lying beyond the Indus, the Hindoo Koosh, and other adjoining tracts. According to Dr. Pritchard, the Ethnologist, they were an off-shoot of the Great Indo-European race, from whom the Persians, Medes, and other Iranian nations in Asia

and the principal nations in Europe like-wise are descended. The Affinity existing between the Zend, the Persian and Sanscrit languages, as also between all the European languages, unmistakably points to a common source of origin. It appears also more than probable that the original cradle of this race being an arid, sandy and mountainous region, and one ill calculated to afford them the sustenance which their growing wants required, they branched off into colonies, East and West. The extreme fertility of the soil in India, its rich productions, the proverbial wealth of its people, and the other innumerable gifts which this favoured land enjoys, and which have more recently tempted the cupidity of the Westeren nations, no doubt, attracted the Aryans, who came to India, not as simple emigrants with peaceful intentions of colonization, but as conquerors. They appear to have been a race imbued with very high notions of self, extremely cunning, arrogant and bigoted. Such self-gratulatory, pride-flattering epithets as आर्य, भूदेव etc., with which they designated themselves, confirm us in our opinion of their primitive character, which they have preserved up to the present time, with, perhaps, little change for the better. The aborigines whom the Aryans subjugated, or displaced, appear to have been a hardy and brave people from the determined front which they offered to these interlopers. Such opprobrious terms, as (शूद्र) Sudra 'insignificant,' महारी 'the great foe' अंत्यज, चांडाळ etc. with which they designated them, undoubtedly show that originally they offered the greatest resistance in their power to their establishing themselves in the country, and hence the great aversion and hatred in which they are held. From many customs* traditionally handed down to us, as well as from

* A most remarkable and striking corroboration of these views is to be found in the religious rites observed on some of the grand festivals which have a reference to Bali Raja, the great king who appears to have reigned once in the hearts and affections of the Sudras and whom the Brahmin rulers displaced. On the day of *Dushara,* the wife and sisters of a Sudra, when he returns from his worship of the *Shumi Tree* and after the distribution of its leaves, which are

the mythological legends contained in the sacred books of the Brahmins, it is evident that there had been a hard struggle for ascendancy between the two races. The wars of Dev and Daitya, or the Rakshas, about which so many fictions are found scattered over the sacred books of the Brahmins, have certainly a reference to this primeval struggle. The original inhabitants with whom these earth-born Gods, the Brahmins, fought, were not inappropriately termed Rakshas, that is the protectors of the land. The incredible and foolish legends regarding their form and shape are no doubt mere chimeras, the fact being that these people were of superior stature and hardy make. Under such leaders as Brahma, Purshram and others, the Brahmins waged very protracted wars against the original inhabitants. They eventually succeeded in establishing their supremacy and subjugating the aborigines to their entire control. Accounts of these conquests, enveloped with a mass of incredible fiction, are found in the books of the Brahmins. In some instances they were compelled to emigrate, and in others wholesale extermination was resorted to. The cruelties which the European settlers practised on the American Indians on their first settlement in the new world, had certainly their parallel in India on the advent of the Aryans and their subjugation of the aborigines. The cruelties and inhuman atrocities which Pursh-

---

regarded on that day as equivalent to gold, amongst his friends, relations and acquaintances, he is greeted, at home with a welcome इडा पिडा जावो आणि बळीचें राज्य येवो "Let all troubles and misery go, and the kingdom of Bali come." Whereas the wife and sisters of a Brahmin place on that day in the foreground of the house an image of Bali, made generally of wheaten or other flour, and when the Brahmin returns from his worship of the *Shumi Tree* he takes the stalk of it, pokes with it the belly of the image and then passes into the house. This contrariety, in the religious customs and usages obtaining amongst the Sudras and the Brahmins and of which many more examples might be adduced, can be explained on no other supposition but that which I have tried to confirm and elucidate in these pages.

ram committed on the Kshetrias, the people of this land, if we are to believe even one tenth of what the legends say regarding him, surpass our belief and show that he was more a fiend than a God. Perhaps in the whole range of history it is scarcely possible to meet with such another character as that of Purshram, so selfish, infamous, cruel and inhuman. The deeds of Nero, Alaric or Machiavelli sink into insignificance before the ferocity of Purshram The myriads of men and defenceless children whom he butchered, simply with a view to the establishment of his coreligionists on a secure and permanent basis in this land, is a fact for which generations ought to execrate his name, rather than deify it.

This, in short, is the histroy of Brahmin domination in India. They originally settled on the banks of the Ganges whence they gradually spread over the whole of India. In order, however, to keep a better hold on the people they devised that weird system of mythology, the ordination of caste, and the code of cruel and inhuman laws, to which we can find no parallel amongst other nations. They founded a system of priestcraft so galling in its tendency and operation, the like of which we can hardly find anywhere since the times of the Druids. The institution of Caste, which has been the main object of their laws, had no existence among them originally. That it was an after-creation of their deep cunning is evident from their own writings. The highest rights, the highest privileges and gifts, and everything that would make the life of a Brahmin easy, smooth-going and happy–everything that would conserve or flatter their self-pride,–were specially inculcated and enjoined, whereas the Sudras and Atisudras were regarded with supreme hatred and contempt, and the commonest rights of humanity were denied them. Their touch, nay, even their shadow, is deemed a pollution. They are considered as mere chattels, and their life of no more value than that of meanest reptile; for it is enjoined that if a Brahmin, "kill a cat or an ichneumon, the bird Chasha, or a frog or a dog, a lizard, an owl, a crow or a Sudra" he is absolved of his sin

by perfoming the चांद्रायण प्रायश्चित, a fasting penance, perhaps for a few hours or a day and requiring not much labour or trouble. While for a Sudra to kill a Brahmin is considered the most heinous offence he could commit, and the forfeiture of his life is the only punishment his crime is considered to merit. Happily for our Sudra brethren of the present day our enlightened British Rulers have not recognized these preposterous, inhuman and unjust penal enactments of the Brahmin legislators. They no doubt regard them more as ridiculous fooleries than as equitable laws. Indeed, no man possessing even a grain of common sense would regard them as otherwise. Any one, who feels disposed to look a little more into the laws and ordinances as embodied in the *Manava Dharma Shastra* and other works of the same class, would undoubtedly be impressed with the deep cunning underlying them all. It may not, perhaps, be out of place to cite here a few more instances in which the superiority or excellence of the Brahmins is held and enjoined on pain of Divine displeasure:

The Brahmin is styled the Lord of the Universe, even equal to the God himself. He is to be worshipped, served and respected by all.

A Brahmin can do no wrong.

Never shall the King slay a Brahmin, though he has committed all possible crimes.

To save the life of a Brahmin any falsehood may be told. There is no sin in it.

No one is to take away anything belonging to a Bramin.

A king, though dying with want, must not receive any tax from a Brahmin, nor suffer him to be afflicted with hunger or the whole kingdom will be afflicted with famine.

The feet of a Brahmin are holy. In his left foot reside all the तीर्थ (holy pilgrimages) and by dipping which into water he makes it as holy as the waters at the holiest of shrines.

A Brahmin may compel a man of the servile class to perform servile duty, because such a man was created by the almighty only for the purpose of serving Brahmins.

A Sudra, though emancipated by his master, is not released from state of servitude; for, being born in a state which is natural to him, by whom can he be divested of his natural attributes?

Let a Brahmin not give temporal advice nor spiritual counsel to a Sudra.

No superfluous accumulation of wealth shall be made by a Sudra, even though he has the power to make it, since a servile man who has amassed riches becomes proud, and by his insolence or neglect he gives pain even to Brahmins.

If a Sudra cohabit with a Brahminee adultress, his life is to be taken. ·But if a Brahmin goes even unto the lawful wife of a Sudra he is exempted from all corporal punishment.

It would be needless to go on multiplying instances such as these. Hundreds of similar ordinances including many more of a worse character than these can be found scattared over their books. But what can have been the motives and objects of such cruel and inhuman Laws? They are, I believe, apparent to all but to the infatuated, the blind and the selfinterested. Anyone who runs may even read them. Their main object in fabricating these falsehoods was to dupe the minds of the ignorant and to rivet firmly on them the chains of perpetual bondage and slavery which their selfishness and cunning had forged. The severity of the laws as affecting the Sudras, and the intense hatred with which they were regarded by the Brahmins can be explained on no other supposition but that there was, originally between the two, a deadly feud, arising as we have shown above, from the advent of the latter into this land. It is surprising to think what a mass of specious fiction these interlopers invented with a view to hold the original occupiers of the soil fast in their clutches, and rule securely for ages yet to come through the means of their credulity. Anyone who will consider well the whole history of Brahmin domination in India, and the thraldom under which it has retained the people even up to the present day. will agree with us in thinking that no language could be too harsh by which to

characterise the selfish heartlessness and the consummate cunning of the Brahmin tyranny by which India has been so long governed. How far the Brahmins have succeeded in their endeavours to enslave the minds of the Sudras and Atisudras, those of them who have come to know the true state of matters know well to their cost. For generations past they have borne these chains of slavery and bondage. Innumerable Bhut writers, with the selfsame objects as those of Menu and others of his class, added from time to time to the existing mass of legends, the idle phantasies of their own brains, and palmed them off upon the ignorant masses as of Divine inspiration, or as the acts of the Deity himself. The most immoral, inhuman, unjust actions and deeds have been attributed to that Being who is our Creator, Governor and Protector, and who is all Holiness himself. These blasphemous writings, the products of the distempered brains of these interlopers, were received as gospel truths, for to doubt them was considered as the most unpardonable of sins. This system of slavery, to which the Brahmins reduced the lower classes is in no respects inferior to that which obtained a few years ago in America. In the days of rigid Brahmin dominancy, so lately as that of the time of the Peshwa, my Sudra brethren had even greater hardships and oppression practised upon them than what even the slaves in America had to suffer. To this system of selfish superstition and bigotry, we are to attribute the stagnation and all the evils under which India has been groaning for many centuries past. It will, indeed, be difficult to name a single advantage which accrued to the aborigines from the advent of this intensely selfish and tyrannical sect. The Indian Ryot (the Sudra and Atisudra) has been in fact a proverbial Milch cow. He has passed from hand to hand. Those who successively held sway over him cared only to fatten themselves on the sweat of his brow, without caring for his welfare or condition. It was sufficient for their purposes that they held him safe in their clutches for squeezing out of him as much as they possibly could. The Brahmin had at last so contrived to entwine himself round the Sudra

in every large or small undertaking, in every domestic or public business, that the latter is by custom quite unable to transact any concern of moment without his aid.

This is even true at the present time. While the Sudra on the other hand is so far reconciled to the Brahmin yoke, that like the American slave he would resist any attempt that may be made for his deliverance and fight even against his benefactor. Under the guise of religion the Brahmin has his finger in every thing, big or small, which the Sudra undertakes. Go to his house, to his field or to the court to which business may invite him, the Brahmin is there under some specious pretext or other, trying to squeeze out of him as much as his cunning and wily brain can manage. The Brahmin despoils the Sudra not only in his capacity of a priest, but does so in a variety of other ways. Having by his superior education and cunning monopolized all the higher places of emolument, the ingenuity of his ways is past finding out, as the reader will find on an attentive perusal of this book. In the most insignificant village as in the largest town, the Brahmin is the all in all; the be all and the end all of the Ryot. He is the master, the ruler. The Patell of a village, the headman, is in fact a nonentity. The Koolkurnee, the hereditary Brahmin village accountant, the notorious quarrel-monger, moulds the Patell according to his wishes. He is the temporal and spiritual adviser of the ryots, the Soucar in his necessities and the general referee in all matters. In most instances he plans active mischief by advising opposite parties differently, so that he may feather his own nest well. If we go up higher, to the Court of a Mamlutdar, we find the same thing. The first anxiety of a Mamlutdar is to get round him, if not his own relatives, his castemen to fill the various offices under him. These actively foment quarrels and are the media of all corrupt practices prevailing generally round about these Courts. If a Sudra or Atisudra repairs to his Courts, the treatment which he receives is akin to what the meanest reptile gets. Instead of his case receiving a patient and careful hearing,

a choice lot of abuse is showered on his devoted head, and his prayer is set aside on some pretext or other. Whereas if one of his own castemen were to repair to the Court on the self-same business, he is received with all courtesy, and there is hardly any time lost in getting the matter right. If we go up still higher to the Collector's and Revenue Commissioner's Courts and to the other Departments of the Public Service, the Engineer, Educational etc., the same system is carried out on a smaller or greater scale. The higher European officers generally view men and things through Brahmin spectacles, and hence the deplorable ignorance they often exhibit in forming a correct estimate of them. I have tried to place before my readers in the concluding portions of this book what expedients are employed by these Brahmin officials for fleecing the Coonbee in the various departments to which business or his necessities induce him to resort. Any one knowing intimately the workings of the different departments, and the secret springs which are in motion, will unhesitatingly concur with me in saying that what I have described in the following pages is not one hundredth part of the rogueries that are generally practised on my poor, illiterate and ignorant Sudra brethren. Though the Brahmin of the old Peishwa school is not quite the same as the Brahmin of the present day, though the march of Western ideas and civilization is undoubtedly telling on his superstition and bigotry, he has not as yet abandoned his time-cherished notions of superiority or the dishonesty of his ways. The Beef, the Mutton, the intoxicating beverages stronger and more fiery than the famed *Somejuice*, which their ancestors once relished, as the veriest dainties, are fast finding innumerable votaries among them.

The Brahmin of the present time finds to some extent, like Othello, that his occupation is gone. But knowing full well this state of matters, is the Brahmin inclined to make atonement for his past selfishness? Perhaps, it would have been useless to repine over what has been suffered and what has passed away, had the present state been all that

is desirable. We know perfectly well that the Brahmin will not descend from his self-raised high pedestal and meet his Coonbee and low caste brethren on an equal footing without a struggle. Even the educated Brahmin who knows his exact position and how he has come by it, will not condescend to acknowledge the errors of his forefathers and willingly forego the long cherished false notions of his own superiority. At present, not one has had the moral courage to do what only duty demands, and as long as this state of matters continues, sect distrusting and degrading sect, the condition of the Sudras will remain unaltered, and India will never advance in greatness or prosperity.

Perhaps a part of the blame in bringing matters to this crisis may be justly laid to the credit of the Government. Whatever may have been their motives in providing ampler funds and greater facilities for higher education and neglecting that of the masses, it will be acknowledged by all that in justice to the latter this is not as it should be. It is an admitted fact that the greater portion of the revenues of the Indian Empire are derived from the Ryot's labor—from the sweat of his brow. The higher and richer classes contribute little or nothing to the state's exchequer. A well informed English writer states that,

"Our income is derived, not from surplus profits, but from capital; not from luxuries but from the poorest necessaries. It is the product of sin and tears."

That Government should expend profusely a large portion of revenue thus raised, on the education of the higher classes, for it is these only who take advantage of it, is anything but just or equitable. Their object in patronising this virtual high class education appears to be to prepare scholars. "Who, it is thought, would in time vend learning without money and without price." "If we can inspire." say they "the love of knowledge in the minds of the superior classes, the result will be a higher standard of morals int he cases of the individuals, a large amount of affection for the British Government, and an unconquerable

desire to spread among their own countrymen the intellectual blessings which they have received."

Regarding these objects of Government the writer, above alluded to, states that :—

"We have never heard of philosophy more benevolent and more utopian. It is proposed by men who witness the wondrous changes brought about in the Western world, purely by the agency of popular knowledge, to redress the defects of the two hundred millions of India, by giving superior education to the superior classes and to them only." ***"We ask the friends of Indian Universities to favour us with a single example of the truth of their theory from the instances which have already fallen within the scope of their experience. They have educated many children of wealthy men, and have been the means of advancing very materially the worldly prospects of some of their pupils; but what contribution have these made to the great work of regenerating their fellowmen? How have they begun to act upon the masses? Have any of them formed classes at their own homes or elsewhere, for the instruction of their less fortunate or less wise countrymen? Or have they kept their knowledge to themselves, as a personal gift, not to be soiled by contact with the ignorant vulger? Have they in any way shown themselves anxious to advance the general interests and repay philanthropy with patriotism? Upon what grounds is it asserted that the best way to advance the moral and intellectual welfare of the people is to raise the standard of instruction among the higher classes? A glorious argument this for aristocracy, were it only tenable. To show the growth of the national happiness, it would only be necessary to refer to the number of pupils at the colleges and the lists of academic degrees. Each wrangler would be accounted a national benefactor; and the existence of Deans and Proctors would be associated, like the game laws and the tenpound franchise, with the best interests of the Constitution."

Perhaps the most glaring tendency of the Government system of high class education has been the virtual monopoly of all the higher offices under them by the

Brahmins. If the welfare of the Ryot is at heart, if it is the duty of Government to check a host of abuses, it behoves them to narrow this monopoly, day by day, so as to allow a sprinkling of the other castes to get into the public service. Perhaps some might be inclined to say that it is not feasible in the present state of education. Our only reply is that if Government look a little less after higher education and more towards the education of the masses, the former being able to take care of itself, there would be no difficulty in training up a body of men every way qualified and perhaps far better in morals and manners.

My object in writing the present volume is not only to tell my Sudra brethren how they have been duped by the Brahmins, but also to open the eyes of Government to that pernicious system of high class education which has hitherto been so persistently followed and which statesmen like Sir George Campbell, the present Lieutenant Governor of Bengal, with broad and universal sympathies, are finding to be highly mischievous and pernicious to the interests of Government. I sincerely hope that Government will ere long see the error of their ways, trust less to writers or men who look through high class spectacles and take the glory into their own hands of emancipating my Sudra brethren from the trammels of bondage which the Brahmins have woven round them like the coils of a serpent. It is no less the duty of such of my Sudra brethren as have received any education to place before Government the true state of their fellowmen and endeavour to the best of their power to emancipate themselves from Brahmin thraldom. Let their be schools for the Sudras in every village; but away with all Brahmin school-masters! The Sudras are the life and sinews of the country, and it is to them alone and not to the Brahmins that the Government must ever look to tide them over their difficulties, financial as well as political. If the hearts and minds of the Sudras are made happy and contented the British Government need have no fear for their loyalty in the future.

**Joteerao Phooley**

# प्रस्तावना

या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे कीं, आज शेंकडों वर्षें शूद्रादि अतिशूद्र, ब्राह्मण लोकांचें राज्य झाल्यापासून सतत दुःखें सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेंत आणि संकटांत दिवस काढीत आहेत, तर या गोष्टीकडेस त्या सर्वांचें लक्ष्य लागून त्यांनीं तिजविषयीं नीट विचार करणें व येथून पुढें भटब्राह्मण लोकांचें अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणें हाच काय तो आहे. या देशांत भट लोकांचें राज्य होऊन सुमारें तीन हजार वर्षांपासून अधिक काळ लोटून गेला असावा, असें अनुमान होतें. ते लोक परकीय देशांतून येऊन या देशांतील मूळचे राहणारे लोकांस जिंकून त्या सर्वांस त्यांनीं आपले दास केले व त्यांस अनेक तऱ्हेचीं क्रूर शासनें दिलीं. पुढें कांहीं काळानंतर त्या लोकांस या गोष्टीचें विसर्जन झालेसें पाहून भट लोकांनीं परकीय देशांतून येऊन या देशांतील मूळचे लोकांस जिंकून त्यांस दास केल्याचें मुळींच छपवून ठेविलें. त्या लोकांनीं आपली वजनदारी ह्या लोकांचे मनावर घसवावी याजकरितां जेणेंकरून आपलें मात्र हित होईल असे नाना प्रकारचे उपाय योजले व ते सर्व सिद्धीस जात गेले; कारण त्या वेळेस ते लोक सत्तेच्या संबंधानें पूर्वीं पराधीन झालेलेच होते व पुढें त्यांस भट लोकांनीं ज्ञानहीन करून टाकिलें, याजमुळें भट लोकांचे पांचपेंच त्यांचे लक्षांत मुळींच आले नाहींत. त्यांनीं त्यांच्यावर वर्चस्व मिळवून त्यांस अक्षय आपले ताब्यांत ठेवण्याकरितां केवळ स्वहितास अनुलक्षून पुष्कळ बनावट ग्रंथ करून ते आपणा सर्वांस ईश्वरापासून प्राप्त झाले, असें त्या वेळचे अज्ञानी लोकांस सांगून त्यांचें मन सर्वस्वी वळविलें. त्या ग्रंथांत त्यांनीं असें लिहिलें कीं, शूद्रांस ईश्वराचा उत्पन्न करण्याचा हेतु इतकाच आहे कीं, त्यांनीं सदासर्वदा भट लोकांच्या सेवेंत तत्पर असावें व जेणेंकरून त्यांची मर्जी खुप राहील असें करावें; म्हणजे ते ईश्वराला पावन होऊन त्यांचे देहाचें व जन्मास येण्याचें सार्थक झालें. आतां कोणी या ग्रंथांविषयीं थोडासा विचार केला असतां ते कितपत खरे आहेत व ते ईश्वरापासून आले असावे किंवा कसें, हें लागलीच कळून येईल. अशा ग्रंथांपासून सर्वशक्तिमान, सर्व जगाचा व त्यांतील सर्व वस्तूंचा उत्पन्नकर्ता जो परमेश्वर त्याच्या समसृष्टीला मोठें गौणत्व आणलें, असें आमचे जे हल्लींचे शहाणे भट बंधु, ज्यांस बंधु म्हणण्यास मोठी लज्या प्राप्त होती; कारण त्यांनीं एके वेळीं शूद्रादि अतिशूद्रांस फार दुःखें दिलीं व हल्लींही ते धर्माच्या योगानें त्यापासून दुखें सोशीत आहेत आणि एकमेकास दुःख देणें हा बंधुधर्म नव्हे, तथापि त्यांस आम्हा सर्वांचे उत्पन्नकर्त्याच्या संबंधानें बंधु म्हणणें भाग पडतें; तर ते-देखील उघड रीतीनें असें म्हणण्यास सोडणार नाहींत, मात्र त्यांनीं स्वहिताकडेस लक्ष्य न देतां केवळ न्यायास अनुसरून विचार केला पाहिजे. असें जर आहे, तर ते ग्रंथ आमचे शहाणे इंग्रज, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन व दुसरे विद्वान लोक पाहून [ते] शुद्ध मतलबी आहेत,

ज्यांत सर्व प्रकारें ब्राह्मणांचें महत्त्व सांगून त्यांस त्यांची लोकांचे मनावर वजनदारी बसावी याजकरितां ईश्वरापेक्षांदेखील श्रेष्ठ मानिले आहेत, असें संमत दिल्यावांचून राहणार नाहींत. त्यांतून वर सांगितलेले लोकांपैकीं इंग्रज लोकांनीं तर पुष्कळ ठिकाणीं इतिहास वगैरे ग्रंथांत भटलोकांनीं स्वहितास्तव इतर लोक, ह्मणजे, शूद्रादि अतिशूद्र लोक ह्यांस आपले गुलाम करून टाकिलें आहे, असें संमत दिलेलेंच आहे. अशा ग्रंथांपासून ईश्वराच्या वैभवाला केवढा नीचपणा भट लोकांनीं आणिला आहे बरें ? ज्या ईश्वरानें शूद्रादि अतिशूद्रांस व इतर लोकांस आपण निर्माण केलेल्या सर्व सृष्टींतील वस्तूंचा सारिखे रीतीनें उपभोग घेण्याची मोकळीक दिली असून, भट लोकांनीं त्याचे नांवचे खोटे ग्रंथ बनवून त्यांजमध्यें सर्वांचे हक्क रद्द करून आपणच अग्रगण्य होऊन बसले. याजवर आमचे कोणी भट बंधु अशी शंका घेतील कीं, हे ग्रंथ जर खोटे आहेत तर त्याजवर शूद्रादि अतिशूद्र यांचे पूर्वजांनीं कसा भरंवसा ठेविला व हल्लींही त्यांपैकीं पुष्कळ कसा भरंवसा ठेवितात ? तर त्याचें उत्तर असें आहे कीं, आतांच्या या सुधारलेल्या काळांत कोणावर कांहीं जुलूम नसून सर्वांस आपल्या मनांतील विचार स्पष्ट रीतीनें लिहिण्याची अथवा बोलण्याची परवानगी असून एखाद्या शहाण्या गृहस्थाकडे कोणी लबाडानें एखाद्या मोठ्या गृहस्थाच्या नांवाचें खोटें पत्र जरी आणलें, तथापि त्यास कांहीं वेळपर्यंत त्याजवर भरंवसा ठेवावा लागतो व समयानुसार तोहि फसला जातो. अशी जर गोष्ट आहे, तर शूद्रादि अतिशूद्र एके वेळीं भटलोकांचे जुलमाचे तडाक्यांत सांपडल्यामुळें व त्यांस त्यांनीं सर्वस्वी अज्ञानी करून सोडिल्यामुळें आपले हिताकरितां समर्थाचे नांवाचे खोटे ग्रंथ करून त्यांजकडेस त्यांचें मन वळवून त्यांस फसविलें व अद्यापही त्यांपैकीं कित्येकांस भट लोक हल्लीं फसविताहेत. हें शुद्ध वर सांगितलेल्या प्रकाराप्रमाणें आहे. भट लोक आपलें पोट भरण्याकरितां आपले स्वार्थी ग्रंथांतून वारंवार जागोजागीं अज्ञानी शूद्र लोकांस उपदेश करितात, त्याजमुळें त्यांच्या मनामध्यें त्याजविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन त्यांस त्यांनीं (भट लोकांनीं) ईश्वरालाच मात्र जो योग्य सन्मान तो आपणास देवविण्यास लाविलें आहे, हा कांहीं लहानसहान अन्याय नव्हे. याजबद्दल भट लोकांस ईश्वराजवळ जबाब द्यावा लागेल. त्यांचा उपदेशांचा ठसा बहुतेक अज्ञानी शूद्र लोकांचे मनावर इतका दृढ झाला कीं, ते अमेरिकेंतील गुलामांसारिखें आपणास, ज्या दुष्ट लोकांनीं दास केलें त्यांपासून सोडवून स्वतंत्रता देणाऱ्या लोकांविरुद्ध उलट्या कंबरा बांधून लढण्यास तयार झाले. ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट आहे, कीं आपणावर जे कोणी उपकार करीत असतील, त्यांस आम्हांवर उपकार करूं नका, आमची जी हल्लींची स्थिति आहे तीच बरी आहे, असें केवळ म्हणून तृप्त न होतां त्यांजबरोबर तंटा करण्यास प्रवृत्त होतात. बरें, आपणास दास्यत्वापासून मुक्त करणारे जे लोक, त्यांचें आपणास सोडविल्यापासून कांहीं हीत होतें हेंही कांहीं नाहीं, उलटें त्यांस आपले लोकांपैकीं शेंकडों लोकांचे बळी द्यावे लागतात व मोठमोठीं साहसकर्में पत्करून आपले जीव धोक्यांत घालावे लागतात. आतां असें परोपकाराचें कृत्य करण्याचा

त्यांचा हेतु तरी काय असावा, याजविषयीं आपण थोडासा विचार केला असतां लागलीच आपणास कळून येईल, कीं मनुष्याला स्वतंत्रता असणें ही एक मोठी जरूरीची गोष्ट आहे. जेव्हां मनुष्य स्वतंत्र असतो तेव्हां त्यास आपले मनांत उद्भवलेले विचार स्पष्ट रीतीनें इतर लोकांस बोलून अथवा लिहून दाखवितां येतात. तेच विचार त्यास स्वतंत्रता नसल्यामुळें मोठे महत्त्वाचे असून लोकांचे हितावह कां असेनात, तथापि ते त्यास दुसरे कोणास कळवितां येत नाहींत; आणि असें झालें म्हणजे कांहीं काळानें ते सर्व विचार लयास जातात. त्याचप्रमाणें मनुष्य स्वतंत्र असल्यापासून तो आपले, सर्व मनुष्यमात्रांस जे सर्वसाधारण हक्क, सर्व जगाचा जो नियंता व सर्वसाक्षी परमेश्वर त्यानें दिलेले असून केवळ स्वहिताकडेस ज्यांचें लक्ष्य, असे कृत्रिमी लोकांनीं लपवून ठेविले, तर त्यांपासून मागून घेण्यास कधीं मागें सरणार नाहीं व त्यांचे हक्क त्यास मिळाले असतां त्यास सुख होतें. ज्यांची त्यांस स्वतंत्रता देऊन त्यास जुलमी लोकांचे अन्यायी जुलुमांपासून सोडवून सुखी करणें हाच काय तो, त्यांचें असें जिवावरचें व धोक्याचें काम करण्याचा हेतु होय. अहाहा !! हें कितीतरी परोपकाराचें स्तुत्य कार्य होय! असा त्यांचा चांगला उद्देश असल्यामुळें ईश्वर त्यांस, जेथें ते जातील तेथें बहुतकरून जयच देत गेला व येथून पुढेंही त्यांस असे चांगले कृत्यांमध्यें त्यांचे प्रयत्न सफळ होऊन त्यांस जयच मिळो, अशी आम्ही ईश्वराजवळ प्रार्थना करितों. दक्षीण अमेरिका व आफ्रिका या दोन पृथ्वीच्या मोठे भागांमध्यें शेंकडों वर्षांपासून दुसरे देशांतून मनुष्यें धरून आणून त्यांस गुलाम करण्याची वहीवाट चालू होती, तिजमुळें एकंदर सर्व युरोपखंडांतील व दुसरे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सुधारलेले राष्ट्रांस मोठी लज्जा प्राप्त झाली होती, ती दूर करण्याकरितां इंग्लिश, अमेरिकन वगैरे उदार लोकांनीं मोठमोठाल्या लढाया करून आपले नुकसानीची तर काय, पण आपले जिवाचीदेखील परवा न धरतां ती फार दिवसांपासून चालत आलेली दुष्ट चाल तळा-बुडानिशी नाहींशी करून पुष्कळ गुलामांस त्यांचे परम आवडते आईबापांपासून, बहीण-भावंडांपासून, मुलांबाळांपासून व स्नेहीमंडळीपासून दुष्ट लोकांनीं एकाएकी ताडातोडी करून उभयपक्षांस परम दुःख झाल्यामुळें ते दिवसानुदिवस झुरणीस लागून मरण्याच्या बेतांत आहेत तोंच त्यांस एकमेकांस भेटविलें. अहाहा !! अमेरिकन वगैरे सदाचारी लोकांनीं कितीतरी चांगलें काम केलें बरें! आज त्यांस त्या गरीब अनाथ गुलामांची दुर्दशा पाहून दया आली नसती तर ते गरीब, बिचारे आपल्या प्रियकर मंडळीस भेटण्याची इच्छा तशीच मनामध्यें ठेवून मरण पावले असते. बरें, त्यांस धरून आणणारे दुष्ट लोक त्यांस चांगले रीतीनें तरी ठेवीत असत काय? नाहीं, नाहीं. त्यांस ते लोक जे जे जाच करीत, ते ऐकिले असतां पाषाणहृदयाच्या मनुष्याचादेखील कंठ दाटून येऊन त्यास रडें आल्यावांचून राहणार नाहीं. ते त्यांस पशूवत् समजून त्यांजबरोबर नेहमीं लाथाबुक्क्यांशीं काम ठेवीत. कधीं कधीं ते त्यांस भर उन्हामध्यें नांगरांला जुंपून त्यांजपासून आपलीं शेतें नांगरून घेत असत व त्यांनी कांहीं कमजारत केलें असतां त्यांचे आंगावर बैलाप्रमाणें कोरड्याचे वळचे

वळ उठवीत. बरें, इतकेंही असून ते त्यांचे पोटापाण्याची तरी नीट व्यवस्था राखीत काय ? मुळींच बोलायला नको. एक वेळ मिळालें एक वेळ नाहीं व जें अन्न मिळे तें अगदीं कनिष्ठ प्रतीचें असून फारच थोडें असे, यामुळें त्यांस नेहमीं अपुर्तेच पोटानें उठणें भाग पडे. त्यांच्याकडून दिवसास छाती फुटून रक्त ओकत तोंपर्यंत काम घेऊन त्यांस अपरात्रीं गुरांचा गोठा वगैरे घाणेरडे जाग्यांत निजायास सोडीत, तेथें थकून आल्यानंतर ते गरीब विचारे त्या खरबरीत जमिनीवर मृतप्राय होऊन पडत; परंतु डोळ्यांस पुरती निद्रा म्हणन ठाऊक नाहीं, विचाऱ्यांस निद्रा येणार ती कोठची ? एक तर पहिली त्यांस धनीसाहेब केव्हां पुकारतील याची जबर धास्ती, दुसरें पोटामध्यें पुरतें अन्न नसल्यामुळें जीव हलक होऊन परम क्लेश होतात, तिसरें आंगावर चाबुकांचे फटके बसल्यामुळें सर्व शरीर रक्ताळून जाऊन त्याचे वेदनेनें तळमळ करीत या कुशीचे त्या कुशीवर होत आहेत, चवथें घरचे मनुष्यांस आपल्यामुळें किती दुःख होत असेल, याचा विचार मनांत येऊन अंतःकरणांत दुःखाचा डोंब पाझरल्यामुळें टपटप नेत्रांवाटें आश्रूंच्या धारा चालत आणि ईश्वरास प्रार्थना करीत कीं, भगवन्न, आतां आमची कांहीं तरी करुणा तुला येऊं दे ! आम्हांला या दुःखापासून मुक्त कर, आमच्यानें हें दुःख सहन होत नाहीं, आतां आमचे प्राण जातील तर बरें होईल. अशा संकटांत व अशा विचारांत सर्व रात्र उजडून जात असे. त्यांस जीं जीं दुःखें झालीं तीं सर्व पूर्णपणें वर्णन करूं गेल्यास भाषेंतील शोकरससंबंधीं शब्द पुरतील, याचा संशय आहे. तात्पर्य,—अमेरिकन लोकांनीं आज शेंकडों वर्षांपासून चालत आलेली ती दुष्ट चाल बंद करून गरीब अनाथ लोकांस त्या अति क्रूर लोकांच्या जुलुमांपासून मुक्त करून त्यांस सर्वस्वी सुखी केलें. या गोष्टीचा शूद्रादिअतिशूद्रांस, इतर लोकांपेक्षां अधिक संतोष वाटत असेल, कारण गुलामांच्या स्थितींत असतां मनुष्यमात्रास किती दुःखें सोसावीं लागतात, याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांवांचून अथवा वर सांगितलेले गुलामां-वांचून इतर लोकांस थोडाच असेल. आतां त्यांच्यामध्यें व वरच्या गुलामांमध्यें इतकेंच अंतर आहे कीं, पहिल्यांस भट लोकांनीं जिंकून गुलाम केलें व दुसऱ्यांस दुष्ट लोकांनीं एकाएकी जुलमानें धरून गुलाम केलें; बाकी सर्व अंशीं ते त्यांच्याशीं मिळतात. त्यांच्या स्थितीमध्यें व गुलामांचे स्थितीमध्यें तिलप्राय भेद नाहीं. त्यांनीं जीं जीं संकटें सोसलीं तीं सर्व शूद्रादिअतिशूद्रांस भट लोकांपासून सोसावीं लागलीं, किंबहुना त्यांपेक्षां अधिक देखील म्हटलें असतां कांहीं चिंता नाहीं. त्यांस जीं दुःखें प्राप्त झालीं तीं ऐकूनच मात्र पाषाणहृदयी मनुष्याचें अंतःकरण तर काय, परंतु प्रत्यक्ष मूर्तिमंत काहाराचा पाषाणही कलकल उकलून आंतून दुःखाश्रूचे लोटचे लोट चालून त्याजमुळें पृथ्वीवर इतकें जळ होईल कीं, ज्यांचे पूर्वजांनीं शूद्रादिअतिशूद्रांस गुलाम केलें त्यांचे जे वंशज हल्लींचे भटबंधु त्यांपैकीं जे आपले पूर्वजांसारखे कठोर हृदयाचे नसून कोमल अंतःकरणाचे आहेत, त्यांस असें वाटेल कीं, हा एक जलप्रलयच आहे. आमचे दयाळू इंग्रज सरकारास, शूद्रादिअतिशूद्रांस भट लोकांपासून काय काय जुलूम सहन करावे लागले व हल्लींहि सहन

करीत आहेत याजविषयींची मुळीच माहिती नाहीं. ते जर याजविषयीं चौकशी करून आपणास माहिती करून घेतील तर त्यांस असें कळेल कीं, आम्ही जे जे हिंदुस्थानचे इतिहास लिहिले त्यांतील हा एक मोठा अति महत्त्वाचा भाग गाळला. त्यांस त्यांचे दुःखांची माहिती एकदां झाली म्हणजे फार वाईट वाटून आपल्या ग्रंथांत, जेथें अति निकृष्ट दशेस येऊन पोंहचलेले व दुष्ट लोकांनीं गांजलेले, ज्यांचे दुःखास पारावार नाहीं अशा लोकांचे स्थितीची उपमा देणें झाल्यास, शूद्रादि अतिशूद्रांच्याच स्थितीची उपमा योग्य साजेल असें वाटेल. त्यांतून कवीस पुष्कळ अंशीं खेद वाटून कांहींसें वरें वाटेल कीं आजपर्यंत कवितेंत त्यास शोकरसाची पूर्णपणें तसबीर श्रोत्यांचे मनामध्यें ठसविण्याकरितां महाप्रयत्नानें काल्पनिक उदाहरणें रचावीं लागत. तर त्यांचे ते सर्व श्रम असें ढळढळीत साकार उदाहरण सांपडल्यामुळें नाहींसे केले. असें जर आहे तर हल्लींचे शूद्रादिअतिशूद्र यांचीं अंतःकरणें आपण ज्यांचे वंशांत उत्पन्न झालों, व ज्यांचे व आपले रक्तमांस एकच आहे, हा जेव्हां विचार त्यांचे मनामध्यें येतो, तेव्हां त्यांचीं दुःखें ऐकून परम दुःखीत होत असतील यांत मोठें आश्चर्य आहे असें कांहीं नाहीं. एके वेळीं भट राज्यांत त्यांच्यावर जे कांहीं प्रसंग गुदरले होते त्यांची आठवण झाली असतां आमचीं मनें भयभीत होऊन आमचे अंगावर रोमांच उभे राहतात व मनांमध्यें लागलीच असे विचार येतात कीं, ज्या प्रसंगाची आठवण आम्हास जर इतकी दुःखदायक होती, तर ज्यांनीं ते प्रसंग सोशिले असतील त्यांचे मनाची काय स्थिति झाली असेल, हें त्यांचें त्यांना ठाऊक. याजविषयीं चांगलें स्पष्ट उदाहरण आमचे भटबंधूंच्याच ग्रंथांमध्यें सांपडतें. तें असें कीं, या देशांतील मूळचे रहिवासी क्षत्रिय लोक यांजबरोबर भट लोकांचा मुख्याधिकारी परशुराम या नामें गृहस्थानें किती क्रूरता दाखविली, हें या ग्रंथांत जाणविलेंच आहे. तथापि त्याचे क्रूरतेविषयीं इतकें समजलें आहे कीं, त्यानें पुष्कळ क्षत्रीय लोकांचे प्राण घेऊन त्यांचे अनाथ झालेल्या स्त्रियांपासून त्यांची लहान लहान चार चार, पांच पांच महिन्यांचीं गरीब बिचारीं निर्दोषी बालकें हिसकावून घेऊन अंतःकरणांत कांहीं द्रव न पावतां, त्यांचे प्राण कीं हो मोठे दुष्ट रीतीनें हरण केले. तो दुष्ट इतकेंच करून राहिला असें नाहीं, तर त्यानें कित्येक, आपले पतींच्या मृत्यूमुळें दीन झालेल्या स्त्रिया, आपले पोटांत संभवलेल्या गर्भाच्या संरक्षणार्थ रानोमाळ मोठ्या क्लेशानें पळत असतां त्यांचा पारध्याप्रमाणें पाठलाग करून त्यांस पकडून आणून त्यांचे प्रसूतकाळीं त्यांस पुत्र झाला असें ऐकिलें मात्र पुरे कीं, लागलीच येऊन त्यांचे प्राण घ्यावे. येणेंप्रमाणें हकीगत भट लोकांचे ग्रंथांत आढळते, व ज्या अर्थी भटलोक त्यांचेविरुद्ध पक्षाचे होते, त्या अर्थीं त्यांजपासून त्या वेळची सर्व वास्तविक हकीकत समजेल, असें आम्हास स्वप्नांतदेखील आणावयाला नको. भट लोकांनीं तिचा पुष्कळ भाग गाळला असावा, याच्यांत कांहीं संशय नाहीं. कारण कोणी आपले तोंडानें आपण केलेलें वाईट कर्म सांगत नाहीं. आतां वर सांगितलेली हकीकत त्यांनीं आपले ग्रंथांत लिहून ठेविली हें एक मोठें आश्चर्य आहे. आमचे विचारास असें येतें कीं, परशुरामानें

एकवीस वेळ क्षत्रीय लोकांचा मोड करून त्यांची वाताहत केली व त्यांचे हतभागी स्त्रियांचे लहान लहान मुलांस मारिलें, याच्यांत मोठा पुरुषार्थ केला व तो इतर जनास माहीत व्हावयाकरितां भट लोकांनीं आपले ग्रंथांत लिहून ठेविला. अथवा जगांत प्रसिद्ध म्हण आहे कीं, "तळहातानें सूर्य झांकिला जात नाहीं", त्याप्रमाणें ही हकीकत जरी त्यांस मोठी लज्जास्पद होती, तथापि तिचा मोठा गवगवा झाल्यामुळें त्यांच्याच्यानें जितकी झांकवेल तितकी त्यांनीं झांकून, जेथें उपायच नाहीं तेथें लिहून ठेवणें त्यांस जरूर पडलें. बरें, भटलोकांनीं जितकी हकीकत लिहिली तितक्याचविषयीं थोडासा विचार केला असतां मनास मोठें दुःख होतें, कारण परशुरामानें जेव्हां त्या गरभारशा स्त्रियांचा पाठलाग केला तेव्हां त्यांस किती दुःख झालें असेल बरें ? स्त्रिजातीस बहुत करून पळण्याची मारामार, त्यांतून त्यांपैकीं कित्येक मोठ्यांच्या व कुलीन स्त्रिया असल्यामुळें घराचा उंबरादेखील ज्यांस ठाऊक नाहीं, जें कांहीं त्यांस लागेल तें सर्व गडीमाणसें आणून देत; सारांश ज्यांनीं पतींचे श्रेय चिंतून त्यांचे जिवावर सुखांत दिवस काढिले, तर त्यांजवर पोटांतील गर्भाचें ओझें घेऊन सूर्याच्या प्रखर उन्हात आडमार्गानें पळण्याचा प्रसंग गुदरणें म्हणजे त्यांस महा संकटकाळच ओढवला असें म्हटलें पाहिजे. त्यांस पळण्याची सवय मुळींच नसल्यामुळें पायांत पाय गुंतून धडाधड ठेंचा लागून कधीं खडकांवर, कधीं डोंगरांचे कपारीवर पडत असतील आणि तेणेंकरून कांहींच्या कपाळांस, काहींच्या कोंपरास, कांहींच्या गुडघ्यांस, व कांहींच्या घोट्यांस लागून रक्तांच्या धारा चालत असतील. व परशुराम मागून येत आहे हें ऐकून तसेंच घाबरें घाबरें पळत असतील, मार्गानें जात असतां त्यांचे कोमळ पायांमध्यें कांटे टोंचून कांटेरी झाडांनीं आंगावरचीं वस्त्रें फाटून त्यांचीं शरीरें भोंसकलीं असतील व तेणेंकरून शरीरांतून रक्त वाहवलें असेल. त्यांचे उन्हामध्यें पळतां पळतां पाय चटचट पोळून त्यांची कमळाच्या देंठासारखी सुकुमार नीलवर्ण कांति परम आरक्तता पावली असेल व तोंडास फेंस येऊन डोळे पाण्यानें गच्च भरून आले असतील. तोंडाकडेस एक एक दोन दोन दिवस पाणीदेखील नेलें नाहीं, सबब कलमल वाटून पोटांतील गर्भ पोटांत गडबड फिरत असतील, त्यांस असें वाटलें असेल कीं, आतां धरणी जर फाटते तर फार बरें होईल म्हणजे आंत आम्ही उडी टाकून या दुष्टापासून मुक्त होऊं. त्यांनीं डोळे भरून आणून ईश्वराची प्रार्थना केली नसेल काय ? कीं, हे प्रभो— आमच्यावर काय हा कहर गुदरविलास. अरे ! ! आम्ही स्वतः बलहीन म्हणून आम्हांस अबला म्हणतात व आम्हांस आमचे पतींचें जें कांहीं बल होतें तेंही या दुष्टानें हारण केलें, असें तुला माहीत असतां निर्दय होऊन आमचा किती तरी अंत पहातोस. अरे, आमचे पतींचे ज्यानें प्राण घेऊन आम्हां अबलांवर शस्त्र धरिलें व त्यांजमध्यें जो मोठा पुरुषार्थ मिरवितो अशा दुष्टाचे अपराधाते पाहून येवढा तूं समर्थ असतां तोंडांत बोट घालून स्तब्ध बसलास काय ! याप्रमाणें त्या दीनमुख होऊन ईश्वराचा धावा करीत आहेत तों इतक्यांत दुष्ट परशुराम येऊन त्यांस धरून चालविलें नसेल काय ? मग त्यांच्या

शोकाला काय विचारावयाचें आहे? त्यांपैकीं कांहीं स्त्रियांनीं फार आक्रोश करून आपले प्राण त्यागिले नसतील काय? व बाकीच्या स्त्रियांनीं अतिशय लीन होऊन त्या दुष्टाची विनवणी केली नसेल काय? कीं, अहो परशुराम, आमचें आपणाजवळ इतकेंच शेवटचें मागणें आहे कीं, आमचे पोटीं जन्म पावणारे अनाथ बालकांचा प्राण घेऊं नका, आम्हीं सर्व मिळून तुम्हाजवळ पदर पसरितों, आम्हास येवढें दान द्या. पाहिजे असल्यास आमचे प्राण घ्या, परंतु आमचे मुलांचे जीव वांचवा. आमचे आपण पति मारल्यामुळें आम्हांस अकालीं वैधव्य प्राप्त होऊन आम्हीं सर्व सुखांला मुकलों, आतां आम्हांस पुढें मुलेंबाळें होण्याची मुळीं आशा राहिली नाहीं व आमचे सर्व पंचप्राण आमच्यापासून जन्म पावणारे बालकांकडेस लागलेले आहेत. आतां आम्हांस काय तें येवढेंच दुःखांत सुख, व आमचें सुखाचें निधान जीं आमचीं बालकें, त्यांचे प्राण घेऊन आम्हा अनाथ स्त्रियांस कां या सर्व आयुष्यभर शोकार्णवांत टाकितां! आम्हास येवढी भिक्षा घाला, आम्हीं तुमच्या धर्माच्या लेकी आहोंत. आमची कशीही करून आपणास दया येऊं द्या. इतके करुणापर शब्द बोलल्यानें त्या दुष्टाचें अंतःकरण कांहींतरी द्रवावें, परंतु मुळींच नाहीं. त्यानें त्या प्रसूत झालेल्या पाहून त्यांजपासून त्यांचीं बालकें हिसकावून घेऊं लागला. तेव्हां त्या त्यांच्या संरक्षणाकरिता त्यांच्यावर पालथ्या पडून पुढें मान करून म्हणाल्या असतील कीं, अहो परशुरामा, तुम्हाला जर या मुलांचे प्राणच घेणें आहे तर प्रथम आमचें शीर उडवा, मग आमचे पाठीमागें त्यांचें काय करणें तें करा. आमचे समक्ष त्यांचे प्राण घेऊं नका, परंतु कांहीं हो त्यानें ऐकिलें नाहीं. हर! हर! त्यांच्याजवळून जेव्हां त्यांचीं मुलें हिसकावून घेतलीं असतील, तेव्हां त्यांस जें दुःख झालें असेल तें लिहिण्यास आमचे हातांतून लेखणी गळून पडते. असो, त्या चांडाळानें त्या मुलांचे प्राण त्यांचे आयांसमक्ष घेतले, तेव्हां कांहीं जणींनीं आपलें उर बडविलें, केंस तोडिले, व तोंडांत माती घालून घेऊन प्राण दिले असतील; कांहीं जणींनीं पुत्रशोक करून प्राण सोडिले असतील व कांहीं जणींला वेड लागून, हा पुत्र! हा पुत्र! करीत भडकत फिरूं लागल्या असतील. ही सर्व हाकिकत भट लोकांपासून आम्हास समजेल अशी आम्हास मुळींच आशा बाळगायास नको. याप्रमाणें भट लोकांच्या मुख्याधिकारी परशुरामानें शेंकडों क्षत्रिय लोक मारून त्यांचे बायकांमुलांची दुर्दशा करून टाकिली व त्यास हल्लीं भट लोकांनीं शूद्रादि अतिशूद्र लोकांस सर्व शक्तिमान परमेश्वर, सर्व जगाचा उत्पन्नकर्ता असें म्हणविण्यास लाविलें आहे, हें मोठें आश्चर्य आहे. परशुरामाचे पाठीमागें भट लोकांनीं त्यांस कमी छळिलें असें नाहीं, तर त्यांनीं आपल्याकडून जितकें छळवेल तितकें त्यांस छळिलें. त्यांनीं त्या लोकांपैकीं बरेच लोकांस त्वेषामुळें त्यांची दुर्दशा करून जिवंतच इमारतीचे पायांत दडपीत, याजविषयीं या ग्रंथांत लिहिलेंच आहे. त्यांनीं त्या लोकांस इतकें तुच्छ मानावें कीं, एकादे वेळेस कोणी शूद्र नदीकांठावर आपलीं वस्त्रें धूत असतां त्या स्थळीं जर एकादा भट आला, तर त्या शूद्रांस आपलीं सर्व वस्त्रें गोळा करून, बऱ्याच दूर

अंतरावर, जेथून भटाच्या आंगावर पाण्याचा शिंतोडा येण्याचा संभव नसेल, अशा स्थळीं जाऊन आपलीं वस्त्रें धुवावीं लागत असे. तेथून जर भटाच्या आंगावर पाण्याचा शिंतोडा आला, अथवा आला असा खोटा भास झाला, तर त्या भटानें अग्निसारखें रागानें तप्त होऊन जवळचें भांडें त्याचें मस्तक रोखून मोठे त्वेषानें मारावें. त्याजमुळें त्याचें मस्तक रक्तबोंबाळ होऊन मुर्च्छित होत्साता जमीनीवर धाडकन पडावें, पुढें कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन आपलीं रक्तानें भरलेलीं वस्त्रें घेऊन निमूटपणें घरीं जावें, सरकारास जर कळवावें तर सर्व भटशाई पडली, उलटी त्यासच सजा देणार; हर ! हर ! परमेश्वरा केव्हढा हा अन्याय ! असो. एक दुःख आहे म्हणून सांगावें, अशीं व यापेक्षां अधिक दुसरीं पुष्कळ दुःखें शूद्रादिअतिशूद्रांस सोसावीं लागत असत. भटराज्यांत त्यांस व्यापाराच्या अथवा दुसऱ्या गोष्टींच्या संबंधानें फिरणें झाल्यास मोठी मारामार पडत असे. त्यांतून प्रातःकाळीं तर फारच अडचण पडे, कारण त्या वेळेस सर्व वस्तूंची छाया लांब पडते आणि अशा प्रसंगीं जर कदाचित् कोणी शूद्र रस्त्यानें जात असतां समोरचे रस्त्यानें भटसाहेबांची स्वारी येत आहे हें पाहून त्यांच्या आंगावर आपली छाया न पडावी या भीतीस्तव घडी दोन घडी आपला खोळंबा करून रस्त्याचे एके बाजूस होऊन त्यास बसावें लागत असे. भटजी गेल्यानंतर तो आपले कामास जाई, एखादे वेळेस याची छाया भटाचे आंगावर चुकून पडली तर तो भट लागलीच त्यास मरेमरेतोंपर्यंत मारी आणि तावडतोब नदीवर जाऊन स्नान करी. त्यांपैकीं कित्येक लोकांस रस्त्यांत थुंकण्याचीदेखील पंचाईत; याजकरितां त्यांस भटवस्तींतून जाणें झाल्यास आपल्याबरोबर थुंकण्याकरितां एखादें भांडें ठेवावें लागत असे. जर त्यांचा थुंका जमिनीवर पडून भटसाहेबानें पाहिलें म्हणजे त्या मनुष्यानें असें समजावें कीं, आतां आपलें पुरें अवुष्य भरलें. याप्रमाणें अनेक संकटें भोगितां भोगितां ते फार त्रासून गेले व केव्हां यापासून सुटका होईल याची वाट, जसा एखादा फार दिवस तुरंगांत टाकिलेला कैदी आपले इष्टमित्रांस, मुलांबाळांस व भावांबंधांस भेटण्याविषयीं अथवा स्वतंत्रतेनें इकडे तिकडे फिरण्याविषयीं मोठे उत्सुकतेनें सुटकेचे दिवसाची वाट पाहातो, त्याप्रमाणें पहात आहेत, इतक्यांत दैववशांत ईश्वरास त्यांची करुणा येऊन या देशांत इंग्रज लोकांचें राज्य झालें व त्यांन्याकडून ते भट लोकांचे कायीक दास्यत्वापासून मुक्त झाले. ते इंग्रज सरकारचे त्याजबद्दल फार फार आभार मानितात व सर्वस्वी त्यांचे ते ऋणी आहेत. त्यांचे उपकार ते कधीं विसणार नाहींत. त्यांनीं त्यांस आज शेंकडों वर्षांचे भटलोकांचे कैदखान्यांतून मुक्त करून त्यांचे मुलांबाळांस सुखाचे दिवस दाखविले. ते नसते तर भटलोकांनीं त्यांस केव्हांच धुळीस मिळविलें असतें. याजवर कोणी अशी शंका घेतील कीं, आज भट लोकांपेक्षां शूद्रादि अतिशूद्र लोकांचा भरणा सुमारें दसपट अधिक असून भट लोकांनीं शूद्रादि अतिशूद्र लोकांस कसें धुळीस मिळविलें असतें ? याचें उत्तर असें आहे कीं, एक शाहाणा मनुष्य दाहा अज्ञानी मनुष्यांचें आपणाकडेस मन वळऊन त्यांस तो आपले ताब्यांत

ठेऊं शकतो. आणखी दुसरें असें कीं, तीं दाहा अज्ञानी मनुष्यें जर एकाच मताचीं असतीं तर त्यांनीं त्या शहाण्या मनुष्याचें कांहीं चालू दिलें नसतें; परंतु ते दाहा जण निरनिराळे दाहा मतांचे असल्यामुळें शहाण्या मनुष्यास त्यांस फसविण्यास कांहींच आडचण पडत नाहीं. त्याप्रमाणें शूद्रादि अतिशूद्रांचीं मतें एकमेकांस मिळूं नये म्हणोन पूर्वी भट लोकांनीं एक मोठा धूर्त कावेबाज विचार शोधून काढिला. त्या लोकांचा समाज जसा जसा वाढत चालला त्याप्रमाणें भट लोकांस भिती वाटूं लागली आणि त्यांनीं त्यांच्यामध्यें परस्पर वाकडेपणा राहील अशी कांहीं तजवीज योजली, तरच आपला येथें राहाण्याचा टिकाव लागून सदासर्वदा ते लोक वंशपरंपरें आपले व आपले वंशजांचे गुलामगिरींत राहून आपणास कांहीं श्रम न करितां त्यांचे निढळयाचे घामानें मिळविलेले उत्पन्नांवर बिनधास्त मौजा मारितां येतील, हा त्यांचा विचार सिद्धीस जाण्याकरितां जातिभेदाचें थोतांड उपस्थित करून, त्यांजवर अनेक स्वहितसाधक ग्रंथ केले. व ते त्या अज्ञानी लोकांचे मनांत भरविले. त्यांपैकीं जे लोक भट लोकांवरोबर मोठें निकरानें लढले त्यांचा त्यांनीं एक वर्गच वेगळा केला. त्यांचा पुर्तेपणीं सूड उगवण्याकरितां त्यांस व त्यांची जी पुढें संतती होईल तिजला त्यांच्यांतीलच लोकांनीं म्हणजे हल्लीं ज्यांस माळी, कुणबी वगैरे म्हणतात, तर त्यांनीं त्यांचा स्पर्शदेखील करूं नये असें भट लोकांनीं त्यांचे मनांत भरविलें. असें जेव्हां झालें तेव्हां अर्थातच त्यांचा व्यापार वगैरे बंद होऊन अन्नास मोताद झाले, त्याजमुळें त्यांस मेल्या गुरांचें मांस खाणें भाग पडलें. तें त्यांचें कृत्य पाहून हल्लींचे शूद्र जे आपणांस मोठ्या अहंपणानें माळी, कुणबी, सोनार, शिंपी, लोहार, सुतार इत्यादि मोठमोठ्या संज्ञा केवळ तो तो धंदा केल्याचे योगानें म्हणवून घेतात तर तेच लोक आपले पूर्वज एकाच घराण्यांतील असतां त्यांचे पूर्वज स्वदेशासाठीं भट लोकांशीं मोठ्या निकरानें लढले, सबब भट लोकांनीं त्यांची अशी दुर्दशा करून त्यांस अन्नअन्न करावयास लाविलें, हें आंतील गुह्य त्यांच्या लक्षांत न येतां ते त्यांचा भट लोकांचे सांगण्यावरून द्वेष करावयास शिकले. हर! हर! किती तरी ते ईश्वराचे अपराधी आहेत कीं, त्या सर्वांचा इतका निकट संबंध असून एकाद्या सणावाराला ते त्यांचे दारीं दुरून अन्न वगैरे मागण्यास आले असतां ते त्यांस झिडकारून देतात, व केव्हां केव्हां काठीसुद्धां घेऊन त्यांचे आंगावर मारण्यास जातात. असो, याप्रमाणें भटलोकांनीं आपल्याशीं इतर लोकांनीं जसजशी वर्तणूक केली त्या त्याप्रमाणें त्याच्या जाति बांधून त्यांस सजा अथवा वरकांतिचा आश्रय देऊन सर्वस्वी आपलें अंकित करून ठेविलें. जेव्हांपासून शूद्रादि अतिशूद्रांमध्यें भटलोकांनीं जातिभेद उत्पन्न केला तेव्हांपासून त्या सर्वांचीं मतें भिन्न भिन्न झालीं. मग अर्थातच त्यास त्यांची पाहिजेल तशी व्यवस्था करण्यास सवड सांपडली. याविषयीं एक जगप्रसिद्ध म्हण आहे. ती अशी कीं, "दोघांचें भांडण आणि तिसऱ्याला लाभ." म्हणजे भटलोकांनीं शूद्रादि अतिशूद्रांमध्यें आपआपसांत वैमनस्य आणून आपण त्यांचे जिवावर ऐषआराम भोगीत आहेत.

सारांश वर सांगितलेंच आहे कीं, या देशांत इंग्रज सरकार आल्यामुळें शूद्रादि अति

शूद्र, भटाच्या कायिक दास्यत्वापासून मुक्त झाले खरे, परंतु आम्हांस सांगण्यास मोठें दु:ख वाटतें कीं, अद्यापि आमचे दयाळू सरकारचे शूद्रादि अतिशूद्रांस विद्या देण्याविषयीं दुर्लक्ष्य असल्यामुळें ते अज्ञानी राहून भटलोकांचे बनावट ग्रंथांच्या संबंधानें त्यांचे मानसिक दास झालेले आहेत. व त्यांस सरकाराजवळ दाद मागण्याचें त्राण राहिलें नाहीं. भट लोक त्या सर्वांस एकंदर सर्व प्रापंचिक सरकारी कामांत किती लुटून खातात, याजकडेस आमचे सरकारचें मुळींच लक्ष्य पोंहचलें नाहीं, तर त्यांनीं दयाळू होऊन या गोष्टीकडेस नीट रीतीनें लक्ष्य पुरवावें व त्यांस भट लोकांचे मानसिक दास्यत्वापासून मुक्त करावें अशी आम्हीं आपले जगन्नियंत्याजवळ शेवटली प्रार्थना करितों.

हें पुस्तक करतेवेळीं माझे मित्र रा. रा. विनायकराव बापजी भंडारकर व रा. रा. सा. राजन्नालिंगु यांनीं मला उत्तेजन दिलें सबब मी त्यांचा फार फार अभार मानितों.

जो. गो.

# अनुक्रमणिका


### भाग १ ला

ब्रह्मा, उत्पत्ति, सरस्वति आणि इराणी अथवा आर्य लोक यांविषयीं... ...

### भाग २

मत्स्य आणि शंखासूर यांविषयीं ... ... ... ... ...

### भाग ३

कच्छ, भूदेव अथवा भूपति, क्षत्रिय, द्विज आणि कश्यप राजा यांविषयीं ...

### भाग ४

वराह आणि हिरण्याक्ष यांविषयीं ... ... ... ...

### भाग ५

नारसिंह, हिरण्यकश्यपु, प्रल्हाद, विप्र, विरोचन, इत्यादिकांविषयीं ... ...

### भाग ६

बळीराजा, जोतीबा, मराठे, खंडोबा, महासुभा, नऊ खंडांचा न्यायी, भैरोबा, सात अश्रय, तळी भरणें, आदितवारास पवित्र मानणें, वामन, पक्ष घालणें, विंध्यावली, घट बसविणें, बळीराजाचें मरण, सती जाणें, आराधी लोक, शिलंगण, तांदुळाचा बळी, दुसरा बळीराजा येण्याविषयीं भविष्य, बाणासूर, कुजागरी, वामनाचा मृत्यु, उपाध्ये, होळी, वीर काढणें, बळीप्रतिपदा, भाऊबीज इत्यादिकांविषयीं ...

### भाग ७

ब्रह्मा, ताडपात्रांवर लिहिण्याची चाल, जादूमंत्र, संस्कृताचें मूळ, अटक नदीचे पलीकडेस जाण्याची बंदी, पूर्वी घोडीं वगैरे ब्राह्मण लोक खात होते, भट, राक्षस, यज्ञ, बाणासुराचें मरण, परवारी, सुताचे पाष्टिचें चिन्ह, बीजमंत्र, माहार, शुद्र, कुळकर्णी, कुळबी, कुळबीण, शूद्रांचा द्वेष, सोवळें, धर्मशास्त्र, मनु, भट, पंतोजीचें शिक्षण, मोठा भयंकर परिणाम, प्रजापतीचें मरण, ब्राह्मण, इत्यादिकांविषयीं ...

### भाग ८

परशुराम, मातृवध, एकवीस स्वाऱ्या, दैत्य, खंडेरावानें रावणाचा आश्रय केला, नऊ खंडची जाणाई, साती आसरा, माहाराचे गळ्यांतील काळा दोरा, अतिशूद्र, अंत्यज, मांग, चांडाळ, महारांस जिवंतच पायांमध्यें दडपणें, ब्राह्मणांत पाट लावण्याची बंदी, क्षत्रिय अर्भकांचा वध, परभु, रामोशी, जिनगर वगैरे लोक, परशूरामाचा पराभव झाल्यामुळें त्यानें आपला जीव दिला आणि चिरंजीव परशुराम यांस आमंत्रण, इत्यादिकांविषयीं ... ... ... ...

भाग ९

वेदमंत्र, जादूचें वजन, मुठ मारणें, देव्हारे घुमविणें, जप, चार वेद, ब्रह्मघोळ, नारदशाई, नवीन ग्रंथ, शूद्रांस ज्ञान देण्याची बंदी, भागवत व मनुसंहिता यांचा असंगतपणा इत्यादिकांविषयीं ... ... ... ...

भाग १०

दुसरे बळी, ब्राह्मण धर्माची फजिती, शंकराचार्याचें कृत्रिम, नास्तिक मत, निर्दयपणा, प्राकृत ग्रंथकार, कर्म आणि ज्ञानमार्ग, बाजीराव, मुसलमानांचा द्वेष आणि अमेरिकन व स्कॉच उपदेशकांनीं ब्राह्मणांचा कृत्रिमरूपी कोट फोडला, इत्यादिकांविषयीं ... ... ... ... ... ...

भाग ११

पुराण सांगणें, बंडें वगैरे परिणाम, शूद्र संस्थानिक, कुळकर्णी, सरस्वतीची प्रार्थना, जप, अनुष्ठानें, देवस्थानें, दक्षिणा, मोठ्या आडनांवांच्या सभा, इत्यादिकांविषयीं...

भाग १२

वतनदार भट कुळकर्णी, युरोपियन लोकांचे वसाहतीची जरूरी, विद्याखात्याच्या तोंडावर काळोखाचा डाग, युरोपियन कामगारांची अक्कल गुंग कशी होते, इत्यादिकांविषयीं ... ... ... ... ... ...

भाग १३

मामलेदार, कलेक्टर, रेव्हिन्यु, जज्ज, आणि इंजिनियर खात्यांतील भट कामगार इत्यादिकांविषयीं ... ... ... ... ... ...

भाग १४

युरोपियन कामगारांचा निरुपाय, खोतांचें वर्चस्व, पेनशन घेऊन निर्वेध झालेल्या युरोपियन कामगारांनीं सरकारांत गांवोगांवच्या हकिगती कळविण्याची जरूरी, धर्म आणि जात्याभिमान इत्यादि. ... ... ... ...

भाग १५

सरकारी शाळाखातीं, म्युनिसिपालिटी, दक्षणाप्राइज कमिटी व भट वर्तमानपत्रकर्ते यांची जूट; आणि शूद्रांदि अतिशूद्रांच्या मुलींनीं विद्या शिकूं नये म्हणून भट लोकांचा कट इत्यादि० ... ... ... ... ...

भाग १६

ब्रह्मराक्षसांचे पीडेचा धिःकार ... ... ... ... ...
पवाडा ... ... ... ... ... ... ...
अभंग ... ... ... ... ... ... ...

(ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यांत.)

# गुलामगिरी

(सुधारल्या इंग्लिश राज्यांत.)

## जोतीराव आणि धोंडीबा

### यांचा संवाद

### भाग १ ला

**ब्रंह्मा, उत्पत्ति, सरस्वती आणि इराणी अथवा आर्य लोक यांविषयीं.**

धों०—युरोपखंडांतील इंग्रज, फ्रेंच वगैरे दयाळू सरकारांनी एकत्र होऊन दास करण्याची बंदी केली, याजवरून त्यांनी ब्रंह्मदेवाच्या नियमांस हरताळ लाविला; कारण मनुसंहितेंत लिहिलें आहे कीं, ब्रंम्हदेवानें आपल्या मुखापासून ब्राम्हणांस उत्पन्न केलें; आणि त्या ब्राम्हणांची फक्त सेवाचाकरी करण्याकरितां त्यानें आपल्या पायांपासून शूद्रांस उत्पन्न केलें,

जो०—इंग्रज वगैरे सरकारांनीं दास करण्याची बंदी केली, याजवरून त्यांनीं ब्रंम्ह्याच्या आज्ञेस हरताळ लाविला म्हणून तुझें म्हणणें आहे. तर या भूमंडळावर इंग्रज वगैरे अनेक नाना प्रकारचे लोक आहेत, त्यांस ब्रंम्ह्यानें आपल्या कोणत्या अवयवापासून उत्पन्न केलें याविषयीं मनुसंहितेंत कसा काय लेख आहे ?

धों०—याजविषयीं सर्व ब्राह्मण म्हणजे विद्वान व अविद्वान असें उत्तर देतात कीं, इंग्रज वगैरे लोक अधम, दुराचारी असल्यामुळें मनुसंहितेंत त्या लोकांविषयीं मुळींच लेख नाहीं.

जो०—यावरून तुझ्या मतें ब्राम्हणांमध्यें अधम, दुराचारी मुळींच नाहींत कीं काय ?

धों०—शोधाअंती इतर लोकांपेक्षां ब्राम्हणांमध्यें अधिक अधम व अधिक दुराचारी आहेत असें आढळतें.

जो०—तर मग अशा अधम व दुराचारी ब्राम्हणांविषयीं मनुसंहितेंत कसा लेख आला ?

धों०—यावरून असें सिद्ध होतें कीं, मनूनें जी उत्पत्ति लिहिली आहे ती अगदीं खोटी आहे; कारण ती सर्व मनुष्यांस लागू पडत नाहीं.

जो०—म्हणूनच इंग्लिश वगैरे लोकांतील ज्ञात्यांनीं ब्राम्हणांतील पुस्तककर्त्यांच्या लबाड्या जाणून दास करण्याची बंदी केली. ब्रंम्हा हा सर्व मनुष्यमात्रांच्या उत्पत्तीस खरोखर कारण असता तर त्यांनीं दास करण्याची बंदीच केली नसती. मनूनें चार वर्णांची उत्पत्ति लिहिली आहे, ती एकंदर सर्व सृष्टिक्रमांशीं ताडून पाहिली म्हणजे सर्व खोटी आहे असें आपणास कळून येतें.

धों०—म्हणजे ती कशी ?

जो०—ब्राह्मण ब्रंह्मयाच्या मुखापासून झाले; परंतु एकंदर सर्व ब्राह्मणांची मूळ माता ब्राह्मणी ही ब्रंम्ह्याच्या कोणत्या अवयवापासून झाली याविषयीं मनूनें कांहींच लिहून ठेविलें नाहीं, हें कसें ?

धों०—कारण, ती त्या विद्वान ब्राह्मणांच्या म्हणण्याप्रमाणें अधम आणि दुराचारी असेल. यास्तव तूर्त तिजला म्लेंछांच्या पंक्तीस बसवा.

जो०—आम्ही भूदेव, आम्ही सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ, असें मोठ्या गर्वानें नेहमीं बोलणारे अशांस जन्म देणारी मूळमाता ब्राह्मणी ना ? आणि तूं तिजला म्लेंछांचे पंक्तीस कसें बसवितोस ? तिला तेथील दारू व गोमांसाचा घमघमाट कसा आवडेल ? हें तूं मोठें अनुचित् बोल्तोस बाबा !

धों०—तुम्हीच कित्येक वेळां भर सभेंत बोललां कीं, ब्राह्मणांचे मूळ पूर्वज जे ऋषि-वर्य, ते श्राद्धाचे निमित्तानें गाई मारून त्यांच्या मांसाचीं नाना तऱ्हेचीं पक्वान्नें करून खात होते, आणि आतां मात्र त्यांच्या मूळ मातेस घाण येईल म्हणून म्हणतां हें कसें ! तुम्ही इंग्रजी राज्यास हयाती चिंतून थोडे दिवस थांबा, म्हणजे हल्लींचे बहुतेक सोंवळे ब्राम्हण, रेसिडेंट, गव्हर्नर वगैरे कामदारांची आपल्यावर जास्ती मेहेरबानी व्हावी, याकरितां त्यांच्या टेबलावरचे उरलेले मांसाचे तुकडे बुटलेराच्या वांटणीसदेखील येऊं देणार नाहींत असें तुम्हांस दिसेल. आतांशा बहुतेक महार बुटलेर ब्राह्मणांच्या नांवानें आंतल्या आंत कुरकुरण्यास लागले आहेस हें तुम्हांला ठाऊक नाहीं ? मनूनेंच ब्राम्हणीच्या उत्पत्तीविषयीं लिहून ठेविलें नाहीं. सबब या दोषाचें खापर त्याच्याच बोडक्यावर फोडा. त्याविषयीं तूं अनुचित् बोलतोस म्हणून तुम्हीं मला कां दोष देतां ? पुढें चालूं द्या—

जो०—बरें तुझी मर्जी, तसें कां होईना. आतां ब्राम्हणास जन्म देणारें जें ब्रंम्ह्याचें मुख तें दरमहाचे दरमहा दूरसें झाल्यामुळें तो चार दिवस सोंवळा होऊन बसत होता, किंवा लिंगाइतिणीसारखा राख लावून पाक होऊन घरांतील कामकाज करीत होता याविषयीं मनूचा कांहीं लेख आहे काय ?

धों०—नाहीं. परंतु, ब्राम्हणांच्या उत्पत्तीस ब्रंम्हा हा मूळ कारण आहे, आणि त्यास लिंगाइतिणीचा उपदेश कसा आवडला असेल बरें ? कारण, हल्लींचे ब्राम्हण, लिंगाईत विटाळ पाळींत नाहींत म्हणून त्यांचा वीट मानितात.

जो०—तर यावरून तूंच विचार करून पाहा कीं, ब्रंम्हाचें मुख, बाहू, जंघा आणि पाय, या चार ठिकाणच्या योनी दूरशा झाल्यामुळें त्यास एकंदर सोळा दिवस सोंवळें होऊन बसावें लागलें असेल, असें जर म्हणावें तर त्यांचे घरांतील खटाटोप कोण करीत असे? याविषयीं तरी मनूचा कांहीं लेख आहे काय?

धों०—नाहीं.

जो०—बरें, तो गर्भ ब्रंम्ह्याच्या मुखांत संभवल्या दिवसापासून नऊ महिन्यांचा होईतोंपावेतों कोणत्या ठिकाणीं राहून वाढला याविषयीं कांहीं मनूनें म्हटलें आहे काय?

धों—नाहीं.

जो०—बरें, पुढें त्या जन्मलेल्या ब्राम्हण बालकास ब्रंम्ह्यानें आपल्या स्तनाचें दूध पाजिलें अथवा वर दूध लावून त्यास लहानाचें मोठें केलें, याजविषयीं तरी कांहीं लेख आहे काय?

धों०—नाहीं.

जो०—सावित्री ही ब्रंम्ह्याची पत्नी असतांहि त्यानें त्या मुलाचें ओझें मुखांत नऊ महिने वागवून त्यास जन्म देण्याचें व त्याचें पालन पोषण करण्याचें लचांड आपल्या माथ्यावर कां घेतलें? हें मोठें आश्चर्य होय.

धों०—त्याचीं बाकीचीं तीन डोकीं तर या लचांडापासून दूर होतीं कीं नाहीं? काय? त्या रांड्या राघोबाला असा पोरींतला घरकुंडी खेळ आवडला?

जो०—आतां त्यास रांड्याराघोबा म्हणावें तर, त्यानें सरस्वती नांवाच्या कन्येशीं व्यभिचार केला. व त्यामुळें त्याचें आडनांव बेटीचोद पडलें. याच निंद्य कर्मावरून त्याचा कोणी आदरसत्कार (म्हणजे पूजा) करीत नाहींत.

धों०—ब्रंम्हास जर खरोखर चार तोंडें होतीं, तर त्याच प्रमाणानें त्यास आठ स्तनें, चार बेंब्या, चार मूत्रद्वारें आणि चार मलद्वारें असलीं पाहिजेत; पण त्याविषयीं खात्री होण्याजोगा लेख कोठेंच आढळत नाहीं. पुढें त्याप्रमाणेंच शेषशाईस लक्ष्मी पत्नी असतां, त्यानें आपल्या बेंबीपासून हें चार तोंडाचें मूल कसें निर्मिलें याविषयीं विचार करूं लागल्यास शेषशाईचीसुद्धां ब्रंम्हासारखी दशा होईल.

जो०—वास्तविक विचाराअंतीं असें ठरतें कीं ब्राम्हण लोक हे समुद्राचे पलीकडेस जो इराण देश आहे त्या देशांतील मूळचे राहणारे होत. पूर्वीं त्यास ईराणी किंवा आर्य लोक म्हणत असत, असें कित्येक इंग्लिश ग्रंथकारांनीं त्यांच्याच ग्रंथावरून सिद्ध केलें आहे. प्रथम त्या आर्य लोकांनीं मोठमोठ्या टोळ्या करून या देशांत येऊन अनेक स्वाऱ्या केल्या व येथील बहुतेक राजांच्या मुलुखांत वारंवार हल्ले करून मोठा धिंगाणा केला. पुढें वामनाचे मागून आर्य लोकांचा ब्रंम्हा या नांवाचा मुख्य अधिकारी झाला. त्यांचा स्वभाव फार हट्टी होता. त्यानें आपल्या कारकीर्दीत येथील आमच्या मूळ पूर्वजांस रणांगणीं जिंकून आपले दास केले; व त्यानें आपले लोक आणि हे दास या उभयतांमध्यें हमेशा भेद रहावा म्हणून

अनेक तऱ्हेचे नेम बांधिले. ह्या सर्व कृत्यांवरून ब्रंम्हा मेल्यानंतर आर्य लोकांच्या मूळच्या नांवाचा आपोआप लोप होऊन त्यांचें नांव ब्राम्हण पडलें. नंतर मागाहून मनूसारखे अधिकारी झाले. त्यांनीं बांधिलेल्या नेमांचा धिक्कार मागें पुढें कोणी करूं नये, या भयास्तव त्यांनीं ब्रंम्ह्याविषयीं अनेक तऱ्हतऱ्हेच्या नवीन कल्पित गोष्टी रचिल्या व त्या गोष्टी ईश्वरेच्छेनेंच झाल्या आहेत असा त्या दासांच्या मनावर ठसा उमटावा म्हणून त्यांनीं शेषशाईचें दुसरें आंधळें गारुड रचिलें, आणि संधि पाहून कांहीं काळानें त्या सर्व लेखांचे ग्रंथ बनविले. त्या ग्रंथांविषयीं शूद्र दासांस नारदासारिख्या पटाईत वायकांतील भाऊजीनें टाळया पिटून उपदेश केल्यामुळें ब्रंम्ह्याचें महत्त्व सहजच वाढलें. आतां आपण ह्या ब्रंम्ह्यासारखी शेषशाईविषयीं चौकशी करूं लागलों तर त्यापासून आपल्यास काडीमात्र फायदा न होतां आपला उभयतांचा वेळ मात्र व्यर्थ जाणार आहे; कारण त्यांनीं मुळींच त्या बिचाऱ्यास उताणें पाडून त्याच्या बेंबीपासून हें चार तोंडाचें मूल निर्माण केलें आणि अशा मुळींच चीत झालेल्या दिनावर खंब ठोकणें यामध्यें मोठा पुरुषार्थ होईल असें मला वाटत नाहीं.

## भाग २ रा

### मत्स्य आणि शंखासूर यांविषयीं.

धों०—वामनापूर्वीं इराणांतून या देशांत आर्य लोकांच्या एकंदर किती टोळ्या आल्या असाव्या ?

जो०—या देशांत आर्य लोकांच्या टोळ्या जळमार्गानें अनेक आल्या.

धों०—त्यांपैकीं पहिली टोळी जळमार्गानें लढाऊ गलबतांवरून आली किंवा कसें ?

जो०—लढाऊ गलबतें त्या काळीं नव्हतीं, सबब ती टोळी लहान लहान मचव्यांतून आली, व ते मचवे माशासारिखे त्वरेनें पाण्यावरून चालत असत, म्हणून त्या टोळीच्या अधिकाऱ्यांचें टोपणनांव मत्स्य पडलें असावें.

धों०—तर मग ब्राम्हण इतिहासकर्त्यांनीं भागवत वगैरे ग्रंथांत तो टोळीचा अधिकारी मत्स्यापासून जन्मला म्हणून लिहिलें आहे, हें कसें ?

जो०—त्याविषयीं तूंच विचार करून पाहा कीं, मनुष्य आणि मासा यांच्या अवयवांत, आहारांत, निद्रेंत, मैथुनांत आणि उत्पत्तींत किती अंतर आहे ? आणि त्याचप्रमाणें त्यांच्या मगजांत, काळजांत, फुफ्फूसांत, आंतड्यांत, गर्भ वाढण्याचा जाग्यांत, आणि प्रसूत होण्याच्या मार्गांत किती चमत्कारीक अंतर आहे ! मनुष्य हा जमिनीवर गुजारा करून राहाणारा प्राणी होय. तो पाण्यांत पडल्याबरोबर गटंगळ्या खाऊन आपल्या प्राणास मुकतो. मासा हा सर्व काळ पाण्यांत राहून आपला गुजारा करणारा प्राणी होय,

व त्यास पाण्याबाहेर काढिल्याबरोबर तो तरफडून मरतो. स्त्रिया बहुतकरून एकाच मुलास जन्म देतात; परंतु मत्स्यीण प्रथम पुष्कळ अंडीं घालून कांहीं काळानंतर त्या सर्वांस फोडून त्यांतून आपलीं सर्व बचीं बाहेर काढिते. आतां ज्या अंड्यामध्यें हें मत्स्यबाळ होतें, त्यास मात्र तिनें पाण्याबाहेर आणून फोडिलें, आणि त्यांतून तिनें तें मत्स्यबाळ बाहेर काढिलें असेल असें म्हणावें तर, तिचा प्राण पाण्याबाहेर कसा वांचला असेल? कदाचित् तिनें पाण्यांतच तें अंडें फोडून मत्स्यास बाहेर काढिलें असेल असें म्हणावें, तर त्या मत्स्य मानवासारिखे बाळकाचा प्राण पाण्यांत कसा वांचला असावा? कोणी अशी शंका घेतील कीं, मनुष्यांतील एखाद्या सराईत पाणबुड्यानें पाण्यांत तळीं बुडी मारून मत्स्य बालक ज्या अंड्यांमध्यें होतें तें अंडें मात्र ओळखून जमिनीवर घेऊन आला असेल. असो, तसें कां होईना, पण पुढें त्या मत्स्यिणीचें अंडें कोणत्या चतुर मर्दानें फोडून त्यांतून मत्स्यबाळ बाहेर काढिलें असावें बरें? कारण, जरी आतां युरोप व अमेरिका खंडांत पुष्कळ सुधारणा होऊन मोठमोठे नामांकित विद्वान वैद्यशास्त्रांत निपूण झाले आहेत, तथापि त्यांपैकीं एकाच्यानेंहि छातीला हात लावून मी मत्स्यिणीचें अंडें फोडून त्यांतून जिवंत मत्स्याचें बच्चें काढीन, असें म्हणवणार नाहीं. असो. बरें, तें अंडें पाण्यांत आहे, म्हणून तो मोठ्या महत्वाचा निरोप कोणत्या अमर मत्स्यानें पाण्याबाहेर येऊन त्या पाणबुड्यास कळविला असेल, व त्या जळचर निरोप्याची भाषा मानव पाणबुड्यास कशी समजली असेल. अशा नाना प्रकारच्या शंकांचें त्या इतिहासांतल्या लेखावरून यथास्थित समाधान करून घेतां येत नाहीं. यास्तव त्याविषयीं असें अनुमान सिद्ध होतें कीं, मागाहून कांहीं लबाड लोकांनीं संधी पाहून एकंदर प्राचीन ग्रंथांत ही दंतकथा कोंबली असावी.

धों०—बरें, तो टोळीचा मत्स्य अधिकारी आपल्या लोकांसहीत कोणत्या ठिकाणीं येऊन उतरला?

जो०—पश्चिम समुद्रांतून येऊन तो एका बंदरावर उतरला.

धों०—मत्स्यानें बंदरावर उतरल्याबरोबर काय केलें?

जो०—मत्स्यानें शंखासूर या नांवाच्या क्षेत्रपतीस मारून त्याचें राज्य घेतलें. पुढें तें शंखासुराचें राज्य आर्यलोकांच्या ताब्यांत मत्स्याच्या मरणकाळपावेतों बिनधोक राहिलें. मत्स्य मरतांच शंखासुराच्या लोकांनीं आपलें राज्य परत घ्यावें या इराद्यानें मत्स्याचे टोळीवर मोठ्या निकरानें हल्ला केला.

धों०—पुढें त्या हल्ल्यामध्यें काय परिणाम झाला?

जो०—त्या हल्ल्यामध्यें मत्स्याचे टोळीचा पराभव झाल्यामुळें तिनें रणभूमी सोडून पळ काढिला. नंतर शंखासुराच्या लोकांनी तिचा पाठलाग केल्यामुळें ती अखेरीस एका डोंगरावर जाऊन झाडींत लपून राहिली. इतक्यांत इराणांतून आर्यलोकांची दुसरी एक मोठी टोळी कचव्यामधून बंदरा येऊन उतरली. व ते कचवे मचव्यांपेक्षां कांहींसे

मोठे असल्यामुळें पाण्यावर कांसवासारिखे सावकाश चालत असत, या कारणामुळें त्या टोळीच्या अधिकाऱ्याचें टोपण नांव कच्छ पडलें.

## भाग ३ रा

### कच्छ, भूदेव अथवा भूपती, क्षत्रिय, द्विज आणि कश्यपराजा यांविषयीं.

**धों०**—मासा आणि कांसव यांमध्यें एकंदर सर्व गोष्टी ताडून पहातां त्यांमध्यें थोडें थोडें अंतर दिसून येतें; परंतु इतर कांहीं गोष्टींत म्हणजे जलांत रहाणें, आंडीं घालणें व त्यांस फोडणें इत्यादिकांनीं ते एकमेकांशीं साम्यता पावतात. यास्तव कच्छ हा कांसवापासून जन्मला म्हणून भागवत वगैरे इतिहासकर्त्यांनी ग्रंथांत लिहून ठेविलें आहे. त्याविषयीं विचार करूं गेल्यास त्याचा परिणाम मत्स्यासारिखा होईल व तेणेंकरून आपला वेळ फुकट जाईल, अशी माझी खात्री झाल्यावरून मी आपल्यास पुढें विचारितों, कीं कच्छानें बंदरावर उतरल्याबरोबर काय केलें?

**जो०**—त्यानें प्रथम त्या बंदरापासून ज्या पर्वतावर मत्स्याची टोळी घेऱ्यामध्यें सांपडली होती, त्या पर्वताचे अलिकडील बाजूपासून बहुतेक तेथील मूळच्या क्षेत्रवासी लोकांस घेरा घालणाऱ्या लोकांसहीत एकदम पिटाळून नंतर तो आपल्या लोकांस सोडवून एकंदर सर्व त्या क्षेत्रांचा भूदेव म्हणजे भूपती होऊन डुरक्या फोडीत बसला.

**धों०**—बरें, ते कच्छानें क्षेत्रांतून पिटाळून लाविलेले क्षत्रिय कोणीकडेस गेले!

**जो०**—समुद्रावरून दुजी इराणी अथवा आर्य लोकांची टोळी आली असें म्हणण्याबद्दल, घाबरल्यामुळें, द्विज आले, द्विज आले, असा शब्द करीत करीत त्या पर्वताचे पलीकडेस जाऊन कश्यप या नांवाच्या क्षेत्रपतीच्या पाठोपाठ निघाले, यावरून कच्छ आपल्याबरोबर कांहीं फौज घेऊन त्या पर्वताचे पलीकडील बाजूनें खालीं उतरला आणि त्यानें तो पर्वत आपल्या पाठीवर घेऊन म्हणजे पाठीशीं घालून अथवा पाठीमागें टाकून कश्यपाच्या राज्यांतील क्षत्रियांस जसजशी इराणांतून मदत येत गेली तसतशी पीडा देऊं लागला. पुढें कश्यपानें जरी तो पर्वत कच्छापासून माघारी घ्यावा ह्मणून मोठे अयास केले; तथापि कच्छानें आपल्या मरणापावेतों तो पाठीस घातलेला पर्वत त्या क्षेत्रपतीच्या हातीं दिला नाहीं व आपली रणभूमी सोडून एक पाऊलसुद्धां मागें हटला नाहीं.

## भाग ४ था

### वराह आणि हिरण्याक्ष यांविषयीं.

**धों०**—कच्छ मेल्यामागें द्विजांचा कोण अधिकारी झाला?

१६३९५



जो०—वराह.

धों०—वराह हा डुकरापासून जन्मला असें भागवत वगैरे इतिहासकर्त्यांनीं लिहून ठेविलें आहे, याविषयीं आपलें मत कसें काय आहे ?

जो०—वास्तविक विचाराअंतीं असें ठरतें कीं, मनुष्य आणि डुकर या उभयतांमध्यें एकंदर सर्व गोष्टी ताडून पाहतां चमत्कारिक अंतर दिसून येतें, व त्याविषयीं तुझी पक्की खात्री व्हावी म्हणून येथें उदाहरणाकरीतां फक्त ते आपल्या बच्चास जन्म दिल्यानंतर कसकशी वर्तणूक करितात, याविषयीं आपण थोडासा विचार करून पाहूं म्हणजे झालें. मनुष्य स्त्री आपल्या मुलास जन्म दिल्याबरोबर त्यास काडीमात्र इजा न देतां त्याचें पालनपोषण करूं लागते; परंतु डुकरीण कुत्रीसारिखें प्रथम आपल्या जन्म दिलेल्या बच्चास एकदम खाऊन नंतर बाकीच्या दुसऱ्या बच्चांस जन्म देते. यावरून वराहाच्या डुकरीण मातेनें प्रथम आपल्या डुकर जातीच्या बच्चास खाऊन नंतर या मानव डुकरास व्याली असावी, असें सिद्ध होतें. परंतु भागवत वगैरे ग्रंथकर्त्यांचे मताप्रमाणें वराह हा आदिनारायणाचा अवतार असल्यामुळें त्याच्या सर्वसाक्षीपणाला व त्याच्या समदृष्टीला बट्टा लागला कीं नाहीं ? कारण वराह हा आदिनारायणाचा अवतार असल्यामुळें त्याच्या जंतीनें आपल्या वडील डुकर भावंडास मारून खाऊं नये ह्मणून त्याविषयीं त्यानें पूर्वी कांहींच बंदोबस्त करूं नये काय ? अरेरे ! ! पद्मा डुकरीण ही वराह आदिनारायणाची आई ना ! आणि तिनें ती बालहत्या कशी केली ! आतां "बालहत्या" या शब्दाचा अर्थ फक्त बाळाचा वध करणें असा होतो, मग तें बाळ कोणाचें कां असेना; पण हिनें तर आपलें पोटचें बाळ स्वतः मारून खाल्लें, तर अशा अन्यायाचा चांगला बोध होण्यासारखा कोशांत शब्दच सांपडत नाहीं. कदाचित् हिजला डंखीण म्हणावें तर "डंखीण सुद्धां आपल्या मुलास खात नाहीं" अशी एक जुनाट म्हण आहे. पुढें त्या वराहाच्या पद्मा आईनें असें अघोर कर्म केल्यामुळें तिची नरकयातनेपासून सुटका व्हावी ह्मणून तिनें कांहीं प्रायश्चित घेतलें असें कोठेंच सांपडत नाहीं; यास्तव मोठी हळहळ वाटते.

धों०—वराहाचे डुकरीण आईचें नांव जर पद्मा होतें, तर यावरून असें सिद्ध होतें कीं तिच्या डुकर पतीचें कांहीं तरी दुसरें नांव असलें पाहिजे कीं नको ?

जो०—पद्मा डुकरिणीचे पतीचें नांव ब्रंह्मा होतें.

धों०—यावरून पूर्वीचीं जनावरें मनुष्यासारिखीं आपआपल्यामध्यें ब्रंह्मा, नारद, आणि मनु अशीं नांवें देत होतीं, व त्यांचीं नांवें या गप्पाड्या ग्रंथकारांस कशीं समजलीं असावीं ? दुसरें असें कीं, पद्मा डुकरिणीनें वराहास त्याचें लहानपणीं आपल्या स्तनाचें दूध पाजिलें असेल यांत कांहीं संशय नाहीं; परंतु पुढें कांहींसा मोठा झाल्याबरोबर आपल्या ब्रंह्मपतीसहित वराहास बरोबर घेऊन गांवांतील खिंडारांतील अती सुकुमार फुलझाडांचा चारा चरण्याची त्यास संवय लावून मोकळी झाली असेल किंवा कसें, हें तो वराह आदिनारायणच जाणे, अशा नाना प्रकारच्या मुद्यांच्या

गोष्टीविषयीं त्यांच्या ग्रंथांत पुरावे सांपडत नाहींत, यास्तव मला असें वाटतें कीं, वराह डुकरीपासून जन्मला म्हणून ग्रंथांत लेख आहेत ते सर्व खोटे आहेत काय? अशा विपरित गोष्टी ग्रंथांत लिहितेवेळीं त्या ग्रंथकारास लाज कशी वाटली नाहीं?

जो०—वाहवा ! आणि तुम्हासारिखेच तसल्या ग्रंथावरून त्यांच्या मुलाबाळांचे पाय धुऊन पितात. यावरून तुम्हाला लाज नाहीं म्हणावी, किंवा त्यांना?

धों०—असो, तुमच्या मतें त्या अधिकाऱ्याचें नांव वराह तरी कसें पडलें असावें बरें?

जो०—कारण त्याचा स्वभाव व आचरण मोठें घाणेरडें असावें व तो जिकडे जाई तिकडेस रानडुकरासारिखी मुसंडी मारून जयच मिळवी. यावरून महाप्रतापी जे हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपु या उभयतांच्या मुलखांतील क्षत्रियांनीं त्याचें नांव धिक्कारानें डुकर (वराह) पाडिलें, त्यामुळें तो फार चिडला असावा, आणि त्यानें या गोष्टीचा मनांत दांत धरून त्यांच्या मुलखांत वारंवार हल्ले करून तेथील सर्व क्षेत्रवासी लोकांस पीडा देऊन अखेरीस त्यानें एका लढाईत हिरण्याक्षास मारिलें. यावरून सर्व पृथ्वी (हिंदुस्थान) भर बाकीच्या सर्व क्षेत्रपतींस दरारा पोंहचून ते कांहींसे गडबडल्यासारिखे झाले; इतक्यांत वराह मरण पावला.

## भाग ५ वा

### नारसिंह, हिरण्यकश्यपु, प्रल्हाद, विप्र, विरोचन इत्यादिकांविषयीं.

धों०—वराह मेल्यावर द्विज लोकांचा कोण अधिकारी झाला?

जो०—नृसिंह.

धों०—नृसिंह स्वभावानें कसा होता?

जो०—नृसिंहाचा स्वभाव लोभी, कृत्रिमी, फितुरी, कपटी, घातकी, निर्दय आणि क्रूर होता. तो शरीरानें सदृढ असून अतिशय बलवान होता.

धों०—त्यानें काय काय केलें?

जो०—प्रथम त्यानें हिरण्यकश्यपूच्या वधाविषयीं विचार चालविला व आपणास त्याला मारिल्याशिवाय त्याचें राज्य मिळायाचें नाहीं असें त्याचे मनांत पक्केपणीं समजलें. हा त्याचा दुष्ट हेतु सिद्धीस जाण्याकरितां त्यानें गुप्त रीतीनें बहुत दिवस प्रयत्न करून, एका आपल्या द्विज पंतोजीकडून हिरण्यकश्यपूच्या प्रल्हाद या नांवाच्या मुलाच्या कोंवळ्या मनावर आपल्या धर्माचीं मूलतत्त्वें ठसविल्यावरून प्रल्हादानें आपल्या हरहर या नांवाच्या कुळस्वामीची पूजा करण्याची वर्ज केली. नंतर हिरण्यकश्यपूनें प्रल्हादाचें भ्रष्ट झालेलें मन पुनः आपल्या कुळस्वामीची पूजा करण्याकडेस वळवावें म्हणून नाना तऱ्हेचे उपाय केले; तथापि नृसिंह हा प्रल्हादास आंतून मदत करीत असल्यामुळें हिरण्य-

कश्यपूचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. शेवटीं नृसिंहानें त्या अज्ञानी मुलास अनेक थापा देऊन त्याचें मन इतकें भ्रष्ट केलें कीं, त्यानें आपल्या पित्याचा वध करावा म्हणून त्याचें मन वळविलें खरें, परंतु तें अघोर कर्म करण्यास त्या मुलाची छाती होईना; सबब नृसिंहानें संधी पाहून ताबुतांतील वाघांच्या सोंगासारिखे आपल्या सर्व आंगास रंग देऊन तोंडांत मोठमोठाले खोटे दांत धरून लांब लांब केसांची दाढी लाविली आणि तो एक तऱ्हेचा भयंकर सिंह बनला. हें सर्व कृत्रिम छपविण्याकरितां नृसिंहानें भरजरीचें एक उंची लुगडें नेसून गरतीसारिखा आपल्या तोंडावर लांबलचक पदर घेऊन मोठ्या थाटानें चमकत ठमकत त्या मुलाच्या मदतीनें एके दिवशीं त्याचे पित्याच्या विशाळ मंदिरांत खांबांची गर्दी होती त्यांत जाऊन लपून उभा राहिला. इतक्यांत हिरण्यकश्यपूनें सर्व दिवसभर राज्यकारभार करून थकल्यामुळें संध्याकाळ झाल्याबरोबर आपल्या मंदिरांत एकांतीं येऊन निर्भयपणानें स्वस्थ विसांवा घेण्याच्या इराद्यानें पलंगावर लोळत पडला न पडला, तोंच नृसिंहानें जलदी करून डोईवरचा लुगड्याचा पदर कंबरेस गुंडाळून त्या लपलेल्या खांबांतून निघून हिरण्यकश्यपूच्या आंगावर एकदम जाऊन पडला आणि त्यानें आपल्या हातांतील वाघनखांनीं हिरण्यकश्यपूचें पोट फाडून त्याचा वध केल्याबरोबर नृसिंहानें तेथील सर्व द्विजांसहित रात्रीचा दिवस करून आपल्या मुलखांत पळून गेला. इकडेस नृसिंहानें प्रल्हादास फसवून असें अघोर कर्म केलेलें उघडकीस आल्यावरून क्षत्रियांनीं आर्य लोकांस मुळींच द्विज म्हणण्याचें सोडून त्यांस विप्रिय म्हणूं लागले. व पुढें त्या विप्रिय शब्दापासून त्यांचें नांव विप्र पडलें असावें. पुढें क्षत्रियांनीं नृसिंहास नारसिंह म्हणजे सिंहाची बायको असें निंद्य नांव दिलें. शेवटीं हिरण्यकश्यपूच्या पुत्रांतून कित्येकांनीं तर नारसिंहास धरून आणून त्यास यथास्थित शासन करावें म्हणून दीर्घ प्रयत्न केला. परंतु नारसिंहानें हिरण्यकश्यपूचें राज्य घेण्याची मुळींच आशा सोडून केवळ मुलखास आणि जिवास संभाळून पुढें कांहीं दुसरी गडबड केल्याशिवाय मरण पावला.

धों०—तर मग नारसिंहाच्या अशा अघोर कर्मावरून त्याच्या नांवानें मागें पुढें कोणी त्याची छीः थू करूं नये या भयास्तव विप्र इतिहासकर्त्यांनीं कांहीं काळ लोटल्यानंतर संधी पाहून नारसिंहाविषयीं तो खांबापासून जन्मला वगैरे नाना तऱ्हेच्या लबाड्या कल्पून इतिहासांत दाखल केल्या असाव्या, असें सिद्ध होतें.

जो०—यांत कांहीं संशय नाहीं. कारण तो जर खांबापासून जन्मला असेल असें म्हणावें, तर त्याची कोणी तरी दुसऱ्यानें नाळ कापून त्याच्या तोंडांत दुधाचा बोळा दिल्याशिवाय तो कसा वांचला असेल. नंतर त्यास कोणी तरी दुसऱ्यानें दाईचें अथवा वर दूध पाजल्याशिवाय तो लहानाचा मोठा कसा झाला असेल! कदाचित् तसेंहि घडून आलें असेल म्हणावें, तर तेणेंकरून एकंदर जो सृष्टिक्रम चालत आला आहे, त्यास बाध येतो. या गप्पाड्या विप्र ग्रंथकारांनीं नारसिंहास एकदम लांकडाच्या खांबांतून बाहेर काढिल्याबरोबर त्यास दुसरी कोणाची मदत न देतां आपल्या आपण इतका शक्तिमान

दाढी मिशांचा ठोंब्या केला कीं, ज्यानें लागलीच हिरण्यकश्यपूस मांडीवर घेऊन त्याचें पोट नखानें फाडून त्याचा वध केला. अरेरे!! जो पिता आपल्या समजुतीप्रमाणें पितृधर्म मनीं आणून केवळ शुद्ध ममतेनें आपल्या स्वपुत्राचें मन खऱ्या धर्माकडेस वळवावें म्हणून खटपट करीत होता, त्यास त्या सर्वसाक्ष आदिनारायणाच्या अवतारानें असें देहान्त शासन करावें काय! असें शासन अज्ञानी मनुष्याचा अवतारसुद्धां करणार नाहीं. तो आदिनारायणाचा अवतार असल्यामुळें त्यानें त्या हिरण्यकश्यपूस दर्शन देतांच मी आदिनारायण आहें अशी त्याची खात्री करून, पिता व पुत्र या उभयतां-मध्यें सलोखा करून देण्याचें एकीकडेस टाकून त्याचा असा निर्दयपणानें वध केला, हें मोठें आश्चर्य होय. त्याच्यानें जर त्या हिरण्यकश्यपूची उपदेश करून खात्री करवली नाहीं तरी तो सर्वांचे बुद्धीचा दाता कशाचा? यावरून असें सिद्ध होतें कीं, नारसिंहामध्यें या आपल्या पुण्यांतील एका शेणपुंज्या रांडेइतकी अक्कल नव्हती; कारण कीं जिनें, पहा, येथील एका प्रतिबृहस्पती म्हणविणाऱ्या एका विद्वानास केवळ आपल्या गोड बोलण्याचा ळळा लावून त्यास आपला गुलाम करून टाकिलें आहे. हल्लीं हिंदुस्तानांत अमेरिकन आणि युरोपियन मिशनरींनीं आपल्यांतील कित्येक तरुणांस खिस्ती धर्मानुसारी केलें आहेत; परंतु त्यांनीं त्यांतून एकाहि तरुणाच्या पित्याचा वध केला नाहीं, हें मोठें आश्चर्य होय!

**धों०**—नारसिंहाची अशी फजिती झाल्यावर विप्रांनीं प्रल्हादाचें राज्य घेण्याविषयीं कांहीं प्रयत्न केले किंवा नाहीं?

**जो०**—विप्रांनीं प्रल्हादाचें राज्य घ्यावें या इराद्यानें अनेक तऱ्हेचे चोरून उपाय केले; परंतु ते सर्व व्यर्थ गेले. कारण, प्रल्हादाचे पुढें डोळे उघडून त्याच्या मनांत विप्रांचें कपट दिसून आलें. यावरून प्रल्हादानें विप्रांचा काडीमात्र विश्वास न धरतां सर्वांशीं वरकांती स्नेह ठेवून, आपल्या राज्याची नीट व्यवस्था करून मरण पावला. नंतर त्याच-प्रमाणें प्रल्हादाचा पुत्र विरोचन यानें आपलें राज्य संभाळून त्यास बळकटी आणून मरण पावला. विरोचनाचा पुत्र बळी हा मोठा पराक्रमी निघाला. त्यानें प्रथम आपल्या आश्रयानें रहाणाऱ्या लहान सहान क्षेत्रपतींस दुष्ट दंगेखोरांच्या त्रासापासून सोडवून त्यांजवर आपलें वर्चस्व बसविलें. नंतर त्यानें आपलें राज्य उत्तरोत्तर वाढविण्याचा क्रम चालविला. त्या वेळीं विप्रांचा मुख्य अधिकारी वामन होता, त्यास तें सहन होईना. सबब बळीचें राज्य एकदम लढून घ्यावें म्हणून चोरून मोठी फौज तयार करून एकाएकीं बळीच्या सरहद्दीवर येऊन ठेपला. वामन अतिशय लोभी, धाडस आणि हेवेखोर होता.

## भाग ६ वा

**बळीराजा, जोतीबा, मऱ्हाठे, खंडोबा, महासुभा, नऊ खंडांचा न्यायी, भैरोबा, भराडी, सात आश्रयीत, तळी भरणें, आदितवारास पवित्र मानणें, वामन, पक्ष घालणें,**

**विंध्यावली, घट बसविणें, बळीराजाचें मरण, सति जाणें, आराधी लोक, शिलंगण, तांदुळांचा बळी. दुसरा बळीराजा येण्याविषयीं भविष्य, बाणासुर, कुजागरी, वामनाचा मृत्यु, उपाध्ये, होळी, वीर काढणें, बळी–प्रतिपदा, भाऊबीज, इत्यादिकांविषयीं.**

धों०—यावरून बळीराजानें काय केलें ?

जो०—बळीराजानें आपल्या राज्यांतील एकंदर सर्व सरदारांकडे व त्याच्या आश्रयानें रहाणाऱ्या क्षेत्रपतींकडे ताबडतोब सांडणीस्वार पाठविले, आणि त्या सर्वांनीं दुसरी कांहीं सबब न सांगतां आपल्या सर्व फौजा घेऊन त्याचे मदतीस यावें म्हणून सक्त ताकीद फिरविली.

धों०—या देशांत बळीच्या ताब्यांत किती मोठें क्षेत्र होतें ?

जो०—या देशांत बळीराजाच्या ताब्यांत अनेक ठिकाणीं अनेक क्षेत्रें होतीं; शिवाय त्याच्या ताब्यांत सिंव्हलद्वीपाचे आसपास कित्येक बेटें होतीं; असा तर्क निघतो. कारण, तेथें बळी या नांवाचें एक बेटसुद्धां आहे. या देशांत दक्षिणेंत कोल्हापुराचे पश्चिमेस बळीच्या ताब्यांत कोंकण व मावळांतील कांहीं क्षेत्रें होतीं; त्यावर जोतीबा या नांवाचा अधिकारी होता. त्याचें रहाण्याचें मुख्य ठिकाण कोल्हापूरच्या उत्तरेस रत्नागिरी म्हणून एक पर्वत आहे त्यावर होतें. त्याचप्रमाणें दक्षिणेंत दुसरें क्षेत्र बळीच्या ताब्यांत होतें त्यास महाराष्ट्र म्हणत असत व त्यांतील सर्व क्षेत्रवासी लोकांस महाराष्ट्री म्हणत असत, त्याचा अपभ्रंश मराठे हा होय. तें महाराष्ट्र क्षेत्र अतिशय मोठें असल्यामुळें बळीराजानें त्याचीं नऊ खंडें केलीं होतीं. यावरून त्या प्रत्येक खंडाच्या अधिकाऱ्याचें नांव खंडोबा पडलें होतें, असें सांपडतें व त्यांच्या योग्यते-प्रमाणें त्याच्या हाताखालीं एक अथवा दोनही प्रधान असत. त्याचप्रमाणें दर एक खंडोबाचे हाताखालीं बहुत मल्ल असत, म्हणून त्यास मल्लखान म्हणतात. त्यांपैकीं जेजोरीचा खंडोबा हा होता. तो आपल्या आसपासच्या क्षेत्रपतींच्या ताब्यांतील मल्लांच्या खोडी मोडून त्यांस ताळ्यावर आणीत असे; यास्तव त्याचें नांव मल्लअरी पडलें आहे. त्याचाच अपभ्रंश मल्हारी हा होय. तो धर्मन्यायानें लढण्यामध्यें इतका अहंकार बाळगीत असे कीं, त्यानें कधीं आपल्यास पाठ दाखविलेले शत्रूंवर वार केला नाहीं, म्हणून त्याचें नांव मारतोंड पडलें होतें. ज्याचा अपभ्रंश मार्तंड हा आहे. तसाच तो दीनांचा कैवारी असे. तो गाण्याचा मोठा षोकी असे; कारण त्यानें स्थापिलेला एक प्रसिद्ध मल्हार राग आहे. तो इतका उत्तम आहे कीं, त्याच्या आश्रयानें मिय्या म्हणून जो मुसलमान लोकांमध्यें प्रसिद्ध गायक होऊन गेला. त्यानेंसुद्धां दुसरा एक मल्हार केला आहे. याखेरीज बळीराजानें महाराष्ट्रांत महासुभा आणि नऊ खंडांचा न्यायी असे दोन मुख्य अधिकारी वसूल व न्याय करण्याचे कामांत नेमले होते. त्यांचे हाताखालीं दुसरे अनेक कामगार असत, असें आढळतें. हल्लीं

त्या महासुभ्याचा अपभ्रंश ह्मसोबा झाला आहे. तो सर्व पीकपाण्याची यथाकळीं तपासणी करून त्याप्रमाणानें सूट तूट घालून सर्वांस आनंदांत ठेवीत असे. यामुळें हल्लीं मऱ्हाठ्यांत एक कूळ असें सांपडणार नाहीं कीं, ज्यांत ते आपल्या शिवारांतील भलत्या एकाद्या दगडास महासुभ्याचे नांवानें शेंदुराचें मांजण करून त्यास ऊद दाखवून त्याचें नांव घेतल्याशिवाय चाड्यावर मूठ ठेवणार राहींत, शेतांत विळा घालणार नाहींत, व खळ्यांतील राशीला अघोली लावणार नाहींत. तो बळीराजाचा सुभे करून वसूल करण्याचा कित्ता यवन लोकांनीं घेतला असावा, असा तर्क निघतो. कारण त्या काळीं यवन तर काय, पण मिसर देशांतले अनेक विद्वान येथें येऊन ज्ञान शिकून जात असत, असे पुरावे सांपडतात. तिसरें असें कीं, अयोध्येजवळ काशीक्षेत्राचे आसपास कांहीं बळी राजाचे ताब्यांत क्षेत्रें होतीं, त्यांस दहावें खंड म्हणत असत. तेथील अधिकाऱ्याचें नांव काळभैरी होतें म्हणून सांपडतें. त्याचप्रमाणें तो अधिकारी पूर्वी कांहीं दिवस काशी शहराचा कोतवाल होता असेंही आढळतें. तो गायनामध्यें इतका निपूण होता कीं, त्यानें एक राग स्वतंत्र उत्पन्न केला आहे. त्या भैरव रागास तानसेनासारिखे महा प्रख्यात गवयीसुद्धां नमूनच राहिले, व त्यानें आपले कल्पनेनें डौर एक नांवाचें वाद्य उत्पन्न केलें. या डौर वाद्याची रचना इतकी विलक्षण आहे कीं, त्याची तालसुरामध्यें मृदंग, तबला वगैरे वाद्यें बरोबरी मुळींच करूं शकत नाहींत. मात्र त्याजकडेस दुर्लक्ष्य केल्यामुळें जसें तें प्रसिद्धीस यावें तसें आलें नाहीं. त्याचे शेवकांस भैरवाडी म्हणत असत, ज्याचा अपभ्रंश भराडी होय. यावरून बळीराजाचें राज्य या देशांत आजपाल ह्मणजे दशरथाचा बाप यासारख्या इतर सर्व क्षेत्रपतींपेक्षां फार मोठे होतें, ह्मणूनच एकंदर सर्व क्षेत्रपती त्याच्या धोरणानें वागत असत; इतकेंच नव्हे, परंतु त्यांपैकीं सात क्षेत्रपती तर बळीस करभार देऊन त्याचे आश्रयानें वागत असत. यावरून त्याचें नांव सात आश्रयीत पडलें होतें म्हणून सांपडतें. सारांश, वर लिहिलेल्या सर्व कारणांकरून बळीराजाचें राज्य फार मोठें होतें: व तो अतिशय बलवान होता ह्मणून त्याविषयीं एक जुनाट म्हणसुद्धां सांपडते. ती अशी कीं, "बळी तोच कान पिळी." बळीराजा जेव्हां कांहीं महत्वाचें काम आपल्या सरदारांस सोंपीत असे तेव्हां आपला दरबार भरवून तेथें तो एका तवकांत भंडार व नारळ यांसहित पानाचा विडा मांडून म्हणत असे कीं, ज्यास हें काम करण्याची हिम्मत असेल त्यानें हा विडा उचलावा. यारुवन तें काम शेवटास नेण्याची ज्यास हिंमत असे तो हरहर[१] महावीराची शपथ घेऊन त्यांतील

---

१. हरहर या शब्दाचा अपभ्रंश हुराहुरा होय, असा तर्क निघतो. कारण, इंग्लिश लोकांत एक अति जुनाट वहिवाट सांपडते ती अशी कीं, ते हुरा हुरा म्हटल्याशिवाय आनंदाची टाळी पिटीतच नाहींत, व त्यांचे सेनापती आपल्या फौजेस हुरा हुरा म्हटल्याशिवाय शत्रूंवर तुटून पडण्याला हुकूम देत नाहींत, असें कोठें कोठें त्यांच्या इतिहासांत सांपडतें. "Hurrah Boys! loose the saddle or win the horse!"

भंडार कपाळीं लावून नारळासहित तो पानाचा विडा उचलून आपल्या माथ्यावर ठेवून पदरांत घेई. त्या वीरास बळीराजा तें काम सोंपीत असे. नंतर तो वीर बळीराजाची आज्ञा घेऊन आपल्या फौजेसहित तळ उचलून शत्रूवर चालून जात असे. यावरून त्या संस्काराचें नांव तळ उचलणें हें पडलें असावें. त्याचा अपभ्रंश "तळी उचलणें" हा होय. परंतु बळीच्या सर्व महावीरांपैकीं भैरोबा व जोतीबा व नऊ खंडोबा हे तर रयतेच्या सुखाकरितां झटण्याची शर्थ करीत असत. याजकरितां एकंदर सर्व मऱ्हाठ्यांनीं हरएक शुभकार्य सुरू करण्याचे पूर्वी तळी उचलण्याचा संस्कार करण्याचें सोडलें नाहीं. त्यांनीं त्या संस्कारांत बहिरोबास, जोतीबास व खंडोबास देवबत मानून त्यांचीं नांवें सामील करून तळी उचलूं लागले. ती येणेंप्रमाणें. "हरहर महादेव. बहिरोबाचा अथवा जोतीबाचा चांग भला; सदानंदाचा उदय आणि मल्लुखान अहंकार. इतकेंच नाहीं, परंतु बळीराजा आपल्या सर्व प्रजेसहित हरहर महादेवाच्या नांवानें आदितवारास पवित्र पाळीत असे. यावरून हल्लींचे मऱ्हाठे म्हणजे मांग, महार, कुणबी, आणि माळी इत्यादि लोक दर आदितवारीं आपल्या घरांतील त्या कुळस्वामीच्या प्रतिमेवर पाणी घालून त्यास कोरड्या ओल्या भाकरीचा नैवेद्य दाखविल्याशिवाय ते आपल्या जिभेवर पाण्याचा थेंबसुद्धां ठेवीत नाहींत.

धों०—वामनानें बळीराजाच्या सरहद्दीवर येऊन ठेपल्यानंतर काय केलें ?

जो०—वामन आपल्या सर्व फौजेसहित बळीच्या राज्यांत एकदम शिरून त्याचे रयतेस पीडा देत देत बळीच्या मुख्य राजधानीजवळ येऊन भिडला. त्यावरून बळीनें आपल्या सर्व देशांवरच्या फौजा हजर होण्याच्यापूर्वी, लाचार होऊन आपली खाजगी फौज मात्र बरोबर घेऊन वामनबरोबर लढाया देण्याची सुरुवात केली, ती येणेंप्रमाणें:— बळी भाद्रपद वद्य १पदेपासून वद्य ३० स्येपावेतों दररोज वामनाशीं लढून संध्याकाळीं परत आपले महालांत आरामास येत असे. यावरून दोन्ही पक्षांतील जेवढे लोक त्या पंधरवड्यांत एकमेकांशीं लढतांना पडले, त्यांच्या मरणाच्या तिथी ध्यानांत राहिल्या. सबब दरवर्षी भाद्रपदमाशीं त्या त्या तिथीस पक्ष घालण्याची वहिवाट पडली असावी, असा तर्क निघतो. नंतर अश्विन शुद्ध १ पदेपासून शुद्ध ८ मी पावेतों बळीराजा वामनाबरोबर लढण्यांत इतका गुंतला कीं, त्यास देहभान न राहातां तो आपल्या महालांत आरामास-सुद्धां आला नाहीं. इकडेस बळीराजाचे विंध्यावली राणीनें आपल्या खोजे आराधि सेवकांकडून एक खड्डा खणवून त्यांत त्यांजकडून जळाऊ लांकडे टाकवून त्या खड्ड्याजवळ ती आठ रात्रीं आणि आठ दिवस अन्न पाणी न घेतां पुढें एक पाण्याचा घट मात्र ठेवून आपल्या पतीस जय मिळून वामनाची पीडा दूर व्हावी म्हणून हरहर महावीराची प्रार्थना करीत घट्ट बसली होती. इतक्यांत अश्विन शुद्ध ८ मीस रात्रीं बळीराजा रणांत पडल्याची बातमी तिला येऊन पोंहचतांच तिनें त्या खड्ड्यांतील लांकडांस आग लावून त्यामध्यें उडी घालून मरण पावली. त्या दिवसापासून सति जाण्याची वहिवाट पडली

असावी असा तर्क निघतो. जेव्हां ती विंध्यावली सति आपल्या पतीच्या विरहामुळें अग्नींत उडी टाकून मरण पावली, तेव्हां तिच्या सेवेंतील स्त्रिया व खोजे आराध्यांनीं आपल्या आंगावरचीं वस्त्रें फाडून जाळलीं; आणि त्यांनीं आपला ऊर बडवून टाळया पिटून त्या खड्डयाचेभोवतीं राणीच्या गुणाचा आठव करून मोठा शोक केला. तो येणेंप्रमाणें–"माझे दयाळू राणीबाई ॥ तुझा डांगोरा गरजला ॥" इत्यादि. ही दुःखाची खपली उचकटूं नये म्हणून विप्रांतील निर्दय ग्रंथकारांनीं मागाहून संधी पाहून त्या खड्डयाचा होम बनवून त्याविषयीं अनेक दुसऱ्या लबाड्या कल्पून ग्रंथांत लिहून ठेविल्या असाव्या. तिकडेस बळी रणांगणीं पडल्यावर बाणासुरानें वामनाशीं एक दिवसभर हालिशीं हाल देऊन मोठ्या निकरानें लढला नंतर त्यानें अश्विन शुद्ध ९ मीस रात्रीं आपली उरलेली फौज बरोबर घेऊन तो पळून गेला. यामुळें वमान इतका बदमस्त झाला कीं, बळीराजाच्या मुख्य राजधानींत मुळींच कोणी पुरुष नाहीं अशी संधी पाहून, त्यानें आपल्याबरोबर सर्व फौज घेऊन अश्विन शुद्ध १० मीस प्रातःकाळीं त्या शहरांत गेला; आणि त्यानें तेथील एकंदर सर्व अंगणाचें सोनें लुटलें. त्याचा अपभ्रंश "शिलंगणांचें सोनें लुटिलें" हा होय. आणि आपल्या घरीं ताबडतोब निघून गेला. पुढें तो घरांत शिरते वेळीं त्याच्या स्त्रीनें पूर्वीं एक कणकीचा बळी थट्टेनें घरांत करून ठेविला होता, त्यास तिनें आपल्या दाराच्या उबंऱ्यावर ठेवून ती वामनास असें म्हणाली कीं, हा पहा बळी पुनः तुमच्याबरोबर युद्ध करण्याकरितां आला आहे, यावरून वामनानें त्या कणकीच्या बळीस लाथ मारून घरांत शिरला. त्या दिवसापासून आजतागायत विप्रांच्या कित्येक कुळांत दरवर्षीं अश्विनमाशीं विजयादशमीस त्यांच्या स्त्रियांनीं कणकीचा अथवा तांदुळाचा बळी दाराच्या उंबऱ्याबाहेर करून ठेविलेला असतो, त्याचे उरावर डावा पाय देऊन ते आपस्त्याच्या काडीनें त्याचें पोट फोडितात; नंतर त्यास उल्लंघून घरांत शिरतात, अशी वहिवाट सांपडते. त्याचप्रमाणें बाणासुराचे लोक अश्विन शुद्ध १० मीस रात्रीं आपल्या घरोघर गेले, तेव्हां त्यांच्या स्त्रियांनीं पुढें दुसरा बळी येऊन देवाचें राज्य स्थापील, याविषयीं भविष्य जाणून त्यांनीं आपल्या उबऱ्यांत उभ्या राहून त्यांस ओंवाळून अशा म्हणाल्या कीं, "इडा पीडा (द्विजांचा अधिकार) जावो आणि बळीचें राज्य येवो." त्या दिवसापासून आजदिवसपर्यंत शेकडों वर्षांचीं वर्षें लोटली, तथापि बळीच्या राज्यांतील कित्येक भागांमध्यें क्षत्रीय वंशांच्या स्त्रियांनीं दरवर्षीं अश्विन शुद्ध १० मीस संध्याकाळीं आपापल्या पतीस व पुत्रास ओंवाळून पुढें येणाऱ्या बळीचें राज्य यावें म्हणून इच्छिण्याचें अद्याप सोडिलें नाहीं. यावरून तो येणारा बळी राजा किती उत्तम असेल! धन्य तो बळी राजा आणि धन्य ही राजनिष्ठा! नाहीं तर आतांचे सोंवळे हिंदू लोक, इंग्लिश लोकांनीं मेहेरबान होऊन आपल्यास मोठमोठे हुद्दे द्यावे म्हणून ते राणीच्या वाढदिवशीं भरसभेंत त्यांच्या बढतीविषयीं मोठमोठालीं व्याख्यानें देतात, आणि त्यांचेविरुद्ध वर्तणूक वर्तमानपत्रांत अगर साहजिक बोलण्यांत दाखवितात.

धों०—बरें, ते बळीराजानें बोलावलेले सरदार मुळींच त्याचें मदतीस आले नाहींत काय ?

जो०—मागाहून ते कित्येक लहानसहान क्षेत्रपतींसहित आपापल्या फौजा घेऊन अश्विन शुद्ध १४शीस बाणासुरास येऊन मिळतांच बळीच्या राज्यांतील एकंदर सर्व विप्रांनीं आपले जीव घेऊन वामनाकडेस पळून गेले. यावरून वामनास इतकी पांचांची धारण पडली कीं, त्यानें आपल्या एकंदर सर्व विप्रांस जमा करून पुढें बाणासुरापासून आपला बचाव कसा करून घ्यावा म्हणून अश्विन शुद्ध १५ मेस[१] सर्व रात्रभर जागर करून आपल्या देवांपुढें प्रसादरूप फांसे टाकीत बसला. नंतर त्यानें दुसरे दिवशीं आपल्या बायकामुलांसहित सर्व फौज बरोबर घेऊन आपल्या मुलखाच्या हद्दीवर येऊन बाणासुराची वाट पहात बसला.

धों०—नंतर बाणासुरानें काय केलें ?

जो०—नंतर बाणासुरानें वामनावर एकदम हल्ला करून त्याचा अगदीं मोड करून त्याजवळचें सर्व लुटून घेतलें. नंतर त्यास त्यांच्या सर्व लोकांसहित प्रथमतः त्यानें आपल्या मुलखांतून जरजर करून हिमाल्यपर्वतावर हांकलून दिलें. नंतर त्यानें त्या पर्वताच्या पायथीं तळ देऊन वामनास दाण्यास इतका महाग केला कीं, त्याचे बहुतेक लोक केवळ उपासानें मरूं लागले. यास्तव वामनाचा अवतार त्या काळजीनें तेथेंच संपला, म्हणजे वामन मरण पावला. त्यावरून बाणासुराचे लोकांस मोठा आनंद होऊन ते असें म्हणाले कीं, वामन ही विप्रांपैकीं एक मोठी उपाधि होती, ती नाहींशी झाल्यानें आपली पीडा दूर झाली, तेव्हांपासून विप्रांस उपाध्ये म्हणण्याची वहिवाट पडली असावी, असा तर्क निघतो. पुढें त्या उपाध्यांनीं आपापल्या बिऱ्हाडीं एकंदर सर्व आपल्या रणांत पडलेल्या आप्तांच्या नांवानें चिता (ज्यास हल्लीं होळी म्हणतात) पेटवून त्यांच्या उत्तरक्रिया केल्या, कारण त्यांच्यामध्यें पूर्वीपासून मेल्या मनुष्याचे धडास जाळण्याची वहिवाट सांपडते. त्याचप्रमाणें तेथील सर्व बाणासुरासहित क्षत्रियांनीं आपापल्या रणांत पडलेल्या आप्तांच्या नांवानें फाल्गून वद्य १ पदेस वीर बनून हातांत नागव्या तरवारी घेऊन मोठ्या आनंदानें नाचून त्यांस मान दिला. कारण क्षत्रिय लोकांत मेल्या मनुष्याचे धडास पुरण्याची बहुत दिवसांपासून वहिवाट सांपडते. शेवटीं बाणासुरानें अखेरीस त्या उपाध्यांचे रक्षणाकरितां कांहीं लोक तेथें ठेवून बाकी सर्व सरदारांस बरोबर घेऊन आपल्या मुख्य राजधानींत येऊन जो काय आनंद केला, तो सर्व येथें वर्णूं गेल्यास ग्रंथविस्तार फार होईल; या भयास्तव त्यांतील सारांश [मात्र देतों.] त्यानें आपल्या सर्व धनाची मोजदाद करून अश्विन वद्य १३ दशीस त्याची पूजा केली व त्यानें वद्य १४ दशीस आणि वद्य ३० वास्येस आपल्या सर्व सरदारांस उत्तम प्रकारचें खाणें

१. ज्यास कुजागरी अथवा कोजागरी पौर्णिमा म्हणतात.

देऊन मौजा मारल्या. नंतर कार्तिक शुद्ध १ देस आपल्या कित्येक सरदारांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या देऊन त्यांस आपापल्या मुलखीं जाऊन कामावर हजर राहण्याचा हुकूम दिला. यावरून येथील एकंदर सर्व अबालवृद्ध स्त्रियांस जो काय आनंद झाला कीं, त्यांनीं कार्तिक शुद्ध २ येस आपापल्या बांधवांस यथाशक्ति भोजन घालून तृप्त केल्यानंतर त्यांनीं त्यांस ओंवाळून "इडा पीडा जावो आणि बळीचें राज्य येवो" अशी त्या येणाऱ्या बळीची आठवण दिली. त्या वेळेपासून आजदिवसपावेतों दरवर्षी दिपवाळींत भाऊबीजेस क्षत्रियांच्या कन्या आपापल्या बांधवांस येणाऱ्या बळीच्या आठवणीशिवाय दुसरा आशिर्वाद देत नाहींत; परंतु उपाध्यांचे कुळांत अशा तऱ्हेची आठवण देण्याची वहिवाट मुळींच सांपडत नाहीं.

**धों०**—तर मग आदिनारायणानें बळीस पातळीं घालण्याकरितां वामनाचा अवतार घेतला. त्या वामनानें भिकाऱ्याचें सोंग घेऊन बळीराजास फसवून, त्यापासून तीन पाउलें पृथ्वी मागून घेतली. नंतर त्यानें भिकाऱ्याचें सोंग टाकून इतका मोठा अगडबंब मनुष्य बनला कीं, त्यानें एकंदर सर्व पृथ्वी आणि आकाश आपल्या दोन्ही पाउलांत आटवून बळीराजास विचारलें कीं आतां मीं तिसरें पाऊल कोठें ठेवावें ? नंतर बळीराजानें लाचार होऊन त्या अगडबंब्यास असें उत्तर दिलें कीं, तूं आतां आपलें तिसरें पाऊल माझ्या मस्तकावर ठेव. असें म्हणतांच त्या बंब्यानें बळीराजाच्या मस्तकावर आपलें तिसरें पाऊल ठेवून बळीस पाताळीं घालून आपला करार पुरा करून घेतला, असें त्याचे उपाध्यांनीं भागवत वगैरे इतिहासांत लिहून ठेविलें आहे, तें सर्व तुमच्या या हकीकती वरून खोटें आहे असें सिद्ध होतें. तर याविषयीं तुमचा काय अभिप्राय आहे तो कळूं द्या.

**जो०**—आतां यावरून तूंच विचार करून पहा कीं, जेव्हां त्या बंब्यानें आपल्या दोन पावलांत एकंदर सर्व पृथ्वी आणि आकाश आटविलें, तेव्हां त्या बंब्याच्या पहिल्या पावलाखालीं कित्येक गावें चेंगरून लयास गेलीं असतील, नाहीं बरें ? दुसरें असें कीं, त्या बंब्यानें जेव्हां आपलें दुसरें पाऊल आकाशांत ठेवितेवेळीं तेथें अतिशय दाटी झाल्यामुळें कित्येक ताऱ्यांचा एकमेकांवर आदळून चुराडा झाला असेल कीं नाहीं बरें ? तिसरें असें कीं, त्या बंब्यानें आपल्या दुसऱ्या पावलांत जर सर्व आकाश आटविलें तर त्याचें कंबरेपासून वरचें धड कोठें राहिलें असावें ? कारण मनुष्याचें दुसरें पाऊल फार झालें तर त्याच्या बेंबटापर्यंत उंच आकाशांत पोहचूं शकतें. यावरून त्या बंब्याचे कंबरेपासून त्याच्या मस्तकापर्यन्त आकाश उरलें असेल, त्यांत अथवा त्या बंब्यानें आपल्याच माथ्यावर आपलें तिसरें पाऊल ठेवून आपला करार पुरा करून घेण्याचें एकिकडेस ठेवून त्यानें केवळ दगेबाजी करून आपलें तिसरें पाऊल बळीराजाच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळीं घातलें, हें कसें ?

**धों०**—काय तो बंब्या आदिनारायणाचा अवतार ना ? आणि त्याच्यानें अशी ढळढळीत दगलबाजी कशी करवली ? अशा लबाडास आदिनारायणाचा अवतार म्हणणाऱ्या

इतिहासकर्त्यांस धिःक्कार असो. कारण त्यांच्याच लेखांवरून वामन हा कपटी, घातकी आणि कृतघ्न होता; असें सिद्ध होतें, कीं ज्यानें आपल्या दात्यास कपटानें पाताळीं घातलें.

जो०—चवथें असें कीं, त्या बंब्याचें डोकें जेव्हां आकाशापलीकडेस स्वर्गांत उंच गेलें असेल, तेव्हां त्यास तेथून बळीस फारच मोठ्यानें ओरडून विचारावें लागलें असेल कीं, आतां माझ्या दोन पावलांतच एकंदर सर्व पृथ्वी आणि आकाश आटलें, यास्तव आतां मीं माझें तिसरें पाऊल कोठें ठेवून आपली कबुलायत पुरी करून घ्यावी? कारण आकाशांतील त्या बंब्याचें मुख आणि पृथ्वीवरील बळीराजा यांमध्यें अनंत कोसांचें अंतर पडलें असेल; आणि त्यापैकीं रशियन, फ्रेंच, इंग्लिश आणि अमेरिकन वगैरे लोकांपैकीं एकाहि मनुष्यास त्या भाषणापैकीं एक शब्दसुद्धां ऐकूं गेला नाहीं, हें कसें? व त्याचप्रमाणें पृथ्वीवरील मानव बळीराजानें त्या बंब्यास उत्तर दिलें कीं, तूं आपलें तिसरें पाऊल माझ्या मस्तकावर ठेव. हें तरी त्या बंब्यास कसें ऐकूं गेलें असेल? कारण, बळी कांहीं त्यासारिखा विचित्र प्राणी बनला नव्हता. पांचवें असें कीं, त्या बंब्याच्या भारानें ही पृथ्वी रसातळास गेली नाहीं, हें मोठें आश्चर्य होय.

धों०—नाहीं तर आपण हे दिवस कोठून पाहिले असते बरें? त्या बंब्यानें काय काय खाऊन आपला जीव वांचविला असेल? अहो, तो बंब्या मेला असेल तेव्हां त्याच्या त्या अगडबंब मढ्यास स्मशानांत नेण्याकरितां चौवे खांदेकरी तरी कोठून मिळाले असतील? कदाचित् त्यास जागच्या जागींच लाकडें रचून जाळलें असेल म्हणावें, तर त्यास जाळण्यापुरतीं लाकडें किंवा गोंवऱ्या तरी कोठून मिळाल्या असतील? बरें तसल्या मढ्यास जाळण्यापुरतीं लांकडें मिळालीं नसतील म्हणावें तर त्याचा जागचे जागींच कोल्ह्याकुत्र्यांनीं खाऊन भंडारा केला असेल काय? सारांश, भागवत वगैरे सर्व ग्रंथांवरून जर सदरीं लिहिलेल्या शंकांचें निवारण होत नाहीं, तर उपाध्यांनीं मागाहून संधी पाहून एकंदर सर्व मूळच्या दंतकथांवरून हे सर्व ग्रंथ केले असावेत, असें सिद्ध होतें.

जो०—बावा! तूं तें भागवत एक वेळ वाचून पहा, म्हणजे तुला त्यापेक्षां इसाबनीति बरी वाटूं लागेल.

## भाग ७ वा

**ब्रंह्मा, ताडपत्रावर लिहिण्याची चाल, जादूमंत्र, संस्कृताचें मूळ, आटक नदीचे पलीकडेस जाण्याची बंदी. पूर्वी घोडीं वगैरे जनावरें ब्राह्मण लोक खात होते, भट, राक्षस, यज्ञ, बाणासुराचें मरण, परवारी, सुताचे पाष्टीचें चिह्न, बीजमंत्र, माहार, शूद्र, कुळकर्णी, कुळंबी, कुणबीण, शूद्रांचा द्वेष, सोंवळें, धर्मशास्त्र, मनू, भट पंतोजीचें शिक्षण, मोठा भयंकर परिणाम, प्रजापतीचें मरण, ब्राह्मण इत्यादिकांविषयीं.**

धों०—वामन मेल्यामागें उपाध्यांचा कोण अधिकारी झाला?

जो०—या प्रसंगीं थोर कुलीन अधिकारी नेमण्याची सवड झाली नाहीं, सबब ब्रंह्मा या नांवाचा एक पटाईत कारकून होता, तोच सर्व राज्यकारभार चालवूं लागला. तो मोठा कल्पनेबाज व जशी वेळ पडेल तसें वागून आपला मतलब साधाणारा होता. त्याच्या बोलण्याचा काडीमात्र विश्वास नसे, म्हणून त्यास चार तोंडांचा ब्रंम्ह्या म्हणण्याचा प्रचार पडला असावा. सारांश, तो अतिशय दक्ष, हट्टी, धूर्त, धाडस आणि निर्दय होता.

धों०—ब्रंह्यानें प्रथम काय काय केलें ?

जो०—ब्रंह्यानें प्रथम ताडपत्रांवर खिळ्यानें उकरून लिहिण्याची युक्ती काढून व त्यास जे कांहीं इराणी जादूमंत्र व ज्या कांहीं भाकड दंतकथा पाठ होत्या त्यांपैकीं कित्येक गोष्टी त्यांत सामील करून त्या सर्वांचें त्यानें त्यावेळच्या सर्वकृत (ज्याचा अपभ्रंश संस्कृत) चालू भाषेंत, आतांच्या फारशी बयतीसारिखीं लहान लहान कवनें करून त्या सर्वांचा सार ताडपत्रांवर टिपून ठेविला. पुढें त्याची फार प्रशंसा वाढली आणि तेणेंकरून ब्रंह्याच्या मुखापासून त्या कादंबऱ्यासहित जादूमंत्र विद्या निघाली म्हणून म्हणण्याची वहिवाट पडली असावी. इतक्यांत उपाध्ये लोक उपासानें मरूं लागले, यामुळें ते इराणांत परत माघारे चोरून छपून पळून जाऊं लागले; तेव्हा त्यानें आटक नदीस अथवा समुद्रास कोणी उल्लंघून पलीकडेस जाऊं नये म्हणून तलाख घालून बंदोबस्त केला.

धों०—त्यांनीं मग त्या झाडींत काय काय खाऊन आपले जीव वांचविले ?

जो०—त्यांनीं मग तेथील झाडांचीं फळें, पानें, जमिनींतील कंदमुळें व जंगलांतील अनेक तऱ्हेचे पशुपक्षी तर काय, पण कित्येकांनीं अखेरीस आपल्या बसत्या घोड्यांचासुद्धां वध करून त्यांस भाजून खाऊन आपले जीव वांचविले. यामुळें त्यांजवरचे रक्षक त्यांस भ्रष्ट म्हणूं लागले. पुढें रक्षक शब्दाचा अपभ्रंश राक्षस, आणि भ्रष्ट या शब्दाचा अपभ्रंश भट झाला. नंतर त्या भटांनीं अशा अडचणींत पडल्यामुळें नाना तऱ्हेच्या प्राणीमात्रांचें मांस खाल्लें व त्याची त्यांस लाज वाटूं लागल्यामुळें त्यांनीं तें खाण्याची बंदी करण्याचे प्रयत्न केले असतील खरे; परंतु त्यांतून कित्येक भटांस मांस खाण्याची रुची लागलेली संवय सुटेना. त्यांनीं कांहीं काळानंतर संधी पाहून त्या नीच कर्माचा दोष छपविण्या-करितां पशूंचा वध करून त्यांचें मांस खाण्यामध्यें अगाध पुण्य आहे म्हणून त्या पशूंचे वधास पशूयज्ञ, अश्वमेध वगैरे प्रतिष्ठित नांवें देऊन तीं ग्रंथीं दाखल केलीं.

धों०—नंतर ब्रंम्ह्यानें काय केलें ?

जो—पुढें बळी राजाचा पुत्र बाणासूर मरतांच त्याच्या एकंदर सर्व राज्यांत कोणी मुख्य अधिकारी नसल्यामुळें, जिकडे पहावें तिकडे बेबंद होऊन जो तो आपापल्या घरचा राजा होऊन ऐषआरामांत गुंतला. अशी संधी पाहून ह्यानें आपल्याबरोबर त्या सर्व बुभुक्षित भट परिवारांस (ज्याचा अपभ्रंश हल्लीं "परिवारी" होय) घेऊन त्यानें राक्षसांवर (रक्षकांवर) एकाएकीं रात्रीं घाला घालून त्यांचा अगदीं मोड केला. नंतर त्यानें बाणासुराच्या राज्यांत शिरण्याचे पूर्वी असा विचार केला कीं, पुढें कदाचित् न जाणों

आपल्यावर एकादें संकट येऊन आपली सर्वांची दाणादाण झाल्यास पुनः आपण आपल्या परिवारांतील एकमेकांनीं एकमेकांस ओळखून काढितां यावें, म्हणून ब्रंम्ह्यानें एकंदर सर्व आपल्या परिवारी लोकांच्या गळ्यांत एक एक पांढऱ्या सुताच्या पाष्टीचें जातीसूचक चिन्ह, म्हणजे ज्यास हल्लीं ब्रंम्हसूत्र म्हणतात तें घालून व त्या प्रत्येकास एक जातीबोधक बीजमंत्र, म्हणजे ज्यास हल्लीं गायत्री म्हणतात, ती शिकवून पुढें त्यांजवर कसाहि प्रसंग गुजरला, तथापि त्यांनीं तो मंत्र क्षत्रियांस सांगूं नये म्हणून तलाख मारून टाकिली. यावरून भट लोक आपापल्या परिवारांतील एकमेकांस एकमेक सहज ओळखून काढूं लागले.

ज्यो०—यानंतर ब्रंम्ह्यानें काय केलें ?

जो०—नंतर बंम्ह्यानें त्या आपल्या सर्व परिवारी भटांस बरोबर घेऊन बाणासुराच्या राज्यांत शिरला आणि त्यानें त्यांतील कित्येक लहानमोठ्या सरदारांचा मोड करून बहुतेक क्षेत्र आपल्या हस्तगत करून घेतांच त्यांपैकीं रणांगणीं कंबरा बांधून लढणाऱ्या महाअरी (हल्लींचा ज्याचा अपभ्रंश महार होय) क्षत्रियांशिवाय जे लोक त्याच्या तावडींत सांपडले होते तेवढ्यांचें मात्र त्यानें सर्व हरण करून त्या सर्वांस केवळ सत्तेच्या मदानें क्षूद्र लोक (ज्याचा अपभ्रंश शूद्र होय) मानून आपले दास केले. त्यांतून कित्येकांस आपल्या लोकांच्या घरोघर सेवाचाकऱ्या करण्याकरितां वांटून दिलें. बाकी राहिलेल्या शूद्रांची गांवोगांव एकेक भटकामगार पाठवून कुळेवारी करून त्यांजपासून शेतांतील काम करून घेऊन, त्यांचे पोटापुरतें अन्न देण्याची वहिवाट घातली. यावरून त्या कामगाराचें नांव कुळेकरणी पडलें. (ज्याचा अपभ्रंश कुळकर्णी होय) त्याचप्रमाणें त्या शूद्र कुळांचीं नांवें कुळवाडी अशीं पडलीं, (ज्याचा अपभ्रंश कुळंबी अथवा कुणबी होय.) व त्या दास कुणब्यांच्या स्त्रियांस नेहमीं शेतीं पुरतें काम नसल्यामुळें कधीं कधीं कारणपरत्वें भटांच्या घरीं सेवाचाकऱ्या करावयास जावें लागत असे; यास्तव कुणबीण आणि दासी या दोन शब्दांमध्यें तीळमात्र भेद दिसून येत नाहीं. वर लिहिलेल्या मूळ आधारावरून पुढें एकंदर सर्व भट उत्तरोत्तर मदांध होत जाऊन शूद्रांस किती नीच मानूं लागले कीं, त्याविषयीं सर्व हकीकत लिहूं गेल्यास त्याचा एक स्वतंत्र ग्रंथ होईल, या भयास्तव त्यापैकीं कांहीं कांहीं सांप्रत मुद्दे आढळतात, ते थोडक्यांत येथें लिहितों. ते येणेप्रमाणें:—हल्लींचे भट (मग ते झाडणाऱ्या मांगा-महारासारिखे अक्षरशून्य कां असेनात) उपाशीं मरूं लागल्यामुळें जीं नाहीं तीं नीच कर्में आचरून पापपुण्याचा विधिनिषेध न मानितां अज्ञानी शूद्रांस फसविण्यास काडीमात्र मागेंपुढें पाहात नाहींत. शेवटीं त्यांचा कोठें उपाय चालेनासा झाला म्हणजे ते शूद्रांचे दारोदार धर्माच्या मिषानें दोम दोम करून आपलीं कशीं तरी पोटें जाळतात; परंतु शूद्रांचे चाकर होऊन त्यांच्या शेतांत गुरें सांभाळून त्यांच्या गोठ्यांतील शेण वाहून शेणखईत नेऊन टाकण्यास, नांगर, कुळव, मोटा आणि गाड्या हांकण्यास, खांदणी, खुरपणी आणि कोळपणी

करण्यास, सोनखताच्या पाट्या डोईवर वाहून झाडांस खतविण्यास, कडव्याच्या आळाशा वाहून गंजी रचण्यास, रात्रीं हातांत काठ्या घेऊन शेतांची राखण करण्यास, व त्यांचे शेतांतील धान्याचीं व भार्जीपाल्याचीं ओझीं वाहून त्यांच्या घरीं नेऊन टाकण्यास लाजतात. ते शूद्रांचे घरीं चाकरीस राहून त्यांचीं घोडीं खाजवून त्यांच्या घोड्यांपुढें धांवण्यास, त्यांचे जोडे बगलेंत मारून सांभाळण्यास, त्यांच्या घरांतील झाडलोट करून त्यांचीं उष्टीं काढून खरकटीं भांडीं घांसण्यास, त्यांच्या घरांतील समया घांसून दिवे लावण्यास व त्यांच्या घरीं चिखलमाती वाहून बिगाऱ्याचें काम करण्यास लाजतात. त्याचप्रमाणें भटणी शूद्रांच्या चाकरिणी होऊन त्यांच्या स्त्रियांस उटणी लावून त्यांस नाहूं घालून त्यांचे केंस विंचरण्यास, त्यांच्या घरांतील झाडलोट करून त्यांच्या स्त्रियांचे बिछाने करून त्यांचे पाय चेपण्यास व त्यांच्या स्त्रियांचीं लुगडीं धुऊन त्यांचे जोडे सांभाळण्यास लाजतात. पुढें जेव्हां ते महाअरी आपल्या शूद्र बांधवांस भटांच्या हातां-तून सोडवावें म्हणून भटांवर हमेशा हल्ले करूं लागले, तेव्हां एकंदर सर्व भट, शूद्रांचा इतका द्वेष करूं लागले कीं ते शूद्र शिवलेलें अन्नसुद्धां खाईनातसे झाले. व त्याच द्वेषावरून हल्लींचे भट शूद्र शिवलेलें अन्न तर काय; पण ते शूद्र शिवलेलें पाणीसुद्धां पीत नाहींत. त्यांनीं आपणांस कोणी शूद्रांनीं शिवूं नये याजकरितां सोंवळें होण्याची चाल पाडली. पुढें कित्येक शूद्रद्रोही भटग्रंथकारांनीं, जनाची तर नाहीं, पण मनाची सुद्धां काडीमात्र लाज न धरितां संधी पाहून त्या सोंवळ्याचें इतकें महत्व वाढविलें कीं सोंवळ्या भटास एकादे शूद्राचा स्पर्श झाला असतांसुद्धां तो वास्तविक अपवित्र होतो, म्हणून त्यांनीं धर्मशास्त्रासारखीं अनेक अपवित्र पुस्तकें करून ठेविलीं आहेत; व कांहीं कालानंतर शूद्रांस आपल्या पूर्वीच्या श्रेष्ठत्वाची आठवण झाल्यास ते कधीं तरी आपल्या उरावर नाचण्यास कमी करणार नाहींत, या भयास्तव शूद्रांस मुळींच कोणी ज्ञान शिकवूं नये म्हणून भटांनीं बंदी करून तृप्त झाले, इतकेंच नाहीं परंतु त्यांनीं त्यांपैकीं कोणी परमार्थसंबंधीं ग्रंथ वाचीत असल्यास त्यांतील एक शब्दसुद्धां शूद्रांचे कानीं पडूं नये असा प्रतिबंध करून टाकिला. याविषयीं मनुसंहितेंत दाखलेही सांपड-तात. त्या आधारावरून हल्लींचे सोवळे भट तसलें अपवित्र पुस्तक शूद्रांचे समक्ष वाचीत नाहींत. आतां जरी खिस्ती म्हणविणाऱ्या इंग्रज सरकारच्या धाकानें विद्या-खात्यांतील पोटार्थी भटपंतोजीच्यानें शूद्रांस आम्ही लिहिणें शिकविणार नाहीं, असें उघड तोंडानें म्हणवत नाहीं, तथापि त्यांच्यानें आपल्या पूर्वजांच्या लबाड्या उघडकीस आणून शूद्रांस त्यांविषयीं खरा समज देऊन आपलें महत्व कमी करून वेववत नाहीं. सबब ते शूद्रांचे मुलांस केवळ कामापुरतें व्यावहारिक ज्ञानसुद्धां न शिकवितां ते त्यांच्या मनांत अनेक तऱ्हेचीं अपुरतीं देशाभिमानाचीं खोटीं तत्वें मात्र भरवून त्यांस पक्के इंग्लिश 'राज्यभक्त' करून अखेरीस त्यांस शिवाजीसारिख्या धर्मभोळ्या, अज्ञानी, शूद्र राजानें आपला देश म्लेंच्छांपासून सोडवून गाई-ब्राह्मणांचें कसें पालन केलें, याविषयीं

अनेक हुलथापा देऊन त्यांस पोकळ स्वधर्माभिमानी करून सोडितात. यामुळें शूद्र समाजाचे मानाप्रमाणें ते मोठालीं जोखमीचीं कामें करण्यास लायक विद्वान होत नाहींत. एकंदर सर्व खात्यांत भटांची गर्दी होऊन ते शूद्रांवर इतक्या सफाईनें जुल्म करितात, कीं त्याविषयीं यथासांग हकीगत लिहूं गेल्यास, कलकत्त्यांतील नीळ पिकविणाऱ्या इंग्लिश लोकांचे जुल्म 'खंडींत नवाटकेंसुद्धां भरणार नाहींत'. आतां चहुंकडे भटांच्या हातांत (नांवाला मात्र टोपीवाले) सत्ता असल्यामुळें ते गरीब व अज्ञानी शूद्र रयतेचें तर काय, पण ते सरकारचेंसुद्धां अनिवार्य नुकसान करीत आले आहेत व ते यापुढेंही सरकारचें नुकसान करणार नाहींत असें कोणाच्यानें म्हणवणार नाहीं. याविषयीं आमच्या शहाण्या सरकारास माहिती असून तें, आंधळ्याचें सोंग घेऊन केवळ भटांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांच्या धोरणानें वागतें. यास्तव ह्यापासून अखेरीस मोठा भयंकर परिणाम होईल यांत तिळमात्र संशय नाहीं. सारांश, ब्रंम्ह्यानें येथील मूळच्या क्षेत्रवासी लोकांस दास केल्यानंतर तो गर्वानें इतका फुगला होता कीं, महाअरींनीं त्याचें नांव थट्टेनें "प्रजापती" पाडिलें होतें असा तर्क निघतो. परंतु ब्रंम्हा मेल्यावर आर्य लोकांच्या मूळच्या भट नांवाचा लोप होत जाऊन त्यांचें नांव ब्राह्मण पडलें.

## भाग ८ वा

**परशुराम, मातृवध, एकवीस स्वाऱ्या, दैत्य, खंडेरावानें रावणाचा आश्रय केला, नऊखंडाची जाणाई, सात आसरा, महारांच्या गळ्यांतील काळा दोरा, अतिशूद्र अंत्येज, मांग, चांडाळ, महारास जिवंतच पायांमध्यें दडपणें, ब्राह्मणांत पाट लावण्याची बंदी, क्षत्रिय अर्भकांचा वध, परभु, रामोशी, जिनगर, वगैरे लोक, परशुरामाचा पराभव झाल्यामुळें त्यानें आपला जीव दिला, आणि चिरंजीव परशुराम यास आमंत्रण, इत्यादिकांविषयीं.**

**धों०**—प्रजापति मेल्यावर ब्राम्हणांचा अधिकारी कोण झाला?

**जो०**—परशुराम.

**धों०**—परशुराम स्वभावानें कसा होता?

**जो०**—परशुराम स्वभावानें पुंड, साहसी, नष्ट, निर्दय, मूर्ख आणि अधम होता. तो आपल्या जन्म देणाऱ्या रेणुकेचें शीर उडविण्यास काडीमात्र भ्याला नाहीं. तो शरिरानें फार बळकट असून मोठा तिरंदाज असे.

**धों०**—त्याच्या अमलांत काय झालें?

**जो०**—प्रजापति मरतांच बाकीच्या उरलेल्या महाअरींनीं ब्राह्मणांच्या हातीं सांपडलेल्या आपल्या बांधवांस ब्राह्मणांच्या दास्यत्वापासून सोडविण्यासाठीं परशुरामाशीं

एकवीस वेळां इतके निकरानें लढाया केल्या कीं, त्यांचें अखेरीस द्वैती म्हणून नांव पडलें व त्या शब्दाचा पुढें अपभ्रंश 'दैत्य' झाला. जेव्हां परशुरामानें एकंदर सर्व महाअरींचा मोड केला, तेव्हां त्यांतून कित्येक महाविरांनीं निराश होऊन, आपल्या स्नेह्यांच्या मुलुखांत जाऊन आपले शेवटचे दिवस काढिले. म्हणजे जेजुरीच्या खंडेरावानें जसा रावणाचा आश्रय केला, त्याचप्रमाणें नऊ खंडाचे न्यायी व सात आश्रय या सर्वांनीं तळकोंकणांत जाऊन तेथें छपून आपले शेवटचे दिवस काढिले. त्यावरून ब्राम्हणांनीं केवळ धिक्कारानें नऊ खंडांचा जो न्यायी त्याचें स्त्रीवाचक निंद्य नांव नऊ खणची जाणाई व सात आश्रयांचें नांव सातीअसरा पाडिलें. बाकी जेवढे महाअरी परशुरामानें रणांगणीं कैदी केले तेवढ्यांपासून परशुरामानें, त्यांनीं कधीं पुनः ब्राह्मणांवर कंबरा बांधूं नयेत म्हणून क्रियाभाक घेऊन, एकंदर सर्वांच्या गळ्यांत एक एक काळ्या सुताचे दोऱ्याचें चिन्ह[१] घालून, त्यांचा, त्यांचे शूद्र बांधवांनींसुद्धां त्यांना स्पर्श करूं नये म्हणून प्रतिबंध केला. नंतर परशुरामानें त्या महाअरी क्षत्रियांस, अतिशूद्र, महार, अंत्येज, मांग आणि चांडाळ म्हणण्याचा प्रचार घालून, त्यांस इतकी पीडा देण्याची वहिवाट घातली कीं, तिला या जगांत दुसरी तोडच सांपडणें नाहीं. उदाहरण:– या निर्दयानें महार, मांग लोकांचा सूड उगविण्याच्या हेतूनें आपल्या लोकांचे मोठमोठे इमारतींच्या पायामध्यें कित्येक मांगांस त्यांचे स्त्रियांसह उभे करून, त्यांचे केविलवाणी ओरडण्याची कोणास दया येईल याजकरितां त्यांचे तोंडांत तेल व शेंदूर ओतून त्यांस जिवंतच त्या पायामध्यें दडपण्याची वहिवाट घातली व ती अति क्रूर चाल मुसलमानांचें जसजसें प्राबल्य होत चाललें तसतशी आपोआप बंद झाली. परंतु इकडे महाअरींशीं लढतां लढतां परशुरामाचे इतके लोक मारले गेले कीं, ब्राम्हणांपेक्षां ब्राम्हण विधवांचा भरणा अधिक वाढला. व त्याची नीट रीतीनें कशी व्यवस्था ठेवावी याची मोठी पंचाईत येऊन पडली. शेवटीं ब्राम्हण स्त्रियांचा पुनर्विवाह अगदींच बंद केला, तेव्हां थोडेसें लागीं लागल्यासारखें झालें. परशुराम आपले ब्राम्हण लोकांचे वधामुळें इतका पिसाळला कीं, त्यानें बाणासुराच्या एकंदर सर्व राज्यांतील क्षत्रियांच्या बीजाचा समूळच नाश करावा, ह्मणून शेवटीं त्या महाअरी क्षत्रियांच्या निराश्रित गरोदर विधवा स्त्रिया, ज्या इतर अनेक भूमींच्या ठायीं आपले जीव घेऊन लपून राहिल्या होत्या, त्यांच्या पोटीं पुढें जन्मणाऱ्या अर्भकांचा जन्म झाल्याबरोबर वध करावा म्हणून परशुरामानें त्यांस पकडून आणण्याचा झपाटा चालविला. त्या झपाट्यांतून मोठ्या दैवयोगानें वांचलेल्या अर्भकांपासून उत्पन्न झालेलीं कांहीं कुळें हल्लीं परभू लोकांचे समाजांत सांपडतात. त्याचप्रमाणें परशुरामाच्या धुमाळींत रामोशी, जिनगर, तुंबडीवाले व कुंभार वगैरे जातीचे लोक असावेत. कारण कित्येक रीतीभातींमध्यें त्यांचा शूद्रांशीं मेळ मिळतो. सारांश, हिरण्याक्षापासून वळी

१. त्याचप्रमाणें मराड्याचे पुंगीस व वाघ्याचे भंडारीस काळा दोरा आहे तो पहा.

राजाच्या पुत्राचा[1] निर्वंश होईतोंपर्यंत एकंदर सर्व त्या कुळाचा नीर काढून त्याच्या लोकांची अशी राखरांगोळी करून त्यांस धुळीस मिळविलें. यावरून ब्राह्मण लोक जादूविद्येंत मोठे प्रवीण आहेत ह्मणून बाकी सर्व अज्ञानी क्षेत्रपतींच्या मनावर वजन बसून, ते ब्राह्मणांच्या मंत्रांस अतिशय भिऊं लागले खरे; परंतु इकडे परशुरामाच्या मूर्खपणामुळें त्याच्या धुमाळींत ब्राम्हणांचा फार क्षय झाला. यामुळें एकंदर सर्व ब्राम्हणलोक त्याच्या नांवानें हाकल्या मारावयास कोठें लागले, कोठें नाहीं तों इतक्यांत येथील एका क्षेत्रपतीच्या रामचंद्र या नांवाच्या मुलानें परशुरामाचें धनुष्य जनक राजाचे घरीं भरसभेंत भंग केल्यामुळें परशुरामानें ती चुरस मनांत धरून, रामचंद्र आपल्या घरीं जानकीस घेऊन जात आहे अशी संधी साधून रामचंद्रास रस्त्यांत गांठून त्याजबरोबर युद्ध केलें. त्यामध्यें परशुरामाचा मोड झाल्यामुळें तो इतका खजील झाला कीं, त्यानें आपल्या सर्व राज्याचा त्याग करून आपल्या कुटुंबासहवर्तमान थोडेसे लोक बरोबर घेऊन तळकोंकणांत जाऊन राहिला. तेथें अखेरीस त्यास त्याच्या पूर्वी केलेल्या एकंदर सर्व दुष्ट कर्मांचा पश्चात्ताप झाल्यामुळें त्यानें आपला जीव कोठें व कधीं व कसा दिला, याचा कोणास शोध लागूं दिला नाहीं.

**धों०**—परशुराम हा आदिनारायणाचा अवतार आहे, तो चिरंजीव आहे, त्याला मरणच नाहीं, असें सर्व ब्राम्हण आपल्या ग्रंथांच्या आधारावरून बोलतात आणि आपण तर म्हणतां परशुरामानें जीव दिला, हें कसें ?

**जो०**—दोन वर्षांपूर्वी मी शिवाजीच्या पवाड्यांत[2] पहिल्या अभंगांत "सर्व ब्राम्हणांनीं आपल्या परशुरामास पाचारुन आणून त्याच्या साक्षीनिशीं माझ्यासमक्ष हल्लींच्या मांगमहारांचे पूर्वज परशुरामाशीं एकवीस वेळां लढणारे महाअरी क्षत्रिय होते किंवा नाहीं, म्हणून पदरांत माप घ्यावें", याविषयींची ब्राम्हणांस सूचना दिली; आतां त्यांनीं परशुरामास पाचारून आणिलें नाहीं. यावरून परशुराम हा खरोखर आदिनारायणाचा अवतार असून चिरंजीव असता तर ब्राम्हणांनीं कधींच त्यास धुंडून आणून माझी तर काय, पण एकंदर सर्व जगांतील ख्रिस्ति व महमदी लोकांचीही खात्री करून त्यांचे समजुतीप्रमाणें सर्व म्लेंछ लोकांचें बंड आपल्या मंत्रविद्येच्या सामर्थ्यानें मोडण्यास कधीं मागें पुढें पाहिलें नसतें.

---

१. बाणासुराची कन्या उषा ही कृष्णाच्या प्रद्युम्न नांवाच्या मुलास दिली होती.

२. **अभंग**—अति महारथी क्षत्रियाचा बाळ ॥ यवनाचा काळ त्रेतायुगीं ॥ १ ॥ स्वभावें तो शूर रणीं भिडणार ॥ लढे अनिवार देशासाठीं ॥ २ ॥ परशुरामाशीं झोंबे महाबळी ॥ एकवीस वेळीं लागोपाठ ॥ ३ ॥ अशा महावीरा म्हणे महाअरी ॥ धाके थरथरी द्विजसूत ॥ ४ ॥ बोधी शिऊं नका मोड झाल्यावर ॥ म्हणा महाआर मांग त्यास ॥ ५ ॥ भित्रा सूड घेई जिंकिल्या शत्रूचा ॥ पूत कृतघ्नाचा सर्प जैसा ॥ ६ ॥ चिरंजीव आहे आण पाचारूनि ॥ पहा तपासूनी जोतीपुढें ॥ ७ ॥

**धों०**—माझ्या मतें आपण स्वतः पुनः एकदां परशुरामास बोलावून पहा. तो खरोखरी जिवंत असल्यास तुमच्या बोलावण्यानें खचित येईल. कारण हल्लींचे ब्राह्मण जरी आपल्यास कितीही 'विविधज्ञानी' झालों आहोंत असें म्हणवोत, तथापि ते परशुरामाच्या मतें भ्रष्टच म्हटले पाहिजेत. याजविषयीं प्रमाण,—आतांशा कित्येकांनीं शास्त्रविधिपूर्वक कारलीं खाण्याचा धिक्कार करून शास्त्रनिषिद्ध माळ्यांचीं गाजरें, खाण्याचा झपाटा चोरून चालविला आहे.

**जो०**—बरें, तसें कां होईना.

चिरंजीव परशुराम उर्फ आदिनारायणाचा अवतार यास :—

मुक्काम सर्वत्र ठायीं,

अरे दादा परशुरामा, तूं ब्राह्मणांच्या ग्रंथांवरून चिरंजीव आहेस. तूं कड्डू कां होईना, परंतु विधिपूर्वक कारलीं खाण्याचा धिक्कार केला नाहींस. तुला पहिल्यासारिखे कोळ्यांच्या मढ्यापासून दुसरे नवीन ब्राम्हण उत्पन्न करावे लागणार नाहींत. कारण, हल्लीं येथें तूं जे मढ्यापासून उत्पन्न केलेले ब्राम्हण त्यांपैकीं कित्येक ब्राम्हण 'विविधज्ञानी' बनून बसले आहेत, त्यांना कांहीं अधिक ज्ञानसुद्धां देण्याची तुला जरूरी पडणार नाहीं. फक्त तूं येथें ये, आणि त्यांनीं शूद्रांचीं गाजरें खाल्ल्याबद्दल त्यांस चांद्रायण प्रायश्चित देऊन त्यांच्याकडून तुझ्या वेदमंत्रजादूच्या सामर्थ्यानें पहिल्यासारिखे कांहीं चमत्कार इंग्लिश, फ्रेंच वगैरे लोकांस करून दाखीव म्हणजे झालें. तूं असा तोंड चुकवून पळत फिरूं नको. तूं या नोटीशीच्या तारखेपासून सहा महिन्यांचे आंत येऊन हजर झाल्यास, मी तर काय; पण एकंदर सर्व जगांतील लोक तुला तूं सर्वसाक्ष आदिनारायणाचा अवतार खास आहेस म्हणून मान देतील व तूं तसें न केल्यास येथील महारमांग आमच्या म्हसोबाच्या पाठीस लपून बसलेल्या तुझ्या विविधज्ञानी म्हणविणाऱ्या ब्राह्मण बच्चांस ओढून आणून त्यांची फटफजीती करण्यास कधीं कमी करणार नाहींत. आणि तेणेंकरून त्यांच्या तुणतुण्याची तार तुटून त्यांच्या झोळींत दगड पडल्यानें त्यांस विश्वामित्रासारिखें उपाशीं मरूं लागल्यामुळें कुत्र्याचें फरें[1] खाण्याचा प्रसंग आणूं नको.

तारीख १ ली, माहे आगस्ट<br>सन १८७२ इसवी. पुणें,<br>जुना गंज घर नं. ५२७.

आपला खरेपणा पहाणारा,<br>जोतीराव गोविंदराव फुले.

१. अथवा पानशेंगा.

# भाग ९ वा

**वेदमंत्र, जादूचें वजन, मूठ मारणें, देव्हारे घुमविणें, जप, चार वेद, ब्रम्हघोळ, नारदशाई, नवीन ग्रंथ, शूद्रांस ज्ञान देण्याची बंदी, भागवत व मनुसंहिता यांचा असंगतपणा, इत्यादिकांविषयीं.**

**धों०**—तुम्हीं खुंटीस नांगर बराच लावला बरें! तुमच्या म्हणण्याप्रमाणें परशुराम मेला व त्याची मातीस माती मिळाली, असें कां होईना. परंतु बाकीच्या सर्व क्षेत्रपतींच्या मनांवर ब्राह्मणांच्या मंत्रांचें वजन कसें बसलें? हें कळूं द्या.

**जो०**—कारण त्या काळीं युद्धामध्यें ब्राम्हण लोक हर एक शस्त्रांवर मंत्रविधि करून त्यास अस्त्रांची योग्यता आणिल्याशिवाय शत्रूंवर त्यांचा उपयोग करीत नसत. त्यांनीं जेव्हां अशा नाना तऱ्हेच्या चेष्टा करून बाणासुराच्या रयतेसहित त्याच्या राज्यकुळाची अशी राखरांगोळी केली; तेव्हां सहजच बाकी सर्व देवभोळ्या क्षेत्रपतींच्या मनावर ब्राम्हणांच्या विद्येची धास्ति बसली. यास उदाहरण:—भृगु नामक ऋषीनें जेव्हां विष्णूच्या छातीवर लाथ मारली, तेव्हां विष्णु (त्यांच्या म्हणण्याप्रमाणें आदिनारायण) ऋषीच्या पायांस श्रम झाले असतील याजकरितां चोळूं लागला. आतां यांतील भावार्थ शुद्ध आपमतलबी आहे. तो असा कीं ज्या अर्थीं साक्षात् आदिनारायण जो विष्णु त्यानें ब्राम्हणाचे लाथेस सहन करून त्याचे पाय दाबिले, त्या अर्थीं आम्ही जे शूद्र (त्यांच्या म्हणण्याप्रमाणें क्षूद्र प्राणी) त्यांनीं आपले, ब्राह्मण लाथाबुक्कया देऊन, प्राण जरी घेऊं लागले, तरी हूं चूं करूं नये.

**धों०**—तर मग आतांच्या हलकट लोकांजवळ जी कांहीं जादूमंत्रविद्या आहे ती तरी त्यांनीं कोठून घेतली असावी.?

**जो०**—हल्लींच्या लोकांजवळ जी कांहीं मूठ मारण्याची, मोहिनी घालण्याची बंगाली जादूमंत्रविद्या आहे, ती केवळ वेदांतील जादूमंत्रविद्येपासून त्यांनीं घेतली नसावी असें कोणच्यानें म्हणवणार नाहीं. कारण, आतां जरी तिच्यामध्यें अतिशय फेरफार होऊन बराच अपभ्रंश झाला आहे, तथापि तिच्यांतील बहुतेक मंत्रांत आणि यंत्रांत ॐनमो, ओं नमः, ओं ऱ्हीं, ऱ्हीं नः वगैरे वेदमंत्रांतील वाक्यांचा बराच भरणा सांपडतो. यावरून ब्राम्हणांच्या मूळ पूर्वजांनीं या देशांत येऊन बंगाल्यांत प्रथम वस्ती केल्यानंतर त्यांची जादूमंत्रविद्या येथून चहूंकडे पसरली गेल्यामुळें तिचें नांव बंगाली विद्या पडलें असावें. इतकेंच नव्हे, परंतु आर्यांचे पूर्वज आतांच्या आडाणी लोकांसारिखे देव्हारा घुमविणारेसुद्धां होते. कारण पूर्वी त्यांजमध्यें देव्हारा घुमविणाऱ्या लोकांस ब्राम्हण म्हणत असत, व ते सोमरस या नांवाची दारू पिऊन तिच्या तारेमध्यें बडबड करून आम्हांबरोबर देव बोलतो म्हणून इतर अज्ञानी लोकांस फसवीत होते, असें त्यांच्याच[1] वेदांवरून सिद्ध

१. कित्येक युरोपियन ग्रंथकारांचीं मतें आहेत.

होतें व त्याच आधारावरून हल्लीं अशा सुधारलेल्या काळांत आतांचे ब्राम्हण भट आपलीं पोटें जाळण्याकरितां जप, अनुष्ठानें, जादूमंत्रविधि करून अज्ञानी माळ्यांकुणब्यांस गंडे घालून फसवितात. तथापि त्या बापुड्या दुर्दैवी हतभाग्यांस त्या ढोंगी गारुड्यांचें कपट शोधून काढण्यास फुरसतच होत नाहीं. कारण, सर्व दिवसभर आपल्या शेतीं खपूनआपल्या मुलाबाळांचें पोषण करून सरकारची पट्टी पुरी करितां करितां त्यांच्या नाकास नळ येतात.

धों०—तर मग ब्रंम्ह्याच्या मुखापासून चार वेद स्वयंभू निघाले ह्मणून कित्येक ब्राम्हण मोठी शेखी करून बोलतात, याला बाध येतो.

जो०—हें सर्व खोटें आहे. कारण त्यांचें बोलणें जर खरें मानावें तर ब्रंम्हा मेल्या-नंतर ब्राम्हणांतील कित्येक ब्रह्मऋषींनीं अथवा देवऋषींनीं केलेलीं सूक्तें ब्रंम्ह्याच्या तोंडांतून निघालेल्या वेदांत कशीं आढळतात? त्याचप्रमाणें चार वेदांची रचना एकाच कर्त्यानें एकाच काळीं केली ह्मणून सिद्ध होत नाहीं; असें कित्येक युरोपियन परोपकारी ग्रंथकारांनीं सिद्ध करून दाखविलें आहे.

धों०—भटांनीं हा ब्रंह्मघोळ केला तरी केव्हां?

जो०—ब्रंह्मा मेल्यानंतर कित्येक ब्रंम्हऋषींनीं ब्रंम्ह्याच्या लेखाचे तीन भेद म्हणजे वेद केले, व पुढें त्या तीन वेदांत अनेक ब्रंम्हऋषींनीं अनेक तऱ्हेचे फेरफार करून त्यांस ज्या कांहीं पूर्वीच्या भाकड दंतकथा माहित होत्या, त्यांचीं त्यांनीं त्याच मासल्याचीं कवनें करून त्यांचा एक नवीन चवथा वेद केला. इतक्यांत परशुरामानें बाणासुराच्या रयतेस असें धुळीस मिळविल्यामुळें सहजच ब्राह्मणांच्या वेदमंत्रजादूचें वजन इतर सर्व क्षेत्रपतींच्या मनावर बसलें, ही संधी पाहून नारदासारख्या बायकांतील पावलीकम-आठ भाऊजीनें रामचंद्र आणि रावण, कृष्ण आणि कंस व कौरव आणि पांडव या सर्व देवभोळ्या क्षेत्रपतींच्या घरोबर रात्रंदिवस खेप्या घालून त्यांच्या बायकापोरांसमोर कधीं कधीं आपल्या विण्याची तुणतुण तार वाजवून व कधीं त्यांच्यापुढें थयथय नाचतां टाळ्या पिटून त्यांस वरकांती ज्ञान उपदेश करण्याचा भाव दाखवून आंतून एकमेकांस एकमेकांच्या लांड्यालबाड्या सांगून त्या सर्वांचे आपापसांत तंटे लावून एकंदर सर्व ब्राह्मण लोकांस निर्वेध केल्यामुळें ब्राह्मण ग्रंथकारांनीं तेवढ्या काळांत सर्व लोकांची नजर चुकवून, आपली सर्व वेदमंत्रजादू व तत्संबंधीं भाकड दंतकथा होत्या तेवढ्यांशीं सरासरी मेळ घालून त्यांनीं अनेक स्मृत्या, संहिता, शास्त्रें, पुराणें, वगैरे भारेचे भारे नवीन ग्रंथ घरांतल्या घरांत बनवून त्या सर्वांत शूद्रांवर ब्राम्हण लोकांचें वर्चस्व स्थापून त्यांनीं आपल्या वडिलोपार्जित शिपाईगिरीच्या मार्गांत कांटी ठोकून मोठा धार्मिकपणाचा डौल घातला. हें सर्व ब्रम्हकपट पुढें कधीं शूद्रांच्या ध्यानांत येऊं नये या भयास्तव, अथवा त्या ग्रंथांत पाहिजेल तसे फेरफार करितां यावेत म्हणून त्यांनीं शूद्र वगैरे पाताळीं घातलेल्या लोकांस मुळींच कोणी ज्ञान देऊं नये, असे मनुसंहितेसरिख्या अपवित्र ग्रंथांत फारच मजबूत लेख करून ठेविले आहेत.

धों०—भागवत त्याच वेळेस केलें असावें काय ?

जो०—भागवत त्याच वेळेस केलें असतें तर सर्वांच्या मागून झालेल्या अर्जुनाच्या जन्मेजय नांवाच्या पणतूची हकीकत त्यामध्यें कधींच आली नसती.

धों०—तुमचें म्हणणें रास्त आहे. कारण त्याच भागवतामध्यें अनेक पुरातन मनःकल्पित भाकड दंतकथा अशा आढळतात, कीं त्यापेक्षां इसाबनीति हजार वांट्यानें बरी म्हणवेल. तिच्यामध्यें मुलांचीं मनें भ्रष्ट होण्याजोगी एकसुद्धां गोष्ट आढळत नाहीं.

जो०—त्याचप्रमाणें मनुसंहिता ही भागवताचे मागून केली असावी म्हणून शाबीत करतां येतें.

धों०—काय? मनुसंहिता भागवताचे मागून केली असावी! असें कसें होईल?

जो०—कारण भागवतांतील वशिष्ठानें, मीं खून केला नाहीं, म्हणून सुदामन राजासमोर शपथ घेतल्याची उपमा मनूनें आपल्या ग्रंथाच्या ८ व्या अध्यायाच्या ११० श्लोकांत कशी घेतली? त्याचप्रमाणें, विश्वामित्रानें विपत्तिकाळीं कुत्र्याचें फरें खाल्ल्याविषयीं त्याच ग्रंथाच्या १० व्या अध्यायामध्यें १०८ श्लोकांत कशी उपमा घेतली? याखेरीज त्याच पुस्तकांत अनेक विरुद्ध गोष्टी सांपडतात.

# भाग १० वा

**दुसरे बळीराजे, ब्राह्मणधर्माची फजीती, शंकराचार्यांचें कृत्रिम, नास्तिक मत, निर्दयपणा, प्राकृत ग्रंथकार, कर्म आणि ज्ञानमार्ग, बाजीराव, मुसलमानांचा द्वेष, आणि अमेरिकन व स्कॉच उपदेशकांनीं ब्राह्मणांचा कृत्रिमरूपी कोट फोडला, इत्यादिकांविषयीं.**

**धों०**—आतां मात्र शिकस्त झाली. कारण आपण शिवाजीच्या पवाड्याच्या प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें साफ सिद्ध होतें कीं, चार घरच्या चार ब्राह्मण ग्रंथकार पोरी मिळून त्या, घरांतल्या घरकुंडांत बराच त्या लटक्या मुटक्यांचा खेळ खेळल्या.

जो०—परंतु पुढें जेव्हां तो एक दीनांचा कैवारी, महापवित्र, सत्यज्ञानी, सत्यवक्ता बळीराजा या जगांत उत्पन्न झाला, तेव्हां त्यानें जो आपण सर्वांचा उत्पन्नकर्ता व सर्वांचा महापिता त्याचे हेतु मनीं धरून ज्यानें आपण सर्वांस दिलेल्या सत्यमय पवित्र ज्ञानाचा व अधिकाराचा सर्वांस सारखा उपभोग घेतां यावा, यास्तव त्यानें एकंदर सर्व भटां-सारख्या कृत्रिमी, दुष्ट आणि मतलबी फांसेपारध्यांच्या दास्यत्वापासून आपल्या दीन व दुबळ्या आणि गांजलेल्या बांधवांस सोडवून देवाचें राज्य स्थापन करण्याची सुरवात करून त्यानें आपल्या वडील बायांचें कांहींसें भविष्य पूर्ण केलेंसें वाटतें. अरे, जेथें मिस्टर टॉमस पेन्सासारिख्या मोठमोठ्या विद्वानांच्या पूर्वजांनीं या बळीराजाचे अंकीत

होऊन आपल्या मागच्या सर्व इडापीडा दूर करून सुखी झाले. परंतु अखेरीस जेव्हा त्या बळीराजास चार दुष्ट लोकांनीं सुळावर देवविलें तेव्हां एकंदर सर्व युरोपखंडांत मोठी ढवळाढवळ होऊन कोट्यावधी लोक त्याचे मतानुयायी झाले व ते आपल्या उत्पन्नकर्त्याच्या नेमाप्रमाणें या जगांत त्याचेंच निवळ राज्य स्थापावें म्हणून रात्रंदिवस झटूं लागले. अशा संधानांत एकंदर सर्व या देशांत थोडीशी स्वस्थता झाल्याबरोबर येथील कित्येक बुद्धिमान बळींनीं त्या घरकुंड्यांतील पोरीसोरींच्या लटक्यामुटक्या खेळाची बरीच दाणादाण केली. म्हणजे सांख्यमुनिसारिख्या विचारी सत्पुरुषांनीं ब्राह्मणांच्या वेदमंत्रजादूविधिप्रमाणें देव्हारा घुमवून गुरांढोरांचा वध करून ढवरे व पालेजत्रांच्या निमित्तानें गोमांस खाणाऱ्या, गर्विष्ट, दांभिक, मतलबी, आनाचारी, इत्यादि दुर्गुणांनीं भरलेल्या अशा ब्राह्मणांनीं केलेल्या एकंदर सर्व चेटकांनीं भरलेल्या ग्रंथांच्या मुखावर तेल काजळाचें माखाण करून बहुतेक ब्राम्हणांस शुद्धीवर आणून त्यांस आपले धर्मानुसारी केलें. परंतु त्यांतून कित्येक उरलेले कुतर्की ब्राह्मण करनाटकांत पळून गेल्यानंतर त्या लोकांमध्यें शंकराचार्य नामें करून एक तऱ्हेची तरकट विद्या जाणणारा महा पंडित उत्पन्न झाला. त्यानें आपल्या ब्राम्हणजातीच्या दुष्ट कर्मांची सर्व ठिकाणीं फजिती व निंदा होऊं लागली, व बुद्धधर्माचा प्रसार होत चालला, हें पाहून त्यास सहन होईना. त्यानें आपल्या लोकांचा उदारनिर्वाहाचा रोजगार ठीक चालेना ह्मणून ज्या दुष्ट कर्मावरून आपल्या वेदांसहित सर्व ग्रंथांचा बौध्य लोकांनीं धिःक्कार व पराभव केला होता, त्यापैकीं गौमांस खाणें व दारू पिणें मात्र बंद करून एकंदर आपल्या सर्व ग्रंथांत फेरफार करून त्या सर्वांस मजबुती येण्याकरितां एक नवीन नास्तिक मत उपस्थित केलें; त्यास हल्लीं वेदांत्त अथवा ज्ञानमार्ग म्हणतात. नंतर त्यानें शिवलिंगांची स्थापना करून या देशांत जे तूर्क येऊन राहिले होते त्यांस हिंदु लोकांतील क्षत्रिय लोकांत सरते करून घेऊन त्यांच्या मदतीनें, मुसलमान लोकांप्रमाणें तरवारीनें, बुद्ध लोकांचा पराभव करून पुनः त्यानें त्या आपल्या उरलेल्या जादूमंत्रविद्येचें आणि भागवतातील भाकड दंतकथेचें वजन अज्ञानी शूद्रांच्या मनांवर बसविलें. या शंकराचार्याच्या धुमाळींत त्याच्या लोकांनीं कित्येक बुद्ध धर्मी लोकांस तेल्याच्या घाण्यांत पिळून मारिलें आणि त्यांचे बहुतेक उत्तम उत्तम ग्रंथ जाळून टाकिले. फक्त त्यांपैकीं अमरकोश मात्र त्यांनीं आपल्या उपयोगाकरितां ठेवून घेतला. पुढें जेव्हां त्या शकराचार्याचे दिवाभीत शिष्य आराध्यासारखे दिवसा मशाली पेटवून पालखींत बसून चहूंकडे विठ्ठल सुवासिनीसारिखे सोंवळेचाव करून नाचत फिरूं लागले, तेव्हां मुकुंदराज, ज्ञानेश्वर वगैरे रामदासासारिखे अनेक 'पायलीचे पंधरा आणि आधोलीचे सोळा' ब्राह्मण ग्रंथकार होऊन व्यर्थ वायां गेले. परंतु त्यातून एकानेंही आपण शूद्रांच्या गळ्यांतील दास्यत्वाच्या पट्ट्याला बोटसुद्धां लावून दाखविलें नाहीं. कारण त्यांस त्यांच्या एकंदर सर्व उरलेल्या दुष्ट कर्मांचा उघड रीतीनें त्याग करण्याचें धैर्य होईना. सबब त्या सर्व दुष्ट कर्मांस कर्ममार्ग आणि नास्तिक

मतास ज्ञानमार्ग असे निरनिराळे दोन भेद करून त्यांविषयीं त्यांनीं अनेक भारेचे भारे पोकळ प्राकृत ग्रंथ करून आपल्या मतलबी जातीस, अज्ञानी शूद्रांस लुटून खाऊं दिलें. परंतु पुढें जेव्हां नित्यशः रात्रीं जी नाहीं तीं लाजीरवाणीं दुष्टकर्मे आचरून लागलीच दुसरे दिवशीं फक्त आपल्या उत्पन्नकर्त्यास मात्र भजणाऱ्या मुसलमानाचें, सव्वा प्रहर दिवस येईपावेतों, तोंड न पहावें म्हणून सोवळें पाळणाऱ्या विटाळशा रावबाजीच्या मजलशीच्या अखेरीस आदिभैरव रागाच्या आरंभीं एकंदर सर्व ब्राह्मणांच्या तुणतुण्याची तार तुटून, इंग्रज बाहदराचा बाहुटा चहूंकडे फडकूं लागला, तेव्हां बहुतेक त्या बळीराजाचे मतानुयायी अमेरिकन व स्काच उपदेशकांनीं त्या त्या सरकारची काडीमात्र परवा न करितां या देशांत येऊन त्यानें एकंदर जो सत्य उपदेश केला होता, त्या सर्वांचा एकंदर सर्व कृत्रिमि दुष्ट ब्राह्मणांस आधार दाखवून त्यांनीं कित्येक शूद्रांस ब्राम्हणांच्या कपटरूप दास्यापासून मुक्त करून शूद्रांच्या गळ्यांतील दास्यत्वाचा पट्टा तोडून ब्राह्मणांच्या ग्रंथाच्या तोंडावर फेंकून दिला. तेव्हां बहुतेक ब्राम्हण आपल्या मनांत खोंचून खास समजले कीं, आतां मात्र हे उपदेशक आपला कृत्रिमी धनीपणा बाकीच्या शूद्रांवर बिलकूल राहूं देणार नाहींत. या भयास्तव बळीराजाचे मतानुयायी उपदेशकांची आणि अज्ञानी शूद्रांची निवळ गांठ पडून त्या उभयतांच्या पुरत्या ओळखी होण्याच्या पूर्वी बहुतेक भटब्राम्हणांनीं बळीराजाचे मतानुयायी उपदेशकांसहित इंग्रज सरकारास मुळींच या देशांतून हांकून द्यावें म्हणून नाना तऱ्हेच्या कल्पना काढून कित्येकांनीं आपल्या पिढिजाद ठकविद्येच्या हिमायतीनें अज्ञानी शूद्रांस उपदेश करून त्यांच्या मनांत इंग्रज सरकारचा द्वेष भरविण्याचा झपाटा चालविला[1] आणि बाकी उरलेल्या भटांतून कोणी कारकूनी, कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे नाना प्रकारचे धंदे पतकरून एकंदर सर्व खात्यांत भट पडले नाहींत असें एकसुद्धां सरकारी अथवा घरगुती खातें सांपडत नाहीं.

## भाग ११ वा

**पुराण सांगणें, बंडें वगैरे परिणाम, शूद्र संस्थानिक, कुळकर्णी, सरस्वतीची प्रार्थना, जप, अनुष्ठानें, देवस्थानें, दक्षिणा. मोठ्या आडनांवांच्या सभा इत्यादिकांविषयीं.**

धों०—काय ! या अधर्मि भटगारुड्यांच्या दंगेखोर मूळ पूर्वजांनीं या देशांत येऊन येथील आपल्या मूळ पूर्वजांचा मोड करून त्यांस आपले दास केल्यानंतर त्यांनीं आपल्या मनगटाचा प्रजापती करून आपला दंगेखोरीचा धर्म बराच गाजविला. त्यामध्यें त्यांनीं मोठा पुरुषार्थ केला असें माझ्यानें म्हणवत नाहीं. परंतु जर कदाचित्

१. उमाजी रामोशी व नाना

आपल्या पूर्वजांनीं भटांच्या पूर्वजांचा मोड केला असता तर त्या आपल्या पूर्वजांनीं आपल्या मनगटाचें लिंग करून भटांच्या पूर्वजांस आपले दास करण्यास कमी केलें असतें काय ? असो, पुढें जेव्हां भटांनीं त्या आपल्या पूर्वजांच्या दांडगाव्यास, संधी साधून मध्येंच, ईश्वरदत्त धर्माचें रूपक देऊन त्या कृत्रीमी धर्माच्या आडून कित्येक भटांनीं एकंदर सर्व अज्ञानी शूद्रांच्या मनांत आमच्या दयाळू इंग्रज सरकारचा द्वेष भरविण्याची कल्पना काढिली, ती कोणती ?

जो०—कित्येक भटांनीं चव्हाठ्यांतील मारुतीसारख्या महावीरांच्या देउळीं रात्रीं बसून मोठा धार्मिकपणाचा डौल घालून वरकांती ज्ञान सांगण्याचा भाव दाखवून आंतून भागवतासारख्या ग्रंथांतील खोट्यानाट्या गोष्टींचीं पुराणें अज्ञानी शूद्रांस सांगून त्यांचीं मनें भ्रष्ट करून त्यांनीं त्या बळीच्या मतानुयायी लोकांच्या वाऱ्यासदेखील उभे राहूं नये म्हणून उपदेश करून उगीच तरी बसले ? नाहीं. पण त्यांनीं संधी साधल्याबरोबर त्याच ग्रंथांतील भाकड दंतकथा सांगून एकंदर सर्व अज्ञानी लोकाच्या मनांत इंग्रजी राज्याचा द्वेष भरवून त्यांनीं या देशांत मोठमोठालीं बंडें उपस्थित केलीं नाहींत काय ?

धों०—होय, कारण आजपावेतों जीं जीं कांहीं मोठमोठालीं बंडें झालीं, त्यांमध्यें आंतून किंवा बाहेरून मुख्य अग्रसर भटजी नाहींत असें बंडच सांपडत नाहीं. पहा–उमाजी रामोशाच्या बंडांत काळ्या पाण्याची शिक्षा झालेला धोंडोपंत सांपडतो—त्याचप्रमाणें कालच्या थोरल्या चपाती गूढ बंडांत परदेशी भटपांडे, कोंकण्या नाना, तात्या टोप्या वगैरे अनेकदेशस्थ भटजी सांपडतात.

जो०—परंतु त्याचप्रमाणें शूद्र संस्थानिक शिंदे, होळकर हे नानाचे कांहीं अंशीं चाकरीच्या संबंधानें नातेवाईक असतां, त्यांनीं त्या बंडखोराची काडीमात्र पर्वा न करितां तसल्या संकटकाळीं आमच्या इंग्रज सरकारास किती मदत केली, हेंही पहा ! असो. तें भटांनीं उपस्थित केलेलें बंड मोडण्याकरितां आमच्या सरकारास कर्ज झालें असेल खरें, व तें कर्ज आदा होण्याच्या भरीस प्रथम पर्वतीसारिखीं निरर्थक संस्थानें न घालतां आमच्या सरकारानें नवीन कर कोणावर बसविला ? अपराधी, निरपराधी रयतेची आवडनिवड न करितां एकंदर सर्व रयतेवर बसविला, हें बरें केलें; परंतु तो कर या बापुड्या अज्ञानी शूद्रावर मुकरर करण्याचें काम आमच्या अति शहाण्या सरकारानें कोणाकडे सोंपिलें ? शूद्र संस्थानिकांनीं आपल्या जातीच्या नानास यथाकाळीं मदत केली नाहीं, सबब आंतल्या आंत तरफडून त्यास शिमग्यांतील संस्कारासहित आशिर्वाद देणाऱ्या. त्रिकाळ स्नान करून शुद्ध होणाऱ्या, द्रव्य-चुकलों, ब्रह्मनिष्ठ भटजी कुळकर्ण्याकडेस सोंपिलें. अरे, या कर्मनष्ट ग्रामराक्षसांकडे त्या मूळ ब्रह्मराक्षसानें सरकारी दप्तराचें काम सोंपल्या दिवसापासून त्यांनीं शूद्रांचा पिच्छाच सोडला नाहीं. तथापि मध्यें एकदां मुसलमान राजांनीं सर्व गांवच्या पशुपक्षांचे गळे सुरीनें कापून त्यांस हलाल करण्याचें काम आपल्या जातीच्या मुलान्याकडेस सोंपिलें, या पटाईत भटजींनीं लेखणीनें शूद्रांचे गळे कापण्यांत मुलान्यास

मागें हटविलें. यास्तव सर्व लोकांनीं सरकारची वाट न पाहतां या ग्रामराक्षसांस "कलम-कसाई" अशी पदवी दिलेली अद्याप चालू असून आपलें शहाणें सरकार, त्यांच्या इतर सर्व कामगारांसारख्या बदल्या न करितां त्यांच्या फक्त संमती घेऊन अज्ञानी लोकांवर कर मुकरर केल्याबद्दल नोटिशी तयार करून पुढें त्याच कुळकर्ण्यांस सर्व लोकांच्या घरोघर जाऊन त्यांच्या भेटी घेऊन नोटिशी वांटण्याचें काम सोंपतें. नंतर त्या नोटिशी पोंहचवून भेट घेणाऱ्या कुळकर्ण्यांच्या फक्त संमती घेऊन सरकार त्यांपैकीं कित्येक नोटिशी रद्द करून अज्ञानी लोकांचा कर बहाल करतें. याला म्हणावें तरी काय !

धों०—असें करण्यापासून कुळकर्ण्यांस कांहीं फायदा होत असेल काय ?

जो०—त्यापासून कुळकर्ण्यांस कांहीं फायदा होतो किंवा नाहीं हें त्यांचें मन जाणे; परंतु त्यांस जरी एकाद्या आडदांड खपाट्यापासून कांहीं फायदा होत नसेल; तथापि ते त्यास अशा नोटिशी देऊन त्यांची निदान आठ चार दिवसांची खोटी करून त्याची हेलपाट्याखालीं चांगली खोड मोडून त्याजवर आपला चेक बसवून तसल्या कामांत कवडीरेवडीला हात न लावतां बाकीचीं सर्व कामें त्यांनीं शुद्ध बगळ्याच्या परी लक्ष लावून इतक्या निष्ठेनें केली कीं, एकंदर सर्व अक्षरशून्य आबालवृद्धांनीं शंकराचार्या-सारखी लक्ष्मीची अशी स्तुति केली कीं "हे आमच्या सरकारी सरस्वतीबाई, तूं आपल्या कायद्यावरून, अडवून लांच खाणारास व त्याचप्रमाणें लाचार झाल्यामुळें लांच देणारास सारखी शिक्षा देतेस यास्तव तूं धन्य आहेस." तेव्हां तिनें प्रसंन्न होऊन कांहीं कुळकरण्यांच्या घरांवर मात्र सतत कित्येक रात्रीं सुर्ती रुपयांची वृष्टी पाडली, म्हणून लोकांत फार गवगवा उठला होता. मग हें खरें असल्यास त्याचा तपास काढून अशा पुण्यशील कुळकर्ण्यांस पालख्या न मिळाल्यास भलत्या एकाद्या वारूवर बसवून त्यास रस्तोरस्तीं मिरविण्याचें काम आपल्या सरकारचें होय.

धों०—अहो, भटांनीं निर्माण केलेल्या चेष्टा मागेंच चार बुद्धिमान गृहस्थांनीं कैद करून त्या बळीराजाच्या सेनापतीच्या पाहऱ्यांत दिल्या असून, त्या आतांशीं त्या पहारेकऱ्यांच्या नजरा चुकवून अशा कलमकसायांस प्रसन्न होऊं लागल्या. म्हणूनच आतांच्या कित्येक भटांनीं शूद्रांच्या श्रमरूप पट्टीद्रव्यापासून मोठमोठाले विद्वान होऊन त्याविषयीं शूद्रांचें काडीमात्र उतराई न होतां, त्यांनीं दोन दिवस पाहिजेल तशा मनमौजा मारून अखेरीस मोठा स्नानसंध्येशीलपणाचा डौल घालून आपली वेदमंत्र–जादूविद्या खरी आहे, असें एकंदर सर्व अज्ञानी शूद्रांच्या मनावर वजन बसवून, त्यांनीं आपल्या नादीं लागावें म्हणून त्यांनीं शादावलाच्या मागच्या अथवा पुढच्या लिंग्रापुढें, आम्हीं आपसांत वर्गण्या करून मजूर भटांकडून जप, अनुष्ठान करविल्यामुळें यंदा पाऊस फार पडला, व महामारीचा उपद्रव फार कमी झाला, असें त्यांनीं शेवटल्या दिवशीं गाड्यावर भाताचे बळी काढून सर्व प्रकारच्या अज्ञानी लोकांस लेणकड्या थापा देऊन, मोठाल्या यात्रा भरवून, त्यांमध्यें प्रथम आपल्या जातीच्या ऐदी भटांस मात्र यथासांग भोजनें

देऊन त्यांतून उरलेलें अन्न बाकी सर्व प्रकारच्या अज्ञानी शूद्रांच्या पंक्ती पाडून त्यांतून कोणास निस्ता मुठभर भातच, कोणास निस्तें वरणच आणि पुष्कळांस निसत्या शिमग्याच्या पोळयाच वाढून त्या सर्वांस तृप्त केल्यानंतर त्यांतून कित्येक भटांनीं त्या अज्ञानी लोकांच्या मनावर आपल्या वेदमंत्रजादूचें वजन बसावें, म्हणून उपदेश करण्याचे झगडे चालविले आहेत खरे; परंतु ते अशा प्रसंगीं इंग्रज लोकास प्रसाद घेण्याकरितां अमंत्रण कां करीत नाहींत ?

जो०—अरे, अशा होल्याकोल्ह्यांनीं अशीं चार भाताचीं शितें टाकून यू-यू करुन जमविलेल्या भटांनीं जरी दह्लोगणती रुद्र करून भों-भों केलें; तथापि त्यांच्यानें आपल्या इंग्रज बहादरास प्रसाद देववेल काय ?

धों०—पुरे करा, "तट्टूकु टुमणी और तेजीकू इशारा बस है." यापेक्षां अधिक सूचना करण्याची गरज नाहीं. एकदां "दुधानें पोळलेली ताक फुंकून खात असते" या म्हणीप्रमाणें.

जो०—बरें, तुझी मर्जी, तसें कां होईना; परंतु आतांचे सुधारलेले भट आपल्या जादूमंत्रविद्येस व तत्संबंधी जपअनुष्ठानास पाहिजेलतितकी कलई देऊन एकंदर सव गल्लीकुचींनीं कां भोंकत फिरेनात—त्यांत कोणाचें कांहीं कमी होत नाहीं; परंतु तसल्या लोकांतील आपल्या धन्याच्या कुळास सातारच्या गडावर कैद करून ठेवणाऱ्या निमक हरामी बाजीसारख्या पाऊणेआठ भटराजांनीं, रात्रंदिवस शेतीं खपणाऱ्या अज्ञानी शूद्रांच्या श्रमाचा पैसा घेऊन ढंमढेऱ्यासारख्या पहिल्या प्रतीच्या जाहामर्द भट-सरदारांस सरंजाम करून दिलेल्या सनूदांतील कारणें पाहून फर्स्ट सॉर्ट टरक्कांडसाहेबा-सारिख्या पवित्र इनाम कमिशनराच्या आंगासदेखील आनंदाचे शहारे उभे राहिले, मग तेथें इतरांचा काय पाड ? त्यांनीं पर्वतीसारखीं अनेक संस्थानें स्थापून त्यांमध्यें इतर सर्व जातींच्या आंधळ्या, पांगळ्या, रांडामुंडांची व त्यांच्या पोरक्या अज्ञानी अर्भकांची काडीमात्र परवा न करितां, फक्त आपल्या जातीच्या धष्टपुष्ट आळशी भटांस दररोज नाना तऱ्हेचीं मिष्टान्न भोजनें घालण्याची वहिवाट घातली. त्याचप्रमाणें त्यांच्या मतलबी ग्रंथांचें अध्यायन करणाऱ्या भटांस यथासांग वार्षिक दक्षिणा देण्याची वहिवाट घातली. हीं सर्व त्यांनीं उपस्थित केलेलीं कृत्रिमें हा काळपावेतों आपल्या सरकारानें तशींच कायम ठेविलीं आहेत. हा त्यांनीं आपल्या शहाणपणाला आणि राजनीतीला मोठा बट्टा लावून घेतला, म्हणून म्हणण्यास कांहीं हरकत आहे काय ! वर लिहिलेल्या पोकळ खर्चांपासून भटांखेरीज बाकीच्या सर्व लोकांस काडीमात्र फायदा न होतां, हे फुकटचें खाऊन माजलेले हे कृतघ्न पोळ, उलटे आपल्या अज्ञानी शूद्र दात्यांस चेटकी धर्माच्या बापीनें आपले पाय धुवून त्याचें पाणी मात्र त्यांस पाजितात. अरे, या कर्मनिष्ठ भटांच्या पूर्वजांनीं त्यांच्या धर्मशास्त्रांस आणि मनुसंहितेंतील कित्येक वाक्यांस हरताळ लावून अशीं नष्ट कर्में कशीं केलीं ? आतां तरी त्यांनीं शुद्धीवर येऊन या कामीं आपल्या

मोठ्या सरकारचें कांहीं न ऐकतां, पर्वती वगैरे संस्थानांवरच्या शूद्रांच्या घामाच्या पोळया कोणी भटांनीं खाऊं नयेत, म्हणून एक मोठी लठ्ठ सार्वजनिक भटसभा स्थापून तिच्या साह्यानें याविषयीं बंदोबस्त केल्याबरोबर त्यांच्या ग्रंथांचें कांहीं ना कांहीं तरी पुनर्विवाहउत्तेजकमंडळीवर वजन पडेल; परंतु त्यांनीं अशा मोठमोठ्या आडनांवाच्या सभा काढून त्यांमध्यें आपल्या डोळयांतील मुसळ काढण्याचें काम एकीकडेस ठेवून सरकारच्या डोळ्यांतील कुसळ अज्ञानी जनास दाखवून तें काढण्याविषयीं त्यांस भरीस घालूं नये. "लंगडी ती लंगडी आणि गांवखुरींही चरेना" याला म्हणावें तरी काय ? त्यांनीं आतां आमच्या अज्ञानानें गांजलेल्या सर्व शूद्रांस त्या बळीराजाच्या पवित्र आधारावरून त्यांच्या कृत्रिमी खोट्या दास्यत्वापासून मुक्त करणाऱ्या अमेरिकन, स्कॉच आणि इंग्लिश बांधवांस कडकडून भेटेतोंपर्यंत मध्येंच कांहीं धांदल करण्याच्या भरीस पडूं नये. आतां पुरे झाल्या त्यांच्या खटपटी; आतां धिक्कार असो त्यांच्या चपातींतील आणि वरणभातांतील गूढास.

## भाग १२ वा

**वतनदार भट कुळकर्णी, युरोपिअन लोकांचे वसाहतीची जरूरी, विद्याखात्याच्या तोंडावर काळोखाचा डाग, युरोपिअन कामगारांची अक्कल गुंग कशी होते, इत्यादिकांविषयीं.**

धों०—असो, परंतु आपण पूर्वीं म्हणालां कीं, बाकी एकंदर सर्व खात्यांत भट पडले नाहींत असें एकसुद्धां सरकारी अथवा घरगुती खातें सांपडत नाहीं. तर या सर्वांमध्यें मुख्य भटजी कोण ?

जो०—वतनदार भट कुळकर्णी होत. ह्यांच्या कपटाविषयीं बहुतेक दयाळू युरोपियन कलेक्टरांस अज्ञानी शूद्रांची दया येऊन त्यांनीं सरकारास रिपोर्टामागें रिपोर्ट करून एकंदर सर्व कायद्यांमध्यें कुळकर्ण्यास बंदोबंदीं खिळून, त्यांस नानाप्रकारचे कोलदांडे घालून, त्यांच्या तोंडास मजबूत मुस्कीं घातलीं आहेत. तथापि या कलमकसायांचें त्यांच्या मतलबी धर्माच्या संबंधानें अज्ञानी शूद्रांवर वजन असल्यामुळें हे सैतानासारिखे आपल्या धर्माच्या आडून उघड चावडींतील भर कचेरींत बसून त्या बळीच्या मतांची निंदा करून अज्ञानी शूद्रांचीं मनें भ्रष्ट करीत नाहींत काय ? असें जर नाहीं म्हणावें, तर शूद्रांस मुळींच वाचतां आणि लिहितां येत नाहीं, तर मग ते कशावरून अथवा कोणापासून त्या मतांचा इतका द्वेष करण्यास शिकले ? याविषयीं तुला कांहीं दुसरीं कारणें ठाऊक असल्यास कळूं दे. इतकेंच नव्हे, परंतु संधी पाहून त्याच चावडींत बसून सरकारी कायद्यांतील भलतें एखादें कलम घेऊन त्यावर नाना तऱ्हेचे कारतुसी कुतर्क घेऊन शूद्रांनीं सरकारचा

द्वेष करावा म्हणून त्यांस चोरून धडे देत नसतील काय? व त्यांपैकीं एक काना अथवा मात्रा शूद्र आपल्या डोळस सरकारच्या कानांवर घालण्यास थरथरां कापत[१] नसतील काय? कारण एकंदर सर्व वरच्या कचेऱ्यांतील भटकामगार त्यांचे जातवाले पडले. यास्तव आतां तरी आपल्या सरकारानें शुद्धीवर येऊन प्रथम हरएक खेड्यांनीं निदान एक एक तरी इंग्लिश अथवा स्कॉच गृहस्थास, त्यांच्या निर्वाहपुरतीं गतकुळी शेतें इनाम देऊन, त्यावर उपदेशकांचें काम सोंपून त्यांनीं फक्त त्या त्या गांवच्या एकंदर सर्व कच्चा हकीकतीविषयीं निदान वर्षातून एकतरी रिपोर्ट सरकारास करीत जावा, असा कायदा करून बंदोबस्त केल्यास पुढें एखाद्या काळीं नानासारख्या भटास पुनः एखादें बंड उपस्थित करण्याची जरुरी पडल्यास त्यानें एखाद्या पिराच्या पुढच्या लिंगाची यात्रा जमवून तींत सारभाताच्या ऐवजीं तयार केलेल्या गूढ चपात्या एकंदर सर्व गांवोगावीं नेमलेल्या वेळीं एकदम पोंहचवून तो प्रसाद अज्ञानी शूद्रांकडून आपल्या सरकारास पासलें पाडून त्यांच्या मुखांत घालण्याच्या कामीं, हा वतनदार कुळकर्ण्यांचा एकोपा बिलकूल उपयोगी पडणार नाहीं. आणि तसें केल्याशिवाय एकंदर सर्व अज्ञानी शूद्रांचे पाय थारींच लागणार नाहींत, इतकेंच नव्हे, परंतु जेव्हां ते युरोपियन उपदेशक एकंदर सर्व शूद्रांस खरें ज्ञान सांगून त्यांचे डोळे उघडतील, तेव्हां ते या ग्रामराक्षसांच्या वाऱ्यासदेखील उभे राहाणार नाहींत. दुसरें असें कीं, सरकारनें पाटीलकीसहित कुळकर्ण्यांचे कामाची परीक्षा घेऊन, तें काम एकाच जातीकडे सोपवूं नये, म्हणजे पलटणीसारखा या कामीं कांहीं आयास न पडतां एकदम बंदोबस्त होऊन सर्व लोकांस विद्या शिकण्याची गोडी सहजासहज लागेल. पाहिजे असल्यास आमच्या दयाळू सरकारानें विद्याखात्याकडील पोकळ खर्च एकदम बंद करून तो सर्व पैसा कलेक्टरखात्यांत जमा करून दर एक युरोपियन कलेक्टराकडून जॉरविससाहेबासारिखा, पक्षपात न करतां सर्व जातींच्या लोकांतील हुशार मुलांतून कांहीं मुलें निवडून काढून त्यांस फक्त जाडेंभरडें अन्नवस्त्र पुरवून त्यांच्याकरितां दरएक कलेक्टराच्या बंगल्याशेजारीं शाळा घालून त्यांची पाटील, कुळकर्णी, आणि पंतोजीच्या कामांत परीक्षा घेऊन त्यांस तीं कामें सोंपूं लागल्याबरोबर एकंदर सर्व कुळकरण्यांच्या जुटास, बदमास नानासारिख्या भटांच्या उपयोगीं न पडतां, ते अज्ञानी शूद्रांचीं वतनें फसवून घेत असल्यास व त्या लोकांत नाना तऱ्हेचे तंटे उपस्थित करीत असल्यास त्यांस तसें करण्याची फुरसतच सांपडणार नाहीं. आजपावेतों लक्षावधी रुपये विद्याखात्याकडे जरी खर्ची पडले, तथापि त्यांपासून शूद्रांच्या समाजाच्या मानाप्रमाणें त्यांच्यांत विद्वान लोकांचा भरणा वाढला नाहीं, इतकेंच नव्हे, महार, मांग, आणि चांभार यांपैकीं कोणी एक-एक शिकलेला कामगार आढळत नाहीं. मग तेथें एम्. ए. अथवा बि. ए. औषधास मिळण्याची मारामार. अरेरे! या आपल्या सरकारच्या

---

१. Chapter IV, The Sepoy Revolt by Henry Mead.

येवढ्या दिगंबर विद्याखात्याच्या गोऱ्या तोंडावर या काळ्या तोंडाच्या भटपंतोजींनीं हा केवढा काळोखाचा डाग लाविला? अरे हीं, "कडुकारलीं" आमच्या सरकारानें इतकीं तुपांत तळून साखरेंत घोळून मळलीं, तथापि त्यांनीं आपला जातिस्वभाव न सोडितां तीं अखेरीस कडूचीं कडूच राहिलीं.

धों०--बरें, हे कुळकर्णी अज्ञानी शूद्रांचीं वतनें कशीं फसवून घेत असतील?

जो०--ज्या शूद्रांस मुळींच वाचितां आणि लिहितां येत नाहीं, अशांस कित्येक कुळकर्णी गांठून त्यांचे आपण सावकार होऊन त्यांजपासून जेव्हां गहाणखतें वगैरे दस्तऐवज लिहून घेतात, त्यावेळीं ते आपल्या जातीचे लेखक मिलाफी करून त्यांत एक तऱ्हेच्या शर्ती लिहून आणि त्या अज्ञानी शूद्रांस भलतेंच कांहींतरी वाचून दाखवून त्यांचे हात लेखणीस लावून खतें पुरीं करून पुढें कांहीं दिवसांनीं या कपटानें लिहिलेल्या शर्तीप्रमाणें त्यांचीं वतनें घशांत टाकून ढेकर देत नसतील काय?

धों०--बरें, हे जात कलमकसाई, अज्ञानी शूद्रांत कोणते प्रकारचे तंटे उपस्थित करीत असतील?

जो०—शेतें, बांध वगैरेसंबंधीं—पोळा आणि शिराळशेट यांच्या डावीउजवी संबंधीं—आणि होळीची पोळी आधीं लावण्यासंबंधीं सर्व तंटे अज्ञानी शूद्रांत उपस्थित करण्याच्या आरंभीं भट कुळकर्णी नाहींत, असे कांहीं तंटे तूं दाखवूं शकशील काय?

धों०—बरें, असे तंटे उपस्थित करण्यापासून या कसायांच्या पदरांत काय पडत असेल!

जो०—अरे, कित्येक घरंदाज अज्ञानी शूद्रांचीं घराणीं ईर्षेस पेटून एकमेकांशीं लढत असतां, आंतून या कलमकसायांसहित दुसऱ्या भटकामगारांचीं घरें शेकारतां शेकारतां धुळीस मिळाले नसतील काय? अरे, या कसायांच्या नारदशाईमुळें मुलकी फौजदारी आणि दिवाणी खात्यांत आतोनात खर्च फुगून त्यांतील बहुतेक कारकून मामलेदारांसहित चिटणिसांनीं आपल्या ऐन "**तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्**" या अस्सल बीजमंत्रास हरताळ लावून त्याबद्दल त्यांनीं "चिरी मिरी देव, चिरी मिरी देव" या यवनी गायत्रीचा उपदेश त्या पवित्र भटमुल्लापासून घेतल्यामुळें भटवकीलांची दलाली वाढून ते मोठमोठ्या चारटांत बसून पोळाखारिख डुरक्या फोडीत फिरतात का नाहीं? याखेरीज मुनसफ नबाबांचे सरंजाम किती वाढले आहेत, याची वेरीज दे. इतकाही बंदोबस्त असून गरीब लोकांस न्याय तरी स्वस्ता पडून वेळेस तरी मिळतो काय? यामुळें एकंदर सर्व खेड्यापाड्यांनींसुद्धां एक जगप्रसिद्ध म्हण पडली आहे. ती अशीं कीं, सर्व खात्यांत ब्राह्मण कामगारांच्या हातांवर अमुक तमुक केल्याशिवाय ते आपल्या गरिबांच्या कामास हातच लावीत नाहींत. "त्यांच्या डोमल्यावर घालायास कांहीं तरी बरोबर घ्या, तेव्हां बाहेर निघा."

धों०—असें होत असल्यास खेड्यांतील शूद्रलोक युरोपियन कलेक्टरांच्या एकांतीं गांठी घेऊन त्यांस आपलीं गाऱ्हाणीं कां सांगत नाहींत?

जो०—अरे, ज्यांस ओंची गांड कशी फोडावी हें मुळींच ठाऊक नाहीं तर तसल्या मेकड भाउल्यांस अशा थोर कामगारांसमोर उभे राहून त्यांस आपलीं गाऱ्हाणीं आणि तीं शिस्तवार सांगण्याची केवढी पंचाईत ? तशांतून एकाद्या लंगोट्या बाहदरानें छातीचा कोट करून एकाद्या बुटलेराच्या मदतीनें युरोपियन कलेक्टरास एकांतीं गांठून त्याच्यासमोर उभे राहून "माझी दाद लागत नाहीं" इतके चार शब्द बोलल्याची या कलमकसायांस बातमी लागली कीं पुरे, मग त्या दुर्दैव्याचें नशीबच फुटलें म्हणून समजलें पाहिजे. कारण ते कलेक्टराच्या कचेरींतील आपल्या जातीच्या भटचिटणिसांपासून तों रेव्हिन्यूच्या अथवा जज्जाच्या सर्व भटकामगारांपावेतों आंतल्या आंत त्या यवनी गायत्रीची वर्दी फिरवून लागलीच अर्धे कलमकसाई नाना तऱ्हेच्या दाखल्यांसहित पुरावे घेऊन वादीचे साक्षीदार आणि अर्धे कसाई वादीविरुद्ध नाना तऱ्हेच्या दाखल्यांसहित पुरावे घेऊन प्रतिवादीचे साक्षीदार होऊन, त्यांच्या तंट्यांत इतका गोंधळ करून टाकितात कीं, त्यांत सत्य काय आणि असत्य काय, हें निवडून काढण्याकरितां मोठमोठे विद्वान युरोपियन कलेक्टर आणि जज्ज आपली सर्व अक्कल खर्च करितात, तथापि त्यांस त्यांतील कधीं कधीं काडीमात्र गुह्य न कळतां ते उलटे त्या गाऱ्हाणें केलेल्या लंगोट्यांसच "तूं मोठा तरकटी आहेस" असें अखेरीस सांगून त्याच्या हातांत नारळाची आई देऊन त्यांस शिमगा करण्याकरितां त्याचे घरीं पाठवीत नसतील काय ? शेवटीं ह्या सर्व भटकामगारांच्या अशा कसबामुळें कित्येक लंगोट्यांनीं आपली या सरकारांत दादच लागत नाहीं, सबब आपले प्राणघात करून घेतले नसतील काय ! कित्येकांनीं दरवडेखोरांचे धंदे करून आपल्या जिवांस मुकले नसतील काय ? कित्येकांनीं आपल्या मनांत अतिशय संताप करून घेतल्यामुळें वेडे झाले नसतील काय ? आणि कित्येकांनीं आपल्या दाढ्या वाढवून अर्धवेड्यासारखे होऊन रस्त्यांत जो भेटेल त्यास आपलीं गाऱ्हाणीं सांगत फिरत नसतील काय ?

# भाग १३ वा

## मामलेदार, कलेक्टर, रेव्हिन्यु, जज्ज, आणि इंजिनियरखात्यांतील भट कामगार, इत्यादिकांविषयीं

**धों०**— यावरून भट मामलेदार असल्यामुळें ते कांहीं अज्ञानी शूद्रांचें नुकसान करितात काय ?

**जो०**—आजपर्यंत जे भट मामलेदार झाले त्यांपैकीं कित्येक आपल्या वाईट आचरणामुळें सरकारचे गुन्हेगार ठरून सजेस प्राप्त झाले. ते आपलें काम करीत असतां इतके कुनीतीनें वागत व गरीबगुरीब लोकांवर जुलूम करीत कीं, त्याचा एक ग्रंथ होईल. अरे, या पुण्यासारख्या शहरांत भटमामलेदार, कुळकर्ण्यांपासून आणलेली

लायकी दाखविल्याशिवाय मोठमोठ्या सावकारांचीदेखील हमी कबूल करीत नाहींत; मग तेथें गरीबगुरीबांची दाद कोठून लागणार! अरे, हे कुळकर्णी तें लायकी तिकीट देतांना आपला देव्हारा घुमवित नसतील काय? त्याचप्रमाणें या शहरची म्युनिसिपालिटी, कोणी एकाद्या घरवाल्यास त्याच्या जुन्या शेतखान्याच्या जाग्यावर नवा शेतखाना, भट मामलेदारांच्या द्वारें त्या पेठेच्या कुळकर्ण्याचा अभिप्राय पाहिल्याशिवाय बांधूं देत नाहीं. अरे, त्या कुळकर्ण्याजवळ त्याच्या पेठेचा नकाशा असून, ज्यांत एकंदर सर्व नवी खरेदी करणारांचीं नांवें सामील करून साल दरसाल त्याची प्रत मामलेदाराच्या दप्तरीं दाखल्याकरितां ठेवण्याची चाल नसून, कुळकर्ण्याचा त्या जाग्याविषयीं अभिप्राय खरा तरी कशावरून समजावा? या सर्व कारणांवरून असा संशय येतो कीं, भट मामलेदारानें आपल्या जातीच्या कलमकसायांचें कांहीं तरी त्यांत हीत व्हावें, म्हणून ही वहिवाट चालू ठेविली असावी. यावरून तूंच विचार करून पहा कीं, अशा युरोपियन लोकांच्या वस्तिशेजारच्या पुणें शहरांत भटमामलेदार जर अशी झोटिंगबादशाई करून आपल्या जातीच्या कलमकसायांची पोळी पिकवितात, तर खेड्यापाड्यांत त्यांचा काय जुलूम असेल बरें? असें जर नाहीं म्हणावें तर आपण बहुतेक खेड्यापाड्यांतील अज्ञानी शूद्रांच्या झुंडी बगलेंत दप्तरें मारून भटकामगारांच्या नांवानें हकल्या मारून भटकत फिरतांना पहातों, त्या सर्वच खोट्या असतील काय? त्यांतून कोणी ह्मणतो, भट कुळकर्ण्याच्या खटपटीमुळें भटमामलेदारानें माझी अर्जी वेळेस घेतलीच नाहीं, सबब प्रतिवादीनें माझे सर्व साक्षीदार फोडून उलटा मजजवळूनच फैल जामीन घेवविला. कोणी म्हणतो, भटमामलेदारानें माझी अर्जी घेऊन हा काळपावेतों दाबून ठेवून प्रतिवादीची मात्र अर्जी दुसरे दिवशीं घेऊन, त्याच्याकडून माझ्या चालत्या वहिवाटीस खो घालून मला असें भिकारी केलें. कोणी म्हणतो, भटमामलेदारानें मी बोलल्याप्रमाणें माझी जबानी लिहिलीच नाहीं आणि पुढें त्याच जबानीवरून माझ्या सर्व तंट्याचा असा गोंधळ करून टाकिला कीं, आतां मला वेड लागण्याची वेळ आली आहे. कोणी म्हणतो, माझ्या प्रतिवादीनें भटमामलेदाराच्या सूत्रानें माझ्या चालत्या वहिवाटीस लाथ मारून त्यानें माझे शेतांत आपल्या पाभारी घातल्याबरोबर मी त्या भटमामलेदाराकडे जाऊन त्यास मोठ्या नम्रतेनें जमिनीस हात लावून मुजरा केला, व त्याच्याशीं एक चकार शब्द न बोलतां फक्त त्याच्या हातांत माझी अर्जी देऊन मी तसाच चार पांच पाउलें हटून आपले दोन्ही हात जोडून त्याच्यासमोर दीन वदन करून थरथरां कांपत उभा राहिलों, इतक्यांत त्या यमानें माझ्याकडे खालवर पाहून लागलीच ती अर्जी माझ्या आंगावर फेंकून देऊन मी कोडताची बेअदबी केली अशा कारणांवरून उलटा त्यानें मलाच दंड केला. तो दंड मला देण्याची ऐपत नसल्यामुळें मला कांहीं दिवस कैदेंत रहावें लागलें. इकडेस प्रतिवादीनें माझें नांगरून डोंगरून वजीवलेलें शेत पेरून आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें म्यां कलेक्टरसाहेबास दोनतीन अर्ज्या केल्या; परंतु त्या

सर्व अर्ज्या तेथील भटचिटणिसानें कोणीकडेस दाबून टाकिल्या आहेत त्यांचा थांगच लागत नाहीं, याला करावें तरी काय? कोणी म्हणतो, भटचिटणिसानें माझा अर्ज कलेक्टरास वाचून दाखवितेवेळीं त्यांतील मुख्य मारू कलम गाळून त्याजकडून भटमामलेदारानें केलेला निकाल कायम करविला. कोणी म्हणतो, माझ्या अर्जावरून कलेक्टरानें आपल्या मुख जबानीनें लिहिण्यास सांगितलेल्या हुकुमाविरुद्ध तेथील भटचिटणिसानें मजकूर लिहून, वाचतांना मात्र कलेक्टरास त्याच्या सांगण्याप्रमाणें अक्षरशः वाचून दाखवून निकालावर त्याची सही घेऊन, तो निकाल जेव्हां मला मामलेदाराच्या मार्फत मिळाला, तेव्हां मी आपल्या कपाळावर हात मारून म्हणालों कीं, हे ब्राम्हणकामगार आपला पण सिद्धीस नेल्याशिवाय उगीच बसत नाहींत. कोणी म्हणतो, माझी जेव्हां कलेक्टरसाहेबांजवळ दाद लागेना, तेव्हां म्यां रेव्हिन्युसाहेबाकडे दोन तीन अर्ज पाठविले; परंतु ते सर्व माझे अर्ज तेथील भटकामगारांनीं खटपट करून त्या साहेबाकडून पुनः कलेक्टराच्याच अभिप्रायाकरितां परत पाठविले. नंतर कलेक्टराचे भट कामगारांनीं माझे सर्व कागद उलटेपालटे करून कलेक्टरसाहेबास वाचून दाखवून, मी मोठा तकरारी आहें म्हणून माझ्या अर्जाच्या पाठीवर त्याजकडून अभिप्राय देववून रेव्हिन्युसाहेबाची समजूत काढली. आतां येथें करणारानें करावें तरी काय! कोणी म्हणतो, जजसाहेबानें मात्र माझा खटला सुरू होतांच, त्याच्या शिरस्तेदारानें मध्यें कोठें तोंड घातल्याबरोबर तो साहेब म्हणाला, "चूप, मध्यें बोलूं नको." नंतर त्यानें माझे कागद स्वतः वाचून पाहिले; परंतु त्या कागदांला तो काय करील बापुडा! कारण पूर्वीच्या एकंदर सर्व कलेक्टर-कचेरींतील भटांनीं, कुळकर्ण्यांच्या सूचनेप्रमाणें माझ्या सर्व खटल्याचें स्वरूपच बदलून टाकिलें होतें. कोणी म्हणतो, आजपावेतों एकंदर सर्व भट कामगारांच्या देवपुजेच्या खोलींतील ठरावाप्रमाणें त्यांचीं घरें भरितां भरितां माझीं घरें गेलीं, दारें गेलीं, शेतें गेलीं, पोतीं गेलीं, आणि माझ्या घरांतील सर्व चीजवस्ता जाऊन बायकोच्या अंगावर फुटका मणीसुद्धां राहिला नाहीं. शेवटीं आम्ही सर्व तडाडा उपाशीं मरूं लागलों, तेव्हां माझ्या धाकट्या भावंडांनीं बिगाऱ्याचा धंदा पत्करून ते सडकेच्या कामावर टोपलीं वाहण्यास जाऊं लागले. तेथेंही सर्व भटजीसाहेब काडीच्या कामाला हात न लावितां, फक्त दररोज सकाळीं व संध्याकाळीं एकदां फैलावर जाऊन हजिरी घेतल्याबरोबर भलत्या एखाद्या मऱ्हाठी वर्तमानपत्रांतील इंग्रज सरकारची अथवा त्यांच्या धर्माची निंदा केली असेल, त्याचा गोषवारा जातां जातां बिगाऱ्यांस सांगून बिऱ्हाडीं परत जातात व त्याबद्दल सरकारही त्यास बिगाऱ्यापेक्षां ज्यास्ती दुपटीच्यावर पगार देत असून एकाद्या बिगाऱ्यानें पगार झाल्याबरोबर त्याची मुठ गार केली नाहीं कीं, लागलीच ते दुसऱ्या दिवसापासून आपल्या वरच्या साहेबास त्या बिगाऱ्याविषयीं नाना तऱ्हेच्या चाहड्या सांगून त्याचे खाडे मांडतात. इतकेंच नव्हे, परंतु कोणी भटजी त्यास म्हणतो, अरे, तूं सरकारी काम संभाळून पत्रावळीकरितां वडाचीं पानें व थोडेसें भेंड संध्याकाळीं घरीं येतांना माझ्या

बिऱ्हाडीं आणून टाक. कोणी म्हणतो, त्या आंब्याची फांदी तोडून रात्रीं माझ्या बिऱ्हाडीं आणून टाक. कोणी म्हणतो, तिरगुळाची नजर चुकवून मला थोडीशीं पानें आणून दे. कोणी म्हणतो, आज रात्रीं गांवांत मी त्या देवघेव करणाऱ्या बोडकीच्या घरीं फराळास जाणार आहें, यास्तव तूं आपली भाकर खाल्ल्याबरोबर माझे बिऱ्हाडीं येऊन माझ्या कुटुंबास सर्व रात्र सोबत देऊन तेथेंच निजून रहा, परंतु दुसरे दिवशीं फैलावर हजर रहाण्यास चुकूं नको, कारण उद्यां संध्याकाळींच थोरले इंजिनियरसाहेब आपलें काम पहाण्याकरितां येथें येणार आहेत म्हणून रावसाहेबांनीं लिहून पाठविलें आहे. असे नाना तऱ्हेचे भटांचे आंतले[१] त्रास मला माझे भाऊ घरीं गेल्याबरोबर सांगून खळाखळां डोळ्यांतून पाणी गाळतात. काय करूं हो दादा, हे सर्व भटजी अटरा वर्णांचे गुरु पडले, यांनीं कसेंही आचरण केलें, तथापि शूद्रानें त्याचा तोंडानें उच्चार करूं नये, असें आपलीं शास्त्रें बोंबलतात. माझा उपाय खुंटला. नाहीं तर म्या कधींच इंग्रजी बोलावयास शिकून एकंदर सर्व ब्राह्मणांच्या ठकबाजा साहेबलोकांस सांगून त्यांच्याकडून या गुलामांच्या खोडी मोडल्या असत्या. याखेरीज एकंदर सर्व इंजिनियर-खात्यांतील भटकामगारांच्या लुच्चेगिऱ्या कंत्राटदार लोक इतक्या सांगतात कीं, त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल, यास्तव तूर्त त्याविषयीं पुरें करितों, सारांश वर लिहिलेल्या गाऱ्हाण्यांपैकीं कांहीं खरें असल्यास त्याजविषयीं बारीक शोध ठेवून त्याचा बंदोबस्त करणें हा आमच्या सरकारचा धर्म होय.

# भाग १४ वा

**युरोपियन कामगारांचा निरुपाय, खोतांचें वर्चस्व, पेन्शन् घेऊन निर्वेध झालेल्या युरोपियन कामगारांनीं सरकारांत गांवोगांवच्या हकीगती कळविण्याची जरूरी, धर्म आणि जात्याभिमान इत्यादिकांविषयीं.**

धों०—असे जर अनर्थ एकंदर सर्व खात्यांत भटकामगारांचा भरणा असल्यामुळें घडून येत असतील, तर युरोपियन कलेक्टर काय करून असतात? ते या सर्व ब्राम्हणांच्या लुच्चेगिऱ्यांविषयीं सरकारास रिपोर्ट कां करीत नाहींत?

जो०—अरे, या भटकामगारांच्या कसबामुळें त्यांच्या टेबलावर इतकें काम सांचलें असतें कीं, त्यांपैकीं कित्येक जरूरीच्या कामाचा निकाल करून फक्त मराठी कागदांवर सह्या करितां करितां त्याच्या नाकास नळ येतात. त्या बिचाऱ्यांनीं या सर्व अनार्थांचा पक्का शोध काढून त्याविषयीं सरकारास रिपोर्ट तरी केव्हां करावे? इतकेंही असून मी असें ऐकतों कीं, कोंकणांतील बहुतेक दयाळू युरोपियन कलेक्टरांनीं अज्ञानी शूद्रांवरचें

---

१. याजविषयीं या पुस्तकाचे शेवटीं इंजिनियरखात्यावर जो पवाडा लिहिला तो पहा.

भट-खोतांचे जुलूम नाहींसे करावेत, म्हणून त्यांनीं अज्ञानी शूद्रांबद्दल स्वतः खोतभटजीचे प्रतिवादी होऊन ते सरकारांत त्याविषयीं खटपट सुरू करीत आहेत; इतक्यांत एकंदर सर्व भट-खोतांनीं अमेरिकन स्लेव्ह होल्डरचा कित्ता घेऊन आपल्या मतलबी धर्माच्या साह्यानें अज्ञानी शूद्रांस सरकारच्या उलट उपदेश केल्यामुळें, बहुतेक अज्ञानी शूद्रांनीं, उलट्या युरोपियन कलेक्टरांवर कंबरा बांधून सरकारास असें म्हणाले कीं, आम्हांवर जो खोतभटजींचा अधिकार आहे तो तसाच राहूं द्यावा, येथें मात्र खोतभटजींनीं सैतानासारिखें अज्ञानी शूद्रांस हातांत घेऊन आपल्या भोळ्या सरकारास अज्ञानी शूद्रांच्या मतरूप शहास गुंतवून, त्या परोपकारी युरोपियन कलेक्टरावर कशी प्यादेमात करण्याची वेळ आणली आहे, ती पहा.

**धों०**—असें जर अज्ञानी शूद्र, भटांच्या उपदेशावरून आपलें चहूंकडून नुकसान करून घेतात, तर यावरून पुढें एकाद्या काळीं त्यांनीं भटांचें ऐकून सरकारच्या टोपीवर धप्पा मारण्याकरितां आपले हात उचलल्याबरोबर त्यांचें केव्हढें नुकसान होणार आहे? कारण शूद्रांस भटांच्या दास्यत्वापासून मुक्त होण्याची अशी संधी पुनः येणें फारच कठीण. यास्तव शूद्रांच्या हातून असे अनर्थ घडून येऊं नयेत, म्हणून तुम्हांस कांहीं उपाय सुचत असल्यास, अज्ञानी शूद्रांस सांगून तर फळच नाहीं, परंतु आपल्या दयाळू सरकारास एकदां तरी कळवून पहा. याउपर शूद्रांच्या कंबख्तीनें डेरेच दिले असल्यास त्याला तुम्ही तरी काय कराल?

**जो०**—याला उपाय, आपल्या दयाळू सरकारनें प्रथम भट समाजांच्या संख्या-प्रमाणानें एकंदर सर्व खात्यांत भटकामगार नेमूं नयेत, असे माझें मत नाहीं. परंतु त्याच प्रमाणानें बाकी सर्व जातीचे कामगार नच मिळाल्यास सरकारनें त्याऐवजीं फक्त युरोपियन कामगार नेमावेत. म्हणजे एकंदर सर्व भटकामगारांस सरकारसहीत अज्ञानी शूद्रांचें इतकें नुकसान करतां येणार नाहीं. दुसरें असें कीं, सरकारानें फक्त ज्या ज्या युरोपियन कलेक्टरांस माहाराष्ट्र भाषा स्वच्छ बोलतां येत असेल, त्या सर्वांस तहातभर पेनशनी देऊन त्यांस येथेंच सर्व खेड्यापाड्यांतून अज्ञानी भेकड बाहूल्या शूद्रांत मिसळून रहाते करून, त्यांजकडून एकंदर सर्व भटकुळकर्णी वगैरे कामगारांच्या कसबांवर चांगली बारीक नजर ठेववावी आणि त्यांजकडून हमेशा तेथील एकंदर सर्व कच्च्या हकीगतीवर रिपोर्ट मागवूं लागल्याबरोबर, त्यापासून एकंदर सरकारी शाळाखात्यांतील भटांच्या गुलाबी लबाड्या उघडकीस येऊन थोड्याच दिवसांत एकंदर सर्व शाळाखात्यांतील जी कांहीं अव्यवस्था झाली आहे, तिचा बंदोबस्त होऊन एकंदर सर्व अज्ञानी गांजलेल्या शूद्रांस खरें ज्ञान झाल्याबरोबर ते या भटांच्या कुतर्की अधिकाराचा धिःकार करून आपल्या राणीसरकारचे उपकार कधीं कधीं विसरणार नाहींत अशी माझी प्रतिज्ञा आहे. कारण आम्हां शूद्रांच्या गळ्यांतील दास्यत्वाच्या पट्ट्याचा घट्टा जलदी कोणाच्यानें घांसून काढवणार नाहीं.

धों०—तर मग तुम्हीं लहानपणीं दांडपट्ट्याची आणि गोळी निशाण मारण्याची कसरत कशाकरितां करीत होतां ?

जो०—आपल्या दयाळू इंग्रजसरकारास पालथें घालण्याकरितां.

धों०—परंतु तुम्हीं असली दुष्ट मसलत कोठून शिकलां ?

जो०—चार सुधारल्या भट विद्वानांपासून. ते याचें कारण (परंतु घरांत चुलीजवळ) असें देतात कीं, आपल्यांतील बहुतेक जातीचे लोक आपल्या अनादिसिद्ध धर्माविषयीं अज्ञानी असल्यामुळें, आपले सर्व लोकांतील एकी नाहींशी झाली व त्याच्या योगानें आपल्यामध्यें असे नाना प्रकारचे जातिभेद होऊन आपली अशी फुटाफुट झाल्यामुळें इंग्रजांच्या हातीं आपलें राज्य लागलें व ते आतां आपल्या अज्ञानी धर्मभोळ्या लोकांतील बहुतेक लोकांचा देशाभिमान नाहींसा व्हावा म्हणून ते आपल्या मतलबी धर्माचा आधार त्यांस दाखवून त्यांस आपले गुरुबंधु करीत आहेत. यास्तव आपण सर्व जातीच्या लोकांची एकी झाल्याशिवाय या लोकांस आपल्या देशांतून एकदम हकून देण्याची आपल्यास ताकद येणार नाहीं. आणि तसें केल्याशिवाय आपण सर्व लोकांस आपल्या अनादिसिद्ध धर्मांत थोडासा फेरफार करून, आपली सर्वांची चांगली एकी केल्याशिवाय आपल्यास अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन लोकांची बरोबरी करितां येणार नाहीं, असें त्यांनीं मला टॉम्स पेन्स वगैरे ग्रंथकारांच्या पुस्तकांतील कित्येक वाक्यांच्या आधारानें सिद्ध करून दाखविलें. यावरून मी तसले वेडेचार कांहीं दिवस माझ्या लहाणपणीं करीत होतों; परंतु पुढें मी जेव्हां त्याच ग्रंथांवरून बारीक विचार करून पाहूं लागलों, तेव्हां या सुधारल्या भटांच्या मतलबी मसलतींचा खरा अर्थ माझ्या ध्यानांत आला. तो असा कीं, आम्ही सर्व शूद्र इंग्रज लोकांचे गुरुबंधु झाल्याबरोबर त्यांच्या एकंदर पूर्वजांच्या कृत्रिमी ग्रंथाचा धिक्कार करूं आणि तेणेंकरून त्यांच्या जात्याभिमानाच्या तोंडांत माती पडून त्यांच्यातील तूर्त प्रत्येक ऐदी लोकांस आम्हां शूद्रांच्या श्रमाच्या पोळ्या ऐत्या खावयास मिळणार नाहींत. व ब्रम्ह्याच्या बापाच्यानें-सुद्धा असें म्हणवणार नाहीं कीं, शूद्रापेक्षां भट उंच. अरे, ज्या लोकांच्या मूळ पूर्वजांसच देशाभिमान हा शब्द मुळींच ठाऊक नव्हता, मग त्या लोकांनीं त्या शब्दाचा असा अर्थ केला म्हणोन त्याचें फारसें आश्चर्य मानूं नये. कारण इंग्रज लोकांनीं मुळींच तो बळीराजा येण्यापूर्वी देशाभिमान ग्रीक लोकांच्या शाळेंत शिकले; परंतु पुढें जेव्हां ते त्या बळीचे मतानुयायी झाले, तेव्हां त्यांच्यामध्यें तो सद्गुण इतका वाढला कीं, त्यांची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही धर्मांतील स्वदेशाभिमान्याच्यानें करवत नाहीं. पाहिजे असल्यास त्यांनीं आपल्यांतून अमेरिकेंतील बळीचे मतानुयायी जॉर्ज वॉसिंगटनची जोड द्यावी. कदाचित् त्यांच्यानें अशा महापुरुषाची जोड देववतच नसल्यास त्यांनीं फ्रान्सांतील बळीचे मतानुयायी लफेटेची तरी जोड द्यावी म्हणजे त्यांस कोणी कुतर्की म्हणणार नाहींत. अरे, या सुधारल्या विद्वानांच्या पूर्वजांस स्वदेशाभिमान जर खरोखर ठाऊक

असता, तर त्यांनीं आपल्या पुस्तकांत आपल्या देशबंधु शूद्रांस पशूपेक्षां नीच मानण्याजोगे लेख करून ठेविलेच नसते. ते विष्ठा खाणाऱ्या पशूंचा गोमूत्र पिऊन पवित्र होतात; परंतु ते शूद्राचे हातचें स्वच्छ कारंजाचें पाणी पिण्यास अपवित्र मानितात. बरें, या सुधारल्या विद्वानांच्या पूर्वजांनीं ग्रिशियन लोकांच्या पवित्र देशाभिमानाविरुद्ध उपस्थित केलेला अपवित्र देशाभिमान आपल्यास कोणाच्या प्रतापानें समजला? इंग्रज लोकांच्या. आणि तसल्या परोपकारी लोकांस म्हणजे आपल्यास भटांच्या दास्यत्वापासून मुक्त करणाऱ्या लोकांस, आपल्या देशांतून हांकून देण्याविषयीं त्या विद्वानांची मसलत कोणाच्यानें घेववेल? असा कोण मूर्ख आहे कीं, ज्याच्यानें आपल्या तारणाऱ्यावर आपला हात उगारवेल? परंतु मी तुला सांगतों कीं, इंग्रज लोक आज आहेत, उद्यां नाहींत, ते आपल्या जन्मास पुरवतील म्हणोन कोणाच्यानें खास करून सांगवत नाहीं. यास्तव त्या लोकांचें राज्य या देशांत आहे, तोंच आपण सर्व शूद्रांनीं जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून मुक्त व्हावें, यामध्यें मोठा शहाणपणा आहे. देवाजीनें एकदां शूद्रांवर दया करून इंग्रज बाहादराच्या हातून भटनानाचें बंड मोडविलें म्हणोन बरें झालें. नाहीं तर त्या शादावलाच्या पुढल्या लिंगापुढें रुद्र करणाऱ्या सुधारल्या भटांनीं आजपावेतों कित्येक महारास एकेरी धोतर नेसल्यामुळें अथवा कीर्तनामध्यें संस्कृत श्लोकांचा उच्चार केल्यामुळें काळें पाणी दाखविलें असतें.

## भाग १५ वा

**सरकारी शाळाखातीं, म्युनिसिपालिटी, दक्षणा प्राइज कमेटी, व भट वर्तमानपत्रकर्त्यांची जूट. आणि शूद्रादि अतिशूद्रांच्या मुलांनीं विद्या शिकूं नये म्हणून भट लोकांचा कट इत्यादिकांविषयीं.**

**धों०**—सरकारी शाळाखात्यांतील भटकामगार गुलाबी लबाड्या करतात त्या कोणत्या?

**जो०**—हल्लीं ज्या पुस्तकाच्या पडोशावरून एकंदर सर्व भटांच्या ग्रंथांतील लबाड्या उघडकीस येऊन त्यांच्या पूर्वजांची मोठी फजिती होणार, या भयास्तव त्यांनीं आपल्या भोळ्या सरकारास कधीं कधीं एकांतीं भेटून व कधीं कधीं वर्तमानपत्राद्वारें नाना तऱ्हेच्या गुलाबी मसलती देऊन त्यांजकडून एकंदर सर्व सरकारी शाळाखात्यांतून तें पुस्तकच हद्दपार करविलें. अरे, जर अशा सुधारल्या काळांत त्यांचे शिष्य म्हणविणाऱ्या सरकारानें चार मतलबी सुधारल्या भटांच्या गुलाबी मसलती ऐकून एकंदर सर्व सरकारी शाळाखात्यांतून तसल्या ग्रंथांस हद्दपार केलें, तर पूर्वींच्या अज्ञानी अधिकाऱ्यांनीं चार धर्मभ्रष्ट ढोंग्यांच्या आग्रहामुळें त्या उपदेशाच्या मालकास सुळावर दिलें म्हणून आम्हास तरी कां नवल वाटावें?

**धों०**—तर यामध्यें सरकारचा दोष काय आहे?

जो०—सरकारचा जर यामध्यें दोष नाहीं म्हणावा तर, सरकारानें ज्या सुधारल्या भटांच्या मसलतीवरून तसल्या पवित्र पुस्तकांस हद्दपार केलें, तर त्या पुस्तकाच्या विरोधी लोकांनीं केलेलीं पुस्तकें सरकारी शाळाखात्यांतून चालू करून त्या लोकांसच शूद्रांचे शाळांत शिक्षक नेमावेत काय? कारण याविषयीं विचार करून पाहिलें असतां असें सिद्ध होतें कीं, जो काळपावेतों तें पुस्तक ज्या प्रतिवाद्यांनीं सरकारी शाळाखात्यांतून हद्दपार करविलें, त्या सर्वांनीं नवीन पुस्तकें केलेलीं एकंदर सर्व सरकारी शाळाखात्यांतून हद्दपार न करवितां, सरकार त्यांस उलटें मोठमोठ्या बक्षीसा देऊन त्या लोकांसच सरकारी सर्व शाळांमध्यें शिक्षक नेमून त्यांस त्या पवित्र पुस्तकाच्या विरुद्ध शूद्रांस तोंडानें उपदेश करण्याची सवड तरी कां देतें? यास्तव आमच्या भोळ्या सरकाराच्यानें त्या पवित्र पुस्तकासारखे, एकंदर सर्व सरकारी शाळाखात्यांतून त्या प्रतिवाद्यांस त्यांच्या पुस्तकांसहीत हद्दपार करवत जर नाहीं; तर आमच्या सरकारानें कृपा करून एकदम सर्व शाळाखातीं बंद करून आपले घरीं स्वस्थ बसल्यास आम्हां शूद्रांवरचा कांहींतरी कर कमी होईल. कारण विद्याखात्यांतील एका मुख्य भटकामगाराच्या निदान दरमहा सहाशें सुर्तीं, म्हणजे दरवर्षी (७२००) सात हजार दोनशें रुपये, पदरीं आवळावे लागतात. आतां सुल्तानीचा तर घोरच नाहीं; परंतु असमानी मेहर झाल्यास येव्हढी रक्कम तयार करण्याकरितां शूद्रांच्या किती कुटुंबांस एक वर्षभर रात्रंदिवस शेतीं खपावें लागत असेल बरें! निदान एक हजार कुटुंबें तरी म्हटलीं पाहिजेत कां नको? बरें, या ऐवजाच्या मानाप्रमाणें ह्या ब्रहस्पतीपासून शूद्रास कांहींतरी उपयोग होतो काय! अरे, चार आणे दररोज मिळणाऱ्या शूद्रबिगाऱ्यांस उन्हामध्यें सूर्य उगवल्यापासून तों तो मावळेपर्यंत सडकेवर मातीचीं टोपलीं वाहवीं लागतात. त्याला बाहेर कोठें जाण्यास एक घटकेचीसुद्धां फुरसत होत नाहीं. आणि वीस रुपये दररोज मिळणाऱ्या भटचाकरांस शाळेंत हवाशीर जाग्यांत खुर्ची आसनावर बसून काम करीत असतां त्यांस म्युनिसिपालिटीचा वराती होऊन, दररोज सकाळीं आणि संध्याकाळीं थंडाई पडल्याबरोबर आपण सर्व लोकांच्या ओळखीस यावें म्हणून मोठ्या डौलानें घोड्याच्या गाडींत बसून शहरांतील रस्तोरस्तीं लोकांच्या पढव्या, शेतखाने पाहून मिरवण्यापुरती फुरसत कोठून मिळते? अरे, त्यानें शहरांतील आळोआळीनें विद्येपासून काय काय फायदे होतात, याविषयीं अज्ञानी लोकांस उपदेश करण्याचें एकीकडेस ठेवून त्यास असें मिरवत फिरण्याचें भूषण वाटतें, यावरून मिशनखात्यांतील दहा रुपये दरमहाचा उपदेशक यांच्यापेक्षां हजार वांट्यानें बरा कां नाहीं बरें! कारण ज्या शहरांत तो उपदेशक राहतो त्या शहरांतील सर्व अबालवृद्धांस तो उपदेशक आहे म्हणून ठाऊक असतो; परंतु हा नबाब त्याच्या खालच्या मजल्यांतील बिऱ्हाडकरूस, हा कोण गोमाजी म्हणून माहीत नसतो. अरे, हा आपल्या वरच्या युरोपियन कामगाराजवळ दररोज इकडच्या तिकडच्या चार गप्पा ठोकून मन मानेल तेव्हां तास दोन तास शाळेंत शिकवून वर्षांतून

त्यांस दोन-चार लेखी रिपोर्ट करितो, म्हणजे ह्याचें काम झालें. आणि यालाच चार आर्जवी लोक इमानी चाकर व देशाभिमानी म्हणतात. अरे, या इमानी भट चाकरांनीं आजपावेतों शाळाखात्यांकडील लाखों रुपये घडांत टाकिले. तथापि यांच्या हातून अतिशूद्रांस विद्या देऊन त्यांपैकीं एकास म्युनिसिपालिटींत सभासद करवलें नाहीं. यावरून तूंच विचार करून पहा कीं, हे शाळाखात्याकडील एकंदर सर्व इमानी चाकर आपल्या देशांतील अज्ञानी अतिशूद्रांचा किती कळवळा करितात! इतकेंच नव्हे, परंतु हे देशाभिमानी, म्युनिसिपालिटींत मुख्य अधिकारी असतां, यांच्यानें गेले सालाच्या पाण्याच्या खरपडांत अतिशूद्रांस सरकारी हौदावर पिण्यापुरतें पाणी भरूं देण्याची मदत करवली नाहीं. यास्तव कमिटींत अतिशूद्रांपैकीं सभासद घेण्याची किती जरूरी आहे!

धों०—तुमचें म्हणणें रास्त आहे; परंतु मी ऐकतों कीं, कमिटींत हल्लीं शूद्रांपैकीं कित्येक सभासद इतके विद्वान आहेत कीं, ते आपली मतें देतेवेळीं, अरे गोविंदा म्हणणाऱ्या[1] यंत्रासारखे आपल्या माना हालवून, होय किंवा नाहीं याचा प्रसाद देतात. कारण, ज्यास मुळींच आपल्या सह्या करण्याची मोठी मारामार, मग तेथें बाकी सर्व आंवळ्यायेवढें पूज्य उरलें असतें. अशा शूद्रसभासदांसारखे कमिटींत खुर्चीअसनावर बसून आपल्या माना हालवून सह्या करण्याजोगे कांहीं अतिशूद्रांत लोक सांपडतील काय?

जो०—अशा शूद्र सभासदांपेक्षां हजार वाट्यानें चांगले लिहितां व वाचितां येतें असे पुष्कळ अतिशूद्र सांपडतील. परंतु भटांच्या मतलबी ग्रंथांच्या आधारावरून एकंदर सर्व अतिशूद्रांस स्पर्श करण्याची बंदी असल्यामुळें सहजच त्या बिचाऱ्यांस शूद्रसभासदांसारिखें सर्व लोकांत मिसळून श्रीमंत होण्याची सवड नसल्यामुळें त्यांस अद्याप गाढवें हांकून आपलीं पोटें भरावीं लागतात.

धों०—एकंदर सर्व जातींचें निरनिराळें संख्याप्रमाण पाहूं जातां, कमिटींत विशेषेंकरून कोणत्या जातीचे सभासदांचा भरणा सांपडतो?

जो०—भट जातीचा.

धों०—म्हणूनच या कमिटींतील बिगारी आणि भंगीखेरीज करून भटकामगारांचा भरणा फार आढळतो. त्यांपैकीं पूर्वीं नळवाले भट कामगार असल्यामुळें काळ्या उन्हाळ्यात एकंदर सर्व आपल्या जातीच्या भटांच्या वाड्यांतील हौदांस इतकें पाणी मनमुराद सोडीत होते कीं, तेथील आसपासच्या सर्व भटगेजाऱ्यांचीं धोत्रेंपात्रें धुण्याची चंगळ होऊन फार पाणी व्यर्थ वायां जात असे; परंतु ज्या ज्या पेठेंत गरीब शूद्रांची वस्ती आहे, त्या सर्व पेठांतील हौदांत दोन प्रहरांनंतर वाटसरास तहान भागविण्यापुरतें पाणी मिळत नसतें. मग धुण्याधाण्याचीं रेलचेल कोठून! याखेरीज भटांच्या वस्तींत नवे हौद

---

१. नंदी.

किती केले आहेत आणि जुनागंज पेठ वगैरे पेठेंतील लोकांनीं आज किती वर्षें हौद हौद करुन कमिटीच्या नांवानें हाका मारल्या. परंतु तेथें भटसभासदांचा फार भरणा असल्यामुळें त्या गरिबांची कित्येक वर्षे दादच लागली नाहीं. परंतु अखेरीस म्हणजे गतसालीं जेव्हां पाण्याची फारच तूट पडली, तेव्हां मिठगंजांतील मांगामहारांनीं काळ्या हौदास शिवून पाणी भरण्यास लागले, तेव्हां आतांशी कमिटीनें शुद्धीवर येऊन त्या लोकांची दाद घेतली. या कमिटीनें इतका वेल्गामी खर्च त्या कामीं केला कीं, तो तिच्यांतील मुख्य सभानायकाच्या शहाणपणाला आणि वैभवाला शोभा देत नाहीं. असो, कमिटींत इतकी अंदाधुंदी असतां त्याविषयीं मऱ्हाठी वर्तमानपत्रकर्ते कां सरकारास जागे करीत नाहींत ?

जो०—अरे, एकंदर सर्व मऱ्हाठी वर्तमानपत्रांचे कर्ते भट असल्यामुळें त्यांच्यानें आपल्या जातीच्या लोकांच्याविरुद्ध लिहिण्यास हातच उचलवत नाहीं. जेव्हां युरोपियन सभानायक होता, तेव्हां तो एकंदर सर्व भटांचें कांहीं कसब चालूं देत नसे. तेव्हां मात्र ते एकत्र होऊन, त्यानें असें केल्यामुळें आम्हां सर्व रयतेचें असें नुकसान झालें, त्यानें तसें केल्यामुळें आम्हां सर्व रयतेचें तसें नुकसान झालें, अशा नाना प्रकारच्या त्याच्या-विषयीं ते कुतर्की कंड्या उठवून त्यास इतका त्रास देत असत कीं, तो आपल्या मुख्य सभानायकाच्या जाग्याचा राजीनामा देऊन पुढें या कमिटीचें नांवसुद्धां घेईनासा झाला. बरें, आपलें दयाळू सरकारही त्या सर्व मतलबी वर्तमानपत्रांच्या म्हणण्यास खरें मानून त्या लिहिण्यांत एकंदर सर्व शूद्रांचें व अतिशूद्रांचें मत आलें आहे म्हणोन समजतें. असें समजण्यामध्यें आमच्या भोळ्या सरकारची मोठी चूक आहे. त्यांस इतकें ठाऊक नाहीं कीं, एकंदर सर्व भट वर्तमानपत्रकर्त्यांची आणि शूद्र व अति शूद्रांची जन्मांतून एकदांसुद्धां अशा कामीं गांठ पडत नाहीं. त्यांतून बहुतेक अतिशूद्रांस तर वर्तमानपत्र म्हणजे काय, कोल्हा कां कुत्रा, कां माकड, हें कांहींच समजत नाहीं. तर मग अशा अनओळखी अतिशूद्रांचीं मतें ह्या सर्व सोंवळ्या वर्तमानपत्रांस कोठून व कशीं कळतात ? त्यांनीं सरकारची थट्टा करून अज्ञानी जनाचीं मनें रिझवून आपलीं पोटें जाळण्याकरितां हा सुधारला तितंबा योजून काढला आहे. तसें जर नाहीं म्हणावें, तर एकंदर सर्व खात्यांत त्यांच्या जातीच्या कामगारांचा भरणा असल्यामुळें एकंदर सर्व शूद्रांसहित अतिशूद्रांचें नुकसान होत आहे, याविषयीं त्यांस शोध काढण्यास फुरसत जर होत नाहीं म्हणावें, तर समुद्राच्या पलिकडील लंदन शहरांतील राणी सरकारच्या मुख्य प्रधानानें आपल्या स्वप्नांत हिंदुस्थानाविषयीं काय काय बरळला, याविषयीं बित्तम बातमी काढण्यास तरी त्यांस कोठून फुरसत होती ? असो, तथापि एखाद्या मऱ्हाठी खिस्ति वर्तमानपत्रकर्त्यानें कमिटींत गरीबांची दाद लागत नाहीं, म्हणोन लिहिल्यास पुढें एकंदर सर्व मराठी वर्तमानपत्रांतील विषयांचे इंग्रजींत गोशवारे काढून सरकारास दाखविण्याचें काम कमिटींतीलच एका भटसभासदाकडे आहे, तर अशा रिपोर्टराच्यानें कमिटींत

आपल्या शेजारीं मांडीशीं मांडी देऊन बसणाऱ्या जातभावांची भीड न धरितां त्यांच्या (आपल्या) विरुद्ध मजकूर सरकारापुढें कसे ठेववतील?

धों०—असा जर चहूंकडे भटसभासदांचा भरणा असल्यामुळें बाकी सर्व जातींचें नुकसान होत आहे, तर तुम्ही याविषयीं एक लहानशी चोपडी करून दक्षणा-प्राईजकमिटीस आर्पण करा; म्हणजे तेणेंकरून तरी सरकारचे डोळे उघडतील!

जो०—भटजोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रांस कसकसें फसवून खातात व खिस्ती उपदेशक आपल्या निःपक्षपाती धर्माच्या आधारानें अज्ञानी शूद्रांस खरें ज्ञान सांगून त्यांस कसकसें सत्य मार्गावर आणितात, या सर्व गोष्टीविषयीं म्यां एक लहानसें नाटक करून सन १८५५ सालांत दक्षणा प्राईज कमिटीस अर्पण केलें. परंतु तेथेंही असल्या भिडस्थ भटसभासदांच्या आग्रहामुळें युरोपियन सभासदांचें कांहीं चालेना, तेव्हां त्या कमिटीनें माझी चोपडी नापसंत केली. अरे, ही दक्षणाप्राईज कमिटी म्युनिसिपालिटीचीच धाकटी बहीण म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं; कारण तिनें या कामीं शूद्रांस उत्तेजन येण्याकरितां किती ठिकाणीं शूद्रांत दिवा लावून उजेड पाडिला आहे तो दाखीव. अखेरीस मी तें पुस्तक एकीकडेस टाकून कांहीं वर्षे लोटल्यानंतर दुसरी लहानसी ब्राह्मणांच्या कसबांविषयीं नवीन चोपडी तयार करून आपल्या स्वताच्या खर्चानें छापून प्रसिद्ध केली. तेव्हां एका माझ्या पुणेकर स्नेह्यानें आग्रह करून त्या चोपडीच्या कांहीं प्रती एकंदर सर्व शाळाखात्यांकडील मुख्य अधिकाऱ्यांनीं विकत घ्याव्यात, म्हणून त्यानें मजकडून त्या सर्व अधिकाऱ्यांस सूचनापत्रें पाठविलीं, परंतु त्यांतून एकाही अधिकाऱ्यानें भटांच्या भयास्तव एकसुद्धां चोपडी खरेदी करून आपल्या नांवास बट्टा लावून घेतला नाहीं.

धों०—तात्यासाहेब, तुम्हांला सर्व लोकांच्या पुढें पुढें करतां येत नाहीं, सबब तुमच्या चोपड्या खपत नाहींत.

जो०—अरे बाबा, चांगलें काम शेवटास नेण्याकरितां वाईट उपाय योजूं नयेत, नाहीं तर त्या कामाच्या चांगुलपणाला बट्टा लागतो. त्यांनीं एक माझी चोपडी विकत घेतली नाहीं, म्हणून माझें कांहीं देवाजिनें कमी पाडिलें आहे काय? नाहीं. परंतु पुढें मी तसल्या लोकांचें अर्जव करण्याचें धिक्कारून आपल्या उत्पन्नकर्त्या पित्यावर कसा भार घालावा हें शिकलों, यास्तव मी त्याचा त्रिवार आभार मानितों.

धों०—नंतर आपण जेव्हां भट वगैरे जातीच्या मुलींकरितां शाळा स्थापिल्या होत्या, तेव्हां सरकारानें मेहरबान होऊन आपल्यास मोठ्या सत्कारानें एक शालजोडी बक्षीस दिली. नंतर त्याचप्रमाणें आपण दुसऱ्या प्रथक् अतिशूद्रांकरितां शाळा स्थापून त्यामध्यें अनेक भट मदतीला घेऊन, त्या सर्व एकंदर शाळांमध्यें शिकविण्याचा भरभराट चालू करून आपण मधींच तें काम एकाएकी एकीकडेस टाकून बाजूला झालां. पुढें आपण कांहीं वर्षे लोटल्यानंतर एकंदर सर्व युरोपियन लोकांचे घरीं जाणें बंद केलें, याचीं कारणें काय असावींत?

जो०—भट वगैरे जातींच्या मुलींच्या शाळा घातल्यामुळें सरकारास आनंद वाटून त्यांनीं मला एक शालजोडी बक्षीस दिली खरी; परंतु जेव्हां मला अतिशूद्रांच्या मुलांमुलींकरितां शाळा असण्याची फार जरूरी दिसल्यावरून, मी त्या कामीं अनेक भटसभासद करून त्या सर्व शाळा त्यांच्या स्वाधीन करून, अतिशूद्रांच्या मुलांमुलीं-करितां शाळा काढल्या, तेव्हां एकंदर सर्व युरोपियन गृहस्थांनीं मला फार द्रव्यद्वारें मदत केली. त्या उदार गृहस्थांपैकीं रेव्हिन्यु कमिशनर रीव्हज्‌साहेब यांनीं जी मदत केली ती मीं कधीं विसरणार नाहीं. त्या उदार गृहस्थांनीं फक्त द्रव्यद्वारें मदत केली इतकेंच नाहीं, परंतु त्यांनीं त्या अतिशूद्रांच्या शाळांत आपला महत्त्वाचा धंदा संभाळून वरचेवर येऊन मुलांची गति विद्येमध्यें किती झाली, याविषयींची चौकशी वारंवार करीत असे व मुलांस विद्या शिकण्याविषयीं उत्तेजन यावें, म्हणून तो फार झटत असे. त्याचे उपकार अतिशूद्रांच्या मुलांच्या हाडांमध्यें खिळले आहेत. त्याजबद्दल त्यांनीं आपल्या शरीराचे चर्मी जोडे करून त्याच्या पायांत घातले, तथापि ते त्याचे उतराई होणार नाहींत. त्याचप्रमाणें दुसरे कांहीं युरोपियन गृहस्थांनीं मला या कामीं फार मदत केली याजबद्दल मी त्यांचे फार आभार मानितों. त्या वेळेस त्याही कामीं मला भटसभासद घेण्याची जरूरी पडली. याचीं आंतलीं कारणें पुढें एखादे प्रसंगीं कळवीन; परंतु पुढें जेव्हां मी त्या शाळांत भटांच्या पूर्वजांच्या कृत्रिमी पुस्तकांतील लबाड्या उघड्या करून मुलांस दाखवूं लागलों, तेव्हां त्यांचा माझा आंतल्या आंत बोलण्या–चालण्यामध्यें वेबनाव होऊं लागला. त्यांचे म्हणण्याचा कल असा दिसून आला कीं, या अतिशूद्रांच्या मुलांस विद्या मुळींच देऊं नये. जर कदाचित् त्यांस शिकविणेंच भाग पडलें, तर त्यांची साधारण अक्षरओळख मात्र करून द्यावी. माझें म्हणणें असें होतें कीं, त्यांना चांगले प्रतीची विद्या देऊन तिजपासून त्यांस आपलें बरेंवाईट समजण्याची शक्ति यावी. आतां त्यांचा अतिशूद्रांस विद्या न द्यावी याचा हेतु, कां, ते लोक विद्वान होऊन आपणास ज्या सरकारच्या योगानें विद्या मिळाली व तेणेंकरून खरें कोणतें व खोटें कोणतें हें समजूं लागलें, त्या सरकारचे परमनिष्ठ सेवक होऊन आपले पूर्वजांनीं त्यांच्यावर केलेल्या जुलूमांची आठवण होऊन आपला सर्वस्वी धिःकार करतील किंवा कसा, हें बरोबर सांगतां येत नाहीं. असा जेव्हां माझे व त्यांचे मतांमध्यें भेद पडूं लागला, तेव्हां मी त्यांचें सर्व कृत्रिम समजून त्या दोन्हीही खात्यांतून एका बाजूला झालों. त्यास कांहीं वर्षें लोटलीं इतक्यांत भटपांड्यांचें बंड उपस्थित झालें, तेव्हांपासून एकंदर सर्व युरोपियन सभ्य गृहस्थ माझ्याशीं पहिल्यासारखे नीट मन उगाळून न बोलतां ते मला पाहिल्याबरोबर आपल्या कपाळास आठ्या घालूं लागले. तेव्हां मी त्यांच्या घरीं जाणेंयेणें अगदीं बंद केलें.

धों०—भटपांड्यांच्या बदमस्तीमुळें त्यांनीं आपला निरअपराध्यांचा आव्हेर करून ते आपल्यास पाहिल्याबरोबर कपाळास अशा आठ्या घालूं लागले, हें त्यांच्या

ब्राह्मणपणाला शोभा देत नाहीं. आणि यावरून आपण भट विधवा स्त्रियांनीं गर्भपात वगैरे अघोर कर्मे करूं नयेत, म्हणोन त्यांस गुप्तपणें बाळंत होण्याकरितां आपल्या घरीं सोय केली आहे. त्या कामीं आपण आपल्या सरकाराजवळ कोणत्याही प्रकारची मदत न मागतां व त्याचप्रमाणें त्या कामांत नांवालासुद्धां भटसभासद न घेतां, तें काम आपण आपल्या खर्चानें चालविलें आहे.

जो०—आपलें सरकार जर म्हणावें तर जिकडे घुगऱ्या तिकडे उदय उदय म्हणणारें आहे. कारण अतिशूद्रांस स्पर्श करण्याची बंदी असल्यामुळें त्यांस सहजच सर्व रोजगार-धंद्यांचें द्वार बंद झालें व त्याजमुळें त्यांजवर पोटाच्या आगीमुळें चोऱ्यामाऱ्या करण्याचा प्रसंग गुजरतो व त्यांनीं चोऱ्यामाऱ्या करूं नये, म्हणोन आमच्या सरकारानें त्यांच्या हजऱ्या घेण्याची वहिवाट घातली, हें बरें केलें. परंतु भटांच्या निराश्रीत अनाथ विधवा स्त्रियांस पाट लावण्याची बंदी असल्यामुळें त्या व्यभिचार करून गर्भपात व बाळहत्त्या करतात, हें आमचें न्यायी सरकार उघड डोळ्यानें पहात असून त्यांजवर मात्र मांग-रामोशांसारखी चौकशी ठेवीत नाहीं हें मोठें आश्चर्य होय; काय? आमच्या सरकारास गर्भपात व बाळहत्त्या करणाऱ्या बायांपेक्षां दरोडेखोर मांगमहार जास्ति दोषी आहेत असें वाटतें काय? दुसरें असें कीं, भटाचें "खाणें थोडें परंतु मचमच फार." अरे, ज्यांच्यानें एकचित्त होऊन आपल्या बाळ बहिणींच्या हजामती करणाऱ्या नापिकांच्या हातून वस्तरा छिनाऊन घेववत जर नाहीं, तर तसल्या लोकांस अशा कामीं सभासद करून काय फळ होणार आहे?

धों०—बरें असो, परंतु आपण पूर्वी म्हणालांत कीं एकंदर सर्व शाळाखात्यांत ज्या कांहीं अव्यवस्था झाल्या आहेत, त्या कोणत्या?

जो०—त्या सर्व अव्यवस्था लिहूं गेल्या असतां त्याचा एक स्वतंत्र लहानसा ग्रंथच होईल, या भयास्तव त्यांपैकीं एकदोन गोष्टी उदाहरणार्थ येथें घेतों. पहिली गोष्ट अशी कीं, शूद्र व अतिशूद्र यांच्या मुलांच्या शाळांकरितां शिक्षक तयार करण्याची अनवस्था.

धों०—असें कसें म्हणतां? सरकारानें सर्व जातींचीं मुलें शिकण्याकरितां पंतोजी तयार करण्याकरितां एक स्वतंत्र निराळी शाळा केली आहे. सरकारच्या मनांत अवडनिवड नाहीं.

जो०—तर मग आजपावेतों त्या तयार केलेल्या पंतोजींनीं अतिशूद्रांचीं मुलें तयार किती केलीं, तीं दाखीव.—आतां खालीं कां पहातोस? मला उत्तर दे.—

धों०—एकंदर सर्व भटपंतोजी लोक असें म्हणतात कीं, अतिशूद्रांचीं मुलें शाळेंत घेतल्याबरोबर हिंदुस्थानांत मोठा धिंगाना होईल, म्हणोन सरकार भितें.

जो०—बरें, तर सरकार पलटणींत सर्व जातींचे लोक भरतात, म्हणोन हिंदुस्थानांतील लोक कां धिंगाना करीत नाहींत? ही सर्व सरकारची हयगय, कारण पलटणीची भरती करतेवेळीं आपण तें काम स्वतः करतात आणि पंतोजी तयार करण्याचें काम भलत्या

एखाद्या शाल विसनी गौत्यागोमाजीकडे नेमितात. त्याला कांहीं या कामाची माहिती नसते. त्याला जर या कामाची माहिती असती, तर त्यानें प्रथम अतिशूद्रांचीं मुलें पंतोजी तयार करण्याचे कामीं हयगय न करतां, त्या शाळेंत फक्त भटांच्या मुलांची इतकी खोगीरभरती न करता.

धों०—तर मग सरकारानें याला काय तोड करावी ?

जो०—याला तोड इतकीच आहे कीं, सरकारानें कृपाळू होऊन हें काम एकंदर सर्व युरोपियन कलेक्टरांच्या हातीं दिल्याशिवाय सिद्धीस जाणार नाहीं. कारण या लोकांचा शूद्र व अतिशूद्रांशीं निकट संबंध असल्यामुळें त्यांनीं भटकामगारांवर भरंवसा न ठेवित दर गांवोगांवीं एक एक वेळीं जाऊन, त्यांनीं कुळकर्ण्याचा हुजूर न धरितां सर्व गांवांतील आबालवृद्धांस विद्येपासून काय काय लाभ होतात, हें सांगितल्याबरोबर ते आपलीं हुशार हुशार मुलें निवडून कलेक्टरसाहेबांच्या स्वाधीन, पंतोजी करण्याकरितां, मोठ्या आनंदानें करतील. कारण जसें युरोपियन कलेक्टरांच्या बोलानें हें काम तडीस जाईल, तसें असल्या गैरमाहीत कामगारांच्यानें तडीस गेलें नाहीं, व पुढेंही जाईल, किंवा न जाईल याचा संशय वाटतो. याविषयीं एक म्हण अशी आहे कीं, 'जेनो काम तेनो थाय बिजा करे तो गोता खाय.' यावरून तूंच विचार करून पहा कीं, शूद्र व अतिशूद्र जातीचे पंतोजी तयार करण्याची किती जरूरी आहे! कारण जेव्हां त्या त्या जातीचे पंतोजी तयार होतील; तेव्हां ते आपापल्या जातीचा अभिमान मनीं धरून ते आपल्या जातीच्या मुलांस, हातांत काठी घेऊन गुरांची वळती करूं लागण्याच्या पूर्वी, इतकी शिकण्याची गोडी लावतील कीं, पुढें तीं मुलें मोठीं झाल्याबरोबर, तीं आपल्यांतील एका मुलास बारीबारीनें माळावर गुरांच्या वळत्या करावयास ठेवून, बाकी सर्व मुलें अखरावर सुरपारंब्या न खेळतां गांवांत येऊन आपल्या पंतोजीजवळ शिकण्यास कधीं कमी करणार नाहींत, परंतु अशा सुधारल्या काळांत जगामध्यें अति सुधारलेल्या अमेरिकन लोकांपैकीं अर्ध्या लोकांनीं आपल्या खासगत देशबांधवांबरोबर तीन वर्षें सतत जंग केल्याशिवाय आपल्या हातांतून दासांस सोडलें नाहीं, तर असल्या गांवठी भटपंतोजीच्यानें शाळेमध्यें शूद्रादि अतिशूद्रांस खरें ज्ञान शिकवून त्यांस आपल्या दास्यत्वापासून मुक्त होऊं देण्याची बुद्धि कशी देववेल! अरे, ज्या एका भटप्रोफेसराच्या पगारांत सहा शूद्र अथवा नऊ अतिशूद्र प्रोफेसर स्वस्ते मिळण्याची खात्री असतां, आपलें सरकार या कामीं भटांच्या नादीं लागून आपल्या अज्ञानी बांधवांच्या कमाईचे पैसे असे बेलगामी खर्चतात, तर आपण जर त्याविषयीं आपल्या सरकारास जागें केलें नाहीं, तर त्याचा दोष आपल्या माथ्यावर येणार आहे. त्याचप्रमाणें चौधऱ्याचे वाड्यांतील खाणावळींत अतिशूद्रांचीं मुलें किती आहेत बरें ?

धों०—आहो, जेथें शूद्रांच्या मुलांची निभावणी लागण्याची मारामार, तेथें अतिशूद्रांचे मुलांचें नांव कशाला काढतां ?

जो०—कां बरें, तूंच म्हणतोस ना, सरकार आवडनिवड करीत नाहीं, तर मग याचें कारण काय ?

धों०—याचें कारण तेथें सर्व भटकामगार असल्यामुळें असें घडून येतें, म्हणून आपण मला एके दिवशीं प्रत्यक्ष प्रमाण दाखविलें होतें. तें असें कीं, जो भट गृहस्थ पूर्वीं जेव्हां आपल्याजवळ चाकरीस होता, तेव्हां तो दोन वेळां अतिशूद्रांच्या शाळेंत येऊन कांहीं विटाळाचा विधिनिषेध न पाळितां सर्व जातींच्या मुलांस शिकवीत असे. आणि तोच भटजीबावा जेव्हां खाणावळींत चाकर झाला, तेव्हां तो इतका सोंवळा बनला कीं, त्यानें एका गरीब सोनारास चाव्हडीवर ओढून आणलें; कारण, त्यानें उन्हाळ्यांत त्या शाळेंतील हौदाला शिऊन आपली तहान भागिवली.

जो०—अरे, ज्या भटशिरोमणीनें केलेलीं गीतें एकंदर सर्व नवीन समाजामध्यें गाण्याचा किता घेतला आहे, तथापि त्यानें आपल्या मलतबी धर्मांप्रमाणें दगडी पुजण्याचें न सोडितां, आपल्या वाड्यांतील भटांच्या हौदाला शूद्रानें शिऊं नये, म्हणून पडदी घालून तो अखेरीस काशीस जाऊन काशीकर होण्याच्या वेतांत आहे. तथापि आमच्या निःपक्षपाती म्युनिसिपालिटींत भटसभासदांचा भरणा असल्यामुळें तिनें ती पडदी तशीच कायम ठेऊन, शुक्रवारांतील शिंप्यांच्या हौदाची पडदी मात्र एकदम पाडिली; तथापि तेथील कित्येक भटजींनीं फक्त आपल्या उपयोगाकरितां त्या हौदाच्या उसवासानजीक एक ल्हानसा चोर हौद बांधून त्यांतील पाणी, आपले सोंवळे चाव करून नाहाण्याधुण्यामध्यें वेलगामी नाशितात.—आतां ब्राह्मणजन्मास येऊन असें कसब लढविलें नाहीं, तर तो जन्म कशाचा !

## भाग १६ वा

### ब्रह्मराक्षसाचे पिडेचा धिक्कार.

धों०—या सर्व आपल्या संवादांवरून असें सिद्ध होतें कीं, एकंदर सर्व भटांनीं आपल्या कृत्रिमी धर्माच्या अडून आपल्या भोळ्या सरकारच्या डोळ्यांत माती टाकून आपण सर्व शूद्रांदि अतिशूद्रांस अमेरिकेंतील दासांपेक्षांही जास्ती पीडा देत आहेत. यास्तव आपण या भटांच्या कृत्रिमी धर्मांचा धिक्कार करून आपल्या अज्ञानी बांधवांस जागे कां करीत नाहींत ?

जो०—मी कालच संध्याकाळीं याविषयीं एक पत्र तयार करून एका माझ्या स्नेहाच्या स्वाधीन करून त्यास अशी विनंती केली कीं, त्यानें त्या पत्रांतील ऱ्हस्वदीर्घांदी सर्व चुक्या नीट करून, त्याची एक एक प्रत करून सर्व भट व खिस्ति वर्तमानपत्रकर्त्यांच्या अभिप्रायाकरितां पाठवावी. त्या पत्राची नक्कल येणेंप्रमाणें—

**शूद्रांनीं ब्रम्हराक्षसांच्या दास्यत्वापासून असें मुक्त व्हावें.**

मूळ भटांच्या (इराणी) पूर्वजांनीं या देशांत मोठा बंडावा करून, येथील आमच्या मूळच्या क्षेत्रवासी पूर्वजांस युद्धप्रसंगीं जिंकिल्यामुळें, त्यांस आपले दास केलें. पुढें जसजसी संधी सांपडत गेली, तसतसी भटांनीं आपल्या सत्तेच्या मदानें अनेक तऱ्हेतऱ्हेचे मतलबी ग्रंथ करून त्या सर्वांचा एक मजबूत कोट बांधून त्यामध्यें त्या सर्व दासांस वंशपरंपरें अटकावून तेथें त्यांस नाना तऱ्हेच्या पीडा देऊन हा काळपावेतों मोठ्या मौजा मारीत आहेत. इतक्यांत जेव्हां इंग्रज बाहदराचें राज्य या देशांत आलें तेव्हांपासून बहुतेक कनवाळू युरोपियन व अमेरिकन सत्पुरुषांस आमचें दुःख पाहवेना; तेव्हां त्यांनीं आमच्या बंदिखान्यांत हमेशा येऊन आम्हांस असा उपदेश केला कीं, "अहो बावांनों, तुम्ही आम्हांसारखे मनुष्य आहांत, तुमचा व आमचा उत्पन्न, व पालन व पोषणकर्ता एकच आहे. आणि तुम्ही पण आम्हांसारखे सर्व अधिकारांस पात्र असतां, या भटांच्या कृत्रिमी अधिकारांस कां मानितां?" वगैरे अशा नाना प्रकारच्या पवित्र सूचनांवरून विचारांतीं मला माझे वास्तविक अधिकार समजल्याबरोबर मी त्या कैदखान्याच्या कृत्रिमी कोटाच्या मुख्य ब्रम्हकपाटदरवाज्याला लाथ मारून बाहेर पडून आपल्या उत्पन्नकर्त्यांचा आभार मानला.

आतां मी त्या परोपकारी युरोपियन उपदेशकांच्या आंगणांत तंबू ठोकून थोडासा विसावा घेण्याच्या पूर्वीं प्रथम अशी प्रतिज्ञा करितों कीं,—

भटांच्या ज्या मुख्य ग्रंथांच्या आधारावरून आम्हीं भटांचे दास आहोंत, म्हणून त्यांच्या दुसऱ्या कित्येक ग्रंथांत लेख आढळतात, त्या सर्व ग्रंथांचा व त्यांचा ज्या ज्या ग्रंथांशीं संबंध असेल, त्या सर्व ग्रंथांचा धिक्कार करून ज्या ग्रंथांवरून (मग तो कोणत्याहि देशांतील अथवा धर्मांतील विचारी पुरुषानें केलेला कां असेना) सर्वांस सारखा उपभोग घेतां येतो, तशा ग्रंथकर्त्यांचा मी आपल्या उत्पन्नकर्त्याच्या संबंधानें धाकटा भाऊ समजून, त्याप्रमाणें वर्तन करणार.

दुसरें असें कीं, जे लोक आपल्या एकतर्फी मताभिमानाच्या दांडगाव्यानें कोणासही नीच मानण्याजोगें आचरण करूं लागतात, त्या उभयतांस तसें आचरण करण्याची सवड देऊन मी आपल्या उत्पन्नकर्त्यानें निर्माण केलेल्या पवित्र अधिकाराच्या नियमास बट्टा लावणार नाहीं.

तिसरें असें कीं, जे दास (क्षुद्र) फक्त आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून नितीस अनुसरून स्वच्छ उद्योग करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें आचरण करीत आहेत, अशी त्यांजविषयीं माझी खात्री झाल्याबरोबर, मी त्यांस केवळ आपल्या कुटुंबांतील बांधवांप्रमाणें समजून त्यांजबरोबर अन्नव्यवहार करीन, मग तो कोणत्याहि देशांतील असो.

पुढें एखाद्या काळीं माझ्या अज्ञानांनीं गांजलेल्या शूद्र बांधवांतून एखाद्यास भटांच्या दास्यत्वापासून मुक्त होण्याची इच्छा झाल्याबरोबर, त्यानें मला एक वेळ तरी कृपा करून

आपलें नांव पत्रद्वारें लिहून कळविल्यास मला या कामीं मोठी हिम्मत येऊन, मी त्याचा फार आभारी होईन.

[1]ता. ५ डिसेंबर सन १८७२ इ.
पुणें, जुनागंज नं० ५२७.

**जोतीराव गोविंदराव फुले.**

धों०—आपण वर दिलेल्या जाहिरातींतील एकंदर सर्व कलमें मला पसंत पडलीं; व मी त्याचप्रमाणें वर्तन करणार. आज हजारों वर्षांच्या भटांच्या कृत्रिमी व त्रासरूप कैदखान्यांतून मी सुटल्यामुळें परमानंद पावलों, यास्तव मी आपला ऋणी आहें. सारांश, तुमच्या सर्व सांगण्यावरून हिंदुधर्माच्या कृत्रिमीपणाविषयीं तर माझी खात्री होऊन चुकली, परंतु ज्या एक परमेश्वरास आपण मानतों व सर्व ज्ञानी लोक मानतात त्या परमेश्वरास, तो सर्वसाक्ष व सर्वज्ञ असतां, आम्हां शूद्रादि अतिशूद्रांचे हाल अजून दिसलेच नसतील काय ?

जो०—त्याविषयीं पुढें एकाद्या प्रसंगीं तुला सर्व खुलासा करून सांगेन म्हणजे तुझी खात्री होईल.

**समाप्त**

---

१. सदहू पत्राविषयीं जे जे वर्तमानपत्रकर्त्यांचे अभिप्राय मिळाले त्यांची योग्यता समजण्याकरितां ते आम्हीं आपले वाचणारांकरितां येथें घेतों:—

## लोककल्याणेच्छु

**पुणें**—शनवार तारीख ४ जानेवारी १८७३.

आमचे प्रसिद्ध महाज्ञानी, महाविचारी व महाशोधक तत्ववेत्ते अजम जोतीराव गोविंदराव फुले यांणीं एका मोठया गृहस्थाच्या शिफारसीनें एक अप्रयोजक अशा प्रकारचें आत्मश्लाघेचें व ब्राह्मणांच्या निंदेचें पत्र आम्हाकडे पाठविलें आहे, त्यास आमच्या पत्रांत जागा मिळण्याचा संभव नाहीं. याबद्दल सदहू अजम फुले आम्हास माफी करोत.

## शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविधसंग्रह.

कोल्हापूर–ता. १ फेब्रुआरी सन १८७३.

**पत्रव्यवहार.**

पुण्यांतील नेटिव वर्तमानपत्रकर्ते खालच्या मजकुरास आपल्या पत्रांत जागा देत नाहींत म्हणून हा आम्हाकडे पाठविला आहे. हा मजकूर चहूंकडे प्रसिद्ध करावा अशी मि. जोती गोविंदराव फुले यांची इच्छा असल्यामुळें आम्ही त्यास या अंकांत जागा देतों. जरी आमच्या हिंदु मित्रांस हा मजकूर कांहीं अंशीं निंदापर वाटेल तरी ह्यामध्यें जो अभिप्राय दाखविला आहे, तो स्तुत्य असें आम्हांस वाटतें. कारण वास्तविक पाहिल्यास ब्राह्मणांनीं मानिल्याप्रमाणें जातीभेद नाहीं असें मि. जोतीच्या लक्षांत पक्कें आल्यावरून मी कोणा पाहिजे त्यांशीं अन्नव्यवहार करीन असें त्यानें धैर्यानें सांगितले. असे छातीचे पुरुष या देशांत पुष्कळ लवकर होवोत.

# भटकामगार इंजिनियरखात्यांत कशी पेंढारगर्दी करितात, याविषयीं

# पवाडा

पेशवाई दक्षिणा रमणा इंजिनियर खातीं।
भरिती होळकरी पोतीं ॥ ध्रु० ॥

भीक मागतां लाज वाटेना घरोघर फिरती। आळसी धर्माआड लपती॥ बिगाऱ्यांचा धंदा मतलबी नीच मानिती। खुशामत करिती किती॥ ब्राह्मणाचें कसब लिहिणें कारकुन्या करिती। कुणब्या दिवसा नाडिती॥ हाजरी पुस्तक हातीं घेऊन फैलांवर जाती। हाजऱ्या मौजेनें घेती॥ बिन फीचे मजूर पाहून हाकालून देती। नाहीं तो दोष लाविती॥ चाल॥ मेस्त्रिला धमक्या देऊन॥ कानावर पगडी चढवून॥ सोंग बिगाऱ्या दावून॥ उभा राही दूर जाऊन॥ पांढरे डोळे करून॥ बोले दांत खाऊन॥ चाल दूर सोडून फैलास॥ मेस्त्री नेती बाजूस॥ शुरू कानगोष्टीस॥ चाल॥ फाजिल हजऱ्या भरल्या नांवें वाचून दाविती॥ आढावा वरचेवर पाहती॥ बिगाऱ्याची घोंगडी, दादा असनावर बसती॥ भरिती होळकरी पोतीं॥ १॥

पांड्या दिवस बारा साऱ्या महिन्यामधीं भरती। बाकी अठरा आपल्या हातीं॥ आठ दिवस खंड्याचे बाकीचे सात सोबती। शिलक बेवीसा भरती॥ तुझ्या घरचीं सर्व माणसें पगारा पुरतीं। पावली दर त्यांच्या हातीं॥ सर्व बायका पोरींवजा सव्वीस दिन असती। उरली शिलक मोजिती॥ राण्या, नाऱ्या, पोरें नव्हतीं दो दिवसां वरतीं। भरती आगाऊ फी पुरतीं॥ रोळी बैल दिवस दाहा नाहीं महिन्याला कमती। तीच रे भिस्त्याची गति॥ चाल॥ आम्ही जातीचे ब्राह्मण॥ आति लाचारी घेऊन॥ नातें धर्माचें दाऊन॥ मोहिती हळूच सांगून॥ नजर सरकारी चुकवून॥ करावें आमचें पाळण॥ चाल॥ बांधून धोतर कंबरेस॥ झटती कसे चाकरीस॥ टळेना नित्यनेमास॥ चाल॥ आठ वाजल्या वेळ झाला घोड्यावर बसती। घरचा रस्ता धरिती॥ परतुन येतां नित्य मळ्यांवर धाडा घालिती। भरिती होळकरी पोतीं॥ २॥

मेस्त्रिच्या जिवलग गडण्या धुंडून काढिती। त्यांच्या हजऱ्या मांडिती ॥ घोडया-पुरता गडी देऊन त्यास रिझविती। भूताला सहज आळविती ॥ पोकळ मेस्त्रि म्हणतां म्हणतां नाग्या फुगविती। चढविती वेळूंच्या वरती ॥ मधींच कधीं भोजन देऊन मिंधा करिती। कसी पाहा संधि साधिती ॥ जेऊं घालतां स्त्री सूचवी सरपणाची कमती। पतीला सोडून कळविती ॥ भाजीपाल्या आग लागली खेड्याची वस्ती। लिंबे लोणच्या पुरतीं ॥ चाल ॥ वाढिती फार दुरून ॥ सोंवळे चाव करून ॥ गोविती गोड बोलून ॥ भोजनीं नादीं लावून ॥ साधिती कसें भोंदून ॥ घेति जागा सारवून ॥ चाल ॥ डागितों पाहून वर्मास ॥ सोडा ह्या नीच कर्मास ॥ आग लागो या धर्मास ॥ चाल ॥ संकट पडतां हाळूच मेस्त्री तोंडाशीं देती। निराळे बाजूला होती ॥ मेस्त्रिला ळला लावून गळा कापिती ॥ भरिती होळकरी पोतीं ॥ ३ ॥

गवताकरितां नित्य बिगारी घोड्याची भरती। पालिनें घोडे खाजविती ॥ फैलामधून शूद्र बायका भांडी घांसिती। बिगारी बिछाने करिती ॥ वेडसरसा कुणबी पाहून पाय दाबिवती। मजेनें झोंपा मारिती ॥ स्वजातीचे भिक्षूक ब्राह्मण फैलावर नेती। भिक्षा माहून देविवती ॥ मिळकतीचे वांटे हुजूर सोबत्यांना देती। समजूत वरच्यावर करिती ॥ दप्तरदारा हासे बांधून भेटीला जाती। शिपायां विड्यास बोलाविती ॥ चाल ॥ टेपलें गोरें येऊन ॥ कचेरी तंबू घेऊन ॥ थकले शिकार खेळून ॥ कागदीं सह्या करून ॥ भटावर बाकी सोंपून ॥ विसावा ग्लास घेऊन ॥ चाल ॥ शोभती खासे कोचास ॥ वाचिती न्युजपेपरास ॥ मान पाहा मधीं डुकलीस ॥ चाल ॥ बिगाऱ्यांच्या कोंबड्या वगैरे सामानाची भरती। पैसा मधींच कीं खाती ॥ बुटलेराच्या हातून गोऱ्या जुलाब करविती। भरिती होळकरी पोतीं ॥ ४ ॥

नुकसानीचा पैसा माती भरीस घालिती। दाखला फिगरेठीं लिहिती ॥ लूट धुमाळी पैसा आठवण रमण्याची होती। रपोटीं मेळ मिळविती ॥ खजिन्यामधीं पैसा सरतां कर योजिती। हाडें कुणब्यांची पिळीती ॥ कर्मनिष्ट चाकर बनले लक्षाधीपती। बुधली कुणब्याची वरती ॥ टोपीवाल्या गुह्य कळतां राजिनामे देती। हवेल्या तीन मजली करती ॥ न्यायशील म्हणवितां आतां तुम्हीं आमचे भूपती। दया नाहीं शूद्रांची चित्तीं ॥ चाल ॥ अनुभव स्वतां लक्षून ॥ सांगतों खरें निक्षून ॥ सर्व जाती निवडून ॥ ध्याव्या संख्या प्रमाण ॥ द्यावीं कामें नेमून ॥ होईल सुख साधन ॥ चाल ॥ घालिनों पदरीं चुकीस ॥ नेमितां एका जातीस ॥ प्रवेश नाहीं शूद्रांस ॥ चाल ॥ एक जातीचे सर्व मिळून देशा नाडिती। बाकीचे तोंडाकडे पहाती ॥ जोतीराव बोधी करूं नये एक जात भरती। भरिती होळकरी पोतीं ॥ ५ ॥

## मारवाडी, भट यांचे कसबाविषयीं

॥ अभंग ॥

काया पुरती लंगोटी। फिरती नांगराचे पाठीं ॥ १ ॥ एका घोंगड्यावांचूनी ॥ स्त्रियां नसे दुजे शयनीं ॥ २ ॥ ढोरामागें सर्वकाळ। पोरें फिरती राणोमाळ ॥ ३ ॥ ताक कण्या पोटभरी। धन्य म्हणें संसारीं ॥ ४ ॥ असे वस्त्रांची कमती। एकमेकां चिकटती ॥ ५ ॥ सरकारी पट्टी नेट। पडे तीन शेंडया गांठ ॥ ६ ॥ कर्जरोखीं लिहिणें थाट। निर्दय मारवाडी काट ॥ ७ ॥ आज्ञान्याला समजत नाहीं। कुळकर्ण्यानें लिहिलें कांहीं ॥ ८ ॥ वकीलाची माहागाई। न्यायाधिशा दया नाहीं ॥ ९ ॥ पापपुण्य जेथें नाहीं। पैशापुरते दादा भाई ॥ १० ॥ नित्य जमती एका ठायीं। शूद्रांची दाद नाहीं ॥ ११ ॥ राजे धर्मशील ह्मणविती। आतां कारे मागें घेती ॥ १२ ॥ विद्या द्यावी पट्टीपुरती। धिःकारूनी सांगे जोती ॥ १३ ॥

## भटांच्या मतलबी ग्रंथांचें कसब याविषयीं

॥ अभंग ॥

लेगाच्या उबीत आंगमोड देई ॥ झोंप येत नाहीं ॥ आळशास ॥ १ ॥ दंव थबथबी शेतीं बांधावरी ॥ बैलास चारी ॥ शुक्रोदयीं ॥ २ ॥ उन पाणीं नित्य सोंवळयाचा थाट ॥ संध्येसाठीं पाट ॥ मौन्य सूख ॥ ३ ॥ निटनेट करी गाड्या आऊतासीं ॥ तुटक्या दोरासी ॥ चार घाली ॥ ४ ॥ पायीं चर्मी जोडा निऱ्याचें धोतर ॥ पगडीचा भार ॥ दुनीं वस्त्रें ॥ ५ ॥ उघडा तो बंब लंगोट्या बाहदर ॥ चिंध्या डोईवर ॥ घोंगडी या ॥ ६ ॥ अन्नशुद्धिमिषें तुप भातावर ॥ करी चेष्टाचार ॥ चित्राहूती ॥ ७ ॥ जोंधळयाच्या कण्या ताक पोटभरी ॥ सुखा नाहीं थोरी ॥ नांगऱ्याच्या ॥ ८ ॥ टेकुनी लोडाशीं काम लिहिण्याचें ॥ बोल दिमाखाचे ॥ रेडा जैसा ॥ ९ ॥ आनवाणी पाय मुठ नांगरास ॥ हाकी बैलास ॥ गीत गात ॥ १० ॥ ताट पिकदाणी तेजाळ समयी ॥ द्विज झोंप घेई ॥ बिछान्यांत ॥ ११ ॥ कोरडी तंबाखू चुन्यासवें खाई ॥ गोड झोंप घेई ॥ घोंगडींत ॥ १२ ॥ अवयव बुद्धि दोघांस सारखी ॥ ब्राह्मण कां सुखी ॥ झाला फार ॥ १३ ॥ सत्तेच्या मदानें विद्या बंद केली ॥ शूद्रांही मानिली ॥ सर्वकाळ ॥ १४ ॥ मनु तो जळाला इंग्रजी बा झाली ॥ ज्ञानाची माऊली ॥ पान्हा पाजी ॥ १५ ॥ आतां तरी तुम्हीं मागें घेऊं नका ॥ धिःकारूनी टाका ॥ मनूमतां ॥ १६ ॥ विद्या शिकतांच पावाल तें सुख ॥ घ्यावा माझा लेख ॥ जोती म्हणे ॥ १७ ॥

## भटांचें कसब आणि शूद्रांचा देवभोळेपणा याविषयीं

॥ अभंग ॥

रडूं लागे शेजाऱ्याशीं ॥ आसूं नाहीं डोळे पुसी ॥ १ ॥
मोल घेई रडूं लागे ॥ बहुरूपी आणी सोंगें ॥ २ ॥
सर्वसाक्ष जगत्पती ॥ त्याला नको मध्यस्ती ॥ ३ ॥
विटाळसा तोंडी ताल ॥ करी पुजा घेई मोल ॥ ४ ॥
मुढा देऊनियां थार ॥ पापी करितो बा जप ॥ ५ ॥
वकीलाचा पाड नाहीं ॥ कर्ता आमुचा सर्वन्यायी ॥ ६ ॥
त्राता सर्वांला सारखा ॥ नाहीं कोणाला पारखा ॥ ७ ॥
भोंदू भट शुद्रांघरीं ॥ देई थापा पोटभरी ॥ ८ ॥
ऐका जोतीबाचा सार ॥ घाला देवाजीवर भार ॥ ९ ॥

४

# सत्यशोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकीगत

साधुकी जात मत पुछीयो, पुछो उनका ग्यान ॥
तलवार की किंमत किजीये, पडा रहन देव म्यान ॥

पुणें, तारीख २४ माहे सप्टंबर सन १८७६ इ०

# सत्यशोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकीगत

अध्यक्ष

रा० रा० विश्राम रामजी घोले, डाक्तर.

उपाध्यक्ष

रा० रा० लक्ष्मणराव हरी शिंदे.

चिटणीस

रा० रा० नारायण तुकाराम नगरकर.

खजिनदार

रा० रा० रामशेट बापूशेट उरवणे.

व्यवस्थापक मंडळी

अध्यक्ष

रा० रा० पोलसानी राजन्ना लिंगू, वकील.

सभासद

१. रा० रा० रामचंद्रराव हरी शिंदे
१. अजम इलायजा शालेमन
१. रा० रा० रामशिंग पुरणशिंग
१. रा० रा० विठ्ठल तुळशीराम हिरवे
१. रा० रा० बाळाजी खंडेराव आढाव
१. रा० रा० विनायक बाबाजी ढेंगळे
१. रा० रा० गणपत भास्करजी कोटकर
१. रा० रा० नारायण गोविंदराव कडलक
१. रा० रा० दिनानाथ नारायणराव
१. रा० रा० आनंदराव रामचंद्र कोठावळे
१. रा० रा० हणमंतराव बापूजी साहाणे
१. रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले

१. गेले वर्षी या समाजाचे वाढदिवशीं जे नियम सर्व सभासदांनीं पसंत केले त्या नियमाप्रमाणें आपआपल्या शक्त्यनुसार वागण्यास सर्व सभासदांनीं प्रारंभ करावा, म्हणून डाक्तर विश्राम रामजी घोले यांनीं सूचना केली, ती सर्व सभासदांनीं मान्य केली. त्याप्रमाणें दर आदितवारीं संध्याकाळीं ईश्वरोपासना आणि पंधरा दिवसांनीं शनिवारीं उपयुक्त विषयांवर व्याख्यान देण्याची सुरुवात झाली.

२. ता. १३ माहे नोवेंबर सन १८७५ इ. रोजीं प्रिन्स आफ वेल्स यांची स्वारी या शहरीं आली, त्या दिवशीं सर्व सभासदांनीं मोठ्या आनंदानें जमून त्यांचे आगमन-प्रीत्यर्थ ईश्वराची प्रार्थना केली. रा० कृष्णरावांनीं युवराजांविषयीं निबंध वाचला. नंतर रा० धोंडीराम नामदेव आणि कृष्णराव भालेकर या उभयतांनीं युवराजाचें हिंदुस्थान-देशीं आगमन झालें, याजविषयीं कांहीं नवीन पदें केलीं, तीं सर्व जमलेल्या सभासदांपुढें गाऊन दाखविलीं.

३. अहमदाबादेस गेले सप्टेंबर महिन्यांत जलप्रलय होऊन हजारों लोकांवर अत्यंत मोठें संकट गुदरलें. त्यांचीं घरेंदारें, अन्नवस्त्रें अगदींच नाहींशीं झालीं. अशा समयीं दुःखपीडित बांधवांस सहाय्य करावें म्हणून डाक्तर विश्राम रामजी घोले यांनीं सूचना केली कीं, वर्गणीची याद तयार करून समाजाचे सभासदांकडे आणि समाजाचे हितेच्छु लोकांकडे पाठऊन वर्गणी जमवावी. या सूचनेस रा० रा० रामचंद्रराव हरि शिंदे आणि दुसरे सभासदांनीं अनुमोदन दिलें. सर्वांनीं मोठे आनंदानें आपल्या शक्त्यनुसार वर्गणी दिली. एकंदर वर्गणी १९५ रु० जमली, ती अमदाबादेच्या कलेक्टरसाहेबांच्या मार्फत रिलिफ फंडाचे अधिकाऱ्यांस देण्याकरितां तसेंच इकडून सूचना केल्यावरून मुंबईतील सत्यशोधक समाजाचे सभासद व मित्रमंडळी यांचकडून १३० रु० वर्गणी जमा करून ती परस्पर अमदाबादेस पाठविली.

४. रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले यांनीं केलेल्या गुलामगिरी आणि ब्राह्मणाचें कसब या पुस्तकांच्या प्रत्येक ५० पन्नास ५० पन्नास प्रती समाजास बक्षीस दिल्या. हीं पुस्तकें, आणि समाजाचे नियम हीं श्रीमंत आणि राजे लोक यांजकडे पाठवावीं असें ठरलें.

५. रा० रा० राघवेंद्रराव रामचंद्रराव, ट्रॅन्सलेटर हायकोर्ट यांस समाजानें ब्राह्मणा-शिवाय लाविलेले विवाह कायदेशीर आहेत कीं काय, असें पत्रद्वारें समाजाचे अध्यक्ष यांनीं विचारल्यावरून त्यांनीं कृपा करून असे विवाह कायदेशीर आहेत, याविषयीं कायद्यांतील अनेक प्रमाणें देऊन कळविलें, त्याजबद्दल समाज त्यांचा फार आभारी आहे.

६. समाजाचे नियमांच्या एक हजार प्रती छापवून सर्व सभासद आणि मित्र-मंडळीकडे पाठविल्या.

७. समाजांतील एका गरीब सभासदाचे मुलाचे लग्नाकरितां फंडांतून ३० रुपये बक्षीस देण्याचें समाजानें कबूल केलें आहे, आणि त्याशिवाय समाजाचे मार्फत सभासद व मित्रमंडळीकडूनही वर्गणी जमली आहे.

८. विलायतेंतील व हिंदुस्थानांतील शेतकीमध्यें अंतर कोणकोणतें व हिंदुस्थानांतील शेतकी उत्तम स्थितीस येण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत, या विषयावर जे कोणी शूद्र लोकांपैकीं पुस्तकें तयार करतील, त्यांस डाक्तर विश्राम रा० घोले, आणि रा० रा० रामशेट बापूशेट उरवणे या उभयतांनीं प्रत्येकीं पंचवीस पंचवीस रुपये बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे. ह्यासंबंधीं वर्तमानपत्रांत जाहिरात लवकरच देण्यांत येईल.

९. ज्या लोकांस दिवसा अभ्यास करण्याची सवड नाहीं अशा लोकांकरितां रा० कृ० पा० भालेकर यांनीं सूचना केल्यावरून मौजे भांबुरडे येथें नाइट स्कूल म्हणजे रात्रीची शाळा कशी काय चालते हें पाहण्याकरितां फक्त तीन महिने समाजामार्फत रा० कृष्णराव यांनीं स्थापन करावी असें ठरलें होतें, परंतु जरूरीच्या कामाकरितां त्यांस दुसरे गांवीं जाणें भाग पडलें याजकरितां ते परत आल्यावर शाळा सुरू करतील.

१०. शूद्र लोकांत विद्येची अभिरुचि नाहीं व त्यामध्यें ती उत्पन्न व्हावी याजकरितां त्यांचीं मुलें वाईट मुलांची संगत धरून रस्त्यांत तमाशा वगैरे पाहण्यांत व खेळण्यांत वेळ घालवितात, त्यांस तशी संवय न लागावी म्हणून तीं मुलें दररोज शाळेंत वेळचे वेळेस नेण्याकरितां व घरीं परत पोहचविण्याकरितां समाजानें एक पट्टेवाला पांच रुपये दरमहाचा ता. १७ माहे ज्यानेवारीपासून ११ मेपर्यंत ठेविला होता.

११. मुलांस व मुलींस विद्याभ्यास करण्याचें उत्तेजन यावें म्हणून कापडगंजांतील सरकारी मुलींची शाळा नं. ६ आणि वेताळपेठेंतील मुलींची शाळा नं. ३ या दोन शाळेमधील शूद्रांचे मुलांची परीक्षा घेण्याकरितां खालीं लिहिलेले पांच सभासदांची नेमणूक केली होती.

रा० रा० जोतीराव फुले.
रा० रा० बाळाजी आढाव.
रा० रा० गणपतराव कोटकर.
रा० रा० विठ्ठलराव हिरवे.
रा० रा० विनायकराव ढेंगळे.

सदर्हू सभासदांनीं शाळा नं. ६ तील शूद्रांचे मुलांची परीक्षा घेऊन त्यांच्या योग्यतेनुसार बक्षिसें देण्याचें ठरविलें. मुलांस खाऊ आणि बक्षिसें डाक्तर वि० रा० घोले, समाजाचे अध्यक्ष, यांनीं मोठे आनंदानें वाटलीं. बक्षिसें वाटण्याच्या पूर्वी रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले यांनीं पंतोजींना मुलांस अधिक शिकविण्याचें उत्तेजन यावें म्हणून सुरस भाषण केलें. मुलींच्या शाळेस कांहीं कारणामुळें बक्षिसें देण्यांत आलीं नाहींत, तीं लवकरच दिलीं जातील.

१२. इंजिनियरिंग कालेज्यांत जीं शूद्रांचीं मुलें जातात त्यांपैकीं गरिबांचीं मुलें फुकट घेण्याकरितां तेथील प्रिन्सिपालास समाजमार्फत अर्ज केल्यावरून मेहेरबान कूकसाहेब, इंजिनियरिंग कॉलेजाचे प्रिन्सिपाल, यांनीं दोनतीन गरिबांचीं मुलें फुकट घेतलीं, त्याबद्दल समाज त्यांचा फार आभारी आहे.

१३. आपले लोकांस नीट भाषण करतां यावें म्हणून या वर्षीं समाजाचा वक्तृत्व-समारंभ ता. २२ माहे मे सन १८७६ पासून सुरू होऊन दुसरे दिवशीं समाप्त झाला. त्या वेळेस उमेदवारांनीं हिंदुस्थानांत जातिभेदापासून व्यवहारिक नफे किंवा तोटे आणि मूर्तिपुजेपासून नफे किंवा तोटे या दोन विषयावर भाषणें केलीं. पहिल्या विषयांत रा० द्वारकानाथ त्रिंबक सोनार यांस समाजाचे फंडांतून दहा रुपयांचें आणि रा० गणपत तुकाराम कुऱ्हाडे यांस डॉक्तर वि० रा० घोले यांणीं दिलेलें पांच रुपयांचें, अशीं दोन बक्षिसें दिलीं. दुसऱ्या विषयांत रा० दामोदर बापूजी शिंपी यांस समाजाचे फंडांतून दहा रुपयांचें आणि रा० आनंदराव रणछोडजी यांस रा० रा० रामशेट बापूशेट उरवणे यांनीं दिलेलें पांच रुपयाचें अशीं दोन बक्षिसें दिलीं. बाकी राहिलेला उमेदवार रा० गोपाळ विश्राम घोले यांना उत्तेजन देण्याकरितां रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले यांनीं स्वतः तीन रुपये बक्षिस दिले.

१४. विद्येचा लाभ सर्व लोकांस सारखा व्हावा म्हणून आपल्यापैकीं गरीबगुरीब मुलांचे आईबापांस फी देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें मुलांस शाळेंत पाठवीत नाहींत, याजकरितां त्या कामीं दरमहा पांच रुपये खर्च करावे, असा समाजानें ठराव केला आहे.

१५. रा० निळोबा रामजी कराडे यांची अतिशय गरीबी असल्यामुळें त्यांच्या मुलांचा विद्याभ्यास होण्याकरितां दरमहा एक रुपया समाजाचे फंडांतून देण्याचें ठरविलें आहे. आणि त्या मुलानें आपले पंतोजीपासून महिन्याचे महिन्यास वर्तणुकीसह अभ्यासाचा दाखला आणला पाहिजे, असें समाजाचे म्यानेजिंग कमिटीनें ठरविलें.

१६. खेडेगांवच्या मुलांस विद्या प्राप्त व्हावी म्हणून मौजे हाडपसर येथें समाजमार्फत शाळा स्थापन केली होती. या शाळेचा खर्च चालविण्यास समाजाचे फंडांतून दरमहा ४ रुपये आणि गांवकरी लोकांनीं आपसांत वर्गणी करून दरमहा सहा रुपये जमा करावे, त्या दहा रुपये खर्चानें शाळा चालवावी असा ठराव केला होता, परंतु गांवकरी लोकां-कडून वर्गणी जमा झाली नाहीं, आणि तूर्त समाजास सर्व खर्च करण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून ती शाळा बंद ठेवणें जरूर पडलें.

१७. आपले गरीब लोकांचीं मुलें शेंकडा पांच फुकट घेण्याचा हुकूम मेहेरबान च्याटफील्डसाहेब, डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्त्रकशन, यांनीं सर्व शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांस दिला, त्याबद्दल रा० रा० नरशिंगराव सायबु वडनाला, समाजांतील सभासद, यांचे सूचनेवरून समाज त्यांचा फार आभार मानीत आहे.

१८. या समाजांत आजपर्यंत एकंदर ३१६ सभासद झाले, त्यांपैकीं ह्या वर्षी ८४ नवीन सभासद झाले.

१९. या समाजाचे खरे व स्तुत्य हेतु जाणून सत्यदीपिका, सुबोधपत्रिका, आणि ज्ञानप्रकाश ह्या पत्रकर्त्यांनीं, जी जी योग्य वेळीं मदत अवश्य आणि सत्यास अनुसरून द्यावयाची ती दिली, याजकरितां समाज ह्या वर्तमानकर्त्यांचा फार आभार मानून सर्व शक्तिमान जगताचा उत्पन्नकर्ता ह्यास प्रार्थना करतों कीं, हीं वर्तमानपत्रें चिरकाल चालून तीं असाच सत्याचा प्रकाश जगभर पाडोत.

२०. रा० रा० हरी रावजी चिपळूणकर हे सद्‌गृहस्थ या समाजाचे सभासद नसतां, यांनीं अनाथ शूद्रांचे मुलांस स्कालरशिप्स देण्याकरितां एक साल रु. ६० देण्याचें मोठे उल्हासानें कबूल केलें आहे. त्याप्रमाणें हे गृहस्थ तुकाराम विठूजी चव्हाण, कुळवाडी व पांडुरंग किसन पाडवे, कुंभार या उभयतांस दरमहाचे दरमहा ५ रुपये गेले जानेवारी-पासून समाजमार्फत देत आहेत. पूर्वींपासून हे उदार गृहस्थ विद्यावृद्धीचे कामीं समाजास मदत देत आले आहेत. यास्तव समाजास याप्रसंगीं त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं. अशा गृहस्थासारखी उदार बुद्धि आपल्यापैकीं शूद्र राजेरजवाडे व सधन लोकांस ईश्वर देवो.

२१. रा० रा० रामचंद्र मनसाराम ढवारे नाईक, प्रसिद्ध कंट्राक्टर, या सद्‌गृहस्थांची पेठ वेताळ येथें मोठी दोन मजली हवेली आहे. ती हवेली दुसरे मारवाडी हुंडीवाले लोक सोळा रुपये दरमहा देऊन भाड्यानें मागत आहेत, इतक्यांत समाजाचे अध्यक्ष विश्राम रामजी घोले डाक्तर यांनीं त्वरा करून सदरीं लिहिलेल्या गृहस्थांस समाजास जाग्याची अतिशय अडचण आहे याविषयीं कच्ची हकीकत कळविल्याबरोबर त्यांनीं आपले स्वतःचे सहा रुपये दरमहाचें नुकसान करून ती हवेली समाजाचे उपयोगाकरितां फक्त दहा रुपये दरमहा भाड्यानें समाजास दिली. इतकें करून ते सद्‌गृहस्थ स्वस्थ बसले असें नाहीं. परंतु ते समाजाचे सभासद नसतां त्यांनीं चालू सालाकरितां समाजास वीस रुपये वर्गणी देऊन वरचेवर उदार गृहस्थ समाजास उत्तेजन देत आहेत. अशा तऱ्हेचे लोक या देशांत निवडल्याशिवाय या देशाची बढती होणें कठीण. त्याचप्रमाणें रा० रा० गंगाराम भाऊ म्हसके, बाजारमास्तरचे शिरस्तेदार, यांनीं समाजास या सालीं कित्येक सत्कृत्यांकरिता २२ रुपये वर्गणी दिली, त्याबद्दल समाज त्यांचे आभार मानीत आहे.

२२. श्री० रा० रा० हरी गणेश पटवर्धन उर्फ अण्णासाहेब सांगलीकर हे सभ्य गृहस्थ ब्राह्मण लोकांपैकीं बडे लोक असून, समाजाचे सभासद नसतां, समाजाचे मुख्य सभानायकाकडून समाजाचा स्तुत्य हेतु त्यांस समजतांच त्यांना शूद्र लोकांचा खरा

कळवळा आल्यामुळें, त्यांनीं चालू सालाकरितां पस्तीस रुपये वर्गणी दिली, यास्तव समाज त्यांचा फार आभारी आहे. याचेंच नांव सत्याभिमान आणि याचेंच नांव मनुष्यमात्राचा कळवळा !

२३. रा० रा० जाया काराडी लिंगु यांनीं दरसाल २५ रुपये शूद्रांचे अनाथ मुलांस विद्येचा लाभ व्हावा म्हणून स्कॉलरशिप देण्याचें कबूल केलें आहे. त्याबद्दल समाज त्यांचा फार आभारी आहे. त्या रकमेंतून रा० सखाराम सटवाजी भोंगळे समाजाचे सभासदांपैकीं असून थोडे दिवसांपूर्वी मरण पावले, त्यांचे मागें त्यांची स्त्री अर्धवट अंधळी असून तिजला लहान दोन मुलें आहेत आणि गरिबी फार आहे, असें समाजानें पाहून त्या मुलांचा अभ्यास व्हावा म्हणून, ती बाई त्या मुलांस जोंपर्यंत शाळेंत पाठवील व तीं मुलें लक्ष लावून अभ्यास करतील तोंपर्यंत, दरमहा दोन रुपये ता. १ माहे मार्च सन १८७६ इसवीपासून समाज देत आहे.

२४. रा० रा० तुकाराम तात्या मुंबईकर यांजकडून गरीब शूद्रांचे मुलांनीं विद्याभ्यास करावा म्हणून साह्य देण्याकरितां आलेले रुपये १२ आणि समाजाचे फंडांतून रुपये ४ एकूण रुपये १६, विद्यार्थी सखाराम मचाले यास दरमहा रुपये २ प्रमाणें मे महिन्यापासून डिसेंबर सन १८७६ अखेरपर्यंत समाजानें देण्याचें कबूल केलें आहे. हा विद्यार्थी येत्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेस जाणार आहे, आणि त्याबद्दल समाजानें दहा रुपये प्रवेश फी त्यास दिली आहे.

२५. रा० रा० कैलासवासी जाया एल्लापा लिंगु यांनीं म्याट्रिक्युलेशन परीक्षेमध्यें शूद्र लोकांचीं जीं मुलें पसार होतील त्यांपैकीं उत्तमास सोन्याचें पदक देण्याकरितां दरसाल पंचवीस रुपये देण्याचें कबूल करून एक सालचे रु. ही दिले आहेत. हें पदक अद्याप देण्यांत आलें नाहीं.

२६. रा० रा० कैलासवासी एल्लापा लिंगु, सत्यशोधक समाजाचे सभासद, यांस अल्प वयांत देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान समाजास कळल्यावरून त्यांचे धाकटे बंधु रा० रा० जाया काराडी लिंगु आणि कुटुंब यांचे दुःखशमनार्थ समाजमार्फत पत्र पाठविलें. आणि हे गृहस्थ दयाळू आणि समाजाची वृद्धि व्हावी म्हणून अंतःकरणपूर्वक झटत होते. अशा सद्गुणी मनुष्याची समाजांत चिरकाळ आठवण रहावी म्हणून समाजाचे व्यवस्थापक मंडळीनें असें ठरविलें आहे कीं, दोन वर्गणीच्या यादी तयार करून एक पुण्यांतील सभासद आणि त्यांचे मित्रमंडळीमध्यें फिरवावी व दुसरी याद मुंबईस वर्गणी जमा करण्याकरितां पाठवावी, आणि जी रक्कम जमा होईल ती सरकारी किंवा सावकारी ब्यांकेमध्यें ठेवून त्यापासून जें व्याज मिळेल त्यामधून समाजाचे वार्षिक वक्तृत्वसमारंभाच्या वेळीं या गृहस्थांच्या नांवानें एक बक्षीस समाजांतील उत्तम भाषण करणाऱ्या उमेदवारास दिलें जावें.

२७. समाजमार्फत बोर्डिंगगृह म्हणजे बाहेरगांवचे शूद्र विद्यार्थी मुलांचे जेवणाची, राहण्याची आणि नीट विद्याभ्यास करण्याची सोय व्हावी, असें गृह स्थापन करावें म्हणून त्याविषयीं विचार करून समाजास रिपोर्ट करावा, याजकरितां खालीं लिहिलेले पांच गृहस्थांची सबकमिटी नेमली आहे:—

रा० रा० गंगाराम भाऊ म्हस्के, रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले, रा० रा० पो. राजन्ना लिंगू वकील, रा० रा० लक्षुमणराव हरी शिंदे, रा० रा० विनायकराव भांडारकर.

२८. रा० रा० व्यंकु बाळोजी काळेवार आणि रामय्या व्यंकय्या अय्यावारू, यांनीं प्रथम मेहेरबान होऊन समाजास छापखाना दिला आहे. त्याविषयीं सुमारें एक वर्ष मालकीच्या हक्काचे संबंधानें येथील आणि मुंबईतील सभासदांमध्यें पत्रव्यवहार होऊन दिलेला छापखाना ते परत नेणार आहेत.

२९. समाजाचे उत्पन्नाचा आणि खर्चाचा गोषवारा येणेंप्रमाणें:—

**जमा**

| | |
|---|---|
| ०९०३ | शिल्लक सालगुदस्त |
| २३२०४ | पुण्यांतील सभासदांकडून आलेली वार्षिक वर्गणी. |
| २६ | बाहेरगांवीं राहणारे सभासदांकडून आलेली वर्गणी. |
| १३४०१४ | पुण्यांतील समाजाचे मित्रमंडळीकडून समाजास उत्तेजन येण्याकरितां साहाय्य. |
| १२ | मुंबईतील मित्रमंत्रळीकडून सहाय्य. |
| ११९ | पुण्यांतील सभासदांकडून अमदाबाद रिलीफ फंडाकरितां आलेली वर्गणी. |
| ६८ | मुंबईतील सभासदांकडून अमदाबाद रिलीफ फंडाकडे गेलेली मदत. |
| ६६ | पुण्यांतील समाजाच्या मित्रमंडळीकडून अमदाबाद रिलीफ फंडाकरितां जमलेली वर्गणी. |
| ७२ | मुंबईतील समाजाच्या मित्रमंडळीकडून अमदाबाद रिलीफ फंडाकडे गेलेली मदत. |
| १३ | पुण्यांतील सभासदांकडून शूद्रलोकांत वक्तृत्वास उत्तेजन येण्याकरितां वर्गणी. |
| १८ | पुण्यांतील सभासद व मि०मंडळीकडून रा० कुशाबा यांच्या मुलाच्या लग्नाकरितां दिलेली वर्गणी. |
| ५०१०६ | समाजगृहाचा कांहीं भाग भाड्यानें दिला त्याचें भाडें आलें तें. |
| ७६६ ०१२ ०९ | एकूण |

## खर्च

| | |
|---|---|
| ११॰॰३ | प्रिन्स आफ वेल्स यांच्या सन्मानार्थ. |
| ३२५ | अमदाबाद येथील दुःखपीडित लोकांस मदत. |
| ७॰१३॰६ | पुण्यांतील गरीब शूद्र लोकांच्या मुलांकरितां सरकारी शाळेंतील फी. |
| ७२॰८ | पुण्यांतील गरीब शूद्र लोकांच्या मुलांस स्कालरशिपीबद्दल. |
| ४३॰३॰६ | शूद्र लोकांस उत्तेजन येण्याकरितां वक्तृत्वसमारंभ. |
| ५६ | शूद्रलोकांतील श्री० व गरीब लोकांस पुस्तकें देण्याकरितां खरिदी. |
| ९॰११ | सरकारी शाळेंतील गरीब शूद्र लोकांच्या मुलांस उत्तेजन येण्याकरितां कपडे व खाऊ. |
| ११॰१॰३ | रा० रा० व्यंकु बाळोजी काळेवार आणि रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या छापखान्याबद्दल खर्च. |
| १९॰१२ | पट्टेवाल्याकरितां बकलासुद्धां पट्टे तयार करणावळ. |
| २९॰१॰ ६ | समाजाच्या उपयोगाकरितां सामानखरेदी. |
| ३६ | समाजगृहाच्या भाड्याबद्दल. |
| २०॰१२ | नियम व नोटिसा वगैरे छापणावळ. |
| ६॰१४॰६ | प्रार्थनासमयीं सारमंडळ वगैरे वाद्याकरितां खर्च. |
| ५॰१५॰३ | रोषनाईकरितां खोबरेल आणि गोडें तेल. |
| ९॰१४॰६ | किरकोळ खर्च. |
| ७८॰॰९ | समाजाकडील नौकर लोकांचा पगार. |
| २४॰॰९ | रोख शिल्लक. |
| ७६६॰१२॰९ | एकूण. |

**रामचंद्र बापूशेट उरवणे**
स० शो० स० खजिनदार

३०. गेले वर्षीं समाजाचे जनरल सभेनें जे नियम पसंत केले होते त्या नियमांपैकीं ९ व्या नियमाचा पोटनेम म्हणजे दुसऱ्या पोटनियमाप्रमाणें आपले बहुतेक लोकांस सांप्रत वागण्यास सुलभ नाहीं, म्हणून तो नियम या वर्षीं तूर्त काढलेला आहे आणि त्याच नियमाच्या चौथ्या पोटनियमाचा, २३ व्या नियमाच्या तिसऱ्या पोटनियमांत समावेश होतो म्हणून तोहि काढिला आहे आणि कांहीं सभासदांच्या अनुभवावरून दुसरे नियमांतही थोडासा व्यवस्थापक मंडळीनें फेरफार केला आहे, आणि ते नियम आतां जनरल सभेच्या पसंतीकरितां वाचून दाखविले जातील.

३१. वरील हकीगतीवरून समाजानें आपले शक्त्यनुसार आजपर्यंत जीं कामें केलीं तीं सर्व लोकांच्या लक्षांत आलींच असतील. हा समाज कायम राहून त्याचें काम योग्य रीतीनें चालल्यास याचा आपले सर्व लोकांस किती उपयोग आहे हें सांगावयास नको. परंतु तसें होण्यास विद्वान, शहाणे, द्रव्यवान व झटून काम करणारे गृहस्थांची मोठी जरूरी आहे आणि जोपर्यंत असे लोकांची संख्या समाजांत अधिक वाढत नाही किंवा जे सभासद आहेत ते नियमानें समाजांत येत नाहींत, तोंपर्यंत ह्या समाजाचा जसा उर्जित काळ व्हावा तसा होणार नाहीं, हें पक्कें प्रत्येक सभासदानें समजावें. समाजानें जीं मोठीं महत्त्वाचीं कामें हातीं धरलीं आहेत, तीं जितकीं लवकर व्हावीं असें आपण इच्छितों तशीं होत नाहींत, तर आतां आमच्यापैकीं विद्वान आणि शहाणे लोकांस अशी विनंती आहे कीं, आपल्यांत अशी म्हण आहे कीं, "गेलेली वेळ पुनः परत येत नाहीं." तर ह्या म्हणीप्रमाणें आपण जर आपले लोकांत सुधारणा करण्याची जी सवड दयाळू इंग्रज सरकारच्या राज्यांत आपणास मिळाली आहे, ती घालविली असतां आपण आपले पुढें होणारे संततीचें फार अनहित करूं. तर अशी उत्तम वेळ न दवडितां सर्व लोकांनीं समाजास जितकी मदत देववेल तितकी दिली असतां आपलें लोकांचें कल्याण होणार आहे.

**नारायण तुकाराम नगरकर**
स. शो. स. चिटणीस

पुणें सत्यशोधक समाजाचे सभासद व मित्रमंडळी यांजकडून आलेली वार्षिक वर्गणी व सत्कार्यार्थ बक्षिसें, ता. २४ माहे सप्तंबर सन १८७५ तागाईत ता. २४ माहे सप्तंबर सन १८७६.

| नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम | नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|---|
| सभासद | रु. आ. पै. | सभासद | रु. आ. पै. |
| अव्वल रोख शिल्लक | ०–९–३ | श्री० रा० रा० रामचंद्रराव रुपराम चौधरी | २१–०–० |
| रा० रा० विश्राम रामजी घोले डाक्तर | ६०–०–० | रा० रा० रामय्या व्यंकय्या आय्यावारू, मुंबई | १७–०–० |
| रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले | ५१–०–० | रा० रा० नागाप्पा रामस्वामी डाक्तर | १५–०–० |
| रा० रा० रामशेट बापूशेट उरवणे, आडती | ५५–०–० | रा० रा० रामचंद्रराव हरि शिंदे | १५–०–० |
| रा० रा० पो० राजन्ना लिंगू | २१–०–० | | |

| नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम |
|---|---|
| सभासद | रु. आ. पै. |
| रा० रा० तुकाराम हणमंतराव पिंजन | १३–८–० |
| रा० रा० बाळाजी खंडेराव आढाव | १२–०–० |
| रा० रा० जाया काराडी लिंगू, मुंबई | ११–०–० |
| श्री० रा० रा० जयसिंगराव आंग्रे | १०–०–० |
| रा० ब० बाळकृष्ण देवराव डेप्युटी कलेक्टर | १०–०–० |
| रा० ब० मारुतराव भुजंगराव ने० आ० पो० सु० | १०–०–० |
| रा० रा० व्यंकु बाळुजी काळेवार, मुंबई | १०–०–० |
| रा० रा० जाया नागू परभाजी, मुंबई | १०–०–० |
| रा० रा० देवजी यल्लाप्पा कंट्र्याक्टर | ७–०–० |
| रा० रा० नारायणराव तुकाराम नगरकर | ६–०–० |
| रा० रा० हणमंतराव बापूजी साहाने | ५–८–० |
| रा० रा० जयसिंगराव सायबू वडनाला, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० बापूजी इरापा कोरबा, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० राजू बाबाजी वंजारी, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० पोचेटी पोचय्या निंगाल, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० इराप्पा मस्नाजी पत्ती, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० दिनानाथजी नारायण राव | ४–८–० |
| रा० रा० रामसिंग सुर्णसिंग | ४–०–० |
| रा० रा० धरमशेट विठोबा हेड रायटर, खडकी | ४–०–० |
| रा० रा० मुरारजी विठोबा हेड रायटर, मुंबई | ४–०–० |
| रा० रा० लक्ष्मण हरी शिंदे पो० इ० | ४–०–० |
| रा० रा० रामभाऊ देवजी पोळे | ४–०–० |
| रा० रा० रामचंद्र विठोबा धामणसकर, हेडक्लार्क, सातारा | ४–०–० |
| मि० इलाइजा सालीमन, रायटर | ३–८–० |
| रा० रा० शिवाप्पा राजन्ना डाक्तर | ३–०–० |
| रा० रा० गणपतराव भास्करजी कोटकर | २–८–० |
| रा० रा० नारायण गोविंदराव कडलक | २–८–० |
| रा० रा० दिनकरराव मुल्हारराव तावरे | २–८–० |
| रा. रा. ग्यानु मल्हारजी झगडे, मेस्त्री | २–८–० |
| रा० रा० नारायणराव सजणाजी डाक्तर | २–०–० |
| रा० रा० सायन्ना अबू ओवर्सियर | २–०–० |

| नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम | नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|---|
| सभासद | रु. आ. पै. | सभासद | रु. आ. पै. |
| रा० रा० बाबाजी मानाजी ढेंगळे, व्यापारी | २-०-० | रा० रा० बाळकृष्ण नारायण फुटाणे | १-०-० |
| रा० रा० येशवंतराव राघोबा कांबळे | २-०-० | रा० रा० सीताराम जबाजी आल्हाट | १-०-० |
| रा० रा० विंगोजी घोटना | २-०-० | रा० रा० आनंदराव रामचंद्र | १-०-० |
| रा० रा० रामजति भगवानजति | २-०-० | रा० रा० धोंडीराम नामदेव कुंभार | १-०-० |
| रा० रा० केदारगीर देवगीर | २-०-० | रा० रा० दुर्गासिंग सुभेदार | १-०-० |
| रा० रा० नरसू नरसाप्पा नेल्ला, मुंबई | २-०-० | रा० रा० रामजी जाधव पेन्शनर | १-०-० |
| रा० रा० आलया व्यंकया आयावारू, पांचगणी | २-०-० | रा० रा० विठ्ठलराव महादेव गुठाळ | १-०-० |
| रा० रा० विठ्ठल तुळशिराम हिरवे | १-१२-० | रा० रा० कासुला इराप्पा लिंगू | १-०-० |
| रा० रा० सुरतसिंग रामदीन | १-१०-० | रा० रा० दाजी सभाराम चव्हाण | १-०-० |
| रा० रा० मोहोनाजी गिरमाजी रायटर | १-१०-० | रा० रा० नारायण हरि माने | ०-१२-० |
| रा० रा० नाना बजाबा कारखाणनवीस | १-८-० | रा० रा० विठ्ठल हैबतराव टिळेकर | ०-८-० |
| रा० रा० हरि गोविंदराव कडलक | १-८-० | रा० रा० रामजी संताजी शिंदे, नगरकर | ०-८-० |
| रा० रा० विनायकराव बाबाजी ढेंगळे | १-८-० | घरभाडें जमा | ५-१-० |

## मित्र

| | | | |
|---|---|---|---|
| रा० रा० हरि रावजी चिपळूणकर | ५२-८-० | रा० रा० रामभाऊ मंचाराम ढवारे नाईक | २०-०-० |
| श्री० रा० रा० हरि गणेश पटवर्धन | ३५-०-० | रा० रा० सीताराम सखाराम दातार | २०-०-० |
| रा० रा० सुपा नरसाप्पा कंट्राक्टर | २५-०-० | रा० रा० गंगाराम भाऊ म्हसके | २०-०-० |

| नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम |
|---|---|
| | रु. आ. पै. |
| रा० रा० सखाराम बाळकृष्ण पेन्शनर स्कूल मास्तर | १५–०–० |
| रा० रा० तुकाराम तात्या व्यापारी, मुं. | १२–०–० |
| रा० रा० नारायणशेट तात्या शेट, वाळेकर | १०–०–० |
| रा० रा० नागू सयाजी कंट्राक्टर, मुंबई | १०–०–० |
| रा० रा० धर्माजी नरसू, मुंबई | १०–०–० |
| रा० रा० राजन्ना जळू | १०–०–० |
| रा० रा० कृष्णाजी जेथाजी-शेट मारवाडी | ५–०–० |
| रा० रा० शिवराम सायन्ना ओवरसियर | ५–०–० |
| रा० रा० राजन्ना सायबू, मुंबई | ५–०–० |
| रा० रा० विनायकराव बापूजी भांडारकर, हे० आ० | ५–०–० |
| रा० रा० बाबाजी शिंदापाशेट | ३–०–० |
| रा० रा० गंगाजी नरसू डाक्तर, मुंबई | [illegible]–०–० |
| सौ० सावित्रीबाई भ्रतार जोतीराव फुले | [illegible]–०–० |

| नांव | वर्गणीची व बक्षिसाची रक्कम |
|---|---|
| | रु. आ. पै |
| रा० रा० मौनाजी नरसू, मुंबई | २–०–० |
| रा० रा० व्यंकू नरसू, मुंबई | २–०–० |
| रा० रा० नागू नरसू, मुंबई | २–०–० |
| रा० रा० लक्ष्मणराव तुकाराम नगरकर, आडती | १–०–० |
| रा० रा० लक्ष्मणशेट गुळवे | १–०–० |
| रा० रा० तात्या मरमाप्पा | १–०–० |
| रा० रा० अण्णा मरमाप्पा | १–०–० |
| रा० रा० दामूचंद पाडळीकर | १–०–० |
| रा० रा० मोतीराम मुरार गुजर | १–०–० |
| रा० रा० सदोबा तोडकरी, ताराळे | १–०–० |
| रा० रा० बाबाजी तोडकरी | १–०–० |
| रा० रा० पुनाल काराडी, मुंबई | १–०–० |
| रा० रा० जिलकर राजन्ना, मुंबई | १–०–० |
| रा० रा० आनंदराव, मुंबई | १–०–० |
| रा० रा० हणमंतराव जगदाळे | ०–६–० |
| एकूण सातशें सहासष्ट रुपये बारा आणे नऊ पै | ७६६–१२–९ |

**रामचंद्र बापूशेट उरवणे.**
सत्यशोधक समाजाचे खजिनदार.

**V. R. GHOLLEY.**
सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष.

# ५

# दुष्काळविषयक विनंतिपत्रक

# दुष्काळविषयक विनंतिपत्रक

मेहेरबान पुणे मुंबई वगैरे ठिकाणचे सभासद यांस वि० वि० समाजाचे हुकुमावरून आपणांस विनंतिपूर्वक असें कळविण्यांत येतें कीं, समाजाचे मार्फत "व्हिक्टोरिया बालाश्रम" स्थापन केलें आहे. घरांत दुष्काळपीडित लोक आपलीं मुलें सोडून जाऊं लागले आहेत, व त्याप्रमाणें इंदापूर व मिरज व तासगांवकडील ब्राह्मणजातखेरीज करून बाकी सर्व जातींतील कित्येक अनाथ लोक आपलीं मुलेंबाळें घेऊन जमले आहेत. कधीं कधीं दोन दोन तीन तीन दिवसांचे उपवास काढून त्यांचीं हाडें मात्र उरलीं आहेत. शिवाय त्यांचे वस्त्रावांचून इतके हाल झाले आहेत कीं त्यांचे येथें इत्थंभूत वर्णन करण्यास मला दुःख वाटतें. यावरून आपण सर्व सभासदांनीं व इतर दयावंत गृहस्थांनीं कृपाळू होऊन, आपल्या शक्तीनुसार कांहीं ना कांहीं तरी, ही जाहिरात पाहतांच, मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपलें कर्तव्यकर्म अशा वेळीं बजावल्याचें श्रेय होणार आहे.

ता. १७ माहे मे, सन १८७७ इ०,

आपला सेवक

**जोतीराव गोविंदराव फुले,**

स० शो० स० चिटणीस.

(ज्ञानप्रकाश, २४ मे १८७७ वरून)

६

# हंटर-शिक्षणआयोगापुढें सादर केलेलें निवेदन

# Memorial Addressed To The Education Commission

**A Statement for the information of the Education commission.**[1]

My experience in educational matters is principally confined to Poona and the surrounding villages. About 25 years ago, the missionaries had established a female school at Poona but no indigeneous school for girls existed at the time. I, therefore, was induced, about the year 1854,* to establish such a school, and in which I and my wife worked together for many years. After some time I placed this school under the management of a committee of educated natives. Under their auspices two more schools were opened in different parts of the town. A year after the institution of the female schools, I also established an indigeneous mixed school for the lower classes, especially the Mahars and Mangs. Two more schools for these classes were subsequently added. Sir Erskine Perry, the president of the late Educational Board, and Mr. Lumsdain, the then Secretary to Government, visited the female schools and were much pleased with the movement set on foot, and presented me with a pair of shawls. I continued to work in them for nearly 9 to 10 years, but, owing to circumstances, which it is needless here to detail, I seceded from the work. These female schools still exist,

---

१. इंग्रज सरकारनें स. १८८२ सालीं शिक्षणविषयक प्रश्नासंबंधीं विचार करण्यासाठीं नेमलेल्या हंटर-शिक्षणआयोगापुढें म. फुले यांनीं सादर केलेलें निवेदन.

* हा मुद्रण दोष असावा. १८५१ असें असावयास पाहिजे.

having been made over by the committee to the Educational Department under the management of Mrs. Mitchell. A school for the lower classes, Mahars and Mangs, also exists at the present day, but not in a satisfactory condition. I have also been a teacher for some years in a mission female boarding school. My principal experience was gained in connection with these schools. I devoted some attention also to the primary education available in this Presidency and have had some opportunities of forming an opinion as to the system and *personnel* employed in the lower schools of the Educational Department. I wrote some years ago a Marathi pamphlet exposing the religious practices of the Brahmins, and, incidentally among other matters, adverted therein to the present system of education, which, by providing ampler funds for higher education, tended to educate Brahmins and the higher classes only, and to leave the masses wallowing in ignorance and poverty. I summarised the views expressed in the book in an English preface attached thereto, portions of which I reproduce here so far as they relate to the present enquiry:—

"Perhaps a part of the blame in bringing matters to this crisis may be justly laid to the credit of the Govt. Whatever may have been their motives in providing ampler funds and greater facilities for higher education, and neglecting that of the masses, it will be acknowledged by all that in justice to the latter, this is not as it should be. It is an admitted fact that the greater portion of the revenues of the the Indian Empire are derived from the ryot's labour—from the sweat of his brow. The higher and richer classes contribute little or nothing to the state exchequer. A well-informed English writer states that our income is derived, not from surplus profits, but from capital; not from luxuries, but from the poorest necessaries. It is the product of sin and tears.

"That Government should expend profusely a large portion of revenue thus raised, on the education of the higher classes, for it is these only who take advantage of it, is anything but just or equitable. Their object in

patronising this virtual high class education appears to be to prepare scholars who, it is thought, would in time vend learning without money and without price. If we can inspire, say they, the love of knowledge in the minds of the superior classes, the result will be a higher standard, of morals in the cases of the individuals, a large amount of affection for the British Government, and unconquerable desire to spread among their own countrymen the intellectual blessings which they have received.

"Regarding these objects of Government the writer above alluded to, states that we have never heard of philosophy more benevolent and more utopion. It is proposed by men who witness the wondrous changes brought about in the Western world, purely by the agency of popular knowledge, to redress the defects of the two hundred millions of India, by giving superior education to the superior classes and to them only...We ask the friends of Indian Universities to favour us with a single example of the truth of their theory from the instances which have already fallen within the scope of their experience. They have educated many children of wealthy men and have been the means of advancing very materially the worldly prospects of some of their pupils. But what contribution have these made to great work of regenerating their fellowmen? How have they begun to act upon the masses? Have any of them formed classes at their own homes or elsewhere, for the instruction of their less fortunate or less wise countrymen? Or have they kept their knowledge to themselves, as a personal gift, not to be soiled by contact with the ignorant vulgar? Have they in any way shown themselves anxious to advance the general interests and repay the philanthropy with patriotism? Upon what grounds is it asserted that the best way to advance the moral and intellectual welfare of the people is to raise the standard of instruction among the higher classes? A glorious argument this for aristocracy, were it only tenable. To show the growth of the national happiness, it would only be necessary to refer to the number of pupils at the

colleges and the lists of academic degrees. Each wrangler would be accounted a national benefactor; and the existence of Deans and Proctors would be associated, like the game laws and the ten-pound franchise, with the best interests of the constitution.

" One of the most glaring tendencies of Government system of high class education has been the virtual monopoly of all the higher offices under them by Brahmins. If the welfare of the Ryot is at heart, if it is the duty of Government to check a host of abuses, it behoves them to narrow this monopoly day by day so as to allow a sprinkling of the other castes to get into the public services. Perhaps some might be inclined to say that it is not feasible in the present state of education. Our only reply is that if Government look a little less after higher education which is able to take care of itself and more towards the education of the masses there would be no difficulty in training up a body of men every way qualified and perhaps far better in morals and manners.

" My object in writing the present volume is not only to tell my Shudra brethren how they have been duped by the Brahmins, but also to open the eyes of Government to that pernicious system of high class education, which has hitherto been so persistently followed, and which statesmen like Sir George Campbell, the present Lieutenant Governor of Bengal, with broad universal sympathies, are finding to be highly mischievous and pernicious to the interests of Government. I sincerely hope that Government will ere long see the error of their ways, trust less to writers or men who look through highclass spectacles, and take the glory into their own hands of emancipating my Shudra brethren from the trammels of bondage which the Brahmins have woven around them like the coils of a serpent. It is no less the duty of each of my Shudra brethren as have received any education, to place before Government the true state of their fellowmen and endeavour to the best of their power to emancipate themselves from Brahmin thraldom. Let there be schools for the

Shudras in every village; but away with all Brahmin school-masters! The Shudras are the life and sinews of the country, and it is to them alone, and not to the Brahmins, that Government must ever look to tide over their difficulties, financial as well as political. If the hearts and minds of the Shudras are made happy and contented, the British Government need have no fear for their loyalty in the future.

JOTEERAO PHOOLEY.

## PRIMARY EDUCATION

There is little doubt that primary education among the masses in this Presidency has been very much neglected. Although the number of primary schools now in existence is greater than those existing a few years ago, yet they are not commensurate to the requirements of the community. Government collect a special cess for educational purposes, and it is to be regretted that this fund is not spent for the purposes for which it is collected. Nearly nine-tenths of the villages in this Presidency, or nearly 10 lakhs of children, it is said, are without any provision, whatever, for primary instruction. A good deal of their poverty, their want of self-reliance, their entire dependence upon the learned and intelligent classes, is attributable to this deplorable state of education among the peasantry.

Even *in towns* the Brahmins, the Purbhoos, the hereditary classes, who generally live by the occupation of pen, and the trading classes seek primary instruction. The cultivating and the other classes, as a rule, do not generally avail themselves of the same. A few of the latter class are found in primary and secondary schools, but owing to their poverty and other causes they do not continue long at school. As there are no special inducements for these to continue at school, they naturally leave off as soon as they find any menial or other occupation. In *villages* also most of the cultivating classes hold aloof, owing to extreme poverty, and also because they require their children to

tend cattle and look after their fields. Besides an increase in the number of schools, special inducements in the shape of scholarships and half-yearly or annual prizes, to encourage them to send their children to school and thus create in them a taste for learning, is most essential. I think primary education of the masses should be made compulsory up to a centain age, say at least 12 years. Muhammadans also hold aloof from these schools, as they some-how evince no liking for Marathi or English. There are a few Muhammadan primary schools where their own language is taught. The *Mahars*, *Mangs*, and other lower classes are practically excluded from all schools owing to caste prejudices, as they are not allowed to sit by the children of higher castes. Consequently special schools for these have been opened by Government. But these exist only in large towns. In the whole of Poona and for a population exceeding over 5,000 people, there is only one school, and in which the attendance is under 30 boys. This state of matters is not at all creditable to the educational authorities. Under the promise of the Queen's Proclamation I beg to urge that Mahars, Mangs, and other lower classes, where their number is large enough, should have separate schools for them, as they are not allowed to attend the other schools owing to caste prejudices.

In the present state of education, payment by results is not at all suitable for the promotion of education amongst a poor and ignorant people, as no taste has yet been created among them for education. I do not think any teacher would undertake to open schools on his own account among these people, as he would not be able to make a living by it. Government schools and special inducements, as noted above, are essential until such a taste is created among them.

With regard to the few Government primary schools that exist in the Presidency, I beg to observe that the primary education imparted in them is not at all placed on a satisfactory or sound basis. The system is imperfect in so far as it does not prove practical and useful in the

future career of the pupils. The system is capable of being developed up to the requirement of the community, if improvements that will result in its future usefulness be effected in it. Both the teaching machinery employed and the course of instruction now followed, require a thorough remodelling.

(a) The teachers now employed in the primary schools are almost all Brahmins; a few of them are from the normal training college, the rest being all untrained men. Their salaries are very low, seldom exceeding Rs. 10, and their attainments also very meagre. But as a rule they are all unpractical men, and the boys who learn under them generally imbibe inactive habits and try to obtain service, to the avoidance of their hereditary or other hardy or independent professions. I think teachers for primary schools should be trained, as far as possible, out of the cultivating classes, who will be able to mix freely with them and understand their wants and wishes much better than a Brahmin teacher, who generally holds himself aloof under religious prejudices. These would, moreover, exercise a more beneficial influence over the masses than teachers of other classes, and who will not feel ashamed to hold the handle of a plough or the carpenter's adze when required, and who will be able to mix themselves readily with the lower orders of society. The course of training for them ought to include, besides the ordinary subjects, an elementary knowledge of agriculture and sanitation. The untrained teachers should, except when thoroughly efficient, be replaced by efficient trained teachers. To secure a better class of teachers and to improve their position, better salaries should be given. Their salaries should not be less than Rs. 12 and in larger villages should be at least Rs. 15 or 20. Associating them in the village polity as auditors of village accounts or registrars of deeds, or village postmasters or stamp vendors, would improve their status, and thus exert a beneficial influence over the people among whom they live. The schoolmasters of village schools who pass a large number of boys should also get some special

allowance other than their pay, as an encouragement to them.

(b) The course of instruction should consist of reading, writing Modi, and Balbodh and accounts, and a rudimentary knowledge of general history, general geography, and grammar, also an elementary knowledge of agriculture and a few lessons on moral duties and sanitation. The studies in the village schools might be fewer than those in larger villages and towns, but not the less practical. In connection with lessons in agriculture, a small model farm, where practical instruction to the pupils can be given, would be a decided advantage and, if really efficiently managed, would be productive of the greatest good to the country. The text-books in use, both in the primary and Anglo-vernacular schools, require revision and recasting, inasmuch as they are not practical or progressive in their scope. Lessons on technical education and morality, sanitation and agriculture, and some useful arts, should be interspersed among them in progressive series. The fees in the primary schools should be as 1 to 2 from the children of cess-payers and non-cess-payers.

(c) The supervising agency over these primary schools is also very defective and insufficient. The Deputy Inspector's visit once a year can hardly be of any appreciable benefit. All these schools ought at least to be inspected quarterly if not oftener. I would also suggest the advisability of visiting these schools at other times and without any intimation being given. No reliance can be placed on the district or village officers owing to the multifarious duties devolving on them, as they seldom find time to visit them, and when they do, their examination is necessarily very superficial and imperfect. European Inspector's supervision is also occasionally very desirable, as it will tend to exercise a very efficient control over the teachers generally.

(d) The number of primary schools should be increased—

(1) By utilising such of the indigenous schools as Ilsha be or are conducted by trained and certificated teachers, by giving them liberal grants-in-aid.
(2) By making over one half of the local cess fund for primary education alone.
(3) By compelling, under a statutory enactment, municipalities to maitain all the primary schools within their respective limits.
(4) By an adequate grant from the provincial or imperial funds.

Prizes and scholarships to pupils, and capitation or other allowance to the teachers, as an encouragement, will tend to render these schools more efficient.

The Muncipalities in large towns should be asked to contribute whole share of the expenses incurred on primary schools within the municipal areas. But in no case ought the management of the same to be entirely made over to them. They should be under the supervision of the Educational Department.

The municipalities should also give grants-in-aid to such secondary and private English schools as shall be conducted according to the rules of the Educational Department, where their funds permit, such grants-in-aid being regulated by the number of boys passed every year. These contributions from municipal funds may be made compulsory by statutory enactment.

The administration of the funds for primary education should ordinarily be in the hands of the Director of public Instruction.

But if educated and intelligent men are appointed on the local or district committees, these funds may be safely entrusted to them, under the guidance of the Collector, or the Director of Public Instruction. At present, the local boards consist of ignorant and uneducated men, such as patels, inamdars, surdars, &c., who would not be capable of exercising any intelligent control over the funds.

## INDIGENOUS SCHOOLS

Indigenous schools exist a good deal in cities, towns, and some large villages, especially where there is a Brahmin population. From the latest reports of Public Instruction in this Presidency, it is found that there are 1,049 indigenous schools with about 27,694 pupils in them. They are conducted on the old village system. The boys are generally taught the multiplication table by heart, a little Modi writing and reading, and to recite a few religious pieces. The teachers, as a rule, are not capable of effecting any improvements, as they are not initiated in the art of teaching. The fees charged in these schools range from 2 to 8 annas. The teachers generally come from the dregs of Brahminical society. Their qualifications hardly go beyond reading and writing Marathi very indifferently, and casting accounts up to the rule of three or so. They set up as teachers as the last resource of getting a livelihood. Their failure or unfitness in other callings of life obliges them to open schools. No arrangements exist in the country to train up teachers for indigenous schools. The indigenous schools could not be turned to any good account, unless the present teachers are replaced by men from the training colleges and by those who pass the 6th standard in the vernaculars. The present teachers will willingly accept State aid, but money thus spent will be thrown away. I do not know any instance in which a grant-in-aid is paid to such a school. If it is being paid anywhere, it must be in very rare cases. In my opinion no grants-in-aid should be paid to such schools unless the master is a certificated one. But if certificated or competent teachers be found, grants-in-aid should be given and will be productive of great good.

## HIGHER EDUCATION

The cry over the whole country has been for some time past that Government have amply provided for higher education, whereas that of the masses has been neglected. To some extent this cry is justified, although the classes

directly benefited by the higher education may not readily admit it. But for all this no well-wisher of his country would desire that Government should, at the present time, withdraw its aid from higher education. All that they would wish is, that as one class of the body politic has been neglected, its advancement should form as anxious a concern as that of the other. Education in India is still in its infancy. Any withdrawal of State aid from higher education cannot but be injurious to the spread of education generally.

A taste for education among the higher and wealthy classes, such as the Brahmins and Purbhoos, especially those classes who live by the pen, has been created, and a gradual withdrawal of State aid may be possible so far as these classes are concerned; but in the middle and lower classes, among whom higher education has made no perceptible progress, such a withdrawal would be a great hardship. In the event of such withdrawal, boys will be obliged to have recourse to inefficient and sectarian schools, much against their wish, and the cause of education cannot but suffer. Nor could any part of such education be entrusted to private agency. For a long time to come the entire educational machinery, both ministerial and executive, must be in the hands of Government. Both the higher and primary education require all the fostering care and attention which Government can bestow on it.

The withdrawal of Government from schools or colleges would not only tend to check the spread of education, but would seriously endanger that spirit of neutrality which has all along been the aim of Government to foster, owing to the different nationalities and religious creeds prevalent in India. This withdrawal may, to a certain extent, create a spirit of self-reliance for local purposes in the higher and wealthy classes, but the cause of education would be so far injured that the spirit of self-reliance would take years to remedy that evil. Educated men of ability, who do not succeed in getting into public service, may be induced to open schools for higher education on being assured

of liberal grants in-aid. But no one would be ready to do so on his own account as a means of gaining a livelihood, and it is doubtful whether such private efforts could be permanent or stable, nor would they succeed half so well in their results. Private schools, such as those of Mr. Vishnu Shastree Chiploonkar and Mr. Bhavey, exist in Poona, and with adequate grants-in-aid may be rendered very efficient, but they can never supersede the necessity of the high school.

The missionary schools, although some of them are very efficiently conducted, do not succeed half so well in their results, nor do they attract half the number of students which the high school attract. The superiority of Government schools is mainly owing to the richly paid staff of teachers and professors which it is not possible for a private school to maintain.

The character of instruction given in the Government higher schools, is not at all practical, or such as is required for the necessities of ordinary life. It is only good to turn out so many clerks and schoolmasters. The Matriculation examination unduly engrosses the attention of the teachers and pupils, and the course of studies prescribed has no practical element in it, so as to fit the pupil for his future career in independent life. Although the number of students presenting for the Entrance examination is not at all large when the diffusion of knowledge in the country is taken into consideration, it looks large when the requirements of Government service are concerned. Were the education universal and within easy reach of all, the number would have been larger still, and it should be so, and I hope it will be so hereafter. The higher education should be so arranged as to be within easy reach of all, and the books on the subjects for the Matriculation examination should be published in the Government Gazette, as is done in Madras and Bengal. Such a course will encourage private studies and secure larger diffusion of knowledge in the country. It is a boon to the people that the Bombay University recognises private studies in

the case of those presenting for the entrance examination. I hope, the University authorities will be pleased to extend the same boon to higher examinations. If private studies were recognised by the University in granting the degrees of B.A., M.A. &c., many young men will devote their time to private studies. Their doing so will still further tend to the diffusion of knowledge. It is found in many instances quite impossible to prosecute studies at the colleges for various reasons. If private studies be recognised by the University, much good will be effected to the country at large, and a good deal of the drain on the public purse on account of higher education will be lessened.

The system of Government scholarships, at present followed in the Government schools, is also defective, inasmuch as it gives undue encouragement to those classes only, who have already acquired a taste for education to the detriment of the other classes. The system might be so arranged that some of these scholarships should be awarded to such classes amongst whom education has made no progress.

The system of awarding them by competition, although abstractedly equitable, does not tend to the spread of education among other classes.

With regard to the question as to educated natives finding remunerative employments, it will be remembered that the educated natives who mostly belong to the Brahminical and other higher classes are mostly fond of service. But as the public service can afford no field for all the educated natives who come out from schools and colleges, and moreover the course of training they receive being not of a technical or practical nature, they find great difficulty in betaking themselves to other manual or remunerative employments. Hence the cry that the market is overstocked with educated natives who do not find any remunerative employment. It may, to a certain extent, be true that some of the professions are overstocked, but this does not show that there is no other remunerative employment to

which they can betake themselves. The present number of educated men is very small in relation to the country at large, and we trust that the day may not be far distant when we shall have the present number multiplied a hundred-fold, and all be taking themselves to useful and remunerative occupations and not be looking after service.

In conclusion, I beg to request the Education Commission to be kind enough to sanction measures for the spread of female primary education on a more liberal scale.

Poona
19th October 1882.

JOTEERAO GOVINDRAO POOLEY,
Merchant and Cultivator and
Municipal Commissioner
Peth Joona Gunja

[*Education Commission, Bombay, Vol. II,* Calcutta, 1884, pp. 140-145.]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

७

# शेतकऱ्याचा असूड

# CULTIVATOR'S WHIP-CORD

*by*

**JOTIRAO GOVINDRAO PHULEY**

***for the defence***

***of Shudra (Dasya) Community***

# शेतकऱ्याचा असूड

हें लहानसें पुस्तक

**जोतीराव गोविंदराव फुले**

यांनीं

शूद्र शेतकऱ्यांचे बचावाकरितां केलें आहे.

For the Kind Consideration

of

His Excellency the Right Hon'ble Sir Frederick Temple Hamilton Temple Blackwood, Earl of Dufferin, K.P., G.C.B. G.C.M.G., F.R.S.D.C.I., Viceroy and Governor General of India.

# अनुक्रमणिका

## उपोद्घात

**प्रकरण १ लें :** सरकारी सर्व खात्यांनीं ब्राह्मण कामगारांचें प्राबल्य असल्यामुळें, त्यांचे स्वजातीय स्वार्थी भटब्राह्मण आपल्या मतलबी धर्माच्या मिषानें अज्ञानी शेतकऱ्यांस इतकें नाडितात कीं, त्यांस आपलीं लहान चिटकुलीं मुलें शाळेंत पाठविण्याचीं साधनें रहात नाहींत, व एखाद्यास तसें साधन असल्यास त्यांच्या दुरुपदेशानें तशी इच्छा होत नाहीं. ...

**प्रकरण २ रें :** सरकारी गोरे अधिकारी हे बहुतकरून ऐषआरामांत गुंग असल्यामुळें त्यांस शेतकऱ्याचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाहीं व या त्यांच्या गाफिलपणानें एकंदर सर्व सरकारी खात्यांत ब्राह्मण कामगारांचें प्राबल्य असतें, या दोन्हीं कारणांमुळें शेतकरी लोक इतके लुटले जातात कीं, त्यांस पोटभर भाकर व आंगभर वस्त्रही मिळत नाहीं. ...

**प्रकरण ३ रें :** आर्य ब्राह्मण इराणांतून कसे आले व शूद्र शेतकरी यांची पूर्वपीठिका, व हल्लींचे आमचें सरकार एकंदर सर्व आपले कामगारांस मन मानेल तसे पगार व पेनशनें देण्याचे इराद्यानें नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून त्यांचें द्रव्य मोठ्या हिकमतीनें गोळा करूं लागल्यामुळें शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत.

**प्रकरण ४ थें :** शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लींची स्थिती. ...

**प्रकरण ५ वें :** आम्हां शूद्र शेतकऱ्यांसंबंधीं भटब्राह्मणांस सूचना, व सांप्रत सरकारनें कोणकोणते उपाय योजावेत. ...

हा आसूड लिहितेवेळीं कित्येक गृहस्थांचें व माझें यासंबंधीं बोलणें झालें, त्यापैकीं नमुन्याकरितां दोन मासले दिले आहेत—

खासा मराठा ह्मणविणारा

कबीरपंथी शूद्र साधू

# उपोद्घात

विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली; नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेलें, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येनें केले.

उद्देश, शूद्र शेतकरी हल्लीं इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोंहोंचण्याचीं धर्म व राज्यसंबंधीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं थोड्या बहुतांचें विवेचन करण्याच्या हेतूनें हा पुढील ग्रंथ रचिला आहे. शूद्र शेतकरी बनावट व जुलमी धर्मांचे योगानें एकंदर सर्व सरकारी खात्यांनीं ब्राह्मण कामगारांचें प्राबल्य असल्यानें भटभिक्षुकांकडून व सरकारी युरोपियन कामगार ऐषआरामी असल्याचे योगानें, ब्राह्मण कामगारांकडून नाडले जातात. त्यांपासून त्यांस या ग्रंथावलोकनाचे योगानें आपला बचाव करितां यावा असा हेतू आहे, म्हणून ह्या ग्रंथास शेतकऱ्याचा आसूड असें नांव दिलें आहे.

वाचकहो, सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यामध्यें तीन भेद आहेत. शुद्ध शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. आतां हे तीन भेद होण्याचीं कारणें पाहिलीं असतां, मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करूं लागले, ते कुळवाडी अथवा कुणबी, जे लोक आपलें शेतकीचें काम सांभाळून बागाइती करूं लागले, ते माळी व जे हीं दोन्हीही करून मेंढरें, बकरीं वगैरेचे कळप बाळगूं लागले, ते धनगर. असे निरनिराळ्या कामावरून प्रथम हे भेद उपस्थित झाले असावेत. परंतु आतां या तीन पृथक जातीच मानतात. याचा सांप्रत आपसांत फक्त बेटी[1]-व्यवहार मात्र होत नाहीं. बाकी अन्नव्यवहारादि सर्व कांहीं होतें. यावरून हे (कुणबी, माळी व धनगर) पूर्वीं एकाच शूद्र शेतकरी जातीचे असावेत. आतां पुढें या तिन्ही जातींतले लोक आपला मूळचा शेतकीचा धंदा निरुपायानें सोडून उदरनिर्वाहास्तव नाना तऱ्हेचे धंदे करूं लागले. ज्यांजवळ थोडेंबहुत अवसान आहे ते आपली शेती संभाळून रहातात व बहुतेक अक्षरशून्य देवभोळे, उघडे नागडे व भुकेबंगाल जरी आहेत तथापि शेतकरीच कायम आहेत व ज्यांस बिलकुल थारा उरला नाहीं, ते देश सोडून जिकडे जिकडे चरितार्थ चालला तिकडे तिकडे जाऊन कोणी गवताचा व्यापार करूं लागले, कोणी लाकडांचा व कोणी कापडाचा. तसेंच कोणी कंत्राटें व कोणी रायटरीची वगैरे नोकऱ्या करून शेवटीं पेनशनें घेऊन डौल मारीत असतात. अशा रीतीनें पैसा मिळवून इस्टेटी करून ठेवितात, परंतु त्यांच्या पाठीमागें गुलहौशी मुलें, ज्यांस विद्येची गोडीच नाहीं अशीं, त्यांची थोड्याच काळांत

१. शूद्रांचे कुलस्वामी जेजुरीचे खंडेराव यांनीं शूद्र (कुणबी) कुळांतील म्हाळसाई व धनगरांतील बानाबाई अशा दोन जातींतील दोन स्त्रिया केल्या होत्या, यावरून पूर्वीं कुळवाडी व धनगर यांचा आपसांत बेटीव्यवहार होत असे.

बाबूके भाई दरवेशी होऊन वडिलांचे नांवानें पोटासाठीं दोम दोम करीत फिरतात. कित्येकांच्या पूर्वजांनीं शिपायगिरीच्या व शहाणपणाच्या जोरावर जहागिरी, इनामें वगैरे कमाविलीं, व कित्येक तर शिंदेहोळकरासारखे प्रतिराजेच बनून गेले होते. परंतु हल्लीं त्यांचे वंशज अज्ञानी अक्षरशून्य असल्यामुळें आपआपल्या जहागिरी, इनामें गहाण टाकून अथवा खरेदी देऊन हल्लीं कर्जबाजारी होत्साते कित्येक तर अन्नासही मोताद झाले आहेत. बहुतेक इनामदार जहागीरदारांस आपल्या पूर्वजांनीं काय काय पराक्रम केले, कसकशीं संकटें भोगिलीं याची कल्पना मनांत न येतां, ते ऐत्या पिठावर रेघा ओढून अशिक्षित असल्यामुळें दुष्ट व लुच्चे लोकांचे संगतीनें रात्रंदिवस ऐषआरामांत व व्यसनांत गुंग होऊन, ज्यांच्या जहागिरी गहाण पडल्या नाहींत, अथवा ज्यांस कर्जानें व्याप्त केले नाहीं, असे विरळाच. आतां जे संस्थानिक आहेत त्यांस जरी कर्जवाम नाहीं, तरी त्यांचे आसपासचे लोक व ब्राह्मण कारभारी इतके मतलबी, धूर्त, घोरणी असतात कीं, ते आमच्या राजेरजवाड्यांस विद्येची व सद्‌गुणांची अभिरुचि लागूं देत नाहींत. यामुळें आपल्या खऱ्या वैभवाचें स्वरूप न ओळखून, आपल्या पूर्वजांनीं केवळ आमच्या चैनीकरितांच राज्य संपादन केलें असें मानून धर्मांचे योगानें अंध जहालेले, राज्यकारभार स्वतंत्र रीतीनें पाहण्याचें आंगीं सामर्थ्य नसल्यामुळें केवळ दैवावर भार टाकून ब्राह्मण कारभाऱ्यांच्या ओंझळीनें पाणी पिऊन दिवसा गोप्रदानें व रात्रीं प्रजोत्पादन करीत स्वस्थ बसतात. अशा राजेरजवाड्यांच्या हातून आपल्या शूद्र जातबांधवांचें कल्याण होण्याचा संभव विशेष, परंतु त्यांच्या मनांत जो विचार कधींही आला नाहीं व जोंपर्यंत "ब्राह्मणो मम दैवतं" हें वेड त्यांच्या डोक्यांतून निघालें नाहीं, तोंपर्यंत कितीही कपाळकूट केली तरी ती व्यर्थच जाणार व इतकेंही करून तसें करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास बाळपणापासून मनावर जाहलेल्या दृढ संस्कारामुळें या मतलबी धर्मांचे विरुद्ध चार गोष्टी ऐकून त्यांचा विचार करणें त्यांस कोठून रुचणार ? व जवळचे कारभारी अगोदर अशा निस्पृह व खऱ्या जात्याभिमान्याची डाळच शिजूं देणार नाहींत, तशांतून धैर्य धरून एकाद्यानें मला तशी सवड दिल्यास मोठ्या आनंदानें मी यथामति आपले विचार त्यांचेपुढें सादर करीन.

असो, जगांतील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशीं ताडून पहातां, हिंदुस्थानांतील अज्ञानी व देवभोळ्या शूद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशांतील शेतकऱ्यांच्यापेक्षां निकृष्ट अवस्थेस पात्र होऊन केवळ पशूपलीकडचे मजलशीस जाऊन पोंहचली, असें दिसून येईल.

हा ग्रंथ अनेक इंग्लिश, संस्कृत व प्राकृत ग्रंथ व हल्लींचे अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या दीनवाण्या स्थितीवरून रचिला आहे, हें सांगण्यास नको. असें सहाय्य घेतल्यावांचून याची रचना करतां आली नसती हें उघडच आहे.

या ग्रंथांत जे कांहीं मीं माझ्या अल्प समजुतीनें शोध लिहिले आहेत, त्यांत

आमच्या विद्वान व सूज्ञ वाचणारांच्या ध्यानांत जीं जीं व्यंगें दिसून येतील, त्यांविषयीं मला क्षमा करून गुणलेशांच्या स्वीकार करावा, अशी त्यांस माझी विनंती आहे. आणि जरकरितां त्यांच्या अवलोकनांत कोणताही भाग अयोग्य अथवा खोटासा दिसेल तर किंवा या ग्रंथाच्या दृढीकरणार्थ जर त्यांस कांहीं (ग्रंथाधार वगैरे) सुचविणें असेल, तर त्याविषयीं त्यांनीं वर्तमानपत्राद्वारें आम्हांस कळवावें. म्हणजे कृतज्ञतापूर्वक अभार मानून दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं त्यांचा योग्य विचार करूं.

**श्रीमंत सरकार गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर सयाजीराव महाराज** यांनीं मी बडोद्यास गेलों होतों त्यावेळीं आपल्या सर्व राजकीय कामांतील अमोल्य वेळांत काटकसर करून अप्रतिम उल्हासानें व सप्रेम भावानें मजकडून हा ग्रंथ वाचवून साग्र लक्षपूर्वक ऐकिला व श्रीमन्महाराजांनीं आपल्या औदार्यप्रमाणें मला द्रव्यद्वारें मदत करून माझा यथासांग अत्युत्तम आदरसत्कार केला, त्याबद्दल मी त्यांचा फार फार ऋणी आहे.

पुणें, मुंबई, ठाणें, जुन्नर, ओतूर, हाडपसर, वंगणी, माळ्याचें कुरुल वगैरे येथील शूद्र गृहस्थांनीं कित्येक वेळां हा ग्रंथ माझ्या तोंडून ऐकला व या ग्रंथांत लिहिलेला मजकूर खरा आहे अशाविषयीं त्यांनीं आपल्या सह्या मजकडे पाठविल्या आहेत.

# प्रकरण १ लें

सरकारी सर्व खात्यांनीं ब्राह्मण कामगारांचें प्राबल्य असल्यामुळें त्यांचे स्वजातीय स्वार्थी भटब्राह्मण आपले मतलबी धर्माचे मिषानें अज्ञानी शेतकऱ्यांस इतकें नाडितात कीं, त्यांस आपली लहान चिटकुलीं मुलें शाळेंत पाठविण्याचीं साधनें रहात नाहींत व एकाद्यास तसें साधन असल्यास यांच्या दुरुपदेशानें तशी इच्छा होत नाहीं.

आतां पहिले प्रकारचे अक्षरशून्य शेतकऱ्यांस भटब्राह्मण धर्ममिषानें इतकें नाडितात कीं, त्यांजविषयीं या जगांत दुसरा कोठें या मासल्याचा पडोसा सांपडणें फार कठीण. पूर्वीच्या धूर्त आर्यब्राह्मण ग्रंथकारांनीं आपले मतलबी धर्माचें लिगाड शेतकऱ्यांचें मागें इतकें सफाईनें लावलें आहे कीं, शेतकरी जन्मास येण्याचे पूर्वीच त्याचे आईस ज्या वेळेस ऋतु प्राप्त होतो, तेव्हां तिच्या गर्भाधानादि संस्कारापासून तो हा मरेपर्यंत कित्येक गोष्टींनीं लुटला जातो, इतकेंच नव्हे तर हा मेला तरी याच्या मुलास श्राद्धं वगैरेंच्या मिषानें धर्माचें ओझें सोसावें लागतें. कारण शेतकऱ्यांचे स्त्रियांस ऋतु प्राप्त होतांच भटब्राह्मण जपानुष्ठान व तत्संबंधीं ब्राह्मणभोजनाचे निमित्तानें त्यांजपासून द्रव्य हरण करितात व सदरचीं, ब्राह्मणभोजनें घेतेवेळीं भटब्राह्मण आपले आप्तसोयरे व इष्टमित्रांसह तूपपोळ्यांची व दक्षिणेची इतकी धांदल उडवितात कीं, त्यांच्या उरल्या सुरल्या अन्नापैकीं त्या बिचाऱ्या अज्ञान शेतकऱ्यांस पोटभर आमटीपोळी मिळण्याची-सुद्धां मारामार पडते. ऋतुशांतिनिमित्तानें भटब्राह्मणांची उदरशांति होऊन त्यांचे हातावर दक्षिणा पडतांच ते शेतकऱ्यास आशिर्वाद दिल्यानंतर त्यास त्यांचे स्त्रियांनीं शनिवार अथवा चतुर्थीचीं व्रतें धरावीं ह्मणोन उपदेश करून घरोघर चालते होतात. पुढें भटब्राह्मण दर शनिवारीं व चतुर्थीस शेतकऱ्यांचे स्त्रियांकडून रुइचे पानांच्या माळा मारुतीचे गळ्यांत घालवून व गवताच्या जुड्या गणपतीचे माथ्यावर रचून शिधेदक्षिणा आपण घेतात व पुढें कधीं कधीं संधान साधल्यास सदरचीं व्रतें उजविण्याची थाप देऊन शेतकऱ्यांपासून लहानमोठीं ब्राह्मणभोजनें घेतात. इतक्यांत शेतकरणी बाया सृष्टिक्रमाप्रमाणें गरोदर झाल्यास, भटब्राह्मणांनीं शेतकऱ्यांकडून मुंज्यांचे ब्राह्मण घालविण्याचे लटके पूर्वी केलेले नवस शेतकऱ्यांशीं सहज बोलतां बोलतां बाहेर काढावयाचे. व शेतकऱ्यांच्या स्त्रिया प्रसूत होण्याच्या पूर्वी भटजीबुवा शेतकऱ्यांचे घरीं रात्रंदिवस खेट्या (फेऱ्या) घालितात; व त्यांच्याशीं मोठी लाडीगोडी लावून त्यांच्याशीं यजमान-पणाचीं नातीं लाऊन त्यांजपासून त्या नवसांची फेड करून घेतात. पुढें शेतकऱ्यांचे स्त्रियांस पुत्र झाले कीं, भटब्राह्मणांची धनरेषा उपटते. ती अशी कीं, प्रथम मुख्य उपाध्ये शेतकऱ्यांचे घरीं जातात व त्यांचे घरांतील बाव व कासऱ्यांनीं वेळ मोजणाऱ्या अज्ञानी स्त्रियांस मुलांचे जन्मकाळ विचारून, ज्या ज्या राशीस जास्त अनिष्ट ग्रह जुळत

असतील, तसल्या राशी मुकरर करून त्यांच्या अर्भकांच्या जन्मपत्रिका अशा रीतीनें तयार करितात कीं, अज्ञानी शेतकऱ्यांचे पुत्रजन्मानें जहालेल्या सर्व आनंदांत माती कालवून त्यास घाबरे करितात व दुसरे दिवशीं त्याजकडून पिंडींतील लिंगापुढें आपले भाऊबंद, सोयरेधायरे व इष्टमित्रांपैकीं भटब्राह्मणास मोलानें जपानुष्ठानास बसवितात व त्यांपैकीं कोणांस शेतकऱ्यापासून उपोषणाचे निमित्तानें फलाहारापुरते पैसे देववितात. उन्हाळा असल्यास पंखे देवववितात, पावसाळा असल्यास छत्र्या, आणि हिंवाळा असल्यास पांढऱ्या धाबळ्या देवववितात. खेरीज उपाध्याचा हात चालल्यास तो शेतकऱ्यापासून पुजेच्या निमित्तानें तेल, तांदूळ, नारळ, खारका, सुपाऱ्या, तूप, साखर, फळफळावळ वगैरे पदार्थ उपटावयास कमी करीत नाहींत. शेतकऱ्यांचे मनावर मूर्तिपूजेचा जास्ती प्रेमभाव ठसावा म्हणून कांहीं भट तपानुष्ठान संपेपावेतों आपल्या दाढ्याडोया वाढवितात. कांहीं फलाहारावर राहतात. अशा नाना प्रकारच्या लोणकढ्या थापा देवून जपानुष्ठान संपेपावेतों भटब्राह्मण, शेतकऱ्यांचें बरेंच द्रव्य उपटतात. शेवटीं समति करवितेवेळीं भटब्राह्मण अज्ञान शेतकऱ्यापासून ब्राह्मणभोजनासहित यथासांग दक्षिणा घेण्याविषयीं कसकशी चंगळ उडवितात हें सर्व आपणांस माहीत असेलच.

आर्य भटब्राह्मण आपल्या संस्कृत विद्यालयांत शूद्र[१] शेतकऱ्यांचे मुलास घेत नाहींत. परंतु ते आपल्या प्राकृत मराठी शाळांत कामापुरती शूद्र शेतकऱ्यांचीं मुलें घेतात, व त्यांजपासून दरमहाचे पगाराशिवाय दर अमावास्येस व पौर्णिमेस फसक्या, कित्येक सणांस शिधा, दक्षिणा, व मुलांनीं शाळेंत खाण्याकरितां आणिलेल्या चबिन्यामधून चौथाई घेऊन त्यांस धुळाक्षर, अंकगणित, मोडी कागदवाचन, भाकडपुराणसंबंधीं प्राकृत श्लोक व भूपाळ्या शिकवून त्यांस कलगी अथवा तुऱ्याच्या पक्षाच्या लावण्या शिकून तत्संबंधीं झगडे घालण्यापुरते विद्वान करून सोडितात. त्यांस आपल्या घरची हिशेबाची टांचणें ठेवण्यापुरतेंदेखील ज्ञान देत नाहींत. मग त्यांचा मामलेदार कचेऱ्यांत प्रवेश होऊन कारकुनीचें काम करणें कठीणच.

शेतकऱ्यांचे मुलाच्या मागणीच्या वेळीं ब्राह्मण जोशी हातांत पंचांगें घेऊन त्यांचे घरीं जातात. व आपल्यापुढें राशीचक्रें मांडून त्यांस मुलीमुलांचीं नांवें विचारून मनांत स्वहित संकल्प धरून मोठ्या डौलानें आंगठ्यांचीं अग्रें बोटांचे कांड्यावर नाचवून भलता एकादा अनिष्ट ग्रह त्यांचे राशीला जुळवून, त्या ग्रहाचे शमनार्थ जपानुष्ठानाच्या स्थापने-करितां व त्यांचे सांगतेकरितां कांहीं द्रव्य शेतकऱ्यापासून घेतात. नंतर शेतकऱ्यांच्या मुलाचा तिथिनिश्चय करतेवेळीं नवरीचे घरीं वस्त्राचे चौघडीवर तांदुळाचे रांगोळ्यांनीं चोकोनी चौक तयार करून त्यावर मुलीच्या व मुलाच्या पित्यास बसवून त्यांचेपुढें खोबरें खारका व हळकुंडाचे लहान लहान ढीग मांडतात, हळदकुंकू व अक्षता मागवून

१. Sir William Jones, Vol. IV, page 111.

मुलीचें व मुलाचें वय, वर्ण, गुण वगैरे यांचा काडीमात्र विचार न करितां कामापुरत्या सुपाऱ्यांत गणपतीची प्राणप्रतिष्ठा करून समर्पयामीचे धांदलींत शेतकऱ्यापासून सण्यांनीं पैसे उपटून कागदाचे चिठोऱ्यावर नेमलेल्या तिथीचें टिप्पण करितात व त्यावर हळदकुंकाचे माखण करून ते उभयतांचे हातीं देतात. नंतर तेथील सामानपैशासहित चौकाचे तांदूळ आपले पदरीं आवळून गणपतीसही घरीं फोडून खाण्याकरितां कणोसरीस लावून निघून जातात. लग्नाचे पूर्वी मारुतीचे देवळांत वधूकडील पोषाक नवरे-मुलास देतेवेळीं भटब्राह्मण आणा दोन आणे कणोसरीस लावून पानविडे पागोट्यांत खोवतात. नंतर वधूचे मांडवांत नवरमुलगा गेल्यानंतर बोहल्यासमोर त्या उभयतांस उभे राहण्याकरितां पायपाट्यामध्यें थोडेथोडे गहूं भरवून त्यावर समोरासमोर उभे करितात. पुढें वधूवरांचे मामाचे हातीं नागव्या तरवारी देऊन त्यास पाठीराखे करितात. व तेथें जमलेल्या मंडळीपैकीं भलत्या कोणाचीं तरी अंगवस्त्रें घेऊन त्यावर हळदकुंकाचे आडवे तिडवे पट्टे ओढून त्या वधुवरांमध्यें अंतरपाठ धरून पाळीपाळीनें कोणी कल्याण रागांत व कोणी भैरवी रागांत श्लोक व आर्यासहित शुभमंगल म्हणून ते अज्ञानी शेतकऱ्यांचे मुलांबाळांचीं लग्नें लावतात. कित्येक सधन माळ्याकुणब्यांचे लग्नांत त्यांचे भाऊबंद, सोयरेधायरे व वऱ्हाडी यांची पर्वा न करतां, अगांतुक ब्राह्मण दक्षिणेसाठीं मांडीवर शालजोड्या घेऊन मोठ्या झोकानें लोडाशीं टेकून बसून मांडवांत इतकी धांदल करितात कीं, वधुवरांच्या बापांनीं आमंत्रण करून आणलेल्या गृहस्थांचें आगतस्वागत करून त्यांस पानविडे देण्याची पुरती फुरसद होऊं देत नाहींत. असले निःसंग दांडगे भिकारी दुसऱ्या एखाद्या देशांत अथवा जातींत सांपडतील काय ? इतक्यांत लग्न लावणारे भटजी वधुवरांस खालीं समोरासमोर बसवून त्यांचेपुढें नानाप्रकारचे विधि करितांना, वेळोवेळीं "दक्षिणां समर्पयामि" म्हणतां म्हणतां शेवटीं थोड्याशा काडवासुड्या गोळा करून त्यांस अग्नि लावून त्यांत तूप वगैरे पदार्थ टाकून वधुवरांस लज्जाहोमाच्या निमित्तानें चरचरीत धुऱ्या देऊन त्यांचे अज्ञानी पित्यांपासून अखेरचे भले मोठे शिधे व दक्षिणा घेऊन घरीं जातात. साड्याचे दिवशीं एकदोन हेकड शेतकऱ्यांस हातीं धरून वधुवरांचे पित्यापासून मन मानेल तशा रकमा आडवून घेतात, व त्याचप्रमाणें मांडव खंडण्याबद्दल द्रव्य त्याजपासून उपटितात. त्यांतून कित्येक सधन शेतकऱ्यांस कर्ण वगैरे दानशूरांच्या उपमा देऊन त्याचेपुढें नाना प्रकारचे गोंडचाळे करून त्यांस इतके पेटवतात कीं, लग्नाचे अखेरीस त्यांचे घरीं मोठमोठ्या सभा करून त्यांत एकंदर वैदिक, शास्त्री, पुराणिक, कथेकरी व भिक्षुक भटब्राह्मणांची वर्गावर्गी न करितां त्यांजपासून दक्षिणा उपटून आपआपले घरीं जातां जातां त्यांजपैकीं कित्येक गुलहौशी भटब्राह्मण रात्रीं मांडवांत नाच असल्याविषयीं तपास ठेवून डोचक्यावर पिटकुल्या पागुट्या व मांडीवर चिटकुल्या शालजोड्या ठेवून, आमंत्रण करून आणलेल्या गृहस्थांचे मांडीशी मांडी भिडवून, लोडाशीं टेकून सर्व रात्रभर नाकाच्या जोडनळ्यांत तपकिरीचे वायबार

ठासतां ठासतां आसपास तपकिरीचा धुरळा उडवून खुशाल नायकिणींचीं गाणीं ऐकत बसतात.

पुढें शेतकरी लोक वयपरत्वें मरण पावतांच त्यांचीं मुलें संसार करूं लागल्यापासून त्यांचे मरणकाळपावेतों त्यांस भटब्राह्मण धर्माचे भुलथापीनें कसें व किती नागवितात, त्याबद्दल एथें थोडासा खुलासा करितों.

शेतकऱ्यांचीं मुलें आपलीं नवीं घरें बांधतेवेळीं शूद्र बिगारी भर उन्हाचे तापांत उरापोटावर मलमा वगैरेचीं टोपलीं वहातात. गवंडी व सुतार उंच गगनचुंबित पहाडावर माकडाचे परी चढून भिंती रचून, लाकडांच्या कळाशा जोडून घरें तयार करितात. यामुळें त्यांची दया येऊन त्या बापुड्या कामगारांस गृहप्रवेश करतेवेळीं तूपपोळ्यांची जेवणें देऊं, म्हणून घराचे मालक कबूल करीत असतात व तीं जेवणें शेतकरीकामगारांस देण्यापूर्वी भटब्राह्मण शेतकऱ्यांचे घरोघर रात्रंदिवस घिरट्या घालून त्यास नाना प्रकारच्या धर्मसंबंधीं भुलथापा देऊन, कित्येक ब्राह्मण अंमलदारांच्या आल्लटप्पू शिफारशी भिडवून, त्यांच्या नव्या घरांत होमविधी करून घरच्या वळचणीला जागोजाग चिंध्यांचीं निशाणें फटकावून, प्रथम आपण आपल्या स्त्रिया मुलांबाळांसहित तूपपोळ्यांचीं यथासांग भोजनें सारून, उरलेंसुरलें शिळेंपाकें अन्न भोळ्या भाविक अज्ञानी घरधन्यास त्याच्या मुलाबाळांसहित कामगारांस गुळवण्याबरोबर खाण्याकरितां ठेवून पानविडे खातांच ऊसांतील इमानी कोल्हेभुकीदाखल आशिर्वाद देऊन शेतकऱ्यांपासून दक्षिणा गुंडाळून पोटावर हात फिरवीत घरोघर जातात व एकदोन मतलबी साधू भटब्राह्मण कित्येक अल्पवयी अल्लड शेतकऱ्यांचे जिवलग गडी बनून त्यांस नांवलौकिकाचे शहास गुंतवून त्यांजकडून लहानमोठ्या सभा करवून त्यांमध्यें कांहीं भटब्राह्मणांस शालजोड्या देववून बाकी सर्वांना दक्षिणा देववितात. शेतकऱ्यांनीं नवीन बांधलले शेतखाने खेरीजकरून त्यांनीं नवीं देवळें, पार वगैरे इमारती तयार केल्या कीं, तेथें त्यांजपासून उद्यापनाचे निमित्तानें ब्राह्मणभोजन व दक्षिणा घेतातच.

दर चैत्रमासीं वर्षप्रतिपदेस भटब्राह्मण शेतकऱ्यांचे घरोघर वर्षफळ वाचून त्यांजपासून दक्षिणा घेतात. तसेंच रामनवमी व हनुमंतजयंतीचे निमित्तानें भटब्राह्मण आपले आळींत एकादा सधन शेतकरी असल्यास त्याजपासून अगर गरीबच सर्व असल्यास त्यांजपासून आळीपाळीनें वर्गण्या जमा करून तूपपोळ्यांची ब्राह्मणभोजनें घेतात.

जेजुरीचे यात्रेंत शेतकरी आपल्या मुलांबाळांसह तळें वगैरे ठिकाणीं अंघोळी करितेवेळीं भटब्राह्मण तेथें संकल्प म्हणून त्या सर्वांपासून एकेक शिवराई दक्षिणा घेतात. ही यात्रा सुमारें पाऊण लाखाचे खालीं नसते; व त्यांपैकीं कित्येक अल्लड सधन शेतकऱ्यांचे मांडीवर खल्लड मुरळ्या बसतांच त्यांजपासून देवब्राह्मणसुवासिनीचे निमित्तानें तूपपोळ्यापुरतें द्रव्य उपटतात. शिवाय शेतकऱ्यांचें भंडारखोबरें, खंडोबा देवापुढें उधळण्याकरितां खरेदी करितेवेळीं, भटब्राह्मण वाण्याबरोबर आंतून पाती ठेवून त्यास बरेंच नाडितात.

दर आषाढमासीं एकादशीस भटब्राह्मण शिधे देण्याची ऐपत नसणाऱ्या कंगाल शेतकऱ्यापासूनसुद्धां निदान एक पैसातरी दक्षिणा घेतात.

पंढरपुरीं एकंदर सर्व शेतकरी आपल्या स्त्रिया व मुलेंबाळें यांसहित चंद्रभागेंत स्नान करितेवेळीं भटब्राह्मण नदीचे किनाऱ्यावर उभें राहून, संकल्प म्हणून त्या सर्वांपासून एकेक शिवराई दक्षिणा घेतात. ही यात्रा सुमारें एक लक्षाचे खालीं नसते; व त्यापैकीं कांहीं शेतकऱ्यांपासून दहा सुवासिनीब्राह्मणांस व कांहीं शेतकऱ्यांपासून निदान एक सुवासिनीब्राह्मणास तूपपोळ्यांचे भोजन देण्यापुरत्या रकमा उपटून माजघरांत आपले घरची मंडळी पात्रावर बसविलेली असते, तेथें प्रत्येक शेतकऱ्यास निरनिराळें नेऊन म्हणतात कीं, "हे पहा तुमच्या सुवासिनीब्राह्मण जेवावयास बसत आहेत. त्यांस कांहीं दक्षिणा देण्याची मर्जी असल्यास द्या, नाहींतर त्यांस दुरून नमस्कार करून बाहेर चला, म्हणजे ते देवास (विठोबास) नैवेद्य पाठवून जेवावयास बसतील." असे **प्रामाणिक** धंदे करून पंढरपुरांतील शेंकडों ब्राह्मण बडवे श्रीमान झाले आहेत.

दर श्रावणमासीं नागपंचमीस बिळांत शिरणाऱ्या मूर्तिमंत नागाच्या टोपल्या बगलेंत मारून शेतकऱ्यांचे आळोआळीनें, नागकू दूध पिलाव, "नागदक्षिणां समर्पयामि" म्हणून पैसा गोळा करीत फिरण्याची भटब्राह्मणांची वडिलोपार्जित वृत्ति, वैदू व गारोड्यांनीं बळकाविली असतां त्यांजवर ते नुकसानीबद्दल फिर्याद न करितां, केवळ दगडाच्या किंवा चिखलाच्या केलेल्या नागांच्या पुजा करून अज्ञानी शेतकऱ्यापासून दक्षिणा घेतात.

पौर्णिमेस श्रावणीच्या निमित्तानें महाराच्या गळ्यांतील काळ्या दोऱ्यांची खबर न घेतां कित्येक डामडौली कुणब्यांचे गळ्यांत पांढऱ्या दोऱ्याचीं गागाभटी[1] जानवीं घालतांना शिधादक्षिणेवर धाड घालितात. एकंदर सर्व शेतकऱ्यांचे हातांत राख्यांचे[2] गंडे बांधून त्यांजपासून एकेक पैसा दक्षिणा घेतात.

वद्यप्रतिपदेस भटब्राह्मण बहुतेक सधन शेतकऱ्यास सप्ताहाचा नाद लावून त्यांचे गळ्यांत विणे घालून त्यांचे इष्टमित्रांचे हातांत टाळ देऊन त्या सर्वांस मृदंगाचे नादांत पाळींपाळीनें रात्रंदिवस पोपटासारखीं गाणीं गाऊन नाचतां नाचतां टणटणा उड्या मारावयास लावून आपण त्यांचेसमोर मोठ्या डौलानें लोडाशीं टेकून त्यांच्या गमती थोडा वेळ पाहून, दररोज फराळाचे निमित्तानें त्याजपासून पैसे उपटून गोकूळअष्टमीचे रात्रीं हरिविजयांतील तिसरा अध्याय वाचून यशोदेचे बाळंतपणाबद्दल चुडेबांगड्यांची सबब न सांगतां, शेतकऱ्यांपासून दक्षिणा उपटतात. प्रातःकाळीं पारण्याचे निमित्तानें शेतकऱ्यांचे

---

१. शूद्र लोकांत जानवीं घालण्याचा प्रथम प्रचार नवता. गागाभट यानें शिवाजीराजापासून सुवर्णतुला दान घेऊन त्यास जानवें घातलें, तेव्हांपासून ही चाल पडली आहे.

२. या राख्या सुताच्या असून एक पैशास सुमारें २५ मिळतात.

खर्चानें करविलेलीं तुपपोळ्यांचीं जेवणें आपण प्रथम सारून उरलेलें शिळेंपाकें अन्न शेतकऱ्यासहित टाळकुटे मृदंगे वगैऱ्यांस ठेवून घरीं निघून जातात.

शेवटीं श्रावण महिन्यांतील सरते सोमवारीं भटब्राह्मण बहुतेक देवभोळ्या अज्ञानी शेतकऱ्यापासून तूपपोळ्यांचीं निदान एकतरी सुवासिनीब्राह्मणभोजन घालण्याचे निमित्तानें यथासांग शिधेसामग्र्या घेऊन, प्रथम आपण आपल्या स्त्रिया मुलांबाळांसहित जेवून गार झाल्यावर प्रसादादाखल एकदोन पुरणपोळ्या व भाताची मूद भलत्यासलत्या इस्तऱ्यावर घालून, दुरून शेतकऱ्यांचे पदरांत टाकून, त्यांच्या समजुती काढितात.

दर भाद्रपदमासीं भटब्राह्मण हरतालिकेचे मिषानें अबालवृद्ध शेतकरणीपासून एकेक, दोनदोन पैसे लुबाडितात.

गणेशचतुर्थीस शेतकऱ्यांचे घरांत गणपतीपुढें टाळ्या वाजवून आरत्या म्हणण्याबद्दल त्यांजपासून कांहीं दक्षिणा घेतात. ऋषिपंचमीस रांडमुंड शेतकरणी स्त्रियांस पाण्याचे डबक्यांत बुचकळ्या मारावयास लावून भटब्राह्मण शेतकऱ्यांचे जिवावर गणपतीचे संबंधानें दिवसा मोदकांसह तूपपोळ्यांचीं भोजनें सारून वरकांति कीर्तनें श्रवण करण्याचे भाव दाखवून आंतून अहोरात्र नामांकित कसबिणींच्या सुरतीकडे मंगळ ध्यान लावून त्यांचीं सुस्वर गाणीं ऐकण्यांत चूर झाल्यामुळें, शेतकऱ्यांचे घरांतील कुंभारी गौरीच्या मुखाकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहींत.

चतुर्दशीस अनंताचे निमित्तानें शेतकऱ्यांपासून शिधेदक्षिणा घेतात. पितृपक्षांत भटब्राह्मण एकंदर सर्व शेतकरी लोकांत पेंढारगर्दी उडवून त्यांच्यामागें इतके हात धुवून लागतात कीं, त्यांच्यांतील मोलमजुरी करणाऱ्या दीनदुबळ्या निराश्रित रांडमुंड शेतकरणीपासूनही त्यांच्या गणपतीच्या नांवानें त्यांजपासून निदान सिधे, दक्षिणा व भोपळ्याच्या फांका घेऊन आपल्या पायांवर डोचकीं ठेवल्याशिवाय त्यांच्या सुटका करीत नाहींत. मग तेथें भोंसले, गायकवाड, शिंदे आणि होळकर यांची काय कथा?

तशांत कपिलषष्ठीचा योग आला कीं, भटब्राह्मण कित्येक सधन शेतकऱ्यांस वाई, नाशिक वगैरे तीर्थांचे ठिकाणीं नेऊन त्यांजपासून दानधर्मांचे मिषानें बरेंच द्रव्य हरण करितात व बाकी उरलेल्या एकंदर सर्व दीनदुबळ्या शेतकऱ्यांपासून नदीवर स्नान करतेवेळीं निदान एकएक पैसा तरी दक्षिणा घेतात.

शेवटीं अमावास्येस भटब्राह्मण शिधेदक्षिणांचे लालचीनें शेतकऱ्यांचे बैलांच्या पायाच्या पुजा करवितात.

विजयादशमीस घोडे व आपट्यांचीं झाडें पूजनाचे संबंधानें शेतकऱ्यांपासून दक्षिणा घेऊन कोजागिरीस त्यांचा हात चालल्यास शेतकऱ्याचे दुधावर सपाटा मारितात.

अमावास्येस लक्ष्मीपूजन व ह्या पूजनाचे संबंधानें शेतकऱ्यापासून लाह्या बत्तासांसह दक्षिणा घेतात.

दर कार्तिकमासीं बलिप्रतिपदेस भटब्राह्मण मांगामहाराप्रमाणें हातांत पंचात्यां घेऊन

शेतकऱ्यास ओवाळतां ओवाळतां "इडापिडा जावो आणि बळीचें राज्य येवो" हा मूळचा खरा अशिर्वाद देऊन शेतकऱ्यांच्या ओवाळण्या न मागतां, हातावर शालजोड्या घेऊन त्यांस यजमानाचीं नातीं लावून शेतकऱ्यांचे बरोबर माली मागत फिरतात.

आळंदीचे यात्रेंत शेतकरी आपल्या कुटुंबासह इंद्रायणींत स्नानें करीत असतां भटब्राह्मण त्या सर्वांपुढें संकल्प म्हणून त्यांजपासून एकेक पैसा दक्षिणा घेतात. ही यात्रा सुमारें पाऊण लक्षाचे खालीं नसते. नंतर द्वादशीस देवब्राह्मणसुवासिनीचे निमित्तानें कित्येक देवभोळ्या शेतकऱ्यांपासून तूपपोळ्यांचीं व त्यांतून कोणी फारच दरिद्री असल्यास त्याजपासून साधा सिधा घेऊन आपापले कुटुंबासह भोजनें करून त्या सर्व अज्ञानी भाविकांस तोंडी पोकळ अशिर्वाद मात्र देतात.

शिवाय भोंवर गांवातील अज्ञानी शेतकऱ्यास पंधरवड्याचे वारीचे नादीं लावून त्या सर्वांपासून बारा महिने दर द्वादशीस पाळीपाळीनें तूपपोळ्यांचीं ब्राह्मणभोजनें काढितात. इतकेंच नव्हे परंतु कित्येक परजिल्ह्यांतील सधन शेतकऱ्यांस चढी पेटवून त्यांपासून तूपपोळ्यांचीं सहस्रभोजनें घालवितात. शेवटीं परगांवचे शेतकऱ्यांचे पंचांनीं अदावतीनें गुन्हेगार ठरवून पाठविलेल्या शेतकऱ्यांचें क्षौर करवून त्यांस प्रायश्चित्ताचे निमित्तानें थोडें का नागवितात ?

वद्य द्वादशीस भटब्राह्मण शेतकऱ्यांचे आंगणांतील तुळशीवृंदावनासमोर धोत्राचा अंतरपाठ धरून मंगलाष्टकाचे ऐवजीं दोन चार श्लोक व आर्या म्हणून तुळशींचीं लग्नें लावून शेतकऱ्यापासून आरतीचे पैशासह ओटीपैकीं कांहीं सामान हातीं लागल्यास गोळा करून जातात.

दर पौषमासीं मकरसंक्रांतीस भटब्राह्मण शेतकऱ्यांचे घरीं संक्रांतफळ वाचून त्यांज-पासून दक्षिणा घेतात, व कित्येक अक्षरशून्य देवभोळ्या शेतकऱ्यांस अगाध पुण्यप्राप्तीची लालूच दाखवून त्यांजकडून मोठ्या उल्हासानें त्यांचीं उंसांचीं स्थळें भटब्राह्मणांकडून लुटवितात.

दर माघमासीं महाशिवरात्रीस भटब्राह्मण कित्येक शेतकऱ्यांचे आळींतील देवळांनीं शिवलीलामृताच्या अवृत्त्या करून सूर्योदयाचे पूर्वी समाप्ति करतेवेळीं त्यांजपासून ग्रंथ वाचण्याबद्दल शिधेदक्षिणा उपटून नेतात.

दर फाल्गुनमासीं होळीपूजा करितांच, शेतकऱ्याजवळचें द्रव्य उडालें यास्तव म्हणा, अगर हिंदूधर्माचे नांवानें ठणाणा बोंबा मारितात, तरी हे भटजीबुवा त्यांजपासून कांहीं दक्षिणा घेतल्याविना त्यांस आपापल्या डोचक्यांत धूळमाती घालण्याकरितां मोकळीक देत नाहींत.

सदरीं लिहिलेल्या प्रतिवर्षी येणाऱ्या सणांशिवाय मधूनमधून चंद्रग्रहण, सूर्यग्रहण व ग्रहांचे उलटापालटीचे संबंधानें शेतकऱ्यापासून भटब्राह्मण नाना प्रकारचीं दानें घेऊन एकंदर सर्व पर्वण्या पाळीपाळीनें बगलेंत मारून, व्यतिपात भाऊबळानें शेतकऱ्यांचे

आळोआळीनें भीक मागत फिरतात. शिवाय शेतकऱ्यांचे मनावर हिंदुधर्माचें मजबूत वजन बसून त्यांनीं निःसंग होऊन आपले नादीं जास्त लागावें म्हणून, सधन शेतकऱ्यांचे घरोघर रात्रीं भटब्राह्मण कधीं कधीं पांडवप्रताप वगैरे भाकड पुराणांचीं पारायणें करून त्यांजपासून पागोट्याधोत्रासह द्रव्यावर घाला घालून, कित्येक निमकहरामी भटब्राह्मण आपल्या शेतकरी यजमानाच्या सुनाबाळांस नादीं लावून त्यांस कुकूचकू करावयास शिकवितात. त्यांतून अधींमधीं संधान सावल्यास शेतकऱ्यांचे वरीं भटब्राह्मण सत्यनारायणाच्या पूजा करवून प्रथम शेतकऱ्यांचे केळांत सव्वा शेरांचे मानानें निर्मळ रवा, निरसें दूध, लोणकढें तूप, व धुवासाखर घालून तयार करविलेले प्रसाद घशांत सोडून नंतर आपल्या मुलांबाळांसहित तूपपोळ्यांचीं भोजनें खाऊन, त्यांजपासून यथासांग दक्षिणा धुचाडून, उलटें शेतकऱ्यांचे हातीं कंदिल देऊन घरोघर जातात.

इतवयांतून शेतकऱ्यांपैकीं कांहीं दुबळे स्त्री-पुरुष चुकून राहिल्यास भटपुराणिक त्या सर्वांस भलत्या एकाद्या देवळांत दररोज रात्रीं जमा करून त्यांस राधाकृष्णाची लीला वगैरेसंबंधीं पुराणें श्रवण करण्याचे नादीं लावतात. समाप्तीचे समयीं त्या सर्वांस चढाओढींत पेटवून त्यांजपासून तबकांत भल्या मोठ्या महादक्षिणा जमा केल्यानंतर, शेवटीं त्यांच्या निराळ्या वर्गणीच्या खर्चानें आपण मोठ्या थाटानें पालख्यांत बसून एकंदर सर्व श्रोतेमंडळीस मागेंपुढें घेऊन मिरवत मिरवत बरोबर जातात.

कित्येक अक्षरशत्रु भटब्राह्मणांस पंचांगावर पोट भरण्याची अक्कल नसल्यामुळें ते आपल्यापैकीं एखाद्या बेवकूब ठोंय्यास ढवळ्याबुवा बनवून त्याचे पायांत खडावा व गळ्यांत विणा घालून त्याजवर एकाद्या शूद्राकडून भली मोठी छत्री धरवून बाकी सर्व त्याचेमागें झांज्या, ढोलके ठोकीत "जे जे राम, जे जे राम," नामाचा घोष करीत अज्ञानी शेतकऱ्यांचे आळोआळीनें प्रतिष्ठित भीक मागत फिरतात.

कित्येक भटब्राह्मण मोठमोठ्या देवळांतील विस्तीर्ण सभामंडपांत आपल्यापैकीं एखाद्या देखण्या ज्वानास कवळेबुवा बनवून त्याचे हातांत चिपळ्याविणा देऊन बाकी सर्व त्याचेमागें ओळीनें तालमृदुंगाचे तालांत मोठ्या प्रेमानें "राधा कृष्ण राधा" म्हणतां म्हणतां नाच्यापोरासारखे हावभाव करून दर्शनास येणाऱ्या जाणाऱ्या सधन रांडमुंडीस आपले नादीं लावून आपलीं पोटें भरून मोठ्या मौजा मारितात.

कित्येक मतिमंद भटब्राह्मणांस भटपणाचा धंदा करून चैना मारण्यापुरती अक्कल नसल्यामुळें ते आपल्यापैकीं एखाद्या भोळसर कारकुनास देवमहालकरी बनवून बाकीचे ब्राह्मण गांवोगांव जाऊन अज्ञानी शेतकऱ्यांपासून देवमहालकऱ्यास नवस करवून त्यास त्यासंबंधानें बरेंच खोरीस आणितात.

कित्येक भटब्राह्मणास वेदशास्त्रांचे अध्ययन करून प्रतिष्ठेनें निर्वाह करण्याची ताकद नसल्यामुळें ते आपल्यापैकीं एखाद्या अर्धवेड्या भांग्यास बागलकोटचे स्वामी बनवून बाकीचे भटब्राह्मण गांवोगांव जाऊन "स्वामी सर्वांचे मनांतील वासना मनकवड्यासारख्या

चाणून त्यांपैकीं कांहीं पूर्ण होण्याविषयीं अन्यमार्गानें बोलून दाखवितात." अशा नाना प्रकारच्या लोणकढ्या थापा अज्ञानी शेतकऱ्यांस देऊन त्यांस स्वामीचे दर्शनास नेऊन तेथें त्यांचें द्रव्य हरण करितात.

सदरीं लिहिलेल्या एकंदर सर्व भटब्राह्मणांच्या धर्मरूपी चरकांतून शेतकऱ्यांची मस्ती जिरली नाहीं, तर भटब्राह्मण बदरीकेदार वगैरे तीर्थयात्रेचे नादीं लावून शेवटीं त्यांस काशीप्रयागास नेऊन तेथें त्यास हजारों रुपयांस नागवून त्यांच्या दाढ्यामिशा बोडून त्यांस त्यांचे घरीं आणून पोहोंचवितात. व शेवटीं त्यांजपासून मांवद्याचे निमित्तानें मोठमोठालीं ब्राह्मणभोजनें घेतात.

अखेर शेतकऱ्याचे मरणानंतर भटब्राह्मण स्मशानीं कारटयांचीं सोंगें घेऊन त्यांचे पुत्राकडून दररोज नाना प्रकारचे विधि करवून त्याचे घरीं दररोज गरुडपुराणें वाचून, दहावे दिवशीं धनकवडी वगैरे डिपोवरील वतनदार कागभटजीस कॉव, कॉव म्हणून पिंडप्रयोजनाचा मानपान देऊन त्यांजपासून गरुडपुराणाचे मजुरीसहित निदान तांबे, पितळ्या, छत्र्या, काठ्या, गाद्या व जोडे दान घेतात. पुढें शेतकऱ्यांचीं एकंदर सर्व मुलें मरेपावेतों त्याजपासून मयताचे श्राद्धपक्षास पिंडदानें करवितेवेळीं त्याचे ऐपतीचे मानानें शिधे व दक्षिणांचीं वर्षासनें घेण्याची वहिवाट त्यांनीं ठेविली आहे. ची ही कीं, शेतकरी यजमानास मोठी लाडीगोडी लावून कोणास कारभारी, कोणास पाटील, कोणास देशमुख वगैरे तोंडापुरत्या पोकळ पदव्या देऊन, त्यांजपासून भटब्राम्हण आपले मुलामुलींचे लग्न वगैरे समयीं केळीच्या पानांसह भाजीपाले फुकट उपटून, त्यांजवर आपली छाप ठेवण्याकरितां शेवटीं एखादे प्रयोजनांत त्या सर्वांस आमंत्रणें करून मांडवांत आणून बसवितात, व प्रथम आपण आपले जातवाल्या स्त्रीपुरुषांसह भोजनें सारून उठल्यानंतर तेथील सर्व एकंदर पात्रांवरील खरकट्याची नीटनेटकी प्रतवार निवड करून त्यांस आपले शूद्र चाकरांचे पंक्तीस बसवून तीं सर्व खरकटीं मोठ्या काऱ्याडाऱ्यानें नाना तऱ्हेचे सोंवळेचाव करून दुरूनच वाढितात; परंतु बाजारबसव्या काड्यामहालांतील शेतकऱ्यांच्या हंगामी वेसवारांडांच्या मुखास चुंबनतुंबड्या लावून त्यांच्या मुखरसाचे घुडके[१] घेण्याचा काडीमात्र विधिनिषेध न करतां, ते आपले यजमान शेतकऱ्यांस इतके नीच मानितात कीं, ते आपल्या अंगणांतील हौदास व आडास शेतकऱ्याला स्पर्शसुद्धां करूं देत नाहींत; मग त्यांच्याशीं रोटी व बेटीव्यवहार कोण करितो ?

एकंदर सर्व सदरचे हकिगतीवरून कोणी अशी शंका घेतील कीं, शेतकरी लोक आज दिवसपावेतों इतके अज्ञानी राहून भटब्राह्मणांकडून कसे लुटले जातात ? यास माझें उत्तर असें आहे कीं, पूर्वी मूळच्या आर्य भटब्राह्मणांचा या देशांत अम्मल चालू

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 12 and 23.

होतांच त्यांनीं आपल्या हस्तगत झालेल्या शूद्र शेतकऱ्यास विद्या देण्याची अटोकाट बंदी करून, त्यास हजारों वर्षें मन मानेल तसा त्रास देऊन लुटून खाल्लें, याविषयीं त्यांच्या मनुसंहितेसारखे मतलबी ग्रंथांत लेख सांपडतात. पुढें कांहीं काळानें चार निःपक्षपाती पवित्र विद्वानांस ब्रह्मकपटाविषयीं बरें न वाटून त्यांनीं बौद्ध धर्माची स्थापना करून, आर्य ब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माचा बोजवार करून या गांजलेल्या अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांस आर्यभटांचे पाशांतून मुक्त करण्याचा झपाटा चालविला होता. इतक्यांत आर्य मुगुटमण्यांतील महाधूर्त शंकराचार्यांनीं बौद्धधर्मी सज्जनांबरोबर नाना प्रकारचे वितंडवाद घालून त्यांचा हिंदुस्थानांत मोड करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न केला. तथापि बौद्ध धर्माच्या चांगुलपणाला तिलप्राय धोका न बसतां उलटी त्या धर्माची दिवसेंदिवस जास्त बढती होत चालली. तेव्हां अखेरीस शंकराचार्यानें तुर्की लोकांस मराठ्यांत सामील करून घेऊन त्यांजकडून तरवारीचे जोरानें येथील बौद्ध लोकांचा मोड केला. पुढें आर्य भटजींस गोमांस व मद्य पिण्याची बंदी करून, अज्ञानी शेतकरी लोकांचे मनावर वेदमंत्र जादूसहित भटब्राह्मणांचा दरारा बसविला.

त्यावर कांहीं काळ लोटल्यानंतर हजरत महमद पैगंबराचे जहामर्द शिष्य, आर्य भटांचे कृत्रिमि धर्मासहित सोरटी सोमनाथासारख्या मूर्तींचा तरवारीचे प्रहारांनीं विध्वंस करून, शूद्र शेतकऱ्यांस आर्यांचे ब्रह्मकपटांतून मुक्त करूं लागल्यामुळें, भटब्राह्मणांतील मुकुंदराज व ज्ञानोबांनीं भागवतबखरींतील कांहीं कल्पित भाग उचलून त्यांचे प्राकृत भाषेंत विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी या नांवाचे डावपेची ग्रंथ करून शेतकऱ्यांचीं मनें इतकीं भ्रमिष्ट केलीं कीं, ते कुराणासहित महमदी लोकांस नीच मानून त्यांचा उलटा द्वेष करूं लागले. नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम या नांवाचा साधु शेतकऱ्यांमध्यें निर्माण झाला. तो शेतकऱ्यांतील शिवाजीराजास बोध करून त्याचे हातून भटब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माची उचलबांगडी करून शेतकऱ्यास त्यांच्या पाशांतून सोडवील, या भयास्तव भट-ब्राह्मणांतील अट्टल वेदांती रामदासस्वामींनीं महाधूर्त गागाभटाचे संगन्मतानें अक्षरशून्य शिवाजीचे कान फुंकण्याचें सट्टल ठरवून, अज्ञानी शिवाजीचा व निस्पृह तुकारामबुवांचा पुरता स्नेहभाव वाढूं दिला नाहीं. पुढें शिवाजी राजाचे पाठीमागें त्याच्या मुख्य भट-पेशव्या सेवकानें शिवाजीचे औरस वारसास साताऱ्चे गडावर अटकेंत ठेविलें. पेशव्याचे अखेरीचे कारकीर्दींत त्यांनीं गाजरताळांची वरू व चटणीभाकरीवर गुजारा करणाऱ्या रकट्यालंगोट्या शेतकऱ्यापासून वसूल केलेल्या पट्टीच्या द्रव्यांतून, त्यांच्या शेतीस पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून धरणें वगैरे बांधकामाकडे एक छदाम खर्च न घालतां, पर्वतीचे रमण्यांत वीसवीस पंचवीसपंचवीस हजार भटब्राह्मणांस मात्र शालजोड्या वगैरे बक्षिसें देण्याचा भडिमार उठविला व हमेशा पेंढाऱ्यांनीं लुटून फस्त केलेल्या शेतकऱ्यांपासून सक्तीनें वसूल केलेल्या जामदारखान्यांतून अज्ञानी शेतकऱ्यांस निदान प्राकृत विद्या देण्या-करितांही दमडीच्या कवड्या खर्चीं न घालतां, ब्राह्मणांचीं मतलबी धर्मशास्त्रें शिकणाऱ्या

भटब्राह्मणांस शेकडों रुपयांचीं वर्षासनें देण्याची चंगळ उडवून, पर्वतीचे रमण्यांतील कोंडवाड्यांत मात्र एकंदर ओगराळ्यांनीं मोहरापुतळ्यांची खिचडी वाटण्याची बाजीराव पेशवेसाहेबांनीं मोठी धूम उडविली, म्हणून आम्हांस फारसें नवल वाटत नाहीं. कारण रावबाजी हे अस्सल आर्य जातीचे ब्राह्मण होते. सबब तसल्या पक्षपाती दानशूरानें पर्वतीसारख्या एखाद्या संस्थानांत शेतकऱ्यांपैकीं कांहीं अनाथ रांडमुंडींची व निराश्रित पोरक्या मुलीमुलांची सोय केली नाहीं, फक्त आपल्या[१] जातींतील भटब्राह्मण, गवई पुजारी व चारपांच हिमायती अगांतुक भटब्राह्मणांस दररोज प्रातःकाळीं अंघोळीस ऊन पाणी व दोन वेळां प्रतिदिवशीं पहिल्या प्रतीचीं भोजनें मिळण्याची सोय करून, हरएक निरशनास दूध पेढे वगैरे फराळाची, आणि पारण्यास व एकंदर सर्व सणावारांस त्यांचे इच्छेप्रमाणें पक्वान्नांची रेलचेल उडवून त्या सर्वांस अष्टोप्रहर चौघड्यासहित गवयांचीं गाणींबजावणीं ऐकत बसवून मौजा मारण्याची यथास्थित व्यवस्था लावून ठेवली आहे.

या वहिवाटी आमचें भेकड इंग्रज सरकार जशाच्या तशाच आज दिवसपावेतों चालू ठेवून त्याप्रीत्यर्थ कष्टाळू शूद्रादि अतिशूद्र शेतकऱ्यांचे निढळाचे घामाचे पट्टीचे द्रव्यांतून हजारों रुपये सालदरसाल खर्चीं घालतें.

सांप्रत कित्येक शूद्रादि अतिशूद्र शेतकरी खिस्ति धर्म स्वीकारून मनुष्यपदास पावल्यानें, भटब्राह्मणांचें महत्त्व कमी होऊन त्यांना स्वतः मोलमजुरीचीं कामें करून पोटें भरण्याचे प्रसंग गुदरत चालले आहेत, हें पाहून कित्येक धूर्त भटब्राह्मण खुळ्या हिंदुधर्मास पाठीशीं घालून नाना प्रकारचे नवे समाज उपस्थित करून त्यांमध्यें अपरोक्ष रीतीनें महमदी व खिस्ति धर्मांच्या नालस्त्या करून त्यांविषयीं शेतकऱ्यांचीं मनें भ्रष्ट करीत आहेत. असो. परंतु पुरातन मूर्तिपूजोत्तेजक ब्रह्मवृंदांतील काका व सार्वजनिक सभेचे पुढारी जोशीबुवा यांनीं हिंदुधर्मांतील जातीभेदाच्या दुरभिमानाचें पटल आपल्या डोळ्यांवरून एकीकडे काढून शेतकरी लोकांची स्थिति पाहिली असती तर, त्यांच्यानें एकपक्षीय धर्माच्या प्रतिबंधानें नाडलेल्या बिचाऱ्या दुर्दैवी शेतकऱ्यांस अज्ञानी म्हणण्यास धजवलें नसतें; व जर ते आमच्या इंग्रज सरकारास शेतकऱ्यांवर होणाऱ्या धर्माच्या जुल्माची यथातथ्य माहिती करून देते, तर कदाचित् त्यास दयेचा पाझर फुटून तें भूदेव भटब्राह्मण कामगारांची शूद्रास विद्या देण्याच्या कामांत मसलत न घेतां, त्यांस ती देण्याकरितां निराळे उपाय योजितें.

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 133.
Having received an English education, he* was a frequent visitor at the tables of Europeans of rank and was in the habit of entertaining them in turn at Bhitoor, etc.

---

* Th adopted son of the late Bajee Rao, the ex-Peishwa of the Maharattas.

सारांश, पिढीजाद अज्ञानी शेतकऱ्यांचे द्रव्याची व वेळेची भटब्राह्मणांकडून इतकी हानि होते कीं, त्यांजला आपलीं लहान मुलेंसुद्धां शाळेंत पाठविण्याचें त्राण उरत नाहीं व याशिवाय आर्यभटऋषींनीं फार पुरातन काळापासून "शूद्र शेतकऱ्यास ज्ञान देऊं नये" म्हणून सुरू केलेल्या वहिवाटीची अज्ञानी शेतकऱ्यांचे मनावर जशीची तशीच धास्ती असल्यामुळें त्यांना आपलीं मुलें शाळेंत पाठविण्याचा हिय्या होत नाहीं आणि हल्लींचे आमचे दयाळू गव्हर्नर जनरलसाहेबांनीं पाताळचे अमेरिकन लोकसत्तात्मक राज्यांतील महाप्रतापी जॉर्ज वाशिंगटन ताताचा कित्ता घेऊन, येथील ब्राह्मण सांगतील तो धर्म आणि इंग्रज करतील ते कायदे मानणाऱ्या अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस, विद्वान भटब्राह्मणां-प्रमाणेंच म्युनिसीपालिटींत आपले वतीनें मुखत्यार निवडून देण्याचा अधिकार दिला आहे खरा, परंतु या प्रकरणांत भटब्राह्मण आपले विद्येचे मदांत सोंवळ्याओवळ्याच्या तोऱ्यांनीं अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र लोकांशीं छक्केपंजे करून त्यांना पुढें ठकवूं लागल्यास आमचे दयाळू गव्हर्नर जनरलसाहेबांचे माथ्यावर कदाचित् अपयशाचें खापर न फुटो, म्हणजे भटब्राह्मणांचे गंगेंत घोडे नाहले, असें आम्ही समजूं.

## प्रकरण २ रें

सरकारी गोरे अधिकारी हे बहुतकरून ऐषआरामांत गुंग असल्यामुळें त्यांना शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाहीं व या त्यांच्या गाफीलपणानें एकंदर सर्व सरकारी खात्यांत ब्राह्मण कामगारांचें प्राबल्य असतें. या दोन्ही कारणांमुळें शेतकरी लोक इतके लुटले जातात कीं, त्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाहीं.

एकंदर सर्व हिंदुस्थानांत पूर्वीं कांहीं परदेशस्थ व यवनी बादशहा व कित्येक स्वदेशीय राजेरजवाडे या सर्वांजवळ शूद्र शेतकऱ्यांपैकीं लक्षावधि सरदार, मानकरी, शिलेदार, बारगीर, पायदल, गोलंदाज, माहूत, उंटवाले व अतिशूद्र शेतकऱ्यांपैकीं मोतद्दार चाकरीस असल्यामुळें, लक्षावधि शूद्रादि अतिशूद्र शेतकरी लोकांचे कुटुंबांस शेतसारा देण्याची फारशी अडचण पडत नसे. कारण बहुतेक शेतकऱ्याच्या कुटुंबांतील निदान एखाद्या मनुष्यास तरी लहानमोठी सरकारी चाकरी असावयाचीच. परंतु हल्लीं सदरचे बादशहा, राजेरजवाडे वगैरे लंपास गेल्यामुळें सुमारें पंचवीस लक्षाचे वर शूद्रादि अतिशूद्र शेतकरी वगैरे लोक बेकार झाल्यामुळें त्या सर्वांचा बोजा शेतकी करणारांवर पडला आहे.

आमच्या जहामर्द इंग्रज सरकारच्या कारस्थानानें एकंदर सर्व हिंदुस्थानांत हमेशा लढायांचे धुमाळयांत मनुष्यप्राण्यांचा वध होण्याचें बंद पडल्यामुळें चहूंकडे शांतता झाली

खरी, परंतु या देशांत स्वाऱ्या, शिकारी बंद पडल्यामुळें एकंदर सर्व लोकांचें शौर्य व जहामर्दी लयास जाऊन राजेरजवाडे "भागू बाया"सारखे दिवसा सोंवळें नेसुन देवपूजा करण्याचे नादांत गुंग होऊन रात्रीं निरर्थक उत्पति वाढविण्याचे छंदांत लंपट झाल्यामुळें, येथील चघळ खानेसुमारी मात्र फार वाढली. यामुळें सर्व शेतकऱ्यांमध्यें भाऊहिस्से इतके वाढले कीं, कित्येकांस आठआठ, दहादहा पाभारीचे पेऱ्यावर गुजारा करावा लागतो, असा प्रसंग गुजरला आहे. व अशा आठआठ, दहादहा पाभरीचे पेऱ्याकरितां त्यांना एकदोन बैल जवळ बाळगण्याची ऐपत नसल्यामुळें ते आपलीं शेतें शेजाऱ्यापाजाऱ्यास अर्धेलीनें अथवा खंडानें देऊन, आपलीं मुलेंमाणसें बरोबर घेऊन कोठेंतरी परगांवीं मोलमजुरी करून पोट भरण्यास जातात.

पूर्वी ज्या शेतकऱ्याजवळ फारच थोडीं शेतें असत, व ज्याचा आपले शेतीवर निर्वाह होत नसे, ते आसपासचे डोंगरावरील दऱ्याखोऱ्यांतील जंगलांतून उंबर, जांभूळ वगैरे झाडांचीं फळें खाऊन व पळस, मोहा, इत्यादी झाडांचीं फुलें, पानें आणि जंगलांतून तोडून आणलेल्या लाकूडफांट्या विकून, पट्टीपासोडीपुरता पैसा जमा करीत व गांवचे गायरानाचे भिस्तीवर आपल्याजवळ एक दोन गाया व दोनचार शेरड्या पाळून त्यांच्यावर जेमतेम गुजारा करून मोठ्या आनंदानें आपआपल्या गांवींच रहात असत. परंतु आमचे **मायबाप** सरकारचे कारस्थानी युरोपियन कामगारांनीं आपली विलायती अष्टपैलू अक्कल सर्व खर्ची घालून भले मोठे टोलेजंग जंगलखातें नवीनच उपस्थित करून, त्यामध्यें एकंदर सर्व पर्वत, डोंगर, टेकड्या, दरींखोरीं व त्याचे भरीस पडित जमिनी व गायरानें घालून फारेष्टखातें शिखरास नेल्यामुळें दीनदुबळ्या पंगु शेतकऱ्याचे शेरडाकरडांस या पृथ्वीचे पाठीवर रानचा वारासुद्धां खाण्यापुरती जागा उरली नाहीं. त्यांनीं आतां साळी, कोष्टी, सणगर, लोहार, सुतार वगैरे कसबी लोकांच्या कारखान्यांत त्यांचे हाताखालीं किरकोळ कामें करून आपलीं पोटें भरावींत, तर इंग्लंडांतील कारागीर लोकांनीं रुचिरुचीच्या दारु-बाटल्या, पाव, बिस्कुटें, हलवे, लोणचीं लहानमोठ्या सुया, दाभण, चाकू, कातऱ्या, शिवण्याचीं यंत्रें, भाते, शेगड्या, रंगीबेरंगी बिलोरी सामान, सूत, दोरे, कापड, शाली, हातमोजे, पायमोजे, टोप्या, काठ्या, छत्र्या, पितळ, तांबें, लोखंडी पत्रे, कुलपें, किल्ल्या, डांबरी कोळसे, तऱ्हेतऱ्हेच्या गाड्या, हारनिसें, खोगीरें, लगाम, शेवटीं पायपोस यंत्रद्वारें तेथें तयार करून, येथें आणून स्वस्त विकूं लागल्यामुळें, येथील एकंदर सर्व मालास मंदी पडल्याकारणानें येथील कोष्टी, साळी, जुलयी, मोमीन इतके कंगाल झाले आहेत कीं, त्यांपैकीं कित्येक विणकर लोक अतिशय मंदीचे दिवसांत उपाशी मरूं लागल्यामुळें अन्नूस्तव कधीं कधीं चोरून छपून आपला निर्वाह डाळीच्या चुणीवर, कित्येक तांदळाच्या व गव्हाच्या कोंड्यावर व कित्येक अंब्यांच्या कोयांवर करितात. कित्येक पद्मसाळी, घरांतील दांताशीं दांत लावून बसलेल्या बायकापोरांची स्थिति पहावेनाशी झाली म्हणजे, संध्याकाळीं निःसंग होऊन दोनचार

पैशांची उधार शिंदी पिऊन बेशुद्ध झाल्याबरोबर, घरांत जाऊन मुर्द्यासारखे पडतात. कित्येक पद्मसाळी गुजरमारवाड्यांकडून मजुरीनें वस्त्रें विणावयास आणलेलें रेशीम व कलाबतू येईल त्या किंमतीस विकून आपल्या मुलांबाळांचा गुजारा करून, गुजरमारवाड्यांचे हातीं तुरी देऊन रातोरात परगांवीं पळून जातात. अशा पोटासाठीं लागलेल्या बुभुक्षित कसवी लोकांनीं रिकामक्या शेतकऱ्यांस मदत कशी व कोणती द्यावी ?

दुसरें असें कीं, शूद्रादि अतिशूद्रांवर पुरातनकाळीं आपले वाडवडिलांनीं महत्प्रयासांनीं व कपटांनीं मिळविलेलें वर्चस्व चिरकाळ चालावें, व त्यांनीं केवळ घोडा, बैल, वगैरे जनावरांसारखे बसून आपणांस सौख्य द्यावें, अथवा निर्जीव शेतें होऊन आपणासाठीं जरूरीचे व ऐषारामाचे पदार्थ त्यांनीं उत्पन्न करावेत, या इराद्यानें अटक नदीचे पलीकडेस हिंदु लोकांपैकीं कोणी जाऊं नये, गेले असतां तो भ्रष्ट होतो, अशी बाब ब्राह्मण लोकांनीं हिंदु धर्मात घुसडली. यापासून ब्राह्मण लोकांचा इष्ट हेतू सिद्धीस गेला; परंतु इतर लोकांचें फारच नुकसान झालें. परकीय लोकांच्या चालचलणुकीचा त्यांस पडोसा न मिळाल्यामुळें ते खरोखर आपणांस मानवी प्राणी न समजतां, केवळ जनावरें समजूं लागले आहेत. इतर देशांतील लोकांशीं व्यापारधंदा अगदीं नाहींसा झाल्यानें ते कंगाल होऊन बसले; इतकेंच नाहीं परंतु "आपले देशांत सुधारणा करा, आपले देशांत सुधारणा करा," अशी जी सुधारलेले ब्राह्मण लोक निदान बाह्यात्कारी हल्लीं हकाटी पिटीत आहेत, त्यांस कारण त्यांची ही वर जाणविलेली धर्माची बाब कारण झाली असावी, हें अगदीं निर्विवाद आहे. या कृत्रिमी बाबीमुळें साळी, सुतार वगैरे कारागीर लोकांचें तर अतिशय नुकसान झालें. आणि त्यांस ती पुढें किती भयंकर स्थितीस पोहोंचवील, याचा अदमास खऱ्या देशकल्याणेच्छुखेरीज कोणासही लागणार नाहीं.

आतां कोणी अशी शंका घेतील कीं, गरीब शेतकऱ्यांनीं, ज्या शेतकऱ्याजवळ भरपूर शेतें असतील, त्याचे हाताखालीं मोलमजुरी करून आपला निर्वाह करावा, तर एकंदर सर्व ठिकाणीं संतति जास्त वाढल्यामुळें कांहीं वर्षें पाळीपाळीनें शेतें पडित टाकण्यापुरतीं भरपूर शेतें शेतकऱ्याजवळ उरलीं नाहींत, तेणेंकरून शेतांस विसांवा न मिळतां तीं एकंदर सर्व नापीक झालीं. त्यांत पूर्वींप्रमाणें पिकें देण्यापुरतें सत्त्व शिल्लक राहिलें नाहीं. त्यांना आपल्या कुटुंबाचाच निर्वाह करितां करितां नाकीं दम येतात, तेव्हां त्यांनीं आपल्या गरीब शेतकरी बांधवांस मोलमजुरी देऊन पोसावें, असें कसें होईल बरें ? अशा चोहोंकडून अडचणींत पडलेल्या बहुतेक शेतकऱ्यांस आपलीं उघडीं नागडीं मुलें शाळेंत पाठविण्याची सवड होत नाहीं, व हें सर्व आमच्या दूरदृष्टी सरकारी कामगारांस पक्केपणीं माहीत असून ते सर्व अज्ञानी मुक्या शेतकऱ्यास विद्या देण्याच्या मिषानें सरसकटीनें लाखों रुपये लोकलफंड गोळा करितात व त्यांपैकीं एक तृतियांश रक्कम नांवाला विद्याखातीं खर्चीं घालून कोठें कोठें तुरळक तुरळक शाळा

घातल्या आहेत. त्या शाळेंत थोडेबहुत शेतकरी आपलीं मुलें पाठवितात. परंतु त्यांचे मुलांस शिकविणारे शिक्षक स्वत: शेतकरी नसल्यानें त्यांस असावी तशी आस्था असते काय ? जे लोक आपल्या मतलबी धर्माच्या बडिवारामुळें शेतकऱ्यास नीच मानून सर्वकाळ स्नानसंध्या व सोंवळेंचाव करणारे, त्यांजपासून शेतकऱ्याचे मुलांस यथाकाळीं योग्य शिक्षण न मिळतां, ते जसेचे तसेच ठोंबे रहातात, यांत नवल नाहीं. कारण आजपावेतों शेतकऱ्यांपासून वसूल केलेल्या लोकलफंडाचे मानानें शेतकऱ्यांपैकीं कांहीं सरकारी कामगार झाले आहेत काय ? व तसें घडून आलें असल्यास ते कोणकोणत्या खात्यांत कोणकोणत्या हुद्यांचीं कामें करीत आहेत, याविषयीं आमचे वाकबगार शाळाखात्यांतील डिरेक्टरसाहेबांनीं नांवनिशीवार पत्रक तयार करून सरकारी ग्याझिटांत छापून प्रसिद्ध केल्यास, शेतकरी आपले मायबाप सरकारास मोठ्या उल्हासानें जेव्हां दुवा देतील, तेव्हां सरकारी ग्याझिटियर मायबापांचे डोळे उघडतील. कारण खेड्यापाड्यांतून जेवढे म्हणून शिक्षक असतात, ते सर्व बहुतकरून ब्राह्मण जातीचेच असतात. त्यांचा पगार आठबारा रुपयांचे वरतीं नसतो. व ज्यांची योग्यता पुण्यासारख्या शहरांत चारसहा रुपयांचे वरतीं नसते, असले पोटार्थी अविद्वान ब्राह्मण शिक्षक, आपला मतलबी धर्म व कृत्रिमी जात्याभिमान मनांत दृढ धरून, शेतकऱ्यांचे मुलांस शाळेंत शिकवतां शिकवतां उघड रितीनें उपदेश करितात कीं, "तुम्हांला विद्या शिकून कारकुनांच्या जागा न मिळाल्यास आम्हासारखीं पंचांगें हातीं घेऊन घरोघर भिक्षा का मागावयाच्या आहेत ?"

अशा अज्ञानी शेतकऱ्यांच्या शेतांची दर तीस वर्षांनीं पैमाष करितांना, आमचे धर्मशील सरकारचे डोळे झाकून प्रार्थना करणारे युरोपियन कामगार, शेतकऱ्यांचे बोडक्यावर थोडीतरी पट्टी वाढविल्याशिवाय शेवटीं 'आमेन'ची आरती म्हणून आपल्या कंबरा सोडीत नाहींत. परंतु सदाचें काम चालू असतां शिकारीचे शोकी युरोपियन कामगार ऐषआराम व ख्यालीखुशालींत गुंग असल्यामुळें त्यांचे हाताखालचे धूर्त ब्राह्मणकामगार अज्ञानी शेतकऱ्यास थोडे का नागवितात ? व युरोपियन कामगार त्यांजवर बारीक नजर ठेवितात काय ?

जेव्हां अज्ञानी व मूढ शेतकऱ्यांत आपसांत शेताच्या बांधाबद्दल किंवा समाईक विहिरीवर असलेल्या भाऊबंदीच्या पाणपाळीसंबंधीं थोडीशी कुरबुर होऊन मारामारी झाली कीं, कळीचे नारद भटकुळकरणी यांनीं दोन्ही पक्षांतील शेतकऱ्यांचे आळींनीं जाऊन त्यांस निरनिराळे प्रकारचे उपदेश करून, दुसरे दिवशीं त्यांपैकीं एका पक्षास भर देऊन त्यांचे नांवाचा अर्ज तयार करून त्यास मामलेदाराकडे पाठवितात. पुढें प्रतिवादी व साक्षीदार हे, समन्स घेऊन आलेल्या पट्टेवाल्यास बरोबर घेऊन आपआपलीं समन्सें रुजूं करण्याकरितां कुळकरण्याचे वाड्यांत येतात, व त्याचीं समानें रुजूं करून शिपायास दरवाज्याबाहेर घालवितांच दोन्ही पक्षकारांस पृथक पृथक एके बाजूला नेऊन

सांगावयाचें कीं, "तुम्ही अमक्या व तुम्ही तमक्या वेळीं मला एकांतीं येऊन भेटा, म्हणजे त्याविषयीं एखादी उत्तम तोड काढूं" नंतर नेमलेल्या वेळीं वादी व त्याचे पक्षकार घरीं आल्यावर त्यास असें सांगावयाचें कीं, "तुम्ही फार तर काय परंतु अमुक रकमेपर्यंत मन मोठें कराल, तर मामलेदारसाहेबांचे फडनविसांस सांगून तुमचे प्रतिवादीस कांहींना कांहीं तरी सजा देववितों. कारण ते केवळ फडनविसाचे हातांत आहेत. मी बोलल्याप्रमाणें कांहींच घडून न आणल्यास, मी तुमची रक्कम त्याजपासून परत घेऊन तुम्हास देईन व माझे श्रमांबद्दल बहिरोबा तुम्हास जी बुद्धि देईल तेंच द्या. किंवा काहींच दिलें नाहीं तरी चिंता नाहीं. माझी काहीं त्याविषयीं तकरार नाहीं. तुम्हांला यश आलें म्हणजे आम्ही सर्व मिळविलें." नंतर प्रतिवादीचे पक्षकाराकडून वादीचे दुपटीनें व आपले श्रमांबद्दल कांहीं मिळून रक्कम घेऊन त्याजबरोबर असा करार करावयाचा कीं, "मी सांगतों तशी तुम्ही तकरार देऊन त्याबद्दल दोनतीन बनावट साक्षीदार द्या, म्हणजे फडनविसास सांगून तुमच्या केसासही धक्का लागूं देणार नाहीं, कारण त्याचें वजन मामलेदारसाहेबावर कसें काय आहे, हें तुम्हाला ठाऊकच आहे. व आतां मीं तुम्हाबरोबर करार केल्याप्रमाणें तुमचें काम फत्ते न झाल्यास त्याच दिवशीं तुमची रक्कम त्यांजपासून परत आणून तुमची तुम्हांस देईन. परंतु माझे श्रमाबद्दलचे घेतलेल्या रुपयांतून तुम्हांस एक कवडी परत करणार नाहीं, हें मी आतांच सांगतों; नाहींतर अशा खटपटीवांचून माझी कांहीं चूल अडली नाहीं." नंतर मामलेदार कचेरींतील ब्राह्मणकामगार अक्षरशून्य अशा वादीप्रतिवादींच्या व त्यांच्या साक्षीदारांच्या जबान्या घेतेवेळीं, ज्या पक्षकारांकडून त्यांची मूठ गार झाली असेल, त्यांच्या जबान्या घेतेवेळीं, त्यांस कांहीं सूचक प्रश्न घालून अनुकूल जबान्या तयार करितात. परंतु ज्या पक्षकारांकडून त्यांचा हात नीट ओला झाला नसेल, त्यांच्या जबान्या लिहितेवेळीं त्यामध्यें एकंदर सर्व मुद्दे मागेंपुढें करून अशा तयार करितात कीं, त्यांजपासून वाचणाराच्या किंवा ऐकणाऱ्यांच्या मनांत त्या कज्याचें वास्तविक स्वरूप न येतां, त्यांचा समज त्यांविरुद्ध होईल. कित्येक ब्राह्मण कारकून अज्ञान शेतकऱ्यांच्या जबान्या लिहितांना त्यांतील कांहीं मुद्यांचीं कलमें अजिबात गाळून टाकितात. कित्येक ब्राह्मणकामगार शेतकऱ्यांच्या जबान्या आपल्या घरीं नेऊन रात्रीं दुसऱ्या जबान्या तयार करून सरकारी दप्तरांत आणून ठेवितात. असें असेल तर एखादा निःपक्षपाती जरी अम्मलदार असला, तरी त्याच्या हातूनही अन्याय होण्याचा संभव आहे. यापुढें खिसे चापसणाऱ्या बगलेवकिलांनीं भरीस घातल्यावरून त्यांनीं युरोपियन कलेक्टराकडे अपीलें केल्यावर कलेक्टरांच्या शिरस्तेदारांच्या, ज्या पक्षकाराकडून मुठी गार होतील, त्याप्रमाणें त्यांच्या अर्जीच्या जबानीच्या सुनावण्या कलेक्टरापुढें करितात व त्या वेळीं त्यांतील बहुतेक मारु मुद्दे वाचतां वाचतां गाळून कलेक्टराचे मुखांतून शुद्ध सोनेरी वाक्यें, "टुमची टकरार टरकटी आहे", बाहेर पडून आपले

वतीनें निकाल करून घेण्याचें संधान न साधल्यास, शिरस्तेदार त्यांचे प्रकरणावर आपले मर्जीप्रमाणें गिचमीड मराठी लिहून साहेबबहादूर संध्याकाळीं आपल्या मॅडमसाहेबा-बरोबर हवा खाण्यास जाण्याचे धांदलींत, अगर मराठी नीट समजणारा एखादा दंडुक्या साहेब असल्यास तो आदले दिवशीं कोठें मेजवानीस जाऊन जागलेला असल्यामुळें दुसरे दिवशीं सुस्त व झोपेच्या गुंगींत असतां, किंवा शिकारीस जाण्याचे गडबडींत तेथें जाऊन, पूर्वीं त्यांनीं जसे शेरे सांगितले असतील, त्याप्रमाणें हुबेहूब वाचून दाखवून त्याच्या सह्या त्या प्रकरणावर सहज घेतात.

कित्येक तिरसट कलेक्टरांचे पुढें धूर्त शिरस्तेदाराची मात्रा चालत नसल्यास ते कांहीं आडमूठ अक्षरशून्य शेतकऱ्यांचीं प्रकरणें मुख्य सदर स्टेशनच्या ठिकाणीं तयार न करितां त्यास गांवोगांव कलेक्टराचे स्वारीमागें पायाला पानें बांधून शिळे तुकडे खात खात फिरावयास लावून त्याचीं हाडें खिळखिळीं करून मस्ती जिरवितात. व कित्येक निवळ अज्ञानी शेतकऱ्यांच्या अर्ज्या फैलास एकदोन दिवस न लावतां, त्यांच्या प्रतिपक्षा-कडून कांहीं चिरीमिरी मिळाल्यास त्या मुळींच गाळून टाकितात. अखेरीस दोन्ही पक्षापैकीं जास्ती पैसा खर्च करणाऱ्या पक्षास जेव्हां जय मिळतो, तेव्हां एकंदर सर्व गांवकरी लोकांत चुरस उत्पन्न होऊन गांवांत दोन तट पडतात. नंतर पोळ्याचे दिवशीं बैलाची उजवी बाजू व होळीस अर्धी पोळी कोणी द्यावी, यासंबंधीं दोन्ही तटांमध्यें मोठमोठ्या हाणामाऱ्या होऊन त्यांतून कित्येकांचीं डोकीं फुटून जखमा झाल्याबरोबर भट (एकंदर सर्व फौजदारी, दिवाणी वगैरे कज्जे अज्ञानी शेतकऱ्यांत उपस्थित करण्याचे कामीं कज्जाचे तळाशीं हे कळीचे नारद नाहींत असे फारच थोडे कज्जे सांपडतील) कुळकर्णी दोन्ही तटवाल्यांस वरकांति शाबासक्या देऊन, आंतून पोंचट पोलिसपाटलास हातांत घेऊन तालुक्यांतील मुख्य पोलिस भुतावळास जागृत करितात. तेव्हां तेथून, आंतून काच्यांनीं पोटें आंवळून वरून काळ्यापिवळ्या पाटलोनी व बूट, डगल्यापगड्यांनीं सुशोभित होऊन, हातीं रंगीबेरंगी टिकोरीं घेतलेल्या बुभुक्षित शिपायांच्या पाठीमागें धापा देत एक दोन झिंगलेले आडमूठ हवालदार व जमादार बगलेंत बोथलेल्या तरवारी घेऊन प्रथम गांवांत येतांच महार व पोलीसपाटील यांस मदत घेऊन व एकंदर गांवांतील दोन्ही पक्षांतील लोकांस पकडून आणून चावडीवर कैद करितात, व पहारेकऱ्याशिवाय बाकी सर्व शिपायी व अम्मलदार अज्ञानी पाटीलसाहेबाचे मदतीनें, मारवाड्याच्या दुकानांतून मन मानेल त्या भावानें व मापानें सिधासामुग्री घेऊन चावडीवर परत येतां येतां, दारूच्या पिठ्यांत कोणी मेजवान्या दिल्यास, ऐन गुंगीच्या नादांत जेवून गार झाल्यानंतर, थोडीशी डामडौली पूसतपास करून त्यांच्या त्या सर्व कैदी लोकांस मुख्य ठाण्यांत आणून फौजदारासमोर उभे करून त्याच्या हुकुमाप्रमाणें त्याची पक्की चौकशी होईतोंपावेतों त्यास कच्चे कैदेंत ठेवितात. यापुढें कैदी शेतकऱ्यांच्या घरचीं माणसें आपआपल्या बायका-मुलाबाळांच्या अंगावरील किडूकमिडूक मोडून आणलेल्या रकमा फौजदारकचेरींतील

कामगारांची समजूत करण्याचे भरीस कसकशा घालितात, त्यापैकीं कांहीं मासले येथें दाखवितों. जर एखाद्या पक्षांतील लोकांस जास्ती मोठाल्या जखमा झाल्या असल्यास धूर्त कामगार, कुळकर्ण्यांचे द्वारें दुसऱ्या पक्षाकडून कांहीं रकमा घेऊन त्यांच्या त्या सर्व जखमा बऱ्या होऊन त्यांचा मागमुद्दा मोडेतोंपावेतों तीं प्रकरणें तयार करून माजिस्त्रेटसाहेबाकडे पाठविण्यास विलंब लावतात. कधीं कधीं धूर्त कामगारांच्या मुठीगार झाल्यास ते दुसऱ्या पक्षांतील मुद्याचे साक्षीदारांनीं त्यांच्या खटल्यांत साक्षीच देऊं नये म्हणून त्यांच्या सावकारास भिडा घालितात. ते कधीं कधीं मुद्याचे साक्षिदारांनीं आपलीं सामानें रुजू करण्याचे पूर्वीं त्यास कुळकर्ण्यांचे मार्फत नाना तऱ्हेच्या धाकधमक्या देऊन त्यास भलत्या एखाद्या दूर परगांवीं पळवून लावितात. त्यांतून कांहीं आडमूठ अज्ञानी शेतकऱ्यांनीं कुळकर्ण्यांचे द्वारें ब्राह्मणकामगारांच्या सूचनांचा अव्हेर करून आपल्या आपल्या साक्षी देण्याकरितां कचेरींत आल्यास, एक तर ते अक्षरशून्य असल्यामुळें त्यांच्या स्मरणशक्त्या धड नसतात व दुसरें त्यांस मागच्या पुढच्या सवालांचा संदर्प जुळून जबान्या देण्याची स्फूर्ति नसते, यामुळें त्यांच्या जबान्या घेतेवेळीं धूर्त कामगार त्यांस इतके घाबरे करितात, कीं त्यास "दे माय धरणी ठाव" होतो. ते कधीं कधीं अज्ञानी शेतकऱ्यांच्या जबान्या घेतांना त्यांच्या नाना प्रकारच्या चाळकचेष्टा करून त्यांस इतके घाबरे करितात कीं, त्यांनीं खरोखर जें कांहीं डोळ्यांनीं पाहिलें व कानांनीं ऐकलें असेल, त्याविषयीं इत्थंभूत साक्ष देण्याची त्यांची छातीच होत नाहीं. याशिवाय कित्येक धाडस कामगारांचे हातावर भक्कम दक्षिणा पडल्या कीं, ते कुळकर्ण्यांचे साह्यानें कायद्याचे धोरणाप्रमाणें नाना प्रकारचे बनाऊ पुरावे व साक्षिदार तयार करवून मन मानेल त्या त्या अज्ञानी शेतकऱ्यास दंड अथवा ठेपा करवितात. त्या वेळीं त्या सर्वांजवळ दंड भरण्यापुरत्या रकमा नसल्यामुळें, त्यांपैकीं बहुतेक शेतकरी, आपले इष्टमित्र सोयरेधायऱ्यांपासून उसऱ्या रकमा घेऊन दंडाच्या भरीस घालून घरोघर आल्याबरोबर, उसऱ्या रकमा घेतलेल्या ज्यांच्या त्यांस परत देऊन इतर ठेपा झालेल्या मंडळीस तुरंगांतून सोडविण्याकरितां अपिलें लावण्यापुरत्या रकमा सावकरापाशीं कर्ज मागूं लागल्यास आमच्या सरकारच्या पक्षपाती शेतकऱ्यांचे कायद्यामुळें शेतकऱ्यास कोणी अब्रूवाले सावकार आपल्या दाराशीं उभेसुद्धां करीत नाहींत. कारण आपले पदरचे पैसे शेतकऱ्यास कर्जाऊ देऊन, त्यानंतर निवाडे करून घेतेवेळीं खिसे चापसणाऱ्या आडमूठ शूद्र वेलिफांच्या समजुती काढून सामानें रुजूं करून आणलेल्या अज्ञानी शेतकऱ्यासमक्ष भर कोडतांत सावकारास फजिती करून घ्यावी लागते. कित्येक तरुण गृहस्थांनीं नाना प्रकारचीं कायदेपुस्तकें राघूसारखीं तोंडपाठ केल्यामुळें त्यांच्या परीक्षा उतरतांच आमचें भोळसर सरकार त्यांस मोठमोठ्या टोलेजंग न्यायाधिशांच्या जागा देतें. परंतु हे लोक आपल्या सार्वजनिक मूळ महत्त्वाचा बांधवी संबंध तोडून, आपण

येथील भूदेवाचे औरस वारसपुत्र बनून, कोडतांत एकंदर सर्व परजातींतील वयोवृद्ध, वडील दुबळ्या गृहस्थांस तुच्छ मानून त्यांची हेळसांड करितात. प्रथम हे सरकारी रिवाजाप्रमाणें एकंदर सर्व साक्षीदार वगैरे लोकांस कोडतांत दहा वाजतां हजर होण्यास सामानें करून आपण सुमारें बारा वाजतां कोडतांत येऊन, तेथील एखादे खोलींत तास अर्धा तास उताणे पालथे पडून नंतर डोळे पुशीत बाहेर चौरंगावरील खुर्चीच्या आसनावर येऊन बसल्याबरोबर, खिशांतील पानपट्टी तोंडांत घालून माकडाचे परी दांत विचकून चावतां चावतां पायावर पाय ठेवून, पाकेटांतील डब्या बाहेर काढून तपकिरीचे फस्के नाकांत ठासतां ठासतां खालीं बसलेल्या मंडळीवर थोडीशी बांकडी नजर टाकून डोळे झांकीत आहेत, इतक्यांत तांबडी पगडी, काळीं डगलीं, पाटलोण-बुटांनीं चष्क बनून आलेल्या प्लीडरवकिलांनीं त्यांच्यापुढें उभें राहून मिशांवर ताव देऊन "युवर आनर" म्हणण्याची चोपदारी ललकारी ठोकल्याबरोबर हे भूदेव जजसाहेब, आपल्या पोटावर हात फिरवून आपले जातभाऊ वकिलास विचारतात कीं, "तुमचें काय बोलणें आहे?" यावरून वकिलसाहेब आपल्या खिशांत हात घालून म्हणतात कीं, "आज एका खुनी खटल्याच्या संबंधानें आम्हांस सेशनांत हाजर होणें आहे. सबब आपण मेहेरबान होऊन आमचे मार्फतचे येथील कज्जे आज तहकूब ठेवावेत." हें म्हणतांच न्यायाधिशांनीं माना हलवून गुढ्या दिल्याबरोबर वकीलसाहेब गाड्याघोड्यावर स्वार होऊन आपला रस्ता धरितांच न्यायाधीश आपल्या कामाची सुरवात करितात. याविषयीं येथें थोडेसें नमुन्याकरितां घेतों. कित्येक भूदेव न्यायाधिश आपल्या उंच जातीच्या तोऱ्यांत किंवा कालच्या ताज्या अमलाच्या झोकांत, न्याय करितांना, बाकी सर्व जातींतील बहुतेक लोकांबरोबर अरेतुरेशिवाय भाषणच करीत नाहींत. कित्येक अक्कडबाज गृहस्थांनीं कोडतांत आल्याबरोबर या राजबिंड्या भूदेवास लवून मुजरे केले नाहींत, तर त्यांच्या जबान्या घेतेवेळीं त्यांस निरर्थक छळितात. तशांत ब्राह्मणी धर्माच्या विरुद्ध एखाद्या ठिकाणीं समाज उपस्थित होऊन त्यास सामील असणाऱ्यांपैकीं थोर गृहस्थास कोडतांत हजर होण्यास थोडासा अवेळ झाला कीं, त्यांचा सूड (येथें सुधारणा करणाऱ्या लोकांनीं सरकारच्या नांवानें कां शिमगा करावा?) उगविण्याकरितां त्यांच्या श्रीमंतीची अथवा त्याच्या वयोवृद्धपणाची काडीमात्र परवा न करितां, त्यांची भर कोडतांत जबान्या घेतेवेळीं रेवडी रेवडी करून सोडितात. त्यांतून हे भूदेव बौद्धधर्मी मारवाड्यांची फटफजिती व पट्टाधूळ कसकशी उडवितात, हें जगजाहिर आहेच. कधीं कधीं ह्या छद्मी भूदेवाच्या डोक्यांत वादीप्रतिवादींच्या बोलण्याचा भावार्थ बरोबर शिरेनासा झाला, म्हणजे हे स्नानसंध्याशील, श्वानासारखे चवताळून त्याच्या हृदयाला कठोर शब्दांनीं चावे घेतात. ते असे कीं:—"तूं बेवकूब आहेस, तुला वीस फटके मारून एक मोजावा. तूं लालतोंड्याचा भाऊ तीनशेंड्या मोठा लुच्चा आहेस." त्यावर त्यांनीं कांहीं हूं चूं केल्यास त्या गरिबाचे दावे रद्द

करितात. इतकेंच नव्हे परंतु या खुनशी न्यायाधिशांच्या तवेती गेल्या कीं, सर्व त्यांच्या जबान्या घरीं नेऊन त्यांतील कांहीं मुद्यांचीं कलमें गाळून त्याऐवजीं दुसऱ्या ताज्या जबान्या तयार करवून, त्यावर मन मानेल तसे निवाडे देत नसतील काय? कारण हल्लीं कोणत्याही जबान्यांवर, जबान्या लिहून देणारांच्या सह्या अथवा निशाण्या करून घेण्याची वहिवाट अजी काढून टाकली आहे. सारांश, बहुतेक भूदेवन्यायाधीश मन मानेल तसे घाशीराम कोतवालासारखे निवाडे करूं लागल्यामुळें कित्येक खानदान चालीच्या सभ्य सावकारांनीं आपला देवघेवीचा व्यापार बंद केला आहे. तथापि बहुतेक ब्राह्मण व मारवाडी सावकार सदरचे अपमानाचा विधिनिषेध मनांत न आणितां कित्येक अक्षरशून्य शेतकऱ्यांबरोबर देवघेवी करितात. त्या अशा कीं, प्रथम ते, अडचणींत पडलेल्या शेतकऱ्यांस फुटकी कवडी न देतां, त्याजपासून लिहून घेतलेल्या कर्जरोख्यावरून त्याजवर सरकारी खात्यांतून हद्दपार झालेल्या खंगार पेनशनर्स लोकांनीं सुशोभित केलेल्या लवादकोर्टांत हुकुमनामे करून घेऊन नंतर व्याजमनुती कापून घेऊन, बाकीच्या रकमा त्यांच्या पदरांत टाकितात. हल्लीं कित्येक ब्राह्मण व मारवाडी सावकार नापतीच्या अक्षरशून्य शेतकऱ्यास सांगतात कीं, "सरकारी कायद्यामुळें तुम्हांला गहाणावर कर्जाऊ रुपये आम्हांस देता येत नाहींत, यास्तव तुम्ही जर आपलीं शेतें आम्हास खरेदी करून द्याल, तर आम्ही तुम्हास कर्ज देऊं व तुम्ही आमचे रुपयांची फेड केल्याबरोबर आम्ही तुमचीं शेतें परत खरेदी करून तुमच्या ताब्यांत देऊं," म्हणून शपथा घेऊन बोल्या मात्र करितात. परंतु या सोंवळ्या व अहिंसक सावकारांपासून कुटुंबवत्सल अज्ञानी भोळ्या शेतकऱ्यांचीं शेतें क्वचितच परत मिळतात. याशिवाय हे अट्टल धर्मशील सावकार, अक्षरशून्य शेतकऱ्यांस कर्ज देतांना त्यांचें दुसरे नाना प्रकारचें नुकसान करितात. सदरील सावकार अक्षरशून्य शेतकऱ्यांवर नाना तऱ्हेच्या बनावट जमाखर्चांच्या वह्यांसहित रोख्यांचे पुरावे देऊन फिर्यादी जेव्हां ब्राह्मण-मुनसफांच्या कोर्टांत आणितात, तेव्हां अज्ञानी शेतकरी आपणास खरे न्याय मिळावेत म्हणून आपले डागडागिने मोडून, पाहिजेतितक्या रकमा कज्जाच्या भरीस घालतात. परंतु त्यांस त्यांचे जातीचे विद्वान वशिले, व खरी मसलत देणारे सूज्ञ गृहस्थ वकील नसल्यामुळें अखेर त्यावरच उलटे हुकुमनामे होतात, तेव्हां ते विचारशून्य, चार पोटबावू बगलेवकिलांचे फुसलावण्यावरून आपल्यास बरोबर न्याय मिळतील या आशेनें वरिष्ठ कोडतांत आपलें करितात; परंतु वरिष्ठ कोडतांतील बहुतेक युरोपियन कामगार ऐषआरामांत गुंग असल्यामुळें अज्ञानी शेतकऱ्यांस एकंदर सर्व सरकारी खात्यांतील ब्राह्मण कामगार किती नाडितात, याविषयीं येथें थोडेसे मासलेवाईक नमुने घेतों, ते येणेंप्रमाणें:—प्रथम धूर्त वकील अज्ञानी शेतकऱ्यापासून स्टांपकागदावर वकीलपत्रें व बक्षिसादाखल कर्जाऊ रोखे लिहून घेतांच त्यांजपासून सचकार व मूळ फिर्यादीकरितां स्टांप वगैरे किरकोळ खर्चाकरितां अगाऊ रोख पैसे घेतात. नंतर कित्येक धूर्त वकील,

येथील भूदेवाचे औरस वारसपुत्र बनून, कोडतांत एकंदर सर्व परजातींतील वयोवृद्ध, वडील दुबळ्या गृहस्थांस तुच्छ मानून त्यांची हेळसांड करितात. प्रथम हे सरकारी रिवाजाप्रमाणें एकंदर सर्व साक्षीदार वगैरे लोकांस कोडतांत दहा वाजतां हजर होण्यास सामानें करून आपण सुमारें बारा वाजतां कोडतांत येऊन, तेथील एखादे खोलींत तास अर्धा तास उताणे पाळथे पडून नंतर डोळे पुशीत बाहेर चौरंगावरील खुर्चीच्या आसनावर येऊन बसल्याबरोबर, खिशांतील पानपट्टी तोंडांत घालून माकडाचे परी दांत विचकून चावतां चावतां पायावर पाय ठेवून, पाकेटांतील डब्या बाहेर काढून तपकिरीचे फस्के नाकांत ठासतां ठासतां खालीं बसलेल्या मंडळीवर थोडीशी वांकडी नजर टाकून डोळे झांकीत आहेत, इतक्यांत तांबडी पगडी, काळीं डगलीं, पाटलोण-बुटांनीं चप्क बनून आलेल्या प्लीडरवकिलांनीं त्यांच्यापुढें उभें राहून मिशांवर ताव देऊन "युवर आनर" म्हणण्याची चोपदारी ललकारी ठोकल्याबरोबर हे भूदेव जजसाहेब, आपल्या पोटावर हात फिरवून आपले जातभाऊ वकिलास विचारतात कीं, "तुमचें काय बोलणें आहे?" यावरून वकिलसाहेब आपल्या खिशांत हात घालून म्हणतात कीं, "आज एका खुनी खटल्याच्या संबंधानें आम्हांस सेशनांत हाजर होणें आहे. सबब आपण मेहेरबान होऊन आमचे मार्फतचे येथील कज्जे आज तहकूब ठेवावेत." हें म्हणतांच न्यायाधिशांनीं माना हलवून गुळ्या दिल्याबरोबर वकीलसाहेब गाड्याघोड्यावर स्वार होऊन आपला रस्ता धरितांच न्यायाधीश आपल्या कामाची सुरवात करितात. याविषयीं येथें थोडेसें नमुन्याकरितां घेतों. कित्येक भूदेव न्यायाधिश आपल्या उंच जातीच्या तोऱ्यांत किंवा कालच्या ताज्या अमलाच्या झोकांत, न्याय करितांना, बाकी सर्व जातींतील बहुतेक लोकांबरोबर अरेतुरेशिवाय भाषणच करीत नाहींत. कित्येक अक्कडबाज गृहस्थांनीं कोडतांत आल्याबरोबर या राजबिंड्या भूदेवास लवून मुजरे केले नाहींत, तर त्यांच्या जबान्या घेतेवेळीं त्यांस निरर्थक छळितात. तशात ब्राह्मणी धर्माच्या विरुद्ध एखाद्या ठिकाणीं समाज उपस्थित होऊन त्यास सामील असणाऱ्यांपैकीं थोर गृहस्थास कोडतांत हजर होण्यास थोडासा अवेळ झाला कीं, त्यांचा सूड (येथें सुधारणा करणाऱ्या लोकांनीं सरकारच्या नांवानें कां शिमगा करावा?) उगविण्याकरितां त्यांच्या श्रीमंतीची अथवा त्याच्या वयोवृद्धपणाची काडीमात्र परवा न करितां, त्यांची भर कोडतांत जबान्या घेतेवेळीं रेवडी रेवडी करून सोडितात. त्यांतून हे भूदेव बौद्धधर्मी मारवाड्यांची फटफजिती व पट्टाधूळ कसकशी उडवितात, हें जगजाहिर आहेच. कधीं कधीं ह्या छद्मी भूदेवाच्या डोक्यांत वादीप्रतिवादींच्या बोलण्याचा भावार्थ बरोबर शिरेनासा झाला, म्हणजे हे स्नानसंध्याशील, श्वानासारखे चवताळून त्याच्या हृदयाला कठोर शब्दांनीं चावे घेतात. ते असे कीं:–"तूं बेवकूब आहेस, तुला वीस फटके मारून एक मोजावा. तूं लालतोंड्याचा भाऊ तीनशेंड्या मोठा लुच्चा आहेस." त्यावर त्यांनीं कांहीं हूं चूं केल्यास त्या गरिबाचे दावे रद्द

करितात. इतकेंच नव्हे परंतु या खुनशी न्यायाधिशांच्या तवेती गेल्या कीं, सर्व त्यांच्या जबान्या घरीं नेऊन त्यांतील कांहीं मुद्यांचीं कलमें गाळून त्याऐवजीं दुसऱ्या ताज्या जबान्या तयार करवून, त्यावर मन मानेल तसे निवाडे देत नसतील काय? कारण हल्लीं कोणत्याही जबान्यांवर, जबान्या लिहून देणारांच्या सह्या अथवा निशाण्या करून घेण्याची वहिवाट अजी काढून टाकली आहे. सारांश, बहुतेक भूदेवन्यायाधीश मन मानेल तसे घाशीराम कोतवालासारखे निवाडे करूं लागल्यामुळें कित्येक खानदान चालीच्या सभ्य सावकारांनीं आपला देवघेवीचा व्यापार बंद केला आहे. तथापि बहुतेक ब्राह्मण व मारवाडी सावकार सदरचे अपमानाचा विधिनिषेध मनांत न आणितां कित्येक अक्षरशून्य शेतकऱ्यांबरोबर देवघेवी करितात. त्या अशा कीं, प्रथम ते, अडचणींत पडलेल्या शेतकऱ्यांस फुटकी कवडी न देतां, त्याजपासून लिहून घेतलेल्या कर्जरोख्यावरून त्याजवर सरकारी खात्यांतून हद्दपार झालेल्या खंगार पेनशनर्स लोकांनीं सुशोभित केलेल्या लवादकोर्टांत हुकुमनामे करून घेऊन नंतर व्याजमनुती कापून घेऊन, बाकीच्या रकमा त्यांच्या पदरांत टाकितात. हल्लीं कित्येक ब्राह्मण व मारवाडी सावकार नापतीच्या अक्षरशून्य शेतकऱ्यास सांगतात कीं, "सरकारी कायद्यामुळें तुम्हांला गहाणावर कर्जाऊ रुपये आम्हांस देता येत नाहींत, यास्तव तुम्ही जर आपलीं शेतें आम्हास खरेदी करून द्याल, तर आम्ही तुम्हास कर्ज देऊं व तुम्ही आमचे रुपयांची फेड केल्याबरोबर आम्ही तुमचीं शेतें परत खरेदी करून तुमच्या ताब्यांत देऊं," म्हणून शपथा घेऊन बोल्या मात्र करितात. परंतु या सोंवळ्या व अहिंसक सावकारांपासून कुटुंबवत्सल अज्ञानी भोळ्या शेतकऱ्यांचीं शेतें क्वचितच परत मिळतात. याशिवाय हे अट्टल धर्मशील सावकार, अक्षरशून्य शेतकऱ्यांस कर्ज देतांना त्यांचें दुसरे नाना प्रकारचें नुकसान करितात. सदरील सावकार अक्षरशून्य शेतकऱ्यांवर नाना तऱ्हेच्या बनावट जमाखर्चांच्या वह्यांसहित रोख्यांचे पुरावे देऊन फिर्यादी जेव्हां ब्राह्मण-मुनसफांच्या कोर्टांत आणितात, तेव्हां अज्ञानी शेतकरी आपणास खरे न्याय मिळावेत म्हणून आपले डागडागिने मोडून, पाहिजेतितक्या रकमा कज्जाच्या भरीस घालतात. परंतु त्यांस त्यांचे जातीचे विद्वान वशिले, व खरी मसलत देणारे सूज्ञ गृहस्थ वकील नसल्यामुळें अखेर त्यावरच उलटे हुकुमनामे होतात, तेव्हां ते विचारशून्य, चार पोटबाबू बगलेवकिलांचे फुसलावण्यावरून आपल्यास बरोबर न्याय मिळतील या आशेनें वरिष्ठ कोडतांत आपलें करितात; परंतु वरिष्ठ कोडतांतील बहुतेक युरोपियन कामगार ऐषआरामांत गुंग असल्यामुळें अज्ञानी शेतकऱ्यांस एकंदर सर्व सरकारी खात्यांतील ब्राह्मण कामगार किती नाडितात, याविषयीं येथें थोडेसे मासलेवाईक नमुने घेतों, ते येणेंप्रमाणें:—प्रथम धूर्त वकील अज्ञानी शेतकऱ्यापासून स्टांपकागदावर वकीलपत्रें व बक्षिसादाखल कर्जाऊ रोखे लिहून घेतांच त्यांजपासून सचकार व मूळ फिर्यादीकरितां स्टांप वगैरे किरकोळ खर्चाकरितां अगाऊ रोख पैसे घेतात. नंतर कित्येक धूर्त वकील,

शिरस्तेदारांचे पाळीव रांडांचे घरीं शिरस्तेदार साहेबांचे समोर त्यांचीं गाणीं करवून त्यांस शेतकऱ्यांपासून कांहीं रकमा देववितात.

अज्ञानी शेतकऱ्यांपासून आडवून लांच खाणाऱ्या सरकारी कामगारास व लाचार झाल्यामुळें लांच देणाऱ्या अक्षरशून्य शेतकऱ्यांस कायदेशीर शिक्षा मिळते. हत्यारबंद पोलिसाच्या उरावर दरवडे घालणाऱ्या भट फडक्या रामोशास व लाचार झाल्यामुळें फडक्याबरोबर त्याच्या पातीदार भावास शिळेपाके भाकरीचे तुकडे देणाऱ्या मित्र्या शस्त्रहीन कंगाल शेतकऱ्यांचे बोडक्यावर जशी कायदेशीर पोलीसखर्चाची रक्कम लादली जाते, व शेतकऱ्यांचे घरांत चोऱ्या करणाऱ्या सर्व जातीच्या चोरट्यांस जशी कायदेशीर शिक्षा मिळते, त्याचप्रमाणें जे शेतकरी आपल्या पहिल्या झोपेच्या भरांत असतां त्यांच्या घरांत चोरांनीं चोऱ्या केल्या असतां त्या शेतकऱ्यांसही कायदेशीर शिक्षा कां नसावी ?! ! एवढा कायदा मात्र आमचे कायदेकौन्सिलांनीं करून एकंदर सर्व पोंचट पोलिसांचा गळा मोकळा केल्याबरोबर आमचे न्यायशील सरकारचे स्वर्गाजवळच्या सिमल्यास घंटानाद होईल.

कित्येक कर्मिष्ठ ब्राह्मणकामगार आपल्या जातींतील पुराणिकाला व कथेकऱ्याला, कित्येक अज्ञानी सधन शेतकऱ्यांपासून देणग्या देववितात. कित्येक धोरणी धूर्त, अज्ञानी भोळ्या सधन शेतकऱ्यांस गांठून त्यांजपासून राधाकृष्णाचीं नवीं देवळें गांवोगांवीं बांधवून, कांहीं जुन्या देवळांचा जीर्णोद्धार करवितात व त्यांजकडून उद्यापनाचे निमित्तानें मोठमोठालीं ब्राह्मणभोजनें काढितात. कित्येक धूर्त कामगार युरोपियन कामगारांच्या नजरा चुकवून एकंदर सर्व अज्ञानी शेतकऱ्यांस नाना प्रकारचे त्रास देतात व त्याबद्दल शेतकरी लोक आंतले आंत त्यांचे नांवानें खडे फोडीत असतांही त्यांनीं (कामगारांनीं) युरोपियन कामगारांचे पुढें पुढें रात्रंदिवस चोंबडक्या केल्या कीं, ते त्यांचेबद्दल उलट्या सरकारांत शिफारशी करून त्यांच्या बढत्या करवितात. त्यांतून बहुतेक युरोपियन कामगारांस दहावीस मिनिटें अस्खलित मराठी भाषण करण्याची केवढी मारामार पडते आणि अशा "टूमी आमी" करणाऱ्या युरोपियन कामगारांस सातारकर छत्रपती महाराज, हिम्मतबहादर, सरलष्कर, निंबाळकर, घाटगे, मोहिते, दाभाडे, घोरपडे वगैरे शेतकरी[१] जहामर्दांची खासगत सोजरी भाषणांतील सर्व गाऱ्हाणीं

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 217.

या लोकांपेक्षां, सरकारावर आपले चरितार्थाचा बोजा कोणत्याही प्रकारें न टाकतां स्वतंत्र रीतीनें उद्योगधंदा करून अनेक प्रसंगीं आपला मौल्यवान वेळ खर्च करून लोककल्याणाचें कामें झटून करणारे लोकांस सरकारनें विशेष मान देणें हें रास्त आहे. नाहीपेक्षां आपल्यांत जी प्रसिद्ध म्हण आहे "मेहेनती दिलगीर आणि चोरटे खुशाल", त्या म्हणीप्रमाणें न्याय होणार आहे.

शिस्तवार समजून घेऊन त्यांचे परिहार ते कसे करीत असतील, तें देव जाणे ! कित्येक धूर्त ब्राह्मणकामगार आपल्या धोरणानें सदा सर्वकाळ वागूं लागतील, वा इराद्यानें ते जिल्ह्यांतील कित्येक कुटाळ असून वाचाळ भटब्राह्मणांस पुढें करून त्यांचे हातून जागोजाग मोठाले जंगी समाज उपस्थित करवितात व आंतून आपण अन्य रीतीनें शूद्रांतील शेतकरी, गवतवाले, लाकडवाले, कंट्र्याक्टर, पेनशनर्स व इस्टेटवाले गृहस्थाकडे आपलें वजन व भिडा खर्ची घालून त्यास पाहिजेल त्या समाजांत सभासद करवितात. कित्येक युरोपियन कामगारांच्या कांहीं घरगुती नाजूक कामास मदत देण्याचे उपयोगी ब्राह्मण शिरस्तेदार पडले कीं, युरोपियन कामगार त्यांच्याविषयीं सरकारांत शिफारशी करून त्यांस रावसाहेबांच्या पदव्या देववितात आणि सदरचे युरोपियन कामगारांच्या जेव्हां दुसऱ्या जिल्ह्यांत बदल्या होतात, तेव्हां हे तोंडपुजे रावसाहेब मनास येतील तशीं मानपत्रें तयार करून, त्यांवर शहरांतील चार पोकळ प्रतिष्ठा गिरविणाऱ्या अज्ञानी, सधन कुणब्यामाळयांच्या व तेल्यातांबोळयांच्या मोडक्यातोडक्या सह्या भरतीला घेऊन भलत्या एखाद्या अक्षरशून्य शूद्र कंट्र्याक्टरांच्या टोलेजंग दिवाणखान्यांत मोठमोठ्या सभा करून त्यांमध्यें त्यांस हीं मानपत्रें देतात. सारांश अस्मानीसुलतानीमुळें पडलेल्या दुष्काळापासून; तसेंच टोळांच्या तडाक्यापासून होणारें नुकसान केव्हांतरी भरून येतें, परंतु एकंदर सर्व लहानमोठ्या सरकारी खात्यांत बहुतेक युरोपिअन कामगार ऐषआरामांत गुंग असल्यामुळें, त्या सर्व खात्यांत भट पडून, ते कोंकणांतील ब्राह्मण खोतासारखे येथील सर्व अक्षरशून्य शेतकऱ्यांचें जें नुकसान करितात, तें कधींही भरून येण्याची आशा नसते. या सर्वांविषयीं कच्च्या हकीकती लिहूं गेल्यास त्यांची "मिस्तरीज आफ दि कोर्ट आफ लंडन" सारखीं पुस्तकें होतील. व ही अज्ञानी शेतकऱ्यांची झालेली दैन्यवाणी स्थिति जेव्हां खिस्ति लोकांस पाहावेना, तेव्हां त्यांनीं **युनायटेड ग्रेट ब्रिटनांत** येथील विद्याखात्याचे नांवानें शिमग्याचा संस्कार सुरू केला. त्यावरून येथील कांहीं सभ्य सद्गृहस्थांसहित कित्येक बडे सरदार लोकांनीं हिंदुस्थानांतील विद्याखात्याकडील मुख्य अधिकाऱ्यांची थोडीशी पट्टाधूळ झाडण्याची सुरवात केली, कोठें न केली, तोंच मायाळू गव्हरनर जनरलसाहेबांनीं येथील विद्याखात्याविषयीं पक्की चौकशी करण्याकरितां चारपांच थोर थोर विद्वान गृहस्थांची कमिटी स्थापून त्यामध्यें मे. हंटरसाहेब मुख्य सभानायक स्थापतांच त्यांनीं आपल्या साथीदारांस बरोबर घेऊन "निमरॉड" शिकाऱ्यासारखे तिन्ही प्रेसिडेन्सींत आगगाड्यांतून मोठी पायपिटी केली, परंतु त्यांनीं येथील एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्र शेतकरी अक्षरशत्रु असल्यामुळें ते कोणकोणत्या प्रकारच्या विपत्तींत संकटें भोगीत आहेत, याविषयीं बारीक शोध काढण्याविषयीं **शेतकऱ्यांचे घाणेरड्या झोपड्यांत स्वतः जाऊन** तेथें आपल्या नाकाला थोडासा पदर लावून, तेथील त्यांचें वास्तविक दैन्य चांगलें डोळे पसरून पाहून तेथील भलत्या एखाद्या अक्षरशून्य, लंगोट्या शेतकऱ्याची साक्षी न घेतां

हिंदु, पारशी, ख्रिस्ति, धर्मांतील बहुतेक सुवाष्ण ब्राह्मणांच्या साक्षी घेण्यामध्यें रंग उडविण्याची बहार करून जागोजागची मानपत्रें बगलेंत मारून अखेरीस आपली पायधूळ कलकत्याकडे झाडली आहे खरी, परंतु त्यांच्या रिपोर्टापासून अज्ञानी शेतकऱ्यांचा योग्य फायदा होईल, असें आम्हांला अनुमान करितां येत नाहीं. तात्पर्य मे. हंटरसाहेब यांनीं, आमचे महाप्रतापी गव्हरनर जनरल साहेबमहाराजांस निरापेक्ष मे. टक्कर (साल्वेशन आर्मीचे) साहेबासारख्या धूर्त लोकांशीं टक्कर मारण्याकरितां आपल्या कामाचा राजीनामा देऊन स्वतः दीन-दुबळ्या अज्ञानी शेतकऱ्यांचे आळोआळीनें खटाऱ्यांत बसून त्यांस अज्ञानांधःकारांतून मुक्त करण्याचे खटाटोपीचा प्रसंग आणला नाहीं, म्हणजे त्यांच्या (हंटरसाहेबांच्या) नौबतीचा डंका वाजेल; व त्याचा आवाज पाताळच्या प्रजासत्ताक राज्याच्या प्रतिनिधींच्या कानीं पडतांच त्यांचे डोळे उघडून त्यांच्या अंतःकरणांत आमचे दीनबंधु काळे लोक "रेड इंडियन्स" यांजविषयीं दया उद्भवेल.

या प्रकरणांत एकंदर सरकारी ब्राह्मण नोकरांविषयीं लिहिलेल्या मजकुराबद्दल पुरावा पाहिजे असल्यास ठिकठिकाणीं आजपर्यंत लांच खाल्याबद्दल किंवा खोट्या लिहिण्याबद्दल वगैरे अशा प्रकारच्या गुन्ह्यांवरून शिक्षा झालेल्या व त्याविषयीं फिर्यादी झालेल्या आहेत, त्या पहाव्या ह्मणजे सहज सांपडेल.

## प्रकरण ३ रें

आर्य ब्राह्मण इराणांतून कसे आले व शूद्र शेतकारी यांची मूळ पीठिका व हल्लींचें आमचें सरकार, एकंदर सर्व आपले कामगारांस मन मानेल तसे पगार व पेनशनें देण्याचे इराद्यानें नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून, त्यांचें द्रव्य मोठ्या हिकमतीनें गोळा करूं लागल्यामुळें शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत.

या सर्व अगम्य, अतर्क्य आकाशमय विस्तीर्ण पोकळींत नाना प्रकारचे तत्त्वांच्या संयोगवियोगानें अगणित सूर्यमंडलें त्यांच्या त्यांच्या उपग्रहासह निर्माण होऊन लयास जात आहेत. त्याचप्रमाणें हरएक उपग्रह आपापल्या प्रमुख सूर्याच्या अनुरोधानें भ्रमण करीत असतां एकमेकांच्या सान्निध्यसंयोगानुरूप या भूग्रहावरील एकाच मातापितरांपासून एक मुलगा मूर्ख आणि दुसरा मुलगा शहाणा असे विपरीत जन्मतात. तर यावरून मूर्खपणा अथवा शहाणपणा हे पिढीजादा आहेत, असें अनुमान करितां येत नाहीं. तसेंच स्त्रीपुरुषाचा समागम होण्याचे वेळीं त्या उभयतांचे कफवातादि दोषात्मक प्रकृतीच्या मानाप्रमाणें व त्या वेळेस त्यांच्या मनावर सत्वरजादि त्रिगुणांपैकीं ज्या गुणांचें प्राबल्य असतें, त्या गुणांच्या महत्त्वप्रमाणानें गर्भपिंडाची

धारणा होते. म्हणूनच एका आईबापाचे पोटीं अनेक मुलें भिन्न प्रकृतीचीं व स्वभावाचीं जन्मतात. असें जर न म्हणावें, तर इंग्लंडांतील प्रख्यात गृहस्थांपैकीं टामस पेन् व अमेरिकन शेतकऱ्यांपैकीं जार्ज वॉशिंगटन या उभयतांनीं शहाणपणा व शौर्य हीं पिढीजादा आहेत म्हणून म्हणणाऱ्या ख्यालीखुशाली राजेरजवाड्यांस आपआपले कृतीनें लाजविलें असतें काय ? शिवाय कित्येक अज्ञानी काळे शिपायी केवळ पोटासाठीं कोर्ट मार्शलचे धाकानें काबूल व इजिप्टांतील जहामर्दांशीं सामना बांधून लढण्यामध्यें मर्दुमगिरी दाखवितात व त्याचप्रमाणें कित्येक अमेरिकेंतील समंजस विद्वानांपैकीं पारकर व मेरियनसारख्या कित्येकांनीं जन्मतः केवळ शेतकरी असूनही स्वदेशासाठीं परशत्रूशीं नेट धरून लढण्यामध्यें शौर्य दाखविलेलीं उदाहरणें आपले पुढें अनेक आहेत. यावरून जहांमर्दी अथवा नामर्दी पिढीजादा नसून ज्याच्या त्याच्या स्वभावजन्य व सांसर्गिक गुणावगुणांवर अवलंबून असते, असेंच सिद्ध होतें. कारण जर हा सिद्धांत खोटा म्हणावा, तर एकंदर सर्व या भूमंडळावरील जेवढे म्हणून राजेरजवाडे व बादशहा पहावेत, त्यापैकीं कोणाचे मूळ पुरुष शिकारी, कोणाचे मेंढके, कोणाचे शेतकरी, कोणाचे मुल्लाने, कोणाचे खिजमतगार, कोणाचे कारकून, कोणाचे बंडखोर, कोणाचे लुटारू व कोणाचे मूळ पुरुष तर हद्दपार केलेले राम्युलस आणि रीमस आढळतात. त्यांतून कोणाचाही मूळ पुरुष पिढीजादा बादशहा अथवा राजा सांपडत नाहीं. आतां डारविनच्या मताप्रमाणें, एकंदर सर्व सूर्यमंडळांतील ग्रहभ्रमणक्रमास अनुसरून वानर पशूजातीचा पालट होऊन त्यापासून नूतन व विजातीय मानवप्राणी झाले असावेत, म्हणून म्हणावें, तर ब्रह्मदेवाचे अवयवांपासून उत्पन्न झालेल्या सृष्टीक्रमानुमतास बाध येतो. यास्तव आतां आपण बौद्ध अथवा जैन मताप्रमाणें जुगलापासून अथवा डारविनच्या मताप्रमाणें वानरापासून मानव स्त्रीपुरुष उत्पन्न झाले, अथवा ख्रिस्ति मताप्रमाणें देवाजीनें मृत्तिकेपासून[1] मानव स्त्रीपुरुष उत्पन्न केले, अथवा आर्य ब्राह्मणांच्या मताप्रमाणें ब्राह्मणांच्या अवयवापासून चार[2] जातीचे मानवी पुरुष मात्र निर्माण झाले असावेत, अशा प्रकारच्या सर्व निरनिराळ्या मतांविषयीं वाटाघाट करीत बसतां, त्यांतून कोणत्याहि एखाद्या मार्गानें मानवी स्त्रीपुरुष जातीचा जोडा अथवा जोडे निर्माण झाले असतील, व अशी कल्पना करून पुढें चालूं तर प्रथम जेव्हां स्त्रीपुरुष निर्माण झाले असतील, तेव्हां त्यांस मोठमोठाल्या झाडांच्या खोडाशीं, त्यांचे ढोलींत[3] अथवा डोंगराच्या कपारींत रात्रीस आराम करून आसपासच्या जंगलांतील कंदमुळें व फळें यांवर आपले क्षुधेचा निर्वाह करावा लागला असेल, व ते जेव्हां ऐन दुपारीं भलत्या एखाद्या झाडाच्या छायेखालीं प्रखरतर

---

१, बायबल, उत्पत्ति, अ. १ ओ. २० व अ. २ ओ. ७.

२. मनुसंहिता अ. १, श्लोक ३१.

३. Captain James Cook's Voyages Round the World, Chapter V, page 262.

सूर्याच्या किरणांपासून निवारण होण्याकरितां क्षणभर विश्रांति घेत असतील, तेव्हां जिकडे तिकडे उंच उंच कडे तुटलेल्या पर्वत व डोंगरांच्या विस्तीर्ण रांगा, गगनांत जणूं काय, शुभ्र पांढऱ्या धुक्याच्या टोप्याच घालून उभ्या राहिलेल्या त्यांच्या दृष्टीस पडत असतील, तसेंच त्यांच्या खालच्या बाजूनीं लहानमोठ्या दऱ्याखोऱ्यांच्या आसपास अफाट मैदानांत जुनाट मोठमोठाले विशाल वड, पिंपळ व फळभारानें नम्र झालेले फणस, आंबे, नारळी, अंजीर, पिस्ते, बदाम वगैरे फळझाडांची गर्दी होऊन, त्यांवर नाना तऱ्हेच्या द्राक्षादि वेलींच्या कमानीवजा जाळीं बनून जागोजाग पिकलेल्या केळीच्या घडांसहित कमळें इत्यादि नाना तऱ्हेचीं रंगीबेरंगी फुलें लोंबत आहेत, त्यांच्या आसमंतात जमिनीवर नाना प्रकारच्या पानांफुलांचा खच पडून त्या सर्वांचा भलामोठा चित्रविचित्र केवळ एक गालिचाच बनून त्यावर जागोजाग तऱ्हेतऱ्हेच्या पानांफुलांनीं घवघवलेलीं झाडें, जशीं काय आतांच नूतन लाविलीं आहेत कीं काय, असा भास झाला असेल. तसेंच एकीकडे एकंदर सर्व लहानमोठ्या झुऱ्या, खोंगळ्या, ओढे व नद्यांचे आजूबाजूचे वाळवंटावर खरबुजें, टरबुजें, शेंदाडीं, कांकड्या, खिरे वगैरे चहूंकडे लोळत पडलेले असून जिकडे तिकडे स्वच्छ निर्मळ पाण्याचे प्रवाह अखंडित खुळखुळ मंजुळवाणा शब्द करीत वहात आहेत. आसपास लहानमोठ्या तलावांच्या जलसमुदायांत नाना तऱ्हेच्या चित्रविचित्र रंगांच्या कमळांवरून भ्रमरांचे थव्याचे थवे गुंजारव करीत आहेत व जागोजाग तळ्यांच्या तटाकीं जलतंतू आपल्या आटोक्यांत येतांच त्यांना उचलून तोंडांत टाकण्याकरितां बगळे एका पायावर बकध्यान लावून उभे राहिले आहेत. शेजारचे अरण्यांत, जिकडे पहावें तिकडे जमिनीवरून गरीब बिचारीं हरणें, मेंढरें वगैरे श्वापदांचे कळपांचे कळप, लांडगे, व्याघ्र आदि करून दुष्ट हिंसक पशूंपासून आपआपले जीव बचावण्याकरितां धापा देत पळत चालले आहेत. व झाडांवर नाना प्रकारचें सुस्वर गायन करून तानसेनासही लाजविणारे कित्येक पक्षी, आपआपल्या मधुर, कोमल स्वरानें गाण्यामध्यें मात करून चूर झाले आहेत, तों आकाशांत बहिरी ससाणे वगैरे घातक पक्षी त्यांचे प्राण हरण करण्याकरितां वरतीं घिरट्या घालून, अकस्मात त्यांजवर झडपा घालण्याचे संधानांत आहेत, इतक्यांत पश्चिमेकडचा मंद व शीतल वायु कधीं कधी आपल्या वायुलहरींबरोबर नाना प्रकारच्या फुलपुष्पांच्या सुवासाची चहूंकडे बहार करून सोडीत आहेत. हें पाहून आपल्या बुद्ध, खिस्ती, मुसलमान, महार, ब्राह्मण वगैरे म्हणविणाऱ्या मानव बांधवांच्या मूळ पूर्वजांस किती आनंद होत असेल बरें! असो, परंतु त्यांस शस्त्रास्त्रें, व वस्त्रेंप्रावर्णें तयार करण्याची माहिती नसल्यामुळें आपल्या दाढ्याडोयांच्या झिपऱ्या जटा लोंबत सोडून हातापायांचीं लांब लांब नखें वाढवून निव्वळ नागवें[1] रहावें लागत असेल नाहीं बरें!

१. बायबल, उत्पत्ति, अ० २ ओं० २५. Captain James Cook's Voyages Round the World, Chapter V, pages 257, 278 and 279.

ज्यांस मातीचीं अथवा धातूंचीं भांडीं करण्याची माहिती नसल्यामुळें, पाण्याच्या कडेला गुडघेमेटी येऊन जनावरांप्रमाणें पाण्याला तोंड लावून अथवा हाताचे ओंझळींनें पाणी पिऊन आपली तहान भागवावी लागत नसेल काय! ज्यांस तवे व जातीं घडण्याची माहिती नव्हती, अशा वेळीं भाकरीचपातीची गोडी कोठून! ज्यांस मेंढरांढोरांचीं कातडीं काढण्याची माहिती किंवा सोय नसल्यामुळें अनवाणी चालावें लागत नसेल काय? ज्यास बिनचूक शंभर अंकही मोजण्याची मारामार त्यास सोमरसाचे[1] तारेंत यज्ञाचे निमित्तानें गायागुरें भाजून खाण्याची[2] माहिती कोठून? सारांश तशा प्रसंगीं ते इतके अज्ञानी असतील कीं, जर त्यांचे समोर कोणीं भंड, व धूर्तांनीं ताडपत्रावर खोदून लिहिलेल्या वेदाप्रमाणें[3] एखादें पुस्तक आणून ठेविलें असतें तर, त्यांनीं तें हातांत घेऊन पाहतांच त्यांत कांहीं सुवास व रस नाहीं असें पाहून त्याची काय दशा केली असती, याविषयीं आतां आमच्यानें तर्कसुद्धां करवत नाहीं. कारण ते स्वतः फलाहारी असल्यामुळें या निशाचरांनीं केलेल्या वेदमतानुसार सोमरसाचे नादांत अगर पक्षश्राद्धाचे निमित्तानें दुसऱ्यांच्या गाया चोरून मारून त्यांच्यानें खावविल्या नसत्या, आणि तसें करण्याची त्यांस गरजही नसेल. कारण ते इतके पवित्र असतील कीं, त्यांना या सर्व मतलबी ग्रंथकारांस आपले वंशज म्हणण्याचें आवडलें असतें काय? त्यांच्यापुढें यांच्यानें "तूं बुद्ध" "तूं ख्रिस्ती" "तूं मुसलमान" "तूं महार म्हणून नीच" व "आम्ही ब्राह्मण म्हणून उंच आहोंत" असें म्हणण्याची जुरत तरी झाली असती काय? असो, पुढें कांहीं काळ लोटल्यावर आपल्या मूळ पूर्वजांची संतति जेव्हां जास्त वाढली, तेव्हां त्यांनीं

---

१. By F. Max Muller, M.A., Lecture III, page 137.

२. John Wilson's India Three Thousand Years Ago, pages 62 and 63.

३. Works by the late Horace Hayman Wilson, M.A., Professor of Sanskrit, page 6. Vrihaspati has the following texts to this effect. [Quoted in the Sarva Darsana, Calcutta edition, page 3 and 6, and with a. V. I. Prabodach, ed. Brockhaus, page 30] :

अग्निहोत्रं त्रयोवेदास्त्रिदंडं भस्मगुंठनम् ॥ बुद्धिपौरुषहीतानां जीविकेति बृहस्पतिः ॥

"The Agnihotra, the Three Vedas, the Tridanda, the smearing of Ashes, are only the livelihood of those who have neither intellect nor spirit." After ridiculing, he says,

ततश्च जीवनोपायो ब्राह्मणैर्विहितस्त्विह ॥ मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्यद्विद्यते क्वचित् ॥

Hence it is evident that it was a mere contrivance of Brahamans to gain a livelihood, to ordain such ceremonies for the dead and no other reason, can be given fort them. Of the Vedas, he says, त्रयो वेदस्य कर्तारो भंड धूर्त निशाचराः ॥ The three authors of the Vedas were Buffoons, Rogues and Fiends and cites texts in proof of this assertion.

आपल्या नातूपणतूस रहाण्याकरितां झाडांच्या फांद्यांचीं आढीमेढी उभ्या करून त्यावर नारळीच्या झांपांची शेकारणी करून पृथक पृथक कुटुंबाकरितां झोपड्या तयार करून त्यांच्या भोवतालीं चौगर्दां बाभळी अथवा करवंदीच्या फांट्यांचें कुंपण, व आंत जाण्याच्या रस्त्यावर एक झोपा अथवा कोरड्या दगडांचा गांवकुस करून त्याला एक वेस ठेवून तिकडून रात्रीस रानांतलीं दुष्ट जनावरें आंत येऊं नयेत, म्हणून तेथें त्यांनीं रखवालीकरितां वेसकर रक्षकांच्या नेमणुका केल्यावरून आंतील एकंदर सर्व गांवकरी लोक आपापल्या मुलांबाळांसह सुखांत आराम करूं लागले असतील, व यामुळेंच आपण सर्व गांवकरी हा काळपावेतों आपआपल्या गांवांतील वेसकरांच्या श्रमाबद्दल दररोज सकाळीं व संध्याकाळीं त्यांस अर्ध्या चोथकोर भाकरीचे तुकडे देतों; आणि त्याचप्रमाणें हल्लीं आपण सर्व गांवकरी लोक एकंदर सर्व पोलीसखात्यांतील शिपायांसहित मोठमोठ्या कामगारांस भाकरीच्या तुकड्याऐवजीं पोलिसफंड देतों कां नाहीं बरें ? या उभयतांत अंतर तें काय ? महाराचे हातांत काठीदोरी व पोलिसचे हातांत वाद्यांचीं टिकोरीं. असो, इतक्यांत सदरच्या गांवीं त्यांच्यांत मुलाबाळांच्या क्षुल्लक अपराधावरून आपआपसांत तंटेबखेडे उपस्थित झाल्यावरून व गांवातील सर्व लहानमोठे वडील जवळपास एखाद्या पाराचे छायेखालीं बसून न्यायांतीं गुन्हेगारास शिक्षा करीत असतील. कारण त्या वेळीं आतांसारखें मोठमोठालीं टाऊनहालें अथवा चावड्या बांधून तयार करण्याचें ज्ञान त्यांस कोठून असेल ? परंतु पुढें कांहीं काळानें त्या सर्वांचीं कुटुंबें जसजशीं वाढत गेलीं असतील, तसतसें त्यांच्यांत सुंदर स्त्रियांच्या व जंगलांच्या उपभोगाच्या संबंधानें नाना प्रकारचे वादविवाद वारंवार उपस्थित होऊं लागले असतील, व ते आपसांत जेव्हां गोडीगुलाबीनें मिटेनात, तेव्हां त्यांपैकीं बहुतेक सालस गृहस्थांनीं आपआपलें सामानसुमान व तान्हीं मुलें पाट्यांत घालून एकंदर सर्व आपल्या जथ्यांतील स्त्रीपुरुषांस बरोबर घेऊन दूर देशीं निरनिराळे अंतरावर जाऊन जिकडे तिकडे गांवें बसवून त्यांत मोठ्या सुखानें व आनंदांत राहूं लागल्यामुळें, प्रथम ज्या ज्या गृहस्थांनीं हिय्या करून आपआपल्या पाट्या भरून दूरदूर देशीं जाऊन गांवें वसविलीं, त्या त्या गृहस्थांस बाकी सर्व गांवातील लोक पाटील अथवा देशमूख म्हणून, त्यांच्या आज्ञेंत वागूं लागले. व हल्लींचे अज्ञानी पाटील व देशमूख जरी भटकुळकर्ण्यांचे ओंझळीनें पाणी पिऊन गांवकरी लोकांत कज्जे लढवितात, तरी एकंदर सर्व गांवकरी, त्यांच्या सल्लामसलतीनेंच चालतात. दुसरें असें कीं, आपल्यामध्यें जेव्हां सोयरीकसंबंध करण्याचा प्रसंग येतो, तेव्हां आपणांत एकमेकांस विचारण्याची वहिवाट सांपडते. ती अशी कीं "प्रश्न–तुमचा गांव कोण आणि तुमचें आडनांव काय ? उ.–आमचा गांव पुणें आणि आमचें आडनांव जगताप. प्र.–तर मग सासवडचे जगताप तुमचे कोण ? उ.–सासवडचे जगताप आणि आम्ही एकच, सुमारें सातआठ डोया झाल्या, शेराचे काळांत आमची मूळ पाटी सासवडाहून

पुण्यास आली, व हल्लीं आम्ही आपल्या मुलाबाळांचीं जावळें सासवडास जाऊन करितों, कारण त्यांची आणि आमची सठवाई एक व त्यांचें आमचें देवदेवकही एक. प्र०— तर मग तुमचा व आमचा सोईरसंबंध सहज़ासहज जमेल; कारण सासवडचे जगताप आमचे सोयरेधायरे आहेत; तुह्मी तिकडचा पदर मात्र जुळवून द्या म्हणजे झालें, मग तुमची आमची इतर बोलाचाली एका क्षणांत करून लग्नचिठ्या ताबडतोब काढतां येतील." याप्रमाणें खरी हकीगत असून जर एखादा प्रश्न करील कीं, तुह्मी हें जें म्हणतां याला आधार तरी कोणत्या शास्त्राचा ? तर त्यास माझें असें उत्तर आहे कीं, सुवर्ण–लोभास्तव इराणांतील आर्य लोकांनीं मागाहून जेव्हां या देशांतील सर्व मूळच्या स्थाइक अस्तिक, राक्षस वगैरे लोकांचा विध्वंस केला, त्यांपैकीं उरलेल्या मुगुटमणी दस्यु[१] लोकांवर लागोपाठ अनेक स्वाऱ्या करून अखेरीस त्यांस आपले दास[२]

---

१. John Wilson's India Three Thousand Years Ago, page 196. They appear also to have been a fair complexioned people, at least comparatively, and foreign invaders of India, as it is said that Indra (the God of the Ether or Firmament) divided the fields among his white complexioned friends after destroying the indigenous Barbarian races, for such there can be little doubt. We are to understand by the expression, Dasyu, which so often occurs and which is often defined to signify one who not only does not perform religious rites but attempts to harass their performers. The Dasyus, here mentioned, are doubtless the Dagyas of the Parsi sacred writings, and the Dakyas of the Behistian tablets, rendered by "countries" or "provinces" probably of an exterior position to be the Goim and Gentiles of the Hebrews. They were not altogether Barbarians ; for they had distinctive cities and other establishments of at least a partial civilization, though the Aryans, lately from more bracing climes than those which they inhabited, proved too strong for them.

२. John Wilson's India Three Thousand Years Ago, page 29. Of the Dasyas mentioned often in the Vedas in contrast with the Aryans, no such traces can be found, though they are once or twice mentioned by Manu. The word Das, derived from dasyu, ultimately came to signify a bondman. In this sense, it has its anologue in our word slave, derived from the Slavi People, so many of whom have become serfs in the modern regions of their abode. Some of the names of the Dasyas and other enemies of the Aryan race mentioned in the Vedas seem to have been of the Aryan origin ; but we see from the non-Sanskrit elements in the Indian languages, that they must have belonged principally to various immigrations of the Scythian or Turanian family of the human race.

करून नाना प्रकारचे त्रास देण्याची सुरवात केली; त्यावेळीं विजयी झालेल्या आर्य लोकांच्यानें आपल्या शास्त्रांत, पराजित केलेल्या शूद्रांची पूर्वीची खरी मूळ पीठिका कशी लिहववेल? पुढें बराच काळ लोटल्यानंतर त्या सर्व गांवच्या वनांतील फळांवर जेव्हां निर्वाह होईना, तेव्हां ते मासे, पशु व पक्षी यांच्या शिकारीवर आपलें उदरपोषण करूं लागले असतील; त्यांजवरही त्यांचा जेव्हां बरोबर निर्वाह होईना; तेव्हां त्यांनीं थोडीशी शेती करण्याचा उद्योग सुरू केल्यामुळें त्यांचें बरेंच लागीं लागलें असेल. पुढें कांहीं काळानंतर जेव्हां चहूंकडे हत्यारेंपात्यारें, औतकाठ्या वगैरे सामान-सुमान नवीन करण्याची त्यांस जसजशी युक्ति सुचूं लागली, तसतशी त्यांनीं प्रांताचे प्रांत लागवड केली असेल व त्या मानानें लोकसंख्याही वाढूं लागल्यामुळें एकंदर सर्व प्रांतांतील वनचराईच्या व सरहद्दीच्या वगैरे संबंधानें सर्व देशभर लढे पडून, त्यांच्यांत मोठमोठाल्या हाणामाऱ्या होऊन खूनखराब्या होऊं लागल्या असतील. त्या सर्वांचा बंदोबस्त करण्याकरितां एकंदर सर्व प्रांतांतील लोकांस एके ठिकाणीं जमून सर्वांनुमतें, त्या सर्व कामांचे निकाल सहज करण्याचें फार कठीण पडूं लागलें असेल. यास्तव सर्वांनुमतें अशी तोड निघाली कीं, एकंदर सर्व प्रांतांतील गांवोगांवच्या लोकांनीं आपआपल्या गांवांतील एकेक शहाणा माहितगार निवडून काढावा, आणि त्या सर्वांनीं एके ठिकाणीं जमून तेथें बहुमतानें सर्व कामांचे उलगडे करून निकालास लावण्याची वहिवाट सुरू केली. यावरून आपले सर्व लोकांत हा काळपावेतों निवडून काढलेल्या पंचाचे मार्फत मोठमोठाल्या कज्जांचे निवाडे करून घेण्याची वहिवाट जारी आहे. पुढें कांहीं काळानें जेव्हां अटक नदीचे पलीकडे जाऊन कित्येक कुळांनीं तेथें लागवड करून वसाहत केली व त्या मानानें चहूंकडे खानेसुमारी अफाट वाढली, तेव्हां आवर्षणामुळें कित्येक ठिकाणीं पिकास अजिबात धक्का बसून सर्व नदीनाले व तळीं उताणीं पडलीं, यामुळें अरण्यांतील एकंदर सर्व पशुपक्षी जिकडे पाणी मिळेल तिकडे निघून गेले. जिकडे पहावें तिकडे उपासामुळें मनुष्यांच्या लोथीच्या लोथी पडलेल्या पाहून कित्येक देशांतील धाडस पुंडांनीं बहुतेक बुभुक्षित कंगालांस आपल्या चाकरीस ठेवून त्यांस आपल्या बरोबर घेऊन, आरंभीं त्यांनीं आसपासच्या अबाद देशांत मोठमोठाले दरोडे घालतां घालतां, त्यांचे हाताखालचे लोकांवर त्यांचा पगडा बसतांच त्यांनीं इतर लोकांचे राजे होण्याचे घाट घातले. (याविषयीं आतां आपण शोध करूं लागल्यास त्यांपैकीं बहुतेक पिढीजादा राजांचे घराण्यांतील मूळपुरुष याच मालिकेंतील शिरोमणि निघतील.) त्यांचा बंदोबस्त करावा म्हणून एकंदर सर्व देशांतील गांवकरी, यांच्या हातून हुशार प्रतिनिधीची निवडणूक करून त्याच्या संमत्तीनें एकंदर सर्व देशाचें संरक्षण करण्यापुरती फौज ठेवून, तिचा खर्च भागण्यापुरता शेतसारा बसवून त्याची जमाबंदी करण्याकरितां, तहशीलदारांसहित चपराशांच्या नेमणुका करून व्यवस्था केली. त्यामुळें एकंदर सर्व देशांतील लोकांस आराम झाला असेल. नंतर कांहीं काळानें चहूंकडे सुबत्ता झाल्यामुळें वळीचें

स्थान म्हणजे बलूचिस्थानचे पलीकडील कित्येक डोईजड लोभी प्रतिनिधींनीं, सदरील चोरटे लोकांचें वैभव पाहून ते आपआपल्या देशाचे राजे बनतांच, पूर्वींचे लोकसत्तात्मक राज्यांचा बोज उडून तीं लयास गेल्यामुळें, इराणचे आलीकडील छप्पन देशांत शाहण्णव कुलाचे प्रतिनिधींनीं मात्र आपआपलीं निरनिराळीं राज्यें स्थापून, त्या सर्वांनीं एकमेकांचे सहाय्यानें आपआपले राज्यकारभार निर्वेधपणें चालवले, यामुळें त्यांच्या वैभवास शेंकडों वर्षें बाध न येतां दस्यू, आस्तिक, अहीर, असूर, उग्र, पिशाच मातंग[1] वगैरे लोकांच्या राज्यांत सर्व प्रजा सुखी होऊन चहूंकडे सोन्याचा धूर निघूं लागला. इतकेंच नव्हे परंतु ह्या सर्वांमध्यें दस्यू लोक महा बलवान असल्याकारणानें त्यांचें एकंदर सर्व यवनांवर इतकें वजन बसलें असावें कीं, त्यापैकीं बहुतेक यवन, दस्यू लोकांबरोबर नेहमीं स्नेहभाव व सरळ अंतःकरणानें वर्तन करीत, त्यामुळें दस्यू लोक हरएक प्रकारें त्यांस मदत करून त्यांचा परामर्श करीत. यावरून यवन लोकांत दस्यू लोकांस दोस्त म्हणण्याचा प्रचार पडला असावा, व त्याचप्रमाणें बाकी उरलेले यवन आर्यादि लोक दस्यू लोकांबरोबर मनांतून कृत्रिमानें वागत व वेळ आल्याबरोबर त्यांच्याशीं उघड गमजा करीत, तेव्हां दस्यू लोक त्यांच्या खोडी मोडून त्यांस ताळ्यावर आणीत असतील, यावरून यवन व आर्य लोकांत दस्यू लोकांस वैरभावानें दुशमन व दुष्ट म्हणण्याचा परिपाठ पडला असावा; कारण दोस्त, दुश्मन आणि दुष्ट या शब्दाच्या अवयवांसहित त्यांच्यांतील भावार्थाचा मेळ दस्यू शब्दाशीं सर्वांशीं मिळतो. शेवटीं एकंदर सर्व इराणी (आर्य), तुर्क वगैरे यवन लोकांस दस्यू लोकांचा बोलबाला सहन होईना, तेव्हां त्यांपैकीं अठरा वर्णांतील अठरा तऱ्हेच्या पगडया घालणाऱ्या "अठरा पगड जातीच्या लोकांनीं" सुवर्ण लूट करण्याच्या आशेनें दस्यू लोकांच्या मुलखांत वारंवार हल्ले करण्याची सुरवात केली. परंतु बळीचे पदरच्या काळभैरव व खंडेरावासारख्या महावीरांनीं त्यांची बिलकुल डाळ मळूं दिली नाहीं. इतक्यांत इराणांतील आर्य[2] लोकांत तिरकमट्याची नवीन युक्ति निघाल्याबरोबर तेथील इराणी क्षेत्र्यांपैकीं बहुतेक बराहासारख्या धाडस दंगलखोरांनीं, अलीकडील छप्पन्न देशांतील लहानमोठ्या संपत्तिमान राजेरजवाडयांचा नाश[3] केल्यानंतर

---

१. गोडबोल्यांच्या महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील प्रोफेसर भांडारकरांची सूचना पृ० १ क. २. John Wilson's India Three Thousand Years Ago, page 28.

२. John Wilson's India Three Thousand Years Ago, pages 17 and 18.

३. John Wilson's India Three Thousand Years Ago, pages 20 and 21.

Among peoples hostile to the Aryas, we also find noticed the Ajasas, Yakshas, Shigravas, Kikatas and others. The enemies of the Aryas are sometimes expressly mentioned as having a black skin: "He (Indra) punished for men those wanting religious rites tore off their skin. The Pishachas are said to have been tawny coloured."

नरसिंह आर्य क्षेत्र्यानें दस्यू लोकांचा तरुण राजपुत्र प्रल्हाद याचें कोवळें मन धर्मभ्रष्ट करून, त्याच्या सहाय्यानें त्याच्या पित्याचा कृत्रिमानें वध केला. नंतर वामन आर्य क्षेत्र्यानें येथील महाप्रतापी दस्यूंपैकीं बळीराजास रणांगणीं पाडतांच, त्यानें तिसरे दिवशीं बळीचे राजधानींतील एकंदर सर्व अंगनांचे अंगावरील सुवर्णालंकारांची लूट केली, यामुळें दस्यू लोकांनीं आपल्या देशांतून, आर्य ब्राह्मण लोकांस हांकून देण्याविषयीं पुष्कळ लढाया केल्या; परंतु अखेरीस परशुराम[१] आर्य क्षेत्र्यानें येथील एकंदर सर्व क्षेत्रवासी दस्यू लोकांवर लागोपाठ एकवीस वेळां स्वाऱ्या करून त्यांची शेवटीं इतकी वाताहत केली कीं, त्यापैकीं कित्येक महावीरांस त्यांच्या परिवारासह हल्लींच्या चीनदेशाजवळ एक[२] पायमार्ग होता, (ज्यावर पुढें कांहीं काळानें समुद्र पसरला, व ज्यास हल्लीं बेहरिंगची सामुद्रधुनी म्हणतात) त्या मार्गानें पाताळीं अमेरिकेंतील अरण्यांत जावें लागलें. कारण तेथील कित्येक जुनाट लोकांचा व तेथील दस्यू (शूद्र) लोकांचा देवभोळेपणा, रीतिभाती, क्रिया वगैरे बऱ्याच अंशीं एकमेकांशीं मिळतात. मूळच्या "अमेरिकन लोकांत येथल्यासारखीं सूर्यवंशी, राक्षस व आस्तिक कुळें सांपडतात. तेथील मुख्य "काशीक" नांवाशीं येथील "काशीकरांशीं" मेळ मिळतो. "कोरीकांचा" चव्द "कांचन" शब्दाशीं मिळतो. ते येथल्यासारखे शकुनापशकून मानीत. त्या लोकांत येथील शूद्रांसारखे मेल्या मनुष्यावर पोषाक घालून प्रेताबरोबर सोनें पुरण्याची क्रिया सांपडते. हल्लीं सर्व शूद्र द्रव्यहीन जरी झाले, तथापि ते (अमेरिकन) शूद्रासारखें मीठ न घालतां मौल्यवान मसाला घालून पुरीत. त्यांच्यांत[३] येथल्यासारखीं "टोपाजी, माणकू, अर्तिल यल्लपा, व अर्तिल बाळप्पा" अशीं नांवें सांपडतात. तेथें "कानडा" नांवाचा प्रांत सांपडतो. परंतु, कांहीं काळानें मागाहून चिनी अथवा आर्य लोकांनीं तेथील लोकांवर स्वाऱ्या करून त्यांस हस्तगत केलें असावें; कारण त्यांनीं हिंदुस्थानांतील आर्य लोकांसारखें, अमेरिकेंतील पूर्वीच्या लोकांस "विद्या

---

१. John Wilson's India Three Thousand Years Ago, page 49. Dr. John Muir, in his "Original Sanskrit Texts", pages 44-56, has given a series of passages sufficient to prove that according to the traditions received by the compilers of the ancient legendary history of India (traditions so general and undisputed as to prevail over even their strong hierarchical prepossessions), Brahmanas and Kshatriyas were at least in many cases, originally descended from one and the same stock. Some of the cases referred to by Dr. Muir are the same as those of the parties mentioned in the first paragraph of this note.

२. W. H. Prescott's History of Peru and Brazil, Vol. I, page 66. W. H. Prescott's History of Peru and Brazil, Volume III, Appendix No. 1, pages 157, 159 and 156.

देण्याची बंदी करून त्यांचे एकंदर सर्व मानवी अधिकार हरण करून त्यांस अति नीच मानून आपण त्यांचे "भूदेव" होऊन, आकाशांतील ग्रहांसह पांच तत्त्वांची पूजा करीत होते असें आढळतें. असो, परंतु येथें आर्य नाना[1] पेशवे याचे दालीबंद जातबंधू परशुरामाच्या धुमाळींत, रणांगणीं पडलेल्या प्रमुख महा अरींच्या एकंदर सर्व निराश्रित विधवा स्त्रियांपासून जन्म पावलेल्या अर्भकांचा त्यानें (परशुरामानें) सरसकटीनें वध करून दस्यू लोकांच्या कित्येक कुळांची दाणादाण करून, बाकी उरलेल्या एकंदर सर्व क्षेत्रवासी दस्यू लोकांचे शूद्र (दास) व अतिशूद्र (अनुदास) असे दोन वर्ग करून आर्य ब्राह्मणांनीं त्यांस नाना प्रकारचे त्रास देण्याविषयीं अनेक मतलबी व जुलमी "कायदे[2]" केले. त्यांपैकीं कांहीं कांहीं लेखी मुद्दे मनूसारख्या कठोर व पक्षपाती ग्रंथांत सांपडतात. ते असें कीं, "ज्या ठिकाणीं शूद्र लोक राज्य करीत असतील, त्या शहरांत आर्य ब्राह्मणानें मुळींच राहूं नये, शूद्रास ब्राह्मणानें कोणत्याच तऱ्हेचें ज्ञान देऊं नये, इतकेंच नव्हे, परंतु आपला वेदघोष शूद्राचे कानींसुद्धां पडूं देऊं नये. शूद्राबरोबर आर्यांनीं अवशीपहाटेस प्रवास करूं नये. शूद्राचा मुरदा फक्त दक्षिणेकडच्या वेशींतून नेण्याविषयीं परवानगी होती. आर्य ब्राह्मणांच्या मळ्यास शूद्रास स्पर्श करण्याची मनाई असे. राजा भुकेनें व्याकुळ होऊन मेला तरी त्यानें ब्राह्मणापासून कर अथवा शेतसारा घेऊं नये. परंतु राजानें विद्वान ब्राह्मणास वर्षासनें करून द्यावींत. विद्वान ब्राह्मणास ठेवी सांपडल्यास त्यानें एकट्यानेंच त्यांचा उपभोग घ्यावा. कारण ब्राह्मण सर्वांचा धनी आहे. परंतु राजास ठेवी सांपडल्यास त्यानें त्यांतील अर्धें द्रव्य ब्राह्मणास द्यावें. आर्य ब्राह्मणांनीं कसला जरी गुन्हा केला, तरी त्याच्या केसालाही धक्का न लावतां त्यास हद्दपार मात्र करावें म्हणजे झालें. ब्राह्मणांनीं आपली सेवाचाकरी शूद्रांस करावयास लावावें, कारण देवाजीनें शूद्रास ब्राह्मणाची सेवा करण्याकरितांच उत्पन्न केलें आहे. जर ब्राह्मणानें एखाद्या शूद्रास आपल्या कांहीं नाजुक कामांत उपयोगी पडल्यावरून, स्वतःच्या दास्यत्वापासून मुक्त केलें, तर त्यास पाहिजेल त्या दुसऱ्या भटब्राह्मणांनीं पकडून आपलें दास्यत्व करावयास लावावें. कारण देवाजीनें त्यास त्यासाठींच जन्मास घातलें आहे. ब्राह्मण उपाशीं मरूं लागल्यास त्यानें आपल्या शूद्र दासाचें जें काय असेल, त्या सर्वांचा उपयोग करावा. बिनवारशी ब्राह्मणाची दौलत राजानें कधीं घेऊं नये, असा मूळचा कायदा आहे. परंतु बाकी सर्व जातीची बिनवारशी मालमिळकत पाहिजे असल्यास राजानें घ्यावी. ब्राह्मण गृहस्थांनीं जाणूनबुजून गुन्हे केले, तरी त्यांस त्यांच्या मुलांबाळांसह त्यांची जिनगीसुद्धां त्यांबरोबर देऊन फक्त हद्दपार करावें. परंतु तेच गुन्हे इतर जातीकडून घडल्यास त्यांस त्यांच्या गुन्ह्याच्या मानाप्रमाणें देहांत शिक्षा करावी. ब्राह्मणाचे घरीं शूद्रास चाकरी न मिळाल्यास त्यांचीं

१. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 135, 136 and 137.
२. The Laws of Manu, Son of Brahma, by Sir William Jones, Volume VII, pages, 211, 214, 217, 224, 260, 262, 335, 392, 397.

मुलेंबाळें उपाशीं मरूं लागल्यास त्यांनीं हातकसबावर आपला निर्वाह करावा. अक्कलवान शूद्रानेंही जास्ती दौलतीचा संचय करूं नये. कारण तसें केल्यापासून त्याला गर्व होऊन तो ब्राह्मणाचा धिःकार करूं लागेल. ब्राह्मणानें शूद्रापाशीं कधींही भिक्षा मागूं नये. कारण त्या भिक्षेच्या द्रव्यापासून त्यानें होमहवन केल्यास तो ब्राह्मण पुढल्या जन्मीं चांडाळ होईल. ब्राह्मणानें कुतरें, मांजर, घुबड, अथवा कावळा मारला, तर त्यानें त्याबद्दल शूद्र मारल्याप्रमाणें समजून चांद्रायण प्रायश्चित्त केलें म्हणजे तो ब्राह्मण दोषमुक्त होईल. ब्राह्मणांनीं बिनहाडकांचीं गाडाभर जनावरें मारलीं अथवा त्यांनीं हाडकांच्या हजार जनावरांचा वध केला असतां, त्यांनीं चांद्रायण प्रायश्चित्त घेतलें म्हणजे झालें. शूद्रांनीं आर्यब्राह्मणास गवताचे काडीनें मारिलें, अथवा त्याचा गळा धोतरानें आवळला, अथवा त्यांना बोलतांना कुंठित केलें, अथवा त्यास धिःकारून शब्द बोलले असतां, त्यानीं ब्राह्मणाचे पुढें आडवें पडून त्यांपासून क्षमा मागावी."[1] याशिवाय शूद्राविषयीं नाना प्रकारचें जुलमी लेख आर्य ब्राह्मणांचे पुस्तकांतून सांपडतात, त्यांपैकीं कित्येक लेख येथें लिहिण्याससुद्धां लाज वाटते. असो, यानंतर आर्य लोकांनीं, आपल्या हस्तगत करून घेतलेल्या जमिनीची लागवड सुरळीत रीतीनें करण्याचे उद्देशानें दस्यू लोकांपैकीं प्रल्हादासारख्या कित्येक भेकड व धैर्यहीन अशा लोकांनीं स्वदेशबांधवांचा पक्ष उचलून आर्यब्राह्मणांशीं वैरभाव धरून तदनुरूप आरंभापासून तों शेवटपर्यंत कधींही हालचाल केली नाहीं. त्यांस गांवोगांवचे कुळकर्ण्यांचे कामावर मुकरर करून आपले धर्मांत सरतें करून घेतलें. यावरून त्यांस देशस्थ ब्राह्मण म्हणण्याचा प्रघात पडला आहे, कारण देशस्थ ब्राह्मणांचा व येथील मूळच्या शूद्र लोकांच्या रंगरूपाशीं, चालचलणुकीशीं व देव्हाऱ्यावरील कुळस्वामीशीं बहुतकरून मेळ मिळतो व दुसरें असें कीं, देशस्थ व कोकणस्थ ब्राह्मणांचा हा काळपावेतों परस्परांशीं बेटी व रोटीव्यवहारसुद्धां मुळींच होत नव्हता. परंतु कालच्या पेशवेसरकारांनीं देशस्थ ब्राह्मणाबरोबर रोटीव्यवहार करण्याचा प्रघात घातला. सदरची व्यवस्था अमलांत आणून आर्यब्राह्मण येथील भूपति झाल्यामुळें त्यांचा बाकींचे सर्व वर्णांचे लोकांवर पगडा पडून त्यांस अठरा वर्णांचे ब्राह्मण गुरु[2] म्हणूं लागले व त्यांनीं स्वतः 'स्वर्गपाताळ एक करून सोडल्यानंतर' आतां कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, अशा बुद्धीनें ताडपत्रें नेसून छातीवर तांबडी माती चोळून दंड थोपटण्याचे विसरून त्याबद्दल स्नानसंध्या करून, अंगावर चंदनाच्या उट्या लावून, कपाळावर केशर, कस्तुरीचे टिळे रेखून, स्वस्थ बसून मौजा मारण्याचा क्रम आरंभिला. त्यांपैकीं कोणी

---

१. The Laws of Manu, son of Brahma, by Sir William Jones, Vol. VII, pages 398 and Vol. VIII, pages 33, 42, 73, 79, 85, 105, 106 and 118.

२. जड अथवा श्रेष्ठ.

भांगेच्या तारेंत नाना प्रकारचे अपस्वार्थी ग्रंथ करण्याचे नादांत, कोणी योगमार्ग शोधून काढण्याचे खटपटींत पडून, बाकी सर्वांनीं आपआपसांत एकमेकांनीं एकमेकांस "अठरा वर्णामध्यें ब्राह्मण गुरु श्रेष्ठ" म्हणण्याचा प्रचार सुरू केला. त्याच सुमारास येथील जंगल (ज्यू) फिरस्ते बकालांनीं आपला धर्म स्वीकारावा, म्हणून आर्य ब्राह्मणांनीं त्यांचा पाठलाग केला. यावरून त्यांनीं संतापून आर्यांचे विरुद्ध नाना प्रकारचे ग्रंथ करून आर्यधर्माची हेळणा करण्याकरितां आपआपल्या जवळच्या आत्मलिंगाची पूजा करूं लागल्यामुळें लिंगाइतांचा एक निराळाच धर्म झाला असावा. नंतर आर्य ब्राह्मणांच्या स्वाधीन झालेल्या येथील एकंदर सर्व क्षुद्र शेतकरी दासांचा, त्यांनीं सर्वोपरी धिःकार करण्याची सुरुवात केली. त्यांस विद्या देण्याची अटोकाट बंदी करून त्यांची स्थिति पशूंच्याही पलीकडच्या मजलशीस पोहोंचविली. व ते अक्षरशत्रु अतैव ज्ञानशून्य झाल्यामुळें, त्यांस आज दिवसपावेतों राज्य व धर्मप्रकरणीं आर्यब्राह्मण इतके नागवितात कीं, त्यांच्यापेक्षां अमेरिकेंतील जुलमानें केलेल्या हप्शी गुलामांचीसुद्धां अवस्था फार बरी होती, म्हणून सहज सिद्ध करितां येईल. तथापि अलीकडे कांहीं शतकांपूर्वी, महमदी सरकारास त्यांची दया येऊन त्यांनीं या देशांतील लक्षावधि शूद्रादि अतिशूद्रांस जबरीनें मुसलमान करून त्यांस आर्यधर्माच्या पेंचांतून मुक्त करून, त्यांस आपल्या बरोबरीचे मुसलमान करून सुखी केलें. कारण त्यांपैकीं कित्येक अज्ञानी मुसलमान मुल्लाने व बागवान आपल्या लग्नांत येथील शूद्रादि अतिशूद्रासारखे संस्कार करितात, याविषयीं वहिवाट सांपडते. त्याचप्रमाणें पोर्तुगीज सरकारनें या देशांतील हजारों शूद्रादि अतिशूद्रांस व ब्राह्मणांस जुलमानें रोमन क्याथलिक खिस्ती करून त्यांस आर्यांचे कृत्रिमी धर्मापासून मुक्त करून सुखी केलें. कारण त्यांच्यामध्यें कित्येक ब्राह्मण शूद्रांसारखीं गोखले, भोंसले, पवार वगैरे आडनांवाचीं कुळें सांपडतात. परंतु हल्लीं अमेरिकन वगैरे लोकांच्या मदतीनें, या देशांतील हजारों हजार गांजलेल्या शूद्रादि अतिशूद्रांनीं, ब्राह्मणधर्माचा धिःकार करून, जाणूनबुजून खिस्ती धर्माचा अंगिकार करण्याचा तडाखा उडविला आहे, हें आपण आपल्या डोळ्यानें ढळढळीत पहात आहों. कदाचित् सदरच्या शूद्रादि अतिशूद्रांच्या दुःखाविषयीं तुमची खात्री होत नसल्यास, तुह्मी नुकतेंच अलीकडच्या दास शेतकऱ्यांपैकीं सातारकर शिवाजी महाराज, बडोदेकर दमाजीराव गायकवाड, ग्वालेरकर पाटीलबुवा, इंदूरकर लाख्या बारगीर, यशवंतराव व विठोजीराव होळकरासारख्या बडे बडे रणशूर राजेरजवाड्यांविषयीं, थोडासा विचार करून पाहिल्याबरोबर, ते अक्षरशून्य असल्यामुळें त्यांजवर व त्यांच्या घराण्यांवर कसकसे अनर्थ कोसळले हें सहज तुमचे लक्षांत येईल; यास्तव त्याविषयीं तूर्त येथें पुरें करितों. असो, येथील छप्पन देशांतील राजांनीं सदरचे लोकसत्तात्मक राज्याची कांस सोडिली, व त्यामुळें आर्य ब्राह्मणांनीं दस्यू वगैरे लोकांची वाताहत करून हा काळपावेतों त्यांची अशी विटंबना करीत आहेत, हें त्यांच्या कर्मानुरूप त्यांस योग्य शासन मिळालें;

यांत कांहीं संशय नाहीं, तथापि इराणापलीकडील ग्रीशियन लोकांनीं, पहिल्यापासून प्रजासत्तात्मक राज्य आपल्या काळजापलीकडे संभाळून ठेविलें होतें. पुढें जेव्हां इराणांतील मुख्य बढाईखोर "झरक्सिस" यानें ग्रीक देशाची वाताहत करण्याकरिता मोठ्या डामडौलानें आपल्याबरोबर लक्षावधि फौज घेऊन, ग्रीस देशाचे सरहद्दीवर ब्राऊन तळ दिला, तेव्हां स्पार्टा शहरांतील तीनचारशें स्वदेशाभिमानी शिपायांनीं रात्रीं एकाएकीं थरमॉपलीच्या खिंडींतून येऊन त्यांचे छावणीवर छापा घालून त्यांच्या एकंदर सर्व इराणी फौजेची त्रेधात्रेधा करून, त्यांस परत इराणांत धुडकावून लाविलें. हा त्यांचा कित्ता इताली देशांतील रोमन लोकांनीं जेव्हां घेतला, तेव्हां ते लोक प्रजासत्तात्मक राज्याच्या संबंधानें एकंदर सर्व युरोप, एशिया व आफ्रिका खंडांतील देशांत विद्या, ज्ञान व धनामध्यें इतकें श्रेष्ठत्व पावले कीं, त्यांच्यामध्यें मोठमोठे नामांकित वक्ते व सिपियो-सारखे स्वदेशाभिमानी योद्धे निर्माण झाले. त्यांनीं आफ्रिकेंतील हनीबॉलसारख्या रणधीरांचा नाश करून तेथील एकंदर सर्व लोकांस यथास्थित शासन केलें. नंतर त्यांना पश्चिम समुद्रांत ग्रेट ब्रिटन बेटांतील, अंगावर तांबड्यापिवळ्या मातीचा रंग देऊन कातडीं पांघरणाऱ्या रानटी इंग्लिश वगैरे लोकांस, वस्त्रपात्रांचा उपयोग करण्याची माहिती करून देऊन, आपल्या हातांत चारपांचशें वर्षें छडी घेऊन त्या लोकांस प्रजासत्तात्मक राज्याचा धडा देऊन वळण लावीत होते; तों इकडे रोमन सरदारांपैकीं महाप्रतापी ज्युलियस सीझरनें आपल्या एकंदर सर्व कारकीर्दींत सहा लक्ष रोमन शिपायांस बळी देऊन अनेक देशांतील पिढीजादा राजेरजवाड्यांवर वर्चस्व बसविल्यामुळें, त्याच्या डोळ्यावर ऐश्वर्याची इतकी धुंदी आली कीं, त्यानें आपल्या मूळ प्रजासत्तात्मक राज्यरूप मातेवर डोळे फिरवून, तिच्या सर्व आवडत्या लेकरांस आपले दासानुदास करून, आपण त्या सर्वांचा राजा होण्याविषयीं मनामध्यें हेतु धरिला. त्या वेळेस तेथील महापवित्र स्वदेशाभिमानी, ज्यांना असें वाटलें कीं, या राज्यसत्तात्मकतेपासून पुढें होणारी मानहानी आमच्यानें सहन होणार नाहीं, त्यांपैकीं ब्रूटस नांवाचा एक गृहस्थ, आपल्या हातांत नागवा खंजीर घेऊन, ज्युलियस सीझर प्रजासत्तात्मक राज्यमंदिराकडे सिंहासनारूढ होण्याचे उद्देशानें जात असतां, वाटेमध्यें त्याचा मार्ग रोखून उभा राहिला. नंतर ज्युलियस सीझर यानें आपल्या मार्गानें आडव्या आलेल्या ब्रूटसाच्या डोळ्यांशीं डोळा लावल्याबरोबर मनामध्यें अतिशय खजिल होऊन, आपल्या जाम्याच्या पदरानें तोंड झांकतांच, ब्रूटसानें आपल्या स्वदेशबांधवांस भावी राज्यसत्तात्मक शृंखलेपासून स्वलंब करण्यास्तव परस्परामध्यें असलेल्या मित्रत्वाची काडीमात्र पर्वा न करितां, त्याच्या (ज्युलियस सीझरच्या) पोटांत खंजीर खुपसून, त्याचा मुरदा धरणीवर पाडला. परंतु ज्युलियस सीझरनें पूर्वीं सरकारी खजिन्यांतील पैसा बेलगामी खर्चीं घालून सर्व लोकांस मोठमोठाल्या मेजवान्या दिल्या होत्या. त्यामुळें तेथील बहुतेक ऐषआरामी सरदार त्याचे गुलाम झाले होते, सबब पुढें चहूंकडे भालेराई

होऊन, तेथील प्रजासत्तात्मक राज्याची इमारत कोसळून, बारा सीझरांचे कारकीर्दीचे अखेरीस रोमन लोकांच्या वैभवाची राखरांगोळी होण्याच्या बेतांत रोमी लोक, इंग्लिश वगैरे लोकांस जागचे जागीं मोकळे सोडून, परत आपल्या इटाली देशांत आले. परंतु त्याच वेळीं इंग्लिश लोकांचे आसपास स्कॉच, स्याक्सन वगैरे लोक अट्टल उत्पाती असल्यामुळें त्यांनीं एखाद्या बावनकशी सुवर्णामध्यें तांब्यापितळेची भेळ करावी, त्याप्रमाणें, त्या प्रजासत्तात्मक राज्यपद्धतीमध्यें वंशपरंपराधिरूढ बडे लोकांची व राजांची मिसळ करून, त्या सर्वांचें एक भलेंमोठें तीन धान्यांचें गोड मजेदार कोडबुळें तयार करून, सर्वांची समजूत काढली. त्या देशांत जिकडे तिकडे डोंगराळ प्रदेश असल्यामुळें लागवड करून सर्वांचा निर्वाह होण्यापुरती जमीन नसून, थंडी अतिशय; सबब तऱ्हेतऱ्हेच्या कलाकौशल्य व व्यापारधंद्याचा पाठलाग करितांच, ते या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकंदर सर्व बेटांसह चार खंडांत विद्या, ज्ञान व धन संपादन करण्याचे कामीं अग्रगण्य होत आहेत, तों इकडे आरबस्थानांतील हजरत महमद पैगंबराचे अनुयायी लोकांनीं इराणांतील मूळच्या आर्य लोकांच्या राज्य-वैभवासह त्यांची राखरांगोळी करून, या ब्राह्मणांनीं चावून चिपट केलेल्या अज्ञानी हिंदुस्थानांत अनेक स्वाऱ्या करून हा सर्व देश आपल्या कबजांत घेतला. नंतर मुसलमानी बादशहा दिवसा तानसेनी गाणीं ऐकून रात्रीं जनानखान्यांत लंपट झाले आहेत, इतक्यांत महाकुशल इंग्रजांनीं मुसलमानांच्या पगड्यावर घणे मारून हा देश सहज आपल्या बगलेंत मारला, यामध्यें त्यांनीं मोठा पुरुषार्थ केला, असें मी म्हणत नाहीं. कारण येथील एकंदर सर्व प्रजेपैकीं एक दशांश ब्राह्मणांनीं आपल्या कृत्रिमी धर्माच्या आडून लेखणीच्या जोरानें, धर्म व राजकीय प्रकरणीं बाकीच्या नऊ दशांश लोकांस विद्या, ज्ञान, शौर्य, चातुर्य व बल याहींकरून हीन करून ठेविलें होतें. परंतु यापुढें जेव्हां इंग्रज लोकांस नऊ दशांश शूद्रादि अतिशूद्र लोकांचा स्वभाव सर्व कामांत रानटी व आडमूठपणाचा असून ते सर्वस्वी ब्राह्मणांचे धोरणानें चालणारे, असें त्यांच्या प्रचितीस आलें; तेव्हां त्यांनीं महाधूर्त ब्राह्मणांस नाना प्रकारच्या लालची दाखवून एकंदर सर्व कारभार त्यांजकडे सोपवून, आपण सर्व काळ मौल्यवान वस्त्रें, पात्रें, घोडे, गाड्या व खाण्यापिण्याच्या पदार्थांत लंपट होऊन, त्यांमध्यें मन मानेल तसे पैसे उधळून, एकंदर सर्व युरोपियन व ब्राह्मण कामगारांस मोठमोठ्या पगारांच्या जागा व पेनशनें देण्यापुरतें महामूर द्रव्य असावें या हेतूनें, कोरड्या ओल्या कोंड्याभोंड्यांच्या भाकरी खाणाऱ्या, रात्रंदिवस शेतीं खपणाऱ्या कष्टाळू शेतकऱ्याच्या शेतावर दर तीस वर्षांनीं, पाहिजेल तसे शेतसारे वाढवून, त्यांच्या अज्ञानी मुलांबाळांस विद्या देण्याची हूल दाखवून, त्या सर्वांच्या बोडक्यावर लोकलफंड या नांवाचा दुसरा एक कराचा बोजा लादला. आणि त्यांनीं (शेतकऱ्यांनीं) आपल्या मुलांबाळांसह रात्रंदिवस शेतांत खपून धान्य, कापूस, अफू, जवस वगैरे काला कित्ता मोठ्या कष्टानें कमावून शेतसाऱ्यासुद्धां लोकलफंडाचे हप्ते अदा

करण्याकरितां त्या सर्व जिनसांस बाजारांत नेऊन दान करावयास जाण्याचे राजमार्गांत, दर सहा मैलांवर जागोजागीं जकाती बसवून त्यांजपासून लाखों रुपये गोळा करूं लागले. जे आपल्या विपत्तींत आसपासच्या जंगलांतील गवत लांकूडफांटा व पानफुलांवर गुराढोरांची व आपली जतणुक करीत असत, तीं सर्व जंगलें सरकारनें आपल्या वशांत सोडलीं. त्यांच्या कोंड्याभोंड्याच्या भाकरीबरोबर तोंडी लावण्याच्या मिठावरसुद्धां भली मोठी जकात बसविली आहे. तसेंच शेतकऱ्याचे शेतांत भरपूर पाणी असल्यानें त्यांच्या जितराबाचा बचाव होऊन त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळावें, असा वरकांति भाव दाखवून, आंतून आपल्या देशबांधव युरोपियन इंजिनीयर कामगारांस मोठमोठे पगार देण्याचे इराद्यानें, युरोपांतील सावकारांस महामूर व्याज देण्याचा हेतु मनीं धरून त्यांचें कर्ज हिंदुस्थानच्या बोडक्यावर वाढवून, त्या कर्जापैकीं लक्षावधि रुपये खर्चीं घालून जागोजाग कालवे बांधिले आहेत. व त्या कालव्यांतील पाण्याची किंमत अज्ञानी शेतकऱ्यांपासून मन मानेल तशी घेऊन, त्यांच्या शेतांत वेळच्या वेळीं तरी पाणी देण्याविषयीं सरकारी कामगारांकडून बरोबर तजवीज ठेवली जाते काय ? कारण या इरिगेशनखात्यावरील बेपर्वा युरोपियन इंजिनीयर आपलीं सर्व कामें ब्राह्मण कामगारांवर सोंपवून आपण वाळ्याचे पडद्याचे आंत बेगमसाहेबासारखे ऐषआरामांत मर्जीप्रमाणें कामें करीत बसतात. इकडे धूर्त ब्राह्मण कामगार आपली हुशारी दाखविण्याकरितां इंजिनीयरसाहेबांचे कान फुंकून त्यांजकडून, पाहिजेल तेव्हां, पाहिजेल तसे जुलमी ठराव सरकारांतून पास करून घेतात. त्यांपैकीं नमुन्याकरितां येथें एक घेतों. तो असा कीं :—वक्तशीर कालव्यांतील पाणी सरल्यामुळें शेतकऱ्यांची एकंदर सर्व जितराबांची होरपळून राखरांगोळी जरी झाली, तरी त्याची जोखीम इरिगेशन, खात्याचे शिरावर नाहीं. अहो, जेथें हजारों रुपये दरमहा पगार घशांत सोडणाऱ्या गोऱ्या व काळ्या इंजिनीयर कामगारांस, धरणांत हल्लीं किती ग्यालन पाणी आहे, याची मोजदाद करून तें पाणी पुढें अखेरपावेतों जेवढ्या जमिनींस पुरेल, तितक्याच जमिनीच्या मालकांस पाण्याचे फर्मे द्यावे, असा तर्क नसावा काय ? अहो, या खात्यांतील कित्येक पाणी सोडणाऱ्या कामगारांचे पाण्यासाठीं अर्जव करितां करितां शेतकऱ्यांचे नाकास नळ येतात. अखेर, जेव्हां शेतकऱ्यांस त्यांजकडून पाणी मिळेनासें होतें, तेव्हां शेतकरी त्यांचेवरील धूर्त अधिकाऱ्यांकडे दाद मागण्यास गेले कीं, पाण्याचे ऐवजीं शेतकऱ्यांवर मगरुरीच्या भाषणांचा हल्ला[1] मात्र होतो. अशा या न्यायीपणाचा डौल मिरविणाऱ्या सरकारी चाकरांनीं, कर्जबाजारी दुबळ्या शेतकऱ्यांपासून पाण्याचे

---

१. हा आरोप आमचे **लोकप्रिय** निःपक्षपाती **मि० विश्वनाथ दाजीसारखे** जे कित्येक गृहस्थ असतील त्यांस लागू नाही. असे **निर्मळ मनाचे पुरुष** सरकारी ब्राह्मण कामगारांत थोडे सांपडतात.

भरपूर दाम घेऊन, त्यांच्या पैशापुरतें भरपूर पाणी देण्याचे ऐवजीं, आपल्या उंच जातीच्या तोऱ्यांत शेतकऱ्यांशीं मगरुरीचीं भाषणें करणें, या न्यायाला म्हणावें तरी काय ? सारांश, आमचे न्यायशील सरकार आपले हाताखालच्या ऐषआरामी व दुसरे धूर्त कामगरांवर भरंसा न ठेवितां शेतकऱ्यांचे शेतास वेळच्या वेळीं पाणी देण्याचा बंदोबस्त करून, पाण्यावरचा दर कमी करीत नाहींत, म्हणून सांप्रत काळीं शेतकऱ्यांचीं दिवाळीं निघून सरकारांस त्यांच्या घरादारांचे लिलांव करून, ते सर्व पैसे या निर्दय कामगाराचे पदरीं आंवळावे लागतात. यास्तव आमचे दयाळू सरकारांनीं दर एक शेतकऱ्याच्या शेताच्या पाण्याच्या मानाप्रमाणें प्रत्येकास एकेक तोटी करून द्यावी, जिजपासून शेतकऱ्यांस जास्त पाणी वाजवीपेक्षां घेतां न यावें. आणि तसें केलें म्हणजे पाणी सोडणारे कामगारांची सरकारास जरूर न लागतां, त्यांच्या खर्चाच्या पैशाची जी बच्यत राहील, ती पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांस पाणी घेण्याचे दर कमी करण्याचे कामीं चांगली उपयोगी पडेल. व हल्लीं जो आमचे विचारी सरकारांनीं पाण्यावरचे दर कमी करण्याचा ठराव केला आहे, तो "इरीगेशन" खात्यास एकीकडे ठेवण्याचा प्रसंग टाळतां येईल. तसेंच अज्ञानी शेतकऱ्यांचे मागें आताशीं लोकलफंडासारखा नवीन एक दुसरा म्युनिसिपालिटीचा जबरदस्त बुरदंडा योजून काढिला आहे. तो असा कीं, शेतकऱ्यांनीं शेतांत तयार करून आणिलेला एकंदर सर्व भाजीपाला वगैरे माल शहरांत आणितेवेळीं त्या सर्व मालावर म्युनिसिपालिटी जकात घेऊन शेतकऱ्यांस सर्वोपरी नाडिते. कधीं कधीं शेतकऱ्यानें गाडीभर माळवें शहरांत विकण्याकरितां आणिल्यास त्या सर्व मालाची किंमत बाजारांत जास्तीकमती वजनानें घेणारे देणारे दगेबाज दलालांचे व म्युनिसिपालिटीचे जकातीचे भरीस घालून गाडीभाडें अंगावर भरून, त्यास घरीं जाऊन मुलाबाळांपुढें शिमगा करावा लागतो. अहो, एकट्या पुणें शहरांतील म्युनिसिपालटीचें आतांच वार्षिक उत्पन्न सांगली संस्थानचे उत्पन्नाचीं बरोबरी करूं लागलें. त्याचप्रमाणें मुंबईतील टोलेजंग म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नाचे भरीस पंतसचिवासारखीं दहाबारा संस्थानें घातलीं, तरी तो खड्डा भरून येणें नाहीं. यावरून "उपरकी तो खूप बनी और अंदरकी तो राम जणी" या प्रसिद्ध म्हणीप्रमाणें प्रसंग गुजरला आहे. जिकडे पहावें तिकडे दुतर्फा चिरेबंदी गटारें बांधलेले विस्तीर्ण रस्ते, चहूंकडे विलायती खांबांवर कंदिलांची रोषणाई, जागोजाग विलायती खापरी व लोखंडी नळांसहित पाण्याच्या तोट्या, मुत्र्या, कचऱ्याच्या गाड्या वगैरे सामानांचा थाट जमला आहे. परंतु पूर्वीचे राजेरजवाडे जरी मूर्तिपूजक असून इंग्रज लोकांसारखे विद्वान नव्हते, तरी त्यांनीं आपल्या रयतेच्या सुखसंरक्षणाकरितां मोठमोठ्या राजमार्गाचे दोन्ही बाजूंनीं झाडें, जागोजाग गांवकुसू, पूल, बहुतेक ठिकाणीं भुईकोट किल्ले व गढ्या, कित्येक ठिकाणीं धरणें, कालवे, विहिरी, तलाव, व अहमदनगर, औरंगाबाद, विजापूर, दिल्ली, पुणें वगैरे शहरांतून मजबूत पाण्याचे नळ, हौद,

देवालयें, मशिदी व धर्मशाळा, मोऱ्या, पाणपोई वगैरे सरकारी खजिन्यांतील द्रव्य खर्ची घालून तयार केल्या होत्या. हल्लींचे आमचे महातत्त्वज्ञानी खऱ्या एका देवास भजणारे इंग्रज सरकार बहादूर, म्युनिसिपालिटीचे द्वारें अन्य मार्गानें रयतेचें द्रव्य हरण करून, त्या द्रव्यापासून सदरचीं कामें पुरीं करूं लागल्यापासून, आंतून रयतेस दिवसेंदिवस प्रामाणिकपणानें चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य कमी कमी होत चालल्यामुळें त्यांस दुर्गुणावलंबन करण्याचें हें एक प्रकारचें शिक्षणच देत आहे. तशांत हल्लीं अशा सुबत्तेचे काळांत चार[1] कोट रयतेस दिवसांतून दोन वेळां पोटभर अन्न मिळत नाहीं, व ज्यांस भुकेची व्यथा अनुभवल्यावांचून एक दिवससुद्धां सुना जात नाहीं, असें उघडकीस आलें आहे. यास्तव आमच्या न्यायशील सरकारनें अक्षरशत्रु शेतकऱ्यांचे शेतांवर वाजवी शेतसारा स्थायिक करून, त्यांस विद्वान करून शेतकीसंबंधीं ज्ञान दिलें, म्हणजे ते पेशवे[2], टोपे, खाजगीवाले, पटवर्धन, फडके वगैरे निमकहरामी बंडखोर ब्राह्मणांचे नादीं लागून, आपल्या प्राणास मुकणार नाहींत. शिवाय या देशांत इंग्रजाचें राज्य झाल्यादिवसापासून इंग्लंडांतील विद्वान कसबी लोक आपल्या अकलेच्या जोरानें यंत्रद्वारें तेथें तयार केलेला माल, येथील सर्व अक्षरशून्य ढोरामांगांपासून तो लोहार व विणकरांचे पोटावर पाय देऊन, त्यांजपेक्षा स्वस्त विकूं लागले. यास्तव येथील तांदूळ, कापूस, अळशी, कातडी वगैरे मालाचा खप इकडे न जाहल्यानें तो माल इंग्लंडांतील व्यापारी पाहिजे त्या दरानें स्वस्त खरेदी करून, विलायतेंतील कसबी लोकांस विकून त्याच्या नफ्यावर कोट्याधीश बनले आहेत. सारांश या सर्व कारणांमुळें शेतकऱ्यांनीं लागवडीकडे केलेला खर्चसुद्धां उभा राहणेची मारामार पडते. तेव्हां ते मारवाड्यांपासून कर्ज काढून सरकारी पट्टी देतात. व याविषयीं बारीक चौकशी करण्याकरितां नेमलेल्या ऐषआरामांत गुंग असणाऱ्या व संध्यासोंवळें यामध्यें निमग्न असणाऱ्या भट सरकारी कामगारांस फुरसत तरी सांपडते काय? त्यांतून इकडील कित्येक मोठ्या आडनांवाच्या सभांतील सरकारी चोंबड्या नेटिव्ह चाकरांनीं "शेतकरी लोक लग्नकार्यनिमित्यानें बेल्गामी खर्च करितात म्हणून ते कर्जबाजारी झाले आहेत." अशी लटकीच पदरची कंडी उठविल्यावरून, महासमुद्राचे पलीकडील आमच्या महाज्ञानी, चार चार घोड्यांच्या चारटांत बसून फिरणाऱ्या मेंढपाळ स्टेट सेक्रेटरीस, शेतकऱ्यांचें पोकळ ऐश्वर्य जेव्हां पाहवेना, तेव्हां त्यांनीं तेथील कसबी लोकांनीं तयार केलेल्या विलायती जिनसांवर अजीबात जकात काढून टाकली. येथें त्यांनीं आपल्या शहाणपणाची कमाल केली! त्यांनीं आपले बडेबडे सावकारांस सालदरसाल सुमारें पांच कोट रुपये व्याज देण्याविषयीं मनांत काडीमात्र विधिनिषेध न आणतां, येथील कायदेकौन्सिलचे द्वारें ज्या लोकांस गरिबीचा इंगा बिलकुल ठाऊक नाहीं, अशा ऐषआरामी

१. Journal of the East India Association, No. 3, Vol. VII, page 124.
२. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 133 and 134.

युरोपियन व सोंवळ्या नेटिव्ह जजांकडून गरीब बापड्या तुटपुंज्या सावकाराचें अजीबाद व्याज खुंटविण्याचें सोंग उभें करविलें आहे. अहो, सरकारचे मनांत जर आम्हां कंगाल शेतकऱ्यांविषयीं खरोखर कळवळा आहे, तर ते आपले विलायती सावकारांचें एक अर्व रकमेचें व्याज अजीबाद बंद कां करीत नाहींत ? आणि तसें केल्याबरोबर शेतकऱ्यांचे पाय कसे थारीं लागत नाहींत, हें पाहूं बरें ? परंतु आमच्या सरकारनें मध्येंच एखादी नवीन मोहीम परदेशांत उपस्थित करून तिकडे ही वांचविलेली रकम खर्ची घालूं नये, म्हणजे त्यांच्या न्यायीपणाची चहूंकडे वाहवा होईल व मे० वेडरबर्नसाहेबासारख्या परोपकारी, उदार पुरुषांनीं प्रथम आपल्या विलायती सरकारांचें व्याज अजीबाद कमी करण्याविषयीं सरकारची चांगली कानउघाडणी करण्याचें काम एकीकडे ठेवून, अशा नव्या व्यांकी उपस्थित करण्याचे नादीं लागून शेतकऱ्याचे माथ्यावर अपेशाचें खापर फोडूं नये. कारण त्यापासून कोणत्याही पक्षाचें हित होणें नाहीं, इतकेंच नव्हे परंतु याशिवाय आमचे गव्हरनर जनरलसाहेबांनीं एकंदर सर्व लष्करी, न्याय, जंगल, पोलिस, विद्या वगैरे लहानमोठ्या सरकारी खात्यांतील शंभर रुपयांचे पगारावरील कामगारांचे पगार व पेनशनी कमी करण्याविषयीं आपल्या मुख्य विलायती सरकारास शिफारस करून, त्याविषयीं बंदोबस्त केल्याविना, शेतकऱ्यांस पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळून त्यांचे कपाळचा कर्जबाजारीपणा सुटणार नाहीं. शेतकऱ्यांनीं आपल्या बायकांमुलांसह रात्रंदिवस शेतांत खपावें, तरी त्यास शेतसारा व लोकलफंड वारून आपल्या कुटुंबांतील दर माणशीं दरमहा तीन तीन रुपयेही पडत नाहींत; आणि साधारण युरोपियन व नेटीव्ह सरकारी कामगारांस दरमहा पंधरा रुपये नसत्या किरकोळ खर्चास व दारुपाण्याससुद्धां पुरत नाहींत. मग कलेक्टर वगैरे कामगारांसारख्या नबाबांचे येथील बेलगामी किरकोळ खर्चाविषयीं गोष्ट काढल्यास आमचें कोण ऐकतो ? यास्तव, आपण, येथील एक आठ बैली कुणबाया ओढणारा शूद्र शेतकरी असून त्याचे चारपांच कर्ते मुलगे आहेत व ज्याचें कुटुंबांतील सुनाबाळा एकापेक्षां एक अधिक एकमेकींच्या पायावर पाय देऊन चढाओढीनें, घरीं व शेतीं, रात्रंदिवस खपणाऱ्या आहेत, व जो ब्राह्मण, गुजर अथवा मारवाडी सावकाराची फुटकी कवडीसुद्धां कर्ज देणें लागत नाहीं, अशाची स्थिती, येथील एका युरोपियन पलटणींतील साधारण गोऱ्या सोजराच्या स्थितीशीं सूक्ष्म रीतीनें तुलना करून पाहिली असतां, त्यामध्यें काशीरामेश्वरापेक्षांही जास्ती अंतर दिसून येतें. इकडे शूद्र शेतकरी लंगोटी नेसून करगुट्याला चुनातंबाखूची गुंतविलेली बटवी, डोईवर चिंध्यांचें पागोटें, उघडाबंब, अनवाणी, हातांत नांगराची मूठ धरून भर कडक उन्हामध्यें सर्व दिवसभर, शिंपलेवजा नोकदार धसकटांनीं युक्त अशा खरबरीत ढेकळांतून आठ बैलाशीं झटे घेतां घेतां गीत गाऊन नांगर हांकीत आहे; तिकडे गोरा शिपाई पायांत पाटलोन, अंगांत पैरणीवर लाल बनाती डगलें, डोईवर कलाबतूचा कशीदा काढलेली नखरेदार टोपी, पायांमध्यें सुती पायमोज्यावर विलायती वजविलेल्या

मजबूत मऊ कातड्याचा बूट, कंबरेवर कातड्याचें तोस्तान व खांद्यावर चापाची बंदूक घेऊन, दररोज सकाळीं अथवा सायंकाळीं हवाशीर मैदानांत तास अर्धा तास परेडीची कसरत करीत आहे. इकडेस शूद्र शेतकऱ्याचा पिढीजादा दरबारी पोशाख म्हटला म्हणजे, जाडाभरडा खादीचा दुहेरी मांडचोळणा, बंडी, पासोडी, खारवी पागोटें, आणि दोरीनें आळपलेला गांवठी जोडा, ज्यांची निहारी व दुपार संध्याकाळचें जेवण ज्वोंधळे, नाचणीची किंवा कोंड्याभोंड्याच्या भाकरी, वा गाजरेंरताळांची वरू, कालवण आमटी अथवा बोंबलाचें खळगुट, तेंही नसल्यास चटणीच्या गोळ्याशिवाय भाकरीवर दुसरें कांहीं मिळावयाचें नाहीं. चटणी भाकर कां होईना, परंतु ती तरी वेळच्या वेळीं व पोटभर त्यास मिळते काय? राहतें घर बैलांच्या गोठ्याशेजारीं असून ज्याच्या उशा-पायथ्याशीं तीन्ही वासरें, पारडीं अथवा कडें बांधलेलीं असल्यामुळें घरांत चहूंकडे मुतारीची उग्र घाण चालली आहे, फाटके पटकूर व मळकट गोधडीचें अंथरूण पांघरूण, सर्व गांवच्या म्हशी पाण्यांत बसून बसून खराब झालेल्या डोहाचे खालचे बाजूस उकरलेल्या डहुऱ्यांतील पाणी पिण्याचें गांवांतील खिंडार तेंच त्यांचा शेतखाना, तशांत मोडशी होऊन त्यास जाळताप आल्यास चांगल्या औषधी व त्यांचा माहीतगार डॉक्टराच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्य, याशिवाय सरकारी शेतसारा वगैरे फंड व पट्ट्या कोठून व कशा द्याव्यात, यासंबंधीं त्यांच्या उरावर कटार टांगलेली असते, अशा अभागी शेतकऱ्यांची अक्कल गुंग होणार नाहीं, असें एखाद्या वाकबगार गोऱ्या अथवा काळ्या डाक्टराच्यानें छातीस हात लावून म्हणवेल काय? तिकडे सरकार विलायतेहून गोऱ्या शिपायांच्या पोषाकाकरितां उंच कपडे, बनाती, रुमाल, पायमोजे, बूट खरेदी करून आणवितें, सरकार त्यांच्या खण्यापिण्याकरितां उत्तम गहूं, तांदूळ, डाळ, निकोपी तरुण गाया, शेळ्या व मेंढ्यांचें मांस, विलायती पोरटर वगैरे अंमली दारू, निर्मळ तेल, तूप, दूध, साखर, चहा, मीठ, मिरच्या, गरम मसाला, सुरी, कांटा वगैरे सामान येथें खरेदी करून, खिस्ती अचाऱ्याकडून तीन वेळां ताजा पाक सिद्ध करवून त्यास वेळचे वेळीं आयतें जेऊं घालितात. त्यास राहण्याकरितां लाखों रुपये खर्चीं घालून सरकारनें दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या आहेत. जीमध्यें लोखंडी खाट, बिछान्यावर उशी, पलंगपोसासह धाबळीची सोय केली असून वरतीं रोपणाईसाठीं हंडी लोंबत आहे. बराकीचे अंगणांत स्नानाकरितां न्हाणी करून तिजमध्यें "फिल्टर" केलेले पाण्याची तोटी सोडली आहे. त्याचप्रमाणें स्वच्छ सोयीचें शौचकूप केलेंच आहे. तशांत अजीर्णामुळें किंचित् खोकला किंवा ताप आला कीं, त्यांच्या जिवासाठीं दवाखाना तयार केलेला असून त्यामध्यें शेंकडों रुपये किंमतीचीं औषधें, शस्त्रें वगैरे ठेवून त्यावर हजारों रुपये दरमहा पगाराच्या डाक्टराची नेमणूक करून, त्यांच्या तैनातींत डोलीसुद्धां हमाल दिलेले आहेत. याशिवाय त्यास देण्यामागण्याची काळजी नसून, घर, शेतखाना, झाडू, पाणी, रस्ता, शेत व लोकलफंड पट्टी वगैरे देण्याची ददात नसून, असमानी व

टोळांच्या सुलतानीविषयीं बिलकूल काळजी नाहीं आणि यावरूनच आपण सोंवळ्यांतील नेटिव्ह कामगारांस धिःकारानें म्हणतों कीं, पहा हा नेटिव्ह कामगार, ऐषआरामी युरोपियन कामगारांचे पुढें पुढें करून अज्ञानी शेतकऱ्यांपासून लांच खाऊन कसा सोजरासारखा लाल गाजर पडला आहे. काय हा उधळेपणा! याला म्हणावें तरी काय? यास्तव आमचे डोळे झांकून निराकार परमात्म्याची प्रार्थना करणाऱ्या, विलायती सरकारानें येथील धूर्त ब्राह्मणांनीं उपस्थित केलेले समाजांच्या व वर्तमानपत्रांच्या गुलाबी लिहिण्यावर बिलकुल भरंवसा न ठेवितां, एकंदर सर्व आपल्या सरकारी खात्यांतील गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षां जास्ती केलेले पगार अजीबाद कमी करून, अज्ञानानें गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान[1] देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्या कमी न केल्यास, थोड्याच काळांत या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असें आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारचे कानांत सांगून या प्रसंगीं पुरें करितों.

## प्रकरण ४ थें

### शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लींची स्थिती :

या प्रकरणाचे आरंभीं रात्रंदिवस शेतीं खपणाऱ्या कष्टाळू, अज्ञानी शेतकऱ्यांच्या कंगाल व दीनवाण्या स्थितीविषयीं वाटाघाट तूर्त न करितां, ज्यांच्या आईच्या आज्याची मावशी अथवा बापाच्या पंज्याची मुलगी, शिंद्याचे अथवा गाइकवाडाचे घराण्यांतील खाशा अथवा खर्ची मुलास दिली होती, येवढ्या कारणावरून माळी, कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांत मराठ्यांचा डौल घालून शेखी मिरविणाऱ्या कर्जबाजारी, अज्ञानी कुणब्यांच्या हल्लींच्या वास्तविक स्थितीचा मासला तुम्हास या प्रसंगीं कळवितों. एक कुळवाडी एके दिवशीं नदीच्या किनाऱ्याजवळच्या हवाशीर दाट आंबराईतील कलेक्टर-साहेबांच्या कचेरीच्या तंबूकडून, मोठ्या रागाच्या त्वेषांत हातपाय आपटून दांतओठ खात आपल्या गांवाकडे चालला आहे. ज्याचें वय सुमारें चाळीशीच्या भरावर असून हिम्मतींत थोडासा खचल्यासारखा दिसत होता. डोईवर पीळदार पेंचाचें पांढरें पागोटें असून त्यावर फाटक्या पंचानें टापशी बांधलेली होती. अंगांत खादीची दुहेरी बंडी व गुढघेचोळणा असून पायांत सातारी नकटा जुना जोडा होता. खांद्यावर जोट, त्यावर

१. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 280, 81, 82, 83, 85 and 86.

खारवी बट्वा टाकला असून, एकंदर सर्व कपड्यांवर शिमग्यांतील रंगाचे पिवळे तांबूस शितोडे पडलेले होते. पायांच्या टांचा जाड व मजबूत होत्या खऱ्या, परंतु कांहीं कांहीं ठिकाणीं उकलून भेगा पडल्यामुळें थोडासा कुलपत चालत होता. हाताच्या कांबी रुंद असून, छाता पसरट होता. चोटीशिवाय भवूक दाढीमिशा ठेवल्यामुळें वरील दोन दोन फाळ्या दातांचा आयत्र झांकून गेला होता. डोळे व कपाळ विशाळ असून आंतील बुबूळ गारोळें भोऱ्या रंगाचें होतें. शरीराचा रंग गोरा असून एकंदर सर्व चेहरामोहरा ठीक बेताचा होता. परंतु थोडासा वाटोळा होता. सुमारें बारावर दोन वाजल्यावर घरीं पोंहोचल्यावर जेवण झाल्यानंतर थोडासा आराम करण्याचे इराद्यानें माजघराचे खोलींत जाऊन तेथें वळणीवरील बुरणूस घेऊन त्यानें जमिनीवर अंथरला आणि त्यावर उशाखालीं बोंगडीची वळकटी घेऊन तोंडावर अंगवस्त्र टाकून निजला. परंतु सकाळीं उठून कलेक्टरसाहेबांची गांठ घेतली व ते आपल्या चहापाण्याच्या व खाण्यापिण्याच्या नादांत गुंग असल्यामुळें, त्यांच्यानें माझी खरी हकीकत ऐकून घेऊन, त्याजपासून मला हप्ता पुढें देण्याविषयीं मुदत मिळाली नाहीं. या काळजीनें त्यास झोंप येईना. तेव्हां त्यानें उताणें पडून आपले दोन्ही हात उरावर ठेवून आपण आपल्याच मनाशीं बावचळल्यासारखें बोलूं लागला—

"इतर गांवकऱ्यांसारखा मी पैमाष करणाऱ्या भटकामगारांची मूठ गार केली नाहीं, यास्तव त्यांनीं टोपीवाल्यास सांगून मजवर शेतसारा दुपटीचे वर वाढविला व त्याच वर्षी पाऊस अळम टळम पडल्यामुळें एकंदर सर्व माझ्या शेत व बागाइती पिकास धक्का बसला, इतक्यांत बाप वारला. व त्याच्या दिवसमासाला बराच खर्च झाला, यामुळें पहिले वर्षी शेतसारा वारण्यापुरतें कर्ज ब्राह्मण सावकारापासून काढून त्यास मळा गहाण देऊन रजिस्टर करून दिला. पुढें त्यानें मन मानेल तसें, मुद्दल कर्जावरील व्याजाचे कच्च्यांचे बच्चे करून माझा बारवेचा मळा आपल्या घशांत सोडला. ज्या सावकाराच्या आईचा भाऊ रेव्हेन्यूसाहेबांचा दफ्तरदार, चुलता कलेक्टरसाहेबांचा चिटणीस, थोरल्या बहिणीचा नवरा मुनसफ आणि बायकोचा बाप या तालुक्याचा फौजदार, याशिवाय एकंदर सर्व सरकारी कचेऱ्यांत त्यांचे जातवाले ब्राह्मणकामगार, अशा सावकाराबरोबर वाद घातला असता, तर त्याच्या सर्व ब्राह्मण आप्तकामगारांनीं हस्तेंपरहस्तें भलत्या एखाद्या क्षुल्लक कारणावरून माझा सर्व उन्हाळा केला असता. त्याचप्रमाणें दुसरे वर्षी घरांतील बायकामुलांच्या अंगावरील किडुकमिडूक शेतसाऱ्याचे भरीस घालून नंतर पुढें दरवर्षी शेतसारा अदा करण्याकरितां गांवांतील गुजर-मारवाडी सावकारांपासून कर्जाऊ रकमा काढिल्या आहेत, त्यांतून कित्येकांनीं हल्लीं मजवर फिर्यादी ठोकल्या आहेत व ते कज्जे कित्येक वर्षांपासून कोडतांत लोळत पडले आहेत. त्याबद्दल म्यां कधीं कधीं कामगार व वकिलांचे पदरीं आवळण्याकरितां मोठमोठाल्या रकमा देऊन, कारकून, चपराशी, लेखक व साक्षीदार यांस भत्ते भरून

चिऱ्यामिऱ्या देतां देतां माझ्या नाकास नळ आले आहेत. त्यांतून लांच न खाणारे सरकारी कामगार कोठें कोठें सांपडतात. परंतु लांच खाणाऱ्या कामगारांपेक्षां, न लांच खाणारे कामगार फारच निकामी असतात. कारण ते बेपर्वा असल्यामुळें त्यांजवळ गरीब शेतकऱ्यांची दाद्च लागत नाहीं व त्यांच्या पुढें पुढें करून जिवलग गड्याचा भाव दाखविणारे हुषार मतलबी वकील, त्यांच्या नांवानें आम्हां दुबळ्या शेतकऱ्यांजवळून कुत्र्यासारखे, लांचांचे मागें लांचांचे लचके तोडून खातात. आणि तसें न करावें तर सावकार सांगतील, त्याप्रमाणें आपल्या बोडक्यांवर त्यांचे हुकुमनामे करून घ्यावेत. यावरून कोणी सावकार आतां मला आपल्या दारापाशीं उभे करीत नाहींत! तेव्हां गतवर्षी लग्न झालेल्या माझ्या थोरल्या मुलीच्या अंगावरील सर्व दागिने व पितांबर मारवाड्याचे घरीं गहाण टाकून पट्टीचे हप्ते वारले. त्यामुळें तिचा सासरा त्या बिचारीस आपल्या घरीं नेऊन नांदवीत नाहीं. अरे, मी या अभागी दुष्टानें माझ्यावरील अरिष्ट टाळण्याकरितां माझ्या सगुणाचा गळा कापून तिच्या नांदण्याचें चांदणें केलें! आतां मी हल्लीं सालचा शेतसारा द्यावा तरी कोठून? बागाइतांत नवीन मोटा विकत घेण्याकरितां जवळ पैसा नाहीं. जुन्या तर अगदीं फाटून त्यांची चाळण झाली आहे. त्यामुळें उंसाचें बाळगें मोडून हुंडीचीहि तीच अवस्था झाली आहे. मकाही खुरपणीवांचून वायां गेली. भूस सरून बरेच दिवस झाले. आणि सरभड गवत, कडब्याच्या गंजी संपत आल्या आहेत. जनावरांचा पोटभर चारा मिळत नसल्यामुळें कित्येक धट्टेकट्टे बैल उठवणीस आले आहेत. सुनाबाळांचीं नेसण्याचीं लुगडीं फाटून चिंध्या झाल्यामुळें लग्नांत घेतलेलीं मौल्यवान जुनीं पांघरुणें वापरून त्या दिवस काढीत आहेत. शेतीं खपणारीं मुलें वस्त्रावांचून इतकीं उघडींबंब झालीं आहेत कीं, त्यांना चारचौघांत येण्यास शरम वाटते. घरांतील धान्य सरत आल्यामुळें राताळ्याच्या वरुवर निर्वाह चालू आहे. घरांत माझ्या जन्म देणाऱ्या आईच्या मरतेवेळीं तिला चांगलें चुंगलें गोड धोड करून घालण्यापुरता मजजवळ पैसा नाहीं, याला उपाय तरी मीं काय करावा? बैल विकून जर शेतसारा द्यावा, तर पुढें शेतकी कोणाच्या जीवावर ओढावी? व्यापारधंदा करावा, तर मला लिहितां वाचतां मुळींच येत नाहीं. आपला देश त्याग करून जर परदेशांत जावें, तर मला पोट भरण्यापुरता कांहीं हुन्नर ठाऊक नाहीं. कण्हेरीच्या मुळ्या मीं वाटून प्याल्यास कर्तीधर्ती मुलें आपलीं कशीतरी पोटें भरतील. परंतु माझ्या जन्म देणाऱ्या वृद्ध बयेस व बायकोसह माझ्या लहानसहान चिटकुल्या लेकरांस अशा वेळीं कोण सांभाळील? त्यांनीं कोणाच्या दारांत उभें रहावें? त्यांनीं कोणापाशीं आपलें तोंड पसरावें?"

म्हणून अखेरीस मोठा उसासा टाकून रडतां रडतां झोपीं गेला. नंतर मी डोळे पुशीत घराबाहेर येऊन पहातों तों त्याचें घर एक मजला कौलारू आहे. घराचे पुढचे बाजूस घराल्गत आढेमेढी टाकून बैल बांधण्याकरितां छपराचा गोठा केला आहे.

त्यांत दोनतीन उठवणीस आलेले बैल रवंथ करीत बसले आहेत. व एक बाजूला खंडी सवा खंडीच्या दोनतीन रिकाम्या कणगी कोपऱ्यांत पडल्या आहेत. बाहेर आंगणांत उजवे बाजूस एक आठ बैली जुना गाडा उभा केला आहे. त्यावर मोडकळीस आलेला तुराठ्यांचा कुरकुल पडला आहे. डावे बाजूस एक मोठा चौरस ओटा करून त्यावर एक तुळशीवृंदावन बांधलें आहे व त्यालगत खापरी रांजणाच्या पाणईचा ओटा बांधला आहे. त्यावर पाण्यानें भरलेले दोनतीन मातीचे डेरे व घागरी ठेविल्या आहेत. पाणईशेजारीं तीन बाजूला छोट दिवालीं बांधून त्यांचे आंत आबडधोबड फरशा टाकून एक लहानशी न्हाणी केली आहे. तिच्या मोरीवाटे वाहून गेलेल्या पाण्याचें बाहेरचे बाजूस लहानसें डबकें सांचलें आहे, त्यामध्यें किड्यांची बुचबुच झाली आहे. त्याचे पलीकडे पांढऱ्या चाफ्याखालीं, उघडीं नागडीं सर्व अंगावर पाण्याचे ओघळाचे डाग पडलेले असून; खर्जुलीं, डोक्यांत खवडे, नाकाखालीं शेंबडाच्या नाळी पडून घामट अशा मुलांचा जमाव जमला आहे. त्यांतून कितीएक मुलें आपल्या तळहातावर चिखलाचे डोले घेऊन दुसऱ्या हातांनीं ऊर बडवून "हायदोस, हायदोस" शब्दांचा घोष करून नाचत आहेत; कोणी दारूपिठ्याचें दुकान घालून कलालीन होऊन पायांत बाभळीच्या शेंगांचे तोडे घालून दुकानदारीण होऊन बसली आहे. तिला कित्येक मुलें चिंचोक्याचे पैसे देऊन पाळीपाळीनें लटकी पाण्याची दारू प्याल्यावर तिच्या अमलामध्यें एकमेकांच्या अंगावर होलपडून पडण्याचें हुबहूब सोंग आणीत आहेत. त्याचप्रमाणें घराचे पिछाडीस घरालगत आढे–मेढी टाकून छपरी गोठा केला आहे. त्यांत सकाळीं व्यालेली हैस, दोनतीन वासरें, एक नाळपडी घोडी बांधली आहे. भिंतीवर जिकडे तिकडे कोण्याकोपऱ्यांनीं घागरीं, तांबडीं गोचिडें चिकटलीं आहेत. छपराच्या वळचणीला वेणीफणी करितांना निघालेले केसांचे बुचके जागोजाग कोंबले आहेत. त्यालगत बाहेर परसांत एके बाजूस कोंबड्यांचें खुराडें केलें आहे. त्याशेजारीं एकदोन कैकाडी झांप पडलेले आहेत, व दुसरे बाजूस हातपात धुण्याकरितां व खरकटीं मडकींभांडीं घासण्याकरितां गडगळ दगड बसवून एक उघडी न्हाणी केली आहे. तिच्या खुल्या दरजांनीं जागोजाग खरकटें जमा झाल्यामुळें त्यांवर माशा घोंघों करीत आहेत. पलीकडे एका बजूला शेणखई केली आहे. त्यांत पोरासोरांनीं विष्ठा केल्यामुळें चहूंकडे हिरव्या माशा भणभण करीत आहेत. शेजारीं पलीकडे एका कोपऱ्यांत सरभड गवत व कडब्यांच्या गंजी संपून त्यांच्या जागीं त्या त्या वैरणींच्या पाचोळ्यांचे लहानमोठे ढीग पडले आहेत. दुसऱ्या कोपऱ्यांत गोवऱ्यांचा कलवड रचिला आहे, त्याचे शेजारीं बाभळीच्या झाडाखालीं मोडक्या औतांचा ढीग पडला आहे, त्याच्या खालीं विलायती धोतरे उगवले आहेत, त्यामध्यें नुकतीच व्यालेली झिपरी कुत्री आल्यागेल्यावर गुरगुर करीत पडली आहे. शेजारीं गव्हाणींतील चघळचिपाटांचा ढीग पडला आहे. बाकी उरलेल्या एकंदर सर्व परसांत एक तरुण बाई घराकडे पाठ करून गोवऱ्या लावीत आहे. तिचे दोन्ही पाय शेण तुडवून

तुडवून गुढग्यापावेतों भरले होते. पुढें एकंदर सर्व माजघरांत उंच खोल जमीन असून येथें पहावें, तर दळण पाखडल्याचा बैचा पडला आहे; तेथें पहावें, तर निसलेल्या भाजाच्या काड्या पडल्या आहेत. येथें खाल्लेल्या गोंधणीच्या बिया पडल्या आहेत, तेथें कुजक्या कांद्यांचा ढीग पडला आहे, त्यांतून एक तऱ्हेची उबट घाण चालली आहे. मध्यें खुल्या जमिनीवर एक जख्ख झालेली म्हातारी खालींवर पासोडी घालून कण्हत पडली होती. तिच्या उशाशीं थोड्याशा साळीच्या लाह्या व पितळीखालीं वाटींत वरणाच्या निवळींत जोंधळ्याची भाकर बारीक कुसकरून केलेला काला व पाणी भरून ठेवलेला तांब्या होता. शेजारीं पाळण्यांत तान्हें मूल टाहो फोडून रडत पडलें आहे. याशिवाय कोठें मुलाच्या मुताचा काळा ओघळ गेला आहे. कोठें पोराचा गू काढल्यामुळें लहानसा राखेचा पांढरा टवका पडला आहे. घरांतील कित्येक कोनेकोपरे चुनातंबाखू खाणाऱ्यांनीं पिचकाऱ्या मारून तांबडेलाल केले आहेत, एका कोपऱ्यांत तिघीचौघींचें भलें मोठें जातें रोविलें आहे. दुसऱ्या कोपऱ्यांत उखळाशेजारीं मुसळ उभें केलें आहे, आणि दाराजवळील कोंपऱ्यांत केरसुणीखालीं झाडून लावलेल्या कचऱ्याचा ढीग सांचला आहे; ज्यावर पोरांची गांड पुसलेली चिंधी लोळत पडली आहे. इकडे चुलीच्या भाणुशीवर खरकटा तवा उभा केला आहे, आवलावर दुधाचें खरकटें मडकें वोंगत पडलें आहे. खालीं चुलीच्या आळ्यांत एके बाजूला राखेचा ढीग जमला आहे, त्यामध्यें मनीमांजरीनें विष्ठा करवून तिचा मागमुद्दा नाहींसा केला आहे. चहूंकडे भिंतीवर ढेकूणपिसा मारल्याचे तांबूस रंगाचे पुसट डाग पडले आहेत. त्यांतून कोठें पोरांचा शेंबूड व कोठें तपकिरीच्या शेंबडाचें बोट पुसलें आहे. एका देवळींत आंतले बाजूस खात्या तेलाचें गाडगें, खोबरेल तेलाचें मातीचें बुटकुलें, दांतवणाची कळी, शिंगटाची फणी, तखलादी आरशी, काजळाची डबी आणि कुंकाचा करंडा एके शेजेनीं मांडून ठेविले आहेत. व बाहेरच्या बाजूस देवळीच्या किनाऱ्यावर रात्रीं दिवा लावण्याकरितां एकावर एक तीनचार दगडांचे दिवे रचून उतरंड केली आहे. त्यांतून पाझरलेल्या तेलाचा ओघळ खालीं जमिनीपावेतों पसरला आहे. त्या सर्वांचें वर्षांतून एकदां आषाढ वद्य अमावस्येस कीट निघावयाचें. दुसरे देवळींत पिठाचे टोपल्याशेजारीं खालीं डाळीचा कणूरा व शिळ्या भाकरीचे तुकडे पडले आहेत. तिसऱ्या देवळींत भाकरीच्या टोपल्याशेजारीं थोड्या हिरव्या मिरच्या, लसूण, कोथिंबीर, दुधाची शिंप व आंब्याच्या करंड्या पडल्या आहेत, ज्यावर माशा व चिलटें बसून एकीकडून खातात व दुसरीकडून त्यांजवर विष्ठा करीत आहेत. आणि चौथ्या देवळींत सांधलेल्या जुन्या वाहाणांचा व जोड्यांचा गंज पडला आहे. शेजारीं चकमकीचा सोकटा व गारेचे तुकडे पडले आहेत. एका खुंटीवर अंथरावयाच्या जुन्या जीर्ण झालेल्या घोंगड्या व चवाळीं ठेविलीं आहेत. दुसरीवर पांघरावयाच्या गोधड्या व पासोड्या ठेविल्या आहेत. व तिसरीवर फाटके मांडचोळणे व बंड्या ठेविल्या आहेत. नंतर माजघराचे खोलींत जाऊन पहातों, तों

जागोजाग मधल्या भिंतीला लहानमोठ्या भंडाऱ्या आहेत. त्यांतून एका भंडारीस मात्र साधें गांवठी कुलूप घातलें होतें. येथेंही जागोजाग खुंट्यांवर पांघरुणांचीं बोचकीं व सुनाबाळांचे झोळणे टांगले आहेत. एका खुंटीला घोडीचा लगाम, खोगीर, वळी, व रिकामी तेलाची बुधली टांगली आहे. दुसरीला तेलाचा नळा टांगला आहे. शेवटीं एका बाजूला भिंतीशीं लागून डेऱ्यावर डेरे व मडकीं रचून पांच उतरंडी एके शेजेनीं मांडल्या आहेत. शेजारीं तुळईला दोन मोळाचीं शिंकीं टांगलीं आहेत. त्यावर विरजणाचें व तुपाचें गाडगें झांकून ठेविलें आहे. अलीकडे भला मोठा एक कच्च्या विटांचा देव्हारा केला आहे. त्याच्या खालच्या कोनाड्यांत लोखंडी कुऱ्हाडी, विळे आणि विळी पडली आहे. वरतीं लहानसें खारवी वस्त्र अंथरून त्यावर रुप्याचे कुळस्वामीचे टांक एके शेजेनीं मांडले आहेत. त्यांच्या एके बाजूस दिवटी बुधली उभी केली आहे. व दुसरे बाजूस दोम दोम शादावलाची झोळी, फावडी उभी केली आहे. वरती मंडपिला उदाची पिशवी टांगली आहे. खालीं बुरणुसावर शेतकऱ्यास गाढ झोंप लागून घोरत पडला आहे. एका कोपऱ्यांत जुनी बंदुकीची नळी व फाटक्या जेनासहित गादीची वळकुटी उभी केली आहे. दुसऱ्या कोपऱ्यांत नांगराचा फाळ, कुळवाच्या फाशी, कोळप्याच्या गोल्ह्या, तुरीची गोधी, व उलटी करून उभी केलेली ताक घुसळण्याची रवी आणि तिसऱ्या कोपऱ्यांत लवंगी काठी व पहार उभी केली आहे. सुमारें दोनतीन खणांत तुळ्यांवर वकाण व शेराचे सरळ नीट वांसे बसवून त्यावर आडव्यातिडव्या चिंचेच्या फोकाट्यांच्या पटईवर चिखलमातीचा पेंड घालून मजबूत माळा केला आहे. ज्यावर राळा, राजगिरा, हुलगा, वाटाणा, पावटा, तीळ, चवळी वगैरे अनेक भाजीपाल्यांचें बीं जागोजाग डेऱ्यांतून व गाडग्यांतून भरून ठेविलें आहे. वरतीं कांभिऱ्याला बियाकरितां मक्याच्या कणसांची माळ लटकत असून पाखाडीला एके ठिकाणीं चारपांच वाळलेले दोडके टांगले आहेत. दुसऱ्या ठिकणीं दुधाभोपळा टांगला असून तिसऱ्या ठिकाणीं शिंक्यावर काशीफळ भोपळा ठेविला आहे. चवथ्या ठिकाणीं नळयासुद्धां चाडें व पाभारीची वसू टांगली असून, कित्येक ठिकाणीं चिंध्याचांध्यांचीं बोचकी कोंबलीं आहेत. मध्यें एका कांभिऱ्याला बाशिंगें बांधलीं आहेत. वरतीं पहावें, तर कौलांचा शेकार करण्यास तीनचार वर्षें फुरसत झाली नाहीं व त्याचे खालचें तुराट्याचें ओमण जागोजाग कुजल्यामुळें गतवर्षीं चिपाडानें सांधलें होतें, म्हणून त्यांतून कोठकोठें उंदरांनीं बिळें पाडलीं आहेत. एकंदर सर्व घरांत स्वच्छ हवा येण्याकरितां खिडकी अथवा सवाना मुळींच कोठें ठेविला नाहीं. तुळया, कांभिरें, ओमणासहित वांशांवर धुराचा डांबरी काळा रंग चढला आहे. बाकी एकंदर सर्व रिकाम्या जागेंत कांतिणीनीं मोठ्या चातुर्यानें, अति सुकुमार तंतूंनीं गुंफलेलीं मच्छरदाणीवजा आपलीं जाळीं पसरलीं आहेत, ज्यांवर हजारों कांतिणीचीं पिलें आपली खेळकसरत करीत आहेत. ओमण, वांसे, तुळयांवर जिकडे तिकडे मेलेल्या घुल्यांचीं व कांतिणीचीं विषारी टरफलें चिकटलीं आहेत, त्यांतून तुळया वगैरे लांकडाच्या

ठेवणीवर कित्येक ठिकाणीं उंदीर व झुरळांच्या विषारी लेंड्यांनीं मिश्र झालेल्या धुळीचे लहानलहान ढीग जमले आहेत, फुरसत नसल्यामुळें जेथें चारपांच वर्षांतून एकदांसुद्धां केरसुणी अथवा खराटा फिरविला नाहीं. इतक्यांत उन्हाळा असल्यामुळें फार तलखी होऊन वळवाचा फटकारा येण्याचे पूर्वी वादळाचे गर्दीमध्यें वाऱ्याचे सपाट्यानें कौलांच्या सावटीतून सर्व घरभर धुळीची गर्दी झाली, तेव्हां तोंड वासून घोरत पडलेल्या कुणब्याच्या नाकातोंडांत विषारी धूळ गेल्याबरोबर त्यास ठसका लागून, तो एकाएकीं दचकून जागा झाला. पुढें त्या विषारी खोकल्याच्या ठसक्यानें त्याला इतकें बेजार केलें कीं, अखेरीस थोडासा बेशुद्ध होऊन तो मोठमोठ्यानें विवळून कण्हूं लागला. त्यावरून त्याच्या दुखणायीत म्हातारे आईनें माजघरांतून धडपडत त्याच्याजवळ येऊन त्याचे मानेखालीं खोगराची वळी घातल्यानंतर त्याच्या हनवटीला हात लावून, तोंडाकडे न्याहाळून रडतां रडतां म्हणाली, "अरे भगवंतराया, मजकडे डोळे उघडून पहा. रामभटाच्या सांगण्यावरून तुला साडेसातीच्या शनीनें पीडा करूं नये, म्हणून म्यां, तुला चोरून, कणगींतले पळोगणती दाणे नकळ्या गुजरास विकून अनेक वेळां मारुतीपुढें ब्राह्मण जपास बसवून सवाष्ण ब्राह्मणांच्या पंक्तीच्या पंक्ती कि रे उठविल्या! कित्येक वेळीं, बाळा, तुला चोरून परभारा, गणभटाचे घरीं सत्यनारायणाला प्रसन्न करण्यानिमित्त ब्राह्मणांचे सुखसोहळे पुरविण्याकरितां पैसे खर्च केले आणि त्या मेल्या सत्यनारायणाची किरडी पाजळली. त्यानें आज सकाळीं कलेक्टरसाहेबाचे मुखीं उभें राहून तुला त्याजकडून सोयीसोयीनें पट्टी देण्याविषयीं मुदत कशी देवविली नाहीं? अरे मेल्या ठकभटानों, तुमचा डोला मिरविला. तुह्मी नेहमीं मला शनि व सत्यनारायणाच्या थापा देऊन मजपासून तूपपोळ्यांचीं भोजनें व दक्षिणा उपटल्या. अरे, तुह्मी मला माझ्या एकुलत्या एक भगवंतरायाच्या जन्मापासून आजदिनपावेतों नवग्रह वगैरेंचे धाक दाखवून शेंकडों रुपयांस बुडवून खाल्लें. आतां तुमचें तें सर्व पुण्य कोठें गेलें? अरे, तुम्ही मला धर्ममिषें इतकें ठकविलें कीं, तेवढ्या पैशांत मी अशा प्रसंगीं माझ्या बच्याच्या कित्येक वेळां पट्ट्या वारून, माझ्या भगवंतरायाचा गळा मोकळा करून त्यास सुखी केलें असतें! अरे, तुमच्यांतीलच राघूभरारीनें प्रथम इंग्रजांस उलटे दोन आणे लिहून देऊन त्यास तळेगांवास आणिलें. तुम्हीच या गोरे गैर माहितगार साहेबलोकांस लांड्यालबाड्या सांगून, आम्हां माळ्याकुणब्यांस भिकारी केलें आणि तुम्हीच आतां, आपल्या अंगांत एकीचें सोंग आणून इंग्रज लोकांचे नांवानें मनगटें तोडीत फिरतां. इतकेंच नव्हे, परंतु हल्लीं माळी कुणबी जसजसे भिकारी होत चालले, तसतसे तुम्हांस त्यांना पाहिल्यासारखें फसवून खातां येईना, म्हणून तुम्ही ब्राह्मण, टोपीवाल्यास बाटवून, पायांत बूट-पाटलोन व डोईवर सुतक्यासारखे पांढरे रुमाल लावून, चोखामेळ्यापैकीं झालेल्या खिस्त भाविकांच्या गोऱ्यागोमट्या तरुण मुलींबरोबर लग्नें लावून, भर चावडीपुढें उभे राहून माळ्याकुणब्यांस सांगत फिरतां कीं,—"आमच्या ब्राह्मण पूर्वजांनीं जेवढे म्हणून ग्रंथ

केले आहेत, ते सर्व मतलबी असून बनावट आहेत. त्यांत त्यांनीं उपस्थित केलेल्या धातूंच्या किंवा दगडांच्या मूर्तींत कांहीं अर्थ नाहीं. हें सर्व त्यांनीं आपल्या पोटासाठीं पाखंड उभें केलें आहे. त्यांनीं नुकताच पलटणींतील परदेशी लोकांत सत्यनारायण उपस्थित करून, आतां इकडे तुम्हां सर्व अज्ञानी भोळ्या भाविक माळ्याकुणब्यांत नाचवूं लागले आहेत. ही त्यांची ठकबाजी तुम्हांस कोठून कळणार? यास्तव तुम्ही या गफलति ब्राह्मणांचें ऐकून धातूच्या व दगडांच्या देवाच्या पूजा करूं नका. तुम्ही सत्यनारायण करण्याकरितां कर्जबाजरी होऊन ब्राह्मणाचे नादीं लागूं नका. तुम्ही निराकार परमात्म्याचा शोध करा, म्हणजे तुमचें तारण होईल." असो, परंतु तुम्ही आम्हा या भित्र्या माळ्याकुणब्यांस उपदेश करीत फिरण्यापेक्षां प्रथम आपल्या जातबांधवांचे आळ्यांनीं जाऊन त्यांस सांगावें कीं, "तुम्ही आपल्या सर्व बनावट पोथ्या जाळून टाका. माळी, कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांस खोटे उपदेश करून आपलीं पोटें जाळूं नका." असा त्यांस वारंवार उपदेश करून त्यांजकडून तसें आचरण करवूं लागल्याबरोबर शेतकऱ्यांची सहज खात्री होणार आहे. दुसरें असें कीं, आम्ही जर तुम्हां पाद्या ब्राह्मणांचें ऐकून आचरण करावें, तर तुमचेच जातवाले सरकारी कामगार येथील गोऱ्या कामगारांच्या नजरा चुकावून भलत्यासलत्या सबबी कटवून आम्हा शेतकऱ्यांच्या मुलांबाळांची दशा करून सोडतील.—इतक्यांत शेतकरी शुद्धीवर येतांच आपल्या मातुश्रीच्या गळ्यास मिठी घालून रडूं लागला.

आतां बाकी उरलेले एकंदर सर्व कंगाल, दीनदुबळे, रात्रंदिवस शेतीं खपून कष्ट करणारे, निव्वळ अज्ञानी, माळी, कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांच्या हल्लींच्या स्थिती-विषयीं थोडेसें वर्णन करितों, तिकडेस सर्वांनीं कृपा करून लक्ष पुरविल्यास त्यांजवर मोठे उपकार होतील. बांधवहो, तुम्ही नेहमीं स्वतः शोध करून पाहिल्यास तुमची सहज खात्री होईल कीं, एकंदर सर्व लहानमोठ्या खेड्यापाड्यांसहित वाड्यांनीं शेतकऱ्यांचीं घरें, दोन तीन अथवा चार खणांची कवलारू अथवा छपरी असावयाचीं. प्रत्येक घरांत चुलीच्या कोपऱ्यांत लोखंडी उलथणें अथवा खुरपें, लांकडी काथवट व फुंकणी, भाणुशीवर तवा, दुधाचें मडकें व खालीं आळ्यांत रांधणाच्या खापरी तवल्या, शेजारीं कोपऱ्यांत एखादा तांब्याचा हंडा, परात, काशाचा थाळा, पितळी, चरवी अथवा वाटी, नसल्यास जुन्या गळक्या तांब्याशेजारीं मातीचा मोखा, परळ व जोगल्या असावयाच्या. त्यालगत चारपांच डेऱ्यामडक्यांच्या उतरंडी ज्यांत थोडे थोडे साठप्याला खपले, हुलगे, मटकी, तुरीचा कणुरा, शेवया, भुईमुगाच्या शेंगा, भाजलेला हुळा, गव्हाच्या ओंब्या, सांडगे, बिवड्या, मीठ, हळकुंडें, धने, मिरीं, जिरें, बोजवार, हिरव्या मिरच्या, कांदे, चिंचेचा गोळा, लसूण, कोथिंबीर असावयाची. त्याचेलगत खालीं जमिनीवर काल संध्याकाळीं, गोडबोल्या भट पेनशनर सावकाराकडून, वाढीदिढीनें जुने जोंधळे आणलेले, तुराट्यांच्या पाट्या भरून त्या भिंतीशीं लावून एकावर एक रचून ठेवलेल्या

असावयाच्या. एके बाजूला वळणीवर गोधड्या, घोंगड्यांचीं पटकुरें व जुन्यापान्या लुगड्यांचे धड तुकडे आडवेउभे दंड घालून नेसण्याकरितां तयार केलेलें धडपे, भिंतीवर एक लांकडाची मेख ठोकून तिजवर टांगलेल्या चिंध्याचांध्याच्या बोचक्यावर मुसकट व गोंवऱ्या वहावयाचीं जाळीं, दिव्याच्या कोनाड्यांत तेलाच्या गाडग्याशेजारीं फणी व कुंकाचा करंडा, वरतीं माळ्यावर गोंवऱ्या व तीनधारी निवडुंगाचे सरपणा-शेजारीं वैरण नीट रचून ठेविली असावयाची. खालीं जमिनीवर कोन्याकोपऱ्यांनीं कुदळ, कुऱ्हाड, खुरपें, कुळवाची फास, कोळप्याच्या गोल्ह्या, जातें, उखळ, मुसळ व केरसुणीशेजारीं थुंकावयाचें गाडगें असावयाचें. दरवाज्याबाहेर डावे बाजूला खापरी रांजणाच्या पाणईवर पाणी वहावयाचा डेरा व घागर असून पलीकडे गडगळ दगडाची उघडी न्हाणी असावयाची. उजवे बाजूला बैल वगैरे जनावरें बांधण्याकरितां आढेमेढी टाकून छपरी गोठा केलेला असावयाचा. घरातील सर्व कामकाजांचा चेंधा उपसून पुरुषांच्या पायांवर पाय देऊन दिवसभर शेतीं काम उरकूं लागणाऱ्या बायकोच्या अंगावर सुताडी घोटा बांड व चोळी, हातांत रुप्याचे पोकळ गोठ व ते न मिळाल्यास कथलाचे गोठ नि गळ्यांत मासा सवा मासा सोन्याचें मंगळसूत्र, पायाच्या बोटांत चटचट वाजणारीं काशाचीं जोडवीं, तोंडभर दांतवण, डोळेभर काजळ आणि कपाळभर कुंकू, याशिवाय दुसऱ्या शृंगाराचे नांवानें आंवळ्याएवढें पूज्य. उघडीं नागडीं असून अनवाणी सर्व दिवसभर गुराढोरांच्या वळत्या करीत फिरणाऱ्या मुलांच्या एका हातांत रुप्याचीं कडीं करून घालण्याची ऐपत नसल्यामुळें त्यांच्याऐवजीं दोन्ही हातांत कथलाचीं कडीं व उजव्या कानांत पितळेच्या तारेंत खरड्यांच्या बाळ्या. याशिवाय अंगावर दुसऱ्या अलंकाराचे नांवानें शिमगा. हिंवावाऱ्यांत व उन्हातान्हांत रात्रंदिवस शेतीं खपणाऱ्या शेतकऱ्याचे कंबरेला लुगड्यांचे दशांचा करगोटा, खादीची लंगोटी, टोपीवर फाटकेसें पागोटें, अंगावर साधे पंचे न मिळाल्यास घोंगडी व पायांत ठिगळें दिलेला अथवा दोरीनें आवळलेल्या जोड्यांशिवाय बाकी सर्व अंग सळसळीत उघडेंबंब असल्यामुळें, त्याच्यानें अतिशय थंडीपावसाळ्यांत हंगामशीर शेतीं मेहनत करवत नाहीं. त्यांतून तो अक्षरशून्य असून त्यास सारासार विचार करण्याची बिलकुल ताकद नसल्यामुळें तो धूर्त भटांच्या उपदेशावरून हरीविजय वगैरे निरर्थक ग्रंथांतील भाकडकथेवर विश्वास ठेवून पंढरपूर वगैरे यात्रा, कृष्ण व रामजन्म व सत्यनारायण करून अखेरीस रमूजीकरितां शिमग्यांत रात्रंदिवस ++ मारतां मारतां नाच्यापोऱ्याचे तमाशे ऐकण्यामध्यें आपला वेळ थोडा का निरर्थक घालवितो ! त्यास मुळापासून विद्या शिकण्याची गोडी नाहीं व तो निवळ अज्ञानी असल्यामुळें त्यास विद्येपासून काय काय फायदे[१] होतात, हें शेतकऱ्याच्या प्रत्ययास आणून देण्याचेऐवजीं शेतकऱ्यांनीं नेहमीं गुलामासारखें त्याच्या

१. A Sepoy Revolt, by Henry Mead, page 293.

तावडींत रहावें या इराद्यानें शेतकऱ्यांस विद्या देण्याची कडेकोट बंदी केली होती. तशी जरी दुष्टबुद्धी आमचें हल्लींचें सरकार दाखवीत नाहींत; तरी त्यांच्या बाहेरील एकंदर सर्व वर्तणुकीवरून असें सिद्ध करितां येईल कीं, शेतकऱ्यांस विद्वान करण्या करितां विद्याखात्याकडील सरकारी कामगारांचे मनांतून खरा कळवळा नाहीं. कारण आज दीनतागाईत विद्या देण्याच्या निमित्तानें सरकारनें लोकलफंड द्वारें शेतकऱ्यांचे लक्षावधी रुपये आपल्या वशांत सोडले असून, त्या ऐवजाच्या मानाप्रमाणें आजपावेतों त्यांच्यानें शेतकऱ्यांपैकीं एकालासुद्धां कलेक्टरची जागा चालविण्यापुरती विद्या देण्यांत आली नाहीं. कारण खेड्यापाड्यांतील एकंदर सर्व शाळांनीं भट ब्राह्मण[1] शिक्षकांचा भरणा, ज्यांची किंमत चिखलमातीचा धंदा करणाऱ्या वेल्दारकुंभारांपेक्षां कमी, ज्यांस शेतकऱ्यांच्या नांगरांच्या मुठी कोणीकडून धरावयाच्या, याविषयीं बिलकुल माहिती नसून तोंडपाटिल्की मात्र करणारे आयदी, शेतकऱ्यांचे जिवावर लालपडून आपल्या अंगीं, आम्ही सर्व मानव प्राण्यांत श्रेष्ठ, म्हणून गर्वाचा ताठा मिरवणाऱ्या मगरूर शिक्षकांकडून त्यांच्या पूर्वजांनीं सर्वोपरी नीच केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांस शिस्तवार व सोईची विद्या देववेल तरी कशी ? कोठें जेव्हां त्यांस शहरगांवीं चाकऱ्या मिळण्याचें त्राण उरत नाहीं, तेव्हां ते विद्याखात्यांतील ब्राह्मण कामगारांचे अर्ज करून खेड्यापाड्यांनीं पंतोजीच्या चाकऱ्या करून कशी तरी आपलीं पोटें जाळितात. परंतु कित्येक शेतकऱ्यांचा, खेड्यापाड्यांनीं शेतावर गुजारा न झाल्यामुळें ते तेथें उपाशी न मरतां परागंदा होऊन मोठमोठ्या शहरांनीं पाहिजेल त्या मोलमजुऱ्या करून पोटें भरीत असतां, त्यांतून फारच थोड्या शेतकऱ्यांचीं मुलें कांहीं अंशीं नांवाला मात्र विद्वान झालीं आहेत. तथापि एकंदर सर्व सरकारी खात्यांनीं ब्राह्मण विद्वानांचा युरोपियन गोऱ्या कामगारांवर पगडा पडल्यामुळें हीं शेतकऱ्यांची साडेसात तुटपुंजीं विद्वान मुलें, आपल्या इतर अज्ञानी शेतकरी जातबांधवांचा सत्यानाश सरकारी ब्राह्मण कामगार कसा करितात, तो सर्व बाहेर उघडकीस आणून सरकारचे कानावर घालण्याविषयीं आपल्या गच्च दांतखिळी बसवून, उलटें ब्राह्मणांचे जिवलग शाळूसोबती बनून त्यांनीं उपस्थित केलेल्या सभांनीं त्यांबरोबर सरकारच्या नांवानें निरर्थक शिमगा करूं लागतात. अशीं सोंगें जर ब्राह्मणांबरोबर न आणावीं, तर ते लोक आपल्या पुस्तकांसह वर्तमानपत्रांनीं यांच्याविषयीं भलत्यासलत्या नालस्त्या छापून यांजवर कोणत्या वेळीं काय आग पाखडतील व याशिवाय, मामलेदार, शिरस्तेदार, माजिस्ट्रेट, इंजिनीयर, डाक्टर, न्यायाधीश वगैरे ब्राह्मण कामगार असून अखेरीस सरकारी रिपोर्टर जरी धर्मानें ख्रिस्ती तथापि हाडाचा ब्राह्मण, या एकंदर सर्व ब्राह्मण कामगारांचा सरकारी खात्यांनीं भरणा असल्याकारणामुळें, ते या तुटपुंज्या साडेसातीस आपलाल्या कचेऱ्यांनीं

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 288.

मलत्या एखाद्या सबबीवरून उभे न करितां, एखादे वेळीं त्यांचा डाव साधल्यास यांच्या पोटावर पाय देतील, या भयास्तव हे आपल्या मनांतून ब्राह्मण कामगारांचें नांव ऐकल्याबरोबर टपटपा लेंड्या गाळितात; इतकेंच नहे, परंतु कित्येक विद्वान भटब्राह्मण सोंवळ्याओंवळ्याचा विधिनिषेध न करितां या साडेसाती चोंबड्या शूद्र विद्वानांच्या उरावर पाय देऊन विलायतेस जाऊन परत आल्याबरोबर पुनः यांच्यासमक्ष आपल्या जातींत मिळून वावरत आहेत. तथापि या साडेसात शेळीच्या गळ्यांतील गलोल्या, आपल्या अज्ञानी आप्तबांधव शेतकऱ्यांसमोर निर्लज्ज होऊन भटब्राह्मणांस आपले घरीं उलटे बोलावून, त्यांच्या हातून नाना प्रकारचे विधी करून त्यांच्या पायांचीं तीर्थें प्राशन करितात, या कोडगेपणाला म्हणावें तरी काय? कदाचित् सरकारी ब्राह्मण कामगारांचे आश्रयावांचून यांचीं पोटें भरत नाहींत म्हणून म्हणावें, तर गांवांत थोडी कां++पोट भरितात!! असो. हल्लीं शेतकऱ्यांची निहारी, शिळ्या तुकड्यांवर लाल चटणीचा गोळा, दुपारीं ताज्या भाकरीबरोबर आमटी अथवा सांडग्याचें खळगुट; रात्रीं निवळ वरणाचे पाण्यांत जोंधळयाच्या अथवा मक्याच्या कण्या, मध्यें कधीं गाजरें अथवा रताळीं पिकल्यास त्यांच्या वरूवर गुजारा करावा लागतो, तरी त्यांस नेहमीं वेळच्या वेळीं पोटभर भाकरी मिळावयाच्या नाहींत. यास्तव मध्येंच एखादे वेळीं भूक लागल्याबरोबर औत उभें करून हिरव्यासरख्या आंब्याच्या कैऱ्या, भोंकरें, उंबरें, गाभुळल्या चिंचा वगैरे शेताच्या आसपास जो कांहीं खाण्याचा पदार्थ हातीं लागेल, तो खाऊन त्यावर ढसढसा पाणी पिऊन पुन्हा आपले औत हाकावयास जातो, व ज्या ज्या वेळीं त्यास पोटभर भाकरी मिळतात, त्या त्या वेळीं तो त्या आधाशासारख्या खातां खातां मध्यें कधीं पाणी पीत नाहीं, यामुळें त्यास सर्व दिवसभर किरमिट ढेंकर वगैरे येऊन मोडशी विकारानें त्यास नाना प्रकारचे रोग होतात. व त्यांचे शमनार्थ दमडीचा ओंवा अथवा सुंठसाखर मिळण्याची भ्रांती! यामुळें हिंवतापाच्या आजारानें अखेरीस यमसदनास जावें लागतें. सणावारास कित्येकांचे घरीं उत्तम पक्वान्न म्हटलें म्हणजे गुळवण्याबरोबर पुरणाच्या पोळ्या, तोंडीं लावण्याकरितां तेलांत तळलेल्या कुरड्या, पापड्या व फुरफुरीं व शेवटीं आमटीबरोबर भात. बहुतेकांचे घरीं डाळरोट्या व तोंडीं लावण्याकरितां सांडग्यांचें कोरड्यास. बाकी उरलेल्या कंगाल शेतकऱ्यांस गुजरमारवाड्यांनीं उधार सामुग्र्या न दिल्यास ते नाचणी अथवा ज्वारीच्या भाकरीवर कशी तरी वेळ मारून नेतात. यास्तव बहुतेक शेतकऱ्यांस कर्ज काढल्याशिवाय पट्टी वारण्याची सवडच होत नाहीं व अशा लाचार शेतकऱ्यांनीं आपल्या मुलीबद्दल निदान पांचपंचवीस रुपये घेतल्या शिवाय त्यांस त्यांचीं लग्नें करून देतां येत नाहींत. त्यांतून अट्टल कर्जबाजारी शेतकऱ्यास ब्राह्मण अथवा मारवाडी सावकारांनीं त्यांचे मुलांच्या लग्नाकरितां कर्ज न दिल्यास, कित्येक मुलें भर ज्वानींत आल्याबरोबर त्यापैकीं कित्येक तरुण निराळ्या मार्गानें मदाग्नि शांत करूं लागल्यामुळें त्यांस क्षयाच्या बाधा होऊन वायां जातात. त्याविषयीं

नामांकित डाक्तर विद्वानांच्या पुराव्यासहित मी पुढें एखादे वेळीं आसुडाच्या पुरवणीदाखल शेतकऱ्यांचें थापटणें या नांवाचा एक स्वतंत्र निबंध करून आपल्यापुढें सादर करीन. कित्येक तरुण निःसंग होऊन चोरीछापीनें काडीमहालांतील खाटल्यावर जाऊन खटपटी करूं लागल्यामुळें थोड्याच दिवसांत ते कैलासवासी होतात व बाकी उरलेलीं, चोर, बंडखोरांचे नादीं लागून आपल्या जिवास मुकतात[1], व ज्यास नवरीच्या बापास देण्यापुरतें कर्ज मिळून उभे केलेल्या लग्नांत शेतकऱ्याजवळ पुरते पैसे नसल्यामुळें एकंदर सर्व माळी, कुणबी व धनगरांपैकीं तरुण दिवसा शेतकामें करून सर्व रात्रभर जात्यावर बसून एकमेकांच्या मांड्यांशीं मांड्या भिडवून हिजड्यासारखीं बायकांचीं गाणीं[2] गाऊन गहूं, ज्वारी दळून बाकी सर्व लहानमोठीं कामें करूं लागतात. त्याचप्रमाणें गांवांतील तरुण स्त्रिया वरमाईस बरोबर घेऊन कांदे चिरून हळकुंडें फोडून भाजल्या बाजरीचा वेरूवार, हळद, चिकसा दळून काढितात. यामुळें सदरच्या पदार्थांची घाण, रात्रंदिवस काम करणाऱ्या वरमाईच्या हिरव्या रंगाच्या पातळाच्या घाणीमध्यें मिसळून तिच्या सर्व अंगाची इतकी उबट दुर्गंधी चालते कीं, तिजपासून जवळच्या मनुष्यास फार त्रास होतो. त्याच्या घरापुढें अंगणांत लहानसा लग्नमंडप शेवरीच्या मेढी रोवून त्यांजवर आडव्या तिडव्या फोंकाट्यावर आंब्याचे टहाळे टाकून नांवाला मात्र सावली केली असते. ढोलकी अथवा डफड्याचे महार-मांगाचे बदसूर वाजंत्र्याची काय ती मौज! नवऱ्या मुलास गडगनेर म्हटलें, म्हणजे पितळीमध्यें अर्ध पावशेराच्या भातावर थोडासा गूळ व नखभर तूप घातलें कीं, नवऱ्या मुलीमुलांबरोबर फिरणारीं मुलें लांडग्यासारखीं घांसामागें घांसाचे लचके मारून एका मिनिटांत पितळी चाटून पुसून मोकळी करितात. लग्नांतील भोजनसमारंभ रस्त्यावर हमेशा बसावयाकरितां पडदा अंथरल्याशिवाय पंगत पडावयाची. देवकार्याचे दिवशीं सर्वांनीं आपआपल्या घरून पितळ्या घेऊन आल्यानंतर त्यांमध्यें ज्वारीच्या भाकरी, कण्या अथवा बाजरीच्या घुगऱ्याबरोबर सागुतीचे बरबट, ज्यामध्यें दर एकाच्या पितळींत एकदां चार अथवा पांच आंतडींबरगड्याचे रवे पडले म्हणजे जेवणारांचें भाग्य. कारण एकंदर सर्व बकऱ्याचीं मागचीं पुढचीं टिंगरें दोनदोन तीनतीन दिवस पुढें घरांतील वऱ्हाडांसहित मुलांबाळांस तयार करून घालण्याकरितां घरांत एका बाजूला टांगून ठेवितात. गांवजेवणांत वाळल्याचिळल्या इस्ताऱ्यांवर थोड्याशा भातांत उभे केलेल्या द्रोणांतील गुळवण्यांत, तेलांत तळलेल्या तेलच्या कुसकरून खातां खातां, गाजरें अथवा बटाट्याची भाजी तोंडीं लावून अखेरीस

---

१. भूदेव वासुदेव फडक्याच्या नादीं लागून बहुतेक अज्ञानी, शूद्र, रामोसी काळ्या पाण्यास व कित्येक तर फाशीं गेले.

२. बामनाच्या मुला, कोठें जातोशी जोढाया। हातीं दवूत लेखणी, फिरशी कुणबी नाडाया॥

हुंदाड्याबरोबर शेवटचा भात खाऊन वरतीं तांब्याभर पाणी पिऊन डरदिशीं ढेंकर दिले कीं, शेतकऱ्याचें जेवण संपलें. त्या सर्व जेवणामध्यें हजार मनुष्यांमागें दमडीचेंसुद्धां तूप मिळावयाचें नाहीं. अशा थाटाचीं शेतकऱ्यांत लग्नें होत असून येथील एकंदर सर्व गैरमाहित शहाणे ब्राह्मणांतील विद्वान्, आपल्या सभांनीं लटक्या-मुटक्या कंड्या उठवून कारभारींस सुचवितात कीं, शेतकरी आपले मुलाबाळांचे लग्नांत निरर्थक पैसा खर्च करितात, यामुळें ते कर्जबाजारी झाले आहेत. अहाहा ! हे सार्वजनिक[1] पोंकळ नांवाच्या समाजांत, एकतरी मांगमहार शेतकऱ्यास त्या समाजाचा सभासद करून त्यास आपल्या शेजारीं कधींतरी घेऊन बसले होते काय ? अथवा यांच्यांतील गांवोगांव वेदावर पांडित्य करणाऱ्या गृहस्थांपैकीं एखाद्या स्वामीनें तरी उघड जातीभेदाच्या उरावर पाय देऊन शूद्राच्या पंक्तींत बसून तेथील एखादा बरबटाचा फुरका मारून शेतकरी खर्चीक म्हणून म्हणावयाचें होतें. हे नाटकांतील फार्सांत लाडकीचें सोंग घेऊन तंबुरीचे खुंटे करून शेतकऱ्याचीं जात्यावरील गाणीं गाऊन मजा करून सोडितात; परंतु यांला आपले मुलाबाळांचे लग्नांत पल्लोगणती बाजरी गहूं दळतांना कोणी पाहिलें असल्यास त्यानें येथें उभें राहून सर्वांस कळविल्यास मी त्यांचा अभार मानीन. हे कधीं तरी शेतकीचीं कामें स्वतः हातांनीं करितात काय ? त्यांना शेतकीचा झुंगा माहित आहे काय ? असो, परंतु शेतकरणीसारख्या यांच्या घरांतील स्त्रिया आपल्या घरांतील शेणशेणकूर करून शेतीं नवऱ्याबरोबर पाभारीमागें तुरी वगैरे मोघून शेतीं खुरपण्याकाढण्या वगैरे करूं लागून खळ्यावर कणसें मोडून तिवड्याभोंवतीं गंज करून मळणी होतांच दाणे उपणतांना वावड्यावर पुरुषास उपणपाट्या उरापोटावर उचलून देऊन, डोईवर राखराखुंडा, शेण, सोनखतांचे पाट्यांचीं व काड्यागवत वगैरे भुसकटांचीं ओझीं वाहून, उन्हाळ्यांत शेतीं काम कमी असल्यामुळें सडकेवर खडी फोडून दिवसभर मोलमजुरी करून, आपल्या भटभिक्षुक पतीस अशा तऱ्हेच्या मदती करीत नसून दररोज सकाळीं निजून उठल्याबरोबर वेणीफणी करून, घरांतील सडासारवण, स्वयंपाक व धुणेंधाणें आटोपून सर्व दिवसभर पोथ्यापुराणें ऐकत बसून लग्नसमयीं जात्याच्या खुंट्याला हात न लावितां अंगावर शालजोड्या घेऊन पुढें शेतकऱ्यांच्या बायकापोरींच्या डोक्यावर रुखवतांच्या शिपतरांची धिंड काढून शूद्रांनीं हातीं धरलेल्या अबदागिरीखालीं मशालीचे उजेडांत, पायांत जोडे घालून शृंगाराच्या डौलांत मोठ्या झोंकानें मिरविणाऱ्या असून, या कुभांड्यासारखे शेतकरी आपल्या मुलाबाळांच्या लग्नमंडपांत विजेची रोषणाई करून आपल्या जातबांधवांस मोठमोठाल्या रकामांची उधळपट्टी करून तूपपोळ्या व लाडूजिलब्यांचीं प्रयोजनें घालून फक्त भटब्राह्मणांच्या सभा भरवून त्यांस शेंकडों रुपये दक्षिणा वाटून आपल्या घराण्यांतील

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 234, 270 and 271.

गरती सुनाबाळांची परवां न करितां त्यांच्यासमोर निर्लज्ज होऊन गांवांतील वेसवा-कसबिणींच्या नाचबैठकांत बसून त्यांचीं वेडीविद्रीं गाणीं ऐकल्यानंतर त्यांस मन मानेल तशा बिदाग्या देत नाहींत. सणावारांस कां होईना, शेतकरी आपल्या आल्या जन्मांतून एकदां तरी आपल्या खोपटांत घीवर, चुरमा, जिलब्या, बासुंदी, श्रीखंड अथवा बुंदीचे लाडू कुटुंबांतील मुलांबाळांस घालण्यापुरतें, त्यांजवळ यांनीं व गोऱ्या कामगारांनीं, कांहीं तरी त्राण ठेविलें आहे काय? या वाचाळांच्या तोंडाला कोणी हात लावावा? अहो, यांच्या धूर्त पूर्वजांनीं मनू वगैरे धर्मशास्त्रांतील घाणेरड्या ग्रंथांत जातिभेदाचें थोतांड उभें करून, उलटें शेतकऱ्यांनीं इंग्रज लोकांस जर नीच मानणाऱ्या प्यादेमातीचा डाव मांडून ठेविला नसता, तर आज सर्वांचेसमोर एक अपूर्व चमत्कार करून दाखविला असता. तो असा कीं, गव्हरनरसाहेबांच्या स्त्रिया मखमलीच्या फुलासारख्या नाजूक असल्यामुळें त्यांस तर या कामीं तसदी न देतां, दहापांच युरोपियन कलेक्टरसाहेबांच्या मडमांस त्यांच्या मुलाबाळांसहित जर शेतकऱ्यांचे लग्नांत आमंत्रणें करून आणिल्या असत्या व त्यांस शेतकऱ्यांचे स्त्रियांबरोबर लग्नांतील सर्व कामें आटोपावयास लाऊन मुख्य वऱ्हाडणी केल्या असत्या, तर त्यांनीं येथील दुर्गंधी, खाण्यापिण्याचा थाट, अंथरुणाचा बोभाट, व बाज्या भराड-गोंधळाचा किलकिलाट वगैरे अव्यवस्था पाहून दुसरे दिवशीं सकाळींच तेथून आपलीं[1] मुलेंलेंकरें जागचे जागीं टाकून पळून गेल्या नसत्या, तर या धूर्तांनीं माझें नांव बदलून ठेवावें, अशी मी भर सभेंत चक्रीदार पागोटीं घालून हातांत वेळूच्या पिंवळ्या काठ्या घेऊन फिरणाऱ्या अजागळ शूद्र चोंबड्या चोपदारासमोर मिशांवर ताव देऊन छातीला हात लाऊन प्रतिज्ञा करितों. या उभयतां काळ्या व गोऱ्या कामगारांनीं रात्रंदिवस मौजा मारण्याकरितां विलायत सरकारची नजर चुकावून अज्ञानी शेतकऱ्यांवर नाना प्रकारच्या भलत्यासलत्या बाबी बसवून त्यास इतका नागवा उघडाबंब केला आहे कीं, त्याला एजंट व गव्हरनरसाहेबांस आपल्या दरबारांत पानविड्या-करितां आमंत्रण करून बोलावण्याची शरम वाटते. अरे, ज्यांचे श्रमांवर[2] सरकारी फौजफाटा, दारूगोळा, गोऱ्या कामगारांचा बाजवीपेक्षां जास्ती ऐषआराम, व काळ्या कामगारांचे बाजवीपेक्षां जास्ती पगार, पेनशनी व सोंवळेचाव असून, त्यांस चारचौघांत पानविड्यापुरता मान मिळूं नये काय? अहो, जो सर्व देशांतील लोकांचे सुखाचा पाया, त्याचे असे बुरे हाल! ज्यास वेळचे वेळीं पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळत नसून, ज्याचे उरावर सरकारी पट्टी देण्याची कटार लोंबत आहे, ज्याच्या हालास साहेब लोकांचा शिकारी कुत्रासुद्धां हुंगून पाहीना, याला म्हणावें तरी काय? ज्यास मुळींच आपल्या लीपींतील मूळाक्षरसुद्धां वाचतां येत नाहीं, त्यानें शेतकी-संबंधीं अन्य भार्षेतील ग्रंथ वाचून शेतसुधारणा तरी कशी करावी? ज्यास नेहमीं

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 44.
२, A Sepoy Revolt by Henry Mead, page 198.

फाके¹ चालले आहेत, त्यानें आपलीं मुलें परगांवीं मोठमोठ्या शहरांतील अग्रिकल्चर शाळेंत शिकण्याकरितां कशाच्या अथवा कोणाच्या आधारावर पाठवावीं ?

आतां आपण शेतकऱ्यांचे हल्लींचे शेतस्थितीकडे वळूं. आमचे महादयाळू इंग्रजी सरकारचा अम्मल या सोंवळ्या देशांत झाल्यादिवसापासून त्यांनीं येथील धष्टपुष्ट गाया कोंवळ्याकाच्या वांसरासहित वाहतुकीचे खांदकरी बैलास यज्ञविधी केल्याशिवाय मारून, मुसलमान, मांग, महार वगैरे आचार्यांस बरोबर घेऊन खाऊं लागल्यावरून, शेतकऱ्याजवळ कष्टाच्या उपयोगी पडण्याजोग्या मजवूत बैलांचें वेणें कमी कमी होत गेलें. तशांत पर्जन्याची अनावृष्टि झाल्यावरून पडलेल्या दुष्काळांत चारापाण्यावांचून लक्षावधि बैलांचा सरसकटीनें खप होऊन त्यांचें वाटोळें झालें. दुसरें असें कीं, शेतकऱ्याजवळ उरलेल्या खल्लड बैलास फारेस्टखात्याच्या अनिवार त्रासामुळें व गायरानांच्या कमताईमुळें पोटभर चारावैरण मिळेनाशी होऊन त्यांची (जनावरांची) संतति दिवसेंदिवस अतिक्षीण होत चालल्यावरून त्यांच्यांत हमेशा लाळीच्या सांथी येऊन, त्या रोगानें दरवर्षी शेतकऱ्यांचे हजारों बैल मरूं लागल्यानें कित्येक शेतकऱ्यांचे गोठ्यांतील दावणीचे खुंटे उपटले. पुढें शेतकऱ्यांजवळ पहिल्यासारखीं मनमुराद जनावरें शिल्लक नसल्यामुळें त्यांच्या बागायतीची वेळच्या वेळीं उस्तवारी होऊन त्यांस पोटभर खतपाणी मिळेनासें झाल्याबरोबर बागाइती जमिनींतील फूल कमी झाल्यामुळें हल्लीं बागाईतांत पूर्वीप्रमाणें पीक होत नाहीं. शिवाय आमच्या सरकारनें धूर्त ब्राह्मण कामगारांस हातीं धरून त्यांच्या मदतीनें दर तीस वर्षांनीं अज्ञानी भेकड शेतकऱ्यांच्या शेतीचा पैमाष करून त्यांजवर मन मानेल तसे शेतसारे वाढवूं लागल्यानें शेतकऱ्यांची हिम्मत खचून त्यांच्यानें त्यांच्या शेताची मशागत होईना, यास्तव कोट्यावधि शेतकऱ्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेनासें झालें. यावरून शेतकरी जसेजसे शक्तिहीन होऊं लागले, तसतशा त्यांच्यांत महामारीच्या अजाराच्या सांथी येऊं लागल्यामुळें दरवर्षी हजारों शेतकारी मरूं लागले. तशांत दुष्काळाच्या अमलांत अन्नावांचून लक्षावधि शेतकऱ्यांचा खप होऊन यमपुरीस गेले. व कित्येकांच्या दाराला जरी काठ्या लागल्या, तरी एकंदरीनें त्यांची पहिल्यापेक्षां खानेसुमारी जास्त वाढल्यामुळें, त्या मानानें पुनः पुन्हा त्याच शेतांच्या लागवडी होऊन जमिनीस विसांवा बिलकुल मिळेनासा झाला, यावरून जिराइती शेतें पिकामागें पिकें देऊन देऊन थकलीं, शिवाय दरवर्षी हजारों खंडी धान्य, कापूस, कातडीं व लोंकर परमुलखीं जात असून मुंबईसारख्या बकाली म्युनिसीपालटींतील गोऱ्या इंजिनीयर व डाक्टर कामगारांच्या गैरमाहितीमुळें, अथवा त्यांच्या आडदांडपणाच्या शैलीमुळें लक्षावधी खंडी खतांचें सत्व समुद्रांत वायां दवडल्यानें शेतांतील सत्व नाहींसें होऊन आतां एकंदर सर्व शेतें पडकळीस आलीं आहेत. अहो, हे विलायती गोरे इंजिनीयर गोऱ्या

१. A Sepoy Revolt by H. Mead, pages 334 and 356.

डाक्टरांचे मिलाफानें, आपल्या देशांतील कारागीर लोकांच्या सामानसुमानांचा येथें खप व्हावा, या इराद्यानें आपल्या पोटावर इंगळ ओढण्याकरितां अशा नाना तऱ्हेच्या युक्त्या (स्किमा) आमलांत आणून बेसमज रयतेचें बेलगामी द्रव्य उधळून, येथील कित्येक हाताखालच्या काळ्या कामगारांकडून त्या त्या इमारतीस आपलीं नांवें देऊन मोकळे होतात. नंतर त्या इमारतीसहित रयतेचें उद्यां कां वाटोळें होईना. त्यांच्या तुंबड्या भरून लौकिक झाला, ह्मणजे गंगेस घोडे न्हाले. त्यांतून एखादे वर्षी पाऊस न पडल्यामुळें मुळींच शेतांनीं पिकें होत नाहींत. कधीं कधीं बैल पुरते नसल्यामुळें कित्येकांच्या पेरणीचा वाफ बरोबर न साधतां पिकास धक्का बसतो. कधीं कधीं बीं विकत घेण्यापुरते पैसे सावकारांनीं वेळेस न दिल्यामुळें, अथवा मागाहून उधार आणलेलें जुनें बीं पेरल्यामुळें कित्येकांचे पिकास धक्का बसतो. अशा नाना प्रकारच्या सुलतानी व अस्मानी अरिष्टांमुळें शेतांनीं पीक न झाल्यास, शेतकऱ्यांपैकीं एकटादुकटा शेतकरी, ब्राह्मण सरकारी कामगारांचे घरीं एकांतीं त्यास पिकापाण्याची सविस्तर हकिकत कळविण्याकरितां गेला कीं, कोणी कामगार नुकताच स्नान करून अंगावर भस्म फासून पुढें पाटावर शालिग्राम मांडून अगरबत्तीच्या सुवासांत लंपट होऊन त्याची पूजा करीत बसला आहे, व कोणी भलती एखादी मळकट पोथी हातांत घेऊन वाचीत बसला आहे, व कोणी नांवाला गोमुखींत हात घालून गच्च डोळे झांकून जपाच्या निमित्यानें बावनखणीकडेस ध्यान लावीत आहे. इतक्यांत बाहेर ओसरीवर शेतकऱ्याचे पायाचा आवाज त्यांचे कानीं पडल्यास डोळे न उघडतां सोवळा कामगार त्यास विचारतो कीं "तूं कोण आहेस?" शे०—रावसाहेब मी शेतकरी आहें." का०, "येथें देवपूजेंत तुझें काय काम आहे? कांहीं भाजीपाला आणला असल्यास घरांत मुलाबाळांस स्पर्श न करितां यजमानीजवळ देऊन चालता हो. दुपारीं कचेरींत येऊन लेखी अर्ज तुझे नांवाचा कर, म्हणजे तुझें काय म्हणणें आहे, तें सर्व साहेबांस समक्ष जाऊन सांगेन. आतां जा कसा." पुढें शेतकऱ्यानें तसेंच मागले पायीं लागोलग राईंतील कलेक्टरसाहेबांचे तंबूचे बाहेरले बाजूस जाऊन बुटलेर, पट्टेवाले व जमादारसाहेबांस मुजरे करून तंबूचे दारापुढें लांब उभा राहून पहातो, तों कोणी साहेब पायाखालीं जमिनीवर काश्मिरी गालिचाची बिछायत, अंगावर सालरजंगासारखा मोंगलाई पेहराव घालून खुर्चीआसनावर बसून लवेंडरच्या सुवासामध्यें आपल्या खाण्यापिण्याचे नादांत गुंग, कोणी कोचावर उताणा पडून पुस्तकांतील गुलाबी वर्णन वाचण्यामध्यें निसंग असल्यामुळें तेथील चपराशी त्यास (शेतकऱ्यास) तेथून धडकावून लवितात. तेव्हां शेतकऱ्यांस आपलीं गाऱ्हाणीं सांगितल्याशिवाय घरीं मुकाट्यानें जावें लागतें. यावरून गोरे कामगारांच्या रीतिभाती, मिजाज व ताजीमतवाजा व काळे कामगारांची दौलत, विद्या, अधिकार, उंचवर्णाची शेखी व सोंवळेचाव, याच्या धुंदींत असणाऱ्या उभयतां कामगारांच्या घरांतील बेपरवा बायकापोरांशीं अज्ञानी दुबळ्या शेतकऱ्यांच्या बायकामुलांचें दळणवळण नसल्यामुळें शेतकऱ्यांच्या वास्तविक अडचणी

गोऱ्या व काळ्या परजातींतील सरकारी कामगारांच्या कानावर घालण्यास मार्गच नाहीं. कारण या उभयतां सरकारी कामगारांचें सर्वच निराळें[1] आणि असे परकी कामगार शूद्र शेतकऱ्यांच्या शेताची पहाणी करून त्यास सूट देणार! पहाणी करतेवेळीं कधीं कधीं गोरे कामगार शिकार करून थकल्यामुळें तंबूंत सडकून झोंपा मारितात. आणि सांवळे कामगार त्या गांवांतील निर्दय कुलकर्ण्यांच्या व अक्षरशून्य भितऱ्या पाटलाच्या मदतीनें गांवांतील त्याचे दोनचार दारूबाज गांवगुंड सोबती घेऊन पहाणी व्हावयाची व तत्संबंधी सर्व कागदपत्र पाहून सूट देणारे म्हटलें म्हणजे, समुद्राचे पलीकडचे गोरे कामगार! इतकाही अटाहास्य करून शेतकऱ्यांस वेळच्या वेळीं सूट नच मिळाल्यास त्यानें मारवाड्यापासून कर्ज काढून पट्टी[2] न वारावी तर, का त्यानें चोऱ्यामाऱ्या करून पट्टी वारावी! किंवा कसें? असो, परंतु अज्ञानी शेतकरी कर्जवाम काढून चावडी भरण्यास चालले कीं, त्यांच्यापुढें वाटेंत बहुतेक अक्षरशून्य ठोंबे, भटांचा थाट करून आडवे उभे राहून फक्त "यजमान तुमचें कल्याण असो" असें म्हणून त्यांजपासून कांहीं ना कांहीं पैसे उपटतात, त्यांतून वेळीं वक्तशीर पाऊस पडून थोडेंबहुत पीक रकमेस आल्यास आमच्या जहामर्द सरकारच्या भागूबाई गोऱ्या कामगारांनीं अज्ञानी भोळ्या शेतकऱ्याजवळून बंदुकी-बरच्या हिसकावून घेतलेल्या. त्यांच्या कित्येक पिकांचा रात्रीं डुकरें येऊन नाश करितात, व बाकी उरलेल्या पिकांवर ब्राह्मण, मारवाडी, वगैरे सावकार लिंगायती व गुजराथी अडते आणि इतर जातींतील दलाल दीडीवाले नजर ठेवून त्यास ओरबडून खातात, इतकेंच नव्हे, परंतु अडत्याचे स्वयंपाकी गुजराथी ब्राह्मण, शेतकऱ्यापासून दर पल्ल्यामागें शेर शेर गूळ ओरबडूं लागले आहेत. असो, शेवटीं बाजार करून एकटा दुकटा शेतकरी, परत वेशीच्या दारांत आला कीं, गावांतील पोलीसपाटलासहीत एकदोन गांवगुंड, दारूबाज लुच्चांस थोडी थोडी दारू न पाजल्यास थोड्याच दिवसांत चावडीपुढें त्याची कुंदी निघालीच, असें समजा. काय हो हे आताचें ज्ञानसंपन्न धर्मराज्य! परंतु या धर्मराज्यांत कर्मनिष्ठ ब्राह्मण कामगारांच्या कर्तबगारीनें काठीला सोनें बांधून रामेश्वरापासून अटकेपावतों फिरण्यास कांहीं हरकत नव्हती. परंतु सांप्रत लक्ष्मी आपल्या ज्ञान व वस्त्रहीन झालेल्या शेतकऱ्यांच्या घरांत पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेना, तेव्हां कंटाळून उघड दिवसा आपल्या समुद्र पित्याचे घरीं गेली व समुद्राचे पलीकडील तिच्या इंग्रज सख्या बांधवांनीं तिच्या मर्जीप्रमाणें आळस टाकून उद्योगधंद्याचा पाठलाग करून, आपल्या घरांतील अबालवृद्ध स्त्रीजातीस बरोबरीचा मान देऊन त्यांचा इतमाम नीट ठेवूं लागल्यामुळें, ती (लक्ष्मी)

---

१. हें येथील लाल अथवा हिरव्या बागेंतील उपदेश करणाऱ्या शूद्र टीकोजीस माहीत कसें नाही? तो हमेशा वेडीचे सोंग कशाकरिता घेतो बरें?

२. A Sepoy Revolt by Henry Mead, page 29.

त्यांची बंदी बटिक झाल्यावरून, ते आपल्या हस्तगत झालेल्या शूद्र शेतकऱ्यांपासून मन मानेल तसें द्रव्य गोळा करून, त्यांजबरोबर वरकांति गोड गोड बोलतात खरे, परंतु त्यांस मनापासून विद्या देण्याकरिता चुकवाचुकव करितात. याचें मुख्य कारण हेंच असावें कीं शेतकरी विद्वान झाल्याबरोबर ते आपल्या खांद्यावर आसूड टाकून लक्ष्मीस पुढें घालून आपल्या घरीं आणून नांदावयास लावण्याकरितां कधीं मागेपुढें पहाणार नाहींत, या भयास्तव ते शेतकऱ्यांस विद्वान करीत नाहींत. कारण तसें घडून आल्यास त्या सर्वांस दोम दोम अमेरिकेंत जाऊन तेथें रात्रंदिवस कष्ट करून आपलीं पोटें भरावीं लागतील. व शेतकऱ्यांची लक्ष्मी जर आजपावेतों आपल्या माहेरीं गप्प बसली नसती, तर भट ब्राह्मणांनीं इतकें सोंवळें माजविलें असतें कीं, यांनीं आपल्या जन्म देणाऱ्या मातापित्यासमुद्धां अंमळ दूर हो! आम्हीं आतां सोवळें नेसलों आहोंत, आम्हांला शिवूं नका, तुमची आम्हांवर सावलीदेखील पडूं देऊं नका, म्हणून म्हणण्यास चुकले नसते. तेव्हां या भूदेव भटांनीं अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांची काय दुर्दशा उडविली असती, त्याचें अनुमानसुद्धां करितां येत नाहीं. परंतु मी खात्रीनें सांगतो कीं, यांनीं तर मांगमहारांस जिवंतच नव्या इमारतीच्या पायांनीं दगडचुन्यांत चिणून काढिलें असतें. आतां मांगामहारांनीं ख्रिस्ती होऊन आपली सुधारणा करून मनुष्यपदास पावावें तर, तेथील कित्येक काळे भट विद्वान ख्रिस्ती, रात्रंदिवस गोऱ्या मिशनरींच्या कानीं लागून ते या अनाथांची डाळ शिजूं देत नाहींत. कारण तेथेंही उंच वर्णांतील झालेले ख्रिस्ती अनेक प्रकारचे भेदाभेद ठेवितात, असें पहाण्यांत आलें आहे. इतकेंच नव्हे परंतु आतांशीं कित्येक विद्वान भटब्राह्मण[1] काखेंत सोंवळींभांडीं मारून इंग्लंडास जाऊं लागले आहेत. तेथें हे प्रतापी जाऊन शेतकऱ्यांच्या घरांतील लक्ष्मीच्या नादांत लंपट होऊन सदा सर्वकाळ विजयी लक्ष्मीच्या झोकांत असल्यामुळें कोणाची परवा न करणारे इंग्रज लोकांस, मुख्या शूद्रादि अतिशूद्रांविषयीं काय काय लांड्यालबाड्या सांगून त्यांच्या समजुतींत काय काय फरक पाडून त्यांचा सरकारी कामगारांकडून कसकसा सत्यानास करितील, याविषयीं आमच्या हल्लींच्या बापुड्या गव्हरनर जनरल साहेबांच्यानेंसुद्धां तर्क करवणार नाहींत. कारण आमचे अट्टल खटपटी माजी गव्हरनर टेंपलसाहेबांचे कारकीर्दींत कालच्या दुष्काळांत तलावकनाल वगैरे ठिकाणीं पोटें आवळून कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांवर भट ब्राह्मण कारभारी असल्यामुळें, शेतकऱ्यांचा भटकामगारांनीं इतका बंदोबस्त ठेविला होता कीं, भेकड सिद्दी लोकांच्या मुलाबाळांस चोरून अमेरिकेंत विकण्याकरितां नेतेवेळीं त्यांची भयंकर स्थिती यांहून फार बरी होती, असें तुमच्या खात्रीस आणून देण्यापुरतें येथें सर्व लिहूं गेल्यास त्या सर्वांचा आसुडाच्या सवाईनें दुसरा

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 286.

एक स्वतंत्र ग्रंथच होईल. यास्तव पुढें एखादे वेळीं मला फावल्यास त्याविषयीं पहातां येईल. परंतु हल्लीं हिंदुस्थानविषयीं लंडनांत रात्रंदिवस बडबड करण्यापेक्षां मे० **फासेटसाहेबानीं मे० ग्ल्याडस्टनसाहेबांसारख्या** डोळसास कसेंही करून आपल्या-बरोबर घेऊन येथें आल्याबरोबर, त्या उभयतांनीं एकदोन आठवडे महारामांगांच्या झोपडींत राहून त्यांची हल्लींची स्थिती स्वतः आपल्या डोळ्यांनीं पाहिल्याबरोबर ते पुनः इंग्लंडांत बडबड करण्याकरितां परत न जातां परभारां अमेरिकेंत पळून न गेल्यास, भटब्राह्मणांच्या पोरासोरांनीं या माझ्या लेखावर पाहिजेल तशा कोट्या करून आपल्या वर्तमानपत्रांसह मासिक पुस्तकांनीं छापून बेलाशक आपलीं पोटें भरावींत. सारांश एकंदर सर्व माळी, कुळबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांजवळ ईश्वराकडून आलेलें म्हणण्या-लायक कुराण, बायबलासारिखें पुस्तक नसल्यामुळें त्यांच्यांतील महाप्रतापी **भोंसले, शिंदे, होळकर, गायकवाड** वगैरे राजेरजवाडे शेतकऱ्यांचीं बहुतेक मुलें, गायीचे बाप, ज्यांस आर्यभटांच्या आडकाठीमुळें संस्कृत रुपावलिसुद्धां धड वाचतां येत नाहीं. आम्हीं मानव प्राणी आहोंत व आमचे वास्तविक अधिकार काय काय आहेत, याविषयीं एकंदर सर्व शेतकऱ्यांस मुळींच कांहीं समजत नाहीं. तसें जर नाहीं म्हणावें, तर शेतकऱ्यानीं आपुल्या स्वजाति, आर्यमानवांच्या मलीन पायांचीं तीर्थें प्राशन करण्याची वहिवाट चालू ठेविली असती काय? ब्राह्मणांच्या सांगण्यावरून त्यांच्या पूर्वजांनीं उपस्थित केलेल्या या दगड धातूंच्या मूर्ति, गाया, सर्प व तुळशींच्या झाडांची शेतकऱ्यांनीं पूजा करून त्यांस देवाप्रमाणें मानलें असतें काय? आर्य-ब्राह्मणांनीं आपले मतलब साधण्याकरितां समूळ ज्ञानहीन करून ठेविल्यामुळें त्यांच्यांत सारासार विचार करण्याची ताकद नसल्यामुळें, ते भुताखेतांवर भरंसा ठेवून मन मानेल त्या वीरांची वारी अंगांत घुमवून, पोरासोरांसह आपल्या अंगावरील साधणी (उतारे) टाकून आपलें द्रव्य खराब करितात. त्यांचा औषधउपचारांवर भरंसा नसल्यामुळें ते लुच्चड देवऋषींचे नादीं लागून आपल्या जिवास मुकतात. असो, याविषयीं पुढें एखादे वेळां पाहतां येईल. अशा चोंहोकडून सर्वोपरी नाडल्यामुळें सत्वहीन झालेले अज्ञानी शेतकऱ्यांत लहानपणीं लग्नें करण्याची वहिवाट असल्यामुळें, प्रथम एकंदर सर्व शेतकऱ्यांचे कोवळ्या वीर्यांचा भंग होत चालल्यावरून त्यांची संतति दिवसेंदिवस वीर्यहीन होत चालली आहे. त्याचप्रमाणें पूर्वीं शेतकऱ्यांच्या गोफणीच्या धोंड्यांच्या भडिमारापुढें एकटादुकटा पेंढारी टिकाव धरीत नसे. परंतु आतांचे इंग्रजी अंमलांतील त्यांचे नातूपणतू इतके तेजहीन झाले आहेत कीं, त्यांस गांवांतील धगड्या मुरळ्यासुद्धां भीक घालीत नाहींत व दुसरें असें कीं, त्यांच्यांत लहानपणीं लग्नें केल्यामुळें, लग्नें केल्यानंतर त्यांचीं मुलें वयांत आल्याबरोबर त्यांस रंगरूप, चालचलणूक, प्रकृती, स्वभाव वगैरे गुणावगुण एकमेकांस न आवडल्यामुळें परस्परांत वितुष्ट पडून, कित्येक उनाड शेतकऱ्यांच्या छाकट्या मुलांनीं आपल्या निरपराधी स्त्रियांचा

त्याग[1] केल्यामुळें त्या बापुड्या आपल्या आईबापांचे घरीं आयुष्याचे दिवस काढीत आहेत व बाकी उरलेल्या निराश्रित बिचाऱ्या हाल्यापाल्या करून आपला गुजारा करितां करितां यमसदनास जातात. शेतकऱ्यांचे आईबाप त्यांच्या संमतीशिवाय त्यांचीं लहानपणीं लग्नें करून देतात. यामुळें त्यांस लग्नाच्या बायका जर आवडल्या नाहींत, तर त्या प्रत्येकांनीं दुसरी एकेक पाटाची बायको केल्यास ते कदाचित न्यायदृष्टीनें अपराधी ठरतील, असें माझ्यानें सांगवत नाहीं. तथापि त्यांनीं एकामागें एक, दोन, तीन, चार पाटाच्या बायका कराव्यात, या जुलमी न्यायाला म्हणावें तरी काय? माझ्या मतें त्यांनीं पांचवी पाटाची बायको करावी, म्हणजे त्यांच्या मळ्यापुढें गाडगीं धरण्याच्या पेंचांतून त्यांचीं मुलें मुक्त होतील. त्यांतून कुणब्यांतील कित्येक शेतकरी ज्यांस ट, फ करून व्यंकटेशस्तोत्र, तुळशीआख्यान व रुक्मिणी स्वयंवर वाचतां आलें कीं, त्यांनीं दोन, दोन, तीन, तीन पाटांच्या बायका केल्यानंतर गांव-पाटिलक्या करितां करितां गांवांतील धूर्त ब्राह्मणांचे नादीं लागून आज यांच्या खोट्या खतांवर साक्षी घालितात, उद्यां त्यांच्या खोट्या पावत्यांवर साक्षी घालून गांवांतील एकंदर सर्व गरीबगुरिबांस त्रास देऊन त्यांजपासून मन मानेल तसें आडवून द्रव्य उपटतात. माळ्यांतील शेतकऱ्यांस ट, फ, कां होईना, वाचण्याचे नांवानें वाटोळें गरगरीत पूज्य. परंतु त्यांस भराड, गोंधळ, चितरकथा व कीर्तनें ऐकतां ऐकतां थोडेसे अभंग, चुटके व दोहरे तोंडपाठ झाले कीं, ते चौकोनी चिरे बनले, म्हणजे त्यांच्यापुढें विद्वान, पंडित व घोड्यावर बसून गोळी निशाण मारणारे काय माल! त्यांनीं एखादा अभंगाचा तुकडा अथवा दोहरा फेकला कीं, भल्या भल्या जाड्या विद्वानांचे मोहरे फिरविण्यापुरता मनांत घमंडीचा भास झाला कीं, त्यांनीं लग्नाच्या बायकोच्या उरावर एकएक, दोनदोन पाटाच्या बायका ठणकावल्याच. त्यांच्या हाळीपाळीच्या जिवावर हातांच्या बोटांत लहानमोठ्या रुप्याच्या अंगठ्या, उजव्या कानांत मोत्यांच्या बाळ्या, सखलादी तांबड्या टोप्या, बसावयास खालीं लहान लहान तरटांचे तुकडे, त्यावर पुढले बाजूला नवारीच्या काळ्या मिचकूट चंच्या, पलिकडे चिटकुल्या पितळेच्या घाणेरड्या पिकदाण्या, त्यांत त्यांच्या आग्रहावरून विडा खाऊन थुंकूं लागल्याबरोबर ओकारी येते. शेजारीं तरटावर एक दोन गांजा मळूं लागणाऱ्या दाटी बळकटी करून बसलेल्या

---

१. मी हा चवथा भाग गतवर्षी सन १८८३ एप्रिल महिन्यांत मुंबई शहरांत वाचला. त्या दिवसापासून शूद्रांत निरनिराळ्या विद्वानांनीं आपापल्या तारुण्यांत लग्नाच्या कुलशील स्त्रिया फक्त गोऱ्यागोमट्या नसल्यामुळें मोकलल्या आहेत, ह्या सर्वांस माझा मोठा राग आला आहे व ते आपआपल्या अनाथ स्त्रियांपाशीं मनाच्या लज्जेस्तव क्षमा मागून त्यांस आपआपल्या घरीं परत आणण्याचे एकीकडे ठेवून माझीच ते उलटी चोरून छापून वर्तमानपत्रद्वारें निंदा करूं लागले आहेत. त्यांच्या तोंडाला हात कोणी लावावा!

भांग्यासोबत्याबरोबर मन मानेल तशा, राजा विक्रमाच्या पोकळ गोष्टी सांगतां सांगतां आपण आपल्यासच टोपाजी मोऱ्याचे पूत हणगोजीराव म्हणवून घेणारे कारभारी बनतात. ज्यांच्या बायकांवर या कारभाऱ्यांच्या जेवणाच्या फेरपाळ्या आल्या असतील, त्या बापुड्या आपल्या हाळ्यापाळ्यांच्या मिळकतींतून या ऐदी कारभाऱ्यांस पान, तंबाकू पुरवून वेळच्या वेळीं जेवूं घालितात. दुपारीं रगडून झोंपा घेतल्यानंतर घराबाहेर पडतांच दोन्ही पाय फांकून सोनारासारखीं पुढें उराडीं काढून चवड्यावर चालतांना दोन्ही दोन्ही अंगावर डुलून बोळक्या तोंडावरील भुरक्या मिशीवर ताव देणारे दोन बायकांचे कारभारी, माळ्यांच्या आळोआळींनीं फिरतां फिरतां तेथील एकदोन तुकडेमोड्ू आप्तांस सामील करून गांवांतील अल्लड तरुण स्त्रियांच्या उखाळ्यापाखाळ्या काढून जातीमध्यें दोनदोन तीनतीन तट करून त्यांच्या पंचायती करितां करितां बहुतेकांच्या सोयऱ्याधायऱ्यांत तुटी पडून, बहुतेकांच्या कानांत सुंठी फुंकून कित्येकांच्या सुनाबाळींचीं मायमाहेरें वर्ज करवितात. शेवटीं हे पराक्रमी कारभारी गरीबगुरिबांस धमक्या देऊन त्यांजपासून दारूपाण्यापुरते पैसे घेऊन संध्याकाळीं घरीं जातांच बायकांच्या पाट्यांतील उरल्यासुरल्या सडक्यासुडक्या फळफळांवर ताव देऊन, त्यांचे स्वयंपाक आटपेपावेतों तेथेंच त्यांच्याशीं लाडीगोडी लाऊन इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून टपत बसतात. गांवांतील लग्नांत हे रिकामटेकडे, तुकडे मोडून गांवातील दिवसाच्या तेलच्यावर धाड घालण्याकरितां त्याच्या मूठमातीस जातात. अशा प्रकारचे अक्षरशून्य मुजोर अधम कारभारी शेतकऱ्यांमध्यें पुढारी असल्यास त्या अज्ञानी शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची सुधारणा कधीं व कशी होणार बरें! असो. आजपावेतों मी काय जी माहिती मिळविली आहे, त्यांपैकीं नमुन्याकरितां सदरची थोडीशी हकिकत आपल्यापुढें आणिली आहे, तिचा आपण स्वतः शोध करून पहाल, तेव्हां तुमची खात्री होईल कीं, शूद्र शेतकऱ्यांवर हल्लीं मोठा खुदाई गहजब गुजरला आहे व ही माहिती तरी फारच थोडी आहे, तथापि आमचे उद्योगी सरकारनें आपल्या गोऱ्या ग्याझेटियरकडून काळ्या भट मामलेदारांमार्फत आजपावेतों शेतकऱ्यांविषयीं जी काय माहिती मिळविलेली आहे, तिच्याशीं कांहीं मेळ मिळेल असें माझ्यानें म्हणवत नाहीं. कारण एकंदर सर्व सरकारी खात्यांपैकीं एकसुद्धां खातें सांपडणार नाहीं कीं, ज्यामध्यें भट पडले नाहींत. या सर्व अनिवार दुःखांचा पाया आजपर्यंत हजारों वर्षांपासून ब्राह्मणांनीं शूद्र शेतकऱ्यास विद्या देण्याची बंदी केली हा होय. शेतकऱ्यांनीं विद्या शिकूं नये म्हणून पुराणिक व कथाड्या भटांनीं त्यांच्या मनावर इतकी छाप बसविली आहे.कीं, शेतकऱ्यांस आपलीं मुलें विद्वान करण्यामध्यें मोठें पाप वाटतें. त्यांतून हल्लीं त्यांची अतिशय लाचारी असल्यामुळें ते आपल्या मुलांस विद्या शिकवूं शकत नाहींत, याचा अनुभव सर्वांस आलाच आहे. यास्तव आमचे अष्टपैलू धार्मिक सरकार ज्या मानानें शेतकऱ्यापासून नाना प्रकारचे कर, पट्ट्या, लोकलफंड वगैरे बाबी

गोळा करितें, त्याचप्रमाणें त्यांनीं प्रथम एकंदर सर्व खेड्यांपाड्यांतील सरकारी मराठी व इंग्लिश् शाळा बंद करून शेतकऱ्यांवर थोडीशी इमानेंइतबारें मेहरनजर करून शेतकऱ्यांपैकींच शिक्षक तयार करण्याकरितां दरएक तालुक्यानें लोकलफंडापैकीं रकमा खर्ची घालून, शेतकऱ्यांच्या मुलांस अन्नवस्त्रें, पुस्तकें, वगैरे पुरवून त्यांच्या मुलांकरितां बोर्डिंग शाळा कराव्यात व त्या शाळांमध्यें त्या मुलांपैकीं शाळागुरु तयार केल्यानंतर फक्त त्यांच्या शाळांनीं शूद्र शेतकऱ्यांनीं आपलीं मुलें अमुक वर्षांचे वयाचीं होईतों पावतों अभ्यास करण्याकरितां पाठवावींत, म्हणून कायदा केल्याशिवाय शेतकऱ्यांचे मुलांस, थोडेसें कां होईना, परंतु खरें ज्ञान झाल्यावांचून त्यांच्या मनावरील कृत्रिमी ब्राह्मणांनीं उमटविलेला ठसा फिक्का पडावयाचा नाहीं. आणि तसें केल्याविना शेतकरी शुद्धीवर येणेंच नाहींत. परंतु आमच्या इदर थापडी तिदर थापडी करणाऱ्या सरकारनें, पल्लोगणती ब्राह्मण कामगारांतील प्रोफेसर व डिरेक्टर शाळाखात्यांत खोगीरभारतील घालून एकंदर सर्व लोकलफंड जरी खर्ची घातला, तथापि त्यांजपासून शेतकऱ्यांचे मुलांस वास्तविक विद्या मिळणें नाहीं. कारण शेतकऱ्यांचे शेतीं कुंपणाकरितां महारांनीं लावलेल्या कांट्या वाऱ्यानें जातात. हीं किती केलीं तरी भाड्याचीं तट्टें. संध्याकाळ झाली कीं, धर्मशाळेपुढें गप्प उभीं रहावयाचीं! हें आमच्या सरकारच्या कानांत हळूच सांगून या प्रसंगीं आजचा विषय पुरा करितों.

## प्रकरण ५ वें

आम्हां शूद्र शेतकऱ्यांसंबंधीं आर्य भट ब्राह्मणांस सूचना, व सांप्रत सरकारनें कोणकोणते उपाय योजावेत :—

हें शेवटचें पांचवें प्रकरण सुरू करण्याचे पूर्वीं या प्रकरणांत भट पडूं नये, या इराद्यानें या देशांतील महाधूर्त आर्य भटब्राह्मणांस या प्रसंगीं कांहीं सूचना करितों. त्या योगानें आमच्या परदेशी विद्वान् सरकारासह आपल्या स्वदेशी अज्ञानी "दस्यू" शूद्र बांधवांचे डोळे उघडून शुद्धीवर येवोत, असें माझें देवाजीजवळ मागणें आहे. कारण त्यांनीं आतांशीं आपल्या धर्मरूपी तरवारीनें सर्व लोकांच्या ऐश्वर्यांचे चरचरा गळे कापणाऱ्या शास्त्ररूप खड्गास सोंवळ्याच्या वळकुट्यांनीं लपवून आपण मोठ्या स्वदेश-अभिमान्यांचीं सोंगें आणून मांगामहाराकडे ढुंकून न पाहतां शूद्र, पारशी, मुसलमान लोकांतील अल्लड होतकरू पोरासोरांस एकंदर सर्व आपल्या पुस्तकांनीं, वर्तमानपत्रांनीं, सभांनीं, वगैरे मार्गांनीं आपल्या देशांतील उच्चनीच भेदभावाविषयीं आपण सर्वत्रांनीं आपआपसांत कुरकुरण्याचें एकीकडे ठेवून, एकचित्त होऊन आपली सर्वांची एकी

केल्याशिवाय या आपल्या हतभाग्य देशाची उन्नती होणें नाहीं, असा उपदेश करितात. हें ऐकून अक्षरशून्य शेतकऱ्यांनीं कांहीं विपरीत आचरण करूं नये, म्हणून येथें थोडासा प्रयत्न करून पहातों. या उपर त्यांचें नशीब.

पूर्वीं धूर्त भटब्राह्मणांच्या पूर्वजांनीं आपल्या धनुर्विद्येच्या जोरानें (दस्यू) शूद्रांवर वर्चस्व मिळवून त्यांजवर त्यांनीं आपला कडकडीत अम्मल बसविल्यादिवसापासून आज हजारों वर्षें पराजित झालेल्या (दस्यू) शूद्र रयतेचा चालत आलेला व आजतागाईत त्यांनीं आपल्या हस्तगत झालेल्या शूद्रांस मतलबानें अज्ञानी ठेविल्यामुळें, शूद्र शेतकऱ्यास आपल्या मूळच्या वास्तविक मानवी अधिकाराचा विसर पडून, ते यांनीं बनविलेल्या ग्रंथांतील मतलबी मतास बौद्ध, महमदी, व खिस्ती पुस्तकांतील सार्वजनिक मानवधर्माप्रमाणें पवित्र मानून विश्वास ठेवूं लागल्यामुळें, एकंदर सर्व अज्ञानी शूद्र, ब्राह्मणांचे अंकित होऊन ते इतर मनुष्यमात्रांचा, अधिकारानुसारी खऱ्या धर्माचा तिरस्कार करून त्यांची निंदा करण्यामध्यें पुण्य मानूं लागले. यामुळें ते यांच्याशीं कोणत्याही प्रकारच्या दगलबाज्या करूं लागले. तथापि हे (शूद्र) तसें करणें हा त्यांचा अधिकारच, असें मानूं लागले. व ब्राह्मणांच्या दगलबाज्यांविषयीं शूद्रांनीं शंकासुद्धां घेऊं नये, हाच काय तो शूद्रांचा धर्म, म्हणून जो प्रचार पडला, तो आजकाळपावेतों चालू आहे. यांतील वास्तविक व्यंगिताविषयीं परदेशस्थ इंग्लिश सरकार व त्यांचें ऐषआरामी गोरे कामगार सर्व प्रकारें गैरमाहीत असल्यामुळें त्यांच्यानें याजविषयीं योग्य बंदोबस्त होत नाहीं. यास्तव एकंदर सर्व शूद्र शेतकऱ्यांची स्थिती एवढ्या दैन्यवाण्या मजलशीस येऊन पोहोंचली आहे व अद्यापही आपण नामानिराळें राहून परभारें शेतकऱ्यांकडून मोटमोठीं महत्त्वाचीं कामें करून घेण्याचे उद्देशानें हे (ब्राह्मण) आपल्या सभांनीं, वर्तमानपत्रांनीं व पुस्तकांनीं त्यांस आपल्या नादीं लावण्याकरितां नेहमीं उपदेश करितात कीं, "शूद्र शेतकऱ्यांनीं ब्राह्मणांबरोबर एकनिष्ठेनें राहून त्यांच्याशीं एकी केल्याशिवाय या दुर्दैवी देशाची उन्नत्ति होणेंच नाहीं." आतां ह्या त्यांच्या पोंकळ उपदेशावरून अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांस उन्नत्तीच्या थापा देऊन, त्यांस केवळ फसविण्याचा हेतु दिसतो. कारण ब्राह्मणांच्या पूर्वजांनीं आपल्या सत्तेच्या मदांत आपणास भूदेव मानून, निर्बळ शूद्र शेतकऱ्यांस दासासारखे वागवूं लागले. व ती अति नीच सुरू केलेली वहिवाट आजदिनपावेतों अन्य रीतीनें जागृत ठेविली आहे. यावरून शेतकऱ्याबरोबर अशी परकी ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल, हें महाप्रतापी, "डाक्टर फ्रयांकलीन" "टामस पेन्" वगैरे प्रमुख गृहस्थांनीं या विद्येच्या प्रतापानें रात्रंदिवस सतत परिश्रम करून उद्योग करणारे अमेरिकन कसबी लोक आपल्या कलाकुसरीच्या सहाय्यानें युरोपखंडांतील एकंदर सर्व राष्ट्रांतील कारागीर लोकांस मागें हटवून, तेथील कोट्यवधि रुपये साल दरसाल घेऊन जातात. ती विद्या ब्राह्मणांच्या पूर्वजांनीं आपल्या वर्चस्वाच्या धुंदींत शूद्र शेतकऱ्यांस देऊं नये, ह्मणून आपल्या मतलबी ग्रंथांत अटोकाट बंदीचे लेख करून ठेविले. यामुळें

या देशांतील खरी शिपाईगिरी व धनुर्विद्येची बढती होण्याचें काम अगदीं बंद पडलें. तसें जर नाहीं ह्मणावें, तर आपण आपल्या डोळ्यांनीं नेहमीं पहातों कीं, आताशीं शिंदे, होळकर वगैरे महापुरुषांच्या घराण्यांतील कित्येक तरुण **खास्से** घोड्यावर बसून भालेबोथाट्याची बरीच दुरदूर करितात, परंतु त्या हतभाग्यांस दुर्बिणी कशा लावून कोणत्या ठिकाणीं मोर्चे बांधून, तोफेचे गोळे कसे डागावेत, या कामीं ते काळ्या कपिला गाईचे बाप ! ते आपल्या पागोट्याला पिळावर पिळ घालून वडिलांच्या अब्रूचा खराबा करून शूद्र शेतकऱ्यांचे उरावर खायला काळ आणि धरणीवर भार मात्र झाले आहेत. या कारणावरून अनेक वेळीं 'फ्रेंच' 'पोर्च्युगीज' व 'मुसलमान' वगैरे लोभी बादशहांनीं या देशांत स्वाऱ्या करून येथील अतोनात द्रव्य आपल्या देशांत घेऊन गेले, त्यांतून कित्येकांनीं ब्राह्मणांच्या मतलबी धर्माची विटंबना केली. अखेरीस कित्येक खुदापास्त मुसलमान सरदारांनीं हजारों भटब्राह्मणांच्या कानांला धरून आपल्या मानवी धर्मांत ओढीत नेऊन त्यांच्या चटचटा सुंता केल्या. तथापि त्यांनीं हा काळपावेतों आपल्या संस्कृत पाठशाळांनीं शूद्र शेतकऱ्यांचे मुलांस विद्या शिकविण्याची बंदी कायम ठेविली आहेच. यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल? आतां सृष्टीक्रमास ताडून पहातां ज्ञानाशिवाय मनुष्यामध्यें व एकंदर सर्व प्राणीमात्रांमध्यें इतर स्वभावजन्य गुण सर्व सामान आहेत, असें अनुभवास येतें. जसें पशूस आहार, निद्रा, मैथून, आपल्या बच्चांची जतणूक करणें, शत्रूपासून आपला बचाव करणें व पोट भरल्यावर डुरक्या फोडून धडका घेण्याशिवाय दुसरें कांहीं कळत नाहीं, यास्तव त्यांच्यानें सदरच्या व्यवहारांत कोणत्याही प्रकारची तिळमात्र सुधारणा करवत नसल्यामुळें त्यांच्या मूळच्या स्थितींत कोणत्याच तऱ्हेची उलटापालट होत नाहीं. परंतु मानव प्राण्यांस स्वभावतःच एक चमत्कारिक विशिष्ट बुद्धि आहे. तिच्या योगानें तो एकंदर सर्व जलजंतू, पशू, पक्षी, कीटक वगैरे प्राणीमात्रांमध्यें महत्त्वास चढून श्रेष्ठत्व पावला आहे व त्याच बुद्धीच्या योगानें त्यानें आपले विचार कागदांवर टिपून ठेवण्याची युक्ति शोधून काढली. यावरून चोंहों खंडांतील लोकांस आजपावेतों लागलेल्या ठेचांविषयीं अनुभवशीर वृत्तांत टिपून ठेवितां आल्यामुळें हल्लीं जगांत अनुभविक ज्ञानभांडाराचा येवढा मोठा समुदाय जमला आहे, व त्या अनुभविक ज्ञानाच्या सहाय्यावरून बुद्धीच्या मदतीनें युरोपियन लोक आपले महत्त्वाचे विचार तारायंत्रद्वारें हजारों मैलांचें अंतरावर एकमेकांस कळवून दुष्काळांत आगबोटींतून व आगगाडींतून वगैरे लक्षावधि खंडी धान्य एकमेकांस पुरवून एकमेकांचा बचाव करितात. आणि अशा बुद्धिमान मानवजातीपैकीं शूद्र शिवाजी शेतकऱ्यानें एका देवास भजणाऱ्या मुसलमानी बादशहास जरजर करून गाईब्राह्मणांसह त्यांच्या मतलबी धर्माचा प्रतिपाळ केला. हा प्रकार मनीं स्मरून अक्षरशून्य शूद्र शिवाजीच्या निमकहराम पेशवे सेवकानें शिवाजीच्या अज्ञानी वंशजास साताराचे गडावर कैदेंत ठेवून, त्यांची चौकशी ठेवण्याचें

काम महाक्रूर निर्दय अशा त्रिंबकजी डेंगळ्यावर सोंपवून आणि पुणें शहरांत आपल्या जातीच्या आर्य भटब्राह्मणांस रमण्यामध्यें रुपयेमोहोरांची दक्षिणा वाटून ब्राह्मणतर्पणें करून रात्रंदिवस काळ कृष्णलीलेचें पुण्यआचरण करितां करितां, ब्राह्मणासारखें एकेरी धोतर नेसण्याबद्दल शूद्र शेतकऱ्यांसह शिंपी वगैरे जातीच्या लोकांस शिक्षा करीत बसले. इतकेंच नव्हे, परंतु हल्लींचे भटब्राह्मण शेतकऱ्यांच्या विष्ठा खाणाऱ्या गायांचे मूत्रास पवित्र तीर्थ मानून त्याच्या सेवनानें शुद्ध होतात. आणि तेच भटब्राह्मण आपल्या मतलबी धर्मांच्या[१] हिमायतीनें शूद्र शेतकऱ्यांस नीच मानितात. यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

आर्यब्राह्मणांतील कित्येक, खोटे कागद, बनावट नोटी व लांच खाल्ल्याबद्दल सक्तमजुरीच्या शिक्षा भोगितात व कित्येक जरी शाक्तमिषें अशौच मांगिणीबरोबर मद्यमांसादि निंद्य पदार्थ भक्षण करितात, तरी ते भोंसले, शिंदे, होळकर वगैरे शूद्र राजेरजवाड्यांस नीच मानून त्यांजबरोबर रोटीव्यवहार करीत नाहींत. बहुतेक भट ब्राह्मण गांवांतील ओवळ्या कसविणींच्या घरीं सर्व प्रकारचा नीच व्यवहार करितात, तरी ते आर्य भट सालस शूद्र शेतकऱ्यांबरोबर बेटीव्यवहार करण्यांत पाप मानितात, यावरून "ढ" च्या पुढल्या "क्ष" नें म्हटल्याप्रमाणें शेतकऱ्यांबरोबर ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

एकंदर सर्व भटब्राह्मण आपल्या देवळांतील दगड, धातूच्या मूर्तीस शूद्र शेतकऱ्यांस स्पर्शसुद्धां करूं देत नसून, दुरून कां होईना, त्यांस आपल्या पंक्तिशेजारीं बसवून जेऊं न घालतां त्यास न कळवितां, आपल्या पात्रांवरील उरलेलें उष्टें तूप त्यांस घालून त्यांच्या पंक्ति उठवतात. यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

हजरत महमद पैगंबराच्या निस्पृह शिष्यमंडळींचें जेव्हां या देशांत पाऊल पडलें, तेव्हां ते आपल्या पवित्र एकेश्वरी धर्माच्या सामर्थ्यानें आर्यभटांच्या मतलबी धर्माचा फट्टा उडवूं लागले. यावरून कांहीं कांहीं शूद्र मोठ्या उत्साहानें महमदी धर्माचा स्वीकार करूं लागले, तेव्हां बाकी उरलेल्या अक्षरशून्य शूद्रांस नादीं लावण्याकरितां महा धूर्त मुकुंदराज भटांनीं संस्कृतच्या उताऱ्यावर थोडी नास्तिक मताची कल्हई करून त्याचा विवेकसिंधु नामक एक प्राकृत ग्रंथ करून त्यांच्यापुढें मांडला, व पुढें इंग्रज

---

१. Sir William Jones, Vol. II, page 224.
It is, indeed, a system of despotism and priestcraft, both limited by law, but artfully conspiring to give mutual support, though with mutual checks; it is filled with strange conceits in metaphysicks and natural philosophy, with idle superstitions and with a scheme of theology most obscurely figurative and consequently liable to dangerous misconception; it abounds with minute and childish formalities with ceremonies generally absurd and often ridiculous.

बहादराचा अम्मल होईतोपावेतों आर्यभटांनीं आपल्या भाकड भारतरामायणांतील शेतकऱ्यांस गोष्टी सांगून, त्यांना उलटे मुसलमान लोकांबरोबर लढण्याचें नादीं लाविलें; परंतु अक्षरशून्य शेतकऱ्यांस मुसलमानांच्या संगतीनें आपल्या मुलांस विद्या शिकविण्याचें सुचूं दिलें नाहीं. यामुळें इंग्लिश अम्मल होतांच सहजच एकंदर सर्व सरकारी खात्यांनीं मोठमोठ्या महत्त्वाच्या जागा आर्यब्राह्मणांस मिळून ते सर्वोपरी शेतकऱ्यास लुबाडून[1] खाऊं लागले व आर्यभट, इंग्रज वगैरे एकंदर सर्व युरोपियन लोकांस जरी मांगा-महारासारखे नीच मानीत आहेत, तथापि त्यांच्या महाधूर्त पूर्वजांनीं महापवित्र मानलेले वेद, ज्यांचीं शेपटेंसुद्धां शूद्र शेतकऱ्यांच्या दृष्टीस पडूं देत नाहींत, ते सोंवळे बुरख्यांतील वेद, हल्लीं त्यांच्यांतील मोठमोठाले जाडे विद्वान् काखेंत मारून गोऱ्या म्लेंछ लोकांच्या दारोदार जाऊन त्यांस शिकवित फिरतात. परंतु हे भटब्राह्मण खेडयापाडयांनीं सरकारी शाळांत शूद्र शेतकऱ्यांच्या अज्ञानी मुलांस साधारण विद्या शिकवितांना थोडी का आवडनिवड करतात ? यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

एकंदर सर्व धार्मिक मिशनरी वगैरे युरोपियन लोकांच्या योगानें परागंदा झालेल्या शेतकऱ्यांच्या मुलांस मोठमोठाल्या शहरीं थोडीशी विद्या प्राप्त झाल्याबरोबर त्यांस गोऱ्या कामगारांच्या दयाळूपणामुळें चुकून आपल्या कचेऱ्यांनीं जागा दिल्या कीं, एकंदर सर्व कचेऱ्यांतील भटकामगार त्यांच्याविषयीं नाना प्रकारच्या नालस्त्या गोऱ्या कामगारांस सांगून त्यांना अखेर कामावरून हांकून देववितात व कित्येक भटकामगार आपल्या वरच्या सरकारी गोऱ्या कामगारांच्या मेहेरबान्या होण्याकरितां, अज्ञानी शेतकऱ्यांचे पिकपाण्याविषयीं भलत्यासलत्या लांड्यालबाड्या त्यांस सांगून शेतकऱ्यांची योग्य दाद लागण्याचे मार्गांत आडफाटे घालून त्यांस चळाचळा कांपावयास लावितात. यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

आर्यब्राह्मणांपैकीं एकंदर सर्व वैदिक, शास्त्री, कथाडे, पुराणिक वगैरे भटभिक्षुक नाना प्रकारचीं संधानें लढवून अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांपैकीं भोंसले, शिंदे, होळकर वगैरे राजेरजवाडयांस पोंकळ धर्माच्या बहुरूपी हुलथापा देऊन त्यांस यजमान म्हणतां म्हणतां त्यांजपासून शेकडों ब्राह्मण-भोजनें, प्रतिदिवशीं गोप्रदानें व दानधर्म उपटीत असून भटब्राह्मणांच्या जातींतील पंतप्रतिनिधी, सचीव, सांगलीकर वगैरे ब्राह्मण संस्थानिकांनीं दुष्काळांतसुद्धां आपल्या यजमान शूद्र शेतकऱ्यांच्या मंडळास, साधीं कां होईनात, भोजनें देऊन त्यांचें वंदन करून आशिर्वाद घेत नाहींत. व त्यांच्यापैकीं बहुतेक विद्वान् ब्राह्मण, गायकवाड वगैरे शूद्र संथानिकांकडून हल्लीं हजारों रुपयांचीं वर्षासनें व नित्यशः खिचड्या उपटीत असल्याबद्दल उपकार मनीं स्मरून ब्राह्मण

१. A Sepoy Revolt by Henry Mead, page 225.

संस्थानिकांपैकीं एकानेंही एखाद्या शेतकऱ्याच्या मुलास अन्नवस्त्र पुरवून त्यास विद्वान करवलें नाहीं. यावरून शेतकऱ्यांबरोबर आर्य ब्राह्मणांची एकी कशी होऊं शकेल ?

एकंदर सर्व श्रीमंत भटब्राह्मणांचे घरीं, दररोज भिक्षा वाटतांना आवडनिवड करून ब्राह्मण भिकाऱ्यांस तांदूळ, व शूद्र, मुसल्मान वगैरे भिकाऱ्यांस चिमूटचिमूट जोंधळे दिले तर दिले, नाहीं तर, पुढें हो, म्हणून सांगतात. यावरून आर्य भटब्राह्मणांपेक्षां परदेशी टक्कर जज्जसाहेबांसारखे परधर्मी युरोपियन खासे म्लेंच्छ, लाख वाट्यानें दयाळू म्हणावें कां नाहीं बरें ? कारण ज्यांनीं आपल्या स्वतःच्या कमाईतून ब्राह्मणांस, शूद्रांपैकीं कित्येक अनाथांचे मुलांस तुकडे घालून त्यांस इंग्रजी शिकविल्यामुळें हे आतां गोऱ्या कामगारांच्या पायावर पाय देऊन त्यांच्याबरोबर सरकारी हुद्यावर डुरक्या फोडीत आहेत. अहो, याचेंच नांव समज ! याचेंच नांव दया ! याचेंच नांव उपकार ! आणि याचेंच नांव उन्नती ! नाहीं तर आर्य भट ब्राह्मणांची कामापुरती एकी आणि काम सरल्यावर तूं तिकडे आणि मी इकडे. कारण "ये गे कोयी तुझी डोयी भाजून खाई आणि माझी डोयी ब्याला ठेवी" या जगप्रसिद्ध म्हणीप्रमाणें भटब्राह्मणांचें अघळपघळ कल्याण होणार आहे. परंतु आर्य विद्वज्जनांस, जर खरोखर या देशांतील सर्व लोकांची एकी करून या देशाची उन्नति करणें आहे, तर प्रथम त्यांनीं आपल्या विजयी व पराजितांमधील चालत आलेल्या दुष्ट धर्मास[१] जलसमाधी देऊन, त्या जुलमी धर्मानें नीच केलेल्या शूद्रादि अतिशूद्र लोकांसमक्ष उघड रीतीनें, आपल्या वेदांत मतासह जातीभेदाचे उरावर थयथया नाचून कोणाशीं भेदभाव न ठेवितां, त्यांच्याशीं कृत्रीम करण्याचें सोडून निर्मळपणें वागूं लागल्याशिवाय सर्वांची खरी एकी होऊन या देशाची उन्नती होणें नाहीं. कदाचित् आर्यभटांनीं आपल्या वडिलोपार्जित धूर्ताईनें शूद्रांतील शेंपन्नास अर्धकच्च्या विद्वानांस हातीं धरून या देशांतील एकंदर सर्व लोकांत कामापुरती एकी करून देशाची क्षणिक उन्नत्ति केल्यास, ती त्यांची उन्नत्ति फार दिवस रहाणार नाहीं. जसें भट ब्राह्मणांनीं, जर शूद्रांतील पोटबाबूयस, फेस करूं लागणाऱ्या चोंबड्या साडेसातीस सामील करून हे हिरव्या बागेंतील बंदछोड आंब्यांच्या कैऱ्या तोडून आढी लावितील, तर पुढें मौल्यवान होणाऱ्या आंब्यासह वाळल्या गवताचा नाश करतील आणि तेणेंकरून एकंदर सर्व वाकबगार शेतकऱ्यांस खालीं माना घालाव्या लागतील, हें माझें भाकीत त्यांनीं आपल्या देवघरांत गोमुखींत घालून सांभाळून ठेवावें, असें माझें त्यांस निक्षून सांगणें आहे.

आतां मी थंडगारशा हवाशीर रमणीय सिमला पर्वतावर जाऊन कांहीं विश्रांति घेऊन आपल्या परम दयाळू गव्हरनरसाहेबांसमक्ष आपल्या समुद्राचे पलीकडील सरकारच्या नांवानें हाका मारून त्यांस शूद्र शेतकऱ्यांची सुधारणा करण्याविषयीं उपाय सुचवितों :—

---

१. A Sepoy Revolt, by Henry Mead, page 227.

आतां आमच्या नीतिमान धार्मिक सरकारनें केवळ द्रव्यलोभ एकीकडे ठेऊन शेतकऱ्यांचे आचरणावर डोळा ठेवण्याकरितां डिटेक्टिव्ह डाक्टरांच्या नेमणुका करून शेतकऱ्यांनीं आपल्या गैरशिस्त आचरणावरून प्रकृति बिघडल्यास व चोऱ्या, छिनाल्या वगैरे नीच आचरण केल्यास त्यांस योग्य शिक्षा करण्याविषयीं चांगला बंदोबस्त केल्याविना ते नीतिमान होणें नाहींत. शूद्र शेतकऱ्यांनीं एकीपेक्षां जास्त बायका करूं नयेत व त्यांनीं आपल्या मुलीमुलांचीं लग्नें लहानपणीं करूं नयेत म्हणून कायदा केल्याविना संतती बळकट होणें नाहीं. सरकारी गोऱ्या कामगारांस एकंदर सर्व प्रकरणांत गैरमाहिती असल्यामुळें, भटब्राह्मणांच्या संख्याप्रमाणापेक्षां कामगारांच्या जास्ती नेमणुका होऊं लागल्यामुळें, त्यांच्यावर शेतीं खपून गांवांत चिखलमातीचीं कामें करून, त्यांच्या स्त्रियांवर भर बाजारांत हेलपाट्या करून पोटें भरण्याचा प्रसंग गुदरत नाहीं. शिवाय शेतकरी अज्ञानी असल्यामुळें भटब्राह्मणांस जातीभेदापासून अनंत फायदे होतात. यावरून ब्राह्मणांतील सरकारी कामगारासहित पुराणिक, कथाडे, शाळेंतील शिक्षक वगैरे ब्राह्मण, जातीभेद मोडूं नये म्हणून आपला सर्व धूर्तपणा खर्ची घालून रात्रंदिवस खटपट करीत आहेत. यास्तव शूद्र शेतकऱ्यांचीं मुलें सरकारी हुद्दे चालविण्यालायक होईतोंपावतों ब्राह्मणांस त्यांच्या जातीच्या संख्येच्या मानापेक्षां सरकारी हुद्याच्या जागा जास्ती देऊं नयेत व बाकी उरलेल्या सरकारी हुद्यांच्या जागा मुसलमान अथवा हिंदू ब्रिटन लोकांस देऊं लागल्याशिवाय ते ( ब्राह्मण ) शूद्र शेतकऱ्याचे विद्येचे आड येण्याचें सोडणार नाहींत. हें त्यांचें कृत्रिम एकंदर सर्व सरकारी खात्यांनीं त्यांचाच भरणा असल्यामुळें, परदेशी गोऱ्या कामगारांच्या नजरेस येण्याचे मार्ग बंद जाहले आहेत. यामुळें, ब्राह्मणांची जात मात्र विद्वान व श्रीमान, व शूद्र शेतकरी हे अन्नवस्त्रासही मोताद होऊन कधीं कधीं ब्राह्मणांचे अंकित होऊन त्यांच्या बंडांत सामील होऊन आपल्या जिवास मुकतात. शिवाय भटब्राह्मणांनीं आपल्या कृत्रिमी धर्माची शूद्र शेतकऱ्यांवर इतकी छाप बसविली आहे कीं, ब्राह्मणांच्या सांगण्यावरून त्यांनीं केलेले खून अथवा गुन्हे इनसाफ होतेवेळीं ते ब्राह्मणास पुढें न करतां आपल्या माथ्यावर घेऊन त्याबद्दल शिक्षा भोगण्यामध्यें पुण्य मानितात. यामुळें पोलीस व न्यायखात्याचे श्रम वायां जातात. यास्तव शूद्र शेतकऱ्यांचे मुलांस विद्वान करण्याकरितां त्यांच्या जातींतील, स्वतः पाभारी, कोळपी व नांगर हाकून दाखविणारे शिक्षक तयार करून, त्यांच्या शाळेंत शेतकऱ्यांनीं आपलीं मुलें पाठविण्याविषयीं कायदा करून, प्रथम कांहीं वर्षें त्यांच्या परीक्षा घेण्याकरितां हलक्या इयत्ता करून, त्यांस ब्राह्मणांच्या मुलांसारख्या पदव्या देण्याची लालूच दाखवून त्यांच्या मुलीमुलांच्या लग्नांत लग्नविधी करण्याविषयीं परजातीनें जुलूम करूं नये, म्हणून बंदोबस्त केल्याशिवाय शूद्र शेतकऱ्यांत विद्या शिकण्याची गोडी उत्पन्न होणें नाहीं. व पुढें शूद्र गांवकऱ्यांचीं मुलें, जीं मराठी सहावे इयत्तेसह नांगर, पाभर, व कोळपी हाकण्याची परीक्षा देऊन सद्गुणी निवडतील, त्यांस मात्र पाटिलक्या

द्याव्यात, म्हणून आमचे दयाळू सरकारनें कायदा केल्याबरोबर हजारों शेतकरी पाटिलक्या मिळविण्याचे चुरशीनें आपलीं मुलें विद्वान करण्याकरतां मोठ्या आनंदानें शाळेंत पाठवितील व असे शिकलेले सद्‌गुणी गांवोगांव पाटील असल्यापासून, एकंदर सर्व खेड्यापाड्यांतील धूर्त भटकुळकर्ण्यांस अज्ञानी शेतकऱ्यांस आपआपसांत कज्जे करितां येणार नाहींत व तेणेंकरून शेतकऱ्यांसह आमचे सरकारचे मोठमोठाले अनिवार फायदे होऊन थोड्याच काळांत हल्लींपेक्षां शूद्र शेतकऱ्यांस जास्ती शेतसारा देण्याची ताकद येऊन निरर्थक येथील पोलीस व न्यायखातीं फुगलीं आहेत, त्यांचें मान सहज कमी करतां येईल. याशिवाय आमचे सरकारनें हिंदुस्थानांत सरकारी कामें करण्यालायक मुळींच भटब्राह्मण नाहींत, असें आपल्या मनांत समजून, जसजसे शूद्र शेतकरी सरकारी शाळेंत विद्वान तयार होत जातील, तसतशा त्यांस मामलेदार वगैरे सरकारी कचेऱ्यांत लहानमोठ्या जागा देऊन, त्यांस तीं कामें करावयास शिकविल्याशिवाय शेतकऱ्याचे पाय थारीं लागून सरकारचा वसूल वाढणेंच नाहीं. हल्लीं आमच्या सरकारनें गुजरमारवाड्यांच्या देवघेवींच्या दगलबाज्यांवर डोळा ठेविला आहे, त्यापेक्षां त्यांच्या दुकानांतील कुजक्या जिनसा व खोट्या मापांसह दारूबाज पाटलावर चांगली नजर ठेविली पाहिजे.

असो. आतां आपल्या सरकारास अक्षरशून्य अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांचे निकस झालेल्या शेतांची सुधारणा करण्याविषयीं उपाय सुचवितों ते—

आमच्या दयाळू सरकारानें एकंदर सर्व शेतकऱ्यांस युरोपियन शेतकऱ्यांसारखें विद्याज्ञान देऊन, त्यांस त्यांसारखीं यंत्रद्वारें शेतीं कामें करण्यापुरती समज येईतों पावेतों एकंदर सर्व गोऱ्या लोकांसह मुसलमान वगैरे लोकांनीं हिंदुस्थानांतील तूर्त गायाबैलांसह त्यांचीं वासरें कापून खाण्याचे ऐवजीं, त्यांनीं येथील शेळ्याबकरीं मारून खावींत; अथवा परमुलखांतील गायाबैल वगैरे खरेदी करून येथें आणून मारून खावे, म्हणून कायदा करून अमलांत आणल्याशिवाय, येथील शूद्र शेतकऱ्यांजवळ बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची मशागत भरपूर करतां येणार नाहीं व त्यांजवळ शेणखताचा पुरवठा होऊन त्यांचा व सरकारचा फायदा होणें नाहीं. एकंदर डोंगरपर्वतावरील गवत-झाडाच्या पानफुलांचें, व मेलेल्या कीटकश्वापदांचें, मांसहाडांचें कुजलेलें सत्व, वळवाच्या पावसानें धुपून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढ्याखोड्यांत वायां जाऊं नये, म्हणून आमच्या उद्योगी सरकारानें सोयीसोयीनें काळ्यागोऱ्या लष्करासह पोलीसखात्यांतील फालतु शिपायांकडून जागोजाग तालीवजा बंधारे अशा रितीनें बांधावे कीं, वळवाचें पाणी एकंदर शेतांतून मुरून नंतर नदीनाल्यास मिळावें. असें केल्यानें शेतें फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायांस हवाशीर जाग्यांत उद्योग करण्याची संवय लागल्या-बरोबर त्यांस रोगराईची बाधा न होतां बळकट होतील. त्यांनीं दररोज एक आणा किंमतीचें जरी इमानेंइतबारें काम केलें, तरी सालदरसाल पंचवीस लक्षांचे वर सरकारच्या

स्थावरमत्तेंत भर पडणार आहे. कारण हल्लीं आमचे खबरदार सरकारजवळ पोलीस खात्यासह पल्टणी शिपाई सुमारें दोन लक्ष आहेत. त्याचप्रमाणें आमच्या दयाळू सरकारनें एकंदर सर्व डोंगरटेकड्यांमधील दऱ्याखोऱ्यांनीं तलावतळीं, जितकीं होतील तितकीं सोयीसोयीनें बांधून काढावींत. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशांत ओढ्याखोड्यांनीं भर उन्हाळ्यांत पाणी असल्यामुळें जागोजाग लहानमोठीं धरणें चालून एकंदर सर्व विहिरींस पाण्याचा पुरवठा होऊन, त्यांजपासून सर्व ठिकाणीं बागाइती होऊन शेतकऱ्यांसहित सरकारचा फायदा होणार आहे. एकंदर सर्व शेतें धूपून त्यामध्यें खोंगळ्या पडूं नयेत, म्हणून सरकारनें शेतकऱ्यांपासून पाणलोटाच्या बाजूनें शेतांच्या बांधांनीं वरचे वर ताली दुरुस्त ठेवाव्यात. आमचे दयाळू सरकारनें आपल्या राज्यांतील एकंदर सर्व शेतांच्या पहाण्या, पाणाड्यांकडून करवून, ज्या ज्या ठिकाणीं दोनग्या मोटांचे वर पाण्याचे झरे सांपडतील, असा अदमास निघेल, त्या सर्व जाग्यांच्या खुणा त्या त्या गांवच्या नकाशांनीं नमूद करून केवळ सरकारच्या मदतीशिवाय पाण्याचा मार्ग दाखविणाऱ्या पाणड्यासह विहिरी खोदून, बांधून काढणाऱ्या शूद्र शेतकऱ्यांस लहानमोठीं बक्षिसें सरकारांतून देण्याची वहिवाट घालावी व एकंदर सर्व नदीनाले व तलावांतील सांचलेला गाळ पूर्वींप्रमाणें शेतकऱ्यांस फुकट नेऊं द्यावा व ज्या ज्या गांवचीं गावरानें आमचे सरकारनें आपल्या "फारेस्टांत" सामील केलीं असतील, तीं सर्व त्या त्या गांवास परत करून फक्त सरकारी हद्दींतील सरपण व शेतास राब खेरीज करून, विकण्याकरितां इमारती लांकडें मात्र तोडूं न देण्याविषयीं सक्त कायदा करून, जुलमी फारेस्टखात्याची होळी करावी. खुद्द आमचे खासे सरकारनें परिश्रम करून आपल्या खजिन्यांतून थोडेसे पैसे खर्ची घालून, इतर देशांतील नाना प्रकारच्या उत्तम उत्तम शेळ्यामेंढरांचीं बेणीं खरेदी करून या देशांत आणवून त्यांची येथें अवलाद उत्पन्न केल्याबरोबर येथील एकंदर सर्व शेतांस त्यांच्या लेंड्यामुतापासून झालेल्या खतांचा महामूर पुरवठा होऊन शेतें सुपीक होतील, व त्यांच्या लोंकरीपासून शूद्र शेतकऱ्यांस फायदा होईल. आमच्या सरकारी जंगलांतील रानटी जनावरांपासून शूद्र शेतकऱ्यांच्या शेतांचा बच्याव करण्यापुरत्या गांवठी तोड्याच्या कां होईनात, जुन्या डामीस बंदुका शूद्र शेतकऱ्यांजवळ ठेऊं देण्याची जर आमचे सरकारची छाती होत नाहीं, तर सरकारनें तें काम आपल्या निर्मळ काळ्या पोलीसखात्याकडे सोंपवून, त्या उपर शेतकऱ्यांच्या शेतांचें रानडुकरें वगैरे जनावरांनीं खाऊन नुकसान केल्यास तें सर्व नुकसान पोलीसखात्याकडील वरिष्ठ अंमलदारांच्या पगारांतून कापून अथवा सरकारी खजिन्यांतून शेतकऱ्यांस भरून देण्याविषयीं कायदा केल्याशिवाय, शेतकऱ्यांस रात्रीं पोटभर झोंपा मिळून त्यांस दिवसा आपल्या शेतीं भरपूर उद्योग करण्याची सवड होणें नाहीं. याचेंच नांव "मला होईना आणि तुझें साहिना!" आमचे दयाळू सरकारचे मनांतून जर खरोखर अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांचें बरें करून आपली पैदास वाढविणें आहे, तर त्यांनीं सालदरसाल श्रावणमासीं प्रदर्शनें करून

आश्विनमासीं शेतपिकांच्या व औतें हाकण्याच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यांस बक्षिसें देण्याची वाहिवाट घालून; दर तीन वर्षांच्या अंदाजावरून उत्तम उत्तम शेतकऱ्यांस पदव्या द्याव्यात व शेतकऱ्यांच्या विद्वान मुलांनीं एकंदर सर्व आपलीं शेतें उत्तम प्रकारचीं वजवून, त्यांनीं थोडथोड्या लोहारी, सुतारी कामांत परीक्षा दिल्यास, त्यांस सरकारी खर्चानें विलायतेंतील शेतकीच्या शाळा पाहण्याकरितां पाठवीत गेल्यानें इकडील शेतकरी तावडतोब आपल्या शेतकीची सुधारणा करून सुखी होतील. आमचे नीतिमान सरकारानें जोगतिणी, आराधिणी, मुरळ्या, कोल्हाटिणी व कसबिणींवर बारीक नजर ठेऊन, त्यांच्याकरितां तालुक्यानीहाय लॉकइसपितळें ठेऊन, मुरळ्या, कोल्हाटिणी, कसबिणी, तमासगीर, नाटककार, कथाडे वगैरे लोकांनीं कुनीतिपर गाणीं गाऊं नयेत, म्हणून त्यांजवर सक्त देखरेख ठेवून त्यांजला वरचेवर शिक्षा केल्यावांचून अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांच्या नीतीसह शरीरप्रकृत्यांमध्यें पालट होणें नाहीं. एकंदर सर्व इलाख्यांतील लष्करी व पोलीसखात्यांनीं शूद्रादि अतिशूद्र शेतकऱ्यांचा मोठा भरणा असून ते "इजिप्ट" व "काबुलांतील" हिरवट लोकांबरोबर सामना करितांना गोऱ्या शिपायांच्या पायांवर पाय देऊन मोठ्या शौर्यानें टकरा देऊं लागतात. एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्र शेतकरी आपल्या मुलांमाणसांसह रात्रंदिवस ऊर पिकेतों शेतीं कष्ट करून, सरकारास कर, पट्ट्या, फंड वगैरे जकातीद्वारें सालदरसाल कोट्यावधि रुपयांचा भरणा करीत आहेत. तथापि शूद्र शेतकऱ्यांच्या मुलांस शेतकीसंबंधीं ग्रंथ अथवा नेटिव्ह वर्तमानपत्रांतील शेतकीसंबंधीं सूचनासुद्धां वाचण्यापुरतें ज्ञान आमच्या धर्मशील सरकाराच्यानें देववत नाहीं. व शेतकऱ्यापैकीं लक्षाधिश कुटुंबास वेळच्या वेळीं पोटभर भाकर व आंगभर वस्त्र मिळण्याची मारामार पडली असून, त्यांच्या सुखसंरक्षणाच्या निमित्यानें मात्र आमचें न्यायशील सरकार लष्करी, पोलीस, न्याय, जमाबंदी वगैरे खात्यांनीं चाकरीस ठेविलेल्या कामगारांस मोटमोठाले जाडे पगार व पेनशनी देऊन अतोनात द्रव्य उधळतें, याला म्हणावें तरी काय!!! कित्येक आमचे सरकारचे नाकाचे बाल, काळे व गोरे सरकारी कामगारांनीं, हजारों रुपये दरमहा पगार खाऊन तीस-पस्तीस वर्षें सरकारी हुद्दे चालविले कीं, त्यांस आमचें सरकार दरमहाचे दरमहा शेंकडों रुपये पेनशनें देतें. बहुतेक काळे वगैरे सरकारी कामगार, सरकारी कचेऱ्यांनीं कामें करण्यापुरते अशक्त, आंधळे बनून खंगल्याचीं सोंगें आणून भल्या भल्या युरोपियन डाक्टर लोकांच्या डोळ्यांत माती टाकून पेनशनी उपटून, गोरे पेनशनर विलायतेस पोबारा करितात व काळे पेनशनरांपैकीं कित्येक, जसे काय आतांच येशू ख्रिस्त योगी महाराजांनीं मेलेल्यामधून उठविल्यासारखे तरुण पठ्ठे बनून, मिशांवर कल्पाची काळी जिल्हई देऊन म्युनिसिपाल व व्यापाऱ्यांच्या कचेऱ्यांनीं मोठमोठ्या पगारांच्या चाकऱ्या पतकरून हजारों रुपयांच्या कमाया करून आपल्या तुंबड्या भरीत आहेत. आमचे खबरदार सरकारनें एकंदर सर्व सरकारी खात्यांतील काळे गोरे शिपायांसहित लष्करी डोलीवाले,

बांधकामाकडील लोहार, सुतार, बिगारी वगैरे हलके पगारी चाकरांच्या पगारांत काडीमात्र फेरफार न करितां बाकी सर्व मोठमोठ्या काळ्या व गोऱ्या कामगारांचे वाजवीपेक्षां जास्ती केलेले पगार व पेनशनी देण्याचें हळूहळू कमी करावें. सदरीं लिहिलेल्या गोष्टींचा विचार केल्याविना आमचे सरकारचे राज्याचा पाया या देशांत मुस्तकीम होऊन, अक्षरशून्य शेतकऱ्यांच्या कपाळच्या लंगोट्या जाऊन त्यांचे हल्लींचे उपास काढण्याचे दिवस कधींच जाणें नाहींत.

सारांश एकंदर सर्व आसूडाच्या प्रकरणांत शूद्रांपैकीं बडे बडे राजेरजवाडे व लहान-सहान अज्ञानी संस्थानिकांच्या, व अतिशूद्रांच्या लाजीरवाण्या स्थितीविषयीं बिलकुल वर्णन केलें नाहीं. याचें कारण, पहिले आपल्या पोकळ वैभवामुळें व दुसरें आपल्या दुर्दैवामुळें शूद्र शेतकऱ्यांपासून ते दुरावले आहेत. याकरितां फक्त येथें मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शूद्र शेतकऱ्यांच्या दैनवाण्या स्थितीविषयीं ठोकळ ठोकळ मुद्यांचें आवडधोबड वर्णन करून येथील गव्हरनरसाहेबांचे रहाते शहरांत व गव्हरनर जनरलसाहेबांचे अमलांत, आमचे समुद्राचे पलीकडील खासे विलायती सरकारास कळविलें आहे. याउपर आमचे सरकारांस ब्राह्मणांच्या मुलांनीं शेवटचें पाणी पाजून मुक्त करावें, अशी जर त्यांची इच्छाच असेल, तर त्यांनीं शूद्र शेतकऱ्यांचीं हाडें पिळून गोळा करीत आलेल्या रायलफंडातून सालदरसाल मोठमोठ्या रकमा खर्ची घालून ब्राह्मणांचे मुलांस विद्वान करण्याची वहिवाट कायम ठेवावी. त्याविरुद्ध[1] तूर्त माझें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु त्यांनीं फक्त शेतकऱ्यांच्या मुलांस विद्या देण्याची थाप देऊन वसूल करीत आलेला एकंदर सर्व लोकल फंड तेवढा तरी निदान शेतकऱ्यांच्या मुलांस[2] मात्र इमानेंइतबारें विद्या देण्याचे कामीं खर्ची घालूं लागल्यास मी इतके दिवस श्रम केल्याचें फळ मिळालें, असें समजून मोठा आनंद मानीन. परंतु त्यांनीं तसें जर नाहीं केलें, तर ते देवाजीजवळ जबाबदार होतील.

आतां प्रथम मी लहान असतांना, माझे आसपासचे शेजारी मुसलमान खेळगडी यांच्या संगतीनें मतलबी हिंदुधर्माविषयीं व त्यांतील जातिभेद वगैरे कित्येक खोट्या मतांविषयीं माझ्या मनांत खरे विचार येऊं लागले, त्याबद्दल त्यांचे उपकार स्मरतों. नंतर पुण्यांतील स्कॉच मिशनचे व सरकारी इन्स्टीटयूशनचे–ज्यांच्या योगानें मला थोडेंबहुत ज्ञान प्राप्त होऊन मनुष्यमात्राचे अधिकार कोणते, हें समजलें व ज्या ज्या युरोपियन धार्मिक गृहस्थांनीं त्यांस द्रव्यद्वारें मदत केली असेल, त्यांचे व तसेच ज्या इंग्रज सरकारच्या स्वतंत्र राज्यपद्धतीमुळें हे विचार मला निर्भयपणें बाहेर काढितां आले, त्या सरकारचे अभार मानून व या सर्वांच्या आपल्या पुत्रपौत्रांसह बढती

1. A Sepoy Revolt by Henry Mead, pages 69 and 235.
2. Pages 301, 308, 313.

होण्याविषयीं आपल्या दयाळू सृष्टीचालक शक्तीची प्रार्थना करून, ती या माझ्या अज्ञानी, अभागी शूद्र शेतकऱ्यांचे डोळे उघडून शुद्धीवर येण्याविषयीं त्यांच्या मनांत प्रेरणा करील, अशा उमेदीनें धीर धरून, तूर्त या माझ्या आसुडाचा फटका लागल्यामुळें पाठीमागें वळून कोण कोण पहातो, हें बघत स्वस्थ बसतों.

तारीख १८
बुधवार
माहे जुलई
सन ई. १८८३
पुणें, पेठ जुनागंज.

**जोतीराव गोविंदराव फुले**
सत्यशोधक समाजाचे सभासद.

# परिशिष्टें

हा आसूड लिहितेवेळीं कित्येक गृहस्थांचें व माझें यासंबंधें बोलणें जाहलें. त्यापैकीं नमुन्याकरितां पुढें दोन मासले दिले आहेत.

१

## खासा मराठा ह्मणविणारा

आसुडाचा दुसरा भाग संपून दुसरें काम हातांत घेतों आहें, इतक्यांत एक ब्राह्मण चक्रीदार पागोटें घातलेला गृहस्थ माझ्यापुढें लोडाशीं टेंकून बसल्यानंतर, तेथील प्रत्येक सामानसुमानाकडे न्याहाळून पहात आहे. तों इकडे माझे मनांत आलें कीं, हे गृहस्थ मारवाड्यांतील म्हणावें, तर त्यांच्या पागोट्याखालीं तीन शेंड्या लोंबत नव्हत्या. शिंप्यांतील म्हणावें, तर पागोट्यावर जागोजाग सुया टोंचलेल्या नव्हत्या. सोनारांतील म्हणावें, तर त्यांचे बाहूपुढें उराड निघालें नव्हतें. व ब्राह्मणांतील म्हणावें, तर त्यांना दोनचार शब्द बोलतांना ऐकलें नव्हतें. यावरून ते कोणत्या वर्गांपैकीं असावेत, म्हणून मीं अनुमान करीत आहें, तोंच त्यांनीं आपला मोहरा मजकडे फिरवून, आपणहूनच मला प्रश्न केला कीं, –"तुम्ही मला ओळखलें नाहीं काय?" मी म्हणालों, "नाहीं महाराज, मी तुम्हाला ओळखलें नाहीं. माफ करा." गृहस्थ म्हणाला, "मी मराठी कुळांतील मराठी आहें." मी–"तुम्ही मराठे असाल परंतु तुमची जात कोणती?" गृ०–"माझी जात मराठे." मी–"महाराष्ट्रांत जेवढे म्हणून महारापासून तों ब्राह्मणापर्यंत लोक आहेत, त्या सर्वांसच मराठे म्हणतात. तरी तुम्ही अमुक जातीचे आहांत याचा उलगडा तेवढ्यानें होत नाहीं." गृ०– "तर मी कुणबी आहें असें समजा." मी–"बरें, तुम्ही काय उद्योग करीत असतां?" गृ०–"सातार्‍यांतील अप्पासाहेब महाराजांस निंबाजवळच्या भागूबाई तारूकशणीचा नाद लागण्याचे पूर्वी आमच्या घराण्यानें त्यांजपासून एकदोन लक्ष रुपये सहजांत कमावून आणले होते; ते आम्हीं हा काळपावेतों हरी हरी करून स्वस्थ खात बसलों आहों. तुमचे दयाराम आत्माराम एकीकडे आणि आम्ही एकीकडे." मी–"बरें तर, आपण आपली पायधूळ इकडे कां झाडिली?" गृ०–"मला कांहीं तुम्हांजवळ मागणें नाहीं, परंतु मी असें ऐकतों कीं, आपली समज अशी झाली आहे कीं, सरकारी खात्यांत ब्राह्मण कामगार असल्यामुळें ते शेतकर्‍यांस फार नाडितात, व शेतकरी कामगार झाल्यास ते अशा लबाड्या करणार नाहींत." मी–"होय. माझ्या मतें एकंदर सर्व सरकारी खात्यांत

शेतकऱ्यांपैकीं त्यांच्या संख्येच्या प्रमाणानें कामगार झाल्यास ते आपल्या जातबांधवांस इतर कामगारांसारखें नाडणार नाहींत." गृ०–"तें कसें ?–याविषयीं माझी तर एकदां खात्री करा." मी–"तुम्ही अशी कल्पना करा कीं, उद्यां जर कलेक्टरसाहेबांनीं फौजदारीचे कामावर तुमची नेमणूक केली व तुमचे भाऊबंद व शेजारीपाजारी जातवाल्या शेतकऱ्यांचे आपआपसांत माराकुट्टे होऊन ते तंटे तुमचे पुढें आल्यास तुम्ही त्यांचा इनसाफ करतांना त्यांस अरेतुरे म्हणाल कां ?" गृ०–"नाहीं." मी–"कां बरें ?" गृ०–"ते माझे भाऊबंद किंवा जातवाले असणार, व मी ज्यांच्यांत लहानाचा मोठा झालों, त्यांना अरेतुरे म्हणण्याविषयीं माझी जीभ तरी कशी लवेल ?" मी–"तुमच्यानें आपल्या जातवाल्यांपैकीं एकापासून लांच खाऊन त्याबद्दल दुसऱ्यास गुन्हेगार ठरवून त्यास दंड अथवा ठेपा मारवतील काय ?" गृ०–"नाहीं, तसें कधींही मजपासून होणार नाहीं." मी–"कां बरें ?" गृ०–"कारण फौजदारीची जागा आज आहे आणि उद्यां नाहीं, त्याचा काय भरंसा ? एखाद्या चोंबडया चाकरानें कलेक्टरचे कान फुंकले कीं फौजदारीची जागा नाहींशी होणार. परंतु माझा ज्यांच्यांशीं रोटीव्यवहार, माझा ज्यांच्यांशीं बेटीव्यवहार, त्यांच्यांशीं वांकडा होऊन माझ्या मुलीमुलांस मुरळ्या वाघे करूं कीं काय ? त्यांच्या मुलाबाळांमध्यें माझ्या मुलाबाळांना सारे जन्म काढावयाचे आहेत. त्यांचीं आढीं माझ्या आढ्यांशीं लागलीं आहेत. त्यांच्या माझ्या पोरासोरांची खेळण्याची जागा एक. त्यांचा माझा पानवठा एक. त्यांचा माझा बांधपेंडवला एक. त्यांचीं माझीं गुरें चारण्याचें गायरान एक. आम्ही आपल्या पडत्या काळीं एकमेकांचे विळे, गोल्ह्या, फासा, फाळ, दोऱ्यादोरखंडाचा व औतकाठ्यांचा उपयोग करितों. आम्हीं आपल्या सोईकरितां एकमेकांचे हेले, बैल, वारंगुळ्यानें देतों, घेतों. रात्रींबेरात्रीं आमच्या एकमेकांच्या कुटुंबांतील स्त्रिया एकमेकींस तेलमीठ, दाणादुणा उसनापासना देतात व घेतात. आम्ही एकमेकांच्या स्त्रियांचे प्रसूतकाळीं त्यांच्या तान्हा बच्यासाठीं न्हाण्या खांदून बाळंतिणी-करितां लगोलग बाजा आणून देतों. आमच्या त्यांच्या रीतिभाती व चालचलणुकी एक. आमचें त्यांचें खाणेंपिणें व पोषाक एक. आमचें त्यांचें देवदेवक एक. आमचे त्यांचे कुळस्वामी एक. आम्ही एकमेकांचे घरास लागलेल्या आगी विझवतों. आमची त्यांची मृत[1]–क्रिया एक असल्यामुळें, आम्ही एकमेकांचे मूठमातीस मदत करूं, एकमेकांच्या मुलाबाळांचें शांतवन करण्याकरितां आपआपल्या घरच्या भाकरी व कोरड्यास घेऊन, त्यांचे घरीं जाऊन त्यांस आपले ताटांत बरोबर घेऊन कड्ड घांस खातों, आणि अशा माझ्या जातबांधवांपासून लांच खाल्ल्यामुळें त्यांच्या माझ्या कुळांत हाडवैर करून घेऊं काय ?" मी–"यावरून तुम्हीच नीट विचार करून पहा कीं, ब्राह्मण कामगार अज्ञानी

१. पूर्वी शेतकऱ्यांची पुरती क्रिया असून ते या तीसचाळीस वर्षांचे अलिकडे क्रिया ब्राह्मणांचे देखेदेखीनें करूं लागले.

शेतकऱ्यांचे जातीचे नसल्यामुळें ते नाना प्रकारच्या लबाड्या करून निराश्रित अक्षरशून्य शेतकऱ्यांस आपल्या जातीपेक्षां जास्त नाडीत असतील, असें तुमची मनदेवता तुम्हांस सांगत नाहीं काय ?" गृ०—"आतां याविषयीं माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं, परंतु हल्लीं शेतकऱ्यांपैकीं कांहीं विद्वान निपजले आहेत. ते तर शेतकऱ्यांवरील संकटें निवारण्याविषयीं एखादे ठिकाणीं जमून नुस्ती प्रसिद्धपणें चर्चासुद्धां करीत नाहींत. अहो, हे भेकड घरोघर++बाईचे नादांत असतां हे ब्राह्मण कामगारांच्या नांवानें कडाकडा बोटें मोडतात. परंतु बाह्यात्कारी ब्राह्मण कामगारांचे चोंबडे चाकर बनून चोंहोकडे लुबरेपणा करीत फिरतात." मी— "अहो, जेथें विद्याखात्याकडील कामगार एज्यूकेशन कमिशनापुढें एकजुटीनें साक्षी देतांना शेतकऱ्यांचे शिक्षणाविषयीं फारशी वाटाघाट न करितां कमिशनच्या डोळ्यांत धूळ टाकून, आमचे दयाळू गव्हरनर जनरलसाहेबांस फसवूं पहातात, तेथें या नेभळ्या शूद्र विद्वानांचा काय पाड ? त्यांनीं ब्राह्मण कामगारांच्या चुक्या काढणें तर एकीकडेसच. परंतु साधारण एजन्टीकडील क्षुल्लक ब्राह्मण कारकुनांस एखाद्यानें लवून मुजरा केला नाहीं कीं, वार्षिक दरबारांत त्याला भलत्या एखाद्या कोपऱ्यांत धक्काधक्कीची जागा मिळून, अखेरीस त्याच्या गळ्यांत बाशा सुकलेल्या हरदासी फुलांच्या माळा पडून, गुलाबदाणींतील जलासहित त्यांच्या मनगटावर कुजक्या तेलाचें मालण मिळून, चुन्याविणा एकदोन पानपट्या हातावर पडतात. कां, मी बोललों तें खरें आहे किंवा कसें ? आतां कां उत्तर देत नाहीं ? असो, तुमची मर्जी. यापुढें तरी बारीक चौकशी करून पुन्हां एथें मजबरोबर एकंदर सर्व ब्राह्मण कामगारांविषयीं वाद–विवाद करण्याकरितां या बरें." गृ०—"आतां मात्र माझी पक्की खात्री झाली कीं, एकंदर सर्व सरकारी खात्यांत भटब्राह्मण कामगारांचा भरणा झाल्यामुळें अज्ञानी शेतकऱ्यांचें व त्याबरोबर या शहाण्या सरकारचें पण अतोनात नुकसान होत आहे. हें या सरकारी खात्याकडील "डायरेक्टर"साहेबांस कसें कळत नाहीं ?" मी—"अहो बावा, "डायरेक्टर"—साहेबांनीं जर इतकी बारीक चौकशी करीत फिरावें, तर त्यांचा ऐषआराम कोणी भोगावा ?" गृ०—"काय हो, अशा सुधारल्या इंग्रजी राज्यांत इतका अंधेर तर पेशवाईंत अक्षरशून्य शेतकऱ्यांवर काय काय जुलुम झाले असतील, त्याची कल्पनासुद्धां करवत नाहीं. आतां येतों, लोभ असों द्यावा." इतकें बोलणें आटोपल्यावर सदहू गृहस्थ निघून गेला.

तारीख २ नोहेंबर
सन १८८२ ई० पुणें.

जो० गो० फु०
स० शो० स० स०

## २

# कबीरपंथी शूद्र साधू

आसूडचा तिसरा भाग लिहून तयार केल्यानंतर दुसरे दिवशीं तिसऱ्या प्रहरीं अंगावर भगवीं वस्त्रें, गळ्यांत तुळशीची माळ घातलेला मुंबईतील एक शूद्र जातीचा कबीरपंथी वाचाळ, पंढरपुरीं खेट्या घालणारा साधु, माझे घराचे अंगणांत येऊन बाकावर बसला. हें माझे घरचे मनुष्यानें मला घरांत येऊन कळविल्याबरोबर मी बाहेर येऊन त्यांस विचारलें कीं, "कां बुवासाहेब, आपण इकडे कां येणें केलें आणि आपली काय मर्जी आहे? तें सर्व कळल्यास मला फार संतोष होणार आहे." बु०– "तुम्हांसच जोतीराव फुले म्हणतात काय?" मी– "होय, याच देहाला जोतीराव फुले म्हणतात." बु०– "बरें तर, आपण हिंदु असून कांहीं इंग्रजी अभ्यास केल्यावरून आतांशे हिंदुधर्माचा धिःकार करूं लागलांत, यास्तव हिंदु धर्माचे मुख्य चार वेद ईश्वरी कृत्यें आहेत किंवा कसें, याविषयीं माझ्या मनाची खात्री करून घ्यावी–या इराद्यानें येथें मी आलों आहें." मी– "हिंदु धर्मातील चार वेद आपण आपल्या प्रत्यक्ष डोळ्यांनीं कोठें पाहिले आहेत काय?" बु०– "होय, ते चार वेद एक ब्राह्मणाचे घरीं मीं आपल्या प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिले आहेत." मी– "ते ग्रंथ ईश्वरानें स्वतः लिहिले याविषयीं तुम्ही कांहीं खात्रीलायक प्रमाण देऊं शकाल काय?" बु०– "त्याविषयीं ब्राह्मणांच्या गप्पाष्टकांशिवाय दुसरें खात्रीलायक प्रमाण नाहीं." मी– "असो, प्रथम ईश्वराला आकार आहे किंवा कसें?" बु०– "ईश्वराला आकार कोठून असणार? तो निराकार परमात्मा आहे." मी– "तर निराकार परमात्म्यानें चार वेद कसे तयार केले?" बु०– "त्याविषयीं ब्राह्मण लोक तुम्हांस उत्तर देतील. हें त्यांचें त्यांसच विचारा, म्हणजे बरें होईल." मी– "दुसरें असें कीं, ईश्वरानें सर्व मानवी प्राण्यांचा उद्धार करण्यासाठीं चार वेद तयार केले किंवा कसें?" बु०– "होय. ईश्वरानें एकंदर सर्व मानवी प्राण्यांचा उद्धार करण्याकरितां चार वेद तयार केले आहेत." मी– "तिसरें असें कीं, ईश्वरानें कोणत्या भाषेंत चार वेद तयार केले?" बु०– "ईश्वरानें चार वेद संस्कृत भाषेंत तयार केले." मी– "चवथें असें कीं, हल्लीं या भूगोलावरील चार खंडासह एकंदर सर्व बेटांतील लोकांस संस्कृत भाषा येते काय?" बु०– "सांप्रत या भूमंडळावरील फारच थोड्या चौकस प्रदेशांतील लोकांस संस्कृत भाषेंतील अर्थ समजतो." मी– "यावरून एकंदर सर्व मानवी प्राण्यांच्या उद्धाराकरितां ईश्वरानें चार वेद तयार केले, असें सिद्ध होत नाहीं. कारण या भूमंडळावर शेकडों तऱ्हेच्या भाषा बोलणारे लोक आहेत. त्यांतून बहुतेक देशांतील लोकांस संस्कृत भाषा तर मुळींच येत नाहीं. त्यांनीं चार वेदांपासून आपला उद्धार करून घ्यावा

—याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे ?" बु०—"ज्या वेळीं ईश्वरानें चार वेद तयार केले, त्या वेळीं एकंदर सर्व खंडांसह बेटांतील लोक संस्कृत भाषा बोलत असतील, यावरून ईश्वरानें चार वेद संस्कृत भाषेंत तयार केले असावेत. परंतु पुढें कांहीं काळानें अशा नाना प्रकारच्या भिन्नभिन्न भाषा पुढें निर्माण झाल्या असाव्यात, असें अनुमान होतें." मी—"अशा (निरनिराळ्या) भाषा पुढें निर्माण होतील, हें ईश्वरास वेद तयार करतेवेळीं पूर्वीं कसें कळलें नाहीं ? यावरून त्याचे त्रिकाळ ज्ञानास व सर्वसाक्षीपणास बाध येतो कीं नाहीं ? शिवाय "जरमन, स्काच, इंग्लिश" वगैरे लोकांतील "म्याक्सम्युलर"सारख्या विद्वानास चार वेदांचें चांगलें परिज्ञान झालें असून त्यांनीं आपल्या खिस्ती धर्माचा धिःकार[1] करून वेदधर्माचा स्वीकार कां केला नाहीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें." बु०—"म्याक्सम्युलरसाहेबास कदाचित् ब्राह्मणासारखा गळ्यांत पांढरा दोर घालून युरोपांतील थंड देशांत त्रिकाळ स्नानसंध्या करीत बसण्याचें भय वाटल्यामुळें त्यांनीं तसें केलें असेल, असें वाटतें. यास्तव त्यांतील खरें व्यंगित त्यांचे मनाला ठावें. मी त्याविषयीं काय सांगू ?" मी—"जर ईश्वरानें सर्व मानवी प्राण्यांचा उद्धार करण्यासाठीं चार वेद तयार केले होते, तर भटब्राह्मणांनीं हिंदूपैकीं शूद्रादि अतिशूद्रांस चार वेदांचें अध्यायन करण्याची मनाई केली नसती. यावरून त्यांनीं ईश्वराचे आज्ञेचा भंग केल्यामुळें वेदकर्ता उगीच कसा एकीकडे लपून बसला व त्यांपासून शूद्रादि अतिशूद्र लोकांचें थोडें कां नुकसान होत आहे ? यास्तव त्यांनीं वेदकर्त्या ईश्वरासहित चार वेदांवर भरंसा ठेवून आपल्यास हिंदु तरी कशाकरितां म्हणवून घ्यावें ?" बु०—"शूद्रादि अतिशूद्र लोकांस चार वेद अध्यायन करण्याविषयीं भटब्राह्मणांनीं कधींच मनाई केली नाहीं. कित्येक भटब्राह्मण लोक पोटासाठीं पाद्रीसाहेबांच्या घरोघर जाऊन त्यांस वेद शिकवितात. आणि ते तुमचे शूद्रादि अतिशूद्र लोक दरिद्री असल्यामुळें त्यांना वेद अध्यायन करण्याची ऐपत मुळींच नाहीं. त्यास ब्राह्मणांनीं करावें तरी काय ? असें बहुतेक ब्राह्मणांचें म्हणणें आहे." मी—"यावरून असें दिसतें कीं, ब्राह्मणांचें कपट आपल्यास कांहींच माहीत नाहीं. बरें असो, तसें कां होईना, धर्माच्या नांवावर निर्वाह करणारे पाद्री लोक वेद शिकण्याकरितां पैसे खर्च करण्यापुरते श्रीमंत आहेत काय ? आणि शूद्रांपैकीं भोंसले, शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे राजेरजवाडे हे वेद शिकण्यापुरते भटब्राह्मणांस पैसे देण्याकरितां दरिद्री आहेत काय ? त्यांतून एकासही आपल्या मुलास चार वेद अध्यायन करण्यापुरतें सामर्थ्य नाहीं ? ते सर्वच का युरोपियन पाद्रीसाहेबांपेक्षां कंगाल आहेत, असें तुम्हांस वाटतें काय ? बुवासाहेब ! अहो, या सर्व शूद्र राजेरजवाड्यांच्या दरबारांत वैदिक, शास्त्री, जोशी व

---

१. पंडिता रमाबाईनें आर्यधर्माच्या नाकाला चुना लावल्यामुळें धुर्तांतील एक अनामीक भागूबाई विद्वान तोंडांत बोट घालून "× × वाग × × वी" म्हणून आपला गुजारा करीत आहे.

कथाडे निरंतरच्या उपदेशावरून त्या अज्ञान्यांची त्यांवर इतकी भक्ति जडते कीं, कोणी राजा, रामदासाचे घराण्यास जहागीर करून देतो. कोणी एकंदर हिंदुस्थानांतील क्षेत्रवासी भटब्राह्मणांस सतत एक महिनाभर बुंदीचीं भोजनें देतो. कोणी पुण्यांतील ब्राह्मणांस सोन्याच्या पुतळ्या वाटतो. यावरून सर्वच शूद्र दरिद्री आहेत, असें सिद्ध होत नाहीं. त्यांतून एकातरी भटब्राह्मणानें आपली भीड खर्ची घालून सदरच्या राजेरजवाड्यांतून एका यजमानापासून तरी, त्याच्या राज्यांतील शूद्र शेतकरी बांधवांचे मुलांकरितां गावोगांव शाळा घालवून त्यामध्यें एकदोन विद्वान् करावयाचे होते! अहो, यांच्यापेक्षा परदेशस्थ असून अन्यधर्मी भिक्षुक पाद्री हजार वाटेनें बरे म्हटले पाहिजेत का नाहीं? कारण शूद्रादि अतिशूद्र लोक आज हजारों वर्षांपासून ह्या ब्राह्मण लोकांच्या पाशांत राहून दिवस काढीत आहेत. त्यांना त्यांतून मुक्त करण्यास्तव त्यांनीं आपल्या मुलखांत ख्रिस्ती लोकांपाशीं भिक्षा मागून त्या पैशानें येथें शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे शूद्र राजेरजवाड्यांचे जातबांधवांस सरकारी शाळेंतील ब्राह्मण विद्यार्थ्यांचे तोलाचे विद्वान केल्यामुळें, ते ब्राह्मण कामगारांचे बरोबर मोठ्या शेखीनें वकिलीचीं व सरकारी हुद्यांचीं कामें करीत आहेत. ह्यावरून त्यांना आतां मूळची आपली स्थिती कशी होती, आणि हल्लीं आपली स्थिती कशी होत चालली आहे, हें कळत नसेल काय? परंतु शूद्र लोक किती हतभाग्य व किती असमंजस समजले पाहिजेत कीं, त्यांना या कामीं एवढें मोठें इंग्रज सरकारचें सहाय्य मिळूनही, ह्या पाशांतून मुक्त होण्याची इच्छा न होतां, हल्लीं मिळालेलें पोकळ वैभव कदाचित् हातचें जाईल, या भीतिस्तव ब्राह्मण कामगारांचे पुढें हांजी हांजी करून एवढ्यांतच कृतार्थ मानून आपआपल्या डौलांत गुंग झाले आहेत.” बु०—“असें जर आहे, तर आपण आपल्या शूद्र राजेरजवाड्यांकडे जाऊन त्यांनीं आपल्या शूद्र बांधवांचे मुलांकरितां गांवोगांव शाळा घालून त्यांस विद्या द्यावी, ह्मणून त्यांची प्रार्थना कां करीत नाहीं?” मी—“अहो महाराज, त्यांच्या दरबारांत ब्राह्मण कारभाऱ्यांचें इतकें प्राबल्य वाढलें असतें कीं, तेथें माझी गरिबाची दाद ते कशी लागूं देतील?” बु०—“असें कसें म्हणतां? अहो, जेथें तुमच्या पुण्यांतील नाच्या पोरांच्या मागें तुणतुण्यावर झील धरून गाणें गाणाऱ्या कुशा थोंगड्यानें बडोद्याहून हजारों रुपये कमावून आणिले; आणि तशा ठिकाणीं फक्त त्यांस त्यांच्या जातबांधवांच्या बऱ्याच्या दोन गोष्टी सांगण्यापुरती त्याजपाशीं तुमची दाद लागणार नाहीं, म्हणून म्हणतां हें कसें?” मी—“राजेसाहेब तमासगिरांचे छंदास लागावेत हा कारभाऱ्यांचा मूळ हेतु असतो. त्याप्रमाणें ते त्यांचे नादीं लागले म्हणजे यांस त्यांच्या राज्यकारभारांत हात घालून आपला फायदा करून घेतां येतो. त्याचप्रमाणें परभारें राजेसाहेबांकडून “युरोपियन” कामगारांस मोठमोठाल्या मेजवान्या देववितात. व आमच्यासारख्यांच्या सल्ल्यावरून कारभारी लोकांचें नुकसान आहे, कारण, राजेसाहेबांनीं शूद्र शेतकऱ्यांचे मुलांस विद्वान केल्यामुळें ते पुढें मोठमोठ्या हुद्यांचीं कामें करूं लागल्यास कारभाऱ्यांच्या ब्राह्मण जातबांधवांचे मुलांस नांगर हांकून

कपाळीं शेतीचा धंदा व चिखलमातीचीं कामें करण्याचें येईल का नाहीं बरें ?" बु०— "असा डावपेंच ब्राह्मण लोकांत नसेल असें मला आजपर्यंत वाटत होतें. परंतु आज माझी खात्री झाली, यावरूनच बावा ! हे धूर्त ब्राह्मण कारभारी शूद्र राजेरजवाड्यांचीं मुलें वयांत आल्याबरोबर त्यांस राज्यकारभार चालविण्याचें ज्ञान नाहीं, म्हणून तूर्त राज्यकारभार देऊं नये, असें इंग्लिश सरकारास लिहिण्यास कमी करीत नाहींत, कारण तसें केल्यापासून आपली सरकारास हुषारी आणि राजपुत्रांची गाफली समजून आपण तेथील कारभारी होतांच, दिवसा तेथील राजपुत्रांच्या गळ्याला माकडाप्रमाणें दोरी लावून, साहेब लोकांचे बंगलोबंगलीं त्यांची धिंड मिरवून, रात्रीं त्यांना नाचतमाशांचे नादीं लावून आपण त्यांच्या दौलतीची वाताहत करीत नसतील कशावरून ?" मी— "जो काळपावेतों आमचे शूद्र राजेरजवाडे शुद्धीवर येऊन आपआपल्या मुलांबाळांसह आपल्या पदरच्या शूद्र मानकऱ्यांस विद्वान करणार नाहींत, तों काळपावेतों ब्राह्मण कारभारी असें करण्याचें सोडणार नाहींत. यास्तव तशा गोष्टींचा येथें उच्चार करून कांहीं फायदा होणें नाहीं. शूद्र आपल्या कर्माप्रमाणें फळें भोगीत आहेत, व त्याचप्रमाणें ब्राह्मण कारभारी आपआपल्या केलेल्या कर्मांचीं कधींना कधीं तरी फळें भोगतील. बु०— "बरें तर, आतां मी येतों." मी— "आपली मर्जी, या राम राम."

पुणें तारीख ६ एप्रिल
सन १८८३ ईसवी.

जो. गो. फु.
स. शो. स. स.

## ८

# ग्रामजोश्यांसंबंधीं जाहीर खबर

(ग्रामजोशांच्या हक्कावद्दलचा मोकद्दमा नंबर ८३१
सन १८८४ यांतील हंशील.)

# जाहिर खबर

सर्व हिंदु धर्मानुयायी त्यांतून मुख्यत्त्वेंकरून मराठे, माळी, कुणबी, कोळी, धनगर वगैरे जातीचे लोकांस ह्या पत्रद्वारें जाहीर करण्यांत येतें कीं, ब्राह्मण लोक आमचे लोकांकडून लग्नकार्यास किंवा देवदेवतांच्या पूजाअर्च्या करण्यासमयीं आणि इतर शुभाशुभ कार्याचे वेळीं मनास वाटेल त्याप्रमाणें यजमानाकडून अडवून पैसे घेतात. ह्या सर्व कारणांकरितां व प्रत्येक मनुष्यास आपापले धर्मसंबंधीं कार्य करण्यास हिंदु शास्त्राची पूर्ण सत्ता असल्यामुळें आज कित्येक दिवसांपासून वर दर्शविले जातींचे लोक ह्या मुंबई इलाख्याचे कित्येक भागावर ब्राह्मणांचे (भटांचे) साह्याशिवाय वर दर्शविलेलीं धर्मसंबंधीं कार्यें करीत आहेत; परंतु हें करणें भट लोकांस न आवडून व त्यांचे रक्ताचें पाणी झाल्याशिवाय फुकट मिळत असलेलीं उत्पन्नें बुडूं पहात आहेत, हें जाणून जुन्नर प्रांतांतील भटांनीं ओतूर येथील कांहीं जोशांस पुढें करून रा. बाळाजी उर्फ काशीबा कुशाजी पाटील डुमरे, ओतूरकर यांनीं आपल्या दोन मुलींचीं लग्नें स्वतः लाविलीं ह्मणून भटांची ६॥ रुपये नुकसान झाली, यास्तव ती नुकसान सदरचे बाळाजी यांजकडून भरून घेण्याकरितां वामन जगन्नाथ, शंकर बापुजी, बळवंत सखाराम, रामचंद्र सदाशिव जोशी, उदास या सर्वांनीं जुन्नर कोर्टांत फिर्याद केली. सांप्रतचे काळास अनुसरून पहातां भटांचा कोणत्याही प्रकारचा हक्क इतर लोकांवर पोंचत नाहीं, हें न्यायदृष्टीनें उघड असून न्यायाधीश महादेव श्रीधर, सबार्डिनेट जज्ज, जात ब्राह्मण यांनीं आपले ब्राह्मण फिर्यादीचे स्वरूपाकडे पाहून ता. २९ मार्च सन १८८६ इसवी रोजीं असा ठराव केला कीं, प्रत्येक लग्नाबद्दल प्रतिवादी बाळाजी पाटील डुमरे यांनीं ४ आणे म्हणजे दोनी लग्नांबद्दल ८ आणे द्यावेत असा ठराव केला. ह्या ठरावाबद्दल वरिष्ठ कोर्टांत प्रतिवादी यांजकडून अपील होणें आहे व अपीलाचा निकाल लागेपर्यंत आमचे लोकांनीं म्हणजे ज्यांचे येथें लग्नकार्यें होतील व जेथें भटजी किंवा ग्रामजोशी लग्न लाविण्याबद्दल हक्कानें पैसा मागतील, तेथें प्रत्येक लग्नाबद्दल मशारनिल्हे रा. सा. सबजज्ज यांच्या ठरावान्वयें

तूर्त चारच आणे लग्न साडे वगैरे विधि करून घेतल्यानंतर द्यावे लागतील व हें सबजज्ज-साहेबांच्या फैसल्यावरून सर्वांस कळविण्यांत येत आहे.

फिर्यादाचा नंबर ८३१ सन १८८४ चा

जुन्नर कोर्टाचा शिक्का

JUDGE
JUNAR
SUBORDINATE
COURT

जोतीराव गोविंद्राव फुले.
नारायण मेवाजी लोखंडे.
भाऊ कोंडाजी पा० डुंबरे.
रामचंद्र तुकाराम हेजीब.
लक्ष्मण गणुजी शेटे.
विश्राम कुशाजी पा० पवार.
रावजी मल्हारजी बोकड.
संतु रामजी लाड.
चिमणाजी मथाजी पा० डुंबरे.
गणु बापुजी पा० डुंबरे.

९

# सत्सार, अंक १

## सत्सार, क्र. १

धूर्त आर्यांची मती खुंटली ॥ रमा पंडिता बरी वाटली ॥
मद्य पिउशा आतां वाटली ॥ दे ब्रांडीची मला बाटली ॥
ज्ञान गेलें, चक्षु थिजले ॥ आतां कैचें वैभव मेलें ॥
दास तुकाचे चेले बनती । शुद्र शिवाचे गळीं लागती ॥

# उपोद्घात

इंग्रज बाहादरचे राज्याच्या प्रतापानें अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस तुरळक तुरळक लिहितां वाचतां येऊं लागलें आहे, ह्मणून आज हजारों वर्षांपासून धूर्त आर्योकडून शूद्रादि अतिशूद्र चोंहूंकडून नाडले जातात, याविषयीं सत्सार या नांवाचे छोटेखानी पुस्तकांत नित्य वाटाघाट करून जगद्वेष्ट्या आर्य ब्राह्मणांची खात्री करावी, म्हणून हा पहिला अंक वाचकांपुढें आणिला आहे. या पुस्तकाचे पुढचे अंक आम्ही अमक्या वेळीं प्रसिद्ध करीत जाऊं, म्हणून आम्ही वचनानें बांधले जात नाहीं. परंतु या आमच्या अल्पशा प्रयत्नास आमचे निःपक्षपाती विचारशील महंमदी, खिस्ती व हिंदू बांधवांनीं उदार आश्रय दिल्यास या पुढचे अंक दर आठवड्यासुद्धां सादर केले जातील.

पुस्तककर्त्ता

# सत्सार

## नंबर १

सत्यशोधक समाजांतील शूद्र सभासदांचें अनेक गृहस्थांबरोबर संभाषण झालें, त्यापैकीं थोडथोड्या मुद्याच्या गोष्टी येथें घेतल्या आहेत, त्या आमचे सूज्ञ विचारशील वाचकांपुढें सादर करितों.

**शूद्र, प्रश्न**—ज्या वेळीं पुण्यांत पंडिता रमाबाईनें येऊन हिंदुधर्मप्रतिपादक अनेक व्याख्यानें दिलीं, त्या वेळीं मला यांच्या व्याख्यानांची फारशी थोरवी वाटली नाही-कारण हिंदु धर्माचे उत्पादकांनीं स्त्री व शूद्रादि अतिशूद्र जातीवर कोणकोणत्या प्रकारच्या अगी पाखडून त्यांजवर अनेक प्रकारचे जुलमी लेख केले, हें त्या बिचाऱ्या गाई बापुड्या पंडिता रमाबाईस माहीत कोठून ! परंतु त्यांनीं विलायतेस जाऊन हिंदु व खिस्ती धर्माची तुलना केल्यामुळें त्यांस हिंदु धर्माचा हेकड व पक्षपातीपणा दिसून आल्याबरोबर त्यांनीं हिंदुधर्माचा धिःकार करून खिस्ती धर्माचा अंगिकार केला किंवा कसें ? याविषयी सर्वांनीं आपली खात्री करून घ्यावी, म्हणून आपण पंडिता रमाबाईस परत हिंदुस्थानांत बोलावून घ्याल, तर फार लोकांचे डोळे उघडणार आहेत. व अशा शोधक साध्विनीस पहाण्याची कित्येकांस फार इच्छा झाली आहे.

**ब्राह्मण, उत्तर**—त्यांच्या घरगुती पत्रावरून असें दिसून येतें कीं, त्या आतांशीं ब्रह्मधर्माचा बारीक शोध करीत आहेत व त्या थोड्याच काळांत परत हिंदुस्थानांत येतील असें मला वाटतें.

**शूद्र**—मुख, बाहू, जांग आणि पद यांपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रास जन्म देणारें ब्रह्म म्हणावें, किंवा अति लाजिरवाण्या पक्षपाती ग्रंथ करणाऱ्या मनूस जन्म देणाऱ्यास ब्रह्म म्हणावें, अथवा तुमच्यांतील कित्येक तर्कबाजांनीं या सर्व सृष्टिउत्पन्नकर्त्या आदिकारणास दिलेलें ब्रह्म नांव म्हणावें. यांतून तुह्मा ब्रह्मसमाजाचें खास ब्रह्म कोणतें, हें तरी एकदाचें कळूं द्या !

**ब्राह्मण**—आम्हां ब्रह्मसमाजाचें ब्रह्म म्हणजे त्याला जातिभेद वगैरे कांहीं नाहीं. तें निराकार परब्रह्म आहे

**शूद्र**—ज्यापेक्षां तुम्ही ब्रम्हसमाजियन जातिभेद मानीत नाहीं, त्या अर्थी आपण सर्व ब्रह्मोंनीं प्रथम एकंदर सर्व मांगामहारांस ब्रह्मो करून त्यांस आपल्या ब्रह्मसमाजांत सामील करून कां घेत नाहीं ?

**ब्राह्मण**—महारमांगांस ब्रह्मो करण्याची ब्रह्मसमाजाची इच्छा आहे. पण त्याप्रमाणें आम्हां सर्व समाजियनांची खटपटही चालूच आहे. परंतु या कामीं आपण सर्व शूद्रांनींसुद्धां आम्हांस मदत करूं लागलें पाहिजे, कारण आपण सर्व जेव्हां इराणांतून या देशात आलों, तेव्हां आपण सर्वांनीं येथील मूळच्या स्थाईक रहिवाशी महारामांगाचें सर्वस्व हरण करून आपण येथील अधिपती झालों.

**शूद्र**—यावरून आपल्या आर्य पूर्वज ब्राह्मणांनीं इराणांतून हिंदुस्थानांत येण्याचे पूर्वीं त्यांनीं आह्मा शूद्रांचे पूर्वजांस दास केलें होतें. किंवा आर्यांनीं इराणांतून हिंदुस्थानांत येतेवेळीं आह्मां शूद्रांचे पूर्वजांस वाटेंतच दास करून येथें बरोबर घेऊन आले, किंवा तुम्हां आर्य ब्राह्मणांच्या पूर्वजांनीं इराणांतून हिंदुस्थानांत आल्यावर आम्हां शूद्रांचे पूर्वजांस आपले दास केलें, यांपैकीं खरें कोणतें, तें तरी चटकन कळूं द्या ! आतां कां उत्तर देण्यास विलंब ? अहो, तुम्हीं ज्यापेक्षां आम्हां शूद्रांस दास व अतिशूद्रांस अनुदास करून आम्हा सर्वांस वंशपरंपरेनें हा काळपावेतों छळीत आलां, त्याअर्थीं आपण केल्या कर्मांचा पश्चात्ताप मानून प्रथम मांगामहारांचे वाजवी मानवी अधिकार त्यांचे त्यांस देऊन त्यांजपाशीं तुमच्या पूर्वजांनीं केलेल्या दुष्ट कर्मांची क्षमा मागा. नंतर आम्हां अज्ञानी शूद्रांबरोबर सल्ला करण्याकरितां आल्यावर पुढें त्याविषयीं पहातां येईल. आतां आम्हांला तुमचे ब्रह्मसमाज व प्रार्थनासमाज नकोत. पुरे झाले तुमचे छक्केपंजे.

**ब्राह्मण, उत्तर**—आम्हांस जर मदत करण्याची आपली मर्जी नसेल, तर आपण तरी मांगामहारांस त्यांचे मानवी अधिकार समजावून त्यांस मार्गावर आणा, ह्मणजे बरें होईल.

**शूद्र**—तुमच्या पूर्वजांनीं इराणांतून येऊन या देशांतील मूळच्या एकंदर सर्व रहिवाशी लोकांवर अनेक स्वाऱ्या केल्या. त्यांचें सर्वस्वी हरण करून ते (ब्राह्मण) त्यांचे अधिपति होऊन बसले. त्यांस आपले दासानुदास करून त्यांस विद्या शिकण्याची बंदी केली. त्यांपैकीं कित्येकांस स्पर्शसुद्धां करण्याचा निर्बंद करून त्यांचा सर्वोपरी छळ केला. त्याविषयीं तुमच्या पूर्वजांनीं केलेल्या मनूसारख्या घाणेरड्या ग्रंथांत अतिक्रूर लेख सांपडतात. यावरून शूद्रादि अतिशूद्रांचा तुम्ही (आर्यांनीं) सर्वस्वी नाश केला, हें सर्व आपण डोळ्यांनीं प्रत्यक्ष पहातों कां नाहीं बरें ? या तुमच्या पूर्वजांनीं केलेल्या नीच कर्मांचा मागमुद्दा नाहींसा व्हावा, म्हणून तुम्ही मांगामहारांस ज्ञान देऊन त्यांस तुम्ही योजून काढलेल्या समाजांत सरते करून घ्या. या कामीं आम्ही शूद्रांनीं तुम्हां आर्य ब्राह्मणांस मदत द्यावी ती कां ! तुमच्या पूर्वजांनीं महारामांगांच्या मार्गात पसरलेले कांटे तुमचे तुम्ही वेंचून काढा.

**ब्राह्मण**—तुम्ही आह्मांपासून पृथक होऊं पहातां असें होईल तरी कसें ? अहो, ज्यापेक्षां तुमच्या कोळणीपासून प्रसवलेल्या व्यासास व चांडाळणीपासून प्रसवलेल्या

वसिष्ठास आम्हीं आपल्यांत सरते करून घेऊन त्यांचे वंशजांस आम्ही ब्राह्मणासारखा मान देतों कां नाहीं? यावरून तुम्हीं आम्हांपासून पृथक कसे होऊं शकाल?

**शूद्र**—व्यास व वसिष्ठ यांच्या माता शूद्रादि अतिशूद्र कुळांतील होत्या, हें जरी तुमच्या ग्रंथाधारावरून खरें मानिलें, तथापि व्यास व वसिष्ठ यांचे पिताजी शूद्रादि अतिशूद्र नव्हते, परंतु त्यांचे जन्मदाते आर्यब्राह्मण होते. म्हणूनच तुमच्या पूर्वजांनीं व्यास व वसिष्ठास ब्राह्मणांत सरते करून घेतलें यांत नवल तें काय? कारण ते तुम्हां आर्य ब्राह्मणांचें बीज होय. परंतु शूद्रादि अतिशूद्रापासून आर्य ब्राह्मणीस झालेल्या उत्पत्तीस तुम्ही आर्यब्राह्मणांनीं आपल्यांत सरते करून घेतल्याविषयीं तुमच्या ग्रंथांत कांहीं मुद्दे सांपडतील काय?

**ब्राह्मण**—हिंदु धर्मांतील ग्रंथांत त्याविषयीं काय काय गडबडगुंडा आहे, तो मला खास करून सांगतां येत नाहीं.

**शूद्र**—यावरून आपण समाजमंदिरांत हमेशा गच्च डोळे झांकून परब्रह्म सनातन ब्रह्माची प्रार्थना करीत असून तें (ब्रह्म) तुम्हांस मांगमहारांच्या पूर्वींच्या वास्तविक स्थितीविषयीं बोध करून तुमचे डोळे कां उघडीत नाहीं?

**ब्राह्मण**—असो, परंतु आम्हीं आर्य ब्राह्मण ते किती आणि तुम्हां शूद्रादि अतिशूद्रांची संख्या आर्य लोकांपेक्षां नऊपट असून आम्हां मूठभर आर्यांच्यानें तुम्हां शूद्रादि अतिशूद्रांस जिंकून त्यांस आपले दास तरी कसें करवलें?

**शूद्र**—अहो, तुमच्यांतील बहुतेक अति महारथी अस्त्रांवर ओं, भों म्हणून छू छू केल्याबरोबर परशत्रूंच्या अक्षौहिणीच्या अक्षौहिणी दलांचा नाश करीत होते, असें तुमचे ग्रंथावरून सिद्ध होत असून तुम्हां हिंदुस्थानांतील आर्य ब्राह्मणांसहित तुमचे दासानुदास शूद्रादि अतिशूद्र वीस कोटी असून मूठभर महंमदी व इंग्रज लोक तुमचे भूपति कसे झाले?

**ब्राह्मण**—आम्हीं ब्राह्मो तसल्या भाकड दंतकथांनीं भरलेल्या ग्रंथावर भरंवसा ठेवीत नाहीं.

**शूद्र**—तर मग तुमचें हें ब्रह्म कोणत्या ग्रंथांतून घेतलें आहे, कीं ज्या ग्रंथाचा संबंध असल्या भाकडकथाभरीत ग्रंथांशीं मुळींच नाहीं.

**ब्राह्मण**—येथें मात्र सिमा झाली. ब्रह्म अथवा ब्राह्मण शब्द कोणाचे तोंडांतून निघाला कीं, तुमचें माथें फिरतें.

**शूद्र**—अहो, जरी मुसलमान व इंग्रज तुमच्या आर्य पूर्वजांचे भुपति झाले, तरी तुमच्या आर्य पूर्वजांनीं या धर्म शब्दाचे आड्डून शूद्रादि अतिशूद्रांचे भूदेव बनून त्यांच्यांतील कुणबी, माळी, आगरी, कोळी, भील, रामोशी, मांग, महार वगैरे लोकांची अशी राखरांगोळी केली, याबद्दल आम्ही कां सत्‌शील महंमदी व खिस्ती लोकांवर आपलें माथें फिरवावें?

**ब्राह्मण**—तसें नव्हे महाराज, आह्मीं प्रार्थना व ब्रह्मसमाजियनांनीं एकंदर सर्व हिंदु, खिस्ती, महंमदी वगैरे धर्मांतील असत्याचा त्याग करून त्यांतील बाकी उरलेल्या सत्याप्रमाणें वर्तन करण्याचा निश्चय केला आहे.

**शूद्र**—खिस्ती धर्मपुस्तकावर तुम्ही पाहिजेल त्या टिका केल्यास चालतील. कारण त्यांच्यातील उपदेशकांस पाहिजेल त्यानें पकडावे, झोडावे, कुटावे, पिटावे व धूर्त ठकांच्या फुसलावणीवरून अज्ञानी शूद्रांच्या पोरासोरांनीं त्यांच्या मागें बोंबाआरोळ्या मारतां मारतां त्यांजवर धूळमातीचा भडीमार करून, त्यांस पाहिजेल तिकडे खिदाडावें, परंतु महंमदी लोक आपल्या कुराणाला तुम्हाला बोटसुद्धां लावूं देणार नाहींत. त्यांच्याशीं अशा तुमच्या गमज्या चालणार नाहींत. उगीच कां मनाचे मांडे करून खातां? असो, परंतु आपण ब्रह्मोनीं एकंदर सर्व हिंदू धर्मांतील असत्य निवडून काढून त्या सर्वांवर हरताळीचा बोळा फिरवून बाकी उरलेल्या सत्याचा एक पृथक ग्रंथ केला आहे काय?

**ब्राह्मण**—तसला ग्रंथ आम्ही केला नाहीं. तसें करण्याचा आम्हा ब्रह्मोंचा विचार चालू आहे.

**शूद्र**—अः तसला ग्रंथ तुम्हीं ब्रह्मो तयार करीतोंपावेतों आम्ही शूद्रादि अतिशूद्रांस-हित पंडिता रमाबाईनें तुमच्या पोकळ बोलण्यावर विश्वास तरी कसा ठेवावा? कारण पुढें एखादे वेळीं आर्य ब्राह्मणांत परशुरामासारखा अथवा नाना पेशव्यासारखा धाडस-दंगेखोर निर्माण झाला व त्याच्या साह्यानें शंकराचार्यासारखा पाताळयंत्री ब्राह्मण पुन्हा प्रतिपादन करूं लागला कीं, एकंदर सर्व आर्य ब्राह्मणांचे ग्रंथांत जें काय लिहिलें आहे, तें सर्व ईश्वरप्रणीत आहे, तर त्या वाचाळाच्या तोंडाला अज्ञानी मांगामहारांच्यानें हात लाववेल काय? जेथें तुम्ही महंमदी व खिस्ती साधू विद्वानांच्या हातांत हा काळ-पावेतों तुरी देत आलांत, तेथें शूद्रादि अतिशूद्रांचा काय पाड?

**ब्राह्मण**—(मोठ्या विनोदानें गालांतल्या गालांत हास्यवदन करून) म्हणाले,–कां बरें तात्या, असें कां म्हणतां? आतांशीं आम्हीं ब्रह्मसमाजाच्या आधारावरून हिंदुधर्मांत लिहिलेल्या प्रतिबंधाचा धिःक्कार करून अज्ञानी स्त्रियांस विद्यादान देण्याच्या कामीं खटाटोप चालविली आहे कां नाहीं?

**शूद्र**—तुम्हीं उगीच काय जें तुमच्या तोंडाला येईल तें बोलूं नका राव. अहो,[1] इंग्लिश राज्याचे विद्येच्या प्रतापानें हिंदू स्त्रियांस खरें ज्ञान मिळण्याचा प्रसंग आला आहे. व त्याप्रमाणें तें सर्व आपल्या आपण घडून प्रचारांत येत चाललें आहे. एवढेंच नव्हे, परंतु आपण सर्वांनीं उपस्थित केलेले सर्व बारिक मोठे समाज त्यांच्याच शिक्षणाचें फळ होय. आतां तुह्मी, (उसमे मेरा ब्रह्मसमाज चांदभाई) म्हणण्याचें सोडा. असो, जर कां शूद्रादि अतिशूद्रांस तुमचे स्त्रियांसारखी सहज विद्या मिळण्याची पर्वणी येऊन

---

१. A Sepoy Revolt by Henry Mead, p. 247.

त्यांस जेव्हां त्यांचे मानवी अधिकार समजूं लागतील, तेव्हां तुम्हां सर्व आर्य ब्राह्मणांस मारवाड्यासारख्या तीन शेंड्या वाढवाव्या लागतील, कारण आतांच्या तुमच्या एका शेंडीवर शूद्रादि अतिशूद्रांसहित पंडिता रमाबाईचा निर्वाह होणार नाहीं.

**ब्राह्मण**—तसा प्रसंग आल्यावर आम्हीं आपली आहे ती शेंडीसुद्धां भादरून संन्याशी बनूं. नंतर ते सर्व आमचें काय करणार? परंतु आतां तुमचा धर्म तरी कोणता, तात्या?

**शूद्र**—ईश्वराचा हातांत तुरी देऊन तुम्हां आर्यब्राह्मणांची सेवाचाकरी करणें हाच कां आम्हां शूद्रांचा धर्म? आमच्या सोईकरितां पाहिजेल त्या वेळीं आम्ही महंमदी अथवा खिस्ती धर्माचा स्वीकार करूं, नाहीं तर आपण सर्वांचा निर्माणकर्ता आहे, त्यापाशीं उत्तम धर्म मागून घेऊं. तुम्ही आतां आमची पोकळ काळजी करूं नका. परंतु तुम्ही संन्याशी होऊन आपल्या पंडिता रमासारख्या सुशिक्षित स्त्रियांस खिस्ती धर्मांत घुसण्याकरितां मार्ग मोकळा करून आपण व्यर्थ वाया जाऊं नका, म्हणजे झालें.

नंतर सदरचें सर्व संभाषण रा. रा. कोंडाजी रावजी पाटील, माळ्याचें कुरूळ यांनीं मनःपूर्वक ऐकलें होतें. सबब दोन प्रहरीं जेवण घेतल्यानंतर सत्यशोधक समाजांतील त्यांचे समाजबांधवांबरोबर संभाषण झालें, तें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**कोंडाजी पाटील, प्रश्न**—तात्यासाहेब, सकाळीं आपण उभयतांमध्यें मार्मिक भाषण ऐकल्यावरून मला एक प्रश्न सुचला आहे तो असा कीं—"ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ याचा शोध करूं नये", म्हणून एकंदर सर्व भटब्राह्मण म्हणत असतात. तर हा ब्रह्मघोळ आहे तरी काय?

**तात्या, उत्तर**—अहो, हे ब्राह्मणांचें ब्रह्मकपट तुम्हांस एकाएकीं समजणें फार कठीण.

**कोंडाजी**—या ब्रह्मकपटाविषयीं तुमचें काय म्हणणें आहे, तें तरी कळूं द्या. नंतर मग तें आम्हास समजलें नाहीं, तर तुम्ही काय कराल?

**तात्या**—पूर्वीं जर आर्यब्राह्मण शूद्रादि अतिशूद्रिणीपासून जन्मलेल्या आपल्या खास उत्पत्तीस ते (आर्यब्राह्मण) आपल्या जातींत सरते करून घेत होते, तर हल्लीं भटब्राह्मण आपल्या पाळीव यवनी व शूद्र वेसवेपासून जन्मलेल्या अष्टपैलू रत्नास आपल्या जातींत सरते कां करून घेत नाहींत?

**कोंडाजी**—त्यांच्या जन्मदात्या भटब्राह्मण वडिलांनीं त्यांस विद्वान् केल्यामुळें, ते ब्राह्मणी पागोटीं घालतात. व संधान साधल्याबरोबर गळ्यांत सुताच्या पाष्ट्या (जानवीं) घालून खासे हराठे बनतात. नंतर निवळ कुणब्यांचा धिक्कार करून त्यांच्यामध्यें मोठ्या शेखीनें मिरवतात. ही ब्राह्मणांच्या उत्पत्तीची अडचण आम्हा शूद्रांत ती कां?

**तात्या, उत्तर**—ते कसलींही पागोटीं बांधून आपल्या गळ्यांत चऱ्हाटें कां आडकवीनात. तुम्हाला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे? परंतु भटब्राह्मणांनीं तुम्हां

निवळ कुळवाड्यांत पसरलेलें हें ब्रह्मलचांड त्यांनीं (ब्राह्मणांनीं) आपल्या जातींत पूर्वीप्रमाणें, मिळवून घेणें यांत त्यांचा थोरपणा होय.

**कोंडाजी**—सर्व हिंदुस्थानांत आर्य ब्राह्मणांचें लचांड पसरलें असून पंडिता रमाबाई हाडाची खरी ब्राह्मणीण असतां, जिनें जुलमी आर्य धर्मांत हा काळपावेतों वावरल्याबद्दल ख्रिस्तीयन लोकांचे द्वारें प्रायश्चित्त (बातीस्मा) घेऊन ख्रिस्ती मंडळांत रमली, म्हणून भटब्राह्मणांनीं बाईच्या नांवानें शिमगा केला यांत नवल तें काय? कारण पंडिता रमाबाईनें त्यांच्या कृत्रिमी धर्मांच्या नाकाला चुना लाविला. परंतु शूद्रांतील कित्येकांनीं पंडिता रमाबाईच्या नांवानें आपलें ऊर बडविलें, याचें कारण काय असावें बरें?

**तात्या**—शूद्रांतील कित्येकांनीं पंडिता रमाबाईच्या नावानें आपलें ऊर बडविलें, म्हणून त्यांच्या रडगाण्यावर अशा प्रसंगीं येथें टीका करणें शोभत नाहीं. कारण आतांशीं चहूंकडे भटब्राह्मणांतील ब्रहस्पतीच्या तोलाचे विद्वान, अज्ञान्याचे भूदेव आपल्या देवपूजेसहित संवळी भांड्याचें वैभव, छे गवाळीं काखेंत मारून, म्लेंच्छांनीं अनेक कुचके पदार्थ रांधून काढलेला निवळ अर्क दारूच्या बाटल्या घटाघटा पिऊन गटारांनीं लोळत पडतात. तरी हे आमचे शूद्र बांधव त्या सर्व छाकट्यांसह त्यांच्या जातीस पवित्र मानितात. परंतु सत्‌शील पंडिता रमाबाईच्या माथ्यावर पाद्री आचार्यानें थोडेसें स्वच्छ पाणी शिंपल्याबरोबर "पंडिता रमाबाई बाटली" "पंडिता रमाबाई बाटली" म्हणून भटब्राह्मणांस हाकाटी करूं लागणाऱ्या शूद्रांची थोरवी ती काय? अहो, कित्येक भटब्राह्मण बाटलींतील ऐन माल गट्ट करून शेवटीं इंग्लंडाकडे दीन वदनेंकरून "रमाबाई बाटली" "रमाबाई बाटली" म्हणून रात्रंदिवस बाटल्यांचा निजध्यास करितात; हेंच कां वाचाळ आर्य भटब्राह्मणांचें वैभवसौभाग्य? असो, यापुढें तुमची मर्जी असल्यास दुसरे कांहीं महत्त्वाचे प्रश्न करा कीं, ज्यापासून आपल्या शूद्र बांधवांचे डोळे उघडतील. परंतु तूर्त हा सर्व मजकुर वर्तमानपत्रकर्त्यांनीं आपल्या पत्रांत, इतर पत्रांसारखी यांत कांहीं घालमेल न करितां छापून प्रसिद्ध केल्यास पुढें तुमच्या मर्जीप्रमाणें करितां येईल;

पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं दोन प्रहरचे जेवन घेतल्यानंतर चि० यशवंत जोतिराव फुले याजबरोबर संवाद सुरू झाला तो पुढें लिहिल्याप्रमाणें:—

**यशवंतराव**—तात्यासाहेब, आर्यब्राह्मण भूदेवांची सेवाचाकरी करणें हाच काय तो शूद्रांचा धर्म म्हणून आर्यांच्या ग्रंथांत लेख सांपडतात, यावर तुमचें काय म्हणणें आहे?

**तात्या**—त्या ग्रंथांचे कर्ते तुमचे पुर्वज नसल्यामुळें आर्य धूर्त ब्राह्मणांतील ग्रंथकारांनीं धर्म शब्दाचे अनेक अर्थ होत असल्यामुळें त्यांनीं (आर्यांनीं) मूळ धर्म शब्दाचे अर्थाचा जो कांहीं खुबीदार अनर्थ केला [तो मोठ] मोठ्या धर्मसंस्थापकांच्या ध्यानांतसुद्धां आला नाहीं. तेथें अज्ञानी शूद्रांच्या लक्षांत तो सहज कोठून येणार?

**यशवंत**—धर्म या शब्दाचे अनेक अर्थ होत असल्यामुळें धर्म शब्दाच्या अर्थाचा आर्य ग्रंथकारांनीं अनर्थ केला तो कोणता?

**तात्या**—आर्यब्राह्मणांनीं जेव्हां हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या व येथील मुळच्या दस्यू लोकांस जिंकून, त्यांस आपलें दास केलें व त्याविषयीं आपल्या ग्रंथांत लेख करून ठेविले आहेत. ते असे कीं, दासांनीं (दस्युनीं) आर्य ब्राह्मणांचें दास्यत्व करावें, हा शूद्र दासाचा (शूद्र दस्युचा) धर्म होय. परंतु पुढें जरी महमदी व इंग्रजांनीं हा देश काबीज करून आर्य ब्राह्मणांस त्यांनीं आपलें दास केलें नाहीं, तरी आर्य ब्राह्मणांनीं पूर्वी जेर केलेल्या शूद्रांवर आपला स्वामित्वाचा पगडा जसाचा तसाच कायम ठेविला, कारण त्यावेळीं शूद्र लोक इतके बळहीन व अज्ञानदशेप्रत पावले होते, कीं आर्य ब्राह्मणांनीं केलेल्या कृत्रिमी ग्रंथास ते (शूद्र) ईश्वरदत्त मानूं लागले. असो, चोरी करणें हा चोराचा धर्म—लबाडी करणें लबाडाचा धर्म— घोडे खाजविणें हा खाजदाराचा धर्म— अज्ञान्यास फसऊन खाणें हा धूर्त ठकाचा धर्म. याशिवाय धर्म या शब्दाचे अनेक अर्थ होत असून आर्य ब्राह्मणांनीं धर्म या शब्दाचा मूळचा खरा अर्थ येके बाजूला ठेवून त्याच शब्दावर असें अंधळें गारूड रचून, एकंदर सर्व अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र जनांस फसवून [आपला धर्म] काढिला आहे.

**यशवंत**—यावरून आर्यभट ब्राह्मणांजवळ भारेचे भारे ग्रंथ आहेत, त्यापैकीं एका ग्रंथांतसुद्धां आपण म्हणतां त्याप्रमाणें धर्म या शब्दाचा खरा अर्थ नाहीं काय?

**तात्या**—भटब्राह्मणांच्या ग्रंथांत धर्म या शब्दाचा खरा अर्थ असून जर त्यांनीं (आर्यांनीं) त्याप्रमाणें वर्तणूक ठेविली असती, तर कित्येक विद्वान् भटब्राह्मणांसह पंडिता रमाबाईनें खिस्ती धर्माचा स्वीकार केला नसता!

**यशवंत**—या तुमच्या बोलण्यावरून आर्य ब्राह्मणांची सेवाचाकरी करण्याकरितां देवाजीनें शूद्रादि अतिशूद्रांस निर्माण केलें असें सिद्ध होत नाहीं; परंतु आपण सर्व आर्यांच्या तावडींत सांपडल्या दिवसापासून आर्यांनीं शूद्रादि अतिशूद्रांस बल व ज्ञानहीन करून धर्म शब्दाच्या आडून आपल्यामागें उपाध्यांसारखे लागले आहेत. यास्तव भटब्राह्मणांनीं उपस्थित केलेल्या टोलेजंग समाजांत या त्यांच्या कृत्रिमी उपाधीविषयीं शूद्रांतील विद्वान् ब्रसुद्धां काढीत नाहींत, हें कसें?

**तात्या**—बाबा, त्या समाजाचे उत्पादक अट्टल मूर्तिपूजक निवळ जातिअभिमान मानून सोंवळ्यांत असतां इंग्रजी पुस्तकाला स्पर्श न करणारे आर्य धूर्त होते. यास्तव त्यांनीं आपल्या धर्मरूपी उपाधीचा बचाव करण्याकरीतां कोणी या समाजांत धर्मसंबंधीं बोलूं नये, म्हणून समाजाचे नियमाचे चोपडींत हा एक नियम घुसडला आहे.

**यशवंतराव**—येथें मात्र भटब्राह्मणांनीं प्यादेमात केली. पुढें याविषयीं बोलत येईल. परंतु या समाजाच्या[चा?] हेतु तरी काय असावा?

**तात्या**—हल्लींच्या सरकारी कायद्यांत मनुसार [ख्या] कांहीं चुक्या होऊं लागल्यास

त्या चुक्यांची दुरुस्ती करण्याचे कामीं सरकारास सुचना देऊन त्यांस ताळ्यावर आणणें हा या समाजाचा हेतु असावा.

**यशवंतराव**—केवळ पिंजऱ्यांतील तोत्यासारखे पोकळ लटपटपंची बोलो वेटा गंगाराम, म्हणून वेळ दवडण्यापेक्षां अशा आणीबाणीच्या वेळीं समाजांतील शूर सभासदांनीं हिराताचा बचाव करण्याचे कामीं कांहींच हालचाल करूं नये, हें मोठें आश्चर्य होय.

**तात्या**—असें कसें म्हणतोस बाळा ? आपले शहाणे सरकारांनीं आजपावेतों रायल व लोकल फंडांतील कोट्यावधी रुपये खर्ची घालून भटब्राह्मणांस विद्वान केले. व त्यांस मोठमोठे जोखमीचे हुदे देऊन त्यांस सर्वोपरी सुखी केलें. कारण हेंच असावें कीं, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ब्राह्मण विद्वान् सरकाराचे उपयोगी पडतील.

**यशवंत**—यावरून ओंवळ्या नीच शूद्रादि अतिशूद्रांची परवा न करितां रशियन लोकांबरोबर पहिल्या टकरा सोंवळे विद्वान् भटब्राह्मण घेतील, नाहीं बरें ?

**तात्या**—याविषयीं तुला संशय वाटतो काय ! अहो, या लढायांचे कामीं विद्वान् भटब्राह्मण तुम्हां शूद्रादि अतिशूद्रांचा विटाळसुद्धां होऊं देणार नाहींत. वेळ मात्र येऊं द्या, तीही मजा आपणच पाहूं.

**यशवंत**—पाहूं बरें आतां जपानुष्ठानाची व ×××××× थोरवी. परंतु तात्या, बहुतेक आर्यब्राह्मण ×××

(अपूर्ण)

## ‘सत्सार नंबर १ या पुस्तकाच्या १६ व्या पृष्ठावरील कटाव’ अशा मथळ्याखालीं एका हस्तलिखितांत सांपडलेला कटाव

राजदस्यची [?] मर्जी कडकली ॥ आर्यभटाची छाती दडपली ॥ १ ॥
ओतूर गांवी भाऊ भडकला ॥ जुन्नरकर शेट्या धडकला ॥ २ ॥
आर्य त्यांमध्यें फुल्यास पाहाती ॥ सोंवळीं भांडीं घेऊन पळती ॥ ३ ॥
पत्रामध्यें हाय हाय करीती ॥ शंकराचार्य हांका मारीती ॥ ४ ॥
जिकडे तिकडे पोथ्या वाचीती ॥ अज्ञान्यांचीं मनें गोंवीती ॥ ५ ॥
अहो काशी यमूनाबाई ॥ उपासी मरतो गे ताई ॥ ६ ॥
शिंद्यांनीं फिरविली ग्वाही ॥ पोटासाठीं घ्या तरी कांहीं ॥ ७ ॥

# १०

## सत्सार, अंक २

# The Essence of Truth

**Series No. 2**

*By*

Jotirao Govindrao Phooley

# सत्सार

**अंक २ रा**

हें ल्हानसें पुस्तक

**जोतीराव गोविंदराव फुले**

यांनीं

लोकहितार्थ केलें तें

पुणें येथें

"जगद्धितेच्छु" छापखान्यांत छापिलें

आवृत्ति पहिली

प्रती २,०००

**आक्टोबर १८८५**

(ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ च्या आक्टाप्रमाणें नोंदविली असे)

**किंमत १ आणा**

पुरुषोत्तम मारुती, सु. वा., रा. रा. ज्याया कराडी लिंगू, रा. रा. राजन्ना बाळू कंट्र्याक्टर, धर्माजी बाबूराव धायरकर वगैरे मित्रांचा मनःपूर्वक आभार मानितों.

# उपोद्घात

हल्लीं या देशांतील इंग्रज बहादराचे राज्याच्या प्रतापानें गांजलेल्या स्त्रियांस तुरळक तुरळक लिहितां वाचतां येऊं लागलें आणि तेणेंकरून आज हजारों वर्षांपासून आर्य धूर्त जनांकडून एकंदर सर्व स्त्रियांचा सर्वोपरी छळ झाला व हल्ली होत आहे, ही सर्व पुरुषांची ठकबाजी, स्त्रिया डोळ्यापुढें आणून मांडावी ह्मणून या अंकांत थोडासा प्रयत्न केला आहे. यांत कित्येक स्त्रियांच्या उपटसूळ मुलांस एकदोन ठिकाणीं निक्षून लिहिलें आहे, याबद्दल एकंदर सर्व माझ्या माथाळू मायभगिनी मला क्षमा करोत, ह्मणून त्या सर्वांस माझी करद्वय जोडून विनवणी आहे. दुसरा सलाम घ्या.

# आभारपूर्वक सूचना

पूर्वी सत्सारचा पहिला अंक छापून प्रसिद्ध झाल्या दिवसापासून एकंदर सर्व माझे मित्रांनीं एक महिन्याचे आंत दोन हजार पुस्तकांपैकीं १,०५० प्रती विकत घेण्याची मदत केल्यामुळें मजला दुसरा अंक पुढें छापून काढण्याची उमेद आली आणि त्याबद्दल मी विशेषेंकरून पोलीसखात्याकडील मे० तुकाराम विठोजी, चि० का० मे. सर्वोत्तमसिंग, ची० का० मे. गणपतराव मल्हार, पो० इ., रा० सा० पुरुषोत्तम मारुती, सु. वा., रा. रा. ज्याथा कराडी लिंगू, रा. रा. राजन्ना बाळू कंट्राक्टर, धर्माजी बाबूराव धायरकर वगैरे मित्रांचा मनःपूर्वक आभार मानितों.

# सत्सार

## नंबर २

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

**उदरीं नऊ महिने ओझें वागविणाऱ्या स्त्रीजातीवर गुरगुरणारा उपटसुळ**

**आर्या**

स्त्रीपासुनि उपजुनियां त्यांची जातीच निंदसील जरी ॥
उपद्व्यापें कोण तुझे स्वजन्मातेनेंचि व्यर्थ इतर करी ॥ १ ॥

**दिंडी**

पत्रकर्ते हो बंधु अनाथांचे । मिरवितां कीं ऐसेंचि ब्रीद साचें ॥ १ ॥
शूद्र जैसा तैशीच स्त्रीहि दीन । शस्त्र धरिती त्यांवरी बुद्धिहीन ॥ २ ॥
निराधारें वा व्यर्थ निंदण्यांत । स्पष्ट मत्सर हा दीसतो जगांत ॥ ३ ॥
असति कांहीं स्वोक्तीस जीं प्रमाणें । भीड सोडोनी जगापुढें नेणें ॥ ४ ॥
निंदकाचे वचिं भाव धरुनि नोहे । श्लाघ्य कुलिला मलिनत्व देतसा हें ॥ ५ ॥
ताराबाई पंडिता रमा यांस । जाति दादा वैभवें शिकविण्यास ॥ ६ ॥
स्वस्त्रियांतें जरि ज्ञान दिलें होय । रमातारेशीं तरिच शिकवुं जाय ॥ ७ ॥

**यशवंत जोतीराव फुले,—प्र०—**तात्यासाहेब, आपण सत्साराचे पहिले अंकांत ब्राह्मणास प्रश्न केला कीं, "हिंदु धर्माचे उत्पादक आर्य ब्राह्मणांनीं स्त्री व शुद्रादि अतिशुद्र जातीवर आग पाखडून त्यांजविषयीं अनेक प्रकारचे जे जे जुलमी लेख लिहून ठेविले, त्यांपैकीं स्त्री जातीविषयीं कोणकोणते आहेत?" तर त्याविषयीं आपणच प्रथम मला उलगडा करून सांगाल, तर फार उत्तम होणार आहे.

**तात्या, उत्तर—**बाळा तुझी जिज्ञासा कांहीं अंशीं खरी असून स्तुत्य आहे, कारण हल्लीं इंग्लिश राज्याचे प्रतापानें पंडिता रमाबाईच्या प्रयत्नेंकरून, कित्येक आर्य ब्राह्मणांतील जाड्या जाड्या विद्वानांस लज्जा प्राप्त होऊन, त्यांनीं आपल्या ऋषिवर्य पूर्वजांस दोषमुक्त करण्याकरितां, आपल्या अज्ञानी निर्बल स्त्रियांस आपल्यासारख्या विद्वान करण्याचे कामीं सुरवात केली आहे; परंतु पूर्वी त्यांच्यांतील निर्दय आर्य ग्रंथकारांनीं

स्त्रियांविषयीं केलेल्या जुलमी लेखांविषयीं आरंभींच आपण वाटावाट करून लिहूं गेल्यास त्यापासून अनेक तोटे होतील. ते असे कीं,—आर्य ग्रंथकारांचे पुस्तकांतील कृत्रिम लबाड्या भट ब्राह्मणांचे लेकीबाळींच्या लक्षांत आल्याबरोबर, त्या एकंदर सर्व देवळांतील पुराणिकांची फटफजीती करून त्यांची रेवडी रेवडी करून सोडतील. शिवाय ब्राह्मणांच्या बहुतेक कुटुंबांत सास्वासुनांचे हमेशा वादविवाद होऊन नाना प्रकारचे तंटेबखेडे उपस्थित होऊं लागतील, या भयास्तव कित्येक भटभिक्षुक आपल्या मुलीबाळींस शाळेंत जाण्याचें बंद करून त्यांस आपलें सत्सार पुस्तक हातींसुद्धां धरूं देणार नाहींत.

तेणेंकरून त्या अबलाबापड्यांचें बरें होण्याचें एकीकडे राहून आपण त्यांचे दुःखास उलट कारण होणार आहोंत. दुसरें असें कीं—सुमारें तीन हजार वर्षांपूर्वी या देशांतील आर्य ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत स्त्रियांविषयीं अनेक जुलमी लेख केले, त्यांतील पाचपेंच आतांच्या जुन्या समजुतीच्या भटब्राह्मणांस कोठून कळणार? कारण त्यांची अलीकडे भलतीच समजत झाली आहे कीं, हे सर्व ग्रंथ अनादीसिद्ध असून ईश्वरप्रणित आहेत. त्यांतून कित्येक ब्राह्मणांसह शूद्रांस थोडेसें इंग्रजी वाचतां येऊन, लिहितां आल्याबरोबर एकानें आपल्या निर्वाहाकरितां वर्तमानपत्र सुरूं केलेंच, दुसऱ्यानें वेडीवाकडीं पुस्तकें तयार करून तीं विकण्याकरितां दुकान मांडलेंच. असल्या पोटबाबु वर्तमानपत्रें व पुस्तकेंकर्त्यांस आर्यांचे ग्रंथांतील व्यंगित कोठून कळणार! परंतु त्यांच्या पत्रांपासून व पुस्तकांपासून अज्ञानी जनांचीं मनें घोटाळ्यांत पडून त्यांस, खरें कोणतें व खोटें कोणतें हें निवडून काढतां मुळींच येत नाहीं. कारण या देशांतील विद्याखात्यांतील कामगारांच्या गैरसमजुतीमुळें शूद्रादी अतिशूद्रांस वाचतांसुद्धां येत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. कारण त्यांजमध्यें फारच थोडे वाचणारे सांपडतात. कांहीं ब्राह्मण विद्वान खेरीज करून एकंदर सर्व अज्ञानी जातीचे लोक एकाद्या उपटसुळाचे भलते सलते अविचारी लेख वाचून, ते कोणते वेळीं काय करतील, याचा नियम लागत नाहीं.

**यशवंत**—आपलें ह्मणणें रास्त आहे. कारण पंडिता रमाबाईच्या संस्कृत विद्वत्तेवरून अथवा तिचे उपदेशावरून ब्रह्म, प्रार्थना, आर्य वगैरे समाजांच्या वडिल बहिणीनें महिला-समाजाचा अवतार धारण केल्याबरोबर कित्येक विद्वानांचे मनांत, स्त्रियांस खरें ज्ञान होण्याकरितां त्यांस इंग्लिश विद्या शिकवावी असें आल्यावरून त्यांनीं महा प्रयास करून स्त्रियांकरितां एक पृथक इंग्लिश शाळा काढली आहे. व या सर्व हालचालीचें श्रेय पंडिता रमाबाईस दिलें, तरी चालेल. आणि असल्या विद्वान, विचारशील, परोपकारी, शोधक पंडिता रमाबाई मनाचा दृढ निश्चय करून, इंग्लिश अभ्यास करण्याकरितां इंग्लंडास गेल्या, आणि त्यांनीं तेथें पक्षपाती हिंदूधर्माचा धिःकार करून खिस्ती धर्माचा स्वीकार केल्याबरोबर महाराष्ट्रांतील कित्येक असमंजस पत्रकर्त्यांनीं त्या अबलेस नाना प्रकारचीं निरर्थक "इसापनीतींतील कोल्ह्यासारखी" दुषणें दिलीं. त्यापैकीं एक हूड वर्तमान-पत्रकर्ता इतका भडकला कीं, तो एकंदर सर्व युरोपियन स्त्रियांच्या अंगावर चाल करून,

त्यांच्या वडिलोपार्जित रीतीभातींवर बेलगामी कुतर्क काढून त्यांस दोष देऊं लागला; त्यामुळें बहुतेक इंग्लिश सभ्य गृहस्थास अतिशय लाज वाटून, त्याची उचलबांगडी करून त्यास थोडे दिवस हवा पालटण्याकरितां बिनभाड्याचे कारागृहांत नेणार, इतक्यांत तो अनुतापी वेडीचें सोंग घेऊन त्या केलेल्या कर्माबद्दल प्रायःश्चित्त घेऊन मोकळा झाला. हें सर्व त्यानें बरोबर केलें काय ?

**तात्या**—अरे बाळा, पंडिता रमाबाई पुण्यांत येण्याचे पूर्वी सौ० ताराबाई शिंदे मुक्काम बुलढणें, प्रांत वऱ्हाड यांनीं "स्त्री पुरुष तुलना" या नांवाच्या पुस्तकांत बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजेल त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरूं लागल्यामुळें, कित्येककुलीन पतिव्रता स्त्रियांस अतिशय विषम वाटून, त्या अज्ञानी व निर्बळ असल्यामुळें अमर्याद कोपातें पावून, त्यांचे मनांत दुष्कर्मरूपी समुद्राच्या अति भयंकर लाटा उद्भवतात, त्याचें निवारण व्हावें याप्रीत्यर्थ त्यांनीं पुरुष मंडळास अतिउत्तम बोध केला, तो "जिस तन लागे वहि तन जाने. बिज्या क्या जाने गव्हारा रे" या प्रसिद्ध कवनाप्रमाणें थोडासा तिखट खरमरीत आहे खरा, परंतु तो बोध एक आडमूठ वर्तमानपत्रकर्त्यास रुचला नाहीं. सबब, अथवा सौ० ताराबाईचें पुस्तक खंडन करूं लागल्यानें, उलट आपल्याच गळ्यांत त्यांतील सर्व दोषांचें घोंगडें पडेल, या भयास्तव राजश्रींनीं त्या पुस्तकांतील एकंदर सर्व बोधाचा धिःकार करून त्यास कचऱ्याचे पेटींत झोंकून आपलें नाक मुठींत धरून उलटी ताराबाईचीच निंदा करून तिचे उपकार फेडले.

**यशवंत**—दीन शुद्रादी अतिशुद्रांसहित स्त्रियांचे हितास्तव, रात्रंदिवस मतलबी भट ब्राह्मण जातीचे मर्दाबरोबर टकरा घेण्याचें एके बाजूला ठेवून, आपल्या घरांतील सायबिणीस "बिस मिल्ला" म्हणून कांदा फोडण्यापुरती "नीयत" म्हणतां येत नसल्यामुळें, सर्वोपरी गांवभर खिदाडे घालण्यास मोकलून, भलत्या एखाद्या विद्वान युरोपियन मडमेकडे आपल्या लेखणीचा मोहोरा न फिरवितां, स्वदेशांतील शेजारीपाजाऱ्यांच्या लेकीबाळींबरोबर बायकांतील दळ्याभाऊजीसारखे चढाओढीनें फेर धरून गाणें आणि हुंबर घालणें भोईफुगडीसह कोंबडा खेळून पक्का घालण्याची हौस मानणें, हें विद्वान म्हणविणाऱ्या मर्दाचें लक्षण नव्हे.

**तात्या**—खरोखर ज्याला आपल्या पुढच्या पात्रावरील बुंदीचा लाडूसुद्धां आम्हा वृद्ध मनुष्यासारखा मुठींत मुरगळून त्याचा चुरा करवत नाहीं, अशा पराक्रमी फोपश्या ज्वानाबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेवणें अप्रशस्त वाटल्यावरून याउपर मी तो सर्वथैव बंद ठेविला आहे. त्यानें आनरेबल रा. बा. माधवराव गोविंदराव रानडे याजसारखे आपल्या लग्नाचे भार्येस घरांतले घरांत विद्वान करून सौ. ताराबाई अथवा पंडीता रमाताईवर जोड सोडली असती, तर त्याच्या नावलौकिकाचा डंका पाताळीं अमेरिकेंतसुद्धां ऐकूं गेला असता. अरे, या स्त्रियांबरोबर हुंबर घालणाऱ्यानें पंडीता रमाताईचें नांवसुद्धां घ्यावयाचें नव्हतें, कारण याची समजूत ती किती ? याला स्वतः

चि. ताराबाईसारखे शिस्तवार असून मार्मिक लिहितां तरी येतें काय ? परंतु जर पंडीता रमाताईबरोबर यास तोलून पाहिलें तर याचें वजन खंडीस नवाटक्यासारखें भरणार आहे. प्रथम यानें आपल्या निजावयाच्या खोलींतील आपल्या सासऱ्याकडून अंदण आलेल्या खासगत तकलादी आरशींत आपला मुखडा पाहून त्या अबलांची बरोबरी करावयाची होती. असो, माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, त्यानें आपल्या स्वजातीचा अव्हेर करून आपले लग्नाचे खाशा स्त्रीस काळ्या पाण्यापलीकडील पतीविरह वनवासनामें बेटांत, नाना प्रकारचे शोकरसांचा अभ्यास करण्याकरीतां, ऐन ज्वानीचे भरांत जबरीनें पाठविलें आहे, म्हणून पूर्वीं वदंता उडाली होती. ती सर्व खरी असल्यास त्यानें आपल्या त्या लग्नाचे खासे बाईस आपल्या घरांत परत आणून तिजकडून चि. ताराबाईचे पुस्तकाचें अक्षरशहा खंडन करवावें. परंतु तसें करण्याचे अगोदर त्यानें वंगणी क्षेत्रीं नेऊन, तेथील भलत्या एखाद्या अशिक्षित कोळणीचे पायाचें तीर्थ पाजून, शुद्ध करण्याचे भरीस पडूं नये, असें माझें त्यास विनयपूर्वक सांगणें आहे. सदरीं लिहिलेली वदंत अक्षरशः खोटी असेल तर त्यानें कृपा करून इकडे तसें लिहून कळवावें, म्हणजे आम्ही पुढील एखादे सत्साराचे अंकांत त्याविषयीं उल्लेख करूं.

**यशवंत**—पुरे आतां, या दादाचा पिच्छा आतां सोडा, हे कसचे आपले लग्नाचे जायेस पतिविरहवनवासनामें बेटांतून घरीं परत आणितात, शिवाय ती विद्यार्थीण कदाचित् विलायती विद्येवर आशक होऊन या पतिराजांच्या आमंत्रणास विन्मुख झाल्यास या नवरोजींची मोठी फजीती होणार आहे.

**तात्या**—तर मग त्यानें प्रथम मार्गावर यावें, उगीच कोणाचे लेकीबाळींवर आपले दांत विचकून ख्याव ख्याव करून त्यांच्या अंगावर चाल करूं नये, म्हणजे बस्स. त्याचे कानावर कोणाविषयींही मजकूर आल्याबरोबर त्यानें आपली स्वतःची पक्की खात्री करून घेतल्यानंतर, पाहिजेल ते वेळीं पाहिजेल त्या मनुष्याचा मुलाजा न करितां त्याचें नांव प्रसिद्ध करून त्यास मार्गावर आणावें, परंतु त्यानें भलत्या एखाद्या मतलबी पोळ्यालाट्ट सुधारकाचें सोंग आणणाऱ्या नादीं लागून आपल्या खाशा घोडीचा लगाम मोकळा सोडून शेतकऱ्यांचीं शेतें तुडविल्यानें हा आपणांस कलंक लावून घेतला, यांत कोणाचें काय जाणार आहे !

**यशवंत**—असा उपटसूळ कोण आहे ! व तो इतकी दांडगाई करितो, तथापी आपण त्याचें नांव एकदम उघडकीस कां आणीत नाहीं ? अशा स्त्रीद्वेष्ट्याचा मुलाजा करणें आपणासारख्यास शोभत नाहीं.

**तात्या**—अरे बाळा, तो किती केला, तरी आपल्यांतील द्विपद बंधु आहे. केवळ आपण रस्त्यावरील चतुष्पात् पशूचें नांव घेऊन त्यास हाका मारणें तर दूरच, परंतु आपण त्याजकडे नुस्ते टक लावून पाहूंसुद्धां नये. न जाणो, तसें केल्यास तो आपले जातिधर्मानुसार कदाचित् आंगावर भोकूं लागेल. व कित्येक सुज्ञ गृहस्थ त्याचे लेखास

हातींसुद्धां धरीत नाहींत, अशाच्या अमंगल नांवाशीं आपल्याला काय करायाचें आहे ? तो उगीच लोकांचीं नांवें घेऊन आपली विद्वत्ता उघडकीस आणीना का. आणि त्यासारखें करणें थोर कुलीन पुरुषाचें सील नव्हे. कारण आपण सर्व मानव प्राणी चुकीस पात्र आहोंत, यास्तव अशा उपटसुळाची कित्येक वेळां क्षमा करणें, आपणां सर्वांस उचित आहे. त्यांतून कित्येक कमी दर्जाचे वर्तमानपत्रकर्त्यांस आपल्यांतील एखाद्या गाई वर्तमानपत्राची अथवा आपल्यांतील एखाद्या वृद्ध अजोबांची कां होईना, निंदा करून अज्ञानी जनांचीं मनें रिझवून आपलीं पोटें जाळावीं लागतात, यास्तव अशा तऱ्हेचा अधमपणा त्यासच शोभतो. परंतु बहुतेक कुलीन सभ्य विद्वान वर्तमानपत्रकर्ते कधीं कोणाचे नांवाचा एकाएकीं उच्चार करून एकंदर सर्व स्त्रीजातीस मलिनत्व आणित नाहींत.

**यशवंत**—आपण ह्मणालां कीं, बहुतेक कुलीन सभ्य विद्वान वर्तमानपत्रकर्ते भलत्या एखाद्या स्त्रीची खोटीनाटी निंदा करून, एकंदर सर्व स्त्रीजातीस मलिनत्व आणीत नाहींत, परंतु फारच थोडे हेकड वर्तमानपत्रकर्त्यांसहित कित्येक लोक असें म्हणतात कीं, "सर्व प्रकारचे साहसादि दुर्गुण स्त्रियांचेच आंगीं वसतात." त्याविषयीं आपला अभिप्राय कसा काय आहे तो कळवाल, तर त्यापासूनच कित्येकांचे डोळे उघडून उत्तम परिणाम होणार आहे.

**तात्या**—बाळा, तूं सारासार विचार करून पाहिल्याबरोबर स्त्रियांपेक्षां पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन ज्यास्ती भयंकर, धाडसी दुष्ट कर्मे आचरणारे आहेत, ह्मणून तुझीसुद्धां खात्री होईल. तथापि तूं विचारतोसच, त्या अर्थी त्याविषयीं थोडेसें सागतों.

प्रथम मूळ लग्नाची पहिली स्त्री दादलोजीस आवडेनाशी झाली, म्हणजे त्यानें दुसरी ज्वान पट्टी स्त्री तिचे उरावर करावी, पुढें सदरप्रमाणें दोघींच्या उरावर तिसरी आणि तिघींच्या उरावर आणखी चवथी स्त्री करून अखेरीस तिचा चोंबडा चाकर बनून रात्रंदिवस तिचे भोवतालीं गोंडा घोळून मौजा मारितो; परंतु स्त्रीचें लग्न होतांच तिचा नवरा दुर्वर्तनी निपजल्यासदेखील तिनें याचे उरावर दुसरा नवरा करून त्याच घरांत रात्रंदिवस संसारप्रपंच करून रहावें, म्हणून आर्यपुरुषांनीं केलेल्या ग्रंथांत कोठें लेख सांपडत नाहीं. पण एरवींची गोष्ट कशाला ? यावरून स्त्रिया किंवा पुरुष यांजपैकीं कोण ज्यास्ती पक्षपाती, जास्ती दगेबाज व ज्यास्ती कृत्रिमी आहे ? अरे बाळा, या पक्षपाती आर्य ग्रंथकारांचें घ्यावयाचें माप एक आणि द्यावयाचें माप एक.

दुसरें : कित्येक पुरुष आपल्या लग्नाच्या व द्वितिय संबंधाच्या स्त्रियांस घरीं मोकलून आपण सर्व रात्रभर गांवांतील गल्ल्याकुच्यांनीं वेस्वारांडांचे घरोघर दरड करीत करीत फिरतात, आणि मोठ्या पहांटेस घरीं येऊन, आपल्या खवळलेल्या स्त्रियांसमक्ष, रात्रभर चरलेल्या चाऱ्यावर रवंथ करितां करितां पासले पडून झोपीं जातात. तरी सदरच्या

बाजारी वेस्वा स्त्रियांस पात्रा या नांवाची किताबत आर्य पुरुषांनीं आपल्या ग्रंथांत दिली आहे. महम्मदी लोकांतील कित्येक छांदिष्ट नबाब बादशहा पुरुषांचे उन्मत्तपणामुळें त्यांच्या खाजगत जनानखान्यांतील शेंपन्नास लालची स्त्रियांच्या मनकामना यथातृप्त न झाल्या, म्हणजे त्या अतिशय खवळून त्यांच्या कोपाविष्ट झालेल्या मनाच्या कामविकाररूप महासागरांत द्वेषरूप लाटा खडकावर कसकसा थडकून छिन्न भिन्न होतात, याविषयीं शून्यवादि पुरुषांचे मनांत कळवळा कोठून येणार! या नबाब अथवा बादशहासाहेबांनीं, जर आपल्या मोहोपाशांत सांपडलेल्या पत्न्यांबरोबर इमानेंइतबारें सत्य स्मरून नांदणूक केली, तर या साहेबांची महिन्यांतून दर तिघी स्त्रियांचे घरीं एक दिवस वस्तीस राहाण्याची पाळीं येणार. तेथें त्याच्या बायकांनीं आपलें पातिव्रत्य कसें व कोणत्या मार्गानें निष्कलंक ठेवावें, याचा विचार करणें आपण आपल्या वाचकांकडे सोपवूं या.

फारच थोडे भले गृहस्थ सांपडतील कीं, जे नाचबैठकांकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहींत. बाकी सर्व वैदिक म्हणा, शास्त्री म्हणा, वेदांति म्हणा, सुधारक अथवा सुधारलेले म्हणा, एका माळेचे मणी, निर्लज्ज होऊन स्वस्त्रियांसमक्ष वेस्वाकसबीण अथवा पात्राचे नाच-बैठकींत गाणें चालू असतां, मधून मधून प्रतिष्ठित पुरुष एकमेकांचे मांडीवर तिजला बसवून तिच्याकडून प्रत्येकाच्या गळ्याला मिठ्या मारवितात.

त्याचप्रमाणें बहुतेक पुरुष नाटक व तमाशांत पोऱ्यास बायकोचें लुगडें नेसवून, त्याचे अंगावर स्त्रियांचे अलंकार घालून, त्यास थेट स्त्रीचें सोंग देऊन त्यास आपल्या सुनाबाळांसमक्ष आपल्यापुढें नाचवून, हलकट गाणीं गावयास लावितात; व त्यांचें गाणें चाललें असतां एकमेकांचे मांडीवर बसवून त्याजकडून सदरील कसबिणींसारखे चावचाळे करून, त्यांचे हातांत चवली अथवा पावली दर पुरुषाकडून देववून, त्यांकडून आपआपले नांवाची दवलतजादा करून, आपण आपल्यासच धन्य मानून घेतात.

आहो, हे सोनपत पानपत, खर्डें वगैरे लढायांत जाहामर्द मुसलमान लोकांबरोबर टकरा घेणारे सोंवळे विद्वान ब्राह्मण व ओंवळे अविद्वान शूद्र शिपायांचे वंशज ना! आणि यांनीं स्त्रियांसमोर आपल्या नाकांत नथड्या अडकवून, नाना तऱ्हेचे नखरे करून ठमकत ठमकत नाचून नारदासारख्या टाळ्या वाजवाव्या, याला म्हणावें तरी काय? परंतु स्त्रियांपैकीं कोणीतरी एका ठिकाणीं जमून, एकादा जवान, देखणा, मृगनयनी, धष्टपुष्ट, मर्द, कसबी, गवई, आपल्यासमोर इष्की गाणीं गावयास लावून, त्यानें गातां गातां आपले हाताचे हावभाव करून, आपल्या नयनाच्या कमठ्यांतून तिराचा वर्षाव केल्याबरोबर आपल्या अंतःकरणांत घायाळ होऊन, त्या छबिल्या गवयाचे मांडीवर पाळीपाळीनें बसून त्याचेबरोबर पुरुषाप्रमाणें ख्यालतमाशे करितात काय? असो, परंतु आपल्यांतील एकादा मायेचा पुत, आपल्या मातेच्या उदरांतून बाहेर पडल्यापासून आजतागाईत, आपल्या विक्टोरीया महाराणी भगिनीच्या अमलांतून का होईना, सदरीं लिहिल्याप्रमाणें करामती स्त्रिया करितात व तें त्यानें आपल्या दृष्टीनें पाहिलें असें सांगूं शकेल काय? व तें

त्यानें तसें लिहून कळविल्यास, मग काय सर्व स्त्रियांना तो एक अयोनिसंभव नारायणच सांपडला असें होईल.

कोणत्याही का खंडांतील राष्ट्र असे ना, तेथील मरणोन्मुख झालेला वृद्ध राजा मृत्यु पावल्यावर त्याची भर ज्वानींत मिनिटसुद्धां येण्याची मारामार, आणि त्या महाराजास सर्व रात्रभर खैचाताणी झाल्यामुळें एक सेकंद तरी गार झोंप घेण्यास सवड होत असेल काय ? कदाचित् ते देवबाप्पा दिवस रगडून झोप काढीत होते ह्मणावें, तर अर्जुनासारिख्या महाविराच्या तुंबळ लढाईंत दिवसभर रथ हाकून अर्जुनास ज्ञान शिकविण्यास त्यांला फुरसत कशी सांपडली असेल ? असा प्रश्न सहज निघतो. वाहवा रे देवपुरुष ! आणि शाबास त्या आर्य ग्रंथकर्त्यांची ! या सर्व गोष्टींवरून स्त्रिया अथवा पुरुष यांपैकीं ज्यास्ती ठक कोण आहे ?

तिसरें : या सर्व पृथ्वीचे पृष्ठभागावर बहुतेक देशांतील लोभी लक्षाधीश (स्त्रिया नव्हेत) पुरुष, शेजारचे निर्बळ मानव बांधवांचे देश काबीज करण्याकरितां, भलत्यासलत्या कुरापती काढून आपआपल्या लावलष्करासहित दलभारास बरोबर घेऊन दुसऱ्याचे मुलखांत स्वाऱ्या करितात, त्या वेळीं उभयतामध्यें तुंबळ युद्ध चालू असतां शेतकी-व्यापार, कारखाने वगैरे अनेक लहानमोठे धंदे बंद पडून चोहोंकडे काळोखमय दुःखाचें धुकें पसरून कोणास कोणी ओळखूं येत नाहीं. अनेक ठिकाणीं निर्दय पेंढारी, कहीवाले यांची लूट धुमाळी चालूं असल्यानें कित्येक घरंदाज श्रीमंताचे, कंगाल होऊन दाण्यास महाग होतात. आणि बहुतेक शेतकऱ्यांचीं जनावरें तृणावांचून मरूं लागतात. यामुळें कित्येक कुटुंबवत्सल शेतकरी आपलीं मुलेंमाणसें व गुरेंढोरें बरोबर घेऊन परागंदा होतात, यामुळें कित्येक खेडींपाडीं ओसाड पडतात. एकाचे स्वार्थबुद्धीवरून दोन्ही पक्षांतील टोलेजंग सैन्यें एकमेकांशीं लढतांना लक्षावधी शिपाई आपल्या अमोल जीवास मुकतात व तेणेंकरून हजारोंहजार स्त्रियांचे कपाळीं वैधव्य आल्यामुळें त्यांना आपलें शेवटलें आयुष्य परम संकटांत व दुःखांत कंठावें लागतें. कित्येक स्त्रिया एकुलत्या एक पुत्राचा शोक करून, हायतोबा हायतोबा करीत करीत यमाजीचा दरबार गांठितात आणि कित्येक पोरकीं मुलीमुलें अन्नवस्त्रास मोताद होऊन जिकडे तिकडे दया दया, भया भया करीत फिरतात. इकडे विजयी सत्ताधारी आपले शिपायांकडून पराजित केलेल्या सत्ताधाऱ्याचे निराधार रयतेस लुटून त्यांचीं घरेंदारें जाळून, फस्त करून, त्यांस निखालस उघडेबंब करून टाकितात, आणि आपल्या मुलखांत (घरीं) आल्यावर मोठमोठाले जंगी दरबार भरवून त्यामध्यें आपल्या फौजेंतील अतिशय क्रूर, अतिशय निष्ठूर, अतिशय धाडसी व नित्य नवीं भयंकर कामें करणाऱ्या शिपायांतून कोणास उमरावबाहादूर, कोणास जंगबाहादूर, वगैरे लांबच लांब बड्या नांवाच्या पदव्या देतात. परंतु कित्येक सालस शिपायांस लढाईंत मोठमोठ्या जखमा झाल्याबरोबर घायाळ होऊन जमिनीवर पडतांच दैवयोगानें त्यांच्यांत थोडीशी धुगधुगी असल्यामुळें, हमालांत दया फुटून त्यांनीं त्यांस,

ओढ्याखोड्याच्या बाळींत मेलेल्या शिपायांच्या ढिगांत टाकून, त्यांजवर दरड न कोसळतां तसेच तेथें पाणी पाणी म्हणत, पडूं दिलें, पुढें जखमाचे वेदनेपासून मुक्त करण्याकरितां डॉक्टरसाहेबांनीं त्यांजवर अमृताच्या कुपींचा प्रयोग करण्याचे चुकल्यामुळें ते अखेरीस कसे तरी वाचले, तसल्या हजारों जखमी शिपायांस थोड्या थोड्या फक्त पोटापुरत्या पेनशनी मिळाल्याबरोबर ते आपल्याला कुटुंबांत अथवा भाऊबंद सोयरेधायऱ्यांत आपले शेवटले दिवस काढण्याकरितां कसे तरी कण्हतकुथत अथवा लंगडखुट घालून आपापले इच्छिले ठिकाणीं जातात. यावरून परदेशांतील राजेरजवाड्यांचे लक्षावधि शूर शिपायांचा वध करून त्यांचे मुलूख आपले ताब्यांत घेण्याकरितां एका ज्युलियस सीझराचे कारकीर्दींत सहा लक्ष रोमन शिपाई खपले, तेव्हां येथील असंख्य क्षेत्रवासी दस्यू, आस्तिक, आहिर, मातंग वगैरे क्षत्रियांचा वध केल्यानंतर त्यांचे आर्भकांचा निर्दयपणें वध करून हा सर्व मुलूख आपले ताब्यांत घेतांना एकट्या आर्य परशुरामाचे धुमाळींत किती आर्य भट (योद्धे अथवा शिपाई) मेले गेले असतील ? या सर्व अफाट जहामर्द पुरुषांचे महापुरांत नांवाला मात्र पांचपंचवीस धाडस स्त्रिया असतील. त्यांपैकीं पुराबाहेर उमदळून आलेल्यांपैकीं मला ज्या ठाऊक आहेत त्यांची नांवें पुढें लिहिल्याप्रमाणें :—पहिली पुराणांतील दैत्यमर्दिनी आंबिका. दुसरी हिंदुस्थानांत स्वारी करणारी सेमीरेमी व तिसरी कालच्या चपाती बंडांत विटाळसा होऊन बसणाऱ्या झांशीच्या राण्याची स्त्री. या सर्व वृत्तांवरून स्त्रिया अथवा पुरुष यांपैकीं ज्यास्ती साहसी कोण ?

चवथें : युरोप व अमेरिका खंडांतील, ब्राह्मणासारखा आपला धर्माचा बाणा बाळगणाऱ्या पुरुषांनीं आफ्रिका खंडांतील अज्ञानी दीन दुबळ्यांचे मुलीमुलांस, चोरून जबरीनें आपल्या अथवा परमुलखांत नेऊन त्याचे दास करण्याकरितां पशुपक्ष्यांसारखा विक्रय करून आपली पोटें जाळीत व त्या बच्च्यांस विकत घेणारे धार्मिक कसकसे छळीत असत, त्याविषयीं विचार करूं गेल्यास पुरुषांचे क्रूर कर्मांविषयीं अंगावर रोमांच उभे राहतात. हा सर्व पुरुषांचा क्रुरपणा बाहेर आणण्याकरितां एका अमेरिकन स्त्रीनें लिहिलेलें "अंकल टाम्स क्याबीन"—"Uncle Tom's Cabin" या नांवाचें एक पुस्तक हातांत घेऊन वाचितांना कसाहि ढ, पाषाणहृदयी, कठोर, निरपराधि स्वस्त्रीचा परित्याग करून एकंदर सर्व स्त्रीजातीचा हेवा करणारा आडमूठ वर्तमानपत्रकर्त्ता जरी असला, तरीसुद्धां लोकलजेस्तव मारवाडिणीसारखा नाकावर पदर घेऊन लुटुमुटु चौघांदेखत आसू ढाळतांना, एकदोन उसासे टाकून थोडेसें फुंदावें लागेल; मग इतर मायाळू जनांची काय कथा ? यावरून स्त्रिया अथवा पुरुष यांपैकीं ज्यास्ती दुष्ट कोण ?

पांचवें : सर्व दुर्गुणांहीं अलंकृत भर्ता स्वर्गवासी होतांच, स्त्रीनें आपल्या पतिप्रेताचे पायाचा अंगठा हातांत धरून, परजातीच्या अशौच्य शूद्र नापिकाचे हातून आपलें बोडकें भादरून घ्यावें, अंगावरील सर्व लहानमोठे दागीने, मरूं घातलेल्या मामाजीचे पदरीं आंवळण्याकरितां, त्याचे स्वाधिन करून, आपण आपल्या मनगटांत

तुळशीच्या मनगठ्या घालण्याजोगती भिकारीण होऊन बसावें. एकंदर सर्व उंची वस्त्रें ह्मातारपणाचे चावनखरे करणेकरितां सासू-आत्याबाईचे स्वाधीन करून आपण केवळ झाडूवाल्या मांगिणीसाठीं गुजरीवर गुजारा करून रहाण्यापूर्ती तयारी करावी; निरंतर बहुतेक मादक मिष्टान्न पदार्थ खाण्याचें अजिबात वर्ज करून एकामागें एक उपोषणांचा पाठलाग करून, फराळाकरितां भुईमुगाचे दाणे वगैरे नच मिळाल्यास खुपरा दशम्या भक्षून, बाकी उरलेलें आयुष्य रात्रंदिवस बटकुलीसारखें घरांतील सर्व कामाचा चेंदा उपसून, आपल्यास कट्टी धार्मिक ह्मणवून घेण्याची तिची छाती होत नसल्यास, तिनें अगाध पुण्य होण्याच्या लालचीनें आर्य पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें आपल्या सर्व दुर्गुणमंडित पतीच्या प्रेताचे उशाखालीं आपली मांडी देऊन बसल्याबरोबर, या अति कोमलहृदयी पुरुषांनीं जिवंत जागृत अज्ञानी स्त्रीस जाळून तिची राखरांगोळी करावी.

फ्रान्सांतील लोकांनीं विरुद्ध पक्षांतील राजघराण्यांतल्या राजेरजवाड्यांस, त्यांचे जहामर्द सरदारांस, त्यांचे विद्वान मुत्सद्यांस, त्याचे धूर्त व चतूर प्रधानांस व त्यांचे कुटुंबवत्सल शिपायांस तलवारीच्या झडक्यांनीं अथवा बंदुकीच्या भाडेमारानें कत्तल करण्याचें आवडेना, तेव्हां भडभुंजाचे डंगासारखें एक यंत्र करून त्यांत, त्या सर्वांचीं एकामागें एक मुंडकीं गुंतवून कचकचा उडविलीं. त्याचप्रमाणें कालच्या उत्तम कुळांतील पवित्र आर्य नानासाहेब पेशव्यांनीं पूर्वीं सोवळें न होतां इंग्लिश सरदारांचे मांडीशीं मांडी भिडवून म्लेंच्छांनीं तयार केलेलें मद्यमांस, पाव, बिसकुटें वगैरे पदार्थ चाटून पुसून खाल्याचे उपकार मनीं स्मरून, त्यांनीं कृतज्ञतापूर्वक सन १८५७ सालच्या कोतुंशी चपाती बंडांत सोवळें होऊन इंग्लिश लोकांचे उपकार किती सफाईनें फेडले, याविषयीं तुझी खात्री होण्याकरितां त्यापैकीं कांहीं नमुने देतों—

फतेगडाहून इंग्लिश स्त्रिया, पुरुष, मुलेंबाळें मिळून सुमारें एकशें सव्वीस भांबावलेले प्राणी, आपापले जीव मुठींत घेऊन नावेंत बसून गंगामार्गानें पळून जात होते. त्या सर्वांस नानासाहेबांनीं अभयवचन देऊन किनाऱ्यावर आणिल्यानंतर त्यांचा परिणामीं कसकसा शेवट केला तो ऐक.—प्रथम नानासाहेब पेशव्यांनीं, त्यांतून सर्व पुरुषांस निवडून तेथेंच एके बाजूला उभे केले आणि त्यांचेसमोर त्यांच्या भांबावलेल्या स्त्रियांनीं आपआपल्या स्तनाला लावून उराशीं गच्च आंवळून धरलेल्या तान्ह्या बच्चांस हिसकावून हातांत नागव्या तरवारी घेऊन, त्यांच्या भोवतालीं उड्या मारून मोठ्या सफाईनें त्यांचीं शिरें कोवळ्या काकडीसारखीं उडविलीं. त्यांचीं लहान लहान चिटकुलीं मुलें दूध पिण्याकरितां आपल्या आयांचे बगलांनीं मुंड्या खुपसून त्यांस मा-मा करून कधीं त्यांच्या डोचक्यावरील टोप्या, कधीं त्यांच्या भाळावरच्या कुरळ केसांच्या लवलव करणाऱ्या बटा, कधीं त्यांचे कान, कधीं त्यांच्या गळ्यांतील क्रास वरखडून पोटभर दूध पिऊन धातांच ते आपल्या पित्यावर झडपा घालून त्यांजवळ गेल्याबरोबर, त्यांनीं त्या बालकांस आपल्या मांडीवर घेऊन त्यांस मुके न दिल्यास त्यांच्या टोप्या खालीं पाडून

त्यांच्या मिशा गच्च आपल्या हातांत धरून ओढाताण करितां करितां त्यांस पा–पा–बा–बा असे बोबडे बोल उद्गारणाऱ्या चिमुकल्या मुलांच्या धडावरील शिरें लिंबासारखीं उडविलीं. दोन वेळां शाळेंत शिकून रात्रंदिवस सर्व घरभर धागडधिंगा घालून एकमेकांच्या खोडाळ्या करून आयांस वारंवार त्रास देणाऱ्या खेळकर मुलांस ज्यांचें नऊ महिने पोटांत ओझें वागवून त्यांस जन्म दिलें, त्यांचा गूमूत काढून त्यांचे सर्वोपरी पालनपोषण केलें, त्यांचे लालन करून करून त्यांचें कौतुक पहाणाऱ्या आयांचे समोर, त्यांस भाल्याचे फाळांनीं भोसकून त्यांस खालीं धरणीवर पाडल्याबरोबर त्यांचीं आईबापें एकमेकांकडे दीन वदनेंकरून पहात आहेत, इतक्यांत त्यांचे स्त्रियांचीं शिरें तरवारीचे झटक्यासरशीं खालीं पाडवितांच बाकी उरलेल्या दुर्दैवी इंग्रजांस नीट ओळींत उभें करून त्या सर्वांचे दोन्ही हात मागें फिरवून, त्यांचे बगलांतून बांबू गोंवून, पिछाडीस प्रत्येकाचे दोन्ही हात जखडून बांधिले.

---

मे० सत्सार पुस्तककर्ते यांस :—

वि. वि. लिहावयास कारण कीं, तुमच्या पुण्यांतील (कृष्णराव) भालेकरांच्या सु (कु) शिक्षणगृहांत (खाणावळ) मुंबईकरांनीं आपलीं मुलें पाठविलीं आहेत. त्यांपैकीं बहुतेकांनीं आपल्या आईबापांस त्यांच्या खाण्यापिण्याच्या अव्यवस्थेविषयीं लिहून गेलेलें पाहूं जातां अंगावर रोमांच उभे रहातात. त्यावरून कित्येकांनीं आपलीं मुलें काढून त्यांची पुण्यांत दुसऱ्याकडे व्यवस्था केली आहे. यास्तव आपण कृपा करून आपल्या सत्सारांत हें पत्र छापून प्रसिद्ध केल्यास एकंदर सर्व मुलांचे पालकांवर मोठे उपकार होतील. भालेकरानें गतवर्षीं कुशिक्षागृह सुरू करण्याचे पूर्वीं त्याविषयीं जाहीरातींत थोर थोर गृहस्थांचीं नांवें पुढें केल्यावरून त्या नांवांस भुलून आम्ही आमच्या मुलांस दुःखांत पाडिलें.

ता० २६ सप्टेंबर, सन १८८५ इसवी
आपला एक मुंबईकर

सर्वगुणसंपन्न आमचे भालेकर, जर तूर्त व्यवहार सुधारक मंडळींत, काय आहे! काय पाहिजे! असें पुकारून सर्व गांवभर गवगवा करण्याचें एके बाजूला ठेवतील आणि आपल्या मुंबईकर यजमानांस वंगनी क्षेत्रीं ताबडतोब नेऊन त्यांजपासून आपल्या कलमी सुशिक्षणास प्रायश्चित देतील तर बरें होईल, नाहीं तर Jack of all and master of none या म्हणीप्रमाणें त्यांचें सर्वच आंधळें गारुड उघडकीस येणार आहे.

स० पु० क०

---

## ११

# मराठी ग्रंथकारसभेस पत्र

# मराठी ग्रंथकारसभेस पत्र

[मराठी ग्रंथकारसभेस (साहित्यसंमेलनास) न्या. म. गो. रानडे यांच्या मार्फत म. फुल्यांनीं जें पत्र पाठविलें होतें, तें 'ज्ञानोदय'वरून देण्यांत येत आहे.]

वि. वि. आपलें ता. १३ माहे मजकूरचें कृपापत्रासोबतचें विनंतिपत्र पावलें. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घाल्मोठ्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयीं वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्यानें खुषीनें व उघडपणें देववत नाहींत, व चालू वर्तनावरून अनुमान केलें असतां पुढेंही देववणार नाहींत, तसल्या लोकांनीं उपस्थित केलेल्या सभांनीं व त्यांनीं केलेल्या पुस्तकांतील भावार्थांशीं आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाहीं. कारण त्यांच्या पूर्वजांनीं आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्यानें, आम्हांस दास केल्याचें प्रकर्ण त्यांनीं आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमानें दडपलें. याविषयीं त्यांच्यांतील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ति व त्रास सोसावे लागतात, हें त्यांच्यांतील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानीं आगांतूक भाषण करणारांस कोठून कळणार? हें सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्कें माहीत होतें, तरी त्यांनीं फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरितां डोळ्यावर कातडें ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळतांच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोंवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानूं लागला; व आपल्या पेनशनदात्या सरकारनें बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धां सोवळ्यानें बोट लावण्याचा विटाळ मानूं लागला! अशीच कां शेवटीं ते सर्व आर्य ब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नति करणार! असो, आतां यापुढें आम्ही शूद्र लोक, आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहींत. सारांश, त्यांच्यांत मिसळल्यानें आम्हा शूद्रादि अतिशूद्रांचा कांहीं एक फायदा होणें नाहीं, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणें असेल, तर त्यांनीं एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधूप्रीति काय केल्यानें वाढेल, त्याचें बीज शोधून काढावें व तें पुस्तकद्वारें प्रसिद्ध करावें. अशा वेळीं डोळे झांकणें उपयोगाचें नाहीं. या उपर त्या सर्वांची मर्जी. हें

माझें अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरितां तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुढ्ढेका येह पहिला सलाम लेव.

आपला दोस्त,
**जोतिराव गो. फुले**
(ज्ञानोदय, दि. ११ जून १८८५)

# १२

# इशारा

# उपोद्घात

आर्य ब्राह्मणांतील पहिला दिवाभीत, गृहस्थाचा डौल घालून पुण्याचा रहिवासी असतां मुंबईकर बनून विद्वान् श्रीमान् महाराज गायकवाड सरकारास पोकळ ज्ञान शिकवतो कीं, "जातिभेद असला म्हणून आपल्या इष्ट हेतूस तो (जातिभेद) बिलकूल (या देशाचे उन्नतीस) आडवा येत नाहीं." तथापि असल्या शूद्रादि अतिशूद्र द्वेष्टया वाचाळ उपदेशकांच्या मतलबी पोकळ पांडित्याचा आम्हांस यत्किंचित् अचंबा वाटत नाहीं, कारण जातिभेद मोडल्यापासून आर्य ब्राह्मणांनीं अतिशूद्रास विद्या शिकण्याचा केलेला ब्रह्मराक्षसी प्रतिबंधाचा धिक्कार करून ते सर्व विद्वान् होतील, त्या वेळीं भटब्राह्मणांची सर्व दुष्कर्मे उघडकीस येतांच त्याचे मतलबी ग्रंथास कोणी हातींसुद्धा धरणार नाहींत. अठरा वर्णांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ म्हणून कोणी त्याची पत्राज चालूं देणार नाहींत, धोत्रेकुट्या ब्राह्मणांस कोणी फुकटफाकट तूप–पोळ्यांची प्रयोजनें देणार नाहींत. तबलजी ब्राह्मणास कोणी मान देणार नाहींत व खोटेनाटें करणाऱ्या ब्राह्मणास कोणी दारापाशीं उभें करणार नाहींत.

परंतु आर्य ब्राह्मणांतील दुजा नूतन शंकराचार्यांचे तोलाचा विद्वान् लहानमोठ्या सभांत उड्या मारून प्रतिपादन करीत फिरतो कीं. "पूर्वींच्या तीस वर्षांपेक्षां हल्लीं शूद्र शेतकऱ्यांची स्थिती बरी आहे." या त्याच्या धाडसाविषयीं मात्र थोडेंसें नवल वाटतें, कारण शूद्र शेतकऱ्यांपासून गोळा केलेल्या करपट्टींतून आमचे इंग्रज सरकारनें लक्षावधि रुपये खर्ची घालून भटब्राह्मणांस विद्यादान केल्याचें सार्थक पालथ्या घागरीवर समुद्र पालथा केल्याप्रमाणें झालें. कारण आज हजारों वर्षांपासून खुनशी आर्य ब्राह्मणांनीं बनविलेल्या खोडसाळ धर्माचे आडून अज्ञानी, शूद्र शेतकऱ्यांवर चहूंकडून जुलूम करीत आले आहेत व ते सर्व डावपेची जुलूम परोपकारी युरोपियन ग्रंथकारांच्या लेखी शोधांवरून व युरोपियन, अमेरिकन, कनवाळू लोकांनीं आपले पदरचे पैसे खर्ची घालून, या हतभागी देशांत पाठविलेल्या धर्मोपदेशकांच्या शिक्षणावरून अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांच्या स्थितींत कोठें थोडासा पालट पडत चालला आहे. म्हणजे या तीस वर्षांत शूद्र शेतकऱ्यांवरील आर्य ब्राह्मणांचा धर्मरूपी जुलूम कांहीं अंशीं कमी झाला, हें उघडपणें कबूल करण्याची लाज वाटून तो मोघम म्हणतो कीं, "पूर्वींचे तीस वर्षांपेक्षां (शूद्र) शेतकऱ्यांची स्थिति हल्लीं बरी झाली आहे." अहो, हे धूर्त, आमचे अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांची "सोजरी" भाषा अजाणत्या गव्हर्नर जनरलसारख्या कामगारांची समजूत काढण्याकरितां वापरून, हमेशा कशीतरी वेळ मारून नेतात.

यांच्या एकातरी ब्राह्मणाच्या कुटुंबांतील बायकामुलांस, आम्हां शूद्र शेतकऱ्यांचे बायका-मुलांसारखें उन्हातान्हांत उपाशीतापाशी शेतीं कामें करण्याचा इंगा माहीत आहे काय ? या

सर्व भटब्राह्मणांतील एकानें तरी सोनखताच्या पाट्या वाहून झाडांच्या खोडाशीं टाकल्या आहेत काय ? यांचे आर्यभटबंधु आम्हां शूद्र शेतकऱ्यांचे निढळाचे श्रमाचीं वीस वीस रुपयांचीं गोप्रदानें दररोज घेऊन नायकिणीच्या भरीस घालतात, याविषयीं कोणाहि ब्राह्मणांची वाचा उसळत नाहीं.

असो. हें त्यांचें म्हणणें पूर्वींचे गायागुरांचे कळप वळणाऱ्या, वल्कलें नेसून पर्णकुटींत वास करणाऱ्या, कंदमुळांवर निर्वाह करून जंगलोजंगलीं भटकत फिरणाऱ्या आर्यभट ब्राह्मणांपेक्षां हल्लींचे भिल्ल, कोळी, मांग व महाराची स्थिति फार नामी आहे, असें म्हणण्यासारखें आहे. अहो, हे मतलबी विद्वान भटब्राह्मणसुद्धां पुन्हा अज्ञानी देवभोळ्या शूद्रातिशूद्र शेतकऱ्यांचे जन्मांतरांत ब्रह्मघोळ करूं पाहतात. याविषयीं आमचे शूद्रातिशूद्रांसह आर्यभट ब्राह्मण बांधवांस स्पष्ट दिसून यावें, म्हणून या चोपडीस ‘इशारा’ नांव दिलें आहे.

ता. १ ऑक्टोवर
सन १८८५

—जोतीराव गोविंदराव फुले

# इशारा

"जिस तन लागे वहि तन जाने।
बीजा क्या जाने गव्हारा रे॥"

या हिंदुस्थान देशाच्या स्थितीविषयीं साधारणपणें थोडासा विचार करूं गेल्यास आपले सहज असें लक्षांत येईल कीं, या देशावर प्राचीन कालापासून ज्या ज्या लोकांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं बहुतेकांचे हातून या देशांतील मूळचे राहणारे शूद्रातिशूद्र प्रजेस सौख्यकारक व दिवसानुदिवस तिचे सुधारणुकीस कारणीभूत असून, देशाचे ऐश्वर्यवर्धक अशा क्वचितच गोष्टी घडून आल्या. प्रथमतः इराणी लोक म्हणजे जे हल्लीं सर्व हिंदुस्थानभर 'आर्य' अथवा 'ब्राह्मण' या नांवानें प्रसिद्ध आहेत, त्या लोकांनीं या देशावर स्वाऱ्या करून आपली सत्ता स्थापन केली. याविषयीं परशुरामाचे कारकीर्दीचें उदाहरण बस आहे. पुढें त्यांनीं मन मानेल तसें सर्वथैव स्वहितास उद्देशून मनूसंहिते-सारखे कायदे करून, त्यास विशेष वजनदारी आणण्याकरितां धर्माचें पूट देऊन, त्या वेळचे अज्ञानांधःकाराच्या महार्णवांत गटांगळ्या खाणाऱ्या शूद्रादि अतिशूद्र जनांत प्रसार करण्यामध्यें जय मिळविला. पुढें कांहीं कालानंतर मुसलमान लोकांनीं (अफगाण, मोंगल वगैरे) या देशावर स्वाऱ्या केल्या. त्याचप्रमाणें अलिकडे युरोपांतील डच, पोर्तुगीज, फ्रेंच इत्यादि लोकांनीं स्वाऱ्या केल्या; परंतु त्या स्वाऱ्या कांहीं विशेष म्हणण्यासारख्या नव्हेत; कारण त्या लोकांची सत्ता या देशांत फारच थोडे ठिकाणीं असून अल्पकाळांतच नाहींशी झाली. त्यापासून प्रजेस विशेष सुख प्राप्त झालें नाहीं व विशेष दुःखहि प्राप्त झालें नाहीं. वर जे लोक सांगितले, त्यांपैकीं पहिले दोन म्हणजे आर्यब्राह्मण व मुसलमान यांपासून प्रजेस (येथें व पुढें प्रजा शब्दाचा अर्थ शूद्रादि अतिशूद्र लोक समजावा.) फारच त्रास उत्पन्न झाला. ते स्वतः कपट, मत्सर, क्रूरता, आपलपोटेपणा वगैरे अवगुणांचे केवळ मूर्तिमंत पुतळेच होते, यांत कांहीं संशय नाहीं. त्यांनीं आपले अविचाराचे हेतु सिद्धीस जावे, म्हणून हातांमध्यें अंमलरूपी अति तीव्र कोरडा घेऊन या देशांतील हस्तगत झालेले दीन प्रजेचे अंगावर फडाफड उडवीत गेले. त्या वेळेस ते प्रजेस, ज्या हितकारक व सौख्यकारक गोष्टी त्याजमध्यें सुधारणा न करितां, तिचा कसा छळ करावा, त्याजमध्यें मोठे प्रवीण होते. इतिहासावरून पाहिलें असतां असें समजतें कीं, कित्येकांनीं एखाद्या मिथ्या व क्षुल्लक कारणाकरितां प्रजेपैकीं शेंकडों मनुष्यांस त्रस्त करून

शेवटीं त्यास मोठे दुष्ट रीतीनें जिवानिशीं मारावें, कित्येकांनीं आपल्या दुष्ट वासना तृप्त करण्याकरितां कुलीन, पतिव्रता आणि सुंदर अशा दुसऱ्याच्या स्त्रियांचा जुलमानें अभिलाष धरावा आणि लहानसहान अपराधाकरितां मनुष्याचे हालहाल करून त्यास देहान्त शिक्षा द्यावी. या वेळेस मनुष्यास शिक्षा देण्याचाहि मार्ग मोठा विलक्षण व भयंकर होता. त्याजविषयीं केवळ ऐकिलें असतां हल्लींच्या कालांतला कसाहि मनुष्य असला, तथापि त्याचें अंतःकरण कळवळून येऊन भयानें सर्वांगास कांटा आल्याशिवाय राहणार नाहीं. पहा, सुळावर देणें हें किती घोर कृत्य आहे ! त्याचे सुईसारखे अणकुचीदार अग्रावर मनुष्यास बसवून तें अग्र त्या मनुष्याचें मस्तक फोडून बाहेर निघेपर्यंत त्यास खालीं ओढणें म्हणजे निर्दयतेची पराकाष्ठा झाली. तसेंच मनुष्याचें अंग चाबुकानें अथवा झाडाचे फोकानें फोडून सर्वांगांतून रक्त वाहावें तोंपर्यंत मारून, त्याजवर मिठाचें अथवा चिंचेचें पाणी वरून शिंपडावें आणि त्यापासून त्यास अत्यंत व्यथा प्राप्त होऊन तो तरफडून तरफडून कसा तळमळत आहे हें पहावें, अथवा त्याची मोट बांधून कडेलोट करणें, अथवा हत्तीस मस्त करून त्याचे पायास मनुष्यास बांधून त्या हत्तीस खडकाळ रस्त्यावरून फिरवणें (प्रख्यात व पराक्रमी विठोजीराव होळकरसारख्या वीराची निमकहराम पेशव्यांनीं कशी दुर्दशा केली याची आठवण करा.) अथवा मनुष्याचे तोंडांत तेल, शेंदूर अथवा शिसें पागळवून ओतणें वगैरे शिक्षा केवळ द्वेषामुळें अथवा यत्किंचित् अपराधामुळें प्रजेस सोसाव्या लागत. थोडकेच दिवसामागें म्हणजे आर्य पेशवे यांचे शेवटील कुलदीपक पुरुष रावबाजीचे कारकीर्दीचा अस्त होईतोंपर्यंत, शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले, तर त्यांस उन्हामध्यें ओणवे करून पाठीवर एक मोठा दगड द्यावा, अथवा त्या शेतकऱ्याच्या बायकोस त्याच्या पाठीवर बसवावें, आणि खालून त्यांस मिरच्यांचा धूर द्यावा. तात्पर्य, त्या वेळेस प्रजेस दुःख देण्याच्या कामांत जी कांहीं सुधारणूक झाली होती, ती अन्य देशांतील प्रजेच्या दुःखाशीं तुलना करून पाहिली असत, हटकून पहिलें बक्षिस हिजला मिळायचेंच ! व ह्यांचे जातीचे लोक प्रजेस कोणते रीतीनें छळावें, तिजला कोणते रीतीनें अधिक दुःख प्राप्त होईल, कोणता उपाय योजला असतां तिचें अकल्याण होईल वगैरे शास्त्रांचा रात्रंदिवस एक भावानें, एक निश्चयानें जसें काय अभ्यासच करीत होते कीं काय, असें वाटतें. प्रजेस दुःख देणें म्हणजे तिला मारणें तोडणें, लुटणें किंवा त्रस्त करणें असा अर्थ समजत असत. प्रजेच्या अकल्याणांत त्यांस मोठा संतोष वाटावा. ते प्रजा याचा अर्थ काडी, कस्पट, ढेकूण अथवा कांहीं एक प्रकारचीं जनावरें समजत. त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनीं राजे व त्यांचे जातीचे लोकांकरितां, त्यांचे स्त्रियांकरितां व मुलाबाळांकरितां धान्य उत्पन्न करावें व वस्त्रें विणावीं, त्यांच्याकरितां उन्हातान्हांत खपावें, आणि त्यांस ज्या ऐषआरामाच्या गोष्टी लागतात, त्या सर्व पुरवाव्यात, ह्याशिवाय दुसरा कांहीं नाहीं. असो.

अशा प्रकारें मदांध होऊन प्रजेशीं क्रूर रीतीनें वागणारे जे राजे लोक व त्यांचे

जातीचे लोक यांची सत्ता सर्वशक्तिमान् जो परमेश्वर यानें हरण करून त्यांस त्यांचे अपराधानुरूप शासन दिलें आणि कनवाळू होऊन आपले दुःखांनीं पीडित अशा शूद्रादि अतिशूद्र प्रजेस परमन्यायी, हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असें राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखालीं प्राप्त करून दिलें. सबब ती त्या प्रभूची फार फार ऋणी आहे व त्यास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे कीं, "हे प्रभो, अम्हांस हें राज्य चिरकाल असूं दे." कारण हें राज्य झाल्यामुळें प्रजेस पूर्वीच्या राज्यांत (भटशाहीमध्यें) जें कांहीं द्वेषामुळें, धर्मसंबंधानें, नीतिसंबंधानें राज्यसंबंधानें आणि दुसऱ्या अनेक गोष्टींच्या संबंधानें जुलूम होत असत, त्या सर्वांतून ती एकदांची सुटली.

हल्लीं कोणत्याहि प्रकारें दुसऱ्याचें अनहित न होतां ज्या हितावह गोष्टी आहेत, त्या तिचे मनोदयानुरूप करण्यास तिजला उत्तेजन प्राप्त झालें आहे. पूर्वीं प्रजेनें मिळविलेली मालमत्ता केवळ लुटारू लोकांपासून असुरक्षित होती. एवढेंच नव्हे, परंतु तिजला मोठमोठ्या अधिकारी व राजे लोकांच्या पेंढारी लोकांपासूनहि अक्षय भीति असे आणि अर्थात् लोकांस स्वकष्टार्जित पैशाचा उपभोग घेण्यास किंवा त्याचा संचय करून ठेवण्यास अनेक अडचणी असल्यामुळें दिवसानुदिवस त्यांची उमेद खचत जाऊन ते आळशी, निरोद्योगी, दारिद्र्यानें त्रस्त होत चालले होते तसेंच हल्लीं स्वमेहनतीनें संपादन केलेल्या पैशांस अगदीं धोका नाहीं, म्हणून लोकांस आपले पैशाचा यथेच्छ रीतीनें उपभोग घेतां येतो, त्याचा संचय करतां येतो, त्याची मनास वाटेल त्याचप्रमाणें व्यवस्था करतां येते. सारांश, त्याजवर त्यांची सर्वस्वी मालकी असते. या कारणामुळें त्यांनीं आपला सर्व आळस टाकून पैसा मिळविण्याकरितां अनेक खटपटी करण्याचें चालविलें आहे. जिकडे पहावें तिकडे सरकारनें प्रजेच्या कल्याणाकरितां अनंत खटपटी करून अनेक सुधारणा केल्या आहेत, आणि दररोज तिचे सुखाकरितां नाना प्रकारच्या गोष्टींची योजना चालविली आहे. पूर्वीं प्रवास करणें म्हणजे लोकांस मोठें संकट वाटत असे; कारण त्या वेळेस प्रवासाचे कामांत अनेक अडचणी असत. हल्लीं सरकारनें सडका वगैरे नीट बांधून नीट बंदोबस्त केल्यामुळें त्या दूर झाल्या आणि लोकांस प्रवास करण्याविषयीं आनंद वाटूं लागला. त्याचप्रमाणें सरकारनें प्रजेचे कल्याणाकरितां पूल बांधले. मोठमोठालीं विद्यालयें स्थापन केलीं. दवाखाने बांधिले. सर्व जातींचे गरीबगुरीब लोकांसाठीं धर्मशाळा बांधिल्या. वगैरे शेंकडों कृत्यें केलीं; परंतु त्या सर्वांमध्यें हल्लीं जें कांहीं कृत्य प्रजेकरितां सरकारनें हातांत घेतलें आहे, तें फारच उत्तम असून मोठें स्तुत्य व सरकारास चिरकाल भूषणास्पद आहे. त्या कृत्याचें महत्त्व फार काय विशेष सांगावें, परंतु तें कृत्य सरकारनें आरंभिल्यामुळें आज फार दिवसांपासून दारिद्र्यानें गांजलेल्या प्रजेला उर्जितकाळच प्राप्त झाला आहे. तें कोणतें म्हणाल, तर जागोजाग डोंगराच्या आसपास खिंडी बुजवून मोठमोठाले विस्तीर्ण पाण्याचे तलाव केले आहेत. त्या स्थळांपासून अनेक सुंदर कनाल काढून सरकार जागोजागीं

त्याचें पाणी सर्व आसपासचे गरीबगुरीब शेतकरी लोकांस अक्षय शेतकीचें काम चालावें, व ज्या ठिकाणीं मनुष्यास पाणी पिण्यासदेखील मिळण्याची पंचाईत, ती दूर व्हावी, अशा कृत्याची फार दिवसापासून गरज होती, ती ईश्वरकृपेनें लवकरच घडून आली.

शेंकडों वर्षें भट राजांनीं प्रजेवर वाकेतोंपर्यंत कराचें ओझें लादून कोट्यवधि रुपये घशांत टाकिले, परंतु त्याचा एक छदाम तरी ईश्वराला स्मरून तिच्या कल्याणाकडे लावायचा होता ! हरहर ! प्रजेपासून वसूल केलेल्या पैशांचा ज्या रीतीनें त्यांनीं व्यय केला ती सांगण्यास आम्हांस लज्जा वाटते. त्यांनीं आपले जातीचे भट लोकांकरिता जागोजागीं देवाचीं संस्थानें स्थापन करून तेथें त्याजकरितां अन्नछत्रें घातलीं. प्रजेकडून पैसा वसूल झाला कीं लागलीच ब्राह्मणभोजनप्रीत्यर्थ अमुक संस्थानाकडेस दोन लक्ष रुपये, अमुक संस्थानाकडेस पन्नास हजार, येणेंप्रमाणें ठराव करून पैसा वाटून घ्यावा. आणि दररोज पर्वतीसारख्या संस्थानावर आज काय, फक्त ब्राह्मणांस तूपपोळीचें जेवण व वर दहादहा रुपये दक्षणा, आज काय ब्राह्मणांस लाडूचें जेवण व वर वीसवीस रुपये दक्षणा, आज ब्राह्मणांस केशरभाताचें जेवण व वर ओगराळें भरून रुपये प्रत्येकास दक्षणा. याशिवाय कित्येक ब्राह्मणांस शालजोड्या, कित्येकांस पागोटीं, कित्येकांस धोतरजोडे, कित्येकांस यथासांग वर्षासन देण्याच्या नेमणुका, अशा रीतीनें दररोज ब्राह्मणांस यथेच्छ भोजन घालून वर रगड दक्षिणा देण्यांत व बक्षिसें देण्यांत प्रजेस अति दुःख होऊन वसूल केलेल्या सर्व पैशांची नासाडी करून टाकली होती.

बरें, त्या वेळेस प्रजेची तरी खाऊन पिऊन सरकारी कर देण्याजोगी स्थिति होती काय ? मुळींच बोलावयास नको. तिची जी कांहीं दशा होती, ती सांगतां पुरवत नाहीं. गरीब बिचारे शूद्र लोकांस रात्रंदिवस भर उन्हाळ्यांत, पावसाळ्यांत आणि हिंवाळ्यांत एकसारखे शेतांत कष्ट करावे लागत असत. त्यांचे अंगास जाडेंभरडें वस्त्र किंवा पोटास जाडेंभरडें अन्नदेखील मिळण्याची मोठी मारामार पडत असे. डोक्यास पहावें तर फाटकी जीर्ण अशी वीस किंवा पंचवीस हात लांबीची चिंधी, जिला पागोटें म्हणण्यास मोठी लाज वाटते. अंगावर सर्व उन्हाळा–पावसाळाभर फाटलेली एखादी खरबरीत घोंगडी, पायांत पांचसात ठिकाणीं सांधलेला, वरून दोरीचे तुकड्यानें बांधलेला फाटका जोडा, तोहि अगदीं जेव्हां भर उन्हाळा असेल तेव्हां मात्र घालावयाचा आणि तो संपला म्हणजे दुसरे वर्षाचे उन्हाळ्यास तसाच जतन करून ठेवावा. बाकी सर्व वर्षभर पायास जोडा म्हणून मुळींच माहीत नाहीं. फार काय सांगावें, नेसण्याकरितां हात–सव्वाहात लांबीचें फडकेंदेखील मिळण्याची भ्रांत. बाजारांतून एखादी दमडी टोलीची वस्तु आणणें झाल्यास ती आणण्याकरितां त्याचेच एक बाजूस अथवा पागोट्यांत बांधावी, परंतु ती आणण्यासाठीं दुसरें वस्त्रदेखील मिळूं नये. ही त्यांचे खुद्द पोशाखाची संक्षिप्त हकीकत झाली.

आतां त्यांचे स्त्रियांचे पोशाखाविषयीं विचाराल, तर तो सांगण्यास आम्हांस मोठें दुःख वाटतें. त्या बिचाऱ्या त्यावर काय समजून आपले दिवस काढीत असतील ते असोत, परंतु यांच्याकडून त्यांस तिळमात्रदेखील सुख मिळत नसे. बिचाऱ्यांस एखादा जाडा घोंगडा सुमारें दोन किंवा अडीच रुपये किंमतीचा मिळाला, तर त्यांस एक दोन वर्षांपर्यंत वालवावा लागे. त्यांस सोडवणीला दुसरें एखादें लुगडें किंवा वस्त्रदेखील नसे. आणि पाठीमागें कामाचा रगाडा असल्यामुळें तेंच लुगडें त्यांस चार चार पाच पाच दिवस न धुतां तसेंच नेसावें लागे. एखादे वेळेस कामांतून सवड सांपडली, तर नदीवर जाऊन नेसलेल्या लुगड्याचा अर्धा भाग मोठ्या लज्जेनें दुःखित होत्साता अंगावरचा काढून तो प्रथमतः धुवावा. त्याप्रमाणें तें लुगडें जीर्ण होऊन फाटत चालल्यामुळें प्रथम अंगावरील अर्ध्या भागास शिवावें व तो नेसल्यानंतर दुसरें नेसलेलें अर्ध्या भागास शिवावें. पुढें तें लुगडें फाटून फाटून त्याचा सात किंवा आठ हात लांबीचा धडपा राहून त्यास इतकीं ठिगळें असावयाचीं कीं, मुळचें हें कोणत्या रंगाचें लुगडें होतें हें सांगतां येत नसे. अशा प्रकारच्या अंगास अपुऱ्या लुगड्याचा धडपा मोठे कष्टांनीं नेसून डोक्यावर गोवऱ्यांची पाटी घेऊन भर बाजारांत जावें. हरहर! किती ही दुःखाची गोष्ट आहे बरें!

ही सांगते वेळेस शूद्र लोकांचे अंतःकरणाचे शतशः तुकडे तुकडे होत असतील यांत कांहीं संशय नाहीं. त्यांस असें वाटत असेल कीं, आम्ही या जन्मांत व्यर्थ आलों. बेहेत्तर, आम्ही जन्मतांच मेलों असतों, तर फार बरें होतें. परंतु आपले समक्ष आपले स्त्रियांची अशी दशा पाहणें नको. एक वेळ मनुष्य आपणास कसेंहि संकट असो, शरिरास मोठे क्लेश होत असोत, तथापि ते सर्व सहन करूं शकेल; परंतु आपले प्रिय जनांचे हाल होत आहेत, हें कधींहि तो सहन करूं शकणार नाहीं. ते पाहतांक्षणींच तो केवळ मृतप्राय होतो. असें जरी त्यांस वाटत असेल तरी ते गरीब लोक करतात काय? निरुपायाची गोष्ट पडली. बरें, त्यांस खाण्यास तरी चांगले असतें काय? स्वप्नांतदेखील आणावयास नको. दररोज जोंधळ्याच्या, नाचण्याच्या अथवा बाजरीच्या भाकरी नुसते मिठाचे खड्याबरोबर, मिरचीबरोबर किंवा कांद्याबरोबर खाव्या लागत. वेळेस भाजीस तेल मिळालें तर मीठ मिळूं नये, मीठ मिळालें तर मिरची मिळूं नये. कधीं जोंधळ्याच्या किंवा नाचण्याच्या कण्या भरडून त्याचा घाटा करून गिळावा. कधीं कधीं नुसती भाजीच उकडून खावी लागत असे. कधीं कधीं जंगलांतील उंबरें खाऊन त्यावर आपला गुजारा करावा आणि कधीं कधीं तर फक्त पाणी पिऊन व पोट दोरीनें आंवळून शेतांत खपावें लागत असे.

अशा प्रकारें दारिद्र्यानें ग्रस्त झालेल्या प्रजेचा पैसा, (अतिशय कष्टांनीं मिळविलेला पैसा कररूपानें हरण करून) त्याची व्यवस्था वर सांगितल्याप्रमाणें आपले जातीचे आर्य लोकांस जेवण घालण्याकडेस करावी, म्हणजे मोठी निंद्य आणि कुनीतीची

गोष्ट आहे. त्याच पैशाचा निदान थोडासा अंश तरी असे कालवे बांधण्याकडेस अथवा तशाच प्रकारचीं दुसरीं सत्कृत्यें करण्याकडेस उपयोग केला असता आणि बाकीचा सर्व पैसा आळसास उत्तेजन देण्यामध्यें खर्च केला असता, तरी त्यापासून प्रजेचें बरेंच कल्याण होऊन ती अन्नवस्त्रास मोताद झाली नसती व भटराजाचे कीर्तीलाहि कलंक लागला नसता. त्यांनीं शेतकरी लोकांचे शेतांस अशा रीतीनें, म्हणजे कालवे वगैरे बांधून पाणी पुरविलें असतें, तर शेतामध्यें विपुल धान्यें वगैरे वेळचे वेळेस पिकून शेतकरी लोकांस सहज रीतीनें पहिल्यापेक्षां दुप्पट चौपट कर देण्याचें सामर्थ्य आलें असतें आणि तेणें-करून भटराजे व ब्राह्मण लोकहि यथेच्छ लाडूचें भोजन जेवून उठल्यानंतर त्यांस रगड दक्षणा देण्यास समर्थ झाले असते. अथवा ब्राह्मणानें ओकारी येईतोंपर्यंत जेवण झाल्यानंतर, जे कोणी जितके लाडू खातील, त्या प्रत्येकास प्रत्येक लाडूमागें जेथें दहा दहा रुपये लावावयाला सांपडत, तेथें वीसवीस किंवा तीसतीस देखील रुपये देण्यास सांपडले असते; परंतु हा विचार त्यांस तूर्त स्वहीतबुद्धीमुळें सुचला नाहीं.

त्या वेळेस कनाल वगैरे नसल्यामुळें शेतकरी लोकांची मोठीच दुर्दशा होऊन जात असे. जिचा परिणाम अद्यापपावेतों त्या लोकांपैकीं शेंकडों गरीब लोकांस सोसावा लागत आहे. हल्लीं ज्या ज्या देशास शेतकीच्या कामाला पाणी देण्याकरितां असे कनाल नाहींत, त्या देशांतील शेतकरी लोकांस शेतकीचें काम करण्यास मोठी गैरसोय असें म्हटलें पाहिजे, व त्यांस आपले (शेतकीच्या कामावर अवलंबून, आपले दरिद्र्यावस्थेंत) देशांत कनाल होईतोंपर्यंत मुक्त होण्यास दुसरा मार्गहि नाहीं. बहुतेक लोकांस ठाऊक आहे कीं, नवीन सरकारचे देशांत शेतकीचें काम ब्रहुतकरून कनालवरच चाललेलें आहे. आणि त्यांजमुळें तेथील शेतकरी लोकांचीहि स्थिति फारच उत्तम आहे. त्याचप्रमाणें या देशांत निझाम सरकारचे राज्यांत जेथें जेथें कनाल आहेत, तेथें तेथें कुणबी लोक चांगले खाऊनपिऊन सधन आहेत. शेतास अशा स्वल्प रीतीनें वेळचे वेळेवर पाहिजे तितकें पाणी देण्याची सोय नसल्यामुळें या देशाचे भागांतील कुणबी वगैरे शेतकीचें काम करणारे लोकांवर पूर्वीं मोठे वाईट प्रसंग पडत असत. शेतकरी लोकांचें काम पाण्यावर फारच अवलंबून असतें. म्हणून त्यांस पाणी जर आहे, तर सर्वच गोष्टी आहेत आणि पाणी जर त्यांस शेतकीचे कामापुरतें नाहीं तर, ते सर्वंच गोष्टीस मुकतात. कारण त्यांस एक पाणी जर अनुकूल आहे, तर जमीन कशीहि खरपड, पडीक, मुरमाड असली तरी ते तिजमध्यें उत्पन्न करूं शकतील. फार काय सांगावें, एक पाण्याच्या साह्यानें त्या तसल्या मुरमाड जमिनीवर जीं जीं फळें व जीं जीं धान्यें तो हंगाम नसतांना उत्पन्न करतां येतील. त्याचें लहानसें उदाहरण पहा कीं, 'आउंदा' जवळ ज्या जमिनीवर हल्लीं आपले गव्हर्नरसाहेबांचा बंगला आहे, ती जमीन आपणांस थोडक्याच दिवसांपूर्वीं अतिशय मुरमाड असल्यामुळें कोणत्याहि प्रकारचें पीक येण्यास अगदीं नालायक असें वाटत होतें. परंतु तिच्यावरच हल्लीं फलवृक्ष, पुष्पवृक्ष आणि

दुसरे नाना प्रकारचे वृक्ष व वनस्पति यांच्या योगानें एक सुंदर मनोहर बाग होऊन गेला आहे. त्यासारखा बाग चांगले मशागत केलेले काळेभोर जमिनीवरदेखील पुणें मुक्कामीं सांपडणें विरळा.

अशा वाईट जमिनीवर असा उत्तम बाग होणें हें मोठें आश्चर्य होय. परंतु थोडासा विचार करून पाहिलें असतां त्याचें मुख्य कारण त्या जमिनीवर नदीपासून पाण्याचा नळ आणून जिकडे तिकडे पाणीच पाणी करून सोडलें आहे. याशिवाय मनुष्याचे श्रम वगैरे हीं कारणें आहेत खरीं; परंतु तीं मुख्य आहेत असें म्हणतां येत नाहीं. त्यांत पाणीच मुख्य कारण असें समजलें पाहिजे. याजकरितां शेतकरी लोकांस शेतकीच्या कामास पाणी असणें ही मुख्य गोष्ट आहे.

ते असें समजतात कीं, त्यांस पाणी जर आहे, तर तेंच त्यांचें सर्व धन व ऐश्वर्य आहे. त्याचमध्येंच त्यांच्या सर्व सोयी व ऐषआरामाच्या गोष्टी आहेत. कारण त्यांस जर एकाच सालीं पाण्यानें आपलें हातचें सोडिलें कीं, त्यांचें सर्व सौख्य जातें, संपत्ति जाते, ऐश्वर्य जातें, आणि मुलांबाळांसह व दुसरीं कुटुंबांतील माणसें त्यांसह मोठे विपत्तींत पडतात. कित्येकांना आपला देशत्याग करावा लागतो. कित्येक अन्नाकरितां त्राही त्राही होऊन लोकांच्या घरोघर, दारोदार [भीक मागूं] लागतात. कित्येक आपले प्राणत्यागासही प्रवृत्त होतात. आतां या गोष्टी कोणते रीतीनें घडून आल्या व हल्लीं येत आहेत याविषयीं लिहिणें अवश्य वाटल्यावरून येथें थोडेसें लिहितों.

सृष्टिक्रमाप्रमाणें पर्जन्य कोणत्याहि एका देशाचे एका भागावर पडला तर दुसरे भागावर पडत नाहीं. याप्रमाणें एका भागावर आहे तर दुसऱ्या भागावर नाहीं. याजमुळें शेतकरी लोकांस दहा पंधरा वर्षांआड पिकापाण्याची तूट पडते आणि अशी तूट पडली म्हणजे कित्येक शेतकरी लोकांनीं आपले शेतांतील आदले वर्षाचें पीक, जें सुमारें सर्व कुटुंबांतील माणसांस वर्ष सहा महिनेपर्यंत पुरण्यासारखें असतें, तेवढें खाऊन टाकिलें म्हणजे त्यांचेजवळ दुसरे वर्षाकरितां बीं भरण्यास एक पैसादेखील नसतो. अशा प्रसंगीं ब्राह्मण व मारवाडी सावकार या लोकांची जी बनून जाते, ती सांगतां पुरवत नाहीं. ते अशा नडींत सांपडलेले कुणब्यांस आपले परम प्रियकर मित्र समजून मोठा आनंद पावतात आणि त्यापैकीं ब्राह्मण सावकार त्यांचे घरीं जाऊन विचारतात कीं, "का पाटील, आपण चिंतेंत आहां असें दिसतें, याचें कारण काय?" "महाराज, काय सांगावें? गेले वर्षीं पाऊस पडला नाहीं म्हणून त्याचे पलीकडचे सालीं जें कांहीं पीक झालें होतें, तें अद्याप पावेतों खात आलों; अलिकडेस कांहीच जवळ राहिलें नाहीं आणि पेरणीची वेळ तर जवळ येऊन पोहोचली. आतां काय करावें?" असें त्यांनीं त्यांस सांगावें. तें ऐकून ब्राह्मण सावकारांनीं म्हणावें कीं, "कांहीं चिंता नाहीं. आपणांस बीं भरण्याकरितां जर दहा–बारा रुपये लागत असतील तर मी देतों." आणि अर्थात् ते गरीब विचारे शूद्र लोक, हा सावकार आपला कांहीं परिचय नसतांना ज्या

अर्थी घरीं येऊन आपणांस दहा–बारा रुपये ध्या, असें म्हणतो आहे, त्या अर्थी यानें कांहीं तरी घर घेण्याचा कपटरूप खोल विचार योजला असावा, हें पूर्ण लक्षांत न आणतां, तूर्त आपली पैशाची गरज होते, याजकडेच सर्व लक्ष देऊन आपणांस दहा–बारा रुपये देण्याविषयीं त्यांस विनंती करितात. सावकारहि 'ठीक आहे' असें म्हणून "उद्यां येते वेळेस स्टांप घेऊन या व आपले कोणी भाऊबंद अथवा मुलेंबाळें असल्यामुळें त्यांसहि बरोबर घेऊन या, बरें पाटील! म्हणजे तुमचें काम मी खास करून देतों. पाटीलबुवा, मी आपणांस कागद वगैरे आणावयास सांगितले, त्याबद्दल मनामध्यें कांहीं एक आणूं नका. माझा तुमच्यावर पूर्ण भरंवसा आहे. मी कांहीं तशांतला नव्हे. कितीहि केलें तरी तुम्ही व आम्ही एका गांवचे. तुमचा आमचा एक धर्म असून तुमच्याबरोबर का मी अन्याय करीन? अरे राम! असें स्वप्नांतदेखील आणावयास नको. तुमच्याविषयीं माझे मनांत तसेंच करणें असतें तर मी तुमच्या घरीं चालून येऊन 'तुम्हांस कांहीं अडचण आहे काय, जर असेल तर मी आपणांस पैशानें मदत करतों' असें म्हटलें असतें काय? कधींहि नाहीं." या रीतीनें वरवर गोड बोलण्याचा पाल्हाळ लावून इकडून तिकडून त्याचे जवळून कागद लिहून घेईतोंपर्यंत समजूत करावी. दुसरे दिवशीं त्यांनीं स्टांप आणल्यानंतर कुलकर्णी वगैरे लोकांकडून त्यांजमध्यें नाना प्रकारच्या अटी घालून लिहून घ्याव्या. आणि त्याजवर त्याची व त्याचे भाऊबंदाची किंवा मुलांची सहीसाक्ष घेऊन त्याचे हातावर लिहणावळीचा वगैरे खर्च कमी करून दहा-बारा रुपयांबद्दल नऊ-दहा रुपये ठेवावे. तो कागद लिहून त्यांस कांहीं दिवस लोटल्यानंतर त्याचें व्याजमुद्दल जरी त्यांस मिळून चुकलें, तरी त्या व्याजाचें व्याज आणि त्याचें पडव्याज जुळून त्याच्या मुलाच्या लग्नाकरितां थोडेसे नवीन पैसे देऊन, त्याजबद्दल नवीन कागद लिहून घ्यावा. पुढें कांहीं दिवसांनीं त्याचें व्याज जुळून पुनः त्याचा नवीन कागद घ्यावा. येणेंप्रमाणें क्रम चालून त्या गरीब बिचाऱ्याच्या अंगावर तीन-चार वर्षांत सुमारें दोनशें–अडीचशेंची रक्कम फुगली, म्हणजे त्याजबद्दल सरकारांत फिर्याद टाकून त्याजवर खर्चसुद्धां तीनशें अथवा सव्वा तीनशें रुपयांचा हुकूमनामा करून, ऐन धान्य वगैरे काढण्याची वेळ आली कीं, त्याच्या शेतीवर जप्ती आणून बसवावी.

हरहर! अशा प्रसंगीं जो कांहीं दुःखाचा देखावा दृष्टीस पडत असतो, तो पूर्णपणें शब्दमात्रेंकरून वर्णन करण्यास अशक्य आहे. गरीब, अनाथ, दीन अशा त्या शेतकऱ्यानें आपले मुलांबायकांसहवर्तमान वस्त्रान्नाचे मोठे हाल सोसून सर्व वर्षभर एकसारखे भर उन्हांत व पावसांत आणि थंडींत रात्रीचा दिवस करून शेतांत कष्ट केले आणि त्या कष्टाचें आतां कांहीं थोडेसें फळ घेणार, तों इतक्यामध्यें सावकाराची स्वारी बरोबर कारकून, शिपाई घेऊन उभी ठाकते, तेव्हां काय विचारावयाचें! त्या शेतकऱ्यास व घरांतील सर्व मुलेंमाणसांस तो सावकार—सर्वांचा प्राणहारक यमरूपी ब्रह्मराक्षस—

आक्राळविक्राळ रूप धारण करून, कारकून शिपायादि आपले दूतांसह आमचे प्राण घेण्यासच आला काय, असें वाटतें. मुलाबाळांचा रडण्याचा एकच कल्होळ होऊन जातो. बायका घाबरून जाऊन नेत्रांतून टपटप अश्रुधारा गाळीत असतात; व तोहि आपलें कपाळ पिटून रडत असतो. त्या सर्वांवर त्या काळीं दुःखाचा डोंगर कोसळून पडतो. ते दाही दिशा आठवून ईश्वराची प्रार्थना करितात कीं, "प्रभो, असा वाईट प्रसंग आमचे सप्तजन्मींचे हाडवैऱ्यांसदेखील प्राप्त न होवो!" सावकारानें घरांतील धान्यें वगैरे सामान बाहेर काढलें, म्हणजे शेतकऱ्यानें पटापट त्याचे पायावर डोकें ठेवून अनेक प्रकारें प्रार्थना करावी, परंतु व्यर्थ! स्त्रियेनें केविलवाणें तोंड करून सावकारापुढें पदर पसरून विनंती करावी कीं, "महाराज, आपलें व्याज मुद्दलासह केव्हांच फिटलें आणि पुनः आपण व्याजाचें व्याज करून आमच्यावर एवढी रकम केलीत. बरें, ती देण्यास आम्हीं कबूल आहोंत, परंतु कृपा करून तजविजीनें घ्याल, तर आमचे गरिबाचा तरणोपाय लागेल. नाहींतर आमचा सर्वस्वी उन्हाळा होऊन घरचे सर्व मनुष्यांची दशा दशा होईल आणि हीं अनाथ दोन-दोन, तीन-तीन वर्षांचीं मुलें अन्न अन्न करून प्राण सोडतील. आतां तुम्हीच पहात अहां कीं, या मुलांच्या अंगावर थंडीवारा निवारणार्थ एक हातभरदेखील फडकें नाहीं. त्याचप्रमाणें त्यांचे खाण्याचीहि मोठी दशा आहे आणि आपण हा सर्व माल घेऊन गेल्यावर या बालकांची काय दशा होईल? त्यांनीं आपलें दीनमुख कोणापुढें पसरावें? महाराज, आपले ठायीं दया, क्षमा आणि शांती हे गुण मुर्तिमंत वास करीत आहेत. आपण दीनानाथ, दीनबंधु आहांत आणि त्याच गुणांमुळें आपणांस भूदेव म्हटलें आहे. याजकरितां या गरीब बालकांची तरी दया घेऊन त्यांचे पोटापुरतें कांहीं थोडेंसें धान्य ठेवा, अशी मी आपणांस हात जोडून, पायां पडून विनंती करीत आहे. तिचा अव्हेर करणें हें आपणांस सर्वथैव अनुचित आहे."

इतकें तिचें भाषण ऐकून महाराजांनीं रागावून डोळे लाल करून म्हणावें कीं, "काय गे मूर्खे, शूद्रीण होऊन तूं का आम्हांस ज्ञान सांगतेस? तुझे मनांत आम्ही आपलें कर्ज सोडून द्यावें, मागूं नये. स्वस्थपणें आम्ही आपले घरीं बसावें म्हणजे झालें!" हे त्याचे शब्द ऐकून बिचारीनें हूं चूं न करितां उगीच बसावें. त्याचप्रमाणें घरचे सर्व मनुष्यांनीं त्याची विनवणी करावी. परंतु तो तिच्याकडेस लक्ष न देतां आपण आरंभलेला दुष्ट हेतु सिद्धीस न्यावा, म्हणून सर्व माल गोळा करून, जो वसूल होईल तो, रकमेंतून वजा देऊन, बाकीबद्दल पुनः त्याचप्रमाणें दुष्ट क्रम चारपांच वर्षांपर्यंत चालला, म्हणजे त्या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याची फारच दुर्दशा होऊन जात असे. त्या एका लहान अशा सात–आठ रुपयांचे रकमेकरितां त्याचें सर्व शेत जाई, गुरेंढोरें जात, विहिरीमळे जात आणि सरतेशेवटीं तोहि देशोधडी जाण्यास अथवा आपले प्राणत्याग करण्यास सिद्ध होई. असो. ह्या ब्राह्मण वगैरे सावकारांनीं आपले

या इंग्रज सरकारचे दयाळू राज्यांतहि त्या गरीब शूद्राजवळून व्याज मुद्दलासुद्धां पैसा जरी घेतला, तरी त्यांस धुळीस मिळवीत; तर स्वकीय राज्यामध्यें, त्यांस जेव्हां एक वर्ष पाऊस न पडल्यामुळें असा कर्ज काढण्याचा प्रसंग पडे, तेव्हां ते त्यांची काय दशा करीत असतील याची, सूज्ञ जनहो, तुम्हींच कल्पना करा.

त्या वेळेस त्या सरकारांत फिर्याद वगैरे करावी लागत नसे. कारण त्यांचे घरांतच सरकार होतें. मनास वाटेल त्याप्रमाणें कुळास मारावें, झोडावें, त्याचा माल सर्व हिसकावून घेऊन जावा. त्याचीं बैलढोरें विकावीं, त्याचे माणसांचें हालहाल करावे, ते त्याचे प्राण जाईतोंपर्यंत पाहिजे तसें करीत. त्याचे डोक्यावर अथवा पाठीवर मोठे थोरले धोंडे देऊन त्यास भर उन्हामध्यें उभे करीत आणि खालून मिरच्यांचा धूर देत. त्याचे शरिराचे नाजूक भागास चाप लावीत व कोल्दांडा घालून त्यास बेदम मार देत. सदरहूप्रमाणेंच त्या वेळचे सरकारचे ब्राह्मण कामगार करपट्टी वसूल करतेवेळीं त्यास नाना प्रकारचे जाच करीत असत.

तथापि हल्लींचे कित्येक सुधारलेले विद्वान् आर्यब्राह्मणांची, स्वकीय पेशवाई जुलमां-विषयीं पक्की खात्री झाली असून, केवळ आपल्या जातबांधवांच्या भयास्तव, आर्य ब्राह्मणांचे त्रासापासून अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांची मुक्तता झाली, हें स्पष्टपणें उघड म्हणण्याची त्यांची छाती होत नाहीं. सबब कधी तरी वेळ मारून नेण्याकरितां मोठ्या सार्वजनिक सभास्थानीं उभें राहून, "पूर्वीपेक्षां हल्लीं या तीस वर्षांत शूद्र शेतकऱ्यांची स्थिति बरी आहे," म्हणून जागोजाग व्याख्यानें देत फिरणारे व इंग्रज सरकारचे आपणांवर शतशः उपकार असून त्यांपैकीं कित्येक नांवालासुद्धां न स्मरतां, राज्यास स्वाभाविक असणारे क्षुल्लक दोषांना सूक्ष्मदर्शक यंत्रदृष्टीनें दाखविणारे जे कोणी आहेत व कित्येक वेडगळ जुन्या समजुतीचे आर्यभट ब्राह्मण फक्त जात्याभिमान दृढ मनीं धरून, त्यांचा पक्ष उचलल्यामुळें त्यांस सद्गुणांचें ओढूनताणून नकली रूप देण्यास झटणारे हल्लीं सांगत आहेत कीं, "पूर्वी पेशवाईत शूद्र शेतकऱ्यास जें सौख्य होतें तें सांगतां येत नाहीं. त्या सुखाचें हल्लीं लेश सुखदेखील नाहीं. त्या वेळची शूद्रांची राहणी काय, चालणी काय, रीतिभाती काय, सर्वच चांगलें होतें. सत्य, सद्गुण, सदाचार, प्रामाणिक-पणा आणि धर्म हे गुण शूद्रांमध्यें अक्षय वास करीत होते. त्या वेळीं शूद्र शेतकऱ्यांजवळ पैसा तरी किती असे कीं, 'जिकडे पहावें तिकडे शूद्रांच्या घरांतून सोन्याचा धूर निघत असे.' आतां तें सौख्य नाहींसें झालें. ती नीति नाहींशी झाली, तो धर्म नाहींसा झाला, आणि ती संपत्तीही नाहींशी झाली." या उभयतांचे बोलण्यांत किती तथ्यांश आहे, याविषयीं विचार करणें वाचकांकडे सोंपवून येथें विषय संपवितो.

१५ जून सन, १८८५ इ.
पुणे पेठ जुनागंज
घर नंबर ३९५

—जोतीराव गोविंदराव फुले

१३

# मामा परमानंद यांस पत्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

# मामा परमानंद यांस पत्र

मुक्काम पुणें ता।। २ माहे जून १८८६ ई।।

राजमान्य राजेश्री नारायणराव माधवराव परमानंद मु।। आंबेर

साष्टांग नमस्कार वि. वि. आपलें ता।। ३० माहे गुदस्तचे कृपापत्र पावलें. त्याचप्रे।। पुण्याचे हायस्कुलांतील भागवतमास्तर यानीं शंकर तुकाराम यानीं छापलेलें पवाड्याचे पुस्तकांतील कांहीं शाहीरांची एक याद मजला आणून दिली, यावरून मी त्यास येक वेळीं कळविलें कीं, सदरचे पवाड्याची प्रत मजजवळ नाहीं आणि ती पाहिल्याशिवाय मला याविषयीं कांहीं कळवितां येत नाहीं. नंतर त्यांनीं तें पुस्तक मला आणून देण्याचें कबूल केलें. परंतु त्यांनीं कबूल केल्याप्रे।। पवाड्याचें पुस्तक आणून दिलें नाहीं. सबब त्याविषयीं मला कांहीं आपल्यास लिहून कळवितां आलें नाहीं.

फितुरी गोपीनाथपंताचे साह्यानें शिवाजीनें दगा करून अफझुलखानाचा [वध ?] केला. तान्हाजी मालुसऱ्यानें घोरपडीचे साह्यानें सिंहगड किल्ला काबीज केला व सिवाजीनें पुण्यांत दरोडा घालून मुसलमान लोकांस कापून काढलें. या सर्वांच्या कच्च्या हकीकतीचे खरे पवाडे माझे पहाण्यांत आले नाहींत. आज दिनपावेतों युरोपियन लोकांनीं जे कांहीं इतिहास तयार केले आहेत, ते सर्व शुद्रा आणि अतिशूद्रांची वास्तविक स्थिति ताडून न पहातां +++ झांकून आर्य भटब्राह्मणांचे ग्रंथावर व भटकामगारांचे सांगण्यावर भरंवसा ठेवून इतिहास तयार केले आहेत. व अलीकडे भटब्राह्मणांचीं विद्वान पोरेंसोरें नवीन पवाडे करून हळूच मैदानांत आणीत आहेत. त्यापैकीं माझे पहाण्यांतही बरेच आले आहेत आणि त्यांतील शूद्रांनीं कमविलेल्या मोत्यापोंवळ्यांचा चारा चरणारे भागवती, गोब्राह्मणासह दादोजी कोंडदेवास फाजील आगांतुकी करावयास लावल्यामुळें तसल्या बनावट पवाड्यांचा मी संचय केला नाहीं.

आठ वर्षांपूर्वी जेव्हां मी मुंबईत आपले घरीं भेटावयास आलों होतों, तेव्हां पांचगणीचे पाटील रामपासमक्ष आपल्यास शुद्र शेतकऱ्याचे दैण्यवाण्या स्थितीचा कांहीं देखावा जगापुढें आणणार, म्हणून कबूल केलें होतें. तें त्या देखाव्याचें असूड या नावाचें तीन वर्षांपूर्वी येक पुस्तक तयार केलें व त्याची येकेक प्रत आपले कलकत्याचे हरभास व आष्टपैलू गवरनर जनरल [ साहेब व ? ] श्रीमान महाराज बडोद्याचे गायकवाड सरकारास पाठविल्या आहेत. आमच्या शुद्रांत भेकडबाहुले छापखानेवाले असल्यामुळें

तें पुस्तक छापून काढण्याचें काम तूर्त येके बाजूला ठेविलें आहे. असूडाची प्रत आपल्यास पहाण्याकरितां पाहिजे असल्यास त्याप्रमाणें लिहून आल्याबरोबर त्याची नकल करण्यास लेखक बसवितों. नकल होण्यास सुमारें येकदोन महिने लागतील असा अदमास आहे. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला

**जोतीराव गोविंदराव फुले**

१४

# सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधि

सत्यमेव जयते

अथ

# सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधि प्रारंभ

हें पुस्तक

जोतीराव गोविंदराव फुले

सत्यशोधक समाजाचे सभासद

यांनीं

लोकहितार्थ केलें

तें

रा० रा० नारायणराव मेघाजी लोखंडे यांनीं आपले

दीनबंधु छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

माहे जून सन १८८७

किंमत १ आणा

(प्रथमावृत्तीचें मुखपृष्ठ)

ह्या प्रथम आवृत्तीच्या २००० दोन हजार प्रती छापिल्या आहेत.
खर्च जाऊन बाकी नफा राहील तो दीनबंधूच्या
सहायार्थ पुस्तककर्त्यानें अर्पण केला असे.

# सत्यमेव जयते

# सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी विधि

## अथ

प्रातःकाळीं प्रथम वर होणाऱ्या मुलानें नाहाव्याकडून आपली चुंच करविल्यावर करवल्यांनीं त्यास उटणें लावून तेलाभ्यंग करून स्नान घालवें. नंतर, त्यानें आपल्या शिवारांत जाऊन तेथें मुकरर केलेल्या जाग्यावर, आपल्या उत्पन्नकर्त्यासहित महासुभ्याचे नांवानें पूजा करून, तेथें खिसका, पंचखाजे व पानाचे विडे अर्पण करून घरीं यावें. नंतर मंडपांत वस्त्रांचे आसनावर धान्याचा चौक भरून, त्यावर त्यास बसवून पांच सुवासिनींनीं त्याचे सर्व अंगाला हळद लावून कपाळावर कुंकाचा मळवट भरावा. नंतर त्यानें पोशाख केल्यावर, त्याचें पागोटें अथवा मुगुटावर फुलांची मंडवळी बांधून, त्यास फुलांचा पोशाख चढवून, त्याचे हातांत कटार देऊन, त्याची सर्वांनीं अलायबलाय घेऊन त्याच्या उष्ट्या हळदीबरोबर चिरडी, चोळी, फुलांची मंडवळी, हारगजरे व कोरडा शिधा वधूचे मंडपांत पाठवून द्यावा. वधूस हळद लावून एकंदर सर्व स्त्रीपुरुष वऱ्हाडी वराचे मंडपांत आल्यावर वरानें गडगनेर घेण्यास सुरुवात करावी.

नंतर वरानें सोनाराकडून कुळस्वामीच्या टाकास उजाळा दिल्यानंतर, वराच्या कुळांतील एका पुरुषानें आपल्या अंगास चंदनाच्या उट्या घेऊन, एका तबकांत गुलाल भंडारांत महाविराच्या टांकापुढें विड्याचें सामान ठेवून, त्यावर स्वच्छ रुमाल घालून, डाव्या हातांत तें पात्र घेऊन उजव्या हातांत नागवी तरवार घेऊन, गांवचे वेशीजवळ जाऊन, आपल्या कुळस्वामी महाविराचे नांवानें पूजा करून वाजतगाजत मंडपांत परत आल्याबरोबर आपल्या कुळधर्मानुसार तळी (विडा) उचलून, मंडपांत आनंदाचा दीप लावून देवकार्यासंबंधी भोजन सर्वांनीं यथासांग सारून, आपल्या कुळ-स्वामीच्या टांकापुढें त्याच्या सन्मानार्थ डाका, भराड व गोंधळाचे नादांत सर्व रात्रभर आनंद करावा.

लग्नाचे दिवशीं वराचे घरीं मंडपांत परटीणीनें वस्त्राचे आसनावर धान्याचा चौक करून त्यावर वरास बसवून त्याचें पागोटें अथवा मुगुटावर तिराचे फळानें तेलाभ्यंग करून त्याचे हातांत कंकण बांधावें. नंतर कटारीला लोण बांधून त्यास आशिर्वाद देवून त्याची अलायबलाय घेतल्यावर, वरानें आपल्या परिवार वऱ्हाडासह तळ उचलून वधूचे गांवांत जावून तेथील चाव्हडींत पुरती जागा नसल्यास दुसरे ठिकाणीं वऱ्हाडासहित बसावें. आणि तेथून वरानें वधूस तयार होवून बसण्याकरितां सांगण्यास, वरधान्यास वधूचे

पालकाचे घरीं पाठवावें. त्यापुढें वधूकडून आलेल्या पोषाकासह देणग्यांचा स्वीकार करून आपल्या कुळस्वामीचा आठव करीत वधूचे घराकडे आपल्या वऱ्हाड परिवारासह, मोठ्या आनंदानें मिरवत मिरवत जावें.

पुढें वधूच्या गांवांतील महारणीनें हातांत दीपताट घेऊन वरमुलास ओंवाळून त्याची अलायबलाय घेतांच वरानें वधूचे मंडपांत प्रवेश करून, प्रथम वधुवरानें आपलीं व आपआपल्या पित्याचीं नांवें, आडनांवें, हल्लींच्या वस्तीचीं नांवें, तारीख अथवा तिथि, वार, मास, वतनाचीं नांवें कळवून, सर्वांसमोर वधुवरामध्यें करारसंबंध करून घेण्याकरितां जातीचे पंचापासून परवानगी घ्यावी आणि अंतरपट मधीं असतां, वधुनें वराचे गळ्यांत घालण्याकरितां फुलांची माळ आपल्या हातांत घेऊन व वरानें वधूच्या हातांत घालण्याकरितां आपल्या हातांत अंगुस्तान घेऊन समोरासमोर उभें रहावें. पुढें वधुवरावर कांहीं विघ्नें आल्यास त्याचें निवारण करण्याकरितां वधुवरांनीं आपआपल्या मामाचे हातीं शस्त्रें देऊन, त्यास आपआपले पाठराखे करावे आणि वरवधूनें पाळीपाळीनें मंगळरूपी करार वदण्याची सुरवात करावी. वरवधु बिचारे विद्वान नसून लाजाळू दिसल्यास, ह्या उभयतांस त्यांचे इष्टमित्रांनीं मंगळें म्हणूं लागण्यास सहाय करावें; परंतु वधुवराचे जातीस नीच मानून त्या सर्वांस आपले सेवक, दास म्हणणाऱ्या धूर्त, कपटी आर्यभट ब्राह्मणाची या कामीं सावलीदेखील पडूं देऊं नये.

## ॥ मंगळाष्टक ॥

### (वर)

देवाचे नियमा प्रमाण धरुनी, चाले तुझें कूल गे ॥
सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच ही त्वत्सगे ॥
अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी ॥
प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी ॥
शुभमंगल सावधान ॥१॥

### (वधू)

मानीशी जरि त्वां दिलें अनुदिनीं, कर्त्या समाधानसे ॥
आह्मां सर्व स्त्रियां असे बहु पिडा, हें नेणशी तूं कसें ॥
स्वातंत्र्यानुभवाचि ओळख अह्मां, झाली नसे मानसीं ॥
यासाठीं अधिकार देशिल स्त्रियां, घे आण त्याची अशी ॥
शुभमंगल सावधान ॥२॥

(वर)

स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा ॥
खर्चाया न मनीं मि भी किमपिही, सर्वस्व माझें कदा ॥
मानीतों सकला स्त्रियांस बहिणी, तूं एकली मत्प्रिया ॥
कर्त्यांचें भय मी मनांत तुजला, ठेवीन पोसावया ॥ ३ ॥
शुभमंगल सावधान ॥ ३ ॥

चवथ्या मंगळाष्टकाचें तिसरें पद पुरें होतांच, वधूनें अंतरपट एकीकडे करून वराच्या गळ्यांत फुलांची माळ घालतांच, वरानें वधूचे उजवे हाताचे बोटांत अंगठी घातल्याबरोबर वधूचे वरानें पाणीग्रहण करून एकंदर सर्व उभयतांकडील परिवारासह स्त्रीपुरुष वऱ्हाडांनीं आशिर्वादरूपी पांचवें मंगळाष्टक म्हणून वधुवरावर पुष्पवृष्टि करीतोंपावेतों तेथेंच उभें रहावें.

## मंगळाष्टक

(वधू)

बंधुवत्मजला समस्त असती, त्वद्भिन्न जे कीं नर ॥
आज्ञाभंग तुझ्या करीन न कदां, मी सत्य कर्त्यावर ॥
ठेवोनी अवघाचि भार झटुंया, लोकां कराया हिता ॥
हाताला धरुनी तुला वरितसे, सर्वांपुढें मी अतां ॥
शुभमंगल सावधान ॥ ४ ॥

## सर्व स्त्रीपुरुषांनीं म्हणावयाचें

### मंगळाष्टक

आभारा बहु मानिजे आपुलिया, मातपित्यांचे सदा ॥
मित्रांचे तुमच्या तसेच असती, जे इष्ट त्यांचे वदा ॥
वृध्दा पंगु सहाय द्या मुलिमुला, विद्या तया शिकवा ॥
हर्षें वृष्टि करा फुलांची अवघे, टाळी अतां वाजवा ॥
शुभमंगल सावधान ॥ ५ ॥

पुष्पवृष्टि झाल्याबरोबर वधुवरांनीं आपल्या उत्पन्नकर्त्यासहित आपल्या कुळस्वामीचें चिंतन करूं लागावें.

## आशिर्वाद

वधुवरा ह्या बहु शक्ति द्याया।
समर्थ तो जोचि जगा करी या॥
सुबुद्धि, विद्या, बल आणि भूती।
दया तयाच्याचि कृपें करोति॥
मनीं स्वकर्त्या दृढ चिंतुनी हो।
बळी कूळस्वामी आठवा हो॥
तशीच विंध्यावलि स्वामिणीला।
स्मरा तसा काळहि भैरवाला॥
खंडेरावा पाहिजे आठविला।
तैसातुह्मी त्याहि महासुभ्याला॥
न्यायाकर्ता जो नउ खंडचा हो।
याशीं स्मर्ता सुख तुह्मा बहु हो॥

इतक्यांत समोरासमोर कांहीं अंतर मध्यें ठेऊन, दोन चवरंग अथवा आसनें सुशोभित करून, त्यावर वधुवरांस बसवून उभयतांमध्यें निर्मळ जमिनीवर, एका पाण्यानें भरलेल्या घटावर, नारळ ठेवावा व त्याचे एके बाजूला जमिनीवर जोतीबा अथवा बहिरोबाचा गुलालानें त्रिशूळ काढून, दुसरे बाजूला जमिनीवर खंडेरावाच्या भंडारानें भाला काढून त्याचे भवतालीं अकरा पानांचे विडे मांडून, त्या प्रत्येक विड्यावर एक सुपारी, एक हळकुंड, एक खारीक, एक नारळ अथवा एक खोबऱ्याची वाटी व एक सणी (दोन पैसे) ठेवून, वराच्या उजवे बाजूला चंदनाचीं लाकडें पेटवून केलेल्या ज्वालांत, वधुवरांच्या मनांत पूर्वी ज्या कांहीं म्हणून दुष्ट वासना आल्या असतील, त्या सर्व त्यांनीं आपआपल्या मनाचा दृढनिश्चय करून, जाळून टाकून, शुद्ध मनें करून, खालीं लिहिलेली महापूजा करण्यास आरंभ करावा.

## पूजा

### सत्यमेव जयते

आकाशनिर्माणकर्त्रे नमः, तेजनिर्माणकर्त्रे नमः, वायुनिर्माणकर्त्रे नमः, उदकनिर्माणकर्त्रे नमः, पृथ्वीनिर्माणकर्त्रे नमः, सूर्यनिर्माणकर्त्रे नमः, चंद्रनिर्माणकर्त्रे नमः, तारांगणनिर्माणकर्त्रे नमः, मयूरनिर्माणकर्त्रे नमः, मर्कटनिर्माणकर्त्रे नमः, अनुरेणुनिर्माणकर्त्रे नमः, पर्जन्यनिर्माणकर्त्रे नमः, सागरनिर्माणकर्त्रे नमः, कच्छनिर्माणकर्त्रे नमः, मत्स्यनिर्माणकर्त्रे नमः, जलजंतुनिर्माणकर्त्रे नमः, वटवृक्षनिर्माणकर्त्रे नमः, चंदननिर्माणकर्त्रे नमः,

तुळशीनिर्माणकर्त्रे नमः, कंदमूलनिर्माणकर्त्रे नमः, वेलीनिर्माणकर्त्रे नमः, सुगंधनिर्माणकर्त्रे नमः पुष्पनिर्माणकर्त्रे नमः; फलनिर्माणकर्त्रे नमः, पिपीलिकानिर्माणकर्त्रे नमः, गजेंद्रनिर्माणकर्त्रे नमः, अश्वनिर्माणकर्त्रे नमः, कीटकनिर्माणकर्त्रे नमः, बुद्धिमान प्राणीनिर्माणकर्त्रे नमः, स्पर्शेंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, कर्णेंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, चक्षुरिंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, रसनेंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, घ्राणेंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, ज्ञानेंद्रियनिर्माणकर्त्रे नमः, शुद्धविचारनिर्माणकर्त्रे नमः, कुळस्वामीणीनिर्माणकर्त्रे नमः, कुळस्वामीनिर्माणकर्त्रे नमः महाबळीराजानिर्माणकर्त्रे नमः, महाजोतीबानिर्माणकर्त्रे नमः, काळबहिरीनिर्माणकर्त्रे नमः, महाखंडेरावनिर्माणकर्त्रे नमः, नवखंडचा न्यायीनिर्माणकर्त्रे नमः, महासुभानिर्माणकर्त्रे नमः, सप्ताश्रयनिर्माणकर्त्रे नमः, ब्रह्मराक्षसनिर्दाळणकर्त्रे नमः

स्नानं समर्पयामि, पंचमृतस्नानं समर्पयामि, सुगंधादिक स्नानं समर्पयामि, चंदनं विलेपनं समर्पयामि, अक्षतां समर्पयामि, पुष्पं समर्पयामि, धूपं समर्पयामि, नैवेद्यं समर्पयामि, तांबुलं समर्पयामि, दक्षिणां समर्पयामि, शूद्रविद्वानाय दक्षिणां समर्पयामि.

पूजा पुरी होतांच, वधुवरांचे अंगावरचे वस्त्रांना स्पर्श होऊं न देतां, उभयतांचे भवताली, कच्या सुतानें वेष्टून मर्यादा करावी आणि त्या मर्यादेचे आंत वधुवरांनीं सर्वांसमक्ष प्रतिज्ञा करावी, ती येणेंप्रमाणें :—

## वर (शपथ)

आजपासून मी तुला माझी भार्या कबूल करून, जातपंचासमक्ष मी प्रतिज्ञा करितों, ती अशी कीं,—आजपासून मी तुला या सूतभर मर्यादेइतकी देखील जागा सोडून तुझ्याबाहेर जाणार नाहीं; म्हणून आपल्या उत्पन्नकर्त्यासहित कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करितों.

## वधू (शपथ)

आजपासून मी तुला माझा भ्रतार कबूल करून, जात पंचासमक्ष मी प्रतिज्ञा करितें ती अशी कीं आजपासून मी तुला या सूतभर मर्यादेइतकीदेखील जागा सोडून तुझ्याबाहेर जाणार नाहीं, म्हणून आपल्या उत्पन्नकर्त्यासहित कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करितें.

प्रतिज्ञा केल्यानंतर मर्यादा केलेल्या सुताचीं दोन कंकणें करून वधुवरांनीं एकमेकांच्या हाताच्या मनगटांत बांधून वधूस वराचे उजवे बाजूला शेजारीं बसवून, जातींतील सुवासिनींकरवीं उभयतांचे पांघरत्या शेल्याची महा सत्य गांठ देऊन, वधूच्या मातापित्यांनीं अथवा वधूच्या मामीमामानीं वरास गंधपुष्पादि अर्पून वधूस कुंकूं लावून तिची ओटी भरून, तिच्या अंगावरच्या वस्त्रालंकारासह भोजन घेण्याचीं पात्रें देऊन, कन्यादान करून त्यांस नमस्कार केल्याबरोबर वधुवरांनीं, आपले जातींतील मुलीमुलें शिकविण्याकरितां जातफंडास महादक्षिणा देवून आपल्या जातपंक्तीबरोबर बहुल्यावर एके ताटांत जेवण घ्यावयास जावें.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं वरानें जानवस घरून वधूचे अंगास लावण्याकरितां खिसका, स्नानाचे पूर्वीं केंसास लावण्याकरितां सुवासिक तेल व मसाला आणि नाहाल्यावर वेणींत घालण्याकरितां फुलें पाठवून द्यावींत. नंतर वरानें दोन प्रहरून वधूकरितां साडीचोळी, अलंकारासह ओंटीचे सामान व वऱ्हाडाकरितां पानसुपारी, गुलाबपाणी, अत्तर, फुलें, बरोबर घेऊन वाजतगाजत मोठ्या थाटानें मिरवत मिरवत वधूचे मंडपांत गेल्यावर फक्त साडीचोळी व अलंकार वधूसाठीं घरांत पाठवून आपण वऱ्हाडाबरोबर मंडपांत बसावें. पुढें वधूनें साडीचोळी नेसून अंगावर अलंकार घालून मंडपांत आल्यावर वधूनें वराचे उजवे बाजूला शेजारीं बसून, उभयतांनीं पूर्वींप्रमाणें आपल्या उत्पन्नकर्त्यासह कुळस्वामीची पूजा केल्यानंतर जातपंचाचे आज्ञेवरून जातींतील पांच सुवासिनींनीं वधूस हाळदकुंकूं देवून तिची ओटी भरावी व वधूनें त्या पांच सुवासिनींस हाळदकुंकूं देऊन त्यांच्या ओट्या भराव्यात. नंतर जातींतील मुलीमुलांस विद्या शिकविण्याकरितां, जातफंडांत टाकण्याकरितां महादक्षिणा देऊन, वरवधूच्या आप्तसोयऱ्यांनीं व इष्टमित्रांनीं आणलेले अहेर ज्याचे त्यांनीं स्विकार केल्यानंतर उभयतां व्याह्यांनीं एकमेकांस पोषाक करून, जातींतील स्त्रीपुरुषांसह एकंदर सर्व वऱ्हाडांस गुलाबपाणी, अत्तर, फुलें देवून विडे वाटल्यावरोबर वराचे वऱ्हाडांनीं जानवस घरीं जावें.

वरानें वधूचे गांवांतील जातवाल्यांस शक्तिप्रमाणें गांवजेवण आणि रात्रीं वधूचे मंडपासमोर मैदानांत उभयतांनीं आपआपले आप्तसोयरे राजांच्या एकमेकाशीं रास (राज) भेटी करवून, उभयतां वऱ्हाडांनीं एकमेकावर रंग गुलाल उडविण्याची रेलचेल करून आपले झेंडे नाचविल्यावर वधूचे मातापित्यांनीं वराचे मातापित्यांस वस्त्रें, अलंकार व आजीस आजेचीर अर्पण करावें. नंतर मंडपांत जाऊन बसावें, आणि वधूच्या मातापित्यांनीं वधूचे मुखांत खडीसाखर घालून तिचे मुखावर बारीक शेला टाकून, मोठ्या विनयपूर्वक व नम्रतेनें वधूस वराचे ओसांगळी घातल्याबरोबर, वरानें वधूसह वऱ्हाडास बरोबर घेऊन, मोठ्या आनंदानें शूद्रादि अतिशूद्रांपासून तो ख्रिस्ती, मुसलमान, पार्शी, ब्राह्मण वगैरे मानव बांधवांपावेतों कोणाची आवडनिवड न करितां त्यांच्यांतील पोरक्या मुलीमुलांस व अंधपंगूंस शक्त्यनुसार दानधर्म करीत आपल्या गांवीं जावें.

इति सत्यशोधक समाजोक्त लग्नसंबंधी विधि समाप्त.

## वास्तुशांति

### सत्यमेव जयते

प्रथम पाया खणणाऱ्या बिगाऱ्यापासून तों बेलदार, वडारी, लोहार, सुतार वगैरे कामगार सामानसुमानवाल्यांची एकंदर सर्व दाम दाम बाकी चुकती करून, आपल्या

उत्पन्नकर्त्यासह कुळस्वामीच्या नांवानें यथासांग पूजा करावी, नंतर आपल्या जातींतील मुलीमुलांस विद्या शिकविण्याकरितां जातफंडांत महादक्षिणा देवून एकंदर सर्व कामगारासह आपले आप्तसोयरे, इष्टमित्रांस पंक्तीस घेऊन पोटभर भोजन सारावें. शेवटीं त्या सर्वांस पानविडे, गुलाब अत्तर देवून, आपलें घर बांधितांना ज्या ज्या कामगारांनीं कसर न करितां इमानें इतबारें झटून कामें केलीं असतील, त्या सर्वांस आपल्या शक्त्यनुसार बक्षिसें देऊन त्यांस संतुष्ट केल्यानंतर एकंदर सर्व परजातींतील अतिशूद्रापासून तों मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, वगैऱ्यांतील पोरक्या अंधपंगू स्त्रीपुरुषांस थोडाबहुत दानधर्म करून गृहप्रवेश करावा.

इति सत्यशोधक समाजोक्त गृहप्रवेशविधि समाप्त.

## दशपिंड

### सत्यमेव जयते

मातीचा एक त्रिकोणी ओटा करून त्याचे तीन कोणावर तीन खारवी रंगाचीं निशाणें रोवून, त्यांचेमध्यें तीन मातीच्या कुंड्या किंवा बोळक्यामध्यें दुध, दहीं, मध, साखर व निर्मळ पाणी तोंडोतोंड भरून त्या दर एकीवर भाताच्या पिंडासह भाजलेल्या कणकीची दामटी ठेवून त्यापुढें एकेक सणी पैशासह तीन पानाचे विडे ठेविल्यावर, तीन भाताचे पिंडावर दुध, दहीं, मध, साखर घालून त्यास धूपदीप दाखवून, त्यास किडे, मुंग्या, पशु पक्ष्यादिकांनीं खाण्याकरितां सोडून, तेथून लांब एके बाजूला दुसरीकडे जाऊन तेथें थोडीशी जागा सारवून त्यावर केळीची अथवा दुसरीं स्वच्छ पानें अंथरून त्यावर मरण पावलेली स्त्री अथवा पुरुष असेल, त्याचे नांवानें, एक कणकीचा अथवा भाताचा पिंड, दुसरा त्याचे आईचे नांवानें, तिसरा पिंड त्याचे आजीचे नांवानें, चवथा पिंड त्याचे पंजीचे नांवानें, पांचवा पिंड त्याचे बापाचे नांवानें, सहावा पिंड त्याचे आजाचे नांवानें, सातवा पिंड त्याचे पंज्याचे नांवानें, आठवा पिंड त्याचे सासूचे नांवानें, नववा पिंड त्याचे आजेसासूचे नांवानें, दहवा पिंड त्याचे पंज्येसासूचे नांवानें, अकरावा पिंड त्याचे शाळेंतील पंतोजी त्याचे जातींतील असल्यास त्याचे नांवानें, बारावा पिंड त्याचे आईचे नांवानें व तेरावा पिंड त्याचे बापाचे नांवानें मांडून, त्या सर्व पिंडांस चंदनाचें गंध लावून त्यावर माका, हदगा अथवा जीं वेळेस फुलें मिळतील तीं व हळदकुंकु, गुलाल घालून, त्यांचेसमोर एकेक सणी पैशासह तेरा पानाचे विडे ठेवून विवाहांत सांगितल्याप्रमाणें आपल्या उत्पन्नकर्त्यासह कुळस्वामीची महापूजा केल्यानंतर तेरा पिंडांची पूजा करावी. नंतर दीनदुबळ्या लेकीवाळीस अथवा विपत्तींत आलेल्या भाऊबंदास अथवा सोयऱ्या-धायऱ्यास गौप्रदानें देऊन आपल्या जातींतील

मुलीमुलांस विद्यादान देण्याकरितां जमविलेल्या **सत्यशोधक समाज** फंडांत वालण्याकरितां आपआपल्या सामर्थ्यानुरूप महादक्षिणा दिल्यानंतर, पिंडापुढें धूपदीपनैवेद्य अर्पून एकंदर सर्व त्याचे कुळांतील स्त्रीपुरुषांसह सोयरेधायरे इष्टमित्रांनीं स्नानें न केल्यास पाण्यानें चुळी भरून तिलांजुळी करण्याचे पूर्वी समाजांतील फंडांत एकेक शिवराई घालून घरोघर जावें.

इति सत्यशोधक समाजोक्त उत्तरक्रियासंबंधीं विधि समाप्त.

## आरती

जयहो जयहो माझ्या आदिसत्या
तुझ्या सत्तेनें शोधूं उत्पन्नकर्त्या ॥ ध्रु० ॥
विजयी द्विज होता क्षेत्री निषेधीले
विद्या बंद करूनी क्षुद्रवत केले
आर्यांनीं शूद्राला पशुतुल्य केले
भूदेव होवूनी पाय पूजविले
अहंब्रह्म होवूनी भोंदीती मुढाला
नाहीं भीत कधीं सद्विवेकाला
ब्राह्मणभोजन चंगळ करविती
ब्रह्मराक्षसाला मार्गे हटविती
मृतांच्या नांवानी दानधर्म घेती
अधम होवूनी मधींच खाती
खाऊ दिले नाहीं श्रमी शूद्राला
अंधपंगुसह पोरक्या मुलाला
सत्योदय होतां खुंटे वेदमति
पाहूं जाता अवघी दिसे खोटी स्मृति
सत्या तुझा महिमा पुराणें ऐकूनी
तोंडें करिती काळीं तेलमाखणानीं
तुला पाहून कुंठित होती पाखंडी
लज्जित होवूनी खालीं घालती मुंढी
कृपा तुझी होता मूढ जनावर
भूदेव कापती मनीं थरथर
कृपेचा सागर या तूं सत्य जाण
मुक्त केले आह्मां ब्रह्मपाशांतून

तुझ्या प्रसादानें मार्ग उमजलों
मातापित्या आह्मी सेवूं लागलों ॥ध्रु०॥
जयहो जयहो माझ्या आदिसत्या
तुझ्या सत्तेनें शोधूं उत्पन्नकर्त्या ॥

× × ×

सेवुं या सत्यराजा ॥ महा प्रांजळ तेजा ॥
शोधीती निर्वाणीं ॥ मन वेधलें काजा ॥ध्रु०॥
लोपलें सत्य जनीं ॥ हित नेणती कोणी ॥
धर्म रचिले बहू ॥ आपहित साधूनी ॥१॥
शोधीला सत्यधर्मा ॥ पावलो गूज मर्मा ॥
विटलो खोटया धर्मा ॥ त्यागिले नीच कर्मा ॥२॥

× × ×

देवा नित्य स्मरूनी, धर सत्य मताला
खोटा धर्म सोडूनी, जोड बंधुप्रीतिला
अहंब्रह्म होवूनी, त्यागू नको दीनाला
सोंवळा रे बनूनी, चढू नको मदाला
इडापिडा मर्दूनी, सेव सत्य राजाला
स्वतः श्रम करूनी, पोस स्वकुटुंबाला
सदा सत्य वदूनी, सोड धूर्त मत्ताला
विद्या क्षुद्रा देवूनी, लाजवी भूदेवाला
शूद्र जन सेवूनी, आर्पी ईश्वराला
भंड मत खोडूनी, जोती नमे ईशाला ॥ध्रु०॥

ह्या पुस्तकांत जो विवाहविधि दाखविला आहे त्यापैकीं मंगळाष्टकें व पूजा करण्याचे मंत्र हे महाराष्ट्र देशांतील कोणत्याही जातींतील लोकांस मोठ्याच उपयोगाचे आहेत. करितां ते सर्व कायम ठेवून देशाचारा व कुळाचाराप्रमाणें विवाहांत कित्येक प्रकार करावे लागतात ते बिनहरकत करावेत. हल्लीं धर्मविधि करतांना नामधारी ब्राह्मण जे मंत्र किंवा मंगळाष्टकें म्हणतात, त्याचा संबंध प्रस्तुतचे विवाहास किंवा वेळासही नसून, त्या मंगळाष्टकांचा व मंत्रांचा काय अर्थ हेंही आमचे लोकांस समजत नसल्यामुळें केवळ अंधळ्यांचे व बहिऱ्यांचे बाजाराप्रमाणें होत आहे, ह्मणून **सत्यशोधक समाजाकडून** विवाह व इतर कार्यासंबंधाचे धर्मविधि चालविण्यास कोणासही अडचण पडूं नये, ह्मणून ते प्राकृत आणि सोपे असे तयार केले आहेत, यास्तव याचा लाभ सर्वांनीं घ्यावा अशी आमची विनंतीपूर्वक सुचना आहे.

१५

# सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक

# SARVAJANIKA SATYA DHARMA PUSTAKA.

BY

## JOTIRAO GOVINDRAO FULE

(FOR THE BENEFIT OF ALL PERSONS.)

PRINTED AND PUBLISHED BY

YESHWANT JOTIRAO FULE

AT THE

SUBODHA PRAKASH PRESS BOMBAY.

POONA: 1891 A. D.

FIRST EDITION.

( All rights reserved by the publisher.)

PRICE 12 ANNAS

सत्यमेव जयते.

# सार्वजनीक सत्य धर्मपुस्तक.

हें

## जोतीराव गोविंदराव फुले

यांनीं

एकंदर मानव स्त्रीपुरुषाच्या हितार्थ केलें

तें

## यशवंत जोतीराव फुले

यांनीं

मुंबई येथें

(सुबोधप्रकाश छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.)

**आवृत्ति पहिली.**

( या ग्रंथासंबंधी सर्व हक्क प्रसिद्ध कर्त्यानें
आपणाकडे ठेविले आहेत. )

पुणे. इसवी सन १८९१.

किंमत १२ आणे.

# जोतीराव गोविंदराव फुले.



जन्म १८२७. मृत्यु १८९०.

# ग्रंथकर्त्याची प्रस्तावना

या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्यें निर्मिकानें अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित तत्संबंधी एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केलें आहे. त्यांपैकीं आपण सर्व मानवस्त्रीपुरुषांनीं त्याविषयीं काय काय करावें आणि आपण सर्व एकंदर मानवस्त्रीपुरुषांनीं त्याचें स्मरण मनीं जागृत ठेऊन एकमेकांशीं कोणत्या तऱ्हेचें आचरण केल्यामुळें त्यास आनंद होणार आहे; यास्तव मी त्याच्या कृपेनें एकंदर सर्व मानवस्त्रीपुरुषांच्या हितासाठीं हा लहानसा ग्रंथ रचिला आहे. तो सर्वांस ग्राह्य होऊन आम्ही सर्वांनीं निर्मिकाच्या सत्यमय राज्याचा सारखा उपभोग घेऊं लागावें म्हणून माझी त्यापाशीं मागणी आहे.

जें कांहीं मी माझ्या अल्पबुद्ध्यनुसार या ग्रंथांत लिहिलें आहे, त्यांत जी आमच्या मानव स्त्रीपुरुष विद्वान् व सूज्ञ वाचणांऱ्याच्या ध्यानांत व्यंगे दिसून येतील, त्यांविषयीं त्यांनीं क्षमा करून गुणलेशाचा स्वीकार करावा, अशी त्या सर्वांस माझी विनंती आहे. आणि जर करितां त्यांच्या अवलोकनांत कोणताही भाग सार्वजनीक अयोग्य किंवा खोटा दिसला तो किंवा या ग्रंथाच्या दृढीकरणार्थ जर त्यांस कांहीं सत्य विचार सुचविणें असेल तर ते, त्यांनीं वर्तमानपत्राद्वारें आम्हांस कळवावे, म्हणजे ते, खरेच विचारी पुरुषांचे असल्यास आह्मी कृतज्ञतापूर्वक मान्य करून दुसऱ्या आवृत्तींत दाखल करूं.

हा ग्रंथ आम्हास विस्तारानें लिहावयाचा होता, परंतु एकंदर सर्व मानवस्त्रीपुरुषांस आपआपले प्रपंच आवरून जर हा ग्रंथ त्यांस वाचतां न येईल, तर एकंदर सर्व रिकामटेकडे धूर्त त्यांस लुटून खातील. यास्तव एकंदर सर्व मानवस्त्रीपुरुषांच्या उपयोगीं हा ग्रंथ पडावा म्हणून या ग्रंथास "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक" असें नांव दिलें आहे. यास्तव सर्वांनीं योग्य आश्रय दिल्यास दुसरी आवृत्ति आम्हांस, सुधारून व तींत नवीन पुराव्यासह कृत्रिमी थोतांडी ग्रंथांचें खंडण करण्याची हिम्मत येईल.

ता. १ माहे एप्रील<br>सन १८८९ इ. पुणें

ग्रंथकर्ता

# विषयानुक्रम

विषय


सुख ...
धर्मपुस्तक ...
निर्माणकर्ता ...
पूजा ...
नामस्मरण ...
नैवेद्य अथवा अन्नदान ...
अनुष्ठान ...
स्वर्ग ...
स्त्रीपुरुष ...
पाप ...
पुण्य ...
जातीभेद ...
पशुपक्ष्यादि वगैरे, आणि मानव प्राणी—यांजमध्यें भेद ...
धर्म ...
नीति ...
तर्क ...
दैव ...
आर्य भटब्राह्मणांचे वेद आणि सार्वजनीक सत्याची तुलना ...
सत्य ...
आकाशांतील ग्रह ...
जन्म ...
कन्या अथवा पुत्र यांचे नांवाचा संस्कार, अन्नांचा संस्कार आणि शाळेचा संस्कार ...
लग्न ...
दुष्टाचरण ...
मृत्यु ...
प्रेताची गति ...
श्राद्ध ...
एकंदर सर्व स्त्रीपुरुषांस ग्रंथकर्त्यांची प्रार्थना ...

# सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक

## सुख

यशवंत जोतीराव फुले. प्रश्न—मानवप्राणी एकंदर सर्व जगांत कशानें सुखी होईल?

जोतीराव गोविंदराव फुले. उत्तर.—सत्य वर्तन केल्याशिवाय मानवप्राणी जगांत सुखी होणार नाहीं. याविषयीं प्रमाण देतों.

॥ अखंड ॥

॥ सत्य सर्वांचें आदी घर ॥ सर्व धर्मांचें माहेर ॥ ध्रु० ॥
॥ जगांमाजीं सुख सारें ॥ खास सत्याचीं तीं पोरें ॥ १ ॥
॥ सत्य सुखाला आधार ॥ बाकी सर्व अंधकार ॥
॥ आहे सत्याचा बा जोर ॥ काढी भंडाचा तो नीर ॥ २ ॥
॥ सत्य आहे ज्याचें मूळ ॥ करी धूर्तांची बा राळ ॥
॥ बळ सत्याचें पाहुनी ॥ बहुरूपी जळे मनीं ॥ ३ ॥
॥ खरें सुख नटा नोंव्हे ॥ सत्य ईशा वर्जू पाहे ॥
॥ जोती प्रार्थी सर्व लोकां ॥ व्यर्थ डंभा पेटूं नका ॥ ४ ॥ सत्य० ॥

यशवंत. प्र०—यावरून देशस्थ आर्य रामदास भट्टजीबुवाचा श्लोक असा आहे कीं "जगीं सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूंच शोधूनी पाहे," याविषयीं तुमचें काय ह्मणणें आहे?

जोतीराव. उ०—देशस्थ आर्य रामदास भट्टजीबुवांनीं या श्लोकावरून निर्मीकानें निर्माण केलेल्या पवित्र जगाविषयीं व संसाराविषयीं अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांचे मनांत वीट भरवून तो सर्व व्यर्थ आहे, ह्मणून त्यांनीं निरिच्छ व निरभ्रम होवून, परित्याग केल्याबरोबर धूर्त आर्य भट्टांनीं त्यांवर झोड उडवावी; वास्तव हा श्लोक बुद्धया केला असावा. कारण आर्य रामदासास सत्य कशाला ह्मणावें, हें केवळ आपल्या जातीमतलबासाठींच कळालें नव्हतें, असें मला वाटतें. याविषयीं मी तुम्हांस एक प्रश्न करितों. त्याचें उत्तर देतांना आर्य रामदासाचा श्लोक कितपत खरा आहे, याविषयीं तुम्हांस सहज निर्णय करितां येईल.

यशवंत. प्र०—असा तुमचा प्रश्न काय आहे, तो आम्हांस सांगाल, तर बरें होईल.

जोतीराव. उ०—असें कोणतें क्षुल्लक सार्वजनिक सत्य आहे कीं, त्याचें आचरण केल्यानें मानवप्राणी दुःखी होतो?

यशवंत. प्र०—सत्यास स्मरून एकंदर सर्व सार्वजनिक सत्य, मग तें क्षुल्लक कां असेना, पण त्याचें आचरण केल्यानें कोणताहि मानव प्राणी दुःखी होणार नाहीं, असें शोधांतीं समजून आलें; तथापि आर्य रामदासानें कोणच्या आधाराच्या जोरावर हा श्लोक कल्पिला असावा?

जोतीराव. उ०—याला जोर मूढ शूद्रादि अतिशूद्रांचें अज्ञान, व त्यांचा मतलबीपणा व धूर्तपणा होय. याविषयीं धूर्त आर्य रामदासानें आपले ग्रंथांत जें कांहीं लिहिलें आहे, त्यावर निःपक्षपातानें विचार करावा, यास्तव तें पुढें देतों.

देव झाले उदंड ॥ देवाचे मांडिलें भंड ॥
भूता देवांचें थोतांड ॥ एकची जाहलें ॥
मुख्य देव तो कळेना ॥ कशास कांहींच मिळेना ॥
एकास एक वळेना ॥ अनावर ॥
ऐसा नासला विचार ॥ कोण पाहतो सारासार ॥
कैचा लहान कैचा थोर ॥ कळेचिना ॥
शास्त्रांचा बाजार भरला ॥ देवांचा गलबला झाला ॥
लोक कामनेच्या व्रताला ॥ झोंबोन पडती ॥
ऐसे अवघे नासले ॥ सत्यासत्य हारपले ॥
अवघे जना एक झाले ॥ चहुंकडे ॥
मतामतांचा गलबला ॥ कोणी पुसेना कोणाला ॥
जो जे मतीं सांपडला ॥ तयासी तोची थोर ॥
असत्याचा अभिमान ॥ तेणें पावीजे पतन ॥
म्हणोनिया ज्ञाते जन ॥ सत्य शोधिती ॥

यशवंत० प्र०—रामदास हा अस्सल आर्य ब्राह्मण कुळांतील असतां, त्यानें आपल्यास रामशर्मा पद न जोडितां अतिशूद्र सुरदासाचें पद आपले नांवास कां जोडून घेतलें? यांतील इंगित काय असावें, हें तुह्मी सांगूं शकाल काय?

जोतीराव० उ०—शिवाजी हा शूद्र जातीमध्यें मोठा योद्धा असून, अक्षरशून्य असल्यामुळें व रामदास अट्टल धूर्त आर्य जातींतील साधु बनल्यामुळें, त्यानें आपल्या नांवास शर्मा असें पद जोडून न घेतां, अतिशूद्र सुरदासासारखा आपल्यास रामदास ह्मणऊन घेऊं लागला. यांतील मुख्य इंगित अज्ञानी शूद्र शूर शिवाजीस खूष करणें होय. तात्पर्य, निर्मीकाच्या नांवावर धर्मसंबंधीं दरवडे घातल्यानें मात्र सुख होतें, व बंडखोरापासून अज्ञानी व पंगू मानवांस सोडविल्यापासून अथवा निराश्रित अंध, पंगू व

पोरक्या मुलीमुलांस व इतर सर्व प्रकारच्या संकटांत पडलेल्या मानव बांधवांस साह्य देण्यापासून, मात्र सुख होत नाहीं, ह्मणून ह्मणणें केवळ एकाद्या नास्तिकानें जग निर्माणकर्त्याचें **अस्तित्व नष्ट करण्याप्रमाणें** होय.

## धर्मपुस्तक

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—यावरून कोणत्याच धर्मपुस्तकांत सर्वथैव प्राणीमात्रांस सुख देण्यापुरतें सत्य नाहीं काय ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनीं धर्मपुस्तकें केलीं आहेत, त्यांपैकीं एकही ग्रंथांत आरंभापासून शेवटापर्यंत सारखें **सार्वजनिक** सत्य नाहीं. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्यें कांहींएक व्यक्तींनीं त्या वेळच्या प्रसंगांस अनुसरून हेकडपणा केल्यामुळें, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होतां, सहजच त्यामध्यें अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करूं लागतात.

दुसरें असें कीं **निर्माणकर्त्ता** जर आपण सर्व मानवांचा **निर्मीक** आहे, तर एकंदर सर्व मानवी प्राण्यांपैकीं प्रत्येक व्यक्तीस त्यानें कृपाळू होऊन एकंदर सर्व उत्पन्न केलेल्या **मानवी अधिकारांचा** यथायोग्य उपभोग घेतां यावा, असें घडून येत नसल्यामुळें त्यांस अनेक प्रकारच्या दुःसह अडचणी सोसाव्या लागतात.

सारांश, आपल्या या सूर्यमंडळासह, आपण वस्ती करणाऱ्या पृथ्वीचा निर्माणकर्त्ता जर एक आहे; तर तिजवरील अनेक देशांतील लोकांचा एकमेकांशीं वैरभाव माजून प्रत्येकामध्यें देशाभिमान व धर्माभिमानाचें खुळ व्यर्थ कां माजलें आहे ? त्याचप्रमाणें या पृथ्वीवरील अनेक देशांतील सर्व नद्या महासागरास मिळत असतां, त्यांपैकीं एका देशांतील नदी पवित्र कशी होऊं शकेल ? कारण ती महापवित्र नदी श्वानाचें मलमूत्र पोटांत घेऊन समुद्रास वाहून नेण्यास कधीं मागेंपुढें घेत नाहीं.

**बळवंतराव. प्र०**—तर यावरून या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कांहीं लोकांस महा पवित्र मानून, त्यांस भूदेवासारखा मान देऊन त्यांसच कां श्रेष्ठ मानितात ?

**जोतीराव. उ०**—या पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवानें व बुद्धिकौशल्यानें एकसारखे असून, त्यांपैकीं कांहीं लोक पिढीजादा पवित्र बनून श्रेष्ठ कसे होऊं शकतील ? सर्वांसारखें त्यांस जन्ममरण असून ते सर्वांप्रमाणें सद्‌गुणांत व दुर्गुणांत निपूण नाहींत काय ?

## निर्माणकर्ता

**यशवंत जोतीराव फुले. प्र०**—तर आपल्या या सूर्यमंडळासह आपण वस्ती करणाऱ्या पृथ्वीचा **निर्माणकर्त्ता कोण** आहे ?

**जोतीराव फुले.** उ०—पूर्व अथवा पश्चिम अथवा दक्षिण, अथवा उत्तर इत्यादि दहा दिशांपैकीं एका तरी दिशेचा आपण शोध करूं लागल्यास तिचा अंत लागेल काय?

**यशवंत.** उ०—दहा दिशांपैकीं एकाहि दिशेचा आम्ही शोध करूं लागल्यास आम्हांस थांग लागणार नाहीं; कारण हजारों वर्षेंसुद्धां आम्ही त्या दिशेचा शोध करूं लागल्यास आम्हांस तिचा थांग लागणार नाहीं, कारण आम्हां मानवांचें आयुष्य तें किती?

**जोतीराव फुले.** प्र०—दहा दिशांपैकीं एकाहि दिशेचा आपल्यास जर थांग लागत नाहीं, तर एकंदर सर्व दिशांची पोकळी किती असावी बरें, याचें तुम्हांला अनुमान तरी करितां येईल काय?

**यशवंत.** उ०—एकंदर सर्व पोकळीची लांबी, रुंदी, उंची व खोली याचा आम्हांस थांग लागणार नाहीं; ती **अनंत आहे**, अशी आमची खात्री झाली.

**जोतीराव.** उ०—या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्यें अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित आपल्या पृथ्वीवरील प्राणीमात्रांसह, पशू, पक्षी, वृक्ष इत्यादिकांस ज्यानें **निर्माण** केलें आहे, तो कर्ता कोठें व तो कसा आहे, हें पाहण्याची आपण यत्किंचित् मानवप्राण्यांनीं इच्छा करूं नये; कारण आपल्या पृथ्वीच्या अतीसन्निध ग्रहांवर काय काय आहे, हें पाहावयास जाण्याचीसुद्धां आपणास शक्ति नाहीं. आतां मी तुम्हांस असें कळवितों कीं, पूर्वेकडे अथवा दुसऱ्या कोणत्याहि दिशेकडे विमानाच्या अथवा रेलवेच्या मार्गानें हजारों वर्षांच्या रस्त्यावर पलिकडे गेल्यावर तेथें एका महालामध्यें सर्वांचा निर्माणकर्ता अनेक विश्वांतील प्राणीमात्रांच्या सुखदुःखाची व्यवस्था करीत बसला आहे, असें आपल्या दृष्टीस पडेल, अशी जर आपण कल्पना केली, तर तुम्ही स्वतः तेथें जाऊन आपल्या सर्वांच्या निर्मीकाचें दर्शन घेऊन पुनः तें शुभवर्तमान माझ्या मुलाबाळांस (कारण आम्ही अल्पायुषी आहोंत म्हणून तोंपर्यंत आम्ही जगणार नाहीं.) येथें परत सांगण्याकरितां तुमच्यानें येववेल काय? अथवा आपल्या सर्वांच्या निर्मीकानें मजा पाहण्यासाठीं आपण मानवांस दर्शन घेण्यास जर बोलाविलें, तर आपल्या या पृथ्वीवर अनेक क्षणिक सार्वभौम राजे झाले, त्यांचें तेज तर काय, परंतु अनंत सूर्यांचें तेज एके ठिकाणीं केल्यानें, त्या आपल्या महापवित्र दैदिप्यमान व तेजोमय निर्मीकाच्या तेजापुढें आपल्याच्यानें उभें राहून त्याचें दर्शन घेववेल काय? आपण कितीहि केलें तरी सर्व कामांत अपुर्ते, पंगू, ज्ञानहीन व सर्व दुर्गुणांत निपूण असून आपला घटकेचा भरंवसा नाहीं.

यास्तव लाचार होऊन त्या आपल्या दयानिधी निर्माणकर्त्यास आपण उभयतां येथूनच अनन्यभावें शरण जाऊन मोठ्या नम्रतेनें साष्टांग प्रणिपात करूं या.

**यशवंत.** प्र०—अति दुर्घट तपश्चर्या केल्यामुळें कित्येक तपस्वी लोकांस निर्माणकर्त्यानें दर्शनें दिलीं, म्हणून कांहीं लोकांच्या ग्रंथांत लेख सांपडतात, याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे?

**जोतीराव. उ०**—कल्पित विष्णूच्या नाभीकमळापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवास निर्माणकर्त्यानें जर दर्शन दिलें नाहीं, तर मानव प्राण्यांची काय कथा ? कारण जगामध्यें कांहीं धूर्त लोकांना अशा प्रकारच्या कल्पित कादंबऱ्या रचून मूढ जनांवर आपलें वजन पाडतां आलें; परंतु हल्लींच्या सत्ययुगांत त्यांचें कल्पित ब्रह्म कित्येक लोकांस कळूं लागलें आहे.

## पूजा

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—आतां आपल्या निर्माणकर्त्यावर पुष्पें चढवून त्याची पूजा आपण मानवांनीं कोणत्या तऱ्हेनें करावी ?

**जोतीराव. उ०**—या अफाट पोकळींतील अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित पृथ्वीवरील पुष्पें वगैरे सर्व सुवासिक पदार्थ जर निर्माणकर्त्यांनीं दयादृष्टीनें आपल्या मानवांच्या उपभोगासाठीं उत्पन्न केलीं आहेत, तर त्यांपैकीं कोणता पदार्थ उलटा आपण निर्मीकावर वाहून त्याची पूजा करावी ? एकंदर सर्व पदार्थ निर्मीकानें जर उत्पन्न केले आहेत, तर आपल्याजवळ आपलें स्वतःचें काय आहे, तें निर्मीकावर वाहून त्याची पूजा करावी ?

**बळवंतराव. प्र०**—तर मग आतां आपण या पुष्पांचा काय उपयोग करावा ?

**जोतीराव. उ०**—स्वपरिश्रमानें आपल्या कुटुंबाचें पोषण करून रात्रंदिवस जगाच्या कल्याणासाठीं झटणारे–ह्मणजे अज्ञानी मानव बांधवांस आपमतलबी व स्वकार्यसाधु लोकांच्या जाळयांतून मुक्त करणारे अशा सत्पुरुषांस फुलांच्या माळा करून नित्य ईश्वराच्या नांवानें अर्पण कराव्यात, ह्मणजे पुष्पांचें सार्थक झालें.

## नामस्मरण

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—निर्माणकर्त्याचें वारंवार पोकळ नामस्मरण केल्यानें त्यास संतोष होईल काय ?

**जोतीराव फुले. उ०**—आपण घरीं असतां मी आपल्या घरीं तुमच्या नांवानें एखाद्या धातूच्या अथवा दगडाच्या मूर्तीवर पुष्पें वाहून तुमचें नामस्मरण केल्यास तुम्हांस त्यापासून कांहीं खरा फायदा होईल काय ? त्याचप्रमाणें एका मातापित्यास सुमारें दहा मुलें झालीं; व त्या उभयतांनीं परिश्रम करून आपला वृद्धापकाळ होत तोंपर्यंत त्यांचें पालनपोषण केलें व तीं आतां उभयतां वृद्ध होऊन पंगू झाल्यावर त्यांपैकीं थोरल्या मुलानें त्यांच्या पाळणपोषणांकरितां कांहीं खटपट न करितां "माझी माता, माझा पिता" असें पोकळ नामस्मरण करूं लागल्यास मातापित्यासह त्याच्या भावंडांस उपवासानें मरावें लागेल कीं नाहीं बरें ? परंतु दुसऱ्या मुलानें मातापित्याचें नामस्मरण न करितां मोठ्या काळ कष्टांनीं श्रम करून आपल्या मातापित्याचें व धाकट्या भावंडांचें

पाळणपोषण केल्यास त्याचे आईबाप व बहिणभावंडें सुखी होऊन आनंद पावतील किंवा नाहीं बरें? यावरून केवळ मातापित्याचें पोकळ नामस्मरण करणारा मुलगा, किंवा अति मेहनत करून स्वकष्टानें त्यांचें व बहिणभावंडांचें पोषण करणारा, या सर्वांस आवडेल? तद्वत् आपल्या परिश्रमानें उदरनिर्वाह न करितां अथवा जगाच्या हितासाठीं न झटतां, केवळ आपलें पोट जाळण्याप्रीत्यर्थ बहुरुप्यासारखें ढोंगी बैराग्याचें सोंग घेऊन सर्वकाळ भांग पिऊन तिच्या अमलांत अज्ञानी भोळ्या जनांचे मिष्टान्नांवर नित्य ताव देऊन लाल गाजरासारखे गलेलठ्ठ पडून, निरर्थक निर्मीकाचें नामस्मरण करितात, ते निश्चयेंकरून विचारवान् पुरुषांच्या उपहासास पात्र होतात.

**बळवंतराव. प्र०**— तर मग निर्मीकाचें नांवसुद्धा आपण मानवांनीं घेऊं नये काय?

**जोतीराव. उ०—आपण मानवांनीं कृतज्ञपूर्वक व मनःपूर्वक** निर्मीकाचें नांवसुद्धां घेऊं नये, म्हणून सिद्ध करणारास अधम व कृतघ्न म्हटलें पाहिजे.

**बळवंतराव. प्र०**—तर मग मानवानें कृतज्ञपूर्वक निर्मिकाचें नांव कसें व कोणत्या वेळीं घ्यावें, याविषयीं विस्तारानें स्पष्टीकरण कराल, तर फार उत्तम होणार आहे.

**जोतीराव. उ०**—जो आपणास निर्माण करून सतत आपलें पाळणपोषण करीत असतो व काळजी वहातो. त्याच्या नांवाचा घोष धर्ममिषानें, कोल्ह्यासारख्या नानाविध युक्त्या लढवून कोणत्या तरी मार्गानें अज्ञान्याच्या हातावर तुरी देऊन **स्वकुटुंबाचा निर्भयपणें निर्वाह करणाऱ्या धूर्त भट्ट मानवानें** मौल्यवान नखरेदार पितांबर नेसून रजस्वला स्त्रीसारखें सोंवळें होऊन, सुगंधी पदार्थांच्या योगानें घमघमाट ज्या ठिकाणीं सुटला आहे, अशा पूजेच्या खोलींत नकट्या गुन्हेगारासारखें आपलीं नकटीं नाकें मुठींत धरून, बगळ्यासारखें एकचित्त होऊन, दिवाभितासारखे गच्च डोळे झांकून, मोठ्या धार्मीकपणाचा आव घालून, त्याचे नांवाचा घोष जर केला, तर आपल्या सर्वांच्या परमन्यायी निर्मिकास या अट्टल धूर्त बहुरुपी गारुड्याचें नामस्मरण पाहून अत्यंत संताप होणार नाहीं काय? यास्तव निर्मीकाचे नांवाचें सदा सर्वकाळ भय बाळगून त्याच्या नांवाची आठवण मनीं दृढ धरून, त्यानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व मानवांबरोबर **छक्केपंजे न करितां** सरळ सात्वीक आचरण केल्यानें निर्मीकाच्या पवित्र नांवास सन्मान दिल्यासारखें होईल. परंतु केवळ निर्मीकाच्या नांवाचा सतत व्यर्थ नामघोष करून त्याचें मस्तक फिरविल्यानें त्यास निःसंशय संतोष होणार नाहीं. सारांश आपल्याकरितां निर्मीकानें निर्माण केलेल्या वस्तूंचा, त्याच्या नांवानें कांहीं धर्मसंबंधित कल्पित छक्केपंजे उत्पन्न केल्याशिवाय आपल्या सर्वांच्या श्रमाप्रमाणें उपभोग घेण्याची सुरवात केल्याबरोबर, एकंदर सर्व जगांतील मानवप्राण्यांत कोणत्याहि तऱ्हेचे निरर्थक कलह उत्पन्न होणार नाहींत. व आपण सर्व बहिणभावंडांसारखे वागूं लागल्याबरोबर एकंदर सर्व मानवी प्राणी सुखी होऊन साक्षात् निर्मीकाचा अम्मल बसून त्याचें राज्य होणार आहे.

## नैवेद्य अथवा अन्नदान

**यशवंत जोतीराव फुले. प्र०**— आपण निर्मीकास नैवेद्य दाखवून त्यास कसें तृप्त करावें ?

**जोतीराव फुले. उ०**—एकंदर सर्व पोकळींतील अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित पृथ्वीवरील सर्व प्रकारचे पदार्थ मानवाच्या निर्वाहाकरितां जर निर्माणकर्त्यानें आपल्या स्वेच्छेनें उत्पन्न केले आहेत, तर त्यांपैकीं आह्मी कोणत्या पदार्थांचा उलटा नैवेद्य त्यास अर्पण करावा ?

**यशवंत. प्र०**—तर यावरून निर्मीकास संतुष्ट करण्यासाठीं पदार्थांचा आम्ही काय व कसा उपयोग करावा ?

**जोतीराव. उ०**—एकंदर आपल्या कुटुंबाचें स्वकष्टानें पाळणपोषण करून ज्या सत्पुरुषांनीं जगाच्या कल्याणासाठीं आपलें सर्व आयुष्य खर्ची घातल्यामुळें त्यांस यदाकदाचित् वृद्धापकाळीं विपत्ति आली अथवा ते कांहीं संकटांत पडले, तर त्यांस अथवा जगांतील पंगु लोकांस अथवा पोरक्या मुलांस निर्मीकाच्या नांवानें स्वशक्त्यनुरूप मदत करावी, म्हणजे त्यास नैवेद्य अर्पण केल्याचें श्रेय होईल.

**यशवंत. प्र०**—यावरून तुमच्या मतें आळशी म्हणून निरुपयोगी भट्ट भिक्षुकांस सहस्रभोजनें व दक्षिणा देऊं नये काय ?

**जोतीराव. उ०**—तसें नव्हे, कोणत्याहि प्रकारचा भेदाभेद न करितां एकंदर सर्व मानवांपैकीं जो कोणी आपल्या कुटुंबाचें पोषण करून जगाच्या कल्याणासाठीं सतत रात्रंदिवस झटत आहे, तो आर्य भट्ट भिक्षुक असो, अथवा अमेरिकेंतील इंडियन असो अथवा ज्याला तुह्मी नीच मानितां असा एखादा मृतप असो, तो मात्र अन्नदान घेण्यास पात्र आहे आणि तशालाच अन्नदान केल्यानें निर्मीकास अर्पिलें जाणार आहे. कारण एकंदर सर्व मानवी प्राण्यांचा निर्माणकर्ता साक्षात् तोच आहे.

## अनुष्ठान

**बळवंतराव. प्र०**—अनुष्ठानांपासून अथवा जप करण्यापासून निर्मीकास कांहीं संतोष होईल काय ?

**जोतीराव. उ०**—नाहीं, कारण हें सर्व अज्ञानरूप अंधःकारांत बुडालेल्या बांधवास बहुरुपी धूर्त ठकांचें लुटून खाण्याचें कृत्रिमी सोंग आहे.

**बळवंतराव. प्र०**—तर मग अनुष्ठान घालून जपतप कसें करावें ?

**जोतीराव. उ०**—निर्मीकानें एकंदर सर्व पदार्थ उत्पन्न केले आहेत. त्यांपैकीं प्रत्येक पदार्थांचा कोणकोणत्या ठिकाणीं कसा कसा उपयोग करावा, याविषयीं रात्रंदिवस खटपट करून ध्यानस्थ होऊन त्याविषयीं विचार करीत बसल्यानें निर्मीकाची अगाध शक्ति, अगाध चातुर्य व अगाध लीला होणार आहे.

## स्वर्ग

**मनाजी बोल्ह्जी मगर. प्र०**—एकंदर जगांतील सर्व अज्ञानी लोक स्वर्ग आहे म्हणून म्हणतात व त्या स्वर्गामध्यें पुण्यवान् मनुष्यांस यावत्काल अनाद्यंत सुख मिळतें, तसेंच पातकी मनुष्यांस त्यांच्या पातकाप्रमाणें नर्कांत यावत्काल नाना प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात, याविषयीं तुमचें कसें काय म्हणणें आहे ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—अति प्राचीन काळीं म्हणजे ज्या वेळेस जिकडे तिकडे सुधारणूक हा पदार्थ काय आहे, हें ज्यांना माहीत नव्हतें, अशा लोकांनीं स्वर्ग हा कोणी एक पशुपक्ष्यादिकांस भेडावण्याकरितां माळ्याच्या जितरापांतील हडकाला शेंदूर लावून थेट बाहुल्यासारखा बागुलबुवा अथवा बुजगावणें करून ठेवला होता. पुढें कित्येक कामांत कालेंकरून सुधारणा होत गेल्या; परंतु स्वर्गाविषयीं कोणीच विचार करून त्याचा खरा थांग लाविला नाहीं.

**मनाजी. प्र०**—यावरून स्वर्ग नाहीं ह्मणून तुह्मास वाटतें काय ?

**जोतीराव. उ०**—यांत काय संशय ? कारण एकंदर सर्व धर्मपुस्तकांत स्वर्ग आहे ह्मणून लिहितात; परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एका तरी गृहस्थास स्वतः हा स्वर्ग पाहिला ह्मणून सांगतां येईल काय ? त्याचप्रमाणें कल्पित पुराण शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देऊन पौराणिक कथेवर विश्वास न ठेवतां एखादा मनुष्य स्वर्ग पहाण्यास गेला व तो परत आला अशी कधींतरी गोष्ट घडून आली आहे काय ? व अशा प्रकारचा मनुष्य तरी एखाद्या भूभागावर सांपडेल काय ?

## स्त्री आणि पुरुष

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—निर्मिकानें या आपल्या पृथ्वीवर जलचर, स्थलचर व खेंचर अशा प्रकारच्या जिवांच्या तीन जाती निर्माण केल्या आहेत; त्यांपैकीं सर्वांत श्रेष्ठ कोण आहे ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—त्यांपैकीं सर्व प्राणीमात्रांत मानव प्राणी श्रेष्ठ केले आहेत व त्यामध्यें स्त्री आणि पुरुष असे दोन भेद आहेत.

**बळवंतराव. प्र०**—या उभयतां स्त्रीपुरुषांमध्यें ज्यास्ती श्रेष्ठ कोण आहे ?

**जोतीराव. उ०**—या उभयतांमध्यें ज्यास्ती श्रेष्ठ स्त्री आहे.

**बळवंतराव. प्र०**—या उभयतां मानवांमध्यें ज्यास्ती श्रेष्ठ स्त्रीच कां ?

**जोतीराव. उ०**—याचें कारण, निर्मीकानें निर्माण केलेल्या चमत्कारिक मोह उत्पन्न करणाऱ्या भवसागरांत तरंगून मजा मारणारे क्षणिक उभयतां मानवप्राणी आहेत. त्यांतून स्वभावेंकरून स्त्रीची जात भिडस्त असल्यामुळें ती प्रथम एका पुरुषास सलगी करण्यास सवड देते; आणि ती सलगी हा कामार्थी धूर्त पुरुष इतकी वाढवितो कीं,

अखेरीस स्त्री स्वतः होऊन त्यास आपला मदतगार वांटेकरी सखा करिते, आणि तीच सृष्टीनियमांस अनुसरून आपल्यांतील सर्व मुलांचें तर काय, परंतु आर्य भटांतील नाडबंद ब्रह्मचारी शंकराचार्यांच्या तोलाच्या मुलाचेंसुद्धां आपल्या उदरीं कांकूं केल्याशिवाय निमूटपणें नवमास रात्रंदिवस सतत ओझें वागविते. तीच आपल्या सर्वांस जन्म देणारी होय. आपले मलमूत्रादि काढून आपल्या सर्वांचें लालन व पालन करून आपल्या सर्वांचा परामर्ष करणारी होय. आपण सर्व पंगू लाचार असतां सर्वकाळ आपली काळजी वाहते व तिनेंच आपणा सर्वांस चालावयास व बोलावयास शिकविलें; यावरून एकंदर आबाल-वृद्धांत जगप्रसिद्ध म्हण पडली आहे कीं, "सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहींत." यास्तव निःसंशय पुरुषापेक्षां स्त्री माझ्या मतें श्रेष्ठ आहे.

**बळवंतराव. प्र०**—याशिवाय स्त्रियांमध्यें विशेष काय आहे ?

**जोतीराव. उ०**—सदरच्या कारणाशिवाय स्त्री आपल्या बहिणभावंडास आवडणारी असल्या कारणानें ती त्यांचा निरापेक्षबुद्धीनें पाठराखेपणा करिते; ह्याशिवाय स्त्री घरांत असल्याखेरीज घर शोभत नाहीं, हें आपण जाणतच असाल. याविषयीं ह्मण अशी आहे कीं, "न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते."

**बळवंतराव. प्र०**—स्त्रिया पुरुषांवर जास्ती प्रीति करितात, याला काय प्रमाण ?

**जोतीराव. उ०**—एखाद्या स्त्रीचा नवरा ज्या वेळेस मृत होतो, त्या वेळेस ती फार दुःखसागरांत बुडून तिला फार संकटें सोसावीं लागतात. मरेतोंपर्यंत सारा काळ वैधव्यांत काढावा लागतो; इतकेंच नव्हे तर पूर्वी कित्येक सतीदेखील जात असत, परंतु पुरुषाला तिच्याविषयीं दुःख होऊन तो कधीं "सता" गेलेला ऐकिला आहे काय ? तो लागेल-तितकीं लग्नें करूं शकतो तशी स्त्रियांची स्थिती नाहीं.

**बळवंतराव. प्र०**—स्त्रियांवर पुरुष कमी प्रीति करितात, याला काय प्रमाण ?

**जोतीराव. उ०**—घरांमध्यें महापतिव्रता स्त्री असतां अत्यंत लोभी पुरुष तिच्या उरावर दुसऱ्या लग्नाच्या दोनदोन, तीनतीन बायका करितात; त्याचप्रमाणें एकंदर सर्व स्त्रिया एका पुरुषाबरोबर लग्न लाविल्यानंतर त्याच्या घरीं नांदत असतां दुसऱ्या एखाद्या गृहस्थाबरोबर लग्न लावून त्याचेच घरीं त्यास आपल्या पतीचा "सवता" करून नांदत नाहींत.

**बळवंतराव. प्र०**—अशा तऱ्हेचे पुरुषांमध्यें अन्याय कशामुळें घडून येतात ?

**जोतीराव. उ०**—स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळें या लोभी व धाडस पुरुषांनीं मोठी कावेबाजी करून कोणत्याहि कामामध्यें स्त्रीजातीची संमत्ती घेतल्या-शिवाय एकंदर सर्व पुरुषांनीं आपलेच घोडे पुढें दपटले; त्यांस मानवी हक्क समजू देऊं नये, या इराद्यानें त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला, यामुळें एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला.

**बळवंतराव. प्र०**—स्त्रियांची जात अबला ती कशावरून ?

**जोतीराव. उ०**—आपणा सर्वांचें ती सतत रात्रंदिवस नऊ महिने उदरीं ओझें वागवीत असतां तिजला कोणत्याच लोभी पुरुषासारखे छक्केपंजे करून धाडसपणा करितां येत नाहीं, यावरूनच स्त्रियांना अबला असें म्हणतात.

**बळवंतराव. प्र०**—असें करण्याचा परिणाम काय होतो ?

**जोतीराव. उ०**—यावरून एकंदर सर्व जगांत प्रथम पुरुषांच्या अत्यंत लोभामुळें हेवा, द्वेष, कृत्रिम वगैरे नाना प्रकारचे दुर्गुण उत्पन्न होऊन सर्व प्रकारचीं पातकें उदयास आलीं.

**बळवंतराव. प्र०**—तर मग एकंदर सर्व जगांतील मानवप्राण्यांस आपल्या पापपुण्याचा झाडा द्यावा लागत नाहीं काय ?

**जोतीराव. उ०**—एकंदर सर्व जगांतील मानवप्राणी आपल्या पापपुण्यानुरूप इहलोकींच प्रत्यक्ष झाडा देऊन आपल्या पुढील वाढणाऱ्या सर्व संततीरूप वृक्षांस पाणी घालितात किंवा मारून टाकितात. अशा प्रकारें त्यांच्यावर किंवा त्यांच्या संततीवर त्या पापाचा किंवा पुण्याचा परिणाम होतो, ह्यावरून ईश्वरानें परलोक हा प्रत्यक्ष इहलोकींच निर्माण केला आहे.

**बळवंतराव. प्र०**—तर याविषयीं कृपा करून आपण कांहीं पुरुषांच्या अत्यंत लोभाविषयीं उदाहरणें दिल्यास माझी व इतर सज्जन लोकांची खात्री होईल.

**जोतीराव. उ०**—कित्येक व्यसनी पुरुष स्वस्त्रीशीं प्रतारणा करून जास्ती सुखी होण्याकरितां लोभानें तिच्या उरावर दोन-दोन, तीन-तीन लग्नाच्या बायका करितात, आणि त्यांजबरोबर रात्रंदिवस आपल्या मनःकामना तृप्त करण्याचे छंदांत पडतात. यामुळें पहिल्या स्त्रीच्या मनांत हेवा उत्पन्न होऊन ती त्यांचा मनापासून द्वेष करूं लागते. यास्तव प्रथम कुटुंबांमध्यें कलह होण्यास पुरुषाचा लोभच मूळ कारण आहे. याखेरीज कित्येक व्यसनी पुरुष स्वस्त्रीशीं दगेबाजी करून ज्यास्ती सुख होण्याकरितां लोभानें तिच्या उरावर अनेक लग्नाच्या बायका करितात आणि त्यांजबरोबर रात्रंदिवस आपल्या मनःकामना तृप्त करण्याचे नादांत पडल्यामुळें पुरुषांमध्यें नाना प्रकारचे घाणेरडे रोग निर्माण होऊन ते एकंदर सर्व जगांत पसरले आहेत. त्याचप्रमाणें कितीएक व्यसनी पुरुष मदोन्मत्त होऊन रजस्वला असलेल्या स्त्रियांबरोबर आपल्या मनःकामना तृप्त करितात, यामुळेंच त्या उभयतां स्त्रीपुरुषांस महाव्याधी उद्भवतात. इतकेंच नव्हे ! परंतु त्याच्या संततींतसुद्धां तोच महारोग कांहीं काळापर्यंत वास केल्याशिवाय रहात नाहीं.

**बळवंतराव. प्र०**—आपण पूर्वीं ह्मणालांत कीं, एकंदर सर्व स्त्रियांस मानवी हक्क समजूं देऊं नये, या इराद्यानें लोभी पुरुषांनीं त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला यामुळें स्त्रियांवर अनेक जुलमी प्रसंग येऊन गुदरले, त्यांपैकीं नमुन्याकरितां एखादें उदाहरण द्याल, तर बरें होईल ?

**जोतीराव. उ०**—साठसत्तर वर्षांच्या जरजर झालेल्या बोथऱ्या खल्लड जरठांशीं आर्य भट्टांनीं पूर्वी लग्न लाविलेल्या स्त्रिया मरतांच त्यांनीं लावण्यवती अशा अज्ञानी मुलींबरोबर पुनः संबंध करून, त्या अबलांचे तारुण्यांत माती कालवितात. परंतु बालपणीं वैधव्य आलेल्या अज्ञानी मुलीनें मात्र पुनः द्वितीय संबंध करूं नये म्हणून कडेकोट प्रतिबंध करून प्रचारांत आणिला आहे व याचे परिणाम खालीं लिहिल्याप्रमाणें होतातः—पवित्रतेचा पोकळ आव घालणाऱ्या अतिनिर्लज्ज आर्य, आपल्यांतील अबला व पंगू भावजया व सुना तारुण्याच्या भरांत आल्याबरोबर, त्यांचा रात्रंदिवस पाठलाग इतका करितात कीं, त्यांची सहजच आडमार्गी पाऊलें पडतात. असें झालें म्हणजे त्यांस अब्रूकरितां नाइलाज होऊन गर्भपात करून बाळहत्या कराव्या लागतात. यावरून धूर्त आर्य भट्ट जातीमध्यें किती गर्भपात व बाळहत्या होत असतील, याविषयीं तुमच्यानें खास अनुमान करून सांगवेल काय ?

**बळवंतराव. प्र०**—या अघोर पापाचें अनुमान करून माझ्यानें सांगवणार नाहीं. परंतु ही पक्षपाती वहिवाट आर्य लोकांनीं आजपावेतों आपल्या जातीमध्यें कशी चालू ठेवली ? कारण ही नेहमीं चालू ठेविल्यानें धूर्त आर्यभट्ट जातीचा आपोआप निर्वंश होऊन लयास जाईल; यास्तव ही दुष्ट चाल ते आपल्यांतून कां काढून टाकीत नाहींत ?

**जोतीराव. उ०**—ह्याचें कारण, स्त्री जातीस नीच मानण्याचा त्यांचा प्रघात पडल्यामुळें व त्यांस अनेक धूर्त व कावेबाज ऋषींनीं केलेल्या संहिता, स्मृत्या वगैरे बळकट आधार मिळाल्यामुळें त्यांनीं आजपावेतों ही दुष्ट चाल चालू ठेविली आहे. यास्तव तुह्मीच विचार करा कीं, आर्य ब्राह्मणांनीं ही दुष्ट चाल प्रचारांत आणल्यामुळें भोळसर अज्ञानी कुळवाडी, सोनार वगैरे जातींतील लोकांनीं त्यांचा कित्ता घेतल्यामुळें, ते भट्टांप्रमाणेंच आपल्या सुनाबाळांस त्याच प्रकारच्या संकटांत पाडतात. या अन्यायावरून आपण सर्वांच्या परमन्यायी व दयामूर्ती निर्माणकर्त्यास त्यांच्या अघोर दुष्ट आचरणाचा संताप येत नसेल काय ?

**बळवंतराव. प्र०**—आर्यभट्टांच्या सुनाबाळांनीं अशा तऱ्हेचे गर्भपात व बाळहत्या करून आर्यांचा निर्वंश होऊं नये म्हणून त्यांच्या पवित्र मानलेल्या वेदांत कोणत्याच ठिकाणीं त्याविषयीं विधिनिषेध केला नाहीं काय ?

**जोतीराव. उ०**—आर्यांच्या पवित्र वेदांमध्यें स्त्रियांचा पुरुषांबरोबर द्वितीय संबंध घडूं नये असें कोठें लिहिलेलें मुळींच आढळत नाहीं. यास्तव गर्भपात व बाळहत्येविषयीं त्यांच्यामध्यें विधिनिषेध कोठून असणार ? परंतु वेदांच्या कारकीर्दींत एका आर्यांचा बंधू मेल्याबरोबर तो आपल्या भाउजयीस पुनर्विवाहासंबंधी कांहींच विधी न करितां त्याजला संतान होण्याच्या निमित्तानें त्याजबरोबर आपल्या स्वस्त्रीसारखी मजा मारीत असे. यावरून आतांच्या धूर्त भट ब्राह्मणांसारखे त्यांच्यात गर्भपात व बाळहत्या होत नसतील, असें अनुमान करितां येईल.

**बळवंतराव. प्र०**—स्त्रियांची जात अबला ती कशावरून ?

**जोतीराव. उ०**—आपणा सर्वांचें ती सतत रात्रंदिवस नऊ महिने उदरीं ओझें वागवीत असतां तिजला कोणत्याच लोभी पुरुषासारखे छक्केपंजे करून धाडसपणा करितां येत नाहीं, यावरूनच स्त्रियांना अबला असें म्हणतात.

**बळवंतराव. प्र०**—असें करण्याचा परिणाम काय होतो ?

**जोतीराव. उ०**—यावरून एकंदर सर्व जगांत प्रथम पुरुषांच्या अत्यंत लोभामुळें हेवा, द्वेष, कृत्रिम वगैरे नाना प्रकारचे दुर्गुण उत्पन्न होऊन सर्व प्रकारचीं पातकें उदयास आलीं.

**बळवंतराव. प्र०**—तर मग एकंदर सर्व जगांतील मानवप्राण्यांस आपल्या पाप-पुण्याचा झाडा द्यावा लागत नाहीं काय ?

**जोतीराव. उ०**—एकंदर सर्व जगांतील मानवप्राणी आपल्या पापपुण्यानुरूप इहलोकींच प्रत्यक्ष झाडा देऊन आपल्या पुढील वाढणाऱ्या सर्व संततीरूप वृक्षांस पाणी घालितात किंवा मारून टाकितात. अशा प्रकारें त्यांच्यावर किंवा त्यांच्या संततीवर त्या पापाचा किंवा पुण्याचा परिणाम होतो, ह्यावरून ईश्वरानें परलोक हा प्रत्यक्ष इहलोकींच निर्माण केला आहे.

**बळवंतराव. प्र०**—तर याविषयीं कृपा करून आपण कांहीं पुरुषांच्या अत्यंत लोभाविषयीं उदाहरणें दिल्यास माझी व इतर सज्जन लोकांची खात्री होईल.

**जोतीराव. उ०**—कित्येक व्यसनी पुरुष स्वस्त्रीशीं प्रतारणा करून जास्ती सुखी होण्याकरितां लोभानें तिच्या उरावर दोन-दोन, तीन-तीन लग्नाच्या बायका करितात, आणि त्यांजबरोबर रात्रंदिवस आपल्या मनःकामना तृप्त करण्याचे छंदांत पडतात. यामुळें पहिल्या स्त्रीच्या मनांत हेवा उत्पन्न होऊन ती त्यांचा मनापासून द्वेष करूं लागते. यास्तव प्रथम कुटुंबांमध्यें कलह होण्यास पुरुषाचा लोभच मूळ कारण आहे. याखेरीज कित्येक व्यसनी पुरुष स्वस्त्रीशीं दगेबाजी करून ज्यास्ती सुख होण्याकरितां लोभानें तिच्या उरावर अनेक लग्नाच्या बायका करितात आणि त्यांजबरोबर रात्रंदिवस आपल्या मनःकामना तृप्त करण्याचे नादांत पडल्यामुळें पुरुषांमध्यें नाना प्रकारचे घाणेरडे रोग निर्माण होऊन ते एकंदर सर्व जगांत पसरले आहेत. त्याचप्रमाणें कितीएक व्यसनी पुरुष मदोन्मत्त होऊन रजस्वला असलेल्या स्त्रियांबरोबर आपल्या मनःकामना तृप्त करितात, यामुळेंच त्या उभयतां स्त्रीपुरुषांस महाव्याधी उद्भवतात. इतकेंच नव्हे ! परंतु त्यांच्या संततींतसुद्धां तोच महारोग कांहीं काळापर्यंत वास केल्याशिवाय रहात नाहीं.

**बळवंतराव. प्र०**—आपण पूर्वी ह्मणालांत कीं, एकंदर सर्व स्त्रियांस मानवी हक्क समजूं देऊं नये, या इराद्यानें लोभी पुरुषांनीं त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला यामुळें स्त्रियांवर अनेक जुलमी प्रसंग येऊन गुदरले, त्यांपैकीं नमुन्याकरितां एखादें उदाहरण द्याल, तर बरें होईल ?

**जोतीराव.** उ०—साठसत्तर वर्षांच्या जरजर झालेल्या बोथऱ्या खल्लड जरठांशीं आर्य भट्टांनीं पूर्वीं लग्न लाविलेल्या स्त्रिया मरतांच त्यांनीं लावण्यवती अशा अज्ञानी मुलींबरोबर पुनः संबंध करून, त्या अबलांचे तारुण्यांत माती कालवितात. परंतु बालपणीं वैधव्य आलेल्या अज्ञानी मुलीनें मात्र पुनः द्वितीय संबंध करूं नये म्हणून कडेकोट प्रतिबंध करून प्रचारांत आणिला आहे व याचे परिणाम खालीं लिहिल्याप्रमाणें होतातः—पवित्रतेचा पोकळ आव घालणाऱ्या अतिनिर्लज्ज आर्य, आपल्यांतील अबला व पंगू भावजया व सुना तारुण्याच्या भरांत आल्याबरोबर, त्यांचा रात्रंदिवस पाठलाग इतका करितात कीं, त्यांची सहजच आडमार्गीं पाऊलें पडतात. असें झालें म्हणजे त्यांस अब्रूकरितां नाइलाज होऊन गर्भपात करून बाळहत्या कराव्या लागतात. यावरून धूर्त आर्य भट्ट जातीमध्यें किती गर्भपात व बाळहत्या होत असतील, याविषयीं तुमच्यानें खास अनुमान करून सांगवेल काय ?

**बळवंतराव.** प्र०—या अघोर पापाचें अनुमान करून माझ्यानें सांगवणार नाहीं. परंतु ही पक्षपाती वहिवाट आर्य लोकांनीं आजपावेतों आपल्या जातीमध्यें कशी चालू ठेवली ? कारण ही नेहमीं चालू ठेविल्यानें धूर्त आर्यभट्ट जातीचा आपोआप निर्वंश होऊन लयास जाईल; यास्तव ही दुष्ट चाल ते आपल्यांतून कां काढून टाकीत नाहींत ?

**जोतीराव.** उ०—ह्याचें कारण, स्त्री जातीस नीच मानण्याचा त्यांचा प्रघात पडल्यामुळें व त्यांस अनेक धूर्त व कावेबाज ऋषींनीं केलेल्या संहिता, स्मृत्या वगैरे बळकट आधार मिळाल्यामुळें त्यांनीं आजपावेतों ही दुष्ट चाल चालू ठेविली आहे. यास्तव तुह्मीच विचार करा कीं, आर्य ब्राह्मणांनीं ही दुष्ट चाल प्रचारांत आणल्यामुळें भोळसर अज्ञानी कुळवाडी, सोनार वगैरे जातींतील लोकांनीं त्यांचा कित्ता घेतल्यामुळें, ते भट्टांप्रमाणेंच आपल्या सुनाबाळांस त्याच प्रकारच्या संकटांत पाडतात. या अन्यायावरून आपण सर्वांच्या परमन्यायी व दयामूर्ती निर्माणकर्त्यास त्यांच्या अघोर दुष्ट आचरणाचा संताप येत नसेल काय ?

**बळवंतराव.** प्र०—आर्यभट्टांच्या सुनाबाळांनीं अशा तऱ्हेचे गर्भपात व बाळहत्या करून आर्यांचा निर्वंश होऊं नये म्हणून त्यांच्या पवित्र मानलेल्या वेदांत कोणत्याच ठिकाणीं त्याविषयीं विधिनिषेध केला नाहीं काय ?

**जोतीराव.** उ०—आर्यांच्या पवित्र वेदांमध्यें स्त्रियांचा पुरुषांबरोबर द्वितीय संबंध घडूं नये असें कोठें लिहिलेलें मुळींच आढळत नाहीं. यास्तव गर्भपात व बाळहत्येविषयीं त्यांच्यामध्यें विधिनिषेध कोठून असणार ? परंतु वेदांच्या कारकीर्दींत एका आर्याचा बंधू मेल्याबरोबर तो आपल्या भाउजयीस पुनर्विवाहासंबंधी कांहींच विधी न करितां त्याजला संतान होण्याच्या निमित्तानें त्याजबरोबर आपल्या स्वस्त्रीसारखी मजा मारीत असे. यावरून आतांच्या धूर्त भट ब्राह्मणांसारखे त्यांच्यात गर्भपात व बाळहत्या होत नसतील, असें अनुमान करितां येईल.

# पाप

**मानाजी बोल्‌जी पाटील. प्र०**—पापाचरण करून एकंदर सर्व मानवी प्राणी दुःखांत पडूं नयेत, म्हणून मानवांच्या बचावासाठीं आपल्या निर्मीकानें त्यांस कांहीं साधन दिलें नाहीं काय ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—असें कसें होईल ? कारण आपला निर्माणकर्ता सर्वज्ञ असून दयानिधी असल्यामुळें त्यानें आपण मानवांस उत्पन्न करण्याच्या पूर्वींच त्यांच्या बचावांविषयीं सर्व व्यवस्था करून ठेविली आहे; इतकेंच नाहीं तर ती उत्तम प्रकारेंही करून ठेविली आहे.

**मानाजी. प्र०**—तर मग कांहीं पुरुषांचे ठिकाणीं जास्ती स्त्रिया असाव्यात अशा प्रकारचा लोभ कसा उत्पन्न झाला ? निर्मीकानें योजून ठेविलेल्या साधनांपासून त्यांनीं आपला बचाव कसा करून घेतला नाहीं ?

**जोतीराव. उ०**—"आपल्यावरून जग ओळखावें" ही जगप्रसिद्ध म्हण आपणांस ठाऊक असलेच. यास्तव **लोभानें ज्याचें चित्त आकृष्ट झालें आहे अशा मनुष्यांनीं** ईश्वरानें दिलेल्या **सद्सद्विचाररूपी** गुणांचा अव्हेर केल्यामुळें ते पुरुष पापी झाले, यास्तव त्यांस अनेक प्रायश्चित्तें भोगावीं लागतात.

**मानाजी. प्र०**—आपण या प्रसंगीं जें कांहीं प्रतिपादन केलें, त्याविषयीं मी कांहींच समजलों नाहीं, यास्तव त्याविषयीं मला चांगला उलगडा करून सांगाल, तर फार बरें होईल.

**जोतीराव. उ०**—कांहीं लोभी पुरुष आपल्यास ज्यास्ती सुख व्हावें; अथवा आपल्या **मनःकामना** ज्यास्ती पूर्ण व्हाव्या, यासाठीं एका घरांत दोन–दोन, तीन–तीन लग्नाच्या बायका करून नांदतात व त्याविषयीं आपण, कांहीं **हेकड पुरुषांनीं** केलेल्या धर्मग्रंथांचा आधारहि दाखवितात. त्याचप्रमाणें जर कांहीं स्त्रियांनीं आपल्या **मनःकामना** तृप्त करण्याकरितां दोन–दोन, तीन–तीन लग्नाचे नवरे करून **एका घरांत नांदूं लागल्यास** आपणा सर्व पुरुषांस याविषयीं कांहीं विधिनिषेध वाटणार नाहीं काय ?

**मानाजी. प्र०**—स्त्रियांनीं तसें जगाविरुद्ध घाणेरडें वर्तन केल्यास त्यांस फार अघोर प्रायश्चित्त दिलें पाहिजे.

**जोतीराव. उ०**—तुह्मास जर स्त्रियांचें तसें आचरण आवडणार नाहीं, तर आपणां सर्व पुरुषांचें त्याच मासल्याचें आचरण स्त्रियांस तरी कसें आवडेल ? कारण स्त्री आणि पुरुष एकसारखे एकंदर सर्व **मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असतां** स्त्रियांस एक तऱ्हेचा नियम लागू करणें व लोभी धाडस पुरुषांस दुसरा नियम लागू करणें, हा **निवळ पक्षपात** होय. उदाहरण "स्त्रियांचें तें पुरुषांचें आणि पुरुषांचें तें हुं हुं." त्याचप्रमाणें कांहीं धाडसी पुरुषांनीं आपल्या जातीच्या **स्वार्थासाठीं बनावट मतलबी** धर्मपुस्तकांत स्त्रियांविषयीं असे अपमतलबी लेख करून ठेविले आहेत.

**मानाजी.** प्र०—कृपा करून अशा तऱ्हेचे दुसरे विषय सर्वांच्या मनांत चांगले बिंबावे ह्मणून कांहीं सर्वोत्तम आणि सर्वमान्य उदाहरणें दिल्यास आपले सर्वांवर मोठे उपकार होतील.

**जोतीराव.** उ०—आर्यभट्ट ब्राह्मणांच्या धर्मांतील राजद्रोही, फितुरी, व्यभिचारी, लाचखाऊ, बनावट कागद करणारे, तबलजी वगैरे लोकांस कां होईना, शूद्रादि अतिशूद्रांनीं नीच मानून त्यांचा स्पर्शसुद्धां होऊं देऊं नये, म्हणून निश्चय करून तो प्रचारांत आणल्यास एका तरी आर्य भट्टास गोड वाटेल काय ?

**मानाजी.** उ०—तसें केल्यानें एकाहि आर्य भट्टास आवडणार नाहीं.

**जोतीराव.** प्र०—त्याचप्रमाणें शूद्रादि अतिशूद्रांनीं **धर्ममिषानें** एकंदर सर्व आर्य भट्ट ब्राह्मणांच्या पगड्यांसह त्यांचें सर्वस्व **हिरावून** घेऊं लागल्यास एकातरी अहंब्रह्म संन्यासी झालेल्या ब्राह्मणास गोड वाटेल काय ?

**मानाजी.** उ०—नाहीं. तसें करणें त्या आर्य भट्ट संन्याशासमुद्धां गोड वाटणार नाहीं, तर मग संसारामध्यें निमग्न झालेल्या ब्राह्मणांस तें कोठून आवडणार ?

**जोतीराव.** प्र०—आर्यभट्टासारखें दुसऱ्या कल्पित शेषशायीच्या बेंबटांतून निघालेल्या ब्रह्मदेवानें ताडपत्रावर लिहिलेल्या ग्रंथाधारावरून एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांनीं आपल्या **पायाचें स्वच्छ निर्मळ तीर्थ** मानवद्वेष्ट्या भट्ट ब्राह्मणांस पाजून त्यांजपासून सिधे व दक्षिणा घेऊं लागल्यास एका तरी आर्यभट्ट दासीपुत्रास बरें वाटेल काय ?

**मानाजी.** उ०—तसें करणें एकाही आर्यभट्ट दासीपुत्रास आवडणार नाहीं.

**जोतीराव.** प्र०—शूद्रादि अतिशूद्रांनीं धूर्त आर्य ब्राह्मणांसारखे, आपल्या मनास वाटेल तसे, ईश्वराच्या नांवानें कल्पित नवीन ग्रंथ रचून त्या ग्रंथांतील एक शब्दसुद्धां एकाहि आर्यभट्ट ब्राह्मणास ऐकूं न देतां एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांनीं आर्यभट्ट ब्राह्मणांस आपले **पिढीजादा** दास करून त्यांस आपली **सेवाचाकरी करावयास** जर लाविलें, तर एका गोळकभट्टास तरी तें आवडेल काय ?

**मानाजी.** उ०—तसें करणें एकाही **खर्चीं** गोळकभट्टास तें आवडणार नाहीं, तर मग ब्राह्मण म्हणविणाऱ्या खाशास कोठून ?

**जोतीराव.** प्र०—एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांची सदरची ही वर्तणूक जर एखाद्या नीच **ब्राह्मणासमुद्धां** आवडणार नाहीं, तर तशाच प्रकारची **मनुसंहितेंतील** शूद्रांविषयीं आर्यभट्ट ब्राह्मणांची नीच वर्तणूक शूद्रांतील साधूसंतांस व राजेरजवाड्यांस कशी आवडेल ? यालाच "आपल्यावरून जग ओळखणें" असें म्हणावें. आर्यभट्ट ब्राह्मणांच्या ग्रंथांमध्यें ब्राह्मणांचें शूद्रापासून घ्यावयाचें माप एक आणि ब्राह्मणांनीं शूद्रादि अतिशूद्रांस द्यावयाचें माप एक. या कारणांवरून धूर्त **विद्वान** आर्यब्राह्मण आणि अक्षरशून्य शूद्रादि अतिशूद्र या उभयतां मानव बंधूमध्यें स्नेह होऊन धर्म वगैरेसंबंधीं एकी कशी होऊं शकेल ? याखेरीज आर्यभट्टांनीं शूद्रादि अतिशूद्रांस विद्या शिकण्याचें

बंद केलें, व आपलें वर्चस्व होण्याकरितां बुध्या स्वकपोलकल्पित भारतरामायणासारखे ग्रंथ रचले आणि बगळ्यापरी मोठा धार्मीकाचा आव घालून त्यांतील भाकड दंतकथा रात्रंदिवस अज्ञानी व भोळसर शूद्रादि अतिशूद्रांस सांगून त्यांचीं मनें पवित्र मुसलमान व क्रिश्चीयन राज्याविषयीं कुत्सित करून त्यांजकडून त्यांच्याशीं मोठमोठ्या तुंबळ लढाया करवून आपण एकाद्या पिंडींतील लिंगापुढें स्वस्थ बिनघोर लटकेच जप अनुष्ठान करूं लागले. यामुळें या देशांत शूद्रादि अतिशूद्रांसह मुसलमान व खिस्ती लोकांचा अनेक वेळां खप झाल्यामुळें आज काळपर्यंत अतिशयित अघोर पापें घडून येत आहेत.

## पुण्य

**बळवंतराव हरी साकवळकर.** प्र०—पुण्य कशास म्हणावें ?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—स्वतःस मात्र सुख होण्याकरितां एकंदर सर्व मानवी प्राण्यांस कायीक व मानसिक पिडा दिली नाहीं, म्हणजे त्यासच पुण्य म्हणावें.

**बळवंतराव** प्र०—तें कसें ? त्याविषयीं आम्हांस उघड रीतीनें समजावून दिल्यास बरें होईल.

**जोतीराव.** प्र०—स्वतः सुख भोगण्याकरितां दुसऱ्यानें जर तुम्हांस पीडा देऊन तुम्हांजवळची एखादी वस्तु **धर्ममिषानें फसवून** अथवा जबरीनें घेऊन तिचा उपभोग तो तुमच्या समक्ष करूं लागला, तर तसें त्याचें आचरण तुह्मास आवडेल काय ?

**बळवंतराव.** उ०—त्याचें तें करणें मला तर काय, परंतु या जगांतील कोणत्याहि मनुष्यास आवडणार नाहीं.

**जोतीराव.** प्र०—तर यावरून इतर मानवी प्राण्यांची एखादी वस्तु त्यांस **धर्ममिषानें** फसवून अथवा जबरीनें घेऊन तिचा उपभोग त्यांच्यासमक्ष घेण्यास आपणांस कांहीं अधिकार पोहोंचतो काय ?

**बळवंतराव.** उ०— तसें करण्यास आपल्यास कोणत्याहि तऱ्हेचा अधिकार पोहोंचत नाहीं. व याविषयीं भूदेव आर्यांच्या शास्त्रांतसुद्धां असा सिद्धांत आहे कीं, "परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्."

**जोतीराव.** प्र०—असा जर तुमच्या शास्त्रांचा सिद्धांत आहे, तर तुमचे **आर्यभट्टजी** (भूदेव) आपल्या ग्रंथांसह निवळ विटाळशी स्त्रीसारखें सोवळें होऊन खिस्ती मुसलमानांसह शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानून त्यांचें सर्व प्रकारचें नुकसान करितात हें कसें ?

**बळवंतराव.** प्र०—याविषयीं आपण कांहीं सार्वजनिक उदाहरणें दिल्यास जनांचें हित होणार आहे.

**जोतीराव.** उ०—पहिलें :—आर्य लोक आपल्या **स्वार्थासाठीं** खिस्ती लोकांबरोबर त्यांच्या टेबलावर उघड बसून मद्यमांसावर ताव मारितात; आणि घरीं गेल्याबरोबर **सोंवळे** होऊन त्यांच्या पवित्र खिस्ती धर्माची निंदा करून अज्ञानी जनांचीं त्याविषयीं

मनें कुत्सित करतात. दुसरें :- आंतून तारुण्याच्या मदामुळें मस्तानी स्त्रीसारख्या वेश्येबरोबर स्वस्त्रीपेक्षांहि अधिक व्यवहार करून बाहेर पडल्याबरोबर अट्टल सोंवळे बनून पवित्र मुसल्मानी धर्माची निंदा करितात; व त्यांस आपल्या आडांतील पाण्याससुद्धां स्पर्श न करूं देतां इतर अज्ञानी जनांचीं मनें त्यांजविषयीं भ्रष्ट करून त्यांस मुसलमानांचा द्वेष करावयास शिकवितात. तिसरें :- अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या निढळाच्या घामाच्या पैशावर पर्वतीसारखीं देवालयें उपस्थित करून त्यांत आपण सोंवळे होऊन यथेच्छ पक्वान्नांची झोड उडवितात-परंतु कर देणाऱ्या भुभुक्षित शुद्रादि अतिशुद्रांस ज्वारीबाजरीचा शिळा उरलेला घांसभरसुद्धां अन्नाचा तुकडा देत नाहींत. आणि घरीं आल्यावर शिंदे, होळकर, गायकवाडासारख्या कुलीन शुद्रांतील राजेराजवाड्यांचा स्पर्श न होऊं देतां त्यांस पशूवत् नीच मानून, आपल्या श्रेष्ठ जातीचा तोरा मिरवितात.

## जातिभेद

**यशवंत जोतीराव फुले. प्र०**—मानवी प्राण्यांत जातिभेद आहे किंवा नाहीं ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—मानवी प्राण्यांत मूळ जातिभेद नाहीं.

**यशवंत. प्र०**—मानवी प्राण्यांत मूळ जातिभेद कसा नाहीं ?

**जोतीराव. उ०**—पशुपक्षी वगैरे प्रत्येक प्राण्यांत जर जातिभेद नाहीं, तर मानवी प्राण्यांतच जातिभेद कोठून असणार ?

**यशवंत. प्र०**—मानवी प्राण्यांत मूळ जर जातिभेद नाहीं, तर याविषयीं चांगला उलगडा करून सांगाल, तर बरें होईल.

**जोतीराव. प्र०**—पशु, पक्षी वगैरे अवयवांमध्यें एकमेकांपासून सर्व भिन्न भिन्न आहेत. त्याप्रमाणें द्विपाद मानवी प्राणी अवयवांमध्यें चतुष्पाद वगैरे प्राण्यांपासून भिन्न आहेत, यास्तव आर्य ब्रह्माजीनें फक्त आपल्या अवयवांपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार जाति उत्पन्न केल्या आहेत, तर मानवतेवर गर्दभ, काक, जंबुक वगैरे प्राणीमात्रांत ब्राह्मण कोणते आहेत, हें मला तुह्मी दाखवूं शकाल काय ?

**यशवंत. उ०**—जंबुक, काक वगैरे मानवतेवर प्राणीमात्रांत ब्राह्मण कोणास ह्मणावें असें सिद्ध करितां येणार नाहीं. कारण आर्य ब्रह्मऋषींसारखेसुद्धां पूर्वीं उघड रीतीनें मांसाहारी होते. यावरून पशूपक्ष्यांदिकांत जातिभेद आहे, ह्मणून सिद्ध करितां येत नाहीं. फक्त मानव प्राण्यांत ब्रह्माजीच्या अवयवांपासून चार जाति मात्र झाल्या आहेत, म्हणून त्यांच्या ग्रंथांतरीं आहे.

**जोतीराव. प्र०**—तर मग पशुपक्षी, गर्दभ वगैरे सर्व प्रकारचे प्राणीमात्र चतुराननाच्या कोणत्या अवयवापासून झाले आहेत ?

**यशवंत. उ०**—हें सर्व आम्ही आर्यभट्टांच्या ग्रंथाधारावरून बोलतों.

**जोतीराव.** प्र०—आर्यभट्टांचे ग्रंथ आपण स्वतः वाचून पाहून त्याविषयीं तुह्मी पक्का शोध केला आहे काय ?

**यशवंत** उ०—नाहीं. कारण आर्यभट्ट ब्राह्मण ते ग्रंथ आमच्या दृष्टीससुद्धां पडूं देत नाहींत; व आह्मीं जर ते ग्रंथ ऐकण्याविषयीं इच्छा दर्शविली, तर आर्यभट्ट ब्राह्मण ते ग्रंथ आह्मास ऐकूंसुद्धां देत नाहींत.

**जोतीराव.** उ०—तर केवळ भट्ट ब्राह्मणांच्या ग्रंथांविषयीं आपण पक्का शोध केल्या-वांचून फक्त त्यांच्या तोंडाच्या थापांवरून जातीभेदाचें थोतांड आपण अंधासारिखें डोळे झांकून कां मानितां ? हा तुमचा शूद्रांचा शुद्ध वेडेपणा होय.

**यशवंत.** प्र०—ब्राह्मण ते ब्राह्मण; आणि शूद्र ते शूद्र; किती जरी आपण केलें तरी शूद्रांचे ब्राह्मण कसे होऊं शकतील ? त्याचप्रमाणें ब्राह्मणांचे शूद्र कसे होऊं शकतील ?

**जोतीराव.** उ०—कां, आर्यब्राह्मणांचे शूद्र जर होऊं शकत नाहींत, तर महामुनी खिस्ताचार्यांच्या बंगल्यांत हे भूदेव आर्यब्राह्मण अतिशूद्र मांगमहार वगैरे लोकांच्या पंक्तीस बसून मद्यपान कां करितात; व पाव बिस्कुटें कां खातात ? याशिवाय ते म्लेंच्छादि अतिशूद्रांच्या मुलीबरोबर विवाह करून आपला संसार करीत नाहींत काय ? यावरून "ब्राह्मणः सर्वत्र पूज्यः" ह्या वाक्याला प्रथम तुम्ही हरताळ लावा, म्हणजे झालें.

**यशवंत.** प्र०—तर यावरून आपल्या या दुर्दैवी बलिस्थानांत जगविरुद्ध धनगर, माळी, कुळंबी वगैरे अनेक जाती आहेत, त्या सर्व खोट्या आहेत काय ?

**जोतीराव.** उ०—हें सर्व ह्मणणें विचारांतीं खोटें ठरेल, असें मला वाटतें. जसें, कोणी एका पुरुषास तीन मुलें आहेत व त्यांपैकीं एक मुलानें मेंढरें राखण्यामध्यें आपला सर्व जन्म घालविला, दुसऱ्यानें मळ्यामध्यें झाडांची लावणी करून त्यांस खुरपण्यामध्यें आपला सर्व काळ घालविला आणि तिसऱ्यानें शेत नांगरून त्यामध्यें पेरणी, काढणी वगैरे तत्संबंधीं कामें करण्यांत आपलें सर्व आयुष्य घालविलें, तर यावरून आपण त्याच्या (पहिल्या मुलाची धनगराची, दुसऱ्याची माळ्याची व तिसऱ्याची कुळंब्याची) अशा प्रकारच्या तिघांच्या तीन जाती आहेत, असें ठरवाल काय ?

**यशवंत.** उ०—तसें कसें ठरवितां येईल ?

**जोतीराव.** प्र०—त्याजप्रमाणें एका आर्यभट्टास तीन मुलें असून त्यांपैकीं एका मुलानें निर्वाहाकरितां तबलजीचा धंदा करण्यामध्यें आपला सर्व जन्म घालविला, दुसऱ्यानें निर्वाहाकरितां वैद्याचा (डॉक्टरीचा) धंदा करून सर्व लोकांस औषध देऊन, जातीचा विधिनिषेध न पाळितां, कांहीं लोकांचीं प्रेतें फाडण्यामध्यें आपला सर्व जन्म घालविला, आणि तिसऱ्यानें पोटासाठीं घरोघर स्वैंपाकी आचाऱ्याचा धंदा करण्यामध्यें आपला सर्व जन्म घालविला, तर यावरून आपण त्याच्या पहिल्या मुलाची गुरवाची जात आहे, दुसऱ्याची वैदूची जात, व तिसऱ्याची आचाऱ्याची जात, असें ठरवाल काय ?

**यशवंत.** उ०—आपण म्हणतां त्याप्रमाणें ठरवितां येणार नाहीं. परंतु या तुमच्या सिद्धांतावरून हालालखोरणीची तरी जात नीच आहे, कीं नाहीं बरें? कारण ती सर्वकाळ अति अमंगळ धंदा करिते.

**जोतीराव.** प्र०—तर यावरून आपल्या उभयतांच्या बालपणीं आपला गुमूत करण्याचें नीच काम आपल्या उभयतांच्या मातुश्रीनें केलें, यास्तव त्यांजला हालालखोरणीसारखें नीच ठरवितां येईल काय?

**यशवंत.** उ०—आपल्या उभयतांच्या मातुश्रींनीं बालपणीं आपला गुमूत काढल्यामुळें त्यांजला नीच कोणाच्यानें म्हणवेल? असा निर्दय कृतघ्न या पृथ्वीच्या पृष्ठभागावर मला तर कोणीही सांपडणार नाहीं; परंतु मानव प्राण्यांत त्यांच्या गुणांवरून जातिभेद ठरवितां येणार नाहीं काय? याविषयीं तुमचें कसें काय मत आहे?

**जोतीराव.** उ०—मानव प्राण्यांत त्यांच्या गुणांवरून जातिभेद ठरवितां येणार नाहीं. कारण मानवांपैकीं कित्येक आपल्या मुलांस सुशिक्षण देतात व तीं स्वभावेंकरून कुशाग्रबुद्धिचीं असल्यामुळें, सद्गुणी व हुशार निवडून मोठमोठे हुद्दे चालिवण्यालायक होतात व कांहीं लोक आपल्या मुलास सुशिक्षण देण्याकरितां अतिशय परिश्रम जरी करितात, तरी तीं स्वभावेंवरून जड बुद्धिचीं असल्यामुळें मूर्ख व दुर्गुणी निवडून तीं हरतऱ्हेचें नीच काम करण्यास प्रवृत्त होतात. यावरून सद्गुण व दुर्गुण हे कांहीं पिढीजादा स्वभाव नाहींत. कारण सद्गुणी ब्रहस्पतिसारख्या मानवांचीं मुलें स्वभावानें कधीं कधीं सद्गुणी निपजत नाहींत. त्याचप्रमाणें धूर्त आर्य भट्टांचीं मुलें नेहमीं शंकराचार्यांच्या तोलाचीं सद्गुणी निजपत नाहींत. ह्यावरून अतिशुद्र चांभारांचीं मुलें सद्गुणी निवडल्यास शंकराचार्यांच्या तोलाचे महामुनि होणार नाहींत, असें न्यायी पुरुषाच्यानें म्हणवणार नाहीं.

**यशवंत.** प्र०—तर यावरून या दुर्दैवी बलिस्थानांत जगविरुद्ध दुष्ट भेदाभेद होऊन ब्राह्मण व मांगमहार यांच्यामध्यें जाति कशा झाल्या, याविषयीं आपणच चांगला उल्लेख केल्यास फार बरें होणार आहे.

**जोतीराव.** उ०—एकंदर सर्व **बलिस्थानांतील क्षत्रिय म्हणजे क्षेत्रांचे मूळ मालक** अस्तिक, पिशाच, राक्षस, अहिर, किकाटस, भिल्ल, कोळी, मांग, महार वगैरे लोक पूर्वी आडहत्यारानें लढण्यामध्यें मोठे कुशल असून शूर व प्रतापी होते. त्याचप्रमाणें ते आनंदांत मग्न असून सर्व सुखाचा योग्य उपभोग घेत होते. त्यांतून बहुतेकांचीं राज्यें भरभराटीस येऊन त्यांच्या एकंदर सर्व देशांत सोन्याचा धूर निघत होता. इतक्यांत इराणी लोकांत म्हणजे आर्य लोकांत धनुष्यानें बाण मारण्याची नवीन युक्ति निघतांच तेथील कांहीं भुमुक्षित असलेल्या **धाडस, दंगेखोर, सुवर्णलोभी,** इराणी ब्राह्मणांनीं, इराणी क्षत्रियांनीं व इराणी वैश्यांनीं एकत्र होऊन या बलिस्थानास सुवर्णासाठीं अनेक वेळां स्वाऱ्या करून येथील मूळच्या सुशील क्षेत्रस्थांस अनेक वेळां त्रास

दिला व अखेरीस त्यांनीं त्यांपैकीं कित्येक शूर लोकांच्या अंगाची कातडीसुद्धां सोलून[1] काढिली. यांविषयीं त्यांच्या लपवून ठेविलेल्या वेदरूपी बखरींत आधार सांपडतो. सारांश, इराण्यांनीं येथील बहुतेक मूळच्या क्षेत्रवासी लोकांस पाताळांत म्हणजे अमेरिकेंत धुडकावून लाविलें व बाकीच्या उरलेल्या क्षेत्रस्थांस धिःकारानें (क्षुद्र) शूद्रादि अतिशूद्र दस्यु (लुटारू) अशीं हलकीं व उपहासास्पद नांवें दिलीं. त्यांस नाना प्रकारचा त्रास देऊन आपले पिढीजादा दासानुदास केलें. अखेरीस त्या सर्व शूद्र जातींचा चवथा वर्ग करून इराणी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीनही वर्गांत तो सामील केला व बलिस्थानांतील मूळच्या क्षत्रियांस म्हणजे शूद्रादि अतिशूद्रांस आर्यांनीं विद्या देण्याचा प्रतिबंध केला. त्याचप्रमाणें आर्यांतील कित्येक पूर्वीच्या धूर्त ऋषींनीं शूद्रादि अतिशूद्रांनीं विद्या शिकूं नये, म्हणून ग्रंथांतरीं कडक नियम करून ठेविले व हल्लीं दगड मातीच्या भिंतीवर स्वार होऊन रेड्यामुखीं वेद बोलविणाऱ्या ज्ञानोबा व शिष्याच्या मुखाचा खलबत्ता करून त्याची परिक्षा पहाणाऱ्या रामदास वगैरे मतलबी आर्यभट्ट साधूसंतांनीं पूर्वी केलेल्या धूर्त ऋषींच्या ग्रंथांवर भारेचे भारे नवीन ग्रंथ करून, त्यामध्यें शूद्रादि अतिशूद्रांस दास केल्याविषयींचे पांचपेच मुद्दाम उघडकीस न आणितां, त्यांस नाना प्रकारच्या धातू दगडांच्या मुर्तीवर भाव ठेवावयास शिकवून, त्यांस कल्पित ब्रह्मघोळयांत ढकलून दिलें. आणि त्याचप्रमाणें धूर्त आर्यांनीं मांगामहाराविषयीं दुष्टाईनें कडेकोट व्यवस्था करून ती प्रचारांत आणिली. यामुळें त्यांच्यामध्यें आजपर्यंत दुष्ट भेदाभेद जसाचा तसाच कायम राहिला. इतकेंही करून आर्यांची तृप्ती न होतां, त्यांनीं आपल्या सर्वांच्या निर्मीकाची कुकूचकू करून, आपणच स्वतः भूदेव आणि अहंब्रह्म बनून इतर अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस ब्रह्मानंदाच्या नादांत वेड्यासारखें टाळ्या वाजवावयास लाविलें.

**यशवंत. प्र०**—एकंदर सर्व अबालवृद्ध ब्राह्मणांची अशी समजूत आहे कीं, आर्य ब्राह्मण मात्र या बलिस्थानांत आहेत, कारण आर्य परशुरामानें जेव्हां बलिस्थानांतील मूळच्या क्षत्रीयांस निःक्षत्रिय केलें, तेव्हांपासून त्यांचे एकंदर सर्व अधिकार नष्ट झाले व तिसरे म्हणून जे आर्य वैश्य होते, ते आपोआप मुळींच नाहींसे झाले. यावरून हल्लीं या बलिस्थानांत ब्राह्म आणि शूद्र नांवाला मात्र उरले आहेत, याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे ?

**जोतीराव. उ०**—आर्य लोकांची ही समजत खरी आहे. कारण इराणांतून आलेल्या आर्य टोळयांपैकीं कांहीं आर्य पशूयज्ञ करण्याचे कामीं चांगले वाकबगार असत; वा धर्मसंबंधीं बाकीचे सर्व विधी चालविणारांस ब्राह्मण म्हणत; कांहीं आर्य शिपायांचा धंदा करीत असत त्यांस क्षत्रिय म्हणत. आणि कांहीं आर्य गुरेंमेंढरें पाळण्याचा धंदा करीत

---

१ त्वचं कृष्णामरंधयत्.

त्यांस वैश्य म्हणत. त्याचप्रमाणें या बलिस्थानांतील एकंदर सर्व मूळच्या रहिवासी लोकांस क्षत्रीय म्हणत असत. प्रथम आर्य ब्राह्मण, आर्य क्षत्रीय आणि आर्य वैश्य अशा तीन प्रकारच्या लोकांनीं एके ठिकाणीं जमून वारंवार या बलिस्थानांत स्वाऱ्या केल्या, तेव्हां येथील एकंदर सर्व बलिस्थानांतील रहिवासी लोकांचें क्षेत्रावरील स्वामित्व नष्ट केलें. नंतर हे तीनहि प्रकारचे इराणी लोक एक विचारानें आपणा सर्वांस फक्त ब्राह्मण असें म्हणवून घेऊं लागले व बलिस्थानांतील एकंदर सर्व पदच्युत केलेल्या क्षेत्रस्थांस धिःकारानें शूद्रादि अतिशूद्र म्हणूं लागले. कारण इराणी लोक आपल्या शिपायांस क्षत्रीय म्हणत. परंतु बलिस्थानांतील लोक एकंदर सर्व प्रजेस क्षत्रिय म्हणत असत. सारांश, क्षत्रिय शब्दाचे मूळ दोन अर्थ होत असल्यामुळें धूर्त आर्यांस अशा तऱ्हेचा गोंधळ कल्पितां आला.

**यशवंत. प्र०**—यावरून आर्य धर्मातील गीतेंत आर्य ब्राह्मणांचे स्वाभाविक गुणांचें केलेलें वर्णन, केवळ अज्ञानी जनांच्या डोळ्यांत माती टाकून त्यांस फसविण्याकरितां तें भारूड रचिलें असावें. उदाहरण :

**शमोदमस्तपःशौचं क्षांतिरार्जवमेव च ॥**
**ज्ञानविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥**

असें जर ह्मणावें तर विजयी धाडस धूर्त आर्यभट्ट ब्राह्मणांनीं पराभव केलेल्या लाचार शूद्रादि अतिशूद्रांस हा काळपावेतों सर्व कामीं हलकें मानून, त्यांचा सर्व काळ तिरस्कार कां करितात व त्यांस एकंदर सर्व मानवी हक्कांचा उपभोग घेण्याच्या कामीं ते स्वतः आडकाठी कां घालतात ? यावरून भंड आर्य लोकांचे अंगीं क्षमेचा गंधसुद्धां नाहीं असें सिद्ध होतें. असो; आपला सर्वांचा निर्माणकर्ता दयेचा सागर व परम न्यायी असतां त्याला सर्वोपरी गांजलेल्या शूद्रादि अतिशूद्रांची कींव कशी आली नाहीं ?

**जोतीराव. उ०**—आपल्या सर्वांच्या दयाघन निर्माणकर्त्यानें कृपाळू होऊन धूर्त आर्य भट्टांच्या दासत्वापासून पंगू शूद्रादि अतिशूद्रांस मुक्त करण्याकरितां, आपण सर्वांचा निर्माणकर्ता एक मानून, जातिभेदाचा समूळ नाश करणारे मुसलमान लोकांस या देशांत पाठविले; परंतु मुसलमान लोकांनीं त्याचे हेतूस धाब्यावर बसवून आपण सर्व प्रकारचें मिष्टान्न खाणें, ख्याली–खुशाली, गाणेंबजावणें वगैरे ऐषआरामांत लंपट झाले व ऐश्वर्याच्या भरांत मदांध होऊन त्यांना दोन बोटें आकाश उरलें होतें. त्यामुळें आपल्या निर्माणकर्त्यास संताप होऊन त्यानें या बलिस्थानांतील मुसलमान लोकांस तोंडघशीं पाडून त्यांचें एकंदर सर्व वैभव नष्ट केलें.

**यशवंत. प्र०**—या देशांतील एकंदर सर्व चैनी मुसल्मानांचें वैभव नष्ट करून आपला सर्वांचा निर्माणकर्ता उगीच कसा बसला ?

**जोतिराव. उ०**—तो उगीच बसला नाहीं. परंतु त्यानें प्रत्यक्ष अतिरानटी दशेपासून

इंग्लिश लोकांस उदयास आणून शौर्यादि गुण त्यांचे अंगीं देऊन, त्यांस पंगु शूद्रादि अतिशुद्रांस धूर्त आर्यभट्टांच्या दासत्वापासून मुक्त करण्याकरतां या देशांत मुद्दाम पाठविलें आहे. त्यांपैकीं कांहीं सज्जन इंग्रज लोक त्यांच्या धर्मातील एका सत्पुरुषाच्या सद्बोधावरून शूद्रादि अतिशूद्रांस आर्य भट्टांच्या कृत्रिमी दासत्वापासून मुक्त करण्याचे कामीं मनःपूर्वक सतत प्रयत्न करीत आहेत.

यशवंत. प्र०—यावरून इंग्लिश लोक आपल्या धर्मांतील ज्या सत्पुरुषाच्या सद्बोधाच्या साह्यानें पंगु शूद्रादि अतिशूद्रांची धूर्त आर्य भट्टांच्या दासत्वापासून सुटका करण्याकरितां झटत आहेत, त्या महासत्पुरुषाचें नांव काय आहे, व त्याविषयीं आम्हांस थोडीशी माहिती कळवाल, तर फार बरें होईल.

जोतीराव. उ०—त्यांच्यांतील महासत्पुरुषाचें नांव यशवंत आहे, व त्याचा सद्बोध येणेंप्रमाणें-"तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीति करा व त्याचें बरें करा."

यशवंत. प्र०—या यशवंत महासत्पुरुषाच्या बोधास मान देऊन भंड धूर्त आर्यभट्टांनीं शूद्रादि अतिशूद्रांस दास करण्याबद्दलचे ग्रंथ एके बाजूला न ठेवितां, जगामध्यें व्यर्थ मूजोरी करूं लागल्यास त्यापासून कोणता अनर्थ होईल, याविषयीं तुम्हीं काय भविष्य करितां?

जोतीराव. उ०—शूद्रादि अतिशुद्रांस दास करण्यासंबंधीं ग्रंथ जर आर्य धूर्त भट्टांनीं समूळ नाहींसे केले नाहींत, तर ईश्वर परमन्यायी असून सर्व समर्थ आहे, यास्तव तोच थोड्या दिवसांत शूद्रादि अतिशूद्रांच्या हातून परस्पर धूर्त आर्यभट्टांचा व त्यांच्या पाखंडी ग्रंथाचा धिःकार करवील, असें मी भविष्य करितों.

यशवंत. प्र०—यावरून वेदाचे कर्ते कोणत्या तऱ्हेचे भले गृहस्थ असावेत, याविषयीं व त्यांच्या चांगुलपणाविषयीं मला थोडा वहीम येतो. यास्तव वेदाविषयीं आपल्यास कांहीं माहिती असल्यास तिचा येथें उल्लेख केल्यास शूद्रादि अतिशूद्रांवर आपले महदुपकार होतील.

जोतीराव. उ०—बृहस्पति या नांवाचा महाविद्वान् शोधक सज्जन या देशांत होता. त्यानें वेदाविरुद्ध जें कांहीं लिहिलें आहे, त्यांतून थोडेसें या प्रसंगीं आपल्या माहिती-करितां देतों. तें असें :

"त्रयो वेदस्य कर्तारो भंड धूर्त निशाचराः"

यशवंत. प्र०—तर या सर्व गोष्टींवरून हल्लींचे आर्य भट्ट ब्राह्मण इंग्रजींत मोठमोठे विद्वान झाले आहेत, व ते मोठमोठ्या सरकारी जोखमीच्या हुद्याच्या जागेचा अधिकार चालविण्यास लायक झाले असून, त्यांच्या पूर्वजांनीं पराजित केलेल्या दीन शूद्रादि अतिशूद्रांच्या जन्मांतराचें मातेरें करून त्यांच्यांत जो सर्वस्व ब्रह्मघोळ करून टाकिला आहे, तो समूळ नाहींसा करण्याविषयीं प्रयत्न कां करीत नाहींत? अथवा सर्वांचा

निर्माणकर्ता तळहातावर मेखा सोसणाऱ्या धूर्त आर्यांचें बरें होण्याकरितां, ह्याविषयीं त्यांच्या डोळ्यावरील पडदा काढून त्यांस दोषमुक्त करून त्यांजला मार्गावर कां आणीत नाहींत ?

**जोतीराव. उ०**—एकंदर सर्व सृष्टीक्रमावरून असें सिद्ध होतें कीं, आर्यांच्या ऋषीवर्य पूर्वजांनीं केलेल्या नीच कर्मांचीं फळें जरी त्यांस भोगावी लागलीं नाहींत, तरी त्यांच्या दुष्टकर्मांच्या अनुमानाप्रमाणें त्यांच्या संतानांस तरी तीं निःसंशय भोगावीं लागतील. यावरून हल्लींचे विद्वान आर्य ब्राह्मण शुद्धीवर येऊन त्याविषयीं त्यांचे कधींच डोळे उघडणार नाहींत. ते आपल्यावरील पुढें येणारीं आरिष्टें टाळण्याकरितां धर्म व राजकीय-संबंधीं अनेक प्रकारचे थोतांडी समाज उपस्थित करून, त्यांमध्यें अज्ञानी जनांच्या व सरकारच्या डोळ्यांत माती टाकण्याकरितां नाना प्रकारच्या युक्त्या लढवितील; परंतु त्या त्यांच्या कल्पित युक्त्या शेवटीं फूस होतील. कारण आपणां सर्वांचा महापवित्र निर्माण-कर्त्ता आर्य ब्राह्मणांच्या कल्पित काळ्या कृष्णासारखा दह्यादुधाच्या चोऱ्यामाऱ्या करून सोळा सहस्र एकशत अष्ट नारींसह गवळ्याच्या भकलेल्या राधेबरोबर लंपट होऊन त्यांच्या उष्टापायथ्याशीं लोळत पडणारा नव्हे.

## पशुपक्ष्यादि वगैरे आणि मानवप्राणी यांजमध्यें भेद

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—निर्माणकर्त्यानें पशुपक्ष्यादि वगैरे आणि मानव-प्राणी यांजमध्यें कांहीं भेद केला आहे काय ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—निर्मीकानें पशुपक्ष्यांदि वगैरे प्राण्यांस एक स्वाभा-वीक खोड दिली आहे. ती जशीची तशीच नेहमीं कायम राहून तिच्या योगानें त्यांच्यानें आपल्यांमध्यें तिळप्राय सुधारणा करून घेतां येत नाहीं, परंतु निर्मीकानें मानव प्राण्यांस सारासार विचार करण्याची बुद्धि दिली आहे, तिच्या योगानें कालेंकरून ते आपल्या-मध्यें ज्यास्ति ज्यास्ति सुधारणा करूं शकतात.

**बळवंत. प्र०**—खोड आणि बुद्धि याविषयीं आपण प्रतिपादन जरी केलें, तरी मला त्याविषयीं कांहीं चांगला बोध झाला नाहीं. यास्तव त्याविषयीं सविस्तर स्पष्टीकरण करून सांगाल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—हजारों वर्षांपूर्वीं पाकोळी नांवाच्या पक्ष्यांनीं बांधलेली कोठीं व त्यांनीं हल्लीं नवीन बांधलेलीं कोठीं यांमध्यें तिलप्राय सुधारणा झालेली दिसून येत नाहीं. यावरून निर्मीकानें पशुपक्ष्यादि इतर प्राण्यास मानवासारखी सारासार विचार करण्याची बुद्धि मुळींच दिली नाहीं, परंतु त्याचप्रमाणें हजारों वर्षांच्या पूर्वीं झाडांच्या ढोलींत राहून निर्वाह करणारे व गुडघेमेटी येऊन हात टेंकून जनावरांसारखे पाणी पिणारे मानव प्राणी व हल्लींच्या सुधारलेल्या काळांत मोठमोठ्या हवेल्यांत वास करून लोडाशीं टेंकून रुप्याच्या पंचपात्रीनें पाणी पिऊन मजा मारीत असलेले मानवप्राणी, या दोहोंची साम्यता होऊं शकेल काय ? यावरून निर्मीकानें मानव प्राण्यांस जी कांहीं अत्युत्तम

सारासार विचार करण्याची बुद्धि दिली आहे, तिजपासून त्याला एकंदर सर्व कामीं दिवसानुदिवस ज्यास्ती सुधारणा करितां येईल.

**बळवंतराव. प्र०**—यावरून पशुपक्षी इत्यादिकांमध्यें कांहीं विशेष सद्गुण मुळींच नाहींत काय ?

**जोतीराव. उ०**—तसें कसें होईल ? पशुपक्ष्यादि प्राणी आपल्या पोटापुरती मात्र काळजी करितात; परंतु ते कांहीं मानव प्राण्यासारखे स्वतः उद्योग केल्याशिवाय दुसऱ्यास नाडीत नाहींत व (एके वेळीं) लढाईमध्यें अश्वत्थामा हत्ती अगर अश्वत्थामा (मनुष्य) मारला गेला, अशी कडी उठली, तेव्हां आपला मुलगा मारला गेला, असें द्रोणास वाटून तो सत्यवादी धर्मास विचारावयास आला, ते वेळेस कृष्णानें त्याजकडून खोटें बोलवून (त्याच्या) गुरूस मारविलें. तेव्हां अशा प्रकारच्या सदा सत्यवादी पुरुषास पापांत ढकलणाऱ्या काळ्या कृष्णास देवबाप्पा मानून, अज्ञानी पंगू मानव बांधवांस त्याविषयीं नाना प्रकारचा भक्तीभाव दाखवून आपण स्वतः साधुसंतांचीं सोंगें घेतात व त्यांस उघड दिवसा धर्ममिषानें राजरोस लुटून त्यांच्या श्रमावर ऐषआराम करून, त्यांस धाय धाय करायास लावितात. उदाहरण—पशुपक्ष्यांमध्यें मानवांतील आर्य ऋषींसारखीं ईश्वराच्या नांवानें धर्मपुस्तकें करून मोठा धार्मिकपणाचा डौल घालून ते आपल्या जातबांधवांस नाडून खातात काय ? त्याच्यांत खोटे इनसाफ, खोटे कागद, खोट्या नोटी, खोट्या साक्षी देणारे थोडे तरी सांपडतील काय ? सारांश, पशुपक्ष्यादिकांमध्यें मानवांतील नाना पेशवा व वासुदेव फडक्यासारखे बंडखोर व चोर निवडत नाहींत. यावरून निर्मीकानें मानव प्राण्यांस सारासार विचार करण्याची बुद्धि देऊन त्यांस सर्वांमध्यें श्रेष्ठ केलें असून त्यांनीं त्या अमोल्य पवित्र बुद्धीचें कांहींच सार्थक केलें नाहीं. यास्तव बुद्धिहीन पशुपक्ष्यादि वगैरे प्राणी या लोभी मानवापेक्षां फार श्रेष्ठ आहेत असें मला वाटतें.

## धर्म

**यशवंत जोतीराव फुले. प्र०**—मजुरांदाखल आपलीं सर्वांचीं वस्त्रेंप्रावरणें धुवून त्यावर आपला निर्वाह करणें हा परटाचा धर्म नव्हे काय ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—मजुरांदाखल आपलीं सर्वांचीं वस्त्रेंप्रावरणें धुवून त्यावर जर परीट आपला निर्वाह करितो, तर आपण कधीं कधीं आपलीं स्वतःचीं वस्त्रें-प्रावरणें घरीं धूत नाहीं काय ? यावरून मजुरी घेऊन दुसऱ्यांचीं वस्त्रेंप्रावरणें धुणें हा एक प्रकारचा धंदा झाला, याला कोणी धर्म म्हणावा ? त्याचप्रमाणें एखादा आर्यभट्ट ब्राह्मण दुसऱ्याची शागिर्दी पतकरून त्यांचीं धोतरें धुवून आपला गुजारा करूं लागला; तर त्यास तुम्ही परीट म्हणाल काय ? व त्या भट्ट शागिर्दाचा परटाचा धर्म होईल काय ?

**यशवंत. प्र०**—त्याचप्रमाणें मजूरादाखल आपल्या सर्वांच्या हजामती करून त्यावर आपला गुजारा करणें हा न्हाव्याचा धर्म नव्हे काय ?

**जोतीराव. उ०**—मजूरादाखल आपल्या सर्वांच्या हजामती करणें, हा जर न्हाव्याचा **धर्म** आहे; तर आपण नेहमीं आपल्या नाजूक जागचे केंस एके बाजूला जाऊन भादरीत नाहीं काय ? याशिवाय धूर्त न्हाव्याचा अतिशय धूर्त भट्टांशीं एखाद्या क्षुल्लक कारणावरून बेबनाव झाल्याबरोबर कित्येक आर्यभट्ट ब्राह्मण द्रव्य मिळविण्याच्या आशेनें वेलाशक बगलेंत धोकट्या मारून दुसऱ्यांच्या हजामती करण्याचा **धंदा** करितात. यावरून आर्यभट्ट ब्राह्मणांचा हजामाचा **धर्म** म्हणतां येईल काय ?

**यशवंत. प्र०**—अथवा मजूरांदाखल आपल्या सर्वांचा गु-मूत काढून त्यावर आपला निर्वाह करणें हा तरी हलालखोराचा **धर्म** नव्हे काय ?

**जोतीराव. उ०**— मजूरांदाखल आपण सर्वांचा गु-मूत काढणें हा जर हलालखोराचा धर्म आहे; तर आपण आपल्या घरांत बिछान्यावर पडलेल्या आजारी माणसाचा गु-मूत काढून बाहेर टाकीत नाहीं काय ? यावरून मजुरी घेऊन दुसऱ्याचा गु-मूत काढणें हा एक प्रकारचा **उद्योग** झाला. याला **धर्म** कोणीं म्हणावा ? त्याचप्रमाणें एखाद्या ठोंब्या आर्यभट्ट ब्राह्मणानें दुसऱ्याची शागिर्दी पत्करून त्याचा गु-मूत काढल्यास त्याला तुम्ही हलालखोर म्हणाल काय ? जसें:—धनगरांनीं मेंढरें पाळून त्यांस चारणें हा त्यांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **उद्योग** होय—शेतीकाम करणें हा कुळवाड्यांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **उद्योग** होय—मळ्यामध्यें काम करणें हा माळ्यांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **उद्योग** होय—दाम घेऊन लोकांची चाकरी करणें हा चाकरांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **उद्योग** होय—घरें बांधणें हा सुतारांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **धंदा** होय—जोडा शिवणें हा चर्मकारांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **धंदा** होय—रखवाली करणें हा रामोशांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **धंदा** होय—दीन पराजितांनीं निर्दय विजयी लोकांची सेवा करणें हा त्यांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **लाचारपणा व निरुपाय** होय—धूर्त चोरांनीं बेसावध लोकांचीं घरें फोडणें हा त्यांचा **धर्म** नव्हे, परंतु ही त्यांची **हातचलाखी** होय—विजयी आर्यभट्टांनीं अतिशूद्रांस विद्या देऊं नये हा त्यांचा **धर्म** नव्हे; परंतु हा त्यांचा **सुड उगविण्याचा द्वेष** होय. पराजित केलेल्या अज्ञानी जनांस भोंदाडून खाणें हा आर्यभट्ट ब्राह्मणांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **धूर्तपणा** होय—सरकारी कामावर असतां अज्ञानी जनांपासून लांच खाणें हा कामगारांचा **धर्म** नव्हे, परंतु हें त्यांचें **सरकाराशीं दगेबाजी करण्याचें कसब** होय—मेहनत न करतां धर्ममिषानें अज्ञानी जनास लुटून आयतें खावें, हा सूज्ञ सज्जन आर्यभट्टांचा **धर्म** नव्हे, परंतु ही त्यांची **उघड ठकबाजी** होय—मूढ शूद्रांकडून स्थायिक इंग्रज सरकाराविरुद्ध बंड करवून अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस संकटांत पाडणें हा धूर्त पेशवे व फडके यांचा **धर्म** नव्हे, परंतु ही त्यांची राजद्रोहीपणाची **कावेबाजी** होय—इतर सर्व लोकांस तुच्छ मानून आपण आपल्यास पवित्र मानून सोंवळेचार करणें हा भट्ट ब्राह्मण मानवांचा **धर्म** नव्हे, परंतु हें सर्व जगांत **हलकें व अपवित्र मानण्याचें** जातिकसब होय. वेश्येचा मुखरस

पिऊन वरीं आल्याबरोबर सोंवळेचार करणें हा सज्जन मानवाचा **धर्म** नव्हे, परंतु ही त्यांची **अपवित्रता** होय–निर्वाहाकरितां पडझड जनावरें खाणें हा मांग, म्हार वगैरे यांचा **धर्म** नव्हे, परंतु हा त्यांचा **लाचारीपणा व निरुपाय** होय–यज्ञाच्या व श्राद्धाच्या निमित्तानें ताज्यातवान्या **गायागुरांचा** निर्दयतेनें वध करून खाणें हा आर्यभट्ट ब्राह्मणांचा **धर्म** नव्हे, परंतु ही त्यांची **मांसाहाराची गोडी** होय.

**यशवंत.** **प्र०**—रयतेपासून कर घेणें हा तरी राजाचा **धर्म** नव्हे काय ?

**जोतीराव.** **उ०**—चोर बंडखोर व अनेक प्रकारच्या धर्मठक धूर्त लबाडांच्या त्रासापासून प्रजेचा व आपला बचाव करण्यापुरती करपट्टी रयतेपासून घेणें, हें राजाचें **कर्तव्यकर्म** होय. याला धर्म कोणीं म्हणावा ?

**यशवंत.** **प्र०**—वसुल केलेली करपट्टी रयतेच्या सुखाकरितां न खर्च करितां केवळ निरोपयोगी धूर्त आर्यभट्टांचें पाळणपोषण करून आपल्या स्वतःच्या ऐषआरामासाठीं तिचा उपयोग केल्यापासून परिणामीं काय होणार आहे ?

**जोतीराव.** **उ०**—तसें केल्यामुळें अनेक राजेरजवाड्यांची खानेखराबी होऊन ते धुळीचे दिवे खाऊन वाया गेले व पुढेंहि त्याचप्रमाणें निःसंशय लयास जातील.

**यशवंत.** **प्र०**—मुलीमुलांनीं आपल्या आईबापांची आज्ञा पाळणें हा पण त्यांचा धर्म नव्हे काय ?

**जोतीराव.** **उ०**—जन्मतांच आपण जेव्हां तान्हीं बाळें असून अशक्त व पंगू होतों, तेव्हां आपल्या जन्मदात्या आईबापांनीं आपलें पाळणपोषण करून आपणांस सुशिक्षण दिलें; हे त्यांचे आपल्यावर अनंत अनिवार उपकार होत. त्याचप्रमाणें जेव्हां आपले जन्मदाते वृद्धापकाळामुळें अशक्त व पंगू होतात, तेव्हां आपण सर्व मुलीमुलांनीं कृतज्ञतापूर्वक मोठ्या आवडीनें त्यांचें पाळणपोषण करावें; व त्यांचें उतराई झाल्या-शिवाय पितृबाळकांमध्यें देववेवीचा व्यापार संपत नाहीं.

**यशवंत.** **प्र०**—यावरून अशक्त व पंगू जन्मदात्या मातापित्यांचें पाळणपोषण करून त्यांचें उतराई झाल्याशिवाय, स्त्रियांचा त्याग करून बाळब्रह्मच्यारी व ताबूतांतील सोंगासारखें सर्व अंगाला राख फासून आईतखावू बैरागी कसे बनतात ? याविषयीं तुमचें कसें काय मत आहे ?

**जोतीराव.** **उ०**—याविषयीं स्त्रियांचा त्याग करून बाळब्रह्मच्यान्यांचें व बैराग्यांचें नऊ महिने उदरीं ओझें वागविणाऱ्या त्यांच्या जन्मदात्यांस विचारा, म्हणजे त्या तुम्हांस यथास्थित उत्तरें देतील; परंतु यदाकदाचित् पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकंदर सर्व स्त्री-पुरुषांनीं मुक्ति मिळविण्याच्या लालचेनें बाळब्रह्मच्यारी, बालब्रह्मच्यारिणी, बैरागी व बैरागिणी या सर्वांनीं थेट साधुसाध्वीणींचीं सोंगें घेऊन रात्रंदिवस **कल्पित सनातन शेषशायीचें** नामस्मरण करीत बसल्यानें त्या सर्वांचा, उपासानें दोन–चार महिन्यांच्या आंत खप होऊन ते सर्व लयास जातील, कां नाहीं बरें ? कारण त्या सर्वांस कोणाच्याहि

जीवावर आपला निर्वाह करून घेण्याचें साधन मुळींच रहात नाहीं. सारांश चाकरानें धन्याची चाकरी करण्याचे उद्योगास चाकराचा धर्म म्हणतात. वेश्येनें तरुणांस नादीं लावण्याच्या उद्योगास पात्रेचा धर्म म्हणतात. आर्य भट्टानें शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानणें यांस आर्यांचा धर्म म्हणतात. आर्य भट्ट ब्राह्मणांचा भिक्षा मागण्याचा धंदा असून त्यास भट्टांचा धर्म म्हणतात. असे धर्म शब्दाचे नाना प्रकारचे अर्थ होत असल्यामुळें, धूर्त भट्ट ब्राह्मण आपलीं कार्यें साधून घेण्याकरितां जसी वेळ येईल तसा त्याचा अर्थ करून आपलें हित करून घेतात.

**यशवंत० प्र०**—आपल्या सर्वांचा निर्माणकर्ता व त्यानें निर्माण केलेले मानवप्राणी यांजमध्यें संबंध दाखवणारा, धर्म हा शब्दाचा एखादा स्वाभाविक पवित्र अर्थ होत असल्यास त्याविषयीं अथवा निर्मीकाच्या थोरवीविषयीं आम्हास कळवाल, तर बरें होईल.

**जोतीराव० उ०**—पूर्वी तुजला कळविलेंच आहे कीं, आपल्या दयाळू परमेश्वरानें या विस्तीर्ण, अगम्य व अतर्क्य पोकळींतील अनंत सूर्यमंडळासह त्यांच्या ग्रहोपग्रहां-सहित पृथ्व्या निर्माण केल्या आहेत. त्यांपैकीं फक्त या आपल्या सूर्यमंडळाविषयीं विचार करूं जातां मज पामराचा त्याविषयीं तर्कसुद्धां पुरत नाहीं; जसें—आकर्षणाच्या योगानें प्रथम सूर्याभोंवतीं पृथ्वी आपली प्रदक्षणा संपवी तोंपावेतों ती आपणच होऊन आपल्या अक्षाभोंवतीं तीनशें पासष्ठ ३६५ वेळां फिरते. यामुळें या पृथ्वीच्या पृष्ठभागावर दिन व रात्र असे दोन भेद होतात. यावरून एकंदर सर्व प्राणी दिवसभर आपल्या जीवनोपायाकरितां परिश्रम करितात; आणि थकल्यामुळें रात्रीं सुखानें आराम घेतात. एकंदर सर्व प्राणीमात्रास पाण्याचा यथास्थित पुरवठा व्हावा, म्हणून निर्माणकर्त्यानें याच पृथ्वीच्या पृष्ठभागावर जागोजाग महासागरांची योजना करून ठेविली आहे व त्या सागरांतील पाणी खराब होऊन सडूं नये, यास्तव त्यांत क्षारादाखल मीठ मिसळविलें आहे व चंद्राच्या आकर्षणाच्या योगानें त्यास दिवसांतून एकदां भरतीच्या अथवा ओहोटीच्या संबंधानें चलनवलन होण्याची योजना केली आहे. त्याचप्रमाणें निर्मीकानें यच्चयावत् निर्माण केलेल्या प्राणीमात्रांपैकीं फक्त मानव प्राण्यांच्या शरीरांतील सांध्याच्या हतवटीविषयीं विचार करूं लागल्याबरोबर त्यांच्यामध्यें निर्मीकाची अगाध ममता व अगाध चातुर्य दिसून येतें. जसें:—मानवांच्या पायांत घोटेगुडघे यांची व कंबरेंत सांध्यांची जर योजना केली नसती, तर त्याला सोईवार चालतां व पळतां न येतां, चिमण्यांसारखें त्याला दोन्ही पाय जुळून टणटणा उड्या माराव्या लागल्या असत्या. हातांत पांच बोटांच्या पेऱ्यास, तळहातास, मणगटास, कोंपरास आणि बाहूंस, सांध्यांची जर योजना केली नसती तर बापुड्या मानवप्राण्यांस नाना प्रकारचे उद्योग करून त्याच हातानें त्यांस जेवण घेतां आलें नसतें. खालीं अथवा वर, डाव्या अथवा उजव्या बाजूला वळविण्याकरितां त्यांच्या मानेंत जर सांधे ठेविले नसते, तर त्यांची मोठी गैरसोय झाली असती. कर्णेंद्रियें जर त्यांस दिलीं नसतीं, तर त्यांच्या योगानें त्यांस भाषण करण्याचें

मुळींच ज्ञान झालें नसतें. मुखामध्यें कुराडे व उखळे वगैरे दातांनीं बारीक चावलेले पदार्थास, रसाळ भाषण करणाऱ्या जिभेला त्यांच्या घशांत मुळींच ढकलितां आलें नसतें व जबड्याच्या खालींवर दोन ओठांचा मजबूत व नेहमीं उघडझाप करणारा डबा जर केला नसता, तर सर्व प्रकारचे प्रवाही व अप्रवाही पदार्थ त्यांस सोईनें खातां न येतां त्यांची फारच फटफजिती झाली असती. व ते पदार्थ सहज खातांना मानवांच्या घशांत गुदमरा होऊन त्यांनीं घाबरूं नये, म्हणून त्यांच्या घशांत वायु घेण्याकरितां निर्मीकानें घ्राणेंद्रियाची योजना केली आहे; व त्यांजकडे सुवासिक व घाणेरडे पदार्थ शोधून कळविण्याचें काम सोंपविलें आहे. सर्वांपेक्षां उंच अशा प्रदेशांत सोईवार वेताची खोलगट जागा करून त्यांमध्यें सूक्ष्म रीतीनें नेत्रांची योजना केली आहे व त्या अति सुकुमार नेत्रांचा बचाव करण्याकरितां एका निमिषांत जलद उघडझाप करणाऱ्या डबीसारख्या दोन ब्रशरूपी पापण्या दिल्या आहेत. याशिवाय मानव प्राण्यांचा जन्म झाल्यानंतर त्यांचे बालपणीं निर्वाह होण्याकरितां त्यांच्या मातेच्या स्तनांत तीन दिवसांच्या आंत त्यांस दूध पोंहचविण्याची योजना केली आहे व त्या मानवी तान्ह्या अर्भकांचे अति कोमल-अति नाजूक ओठ असल्यामुळें त्यांस दूध पितांना कोणत्याहि प्रकारची इजा होऊं नये, म्हणून निर्मीकानें त्यांच्या मातेचे दोन्ही स्तन अतिशय मऊ व गुलगुलीत लहान लहान रेशमी गिरद्यांसारखे कांहींसे उंच केले आहेत. आणि अर्भकानें स्वभावेंकरून ते मुखांत धरून त्यांपासून सहज दूध चोखतां यावें यास्तव त्यांच्या स्तनांवर अतिशय मऊ सहज त्यांच्या मुखांत मावण्याजोगत्या अशा बोंडशा केल्या आहेत. व त्यास दूध पितांना ठसका लागून त्यानें घाबरूं नये म्हणून प्रत्येक बोंडशीस अति सूक्ष्म जाळीवजा छिद्रें करून त्यांतून दुधाच्या सुमारें अठरा धारांची योजना केली आहे, शिवाय मानवी प्राण्यांच्या मातुश्रीचें स्तानांतलें दूध संपतांच त्यांचा निर्वाह होण्याकरितां आपल्या दयाळू निर्मीकानें द्राक्षें, डाळिंब, पपनस, नारिंग, जायफळें, बोरें, आंवळीं, काजू, जांबूळ, बकुळ, सपताळ, केळीं, नारळ, पेरू, शिताफळें, अंजीर, फणस, आंबे, रामफळें, आननस वगैरे नाना प्रकारचीं फळें; ज्वारी, तूर, तीळ, मसूर, वाल, उडीद, मूग, वाटाणा, राळे, बाजरी, हरबरे, गहूं, तांदूळ वगैरे नाना प्रकारचीं धान्यें; माठ, पोकळी, चुका, चाकवत, मेथी, तांदुळजा, कोबी, भोपळे, घोसाळीं, पालख, वांगीं, गवार, पडवळ, भेंडी वगैरे नाना प्रकारचा भाजीपाला; बटाटे, कांदे, लसूण, गाजरें, मुळे, रताळीं, आलें वगैरे नाना प्रकारच्या कंदमुळांसह वनस्पती निर्माण केल्या आहेत व त्या सर्वांमध्यें त्यांच्या आच्छादनाकरितां वस्त्रप्रावरणांचा पुरवठा व्हावा, म्हणून पल्हाटी, ताग वगैऱ्यांचीं झाडें केलीं आहेत व त्या सर्वांची मनःपूर्वक आपण सर्वांनीं रात्रंदिवस मेहनत, मशागत करून त्यांची सर्वप्रकारें जतणूक करून, आपण स्वतः श्रमानें थकल्यावर त्यांचा सर्वोपरी उपभोग घेतांना चांपा, पारिजात, कांचन, कदंब, केवडा, केतकी, गूलच्छबू, पाच, मरवा, चमेली, मोतिया, गुलाब, मधुमालती, कांटेशेवती, रेवती, मदनबाण, मोगरा, जुई, जाई,

वगैरे नानाप्रकारच्या सुवासिक फुलांचा या जगद्रूप मळ्यांत मानव माळिणी माळ्यानें सुवास घेऊन, चिरकाल आराम आनंदांत रहाण्याकरितां तीं निर्माण केलीं आहेत.

**यशवंत. प्र०**—निर्मीकानें कृपाळू होऊन सदरीं वर लिहिलेली एकंदर सर्व व्यवस्था मानवी स्त्रीपुरुषांच्या सुखासाठीं जर केली आहे, तर एकंदर सर्व जगांत असंतोष होऊन दुःख कसें उद्भवलें ?

**जोतीराव. उ०**—याचें कारण–आपण सर्व मानवांनीं निर्माणकर्त्याचें भय सदा सर्वकाळ जागृत न ठेवितां, त्यानें निर्माण केलेल्या मानव स्त्रीपुरुषांनीं एकमेकांविषयीं बहिण-भावंडपणाची पवित्र वृत्ती जागृत न ठेविल्यामुळें या जगामध्यें सत्याचा मुळींच ऱ्हास होत गेला व यामुळें एकंदर सर्व जगांत असंतोष होऊन दुःखाचें प्राबल्य झालें.

**यशवंत. प्र०**—या सर्वांविषयीं चांगला उलगडा करून जर सांगाल, तर फार बरें होईल.

**जोतीराव. उ०**—आपण आपल्यासच मोठे शहाणे मानून विद्येच्या तोऱ्यांत एकंदर सर्व मानवी पुरुषांनीं, आपल्या जन्मदात्या मातांनीं आपल्या उदरीं नऊ महिने ओझें वागवून आपणांस जन्म दिला, याविषयीं ते अनोळखी होऊन कृतघ्न होतात. त्याचप्रमाणें पुरुषांच्या मातेच्या उदरीं त्याच्या पूर्वीं अथवा मागाहून जन्मलेल्या आपल्या पाठराख्या भगिनीची दिमाखानें हेळसांड करितात. त्याचप्रमाणें मानव पुरुषांनीं आपल्या पोटच्या लेकीबाळी व सुना–बाळांचा कोणत्याच तऱ्हेचा बोज न ठेवितां एकंदर सर्व माता, भगिनी, कन्या आणि सुनाबाळांस कृत्रिमी व अतिशय लबाड स्त्रियांची जात आहे, असा त्यांजवर लटकाच आरोप घेऊन, त्यांस लुटींत सांपडलेल्या बटकुल्या दासीसारखें वागवितात. यावरून एकंदर सर्व जगांत सत्याचा ऱ्हास झाल्यामुळें असंतोष होऊन दुःख झालें.

**यशवंत. प्र०**—एकंदर सर्व मानवी पुरुषांनीं सत्यास स्मरून ते एकंदर सर्व स्त्रियांस त्यांच्या एकंदर सर्व मानवी हक्कांच्या जर आड आले नाहींत, तर या जगांमध्यें निर्मीकाचें राज्य होऊन एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुष संतोषी होऊन सुखी होतील कां नाहीं ?

**जोतीराव. उ०**—तसें केल्यानें केवळ निर्मीकाचें राज्य होऊन आपण सर्व सुखी होणार नाहीं. कारण, एकंदर सर्व पुरुषांनीं सत्यास स्मरून एकमेकांनीं एकमेकांशीं निर्मळ व पवित्र अंतःकरणानें वागल्याशिवाय त्या सर्वांमध्यें निर्मळ भाऊपणा जागृत होणार नाहीं. आणि म्हणूनच या आपल्या दुर्दैवी जगांत निर्मीकाचें राज्य तूर्त होणें नाहीं.

**यशवंत. प्र०**—याविषयीं एखादें जागृत उदाहरण द्याल, तर फार बरें होईल.

**जोतीराव. उ०**—याविषयीं यशवंत महा सत्पुरुषाच्या वाक्याचा आधार येथें देतों–व त्या महा वाक्याच्या पवित्रतेवरून आपली सर्वांची बालोबाल खात्री होईल. तें येणेंप्रमाणें :–" जसें माणसांनीं तुम्हांशीं वर्तावें म्हणून तुमची इच्छा आहे तसेंच तुम्हीही त्यांशीं वर्ता. "

# नीति

**यशवंत जोतीराव फुले.** प्र०—आर्यांच्या धर्मांत भट्ट ब्राह्मणांखेरीज बाकीच्या एकंदर सर्व लोकांस नीतीचा सारखा उपभोग घेण्यासारखी मोकळीक आहे कां नाहीं ?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—आर्यांच्या धर्मांत भट्ट ब्राह्मणांखेरीज बाकीच्या एकंदर सर्व लोकांस नीतीचा सारखा उपभोग घेण्यासारखी मुळींच मोकळीक नाहीं. कारण, आर्यांच्या मुख्य वेदांत आर्यभट्टांनीं सुवर्णलोभास्तव जेव्हां जेव्हां या सधन व संपत्तीवान बलिस्थानांत अनेक वेळां स्वाऱ्या केल्या, तेव्हां तेव्हां त्यांनीं येथील मुळचे मालक, अस्तिक, किकाटस, पिशाच, अहिर, राक्षस, भिल्ल, कोळी, वैदु, मातंग शूद्रादि अतिशूद्र वगैरे क्षत्रिय लोकांस तीरकमठ्याच्या साह्यानें लढून त्यांस, अनेक वेळां लुटून त्या सर्वांस रसातळीं घातलें. नंतर त्यांजवर आर्यांनीं आपलें वर्चस्व कायम करतांच त्यांनीं आपल्या सर्वांच्या निर्मीकाचें भय मनांत न आणितां, त्या सर्वांस हलके मानून त्यांला पशुपेक्षांहि नीच मानण्याची वहिवाट घातली; व त्यांच्या संततीस पिढीजादा आर्यांनीं आपले दास करून त्या सर्वांस नाना तऱ्हेचे अनिवार त्रास आजपावेतों देत आले आहेत. त्याविषयीं त्यांचें वेदांतील वास्तविक इतिहास व श्रुतिसंहिता वगैरे संस्कृत ग्रंथांतील कावेबाजी व आपमतलबी लेख, बलिस्थानांतील क्षत्रियांस समजूं नयेत, ह्मणून आर्यांनीं आपल्या स्वार्थी चुलीच्या भानवसीमागें सोवळ्यांत लपवून ठेविले आहेत. इतकेंच नव्हे परंतु बलिस्थानांतील अक्षरशून्य क्षत्रियांस आर्यांच्या हेवेखोर व बनावट ग्रंथांचा मागमूससुद्धां लागूं नये म्हणून आर्यांनीं मोठ्या धूर्ताईनें पाडाव केलेल्या लाचार क्षत्रियांस मुळींच संस्कृत भाषेचें ज्ञान होऊं नये, या इराद्यानें त्यांनीं त्यांस तत्संबंधीं विद्या शिकण्याची अटोकाट बंदी केली. "अति जुनाट आर्यांच्या नीतीचा हा एक मासला पहा."

**यशवंत.** प्र०—रामायण व भागवतांतील एकंदर सर्व इतिहासांतील नीति खरी व विश्वासनीय आहे काय ?

**जोतीराव.** उ०— रामायण व भागवतांतील इतिहासांत एकंदर सर्व नीति खरी व विश्वासनीय आहे, असें कोणाच्यानें म्हणवेल ? कारण, रामायणांतील अनेक गोष्टी जंबुकांच्या तोलाच्या असंभवनीय आहेत व भागवतांतील एकंदर सर्व गोष्टी असंभवनीय, आपल्या सर्वांच्या निर्मीकाच्या नांवाला बट्टा लावण्यासारख्या आहेत.

**यशवंत.** प्र०—तर यावरून रामायणांत कोणत्या गोष्टी असंभवनीय आहेत, याविषयीं आपण आम्हांस थोडेसें कळवाल, तर बरें होईल ?

**जोतीराव.** उ०—कल्पित रामायणांतील लोभी रावणास दहा मुखें, दहा नाकें, वीस डोळे, वीस कान आणि वीस हात होते; परंतु त्यास एकच गुद्द्वार असून दोन पाय मात्र होते, यावरून त्यानें आपल्या दशमुखांनीं खाल्लेले पदार्थ पचन होऊन एकाच

गुदद्वारानें बाहेर निघण्याची कशी काय योजना केली होती, व त्याविषयीं एकंदर सर्व सृष्टीक्रमास ताडून पाहतां रावणाच्या शरीराचे रचनेविषयीं मोठा चमत्कार वाटतो ! पुन्हां त्याचप्रमाणें एके वेळीं परशुराम जनकराजास भेटावयास गेला होता. तेथें त्यानें आपले धनुष्यबाण त्याच्या महालाच्या बाहेरल्या एका कोपऱ्यांत ठेऊन आपण दिवाणखान्यांत त्याला भेटावयास गेला; नंतर कांहीं वेळ त्या उभयतांचें भाषण चाललें असतां इकडे एकंदर सर्व महालांतील मुलीमुलें लांकडाच्या काठ्यांचे घोडे करून खेळूं लागलीं; परंतु जानकीच्या हातीं लांकडाची काठी न लागल्यामुळें तिनें तेथें पडलेल्या धनुष्याचा घोडा करून आपणहि त्या सर्व मुलांत खेळूं लागली. नंतर परशुराम आपलें संभाषण संपवून बाहेर येऊन पहातो, तों आपण ठेवलेलें धनुष्य तेथें नाहीं; नंतर थोडी चवकशी करतां त्यास त्या धनुष्याचा घोडा करून जानकी पोरांमध्यें टणटणां उड्या मारून खेळत आहे, असें दिसलें. तेव्हां (भूदेव) परशुरामास वाटलें कीं, आतां माझा अवतार संपला. कारण या मुलीचा पति मजपेक्षांहि महाबलवान् निर्मीकानें निर्माण केला असावा; कारण ही अजाणती मूल माझे धनुष्यास काठीसारखें समजून त्याचा घोडा करून जर खेळत आहे, तर माझ्या अवताराची पुंगी बंद झाली, असें मनांत समजून त्यानें त्याविषयीं खरेंखोटें ताडून पहाण्याविषयीं बेत केला व त्यानें आपले धनुष्यबाण जनकराजाजवळ ठेविले; आणि त्यास एकांतीं असें कळविलें कीं, या धनुष्यावर जो बाण चढवील त्यास मात्र ही मुलगी द्या व तसें न केल्यास मुलीस योग्य नवरा न मिळाल्यास तिच्या आयुष्याचें मातेरें होऊन बोजवार होणार आहे. पुढें परशुरामाच्या सुचनेवरून तिच्या विवाहसमयीं जनकराजानें एकंदर सर्व बलिस्थान वगैरे द्वीपांतील राजेरजवाड्यांस धनुष्यबाणाच्या प्रतिज्ञेविषयीं जाहीर अमंत्रण केलें. नंतर सर्व जमलेल्या भूपती मंडळीमध्यें प्रथम रावणानें पुढें सरसावून हातांत धनुष्यबाण घेऊन त्यानें धनुष्यास बाण लावून मोठ्या दांत बळकटीनें तें धनुष्य कानापावेतों नेण्याच्या अगोदर त्याचा दम खुंटला व धनुष्यबाणास छातीवर घेऊन तो आपले आपण सभेमध्यें उताणा पडला. पुढें राम, लक्ष्मण व सीता वनवासाला गेले असतां तेथें त्यांस शूर्पणखा नांवाच्या स्त्रीची अप्रतिष्ठा केल्यामुळें तिच्या भावास राग येऊन त्यानें त्याचा सूड उगविण्याच्या इराद्यानें आपल्याजवळील एकास सुवर्णमय मृग करून सीता पंचवटींत होती, त्या ठिकाणीं त्यास पाठविलें. यावरून मृगाच्या देखणेपणास सीता लुब्ध होऊन तिनें हट्टानें रामास त्याला धरावयास पाठविला; नंतर कांहीं वेळानें रामासारखी वाणी त्या मृगवेषधारी राक्षसानें कपटानें केली व ती रामाची वाणी समजून सीतेनें रामचंद्राचा शोध काढण्याकरितां लक्ष्मणास पाठविलें असतां ती एकटी आहे, असें पाहून रावणानें संन्याशाचें सोंग घेऊन भिक्षा मागतांना सीतेस कोंकरासारखी खांद्यावर टाकून आपल्या शहरीं त्वरेनें निघून गेला. यावरून रावणाच्या उरावर पडलेलें धनुष्य त्याच्या उरास दडपून चेपणाऱ्या भूदेव परशुरामाच्या आयुधाचा घोडा करून खेळणाऱ्या जानकीस

कोंकरासारखें सहज खांद्यावर टाकून पळण्यास रावण त्याच वेळीं कसा समर्थ झाला? व दुसरें असें कीं रावण हा मानवाव्यतिरिक्त निराळी जात होती, तर जनकराजानें या परजातीच्या रावणास आपल्या मुलीच्या स्वयंवराच्या समारंभास येण्याचें आमंत्रण केलें नसतें. कारण, रावणानें धनुष्याला बाण लावण्याची प्रतिज्ञा जर पूर्ण केली असती तर जानकीस रावणाबरोबर लग्न लावून त्याचा संसार करावा लागता असता; यास्तव रामाची व राक्षसाची जात निराळी होती, असें म्हणणें हें किती अश्लाघ्य आहे. तर यावरून असें सिद्ध होतें कीं, रामायणांतील इतिहास त्या वेळच्या गप्पाड्या नाटक्यांनीं केवळ लोकांचीं मनें रिझवण्याकरितां कल्पून रचिला असावा. या सर्वांत नीतीचा गंधसुद्धां नाहीं असें मला वाटतें.

**यशवंत. प्र०**—लोभी रावणाविषयीं गोष्ट या वेळीं एक बाजूला ठेवा. परंतु सात्वीक एकपत्नि, एकवचनी, अशा रामचंद्राविषयीं एखादी असंभवनीय गोष्ट रामायणांत असल्यास सांगा पाहूं.

**जोतीराव. उ०**—एकपत्नि, एकवचनी, एकबाणी, रामचंद्रानें अहिमहिच्या स्त्रीस मर्कटद्वारें वचनानें विषयसुखाची थाप देऊन तिच्या पतीचा विश्वासानें घात करविला; परंतु रामचंद्रानें आपलें वचन पुरें करण्याच्या पूर्वीं तिचा पलंग भ्रमरांकडून कोरून पोंकळ करविला. आणि त्या रांडमुंड भोळ्याबापुडीस दिलेले वचनाचा भंग करून घरीं निघून गेला. त्याचप्रमाणें फळें पाला खाऊन शेपटें हालवून चेष्टा करणाऱ्या वानरांचें रामचंद्रानें दळ कसें उभें केलें? व त्यांपैकीं मारुती नांवाचा वानर यानें सीतेबरोबर भाषण करून अठरा क्षौणी दळभारासह रावणाच्या बागेची रखवाली करणाऱ्या जंबुमाळी सरदाराचा युद्धामध्यें मोड केला व त्यानें आपलें पुच्छ वर करून त्यास आपल्या पायाखालीं तुडविलें हें समयास अनुसरून त्यानें बरें केलें. परंतु हल्लीं जंबुमाळी मानव सरदाराच्या हातांत नागवी तरवार न देतां खुर्पे देऊन जागोजाग मर्कटांच्या दगड धातूच्या मूर्ती करून त्यांवर तेल शेंदूर खरकटून त्यांची आराधना करितात व तसेंच कुंभकर्णाचा आहार व निद्रा यांविषयीं इतिहासकर्त्यानें बरीच मीठमिरची लावून पाल्हाळ केला आहे, परंतु रावणाचें अंगावर पडलेलें, त्याचे उरास चेपणारें धनुष्य सहज हातांत धारण करून युद्ध करणारा ब्रह्मराक्षस परशुराम काय काय खात होता, याविषयीं कांहींच उल्लेख केला नाहीं, याविषयीं इतिहासकर्त्यांच्या कारस्थानीचा फार आचंबा वाटतो. त्याचप्रमाणें इंद्रजीताचें शीर सुलोचनेच्याच हातावर येऊन कसें पडलें? या सर्वांवरून रामायणांतील एकंदर सर्व इतिहास केवळ माकडचेष्टा असून एखाद्या भंगड मनुष्यानें हें कल्पनेनें लिहिलें आहे म्हणून सहज सिद्ध करितां येईल. यांत नीतिचा लव आहे म्हणून आम्हास दाखवितां येणार नाहीं.

**यशवंत. प्र०**—आतां भागवतांतील एकंदर सर्व गोष्टी असंभवनीय आहेत; त्या सर्वांविषयीं येथें थोडासा उल्लेख करून दाखवाल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—भागवतांतील एकंदर सर्व गोष्टी असंभवनीय आहेत; त्यांपैकीं तुमच्या माहितीस्तव, नमुन्यासाठीं कांहीं गोष्टींचा येथें उल्लेख करून दाखवितों. अतिशय तामसी, गळयांत रुंडमाळा धारण करणाऱ्या शिवाच्या प्रसादेंकरून दुंदुभी नांवाच्या राक्षसाला मनुष्यांचीं शंभर, हत्तींचीं शंभर आणि घोड्यांचीं शंभर अशीं तीनशें मुखें असून त्यास हजार हात व दोन पाय मात्र होते. तर यावरून दुंदभी नांवाच्या राक्षसाच्या शरीराचे रचनेविषयीं विचार केला असतां रावणाविषयीं कांहींच अचंबा वाटत नाहीं. एके वेळीं गोकुळांत अतिशय पर्जन्यवृष्टि होऊं लागल्यामुळें एकंदर सर्व गोपाळांसह गांवचे लोक गर्भगळीत होऊन भयाभीत झाले व त्या सर्वांस अद्भुत चमत्कार करून दाखविण्याकरितां अवतारी देवबापा कृष्णाजीनें (मारुती माकडासारखा द्रोणागिरी) गोवर्धन पर्वत उचलून त्यास आपल्या हाताच्या करांगळीवर घेऊन सर्व लोकांचा बचाव केला. त्याचप्रमाणें यमुनेच्या डोहांत बुडी मारून कालिया सर्पाचा पराभव केला, आणि आपण यशस्वी होऊन त्याचे पाठीवर उभा राहून मोठ्या शेखीनें तोंडानें पुंगी वाजवीत वाजवीत डोहाच्या बाहेर निघाला, या सर्व असंभवनीय गोष्टी कोणाच्यानें खऱ्या ह्मणवतील ?

**यशवंत. प्र०**—भागवतांतील एकंदर सर्व गोष्टी आपल्या सर्वांच्या निर्मीकाच्या नांवाला बट्टा आणण्यासारख्या आहेत. त्या सर्वांविषयीं इत्थंभूत वर्णन केल्यास सर्व लोकांचे डोळे उघडणार आहेत.

**जोतीराव. उ०**—प्रथम दुंदुभी नांवाच्या राक्षसाच्या घरीं कृष्णानें (ठेंगू वामनासारखें) ब्राह्मणाचें थेट सोंग घेऊन त्याचा निर्दयपणें कपटानें वध केला, हें आपल्या सर्वांच्या परम दयाळू निर्मीकाच्या नांवाला शोभेल काय ? यावरून इतर मानवी धर्मांतील लोकांपेक्षां एकंदर सर्व आर्यांच्या धर्मांतील ब्राह्मण लोक इतर अज्ञानी जनांबरोबर ठकबाज्या करण्याचा विधिनिषेध मानीत नाहींत. दुसरें असें कीं, कृष्णाजीनें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरांतील दुध, दहीं व लोणी चोरून खाल्लें. आतां हा चोरी करण्याचा धंदा आपल्या परम न्यायी निर्मीकाच्या नांवाला शोभेल काय ? यावरून इतर धर्मांतील लोकांपेक्षां आर्यभट्ट ब्राह्मणांस चोऱ्यामोऱ्या करून लांच खाण्याचा विधिनिषेध वाटत नाहीं. तिसरें असें आहे कीं, त्यावेळच्या रुढीप्रमाणें गवळ्यांच्या स्त्रिया नग्न होऊन नदींत स्नान करीत असतां अति चावट कृष्णाजीनें त्या सर्वांचीं, भामट्यासारखीं, लुगडीं व चोळ्या बगलेंत मारून कदंब वृक्षावर बसून त्या सर्वांची निर्लज्जपणें मोठ्या हौसेनें मजा पाहात बसला; आतां हा निर्लज्जपणा आपल्या परम पवित्र निर्मीकाच्या नांवाला शोभेल काय ? यांवरून इतर धर्मांतील लोकांपेक्षां एकंदर सर्व आर्यभट्ट ब्राह्मणांस स्त्रियांबरोबर उद्धटपणा करून त्यांची अमर्यादा करण्याचा विधिनिषेध वाटत नाहीं. चवथें असें कीं, कृष्णाजीस जरी सोळा सहस्त्र एकशत अष्ट नारी होत्या, तरी गवळ्याच्या राधा स्त्रीवर लंपट होऊन तिचें मन भ्रष्ट केलें. हें त्याचें व्यभिचाराचें कृत्य आपल्या परम नीतिमान् निर्मीकाच्या नांवाला शोभेल काय ? यावरून इतर धर्मांतील लोकांपेक्षां एकंदर सर्व आर्यभट्ट ब्राह्मणांतील

वेदवेत्ते शास्त्रीपंडीतांस वेसवारांडांचें गाणेंबजावणें ऐकण्याचा व व्यभिचाराचा बिलकूल विधिनिषेध वाटत नाहीं. याशिवाय सर्व दुर्गुणसंपन्न अष्टपैलू देव अवतारी कृष्णाजीनें अनेक वेळां लबाडीनें नाना प्रकारच्या ठकबाजा करून अनेक लोकांच्या प्राणास भवला व आपल्या सख्या कंसमामा दैत्याचा वध केला, या सर्वांवरून सर्वोपरी काळ्या रंगाच्या कृष्णाजीनें अर्जुनास गीतेमध्यें उपदेश केला आणि त्यांत त्यानें नीतिचा काय उजेड पाडला असेल तो असो. जसें :—

**"लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण"**

**यशवंत. प्र०**—कृष्णाजी जर देव जातीचा होता, तर त्याच्या सख्या मामाची दैत्याची अवलाद कशी झाली? या सर्वांवरून माझ्या मतें इसापनीति फार बरी दिसते. याविषयीं तुमचें काय मत आहे?

**जोतीराव. उ०**—धूर्त आर्य भट्टांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत कांहींच धरबंद नाहीं. ते आपल्या मतलबासाठीं पाहिजेल तें करतील आणि वेळेस आपल्या सर्वांच्या निर्मीकाची सुद्धां कुकूचकू करून आपण स्वतः वेदांती अहंब्रह्म बनून खासे भूदेव होऊन बसण्यास चुकत नाहींत. इसापनीतींत कोल्ह्याकुत्र्याविषयीं कल्पित गोष्टी ऐकून मानव प्राणी सुनीतिमान होतो. परंतु रामायण व भागवतांतील कल्पित माकडांसहि दुंदुभीसारख्या विचित्र प्राण्यांविषयीं गोष्टी ऐकून मानवप्राणी कुनीतीच्या ठिकाणीं रत मात्र होतात. आणि आपल्या अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या मुलांस सुशिक्षण देण्याकरितां शाळा बांधण्याच्या कामीं खर्च न करितां, वाई, बनारस, प्रयाग, नाशीक वगैरे ठिकाणीं राम-कृष्णांचीं देवालयें बांधण्यांत अतोनात खर्च करितात. याला कोणीतरी नीति ह्मणेल काय? शूद्रांपासून व अतिशूद्रांपासून कराचा पैसा घेत असत व तो पैसा लोकहिताकडे खर्च करण्याच्या ऐवजीं आपल्या कामाकडे व रामकृष्णांचीं देवालयें बांधण्याकडे खर्च करीत असत. आतां हा एवढा अनर्थ कशावरून ह्मणाल तर भागवत व रामायण यावरूनच होय, हें सूक्ष्म विचारांतीं सहज कळून येईल.

**यशवंत. प्र०**—यावरून एकंदर सर्व जगांत नीतीचें आचरण करणारे कोणीच नाहींत काय?

**जोतीराव. उ०**—असें कसें ह्मणतोस? महंमदी धर्मांत नीतीनें आचरण करून आपल्या निर्मीकास संतोष देणारे बहुतेक आहेत.

**यशवंत. प्र०**—एकंदर सर्व मुसलमान लोकांनीं तर कित्येक मूर्तीपूजक लोकांच्या जुलमानें सुंता करून त्यांस बाटिवलें ह्मणूनच धूर्त आर्य भट्टांच्या हेवेखोर ग्रंथांत लेख सांपडतो, तो येणेप्रमाणें "न नीचो यवनात्परः" व मुसलमान लोकांचें कुराण समजूं नये ह्मणून त्यांनीं एक शास्त्र मानून नियम करून टाकिला तो असा—"न वदेद्यावनी भाषां कष्टे प्राणगते अपि."

**जोतीराव.** उ०—कृत्रिमी आर्य भूदेव नटांच्या अपमतलबी बनावट धर्माच्या पाशांत सांपडलेल्या बहुतेक अज्ञानी मूर्तीपूजकांचें कल्याण होण्यासाठीं कित्येक धार्मीक जाहामर्द मुसलमानांनीं आपल्या हातावर शिरें घेऊन तलवारीच्या जोरानें त्यांनीं आपल्यासारख्या त्यांच्या सुंता करून त्यांस "बिसमिल्ला हिर रहिमान् निर्रहिम" असा महापवित्र कलमा पढवितात व त्यांस आपल्या सर्वांच्या सरळ सत्य धर्ममार्गावर नेतात. कारण महंमदी लोकांच्या पवित्र कुराणांत एकंदर सर्व प्राणीमात्रांचा निर्माणकर्ता खुद्द खासा एक आहे आणि याच कारणामुळें त्यास खुदा म्हणतात व त्या खुदानें निर्माण केलेल्या मानवांस एकमेक भावंडांप्रमाणें मानितात. त्याचप्रमाणें एकंदर सर्व मानवांस त्यांचें पवित्र कुराण वाचून पाहण्याची व त्याचप्रमाणें आचरण करण्याची मोकळीक आहे, तसेंच ते सर्वांस आपल्या बरोबरीचे हक्क देऊन त्याजबरोबर रोटी व बेटी व्यवहार सुरू करण्याची मोकळीक देतात, आणि अखेरीस त्या सर्वांस आपल्या सर्वांच्या खुद्द निर्मीकाचे आभार मानण्याकरितां महिझीतींत आपल्याबरोबर घेऊन बसतात.

**यशवंत.** प्र०—एकंदर सर्व मानवांनीं एकमेकांस भावंडांसारखे मानून त्याप्रमाणें आचरण करावें म्हणून त्यांच्या पवित्र कुराणांत जर लेख आहे, तर त्याचप्रमाणें आर्यांचे अथर्व वेदांतसुद्धां तसल्या प्रकारचा श्लोक आहे, तो पुढें देतों.

### श्लोक

**सहृदयं संमनस्य अविद्वेष कृणोमिवः**
**अन्योन्यं अभिहर्यंत वत्सजातं इवाध्न्या ।**
**अनुव्रतः पितुःपुत्रो मात्रा भवतु सम्मनः**
**जायापत्ये मधुमातिं वाचं वदतु शांतिवान् ।**
**मा भ्राता भ्रातारं द्विषद् मास्वसारं उतस्वसा**
**संम्यंचः सव्रतः भूत्वा वाचं वदत भद्रया ।**

**अर्थ**—एक मनानें व एक अंतःकरणानें तुम्हीं राहावें, कोणी कोणाचा द्वेष करूं नये. नुकतेंच जन्मलेलें आपलें वत्स पाहून ज्याप्रमाणें गाईस आनंद होतो, त्याप्रमाणें तुम्हीं परस्परांवर प्रेम करा. पुत्रानें पित्याची आज्ञा पालन करावी. मातेशीं एक मनानें वागावें. पत्नीनें पतीशीं ऐक्यानें राहून त्याजशीं सर्वदा मधूर भाषण बोलावें. बंधुभगिनीमध्यें कोणत्याही प्रकारचा द्वेषभाव नसावा. अशाप्रकारें गोड बोलून ऐक्य रक्षण करावें.

**जोतीराव.** प्र०—त्यांनीं या वेळेस पुढें आणलेला तशा प्रकारचा अथर्व वेदांत जर श्लोक होता, तर निर्दय आर्यांच्या कारकीर्दींत शूद्रादि अतिशूद्रांसह म्लेंच्छ वगैरे लोकांस निराळे भिन्न जातीचे समजून तुच्छ मानून त्यांचा छळ करण्याची वहिवाट आपले आपण पडली असावी काय ?

**यशवंत.** उ०—पूर्वींपासून आजतागायित धूर्त आर्य भट्टांनीं आपल्या अपवित्र सोवळ्यांत वेदांस छपवून ठेविलें होतें ह्मणून असा अनर्थ घडून आला.

**जोतीराव.** उ०—पूर्वीं धूर्त आर्य भट्ट ब्राह्मणांच्या कारकिर्दींत दासानुदास केलेल्या शूद्रादि अतिशूद्रांस त्यांच्या वेदांतील एक शब्दसुद्धां ऐकूं देत नसत आणि या निःपक्षपाति इंग्रज बहादरांच्या राज्यांत वेदांतील वाक्यें बापुड्या लोटन खबुत्रासारखी तुच्छ मानलेल्या शूद्रादि अतिशूद्रांचे चरणाजवळ गडबडा लोळावयास धूर्त आर्योंनीं लावलीं आहेत, आतां त्यांची वेदरुपी काळी चिंधी आह्मां शूद्रादि अतिशूद्रामध्यें नको.

**यशवंत.** उ०—तें कसें कां होईना, परंतु आपल्या धर्मशील जाहॅमर्द मुसल्मानांनीं, शूद्रादि अतिशूद्रांस धूर्त आर्य भट्टांच्या कृत्रिमी दासत्वांतून कां मुक्त केलें नाहीं?

**जोतीराव.** उ०—धूर्त आर्य भट्टांनीं आपल्या सोवळ्यांत लपवून ठेवलेल्या त्यांच्या वेदाचा तपास काढून त्यांतील एकंदर सर्व खोटसाळपणा तपासून शूद्रादि अतिशूद्रांस मुसलमान करून त्या सर्वांस आपल्यासारखा पवित्र मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास लावले नाहीं ह्मणून असा अनर्थ घडून आला, ही सर्व बेफाम मुसलमानांची चूक आहे ह्मणून मी कबूल करितों.

**यशवंत.** प्र०—धूर्त आर्य भट्ट केवळ मूठभर असतां त्यांचे वेद तपासून पाहाण्यास तुमचे जाहामर्द मुसल्मान लोक आर्य धर्मातील अति कोपीष्ट ऋषी मंडळाचे शापास भ्याले असावे.

**जोतीराव.** उ०—मुसलमान लोक जर त्यांच्या धूर्त आर्य ऋषींच्या शापास भिणारे असते, तर त्यांनीं त्यांच्या सोरटी सोमनाथाच्या मूर्तीचे तुकडे तुकडे केले नसते. परंतु ते थोडेसे ऐश्वर्याच्या मदांत बेफाम झाले असतां अति पटाईत मुकुंदराज, ज्ञानोबा, रामदास वगैरे ब्रह्मवृंदांतील महाधूर्त साधूंनीं कल्पित भागवतांतील कावेबाज अष्टपैलू काळ्या कृष्णानें कुतर्कभरीत गीतेंत पार्थास उपदेश केलेला मात्र उचलून त्यांनीं प्राकृत भाषेंत विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, दासबोद वगैरे अनेक प्रकारचे थोतांडी ग्रंथ रचून त्या सर्वांचे कपटजालांत अक्षरशुन्य शिवाजीसारख्या महावीरास फसवून त्यास मुसल्मान लोकांचे पाठलाग करावयास लाविलें. यामुळें मुसल्मान लोकांस एकंदर सर्व महाधूर्त आर्यांचें कूट बाहेर पाडण्यास फुरसतच झाली नाहीं. असें जर नाहीं म्हणावें, तर मुसलमान लोक या देशांत येण्याच्या संधीस धूर्त आर्य मुकुंदराजास शूद्रादि अतिशूद्रांची दया येऊन त्यानें त्याजकरितां प्राकृत विवेकसिंधु त्याचवेळीं कां केला? यांतील कावेबाजी अशी आहे कीं, अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांनीं मुसलमान होऊन धूर्त आर्य भट्टांच्या मतलबी धर्माची फटफजीती करूं नये. सारांश—मुसलमान लोकांस ह्या महाधूर्त आर्य ब्राह्मणांचें कूट बाहेर पाडण्यास जर फुरसत झाली असती, तर त्यांनीं त्यांच्या वेदांसह एकंदर सर्व पुस्तकांच्या पिंजाऱ्यासारख्या फुसड्या फुसड्या करून उधळून त्यांची धुळधाणी केली असती.

**यशवंत. प्र०**—मुसलमानासारखे धूर्त आर्य भट्ट ब्राह्मण त्यांचे पवित्र वेद बाहेर काढून एकंदर सर्व मानवी प्राण्यांस वाचून पाहाण्याची मनाई कां करितात? त्यांतील इंगीत काय आहे हे आम्हांस कळवाल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—धूर्त आर्य भट्ट ब्राह्मणांनीं आजपावेतों मोठी कावेबाजी करून त्यांनीं आपले खल्लड जुनाट वेद बाहेर काढले नाहींत, म्हणून त्यांस शूद्रादि अति-शूद्राबरोबर मोठ्या शेखीनें पोकळ पत्राज करितां येती. धूर्त आर्यांनीं जर वेदांचीं भाषांतरें करून सर्व लोकांत प्रसिद्ध केलीं असतीं, तर एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांसह म्लेंच्छ वगैरे लोकांनीं धूर्त ब्राह्मणाची हुऱ्याहुऱ्या करून त्यांस मांगामहारांचीं कामें हौसेनें करावयास लावलीं असतीं. कारण धूर्त आर्य ब्राह्मणांनीं या बलिस्थानांत जेव्हां जेव्हां स्वाऱ्या केल्या, तेव्हां तेव्हां आर्यांनीं येथील मूळच्या क्षत्रियांस कसकसे रसातळीं घालून त्या सर्वांस कसकसा त्रास दिला, याविषयीं त्यांच्या वेदांत कोठें कोठें मागमूस लागतो; व यावरून एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांस आर्यांचें कपट समजल्या-बरोबर ते त्यांच्याबरोबर चोरून छपून रोटीव्यवहार न करितां त्यांची सावलीसुद्धां आपल्या अंगावर पडूं देणार नाहींत असें मी खात्रीनें भविष्य करितों. पाण्यांत वेदरूपी हैस आणि तिचें मोल धूर्त आर्यभट्ट कसें करितात, ही कोणत्या गांवची नीति ह्मणावी?

**यशवंत. प्र०**—सारांश-यावरून तुमच्या मतें नीति तरी कशास ह्मणावी?

**जोतीराव. उ०**—आपल्या सर्वांच्या निर्मीकास संतोष देण्यासाठीं सार्वजनीक सत्याचें भय मनीं धरून जो कोणी इतर मानव बांधवांबरोबर आचरण करील, त्यास नीति ह्मणावी; मग तो ख्रिस्ती असो, महमदी असो, सत्यशोधक समाजीयन असो, अथवा एखादा गावंढेकरी अज्ञानी असो.

## तर्क

**गुंडीराम धोंडीराम प्रवाशी. प्र०**—तर्क या शब्दाचे किती अर्थ होतात?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—तर्क या शब्दाचे तीन प्रकारचे अर्थ होतात. १ ला प्रकार-प्रत्यक्ष कर्त्यांवरून कर्मांचें आणि कर्मांवरून कर्त्यांचें ज्ञान होतें. २ रा प्रकार-पदार्थांच्या लक्षण दर्शनांवरून कर्मांचें जें ज्ञान होतें तें. ३ रा प्रकार-अनेक गोष्टींविषयीं अनेक प्रकारचे मात्र अंतःकरणाचें आकार म्हणजे तरंग होतात, ज्यामध्यें निश्चयरूपता असत नाहीं.

**गुंडीराम. प्र०**—१ ला प्रकार-कर्त्यांवरून कर्मांचें आणि कर्मांवरून कर्त्यांचें ज्ञान होतें तें कसें?

**जोतीराव. उ०**—कातणीनें जाळें केलें, पाकोळीनें कोठें बांधिलें, आणि मनुष्यानें शस्त्र केलें या वाक्यांत जाळें, कोठें आणि शस्त्र, यांचे कर्ते कातन, पाकोळी आणि

मनुष्य व त्याचप्रमाणें कातन, पाकोळी आणि मनुष्य यांचें कर्म जाळें, कोठें आणि शस्त्र होत, असें ज्ञान होतें.

गुंडीराम. प्र०—२ रा प्रकार–पदार्थांच्या लक्षण दर्शनावरून कर्मांचें जें ज्ञान होतें, तें कसें ?

जोतीराव. उ०—आपणांस कर्त्यांच्या लक्षणावरून कर्मांचें ज्ञान होतें. यावरून त्यांचे कर्ते अदृश्य असावेत असें अनुमान होतें. जसें–वायूनें जहाज बुडालें, विजेनें मनुष्य मेला आणि मनानें कुतर्क घेतले, या वाक्यांत जहाज, मनुष्य आणि कुतर्क यांचे कर्ते वायु, विज आणि मन होत व त्याचप्रमाणें वायू, विज आणि मन ह्यांचें कर्म जहाज, मनुष्य आणि कुतर्क होत, असें ज्ञान होतें.

गुंडीराम. प्र०—३ रा प्रकार–अनेक गोष्टींविषयीं अनेक प्रकारचे जे अंतःकरणाचे आकार ह्मणजे तरंग होतात, ज्यामध्यें निश्चयरूपता असत नाहीं, त्याविषयीं कसें ?

जोतीराव. उ०—ज्यामध्यें कर्त्यावांचून कर्म असतें व त्याच्या साक्षात्काराविषयीं अथवा लक्षणाविषयीं कांहींच ज्ञान होत नाहीं. जें पहावें तें सर्व अनुमानानें वाटेल तसें मंगडासारखें स्वकपोलकल्पित केलेलें असतें, त्याविषयीं महाभारतांतील धूर्त आर्यभट्टांनीं अज्ञानी जनांपासून आपला मतलब साधून हित होण्यासाठीं आपल्या सर्वांच्या निर्माण-कर्त्यांच्या जागीं लटकेच अष्टपैलू बाळबोध काळ्या कृष्णास कल्पून त्यानें लोभी अर्जुनास बोध केला होता, ज्यास गिता ह्मणतात, व पुढें कांहीं काळानें जेव्हां जाहामर्द मुसलमान लोकांचें या देशांत राज्य झालें, तेव्हां अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र पवित्र कुराणांतील सार्वजनीक सत्य पाहून मुसलमान होऊं लागतील, या भयास्तव धूर्त देशस्थ आळंदीकर ज्ञानोबानें, तो गीतेंतील बोध उचलून, त्याच्यावर ज्ञानेश्वरी नांवाचा ग्रंथ केला. तो सर्व अक्षरशः वाचून पाहिल्याबरोबर धूर्त आर्य धर्माचें पाचपेचीं आंधळें भारुड सर्व लोकांच्या ध्यानांत सहज येईल ?

गुंडीराम. प्र०—त्याविषयीं येथें थोडक्यांत विवेचन करण्याची कृपा कराल, तर बरें होईल.

## ज्ञानेश्वरी, बारावा अध्याय

जोतीराव. उ०—ज्ञानेश्वरी अध्याय १२ वा ॥ जो सर्व भूतांचे ठायीं ॥ द्वेषातें नेणेचि कांहीं ॥ आप-परू जया नाहीं ॥ चैतन्या जैसें ॥ १ ॥ असा खरोखरच समज जर बाळबोध कृष्णाजीचा होता, तर त्यानें पांडवांस मदत करून त्यांच्या हातून कौरवांचा मोड करवून त्यांचा सत्यानास करविला नसता. हें जें त्याचें करणें आपल्या सर्वांच्या निर्मीकास तर शोभणार नाहींच; परंतु त्यानें निर्माण केलेल्या जंगली रानवट मानवांससुद्धां तसें करणें आवडणार नाहीं ॥ उत्तमातें धरिजे ॥ अधमातें अव्हेरिजे ॥ हें कांहींच नेणीजे ॥ वसुधा जेवी ॥ २ ॥ असा खरोखर समज जर बाळबोध कृष्णाजीचा

होता, तर त्यानें धर्मराजास मान देऊन त्याचा सर्वोपरी सत्कार केला नसता. हें त्याचें पक्षपाती आचरण जंगली मानवांससुद्धां आवडणार नाहीं. ॥ गाईची तृषा हरूं ॥ व्याघ्रा विष होऊन मारूं ॥ ऐसे नेणेचिगा करूं ॥ तोय जैसे ॥ असा खरोखर समज जर बाळबोध कृष्णाजीचा होता, तर त्यानें काळीयाचें मर्दन केलें नसतें. ॥ तैसी अवघिया भूतमात्री ॥ एकपणें जया मैत्री ॥ कृपेसी धात्री ॥ आपण जो ॥ ५ ॥ असा खरोखर समज जर बाळबोध कृष्णाजीचा होता, तर त्यानें शिशुपालाशीं लग्न होणाऱ्या रुक्मीणीस चोरून नेऊन तिजबरोबर राक्षसविवाह लाविला नसता. ॥ आणि मी हें भाष नेणे ॥ माझें कांहिची न ह्मणे ॥ सुख दुःख जाणणे ॥ नाहीं जया ॥ ६ ॥ असा जर खरोखर समज बाळबोध कृष्णाजीचा होता, तर त्यानें द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं बहुरुप्यासारखें कपटानें द्रौपदीस साह्य केलें नसतें. ॥ वार्षीयेवीण सागरू ॥ जैसा जळें निर्भरू ॥ तैसा निरुपचारू ॥ संतोषी जो ॥ ७ ॥ असा खरोखर समज जर बाळबोध कृष्णाजीचा होता, तर त्यानें कालयवनाचा कपटानें वध करविला नसता. हें त्याचें कृत्य जंगली रानवट मानवाससुद्धां सुचलें नसतें. ॥ व्यापक आणि उदास ॥ जैसें कां आकाश ॥ तैसें जयाचें मानस ॥ सर्वत्रगा ॥ ९ ॥ खरोखर व्यापक जर बाळबोध कृष्णाजींचें मन होतें, तर त्याचा प्रद्युम्न नामक पुत्र जेव्हां शंबर नामक दैत्यानें चोरून नेला, तेव्हां त्याचें व्यापकत्व झोपी गेलें होते काय? व त्यानें नरकासुराच्या सात हजार पुत्रांसह त्यास मारिलें हें कसें? ॥ संसार व्यथें फिटला ॥ जो नैराश्यें विनटला ॥ व्याधा हातोनी सुटला ॥ विहंगम जैसा ॥ १० ॥ अशी जर बाळबोध कृष्णाजीची आर्य संन्याशासारखी वृत्ति होती, तर त्यानें सोळा सहस्र एकशत अष्ट नारींबरोबर मजा मारून यादवकुळांत संतती वाढवून त्या सर्वांची यादवी करून आपसांत नाश करविला नसता. ॥ जो आत्मलाभासारिखें ॥ गोमटें कांहिंचि न देखे ॥ ह्मणोनि भोग विशेखें ॥ हरींखेना जो ॥ ११ ॥ पहिल्या ओवीपासून सातव्या ओवीपर्यंत विचार केला असतां, केवळ पोकळ आत्मज्ञान करून घेतल्यानें आत्म्याचा उद्धार होऊन त्याची सद्गती होते, परंतु त्याच्या आत्म्यास उदयास आणणाऱ्या देहास काय लाभ प्राप्त होणार? याविषयीं कृष्णाजींनीं गीतेंत कांहींच म्हटलें नाहीं हें कसें? कारण, देहच जर नसता तर आत्मा बिचारा कोठून आला असता? ॥ कां घरीचिया उजेड करावा ॥ परखिया अंधार पाडावा ॥ हें नेणेचि गा पांडवा ॥ दीप जैसा ॥ १७ ॥ परंतु दिव्याच्या बुडाखालीं अंधार असतो, हें बाळबोध कृष्णाजीस कसें माहीत नव्हतें; कारण, त्या वेळीं पारदर्शक बिल्होरी हंड्या नव्हत्या. ॥ जो खांडावया घाव घाली ॥ कां लावणी जयानें केली ॥ दोघा एकचि साउली ॥ वृक्ष दे जैसा ॥ १८ ॥ या जगांत कित्येक विषारी झाडें आहेत आणि त्यांच्या योगानें तळें वगैऱ्यांतील पाणी बिघडतें व तें विषारी पाणी प्याल्याबरोबर निरपराधी जनांस विकार करून त्यांचा प्राण घेतें, हें कसें? ॥ नातरी इक्षुदंडु ॥ पाळि तया गोडु ॥ गाळी तया कडु ॥ नोहेचि जेवीं ॥ १९ ॥ माळी उसाच्या लावण्या करून त्यास जेव्हां पाणी देतात,

तेव्हां ते माळ्यांच्या डोळ्यांस पानाचे सपके मारून त्यांचे डोळे विनाकारण घायाळ करितात, हें कसें ? ।। तिही ऋतु समान ।। जैसे का गगन ।। तैसा एकचि मान ।। शितोष्णी जया ।। २१ ।। आकाशांत जसजसें उंच जावें, तसतसें जास्ती शीत अनुभवास येतें. याविषयीं बाळबोध कृष्णाजीस अनुभव नव्हता काय ? ।। माधुर्यें चंद्रिका ।। सरिसी रायारंका ।। तैसा जो सकळिका ।। भूता समू ।। २३ ।। चंद्राच्या संबंधानें जेव्हां समुद्रास भरत्या व ओहोट्या येतात, तेव्हां नित्य किती किटकांचा नाश होतो, ह्याविषयीं बाळबोध कृष्णाजीस माहिती नसावी काय ? ।। अघविया जगा एक ।। सेव्य जैसें उदक ।। तैसे जयाचे तीन्ही लोक ।। आकांक्षिती ।। २४ ।। पृथ्वींतील ज्यास उदक रॉक आईल ह्मणतात त्याचे तिन्ही लोक सेवन करण्यास इच्छित नाहींत, हें कसें ? ।। जो यथालाभें संतोखे ।। अलाभे न पारुखे ।। पाऊसेवीण न सुके ।। समुद्र जैसा ।। २७ ।। पर्जन्याची अनावृष्टि झाल्यामुळें समुद्र कांहीं सुकत नाहीं, त्याचप्रमाणें पर्जन्याची अतिवृष्टी झाल्यामुळें समुद्र कांहीं वाढत नाहीं, तो दोन्ही वेळेस सारखा समान असतो, हें कसें ? ।। आणि वायुसि एके ठायीं ।। बिढार जैसे नाहीं ।। तैसा न धरीच कांहीं ।। आश्रम जो ।। २८ ।। वायू भरीव वस्तूंच्या ठिकाणीं रहात नाहीं; परंतु तो एकंदर सर्व पोकळींत आश्रम करून राहतो, हें निर्वीवाद आहे. ।। हें विश्वचि माझें घर ।। ऐशी मती जयाचि स्थीर ।। किंबहुना चराचर ।। आपण जहाला ।। २९ ।। मग यावरिहि पार्था ।। माझ्या भजनीं आस्था ।। तरी तयाते मी माथां ।। मुकूट करीं ।। ३० ।। स्थीर मतीनें विश्व हें आपलें घर मानून, किंबहुना जो कोणी मानवप्राणी चराचर जर झाला, तर त्यानें पोकळ कृष्णाच्या भजनाची आस्था तरी कशासाठीं करावी ? कारण, त्याचें ह्याच अध्यायांतील पहिल्या ओवीपासून सातव्या ओवीपर्यंत आचरण जर सतत कायम रहातें, तर त्यांत पाप अथवा पुण्य आचरल्यानें कांहींच कमज्यास्ती होत नाहीं.

## ज्ञानेश्वरी, तेरावा अध्याय

तेराव्या अध्यायांतील सातव्या व आठव्या ओवींतला अभिप्राय ज्या कोणास सर्वज्ञता आल्याबरोबर त्याचा महिमा वाढेल, या भयास्तव त्यानें वेड्याचें सोंग घेणें व त्यानें आपला चतुरपणा आवडीनें लपविण्यासाठीं पिसा होणें, हें बाराव्या अध्यायांतील दुसऱ्या ओवीस अगदीं विरुद्ध आहे. तेराव्या आध्यायांतील विसावी ओवी "तरी अहिंवसा बहुतापरी ।। बोलीली असें अवधारी ।। आपुल्या मतांतरी ।। निरूपिली ।। २० ।। असे शब्द वापरले नसते व यावरून जगांतील इतर धर्माविषयीं बाळबोध कृष्णाजीस कांहींच माहीत नव्हतें, असें सिद्ध होतें. कारण तसें असतें, तर कृष्णाजीनें "आपुल्या मतांतरी निरूपिली ।।" असें शब्द वापरले नसते व त्याचप्रमाणें धूर्त आर्यांचे मीमांसा ग्रंथांतील आधार त्यानें पुढें केला नसता. बाराव्या अध्यायांतील ।। हें विश्वची माझे घर ।। ऐशी मती जयाचि स्थीर ।। किंबहुना चराचर ।। आपण जहाला ।। २९ ।। असें असतां

तेराव्या अध्यायांत ॥ अहो वसती धवळारे ॥ मोडूनी केली देऊळी देव्हारे ॥ नागुनि व्यव्हारे ॥ गवादी घातली ॥ ३१ ॥ यावरून अष्टपैलू कृष्णाजी निवळ मूर्तीपूजक होता, असें सिद्ध होतें. बाराव्या अध्यायांतील पहिल्या ओवीपासून सातव्या ओवीपर्यंत आर्यांच्या देवाचें आचरण जर ठाम आहे, तर काळाच्या मुखांत जाणत्या धूर्त आर्य मानवांस गुरु करण्याचें काय प्रयोजन ? तेराव्या अध्यायांतील ॥ स्वशिखराचा भारू ॥ नेणें जैसा मेरू ॥ कीं धरा यज्ञ सुकरू ॥ वोझे न ह्मणे ॥ ७९ ॥ सूकर यानें आपल्या दांतावर पृथ्वी धरली त्यावेळीं त्यास कांहीं ओझें झालें नाहीं व त्याचप्रमाणें सूकराचा धाकटा भाऊ कृष्णाजी यानें गोवर्धन पर्वत उचलून त्यास आपल्या करंगळीवर धरला तेव्हां त्यास ओझें झालें नाहीं. यांत नवल तें कोणतें ? ॥ उदयिजतां बोधार्का ॥ बुद्धीची डाळ सात्विका ॥ भरोनिया त्र्यंबका ॥ लाखोली वाहे. ॥ ११० ॥ ही बाराव्या अध्यायांतील साहव्या ओवीस अगदीं विरुद्ध आहे. ॥ मृत जैसा शृंगारिला ॥ गाढव तीर्थी न्हाणिला ॥ कडु दुधीया माखिला ॥ गुळें जैसा ॥ १४४ ॥ गाढवानें जर तीर्थी स्नान केलें, तर त्यास कांहीं पवित्रता येत नाहीं. यावरून धूर्त आर्यांतील तिर्थांचा बडीवार तो काय ? सारांश–सुज्ञ जनांस माहिती होण्याकरितां नमुन्यासाठीं आर्य ज्ञानोबाचे ज्ञानेश्वरींतील निराधार तर्कांचे फारच थोडे वेंचे घेऊन त्यांचें कामापुरतें खंडण करून हा विषय येथें तूर्त संपवितों.

## दैव

**॥ मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें ॥ तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥ ८ ॥**

—रामदास.

**गणपतराव दर्याजी थोरात. प्र०**—दैवाचे कोणते प्रतिशब्द आहेत ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—दैवास नशीब, प्रालब्ध, प्राक्तन, संचित, रती, सुकृत, ल्लाटरेषा, ब्रह्मलिखित, असे अनेक प्रतिशब्द आहेत. याविषयीं उदाहरणें—एखाद्या आईबापानें आपल्या मुलास विद्या शिकण्याची गोडी नसतां, त्यास दुराग्रहानें त्याच्या मनाविरुद्ध शाळेंत घालून त्यास अभ्यास करावयास लाविलें; तथापि त्यास स्वभावतः विद्या शिकण्याची मुळींच गोडी नसल्यामुळें, तो अविद्वान् निपजल्याबरोबर त्याजविषयीं सर्व लोक असें म्हणूं लागतात कीं, विद्या शिकणें हें त्याच्या दैवांतच नव्हतें. त्याचप्रमाणें एखाद्या आईबापानें मुलास विद्या शिकण्याची गोडी असतां त्यास शाळेंत पाठविण्याचा प्रयत्न जरी केला नाहीं, तथापि त्यानें आपण होऊन शाळेंत जाऊन विद्या संपादन केल्याबरोबर त्याजविषयीं सर्व लोक असें म्हणूं लागतात कीं, विद्या शिकणें हें त्याच्या दैवांतच होतें. एखाद्या कारागिरानें शिल्पशास्त्र वगैरे विद्येमध्यें पुरती माहिती करून घेतल्याशिवाय आगगाडी करण्याची कल्पना करून ती तयार करूं लागल्यामुळें त्याचा सर्व पैसा खर्ची पडून त्याची सर्वोपरी नुकसानी झाल्याबरोबर त्याज-

विषयीं सर्व लोक असें म्हणूं लागतात कीं, आगगाडी तयार करून त्यामध्यें यश मिळविणें हें त्याच्या नशीबांतच नव्हतें. त्याचप्रमाणें एखाद्या कारागिरानें शिल्पशास्त्र वगैरे विद्येमध्यें चांगली पूर्ण माहिती करून घेतल्यानंतर निर्विघ्नपणें आगगाडी तयार केल्याबरोबर, त्याजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, आगगाडी तयार करतां येणें हें त्याच्या नशिबांतच होतें. एखाद्या व्यापाऱ्यानें व्यापाराविषयीं बिलकूल माहिती करून न घेतां, त्यानें व्यापार करण्याचें काम सुरू करतांच त्यामध्यें त्याची सर्वोपरी नुकसानी झाल्याबरोबर त्याजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, व्यापारामध्यें यश मिळीवणें हें त्याच्या प्रालब्धांमध्येंच नव्हतें. त्याचप्रमाणें एखाद्या मनुष्यानें व्यापारासंबंधीं माहिती करून घेण्यासाठीं एखाद्या वाकबगार व्यापाऱ्याच्या दुकानीं उमेदवारी करून त्याविषयीं चांगली माहिती करून घेतांच तो व्यापार करूं लागल्याबरोबर त्यास यश येऊं लागतें. यामुळें त्याजविषयीं सर्व लोक त्यास असें ह्मणूं लागतात कीं, व्यापारामध्यें यश मिळणें हें त्याच्या प्रालब्धांतच होतें. एखाद्या आईबापांस चोरी करण्याची संवय असल्यामुळें त्यांचीं मुलेंहि त्यांसारखीं चोर निपजून त्यांस अखेरीस काळें पाणी अथवा फांशीच्या शिक्षा झाल्याबरोबर त्यांजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, काळें पाणी अथवा फांशीची शिक्षा होणें हें त्यांच्या प्राक्तनांतच होतें. त्याचप्रमाणें एखाद्या मुलाचे आईबाप स्वभावानें सद्‌गुणी असल्यामुळें त्यांचीं मुलेंहि त्यासारखीं सद्गुणी निवडतांच त्यांस मोठमोठ्या सरकारी हुद्याच्या जागा मिळून त्यांचा लौकीक झाल्याबरोबर, त्यांजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, मोठमोठ्या सरकारी हुद्याच्या जागा मिळून त्यांचा लौकीक होणें हें त्यांच्या प्राक्तनांतच होतें. एखाद्या राजानें लढाईसंबंधीं सर्व सामग्र्या तयार केल्याशिवाय शत्रुबरोबर लढाई करतांच त्याचा मोड झाल्याबरोबर त्याजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, युद्धामध्यें मोड होणें हें त्याचे संचितांतच होतें. त्याचप्रमाणें एखादा राजा धनुर्विद्येसंबंधीं एकंदर सर्व सामग्र्या सिद्ध करून जेव्हां शत्रूचा मोड करितो, तेव्हां त्याजविषयीं सर्व लोक असें ह्मणूं लागतात कीं, युद्धामध्यें जय मिळीवणें हें त्याचे संचितांतच होतें. एखादा अक्षरशून्य अज्ञानी ठोंब्या, ज्यास व्यापारधंद्याविषयीं स्वतः अनुभव नसून तो अगोचरपणा करून सरकारी कामांत मक्ता घेण्याचा धाडसपणा करितो; त्याचा असा समज असतो कीं, "जवभर रतीपुढें तोबराभर अक्कल कांहीं कामाची नाहीं." अशा अज्ञानी धाडस मनुष्यानें एखादा मोठा मक्ता घेतला आणि त्यानें केवळ पोकळ दैवावर भरंवसा ठेवून त्यामध्यें जाणूनबुजून हयगय केल्यामुळें त्यास तोटा आल्याबरोबर त्याजविषयीं सर्व लोक असें म्हणूं लागतात कीं, त्याला मक्त्यामध्यें तोटा आला, येथें त्याच्या रतीनें मागें घेतलें. त्याचप्रमाणें सदरच्या अज्ञानी ठोंब्यानें एखादा मोठा मक्ता घेतल्यावर सरकारी कामगारांस लांच दिल्यामुळें अथवा छक्केपंजे करून त्या कामांत कांहीं कसर ठेवल्यामुळें त्यास एखाद्या वेळीं मक्त्यामध्यें थोडासा नफा झाल्याबरोबर

त्याजविषयीं सर्व लोक असें म्हणूं लागतात कीं, त्याच्या रतीनें आपुलें पाऊल पुढें सारलें, म्हणूनच मक्त्यामध्यें त्यास नफा झाला. असो, एक सत्यशोधक समाजीयन एके वेळीं वैशाखमासीं भर उन्हांत प्रवास करीत असतां, सुमारें बारा वाजतां उन्हाच्या तापानें अतिशय व्याकूळ होऊन क्यॉनालच्या शेजारीं एका थंडगार वृक्षाचे गाढ छायेखालीं ऊन टाळण्याकरितां विश्रांतीस बसतो, तों बाराची तोफ दणाणल्यामुळें क्यॉनालांतील शेवाळ काढणाऱ्या बंदीवानांस दोन प्रहरची सुटी मिळतांच, ज्या झाडाच्या छायेखालीं हा प्रवासी विश्रांतीस बसला होता, त्या झाडाखालीं कांहीं शिपायी लोकांनीं एकंदर सर्व बंदीवानांस भाकरी खाण्याकरितां आणून बसविलें. नंतर भाकरी खाल्ल्यावर त्यांपैकीं कांहीं बंदीवानांबरोबर प्रवाशाचें संभाषण झालें, तें मासल्याकरितां पुढें देतों :—

**प्रवासी.** (पहिल्या कैद्यास प्रश्न करितो) तूं कोण जातीचा आहेस ?

**१ ला बंदीवान. उ०**—महाराज, मी ब्राह्मण जातीचा आहें.

**प्रवासी. प्र०** —अरे, तूं जातीचा गाईसारखा गरीब ब्राह्मण असतां तुझ्या पायांत बिड्या पडण्याचें कारण काय ?

**१ ला बंदीवान. उ०**—गाईसारखा गरीब मी ब्राह्मण जातीचा त्रिकाळ स्नानसंध्या करणारा आहें खरा; परंतु बिड्या पडणें हें माझ्या सुकृतांत होतें, याला मी काय करूं ?

**प्रवासी. प्र०**—तुझ्या सुकृताप्रमाणें जर तुझ्या कपाळीं बिड्या पडल्या, तर तुम्हां धूर्त आर्यांचें सुकृत मोठें चमत्कारिक आहे बुवा.

**१ ला बंदीवान. उ०**—असें नव्हे, महाराज, मी हुबेहूब खोट्या नोटा करून कित्येक वेळां चावडीवर, उघड दिवसा दरवडा घातल्याप्रमाणें सरकारच्या डोळ्यांत माती टाकून मी आपला तळीराम गार केला. ही सर्व लबाडी जेव्हां सरकारच्या नजरेस आली, तेव्हां त्यांनीं ही शिक्षा यथायोग्य दिली आहे. सुकृत—बिचाऱ्याकडे याचा काय बोल आहे ? हीं मी माझ्या दुष्कर्मांची फळें भोगीत आहें.

**प्रवासी.** (दुसऱ्यास प्रश्न करितो) तुझ्या पण गळ्यांत धूर्त आर्य ब्राह्मणासारखा पांढरा दोरा आहे, म्हणून तूं ब्राह्मण असावास, असें मला वाटतें.

**२ रा. बंदीवान. उ०**—होय महाराज, माझी जात ब्राह्मणाचीच आहे.

**प्रवासी. प्र०**—तुम्ही ब्राह्मण केवळ दया, क्षमा, शांतीचें माहेरघरच असतां तुझ्या पायांत बिड्या रे कां ?

**२ रा. बंदीवान. उ०**—या जन्मीं माझ्या पायांत केव्हां तरी बिड्या पडाव्यात, म्हणून माझ्या ललाटीं होतें, तेथें माझा उपाय नाहीं.

**प्रवासी. प्र०**—तुझ्या पायांत बिड्या पडणें हें जर तुझ्या ललाटींच होतें, तर सरकारानें तुला शिक्षा कां दिली ? ते वेळेस त्यांनीं तुझ्या ललाटरेषेविषयीं कांहीं विचार केला नाहीं, हें कसें ?

**२ रा. बंदीवान. उ०**—तसें नव्हे, महाराज, मी विद्वान् केवळ सरकारच्या खर्चानें

झालों असून सरकारी कामगार झालों, परंतु मी त्रिकाळ स्नान–संध्या करून देवपूजा करण्याचें धाब्यावर ठेवून सर्व काळ दीन, अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांवर जुलूम करून कित्येक वेळां लांच खाल्ले, तेव्हां सरकारनें मला ही योग्य शिक्षा दिली. वास्तविक विचार करतां एथें कैचें लल्लाट आणि येथें कैचें फल्लाट आलें आहे!

प्रवासी. (हासत हासत) म्हणाला, " कां, अठरा वर्णांनां ब्राह्मण गुरु म्हणविणारे पांढरा दोरेवाले तिसरे महाराज, " तुमची जात कोण आहे ?

३ बंदीवान. उ०—माझी पण जात ब्राह्मणाचीच आहे.

प्रवासी. प्र०—अरे, येथें ब्राह्मण कैद्यांची तर सांतच आली आहे. असो, तुझ्या पायांत बिड्या रे कां ?

३ रा बंदीवान. उ०—या जन्मीं माझ्या पायांत बिड्या पडणें हें माझ्या कपाळीं ब्रह्मलिखित होतें, तेथें माझा निरुपाय, याला मी काय करावें ?

प्रवासी. प्र०—जर तुझ्या कपाळीं बिड्या पडण्याचें ब्रह्मलिखित होतें, तर सरकारानें तुला शिक्षा तरी कां दिली ?

३ रा बंदीवान. उ०—तसें नव्हे, देशमुख, मी नाना पेशव्यासारखें या आपल्या धर्माविरुद्ध हिंसक सरकारावर बंड करून कित्येक अज्ञानी रामोशी माळी वगैऱ्यांच्या प्राणास भवलों व अज्ञानी लोकांतील शांततेचा क्षय केल्यामुळें, मला ही शिक्षा झाली. ब्रह्मलिखित होतें म्हणून दोष देतां येत नाहीं. हीं मी माझ्या दुष्कर्मांचीं फळें भोगीत आहें.

प्रवासी. प्र०—कां हो भटजी, तुम्ही जर हिंसक नाहीं, तर तुमचा नाना पेशवा रेसिडेंटसाहेबांच्या टेबलावर बसून मांडीशीं मांड देऊन, त्यांच्याबरोबर मद्यमांसावर कधीं कधीं झोड उडवीत नव्हता काय ? आणि त्याचप्रमाणें तुमचे आर्यांचे पूर्वज यज्ञांच्या व श्राद्धांच्या निमीत्तानें गायागुरें भाजून खात नव्हते काय ? असें असून तूं इंग्रजांवर नाक चढवून काय बोलतोस ?

३ रा बंदीवान. उ०—आतां आमची कामाची जुपी होण्याची वेळ जवळ आली आहे, नाहीं तर त्याविषयीं तुम्हांला यथास्थित उत्तर दिलें असतें.

प्रवासी. प्र०—अरे, तूं काळा दोरावाला कोण जातीचा आहेस ?

४ था बंदीवान. उ०—जोहार महाराज–मी व्हय, मी तुमचा माविताच उष्ट खाणारा महार जातीचा आहे. लई दिवस झाल, मग बामन महाराजांनीं आमच्या गळ्यांत काळा दोरा घालून आम्हांस गांवाबाहेर हाकून दिल.

प्रवासी. प्र०—अरे, तूं खरा निरुपद्रवी म्हार जातीचा असतां तुझ्या पायांत रे बिड्या कां ?

४ था बंदीवान. उ०—नव्ह, मायबाप, या जनमीं माझ्या पायांत बेड्या पडण हें माझ्या दैवांत होतं.

**प्रवासी. प्र०**—तुझ्या दैवांत जर बिड्या होत्या, तर अविचारी सरकारानें तुला शिक्षा तरी कां दिली ?

**४ था बंदीवान. उ०**—तस नव्हं देसमुक महाराज,—माझ्या बायकून लई लबाडी केल्यामुळ मी रागाच्या भिरकंडीत तिला सहज चापट मारतांच तिचा जीव निघुन गेला, यामुळ ही मला शिकशा झाली. याचा बोल दैवावर कायी नाहीं.

**प्रवासी. प्र०**—तुझ्या बायकोनें अतिशय मूर्खपणा केला, तो कोणता ?

**४ था बंदीवान. उ०**—एके दिशीं कुचित् ब्राह्मण मामलदाराच्या कचाट्यांत घावल्यामुळ त्यान रातच्या बारा वाजसतंव्हर आनपान्याशिवाय मजपासून गावकीच काम घेतल. आणि मंग मी घरी गेलों; तव्हां घरात बघतो, तो माझ्या बायकून चुलीपाशी + + + अक्षी घान केली आणि घराच्या एका कोपऱ्यांत झोपी जाऊन डराडर घोरत पडली व्हती. यावरून मी तिजला पुसल कीं, तूं घराबाहेर न जातां घरातच कां ××× ? ती काळोखी रात असल्यामुळ मला बाहेर ××× जान्याच लई भ्या वाटल आणि हाडळीच्या भयामुळ मी घरांतच ×××, आस खरूखर उत्तर द्याथाच एके बाजला ठेऊन माझ्या बायकून घाबरून उत्तर दिलें कीं "चुलीपाशी ××× आणि दैवांत होते ते झाले." यावरून मी सर्व दिवस उपाशीं असल्यामुळ रागाच्या भिरकंडींत मी तिला एक चपराक मारतांच कोंबडीसारखी खुडखुड करून तिचा परान निघुन गेला. यावरून सरकारानें त्या गुन्ह्याबद्दल मजला जन्मठेप दिली. इथ दैव कैच आणि इथ फैव कैच !

**गणपतराव. प्र०**—यास्तव दैव आहे, किंवा नाहीं याविषयीं चांगला उलगडा करून सांगाल, तर फार बरें होईल !

**जोतीराव. उ०**—दैव हें कल्पित धोरणानें मानलेलें कर्म आहे. त्यास मुळींच कर्ता नसतो. नशीब, प्रालब्ध आणि संचित या सर्वांचा कर्ता अनुमानानें आपण सर्वांचा निर्माणकर्ता मानीला आहे. रती, सुकृत हीं पूर्वजन्मीं आपण केलेल्या कर्माचीं फळें होत, अशी कल्पना आहे. लल्लाटरेषा व ब्रह्मलिखीत हें आमच्या पूर्व जन्मींच्या पापपुण्यावरून जन्मास घालतेवेळीं ब्रह्माजीनें आपल्या कपाळावर सर्व लिहून ठेवलें असतें, त्याप्रमाणें तें सर्व घडून येतें. या सर्वांवरून असें सिद्ध होतें कीं, उद्योग आणि आळस याविषयीं परीणामीचें अनुमान सर्व लोकांस कळत नाहीं; यास्तव ते त्यास अनुमानानें दैव ह्मणतात. दैव हें एक रामायण व भागवतांतील भाकड दंतकथेसारखेंच कल्पिलें आहे, तें सर्व मिथ्या आहे, याविषयीं रामदासाचें उदाहरणार्थ :

**अभंग**

**एक देव आहे खरा ॥ माये नाथिला पसारा ॥ १ ॥**
**हेंचि विचारें जाणावें ॥ ज्ञाता तयासी ह्मणावें ॥ २ ॥**
**रामदासाचें बोलणें ॥ स्वप्नापरी जायी जिणे ॥ ३ ॥**

### अभंग

जया ज्ञान हें नेणवे ॥ पशु तयासी ह्मणावें ॥ १ ॥
कोणे केले चराचर ॥ कोण विश्वाचा आधार ॥ २ ॥
ब्रह्मादिकाचा निर्मीता ॥ कोण आहे त्यापरता ॥ ३ ॥
अनंत ब्रह्मांडाच्या माळा ॥ हे तो भगवंताची लिळा ॥ ४ ॥
रामदासाचा विवेक ॥ सर्व–कर्ता देव एक ॥ ५ ॥

### अभंग

ज्ञानाविणें जे जे कळा ॥ ते ते जाणावी अवकळा ॥ १ ॥
ऐसें भगवंत बोलीला ॥ चित्त द्यावें त्याच्या बोला ॥ २ ॥
एकें ज्ञानेची सार्थक ॥ सर्व कर्म निरर्थक ॥ ३ ॥
दास म्हणे ज्ञानावीण ॥ प्राणी जन्मला पाषाण ॥ ४ ॥

### अभंग

ज्याचें होतें त्याणें नेलें ॥ एथें तुझें काय गेलें ॥ १ ॥
वेगीं होई सावधान ॥ करी देवाचें भजन ॥ २ ॥
गती नकळे होणाराची ॥ हे तो इच्छा भगवंताची ॥ ३ ॥
पूर्व संचिताचें फळ ॥ होती दुःखाचे कल्लोळ ॥ ४ ॥
पूर्वीं केलें जें संचित ॥ तें तें भोगावें निश्चीत ॥ ५ ॥
दास म्हणे पूर्व रेखा ॥ प्राक्त न टळे ब्रह्मादिकां ॥ ६ ॥

सदरच्या अभंगांत अनंत ब्रह्मांडांतील ब्रह्माजीस निर्माणकर्त्याची लिला व ज्ञानविषयीं अनंत ब्रह्मांडाचा निर्माणकर्ता भगवान् बोलला, हें मानव आर्य रामदासास ऐकूं आलें व त्याचप्रमाणें भगवंताची इच्छा व आर्याजीचें ब्रह्मादिकांस टाळतां न येणारें संचित; या तिन्ही वाक्यांतील खरें तथ्य रामदासास कळालें नव्हतें, याविषयीं मोठें आश्चर्य वाटतें. कारण, लिलेविषयीं ज्ञान, इच्छा आणि संचित हीं परस्परांशीं किती विरुद्ध आहेत, हें साधारण मनुष्याच्यासुद्धां मनांत सहज येतें.

## आर्यभट ब्राह्मणांचे वेद आणि सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्याची तुलना

**गोविंदराव गणपतराव काळे. प्र०**—महमदी लोक आपल्या धर्मांतील मूसा, दावीद, सुलेमान वगैरे सत्पुरुषांचे ग्रंथांसह हजरत महमद पैगंबरानें केलेल्या पवित्र कुराणाचीं बाकीच्या इतर सर्व लोकांकरितां अक्षरशः भाषांतरें करून ते जगजाहीर जरी करीत नाहींत, तरी त्यांच्या धर्मांतील पुस्तकें एकंदर सर्व मानवांस ऐकण्यास अथवा वाचून

पहाण्यास अथवा त्याप्रमाणें आचरण करण्यास कोणत्याच तऱ्हेचा ते प्रतिबंध करीत नाहींत, हें कसें?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—इतर सर्व लोकांनीं कुराणाप्रमाणें वर्तन करूं लागल्याबरोबर मुसलमान लोकांस अतिशय आनंद होतो. कारण ते असें समजतात कीं, कुराण हें अति पवित्र असल्यामुळें एकंदर सर्व जगांतील मानवप्राण्यांनीं मात्र त्याचा उपभोग घेतल्याबरोबर त्यांमध्यें मनुष्यपणा येणार आहे.

**गोविंदराव.** प्र०—त्याचप्रमाणें खिस्ती लोक आपल्या धर्मांतील मुख्य बायबल खिस्तीयन लोकांसह एकंदर सर्व जगांतील सर्व प्रकारच्या परधर्मी लोकांस प्रांजळ बुद्धीनें वाचून पाहण्यासाठीं बहुतेक निरनिराळ्या भाषांमध्यें त्याचे तरजुमे करून सर्वांमध्यें जगप्रसिद्ध करितात. यावरून तें सार्वजनीक ईश्वरप्रणीत सत्याच्या नांवाला कांहींसें शोभण्यासारखें दिसतें, असें मला वाटतें.

**जोतीराव.** उ०—तुला त्याविषयीं कसेंहि वाटो. परंतु बायबलामध्यें कोणत्याच प्रकारची आवडनिवड नसतां त्याचा सर्व मानव प्राण्यांना सारखा उपभोग घेतां येतो, असें असून धूर्त आर्यभट्टांचे अज्ञानी शूद्र स्नेही आपल्या ग्रंथांत असें लिहितात कीं– "इंग्रज लोकांचें राज्य या देशांत झालें तेव्हां त्यांनीं येथें इंग्रजी शाळा वगैरे स्थापून व पाद्रींकडून आपल्या खिस्ती धर्माचा उपदेश करवून या देशांतील लोकांत जो आस्तिकपणा वागत होता, त्याचा नाश केला; म्हणून इंग्रजी विद्या शिकलेले लोक आपलीं (आर्य धूर्त भट्टांचीं) शास्त्रें खोटीं व अज्ञानभरीत आहेत, असें मानूं लागले आहेत;" याला कोणत्या प्रकारचा शहाणपणा म्हणावा?

**गोविंदराव.** प्र०—तसेच आर्यभट ब्राह्मणांचे वेद सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्याच्या नांवाला कांहींसे शोभण्याजोगते आहेत काय?

**जोतीराव.** उ०—धूर्त आर्य ब्राह्मणांनीं अंकित केलेल्या शूद्रादिअतिशूद्रांस खेरीज करून, आपल्या आर्यभट जातीशिवाय इतर परधर्मी इंग्लिश, फ्रेंच वगैरे म्लेंछांनीं त्यांस फक्त कांहीं द्रव्याची लालूच दाखविल्याशिवाय त्यांनीं आजपावेतों आपलें मन मोकळे करून प्रसिद्धपणें त्यांच्या वेदाचा मुखडा तर कोणासहि दाखविला नाहीं; यावरून आर्यांचे मुख्य वेद सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्याच्या नांवाला बिलकूल शोभण्याजोगते नाहींत; आणि प्राचीन काळीं धूर्त आर्य ब्राह्मण लोक ज्ञानसंपन्न, धर्मनिष्ठ, नीतिमान होते, म्हणून म्हणणाऱ्या वाचाळ शूद्रास कोणत्या तऱ्हेचा धर्मलंड म्हणावा?

**गोविंदराव.** प्र०—या जगांतील एकंदर सर्व धर्मांतील लोकांबरोबर धूर्त आर्यांची वर्तणूक कशी कां असेना, परंतु आर्यांनीं पूर्वी धनुर्विद्येच्या बळानें व हल्लीं पूर्वी आर्यांतील धूर्त ऋषींनीं आपल्या पक्षपाती ग्रंथांनीं, कपटानें कायम केलेल्या दासानुदास शूद्रादि अतिशूद्रांस मुळींच वेद पाहूं अथवा ऐकूं देत नाहींत, यांतील इंगित काय असावें बरें?

**जोतीराव.** उ०--त्यांतील कृत्रिमी आर्यांचें इंगित काय आहे, याविषयीं तूं धूर्त आर्यभटांसच विचार, म्हणजे ते कदाचित् त्याविषयीं तुला कळवितील.

**गोविंदराव.** प्र०--धूर्त आर्यब्राह्मण तळहातावर मेखा सोसणारे पुरे धमलंड आहेत. ते आपल्या वेदांतील इंगिताविषयीं दुसऱ्या कोणाला कधींच कळविणार नाहींत. तेथें मज पामराची कोण कथा! यास्तव तुम्हीच कृपा करून त्याविषयीं प्रतिपादन कराल, तर फार बरें होणार आहे.

**जोतीराव.** उ०--नको रे बाबा, नको! त्यांचे इंगित तुला कळविण्याची अद्याप वेळ आली नाहीं. कारण, अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र केवळ अक्षरशुन्य आहेत, यास्तव ते भर रस्त्यांत धूर्त आर्यभट्टांच्या धोतराला पिळ घालून त्यांजबरोबर त्याविषयीं वाद घालूं लागल्याबरोबर त्या अडमूठांची समजूत कोणी काढीत बसावी.

**गोविंदराव.** प्र०--तें कसें कां असेना, तुम्ही या परम न्यायी इंग्रज सरकारच्या राज्यांत ईश्वरास स्मरून सत्य जें असेल, तें जगापुढें आणा. त्याविषयीं आतां धूर्त आर्यभटांचें फारसें भय तुह्मांला बाळगण्याची जरूरी दिसत नाहीं.

**जोतीराव.** उ०--अरे बाबा, अट्टल धूर्त आर्यब्राह्मण नास्तिकांनीं पापपुण्याचा विधिनिषेध न मानितां, त्यांनीं आपण सर्वांच्या निर्मिकाची उचलबांगडी करून त्याच्याऐवजीं आपण स्वतः अहंब्रह्म ह्मणजे इतर सर्व अज्ञानी मानवांचे भूदेव होऊन, त्यांपैकीं निवळ शूद्रादि अतिशूद्र मूढजनांस सर्वकाळ निर्लज्यपणें उघड नाना प्रकारच्या धर्मलंडी ठकबाज्या करून त्यांस भोंदाडून खातात, या त्यांच्या कृत्रिमी ठकबाज्यांविषयीं मीं थोडेसें जगजाहीर केल्याबरोबर त्यांनीं सर्व बलीस्थानभर मजविषयीं, कोल्हेभूक करून, अशी कंडी उठविली आहे कीं, मी ब्राह्मणांसह त्यांच्या कल्पित ब्रह्माचा मोठा द्वेष्टा आहें. आणि त्यांतून बहुतेक शूद्रादि अतिशूद्र निवळ अज्ञानी असल्यामुळें धूर्त भटांनीं मोठी कावेबाजी करून, अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस, माझीच उलटी निंदा करावयास लाविलें आहे; यास्तव धूर्त आर्यभट्टांची कावेबाजी तूर्त बाहेर पाडण्याची संधी आली नाहीं.

**गोविंदराव.** प्र०--धूर्त आर्यभट्टांनीं बहुतेक शूद्रादि अतिशूद्र अज्ञानी असल्यामुळें त्यांनीं त्यांस जरी आपणावर दगड फेकावयास लाविलें, तरी आपण आपलें पवित्र मानवी कर्तव्यकर्म करण्यास चुकूं नये, हें आपलें सत्यशोधक समाजीयनांचें ब्रीद असतां आपण असल्या सत्यशून्य, आर्यभट्ट ब्राह्मणांच्या वितंडवादास भ्यावें तें कां? तर तुम्ही कंबर बांधून या निर्दय आर्यभट्टांचे खल्लड वेद बाहेर काढून त्यांची सार्वजनिक ईश्वरप्रणीत सत्यांशीं तुलना करून जर दाखवाल, तर कोट्यावधी शूद्रादि अतिशूद्रांचे पाय थरीस लागणार आहेत.

**जोतीराव.** उ०--वेद रचल्यापासून धूर्त आर्यभट्टांनीं आपले खल्लड वेद जर बिळांत लपवून ठेविले आहेत; तर त्यांस त्यांच्या बिळाच्या बाहेर काढून त्यांपैकीं ऋग्वेदाचें मात्र

अक्षरशः आतांच्या आतां प्राकृत करून त्याची सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्याशीं तुलना मी कशी करावी ?

**गोविंदराव.** उ०—धूर्त आर्यभटांनीं आरंभापासून आजपावेतों आपले वेद जर लपवून ठेविले आहेत, तर वारूसारखी त्यांच्या पोटाखालीं काय खोड आहे ?

**जोतीराव.** उ०—वेदांच्या पोटाखालीं वारूसारखी टळटळीत मुख्य गोम आहे. ती अशी कीं, कंगाल आर्य[1] लोकांनीं प्रथम जेव्हां इराणांत आपलें काळें करून धनुर्विद्येच्या बळावर आडहत्यारानें लढणाऱ्या सधन क्षत्रियांच्या सुवर्णमय बळीस्थानांत आले, तेव्हां त्यांचे या देशांत मुख्य हाडवैरी नाना प्रकारचे लोक होते. त्यांस आर्य लोक द्वेषानें दस्यु, हल्लीं आम्हा शूद्रांपैकीं महामुनि गोसाव्यांत गिरी, पुरी, भारथी वगैरे दशनामी लोक आहेत. या शब्दांचें मुळ दस्यू असावें असें अनुमान होतें. (लुटारू मागाहून दास). महाअरी (ह्मार) क्षुद्र (शूद्र) असें म्हणूं लागले. दस्यू लोकांपैकीं कित्येक राज्य-धुरंधर, महाप्रतापी विख्यात् होते, त्यांस यवन लोक हेव्यानें दुष्मन व स्नेहभावानें दोस्त ह्मणत असत, (दुष्मन व दोस्त या शब्दांचें मूळ दस्यू असावें असें अनुमान होतें.) त्यांतील मुख्य लोकांचीं नांवें होतीं, तीं येणेंप्रमाणें—ज्यांच्या शरीराचा बांधा उंच असून जे अति मजबूत, शरीरानें अक्राळविक्राळ असत, त्यांस दराऱ्यानें भित्रे भट

---

१. हल्लीं ज्यांस कोंकणस्थ ब्राह्मण म्हणतात त्यांनीं आपल्या इराणांतून व बलिस्थानांत येतेवेळीं आपल्याबरोबर देशस्थ ब्राह्मणांस घेऊन आले नाहींत. कारण हे मूळचे बलिस्थानांतील क्षेत्रस्थ असावेत, म्हणून कित्येक गोष्टींवरून सिद्ध करतां येतें. आर्यांनीं जेव्हां या बलिस्थानावर स्वाऱ्या केल्या, तेव्हां त्यांनीं मुळच्या देशस्थांस (खिस्ती मुसलमानासारखे आपल्या आर्य-धर्मांत सर्ते करून त्यांस) देशस्थ नांव दिलें असें अनुमान निघतें. आर्यांनीं देशस्थ ब्राह्मणांस आपल्या धर्मांत सर्ते करून घेतल्यानंतर त्यांस यजुर्वेद वाचून पढाण्याचा अधिकार दिला असावा, असा अदमास करितां येतो. कारण आर्यब्राह्मण आणि देशस्थब्राह्मण या उभयतांमध्यें कालच्या पेशवाईपावेतों मुळींच पंक्तीस उघड बसून अन्नव्यवहार करण्याची जर वहिवाट नव्हती, तर त्यांच्यामध्यें बेटीव्यवहार कोठून असणार ? कारण आर्य ऊर्फ कोंकणस्थ ब्राह्मणांचा वर्ण इराणी व काबुली लोकांशीं मिळतो; व देशस्थ ब्राह्मणांचा वर्ण येथील मूळच्या शूद्रादि अतिशूद्रांशीं मिळतो. याशिवाय बहुतकरून शूद्रादि अतिशूद्रांचे कूलस्वामी, देवके, डाका, गोंधळ, भराड वगैरे देशस्थांसीं मिळतात. आर्यांनीं येथील मूळच्या क्षत्रियांस (जबरीनें अथवा गोडीगुलाबीनें म्हणा) आपल्या धर्मास सर्ते करून त्यांस गांवोगांव वतनदार कुळकर्णी केलें; तसेंच मागाहून मुसल्मानांनीं येथील मूळच्या क्षत्रियांस येथील धर्मांत सर्ते करून त्यांस वतनदार मुल्ला केले. उदाहरणार्थ, आमचे स्ने. रे. नारायणराव शेषाद्री हे पूर्वी आर्यधर्मानुयायी असतां त्यांनीं खिस्ती धर्माचा स्वीकार करून इंदापुरास वतनदारी मिळवून तेथें देऊळ बांधून खिस्ती धर्माचा उपदेश केला.

राक्षस ह्मणत; ज्या लोकांचे चेहरेमोहरे तामशी असून भयंकर दिसत, त्यांस भ्याड आर्य अचंब्यानें उग्र ह्मणत; जे लोक नेहमीं आर्यांची चेष्टा करून त्यांस उपद्रव करीत असत, त्यांस ते द्वेषबुद्धीनें पिशाच् म्हणत; जे लोक आर्यांस नेहमीं उपद्रव देण्यामध्यें गम्मत मानीत असत, त्यांस आर्यलोक हेव्यानें तरफडून असूर म्हणत. याशिवाय यज्ञाच्या निमित्तानें घोडे, गाया भाजून खाणाऱ्या आर्यांच्या विधीचा विध्वंस करून त्यांस सर्वोपरी त्रास देत असत, त्यांस आर्यलोक अजास, यक्ष, शिग्रव, किकाट (कैकाडी) वगैरे म्हणत असत. आणि हे सर्व दस्यूमन (आर्यांचे दुष्मन) काळ्या वर्णांचे होते आणि त्यांपैकीं जे सर्व काळ आर्यांच्या धर्मांचा तिरस्कार करून त्यांचा सवा-परी वीट मानीत, त्यांच्या सर्व अंगाचीं निर्दय आर्य लोक मोठ्या क्रुरतेनें कातडीं सोलून काढीत, त्याविषयीं आर्यांनीं पवित्र मानलेल्या त्यांच्या वेदांत मजबूत आधार सांपडतो. तो असा कीं, "त्वचं कृष्णामरंधवत्" अर्थ-(त्यांनीं काळ्या लोकांचीं कातडीं फाडलीं.) याशिवाय ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन आणि अमेरिकन लोकांतील सत्पुरुषांच्या लेखांत निर्दय आर्य भट्टब्राह्मणांच्या अनन्वित दुष्ट कर्मांविषयीं मजबूत आधार सांपडतात.

**गोविंदराव.** प्र०--अशी धूर्त आर्यभट्टांच्या वेदाच्या पोटाखालीं, जर तट्टासारखी गोम आहे, तर आर्य लोकांनीं त्या वेदरूपी वारूस रंगणांत काढून त्यास हल्लीं बाजार दाखवूं नये, इतकेंच नव्हे; परंतु त्यांनीं आपले वेदरूपी वारूस शूद्रादि अतिशूद्रांच्या दृष्टीससुद्धां कधींच पडूं देऊं नये, असें माझें मत आहे. कारण, तसें धूर्त आर्यभटांनीं केल्यास त्यांजकडून आजपावेतों गांजलेले शूद्रादि अतिशूद्र त्यांची कोणत्या तऱ्हेची व किती फटफजिती करतील, याचें मला अनुमानसुद्धां करवत नाहीं; परंतु या तुमच्या लिहिण्यावरून कदाचित् आर्य धूर्त भट्ट ब्राह्मणांनीं आपल्या वेदांचें प्राकृत भाषांतर करून जगजाहीर केल्यास मग ते दोषमुक्त होतील ना?

**जोतीराव.** उ०—तसें त्यांनीं केल्यास त्यांस दोष कोणी देणार नाहीं. परंतु धूर्त आर्य ब्राह्मणांस आपल्या सोवळ्यांत लपवून ठेविलेल्या वेदाचें प्राकृत करून त्यास यांच्यानें मैदानांत आजपावेतों आणवलें नाहीं; आणि यामुळें त्यांच्यानें तसें करण्याचें धैर्य व्हावयाचें नाहीं. याचें पहिलें कारण, आर्यांच्या वेदांत क्रूर आर्य भट्ट ब्राह्मणांनीं शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, खोंड, राक्षस, पिशाच, वगैरे लोकांस रसातळीं घातल्याबद्दल आधार आहेत व दुसरें कारण, मागाहून आर्यांपैकीं मुकुंदराज, ज्ञानोबा, रामदास, मोरोपंत, वामन वगैरे साधूंनीं पोरींच्या घरकुंडांत भातकुल्या करून वेदांत कल्पिलेल्या ब्रह्माची उतरंड रचिली आहे; ती ढांसळून तिच्या खापरखुड्या होतील, या भयास्तव धूर्त आर्य भट्टब्राह्मण, आपण होऊन गुण्यागोविंदानें, वेदांचें भाषांतर करून कधींच मैदानांत आणणार नाहींत, असें मी भविष्य करून सांगतों.

**गोविंदराव.** प्र०—वेदांमध्यें शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, खोंड, राक्षस, पिशाच् वगैरे लोकांस रसातळीं घातल्याबद्दल लेख आहेत, म्हणून आपण म्हणतां आणि एकंदर सर्व

धूर्त आर्य भट ब्राह्मण मोठ्या शेखीनें म्हणतात कीं, एकंदर सर्व मानवी प्राण्याचें तारण होण्यासाठीं ईश्वरानें वेद निर्माण केले आहेत.

जोतीराव. उ०--हें सर्व आर्य धूर्त ब्राह्मणांचें म्हणणें अजीबाद खोटें आहे. कारण, आपण सर्वांच्या निर्माणकर्त्यानें जर एकंदर सर्व मानवी प्राण्यांचें तारण होण्यासाठीं वेद निर्माण केले असते, तर ते एकंदर जगांतील सर्व भाषांमध्यें केले असते; आणखी त्याचप्रमाणें ते फक्त मरूं घातलेल्या अवघड संस्कृत भाषेमध्येंच करून या सर्व जगांमध्यें एकट्या भटब्राह्मणांनींच मात्र त्यांचा उपभोग घ्यावा, आणि इतर जगांतील मानवांनीं आर्यांच्या तोंडाकडे पहावें, असें झालें नसतें; यावरून आप्पलपोट्या धाडस आर्यांचे वेद आणि सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्यांतील, खरें कोणतें व खोटें कोणतें, हें निवडून काढण्यास आपल्यास मूळींच मार्ग नाहीं.

गोविंदराव. प्र०—कांहो तात्यासाहेब–एकंदर सर्व आर्य भट्टांची खरोखर जर लाचारी आहे म्हणून म्हणावें, तर हल्लींचे कित्येक धूर्त आर्य ब्राह्मण राजद्रोही बंडखोर वासुदेव फडक्याविषयीं व मनःकल्पित रामायण, भागवत, सत्यनारायण वगैरेविषयीं भारेंचे भारे नवीन ग्रंथ छापून उदयास आणून, अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांचीं मनें भ्रष्ट करून कुत्सित करीत असतां, त्यांजला हा काळपावेतों वेदांचें भाषांतर करून जगापुढें आणण्याची मुळींच ऐपत झाली नाहीं, हें कसें ?

जोतीराव. उ०—धूर्त आर्य ब्राह्मणांच्या लाचारीमुळें जर त्यांस वेदांचें भाषांतर करण्याची ऐपत होत नाहीं, तर चवल कम पावणे आठ आर्य बाजीरावसाहेबांनीं आपल्या पवित्र पेशवाईच्या अमलांत रात्रंदिवस शेतीं खपून वाया गेलेल्या परजातीच्या शूद्रादि अतिशूद्र पंगू वृद्धास नचक्या कवडीचीसुद्धां मदत न करितां त्यानें आपल्या स्वजातीच्या धूर्त आर्य धर्मलंड भिक्षुकांस मात्र लाखो रुपयांची रमण्यामध्यें दरवर्षी रुपये मोहोरांची खिचडी करून वग्राळ्यानें दक्षिणा वांटली, हें कसें ! अशा सधन व श्रीमंत आर्य सोंवळ्या बाजीरावास वेदाचें भाषांतर करण्यासाठीं लाचारी होती, म्हणून म्हणण्याचें शोभेल काय ? त्याचप्रमाणें कित्येक भट भिक्षुक कथाडे ब्राह्मण आपल्या बनावट धर्माच्या मिषानें अज्ञानी शूद्रांतील हल्लींचे शिंदे, होळकर वगैरे सरकारांपासून लाखो रुपये उपटून खात असतां, त्यांची वेदांचें भाषांतर करून प्रसिद्ध करण्याची जुरत होत नाहीं, याला कोणत्या प्रकारचा धूर्तपणा म्हणावा ?

गोविंदराव. प्र०—असो–धूर्त आर्यभटांनीं आजपावेतों आपले वेद जर मैदानांत आणले नाहींत, तर आपण आजपर्यंत कलभांड धूर्त आर्यभट्टांच्या वेदांतील आंधळें गारुड उघडकीस आणून अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांपुढें ठेविलें आहे, याला तरी काय आधार ?

जोतीराव. उ०—या धूर्त आर्यभट्ट ब्राह्मणांनीं हा काळपावेतों आह्मा शूद्रादि अतिशूद्रांस संस्कृत शिकण्याची बंदी केली होती, म्हणूनच आपणांस त्यांच्या वेदांतील गोम

शोधून काढण्यास मार्ग उरला नव्हता; परंतु कर्नल लिग्यांड जेकप, उइल्सन्स वगैरे कित्येक कनवाळू युरोपियन सत्पुरुषांस आम्हा शूद्रादि अतिशूद्रांची दया येऊन त्यांनीं वेदांतील गोम बाहेर काढून जगप्रसिद्ध केली आहे. याला मूळ आधार युरोपियन सद्गृहस्थांचे लेख होत.

**गोविंदराव. प्र०**—कर्नल लिग्यांड जेकप, वुइल्सन्स वगैरे सत्पुरुषांस आह्मा दीन अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांची दया येऊन त्यांनीं वेदांतील गोम बाहेर काढून जगप्रसिद्ध केली हें बरें केलें; परंतु त्यांनीं धूर्त आर्यांच्या तावडींतून एकदर सर्व गांजलेल्या आह्मा शूद्रादि अतिशूद्रांस मुक्त करण्याविषयीं कांहींच प्रयत्न केला नाहीं, म्हणून मी त्यांच्या राजकारस्थानीस अथवा भित्रेपणास दोष देतों. कारण, उदाहरणार्थ–इंग्रज लोकांतील कांहीं लोकांस जर धूर्त आर्य भट्टांनीं जुलमानें गुलाम केले असते, तर त्यांनीं धूर्त भटांसह त्यांच्या वेदाच्या चिंध्या चिंध्या करून आपल्या जातीच्या इंग्रज लोकांस आर्यांच्या तावडींतून सोडविण्यास कधीं मागें घेतलें असतें काय?

**जोतीराव. उ०**—परंतु कर्नल लिग्यांड जेकप, वुइल्सन्स वगैरे सत्पुरुष बिचारे काय करतील. हा विषय आम्हा अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या ध्यानांत ठसण्याची आपल्यामध्यें योग्यता आली नव्हती. आपण केवळ जुलमानें धरून नेलेल्या अमेरिकेंतील सिद्दि लोकांसारखे पिढीजादा त्यांचे गुलाम बनलों होतों. तसें जर त्यांनीं त्या वेळीं केलें असतें, तर आपल्यांतील अडमुठ अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या पूर्वजांनीं धूर्त भट्टांच्या चिथावणीवरून, परवांच्या आर्यभट पांड्याच्या चपाती बंडाप्रमाणें, निरपराधी युरोपियन लोकांबरोबर मोठा प्रळय केला असता आणि तेणेंकरून लक्षावधी शूद्रादि अतिशूद्रांसह इंग्रज लोक प्राणास मुकले असते.

**गोविंदराव. प्र०**—कर्नल लिग्यांड जेकब सत्पुरुषासारखे तुम्ही कांहीं आतां एकटे नाहींत, त्यांतून महाराष्ट्रांतील इंग्रजी शिकलेले कांहीं आर्य ब्राह्मण जरी शुद्ध अंतःकरणाचे नाहींत, तरी नाईलाजास्तव वरकांती तुमच्या मताला मिळतील, असा संभव आहे आणि शेंकडों शूद्रादि अतिशूद्र सत्यास स्मरून निःसंशय तुमच्या मताला साह्य देतील, अशी माझी पक्की खात्री आहे. यास्तव धूर्त आर्य भटांच्या वेदांत भट पडो. तुम्ही भटांसह त्यांच्या वेदाची पर्वा न करितां एकंदर सर्व धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मागील व हल्लींच्या आचरणावरून व ईश्वरप्रणित सार्वजनिक सत्याची तुलना केल्याबरोबर बहुतेक अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांची समजूत होऊन त्यांचें बरें होणार आहे.

**जोतीराव. उ०**—आपण सर्वांच्या निर्मीकानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व विस्तीर्ण पोकळींतील अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या उपग्रहांवरील नाना प्रकारच्या अनंत खटाटोपीविषयीं व्यवस्था कसकशा केल्या आहेत, त्या सर्वांविषयीं ज्ञान करून घेणें हें आम्हा क्षणभंगूर मानवांच्या बुद्धितरंगाच्या आटोक्यांत तर येणेंच नाहीं; परंतु त्यांपैकीं आपण वस्ती करणाऱ्या, या आपल्या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकंदर सर्व प्राणीमात्र खेरीजकरून फक्त

आपल्या या मानवी प्राण्याविषयीं निर्मीकानें काय काय सोईवार व्यवस्था केल्या आहेत, त्याविषयीं एकंदर सर्व आर्य लोक बेसमज होते; कारण हा काळपावेतों निर्माणकर्त्याविषयीं मनुजांचीं कर्तव्यकर्मे जीं आहेत आणि ज्यांचा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहे आणि त्याचप्रमाणें मनुष्यांनीं आपल्या शेजाऱ्याबरोबर कसें वर्तन करावें, ज्याविषयीं प्रत्येक मनुष्यास अनुभव आहे, हें सर्वांस सहज सिद्ध करतां येतें. या उभय सिद्धांताविषयीं एकंदर सर्व आर्य लोकांसह त्यांच्या वेदकर्त्यांस बिलकूल ज्ञान झालें नव्हतें; यावरून आर्य ब्राह्मणांच्या मागील व हल्लींच्या, जगविरुद्ध आचरणांवरून साफ सिद्ध होतें.

**गोविंदराव. प्र०**—आपण सर्वांच्या निर्मीकाविषयीं मनुजांचीं कर्तव्यकर्मे काय आहेत, ज्यांचा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहे, व तत्संबंधीं एकंदर सर्व आर्य लोकांसह त्यांच्या वेदकर्त्यांस बिलकूल ज्ञान झालें नव्हतें, याविषयीं प्रथम उलगडा करून जर प्रतिपादन कराल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—आर्य लोकांच्या वेदांत एकंदर सर्व आर्य ब्राह्मण येथील एकट्या सूर्यास मुख्य दैवत समजून त्याच्या नांवानें अर्घ्य देऊन त्याची पूजा जर करीत होते, तर या विस्तीर्ण पोकळींत अनंत सूर्यमंडळांच्या निर्माणकर्त्याविषयीं आर्यांस ज्ञान झालें नव्हतें, असें सिद्ध होतें.

**गोविंदराव. प्र०**—आर्यांच्या वेदांत एकंदर सर्व आर्य ब्राह्मण सूर्यनारायणाशिवाय एखाद्या तत्वास ते देव समजून त्याची पूजा करीत नव्हते काय ?

**जोतीराव. उ०**—आर्यांच्या वेदांत एकंदर सर्व आर्य ब्राह्मण सूर्यनारायणाशिवाय अग्नितत्वासमुद्धां मुख्य दैवत समजून त्याची पूजा करतांना त्याच्यापुढें नांवाला गाया गुरें व बोकडास अर्पण करीत असत आणि त्या बिचाऱ्या मुक्या जनावरांनीं मोठ्या स्वरानें हंबरडे फोडूं नये, म्हणून त्यांच्या तोंडांत कापडाचे बोळे कोंबून सोमरसाच्या (दारू) नादांत त्यांच्या नरड्यांवर बुक्यांचा भडीमार करतां करतां त्यांचे प्राण घेऊन आपण स्वतः त्यांचें मांस खात होते.

**गोविंदराव. प्र०**—आर्यलोक पूर्वीं गायागुरें यांचें व हल्लीं बोकडाचे हालहाल करून त्यांचे प्राण घेत होते. ते मुसलमानांसारखे त्यांचे एकदम झटक्यासरसे सुऱ्यांनीं गळे कापून त्यांस हालाल करून कां खात नाहींत ? यांतील मर्म काय असावें बरें ?

**जोतीराव. उ०**—मुसलमानांसारखे जनावरांचे सुऱ्यांनीं गळे कापल्याबरोबर त्यांतील रक्त (सत्व) निरर्थक वायां गेल्यामुळें त्यांच्या मांसांत असावी तशी चव आणि खमंगी रहात नाहीं, अशी पूर्वीच्या व हल्लींच्या आर्य लोकांची जुनी समजूत असावी. हेंच काय तें त्यांतील मर्म. यास्तव गायागुरें यांचें व बोकडांचें मांस भाजून देण्याकरितां अग्निदेवतांपुढें थयथया नाचविली खरी ! परंतु यावरून असें सिद्ध होतें कीं, सर्व भूतांच्या ठायीं दया ठेवणाऱ्या आपण सर्वांच्या निर्मिकानें, फक्त अघोरी खादाड आर्यभट्टांच्या खाण्याकरितां गाया, गुरें, बोकडांस निर्माण केलें असावें, असें सिद्ध होतें.

**गोविंदराव.** प्र०—तूर्त हें एकीकडे ठेवा, परंतु ताज्यातवान्या गायागुरें यांचे व बोकड यांचे बुक्यानें प्राण घेऊन त्यांचे मांस खाणारे अघोरी आर्यभट्ट ब्राह्मण व त्याचप्रमाणें रोगानें अथवा लंगडीलुलीं, आंधळींपांगळीं आपमृत्यूनें मेलेल्या जनावरांचे मांस खाणारे लाचार मांगमहार या दोहोंपैकीं आपण कोणास निर्दय व क्रूर म्हणाल ?

**जोतीराव.** उ०—या दोहोंपैकीं धूर्त आर्यभट ब्राह्मणांस पक्के निर्दय व क्रूर म्हटलें पाहिजे, असें न्यायाचें ठरतें.

**गोविंदराव.** प्र०—यावरून आपण कोणत्या न्यायानें लाचार मांगाह्मारांस निर्दय म्हणून क्रूर मानितां ? याला काय आधार आहे ?

**जोतीराव.** उ०—अरे, येथें तूं मध्येंच कोठून न्याय आणिलास ! आघोरी खादाड आर्यब्राह्मण ताज्यातवान्या गायाबोकडांचे प्राण घेऊन त्यांचें मांस मोठ्या आवडीनें बेधडक खातात; याला मूळ आधार धूर्त आर्यभट ऋषींनीं ताडपत्रांवर लिहून ठेवलेले वेद होत.

**गोविंदराव.** प्र०—आर्य ऋषींनीं ताडपत्रांवर लिहून ठेवलेले वेदांत आधार असला, म्हणजे धूर्त आर्यभटांनीं पाहिजेल तें बेधडक करावें. त्यांला मनाची तर लाज नाहींच; पण त्यांना आपण सर्वांच्या निर्मीकाचेंसुद्धां भय वाटत नाहीं, हें कसें ?

**जोतीराव.** उ०—धूर्त आर्यभटांच्या मनाला आणि सर्वांच्या निर्मीकाविषयीं मुळींच भय वाटत नाहीं, कारण ते वेदांती बनून भृगु ब्राह्मणासारखी कल्पित विष्णु देवबापास लाथ मारून आपणच स्वतः अहंब्रह्म अथवा भूदेव होऊन, आपणा सर्वांच्या निर्मीकास पाळथा घालण्यास जर भीत नाहींत, तर त्यांच्या ठायीं निर्मीकाचें भय कोठून असणार ?

**गोविंदराव.** प्र०—याशिवाय आर्यलोक गायागुरें बोकड (मुख्यत्वेंकरून काळ्या कपिला गाया) खाण्यामध्यें जरी पुण्य मानीत असत, तथापि त्यांनीं पुढें बौध्यधर्माच्या धाकानें मांस खाणें जरी सोडून दिलें, तरी हल्लीं ते शुद्ध होण्याच्या निमित्तानें गोमांसा-ऐवजीं गोमूत्र प्राशन करून आपल्यास पवित्र मानून घेतात, याला काय ह्मणावें ?

**जोतीराव.** उ०—पूर्वींचे आर्य पुण्यप्राप्तीसाठीं यज्ञ व श्राद्धांमध्यें गाया-बोकडांचा वध करून त्यांचें मांस खात होते. आणि नाईलाजास्तव हल्लींचे आर्य गोमूत्र प्राशन करून शुद्ध मानून घेतात. यावरून तूंच विचार करून पहा कीं, एकंदर सर्व धूर्त आर्यभटांच्या आचरणांत कोणत्याच तऱ्हेचा चिरकाळ धरबंद नसतो. ते कोणत्या वेळीं आपलीं पोटें जाळण्याकरितां काय करतील, याचा नेम नाहीं.

**गोविंदराव.** प्र०—आतांशीं बरें सुचलें, कांहो "अठरा वर्णानां ब्राह्मणो गुरुः" असतां त्यांनीं मानवी शूद्रादि अतिशूद्रांची विष्ठा खाणाऱ्या पशु गाईचें जरी मूत्र पिऊन शुद्ध मानून घेतात, तरी ते अत्युत्तम अतिशूद्र मानवांचा जेवतांना स्पर्शसुद्धां होऊं देत नाहींत, याला काय आधार असावा बरें ?

**जोतीराव.** उ०—शूद्रादि अतिशूद्र मानव केवळ अज्ञानी असल्यामुळें धूर्त आर्यभट

ब्राह्मण चेष्टेखोर पशु माकडासह सरपटणाऱ्या विषारी सर्पांची पूजा करण्यास लाजत नाहींत, तरी शूद्रादि अतिशूद्रांनीं तुच्छ मानून अपंक्त केलेल्या वेसवारांडांबरोबर ते निर्लज्यपणें खाणें, पिणें वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार करण्यामध्यें आनंद मानितात. यावरून धूर्त आर्य भटांस अत्युत्तम अतिशूद्रांस नीच मानण्याविषयीं आधार काय आहे? म्हणून तूं विचार करून पहा, ह्मणजे तुझ्या सहज ध्यानांत येईल.

**गोविंदराव.** प्र०—या सर्व मागील इतिहासावरून आर्यभट ब्राह्मण आपल्या वेदांस खिस्ती लोकांसारखे बाहेर काढीत नाहींत, तर ते मोठे धूर्त आहेत व त्यांनीं तसें केल्याबरोबर वेदाचें सहज महत्व कमी होणार आहे, असें सिद्ध होतें.

**जोतीराव.** उ०—धूर्त आर्यभटब्राह्मणांनीं वेद लपवून ठेविल्याकारणामुळें वेदांची अज्ञानी शुद्रादि अतिशूद्रांत पोकळ पत्राज वाढली आहे खरी, परंतु यापुढें त्यांनीं खिस्ती लोकांच्या बायबलासारखें, आपल्या वेदास बाहेर काढून त्याचें प्राकृत करून जगजाहीर केल्याबरोबर, धूर्त आर्यभटांसह त्यांच्या वेदांची बाजारच्या कोल्हाटणीसुद्धां फटफजीती करण्यास कधीं भिणार नाहींत, अशी मी प्रतिज्ञा करून सांगतों.

**गोविंदराव.** प्र०—तर मग आर्यांच्या वेदांत एकंदर सर्व जगास बोध घेण्यासारखें बिलकूल कांहींच नाहीं, असें तुम्हांला वाटतें काय?

**जोतीराव.** उ०—असें कसें म्हणतोस? वेदामध्यें नीति वगैऱ्यांविषयीं जें प्रतिपादन केलें आहे, तें सर्व आपल्या जातीच्या आप्पलपोट्या धूर्त आर्यभटांच्या हिताकरितां मात्र योजिलें आहे. त्यांमध्यें एकंदर सर्व पराजित केलेल्या शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, कोळी वगैरे लोकांस म्लेंछ या सर्वांस, मान्य होऊन त्यापासून त्या सर्वांचें बिलकूल हित होण्यासारखें नाहीं.

**गोविंदराव.** प्र०—दुसरें, आपण पूर्वी असें म्हणालांत कीं, "मनुष्यांनीं आपल्या शेजाऱ्याबरोबर कसें वर्तन करावें", याविषयीं प्रत्येक मनुष्यास आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सहज सिद्ध करतां येतें, या सिद्धांताविषयीं एकंदर सर्व आर्य लोकांसह त्यांच्या वेदकर्त्यांस बिलकूल ज्ञान झालें नव्हतें. याविषयीं आतां उलगडा करून जर प्रतिपादन कराल, तर बरें होईल.

**जोतीराव.** उ०—आपण सर्वांच्या निर्मिकानें एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न करते-वेळीं मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी निर्माण केला आहे. आणि त्यास आपआपसांत सारखे हक्काचा उपभोग घेण्यास समर्थ केला आहे. आणि याच कारणास्तव प्रत्येक मनुष्य गांवांतील व मुलखांतील अधिकारांच्या जागा चालविण्याचा अधिकारी आहे.

**गोविंदराव.** प्र०—यावरून एकंदर सर्व मनुष्य सर्व कामीं सारखे अधिकारी असतां, आर्य धूर्त भट ब्राह्मण, शूद्रादि अतिशूद्रांस आपले दासानुदास करून त्यांचे धनी कोणत्या न्यायानें झाले?

**जोतीराव.** उ०—धूर्त आर्यभट ब्राह्मण शूद्रादि अतिशूद्रांचे अन्यायानें धनी झाले

म्हणून आपण सर्वांच्या निर्मीकास संताप झाला आणि त्यानें मोंगल, पठाण, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्लिश या सर्व लोकांकडून धूर्त आर्य भटांचें ऐश्वर्य नष्ट करून त्यांस त्यांचे धनी केलें.

**गोविंदराव. प्र०**—आपल्या सर्वांच्या निर्मीकानें मुसलमान व ख्रिस्ती वगैरे लोकांकडून धूर्त आर्यभटांचें ऐश्वर्य नष्ट करून जरी त्यांचे मुसलमान व ख्रिस्ती धनी केले, तरी त्यापासून आपण शूद्रादि अतिशूद्रांचे कोणत्या प्रकारचे फायदे झाले, याविषयीं मला उघड कांहीं समजत नाहीं.

**जोतीराव. उ०**—अरे–बाबा, आपण सर्वांचा निर्मीक परम दयाळू व परम न्यायी आहे आणि त्याच्या न्यायाविषयीं तुला कांहीं उघड समजत नाहीं, म्हणून मला मोठी हळहळ वाटते. कारण क्षुल्लक अशा अति चिमुकुल्या मुंगीच्या अवयवांचा–तिच्या इंद्रिय वगैरे उद्योगाचा आह्मी कधींच विचार करीत नाहीं, तथापि तिजला कोणी निरर्थक त्रास देऊं शकत नाहीं व त्याचप्रमाणें या अत्युत्तम मानव प्राण्यांच्या अवयवांचा, त्यांच्या दशेंद्रियांचा आणि त्यांच्या ज्ञानाच्या थोरवीविषयीं विचार करूं गेल्यास आम्हांस थांग लागत नाहीं. आणि अशा मानवांपैकीं शूद्रादि अतिशूद्रांचे पूर्वी तरवारीच्या आणि सांप्रत ठकबाजीच्या जोरानें धनी आर्य मानव बनले आहेत. यास्तव सर्वन्यायी आपल्या सर्वांच्या निर्मीकानें शूद्रादि अतिशूद्रांबद्दल धूर्त आर्यभटांस प्रायश्चित देऊन त्यांस शुद्धीवर आणण्याकरितां पूर्वी मुसलमानांस व हल्लीं ख्रिस्ती लोकांस आर्यांचे धनी केले आहेत, हें पक्कें समज.

**गोविंदराव. प्र०**—शूद्रादि अतिशूद्रांबद्दल मुसलमान लोकांनीं धूर्त आर्यभटांस कोणत्या तऱ्हेचें प्रायश्चित दिलें, याविषयीं फारच थोड्यांत येथें विवेचन कराल, तर बरें होईल ?

**जोतीराव. उ०**—मुसलमान लोकांनीं धूर्त आर्य भट्टांच्या कोरीव दगडाच्या मूर्तीचा विध्वंस करून त्यांनीं जुलमानें दासानुदास केलेल्या शूद्रादि अतिशूद्रांचे कळपाचे कळप त्यांच्या तावडीतून सोडवून मुसलमान करून त्या सर्वांस आपल्या मुसलमानी धर्मांत सामील केलें. इतकेंच नव्हे परंतु त्या सर्वांबरोबर रोटी व बेटी व्यवहार सुरू करून त्या सर्वांस सर्व कामीं बरोबरीचे हक्क दिले. आणि त्या सर्वांस आपल्यासारखे सुखी करून त्यांच्या तोंडाकडे आर्यभटांस टकमका पहावयास लाविलें.

**गोविंदराव, प्र०**—त्याचप्रमाणें ख्रिस्ती लोकांनीं शूद्रादि अतिशूद्रांबद्दल धूर्त आर्यभटांस शुद्धीवर आणण्याकरितां कोणकोणतीं प्रायश्चितें दिलीं, याविषयीं थोडेसें येथें विवेचन कराल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—प्रथम कर्नल लिग्र्यांड जेकप, सर वुईल्यम जोन्स वगैरे इंग्लिश सत्पुरुषांनीं धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या वेदांसह स्मृत्या, संहितांचे आंडें फोडून त्यांतील शूद्रादि अतिशूद्र वगैरे लोकांस निःक्षत्रीय करून त्यांस कसकसे त्रास दिले, याविषयीं

साद्यंत इतिहासाचा तपास काढून जगप्रसिद्ध केल्यामुळें आपण सर्व शूद्रांचे आतांशे डोळे उघडून एकंदर सर्व धूर्त आर्यभट ब्राह्मणांचें ब्रह्मकपट आपल्या दृष्टीपुढें स्वयंभू थयथया नाचूं लागलें आहे.

**गोविंदराव. प्र०**—कर्नल लिग्न्यांड जेकप, सर वुईल्यम जोन्स वगैरे सत्पुरुषांनीं धूर्त आर्यभटांचें ब्रह्मकपट जेव्हां बाहेर पाडिलें, तेव्हां आमच्या इंग्रज सरकारनें आम्हा अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या मुक्ततेविषयीं कांहींच प्रयत्न केला नाहीं, याविषयीं मोठा अचंबा वाटतो !

**जोतीराव. उ०**—धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या पूर्वजांनीं शूद्रादि अतिशूद्रांविषयीं रचलेले ब्रह्मकपटाविषयीं त्यांची खात्री होऊन त्यास पश्चाताप होऊन त्यांनीं आपणच होऊन शूद्रादि अतिशूद्रांस तुच्छ मानून त्यांस ठकविण्याचें अजीबाद वर्ज करावें; म्हणून प्रथम इंग्रज सरकारनें या सर्व बलिस्थानांत शूद्रादि अतिशूद्रांच्या करपट्टींतून पैसे खर्च करून धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलांस खरें ज्ञान होण्याकरितां जागोजाग इंग्रजी विद्यालयें स्थापून त्यांस फुकट विद्यादान देण्याचें सुरू केलें.

**गोविंदराव. प्र०**—शूद्रादि अतिशूद्रांनीं परिश्रम करून सरकारास वसूल दिलेल्या करपट्टीच्या पैशांतून धूर्त आर्य भटब्राह्मणांच्या मुलांकरितां प्रथम इंग्रजी विद्यालयें स्थापून त्यांमध्यें त्यांस विद्वान केलें खरें, परंतु त्यांच्या मुलांनीं इंग्रजी शाळांत शिकून, परिणामीं काय केलें, याविपयीं थोडेसें विवेचन केल्याबरोबर सरकारासह शूद्रादि अतिशूद्रांचे डोळे उघडणार आहेत.

**जोतीराव. उ०**—अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या परिश्रमाच्या करपट्टींतून धूर्त आर्य भटब्राह्मणांचीं मुलें जेव्हां शाळांनीं विद्वान झालीं, तेव्हां त्यांच्या पूर्वजांनीं ब्राह्यात्कारी धर्मसंबंधीं, परंतु आंतून शुद्ध राजकीय, रचलेल्या ब्रह्मगारुडावर केवळ झांकण घालण्याकरितां कपटानें सध्यां आपला बचाव करण्यास्तव आपल्या डोळ्यांवर कातडीं ओढून मोठ्या धांदलीनें त्यांनीं ब्रह्मसमाज व प्रार्थनासमाज उभारले आहेत व त्यांनीं त्या समाजांत एकंदर सर्व खिस्ती धर्माचें उष्टेंमाष्टें चोरून छपून गोळा केलें आणि त्यांनीं आपल्या कल्पित ब्रह्माजीच्यापुढें डोळे झांकून बाकीच्या अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांच्या मनांत पुनः एक तऱ्हेचा ब्रह्मघोळ करण्याची खटपट सुरू केली आहे.

**गोविंदराव. प्र०**—या सदरच्या समाजांशिवाय धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलांनीं दुसऱ्या कांहीं सभा उपस्थित केल्या आहेत काय ?

**जोतीराव. उ०**—धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलांनीं ज्या सभा उपस्थित केल्या आहेत, त्यांपैकीं मुख्य पुणें येथील सार्वजनीक सभा आणि न्यॉशनल कांग्रेस अशा मुख्य दोन सभा उभारल्या आहेत, म्हणून माझ्या ऐकिवांत आहे.

**गोविंदराव. प्र०**—या त्यांच्या सार्वजनिक सभेच्या शुद्ध आडनांवावरून या सभेमध्यें कुळंबी, माळी, धनगर, कोळी, भिल्ल वगैरे शेतकरी लोक सभासद असतील, नाहीं बरें?

जोतीराव. उ०—तुझ्या ह्मटल्याप्रमाणें कुळंबी वगैरे शेतकरी लोकांचा या सभेंत सभासद असण्याचा संभव नाहीं, असें मला वाटतें.

गोविंदराव. प्र०—तर मग वाण्याउदम्याचा व्यापार करणारे गुजर, मारवाडी वगैरे दुकानदार व वस्त्रप्रावरणें विकण्याचा उद्योग करणारे साळी, कोष्टी, खत्री, वगैरे लोक या सभेंत सभासद असावेत, नाहीं बरें ?

जोतीराव. उ०—गुजर, मारवाडी वगैरे दुकानदार व वस्त्रप्रावरणें विकण्याचा उद्योग करणारे साळी, कोष्टी लोकांचें या सभेंत मुळींच नांवसुद्धां नाहीं, असें माझ्या ऐकिवांत आहे.

गोविंदराव. प्र०—बरें असो, लोहार, सुतार, चांभार, कुंभार, न्हावी, परीट वगैरे मिळून बारा बलुते व मांग, भट, जोशी वगैरे मिळून बारा आलुते तरी या सभेंत सभासद आहेत काय ?

जोतीराव. उ०—या सभेंत ! या सभेंत बारा बलुते सभासद आहेत म्हणून त्यांचें नांवसुद्धां येथें तूं घेऊं नकोस; परंतु बारा आलुत्यापैकीं ब्राह्मण जोशी, उपाधी, आलुत्यांचा मात्र या सभेंत भरणा आहे, त्यांमध्यें जे सरकारी कामगार आहेत, ते जरी उघडपणें या सभेचे सभासद नाहींत, तरी त्यांच्या मुलाजाकरितां इतर जातीचे पांचपंचवीस सभासद सामील करून घेतले आहेत. त्यांपैकीं एकदोन मात्र श्रीमंत असून बाकी कोणी वकिली, कोणी कारकुनी करून पोटें जाळणारे आहेत.

गोविंदराव. प्र०—कांहो, या बळिस्थानांत अदमासें एकंदर सर्व वीस कोटी खानेसुमारी आहे आणि त्यांत दोन कोटी आर्यब्राह्मण आहेत. त्यांपैकीं पुण्यांतील आर्य ब्राह्मणांनीं पांचपंचवीस इतर जातीचे लोक सामील करून पुण्यांत जर सभा केली; तर त्या सभेस सार्वजनीक सभा कोणी ह्मणावी ?

जोतीराव. उ०—सर्वांशीं तुझें म्हणणें खरें आहे, कारण ह्मारांच्या पडझड बाबीसंबंधीं विचार करण्यासाठीं या सार्वजनीक सभेंत ब्रह्मवृंद सभासद ह्मार सभासदास आपल्याबरोबर घेऊन कधीं बसले होते ? अथवा त्या पडझडीच्या संबंधानें त्या सर्वांनीं कधीं सरकारांस अर्ज केला होता, ह्मणून माझ्या तर ऐकिवांत नाहीं.

गोविंदराव. प्र०—तथापि या सभेच्या रेकार्डांत असणाऱ्या अर्जांपैकीं एक तरी अर्ज कोणी असा दाखवावा कीं, ज्यांत एकाच वर्गाचा किंवा व्यक्तीचा संबंध आहे, असें एक सार्वजनीक पोरीच्या घरकुंडरूपी सभेंत बसून बढाई करणारा ह्मणत आहे.

जोतीराव. उ०—त्यांचें म्हणणें ठीक आहे. कारण त्यांस असें वाटतें कीं, मजवांचून या जगांत दुसरा कोणी शहाणा नाहीं ! परंतु तूं अशी कल्पना कर कीं, हल्लीं सरकारानें अशी जाहिरात दिली आहे कीं, ज्या कोणास संस्कृत, मराठी आणि इंग्लिश भाषेचें ज्ञान झालें असून त्यास त्या सर्व भाषांमध्यें पत्रव्यवहार ठेवितां येईल, अशा ह्मारास अथवा मांगास दीड हजार रुपये दरमाहा मिळतील. यावरून ही सदरची जागा चालविण्यास किती ह्मार अथवा मांग निवडतील ?

**गोविंदराव. प्र०**—सदरची जागा चालविण्यास एकसुद्धां म्हार अथवा मांग निवडणार नाहीं.

**जोतीराव. उ०**—याचप्रमाणें मोघम आम्हा हिंदूंस कलेक्टरांच्या जागा, युरोपियन लोकांसारख्या इंग्रज सरकारानें द्याव्यात, म्हणून सार्वजनीक सभेच्या रेकार्डांत अर्ज असतील, परंतु ते अर्ज अविद्वान शूद्रादि अतिशूद्रांच्या काय उपयोगाचे? कारण मोघम नांव हिंदूंचें आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण! वाहावा रे सभा! आणि वाहावा रे दुटप्पी तिचें रेकार्ड!

**गोविंदराव. प्र०**—आतां ह्या न्यॉशनल कांग्रेसविषयीं थोडेसें समजून सांगाल, तर आपल्या भोळसर मायाळू इंग्रज सरकारासह अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांचे डोळे उघडून त्यापासून त्या उभयतांचा कांहीं फायदा झाला तर होईल!

**जोतीराव. उ०**—सांगतों ऐक–आर्यांच्या खोटसाळ मतलबी धर्मावरून धूर्त आर्यभट ब्राह्मण अज्ञानी शूद्रास तुच्छ मानितात. अज्ञानी शूद्र, अज्ञानी म्हारांस नीच मानितात आणि अज्ञानी म्हार मांगास नीच मानितात. त्यांतून अति सोवळे धूर्त आर्यभट ब्राह्मण शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानून आपण तर नाहींच, परंतु त्या सर्वांमध्यें आपआपसांत रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होऊं देण्याविषयीं प्रतिबंध केल्यामुळें अर्थातच त्या सर्वांमधले भिन्न भिन्न प्रकारचे आचारविचार, खाणें-पिणें, रीतिभाती एकमेकांच्या एकमेकांशीं मिळत नाहींत. अशा अठरा धान्यांची एकी होऊन त्याचें चरचरीत कोडबुळें म्हणजे एकमय लोक "nation" कसें होऊं शकेल? अरे, हे धूर्त आर्यभट ब्राह्मण एकंदर सर्व जगांतील लोकांस तुच्छ मानून त्यांचा मनापासून हेवा व द्वेष करणारे आहेत. हे केवळ आपल्या हितासाठीं अज्ञानी मूढ शूद्रादि अतिशूद्रास कोणत्या वेळीं कोणत्या खड्ड्यांत घालतील, याचा नेम नाहीं. यास्तव आर्य लोकांनीं एकधर्मी अमेरिकन अथवा फ्रेंचांचें लटकें सोंग घेऊन शेंकडों न्याशनल कांग्रेसा नवीन उपस्थित जरी केल्या, तरी त्यांच्या न्याशनल कांग्रेसांत समंजस असा शूद्रादि अतिशूद्र कधींच सभासद होणार नाहीं, असें मी खात्रीनें सांगतों. कारण, तसें केल्यानें आमच्या मायाळू इंग्रज सरकारचें शूद्रादि अतिशूद्रांविषयीं मन विटणार आहे.

**गोविंदराव. प्र०**—समंजस शूद्रादि अतिशूद्र त्यांच्या न्याशनल कांग्रेसमध्यें जर सभासद होणार नाहींत, तर त्या सभेमध्यें हिंदु लोकांस मोठमोठ्या हुद्याच्या जागा द्याव्यात म्हणून युरोपियन मि. हंटरसाहेब इंग्रज सरकारांस ज्ञानाच्या गोष्टी सांगतात, हें कसें?

**जोतीराव. उ०**—याचें कारण, हिंदूंतील आर्यब्राह्मण खेरीज करून शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, कोळी वगैरे लोकांविषयीं मि. हंटरसाहेबास बिलकूल ज्ञान नाहीं, म्हणून ते तसा वाचाळपणा करीत आहेत. त्याचप्रमाणें पूर्वीं लार्ड रिपन गव्हरनर जनरलसाहेबांनीं हिंदूंतील शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, कोळी वगैरे लोकांविषयीं माहिती करून न घेतां, एकट्या आर्यभटांस हिंदू समजून त्यांस म्युनिसिपालीटीचा अधिकार दिल्यामुळें बाकीच्या सर्व

आनार्य लोकांस किती त्रास भोगावा लागतो, याचा तूंच विचार करून पहा, ह्मणजे तुझ्या सहज ध्यानात येईल !

गोविंदराव. प्र०—तथापि या न्यॉशनल कांग्रेसमध्यें शूद्रादि अतिशूद्रांनीं सभासद होऊन ब्राह्मणांबरोबर आपले वाजवी हक्क सरकारापाशीं मागण्यास कोणती हरकत आहे. त्यांचा या कामीं कोणी हात धरला आहे, ह्मणून एक गुलहौशी, भटब्राह्मणाचा वेष धारण करणारा तोतया करून बकत आहे.

जोतीराव. उ०—माझें त्या तोतयाच्या बकण्याविषयीं या प्रसंगीं कांहींच बोलणें नाहीं. या सोडून ! त्यांचें नांवसुद्धां येथें घेण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु मी तुजला कांहीं प्रश्न करितों. ते असे कीं—हा काळपावेतों धूर्त आर्यभटांनीं शूद्रांस संस्कृत शिकण्याची बंदी केली होती कां नाहीं? त्याचप्रमाणें त्यांनीं अतिशूद्रांच्या मुलांस हा काळपावेतों शाळेंत घेण्याची आटोकाट बंदी केली होती कां नाहीं? व त्यांच्यांत मामलेदाराच्या कचेरींत खालच्या कारकुनाचेंसुद्धां काम चालविण्यापूर्ती एकास विद्या आली नसतां बळीस्थानांतील कलाकौशल्य जाणणाऱ्या लोकांस "कलाकौशल्याच्या कामीं युरोपियन लोकांची बरोबरी करून एकंदर सर्व जगाबरोबर चाल ठेवण्यास तयार व्हा; नाहींतर उभे राहा आणि मरा !" असे मुख्य साडेभावार्थी कळचेऱ्या नारदमुनीच्या नादीं लागून षट्कर्मी तर नव्हेच; परंतु खट कर्मे प्रतिपादन करणारा, अज्ञानी शूद्रादिअतिशूद्रांस व्यापाराची हुल दाखवून वेदांचें बोचकें पळविणारा उचल्या, धूर्त आर्यभटांचा तोंड मानलेला धाकटा भाऊ म्हणावा !

गोविंदराव. प्र०—हा काळपावेतों धूर्त आर्यभटांनीं शूद्रांस संस्कृत शिकण्याची बंदी केली होती. त्याचप्रमाणें त्यांनीं अतिशूद्रांच्या मुलांस हा काळपावेतों शाळेंत घेण्याची बंदी केली होती. या कारणास्तव मांगाह्मारांत मामलेदाराच्या कचेरींतील खालच्या कारकुनाचेंसुद्धां काम चालविण्यापूर्ती त्यांस विद्या आली नाहीं, हें निर्विवाद आहे.

जोतीराव. उ०—असो, या निःपक्षपाती इंग्रज सरकारच्या राज्यांत एकंदर सर्व मांगाह्मारांस विद्या मिळण्याचा संभव आहे आणि तसें पुढें घडून आल्यास त्या सर्वांनीं एकत्र होऊन माजी गवरनर जनरल लार्ड रिपन व मि. हंटरसाहेब या उभयतांस पुढें घालून महाराणी विक्टोरिया आईसाहेबांसमोर नेऊन त्यांस असें विचारलें कीं, हा काळपावेतों जर धूर्त आर्यभटांनीं आम्हांस विद्या शिकण्याची बंदी केली होती, तर आम्ही त्यांच्यासारखे विद्वान होईतों पावतों एकट्या आर्य धूर्त भटब्राह्मणांस मोठमोठाल्या हुद्याच्या जागा दिल्यास ते आम्हांस पुनः अन्य रीतीनें रसातळीं घालण्याचा प्रयत्न करतील कां नाहीं बरें? असा प्रश्न सदरच्या उभयतां इंग्रजांस केल्यास ते त्याचें काय उत्तर देतील?

गोविंदराव. प्र०—सदरच्या प्रश्नाचें उत्तर न देतां ते उभयतां निःसंशय खालीं माना घालतील आणि पालथ्या नजरेनें वेषधारी तोतयाच्या तोंडाकडे पाहून त्याच्या नांवानें

बोटें मोडीत बसतील. याशिवाय दुसरा कांहीं त्यांच्याजवळ उपाय राहणार नाहीं. पुढें कसें ?

जोतीराव उ०—यावरून या बळीस्थानांतील एकंदर शूद्रादि अतिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान् होऊन विचार करण्यालायक होईतोंपावेतों ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय (Nation) होऊं शकत नाहीं. असें असतां एकट्या उपऱ्या आर्यभट ब्राह्मण लोकांनीं न्यॅशनल कांग्रेस स्थापिली, तर तिला कोण विचारतो ?

गोविंदराव. प्र०—तर यावरून शूद्रादि अतिशूद्रांच्या घराशेजारीं शाळा असून त्यांनीं जरी आपलीं मुलें शाळेंत पाठविलीं नाहींत, तरी त्यांच्या मुलांस उपऱ्या आर्यभट ब्राह्मणांनीं कडेवर घेऊन उचलून नेऊन शाळेंत पोंचवावीं, असें सिद्ध होतें.

जोतीराव. उ०—आर्यभटांनीं आजपावेतों शूद्रांस संस्कृत शिकण्याची व अतिशूद्रांस शाळेंत घेण्याची बंदी केली होती. या त्यांच्या मूर्खपणामुळें त्यांनीं तर काय, परंतु त्यांच्या कल्पित ब्रह्माजीच्या महापिताजीनें जरी शूद्रादि अतिशूद्रांचीं मुलें कडेवर उचलून नेऊन त्यांस शाळेंत पोहचवून दररोज परत आणून घरीं पोहचविलीं, तरी एकंदर सर्व धूर्त आर्यभट ब्राह्मणांनीं पूर्वीं केलेल्या दुर्वर्तनाबद्दल ते दोषमुक्त होणार नाहींत. कारण विद्वत्ता हीं कांहीं पिढीजादा नाहीं.

गोविंदराव. प्र०—आपल्या इंग्रज सरकारनें पूर्वीं धूर्त आर्यभट ब्राह्मणांसच एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्रांस विद्या देण्याचें काम सोपीलें होत. परंतु हल्लीं आपल्या निष्पक्षपात इंग्रज सरकारनें सर्व जातीच्या मुलांस शाळेंत घेण्याची मोकळीक दिली असतां अतिशूद्रांचीं मुलें विद्वान होऊन मोठे कामगार झाले आहेत, असें माझे पाहाण्यांत व ऐकण्यांतसुद्धां आलें नाहीं, याचें मुख्य कारण काय असावें बरें ?

जोतीराव. उ०—आपल्या इंग्रज सरकारनें सर्व जातींच्या मुलांस शाळेंत घेण्याविषयीं जरी मोकळीक दिली आहे, तरी अतिशूद्रांच्या जातींतील पंतोजी तयार करण्याविषयीं त्यांनीं कांहीं तजवीज केली नाहीं. यावरून आर्य धर्मअनुयायी भटब्राह्मण पंतोजीकडून अतिशूद्रांचीं मुलें विद्वान होऊन मोठे कामगार कधींच होणार नाहींत, याविषयीं आमच्या भोळसर सरकारानें विचार केला आहे काय ? कारण, आर्य लोकांच्या एकतर्फी ग्रंथांत शूद्रादि अतिशूद्रांस विद्या न देण्याविषयीं कडेकोट बंदोबस्त केला आहे. आणि धूर्त आर्यभट ब्राह्मण आपलीं पोटें जाळण्याकरितां विद्वान् झालेले पोटार्थी भट पंतोजीकडून खेडेगांवांतील अतिशूद्रांचीं मुलें शाळेंत शिकून विद्वान होणार नाहींत, असें मी खात्रीनें सांगतों.

गोविंदराव. प्र०—इंग्रज सरकारच्या शाळाखात्यांत पक्षपात असल्यामुळें एकंदर सर्व धूर्त आर्यभट ब्राह्मणांचीं मुलें विद्वान झाल्याबरोबर त्यांचा जरी सरकारी लष्करी खात्यांत प्रवेश होत नाहीं, तरी त्यांचा बाकीच्या एकंदर सर्व खात्यांत प्रवेश होऊन पलपलाट झाला असतो. यामुळें शूद्रादि अतिशूद्र अज्ञानी असून त्यांस स्वतंत्रता कशास म्हणावें, हें मुळींच

समजत नसल्यामुळें धूर्त ब्राह्मण कामगार त्यांस कसकसें नाडीत असतील, याविषयीं आतां माझ्या पक्कें लक्षांत आलें. परंतु वेदसंहितासह आर्यभट ब्राह्मणाचे कारकिर्दीत प्रत्येक मानवास त्यानें स्वतः कमविलेल्या मालमत्तेचा उपभोग घेतां येत होता काय ?

जोतीराव. उ०—पूर्वी आर्यभट ब्राह्मणांच्या कारकीर्दीत एखाद्या शूद्रानें आपल्या जीवावर उदार होऊन आर्य यजमानासह त्यांच्या कुटुंबांतील एकंदर सर्व माणसांचे प्राण वांचविले, यास्तव त्यानें उदार होऊन त्या जाहमर्द शूद्रास आपल्या दासत्वापासून मुक्त केल्याबरोबर, भलता एखादा दुसरा नाग्या आर्यभट ब्राह्मण त्या परोपकारी शूद्रास पकडून त्यास आपल्या बापाची मत्ता समजून आपलें दास्य.व करावयास लावीत असे. त्याचप्रमाणें दुष्काळांत आर्यानें शूद्रांच्या मालमिळकतीचा यथेच्छ उपभोग घ्यावा, म्हणून मनुसंहितेंत सांगितलें आहे. इतकेंच नव्हे, परंतु शूद्रांच्या स्वस्त्रीचें एखाद्या उन्मत्त आर्यभट ब्राह्मणानें पातिव्रत्य नष्ट केल्याबद्दल त्यास नांवाला सुमारें चौदा रुपये मात्र दंड द्यावा लागत असे व त्याचप्रमाणें आर्यभट ब्राह्मणांतील एखाद्या इष्की स्त्रीनें भलत्या एखाद्या शूद्राच्या अंगावर पडून आपला मतलब साधून घेतल्यास त्याबद्दल ब्राह्मणीस मोकळें सोडून शूद्रांच्या तोंडांत शिसें पाघळून ओतावें; आणि त्याचें उत्पत्तीचें स्थान कापून काढण्याची त्यांस शिक्षा देत असत.

गोविंदराव. प्र०—सदरचे एकंदर सर्व धूर्त आर्यभट ब्राह्मणांनीं पराजीत केलेल्या शूद्रादि अतिशूद्रांबरोबर दुष्ट आचरण केलेलें मला ऐकण्याचीसुद्धां लाज वाटते.

जोतीराव. उ०—धूर्त आर्यभट ब्राह्मणांनीं शूद्रादि अतिशूद्रांबरोबर दुष्ट आचरण केलेलें तुला ऐकण्याची लाज वाटावी, हें योग्यच आहे. कारण तुला या दयाळू इंग्लिश सरकारच्या राज्यांत मनुष्यपणा आला. परंतु धूर्त आर्यभट्टांच्या पुर्वजांनीं पूर्वी आपल्या शूद्रादि अतिशूद्रांच्या पूर्वजांस अनीवार त्रास देतेवेळीं त्यांस लाज वाटली नाहीं व त्याचप्रमाणें आतांहि आर्यांचे वंशज आपण शूद्रादि अतिशूद्रांस बनावट धर्म व राजकीय कामामध्यें नाना प्रकारचे छक्केपंजे करून आपणांस ठकविण्यास लाजत नाहींत. यावरून आर्य लोकांत मुळींच मनुष्यपणा नाहीं, असें सिद्ध होतें.

गोविंदराव. प्र०—आहो तात्यासाहेब ! आर्यांनीं जें केलें तें पुनः परत येत नाहीं. आतां त्यांनीं याला काय उपाय करावा ?

जोतीराव. उ०—आतां त्याला उपाय एवढाच आहे कीं, एकंदर सर्व आर्यभट ब्राह्मण लोक आपल्यास निर्लज्जपणें स्वतः अहंब्रह्म म्हणवून घेतात, याविषयीं त्यांस पश्चाताप होऊन ते सर्व, सत्य शोधून सत्य वर्तणारे झाल्याबरोबर एकंदर सर्व शूद्रादि अतिशूद्र, भिल्ल, कोळी, खोंड वगैरे लोक त्यांच्या मागील व हल्लींच्या नीच कर्माबद्दल सूड न घेतां त्यांस निःसंशय क्षमा करतील.

गोविंदराव. प्र०—परंतु एकंदर सर्व जगांतील मानवप्राणी आर्यांस छिः थुः करितात, याला त्यांनीं काय करावें ?

जोतीराव. उ०—एकंदर सर्व आर्यभट ब्राह्मण आपले थोतांडी ग्रंथ एके बाजूला फेकून एकंदर सर्व मानव स्त्रीप्राण्यांबरोबर सत्य वर्तन जेव्हां करूं लागतील, तेव्हां जगांतील एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुष आर्यांचें कल्याण व्हावें, ह्मणून आपण सर्वांच्या निर्मीकाच्या पदापाशीं लीन होऊन त्यांजविषयीं मनःपूर्वक प्रार्थना करतील, यांत कांहीं संशय नाहीं. तूर्त हा विषय या प्रसंगीं थोडासा लांबला आहे, यास्तव मी येथेंच मुक्काम करितों.

## सत्य

गणपतराव दर्याजी थोरात. प्र०—सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावें ? .

जोतीराव गोविंदराव फुले. उ०—सत्यवर्तन करणाऱ्यांविषयीं नियम देतों, ते येणें-प्रमाणें—

१. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केलें. त्यांपैकीं स्त्रीपुरुष हे उभयतः जन्मतांच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असें कबूल करणारे, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२. स्त्री असो अथवा पुरुष असो, ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें या विस्तीर्ण पोकळींतील निर्माण केलेल्या अनंत सूर्यमंडळांसह त्यांचे ग्रहोपग्रहास अथवा एखाद्या विचित्र ताऱ्यास अथवा एखाद्या धातू दगडाच्या मूर्तीस निर्मिकाच्या ऐवजीं मान देत नसल्यास, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

३. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व वस्तूंचा यच्चावत् प्राणीमात्रांस उपभोग घेऊं न देतां, निरर्थक निर्मीकास अर्पण करून त्याचें पोकळ नाम-स्मरण जे करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

४. आपण सर्वांच्या निर्माणकर्त्यानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व प्राणीमात्रांस समस्त वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेऊन त्यांस निर्मीकाचा आभार मानून त्याचें गौरव करूं देतात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

५. विश्वकर्त्यानें निर्माण केलेल्या प्राणीमात्रांस जे कोणी कोणत्याहि प्रकारचा निरर्थक त्रास देत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

६. आपल्या सर्वांच्या निर्मीकानें एकंदर सर्व स्त्रीपुरुषांस, एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहेत. त्यांतून एखादा मानव अथवा कांहीं मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करूं शकत नाहीं व त्याप्रमाणें जबरी न करणारांस, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

७. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे, ज्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याहि तऱ्हेचें नुकसान करितां येत नाहीं, अथवा जे कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

८. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें एकंदर सर्व प्राणीमात्रांस निर्माण केलें आहे. त्यांपैकीं हरएक स्त्रीनें एका पुरुषास मात्र आपला भ्रतार करण्याकरितां वजा करून व तसेंच हरएक पुरुषानें एका स्त्रीस मात्र आपली भार्या करण्याकरितां वजा करून, एकंदर जे सर्व स्त्रीपुरुष एकमेकांबरोबर मोठ्या आवडीनें बहीण भावंडाप्रमाणें आचरण करतात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

९. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें एकंदर सर्व स्त्रियांस अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांविषयीं आपले पाहिजेल तसे विचार, आपलीं पाहिजेल तशीं मतें बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे; परंतु ज्या विचारांपासून व मतांपासून कोणत्याहि व्यक्तीचें कोणत्याच तऱ्हेचें नुकसान मात्र होऊं नये ह्मणून जे खबरदारी ठेवितात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

१०. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यांच्या व्यवस्थेवरून एकंदर जे सर्व स्त्रीपुरुष दुसऱ्याच्या धर्मसंबंधीं मतांवरून अथवा राजकीयसंबंधीं मतांवरून त्यांस कोणत्याहि प्रकारें नीच मानून त्यांचा छळ करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

११. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांस एकंदर धर्मसंबंधीं गांवकी अथवा मुल्की अधिकाराच्या जागा त्यांच्या योग्यतेनुरूप व सामर्थ्यानुरूप मिळाव्यात, ह्मणून त्यांस समर्थ केले आहेत, असें कबूल करणारे, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

१२. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यांच्या नियमास अनुसरून एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुष धर्म, गांवकी व मुलकी यासंबंधींची प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, संरक्षण आणि त्याचा जुलमापासून बचाव करण्याविषयीं जे कोणी बाध आणीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

१३. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या मातापित्याचा वृद्धापकाळीं परामृष करून इतर मानववृद्ध शिष्टांस सन्मान देतात अथवा मातापित्याचा परामृष करून इतर मानववृद्ध शिष्टांस सन्मान देणारांस बहुमान देतात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

१४. स्त्री अथवा पुरुष, जे वैद्यांच्या आज्ञेवांचून अफू, भांग, मद्य वगैरे अमली पदार्थांचें सेवन करून नाना तऱ्हेचे अन्याय करण्यास प्रवृत्त होत नाहींत, अथवा ते सेवन करणारास आश्रय देत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१५. स्त्री अथवा पुरुष, जे—पिसू, ढेकूण, ऊं वगैरे किटक, विंचू, सरपटणारे सर्प, सिंह, वाघ, लांडगे वगैरे आणि त्याचप्रमाणें लोभी मानव दुसऱ्या मानव प्राण्यांचा वध करणारे किंवा आत्महत्या करणारे खेरीजकरून, जे स्त्री अथवा पुरुष, दुसऱ्या मानव प्राण्यांची हत्या करीत नाहींत अथवा हत्या करणारास मदत देत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१६. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या हितासाठीं दुसऱ्याचें नुकसान करण्याकरितां

लबाड बोलत नाहींत अथवा लबाड बोलणारास मदत करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१७. स्त्री अथवा पुरुष, जे व्यभिचार करीत नाहींत अथवा व्यभिचाऱ्यांचा सन्मान ठेवीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१८. स्त्री अथवा पुरुष, जे हरएक प्रकारची चोरी करीत नाहींत अथवा चोरास मदत करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१९. स्त्री अथवा पुरुष, जे द्वेषानें दुसऱ्याच्या घरास व त्यांच्या पदार्थांस आग लावीत नाहींत अथवा आग लावणाऱ्यांचा स्नेह करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२०. स्त्री अथवा पुरुष, जे स्वतःच्या हितासाठीं—न्यायानें राज्य करणाऱ्या संस्थानीकांवर अथवा राज्यावर अथवा एकंदर सर्व प्रजेनें मुख्य केलेल्या प्रतिनिधीवर बंड करून लक्षावधी लोकांचीं कुटूंबें उघडीं पाडीत नाहींत अथवा बंड करणारांस मदत देत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२१. स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व जगाच्या हितासाठीं धर्मपुस्तक तयार केलें आहे, म्हणून मोठ्या बढाईनें वाचाळपणा करितात; परंतु तें धर्मपुस्तक आपल्या बगलेंत मारून इतर मानवांस दाखवीत नाहींत, अशा कपटी बढाईखोरांवर जे विश्वास ठेवीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२२. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या कुटुंबासह, आपल्या भाऊबंदांस, आपल्या सोयऱ्या-धायऱ्यांस आणि आपल्या इष्टमित्र साथ्यांस मोठ्या तोऱ्यानें पिढीजादा श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहींत आणि एकंदर सर्व मानवी प्राण्यांस पिढीजादा कपटानें अपवित्र मानून त्यांस नीच मानीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२३. स्त्री अथवा पुरुष, जे पूर्वी कपटानें लिहिलेल्या ग्रंथांच्या वहिवाटीवरून कांहीं मानवांस पिढीजादा दास मानीत नाहींत अथवा दास मानणाऱ्यांचा बोज ठेवीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२४. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या लोकांचें वर्चस्व मुद्दाम राहण्याकरितां शाळेमध्यें शिकवितांना इतर लोकांच्या मुलांबरोबर दूजाभाव करीत नाहींत अथवा शाळेंत शिकवितांना दूजाभाव करण्याचा धिःकार करितात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२५. स्त्री अथवा पुरुष, जे न्यायाधिशाचा हुद्दा चालवितांना अन्यायी लोकांचा, त्यांच्या अन्यायाप्रमाणें त्यांस योग्य शिक्षा देण्यास कधींहि, पक्षपात करीत नाहींत अथवा अन्यायानें पक्षपात करणाऱ्यांचा धिःकार करितात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२६. स्त्री अथवा पुरुष, जे शेतकी अथवा कलाकौशल्य करून पोटें भरणारांस श्रेष्ठ मानितात; परंतु शेतकरी वगैऱ्यांस मदत करणारांचा आदरसत्कार करितात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२७. स्त्री अथवा पुरुष, जे चांभाराच्या घरीं कां होईना, बिगाऱ्यांचा धंदा करून आपला निर्वाह करणाऱ्यांस तुच्छ मानीत नाहींत; परंतु त्या कामीं मदत करणारांची वहावा करितात, त्यांस सत्यवर्तन ह्मणावेत.

२८. स्त्री अथवा पुरुष, जे स्वतः कांहीं उद्योगधंदा न करतां निरर्थक धार्मिकपणाचा डौल घालून अज्ञानी जनांस नवग्रहांची पिडा दाखऊन त्यांस भोंदाडून खात नाहींत अथवा तत्संबंधीं पुस्तकें करून आपलीं पोटें जाळीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

२९. स्त्री अथवा पुरुष, जे भावीक मूढांस फसवून खाण्याकरितां ब्रह्मर्षीचें सोंग घेऊन त्यांस आंगाराधुपारा देत नाहींत, अथवा तत्संबंधी मदत करीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३०. स्त्री अथवा पुरुष, जे कल्पित देवाची शांती करण्याचे निमित्तानें अनुष्ठानी बनून अज्ञानी जनांस भोंदाडून खाण्याकरितां जपजाप करून आपलीं पोटें जाळीत नाहींत अथवा तत्संबंधी मदत करणारांचा बोज ठेवीत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

३१. स्त्री अथवा पुरुष, जे आपलीं पोटें जाळण्याकरितां अज्ञानी जनांत कलह उपस्थित करीत नाहींत अथवा तत्संबंधी मदत करणारांच्या सावलीसदेखील उभे राहत नाहींत, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

३२. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या सर्वांच्या निर्मिकानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांपैकीं मानव स्त्रीपुरुषांमध्यें कोणत्याच तऱ्हेची आवडनिवड न करतां त्याचें खाणेंपिणें व लेणेंनेसणें याविषयीं कोणत्याच प्रकारचा विधीनिषेध न करितां त्यांच्याबरोबर शुद्ध अंतःकरणानें आचरण करितात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

३३. स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांपैकीं कोणाची आवडनिवड न करितां त्यांतील महारोग्यांस, पंगूंस व पोरक्या मुलांस आपल्या शक्त्यनुसार मदत करतात अथवा त्याला मदत करणाऱ्यांस सन्मान देतात, त्यांस सत्यवर्तन करणारे ह्मणावेत.

**गणपतराव. प्र०**—या आपल्या सदरील नियमांवरून असें सिद्ध होतें कीं, एकंदर सर्व मानवांनीं सत्य आचरण कसें करावें, याविषयीं आपल्या दयामूर्ति निर्मिकानें स्वतः एखादें पुस्तक केलें नसावें, असेंच तुम्हांला वाटतें काय ?

**जोतीराव. उ०**—भले, शाबास ! कारण आपण सर्वांच्या निर्मिकानें या अगम्य पोकळींतील अनंत सूर्य मंडळांसह त्यांच्या ग्रहोउपग्रहांवरील अनंत प्राणीमात्रांस त्यानें धडा घालून दिल्याप्रमाणें, ते आपल्या सुवर्तनानें कसें वर्तन करीत आहेत; त्याविषयीं संतोष मानण्याचें एके बाजूला ठेऊन या आपल्या पृथ्वीवरील मानव स्त्रीपुरुषांनीं सत्य आचारण करावें म्हणून त्यानें स्वतः एखादें धर्मपुस्तक जर केलें असतें, तर त्यानें येथील स्त्रीपुरुषांची आवडनिवड न करितां या उभयतांच्या मानवी अधिकाराविषयीं

निःपक्षपातानें लिहिलें असतें व त्याचप्रमाणें त्यानें तें धर्मपुस्तक एकंदर सर्व जगांतील निरनिराळ्या भाषांत समजण्याजोगतें केलें असतें.

**गणपतराव. प्र०**—तर मग हीं निरनिराळीं धर्मपुस्तकें या जगांत कोणीं केलीं? ज्यामध्यें पुरुषांच्या मानवी हक्कांविषयीं मात्र अघळपघळ लिहिलें आहे.

**जोतीराव. उ०**—परंतु हीं सर्व निरनिराळीं धर्मपुस्तकें अनेक कनवाळू परोपकारी सत्पुरुषांनीं केलीं आहेत. व त्यांमध्यें त्यांच्या समजुतीप्रमाणें पुरुषांच्या हक्कांविषयीं कांहींना कांहीं तरी प्रतिपादन केलें आहे.

**गणपतराव. प्र०**—बरें सुचलें! तथापि पहिलें, आर्यांच्या धर्मांमध्यें आपण सर्वांच्या निर्मिकाची उचलबांगडी करून एकंदर सर्व आर्य आपणांस अज्ञानी जनांचे भूदेव म्हणवितात. दुसरें, खिस्ती धर्मांमध्यें येशूस सर्वांच्या निर्मिकाचा पुत्र म्हणतात. आणि तिसरें, महमदी धर्मांमध्यें महमदास आपणा सर्वांच्या निर्मिकाचा पैगंबर म्हणतात; या सर्वांविषयीं उलगडा करून सांगाल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—कारण पहिलें असें कीं, आर्यांनीं कुतर्कभरित तत्वज्ञानाच्या लंडाईनें वेदांती बनून आपण सर्वांच्या निर्मिकास निकामी करून त्याची उचलबांगडी केली. आणि ते आपणच स्वतः अहंब्रह्म होऊन पराजित केलेल्या अज्ञानी लोकांचे भूदेव बनले आहेत. यावरून अर्थात् एकंदर सर्व जगांतील सुज्ञ पुरुष त्यांस कुचके धर्मलंड नास्तिक म्हणूं लागले व दुसरें असें कीं आपण सर्वांच्या निर्मिकाविषयीं जो कांहीं येशूनें उपदेश केला, त्यामध्यें त्यानें आपल्या सर्वांच्या निर्मिकास बापासमान मानून अज्ञानी मानव बंधूजनांचें तारण होण्यासाठीं त्यांस मोठ्या आशेनें बोध केला, यावरून अर्थात् हल्लींचें एकंदर सर्व खिस्ती लोक त्याला देवाच्या पुत्रासारिखा मानून त्यास तारणारा म्हणतात. आणि तिसरें असें कीं, महमदानें निर्मिकाच्या अधिकाऱ्यांविषयीं बरेंच पवित्र कुराण लिहून ठेविलें आहे; त्यांत त्यानें जो कांहीं उपदेश केला आहे, त्या सर्वांमध्यें एकंदर सर्व मानव बंधुजनांस सुमार्गावर आणण्याकरितां आपण सर्वांच्या निर्मिकानें महमदाला येथें पाठविलें आहे, म्हणून तो मोठ्या आवेशानें उघड सर्वांस कळवीत असे. यावरून अर्थात् हल्लींचे एकंदर सर्व सुन्नी अथवा सिय्या महमदी लोक त्याला पैगंबर अथवा आपण सर्वांच्या निर्मिकानें पाठविलेला, म्हणतात.

**गणपतराव. प्र०**—कांहो तात्यासाहेब, हीं सर्व धर्मपुस्तकें अनेक सत्पुरुषांनीं जर केलीं आहेत, तर त्यांपैकीं एखादें धर्मपुस्तक सत्स्त्रीनें केलें आहे काय?

**जोतीराव. उ०**—एखाद्या सत्स्त्रीनें आजपावेतों जर धर्मपुस्तक केलें असतें, तर मानव पुरुषांनीं एकंदर सर्व स्त्रियांच्या हक्कांविषयीं हयगय करून त्यांनीं आपल्या पुरुषजातीच्या हक्कांविषयीं मात्र वाचाळपणा केला नसता. कारण स्त्रिया जर ग्रंथ लिहिण्याजोगत्या विद्वान् असत्या, तर पुरुषांनीं असा उघड गोमा करून पक्षपात केला नसता.

**गणपतराव.** प्र०—असो, या महा सत्पुरुषांच्या निरनिराळ्या धर्मपुस्तकांत त्यांच्या समजुनीप्रमाणें पुरुषांच्या हक्कांविषयीं कांहींना कांहीं जर सत्य प्रतीपादन केलें आहे, तर त्यांच्या अनुयायांमध्यें इतका भेदभाव पडला आहे, तो कां ?

**जोतीराव.** उ०—त्यांच्यामध्यें इतका भेदभाव पडण्याचें कारण, जे ते आपल्या धर्मावरून व दुसऱ्याच्या धर्माविषयीं सारासार विचार न करतां, माझाच धर्म खरा आहे, म्हणून वेलगामी हट्ट घेऊन बसतात. परंतु एकमेकांनीं एकमेकांच्या धर्माविषयीं सारासार विचार केल्याबरोबर कोणीच कोणाच्या धर्माला खोटें म्हणणार नाहींत, असें माझ्या विचारानें ठरतें.

**गणपतराव.** प्र०—तथापि दुसरें असें कीं, ते एकमेकांच्या धर्मपुस्तकांतील सत्याविषयीं जरी सारासार विचार करून पाहतात, तरी ते एकमेकांशीं निरर्थक हाडवैर कां करितात ?

**जोतीराव.** उ०—परंतु ते परस्परांच्या धर्मस्थापक सत्पुरुषांसह त्या वेळच्या अज्ञानी लोकांतील सत्य आचरणाच्या अनुमानस्थितीविषयीं सारासार विचार करीत नाहींत, यामुळें तसें घडून येतें.

**गणपतराव.** प्र०—या तुमच्या सिद्धांतावरून हल्लींच्याप्रमाणें अति प्राचीन काळचे मानव समंजस नव्हते काय ?

**जोतीराव.** उ०—यांत काय संषय ! कारण, हल्लींप्रमाणें अति प्राचीन काळचे मानव जर समजंस असते, तर त्यांनीं शूद्रादि अतिशूद्र मानवांस धिःकारानें नीच मानण्याची वहिवाट पाडली नसती. त्याचप्रमाणें प्राचीन काळचे मानव पराजित केलेल्या मानवांच्या कन्या-पुत्रांस आपल्या कुणबिणी व दास करून त्यांस आपली सेवाचाकरी करावयास लाविली नसती; आणि अशा तऱ्हेचा अधिकार कांहीं लोकांस होता, म्हणून एखाद्या धर्मपुस्तकांत महासत्पुरुषांच्यानें प्रसिद्धपणें लिहून ठेवविलें नसतें. यावरून ते हट्टी स्वभावाचे असून ते दुसऱ्यांचा सूड घेणारे मात्र होते, असें सिद्ध होतें.

**गणपतराव.** प्र०—अशा तऱ्हेचें धर्मपुस्तक एखाद्या जंगली रानवट मानवाच्यानें लिहून ठेवण्याची छाती झाली नसती. यास्तव धर्मपुस्तक तरी कसें असावें, यांविषयीं थोडक्यांत उल्लेख करून दाखवाल, तर बरें होईल ?

**जोतीराव.** उ०—स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व गांवच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधानें अथवा कोणत्याहि धर्मांतील मताच्या संबंधानें, स्त्री आणि पुरुष या उभयतांनीं अथवा सर्व स्त्रियांनीं अथवा सर्व पुरुषांनीं, एकमेकांत एकमेकांची कोणत्याच प्रकारची आवडनिवड न करितां या सर्व स्त्रीपुरुषांनीं, या भूगोलावर आपलें एक कुटुंब समजून एकमतानें, एकजुटीनें एकमेकांशीं सत्यवर्तन करून आपण सर्वांच्या निर्मिकास संतोष देऊन आपण त्याचीं आवडतीं लेकरें होतात; त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत; परंतु या सदरच्या नियमास अनुसरून एकंदर सर्व स्त्रीपुरुषांनीं जर सत्य आचरण केलें असतें

तर एकंदर सर्व जगांतील देवबापा परशुरामादि शिपायांस; पोलिसास, न्यायाधिशास व तुरंगावरील शिपायास अजिबाद फांटा द्यावा लागला असता.

**गणपतराव.** प्र०—तर मग एकंदर सर्व जगांतील स्त्रीपुरुष मानवांनीं कोणत्या धर्माचा स्वीकार करावा, याविषयीं आपण निकाल कराल, तर बरें होईल.

**जोतीराव.** उ०–अहो बाबा, या भूमंडळावर महासत्पुरुषांनीं जेवढीं म्हणून धर्मपुस्तकें केलीं आहेत, त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणें कांहींना कांहीं सत्य आहे. यास्तव कोणत्याहि कुटुंबांतील एका मानव स्त्रीनें बौद्ध धर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास तिनें तो धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबांतील तिच्या पतीनें जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास त्यानें खिस्ती व्हावें व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येनें कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास तिनें महमदी धर्मी व्हावें. आणि त्याच कुटुंबांतील त्याच्या पुत्रानें सार्वजनीक सत्यधर्मपुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास त्यानें सार्वजनीक सत्यधर्मी व्हावें; आणि या सर्व मातापित्यासह कन्यापुत्रांनीं आपला प्रपंच करीत असतां प्रत्येकानें कोणी कोणाच्या धर्माचा हेवा करून द्वेष करूं नये आणि त्या सर्वांनीं आपण सर्वांच्या निर्माणकर्त्यानें निर्माण केलेलीं लेकरें असून त्याच्याच (निर्मिकाच्या) कुटुंबांतील आहोंत, असें समजून प्रेमानें व गोडीगुलाबीनें एकमेकांनीं वर्तन करावें, म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यांत धन्य होतील.

**गणपतराव.** प्र०—पुरे आतां; कारण त्या सर्व धर्मपुस्तकांत कांहींना कांहीं जर सत्य आहे, तर या भूमंडळावर जेवढे म्हणून धर्म आहेत, ते सार्वजनिक सत्याचीं लेकरें आहेत, अशी माझी खात्री झाली.

**जोतीराव फुले.** उ०—यावरून एकंदर सर्व धर्मांसह त्यांच्या अनुयायी लोकांनीं नमुन सार्वजनीक सत्यास साष्टांग प्रणिपात करावा, अथवा सार्वजनीक सत्यानें एकंदर सर्व धर्मांसह त्यांच्या अनुयायी लोकांस कोणत्या तऱ्हेचा मान द्यावा? याविषयीं तुमचा तुह्मीच सरळ चोख विचार करून पाहा. असो; परंतु प्रत्येक स्त्री-पुरुष मानवानें दुसऱ्या व्यक्तीचें नुकसान न करितां त्यास कोणत्याहि तऱ्हेचें आचरण करण्यास अधिकार जर आहे, तर तुम्ही कोणत्याहि धर्मांसह त्यांच्या अनुयायी लोकांची आवडनिवड न करितां त्या सर्वांबरोबर बहिण-भावंडाप्रमाणें सत्य वर्तन करण्याचा क्रम चालू करा, ह्मणजे तुम्ही आपणा सर्वांच्या जगनियंत्यासमोर धन्य व्हाल.

## आकाशांतील ग्रह

**बळवंतराव हरी साकवळकर.** प्र०—आकाशांतील ग्रह या आपल्या भूमंडळावरील मानव स्त्री-पुरुषांस पीडा देतात, ह्मणून ग्रहशास्त्रवेत्ते मोठ्या डौलानें ह्मणतात, हें खरें आहे काय?

गणपतराव. प्र०—असो, या महा सत्पुरुषांच्या निरनिराळ्या धर्मपुस्तकांत त्यांच्या समजुतीप्रमाणें पुरुषांच्या हक्कांविषयीं कांहींना कांहीं जर सत्य प्रतीपादन केलें आहे, तर त्यांच्या अनुयायांमध्यें इतका भेदभाव पडला आहे, तो कां ?

जोतीराव. उ०—त्यांच्यामध्यें इतका भेदभाव पडण्याचें कारण, जे ते आपल्या धर्मावरून व दुसऱ्याच्या धर्माविषयीं सारासार विचार न करतां, माझाच धर्म खरा आहे, म्हणून वेल्गामी हट्ट घेऊन बसतात. परंतु एकमेकांनीं एकमेकांच्या धर्माविषयीं सारासार विचार केल्याबरोबर कोणीच कोणाच्या धर्माला खोटें म्हणणार नाहींत, असें माझ्या विचारानें ठरतें.

गणपतराव. प्र०—तथापि दुसरें असें कीं, ते एकमेकांच्या धर्मपुस्तकांतील सत्याविषयीं जरी सारासार विचार करून पाहतात, तरी ते एकमेकांशीं निरर्थक हाडवैर कां करितात ?

जोतीराव. उ०—परंतु ते परस्परांच्या धर्मस्थापक सत्पुरुषांसह त्या वेळच्या अज्ञानी लोकांतील सत्य आचरणाच्या अनुमानस्थितीविषयीं सारासार विचार करीत नाहींत, यामुळें तसें घडून येतें.

गणपतराव. प्र०—या तुमच्या सिद्धांतावरून हल्लींच्याप्रमाणें अति प्राचीन काळचे मानव समंजस नव्हते काय ?

जोतीराव. उ०—यांत काय संषय ! कारण, हल्लींप्रमाणें अति प्राचीन काळचे मानव जर समजंस असते, तर त्यांनीं शूद्रादि अतिशूद्र मानवांस धिःकारानें नीच मानण्याची वहिवाट पाडली नसती. त्याचप्रमाणें प्राचीन काळचे मानव पराजित केलेल्या मानवांच्या कन्या-पुत्रांस आपल्या कुणबिणी व दास करून त्यांस आपली सेवाचाकरी करावयास लाविली नसती; आणि अशा तऱ्हेचा अधिकार कांहीं लोकांस होता, म्हणून एखाद्या धर्मपुस्तकांत महासत्पुरुषांच्यानें प्रसिद्धपणें लिहून ठेवविलें नसतें. यावरून ते हट्टी स्वभावाचे असून ते दुसऱ्यांचा सूड घेणारे मात्र होते, असें सिद्ध होतें.

गणपतराव. प्र०—अशा तऱ्हेचें धर्मपुस्तक एखाद्या जंगली रानवट मानवाच्यानें लिहून ठेवण्याची छाती झाली नसती. यास्तव धर्मपुस्तक तरी कसें असावें, यांविषयीं थोडक्यांत उल्लेख करून दाखवाल, तर बरें होईल ?

जोतीराव. उ०—स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व गांवच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधानें अथवा कोणत्याहि धर्मांतील मताच्या संबंधानें, स्त्री आणि पुरुष या उभयतांनीं अथवा सर्व स्त्रियांनीं अथवा सर्व पुरुषांनीं, एकमेकांत एकमेकांची कोणत्याच प्रकारची आवडनिवड न करितां या सर्व स्त्रीपुरुषांनीं, या भूगोलावर आपलें एक कुटुंब समजून एकमतानें, एकजुटीनें एकमेकांशीं सत्यवर्तन करून आपण सर्वांच्या निर्मिकास संतोष देऊन आपण त्याचीं आवडतीं लेकरें होतात; त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत; परंतु या सदरच्या नियमास अनुसरून एकंदर सर्व स्त्रीपुरुषांनीं जर सत्य आचरण केलें असतें

तर एकंदर सर्व जगांतील देवबापा परशुरामादि शिपायांस; पोलिसास, न्यायाधिशास व तुरुंगावरील शिपायास अजिबाद फांटा द्यावा लागला असता.

**गणपतराव. प्र०**—तर मग एकंदर सर्व जगांतील स्त्रीपुरुष मानवांनीं कोणत्या धर्माचा स्वीकार करावा, याविषयीं आपण निकाल कराल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—अहो बाबा, या भूमंडळावर महासत्पुरुषांनीं जेवढीं म्हणून धर्मपुस्तकें केलीं आहेत, त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणें कांहींना कांहीं सत्य आहे. यास्तव कोणत्याहि कुटुंबांतील एका मानव स्त्रीनें बौद्ध धर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास तिनें तो धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबांतील तिच्या पतीनें जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास त्यानें खिस्ती व्हावें व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येनें कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास तिनें महमदी धर्मी व्हावें. आणि त्याच कुटुंबांतील त्याच्या पुत्रानें सार्वजनीक सत्यधर्मपुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणें पाहिजे असल्यास त्यानें सार्वजनीक सत्यधर्मी व्हावें; आणि या सर्व मातापित्यासह कन्यापुत्रांनीं आपला प्रपंच करीत असतां प्रत्येकानें कोणी कोणाच्या धर्माचा हेवा करून द्वेष करूं नये आणि त्या सर्वांनीं आपण सर्वांच्या निर्माणकर्त्यानें निर्माण केलेलीं लेकरें असून त्याच्याच (निर्मिकाच्या) कुटुंबांतील आहोंत, असें समजून प्रेमानें व गोडीगुलाबीनें एकमेकांनीं वर्तन करावें, म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यांत धन्य होतील.

**गणपतराव. प्र०**—पुरे आतां; कारण त्या सर्व धर्मपुस्तकांत कांहींना कांहीं जर सत्य आहे, तर या भूमंडळावर जेवढे म्हणून धर्म आहेत, ते सार्वजनिक सत्याचीं लेकरें आहेत, अशी माझी खात्री झाली.

**जोतीराव फुले. उ०**—यावरून एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांनीं नमुन सार्वजनीक सत्यास साष्टांग प्रणिपात करावा, अथवा सार्वजनीक सत्यानें एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांस कोणत्या तऱ्हेचा मान द्यावा? याविषयीं तुमचा तुह्मीच सरळ चोख विचार करून पाहा. असो; परंतु प्रत्येक स्त्री-पुरुष मानवानें दुसऱ्या व्यक्तीचें नुकसान न करितां त्यास कोणत्याहि तऱ्हेचें आचरण करण्यास अधिकार जर आहे, तर तुम्ही कोणत्याहि धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांची आवडनिवड न करितां त्या सर्वांबरोबर बहिण–भावंडाप्रमाणें सत्य वर्तन करण्याचा क्रम चालू करा, ह्मणजे तुम्ही आपणा सर्वांच्या जगनियंत्यासमोर धन्य व्हाल.

## आकाशांतील ग्रह

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—आकाशांतील ग्रह या आपल्या भूमंडळावरील मानव स्त्री-पुरुषांस पीडा देतात, ह्मणून ग्रहशास्त्रवेत्ते मोठ्या डौलानें ह्मणतात, हें खरें आहे काय?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—या सर्व विस्तीर्ण पोकळींत अनंत तारे आहेत, त्यांपैकीं आपल्या अति संनिधचे सूर्य आणि चंद्र हे उभयतां या पृथ्वीवरील एकंदर सर्व जलचर भूचर आणि वनचरांसह वनस्पतीचें प्राण जीवन आहेत, ह्मणून निर्विवाद आहे. व तसेंच बाकी शनी वगैरे ग्रह एकट्या मानव स्त्रीपुरुषांस पीडा देतात ह्मणून सिद्ध करितां येत नाहीं. तसेंच शनी वगैरे ग्रहांच्या क्रमणाच्या संबंधानें एखाद्या वेळीं या आपल्या पृथ्वीवरील एकंदर सर्व प्राणीमात्रांस कांहीं एक तऱ्हेचें हित अथवा अनहित होण्याचा जरी संभव आहे; तरी ते एकंदर सर्व प्राण्यांपैकीं फक्त मानव स्त्रीस अथवा पुरुषास पीडा देतात, ह्मणून सिद्ध करतां येणार नाहीं. कारण, शनीवरील एकंदर सर्व प्रदेश इतका विस्तीर्ण आहे कीं, त्याच्या निर्वाहाकरितां चार चंद्र आहेत व त्यास आपल्या सर्वांच्या निर्मिकानें नेमून दिलेले उद्योग एके बाजूला ठेऊन तो या भूमंडळावरील एखाद्या मानव व्यक्तीस पीडा देण्यास येतो; आणि ती पीडा टाळण्याकरितां अज्ञानी लोकांनीं धूर्त आर्यभट जोशांस भक्कम दक्षिणा दिल्यानें दूर होती, ही सर्व पोटबाबू आर्य जोशांची लबाडी आहे.

**बळवंतराव.** प्र०—त्याचप्रमाणें आकाशांतील मेष व वृषभ ग्रह या भूमंडळावरील चतुष्पाद बैल व मेंढ्यांबरोबर टकरा घेण्याचें एकीकडेच ठेवून येथील एखाद्या द्वीपद मानव स्त्रीपुरुषांच्या राशीला येऊन त्यांस पीडा देण्यास समर्थ होतात हें कसें ?

**जोतीराव.** उ०—अहो ! त्यांच्या या भूमंडळावरील चतुष्पाद भाऊबंदांस म्हणजे बैलांस जन्म देणाऱ्या गायांसह मेंढ्यांस अघोरी आर्यभट ब्राह्मण त्यांस खाण्याच्या निमित्तानें यज्ञांमध्यें त्यांचा बुक्यांनीं वध करून त्यांचें मांस जरी ते गिधाडासारखे खात होते, तरी त्यांच्यानें त्यावेळीं आर्यभट ब्राह्मणांचें कांहीं नुकसान करवलें नाहीं; तथापि हल्लींच्या सत्ययुगांत जर गाया मेंढ्यांस ईश्वरकृपेनें वाचा फुटली असती, तर त्यांनीं धूर्त आर्यांतील ग्रंथकारांचीं नाकें ठेंचण्यास कधींहि मागेंपुढें घेतलें नसतें.

**बळवंत.** प्र०–तथापि आर्यांतील ग्रहशास्त्रवेत्ते आकाशांतील ताऱ्यांच्या संबंधानें मानव स्त्रीपुरुषांच्या जन्मवेळेवरून त्यांच्या नांवांचीं मूळाक्षरें काढितात आणि त्या मूळाक्षरांवरून त्यांच्या जन्मपत्रिका वर्तवितात आणि त्यांमध्यें त्यांस पुढें होणारे लाभाविषयीं व त्यांस पुढें येणाऱ्या संकटांविषयीं भाकीत लिहून ठेवतात, याविषयीं येथें थोडासा उलगडा करून प्रतिपादन कराल, तर बरें होईल.

**जोतीराव.** उ०—आकाशामध्यें सत्ताविस नक्षत्रें आहेत, त्यांपैकीं येथें मानव स्त्रीपुरुषांच्या मूळच्या नांवाचा सिद्धांत सिद्ध करण्याकरितां या प्रसंगीं सत्ताविस नक्षत्रें आणि बारा राशींचीं नांवें कामापुरतीं घेतों. तीं अशीं. नक्षत्रें—अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी वगैरे; आणि राशी–मेष, वृषभ वगैरे; आतां प्रत्येक दिवशीं एक नक्षत्र असतें. त्याचे वेळचे चार भाग करून त्या प्रत्येकांस पहिलें, दुसरें वगैरीं चरणें ह्मणतात. प्रथम स्त्री अथवा पुरुष यांचा जन्म अश्विनी नक्षत्राच्या पहिल्या चरणांत झाला, तर त्याचें

चु होतें. दुसऱ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव चे होतें. तिसऱ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव चो होतें आणि चवथ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव ला होतें. भरणी नक्षत्राच्या पहिल्या चरणांत झाला, तर त्याचें नांव ली होतें. दुसऱ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव लू होतें, तिसऱ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव ले होतें आणि चवथ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव लो होतें. कृतिका नक्षत्राच्या पहिल्या चरणांत झाला, तर त्याचें नांव आ होतें. दुसऱ्या चरणांत झाला, तर त्याचें नांव इ होतें इत्यादि. यावरून मानव स्त्री-पुरुषांचा जन्म होतांना त्यावेळीं नक्षत्राचें कोणते चरण होते, म्हणून समजणारे लोक फारच विरळा. त्यांतून नक्षत्राचें पहिले व दुसरे चरणांचा संधी होतांना एक शतांश निमिषाची घालमेल झाल्याबरोबर चे-याची-चू आथवा चू-याची-चे होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें अश्विनीचीं चार चरणें, भरणीचीं चार चरणें आणि कृतिकाचें पहिलें चरण. असे एकंदर सर्व नऊ चरणें मिळून एक मेष रास होती. आतां मेष व वृषभ राशीचा संधी होतांना एक शतांश निमिषाची त्यांच्यामध्यें घालमेल झाल्याबरोबर, वृषभ राशीची मेष रास अथवा मेष राशीची वृषभ रास होण्याचा संभव आहे. त्या सर्वांवरून मानव स्त्री-पुरुषांचा जन्म होतेवेळीं घंगाळाच्या पाण्यांत वाटी टाकून घटका पाहाणारे फारच थोडे; परंतु बांव अथवा कासऱ्यानें सूर्य अथवा एखादा रात्रीचा तारा मोजणारे बहुत सांपडतील. यावरून आर्यांतील ग्रहशास्त्रवेत्ते मुली-मुलांच्या जन्मपत्रिका कोणत्या तऱ्हेनें वर्तवितात, याविषयीं आपणांस खासा अनुभव असेलच. याशिवाय आपण पेशवे सवाई माधवराव यांची जन्मपत्रिका वाचून पहा, म्हणजे आर्यजोशांची ठकबाजी तुमच्या सहज लक्षांत येईल.

बळवंतराव. प्र०—बरें सुचलें. कांहो! मानव स्त्री-पुरुष बालकांनीं आपल्या मातेच्या उदरीं जन्म पावलेल्या वेळेविषयीं आर्य ग्रहशास्त्रवेत्यांनीं ठरविलेल्या मताप्रमाणें आपण प्रतिपादन केलें, हें आपण ठीक केलें. परंतु एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुष आपल्या मातेच्या उदरांत असतां त्यांच्या सातव्या महिन्यांत कां आठव्यांत कां नवव्या महिन्यांत, ते साक्षात् सजीव प्राणी होऊन त्यांचे जन्म पावण्याची ती मुख्य वेळ म्हणावी, अथवा मातेच्या उदराबाहेर पडल्यावर त्यांचे जन्म पावण्याची मुख्य वेळ म्हणावी, या दोहोंपैकीं कोणती मुख्य वेळ खरी आहे? याविषयीं नीट उलगडा करून सांगाल, तर बरें होईल.

जोतीराव. उ०—याविषयीं आर्यांतील ग्रहशास्त्रवेत्यांनीं या कामीं केवळ आपली पोटें जाळण्याकरितां ज्योतिषशास्त्रांत हें मनःकल्पित थोतांड उभें केलें आहे, कारण मानव स्त्रियांच्या उदरांत अथवा उदराबाहेर आलेल्या बाळकांची मुख्य जन्म काळांच्या दोन्ही वेळा नव्हेत. परंतु स्त्री-पुरुष जेव्हां एकांत स्थळीं रमतात, तेव्हां स्त्रीच्या उदरांत मानव पुरुष आपल्या स्वतः स्वयंभू अवताराचें बीजारोपण करितो. याविषयीं आर्यांतील ग्रहशास्त्रवेत्यांनीं स्त्री-पुरुषांपासून त्यांच्या रमण्याच्या वेळकाळांची

नीकी बरोबर माहिती काढून जर त्यांनीं जन्मपत्रिका करण्याची वहिवाट घातली असती, तर त्या सर्वांस गमतीकरितां या प्रसंगीं बरें झटलें असतें.

**बळवंतराव.** प्र०—मानव पुरुष जेव्हां आपण स्वतः स्त्रीच्या उदरांत अवतार धारण करितो, तेव्हां तो आपल्यासारखा मानव पुरुष न जन्मतां, तोच नेहमीं अथवा पाळीपाळीनें स्त्री अथवा पुरुष होऊन जन्म पावतो, याविषयीं आपणा सर्वांच्या निर्मिकानें आपल्या हातांत कोणती किल्ली ठेवली आहे, तिचें आपण कृपा करून जर येथें थोडेसें प्रतिपादन कराल, तर आपले एकंदर सर्व मानवप्राण्यांवर मोठे उपकार होणार आहेत.

**जोतीराव.** उ०—आपण सर्वांच्या निर्माणकर्त्यानें निर्माण केलेल्या एकंदर सर्व प्राणीमात्रांसह मानव पुरुष, जेव्हां आपण स्वतः स्त्रीच्या उदरांत अवतार धारण करितो, तेव्हां तो आपल्यासारिखा मानव पुरुष होऊन न जन्मतां, तोच नेहमीं अथवा पाळी-पाळीनें स्त्री अथवा पुरुष होऊन जन्मतो. याप्रीत्यर्थ आपल्या सर्वांच्या निर्मीकानें आपल्या हातांत कोणती किल्ली ठेविली आहे, याविषयीं प्रतिपादन करण्याचें हें स्थळ नव्हे व तसें केल्यानें हा विषय येथें विनाकारण फुगून त्याचा माझ्या अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र बांधवांसह इतर मानव वाचकांस वाचण्याचा कंटाळा येणार आहे. या भयास्तव आपणा सर्वांच्या निर्मीकाच्या सत्तेनें दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं याचें पृथक, मला सविस्तर विवेचन करितां येईल.

## जन्म

**लक्ष्मण मनाजी.** प्र०—या जगांत मानव स्त्री–पुरुषांस कन्या अथवा पुत्र झाल्याबरोबर त्यांस कसें वाटतें ?

**जोतीराव फुले.** उ०—मानव स्त्री-पुरुषांस कन्या अथवा पुत्र झाल्याबरोबर त्यांस आनंद होऊन उल्हास वाटतो खरा, परंतु ही त्यांची सर्वथैव चूक आहे. स्त्रीनें अथवा पुरुषानें पूर्वी कमविलेल्या दुर्गुणांचा त्यांनीं समूळ जर परित्याग केला नाहीं, तर त्याजपासून जन्म पावलेल्या कन्या–पुत्रांचा शेवट त्यांच्या सहवासानें फारच वाईट होणार आहे.

**लक्ष्मण.** प्र०—मानव माता–पित्यांस मूल जन्मल्याबरोबर त्यांनीं आपल्यांतील पूर्वी असलेल्या दुर्गुणांचा जर समूळ परित्याग केला नाहीं, तर त्यापासून त्यांच्या कन्या–पुत्रांचें नुकसान होणार तें कोणतें ?

**जोतीराव.** उ०—कारण आपणा सर्वांच्या निर्मीकानें मुख्य स्त्री व पुरुषांस अति-पवित्र व अति कोमल निर्माण केलें आहे, हें त्यांच्या मुखचंद्रावरून सहज सिद्ध करितां येतें. यास्तव मानव मातापित्यांमध्यें पूर्वी असलेला चोरी करण्याचा धंदा ते जर जागृत ठेवतील, तर त्यांच्या कन्या–पुत्रांच्या कोमल अंतःकरणावर चोरी करण्याचा ठसा उमटून त्यांच्यानें पुढें कदापि चोरी करण्याचा निषेध करवणार नाहीं. त्याचप्रमाणें माता–पिता पूर्वीचे एकंदर सर्व दुर्गूण जर कायम ठेवतील, तर त्यांचे

कन्या-पुत्रांस सद्‌गुणी होण्यास फारच अडचणी सोसाव्या लागतील. यास्तव एकंदर सर्व मातापित्यांनीं आपल्यास कन्या अथवा पुत्र झाल्याबरोबर आपल्यांतील पूर्वीच्या दुर्गूणांचा सर्वोपरी त्याग करून आपण स्वतः शुचिर्भूत होऊन आपल्या कन्या-पुत्रांस सत्य सदाचरणरूपी **मंगलस्नान** जर घालणार नाहींत, तर त्यांस लक्षावधी पाण्याच्या आंघोळी घातल्यानें काय होणार आहे ! व अशा तऱ्हेचें मातापित्यांनीं स्वतः सत्यसदाचरणाचें मंगलस्नान करून आपण स्वतः आपल्या कन्या-पुत्र अज्ञानी अर्भकांस सत्य मार्गावर लावण्याविषयीं जर प्रयत्न केला, तर त्यांचीं मुलें एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांस निःसंषय प्रीय होतील. मुलांचा अथवा मुलींचा जन्म झाल्याबरोबर त्यांच्या कुळांत जो सत्यपाळक असेल, त्यानें प्रथम त्यांचें चुंबन घ्यावें. नंतर मुलांच्या जन्मदात्यांनीं चुंबन घेऊन एकंदर सर्व इष्ट-मित्रांसह कुटुंबांतील स्त्री-पुरुषांनीं शांतपणें सत्यास जीवीं धरून आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या कृपेविषयीं मंजुळ स्वरानें गायन करून एकंदर सर्व मानवांतील अंध पंगू जनांस आपल्या शक्त्यनुसार साह्य देऊन सर्वांनीं उल्हास आणि आनंद करावा.

## कन्या अथवा पुत्र यांचे नांवाचा संस्कार, —अन्नाचा संस्कार आणि शाळेचा संस्कार.

**यशवंत जोतीराव फुले.** प्र०—कन्या अथवा पुत्र यांच्या नांवाचा संस्कार केव्हां करावा ?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—कन्या असल्यास तिच्या नांवाचा संस्कार बाराव्या दिवशीं करावा व पुत्र असल्यास त्याच्या नांवाचा संस्कार तेराव्या दिवशीं करावा.

कन्या अथवा पुत्र यांच्या नांवाचा संस्कार करण्याच्या पूर्वी मानव माता-पित्यांनीं त्यांच्या मुलाचा जन्म होतांच त्यांच्यामध्यें पूर्वीच्या दुर्गुणाचा परित्याग करीन, म्हणून जो त्यांनीं संकल्प केला होता, तो त्यांनीं मनीं दृढ धरून, आणि आम्ही उभयतां कोणत्याहि मानव प्राण्यांचा द्वेष करणार नाहीं आणि सर्वांबरोबर बहिण-भावंडांप्रमाणें प्रीति करण्याचा निश्चय करून मुलांस तेलाभ्यंग करून स्नान घालून वस्त्रें घालावींत. मातापित्याच्या सद्‌गुणाशिवाय मुलांच्या अंगावर रुपें, सोनें, रत्नें वगैऱ्यांचा कोणत्याच प्रकारचा मौल्यवान् धातु, मौलीक दगडांचे अलंकार नसावेत, कारण त्यांच्या अलंकारापासून मुलांच्या जिवास धोका मात्र आहे, परंतु सद्‌गुण अलंकारापासून मुलांसह एकंदर सर्व मानवांस सुजनासारिखा लाभ होणार आहे. घरांतील स्त्रियांनीं पुरुषांच्या सल्यानें मुलांच्या नांवाचा संस्कार करून त्यास पाळण्यांत घालून निर्मीकाची आभार स्तुति गावी.

मुलाच्या मातुश्रीच्या स्तनांत दुध पुरें असल्यास मुलास सहा महिन्यांच्या आंत कोणत्याहि प्रकारचा अन्नसंस्कार करूं नये.

कन्येस अथवा पुत्रास थोडें थोडें बोलतां येऊं लागल्याबरोबर, तींच त्यांना त्यांच्या आईनें स्वतः लहान लहान वाक्यें त्यास बोलावयास लावून त्यांजकडून मूळाअक्षरें मात्र खेळतां खेळतां पाठ करवावींत. पुढें पाचवें वर्ष लागतांच त्यांस शाळेंत पाठविण्याची सुरवात करावी. पंतोजी मात्र कळवळ्याच्या असून तो भाडोत्री स्वार्थसाधु व आपमतलबी कल्पित धर्माभिमानी नसावा.

## लग्न

**गणपतराव दर्याजी थोरात, पेन्शनर. प्र०**—लग्न ह्मणजे काय?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्यानें जेवढे म्हणून प्राणीमात्र निर्माण केले आहेत, त्यांतून मानव स्त्री-पुरुषांस एक तऱ्हेची सारासार विचार करण्याची मात्र बुद्धि म्हणजे अक्कल दिली आहे व ते तिच्या योगानें एकंदर सर्व मानव प्राण्यांस कांहीं अविचारी दांडग्या लोकांस कलह करीतां येऊं नये, म्हणून सर्वांनुमतें असें ठरलें असावें कीं, हरएक मानव पुरुष व स्त्री हे उभयतां मरेतों पावेतों एकमेकांचे साथी व साह्यकारी होऊन एकचित्तानें वर्तन करुन त्यांनीं सुखी व्हावें, म्हणून जी कांहीं परस्परांशीं कबुलायत करण्याची वहिवाट घातली आहे, त्यास लग्न म्हणतात.

**गणपतराव. प्र०**—मानव कन्यापुत्रांनीं कोणत्या गुणांवरुन एकमेकांशीं लग्न लावावें; याविषयीं कांहीं नियम असल्यास आम्हांस कळवाल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—मानव कन्यापुत्रांनीं एकमेकांशीं कोणत्या गुणांवरुन एकमेकांबरोबर लग्न लावावें, याविषयीं कांहीं नियम नाहींत.–कित्येक कन्येंचीं माता-पितरें आपली कन्या कांहीं दिवस खाईल, पिईल, लेईल, नेसेल आणि मजा मारील, या आशेनें तिची संमती घेतल्याशिवाय तीस श्रीमंताची सून करुन देतात. कित्येक पुत्रांचीं माता-पितरें आपला पुत्र कांहीं दिवस खाईल, पिईल, लेईल, नेसेल आणि मजा मारील, या आशेनें त्याचीं संमत्ती घेतल्याशिवाय त्यास राजेरजवाडे यांचा जावई करुन देतात. कित्येक कन्या तरुण मुलांच्या कुस्वरूपाची परवा न करितां, त्याच्या फक्त शौर्यावर भाळून त्यास आपला पति करितात. कित्येक पुत्र तरुण मुलींच्या दुष्ट स्वभावाची परवा न करीतां तिच्या फक्त देखणेपणावर भाळून तीस अपली पत्नी करीतात. यावरुन कन्या-पुत्रांनीं आपल्या माता-पित्यासह वडील धाकुटे इष्टमित्रांचा सल्ला घेऊन त्यांनीं स्वतः मागें पुढें पाहून सारासार विचार करावा आणि वधू अथवा वराच्या माता-पित्यांच्या गृहीं अथवा सत्यशोधक समाजगृहांत वधूवरांनीं एकमेकांसमोर आसनावर बसून अथवा उभे राहून मानव पंचासमक्ष पुढें दिलेल्या आपआपल्या प्रतिज्ञांदाखल मंगळाचा स्वतः अनुक्रमानें उच्चार करुन लग्न लावल्याबरोबर आपल्या सर्वांच्या निर्मीकास परमानंद होणार आहे.

## ।। मंगलाष्टक ।।

(वर)

देवाचे नियमा प्रमाण धरुनि चाले तुझें कूळ गे ।।
सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी तैसेचहि त्वत्सगे ।।
अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी ।।
प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी ऐकून किर्ती अशी ।।
शुभमंगल सावधान ।। १ ।।

(वधु)

मानीशी जरी त्वां दिलें अनुदिनीं, कर्त्या समाधानसें ।।
आम्हां सर्व स्त्रियां असे बहु पिडा, हें नेणशी तूं कसें ।।
स्वातंत्र्यानुभवाची ओळख आह्मां, झाली नसे मानशीं ।।
यासाठीं अधिकार देशिल स्त्रियां, घे आण त्याची अशी ।।
शुभमंगल सावधान ।। २ ।।

(वर)

स्थापाया अधिकार मी झटतसें, या बायकांचे सदा ।।
खर्चाया न मनीं मि भीं किमपिही, सर्वस्व माझें कदा ।।
मानीतों सकला स्त्रियांस बहिणी तूं एकली मत्प्रिया ।।
कर्त्याचें भय मी मनांत तुजला, ठेवीन पोसावया ।।
शुभमंगल सावधान ।। ३ ।।

(वधु)

बंधूवत्मजला समस्त असती, त्वद्भिन्न जे कीं नर ।।
आज्ञाभंग तुझा करीन न कदां, मी सत्य कर्त्यावर ।।
ठेवोनी अवधाचि भार झटुं या, लोकां कराया हिता ।।
हाताला धरुनी तुला वरीतसें, सर्वांपुढें मी अतां ।।
शुभमंगल सावधान ।। ४ ।।

## सत्यपाळक स्त्री–पुरुषांचा आशीर्वाद

आभारा बहु मानिजे आपुलिया, माता-पित्यांचे सदा ।।
मित्रांचे तुमच्या, तसेच असती जे इष्ट त्यांचे वदा ।।

वृद्धां पंगु सहाय द्या मुलिमुला, विद्या तया शीकवा ॥
हर्षे वृष्टि करा फुलांचि अवघे, टाळी अतां वाजवा ॥
शुभमंगळ सावधान ॥ ५ ॥

## वर (शपथ)

आजपासून मी तुला माझी भार्या कबूल करून, मानव पंचांसमक्ष मी अशी प्रतिज्ञा करतों कीं, आजपासून मी मनीं कोणत्याहि प्रकारचा कुतर्क न धरून एक क्षणभर-देखील तुझ्या बाहेर जाणार नाहीं; म्हणून आपल्या सर्वांच्या उत्पन्नकर्त्यासहित आपल्या कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करितों.

## वधु (शपथ)

आजपासून मी तुला माझा भ्रतार कबूल करून, मानव पंचांसमक्ष मी प्रतिज्ञा करितें, ती अशी कीं, आजपासून मी मनीं कोणत्याही प्रकारचा कुतर्क न धरून एक क्षणभर-देखील तुझ्याबाहेर जाणार नाहीं; म्हणून आपल्या सर्वांच्या उत्पन्नकर्त्यासहित आपल्या कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करतें.

शेवटीं वधू-वरानें सर्व इष्टमित्रांच्या भेटी घेतल्यानंतर वर-वधुनें मोठ्या आनंदानें कोणत्याहि धर्माची अथवा देशाची आवडनिवड न करितां एकंदर सर्व मानवबंधूंतील पोरक्या मुली-मुलांस व अंध-पंगूंस आपल्या शक्त्यानुसार दानधर्म करीत आपल्या घरीं अथवा गांवीं जावें.

## दुष्टाचरण

**लक्ष्मण मानाजी पाटील, मगर. प्र०**—आपण सर्वांच्या निर्मीकानें एकंदर सर्व प्राणी-मात्रांस उत्पन्न करतेवेळीं फक्त मानव स्त्री-पुरुषांस सारासार विचार करण्याची बुद्धि देऊन, त्यांस अतिपवित्र केलें आहे, असा जर तुमचा सिद्धांत आहे, तर या जगामध्यें कांहीं मानव स्त्री-पुरुष दुष्टाचरणी कसे झाले ?

**जोतीराव. उ०**—एकंदर या सर्व पृथ्वीच्या पृष्ठभागांवरील कांहीं मानव स्त्रीपुरुष आळशी झाल्यामुळें ते दुष्टाचरणी झाले.

**लक्ष्मण. प्र०**—याविषयीं आपण जर एखादें साक्षात् उदाहरण द्याल, तर एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांवर आपले मोठे उपकार होतील.

**जोतीराव. उ०**—प्रथम, त्या आळशी मानव स्त्री-पुरुषांनीं आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस विचारल्यावांचून, त्यांच्या वस्तु जेव्हां चोरून नेऊं लागले; तेव्हां एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांस आपआपल्या शेतमळ्यांतील वगैरे बाहेरचीं कामें करावयास जाण्याच्या पूर्वीं

प्रत्येक घरवाल्यास त्यांच्या कुटुंबांतील एखादा कामकरी घरीं ठेवून, आपआपल्या घरांची रखवाली करण्याची अडचण पडूं लागली; व ही गैरसोय दूर करण्याकरितां कांहीं मानव कारागीर एकंदर सर्व जगांतील मानवास हितावह होऊन, त्यांच्या उपयोगीं पडण्याजोगत्या वस्तु तयार करण्याचें काम एके बाजूला सोडून, ते लाखो रुपयांच्या किंमतीचीं नाना तऱ्हेचीं कुलपें करण्यांच्या कामीं गुंतले. यामुळें एकंदर सर्व जगांतील मानव स्त्री-पुरुषांच्या वेळेच्या व द्रव्याच्या संबंधानें त्यांचें किती नुकसान झालें; व हल्लीं होत आहे, याविषयीं माझ्यानें अनुमान करूनसुद्धां सांगवत नाहीं.

लक्ष्मण. प्र०—असो—परंतु एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांनीं आपआपल्या घरांतील सामानाच्या बचावासाठीं कुलपें खरेदी करूं लागल्यामुळें त्यांच्या घरांतील सर्व वस्तु सुरक्षित राहून ते सुखी झाले असतील काय ?

**जोतीराव. उ०**—अरे, हे संवयीनें बनलेले अट्टल चोर मानव कारागिरांच्या **कुलपी अटकावाला कोठून भिणार !** परंतु त्यांपैकीं, (स्त्रियांशिवाय) कांहीं एक मानव पुरुष चोरांनीं जिवावर उदार होऊन एके ठिकाणीं जमून त्यांनीं आपल्या तोंडाला काळें लावून त्याला चुन्याच्या पांढऱ्या ठिपक्यांनीं साजरें करून, एका हातांत टेंभे आणि दुसऱ्या हातांत नागव्या तलवारी घेऊन रस्तोरस्तीं सराटे पसरून लोकांस मारण्याकरितां दगडांचे जागोजाग लहान लहान ढीग करीत. आणि एकंदर सर्व गांवकऱ्यांची पर्वा न करितां त्यांच्यासमक्ष निर्लज्ज होऊन "हरहरमहादेव" अथवा "दीनदीन" म्हणण्याच्या नादांत सधन मानव स्त्रीपुरुषांच्या घरांवर दरवडे घालून त्यांचीं जबरीनें कुलपें मोडून त्यांचीं घरें लुटून नेऊं लागले.

**लक्ष्मण. प्र०**—यावरून गांवकरी लोक पुढें काय करूं लागले ?

**जोतीराव. उ०**—गावांत दरवडे पडूं लागल्यामुळें कित्येक खेड्यापाड्यांसह एकंदर सर्व गावकऱ्यांनीं आपआपल्या स्वतःच्या निर्वाहांचीं कामें एके बाजूला सोडून, एकंदर सर्व गांवांतील मानव स्त्री-पुरुषांनीं एकत्र होऊन, त्यांनीं आपल्या डोक्यांवर कऱ्हत कुन्थत चिखलमातीच्या टोपल्या वाहून, एकंदर सर्व गांवाभोंवतालीं गांवकूस बांधिलें; आणि त्याला जागोजाग मोठमोठाले दरवाजे लावून त्यांच्या संरक्षणाकरितां आपसांतच वर्गणी जमा करून ते वेसकरांस वेतन देऊं लागले.

**लक्ष्मण. प्र०**—यापुढें दरवडेखोर आपला परिणाम कोणत्या थरास लावितात, याविषयीं आपल्यास विचारण्याचा त्रास जरी देत नाहीं, तरी तूर्त असें विचारतों कीं, मूळ मानव स्त्रीपुरुषांत चोर कोणाच्या हयगयीनें निपजले ?

**जोतीराव. उ०**—कुटुंबांतील मुख्य माता अथवा पिता; गांवांतील मुख्य पाटलीण अथवा पाटील; देशांतील मुख्य देशमुखीण अथवा देशमुख; पृथ्वीवरील मुख्य महाराणी अथवा महाराजा, या सर्व मुख्य अधिकाऱ्यांत सत्यपाळकपणाची मुळींच कळकळ नसल्यामुळें ते आपल्या ताब्यांत असलेल्या मुलीमुलांवर चांगली चौकशी न ठेवितां

त्यांस उनाड होऊं देतात, आणि त्यांस योग्य वेळीं योग्य शिक्षण देण्याची हयगय करितात. यामुळें एकंदर सर्व जगांत चोऱ्या वगैरे सर्व प्रकारच्या दुष्ट आचरणांचा फैलाव झाला व होतहि आहे.

लक्ष्मण. प्र०—यास्तव या बलिस्थानावरील मुख्य महाराणि आईसाहेब सरकारांनीं आपल्या ताब्यांत असलेल्या प्रजेच्या कन्यापुत्रांस आळशी होऊं न देतां, त्यांस योग्य वेळीं योग्य शिक्षण द्यावें. तें कोणतें कीं, जेणेंकरून एकंदर सर्व बलिस्थानांत चोरी वगैरे सर्व प्रकारच्या दुष्ट आचरणांचा फैलाव झाला आहे, त्याचें निर्णश होईल.

जोतीराव. उ०—अरे बाबा, आपल्या राणीसाहेब या बलिस्थानांतील एकंदर सर्व शेतकरी लोकांपासून जेवढी म्हणून करपट्टी घेतात, तिचें नांवसुद्धां मी येथें घेत नाहीं. परंतु मी तुला असें विचारतों कीं, या आपल्या कनवाळू महाराणी आईसाहेब बलिस्थानांतील अज्ञानी शेतकरी लोकांपासून जेवढा म्हणून लोकलफंड सक्तीनें वसूल करितात, तो सर्व शूद्रादि अतिशूद्र शेतकऱ्यांच्या मुलांकरितां शाळा घालून त्या शाळेंत त्यांस शेतकीसह तत्संबंधीं सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्याच्या कामीं, येथील एकंदर सर्व कृत्रिमी, ढोंगी, धर्मलंड आणि बंडखोर भटपांड्यासह पेशव्यांच्या जातीचे, जे आपल्यासच श्रेष्ठ मानून इतर मानवास तुच्छ मानितात, अशांवर भरंवसा न ठेवितां फक्त युरोपियन कामगारांच्या द्वारें खर्च केल्याबरोबर त्या शाळांपासून शेतकऱ्यांत हल्लींपेक्षां ज्यास्ती चोर निपजतील, असें तुला वाटतें काय ?

लक्ष्मण. प्र०—खरोखर सरकारानें सदरीं लिहिलेल्या लोकांच्या, पंतोजीच्या जाग्यावर जर नेमणुका शेतकऱ्यांच्या शाळांत केल्या नाहींत, तर मात्र पूर्वीप्रमाणें त्यांच्यांत चोर होणार नाहींत व ते निरंतर उद्योगी झाल्यामुळें त्यांच्यांत जास्ती सद्‌गुणी निपजतील आणि ते आर्यभट्ट फडक्या चोरासारख्यांच्या नादीं न लागतां, आपल्या सरकारास कोणत्याच प्रकारचा तोशीस न लावितां ते मोठ्या उल्हासानें जास्ती करपट्टी देण्यास समर्थ होतील, असें मी प्रतिज्ञेनें सांगतों. परंतु आपल्या सरकारानें बळिस्थानांतील शेतकऱ्यांच्या शाळांशिवाय दुसऱ्या कोणत्या लोकांकरितां आणखी शाळा घालाव्यात ?

जोतीराव. उ०—आपल्या कनवाळू सरकारानें या बळिस्थानांतील शेतकऱ्यांच्या शाळांशिवाय धिसाडी, लोहार, बटई-सुतार-कढई-चांभार-सोनार-तांबट-साळी-शिंपी वगैरे कारगिरांच्या मुलांकरितां निरनिराळ्या शाळा घालून त्यांमध्यें त्या सर्वांच्या कसबांसंबंधीं सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्याच्या कामीं थोडा थोडा खर्च केल्याबरोबर त्या सर्व शाळांत शिकलेलीं कारगिरांचीं मुलें फारच थोडीं चोर निपजतील, असें मी खात्रीनें सांगतों.

लक्ष्मण. प्र०—एकंदर सर्व बलिस्थानांतील कारागिरांच्या मुलांसाठीं शाळा घालण्याकरितां आपल्या सरकारानें रयतेच्या कोणत्या फंडांतून खर्च करावा ? कारण, कारागीर लोक शेतकऱ्यांसारखा सरकारास लोकलफंड देत नाहींत.

जोतीराव. उ०—असें जर आमच्या सरकारचें म्हणणें आहे, तर त्यांत त्यांची थोडीसी गैरसमज आहे असें म्हटलें पाहिजे; कारण त्यांनीं पाहिजे असल्यास शेतकऱ्यांपासून वसूल केलेल्या करपट्टीच्या रॉयलफंडांतून थोडासा पैसा खर्च करून कारागीर लोकांच्या मुलांकरितां शाळा घातल्याबरोबर ते यूरोप व अमेरिका खंडांतील कारागिरांसारखे थोड्या किंमतींत नांगर, कुळव, पाभारी, कोळपी, काढणी व मळणी वगैरे नानाप्रकारचीं यांत्रिक आऊतें लागोपाठ सहज शेतकऱ्यासाठीं जेव्हां करतील, तेव्हां शेतकरी लोक आपल्या सरकारास जास्ती कर देण्यास सहज समर्थ होतील. यामुळें एकंदर सर्व बळिस्थानांतील क्षत्रियांसह सरकारचा बोलबाला होऊन त्याची या जगांत अगाध किर्ति होईल.

लक्ष्मण. प्र०—सरकारानें एकंदर सर्व शेतकऱ्यांसह कारागीर लोकांकरितां शाळा घातल्या आणि त्यांनीं आपआपलीं मुलें धूर्त आर्य पुराणिकांच्या चिथावणीवरून त्या शाळेंत शिकण्याकरितां जर पाठविलीं नाहींत, तर तेथें आपल्या सरकारानें काय उपाय करावा?

जोतीराव. उ०—एकंदर सर्व अज्ञनी शेतकाऱ्यांसह कारागिरांनीं आपआपलीं मुलें त्यांच्या शाळेंत हट्टानें जर पाठविलीं नाहींत; तर सरकारानें असल्या हेकड लोकांचीं मुलीमुलें शाळेंत शिकण्याविषयीं बेलाशक सक्तीचा कायदा करावा आणि सरकारी सत्यपाळकांकडून त्या सर्व लोकांस असा बोध करावा कीं, तुम्ही आपलीं मुलें जर आपआपल्या शाळेंत पाठविलीं नाहींत, तर तीं मुलें आळसामुळें उनाड होतील आणि आपलीं पोटें जाळण्याकरितां तीं चोऱ्या करूं लागतील; यामुळें त्यांस सक्तमजुरींची शिक्षा देऊन त्यांच्या पायांत बिड्या घालून त्यांच्या संरक्षणासाठीं सरकारास खबरदारी ठेवावी लागेल. तशींच तुमचीं मुलें आळसामुळें अट्टल चोर झाल्यावर शेजाऱ्यांच्या घरांवर दरवडे घालून त्यांस जर जखमा करतील, तर सरकारास त्यांस काळ्या पाण्याच्या सजा द्याव्या लागतील, आणि त्याप्रीत्यर्थ सर्व खर्च सरकारी पोत्यांतून करावा लागेल. तशींच तुमचीं मुलें आळसामुळें निसंग बंडखोर होऊन प्रांतांतील गांवें लुटतांना तेथील कांहीं घरें जाळून लोकांची खूनखराबी करतील, त्यांच्या चीजवस्तूंसह द्रव्याची नुकसानी करून त्यांच्या बायापोरांस तळतळायास लावतील—आणि तेथील एकंदर सर्व व्यापारधंद्यांची अव्यवस्था जर करतील, तर सरकारास त्यांतील कित्येक बंडखोरांस तोफेच्या तोंडीं देऊन बाकीच्यांस फांशीच्या शिक्षा द्याव्या लागतील व त्या सर्वांप्रीत्यर्थ सरकारास जेव्हां पोलीस ठेवण्याचा प्रसंग येईल; तेव्हां त्या सर्व खर्चांचा बोज्या तुम्हां सर्व शेतकऱ्यांसह कारागिरांस सोसावा लागेल. इतकेंच नव्हे परंतु, तुमचीं मुलें चोर, दरवडेखोर आणि बंडखोर झाल्यामुळें सरकार त्यांस शिक्षा देऊन त्यांची रस्तोरस्तीं जेव्हां धिंड काढील, तेव्हां तुम्हां त्या बंडखोरांच्या आईबापांस लज्जेस्तव परागंदा होऊन आपलीं तोंडें काळीं करावीं लागतील, आणि तुमच्या निराश्रित अबला सुनाबाळांस शोकसमुद्रांत

गटंगळ्या खाव्या लागतील–तुमच्या भाऊबंदांच्या मुखाला काळीमा लागून तुमच्या सोयऱ्याधायऱ्यांचा कोणी आदरसत्कार करणार नाहींत आणि तुमच्या इष्टमित्रांस लज्जा प्राप्त होऊन त्यांस चारचौघांत खालीं माना घालाव्या लागतील. त्याचप्रमाणें तुम्हीं आपलीं मुलें आपल्या शाळेंत जर पाठविलीं नाहींत, तर तीं उनाड होऊन, वयांत आल्याबरोबर काळ्या कृष्णासारखे निर्लज्ज होऊन व्यभिचार करूं लागल्यामुळें ते सर्व, स्वभावानें सदाचारी लोकांच्या तिरस्कारास पात्र होतील; आणि त्यांच्यासाठीं एकंदर सर्व लोकांत दुंबळ हाणामाऱ्या, ठोकाठोक्या, खूनखराब्या होऊं लागतील; व त्यांचा बंदोबस्त ठेवण्याकरितां सरकारास शिबंदी ठेवण्याचा जो कांहीं खर्च पडेल, त्याचा बोजा तुम्हां शेतकऱ्यांसह कारागिरांच्या उरावर बसेल. त्याचप्रमाणें तुम्ही आपलीं मुलें आपआपल्या शाळेंत जर पाठविलीं नाहींत, तर तीं मुलें वयांत आल्याबरोबर आपलीं पोटें जाळण्याकरितां धूर्त आर्यभटांतील कृत्रिमी कज्जेदलाल कुलकर्ण्यांच्या नादीं लागून गांवांतील निरपराधी सालस, भल्या गृहस्थांविरुद्ध खोट्या साक्षा देऊन त्यांजवर खोटे कागद करतील; आणि सरकाराविरुद्ध बनावट छापील कागद व बनावट नोटा करून अट्टल खोटें बोलणारे जेव्हां होतील, तेव्हां सरकारास त्यांचे इनसाफ करण्याकरितां पगारी न्यायाधीश नेमावे लागतील व त्या सर्वांचा खर्च शेतकऱ्यांसह कारागिरांच्या बोडक्यावर बसेल. सारांश, एकंदर सर्व जगांतील लोकांनीं आपआपल्या मुलीमुलांस शाळेंत घालवून त्यांस सत्यज्ञानविद्या दिल्याबरोबर सहजच ते सर्व लोक सद्गुणी झाल्यामुळें कोणी कोणाच्या राष्ट्रांवर स्वाऱ्या करणार नाहींत, आणि यामुळें एकंदर सर्व जगांत जागोजाग शेतकऱ्यांसह कारागिरांच्या निटळाच्या घामाचे कोट्यावधि रुपये खर्चीं घालून निरर्थक फौजफाटे ठेवण्याचा त्या सर्व सरकारांस प्रसंग येणार नाहीं, अशाविषयीं बोध करा म्हणजे काम झालें.

**लक्ष्मण. प्र०**—कां हो तात्यासाहेब–चोरापेक्षां जास्ती दोषी कोण आहेत?

**जोतीराव. उ०**—चोराच्या दोषांविषयीं मी तुला पूर्वी याच निबंधांत कळविलें आहे, परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जे कांहीं लोक आपल्या हितमतलबासाठीं नास्तिक बनले आहेत, ज्यांनीं आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याची उचलबांगडी करून त्याच्याऐवजीं त्यांनीं पराजित केलेल्या अज्ञानी लोकांचे आपण स्वतः अहंब्रह्म अथवा भूदेव होऊन त्यांची निवड करून त्यांस तुच्छ मानितात, अशा धूर्त मतलबी लोकांच्या शाळेंत शिकलेलीं विद्वान् मुलें अट्टल निर्दय चोर झालीं आहेत.

**लक्ष्मण. प्र०**—आतां येथें या निर्दय विद्वान चोरांविषयीं थोडें थोडें प्रतिपादन कराल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—अज्ञानी लाचार चोर पोटाकरितां चोऱ्या करितात; परंतु शाळेंत शिकलेल्या नास्तिक चोरांपैकीं कित्येक सरकारापासून दरमहाचे दरमहा पगारासह गाडीघोड्याबद्दल भत्ते घेऊन सरकारचे चाकर होतात; आणि सरकारची चाकरी इमानेंइतबारें न करितां अज्ञानी रयतेचा न्याय करितांना त्यांजपासून लांचलुचपत

खाऊन आपल्या बरोबर तेच निर्लज्जपणें पोकळ सोंवळे बनून लटकाच अस्तिकपणाचा डौल घालितात.

**लक्ष्मण. प्र०**—अज्ञानी रयतेपासून लांच खाणाऱ्या निर्लज्ज सोंवळ्या चाकरास तूर्त बीनभाड्याच्या घरांत मौजा मारण्याकरितां सोडून द्या, परंतु त्यांच्यांतील कित्येक लोक सरकारी कामगारांस फसवून अज्ञानी लोकांत डौल मिरविण्याकरितां सरकारापासून पगार घेतल्याशिवाय आनररी माजीस्त्रेटाचे हुद्दे पतकरितात; याविषयीं तुमचें काय मत आहे ?

**जोतीराव. उ०**—त्यांच्यापैकीं कित्येकांस कामापुरती विद्या नसून त्याला जगाचा बिलकूल अनुभव नसतो–ज्याला मॉट्रिक्युलेशन परिक्षा कशाला म्हणावें, हें त्यांस मुळींच माहीत नसतें, असे अजाणते ठोंबे केवळ बड्या घराण्यांतील सरदारांचे पुत्र असले, म्हणजे त्यांस ऑनररी माजिस्त्रेटाचे हुद्दे देतात. अहो, यांतील कित्येकांस आपल्या घरांतील प्रपंच व बायकापोरांची नीट व्यवस्था ठेवण्याचें ज्ञान नाहीं, तर त्यांस अज्ञानी शूद्रबांधवांचा न्याय बरोबर कसा करितां येईल ? जे आपण आपल्या जातीचा पोकळ श्रेष्ठपणांचा तोरा मिरविणारे असून, बाकीच्या एकंदर सर्व जातीच्या लोकांस नीच मानणारे असतात, त्या सर्वांवरून त्यांनीं नीच मानलेल्या एकंदर सर्व जातींच्या लोकांनीं त्यांच्या न्यायाच्या नांवानें कां शिमगा करावा ?

**लक्ष्मण. प्र०**—ह्याचप्रमाणें पगार घेतल्याशिवाय सर्व वृद्ध पेन्शनर विद्वान व कळचेटे कुळकर्ण्यांसह, ट, फ, करणारे पाटील लोक लवादांचीं कामें करितात, याविषयीं तुमचें काय मत आहे ?

**जोतीराव. उ०**—पांजरपुऱ्यांतील जनावरांप्रमाणें सरकारी नोकरी करून जीर्ण झालेले पेनशनी लायक लोकांसह कळचेटे कुळकर्णी, ट, फ, करणाऱ्या ठोंब्या पाटलांस खिशांत घालून त्याची परवा न करितां जे एकंदर सर्व लोकांस नीच मानून आपल्या जातीच्या श्रेष्ठपणाचा ताठा मिरवितात, अशा जगमत्सरी लोकांपासून अज्ञानी लोकांचा नीट इनसाफ होऊन त्यांचें कल्याण होणें, फारच कठीण.

**लक्ष्मण. प्र०**—त्याचप्रमाणें सरकारापासून कांहीं वेतन घेतल्याशिवाय एकंदर सर्व तरुण अथवा वृद्ध विद्वान लोक म्युनिसीपालिटीचे सभासद झाल्यामुळें बाकीच्या एकंदर सर्व जातींच्या लोकांचें हित होतें काय ? याविषयीं तुमचें मत कसें काय आहे ?

**जोतीराव. उ०**—अरे, या तुमच्या एकंदर सर्व म्युनिसीपालिट्यांत धूर्त आर्यभटांच्या अमलांत नीच मानलेला चांभार, कढई, मोची, म्हार, मांग वगैरे लोकांपैकीं एक तरी सभासद आहे काय ? असल्यास दाखीव ?

**लक्ष्मण. प्र०**—आर्य भटांनीं कृत्रीमानें नीच मानलेल्या शूद्रांपैकीं एकहि अतिशूद्र म्युनिसीपालटींत सभासद नाहीं, कारण त्यांच्यामध्यें म्युनिसिपालिटींत बसण्याजोगता विद्वान् कोणी अद्याप झालाच नाहीं.

जोतीराव. उ०—यावरून इंग्रज लोकांतील पावणे दोन शहाण्या गवरनर जनरल लॉर्ड रिपन सरकारी अधिकाऱ्यानें या आर्यभटांनीं नीच मानलेल्या अतिशूद्रांविषयीं चांगला पोक्त विचार केल्याशिवाय त्यानें कोणत्या आधारावरून या बळिस्थानांतील लोकांस म्युनिसीपालिटीचा अधिकार दिला. कारण उदाहरणार्थ, या पुणे शहरांतील म्युनिसीपालटीचा अधिकार सरकारानें आपल्याकडून काढून एकंदर सर्व जातीच्या लोकांकडे दिल्यामुळें युरोपियन कलेक्टरासारखे वडे वडे सरकारी कामगार या शहराकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहींत व तेथील सभासदांच्या हयगयीमुळें हल्लींच्या या म्युनिसी-पालिटींतील हेल्थ आफिसराची हलालखोरि धंद्याविषयीं रयतेचें द्रव्य खर्च करण्याच्या कामीं व गंज पेठेंत जी अव्यवस्था केली आहे, ती समक्ष पाहिल्याबरोबर त्याच्याविषयीं कोणाच्या मनाला किळस वाटणार नाहीं असा पुरुष विरळा सांपडेल! कारण भाड्याच्या तट्टांला त्यांच्या भाडोत्री यजमानानें त्यांस मार्गावर चालण्याकरितां किती जरी टुमण्या दिल्या, तरी हे शुद्धीवर येऊन मार्गांवर नीट चालवयाचे नाहींत. यास्तव अतिशूद्र शेतकरी विद्वान् होऊन त्यांनीं आपले आसूड अंगाभोवतालीं फिरवून त्यांस यथास्थित फटकारे दिल्याविना हे पुरपुर करून × × गाळावयाचे नाहींत.

लक्ष्मण. प्र०—त्याचप्रमाणें खोटे कागद करून लबाड बोलणाऱ्यांपेक्षां जास्ती दोषी कोण आहेत?

जोतीराव. उ०—खोटे कागद वगैरे करून लबाड बोलणाऱ्यांपेक्षां जास्ती दोषी त्यांस ह्मणावें कीं, जे आपण सर्वांच्या निर्मीकाच्या नांवानें स्वतःच्या कल्पनेनें बनावट धर्मपुस्तकें करून अज्ञानी शूद्र वगैऱ्यांस लुटून आपल्या पोरांलेकरांचीं पोटें जाळतात.

लक्ष्मण. प्र०—त्याविषयीं आह्मी काय खासा उपाय करावा, याविषयीं आह्मा सर्वांस कळवाल, तर बरें होईल.

जोतीराव उ०—याला उपाय आर्यभटांनीं नीच मानलेल्या सर्व शूद्रादि अतिशूद्रांसह भिल्ल कोळी वगैरे मानव बांधवांनीं आपआपल्या कन्यापुत्रांस शाळेमध्यें पाठवून त्या सर्वांस सत्यज्ञान शिकविण्याचा आरंभ करावा, म्हणजे कांहीं काळानें आपण सर्वांच्या मुलीमुलांस सत्यज्ञान प्राप्त झाल्याबरोबर त्यांतून शूद्र वगैऱ्यांतील एखादा सत्पुरुष आपण सर्वांच्या समाधीवर पुष्पवृष्टि करून, आपण सर्वांच्या नांवानें उल्हास करील, असें मी स्वसंतोषानें भविष्य करितों.

## मृत्यु

यशवंत जोतीराव फुले. प्र०—मृत्यु ह्मणजे काय?

जोतीराव गोविंदराव फुले. उ०—एकंदर सर्व प्राणीमात्रांचें देहस्थित प्राण्यांचें जें गमन तें.

यशवंत. प्र०—कित्येक मानव स्त्रीपुरुषांच्या तान्ह्या मुली-मुलांस मरण येण्याच्या पुर्वी

क्लेश होतात, ह्याचं कारण काय असावें, याविषयीं थोडक्यांत कृपा-करून प्रतिपादन कराल, तर बरें होईल.

जोतीराव. उ०—कित्येक तान्ह्या मुली-मुलांच्या मरणाच्या पुर्वा त्यांस क्लेश होतात, ह्यांचें मूळ कारण त्यांचे माता-पित्यांनीं कांहीं कामीं अपरमित वर्तन केल्यामुळें त्या उभयतांच्या शरिरांत कांहीं एक प्रकारचे रोग स्थायीक होतात, यामुळें त्यांचीं तान्हीं बाळकें मरण येण्याच्या पुर्वी क्लेशानें तडफडून आपले प्राण सोडितात.

यशवंत. प्र०—तान्ह्या बाळकांविषयीं पुरे-परंतु कित्येक मानव तरुण अथवा वृद्ध स्त्री-पुरुषांस मरणाच्या पूर्वी क्लेश होतात, याचीं कारणें काय असावींत?

जोतीराव. उ०—याचीं कारणें सांगतों ऐक-एका मानव स्त्रीनें मानव पंचासमक्ष एखाद्या मानव पुरुषास आपला भ्रतार कबूल करून त्याजबरोबर जेव्हां ती सर्व कामी सर्व काळ प्रतारणा करिते, तेव्हां तिला मरणाच्या पुर्वी पश्चाताप झाल्यामुळें क्लेश होतात. त्याचप्रमाणें एका मानव पुरुषानें मानव पंचासमक्ष एखाद्या मानव स्त्रीस आपली भार्या कबूल करून तिजबरोबर जेव्हां सर्व कामीं सर्वकाळ दगेबाजी करितो, तेव्हां त्याला मरणाच्या पूर्वी पश्चाताप झाल्यामुळें क्लेश होतात. इतकेंच नव्हे, परंतु, कित्येक मानव पुरुष आपल्या हितमतलबासाठीं आपल्या शेजाऱ्यांबरोबर नाना प्रकारच्या ठकबाज्या करितात, आणि कित्येक जुलीयस सीझरासारखे आपल्यास राज्य प्राप्त व्हावें म्हणून आपल्या पदरच्या जॉहामर्द शिपायांकरवीं लक्षावधी आपल्या मानव शेजारी बांधवांचा वध करणाऱ्यांस मरण येण्याच्या पूर्वी पश्चाताप झाल्यामुळें अतिशय क्लेश होतात. अरे! एका मनुष्यानें एखाद्या क्षुल्लक अशा मानवाची अन्यायानें जर हत्या केली, तर आपल्यास किती क्लेश होतात? त्याचप्रमाणें जुलीयस सीझरानें लक्षावधि प्राण्यांचा जर वध केला, तर त्याला त्याच्या मरणापूर्वी पश्चात्ताप झाल्यामुळें त्याला निःसंशय क्लेश झाले असतील, त्याविषयीं येथें सिद्ध करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

यशवंत. प्र०—कां हो, जुलीयस सीझर अपमृत्युनें मरण पावला काय?

जोतीराव. उ०—जुलीयस सीझर आपमृत्युनें मुळींच मेला नाहीं. प्रथम तो लोक-सत्तात्मक राज्याचा पूर्ण भक्त होता व त्या कामीं त्यास थोडेसें सामर्थ्य येतांच आपल्या रोम येथील लोकसत्तात्मक राज्यांतील एकंदर सर्व मानव बांधवांस गुलाम करून त्यांच्यावर आपण स्वतः राजा होण्याचा [त्यानें] यत्न केला, परंतु हें ईश्वरास न साहून त्यानें निःपक्षपाती ब्रूटस, जो त्याचा जिवलग मित्र होता, त्याच्या मनांत भरवून त्याजकडून भर दरबारांत क्यासकाच्या हातून सीझराच्या पोटांत नागवी खंजीर खुपसून त्यास जेव्हां घायाळ केलें, तेव्हां त्यास आपला प्राण सोडण्याच्या पूर्वी किती क्लेश झाले असतील, याविषयीं तूंच विचार करून पहा, म्हणजे झालें.

यशवंत. प्र०—या पृथ्वीच्या पाठीवर जूलीयस सीझरापेक्षां जास्ती दुष्ट कोण होता?

जोतीराव. उ०—जूलीयस सीझरापेक्षां जास्ती दुष्ट आर्यभटांतील परशुराम होता व प्राचीन काळीं आर्यांनीं ज्या लोकांस पराजित करून त्यांस आपले पिढीजादा दासानुदास केले, अशा निबळ अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र, पंगू लोकांस फसविण्याकरितां निर्लज्ज आर्य, हल्लीं परशुरामास देवाचा अवतार ह्मणतात. परंतु माणसाचा अवतार जो परशुराम त्यानें या बळिस्थानांतील क्षेत्रांच्या मालकांपैकीं कित्येक क्षत्रियांचा निकरानें जेव्हां वध केला, तेव्हां त्यानें त्या जॉहामर्द क्षत्रियांच्या निराश्रित अबला गर्भीणी स्त्रियांचा 'लांडग्यासारखा" पाठलाग करून त्यांस पुत्र प्रसवतांच त्यांचा निर्दयपणानें वध करून या लाचार क्षत्रिणींस दुःखसमुद्रांत ढकलून दिलें. वाहावा रे आर्यभटांची अवताराची कल्पना! या निर्दय दुष्ट परशुरामास सैतानाचा अवतारसुद्धां कोणी म्हणणार नाहीं, कारण मुसल्मानांनीं कल्पिलेले सैतान या परशुरामापेक्षां फार बरे नव्हे काय?

यशवंत. प्र०—या पृथ्वीच्या पाठीवर आर्यांतील देव परशुरामापेक्षां ज्यास्ती अधम निष्पन्न कोण झाला?

जोतीराव. उ०—आर्यांतील देव परशुरामापेक्षां जास्ती अधम कालच्या आर्यभट पांड्याच्या चपाती बंडातील आर्यभट पेशवा होय. कारण, आर्यांतील देव परशुरामानें या आपल्या बलिस्थानांतील मूळच्या जॉहामर्द क्षत्रियांस त्यांच्या नूतन उपजलेल्या अर्भक पुत्रांचा मात्र वध केला, परंतु कानपूरच्या छावणींत आर्यभट्टांतील निर्दय बंडखोर पेशव्यानें वायकापोरांच्या शहास गुंतलेल्या जॉहामर्द इंग्लिश शिपायांसमक्ष त्यांच्या भांबावलेल्या स्त्रियांसह त्यांच्या कडेवरच्या तान्ह्या कन्यापुत्रांस हिसकावून दिवसां निर्दयपणानें वध करून अखेरीस पुरुष मंडळीवर गमतीगमतीनें पाळीपाळीनें प्रत्येकावर बंदुकपिस्तुलाचे ताशेरे झाडून त्या सर्वांचे हाल हाल करून प्राण घेतले; यावरून पेशव्यांच्या मनाला मरण्यापूर्वी पश्चाताप झाल्यामुळें क्लेश झाले नसतील, कारण आर्य लोक नेहमीं अहंब्रह्म बनतात. त्यांच्या मनाला आपण सर्वांच्या निर्मिकाची भीडमर्यादा बिलकूल वाटत नाहीं, यास्तव त्या लोकांस पापपुण्याचा विधिनिषेध मुळींच वाटत नाहीं आणि अशा असुरांच्या जातीस भूदेव मानून त्यांच्या पायाचीं तीर्थें पितात, अशा लोकांस काय ह्मणावें! बरें, असो, परंतु असल्या तऱ्हेच्या व्यक्ति त्यांच्या माता-पित्यांनीं जन्मतांच जर नाहींशा केल्या असत्या, तर एकंदर सर्व जगांतील लक्षावधी कुटुंबांस अनिवार त्रास भोगावे लागले नसते आणि त्यांस त्यांच्या मरणाच्या पूर्वी पश्चाताप झाल्यामुळें क्लेश भोगावे लागले नसते.

यशवंत. प्र०—असल्या तऱ्हेच्या व्यक्ति पृथ्वीच्या पाठीवर जर असल्या, तर त्या पुढें कदाचित एखादे वेळीं वळवळ करणाऱ्या विषारी सर्पासारखे भयानक होतील, यास्तव आपण सर्वांनीं त्यांजविषयीं नेहमीं सावध राहिलें पाहिजे. असो, परंतु कोणत्या कारणावरून मानव स्त्री अथवा पुरुष आपल्या मरणाच्या पूर्वी शांतपणें आनंदांत आपले प्राण सोडितात?

**जोतीराव.** उ०—मानव स्त्रीपुरुष आपलीं लग्नें झाल्यानंतर ते निर्मळ अंतःकरणानें सत्यास स्मरून एकमेकांशीं जेव्हां सर्वकाळ सर्वकामीं सत्य-आचरणांत आपलें सर्व आयुष्य घालवितात. यास्तव मरण येण्याच्या पूर्वीं ते शांतपणें आपले प्राण सोडितात. कित्येक मानव स्त्रीपुरुष आपल्या शेजाऱ्याचें बरें करण्यासाठीं सर्व काळ प्रयत्न करितात. म्हणून त्यांच्या मरणापूर्वीं त्यांस कोणत्याच प्रकारचे क्लेश होत नाहींत. तथापि कित्येक अशक्त भित्र्या स्वभावाचे केवळ भाविक मानव स्त्रीपुरुषांच्या आजारीपणांत त्यांच्या इंद्रीयांचे व्यापार फारच मंद पडतात. यामुळें त्यांपैकीं कित्येक बावचळून असें म्हणतात, देवाचे दूत आले आणि कित्येक म्हणतात कीं, यमाचे दूत आले आणि कित्येक सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त, महंमद वगैरे महा सत्पुरुषांसारखे, एकंदर सर्व आपल्या मानव स्त्रीपुरुषांच्या संतानानें सत्य वर्तन करून त्यांनीं आपलें आयुष्य आनंदांत घालवावें म्हणून जीवंत असतां झटतात. यास्तव मरण येण्याच्या पूर्वीं त्याच्या मुद्रेवर शांतपणें आनंदाचा गांभीर्य प्रकाश पडतो. अशा " **सत्पुरुषांस जगाच्या कल्याणा आणि सत्याची विभूती** " असें म्हणावें आणि तेच मृत असून एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांच्या हृदयमंदीरांत आठवणरूपी जागृत होऊन वास करितात. यास्तव प्रत्येक मानव स्त्रीपुरुषानें जीवंत असतां सत्यास जीवीं धरून त्याप्रमाणें सत्य आचरण केल्यानें त्याच्या वृत्तींत अत्यंत गांभीर्यपणा येऊन त्यास काळ समीप असल्यामुळें कल्पित परलोकाचें भय वाटत नाहीं. यास्तव आपण शुद्धीवर असतां आपल्या कन्यापुत्रांसह कुटुंबांतील एकंदर सर्व तरुणांस सत्याविषयीं बोध करून एकंदर सर्व सोयरेधायरे इष्टमित्र वगैऱ्यांचा निरोप घ्यावा आणि शांतपणें सत्यास स्मरून पुढें दिलेली प्रार्थना करावी.

## ॥ प्रार्थना ॥

या तुझ्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्यें अनंत सूर्यमंडलांसहित या पृथ्वीवरील प्राणीमात्रांसह मज मानवास निर्माण करून मला सदसद्विचार करण्याची बुद्धि दिलीस व तुझ्या आज्ञेप्रमाणें सत्यास स्मरून मी या जगांत वर्तन केलें, हें तूं जाणतोस, यास्तव तूं माझा अंगिकार करशील, अशी माझी पूर्ण खात्री आहे. आणि त्याचप्रमाणें माझ्या बाकी एकंदर सर्व मानव बहिण-भावंडांनीं सत्यास स्मरून आचरण केल्याबरोबर, त्यांचाहि अंगिकार निःसंषय करशील !! तुझी सत्यसत्ता वाढो !!!

**यशवंत.** प्र०—मानव स्त्री अथवा पुरुषांचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर त्याच्या प्रेताविषयीं प्रथम काय करावें ?

**जोतीराव.** उ०—त्या प्रेतास घरांतील एखाद्या हवाशीर खोलींत बिछान्यावर निजवावें आणि त्या खोलींत शवाजवळ एखाद्या पोक्त मनुष्यास मात्र बसवून एकंदर सर्व घरांतील हवा स्वच्छ होण्याकरितां थोडाथोडा उद-कापूर जाळण्याचें सुरू करावें आणि बाकीच्या एकंदर सर्व कुटुंबांतील बायकापोरांस मोठमोठ्यानें रडण्याचा कोल्हाळ करूं न

देतां, त्यांसह एकंदर सर्व इष्टमित्रांनीं खोलीच्या बाहेरच्या बाजूस बसून मृतानें आजपावेतों आपल्या सर्वांच्या निर्मिकास स्मरून सत्य आचरण कसें केलें, याविषयीं पक्का प्रहर अथवा दीड प्रहर विचार करीत बसावें.

## प्रेताची गती

**बळवंतराव हरी साकवळकर. प्र०**—एकंदर सर्व मानव कन्यापुत्रांनीं आपल्या मातापित्यांच्या प्रेतांची गति कशी लावावी ?

**जोतीराव गोविंदराव फुले. उ०**—एकंदर सर्व मानव कन्यापुत्रांच्या मातेनें अथवा पित्यानें आपल्या मरणाच्या अगोदर आपल्या प्रेताची कोणत्या प्रकारानें गति लावावी, म्हणून त्यांनीं स्वतःची आपली इच्छा जशी प्रदर्शित केली असेल, त्याप्रमाणें त्याच्या कन्यापुत्रांसह एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांनीं त्याच्या प्रेताची गति लावावी. अथवा मानव मातापित्यानें त्याच्या मरणाच्या अगोदर त्याच्या प्रेताविषयीं आपली इच्छा कोणास प्रदर्शित जर केली नाहीं, तर त्यांच्या कुटुंबांत पूर्वीपासून चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें त्यांच्या प्रेताची गति लावावी.

**बळवंतराव. प्र०**—मानव प्राण्यांच्या प्रेताची गति लावण्याचे प्रकार जे आहेत, त्यांविषयीं फारच थोडक्यांत प्रतिपादन जर कराल, तर बरें होईल.

**जोतीराव. उ०**—भूमींतील कसरवाळव्या वगैरे कीटकांनीं प्रेताचा भंडारा करून खाण्याकरितां चार खंडांसह बेटांतील बहुतेक लोक आदिपासून हा काळपावेतों आपल्यांतील प्रेतांस मातीआड करून त्यांवर खुणेकरितां एखादा मोठा दगड ठेवितात अथवा समाधि बांधितात.—जलांतील मगरमासे वगैरे प्राणीमात्रांनीं प्रेताचा भंडारा करून खाण्याकरितां कांहीं लोक आपल्यांतील प्रेत जास्ती रुचिकर व्हावें, म्हणून त्यांस थोडासा अग्नीचा डाग देऊन वाहत्या पाण्यांत ढकलून देतात. भूमीवरील कोल्हे लांडगे वगैरे चतुष्पाद जनावरांनीं प्रेताचा भंडारा करून खाण्याकरितां कांहीं लोक आपल्यांतील प्रेताचे हातपाय तोडून चव्हाट्याच्या चार रस्त्यावर फेकून देत असत, याविषयीं ग्रंथांत मात्र आधार आहे, असें कित्येक लोक म्हणतात; परंतु हल्लीं तसा प्रकार माझ्या पाहाण्यांत कधींहि आला नाहीं. तथापि कांहीं निर्दय जातीचे लोक आपल्यांतील प्रेतासह प्रेताच्या जिवंत असलेल्या भार्येस जाळून टाकितात आणि त्याविषयीं त्यांच्या शास्त्रांत लेख दाखवितात. परंतु त्याचप्रमाणें त्यांच्यांतील महापतिव्रतेच्या प्रेतासह प्रेताच्या जिवंत असलेल्या भ्रतारास जाळून टाकावें, ह्मणून त्यांच्या शास्त्रांत अजिबाद मुळींच लेख नाहीं, यावरून त्यांच्यांतील शास्त्रकर्ते पहिल्या प्रतीचेच अधम होते, असें सिद्ध होतें.—आकाशांतील कावळे, गिधाडें वगैरे द्विपाद पक्ष्यांनीं प्रेताचा भंडारा करून खाण्याकरितां कांहीं लोक आपल्यांतील प्रेतास आडरानांत एके बाजूला एकांत स्थळीं नेऊन ठेवितात. कांहीं लोक आपल्यांतील प्रेतास अग्नीमध्यें ढोसढोसून त्याची राखरांगोळी करितात

आणि भूमींतील, जलांतील, भुमिवरील आणि आकाशांतील कीटक पशुपक्ष्यादि प्राणीमात्रांस धुरी देऊन त्या प्रेताच्या नांवानें मूठभर भाताचे अथवा कणिकीचे पिंड करून दर्भरूपी गवताच्या कावळ्याला मात्र लटुमुटी अर्पण करितात. आणि एकंदर सर्व कावळे वगैरे मुक्या जनावरांची समजूत काढितात.

**बळवंतराव.** प्र०—कां हो, मूळ मानव स्त्रीपुरुषांस काष्टापासून अग्नी कसा होतो, याविषयीं त्यांस मुळींच माहिती जर नव्हती, तर इराणी आर्य लोकांनीं कावळेगिधाडांच्या तोंडाला पानें पुसून त्यांनीं आपल्या प्रेताचें दहन कसें केलें असेल! यांतील मूळ इंगित काय असावें?

**जोतीराव.** उ०—इराणी आर्य लोकांनीं या बलिस्थानांत लागोपाठ सतत शेकडों वर्षे स्वाऱ्या करून येथील मूळच्या क्षेत्रस्थ दस्यू लोकांतील कित्येक महारथी वीरांचा रणांगणीं परशुराम आर्यानें संहार करितांच, त्यांच्या स्त्रियांच्या पोटीं होणाऱ्या अर्भकांचा वध करून बाकी सर्व मांगमहार वगैरे लोकांस पिढीजादा जेव्हां अनिवार त्रास देऊं लागले, तेव्हां बलिस्थानांतील क्षेत्रस्थ दस्यू लोकांस अतिशय संताप जेव्हां झाला, तेव्हां त्यांनीं आर्यांच्या प्रेतांस कावळेगिधाडांच्या हातीं लागूं न देतां त्यांच्या प्रेतांस हटकून छिन्न भिन्न करून, त्यांची पाहिजेल तशी द्वेषानें विटंबना करूं लागले. यामुळें एकंदर सर्व इराणी आर्य लोक आपल्यांतील एकंदर सर्व स्त्रीपुरुषांसह आपल्या कन्या-पुत्रांचे प्रेतास दहन करूं लागले असावेत, असा अदमास निघतो.

**बळवंतराव.** प्र०—असो, परंतु एकंदर सर्व स्त्री-पुरुषांनीं आपल्यांतील प्रेतांची गति लावण्याकरितां काय करावें?

**जोतीराव.** उ०—प्रेताची गति लावण्याकरितां प्रथम त्याच्या कन्या-पुत्र आप्तवर्ग स्त्री-पुरुषांनीं त्यास स्नान घालून त्याच्या अंगास सुवासिक तेल लावावें. त्यास वस्त्रें नेसवून त्याजकरितां तयार केलेलें तिरडें अथवा जनान्यांत नेऊन निजवावें. त्याचें सर्वांग आच्छादित करून त्यावर पुष्पांच्या माळा घातल्यानंतर त्याच्या पुत्रांसह एकंदर सर्व मित्रांनीं पाळीपाळीनें प्रेतास खांदे देऊन स्मशानभूमीच्या ठिकाणावर न्यावें. प्रेताची कोणत्याहि तऱ्हेची गति लावण्याच्या पूर्वीं त्याच्या अंगावरचीं वस्त्रें काढूं नयेत. नंतर स्मशानांतून आपआपल्या घरोघर जाण्याच्या पूर्वीं एखाद्या सत्यपालक वृद्धानें निर्मीकाविषयीं प्रार्थना करावी, ती अशी कीं:—

## प्रार्थना

तूं एकंदर सर्व पृथ्वीवरील मातीस निर्माण करून तिच्याद्वारें आम्हां सर्व प्राणीमात्रांचें पोषण करवितोस. यास्तव आम्हांपैकीं एका मानवाचें प्राणोत्क्रमण झाल्यामुळें त्यांतील माती, मातीस मिळवून आम्ही सर्व तुझ्या शाश्वत अविनाशी सत्याकडे वळतों.

**बळवंतराव.** प्र०—प्रेतांची गति लावतेवेळीं कांहीं मानव स्त्री-पुरुष आपण आपल्यासच उंच मानितात आणि जगविरुद्ध सर्व लोकांस धिःकारानें नीच मानितात व आपण स्वतः सोवळें बनून बाकी सर्व मानव स्त्री-पुरुषांच्या प्रेतांस स्पर्श न करितां त्यांच्या प्रेतांस कोणत्याहि प्रकारची मदत देण्याचा विटाळ मानितात. अशा प्रकारच्या मानवाबरोबर बाकीच्या मानवांनीं कसें आचरण करावें ?

**जोतीराव.** उ०—अशा मानवद्वेष्ट्या पोकळ बढाईखोर जातीच्या लोकांनीं नीच आचरण केल्याबद्दल त्यांस पश्चाताप होईतों पावेतों ते जिवंत असतां त्यांची इतरांनीं सावलीसुद्धां न घेतां त्याजबरोबर कोणत्याच प्रकारचा व्यापार ठेवूं नये, ह्मणजे ते शुद्धीवर आले तर येतील.

**बळवंतराव.** प्र०—सोंवळें करणाऱ्या लोकांपैकीं कांहीं लोक असें म्हणतात कीं, आमच्या मूळ कुळस्वामी ऋषींची उत्पत्ति मांगणीपासून झाली, याविषयीं आपण उलगडा करून सांगाल, तर बरें होईल.

**जोतीराव.** उ०—कोणी परदेशांमध्यें स्वारी करूं लागल्याबरोबर ते आपल्या स्त्रियांस बरोबर घेऊन जात नाहींत, अशी वहिवाट पूर्वीपासून सांपडते. त्याचप्रमाणें इराणांतील आर्य लोकांनीं बलिस्थानांत जेव्हां जेव्हां स्वाऱ्या केल्या, तेव्हां तेव्हां त्यांपैकीं कोणी कोळणीशीं रत झाले, त्यांच्या कुळास वाल्मिक आणि व्यासऋषीचें कूळ ह्मणूं लागले. कोणी अतिशूद्रीण अथवा परवारणीशीं रत झाले, त्यांच्या कुळांस सांख्य, कबीलर, पराशर आणि सतीरऋषींचें कूळ ह्मणूं लागले आणि चांभारणींशीं रत झाले, त्यांच्या कुळांस टंकऋषीचें कूळ ह्मणूं लागले.

**बळवंतराव.** प्र०—परंतु गाढवी, कोल्ही अथवा कुत्री या चतुष्पाद जनावरांपासून ऋषींचीं कुळें कशीं झालीं ?

**जोतीराव.** उ०—मूळ ऋषींच्या माता गाढवी वगैरे कांहीं नव्हत्या; परंतु त्या स्त्रियांपैकीं कोणी गाढवीसारखी आर्यांच्या अंगावर भोंभों करून भोकणारी होती, कोणी कोल्हीसारखी आर्यांच्या अंगावर हुकी हुकी करणारी होती आणि कोणी कुत्रीसारखी आर्यांच्या अंगावर दांत विचकून ख्याव ख्याव करणारी होती, म्हणून त्या सर्व स्त्रियांच्या नाना प्रकारच्या स्वभावावरून त्यांचीं नांवें गाढवी, कोल्ही आणि कुत्री वगैरे पडलीं असावींत, असें न्याय अनुमानानें ठरतें. सारांश आर्य मानव स्त्री-पुरुषांपासून उत्पन्न झालेली खाशी संतति या बलिस्थानांत फारच थोडी सांपडेल.

## श्राद्ध

**गोविंद गणपतराव काळे.** प्र०—श्राद्ध म्हणजे काय ?

**जोतीराव गोविंदराव फुले.** उ०—मृत पितरांचे उद्देशानें पुत्रादिकांनीं करायाचीं ब्राह्मणभोजनें पिंडदानें एतद् प्रधान कर्में आहेत तीं.

**गोविंद. प्र०**—यावरून शूद्रादि अतिशूद्रांच्या पुत्रादिकांनीं आपल्या मृत माता-पित्यांच्या उद्देशानें आर्यभट ब्राह्मणांस भोजन द्यावें, असें ठरतें.

**जोतीराव. उ०**—शूद्रादि अतिशूद्रांच्या घरीं आर्य ब्राह्मणांनीं अन्नग्रहण करूं नये, म्हणून मनुस्मृति वगैरे ग्रंथांत सांगितलें आहे; तें असें कीं, "राजाचें अन्न गृहण केल्यानें तेजाचा नाश होतो, शूद्रान्न गृहणानें आयुष्याचा नाश होतो, सोनाराच्या अन्न गृहणानें आयुष्याचा नाश होतो. आणि चर्मकाराच्या (चांभाराच्या) अन्न गृहणानें किर्तीचा नाश होतो," याप्रमाणें आहे. आणि "शूद्र याजक (शूद्राचा उपाध्याय) तो जितक्या ब्राह्मणांस आपल्या अंगानें स्पर्श करील, त्या तितक्या ब्राह्मणांस दान दिलें असतां, दान देणाऱ्या पुरुषांस त्या दानापासून फल प्राप्त होत नाहीं." तसेंच मनुस्मृतींत सांगितलें आहे, तें असें कीं, "ब्राह्मणांकडील अन्न हें अमृताप्रमाणें जाणावें आणि शूद्रान्न रक्ताप्रमाणें आहे. यास्तव शूद्रांकडील अन्न वर्णपरत्वेंकरून कनिष्ट आहे." तर येथें कोणी शंका घेतील, ती अशी कीं, आम्ही शूद्रांकडील अन्न घेत नाहीं. आमान्न घेतों. असें असल्याकारणानें आमान्नास (शिध्यास) दोष नाहीं असें म्हणतील, तर त्या आमान्नाविषयीं प्रमाण ऐका. तें असें कीं, "शूद्रांकडील जें आमान्न (सिधा) त्यास शूद्रान्न असें म्हणावें. आणि पक्क झालेलें जें अन्न असेल तें उच्छिष्ट (उष्टें), असें जाणावें. तस्मात् शूद्रांकडील या दोन्ही प्रकारच्या अन्नाचा त्याग करावा, कारण या दोन्ही अन्नांच्या योगानें ब्राह्मण दोषी होतो."

**गोविंद. प्र०**—यावरुन गरुडपुराणांत मृत पितरांच्या नांवानें दान करणें याविषयीं जें प्रतिपादन केलें आहे, तें सर्व कल्पित आहे, असें तुमच्या बोलण्यावरून सिद्ध होतें कां नाहीं ?

**जोतीराव. उ०**—कच्छ, मच्छ वगैरे पुराणांसारखें, धूर्त आर्यभट रिकामटेकड्या ब्राह्मणांनीं आपलीं पोटें जाळण्याकरितां; गरुडपुराणाचें थोतांड आपल्या कल्पनेनें रचिलें आहे, याविषयीं बृहस्पति या नांवाच्या महासत्पुरुषाचे ग्रंथांतील आधार देतों, तो असा कीं,

**ततश्च जीवनोपायो ब्राह्मणैर्विहितस्त्विह**
**मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्य विद्यते क्वचित् ॥**

**गोविंदराव. प्र०**—या महाविद्वान बृहस्पतिच्या आधारावरून शूद्रादि अतिशूद्रांच्या कन्या-पुत्रांनीं आपल्या मृत माता-पित्यांच्या नांवानें धूर्त आर्य ब्राह्मणांस सुवर्णदान, शय्यादान, छत्रीदान गोप्रदान आणि जोडे वगैरे दान करूं नये, असें सिद्ध होतें.

**जोतीराव. उ०**—अरे बाळा, यांत काय संषय ? कारण शूद्रादि अतिशूद्रांचे माता-पिता जिवंत असतां त्यांनीं त्यांस अन्नान्न करायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवानें धूर्त आर्य ब्राह्मणांस सुवर्णदान दिल्यानें त्याबद्दल त्यांच्या मृत पावलेल्या

पितरांस कोणत्या ठिकाणीं आणि केव्हां लाभ होणार आहे? तसें त्यांनीं आपल्या माता-पित्याला वस्त्र वस्त्र करायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवानें धूर्त आर्य ब्राह्मणांस शय्यादान देऊन त्यांस नरम बिछान्यावर लोळायास लावल्याबद्दल त्यांच्या मृत झालेल्या पितरांस कोणत्या ठिकाणीं आणि केव्हां आराम सुख होणार आहे. तसेंच त्यांनीं आपल्या माता–पित्याला उन्हांत तळतळायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवानें धूर्त आर्य ब्राह्मणांस छत्रीदान दिल्यानें त्याबद्दल त्यांच्या मृत पावलेल्या पितरांच्या अंगावर छत्रच्छाया कोणत्या ठिकाणीं आणि केव्हां पडणार? आणि तसेंच त्यांनीं आपल्या माता–पित्याला भर उन्हांत अनवाणी तळतळायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवानें धूर्त आर्य ब्राह्मणांस जोडेदान दिल्यानें त्याबद्दल त्यांच्या मृत झालेल्या पितरांना पादुकासुख कोणत्या ठिकाणीं आणि केव्हां होणार? या सर्वांविषयीं सिद्ध करतां येत नाहीं. यावरून धूर्त आर्यभटाविषयीं बृहस्पतीचें म्हणणें सर्व खरें आहे किंवा खोटें आहें, याविषयीं तुझा तूंच विचार कर, म्हणजे झालें.

**गोविंदराव. प्र०**—यावरून शूद्रादि अतिशूद्रांनीं आपल्या माता–पित्यांच्या नांवानें आर्य ब्राह्मणांस दान जर केलें नाहीं, तर त्यांची गति कशी लावावी?

**जोतीराव. उ०**—वा! खासा प्रश्न–धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मृत मातापित्यांची गति लावण्याकरितां ते पुन्हां शूद्रादि अतिशूद्रांस कांहीं दान करितात काय?

**गोविंदराव. उ०**—आर्यभट ब्राह्मणांच्या मातापित्यांची गति लावण्याकरितां शूद्रादि अतिशूद्रांस कांहींच दान करीत नाहींत.

**जोतीराव. प्र०**—यावरून धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मृत मातापित्यांची गति कशी लागत असेल, याविषयीं तुला कसें वाटतें?

**गोविंदराव. उ०**—शूद्रादि अतिशूद्रांच्या मृत मातापित्यांची गति लावण्याकरितां धूर्त आर्यभट्ट ब्राह्मण आपल्या पायाचें तीर्थ पाजून त्याजपासून जर दान घेतात, तर आर्यभट ब्राह्मण आपल्या मृत मातापित्यांची गति लावण्याकरितां शूद्रादि अतिशूद्रांच्या पायाचें तीर्थ न पितां त्यांजला कांहींच दान करीत नाहींत. यामुळें आर्यभटांचे मृत पूर्वज आधीं मधींच लोंबत असतील असें मला वाटतें. परंतु शूद्रादि अतिशूद्रांनीं आपल्या मृत मातापित्यांचे उतराई होण्याकरितां त्यानीं काय करावें?

**जोतीराव. उ०**—शूद्रादि अतिशूद्रांचे माता-पिता मृत होतांच त्यांचे भाऊबंद, सोयरे-धायरे आणि इष्टमित्र त्यांचे घरीं येऊन त्यांच्या प्रेतांची गति लावण्याकरितां त्यांस सर्व प्रकारची मदत करितात, याबद्दल त्यांचे उतराई होण्याकरितां मृत माता-पित्यांचे तेरावे दिवशीं आपल्या शक्त्यनुसार त्या सर्वांस भोजन देऊन त्या सर्वांच्या गळ्यांत पुष्पांच्या माळा घालाव्यात. आणि आपल्या शक्त्यनुसार कांहीं द्रव्य देऊन त्यांच्या शाळेंत जाणाऱ्या मुलीमुलांस मोठ्या उल्हासानें गाया बक्षीस कराव्यात व दर वर्षी आपल्या

माता-पित्यांची आठवण राहाण्याकरितां आपल्या सामर्थ्याप्रमाणें वर्षश्राद्धें करून कांहीं भाऊबंदांस सोयऱ्या-धायऱ्यांस इष्टमित्रांस भोजन देऊन कोणाची आवडनिवड न करतां आपल्या सर्वांच्या निर्मिकाच्या नांवानें शाळेंत जाणाऱ्या निराश्रित मुली-मुलांस थोडीबहुत मदत केली, म्हणजे जन्मास आल्याचें सार्थक झालें.

# एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांस ग्रंथकर्त्याची प्रार्थना

## ॥ अखंड ॥

निर्मीकानें जर एक पृथ्वी केली ॥ वाही भार भली ॥ सर्वत्रांचा ॥ १ ॥ध्रु०॥
तृण वृक्ष भार पाळी आम्हासाठीं ॥ फळें तीं गोमटीं ॥ छायेसह ॥ २ ॥
सुखसोईसाठीं गरगर फेरे ॥ रात्रंदीन सारें ॥ तीच करी ॥ ३ ॥
मानवांचे धर्म नसावे अनेक ॥ निर्मीक तो एक ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ निर्मी० ॥

## ॥ अखंड ॥

प्राणीमात्रा सोई सुख करण्यास ॥ निर्मी प्रजन्यांस ॥ नद्यांसह ॥ १ ॥ ध्रु० ॥
त्यांचें सर्व जल वेगानें वहाती ॥ पाणी पुरवती ॥ सर्व प्राण्यां ॥ २ ॥
सागराचें योगें व्यापार करिती ॥ सुख देती घेती एकमेकां ॥ ३ ॥
मानवांचे साठी बहुधर्म कसे ॥ झाला कां हो पीसे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ ॥ प्रा० ॥

## ॥ अखंड ॥

एक सूर्य सर्वां प्रकाशास देतो ॥ उद्योगा लावीतो ॥ प्राणीमात्रा ॥ १ ॥ ध्रु० ॥
मानवासहीत प्राण्यांची जीवन ॥ सर्वांचें पोषण ॥ तोच करी ॥ २ ॥
सर्वां सुख देई जनकाच्या परी ॥ नच धरी दुरी ॥ कोणी एका ॥ ३ ॥
मानवांचा धर्म एकच असावा ॥ सत्यानें वर्तावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ ए० ॥

## ॥ अखंड ॥

एक चंद्र नित्य भ्रमण करीतो ॥ सर्वां सुख देतो ॥ निशीदीनीं ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥
भरती ओहोटी समुद्रास देतो ॥ जल हालवीतो ॥ क्षारांसह ॥ २ ॥
पाणी तेंच गोड मेवयोगें होतें ॥ संतोषी करीतें ॥ सर्व प्राण्यां ॥ ३ ॥
मानवांचे साठीं बहू धर्म कसे ॥ झालां कांहो पीसे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ एक० ॥

## ॥ अखंड ॥

सर्वांसाठीं एक वायु केला खास ॥ घेती श्वासोच्छवास ॥ प्राणीमात्र ॥१॥ ॥ध्रु० ॥
वृक्ष वल्लीसह सर्वांचें जीवन ॥ करी तो पालन ॥ जगामाजीं ॥ २ ॥
वायूच्या योगानें हवा शुद्ध होती ॥ प्राण्या सुख देती ॥ निशींदिनीं ॥ ३ ॥
मानवांनों तुम्ही सत्यधर्मी व्हावें ॥ ईशगूण गावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ स० ॥

॥ अखंड ॥

प्राणीमात्रा नेत्रें निर्मीकानें दिलीं ॥ पाहूं तीं लागलीं एकमेकां ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥
ज्ञान सर्वां दिलें सत्य शोधण्याला ॥ मार्गी लावण्याला ॥ अज्ञान्यास ॥ २ ॥
निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक ॥ भांडणें अनेक ॥ कशासाठीं ॥ ३ ॥
मानवांनों तुम्ही ईशा नित्य ध्यावें ॥ सर्व सुखी व्हावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ प्रा० ॥

॥ अखंड ॥

स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावें ॥ कुटुंबा पोसावें ॥ आनंदानें ॥ १ ॥ ध्रु० ॥
नित्य मुलीमुलां शाळेंत घालावें ॥ अन्नदान द्यावें ॥ विद्यार्थ्यांस ॥ २ ॥
सार्वभौम सत्य स्वतः आचरावें ॥ सुखें वागवावें ॥ पंगू लोकां ॥ ३ ॥
अशा वर्तनानें सर्वां सुख द्याल ॥ स्वतः सुखी व्हाल ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ स्त्री० ॥

॥ अखंड ॥

दूर्गूणांचा छंद ज्यास वा लागला ॥ भिक्षा घालण्याला ॥ पात्र नाहीं ॥ १ ॥ ध्रु० ॥
खोटें बोलणारा मद्यपि निवळ ॥ वालीना आगळ ॥ तर्कटास ॥ २ ॥
मानव भावंडें सर्व एकसहा ॥ त्यांजमध्यें आहां ॥ तुम्ही श्रेष्ठ ॥ ३ ॥
बुद्धीसामर्थ्यानें सुख द्यावें घ्यावें ॥ दीनांस पाळावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ दूर्गू० ॥

॥ अखंड ॥

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी ॥ त्याचें भय मनीं ॥ धरा सर्व ॥ १ ॥ ध्रु० ॥
न्यायानें वस्तूचा उपभोग घ्यावा ॥ आनंद करावा ॥ भांडूं नये ॥ २ ॥
धर्म राज्य भेद मानवा नसावे ॥ सत्यानें वर्तावें ॥ ईशासाठीं ॥ ३ ॥
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों ॥ मनुजा सांगतों ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥स०॥

॥ अखंड ॥

सूर्यमंडळांची करितां गणना ॥ तर्क तो चालेना ॥ कल्पनेचा ॥ १ ॥ ध्रु० ॥
त्यांच्या भोंवताली उपग्रह किती ॥ प्रागी जगताती ॥ असंख्यात ॥ २ ॥
त्यानें निर्मीयले मानव हे सारे ॥ त्याचींच लेंकरें ॥ तोच रक्षी ॥ ३ ॥
आपल्यावरून जग ओळखावें ॥ सर्वां निववावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥ सूर्य० ॥

सद्सद्विचारसंपन्न महाराज सयाजीराव गायकवाड, सेना खासकेल, समशेर बहादर, जी. सी. एस्. आय., असिस्टंट रा. ब. विश्राम रामजी घोले, ऑनररी असिस्टंट सर्जन टु हिज हायनेस् धि व्हॉईसराय आणि गव्हर्नर जनरल ऑफ् इंडिया,

कनवाळू नागेश्वरगीर कल्याणगीर बुवा व मोरो विठ्ठल वाळवेकर या सर्वांची ग्रंथकाराविषयीं ममता.

## ॥ अखंड ॥

गायकवाडी आश्रय, घोल्याची नजर ॥ होती अनिवार ॥ फी न घेतां ॥ १ ॥ गा० ॥धृ०॥
दुष्ट रोगांतून फुल्या वांचविला ॥ आनंदी पत्नीनी ॥ केली ज्याच्या ॥ २ ॥
बुवाजीचें द्रव्य समाजीं नमूद ॥ फुल्या केला मर्द ॥ रोग्यांमध्यें ॥ ३ ॥
योजूनीयां मनीं प्रश्न करणारे ॥ आप्तइष्ट सारे ॥ नाडलेले ॥ ४ ॥
"सार्वजनीक सत्यधर्म" पुरा केला ॥ त्यास छापण्याला ॥ द्रव्यतूट ॥ ५ ॥
जाणूनी ही वार्ता मित्र मोरोपंतें ॥ नेलें छापण्यातें ॥ पुस्तक हें ॥ ६ ॥
ज्याचा मूळ मुद्दा सर्वांचा निर्मीक ॥ सत्य आहे एक ॥ नसे दूजा ॥ ७ ॥
आपसुखासाठीं त्यानें केलें सर्व ॥ वाहूं नको गर्व ॥ पूजेमध्यें ॥ ८ ॥
स्त्रीपुरुषांमध्यें निवड नसावी ॥ गुणं आदरावीं सर्व काळ ॥ ९ ॥
एकोणीस शतकीं ग्रंथ केला सिद्ध ॥ वाचोत प्रबुद्ध ॥ जोती म्हणे ॥ १० ॥गा०॥

१६

# अखंडादि काव्यरचना

# अखंडादि काव्यरचना

## अनुक्रम

### विभाग १


मानवांचा धर्म एक ...
मानवी स्त्रीपुरुष ...
आत्मपरीक्षण ...
नीती ...
धीर ...
समाधान ...
सहिष्णुता ...
सद्विवेक ...
उद्योग ...
स्वच्छता ...
गृहकार्यदक्षता ...


### विभाग २


गणपती ...
आर्य भटब्राह्मणांचें कसब ...
सत्यपाठ ...
भटाची वाणी ...
ढोंगी गुरु ...
ब्राह्मणांचा भोंदूपणा ...
शूद्रांपासून फंड गोळा करण्याविषयीं निषेधार्थक ...
दस्यूचा पोवाडा ...


### विभाग ३


बळीराजा ...
मानव महंमद ...
श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, संस्थान बडोदें, यांना पत्र ...
बडोद्याचे दिवाण लक्ष्मण जगन्नाथ यांना पत्र ...
गंगाराम भाऊ म्हस्के, वकील यांस उत्तर ...
मे. रावसाहेब गंगाराम भाऊ म्हस्के यांस पत्र पाठविलें, त्यासंबंधीं ...


### विभाग ४


शूद्रादि अतिशूद्रांस उपदेश ...
आदिसत्याच्या आरत्या ...


### विभाग ५


एक अपूर्ण काव्य ...

# विभाग १ ला

## ॥ मानवांचा धर्म एक ॥

(१)

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी ॥ त्याचें भय मनीं ॥ धरा सर्व ॥ १ ॥
न्यायानें वस्तुंचा उपभोग घ्यावा ॥ आनंद करावा ॥ भांडूं नये ॥ २ ॥
धर्मराज्य भेद मानवा नसावे ॥ सत्यानें वर्तावें ॥ ईशासाठीं ॥ ३ ॥
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों ॥ आर्यांस सांगतों ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

निर्मीकानें जर एक पृथ्वी केली ॥ वाही भार भली ॥ सर्वत्रांचा ॥ १ ॥
तृणवृक्षभार पाळी आम्हासाठीं ॥ फळें तीं गोमटीं ॥ छायेसह ॥ २ ॥
सुखसोईसाठीं गरगर फेरे ॥ रात्रंदीन सारें ॥ तीच करी ॥ ३ ॥
मानवांचे धर्म नसावे अनेक ॥ निर्मीक तो एक ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

प्राणीमात्रा सोई सुख करण्यास ॥ निर्मी पर्जन्यांस ॥ नद्यांसह ॥ १ ॥
त्याचें सर्व पाणी वेगानें वाहती ॥ आर्यें कुरापती ॥ तीर्थें केलीं ॥ २ ॥
दाढी डोई वेण्या मुंड भादरीती ॥ भट करिताती ॥ द्रव्यलूट ॥ ३ ॥
आर्यांनीं कल्पीलीं थोतांडें हीं सारीं ॥ ठगे सर्वोपरी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

जप अनुष्ठानें पाऊस पाडीती ॥ आर्ये कां मरती ॥ जळावीण ॥ १ ॥
जळांत बुडतां गटांगळ्या खाती ॥ प्राणास मुकती ॥ तळीं बसे ॥ २ ॥
फुगुनीयां वर जळीं तरंगती ॥ मजा ते दावीती ॥ मृत्युलोकीं ॥ ३ ॥
अज्ञानी शुद्रांत भुदेव बनती ॥ भिक्षा कां मागती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

---

१. यातील १, २, ३, ७, ८, ९, ११, १३ हे अभंग थोड्या फार फरकाने सार्वजनिक सत्यधर्मपुस्तकाच्या अंतीं आलेले आहेत.

(५)

जप अनुष्ठानें स्त्रिया मुलें होती ॥ दुजा कां करीती ॥ मुलासाठीं ? ॥ १ ॥
भट ब्राह्मणांत बहु स्त्रिया वांज ॥ अनुष्ठानीं बीज ॥ नाहीं का रे ? ॥ २ ॥
अनुष्ठानावीण विध्वा मुलें देती ॥ मारूनी टाकीती ॥ सांदींकोनीं ॥ ३ ॥
ज्याचीं जशींकर्में तशीं फळा येती ॥ शिक्षा ती भोगीनी जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

ईश म्हणे आर्य परशरामास ॥ वधी अर्भकांस ॥ क्षत्रीयांच्या ॥ १ ॥
दांभीक पेशवे पानपतीं जाती ॥ पाळथे पडती म्लेंछापुढें ॥ २ ॥
मर्द रावबाजी इंग्रजास भ्याला ॥ गौप्रदानी झाला ॥ बीठूरास ॥ ३ ॥
धूर्त आर्य नाना सोंवळें दावीतो ॥ गोऱ्यासंगें खातो ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

एक सूर्य सर्वां प्रकाशास देतो ॥ उद्योगा लावीतो ॥ प्राणीमात्रा ॥ १ ॥
मानवासहीत प्राण्यांचें जीवन ॥ सर्वांचें पोषण ॥ तोच करी ॥ २ ॥
सर्वां सूख देई जनकाच्या परी ॥ नच धरी दूरी ॥ कोणी एका ॥ ३ ॥
मानवांचा धर्म एकच असावा ॥ सत्यानें वर्तावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

एक चंद्र नित्य भ्रमण करीतो ॥ सर्वां सूख देतो ॥ निशीदीनीं ॥ १ ॥
भरती ओहोटी समुद्रास देतो ॥ जळ हालवीतो ॥ क्षारांसह ॥ २ ॥
पाणी तेंच गोड मेघा योगें होतें ॥ संतोषी करीतें ॥ सर्व प्राण्यां ॥ ३ ॥
मानवांचे साटीं बहु धर्म कसे ॥ झालां कां हो पिसे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

सर्वांसाठीं एक वायु केला खास ॥ घेती श्वासोश्वास ॥ प्राणीमात्र ॥ १ ॥
वृक्षवल्लीसह सर्वांचें जिवन ॥ करीतो पालन ॥ जगामाजीं ॥ २ ॥
वायुच्या योगानें हवा शुद्ध होती ॥ प्राण्या सूख देती ॥ निषीदीनीं ॥ ३ ॥
मानवांनों, तुम्ही ईशा नित्य भ्यावें ॥ सर्व सूखी व्हावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

इराणी धाडस दंगेखोर बंड ॥ स्वाऱ्या त्या उदंड ॥ केल्या त्यांनीं ॥ १ ॥
बळीस्थानीं त्यांचें वरचस्व झालें ॥ क्षेत्र स्थापीलें ॥ अतोनात ॥ २ ॥
आर्य अपभ्रंश इराण्यांचा झाला ॥ दिमाखें म्हणाला ॥ भट श्रेष्ठ ॥ ३ ॥
पाखांडेंही सारीं वेद लपवीनी ॥ जगालागीं भीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

क्षत्रियांनो, तुम्ही कष्टकरी व्हावें ॥ कुटुंबा पोसावें ॥ आनंदानें ॥ १ ॥
नित्य मुलींमुलां शाळेंत घालावें ॥ अन्नदान द्यावें ॥ विद्यार्थ्यास ॥ २ ॥
सार्वभौम सत्य स्वतः आचरावें ॥ सुखें वागवावें ॥ आर्य भट्टा ॥ ३ ॥
अशा वर्तनानें सर्वां सूख द्याल ॥ स्वतः खुषी व्हाल ॥ जोती म्हणे ॥ ४

(१२)

दरिद्री मुलांनीं विद्येस शिकावें ॥ भिक्षान्न मागावें ॥ पोटापुरतें ॥ १ ॥
विद्वान वृद्धांनीं विद्यादान द्यावें ॥ भिक्षेकरी व्हावें ॥ गांवामध्यें ॥ २ ॥
स्त्रीपुरुषांसाठीं शाळा त्या घालाव्या ॥ विद्या शिकवाव्या ॥ भेद नाहीं ॥ ३ ॥
स्वतः हितासाठीं खर्च जे करीती ॥ अधोगती जाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१३)

दुर्गूणांचा छंद ज्यास वा लागला ॥ भिक्षा घालण्याला ॥ पात्र नाहीं ॥१॥
खोटें बोलणारा मद्यपी निब्बळ ॥ घाली ना अगळ ॥ तर्कटास ॥२॥
तर्क धर्म बळ राजद्रोही खळ ॥ शुद्रांत प्रबळ ॥ ज्ञान सांगे ॥ ३ ॥
अशा साह्य देतां माजवितां पोळ ॥ मानवासी राळ ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१४)

मुळीं बुद्धी नाहीं पशुपक्षादिकां ॥ त्याजमध्यें हाका ॥ वेदवक्त्या ॥ १ ॥
खिस्त महंमद सांग ब्राम्हणासी ॥ धरावे पोटाशीं ॥ बंधूपरी ॥ २ ॥
मानव भावंडें सर्व एकसहा ॥ त्याजमध्यें आहां ॥ तुम्ही सर्व ॥ ३ ॥
बुद्धीसामर्थ्यानें सूख द्यावें घ्यावें ॥ दीनास पाळावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१५)

स्वभावा लिहावी भाषण करावें ॥ सद्गुणी असावें ॥ स्वभावांत ॥ १ ॥
चाळीशीच्यावर त्यांनीं दिक्षा घ्याव्या ॥ शाळा तपासाव्या ॥ योग्य वेळीं ॥ २ ॥
मुढ मांगसह ब्राम्ह मुजोर ॥ मूळ सत्य सार ॥ त्यांस सांगा ॥ ३ ॥
निर्मीकाचा धर्म एक आहे सत्य ॥ व्यर्थ कां पांडीत्य ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१६)

इंग्रजी लिहावें भाषण करावें ॥ जगांत त्यागावें ॥ व्यसनास ॥ १ ॥
चाळीशीच्यावर त्यांनीं दिक्षा घ्याव्या ॥ शाळा तपासाव्या ॥ गांवोगांवीं ॥ २ ॥

आवेशी खिस्तास करा सत्यबोध ॥ करावे सावध ॥ बंधूपरी ॥ ३ ॥
सत्यावीण नाहीं जगीं अन्य धर्म ॥ कळवावें वर्म ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१७)

यवनीं लिहावें भाषण करावें ॥ सर्वस्वी त्यागावें व्यसनास ॥ १ ॥
चाळीशीच्यावर त्यांनीं दिक्षा घ्याव्या ॥ शाळा तपासाव्या ॥ नगरींच्या ॥ २
सुनीशीया सर्व करा सत्यवादी ॥ त्याची जहामर्दी ॥ जगाठायीं ॥ ३ ॥
जगामाजीं एक सत्यधर्म खास ॥ सांगा सर्वत्रांस ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१८)

तीन भाषेंमध्यें सध्या जे निपूण ॥ सद्‌गुणीं संपन्न ॥ मानवंत ॥ १ ॥
चाळीशीच्यावर मुख्य दिक्षा घ्यावी ॥ गादी संभाळावी ॥ समाजाची ॥ २ ॥
क्षेत्री खिस्ती महंमदी आळवावे ॥ सत्य वर्तवावें ॥ त्यांचे हस्तें ॥ ३ ॥
सत्यावीण नाहीं जगीं अन्य धर्म ॥ कळवावें वर्म ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१९)

सर्व भाषेंमध्यें असे जो निपूण ॥ सद्‌गुणी संपन्न ॥ सत्यवादी ॥ १ ॥
त्याला नको दिक्षा गादी पाठबळ ॥ वर्षांची अगळ ॥ त्याला नको ॥ २ ॥
लेखी भावंडे तो अथवा ती सर्व ॥ करीना बा गर्व ॥ पाखांडाचा ॥ ३ ॥
सत्यावीण नाहीं त्यास मुख्य धर्म ॥ सत्य ज्याचें कर्म ॥ जोती म्हणे ॥ ४ ।

## ॥ मानवी स्त्रीपुरुष ॥

(१)

सारे स्त्रीपुरुष भावंडांत लेखी ॥ मांगम्हारा दुःखी ॥ करीताती ॥ १ ॥
खिस्त महंमदा सत्यानें आळवी ॥ मानवा वळवी ॥ ईशाकडे ॥ २ ॥
धर्म-देश-जाती-भेद नाहीं तिला ॥ शोभे मनुज्याला ॥ खरी माता ॥ ३ ॥
अशा मानवीस सत्स्त्री म्हणावी ॥ तिची कीर्ती गावी ॥ जोती म्हणे ॥ ४

(२)

आत्मज्ञान नाहीं ब्रह्मराक्षसाला ॥ पिडी सर्वत्रांला ॥ सोंवळ्यानें ॥ १ ॥
स्वतः सुखदुःख पराशीं तोलणें ॥ मेळ बैसवीणें ॥ त्यास कैचें ॥ २ ॥

यालाच म्हणावें अहंब्रम्ह झाला ॥ गर्वानें फुगला ॥ वाया गेला ॥ ३ ॥
मानवास बट्टा यानेंच लाविला ॥ दुर्गुणी आगळा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

निर्मळ निर्दोषी निश्चळ विचारी ॥ सदा सत्याचारी ॥ प्रपंचांत ॥ १ ॥
सूर्यापरि सत्यप्रकाशा पेरीतो ॥ शांती सर्वां देतो ॥ चंद्र जैसा ॥ २ ॥
होईना भूदेव जती मारवाडी ॥ मानवा न पीडी ॥ सर्पवत ॥ ३ ॥
अशा सज्जनास मानव म्हणावें ॥ त्याचे गुण गावे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

जगीं अमंगळ खळ संसारांत ॥ जाई एकांतांत ॥ मुक्त म्हणे ॥ १ ॥
मुक्त झाले त्यांनीं ग्रंथ कसे केले ॥ पाखंडें नोंदीलें ॥ आर्यहित ॥ २ ॥
आर्य श्रेष्ठ केले शूद्र नागवीले ॥ नित्य वागवीले ॥ दासापरी ॥ ३ ॥
मानवाचे द्वेष्टे धूर्त सर्वोपरी ॥ पहा ग्रंथांतरीं ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

सत्यवर्तनानें सर्व सुखी होती ॥ आर्य झुरताती ॥ मनीं सर्व ॥ १ ॥
कष्टाळू स्वभाव ब्राह्मणांचा नाहीं ॥ भांबाऊन पाही ॥ शूद्राकडे ॥ २ ॥
भोंदाडू स्वभाव मुळींच जाईना ॥ योजी फितुरांना ॥ सर्व कामीं ॥ ३ ॥
कष्टकरी करा ऐशा ऐदी भटा ॥ उपटावा कांटा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

सत्यानें वर्तावें मानवांचा धर्म । ठावें नाहीं वर्म ॥ ब्राह्मणास ॥ १ ॥
कष्टाळू शुद्रांचे लक्ष्मी पाय दाबी ॥ म्हणे ना कुणबी ॥ त्यास कधीं ॥ २ ॥
सुख देणें घेणें सर्व सुखी होती ॥ अरिष्टें पळती ॥ बारा वाटा ॥ ३ ॥
कष्टाळू मानव शूद्र बंधू खरा ॥ त्याचें हीत करा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

सत्य अनुग्रह स्वतः ज्यास झाला ॥ छळीना कोणाला ॥ तिळमात्र ॥ १ ॥
कायावाचामनें ब्राह्मण होईना ॥ श्रेष्ठत्व दावीना ॥ शुद्रादीकां ॥ २ ॥
कुळअभिमानी मधी ना मिरवी ॥ कोणास न दावी ॥ अर्थदंभ ॥ ३
अशा मानवास गुणज्ञ म्हणावें ॥ त्यासंगें वर्तावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

शिरीं जटाभार मृगचर्मी वस्त्र ॥ वाची आर्यशास्त्र ॥ साधु झाला ॥ १ ॥
ताबुतीं चितारे सोंग रंगवीलें ॥ घरांत खेळले ॥ वाघापरी ॥ २ ॥
साधुपरी व्याघ्र मनुष्य वा केला ॥ गांठी ना कुत्र्याला ॥ धावतांना ॥ ३ ॥
सत्यावीण साधु मानव बनले ॥ सर्व वाया गेले ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

मातापित्यामुळें होईना कुलीन ॥ दुर्गूणाची खाण ॥ जगामाजीं ॥ १ ॥
द्रव्याच्या बळानें दारूस सोडीना ॥ पाळी वेसवांना ॥ लाज गेली ॥ २ ॥
ब्राम्हण म्हणूनी उन्मत्त तो झाला ॥ नाडितो शुद्राला ॥ सर्वोपरी ॥ ३ ॥
दुर्गुणापासून मुक्त नाहीं झाला ॥ त्यागा पातक्याला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

स्त्रीपुनर्विवाह करण्याची बंदी ॥ अन्यायाची धुंदी ॥ थांग नाहीं ॥ १ ॥
खोट्या नोटा खतें आर्याजी करीती ॥ लांच बहु खाती ॥ अन्यायानें ॥ २ ॥
अन्य क्षुद्र लोकां पुराणें सांगती ॥ बंड करविती ॥ हितासाठीं ॥ ३ ॥
अन्यायी ब्राह्मण बहु ठाईं होती ॥ दुःख सर्वां देती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

म्लेंच्छाचे धर्मास हेव्यानें निंदीती ॥ ग्रंथानें लिहिती ॥ त्यांची निंदा ॥ १ ॥
नित्य शुद्रा तुच्छ गर्वानें मानीती ॥ त्यास वापरीती ॥ पशुपरी ॥ २ ॥
शुद्रास निंदून त्याचें सर्व खाती ॥ त्यांच्याशीं वागती ॥ लोवळ्यानें ॥ ३ ॥
निंदकाचें घर ब्राम्हणी सोहळा ॥ खरा हा वाटोळा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१२)

आर्या ठावें नाहीं द्यावन मुळ ॥ गुलामांचा बाळ ॥ शुद्रां म्हणे ॥ १ ॥
ब्राम्हण करितो मांगम्हार–छळ ॥ स्मृतीचें वादळ ॥ लेखीं दावी ॥ २ ॥
आर्य वेद सर्व अती खोडसाळ ॥ काढीताती पळ ॥ रानोमाळ ॥ ३ ॥
छळाचें कारण भट हें वा मुळ ॥ केला तो अढळ ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१३)

मानवांचा जो कां अन्याय न करी ॥ भावंडांचे परी ॥ लेखी सर्वां ॥ १ ॥
मांगम्हार–निंदा ठावी नाहीं व्यथा ॥ जाळी आर्यग्रंथा ॥ अग्नीमध्यें ॥ २ ॥

ऐश्वर्याच्या मदीं कोणास न छळी ॥ घाळी रसातळीं ॥ द्वेषभाव ॥ ३ ॥
ह्यालाच म्हणावा सत्यवादी पुरा ॥ जोती बंधू खरा ॥ मानवांचा ॥ ४ ॥

## (१४)

क्रोधाचा विटाळ सत्यधर्म पाळी ॥ तो खरा बळी ॥ मानवांत ॥ १ ॥
सर्वांभूतीं दया हृदयीं कोमळ ॥ घाळीतो अगळ ॥ इंद्रियांस ॥ २ ॥
जगांत वर्ततो सद्‌गुणी मवाळ ॥ वानसेस मुळ ॥ डाग नाहीं ॥ ३ ॥
सत्य शोध होतां धिक्कारी तो कली ॥ तोच सत्यवाली ॥ जोती म्हणे ॥ ४

## (१५)

कमळपत्रास उदक डागीना ॥ कृष्णाजी होईना ॥ देवबाप्पा ॥ १ ॥
सुई-आग्रावर मोहरी थांबेना ॥ ब्राम्हण होईना ॥ सत्कर्मी ॥ २ ॥
असा जगीं दाव संसारी ब्राम्हण ॥ त्याचेंच चुंबन ॥ आम्ही घेऊं ॥ ३ ॥
इतरांसारीखा दुर्गुणी ब्राम्हण ॥ आणाल कोठून ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## (१६)

पोटीं बाळगून जन्म त्यास दिला ॥ पाजीला पोशीला ॥ माऊलीनें ॥ १ ॥
सर्वांभूतीं दया माता सेवेवीण ॥ म्हणेना सज्जन कोणी त्यास ॥ २ ॥
दंभभक्तीसाठी संन्याशी बनती ॥ खोडीती संतत्ती ॥ जगामाजी ॥ ३ ॥
आर्यपाखंडानें माते कष्ट देती ॥ अधोगती जाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## (१७)

आत्मज्ञान नाहीं आर्य ब्राम्हणाला ॥ छळी मानवाला । सर्वोपरी ॥ १ ॥
क्षमा दया नाहीं अहंब्रम्ह झाला ॥ भिक्षुक बनला ॥ जगा त्रास ॥ २ ॥
अतीशुद्र यानें कनिष्ट मानीला ॥ गर्वानें फुगला ॥ कोल्ह्यापरी ॥ ३ ॥
श्राद्धाचे निमित्य मुक्या गाया वधी ॥ स्वतः करी विधी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## (१८)

सबळ दुर्बळ त्यास प्रिय जरी ॥ धरी ना तो दुरी ॥ एकासही ॥ १ ॥
दोष काढणाऱ्या भिऊन वर्ततो ॥ नितीनें वागतो ॥ त्याच्यासंगें ॥ २ ॥
रागीटास सदा नम्रता दाखवी ॥ सोंवळें मिरवी ॥ अज्ञान्यांत ॥ ३ ॥
अशा ब्राम्हणांनीं बट्टा मानवास ॥ आणिला तो खास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१९)

अज्ञानी शुद्रास गर्वानें छळीतो ॥ सर्वोपरी भीतो ॥ इंग्रजास ॥ १ ॥
विद्वत्तेचा मद अंत्यजां दावितो ॥ यवनीचें खातो ॥ गिधापरी ॥ २ ॥
यज्ञामध्यें घोडेगायांस वधीतो ॥ म्हारास निंदीतो ॥ मत्सरानें ॥ ३ ॥
ब्राह्मणांनो, तुम्ही दुर्जन कां होतां ॥ मानवां छळीतां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२०)

सत्यवक्ते होते जर ब्राम्हणांत ॥ तर रमाकांत निर्मी कैसा ॥ १ ॥ *
बोधपर वाणी आर्याची अखंड ॥ पेशव्यानें बंड ॥ कसें केलें ॥ २ ॥
जगीं सर्वां प्रिय कोण आर्य झाला ॥ दावा हो आम्हाला ॥ एक तरी ॥ ३ ॥
कल्पनेचा कृष्ण यांनींच निर्मीला ॥ कोळ्यानें वधीला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२१)

सत्य निर्मीकास शोधल्यावांचून ॥ थोतांडें कल्पून ॥ ग्रंथ केले ॥ १ ॥
त्याचे जागेवर भूदेव बसती ॥ शुद्रा ठकवीती नटापरी ॥ २ ॥
मृताच्या मुलास नित्य नागवीती ॥ जोडे उपटीती ॥ दानासवें ॥ ३ ॥
आर्य ब्राम्हणास उपाधी गणावी ॥ त्याचा शोध लावी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२२)

ऐहिकाची इच्छा इंग्रजी शिकती ॥ आर्य दास होती ॥ इंग्रजाचे ॥ १ ॥
ब्राह्मण सर्वस्वी होती पक्षपाती ॥ भटा वाचवीती ॥ न्यायामध्यें ॥ २ ॥
परलोक आशा यज्ञ करिताती ॥ बोकडास खाती ॥ इंग्रजींत ॥ ३ ॥
जपजाप–दंभ घरीं मिरवीती ॥ शुद्रा दोष देती । जोती म्हणे ॥ ४ ॥

(२३)

सत्यानें वर्तावें ज्यास लोभ झाला ॥ मानवी शोभला ॥ तोच सुखी ॥ १ ॥
सर्व सुखी व्हावे मुळ आशा ज्याची ॥ हाव सद्‌गुणाची ॥ तोच ज्ञानी ॥ २ ॥
आपसुखदुःख पराचें जाणतो ॥ त्यांच्याशीं वततो ॥ तोच धन्य ॥ ३ ॥
अशा मानवास सद्‌गुणी म्हणावा ॥ भावंडीं गणावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२४)

खरेखोटे दोघे प्रिय ब्राम्हणांना ॥ वंदीना निंदीना ॥ कोणी एका ॥ १ ॥
त्याला आवडेना प्रित पवित्रता ॥ शुद्र वापरीतां ॥ क्षमा नाहीं ॥ २ ॥

कधीं धिःकारीना धूर्त ब्रम्हनिष्ठ ॥ क्रुर कर्मी नष्ट ॥ जगद्वेष्टा ॥ ३ ॥
मनुष्यपणाचें नाहीं देहभान ॥ सर्वांत दुर्जन ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२५)

श्राद्धामध्यें गाया आर्यभट खाती ॥ मौजा मारीताती ॥ मृतानांवें ॥ १ ॥
पडझड गाया दीन मांग खाती ॥ ब्राम्हण निंदीती ॥ त्यांला सर्व ॥ २ ॥
अहिंसक जती पाणी काढवीती ॥ किड्या मोक्ष देती ॥ तृषेसाठीं ॥ ३ ॥
आर्यासह जत्या नाहीं सत्य त्या ॥ जाती सर्व वाया ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२६)

ब्रम्ह जाणल्यानें ब्राम्हण बा होती ॥ कसे ते उरती ॥ शुद्रादीक ॥ १ ॥
सर्वांशीं करीती रोटीबेटीबंदी ॥ नागापरी धुंदी ॥ ब्राह्मणांत ॥ २ ॥
ख्रिस्त महंमदा निचांत गणती ॥ छळ करिताती ॥ पशूपरी ॥ ३ ॥
ब्रम्हजाण त्याहि ब्राम्हणाची खूण ॥ दुर्गुणाची खाण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२७)

भूत वर्तमान भविष्य काळास ॥ भिईना तो खास ॥ सत्य पोटीं ॥ १ ॥
त्रीकाळ जगांत सत्यानें वागतो ॥ सुख देतोघेतो ॥ सर्वकामीं ॥ २ ॥
त्याच्या पाठीमागें सुख संतानास ॥ हर्ष मानवास ॥ जगामाजीं ॥ ३ ॥
अशास म्हणावा बुद्ध महाजन ॥ मानवी भूषण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२८)

ब्राह्मणाचा धर्म जतीमारवाडी ॥ धाना पेढे वाढी ॥ मेल्यामागें ॥ १ ॥
सोंवळा होऊन मानवा शिवेना ॥ खाईना पिईना ॥ राजरोस ॥ २ ॥
बेटीव्यवहार शुद्राशीं करीना ॥ उचीष्ट देईना ॥ अंत्यजास ॥ ३ ॥
आर्य ब्राह्मण हा मानवा शोभेना ॥ मार्गास लागेना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२९)

कल्पनेचे देव कोरीले उदंड ॥ रचीले पाखांड ॥ हितासाठीं ॥ १ ॥
किन्नर गंधर्व ग्रंथीं नाचवीले ॥ अज्ञ फसवीले ॥ कुत्रीमानें ॥ २ ॥
निर्लज्य सोवळें त्याचें अधिष्ठान ॥ भोंदीती निदान ॥ शुद्रादीक ॥ ३ ॥
ब्राह्मणांनीं नित्य होऊनी निःसंग ॥ शुद्र केलें नंग ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३०)

ईशें केलें नाहीं तुजसाठीं सर्व ॥ करूं नको गर्व ॥ प्राण्यांमध्यें ॥ १ ॥
देह देऊनीयां बुद्धिमान केला ॥ धनीपणा दिला ॥ सर्वांमध्यें ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा देह कष्टवावा ॥ कारणीं लावावा ॥ सत्यासाठीं ॥ ३ ॥
अशा वर्तनानें जन्माचें सार्थक ॥ संतोषी निर्मीक ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३१)

सत्य ज्याचें धैर्य सदय गंभीर ॥ सत्यवादी शूर ॥ मानवंत ॥ १ ॥
जितेंद्रियें ज्याचीं मानवा भूषण ॥ सद्‌गुणी संपन्न ॥ सर्व कामीं ॥ २ ॥
परं सुखःदुख स्वतःशीं तोलीतो ॥ सर्वांशीं वर्ततो ॥ एकभावें ॥ ३ ॥
अशा मानवास म्हणावा सज्जन ॥ जोतीबा चुंबन ॥ घेई त्याचें ॥ ४ ॥

## ॥ आत्मपरीक्षण ॥

(१)

परा लाभ होतां संतोष मानीतो ॥ साह्य देतो घेतो ॥ सद्गुणाचें ॥ १ ॥
विद्वान करीतो पंगु जगाप्रत ॥ पाळी सदा व्रत ॥ घरामध्यें ॥ २ ॥
'आपल्यावरून जग ओळखतो' ॥ मानवा लेखी तो ॥ बंधूपरी ॥ ३ ॥
आत्मपरीक्षण करीतो जगांत ॥ धन्य मानवंत ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

जगामाजीं सर्व मजला असावें ॥ शेजाऱ्या नसावें ॥ हेवा मुळ ॥ १ ॥
स्वतः हितासाठीं तळमळ करी ॥ झटे सर्वोपरी ॥ किर्तीसाठीं ॥ २ ॥
खरा मतलबी सर्वांत वर्ततो ॥ निराशा करीतो ॥ बापड्यांची ॥ ३ ॥
आत्मपरिक्षेला नाहीं जुमानीत ॥ झुरे विषादांत ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

निर्मीकें निर्मीले मनुज सकळ ॥ दिलें बुद्धीबळ ॥ कमजास्ती ॥ १ ॥
बुद्धिप्रामाण्यानें उद्योगा लागती ॥ यश मिळविती ॥ धंद्यामध्यें ॥ २ ॥
शिपायाचे धंदे आर्याजीनें केले ॥ क्षुद्रास जिंकीलें ॥ शस्त्रेंअस्त्रें ॥ ३ ॥
पिढीजादा त्यांचे दास बनविले ॥ सूड उगविले ॥ सर्व कामीं ॥ ४ ॥
शूर भिल्ल कोळी शरानें तोडीले ॥ हाकलून दिले ॥ रानींवनीं ॥ ५ ॥

मांग महाअरी केले बहु जेर ॥ शिक्षा खडतर ॥ आर्याजींची ॥ ६ ॥
वेदा मनु नाहीं आत्मपरिक्षण ॥ आर्यास दुषण ॥ जोती म्हणे ॥ ७ ॥

(४)

आर्याजीनें सर्वा पदच्युत केलें ॥ गर्वानें फुगले ॥ शोधी वेद ॥ १ ॥
निराशा शूद्रांचीं आजतागाईत ॥ गणिले दासांत ॥ त्याजपैकीं ॥ २ ॥
आनंदले मनीं विद्याबंदी केली ॥ घेईना साऊली ॥ अंत्यजाचि ॥ ३ ॥
आर्यें धिक्कारिलें आत्मपरिक्षेला ॥ त्रास हा जिंकिल्या ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

आर्याजीचा हेवा त्रास जिंकिल्यास ॥ लुटी अज्ञान्यास ॥ सर्व कामीं ॥ १ ॥
झाकल्या वेदाचा आधार दावीती ॥ श्रेष्ठत्व ओढीती ॥ स्वतःकडे ॥ २ ॥
मानवांचे हक्क शुद्रा मुख्य दावा ॥ पुरे वेदकावा ॥ ब्रम्हकुट ॥ ३ ॥
किड लागो आर्य आत्मपरिक्षेला ॥ त्रास अंत्यजाला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

आर्यें कांहीं ग्रंथ तर्कानें रचीले ॥ नाहीं ईशा भ्याले ॥ स्वार्थासाठीं ॥ १ ॥
शुद्रादीका घरीं पारायण केलें ॥ त्यास ठकविलें ॥ धर्ममिषें ॥ २ ॥
धंदा न करितां सर्वांस भोंदीलें ॥ भूदेव बनविलें ॥ त्यांचे हेच ॥ ३ ॥
आत्मपरिक्षेला आर्यांनीं त्यागीलें ॥ धर्मलंड झाले ॥ जोती ह्मणे ॥ ४ ॥

(७)

शुद्रादीक सर्व आर्यांनीं भोंदीले ॥ फुंकोनीयां खाल्ले ॥ उंद्रापरी ॥ १ ॥
सर्व गोष्टीमध्यें अमर्यादा केली ॥ घेई ना सावली ॥ जेवतांना ॥ २ ॥
अशा वर्तनानें भिईना मनाला ॥ लाजेना मनाला॥ मनीं दंड ॥ ३ ॥
सदा मनीं द्वेष अपराधी खळ ॥ नाहीं त्यास बळ ॥ सद्गुणाचें ॥ ४ ॥
आत्मपरिक्षण हद्पार करी ॥ काळें पाणी जारी ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(८)

मांग आर्यांमध्यें पाहूं जातां खूण ॥ एक आत्मा जाण ॥ दोघांमध्यें ॥ १ ॥
दोघेही सारीखे सर्व खाती पिती ॥ इच्छा ती भोगीती ॥ सारखेच ॥ २ ॥
मांग आर्य दोघे शोभा मानवांत ॥ दोघे वर्तनांत ॥ एकसहा ॥ ३ ॥
सर्व ज्ञानामध्यें आत्मज्ञान श्रेष्ठ ॥ कोणी नाहीं भ्रष्ट ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

तेथे कैचा देश धर्म जातीभेद ॥ सर्वांची उमेद ॥ सुखासाठीं ॥ १ ॥
सुखापोटीं मोह उत्पन्न तो झाला ॥ पिडी सर्वत्राला ॥ एकसहा ॥ २ ॥
मानवाचा मोह हेवा खास त्याला ॥ रक्तपाती झाला ॥ जगामाजीं ॥ ३ ॥
आपस्वार्थामध्यें आत्मज्ञान भ्रष्ट ॥ झाले बहु दुष्ट ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

मानवाचे हक्क सर्वांस कळतां ॥ मग कोण त्राता ॥ आर्य भटा ॥ १ ॥
विचारीते झाले सर्व कसे नीच ॥ आर्य कां रे उंच ॥ बळीस्थानीं ॥ २ ॥
विषारी ते वेद अज्ञान्या डसती ॥ बिळांत पळती ॥ सर्पावत ॥ ३ ॥
भांडणें लागतां सर्वांचें वाटोळें ॥ पाखंडे सोहळे ॥ फेका दूर ॥ ४ ॥
येणारें अरिष्ट कसें तरी टाळा ॥ शुद्रादीक गळा ॥ पडा आतां ॥ ५ ॥
वेळ आली आत्मपरिक्षण करा ॥ निर्मीकास स्मरा ॥ जोती म्हणे ॥ ६ ॥

(११)

भ्रष्ट आर्य तुम्ही सद्‌गुणी कां व्हाना ॥ म्लेंच्छा कित्ता घ्याना ॥ जगामाजी ॥ १ ॥
आतां पुरें झालें सोंग भूदेवाचें ॥ धूर्त नट त्याचे ॥ जगीं छीः थूः ॥ २ ॥
शरण जाऊनी त्यांची क्षमा मागा ॥ नाहीं दुजी जागा ॥ तुम्हांसाठीं ॥ ३ ॥
आत्मपरीक्षणा तुम्ही द्यावा थारा ॥ मच्छरा आवरा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१२)

स्वतःच्या न्युन्यता व्यंगें सुधारती ॥ सत्यानें वागती ॥ सर्वांसंगें ॥ १ ॥
माझ्याशीं लोकांनीं जसें बा वर्तावें ॥ तसें मी वर्तावें ॥ जगासंगें ॥ २ ॥
त्यांत दुजाभाव नसावा अंतरीं ॥ मग मौजा मारीं ॥ जगामाजी ॥ ३ ॥
आत्मपरिक्षेंत असावें सावध ॥ जोती करी बोध ॥ धूर्त लोकां ॥ ४ ॥

(१३)

जरी तुझी सुखालागीं तळमळ ॥ तरी पाठबळ ॥ सत्य घेई ॥ १ ॥
धैर्यानें वागावें सत्य आळवून ॥ सुखी करा जन ॥ जगामाजीं ॥ २ ॥
मग तूं अवघाची सुखरूप होशी ॥ तरून तारशी ॥ दुसऱ्यास ॥ ३ ॥
खरें हेंच ज्ञान आत्मपरिक्षण ॥ बुद्धीचें लक्षण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ नीति ॥

### (१)

निर्मीले बांधव स्त्रीपुरुषप्राणी ॥ त्यांत गोरे कोणी ॥ रंगवर्ण ॥ १ ॥
त्यांचे हितासाठीं बुद्धिमान केले ॥ स्वतंत्र ठेविले ॥ ज्या त्या कामीं ॥ २ ॥
कोणास न पिडी कमावलें खाई ॥ सर्वां सुख देई ॥ आनंदांत ॥ ३ ॥
खरी हीच नीती मानवाचा धर्म ॥ बाकीचे अधर्म ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

### (२)

माझें कांहीं कोणी घेऊं नये जनीं ॥ वसे ध्यानींमनीं ॥ मानवांच्या ॥ १ ॥
माझ्या मनीं सर्व मजला असावें ॥ दुज्या कां नसावें ॥ जगामाजी ? ॥ २ ॥
आपल्यावरून जग ओळखावें ॥ त्यांच्याशीं वर्तावें ॥ सत्य तेंच ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य नीती खूण ॥ करी जीवदान ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

### (३)

सत्याविण नाहीं धर्म तो रोकडा ॥ जनांशीं वांकडा ॥ मतभेद ॥ १ ॥
सत्य सोडूं जातां वादामध्यें पडे ॥ बुद्धीस वांकडे ॥ जन्मभर ॥ २ ॥
सत्य तोच धर्म करावा कायम ॥ मानवा आराम ॥ सर्व ठायीं ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य हीच नीती ॥ बाकीची कुनीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

### (४)

आपहितासाठीं सत्यानें वर्तावें ॥ सुमार्गी लावावें ॥ भावंडास ॥ १ ॥
तुझी वर्तणूक आधीं कर नीट ॥ दुर्गुणाचा वीट ॥ खरें सुख ॥ २ ॥
मानवी सुखास वाटेकरी होती ॥ फळास भोगीती ॥ सर्वांसह ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य खरी नीती ॥ बाकीची कुनीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

### (५)

तुझे हितासाठीं जगीं सत्य धर ॥ निर्मीक आधार ॥ सर्व ठायीं ॥ १ ॥
आपपर नाहीं देशधर्मकुट ॥ करवावा वीट ॥ सत्यासाठीं ॥ २ ॥
मानवी भूषण तूंच होशी खास ॥ सर्वांचा पडोसा ॥ जगामाजीं ॥ ३ ॥
मानवी नीती हीच धर्मनीती ॥ बाकीची कुनीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

खोटें बोलूनीयां अज्ञान्या पिडणें ॥ लुटूनियां खाणें ॥ भावंडास ॥ १ ॥
विश्वासघातानें मित्रास नाडणें ॥ नव्हेत लक्षणें ॥ सज्जनांचीं ॥ २ ॥
धंदा कलालाचा कुटुंबा पोसणें ॥ मद्यपी करणें ॥ मुलींमुलां ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य खरी नीती ॥ बाकीची कुनीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

प्रामाणीकपणा ज्याचे असे पोटीं ॥ दावितो सचोटी ॥ सर्व जना ॥ १ ॥
कृतज्ञ होऊन मानवा संभाळ ॥ निर्मीकाचें बळ ॥ तुजवरी ॥ २ ॥
नम्र होऊनीयां रक्षा सौजन्यास ॥ झटा उद्योगास ॥ निशीदिनीं ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य सर्व नीती ॥ बाकी कुरापती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ धीर ॥

(१)

सत्याचा जिव्हाळा मनाची स्वच्छता ॥ चित्तास स्वस्थता ॥ जेथें आहे ॥ १ ॥
जेथें जागा धीर सदा हृदयांत ॥ सत्यवर्तनांत ॥ खर्चीं घाला ॥ २ ॥
पिडा दुःखें सोशी संकटें निवारी ॥ गांजल्यास तारी ॥ जगामाजीं ॥ ३ ॥
धीर धरूनीयां सर्वां सूख देती ॥ यशवंत होती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

धीर सोडीतांच शुद्रां दास केले ॥ आर्याजी ताठले ॥ ऐश्वर्यांत ॥ १ ॥
भित्रे शुद्र वेडे अज्ञानी बापुडे ॥ आर्य पाईं पडे ॥ लज्या गेली ॥ २ ॥
अज्ञानी म्हणूनी म्लेंच्छाशीं लढले ॥ प्राणाशी मुकले ॥ आर्यांपाईं ॥ ३ ॥
शूर मांगम्हारा आर्यें नागवीलें ॥ पशूवत केले ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

धीर असल्यानें प्रसंग पडतां ॥ निर्धारें वर्ततां ॥ यश येई ॥ १ ॥
निश्चयानें जे कां हिंमत धरीती ॥ संकटें वारीती ॥ जगामाजीं ॥ २ ॥
मोठमोठे गुण दृढ करीं धीर ॥ करीं पुष्ट कर ॥ नीयतींत ॥ ३ ॥
सत्यानें वर्ततां आरिष्टें पळती ॥ देशोधडी जाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

दुष्ट आचारानें मनीं भय वसे ॥ चिंताक्रांत दिसे ॥ मुद्रा त्यांची ॥ १ ॥
नष्ट कर्मं सर्व उघडीं पडतां ॥ होईल फजीती ॥ मनीं भय ॥ २ ॥
सरळ स्वभाव सत्य-आचारण ॥ नसे त्यावांचून ॥ समाधान ॥ ३ ॥
निर्मीकाचें भय घेई जो आधार ॥ खरा त्याचा धीर ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

अंतर निर्मळ भार ईशावर ॥ सत्य वर्तणार ॥ जगामाजीं ॥ १ ॥
धर्म जातीभेद निर्दाळी मनांत ॥ सुखी मानवांत ॥ धन्य तोच ॥ २ ॥
सत्य वर्णण्याचा आर्या नाहीं धीर ॥ धूर्त अगोचर ॥ खरा भंड ॥ ३ ॥
खोटे वेद मनू अंत्यजा दावीना ॥ मैदानी आणीना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ समाधान ॥

(१)

प्राणीमात्रा सर्व निर्मीली ॥ साधने ती दिली ॥ परोपरी ॥ १ ॥
पदार्थ निर्मून सर्वांस पोशीले ॥ आनंदीत केले ॥ सर्वकाळ ॥ २ ॥
त्यांपैकीं मानव बुद्धीमान केला ॥ सत्य वर्तायाला ॥ मासल्यांत ॥ ३ ॥
रंजलेगांजले अनाथा पोसावें ॥ प्रितीनें वागावें ॥ बंधूपरी ॥ ४ ॥
त्याच्या खटाटोपी आणा ध्यानीं मनीं ॥ उपकार मनीं ॥ जिवेंभावें ॥ ५ ॥
परपिडा देणं मानवा दुषण ॥ कळीचें साधन ॥ जगामाजीं ॥ ६ ॥
कृतज्ञ होऊनी मानी समाधान ॥ तृप्तीची ती खूण ॥ जोती म्हणे ॥ ७ ॥

(२)

हेळसांड करी नियतवृत्तीची ॥ मात दुर्गूणांची ॥ संसारांत ॥ १ ॥
रोगग्रस्त होतां दांतओठ खाती ॥ तेव्हां खवळती ॥ मनामधीं ॥ २ ॥
सरकारावर व्यर्थ रागावती ॥ स्नेहास निंदीती ॥ कधींमधीं ॥ ३ ॥
समाधान नष्ट जातें बुद्धीबळ ॥ व्यर्थ तळमळ ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

माझीच योग्यता जास्ती आहे म्हणे ॥ दावी धीटपणें ॥ अज्ञान्यास ॥ १ ॥
अजागळी नाहीं दुध किंवा मुत्र ॥ मोक्ष वेदांतांत ॥ आहे म्हणे ॥ २ ॥

मूढा लुटूनीयां प्रपंच करिती ॥ जगीं हुंबरती ॥ झालों मुक्त ॥ ३ ॥
त्याला कैचें सुख समाधान सौख्य ॥ पापी हेच मुख्य ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

आपली योग्यता नाहीं सद्‌गुणांत ॥ आणीना मनांत ॥ जसा मेंढा ॥ १ ॥
आत्मज्ञान नाहीं मुल कलालाचा ॥ धंदा खाटकाचा ॥ ज्ञान सांगे ॥ २ ॥
समाधान त्यानें केलें हद्‌पार ॥ करा बोजवार ॥ शांततेचा ॥ ३ ॥
त्यास मुळीं नाहीं निर्मीकाची भीती ॥ अज्ञान्या नाहीं ती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

नष्ट आचारानें रोगग्रस्त होती ॥ संताना नाडिती कांहीं वेळ ॥ १ ॥
कल्पून प्राक्तन त्यास दोष देती ॥ शिमगा करीती ॥ त्याच्या नांवें ॥ २ ॥
प्राक्तनांत होतें तैसेंच घडलें ॥ ब्रम्हयानें लिहिलें ॥ खोटें नाहीं ॥ ३ ॥
अयोनीसंभव निर्मी नारायण ॥ खोटें समाधान ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

स्वर्गाची शांतता कल्पून मनांत ॥ लिहिली ग्रंथांत ॥ तर्कबळें ॥ १ ॥
कोठें आहे स्वर्ग पाहिले ते कोणी ॥ भिऊं नका मनीं ॥ दावा आम्हा ॥ २ ॥
तुम्हावर प्रश्न दोरेवाले दादा ॥ पेटूं नका वादा ॥ आर्यदादा ॥ ३ ॥
खोटें बोलणाऱ्या समाधान नाहीं ॥ शोधूनीयां पाहीं ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

जशीं ज्यांचीं कर्मे तशीं फळें देती ॥ वळण लावीती ॥ संतानास ॥ १ ॥
दुष्ट कर्मे तुम्ही अजीबाद टाका ॥ पुढें नाहीं धोका ॥ मुलांबाळां ॥ २ ॥
झालें गेलें सर्व मनीं झुरूं नका ॥ सत्यकर्मी विका ॥ आपुल्यास ॥ ३ ॥
खरें समाधान भोगा सावकाश ॥ आनंद जगास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

असंतोष राजा मच्छर प्रधान ॥ शिपाई दुर्जन ॥ कडीकोट ॥ १ ॥
हेवा चोपदार मारीती किंकाळी ॥ द्यावे म्हणे बळी ॥ सद्‌गुणास ॥ २ ॥
अज्ञानी रयत दारूबाज करी ॥ तंटे घरीं दारीं ॥ सुख नाहीं ॥ ३ ॥
अशा वर्तनानें नाहीं समाधान ॥ खरे हे पाषाण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

दुष्ट आचारानें निचत्व पावती ॥ संकटीं पडती ॥ लागलीच ॥ १ ॥
पश्चात्तापाअंतीं विचार करीती ॥ शुद्धीवर येती ॥ मनामध्यें ॥ २ ॥
सुमार्गीं लागतां होती महाजन ॥ होतसे कल्याण ॥ पदोपदीं ॥ ३ ॥
समाधान वृत्ती ज्याची अखंडीत ॥ सुखांत मंडीत ॥ जोती म्हणे ॥४ ॥

(१०)

समाधान वृत्ती ज्याची अखंडीत ॥ संकटीं पडीती लागलीच ॥ १ ॥
सत्य पाठबळ मनी दृढभाव ॥ करी धावाधाव ॥ दीनासाठीं ॥ २ ॥
भल्या सॉक्रेटीसा विष त्या पाजीलें ॥ छळूनी मारिलें ॥ द्वेषाभावें ॥ ३ ॥
समाधान ज्याचा भंग झाला नाहीं ॥ ग्रंथांतरीं पाहीं ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ सहिष्णुता ॥

(१)

विपत्तींत खंती मुळींच मानीना ॥ हिमतीचा राणा ॥ क्रोधावीण ॥ १ ॥
रोगग्रस्त होता संतापा पेटेना ॥ घरांत करीना ॥ कुरकूर ॥ २ ॥
अहीत कृत्यांची हेळणा करीना ॥ उपाय योजीना ॥ सुडासाठीं ॥ ३ ॥
त्यास उपदेश करीतां सोडीना ॥ वादास पेटेना ॥ त्यांच्या संगें ॥ ४ ॥
सहिष्णुतावीण सुखास भोगीना ॥ संतोषी होईना ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(२)

इराणी भटजी बळीस्थानीं आले ॥ क्षत्रीया जिंकीलें ॥ द्रव्यलोभ ॥ १ ॥
वेदामध्यें आहे त्याचा मागमुद्या ॥ शिपायाचा धंदा ॥ आर्यं केला ॥ २ ॥
जिंकील्या मानवा स्पर्शी बंदी केली ॥ घेई ना सावली ॥ द्वेषबुद्धी ॥ ३ ॥
विद्या बंद केली अज्ञानीं ठेवीलें ॥ लंड धनी झाले ॥ लुटमाप ॥ ४ ॥
सहिष्णुता खरी मांगमहाराची ॥ फजीती आर्यांची ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(३)

दुष्ट वर्तनानें नष्ट कर्मी होती ॥ संकटें भोगीती ॥ क्लेशासह ॥ १ ॥
दुःख क्लेश होतां देवा दोष देती ॥ निर्मीका निंदीती ॥ सर्वोपरी ॥ २ ॥
जन्ममृत्यूसह सुखदुःख देता ॥ कर्ताकरविता ॥ त्याची लिला ॥ ३ ॥

केलीं दुष्ट कर्मे सांगण्यास भीती ॥ देवाची फजीती ॥ करी मुळ ॥ ४ ॥
सहिष्णुता नाहीं अशा सोंगाड्यास ॥ खऱ्या नास्तीकास ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(४)

मानव सारिखे निर्मीकें निर्मीले ॥ कमी नाहीं केले ॥ कोणी एक ॥ १ ॥
कमी जास्ती बुद्धी मानवा वोपीली ॥ कोणा नाहीं दिली ॥ पिढीजादा ॥ २ ॥
शुद्रादीक नाहीं कशामध्यें उणा ॥ अवयवीं खुणा ॥ आर्यापरी ॥ ३ ॥
मानवाचे हक्क ते कां विसरले ? ॥ अति शुद्र झाले ॥ पशुवत ॥ ४ ॥
शुद्र केव्हां झाले आर्यांचे दास ॥ बाकी अनुदास ॥ कसे झाले ॥ ५ ॥
आर्यलोभ मूळ तंट्याचें कारण ॥ ग्रंथ तपासून ॥ पाहूं जातां ॥ ६ ॥
मूळ धर्मभेद मानवा नसावा ॥ एकोपा असावा ॥ जगामाजी ॥ ७ ॥
सार्वत्रीक सत्य ग्रंथ रचीयेला ॥ त्यास छापण्याला ॥ द्रव्य तुटा ॥ ८ ॥
शुद्रादीक-किंव येतांच मानवा ॥ देशस्थ बांधवा ॥ मर्दापरी ॥ ८ ॥
ग्रंथ छापण्याची केली सुरवात ॥ प्रती वीस शत ॥ एकदम ॥ १० ॥
विक्री झाल्यावर दाम घेणें बोली ॥ टोंचणी ही दिली ॥ चिकू शुद्रां ॥ ११ ॥
मोरो विट्ठल वाळवेकर धेंड ॥ सहिष्णू अखंड ॥ मुंबापुरीं ॥ १२ ॥
सदसद्विवेकी सुबोधाचा दाता ॥ गृहिणीचा पिता ॥ जोतीमित्र ॥ १३ ॥

(५)

थोडे दीन तरी मद्य वर्ज करा ॥ तोच पैसा भरा ॥ ग्रंथासाठीं ॥ १ ॥
ग्रंथ वाचीतांना मनीं शोध करा ॥ देऊं नका थारा ॥ वैरभावा ॥ २ ॥
खोट्या धर्मा नाहीं सत्याचा आधार ॥ व्यर्थ बडीवार ॥ स्वार्थासाठीं ॥ ३ ॥
सत्य सोडूनीयां धर्मवादी होती ॥ संग्रामीं करीती ॥ रक्तपात ॥ ४ ॥
लढण्याचा कित्ता संताना घालीती ॥ पिढीजादा देती ॥ दुःख जगा ॥ ५ ॥
सहीष्णुतेवीण नाहीं समाधान ॥ एकीस बंधन ॥ जोती म्हणे ॥ ६ ॥

## ॥ सद्विवेक ॥

(१)

दृढ मनीं धरीं सद्विवेकास ॥ तेंच संतानास ॥ सुख देई ॥ १ ॥
जगहितासाठीं सत्यानें वर्तती ॥ हित ते करीती ॥ स्वतःचेही ॥ २ ॥
आपहितासाठीं मुढा नाडूं जातां ॥ त्यानें तसें होतां ॥ मग कसें ? ॥ ३ ॥
सद्विवेकानें तुम्ही करा न्याय ॥ नसे पुढें भय ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

विवेकी करीना जप अनुष्टानें ॥ पोकळ अर्पण ॥ निर्मीकास ॥ १ ॥
विवेकी छळीना दीन रंडक्यांना ॥ त्यांस भादरीना ॥ न्हाव्या हातीं ॥ २ ॥
विवेकी भजेना धातू दगडास ॥ म्हणेना शुद्रास ॥ तुम्ही नीच ॥ ३ ॥
सद्विवेकावीण करीत तळमळ ॥ पाखांडी निव्वळ ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

पशुहिंसा आहे अस्सल वेदान्त ॥ पुण्य गौवधांत ॥ धूर्त म्हणे ॥ १ ॥
शुद्रादीकास साक्ष भ्या मनूची ॥ चैन ब्राह्मणाची ॥ बळीस्थानीं ॥ २ ॥
मनु धिःकारूनी एकीकडे फेका ॥ माना शूद्रादीकां ॥ बंधूपरी ॥ ३ ॥
सद्विवेकावीण आर्याजी पाषाण ॥ कलीचें रक्षण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

आर्यें जेरदस्त मांगम्हारा केलें ॥ पाताळीं घातलें ॥ स्पर्शबंदी ॥ १ ॥
धूर्त ऋषीजींनीं वेदास रचीलें ॥ द्वेषानें छळीलें ॥ सिमा नाहीं ॥ २ ॥
अन्नावीण बहु उपासानें मेले ॥ उष्टें नाहीं दिलें ॥ हेवा मूळ ॥ ३ ॥
सद्विवेकास आर्यांनीं त्यजिलें ॥ त्यांचे हाल केले ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

बंधु आर्य राया दयावान व्हावा ॥ जाळून टाकावा ॥ मनुग्रंथ ॥ १ ॥
वेदांती म्हणतां तुम्हा कैचा भेद ॥ लावा पाहूं दाद ॥ मनुज्यांची ॥ २ ॥
सांडुं नका खिस्ती मुसलमानास ॥ मांगामहारास ॥ शुद्रासह ॥ ३ ॥
निर्धारानें धरीं सद्विवेकास ॥ कित्ता संतानास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

बंधु सद्विवेकास बहु विसरती ॥ धर्मास कल्पीती ॥ घरोघर ॥ १ ॥
मानवांचा धर्म एक तो कोणता ॥ जगीं शोधूं जातां ॥ बहु धर्म ॥ २ ॥
जो तो म्हणे माझा धर्म श्रेष्ठ ॥ गर्वानें फुगला ॥ जगामाजी ॥ ३ ॥
कोणत्या धर्मास जगीं थारा द्यावा ॥ संसारीं पाळावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

वेद मनुग्रंथ घरीं लपविले ॥ म्लेंच्छा फसविले ॥ मोघमांत ॥ १ ॥
त्यांचें ब्रह्मकुट इंग्लिशें शोधीलें ॥ बाहेर काढीलें ॥ छीः थूः केली ॥ २ ॥

मांग महाअरी वाढपे करीती ॥ मोठे हुद्दे देती ॥ फौजेमध्यें ॥ ३ ॥
इंग्लीश स्मरती सद्विवेकास ॥ काळीमा आर्यास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

अंत्यजांनो, तुम्ही उपकार स्मरा ॥ पोटीं गच्च धरा ॥ इंग्लिशास ॥ १ ॥
आर्यहितासाठीं न्याशनल सभा ॥ शुद्रादीका शोभा ॥ कशी राहे ॥ २ ॥
गोऱ्या लोकां ध्यावें सभेमध्यें जावें ॥ हाणून पाडावें ॥ ब्रह्मकुट ॥ ३ ॥
मर्दुमकीनें रक्षा सद्विवेकास ॥ सौख्य मानवास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

वेळ आल्यावर कळ चेतवीती ॥ मुढा लढविती ॥ पक्के धूर्त ॥ १ ॥
हितासाठीं कांहीं करी करामत ॥ धिंगाणा राज्यांत ॥ शुद्रतोटा ॥ २ ॥
प्रसंग पडतां शुद्र तोंडीं देती ॥ अनुष्टानी होती ॥ पक्के धूर्त ॥ ३ ॥
नित्य त्यांची जे कां संगत धरीती ॥ फजीत पावती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

कलालाचा धंदा नाहीं दयाशांती ॥ उघड नाडीती ॥ जोशापरी ॥ १ ॥
वकलाचा धंदा झिंगल्या गांठीती ॥ नाच त्या करीती ॥ त्यांच्यापुढें ॥ २ ॥
गायन करून त्यास रिझविती ॥ घरीं रडवीती ॥ अंगनांस ॥ ३ ॥
सद्विवेकावीण मुढ दारू पिती ॥ मुला कित्ता देती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

जगामाजी धर्म अगणीत होती ॥ लढाया खेळती ॥ रेड्यापरी ॥ १ ॥
रेडे धरणारे प्राणास मुकती ॥ कित्येक म्हणती ॥ स्वर्गीं गेले ॥ २ ॥
कोणी म्हणे सर्व मार्टर झाले ॥ जन्नतीस गेले ॥ कोणी म्हणे ॥ ३ ॥
सद्विवेकावीण सर्व भांबावले ॥ रक्तपाती झाले ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ उद्योग ॥

(१)

मानवा उद्योग अनेक आहेत ॥ बऱ्यावाईटांत ॥ काळ जातो ॥ १ ॥
आपहितासाठीं उद्योग करीती ॥ मार्ग दावीताती ॥ संतानास ॥ २ ॥
त्यापैकीं आळशी दुष्ट दुराचारी ॥ जन वैरी करी ॥ सर्व काळ ॥ ३ ॥
जसा ज्याचा धंदा तशीं फळें येती ॥ सुखदुःखी होती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

सत्य उद्योगानें रोग लया जाती ॥ प्रकृती ती होती बळकटा ॥ १ ॥
उल्हासीत मन झटे उद्योगास ॥ भोगी संपत्तीस ॥ सर्वकाळ ॥ २ ॥
सदाचार सौख्य त्याची सेवा करी ॥ शांतता ती वरी ॥ आवडीनें ॥ ३ ॥
नित्य यश देई त्याच्या उद्योगास ॥ सुख सर्वत्रांस ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

उद्योग जो करी दीनबंधूसाठीं ॥ ममता ती पोटी ॥ मानवाच्या ॥ १ ॥
विद्या सर्वां देई सद्गुणाची हाव ॥ करी नित्य कींव ॥ अज्ञान्याची ॥ २ ॥
थकल्या भागल्या दीना साह्य करी ॥ उद्योगास सारी ॥ जपूनीयां ॥ ३ ॥
त्याच्या उद्योगास नित्य यश देई ॥ जगा सुख देई ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

सर्व दुर्गूणांचा आळस हा पिता ॥ बाळपणीं कित्ता ॥ मुलीमुलां ॥ १ ॥
तरुणपणांत दुर्गूणि संसारीं ॥ वृद्धपणीं करी ॥ हाय हाय ॥ २ ॥
उद्योगा सोडूनी कलाल बनती ॥ शिव्याश्राप देती ॥ जनामाजी ॥ ३ ॥
आळशास सुख कधींच होईना ॥ शांतता पावेना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

धनाढ्य आळशी जुव्वेबाज होती ॥ चोरून खेळती ॥ एकीकडे ॥ १ ॥
डाव जिंकितांच बक्षीसें वेश्यांस ॥ खाऊ चोंबड्यांस ॥ सर्वकाळ ॥ २ ॥
द्रव्य हरतांच शेतावर पाळी ॥ सर्व देई बळी ॥ घरासह ॥ ३ ॥
सर्व ऋतूमध्यें फिरे नंगा भुका ॥ मारीतसे हांका ॥ पोटासाठीं ॥ ४ ॥
आळशाचा धंदा निःसंग बा होती ॥ भिक्षेस लागती ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(६)

आळशांचा धंदा उद्योग करीती ॥ दुकान मांडिती ॥ सोरटीचें ॥ १ ॥
नांवनिशी नाहीं पैशे देई त्यांची ॥ आदा आढाव्याची ॥ देत नाहीं ॥ २ ॥
उचल्याचे परी मुढास नाडीती ॥ तमाशा दावीती ॥ उद्योग्यास ॥ ३ ॥
अशा आळशाची शेवटीं फजीती ॥ धूळमाती खाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

रोजगारासाठीं पैसा नसे गांठीं ॥ अज्ञान्यास गांठी ॥ नफा हल ॥ १ ॥
शेर घेणाऱ्यास गळीं भाल दोरी ॥ पावतींत सारी ॥ जडीबुट्टी ॥ २ ॥

पैशे बुडाल्यास नाहीं त्यास दाद ॥ सुका आशीर्वाद ॥ भटासाठीं ॥ ३ ॥
उचल्याच्या परी खिसे कातरीती ॥ तोंड लपवीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

शेअरमार्किटांत खप कागदाचा ॥ नफा दलालाचा ॥ बुड धन्य ॥ १ ॥
शेअरकागदास पाहूनी रडती ॥ शिव्याशाप देती ॥ योजी त्यास ॥ २ ॥
शेअर व्यापाराचा जळो तो उद्योग ॥ होऊनी निःसंग ॥ गुढा लुटी ॥ ३ ॥
आळशाचा खरा नित्य हाच धंदा ॥ दुरूनच वंदा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

सधन जगांत मारूनियां गप्पा ॥ देई व्यर्थ थापा ॥ पैसा लुट ॥ १ ॥
द्रव्यलोभासाठीं शेतास काढीती ॥ जल हाटवीती ॥ सागराचें ॥ २ ॥
जगामधीं ठक धनवान होती ॥ दिवाळें काढीती ॥ अखेरीस ॥ ३ ॥
त्याच्या संगतीनें द्रव्यहीन होती ॥ प्राणास मुकती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

शेअर्स काढून उद्योग काढणें ॥ हिशेब ठेवणें ॥ रोजकीर्द ॥ १ ॥
खतावणी सर्व बिनचुक ठेवी ॥ नफातोटा दावी ॥ शोधी त्यास ॥ २ ॥
जामीन देऊन नितीनें वर्तावें ॥ सर्वा वांचवावें ॥ अब्रूमध्यें ॥ ॥ ॥
शेअर्स विकुं गेल्या कांहीं नफा व्हावा ॥ जगा दाखवावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

आळशाचा धंदा उद्योग काढीती ॥ भिंतीस फोडीती ॥ मध्यरात्रीं ॥ १ ॥
जाईल तितकी चोरी ते करीती ॥ मुकाट्यानें जाती ॥ घरांतून ॥ २ ॥
दुष्ट नष्ट गूण अंगीं जडताती ॥ सर्पवत होती ॥ जगा त्रास ॥ ३ ॥
त्यांच्या उद्योगास येत नाहीं यश ॥ रागावतो ईश ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ स्वच्छता ॥

(१)

स्वच्छ होण्यासाठीं स्नान तें करावें ॥ वस्त्रांनीं पुसावें ॥ लागलेंच ॥ १ ॥
स्नानाचा कंटाळा ॥ पुळ्यांचे माहेर ॥ खरजुचें घर ॥ आदीपीठ ॥ २ ॥

दांत खाऊनीयां बोलतां चालतां ॥ नित्य खाजवीतां ॥ वेळ जाई ॥ ३ ॥
स्वकीय स्वच्छता मुळीं विसरला ॥ वैद्यानें नाडीला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

अंगवस्त्रें ज्यास धुण्याचा कंटाळा ॥ चोळी वेळोवेळां ॥ दोन्ही काखा ॥ १ ॥
दांत विंचकूनी जांघास चोळी ॥ काढीतांच मळी ॥ गार वाटे ॥ २ ॥
वस्त्रांतील उवा चिमटीनें धरी ॥ चोळूनियां मारी ॥ मुकाट्यानें ॥ ३ ॥
अंगवस्त्रें स्वच्छ ठेऊं विसरतो ॥ निंदे पात्र होतो ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

स्नान केल्यावर उल्हास मनास ॥ झटे उद्योगास ॥ आवडीनें ॥ १ ॥
रुचीकर लागे जाडेंभर्डें अन्न ॥ होईना अजीर्ण ॥ कधीं त्यास ॥ २ ॥
स्पर्शरोग त्यास होण्याचा अभाव ॥ मनाचा संभव ॥ सर्व ठायीं ॥ ३ ॥
शरीरीं स्वच्छता ठेऊं विसरतो ॥ सुख ना भोगीतो ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

वस्त्रें धुतल्यानें ज्यास्त तीं टिकती ॥ संतोषी ठेविती ॥ वापणाऱ्या ॥ १ ॥
धुळीसह घाम वस्त्रें कुजविती ॥ दुर्गंधी सोडीती ॥ घ्राणेंद्रिया ॥ २ ॥
दुर्गंध येतांच किळस करती ॥ दुरून वागती ॥ त्यांच्यासंगें ॥ ॥ ॥
वस्त्राची स्वच्छता ठेऊं न जाणती ॥ रोगग्रस्त होती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

निर्मीकें निर्मीले मानव पवित्र ॥ कमीजास्त सुत्र ॥ बुद्धीमध्यें ॥ १ ॥
पिढीजाद्य बुद्धि नाहीं सर्वांमधीं ॥ शोध करा आधीं ॥ पुर्तेपणीं ॥ २ ॥
सत्य सेवूनीयां चित्त करीं स्वच्छ ॥ मग मान तुच्छ ॥ मानवास ॥ ३ ॥
मनाची स्वच्छता नाहीं समजला ॥ भूमीभार झाला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ गृहकार्यदक्षता ॥

(१)

आद्यापेक्षां जास्त खर्च जे करीती ॥ ऋणकरी होती ॥ जिवा कांच ॥ १ ॥
सोयरेधायरे मागें पुढें येती ॥ तुकडे मोडीती ॥ दिमाखानें ॥ २ ॥

मतलबी स्नेही रसाळ बोलती ॥ भोंदुनीयां खाती ॥ संधी येतां ॥ ३ ॥
गृहकार्यदक्ष होऊं विसरला ॥ चोंबड्यांनीं खाल्ला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

सर्व ठायीं दक्ष असे परिमीत ॥ तोच सुरक्षीत ॥ जगामाजी ॥ १ ॥
सत्संगती निरोगी संतती ॥ फळती विपत्ती ॥ रानोमाळ ॥ २ ॥
मेल्यामागें कोणी दोषी ठरवीना ॥ आनंद संताना ॥ चीर केला ॥ ३ ॥
गृहकार्यदक्ष सर्वदा जपला ॥ मान निर्मिकाला ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

# विभाग २ रा

## गणपती

### १

पशुशिरीं सोंड पोर मानवाचें ॥ सोंग गणोबाचें ॥ नोंद ग्रंथी ॥ धृ० ॥
बैसे उंदरावरी टेवूनियां बूड ॥ फुकितो शेंबूड ॥ सोंडेंतून ॥ १ ॥
अंत्यजासी दूर, भटा लाडू देतो ॥ नाकानें सोलीतो ॥ कांदे गणू ॥ २ ॥
चिखला तुडवूनी बनविला मोऱ्या ॥ केला ढंवुढेऱ्या ॥ भाद्रपदीं ॥ ३ ॥
+++ +++ ++ वांचून ॥ करवी भ्रमन ॥ सर्व लोकीं ॥ ४ ॥
++++++ चंद्र हांसला म्हणून ॥ श्रापवरदान ॥ पाहील्यास ॥ ५ ॥
+++ ++ चंद्रास पाहीलें ॥ अस्वली वरीलें ॥ कृष्णदेवें ॥ ६ ॥
++++ वला गणुजी दोंदीला ॥ नोवरा मिळाला ॥ देवबाप्पा ॥ ७ ॥
गणोबाची पूजा भात्रीका दाविती ॥ हरामाच्या खाती ॥ तूपपोळ्या ॥ ८ ॥
जै मंगलमूर्ती जै मंगलमूर्ती ॥ गाती नित्य किर्ती ॥ टाळ्यांसह ॥ ९ ॥
उत्सवाच्या नांवें द्रव्य भोंदाडीती ॥ वाटी खिरापती ॥ धूर्त भट ॥ १० ॥
जतिमारवाडी गरीबा नाडिती ॥ देऊळें बांधीती ॥ कीर्तीसाठीं ॥ ११ ॥
देवाजीच्या नांवें जगाला पीडीती ॥ अधोगती जाती ॥ निश्चयानें ॥ १२ ॥
खरे देवभक्त देह कष्टवीती ॥ पोषण करीती ॥ घरच्यांचें ॥ १३ ॥
अजाणासी ज्ञान पांगळ्या अन्नदान ॥ हेंच वा स्मरण ॥ निर्मीकाचें ॥ १४ ॥
भोळा वारकरी त्यास दिली हूल ॥ स्मरणांत फल ॥ आहे म्हणे ॥ १५ ॥
क्षत्रीय रामाचा धूर्त वने दास ॥ गांठी शिवाजीस ॥ मतलबी ॥ १६ ॥
दादु कोंडदेव त्या टेवी अविद्वान ॥ करवी तुळादान ॥ ऐदी भटा ॥ १७ ॥
स्वजातिहितासाठीं वोधीलें पाखांड ॥ धर्मलंड खरे जोती म्हणे ॥ १८ ॥

## ॥ आर्य भटब्राह्मणांचें कसब ॥

### (१)

सर्वांचा निर्मीक एक आहे जाण ॥ पाळणपोषण ॥ तोच करी ॥ १ ॥
स्त्रीपुरुष हक्क सर्वां कळवावे ॥ सत्यानें बोधावे ॥ मानवांस ॥ २ ॥

देशधर्मभेद नसावा अंतरीं ॥ भावंडांचे परी ॥ धरी सर्वां ॥ ३ ॥
असे वा शिक्षक सर्व ठाई नेमा ॥ आदीसत्य नमा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

सार्वभौम सत्य ज्याचें भांडवल ॥ निर्मीक अव्वल ॥ सर्व एक ॥ १ ॥
त्यानें निर्मीयले मानव हे सारे ॥ त्यांचींच लेकरें ॥ तोच रक्षी ॥ २ ॥
आपल्यावरून जग ओळखावें ॥ सर्वां निववावें ॥ संसारांत ॥ ३ ॥
जसजसे आम्ही मानवासीं वागूं ॥ त्याचीं फळें भोगूं ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

आर्यांनीं क्षत्रीयां रणांत जिंकीलें ॥ त्यांना दास केलें ॥ पिढीजादा ॥ १ ॥
मत्सरानें दासा म्हणाले ते क्षुद्र ॥ अपभ्रंश शुद्र ॥ त्याचा झाला ॥ २ ॥
द्वेषानें पिडीले विद्या बंद केली ॥ घेईना साऊली ॥ जेवतांना ॥ ३ ॥
अशा पंगु शुद्रा विद्या तुम्ही द्यावी ॥ भिक्षा ती मागावी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

विजयी आर्यांनीं धर्मग्रंथ केले ॥ शुद्रा नागवीलें ॥ दासापरी ॥ १ ॥
धूर्त भटें मुळीं वेद लपविले ॥ पाहूं नाहीं दिले ॥ अंत्यजास ॥ २ ॥
शुद्रादिक म्हणे माझा वेद धर्म ॥ अज्ञानास वर्म ॥ ठावें नाहीं ॥ ३ ॥
वेदांतील वर्म मैदानीं आणावें ॥ जगा दाखवावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

खिस्त सर्व ग्रंथ मैदानीं आणती ॥ वाचून दावीती ॥ स्त्रीपुरुष ॥ १ ॥
भटासह मांगा पोटाशीं धरिती ॥ वेव्हार करीती ॥ रोटीबेटी ॥ २ ॥
त्यांस ठावें सत्य तेंच सिद्ध करी ॥ निववी अंतरीं ॥ सर्व जना ॥ ३ ॥
सर्व खंडीं दावी नातें भावंडाचें ॥ पुत्र निर्मीकाचे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

महंमद म्हणे निर्मीक तो एक ॥ कल्पीना अनेक ॥ जगामाजी ॥ १ ॥
भावंडाचे परी मानवा आळवी ॥ सत्यानें वळवी ॥ ईशासाठीं ॥ २ ॥
देश जातीभेद अजि बुडविले ॥ मूर्तीस फोडीलें ॥ कुभांड्यांच्या ॥ ३ ॥
दास्यत्वापासून बहु मुक्त केले ॥ ईशाकडे नेले ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

ईशें सर्व शुद्र आर्यापरी दिले ॥ कमी नाहीं केलें ॥ कांहीं एक ॥ १ ॥
निर्मीकाची दया इंग्रजा आणलें ॥ भटा धिःकारिलें ॥ सर्वोपरी ॥ २ ॥
आर्य कसे धनी, शुद्र कां हो दास ? ॥ शोधा कृत्रीमास ॥ वेळ हीच ॥ ३ ॥
आतां कां रे तुम्ही विचार कराना ॥ धुर्त धिक्काराना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

शुद्र दीनबंधू शेतांत खपतो ? ॥ कुटुंबा पोषीतो ॥ बैलसह ॥ १ ॥
साऱ्यासह वारी लोकलफंडास ॥ घाली भरतीस ॥ कांहीं धान्य ॥ २ ॥
गोळा सर्व फंड इंग्रज करीती ॥ शाळा ते घालीती ॥ नांवासाठीं ॥ ३ ॥
भट शुद्रा मुला भट खेळवीती ॥ गोऱ्या थापा देती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

अल्लड इंग्रज भटा जागा देती ॥ पंतोजी करीती ॥ गांवोगांवीं ॥ १ ॥
जगद्वेष्टे भट शिक्षक बनती ॥ शुद्रा शिकविती ॥ कृष्णलिला ॥ २ ॥
संधी साधल्यास शिवाजी वर्णिती ॥ मत्सरी करीती ॥ यवनांचे ॥ ३ ॥
देशप्रीती दंभ इंग्रजी निंदीती ॥ गर्वें हुंबरीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

सर्प विंचवांत ब्राह्मण ते दावा ॥ दोरा घालवावा ॥ त्यांच्या गळीं ॥ १ ॥
स्वजाती पिडणें त्यांचे नव्हे कर्मी ॥ करी ना अधर्मी ॥ जातीमध्यें ॥ २ ॥
सर्व मानवांत ब्राम्हण बनला ॥ धिःकारी शुद्राला ॥ अहंपणें ॥ ३ ॥
शुद्रांनीं अर्पावें काठी जोडे दान ॥ आदराची खूण ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

गर्धभी ब्राम्हण कुंभार पाळीती ॥ ओझें ते लादीती ॥ पाठीवर ॥ १ ॥
चुकारू ब्राह्मण टिकोरी मारीती ॥ वेगे चालवीती ॥ मार्गावर ॥ २ ॥
काम झाल्यावर मोकाट सोडती ॥ फुंकूनीया खाती ॥ उकिरडा ॥ ३ ॥
पशूंतील भट अश्वलीद खाती ॥ कुलूली करीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१२)

मानवी ब्राह्मण बंडखोर होती ॥ काळेपाण्या जाती ॥ इंग्रजींत ॥ १ ॥
ब्राह्मणी वकील खोटे स्टँप करी ॥ दगेबाज परी ॥ गोप्या नाडी ॥ २ ॥

भट अभ्यंकरा पाँच पार्टी दिक्षा ॥ गाढवाची शिक्षा ॥ स्वारी देणें ॥ ३ ॥
धूर्त ब्राह्मणाची धिंड मिरवीनी ॥ मस्ती जिरवीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१३)

आर्य ब्राह्मणांत पेशवा वाटोळा ॥ करितो सोहळा ॥ कानपुरीं ॥ १ ॥
स्त्रीपुरुषांसह तान्ह्या अर्भकांस ॥ वधी इंग्रजास ॥ सूडासाठीं ॥ २ ॥
हुके गोळीबार भाल्यानें टोंचवी ॥ तान्ह्यास लोळवी ॥ पिस्तुलानें ॥ ३ ॥
वौंशज हा खरा ब्रह्मराक्षसांचा ॥ पुत सैतानांचा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१४)

चांडाळ ब्राह्मण मांगा दूर धरी ॥ स्वतः पाणी भरी ॥ आडावर ॥ १ ॥
तान्हेनें व्याकूळ जरी मांग मेला ॥ दया ब्राह्मणाला ॥ येत नाहीं ॥ २ ॥
मानवाचे द्वेष्टे गर्व अभिमानी ॥ जगांत दुर्गुणी ॥ कळचेटे ॥ ३ ॥
मांगाचे लग्नांत दक्षणा ते घेती ॥ सोवळ्यानें खाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१५)

धूर्त आर्यभट मत्सरी निःसंग ॥ अहंपणीं दंग ॥ दया नाहीं ॥ १ ॥
मुळचे क्षत्रिय भिल्लासह कोळी ॥ घाली रसातळीं ॥ वैरभावें ॥ २ ॥
भोळ्या इंग्रजांनो, जागे का रे व्हाना ॥ विद्या त्यास द्याना ॥ जगबंधू ॥ ३ ॥
तसें न कराल तर ईशा रागवाल ॥ पश्चात्तापी व्हाल ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१६)

अस्सल क्षत्रीय रणीं जेर केले ॥ हाकलून दिले ॥ अरण्यांत ॥ १ ॥
कंदमुळें फळें भक्षून राहीले ॥ आर्यांनीं पीडीले ॥ बाहेरून ॥ २ ॥
ब्राह्मणाचे वेद मैदानीं आणा ना ॥ वाचून दावा ना ॥ सर्व जगा ॥ ३ ॥
वेदबळावर होती धर्मलंड ॥ कुभांडी अभंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१७)

विष्ठाखाती गाय म्हणे द्विज माता ॥ शुद्रास पीडीतां ॥ पुण्य वाटे ॥ १ ॥
यज्ञामध्यें आर्य घोडेगाया खाती ॥ इंग्रजा निंदिती ॥ म्लेंच्छासह ॥ २ ॥
कल्पनेचा धर्म शुद्रास दावीती ॥ हरामाचें खाती ॥ त्यांचें घरीं ॥ ३ ॥
पशूपेक्षां शुद्र भटा वाटे दुष्ट ॥ स्वतः सत्यभ्रष्ट ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१८)

मुक्या गाया सर्वं इंग्रज बा खाती ॥ विलाप करीती ॥ भटी बोंब ॥ १ ॥
वेदामध्यें नाहीं गाईचा विलाप ॥ घोडे गपागप ॥ आर्य खाती ॥ २ ॥
ब्राम्हणांचे आप्त अंत्यज भावंडां ॥ छळीले उदंड ॥ बळी देतां ॥ ३ ॥
मांगाचा विलाप भटा वाटे गोड ॥ खरे धर्मलंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१९)

व्यभीचारासवें व्यसनी अम्मल ॥ भार्येची अक्कल ॥ गुंग केली ॥ १ ॥
दारूच्या नादांत मुढ खर्च करी ॥ करीतो भिकारी ॥ मुलाबाळां ॥ २ ॥
धूर्त आर्य शुद्रा धर्मथापा देती ॥ उंद्रापरी खाती ॥ फुंकूनीयां ॥ ३ ॥
अशा निद्रिस्तास विद्या कां हो द्याना ॥ भिक्षा ती मागाना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२०)

भट कुळकर्णी शुद्रा चिथवीती ॥ कज्जे लाविताती ॥ गांवोगांवीं ॥ १ ॥
कज्यांच्या नादांत शुद्रा कर्ज देती ॥ भट लांच खाती ॥ सर्वांचीही ॥ २ ॥
विद्याहीन शुद्र ब्राह्मणांनीं केले ॥ सूड उगविले ॥ सर्वकाळ ॥ ३ ॥
अशा विद्या द्यावी जलदी करून ॥ भिक्षेसी मागून ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२१)

न्यॉशनल सभा आर्योजी स्थापिती ॥ सामील करीती ॥ मुढ शुद्रां ॥ १ ॥
बाकी भोळ्या शुद्रा नाडीती जगांत ॥ खाती हॉटेलांत ॥ ब्रह्मबीज ॥ २ ॥
आर्य हितसाधू गोऱ्या चिडवीती ॥ जागा मागताती ॥ जोखमिच्या ॥ ३ ॥
भट अधिकारी द्रव्यास जोडीती ॥ शुद्रा त्रास देती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२२)

स्वतः आर्यभटे कंबरा बांधा ना ॥ क्षमा ती मागा ना ॥ जगापाशीं ॥ १ ॥
शुद्र दासां तुम्ही विद्या बंद केली ॥ घ्या ना ती साऊली ॥ अंत्यजाची ॥ २ ॥
शुद्रादीकां तुम्ही आधीं मुके द्यावे ॥ सत्यानें वागावें ॥ मानवांशीं ॥ ३ ॥
ब्राम्हणांनो, तुम्ही कृतघ्न कां होतां ॥ इंग्रजां निंदितां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२३)

अज्ञानी शुद्रास नादीं लावूं नका ॥ देऊं नका धक्का ॥ यवनास ॥ १ ॥
ब्राह्मणाची जात कृत्रिमी अखंड ॥ छळीले उदंड ॥ शुद्रादीकां ॥ २ ॥

भट अभ्यंकरा पाँच पाटीं दिक्षा ॥ गाढवाची शिक्षा ॥ स्वारी देणें ॥ ३ ॥
धूर्त ब्राह्मणाची धिंड मिरवीनी ॥ मस्ती जिरवीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१३)

आर्य ब्राह्मणांत पेशवा वाटोळा ॥ करितो सोहळा ॥ कानपुरीं ॥ १ ॥
स्त्रीपुरुषांसह तान्ह्या अर्भकांस ॥ वधी इंग्रजास ॥ सूडासाठीं ॥ २ ॥
हुके गोळीबार भाल्यानें टोंचवी ॥ तान्ह्यास लोळवी ॥ पिस्तुलानें ॥ ३ ॥
वौंशज हा खरा ब्रह्मराक्षसांचा ॥ पुत सैतानांचा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१४)

चांडाळ ब्राह्मण मांगा दूर धरी ॥ स्वतः पाणी भरी ॥ आडावर ॥ १ ॥
तान्हेनें व्याकूळ जरी मांग मेला ॥ दया ब्राह्मणाला ॥ येत नाहीं ॥ २ ॥
मानवाचे द्वेष्टे गर्व अभिमानी ॥ जगांत दुर्गुणी ॥ कळचेटे ॥ ३ ॥
मांगाचे लग्नांत दक्षणा ते घेती ॥ सोवळ्यानें खाती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१५)

धूर्त आर्यभट मत्सरी निःसंग ॥ अहंपणीं दंग ॥ दया नाहीं ॥ १ ॥
मुळचे क्षत्रिय भिल्लासह कोळी ॥ घाली रसातळीं ॥ वैरभावें ॥ २ ॥
भोळ्या इंग्रजांनो, जागे का रे व्हाना ॥ विद्या त्यास द्याना ॥ जगबंधू ॥ ३ ॥
तसें न कराल तर ईशा रागवाल ॥ पश्चात्तापी व्हाल ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१६)

अस्सल क्षत्रीय रणीं जेर केले ॥ हाकलून दिले ॥ अरण्यांत ॥ १ ॥
कंदमुळें फळें भक्षून राहीले ॥ आर्यांनीं पीडीले ॥ बाहेरून ॥ २ ॥
ब्राह्मणाचे वेद मैदानीं आणा ना ॥ वाचून दावा ना ॥ सर्व जगा ॥ ३ ॥
वेदबळावर होती धर्मलंड ॥ कुभांडी अभंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१७)

विष्ठाखानी गाय म्हणे द्विज माता ॥ शुद्रास पीडीतां ॥ पुण्य वाटे ॥ १ ॥
यज्ञामध्यें आर्य घोडेगाया खाती ॥ इंग्रजा निंदिती ॥ म्लेंच्छासह ॥ २ ॥
कल्पनेचा धर्म शुद्रास दावीती ॥ हरामाचें खाती ॥ त्यांचें घरीं ॥ ३ ॥
पशूपेक्षां शुद्र भटा वाटे दुष्ट ॥ स्वतः सत्यभ्रष्ट ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१८)

मुक्या गाया सर्व इंग्रज बा खाती ॥ विलाप करीती ॥ भटी बोंब ॥ १ ॥
वेदामध्यें नाहीं गाईचा विलाप ॥ घोडे गपागप ॥ आर्य खाती ॥ २ ॥
ब्राम्हणांचे आप्त अंत्यज भावंडां ॥ छळीले उदंड ॥ बळी देतां ॥ ३ ॥
मांगाचा विलाप भटा वाटे गोड ॥ खरे धर्मलंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१९)

व्यभीचारासवें व्यसनी अम्मल ॥ भार्येची अक्कल ॥ गुंग केली ॥ १ ॥
दारूच्या नादांत मुढ खर्च करी ॥ करीतो भिकारी ॥ मुलाबाळां ॥ २ ॥
धूर्त आर्य शुद्रा धर्मथापा देती ॥ उंद्रापरी खाती ॥ फुंकूनीयां ॥ ३ ॥
अशा निद्रिस्तास विद्या कां हो द्याना ॥ भिक्षा ती मागाना ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२०)

भट कुळकर्णी शुद्रा चिथवीती ॥ कज्जे लाविताती ॥ गांवोगांवीं ॥ १ ॥
कज्यांच्या नादांत शुद्रा कर्ज देती ॥ भट लांच खाती ॥ सर्वांचीही ॥ २ ॥
विद्याहीन शुद्र ब्राह्मणांनीं केले ॥ सूड उगविले ॥ सर्वकाळ ॥ ३ ॥
अशा विद्या द्यावी जलदी करून ॥ भिक्षेसी मागून ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२१)

न्यॉशनल सभा आर्याजी स्थापिती ॥ सामील करीती ॥ मुढ शुद्रां ॥ १ ॥
बाकी भोळ्या शुद्रा नाडीती जगांत ॥ खाती हॉटेलांत ॥ ब्रह्मबीज ॥ २ ॥
आर्य हितसाधू गोऱ्या चिडवीती ॥ जागा मागताती ॥ जोखमिच्या ॥ ३ ॥
भट अधिकारी द्रव्यास जोडीती ॥ शुद्रा त्रास देती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२२)

स्वतः आर्यभटे कंबरा बांधा ना ॥ क्षमा ती मागा ना ॥ जगापाशीं ॥ १ ॥
शुद्र दासां तुम्ही विद्या बंद केली ॥ घ्या ना ती साऊली ॥ अंत्यजाची ॥ २ ॥
शुद्रादीकां तुम्ही आधीं मुके द्यावे ॥ सत्यानें वागावें ॥ मानवांशीं ॥ ३ ॥
ब्राम्हणांनो, तुम्ही कृतघ्न कां होतां ॥ इंग्रजां निंदितां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२३)

अज्ञानी शुद्रास नादीं लावूं नका ॥ देऊं नका धक्का ॥ यवनास ॥ १ ॥
ब्राह्मणाची जात कृत्रिमी अखंड ॥ छळीले उदंड ॥ शुद्रादीकां ॥ २ ॥

मतलबी धर्म ज्यांत नाहीं दया ॥ कामापुर्ती माया ॥ पक्के धूर्त ॥ ३ ॥
कोळयासह सर्व क्षेत्री साक्ष देती ॥ वेदास दावीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२४)

शुद्र मांगाम्हारा अज्ञानी ठेविती ॥ ब्राम्हणास देती ॥ अधिकार ॥ १ ॥
परशुरामाची जात अवघड ॥ वधी धडाधड ॥ क्षेत्रीबाळें ॥ २ ॥
सोवळा ब्राह्मण कानपुरीं नाना ॥ वधी अर्भकांना ॥ इंग्रजांच्या ॥ ३ ॥
इंग्रजांनो, तुम्ही कां रे विसरतां ॥ शुद्र हातीं देतां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२५)

मोठमोठे हुद्दे ब्राम्हणा देशील ॥ वश करितील ॥ मुढ शुद्रां ॥ १ ॥
मारणें मरणें कुरणाचा धर्म ॥ सत्य कोण वर्म ॥ शोधी तेव्हां ॥ १ ॥
अज्ञानी शुद्रांस मुळ ज्ञान नाहीं ॥ आर्योकडे पाही ॥ सर्व कामीं ॥ ३ ॥
आर्याहातीं सर्व अधिकार येतां ॥ शुद्रा नाहीं त्राता ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२६)

इंग्रजांनो, तुम्ही बसूं नका उगे ॥ ब्रॉडलास वेगें ॥ आणा येथें ॥ १ ॥
त्याचे कान धरा दावा दुष्ट वेद ॥ आर्याजींचा मद ॥ शुद्रछळ ॥ २ ॥
त्याला ठावे नाहीं शुद्रादीक हाल ॥ कृत्रीमाचा लाल ॥ चमकेना ॥ ३ ॥
अनुभवावीण व्यर्थ वाचाळतां ॥ जळो ती विद्वत्ता ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२७)

हिंदुधर्माचे ब्राम्हण वकील ॥ लुटीले सकळ ॥ जन त्यानें ॥ १ ॥
धर्ममिशें लोक नाडीले वकीलें ॥ स्वार्थ साधले ॥ आपुले ते ॥ २ ॥
नलगे वकील देवदरबारीं ॥ भक्ती एक खरी ॥ जोती म्हणे ॥ ३ ॥

(२८)

कोण ते ब्राम्हण मुखांतून झाले ॥ शुद्र तया केले ॥ कोण्या देवें ॥ १ ॥
ऋषीचें तें कुळ गंगेचें मुळ ॥ विचारीतो खूळ ॥ धूर्त म्हणे ॥ २ ॥
तैशीं खोटीं शास्त्रें लिहूनीयां जाण ॥ शपथाआणानें ॥ भय घाली ॥ ३ ॥
आणीक भटांनीं कपटें तीं केलीं ॥ विद्या ती ठेवीली ॥ आपले हातीं ॥ ४ ॥
आजवर त्यांचें कपट चाललें·॥ इतरां नाडलें ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(२९)

हेच शास्त्रकर्ते हेच न्यायदेते ॥ गुरु हेच होते ॥ पूर्वकाळीं ॥ १ ॥
म्हणूनी निचांनीं आम्हां नीच केलें ॥ श्रेष्ठत्व आगीलें ॥ आपणासी ॥ २ ॥
कोण्या ब्राह्मणास पुज्य तें मानावें ॥ कोणास आणवें ॥ धर्मकार्यी ॥ ३ ॥
ब्राम्हणेतरांनो, विचारासी करा ॥ अभीमान धरा ॥ मानवांचा ॥ ४ ॥
ह्यांची उत्पत्ती सह्याद्रीखंडीं ॥ वर्णिली अखंडी ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

## सत्यपाठ

(१)

इंग्रजासंगतीं मद्यमांस खाती ॥ मांगास निंदिती ॥ सोंवळ्यानें ॥ १० ॥
न्याय करतांना लांचास बा खाती ॥ पाठीशीं घालिती ॥ अन्यायास ॥ २ ॥
यवनीचें मुख मौजेनें चोखिती ॥ म्हारास म्हणती ॥ नीच वेटे ॥ ३ ॥
असे जगद्वेष्टे आर्यास म्हणावे ॥ समूळ त्यागावे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

सर्व भूतां निर्मी धोंड्याचा विठ्ठल ॥ पंढरी सकळ ॥ वेडी केली ॥ १ ॥
विठ्ठलाची मूर्ती ध्यानीं मनीं धरी ॥ गातां ताल धरी ॥ नाच्यापरी ॥ २ ॥
निर्लज्य होऊनी फुगड्या खेळतो ॥ पकृत्यास घालितो ॥ स्त्रीयांसंगें ॥ ३ ॥
"सुखरूप होशी" उपदेश करी ॥ वेडा वारकरी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

आर्याजींचा ब्रम्हा अवयवी व्याला ॥ टरफल झाला ॥ विंचू जैसा ॥ १ ॥
वेदांतीं पहातां विष्णू ब्रम्हागळे ॥ कल्पना मावळे ॥ सत्य उरे ॥ २ ॥
शूद्रादिक कांहीं का + मुक्त झाले ॥ मानव बनले ॥ सुखासाठीं ॥ ३ ॥
तूं कां येथें व्यर्थ वाचा शिणविशी ॥ सत्या मोकलीशी ॥ जोती म्हणे ॥ ३ ॥

(४)

मुखें भावभक्ती आक्रोश फोडिती ॥ आर्या रिझविती ॥ स्नेहासाठीं ॥ १ ॥
शुद्रा भुलवूनी गुलाम करीशी ॥ भटा मोकलीशी ॥ धनीपणा ॥ २ ॥
भटजीचा संग धरूं नको आतां ॥ देती खास गोता ॥ अखेरीस ॥ ३ ॥
दुर्गूणाची खाण कृत्रीमी अचाट ॥ जगांत बोभाट ॥ जोती म्हणे ॥ ३ ॥

(५)

इंग्रजासंगतीं आर्य खाती पिती ॥ सोवळें दाविती ॥ घरीं शुद्रा ॥ १ ॥
न्याशनल सभा अज्ञ शुद्रा दावी ॥ तुलना करावी ॥ इंग्रजांशीं ॥ २ ॥
सभा उपदेश धिंगाणे होतील ॥ शुद्र मरतील ॥ मौज आर्या ॥ ३ ॥
राजा तोच खरा बंदोबस्त जारी ॥ मुढ शूद्रा तारी ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

सर्व धर्मी करा न्याशनल सभा ॥ तिजमध्यें उभा ॥ करा आर्या ॥ १ ॥
त्यांच्या पूर्वजांनीं रचिलें भारूड ॥ वेदांचें गारूड ॥ वैरभावें ॥ २ ॥
शूद्रासह म्लेंच्छा छळीलें उंदड ॥ खरे कलखंड ॥ मानवांत ॥ ३ ॥
यास तुम्ही करा ॥ सत्य वर्तणारा ॥ जगा सुखी करा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

जातीभेद आर्या चोखड वाटतो ॥ म्लेंच्छास फाडतो ॥ हितासाठीं ॥ १ ॥
आर्य श्रेष्ठ सर्व पिढीजादा होती ॥ तुच्छ मानीताती ॥ सर्व जग ॥ २ ॥
धर्मभेद त्यांनीं हितासाठीं केला ॥ शुद्र लुटण्याला ॥ धर्मिमिशें ॥ ३ ॥
आर्यासह सांग ख्रिस्त महंमद ॥ नको त्यांत भेद ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## ॥ भटाची वाणी ॥

(१)

मेरी तुंबडी भर दे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ध्रु० ॥
आले उपाधे भट दहापांचांचा गट ॥ जमून करी वटवट ॥
हात पसरीती चट ॥ घेती दक्षिणा घट ॥ कशी वरून लगट ॥
मेरी तुंबडी भर दे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ १ ॥
जात बाजींदी नट ॥ अडवून धरी मनगट ॥ घेती दक्षणा झट ॥
पाहाती रांडांचा मठ ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ २ ॥
भेटती मैना पोपट ॥ जेव्हां जमती गटपट ॥ बिस्क बी बे झडपट ॥
चुमण घेती मटमट ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ३ ॥
लाळ घोटीती घटघट ॥ असा पापी महानट ॥ धुवून आपले अंगुष्ट ॥
शुद्रा पाजीती हे दुष्ट ॥ दान करीनात थै ॥ ४ ॥

खानी दुलन कर्देन ॥ आनंद घोटे जर्देन ॥ लक्षर प्यादे जळद ॥
मेरी तुंबडी भर दे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ५ ॥
अरे, त्याला नेऊन जाळा ॥ अरे त्याला नेऊन जाळा ॥ अहो शुद्रांचा काळ ॥
आले ब्राह्मण चांडाळ ॥ हा दुष्ट तात्काळ ॥ हे उठले कपाळ ॥
मेरी तुंबडी भर दे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ६ ॥
घ्या हिरावून जपमाळ ॥ दान करीन देवे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥
चरी बरी बरी बरी ॥ अहो कशाची बरी ॥ पोथी बगलेंत मारी ॥
जाती शुद्रांच्या घरीं ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ७ ॥
करीती बडबड भारी ॥ सोंग बोकडाचे परी ॥ दाढीवाली सारी ॥ मेरी तुंबडी ॥ध्रु० ।
मिष तिर्थांचें करी ॥ खाल्ली पंचपात्री ॥ देती तीर्थ कुपात्रीं ॥ जात मैंदाची खरी ।
मेरी तुंबडी भर दे ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ८ ॥
हात गोमुखीं सारी ॥ चित्त पैशावरी ॥ किंवा तरण्याताठ्या पोरीवरी ॥
भडवे रात्रंदिन शयनीं ॥ मेरी तुंबडी भर दे ॥ ९ ॥
अहो कशाची भार ॥ कित्येक ब्राम्हण अम्मलदार ॥
कोणी पंच फौजदार ॥ कोणी शिरस्तेदार ॥ कोणी कुलकर्णी सावकार ॥
मेरी तुंबडी भर दे ॥ १० ॥
मोठे मोठे दुकानदार ॥ सारे भटच अम्मलदार ॥ गरीब शुद्रावर कहर ॥
हे पहा करीती जोजार ॥ असें आंधळें सरकार ॥
कांहीं करीना विचार ॥ जोतीरामाचा मार ॥ फुलापेक्षां सुकुमार ॥
मेरी तुंबडी भर दे ॥ ११ ॥

## (२)

जाळ तुझी फुकी एकी ॥ धूर्त नटी अर्ध मुकी ॥ १ ॥
तुम्ही आर्य कार्यसाधु ॥ नव्हत शुद्रांचे हो बंधू ॥ २ ॥
नाथ प्रमाथा बोसाची ॥ साक्ष देतों निबंधाची ॥ ३ ॥
जेव्हां इंग्रजी वाचाल ॥ तेव्हां शांतीस ती धराल ॥ ४ ॥
ज्याला नाहीं सत्यभीती ॥ त्याला कैची बंधूप्रिती ॥ ५ ॥
द्विज चाकराची निती ॥ फी मजूरापाशीं घेती ॥ ६ ॥
घरीं धार्मीक बनती ॥ कचेरींत लांच खाती ॥ ७ ॥
यवनी रंभा हे पाळीती ॥ भ्रष्ट मांगास म्हणती ॥ ७ ॥
वेश्यांचें चुंबन घेती ॥ शुद्रा पादोदका देती ॥ ९ ॥
जितशुद्रा तुच्छ मानी ॥ मेल्यामागें टपे दानी ॥ १० ॥

मद्यमांस शाक्त खाती ॥ म्हारामांगा दोष देती ॥ ११ ॥
परशुराम देव साचा ॥ वध करी अर्भकांचा ॥ १२ ॥
भट पेशवा जो नाना ॥ छेदी स्त्रीयालेकरांना ॥ १३ ॥
बहु स्त्रीयांचा हा पती ॥ स्त्रीस का उलटी रीती ॥ १४ ॥
एक मरतां दुजी जाया ॥ हा मारतो सती न्याया ॥ १५ ॥
पक्षपाती सर्व मनु ॥ नेत्री सलतात कानू ॥ १६ ॥
सत्य यवनाची वाणी ॥ वेद वाही त्यांचें पाणी ॥ १७ ॥
हीच कां हो शास्त्रनीती ॥ जोती पुसे भट्टाप्रती ॥ १८ ॥

(३)

विशारी द्वीजिव्हा सर्पास कल्पना ॥ पवित्रशयन ॥ द्विजें केलें ॥ १ ॥
उपडा पाडून वर निजविलें ॥ शेशशाई दिलें ॥ नांव त्याचें ॥ २ ॥
काम सारीतांना श्रमला भागला ॥ पाय दाबायाला ॥ रमा बाबी ॥ ३ ॥
सर्प खाणाराला पुढें उभा केला ॥ गरुडपक्षाला दासापरी ॥ ४ ॥
कमळ उगवी नाभींतून त्याचे ॥ पुच्छ वानराचें पोटावर ॥ ५ ॥
फुल फोडोनियां ब्रह्माजी काढीला ॥ पंचमुखी केला ॥ चार हात ॥ ६ ॥
ब्रह्माजी तो साचा अवयवी झाला ॥ भटासी ओकला ॥ तोंडांतून ॥ ७ ॥
विष्णूची रमा ब्रम्ह्याची सावित्री ॥ कवण्या कार्याप्रती ॥ सांग भटा ॥ ८ ॥
अयोनिसंभव मानव–उत्पत्ती ॥ लिहील्यात ग्रंथीं ॥ गप्पा सर्व ॥ ९ ॥
मांगापरी आज भटजीचा जन्म ॥ कळूं आलें वर्म ॥ जोती म्हणे ॥ १० ॥

## ढोंगी गुरू

(१)

निर्मीकाची दया केले प्राणीमात्र ॥ अवयवीं सुत्र ॥ निराळेच ॥ १ ॥
सारखीं इंद्रीयें सर्वांस बा दिलीं ॥ सोईवार केलीं ॥ सर्वोपरी ॥ २ ॥
त्यांपैकीं मानव वर्णीतों थोडक्यांत ॥ बुद्धी लक्षणांत ॥ सर्वांमध्यें ॥ ३ ॥
बुद्धि न खर्चीतां कल्पना करीती ॥ मानवा नाडीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

ईशें मानवास दोन नेत्र दिले ॥ सुरक्षीत केले ॥ हितासाठीं ॥ १ ॥
पुढें येतां वस्तुप्रतीबिंब पडे ॥ बुबुळीं रोकडे ॥ हुबू चीत्र ॥ २ ॥

बुद्धीज्ञानबळें त्यास ओळखून ॥ करी समाधान ॥ लागलीच ॥ ३ ॥
पाहिल्यावांचून डोळे झाकीताती ॥ मूर्ती कल्पीताती ॥ अंधारांत ॥ ४ ॥
त्यास विश्वंभर नांव त्यांनीं केलें ॥ कल्पनीं निवाले ॥ ढोंगी गुरू ॥ ५ ॥
हाच निजमंत्र फुंकीती कानांत ॥ बोधती एकांतीं ॥ पोटासाठीं ॥ ६ ॥
कल्पनेचा विष्णु शिश्याशीं बोलेना ॥ खाईना पिईना ॥ सर्व ढोंग ॥ ७ ॥
डोळे झांकल्यानें झाला हा अनर्थ ॥ वाया गेले व्यर्थ ॥ गुरुशिश्या ॥ ८ ॥
मानवांत गुरू मूळ कोण झाला ॥ प्रश्न गुरूजीला ॥ जोती म्हणे ॥ ९ ॥

(३)

कर्णेंद्रियें दिलीं नाद ऐकण्यास ॥ सावध होण्यास ॥ सर्व कामीं ॥ १ ॥
सत्य बोल जेव्हां पडतात कानीं ॥ आनंदले मनीं ॥ सुख होई ॥ २ ॥
खोटे बोल जेव्हां कानीं ऐकूं येती ॥ दुःख सर्वां देती ॥ लागलीच ॥ ३ ॥
कानामध्यें बोटें शरीरीं व्यापार ॥ होतसे व्यापार ॥ धडफड ॥ ४ ॥
त्यास अनुहत धूर्त गुरू म्हणे ॥ जळो त्याचें जिणें ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(४)

घ्राणेंद्रियें द्वारें स्वच्छ हवा येती ॥ अस्वच्छ टाकीती ॥ नाकांतून ॥ १ ॥
पोटीं सर्व घेती जिवनाची हवा ॥ काळजास मेवा ॥ क्षणोक्षणीं ॥ २ ॥
दुर्गंधी येतांच नाक मुरडती ॥ आंठ्या त्या घालीती ॥ कपाळास ॥ ३ ॥
नाक दाबोनियां कोंडी स्वाच्छोस्वास ॥ क्लेश शरीरास ॥ देती धूर्त ॥ ४ ॥
डोळे झांकूनीयां भांबाऊन पाही ॥ ईश सर्व देहीं ॥ गुरू म्हणे ॥ ५ ॥
भ्रमाचें गारूड ब्रह्म सोंग केलें ॥ अज्ञान्या दावीलें ॥ जोती म्हणे ॥ ६ ॥

(५)

हाडावीण जिभ रस इंद्रियांस ॥ गोड कडू तीस ॥ जाणण्यास ॥ १ ॥
सहज पदार्थ दाताखालीं दाबी ॥ चावीतां लोळवी ॥ सहजांत ॥ २ ॥
सत्य बोलण्याची जिभेस कसोटी ॥ घशाकडे लोटी ॥ लागलीच ॥ ३ ॥
बारीक होतांच गच्च तोंड मिटी ॥ सुख उठाउठीं ॥ सर्वां देई ॥ ४ ॥
खोटें बोलूनीयां अनर्थ करवी ॥ रक्तपाती होई ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(६)

मानवशरीरीं चक्रास कल्पीती ॥ निर्मिका दावीती ॥ क्षणामध्यें ॥ १ ॥
पशुपक्षादीकां चक्रें कां नसावीं ॥ त्यांच्यामध्यें दावीं ॥ चक्रें किती ॥ २ ॥

सर्वांचा जो कर्ता कोणास दिसेना ॥ गुरूच्या कल्पना ॥ व्यर्थ तर्क ॥ ३
मानवांत प्राणी किती गुरूवीण ॥ वाया गेले जाण ॥ गुरुमतें ॥ ४ ॥
गुरुवीण सर्व अधोगती नेती ॥ काळीमा लावीती ॥ निर्मीकास ॥ ५ ॥
मुढा फसवूनी गुरू होऊं नका ॥ सत्यत्वास धक्का ॥ जोती म्हणे ॥ ६ ॥

(७)

शरीरीं चक्रास कल्पीती ओढाळ ॥ निर्मीकाची राळ ॥ मुढें केली ॥ १ ॥
वेड्यापरी सर्व गुरु बरळती ॥ दावीन म्हणती ॥ निर्मीकास ॥ २ ॥
कोणत्या गुरूनें निर्मीका पाहीला ॥ दावीं ना आम्हाला ॥ प्रत्यक्ष तो ॥ ३ ॥
गुरू सर्व हीरे मैदानीं आणावे ॥ तपासून घ्यावे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

गुरुजींनीं आतां तोंड लपवितां ॥ होईल फजीता ॥ जगामाजीं ॥ १ ॥
गुरुजींनीं आम्हा निर्मीक दावीतां ॥ त्यास खरी वार्ता ॥ पुसूं आम्हीं ॥ २ ॥
तूंच का येशू खरा बाप होशी ॥ पुत्रा मोकलीशी ॥ दुष्टा हातीं ॥ ३ ॥
कुराण हदीस यवनास देशी ॥ व्यर्थ लढवीशी ॥ सुन्नी शिया ॥ ४ ॥
तूंच रामचंद्र झाला अयोध्येस ॥ वधी रावणास ॥ पत्नीसाठीं ॥ ५ ॥
कृष्ण होऊनीयां मामास मारीलें ॥ कोळयानें वधीलें ॥ तोच तूं का ॥ ६ ॥
सत्यआचरण निर्मीक आधार ॥ सुखाचें माहेर ॥ जोती म्हणे ॥ ७ ॥

(९)

शरीराचे पोटीं आत्मा जन्मे बेटा ॥ दिमाखाचा ताठा ॥ व्यर्थ करी ॥ १ ॥
घडामोड सर्व स्मरणांत ठेवी ॥ तुलना करवी ॥ सर्व कामीं ॥ २ ॥
झाला अनुभव टाका एकीकडे ॥ सत्याशीं वांकडे ॥ होई मूर्ख ॥ ३ ॥
गुरु म्हणे आत्मा आहे निराधार ॥ सांगे बडीवार ॥ त्याचा फार ॥ ४ ॥
कुडीवीण आत्मा दावीना मजला ॥ धिःकार गुरूला ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

(१०)

धंदा येत नाहीं विद्येवीण पशू ॥ नाहीं तो जिज्ञासू ॥ भूमीभार ॥ १ ॥
भांग पिऊनीयां सदा डोळे लाल ॥ घरच्याचे हाल ॥ साह्यावीण ॥ २ ॥
भटांमाजी ऐके गुरुचरित्राला ॥ गुरूजी बनला ॥ पोटासाठीं ॥ ३ ॥
धातू दगडाच्या मूर्तीस भजून ॥ घंटा वाजवून ॥ स्वतः खाई ॥ ४ ॥
अन्नावीण मेली घरीं जन्मदाती ॥ सोंगाची फजीती ॥ जोती म्हणे ॥ ५ ॥

## (११)

गुरुजींनीं ईशा देहांत कल्पीला ॥ गर्वानें फुगला ॥ मुढामध्यें ॥ १ ॥
नाशीवंत देह घाणीचें आगर ॥ देवा दीलें घर ॥ कैसें शोभे ॥ २ ॥
जास्ती खातां अन्न कुदर्पी ढेंकर ॥ येई तिरस्कार ॥ घाण येतां ॥ ३ ॥
गुद्‌चक्रांतून + + चा गजर ॥ होई वारंवार ॥ बाजापरी ॥ ४ ॥
लाळीचे पाझर येती जिभेंतून ॥ अभीयंकावीण ॥ स्नान होतें ॥ ५ ॥
पदार्थांचे दोष वाही नाकांतून ॥ चंदनलेपन ॥ कशासाठीं ॥ ६ ॥
देवास आश्रम गुरुजींनीं दिले ॥ मुढ वेडे केले ॥ धूर्तांपरी ॥ ७ ॥
सर्वांचा निर्मीक शरीरांत कोंडी ॥ गुरुजी पाखांडी ॥ जोती म्हणे ॥ ८ ॥

## (१२)

पुढचा घाबरा ठेंच लागे पडे ॥ पाही सर्वांकडे ॥ टकाटका ॥ १ ॥
सर्वांनीं पाहातां ओशाळा तो होई ॥ म्हणे आई आई ॥ लाजोनीयां ॥ २
वाटेंत लोळतां लोक हासतांना ॥ रक्त पुशीतांना ॥ वेळ जाई ॥ ३ ॥
कोणी न पाहातां मुकाटयानें उठे ॥ लागे नीट वाटे ॥ झपदिशीं ॥ ४ ॥
शहाणपण येई मागे चाले त्यास ॥ बोधी सर्वत्रास ॥ नीट चला ॥ ५ ॥
ठेंच लागूनीयां खालीं पडणारा ॥ त्यास हासणारा ॥ पाहूनीयां ॥ ६ ॥
मागचा तेव्हांच होतसे शहाणा ॥ बोधी सर्वजना ॥ चालतांना ॥ ७ ॥
याजमध्यें गुरू कोणास म्हणावा ॥ गोठ्यांत कोंडावा ॥ जोती म्हणे ॥ ८

## (१३)

मानवासारखा पोटीं जन्म घेतो ॥ गुळवणी पितो ॥ पाजीतांच ॥ १ ॥
अन्ना नित्य खाई उदकास पिई ॥ विष्ठामुत नाहीं ॥ पोटामध्यें ॥ २ ॥
सद्‌गुणां सांडून दुर्गूणाचा बेटा ॥ कळचेटा मोठा ॥ सर्वांमध्यें ॥ ३ ॥
खोटे तर्क सर्व कल्पीतो मनांत ॥ लिहितो ग्रंथांत ॥ धूर्तांपरी ॥ ४ ॥
बंड करूनीयां फाशीसुद्धां जाती ॥ जगांत फजिती ॥ भूदेवांची ॥ ५ ॥
अंगरोग होतां क्लेशानें कण्हती ॥ भूदेव मरती ॥ सर्व कां हो ॥ ६ ॥
जगांत भूदेव खरा कोण झाला ॥ दावावा आम्हाला ॥ जोती म्हणे ॥ ७

# ब्राह्मणांचा भोंदूपणा

[पद]

इच्छा ब्राह्मण भोंदुची ॥ मिथ्या धांव भटांची ॥ इच्छा ॥ ध्रु० ॥
म्हणे आम्हांस देव देतो मूढास बोधितो
गुलहौषी देवा करुनी शुद्रा फसवीतो ॥ १ ॥
आळस रिपु, मनुजें स्वतः श्रम करावे ॥
धूर्त भटाचे मनीं इच्छा हरामाचें खावें ॥ २ ॥
मुठींत नाक मनांत नाम भट्टानें घोकावें ॥
शुद्रादिकांनीं शेतीं खपुन आर्या पोसावें ॥ ३ ॥
खाया मिष्टान्न मऊ बिछाने भटास असावे ॥
मोठमोठे हुद्दे घेऊन शुद्रा नागवावें ॥ ५ ॥
भटजींच्या ध्यानीं ब्राह्मण पंतोजी असावे ॥
शूद्रादीकां विद्या न देतां मूढच ठेवावें ॥ ६ ॥
नांव देशाचें सांगूनी आपण पार्लमेंटी व्हावें ॥
शूद्रादिकांनीं रणामध्यें लढून मरावें ॥ ७ ॥
भूदेवांच्या मनीं हाव पालखींत बैसावें ॥
जिवंत-मेले भटा शुद्रें खांदेकरी व्हावें ॥ ८ ॥
सिव्हील सर्व्हीसची मनीं हाव सभेंत निंदावें ॥
हक्कासाठीं उगीच इंग्रजी घोंडे मारावे ॥ ९ ॥
जोती सांगे ब्रह्मलचांडा समूळ त्यागावें ॥
पोटापुरता धंदा सारून सत्या आळवावें ॥ १० ॥

# शूद्रापासून फंड गोळा करण्याविषयीं निषेधार्थक

(१)

ब्राह्मणाचीं मुलें विद्येस टिकती ॥ आर्जव करीती ॥ इंग्रजाचा ॥ १ ॥
गोऱ्या फुगवूनी कामगार होती ॥ शुद्रास नाडीती ॥ सर्व कामीं ॥ २ ॥
तर्क धर्म मुढ शुद्रां शिकविती ॥ मत्सर करीती ॥ इंग्रजांचे ॥ ३ ॥
इंग्रजास तुम्ही करा आधीं जागे ॥ फंड लागे मागें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(२)

साऱ्यासह फंड शुद्र किती देती ॥ धूर्त आर्य खाती ॥ शाळाखातीं ॥ १ ॥
शुद्रादीक त्यांनीं किती शिकविले ॥ कामगार केले ॥ दावा आम्हां ॥ २ ॥
शुद्रासाठीं गोरे मनांत झुरती ॥ भटा जागा देती ॥ जोखमीच्या ॥ ३ ॥
शुद्राजी थकले फंड देतां देतां ॥ भटांस पोशीतां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(३)

शाळा तपासाऱ्या गांवोगांवीं सर्व ॥ आर्या झाला गर्व ॥ जगामाजी ॥ १ ॥
मानव शिक्षक नेमा निर्विवाद ॥ आर्य भेदाभेद ॥ त्यागा सर्व ॥ २ ॥
भट्टाचें शिक्षण खोटा धर्मसार ॥ कृत्रीमाचें घर ॥ मनुमत ॥ ३ ॥
शुद्राजींनीं फंड कोठवर द्यावे ॥ आर्यांस पोसावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(४)

तरुण शुद्रांनीं विद्या संपादावी ॥ चाकरी धरावी ॥ शाळाखातीं ॥ १ ॥
शाळेमधीं कधीं निवड नसावी ॥ मानवा शिकवी ॥ एकसहा ॥ २ ॥
मुळीं जातीभेद खुळास त्यागावें ॥ आर्या लाजवावें ॥ सतकर्मीं ॥ ३ ॥
शुद्रांच्या श्रमाचा लोकल तो फंड ॥ खाती आर्य भंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(५)

गांवोगांव भट शाळागुरू होती ॥ शुद्रा शिकविती ॥ राजद्रोहा ॥ १ ॥
मांग-म्हार मुला दूर बसविती ॥ फुकटचा खाती ॥ सर्व फंड ॥ २ ॥
ब्राह्मण पंतोजी गोऱ्या धूर देती ॥ म्हारास पिडीती ॥ धर्मथापा ॥ ३ ॥
अंत्यजाचा आहे लोकल तो फंड ॥ त्यांचे कां हो भंड ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(६)

आर्य शुद्र पोरा शाळेंत छळीती ॥ चेष्टा ते करीती ॥ वर्गामध्यें ॥ १ ॥
जातीचे ब्राह्मण गर्वें हंबरती ॥ तोरा मिरविती ॥ आम्ही श्रेष्ठ ॥ २ ॥
यज्ञामध्यें भट घोडे गाया खाती ॥ बोकड वधीती ॥ इंग्रजींत ॥ ३ ॥
नाक चढवूनी इंग्रजा निंदीती ॥ शुद्रास भोंदीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(७)

आर्य परिक्षक पक्षपाती होती ॥ भट पोरा देती ॥ गुण जास्त ॥ १ ॥
शुद्र पोरावर डोळे वटारीती ॥ घाबरे करीती ॥ परिक्षेंत ॥ २ ॥

जगद्वेष्टे आर्य जातीचे कमीन ॥ करी अपमान ॥ शूद्रांचा हो ॥ ३ ॥
पवित्र इंग्रज भटा बढविती ॥ मोकळे सोडीती ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(८)

सरकारी शाळीं आधीं शूद्र भरा ॥ भटोबास थारा ॥ देऊं नका ॥ १ ॥
भटावत तुम्ही शिक्षक बनावें ॥ त्यांना हटवावें ॥ सत्यामध्यें ॥ २ ॥
विद्या शिकवूनी मग + + गप्पा ॥ मनुमत कापा ॥ तुम्ही सर्व ॥ ३ ॥
असें न करीतां फंडास मागतां ॥ शुद्रा लाजवितां ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(९)

विद्या शिकोनीयां गांवोगांव फिरा ॥ उपदेश करा ॥ शुद्रादीकां ॥ १ ॥
शुद्र शिक्षक ते सरकारा मागा ॥ आर्याजीस सांगा ॥ दान मागा ॥ २ ॥
शुद्र मुलीमुलां शाळेंत घालावें ॥ सुशील करावे ॥ सर्व कामीं ॥ ३ ॥
शुद्राजींनीं फंड कोणा कोणा द्यावे ॥ धूर्तास पोसावे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(१०)

सरकारी शाळा आधीं दिवे लावा ॥ उजेडा दाखवा ॥ शुद्रांदीकां ॥ १ ॥
फंड नको तुम्हा कोणाची मदत ॥ दावा करामत ॥ शुद्र लोकां ॥ २ ॥
असें न करीतां लोका त्रास देतां ॥ खापर फोडीतां ॥ माथ्यावर ॥ ३ ॥
इंग्रजांचे माना तुम्ही उपकार ॥ मनु हद्दपार ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

(११)

शुद्रां आर्यत्रास जपून शोधावे ॥ कामगार व्हावे ॥ सर्व खातीं ॥ १ ॥
आर्य ठकबाज्या उघड्या कराव्या ॥ जगा दाखवाव्या ॥ वेळोवेळीं ॥ २ ॥
मुढ शुद्रादीकां सत्यानें वागवीं ॥ त्याजला दाखवीं ॥ भट-कावा ॥ ३ ॥
शुद्रांचे वंशज तुम्ही खरे खास ॥ दावा जगतास ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## दस्यूचा पोवाडा

(१)

रणांगणीं आर्य धूर्तांनीं दस्यु जिंकुनी गणिले दासांत ॥
तुम्ही नव्हता तुमचा दास, पुसा वेदास, ओढा चौघांत ॥

दस्युजन होते सबळ, हृदयीं निर्मळ, चोख वागले, ॥
यवनास वागवी रास्त, म्हणून दोस्त, नांव पावले ॥
महा दुष्टांच्या खोडी मोडून, भीड सोडून, नीट वर्तले ॥
भीती मनीं यवन, म्हणूनी दुष्मन, नांव पावले ॥
अतीरथी बुडविले किती, नाहीं ज्या गती, सत्तेच्या पायीं ॥
विर्य थेरांचें मिरवितां, मिशा पिळीतां, शरमता नाहीं ॥
आपण शहाणे म्हणवितां, नाक चढवितां, गोष्ट ही ध्यावी ॥
तुम्ही मुळचे क्षेत्रपती, झाली कोण गती, तोलुनी पाही ॥
मानवास आणिली हानी, बरें ना कोणी, म्हणे तुजलाही ॥
पराधीनत्व असे वाईट, मुलांचें नीट, दिसत नाहीं ॥
तुम्ही शोध करा दूरवर, सांगतों सार धरावी सोयी ॥ १ ॥

रणांगणीं ॥ ध्रु० ॥

(२)

मांगास बहुत पीडिले, सजीव दडविले, ग + + पायांत ॥
लेश उरले उष्टे मागती, नाहीं ज्यां गती, आर्यन्यायांत ॥
सत्याची नाहीं तुम्हां रुची, खऱ्या अब्रुची, वीर्यहीन झालां ॥
सत्तेवांचून सकळ कळा, झाल्या अवकळा, पुसा मनाला ॥
गोडी आर्जवाची लागली, लाज सोडली, पडतां पायां ॥
वस्त्रान्न नाहीं पुरतें, घरीं झुरते, शेजेची जाया ॥
पोटावांचून वाया गेली, पहातां खर्जूली, येते ओकाया ॥
आर्या जेवितां लाळ घोटिती, दार लोटिती, बसती जेवाया ॥
तनमनधनास अर्पीले, नित्य वारीले, नाहीं ज्या दया ॥
सुप्रसन्न भुदेव झाले, मुक्त तुम्हां केलें, क्लेश भोगाया ॥
तुम्ही कसे झालां निसंग, आर्यपदीं दंग, नित्य लोळाया ॥
आर्यांची मनुस्मृति बघा, तींत आहे दगा, वाची ग्रंथाला ॥
जंवर हात भिजे, तंवर भट भजे, आलें प्रत्ययाला ॥
तुझ्या भार्येस तुच्छ मानून, म्हणे कुळंबीण, तुझ्यादेखत ॥
क्षत्रीय पूर्वीचे खरें सांगतों, वेद दावितों, आण ध्यानांत ॥ २ ॥

रणांगणीं ॥ ध्रु० ॥

(३)

बळी राज्यादि कुळस्वामीला, डाग लावीला, दंग क्लेशांत ॥
अन्नावांचून होती हाल, केली कमाल, सर्व जगांत ॥

पायींचें पितां तीर्थ, केली कीं शर्थ, खऱ्या मर्दांत ॥
छळती यवन दुरागी, शरम नाहीं, कांहीं मनांत ॥
तेलीतांबोळयादी ठोक दे, खरीं माकडें, चेष्टा करीती ॥
भूमीनें सोडिलें पीक, झाल्यानें दिक, दुरुनी वाढीती ॥
विद्येचा अन्हेर कराल, देशोधडीला जाल, डाग वंशांत ॥
लावितां कीर्तीध्वजा, उडविती मजा, आर्य पिंजऱ्यांत ॥
तुम्ही कुलदीपक कसे, निपजले जसे, पक्षी राव्यांत ॥
जगानें काय वर्णावें, कवींनीं गावे, गुण चौघांत ॥
नाहीं पदरीं दमडी रोख, कल्याचा झोंक, सुत गळयांत ॥
घरीं मराठमोळा माजला, स्त्रिया साजल्या, जुन्या चिंध्यांत ॥
सर्व काळ बोंबीतां मुढ, होईना जड, बिडी पायांत ॥
गंगेंत वराह धुतला, वर काढिला, लोळे गाळांत ॥ ३ ॥
रणांगणीं ॥ ध्रु० ॥

(४)

तुम्हां सांगतों बहुतां परी, गोष्ट ही खरी, शूद्रहिताची ॥
दुर्दशा ती अविद्येपायीं, ऐकतों मीहि, कथा बहुतांची ॥
शिंदे होळकरादि भोसले, नाहीं भासले, ब्रह्मकूटाचा ॥
आजकाल टाकिती माप, भागीती व्याप, दास धर्माचा ॥
इंग्लिशें उघडे पाडिलें, गुढ आंतलें, वेद मंथून ॥
वेदमताचें केलें खंडण, सत्यमंडण, निकें स्थापून ॥
आर्यांची खुंटली मती, बाटले किती, आवड सत्याची ॥
जागोजाग सभा स्थापीती, देऊन गोविती, थाप एकीची ॥
भट कारस्थानी, आणावे मनीं, शोध सत्याचा ॥
परिणाम असे वाईट, करावा नीट, आर्यस्थापीचा ॥
बुद्धांनीं खोड मोडिली, कीर्ती जोडली, सर्व जगांत ॥
मनीं आर्यभट्ट कुढती, उघड रडती, उर पिटीत ॥
जोतीस जोत जोडि लाविना, एकी होईना, सर्व जगांत ॥
फुले रावाचे निके बोल, नव्हती फोल, आणा ध्यानांत ॥ ४ ॥
रणांगणीं ॥ ध्रु० ॥

---

## विभाग ३ रा

### बळी राजा

आमुच्या देशीचे अतुल स्वामी वीर ॥ होते रणधीर ॥ स्मरूं त्यास ॥ ध्रु० ॥
बळिस्थानीं आले शूर भैरोबा ॥ खंडोबा जोतीबा ॥ महासुभा ॥ १ ॥
सद्‌गुणी पुतळा राजा मूळ बळी ॥ दसरा दिवाळी ॥ आठवीती ॥ २ ॥
क्षेत्रीय भार्या "इडापिडा जावो ॥ बळीराज्य येवो" ॥ अशा कां बा ? ॥ ३ ॥
आर्यभट आले सुवर्ण लुटीलें ॥ क्षेत्री दास केले ॥ बापमत्ता ॥ ४ ॥
वामन कां घाली बळी रसातळीं ॥ प्रश्न जोती माळी ॥ करी भटां ॥ ५ ॥

### मानव महंमद

(१)

महमंद झाला जहामर्द खरा ॥ त्यागीले संसारा ॥ सत्यासाठीं ॥ ध्रु० ॥
खोटा धर्म सोडा, सांगे जगताला ॥ जन्म घालविला ॥ ईशापायीं ॥ १ ॥
जगहितासाठीं लिहिलें कुराण ॥ हिमतीचा राणा ॥ जगीं वीर ॥ २ ॥
जगाचा पालक निर्मीक अनादि ॥ सर्व काळ वंदी ॥ निके सत्य ॥ ३ ॥
मन केलें धीट, धरीली उमेद ॥ नाहीं भेदाभेद ॥ ठावा ज्याला ॥ ४ ॥
जनहितासाठीं खोटा अभिमान ॥ दिला झुगारून ॥ अग्नीमध्यें ॥ ५ ॥
मर्द महंमद ढोंग्यांत पांगळा ॥ शोभला पुतळा ॥ सज्जनांत ॥ ६ ॥
नव्हता कोणी त्याला तेव्हां साह्यकरी ॥ एकटाच सारी ॥ सत्य पुढें ॥ ७ ॥
एक त्याला फक्त सत्याचा आधार ॥ हिय्या समशेर ॥ मनामध्यें ॥ ८ ॥
++++++य येई अजा । निर्मीकाच्या ध्वजा ॥ उभारील्या ॥ ९ ॥
कोणी नाहीं श्रेष्ठ कोणी नाहीं दास ॥ जात-प्रमादास ॥ खोडी बुडी ॥ १० ॥
मोडीला अधर्म आणि मतभेद ॥ सर्वांत अभेद ॥ ठाम केला ॥ ११ ॥
केल्या कमाईचा न धरी अभिलाष ॥ खैरात दिनास ॥ देई सर्व ॥ १२ ॥
मानवी मनाचा घेई अंतीं ठाव ॥ कल्याणाची हाव ॥ पोटीं माया ॥ १३ ॥
मूर्तीपूजकांच्या बंडासी मोडीलें ॥ ढोंगी वळविले ॥ ईशाकडे ॥ १४ ॥
देव एक ऐसें ग्रंथासी स्थापिलें ॥ जग-बंधु केलें ॥ मनुजास ॥ १५ ॥

तेणें धर्मगुरु तसची जहाले ॥ हट्टासी पेटले ॥ मूर्तीसाठीं ॥ १६ ॥
ढोंगी धार्मीकांनीं पाठलाग केला ॥ विवरीं लपला ॥ डोंगराच्या ॥ १७ ॥
ईश रक्षी त्याला लंड वधूं गेले ॥ शोधीत फिरले ॥ सर्व व्यर्थ ॥ १८ ॥
मेल्यामागें बहु त्याचे शिष्य झाले ॥ बळीस्थानीं आले ॥ किती एक ॥ १९ ॥
कळूं आलें त्यांना आर्याजी अभद्र ॥ मुक्त केले शूद्र ॥ दास्यांतून ॥ २० ॥
इस्लामा प्रसारी, आर्यां घरीं पाडी ॥ खीळी सत्य–विडी ॥ त्यांचे पायीं ॥ २१ ॥
आर्य दस्यु इस्लामानें मुक्त केले ॥ ईशाकडे नेले ॥ सर्व काळ ॥ २२ ॥
आर्यधर्म–भंड इस्लामें फोडीलें ॥ ताटांत घेतले ॥ भेद नाहीं ॥ २३ ॥
मांगासह आर्यां नेलें मसीदींत ॥ गणी बांधवांत ॥ आप्त सखे ॥ २४ ॥
क्षत्रिया जिंकलें राज्य त्यांचें झालें ॥ मोंगलांनीं केले ॥ मुक्त कांहीं ॥ २५ ॥
जातिभेदाभेदीं फायदा तो साचा ॥ मुसलमानांचा ॥ झाला मोठा ॥ २६ ॥
अंत्यजास धरी पोटीं सावकाश ॥ लाजवी आर्यांस ॥ सर्व काळ ॥ २७ ॥
म्हणूनीयां आर्य बोंब मारीताती ॥ शिमगा खेळती ॥ ब्रह्मरूपी ॥ २८ ॥
भेद सोडुनीयां एका ताटीं खाती ॥ एकच बनती ॥ म्हणोनीयां ॥ २९ ॥
इस्लामासी मान शूद्र राजे देती ॥ कर्बलास नेती ॥ ताबूतास ॥ ३० ॥
इस्लामी बांधव अचंबा करीती ॥ धूळ फेकीताती ॥ मनूवर ॥ ३१ ॥
मनुस्मृति आहे पाखांडाची मुळी ॥ गिर्वाणाचे तळीं ॥ विळपळे ॥ ३२ ॥
कणकणीच्या गाई ब्राह्मण भक्षीती ॥ कां रे चिडवीती ॥ मुसलमाना ? ॥ ३३ ॥
आर्य गाई खाती, वरी शुद्ध होती ॥ क्षुद्रा लढवीती ॥ जोती दावी ॥ ३४ ॥

(२)

आर्यधर्म श्रेष्ठ भट वाखाणीतो ॥ जुलमी म्हणतो ॥ मोंगलास ॥ ध्रु० ॥
भटपाशांतून शुद्र मुक्त केले ॥ ईशाकडे नेले ॥ कोणी दादा ? ॥ १ ॥
देशामाजी कोणी उन्माद तो केला ॥ शुद्र वागवीला ॥ दासापरी ? ॥ २ ॥
जिंकल्या क्षेत्र्यास पिशाच्य म्हणाला ॥ ग्रंथांनीं नोंदीला ॥ वैरभावें ॥ ३ ॥
अहंब्रह्म हाच कसा निवडीला ॥ तुच्छ मानण्याला ॥ मनुज्यांस ॥ ४ ॥
आपुल्या पूर्वजां वर्णी वेलगामी ॥ हे ते म्हणे स्वामी ॥ निर्मीकाचे ॥ ५ ॥
आर्यांचे पूर्वज मच्छकच्छ व्याले ॥ डुकरीनें दिलें ॥ तिजें बाळ ॥ ६ ॥
खांबांतील किडा मानव बनला ॥ वधी भूपतीला ॥ पोट फाडी ॥ ७ ॥
कपटी वामन अगडबंब झाला ॥ घाली रसातळा ॥ बळीराजा ॥ ८ ॥
आर्यां अवतार परशुरामाचा ॥ वैरी विधवांचा ॥ बाळें वधी ॥ ९ ॥
पडल्या विरास लाथांनीं मारीतो ॥ माकड लढतो ॥ लंकापुरीं ॥ १० ॥
पशूंचा अलाप भटा ऐकूं येतो ॥ टोणगा बोलतो ॥ चारी वेद ॥ ११ ॥

होते आर्य यज्ञीं ब्राह्मणकसाई ॥ हंबरती गाई ॥ भटामागें ॥ १२ ॥
ब्राह्मण बोडक्या काळ्या पाण्या जाती ॥ ऋषी गुण गाती ॥ वर्णू किती ॥ १३ ॥
आतां म्हारमांग किर्तन करीती ॥ शिमगा खेळती ॥ आर्य नांवें ॥ १४ ॥
नाटकांत भट स्त्रीवेश घेती ॥ नाक उडविती ॥ वेश्येपरी ॥ १५ ॥
भट थाप देती भोळ्या इंग्रजांस ॥ नित्य देती त्रास ॥ शुद्रादिकां ॥ १६ ॥
भटजी शिकूनी कामगार होती ॥ शुद्राला नाडीती ॥ सर्वोपरी ॥ १७ ॥
आर्य धर्मलंड शुद्रा फसवीती ॥ यवना निंदीती ॥ खिस्तासह ॥ १८ ॥
मुसलमानांना निच्यांत गणीती ॥ हॉटेलांत पीती ॥ बरांडीस ॥ १९ ॥
मास आंड्यासह बिस्कीटास खाती ॥ पुस्तकें रचीती ॥ मतलबी ॥ २० ॥
इतिहासग्रंथ खुबीनें वाचीती ॥ शुद्रांत पेरीती ॥ राजद्रोह ॥ २१ ॥
भुललेत शुद्र आर्य सेवायास ॥ मुसलमानांस ॥ त्यागावया ॥ २२ ॥
आर्यभट स्थापी न्याशनल सभा ॥ नारदाचा सुभा ॥ टाळ्या पिटी ॥ २३ ॥
क्षत्रीया पाहूनी बळिस्थानीं मुढ ॥ करी धडपड ॥ कळचेट्या ॥ २४ ॥
मुसलमानाला म्हणे एकी करा ॥ एकीकडे सारा ॥ तूर्त धर्म ॥ २५ ॥
भट सोदे साई पोटामध्यें ठेवी ॥ म्लेंच्छांस फसवी ॥ पक्का धूर्त ॥ २६ ॥
डोईचा पदर सदा खांद्यावर ॥ नाग डोक्यावर ॥ वीष पोटीं ॥ २७ ॥
रोज घाली वेणी भांगांत गुलाल ॥ सोडी बहु ताल ॥ चालतांना ॥ २८ ॥
अंगीं कामवीर भवाया कमानी ॥ शर नेत्रांतूनी ॥ सोडी नित्य ॥ २९ ॥
भोळ्या इंग्रजास भाव दावीताती ॥ मेजवान्या देती ॥ दीमाखानें ॥ ३० ॥
भटीण न्हावून धाब्यावरी जातां ॥ केस वाळवीतां ॥ कांती फाके ॥ ३१ ॥
भटणीचा इंगा विचारी दावीदा ॥ काममोहगदा ॥ करी चेंदा ॥ ३२ ॥
भटणीला आहे कंचुकी सोरट ॥ सोवळ्याचा वीट ॥ भटा नाहीं ॥ ३३ ॥
तीर्थयात्रीं आर्य अंगवस्त्रें नेती ॥ फुगड्या खेळती ॥ पंढरीस ॥ ३४ ॥
शुद्राघरीं पुजा खेळ मांडी भट ॥ देवा करी न + ॥ हितासाठीं ॥ ३५ ॥
बळीस्थानीं किती आर्यभट लंड ॥ देवाजीचे भंड ॥ ज्यांनीं केले ॥ ३६ ॥
ढोंगासाठीं खळ वर्दळीस येती ॥ यवना निंदीती ॥ चुलीपाशीं ॥ ३७ ॥
यवनी भाषेंत लिहितां अहंता ॥ आर्याजीच्या सुंता ॥ करितील ॥ ३८ ॥
मोठमोठे वीर जंगी झाले ठार ॥ पडद्याचा सार ॥ ऐक भटा ॥ ३९ ॥
अल्पसा पडदा तारी तरुणास ॥ विषयलंपटास ॥ रीग नाहीं ॥ ४० ॥
कदापि पडदा सज्जनीं नसावा ॥ समूळ त्यागावा ॥ जगामाजी ॥ ४१ ॥
ओंगळ सोवळें तुझें फार द्वाड ॥ मोडी हाडोहाड ॥ अंत्यजाचें ॥ ४२ ॥
हलाल कंदुरी शूद्रादीक खाती ॥ दुरूनी वाढीती ॥ फकीरास ॥ ४३ ॥
सावकारी खूण शूद्रास लुटीतो ॥ भटास वाढीतो ॥ तूपपोळ्या ॥ ४४

अनाथांचीं मुलें दुरून पहाती ॥ लाळीस घोटीती ॥ मुकाटयानें ॥ ४५ ॥
भटजी शुद्रांच्या पोरा आधीं खाती ॥ उष्टेमाष्टें देती ॥ यजमाना ॥ ४६ ॥
सदोदित म्हणे + + + आशिक्षित ॥ बोधितो पत्रांत ॥ अडबंका ॥ ४७ ॥
राष्ट्रसभेसाठीं मित्र होऊं जातो ॥ येईन म्हणतो ॥ मद्रासेस ॥ ४८ ॥
जसे मांग म्हार याचे नव्हे दादा ॥ पुन्हां शत्रुभेद ॥ जागा देतो ॥ ४९ ॥
आर्य ब्राह्मणांनीं शुद्र नागवीले ॥ नित्य बोंबलले ॥ शिमग्यांत ॥ ५० ॥
ताबुता करून नाहीं उमजले ॥ फकीर ते झाले ॥ इमामाचे ॥ ५१ ॥
नटी नारसिंह सोंगास बा घेती ॥ तेंच गाणें गाती ॥ ताबुतांत ॥ ५२ ॥
सोमरस दारू यज्ञीं भट पिती ॥ गाईमांस खाती ॥ हाय हाय ॥ ५३ ॥
थोतांडें रचिती देवा लाथ देती ॥ भट लांच खाती ॥ हाय हाय ॥ ५४ ॥
धूर्त भट शास्त्री निलाजरे होती ॥ खोटे लेख देती ॥ हाय हाय ॥ ५५ ॥
विषारी नागास फेकी दुधपेढा ॥ भट म्याला वेडा ॥ हाय हाय ॥ ५६ ॥
++++++आर्या देई गोता ॥ करूं नको आतां ॥ हाय हाय ॥ ५७ ॥
आर्य धर्म श्रेष्ठ ॥ ध्रु० ॥

## श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, संस्थान बडोदें, यांना पत्र

येऊं द्या दया मना, दया मना ॥ भटें केली दैना ॥ ध्रु० ॥
विद्याबंदी मूळ पाया केला दैनवाणा ॥
आर्योजींनीं शुद्रा आणिला खरा पशूपणा ॥ १ ॥ येऊं द्या० ॥
मौजेसाठीं खर्च, स्त्रियांची करिती हेळणा ॥
तमाशांत मर्द नाचती उणें पुरुषांना ॥ २ ॥ येऊं द्या० ॥
वेसवेचें गाणें ऐकतां मळवी नीतींना ॥
मुळ पातकी होती दोष देती गरतींना ॥ ३ ॥ येऊं द्या० ॥
वसूलाचा पैसा खर्चून खिचडी ऐद्यांना ॥
कष्ट करी शेतीं खाती चटणी–भाकरींना ॥ ४ ॥ येऊं द्या ॥
वर्षासनें भटजी नेती खुल्ला खजीना ॥
शेतकरी कष्ट करूनी करिती भरणा ॥ ५ ॥ येऊं द्या० ॥
शेतांतील बैल मरती औतां आगोलींना ॥
गोप्रदानें भटजी खाती सोयरीं कीं माना ? ॥ ६ ॥ येऊं द्या० ॥
पक्वान्नांचीं नित्य भोजनें आर्यभटांना ॥
जन्मान्तरीं शेतकऱ्याला तुकडा मिळेना ॥ ७ ॥ येऊं द्या० ॥

हात जोडून भटास देती रोख दक्षणा ॥
सार्वजनीक सूट नाहीं कधीं कुळंव्यांना ॥ ८ ॥ येऊं द्या० ॥
नाचे पोरें भटाभिक्षुकां शालजोड्या दाना ॥
उत्तम शेती करितो त्याला बक्षिस कां द्याना ॥ ९ ॥ येऊं द्या० ॥
दारूवर कर लादितां वढती दुर्गूणा ॥
परिणामीं काय होईल कैसें उमजेना ॥ १० ॥ येऊं द्या० ॥
अक्षरशुन्य शुद्रादिकां कांहींच कळेना ॥
अशा मुक्यांचे बाप आतां तुम्हीच कां व्हाना ॥ ११ ॥ येऊं द्या० ॥
कष्टाळूंची दैना दाविली मुख्य प्रधाना ॥
दयानिधी आहां म्हणूनी लिहिलें पदांना ॥ १२ ॥ येऊं द्या० ॥
गेली घडी पुन्हां येईना माहीत सर्वांना ॥
सर्वकाळ पुर वाहीना पर्वतीं दऱ्यांना ॥ १३ ॥ येऊं द्या० ॥
उदकाची किंमत ती ठावी रणीं शिपायांना ॥
काशीकर तुच्छ मानितो गंगाबाईंना ॥ १४ ॥ येऊं द्या० ॥
जोतीराव सयाजीरायाला करितो प्रार्थना ॥
वाहत्या गंगेमध्यें एकदां हात कां धुवाना ॥ १५ ॥ येऊं द्या० ॥

## बडोद्याचे दिवाण लक्ष्मण जगन्नाथ, यांना पत्र

आधीं बोधुं लक्षुमणी लक्षुमणी। घाव घालूं निशाणी ॥ ध्रु० ॥
जोड शूद्राला सयाजीरावांची भटांच्या ध्यानीं ॥
कुत्रीम्याचे नेत्र रोखुं चालूं पविऱ्यानीं ॥ १ ॥ आधीं० ॥
वडील त्यांचे बहादूर तरवार ढालांनीं ॥
दीन शुद्रां जागे करूं आज सत्य अमृतांनीं ॥ २ ॥ आधीं० ॥
देशसुधारासाठीं आमच्या रात्रंदिन ध्यानीं ॥
मांगभटां ऐक्य करूं बसवूं पंक्तींनीं ॥ ३ ॥ आधीं० ॥
पुनरपि आम्ही गुरजरप्रांतीं देऊं व्याख्यानीं ॥
मुख्यप्रधाना येश येऊ, जोतीराव मनीं ॥ ४ ॥ आधीं० ॥

## गंगाराम भाऊ म्हस्के, वकील, यांस उत्तर

उत्तर देतों गंगोबांना, गंगोबांना ॥ म्हस्के वकीलांना ॥ उत्तर...॥ ध्रुपद ॥
पोट भरेना म्हणून भटजी सोडी ईराणा ॥ बळीस्थानीं येऊनी
यांनीं केला धिंगाणा ॥ १ ॥

कपटनीतीनें यांनीं जिंकिलें क्षत्रिय मर्दांना ॥ दास केल्या क्षुद्र गणणें
बट्टा शिपायांना ॥ २ ॥

कष्ट करीना आपुल्यासाठीं मिरवी दिमाखांना ॥ शुद्रा घरीं भिक मागणें
बट्टा भटांना ॥ ३ ॥

उठा झडकरी, त्यागा सर्व, जागवा शुद्रांना ॥ पोटावरतीं नजर देणें
भय संतानांना ॥ ४ ॥

भटुजी दास राहण्या शुद्रबांधवांना ॥ कल्पनेचे ग्रंथ स्थापुन
वेडे करी त्यांना ॥ ५ ॥

नॅशनल सभा नवी काढिली सांगे यवनांना ॥ इंग्रजांचे दोष काढी ॥
बोधी कारस्थाना ॥ ६ ॥

+ + + व करी मना ॥ तो त्यापरी ब्रह्म घोकणें
पोषी ढेकुणांना ॥ ७ ॥

ढोंगासाठीं सोवळें दावी फसवी मुढांना ॥ पोटासाठीं ब्रह्म त्यागी
खाई बिस्कुटांना ॥ ८ ॥

कष्टा सांडुन भिक मागणें बट्टा मनुजांना ॥ दीन शुद्रा उष्टें वाढणें
भटजी लाजेना ॥ ९ ॥

कसवी + + + मुखविटाळ मानीना ॥ शुद्र राजांना नीच मानी
घेईना पंक्तींना ॥ १० ॥

शुद्र शिकतां नोकरी घेतील धाक मंडूकांना ॥ कारभारी चोर नेमणें
नाडी अबलांना ॥ ११ ॥

सिवील सर्वीस भटा पाहिजे गाती पाळणा ॥ कोळशास नित्य धुतलें
सफेद होईना ॥ १२ ॥

लाथ विष्णूला भूदेव मारतो दावी धूर्तपणा ॥ अशा दुष्टा देव मानणें
ईशा उणेपणा ॥ १३ ॥

शुद्र म्हणतो धर्म रक्षणें क्षेत्र्याचा बाणा ॥ धूर्त आर्यांचा पक्ष घेई
ठोकी मुसलमाना ॥ १४ ॥

नसेल तेथें कुळ काढणें भटजीच्या ध्याना ॥ आपण एकीकडे राही
लढवी मूर्खांना ॥ १५ ॥
पेशवाईची पुन्हा स्थापना बंडखोर नाना ॥ परशुरामी खुण देतो
इंग्लीश पोरांना ॥ १६ ॥
निःक्षत्रिय ते पृथ्वी म्हणती करिती विटंबना ॥ बेलगामी वर्मी टोंचीती
जाची शुद्रांना ॥ १७ ॥
+ + + व्हाना ॥ अरेरावी लेख तोलून
योजा उपायांना ॥ १८ ॥
भटपाशा सोडून तुम्ही यावें मैदाना ॥ शुद्र बांधवां सत्य सांगून
खुले कराना ॥ १९ ॥
शुद्र जनांची आज करिती भटजी हेळणा ॥ जोती म्हणे पुढें सांगूं
धूर्त आर्यांना ॥ २० ॥

## मे० रावसाहेब गंगाराम भाऊ म्हस्के यांस पत्र पाठविलें, त्यासंबंधीं

### ॥ अखंड ॥

आजारी शत्रूच्या जाई खबरीस ॥ साह्यकारी त्यास ॥ खरा शूर ॥ १ ॥
झालें गेलें सर्व आणूं नये मनीं ॥ सूड कारस्थानीं ॥ वर्तू नये ॥ २ ॥
नीट झाल्यावर त्यास उभा करी ॥ कुस्तीगीरापरी ॥ त्याशीं लढे ॥ ३ ॥
सत्यआचरणीं यश मिळवावें ॥ जगा दाखवावें ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

# विभाग ४ था

## शूद्रातिशूद्रांस उपदेश

### ॥ अखंड ॥

आर्यांच्या इराणीं नाहीं भेदाभेद ॥ घ्यावा हाच शोध ॥ वेदामध्यें ॥ १ ॥
गोंड भिल्ल क्षेत्री होते मुळ धनी ॥ इराणी मागुनी ॥ आले येथें ॥ २ ॥
धिंगाणा मांडीला आर्य भटोबांनीं ॥ स्वदेशाभिमानी ॥ रक्षूं गेले ॥ ३ ॥
यज्ञभंग केले झोडीले लुटीले ॥ दस्यू नांव दिलें ॥ ब्राह्मणांनीं ॥ ४ ॥
दस्यूचा अपभ्रंश "दुष्ट" दुर्गूणी ॥ शब्द आर्यजनीं ॥ देई साक्ष ॥ ५ ॥
दस्युची गलती दोस्त दुष्मन ॥ निघे अनुमान म्लेंच्छवाणी ॥ ६ ॥
आर्यभटोबाचें वर्चस्व झालें ॥ क्षत्रीय दास केले ॥ म्हणे क्षुद्र ॥ ७ ॥
क्षुद्राचा अपभ्रंश शुद्र बा झाला ॥ प्रचारांत आला ॥ अखेरीस ॥ ८ ॥
गर्भीणी स्त्रीयांस धुंडून काढील्या ॥ जप्तीस ठेवील्या ॥ अटकेंत ॥ ९ ॥
पोटीं पुत्र होतां परशुरामानें ॥ वधीलीं शस्त्रानें ॥ तान्हीं बाळें ॥ १० ॥
वध केला साच रेणुकामातेचा ॥ लाडका पित्याचा ॥ देव कैचा ॥ ११ ॥
वैरभावें दिलीं दुर्जीं नावें तुच्छ ॥ राक्षस पिशाच्य ॥ महा अरी ॥ १२ ॥
पोटापुरतें देई त्यांचे कष्टांतून ॥ घेई हिसकून ॥ बाकी सर्व ॥ १३ ॥
पशुपेक्षां नीच शिक्षेचा बा ठोका ॥ मागें अमेरिका ॥ जगामाजीं ॥ १४ ॥
सर्वोपरी छळ नित्य विटंबना ॥ केली निर्भर्त्सना ॥ सर्वकाळ ॥ १५ ॥
जाच नाना परी विद्या बंद केली ॥ दया नाहीं आली ॥ क्षणमात्र ॥ १६ ॥
मेली होती काय त्यांची क्षमा दया ? ॥ काढीं मनुराया ॥ मनु तुझें ॥ १७ ॥
सार्वजनिक सभा स्त्री विटाळशी ॥ वाकडी म्हारार्शी ॥ मधीं का रे ॥ १८ ॥
विध्वांचे परी न्याशनल कांग्रेस ॥ पळे बंगाल्यास ॥ नाच करी ॥ १९ ॥
ॐ नमो तो नाहीं मांगम्हारास ॥ सिवील सर्व्हीस ॥ कोणासाठीं ? ॥ २० ॥
सावली न घेती मांगमहाराची ॥ प्रित बंधुत्वाची ॥ जोडे कैसी ॥ २१ ॥
सार्वजनीक सभा बोधी सरकारास ॥ सर्व वम् फुस ॥ ब्रह्मकुट ॥ २२ ॥
नवल करीजे नटवयाचे परि ॥ शुद्र राजे घेरी ॥ अल्लडसे ॥ २३ ॥
वकीलाचा थाट शिष्टाई करीती ॥ लिवानेरा देती ॥ हूल थापा ॥ २४ ॥
आर्याजींची नीति अति अमंगळ ॥ कथीली गोपाल ॥ देशमूखें ॥ २५ ॥

नॅशनल सभा इंग्रजा कां बोधी ॥ सत्य वर्ता आधीं ॥ एकीसाठीं ॥ २६ ॥
आर्य भटासाठीं सिवील सर्विस ॥ धोका हा देशास ॥ भीक माझी ॥ २७ ॥
नित्य किती सांगूं शूद्रां विनवून ॥ खरे हे पाषाण ॥ मूर्तीमंत ॥ २८ ॥
ळीवार्नेर साचा निर्मळ बुद्धीचा ॥ कैवारी शुद्रांचा ॥ दीनबंधु ॥ २९ ॥
विद्वान शुद्रांनों जागे कां रे व्हाना ॥ तपासोनी पहाना ॥ ब्रह्मघोळ ॥ ३० ॥
अज्ञानी स्त्रियांचे नाच की नाचाल ॥ सर्वस्वी नाडाल ॥ संततीला ॥ ३१ ॥
पशूच्या चर्मांचे जोडे कीं रे होती ॥ तुमची फजीती ॥ क्लेश सर्वां ॥ ३२ ॥
देवापाशीं तुम्ही जाब काय द्याल ॥ गोंधळीं पडाल ॥ सर्वसाक्षी ॥ ३३ ॥
मेल्यामागें तुमची छी थू कीं होईल ॥ स्त्रीया लाजतील ॥ चौघांमध्यें ॥ ३४ ॥
पशू नव्हे तुम्ही मानव कमाल ॥ देणगी अक्कल ॥ विध्वा केली ॥ ३५ ॥
अज्ञानांचे राजे श्रीमंत कां झालां ॥ जन्मतः नाहीं मेलां ॥ एक दुःख ॥ ३६ ॥
इंग्रजांचे श्रम पहा डोळेभरी ॥ होऊनी आभारी ॥ माना त्यास ॥ ३७ ॥
कृतघ्न पेशवे होऊं नका मनीं ॥ मागतसों दानीं ॥ एवढेंच ॥ ३८ ॥
मानवपदाची जरा लाज धरा ॥ विद्वान तीं करा ॥ मुलींमुलें ॥ ३९ ॥
गिर्वाणी शिकतां कळेल तुम्हाला ॥ आठवाल बोला ॥ माझ्या तुम्ही ॥ ४० ॥
ऐकूं दिलें नाहीं एकहि शब्दाला ॥ वेदबखरीला ॥ लपविलें ॥ ४१ ॥
द्विजकूट तुम्ही आणावें मैदानीं ॥ आली ही पर्वणी ॥ जोती सांगे ॥ ४२ ॥

## आदिसत्याच्या आरत्या

### (१)

जय हो जय हो माझ्या आदीसत्या ॥ तुझ्या सत्तेनें शोधूं उत्पन्नकर्त्या ॥ धृ० ॥
विजयी द्वीज होतां क्षेत्री निषेधीले ॥ विद्या बंद करुनी क्षुद्रवत केले ॥ १ ॥
आर्यांनीं शुद्राला पशुवत केलें ॥ भूदेव होऊनी पाय पुजवीले ॥ २ ॥
अहंब्रम्ह होऊनी भोंदीला मुढाला ॥ नाहीं भीत कधीं ते सद्वीवेकाला ॥ ३ ॥
ब्राम्हणभोजन चंगळ करवीती ॥ ब्रह्मराक्षसाला मागें हटवीती ॥ ४ ॥
मृतांच्या नांवानें दानधर्म घेती ॥ अधम होऊनी मधींच खाती ॥ ५ ॥
खाऊं दिलें नाहीं श्रमी क्षुद्राला ॥ अंध पंगुसह पोरक्या मुलाला ॥ ६ ॥
सत्योदय होतां कुंठे वेदमती ॥ पाहूं जातां अवघी दिसे खोटी ॥ ७ ॥
सत्या तुझा महिमा पुराणें ऐकुनी ॥ तोंडें करिती काळीं तेलमाखणांनीं ॥ ८ ॥
तुला पाहून कुंठित होती पाखांडी ॥ लज्जित होऊन खालीं घाली मुंडी ॥ ९ ॥
दया तुझी होतां मुढ जनांवर ॥ भूदेव कांपती मनीं थरथर ॥ १० ॥

कृपेचा सागर बा तूं सत्य जाण ॥ मुक्त केले आम्हां ब्रह्मपाशांतून ॥ ११ ॥
तुझ्या प्रसादानें मार्ग उमजलों ॥ मातापित्या आम्हीं सेवूं लागलों ॥ १२ ॥
जय हो० ॥

(२)

सेवूं या सत्यराजा ॥ महाप्रांजळ तेजा ॥ शोधीती निर्वानी ॥ मन वेधीले काजा ॥
लोपले सत्य जनीं ॥ हित नेणती कोणी ॥ धर्म रचीले बहु ॥ आपहित साधूनी ॥
शोधीतां सत्यवर्मा ॥ पावलों गुजवर्मा ॥ विटलों खोट्या धर्मा ॥ त्यागीले नीच कर्मा ॥
देवा नित्य स्मरूनी ॥ धरा सत्यमताला ॥ खोटा धर्म सोडूनी ॥ धरा बंधुप्रितीला ॥
अहंब्रह्म होऊनी ॥ त्यागूं नको दीनाला ॥ सोवळे रे बनूनी ॥ चढूं नको गरवाला ॥
इडापिडा मर्दून ॥ सेवा बळीराजाला ॥ स्वतः श्रम करुनी ॥ पोस स्वकुटुंबाला ॥
सदा सत्य वदोनी ॥ सोड धूर्त मताला ॥ विद्या क्षुद्रा देऊनी ॥ लाजवी भू-देवांला ॥
शुद्रजना सेऊनी ॥ अर्पी ईश्वराला ॥ भंडमत खोडूनी ॥ जोती नमे ईशाला ॥ सेवूं०॥

# विभाग ५ वा

[जोतीरावांच्या कवनांतील स्तबकें उद्धृत करून त्यांवर सटीक भाष्य करणारा एक लेख विविधज्ञानविस्तारांत 'नवीन शाईर' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झाला होता. त्यांतील टीका गाळून मूळ कवनांतील स्तबकें खंडित स्वरूपांत येथें देण्यात येत आहेत.]

इंग्लिश राज्य झालें ॥ ब्राह्मण मनामध्यें झुरती ॥ दोष पहा राणीला देती ॥
सर्व मलायी खाती ॥ इंग्लिशां दूध पाजिती ॥ डोईवर खापर फोडीती ॥
सर्व भ्रष्ट कामें करिती ॥ नीच रुवांस मानीती

\+ + +

[गांवचे कुळकर्णी—]

\+ + कज्जे लाविती ॥ पाटीला चित्र नाचविती ॥ तयारी रपोटाची करिती ॥
स्वजातीस मामलेदारी ॥ कुळकर्णी माजले भारी ॥
उभयतां नरोट्या देती ॥ सरकारी आणि सावकारी नातें ॥
\+ + + रयत गांजली सारी ॥
\+ + +
सर्व जागा आप्तांला देती ॥ जमाव जातीचा करिती ॥
\+ + +
लोडासी टेकून दिमाखानें बसती ॥ लंगोट्या पाहून हसती ॥
बगले कानीं लागती ॥ स्वजाती कैंदीस ताजीम देती ॥
शूद्रावर फाडिती ॥

\+ + +

[चिटणीस—]

\+ + मेजवान्या देती ॥ पायथीं रांडांच्या पडती.
अर्जी वाचतां मजकूर गाळीती ॥ कलेक्टर ढेरे गणपती ॥
हातचलाखी करून वरती ॥ सही त्याची घेती ॥ करिती अर्जाची माती ॥
\+ + +
देती शुद्रास शिक्षा हटकुनी ॥ न्यायाधीश उठे झटकुनी ॥
पुस्ती कायदे कलम देउनी ॥

\+ + +

महारमांगांची दाद घेतां सोवळें दाविती ॥ यवनी रांडा ठेवीती ॥
न्याय करितां—शिप्यानें समजूत उजरती ॥ राग येतां दुरून
जोडे फेकून मारिती ॥ दयेला नाहीं जरा वस्ती ॥

\+ + +

इंग्लिशां नांव ठेविती ॥ दोष राणीला देती ॥

\+ + +

पार्लमेंटामधीं सभासद होऊं पाहती ॥ कलकटरी जागा मागती ॥ (केवढी) छाती ॥

\+ + +

ज्याचा माल त्याचे हाल, मुलें भलत्याचीं शिकती ॥
माळीकुळंबी यांच्या पोरांना मिळेना लंगोटी पुरती ॥
जोडा नाहीं पाय पोळती ॥
थोडीशीं पोरें जमवून मोठी संख्या रपोटांत लिहिती ॥
म्हाराच्या पोरांचा विटाळ मानीती ॥ इंग्रजा शेकह्यांड करिती ॥

\+ + +

ब्रह्मयास मधीं वर्णिती हो ॥ इतर धर्मास निंदिती हो ॥
शूद्र पोरां खोटा धर्म हळूच शिकविती ॥ द्वेष राणीचा भरविती ॥

\+ + +

शूद्र लेकरा मुका मार देऊन पळविती ॥
चापट्या गुद्दे मारिती ॥ जोरानें कान पीळिती ॥
परंतु स्वजातीला शिक्षा बोधानें करिती ॥

\+ + +

गुणी म्हणे शाळामास्तर ॥ पंतोजी चढविला फार ॥

\+ + +

शूद्रांची जात वेडी हो ॥ लिहिण्याची नाहीं गोडी हो ॥
अशी खोटीच लिहितो चहाडी ॥
सिद्धसाधक होऊन जातीची करितो बढती ॥ कोण घेईना यांची झडती ॥

\+ + +

आठ वाजल्यानंतर ॥ आणि मग खुर्ची आसनावर बसती ॥
हाजरीं पोरेंसोरें घेती ॥ ब्राह्मणांचीं मुलें शिकवितां दहा वाजविती ॥
अगदीं थकल्यासारखे दाखविती ॥ सावली—घड्याळा पाहती ॥
शाळेला झटकन सोडिती ॥

\+ + +

जेऊन झोपती गार ॥ नंतर न्यूजपेपर ॥ लिहिती पत्र अखेर ॥

थंडाई पडल्यावर ॥ शाळेंत जाती घडीभर ॥ शिकविती भावलें तर ॥

\+ + +

शूद्राच्या शिकण्याची माती हो ॥

\+ + +

गाळ्याकुणब्या बोध करून रात्रीं पोथ्या वाचिती ॥

भलतीच थाप देती ॥ देती सिध्यावर दक्षिणा घेती ॥ शूद्राला उघड नाडिती ॥

अशा तऱ्हेच्या ढोंगी लोकां शिक्षक नेमिती ॥

सुधारले मंडूक सर्पां ज्ञान शिकविती ॥

घरामधें दगडी पुजिती ॥ धर्म बुडाला म्हणती ॥ उगीच हाका मारिती ॥

\+ + +

गव्हार खरें हें भोळें सरकार ॥ चहूंकडे भटभाई ॥ कुणब्याची दाद नाहीं ॥

\+ + +

नीति राव जोतीची, मतलबी मनामधीं झुरती ॥ दुसरे ख्रिस्ती तरफडती ॥

\+ + +

सुचवितों राणीबाईला ॥ सोपूं नको ब्राम्हणाला ॥ फसूं नको त्यांच्या तर्काला ॥

जातजातीच्या संख्याप्रमाण कामें नेमा ती ॥ खरी ही न्यायाची रीति ॥

\+ + +

नेमा गुरु अन्य जातीचे ॥ नमूने सात्विक ज्ञानाचे ॥ निवळ माळ्या कुणब्याचे ॥

दुसरे महार मांगांचे ॥

\+ + +

लोक तुला गाण्यामध्यें गातील हो ॥ जगामधीं कीर्ती होईल हो ॥

\+ + +

जोती म्हणे धाव घेई ॥ दुष्टापासून सोडवी.

[*विविधज्ञानविस्तार*, पु. २, अं. ८ (फेब्रु. १९६९), पृ. ११९–१२२ वरून]

# परिशिष्टे

# महात्मा फुले यांचे अनुपलब्ध लेखन

## १. तृतीय रत्न नाटक

अठराशे पंचावन्न साली त्यांनी (म. फुल्यांनीं) 'तृतीय रत्न' नांवाचे नाटक लिहिले. त्यांत ब्राह्मणांनी देवाच्या नांवाने जे समज पसरविले होते आणि अंधश्रद्धा निर्माण केल्या होत्या, त्या सर्व त्यांनी उजेडात आणल्या.

त्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, एक ब्राह्मण भिक्षुक एका खेड्यात फिरत असता एका शेतकऱ्याच्या गरोदर पत्नीला पाहतो. तो तिला सांगतो की, तुझ्या भावी मुलाचा जन्म तुझ्या नवऱ्याला घातक ठरणार आहे. हे भविष्यकथन ऐकून ती भेदरून जाते. तो ब्राह्मण भिक्षुक तिला सांगतो की, हे संकट दूर व्हावे म्हणून तुझ्या कुटुंबाच्या वतीने मी देवाची प्रार्थना करतो. असे म्हणून तो तिचे सांत्वन करतो. त्याची सूचना ती मान्य करते. शेतकऱ्याच्या घरी ही प्रार्थना आणि ब्राह्मणभोजन चालले असताना एक खिस्ती धर्मोपदेशक तेथे योगायोगाने येतो. वादविवादास प्रारंभ होतो. ब्राह्मणाची लबाडी उघडकीस येते.

जोतीरावांनी शेवटी त्या चर्चेपासून असा निष्कर्ष काढला की, मूर्तिपूजेपेक्षा ज्ञान हे श्रेष्ठ होय. जोतीरावांनी शेवटी तो शेतकरी आणि त्याची पत्नी यांना आपण खास काढलेल्या प्रौढांच्या रात्रशाळेत शिकावयास जाण्याचा उपदेश केला.

[धनंजय कीर, *महात्मा जोतीराव फुले*, मुंबई, १९६८, पृ० ८४.]

## २. अस्पृश्यांची कैफियत

अठराशे पंचाऐंशी सालच्या पूर्वार्धात जोतीराव एकदोन पुस्तिका लिहीत होते. 'अस्पृश्यांची कैफियत' नांवाची एक पुस्तिका त्यांनी थोड्याच दिवसांत प्रकाशित केली. अस्पृश्यांच्या दारुण हालअपेष्टांवर त्यांनी त्यात प्रकाश टाकला आहे. एक महार आणि एक मांग हे भारताच्या दौऱ्यावर असलेल्या महाराणी व्हिटोरियाला आपल्या वस्तीत

येण्याचा आग्रह करीत आहेत, अशी कल्पना केली आहे. ते तिला अत्यंत आर्जवाने आमंत्रण देतात. आणि मोठ्या भक्तिभावाने आपल्या वस्तींना भेट देण्याचा तिला आग्रह करतात. तुमच्या राज्यांत आमची कांहीं सुधारणा झाली आहे का, ते पहा, अशी तिला विनंती करतात.

महाराणी त्यांच्या वस्तींना भेट देते. पेशव्यांच्या राज्यात अस्पृश्यांना फार निर्दयतेने वागवीत असत, असे त्यांनी तिला सांगितले. त्यांना कुत्र्यामांजराचे जीवन जगावे लागे. त्या काळीं त्यांना इमारतीच्या पायाखालीसुद्धा जिवंत गाडीत असत. त्यांना बळें वेठीस धरीत असत. ब्रिटिश राजवटीत त्यांचे जीवन सुरक्षित झाले. परंतु रस्त्यांतून त्यांना अजून मोकळेपणाने चालता येत नव्हते, बाजारांत ते मोकळेपणाने फिरू शकत नव्हते. दारिद्र्यामुळे ते आपली मुले शाळेत पाठवू शकत नव्हते. त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीसारखीच दुःसह होती. त्यांच्याजवळ उपजीविकेची काही साधने नव्हती. गावाच्या सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना काही प्रवेश मिळत नव्हता. 'आमचे दारिद्र्य आणि आमची दुःखे आम्हांस इतर माणसांप्रमाणे माणसांचे हक्क देवून दूर करावीत. अशी त्यांनी महाराणीला प्रार्थना केली. आपले सरकार तुमच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करील आणि ती दूर करील, असे आश्वासन महाराणीने दिले.

[धनंजय कीर, *महात्मा जोतीराव फुले*, मुंबई, १९६८, पृ० २४७–४८.]

## ३. मद्यपानगृहांच्या वाढीस विरोध दर्शविणारे पत्र

[पुण्यातील मद्यपानगृहांत वाढ करण्याच्या सरकारी धोरणाला विरोध करणारे हे पत्र म० फुले यांनीं पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लंकेट यांना १८ जुलै, १८८० रोजी लिहिले होते.]

"नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या उद्देशाने बराच मोठा नोकरवर्ग नेमला आहे. लोकांचे आरोग्य सांभाळण्याचे दृष्टीने तसे एक खाते-सुद्धा ती चालवीत आहे. तथापि ज्या पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते, त्यात आता भरवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अधःपाताची सर्व बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे, त्याला बाध येत आहे.

"दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे; एवढेच नव्हे, तर त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे, हे माझे म्हणणे बहुतेक लोक आप-खुषीने मान्य करतील. दारूचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड

प्रमाणात वाढली आहे की, त्यामुळे अनेक कुटुंबांचा संपूर्ण नाश झाला आहे. आणि ह्या दुर्गुणाला आता शहरात सराईतपणा आला आहे.

"ह्या व्यसनाच्या प्रसाराला काही प्रमाणात तरी आळा बसावा, म्हणून मी नगरपालिकेला अशी सूचना करतो की, नगरपालिकेने या दारूगुत्त्यांवर, ते ज्या प्रमाणात हानी करतात, त्या प्रमाणात कर बसवावा. मला असे कळते की, कुठल्याही नगरपालिकेने अशा गुत्त्यांवर कर बसविलेला नाही; मात्र त्यांच्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो. या बाबतीत आवश्यक तर नगरपालिकेने चौकशी करावी. माझा हा ठराव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आपला आभारी होईन."

[धनंजय कीर, *महात्मा जोतीराव फुले*, मुंबई, १९६८, पृ. १८५–१८६.]

परिशिष्ट क्र. २.

# हंटर–शिक्षणआयोगापुढे सादर केलेले निवेदन[१]

माझा शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव पुणे आणि पुण्याच्या परिसरातील खेडी यांपुरताच प्रामुख्याने आहे. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी या पुण्यात स्त्रियांसाठी एक शाळा स्थापन केली होती, पण जिला स्वकीय म्हणता येईल अशी एकही मुलींची शाळा त्या काळी येथे नव्हती. म्हणून तशी शाळा स्थापन करण्याची प्रेरणा मला सन १८५४ च्या सुमारास झाली व मी आणि माझी पत्नी अशा उभयतांनी कित्येक वर्षेपर्यंत त्या शाळेत काम केले. कालांतराने त्या शाळेची व्यवस्था मी एतद्देशीय सुशिक्षितांच्या एका समितीकडे सोंपविली. या समितीच्या विद्यमाने शहराच्या इतर भागांत अशाच आणखी दोन शाळा उघडण्यात आल्या. या मुलींच्या शाळांच्या स्थापनेनंतर एका वर्षांत कनिष्ठ वर्गातील आणि विशेषतः महारमांगांच्या मुलामुलींना एकत्र शिक्षण देणारी एक स्वकीय शाळा मी स्थापन केली. थोड्याच काळात याच वर्गातील मुलांसाठी आणखी दोन शाळा उघडण्यात आल्या. माजी शिक्षामंडळीचे अध्यक्ष सर अर्स्किन पेरी आणि सरकारचे तत्कालीन सचिव श्री० लुम्सडेन यांनी मुलींच्या शाळांना भेटी देऊन, शिक्षणक्षेत्रात सुरू झालेल्या या नव्या चळवळींबद्दल समाधान व्यक्त केले आणि शालजोडी देऊन माझा गौरव केला. या संस्थामध्ये मी सुमारे नऊदहा वर्षे कार्य करीत होतो; पण काही विशिष्ट परिस्थितीमुळे—जिच्या तपशीलवार उल्लेखाची येथे जरूरी नाही—ते कार्य मी सोडले. सध्या समितीने मुलींच्या शाळांची व्यवस्था शिक्षणखात्याकडे सुपूर्द केली असून मिसेस् मिचेलच्या देखरेखीखाली त्या शाळा अद्यापही चालू आहेत. महारमांगादि कनिष्ठ वर्गीयांची शाळासुद्धा आजपर्यंत चालू असली, तरी तिची स्थिती फारशी समाधानकारक नाही. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेल्या वसतीगृही शाळेत मी काही वर्षे शिक्षकाचे काम केलेले आहे. आता उल्लेखिलेल्या शाळांमध्ये मी जे कार्य केले, तोच शैक्षणिक क्षेत्रामधला माझा महत्त्वाचा अनुभव म्हणता येईल. याशिवाय या इलाख्यातील प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातही मी लक्ष घातले आहे व प्राथमिक

---

१. मागे (पृ. १६८ ते १८१) दिलेल्या इंग्रजी निवेदनाचे हे मराठी भाषांतर केवळ मराठी वाचकांसाठी मुद्दाम देण्यात येत आहे—संपादक

शाळांतील एकंदर शिक्षणपद्धती आणि शिक्षणखात्यामार्फत नेमली जाणारी माणसे यांविषयी मतप्रदर्शन करण्याइतपत त्या क्षेत्राचे निरीक्षण करण्याची संधी मला लाभलेली आहे. काही वर्षांपूर्वी ब्राह्मणांच्या धार्मिक कृत्यांचा दंभस्फोट करणारी एक पुस्तिका मी लिहिली होती व तींत अन्य विषयांबरोबरच प्रचलित शिक्षणपद्धतीसंबंधीही विचार मांडले होते. प्रचलित शिक्षणपद्धतीत उच्च शिक्षणावर बारेमाप खर्च केला जात असून ती फक्त ब्राह्मणांना आणि उच्च वर्णीयांनाच सुशिक्षित बनविते व सर्वसामान्य लोकांना अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या खातेऱ्यात लोळत ठेवते. सदरील पुस्तिकेत मांडलेल्या एतद्विषयक मतांचा सारांश मी इंग्रजी प्रस्तावनेत दिला होता. त्या प्रस्तावनेचा, प्रस्तुत चौकशीशी संबंधित असलेला भाग येथे उद्धृत करीत आहे :

"...या बाबतीत जो अनवस्था प्रसंग ओढवलेला आहे, त्याचा काही तरी दोष सरकारच्या पदरी बांधता येईल, अशी वस्तुस्थिती आहे. उच्च शिक्षणार्थ पैशाची आणि सवलतींची खैरात करण्यात आणि सामान्य जनतेच्या शिक्षणाची आबाळ करण्यात सरकारचे जे काय हेतू असतील, ते असोत; पण सामान्य जनतेचे न्याय्य हित साध्य करण्याच्या दृष्टीने तसे करणे अनिष्ट आहे, असेच कोणीही म्हणेल. हिंदी साम्राज्याच्या महसुलापैकी फार मोठा हिस्सा, घाम गाळणाऱ्या श्रमिक रयतेच्या कष्टामधून उभा राहत असतो, ही गोष्ट सर्वमान्य आहे. एक माहितगार इंग्रज लेखक म्हणतो, "आमचे उत्पन्न शिलकी नफ्यातून येत नाही, ते येते मूळ भांडवलातून. ते चैनीच्या वस्तूवरील करांतून उभे राहत नाही; ते उभे राहते अत्यंत निकृष्ट अशा गरिबांच्या गरजेच्या वस्तूंवरील करांतून. हे उत्पन्न पापाचे आणि अश्रूंचे फळ आहे."

अशा रीतीने मिळविलेल्या उत्पन्नापैकी फारच मोठा हिस्सा सरकार, वरिष्ठ वर्गीयांच्या— कारण आज तरी हेच वर्ग त्याचा लाभ उठवीत आहेत—शिक्षणावर मुक्तहस्ताने उधळीत आहे, ही गोष्ट न्यायाला आणि समदृष्टीला धरून नाही. केवळ वरिष्ठ वर्गीयांच्या शिक्षणास उत्तेजन देण्यात सरकारचा हेतू पाहू लागल्यास असा दिसतो की, त्यांच्यांतून जे विद्वान शिकून तयार होतील, ते धनाची अपेक्षा न करता अल्पावधीतच शिक्षणप्रसारास वाहून घेतील, अशी सरकारची कल्पना आहे. आपण जर वरिष्ठ वर्गीयांत ज्ञानार्जनाची प्रेरणा उत्पन्न केली, तर त्यांची व्यक्तिगत नैतिक पातळी उंचावेल, त्यांच्यांत ब्रिटिश सरकारविषयी प्रेमादराची भावना फार मोठ्या प्रमाणावर वाढीस लागेल आणि स्वतःला लाभलेले बुद्धिमत्तेचे वरदान आपल्या देशबांधवांमध्ये फैलावावे, अशी अदम्य प्रेरणा त्यांच्या ठायी उत्पन्न होईल, असा या बाबतीत त्यांचा दावा आहे." सरकारने बाळगलेल्या या हेतूविषयीं उपरोल्लिखित लेखकाने पुढे म्हटले आहे, "याहून उदात्त, याहून लोककल्याणकारी आणि याहून आदर्शवादी पण स्वप्नाळू वृत्तीचे तत्त्वज्ञान आपल्या तरी ऐकिवात नाही. फक्त उच्च वर्गीयांच्या पदरी शिक्षणाचे सारेच्या सारे फायदे टाकून वीस कोटी हिंदी प्रजेचे न्यून पूर्ण करू पाहणारी ही मंडळी

दुसरीतिसरी कोणी नाही; केवळ सार्वत्रिक शिक्षणाच्या बळावर पश्चिमी जगतात केवढी अद्‌भुत क्रांती घडवून आणता आलेली आहे, हे ज्यांनी चक्षुर्वै सत्यं पाहिलेले आहे, अशी ही मंडळी आहे. हिंदी विद्यापीठांच्या पाठिराख्यांना आमचा सवाल आहे की, आजवरच्या आपल्या अनुभवाच्या शिदोरीतून आपल्या सिद्धांताची सत्यता पटविणारे एक तरी उदाहरण त्यांनी पुराव्यादाखल पुढे मांडावे. श्रीमंतांच्या कित्येक मुलांना त्यांनी सुशिक्षित केले आहे आणि काही विद्यार्थ्यांना तर उदंड ऐहिक कल्याण करून घेण्याची साधने उपलब्ध करून दिली आहेत. पण त्यांनी आपल्या देशबांधवांच्या उद्धाराच्या महान कार्यासाठी कितीसा हातभार लाविला आहे ? सर्वसाधारण जनतेच्या स्थितीत फेर पाडतील, असे कोणते उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत ? आपल्या अभागी आणि अज्ञानी बांधवांच्या शिक्षणासाठी त्यांनीं स्वतःच्या घरी किंवा अन्यत्र शिक्षणवर्ग सुरू केले आहेत काय ? की त्यांनी स्वतःला मिळालेले ज्ञान, अडाणी गांवढळांच्या संसर्गाने मलिन होऊ नये, म्हणून त्याला स्वतःची खाजगी देणगी समजून, आपले आपल्याजवळ राखून ठेविले आहे ? सर्वसामान्य जनतेची उन्नती साधावी आणि वरील औदार्याची देशभक्तीने परतफेड करावी, अशा प्रकारची आस्था आपल्या ठायी आहे, याची थोडी तरी लक्षणे, कोणत्या तरी प्रकारे, त्यांनी दाखविली आहेत काय ? मग जनतेच्या नैतिक आणि बौद्धिक कल्याणाची प्रगती साधण्यासाठी वरिष्ठ वर्गीयांची शैक्षणिक पातळी वाढली पाहिजे, असा दावा कशाच्या जोरावर केला जातो ? वरिष्ठ वर्गीयांच्या बाजूने केला जाणारा हा दावा वस्तुस्थितीवर टिकता, तर सोन्याहून पिवळे होते. मग 'राष्ट्रीय कल्याणाची' वृद्धि झालेली आहे वा नाही, हे दर्शविण्यासाठी नुसती महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या आणि विद्यापीठीय पदव्यांच्या याद्या पुढे केल्या असत्या, तरी काम भागले असते. मग प्रत्येक रँगलरची गणना राष्ट्रहितैषी पुरुषात झाली असती, जंगलांतील शिकारीसंबंधीचे कायदे आणि दहा पौंड कर भरणारास मतदानाचा मिळालेला हक्क, यांचा संबंध राज्यघटनेच्या कल्याणकारकतेशी जसा जोडण्यात येतो, तद्वत् डीन आणि प्रॉक्टर या पदांच्या नेमणुकीचा संबंध देशहिताशी जोडता आला असता.''

या उच्च शिक्षणपद्धतीची ढळढळीत दिसून येणारी प्रवृत्ती म्हणजे तिच्यामुळे वरिष्ठ अधिकारपदे ही ब्राह्मणवर्गाची सर्वस्वी मिरासदारी होऊन बसलेली आहे. सरकारला रयतेच्या कल्याणाची खरीखुरी कळकळ असेल, तर या पद्धतीचे नाना प्रकारचे हे दुरुपयोग थांबवून सरकारी नोकऱ्यांच्या क्षेत्रात अन्य जातीच्या लोकांचा हळुहळू शिरकाव होण्यास वाव करून देणे आणि त्या प्रमाणात ब्राह्मणवर्गाच्या मिरासदारीला उत्तरोत्तर आळा घालणे हे सरकारचे आद्य कर्तव्य ठरते. शिक्षणाची सद्यःस्थिती ध्यानात घेता तीत असे करणे अशक्यप्राय आहे, असे म्हणण्याकडे काही मंडळींचा कल होईल. यावर आमचे उत्तर असे आहे की, उच्च वर्गीय लोक आपल्या उच्च शिक्षणाची काळजी घेण्यास समर्थ असल्याने त्याकडील लक्ष जरा कमी करून, सरकार जर जनतेच्या शिक्षणावर अधिक भर देईल, तर

नीतीच्या आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होण्यास मुळींच अडचण पडणार नाही. माझ्या या प्रस्तुत ग्रंथलेखनाचा हेतू शूद्रबांधवांना ब्राह्मण कसे ठकवितात, हे सांगणे इतकाच नाही; तर बंगाल प्रांताचे उदारमनस्क आणि दयाळू लेफ्टनंट गव्हर्नर सर जॉर्ज कॅम्बेल यांच्यासारख्या विश्वव्यापक सहानुभूतीच्या राजकारणी गृहस्थांना, जी ही उच्चवर्णीय शिक्षणपद्धती सरकारच्याच हिताच्या दृष्टीने उपद्रवी आणि अपायकारक वाटत आहे, ती ही शिक्षणपद्धती कशी घातकी आहे, याबाबतही सरकारचे डोळे उघडणे, हाहि या ग्रंथलेखनाचा हेतू आहे. आपण चोखाळीत असलेल्या मार्गातील चूक सरकारला लवकरच उमगून येईल आणि ते उच्चवर्गीय चष्म्यातून पाहणाऱ्या लेखकांच्या किंवा गृहस्थांच्या मतावर विश्वास ठेवणार नाही, अशी मला मनोमन आशा आहे. अशा रीतीने सर्पाच्या वेटोळ्याप्रमाणे गुलामगिरीचे जे पाश ब्राह्मणांनी शूद्र बांधवांच्या गळ्याभोवती घट्ट आवळले आहेत, त्यांतून त्यांची मुक्तता करण्याचे श्रेय सरकारने आपण होऊन संपादावे. त्याचबरोबर शिक्षणाचा लाभ झालेल्या प्रत्येक शूद्र बांधवाचे हे कर्तव्य आहे की, त्याने आपल्या बांधवांच्या सत्यस्थितीचे चित्र सरकारपुढे मांडण्याची कोशीस करून ब्राह्मणी दास्यातून आपली सुटका व्हावी, म्हणून यथाशक्ति झटले पाहिजे. प्रत्येक खेड्यापाड्यात शूद्रांसाठी खास शाळा उघडली पाहिजे. मात्र तिच्याशी ब्राह्मण शिक्षकांचा नुसता संपर्कही असता कामा नये. शूद्र हाच राष्ट्राचा खराखुरा पोशिंदा आणि आधारस्तंभ आहे. सरकारने आपल्या आर्थिक वा राजकीय अडचणीवर मात करण्याच्या दृष्टीने ब्राह्मणांवर नव्हे, तर शूद्रांवरच विसंबून राहिले पाहिजे. शूद्र वर्ग मनोमन सुखी आणि समाधानी झाल्यास भावी काळात त्या वर्गाच्या राजनिष्ठेविषयी कोणत्याही प्रकारचे भय बाळगण्याचे सरकारला कारण पडणार नाही.

जोतीराव फुले"

## प्राथमिक शिक्षण

या इलाख्यात सर्वसाधारण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाची खूपच हेळसांड झालेली आहे, यात तिळमात्र शंका नाही. काही वर्षांपूर्वीच्या मानाने या इलाख्यातील प्राथमिक शाळांची संख्या सध्या वाढलेली असली, तरी समाजाची गरज भागविण्याच्या दृष्टीने ती मुळीच पुरेशी नाही. सरकार शिक्षणासाठी म्हणून एक खास कर घेते. पण ह्या करातून गोळा होणारा निधी ज्या कामासाठी उभा केलेला आहे, त्यावर खर्च होत नाही, ही शोचनीय गोष्ट आहे. या प्रांतातील नऊ दशांश गावांना म्हणजे जवळजवळ दहा लाख मुलांना प्राथमिक शिक्षणाची कसलीही सोय उपलब्ध केलेली नाही, असे सांगितले जाते. शेतकऱ्यांचे कमालीचे दारिद्र्य; त्यांच्यातील स्वावलंबनाचा अभाव, सुशिक्षित आणि बुद्धिमान वर्गावर अवलंबून राहण्याची त्यांना जडलेली संवय या गोष्टींना, त्यांची ही शैक्षणिक क्षेत्रातील शोचनीय अवस्थाच कारणीभूत आहे.

वंशपरंपरा लेखनावर उपजीविका करणारे ब्राह्मण, प्रभु, इत्यादी वर्ग आणि व्यापारी वर्ग हेच बहुधा शहरातूनसुद्धा शिक्षणाचा लाभ घेताना आढळतात. शेतकरी आणि इतर तत्सम वर्गांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ प्रायः घेता येत नाही. या वर्गांपैकी काही थोडी मुले प्राथमिक आणि माध्यमिक शाळांत घातली जातात. पण दारिद्र्यादी कारणामुळे ती या शाळात टिकून राहात नाहीत. घरकाम किंवा दुसरा एखादा कामधंदा मिळाला की, ती स्वाभाविकच शाळा सोडून देतात. शाळेत टिकून राहण्याच्या दृष्टीने विशेष प्रलोभने नसल्यामुळे खेड्यामधल्या शेतकरीवर्गाची बहुतेक मुले शाळेपासून दूरदूरच राहतात. एकतर हा शेतकरीवर्ग पराकोटीच्या दारिद्र्याने गांजलेला असतो. शिवाय त्याला आपली मुले गुरेढोरे राखण्यासाठी आणि शेतकीच्या कामासाठी हवी असतात. शाळांच्या संस्थेत वाढ करण्याबरोबरच या वर्गाला आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे आणि त्यामध्ये विद्येची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून शिष्यवृत्त्यांची व सहामाही वा वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवणे अगत्याचे आहे. काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत, निदान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, असे माझे मत आहे. कारण काहीही असो, मराठी आणि इंग्रजी भाषा शिकण्याची गोडी नसल्यामुळे मुसलमानवर्गसुद्धा या शाळांपासून दूरच राहिलेला आहे. ज्यामधून मुसलमानांची स्वतःची भाषा शिकविली जाते, अशा प्राथमिक शाळा फारच थोड्या आहेत. जातीपातीच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोणामुळे इतर वर्गांच्या बरोबरीने वर्गात बसण्याची परवानगी मिळत नाही, म्हणून महारमांग आणि इतर कनिष्ठ वर्ग यांना या शाळांतून जवळजवळ मज्जावच झालेला आहे. परिणामी सरकारला त्यांच्यासाठी खास शाळा उघडाव्या लागलेल्या आहेत. पण अशा शाळा फक्त मोठ्या शहरांतूनच आहेत. (अस्पृश्यांची) पांच हजारांवर वस्ती असूनही उभ्या पुणे शहरात अशी एकमेव शाळा आहे आणि तीत तिसाहून कमी मुलगे उपस्थित असतात. ही परिस्थिती विद्याखात्यातील अधिकाऱ्यांस खचितच भूषणावह नाही. जातीपातीच्या पूर्वग्रहामुळे इतर शाळांत मज्जाव असल्याने, ज्या ठिकाणी या जातींची वस्ती पुरेशी मोठी असेल, त्या ठिकाणी त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा उघडाव्या, अशी कळकळीची विनंती, मी राणीच्या जाहीरनाम्यास अनुसरून सरकारला करीत आहे.

गरीब आणि अज्ञानी जनतेत विद्येची गोडीच उत्पन्न झालेली नसताना, सांप्रतच्या शिक्षणाच्या परिस्थितीत, परीक्षेच्या निकालावर शिक्षकांचे वेतनमान ठरविणे, ही गोष्ट, सामान्य जनतेत शिक्षणप्रसार होण्याचा विचार केल्यास मुळीच योग्य ठरणार नाही. पोटापुरती मिळकत होण्याची शाश्वती नसल्यामुळे कोणीही शिक्षक स्वतः पुढाकार घेऊन या लोकांसाठी शाळा काढील, असे मला वाटत नाही. तेव्हा या लोकात विद्येची गोडी उत्पन्न होण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे सरकारी शाळा उघडणे व त्यांच्या मुलांसाठी खास प्रलोभने ठेवणे, या गोष्टी अत्यावश्यक आहेत.

या इलाख्यात सध्या थोड्या सरकारी शाळा चालू आहेत, त्यांमधून देण्यात येणारे प्राथमिक

शिक्षण समाधानकारक व भक्कम पायावर उभारलेले नाही, हे मी नम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो. हे शिक्षण विद्यार्थ्यांच्या भावी जीवनक्रमाच्या दृष्टीने कुचकामी आहे, ही सध्याच्या शिक्षणपद्धतीमधील मोठीच उणीव आहे. मात्र भावी उपयुक्ततेवर दृष्टी ठेवून समाजाच्या गरजा भागविण्याच्या उद्दिष्टाने तिच्यात सुधारणा घडवून आणल्यास सांप्रतच्या पद्धतीचाही योग्य दिशेने विकास करणे शक्य आहे. पण त्यासाठी चालू शिक्षणयंत्रणा आणि सध्या अनुसरला जाणारा अभ्यासक्रम यांची आमूलाग्र पुनर्रचना होणे, अगत्याचे आहे.

(अ) सध्या प्राथमिक शाळांमधून जे शिक्षक नेमले जातात, ते प्रायः ब्राह्मणच असतात. त्यांच्यापैकी फारच थोडे नार्मल शिक्षकविद्यालयात शिकून प्रशिक्षित झालेले असतात. बाकीचे बहुसंख्य शिक्षक अप्रशिक्षितच असतात. त्यांचे वेतन तर अगदीच निकृष्ट असते. ते दहा रुपयांपेक्षा अधिक क्वचितच असते. त्यांची पात्रताही एकंदरीत बेतास बातच असते. सर्वसाधारणपणे व्यावहारिक दृष्ट्या ते सारे अगदी कुचकामाचे असतात. बहुधा त्यांच्याच नाकर्तेपणाच्या संवयी, त्यांच्या हाताखाली शिकून तयार होणारी मुले उचलतात. वंशपरंपरेने चालत आलेला आपला धंदा, दुसरे एखादे अंगमेहनतीचे काम किंवा एखादा स्वतंत्र उद्योग करण्याचे टाळून ते बहुधा कुठेतरी चाकरी मिळवण्यासाठी झटत असतात. माझ्या मते प्राथमिक शाळांतील शिक्षक हे प्रशिक्षित असलेच पाहिजेत; तसेच ते शक्यतो शेतकरीवर्गापैकीच असले पाहिजेत. ब्राह्मणवर्गातले शिक्षक धार्मिक पूर्वग्रहामुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरीवर्गातले शिक्षक त्या वर्गात अधिक सहजपणे मिसळतील, त्यांच्या गरजांशी, आशाआकांक्षांशी अधिक चांगल्या रीतीने समरस होतील. प्रसंगी नांगराची लुमणी किंवा सुताराची तासणी हाती घेण्यात त्यांना कमीपणा वाटणार नाही. समाजातील कनिष्ठ थरांशी ते तत्परतेने एकरूप होतील. त्यामुळे अन्य वर्गांतून आलेल्या शिक्षकांपेक्षा हे शिक्षक बहुजनसमाजावर हितकरी असा प्रभाव पाडू शकतील. त्यांच्या अभ्यासक्रमात इतर सर्वसाधारण विषयांबरोबरच शेतकी आणि आरोग्य यांच्या मूलभूत ज्ञानाचा अंतर्भाव केला पाहिजे. अप्रशिक्षित असूनही पूर्णपणे लायक ठरलेल्या शिक्षकांना ठेवून बाकीच्या अप्रशिक्षित शिक्षकांच्या जागी लायक प्रशिक्षित शिक्षक नेमण्यात आले पाहिजेत. या व्यवसायासाठी अधिक लायक माणसे मिळावीत, म्हणून शिक्षकांचे वेतनमान वाढवून त्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात यावी. शिक्षकाचे किमान वेतन बारा रुपयांहून कमी असू नये. मोठ्या वस्तीच्या गावांमधून ते वेतन पंधरा ते वीसपर्यंत असावे. हिशेबनीस, दस्तैवजादि कागदपत्रांची नोंदणी करणारा कारकून, पोस्टमास्तर, तिकिटविक्रेता यांसारखी खेड्यांमधील कामे शिक्षकांकडे सोपवून त्यांना गांवकारभारात सहभागी करून घ्यावे. असे केल्याने त्यांचा दर्जा उंचावेल आणि ज्या लोकांत त्यांना वावरावयाचे आहे, त्यांच्यावर त्यांचे हितकारक असे वजन पडेल. खेड्यांतील ज्या शाळांतून अधिक मुले उत्तीर्ण होतील, त्या शाळांतील शिक्षकांना पगाराखेरीज उत्तेजनार्थ खास भत्ता देण्यात यावा.

(ब) अभ्यासक्रमात मोडी-बालबोध लेखनवाचन, हिशेबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतकीचे प्राथमिक ज्ञान, तसेच नीती आणि आरोग्य यांसंबंधीचे सोपे धडे अंतर्भूत करावे. शहरांतील व मोठ्या गांवांतील शाळांच्या अभ्यासक्रमापेक्षा खेड्यांतील शाळांमधील अभ्यासक्रम कमी असावा. मात्र व्यवहारोपयोगी होण्याच्या दृष्टीने त्यात कसलीही उणीव नसावी. विद्यार्थ्यांना शेतकीच्या पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देता यावे म्हणून एक 'आदर्श' शेतीची छोटीशी योजना आखल्यास ती निश्चितच फायदेशीर होईल. ही योजना खऱ्याखुऱ्या कार्यक्षमतेने अमलात आणल्यास तिच्यामुळे सर्व देशाचेच कोटकल्याण साधेल. अँग्लो-व्हर्नाक्युलर प्राथमिक शाळांतील विद्यमान पाठ्यपुस्तकात व्हावहारिक उपयुक्तता आणि प्रगतिशीलता या दृष्टीने फारसा वाव नसल्याने त्यांची सुधारणा आणि पुनर्रचना होणे, अत्यंत आवश्यक आहे. यांत्रिकी, नीतिबोध, आरोग्य, शेतकी आणि उपयुक्त कला या विषयांवरील पाठ या पुस्तकांमधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावे. कर भरणारे आणि कर न भरणारे यांच्या मुलांना प्राथमिक शाळेची फी, एकास दोन या प्रमाणात असावी.

(क) प्राथमिक शाळांवरील निरीक्षणयंत्रणा सदोष आणि अपुरी आहे. दुय्यम शाळातपासनीस वर्षातून एकदा शाळेला भेट देतात. अशा या भेटीपासून म्हणण्यासारखा फायदा होत नाही. अधिक वेळा नाही तरी, कमीत कमी दर तिमाहीस या सर्व शाळांची तपासणी होणे अगत्याचे आहे. पूर्वसूचना न देता इतर वेळीही या शाळांना भेटी दिल्यास तेही फार उपयुक्त ठरण्याजोगे आहे, हेही येथे सुचवावेसे वाटते. या बाबतीत जिल्ह्यातील किंवा गांवातील सरकारी अधिकाऱ्यांवर विसंबून राहण्यात अर्थ नाही. एक तर त्यांच्यामागे कामे फार असतात, त्यामुळे या शाळांना भेटी देण्यास त्यांना फावत नाही. तसेच त्यांनीं दिलेल्या धूळभेटी अपुऱ्या आणि उडत्या असतात. सामान्यतः शिक्षकवर्गावर योग्य ते नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने अधूनमधून युरोपीयन तपासनिसांची देखरेखही अत्यावश्यक आहे.

(ड) प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करण्यात यावी, त्यासाठी—

(१) ज्या देशी शाळांतून प्रमाणपत्रित शिक्षक नेमले जातील वा आधीच नेमले गेलेले असतील, अशा शाळांना सढळ हाताने अनुदान दिले जावे.

(२) स्थानिक कराच्या निधीपैकी निम्मा निधी केवळ प्राथमिक शिक्षणावरच खर्च करावा.

(३) आपापल्या हद्दीतील सर्व प्राथमिक शाळा स्वखर्चाने चालविण्यास नगरपालिकांना भाग पाडण्यासाठी सरकारने रीतसर कायदा पसार करावा.

(४) प्रांतिक किंवा मध्यवर्ती निधीमधून पुरेसे अनुदान मिळण्याची तरतूद करण्यात यावी.

विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे व शिष्यवृत्त्या, तसेच विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या शिक्षकांसाठी जादा अनुदान आणि अन्य भत्ते ठेवण्यात यावे. शाळा चांगल्या कार्यक्षम बनण्याच्या दृष्टीने या गोष्टी हितकारक ठरतील.

मोठ्या शहरांतील नगरपालिकांनी आपल्या हद्दींतील प्राथमिक शाळांचा सर्वच्या सर्व खर्च स्वतः चालविला पाहिजे, असा आदेश नगरपालिकांना देण्यात यावा. मात्र शाळांचा कारभार सर्वस्वी नगरपालिकांवर सोपवू नये. त्या शिक्षणखात्याच्या देखरेखीखालीच असाव्या.

ज्या माध्यमिक किंवा खाजगी इंग्रजी शाळा शिक्षणखात्याच्या नियमानुसार चालविल्या जात असतील, त्यांनाही शक्यता असल्यास आर्थिक सहाय्य करावे, पण हे सहाय्य दरवर्षी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात देण्यात यावे. आपल्या निधीमधून अशी अनुदाने देण्याची तरतूद करण्याची नगरपालिकांवर सक्ती असावी, यासाठी सरकारने रीतसर कायदा पास करावा.

प्राथमिक शिक्षणावर खर्च करावयाच्या निधीच्या विनियोगयंत्रणेवर सामान्यतः शिक्षणखात्याच्या संचालकांचे नियंत्रण असावे.

जिल्हा किंवा स्थानिक पातळीवर सुशिक्षित आणि बुद्धिमान नागरिकांच्या समित्या, जिल्हाधिकारी किंवा शिक्षणखात्याचे संचालक यांच्या नियंत्रणाखाली नेमता आल्यास, त्यांच्याकडे या अनुदाननिधींची व्यवस्था सोपविण्यास हरकत नाही. मात्र सांप्रत पाटील, इनामदार, सरदार यांसारख्या अडाणी आणि अशिक्षित मंडळींचाच भरणा लोकलबोर्डातून आहे. ही मंडळी अशा निधीवर अवश्य ते नियंत्रण सुजाणपणे ठेवू शकणार नाही.

## देशी शाळा

मोठी गावे, शहरे किंवा महानगरे यांमध्ये व विशेषतः ज्या मोठ्या शहरात ब्राह्मण वस्ती विशेष आहे, अशा शहरांमध्ये एतद्देशीय शाळा सध्या अस्तित्वात आहेत. विद्याखात्याच्या अलीकडच्या प्रतिवृत्तावरून अशा एतद्देशीय शाळांची संख्या १,०४९ आहे आणि त्यांत पटावर एकूण २७,६९४ विद्यार्थी आहेत. या शाळा जुन्या गावगाड्याच्या धर्तीवर चालविल्या जात असतात. गुणोत्तराचे पाठांतर, थोडे मोडी लेखनवाचन आणि धार्मिक उताऱ्यांचे पाठांतर एवढ्याच गोष्टी या शाळांमधून शिकविल्या जातात. या शाळांतील शिक्षकांची शिक्षणशास्त्राशी तोंडओळखही नसते, त्यामुळे ते शिक्षणपद्धतीत सुधारणा घडवून आणण्यास सामान्यतः अगदी अपात्र असतात. या शाळांची फी २ ते ८ आणेपर्यंत असते. हे शिक्षक प्रायः ब्राह्मणवर्गातील कुचकामी नि टाकाऊ ठरलेले लोक असतात. जुजबी मराठी लेखनवाचन व जेमतेम त्रैराशिकापर्यंत हिशेबठिशेब, एवढीच त्यांची तयारी असते. उदरनिर्वाहाचा अखेरचा उपाय म्हणून त्यांनी शिक्षकाचा पेशा पत्करलेला असतो. इतर कोणताहि उद्योग करण्यात अपेशी ठरल्यामुळे किंवा तेवढी मुळांतच पात्रता

नसल्यामुळे नाइलाजास्तव त्यांनी शाळा उघडलेल्या असतात. खेड्यापाड्यांतील शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची कसलीही सोय सध्या खेड्यांमधून उपलब्ध नाही. विद्यमान शिक्षकांऐवजी त्यांच्या जागी, प्रशिक्षण-महाविद्यालयांतून तयार झालेला किंवा निदान देशी भाषेतील सहावी यत्ता उत्तीर्ण झालेला शिक्षकवर्ग नेमल्याशिवाय या शाळांकडून भरीव कार्य होणार नाही. सध्याचे शिक्षक सरकारी मदत खुषीने स्वीकारतील; पण त्यांना मदत करणे म्हणजे पैशाची व्यर्थ उधळपट्टी ठरणार आहे. अशा प्रकारच्या सरकारी अनुदान घेणाऱ्या शाळेचे एकही उदाहरण माझ्या माहितीचे नाही. यदाकदाचित् असे अनुदान कोठे दिले जात असले, तर ते अपवादभूत म्हटले पाहिजे. माझ्या मते, अशा शाळांपैकी ज्यांमधून प्रमाणपत्रित शिक्षकांची नेमणूक झालेली नसेल, त्यांना मुळींच अनुदान देण्यात येऊ नये; परंतु प्रमाणपत्रे मिळविलेले आणि लायक असे शिक्षक नेमलेले असतील, त्यांनाच अनुदान देण्यांत यावें. तरच खरेखुरे कल्याण साधेल.

## उच्च शिक्षण

सरकार उच्च शिक्षणासाठी सढळपणे तरतूद करीत असले, तरी त्याने बहुजनसमाजाच्या शिक्षणाची हेळसांड चालविली आहे, अशी हाकाटी गेले काही दिवस सर्व देशभर चालू आहे. उच्च शिक्षण पदरात पडल्याने ज्या वर्गांचा प्रत्यक्ष फायदा झालेला आहे, अशा वर्गांतील लोकांनी ही हाकाटी मान्य केली नाही, तरी ती काही अंशी न्याय्यच म्हणावी लागेल. असे असले तरी सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणासाठी करीत असलेली मदत सरकारने तोडावी, असे कोणीही देशहितेच्छू म्हणणार नाही. त्याची एवढीच इच्छा असणार की, प्रजाशासनाखालील एक वर्गच्या वर्ग संपूर्णपणे दुर्लक्षिला जात असल्याने, अन्य प्रगत वर्गांबरोबरच, या उपेक्षित वर्गांच्याही प्रगतीची तितकीच आस्था सरकारने दर्शविली पाहिजे. हिंदुस्थानातील शिक्षण अद्यापि बाल्यावस्थेत आहे. उच्च शिक्षणार्थ दिले जाणारे अनुदान थांबविल्यास,. तेही एकंदर शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल.

उच्च आणि श्रीमंत वर्गांत, ब्राह्मण, प्रभु इत्यादी जातींत व विशेषतः जे लोक लेखणीवर उपजीविका चालवितात, अशा वर्गांत सध्या शिक्षणाची गोडी उत्पन्न झालेली आहे. या वर्गांच्या बाबतीत होणारी सरकारी मदत क्रमाक्रमाने कमी कमी करीत नेणे, शक्य आहे. परंतु ज्या मध्यम आणि कनिष्ठ वर्गांमध्ये शिक्षणाची म्हणण्यासारखी प्रगती अद्यापी झालेली नाही, अशा वर्गांचे अनुदान थांबविल्यास ती एक आपत्तीच ठरेल. अशांचे अनुदान थांबविल्यास नाइलाजस्तव त्या लोकांना नालायक आणि संकुचित दृष्टीच्या शाळांमध्ये प्रवेश मिळविण्यावाचून दुसरे गत्यंतर नाही आणि त्यामुळे एकंदर शैक्षणिक कार्याचीच हानी झाल्यावाचून राहाणार नाही. तसेच कोणत्याही पातळीवरची शिक्षणव्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे इष्ट ठरणार नाही. यापुढे बहुत काळपर्यंत, धंदेशिक्षण असो, वा कारभार विषयक शिक्षण असो, सर्व पातळीवरच्या शिक्षणयंत्रणा सरकारी नियंत्रणाखालीच राहाणे

योग्य ठरेल. प्राथमिक आणि उच्च या दोन्ही पातळ्यांवरील शिक्षणाचे संवर्धन होण्यासाठी आवश्यक असणारी आस्था आणि कृपादृष्टि केवळ सरकारच दाखवू शकेल.

शाळा--कॉलेजांवरील सरकारी नियंत्रण काढून घेतल्यामुळे त्याचे पर्यवसान शिक्षणाची वाढ खुंटण्यात होईल; एवढेच नव्हे, तर हिंदुस्थानांत भिन्न भिन्न राष्ट्रीयत्वाचे आणि भिन्न भिन्न धर्माचे लोक नांदत असल्यामुळे, जे एक प्रकारचे तटस्थतेचे धोरण ठेवण्याचे सरकारचे आजवरचे उद्दिष्ट आहे, तेच जबरदस्त धोक्यात येईल. ही मदत थांबविल्यामुळे उच्च आणि श्रीमंत वर्गामध्ये स्थानिक गरज भागविण्यापुरती स्वावलंबी वृत्ती काहीं अंशी उत्पन्न होण्याचा संभव आहे. पण त्यामुळें एकंदरीत होणारे शिक्षणाचे नुकसान एवढे मोठे असेल की, अशा स्वावलंबी वृत्तीतून ते भरून काढायचे म्हटल्यास त्याला दीर्घ कालावधी लोटावा लागेल. सरकारी नोकऱ्या मिळविण्यात अयशस्वी झालेल्या सुशिक्षितांना, सढळ अनुदानाची शाश्वती देऊन, उच्च शिक्षणार्थ शाळा उघडण्यास उद्युक्त करता येईल. परंतु उपजीविकेचे साधन म्हणून कोणीही माणूस स्वतःच्या बळावर शाळा उघडण्यास धजणार नाही. असे खाजगी प्रयत्न टिकाऊ आणि चिरस्थायी होतील किंवा काय आणि त्या प्रयत्नांतून अर्धेमुर्धे तरी फळ पदरात पडेल किंवा नाही, याविषयी शंकाच वाटते. श्री० विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि श्री० भावे यांनी अशा प्रकारच्या खाजगी शाळा पुण्यात चालविलेल्या आहेत. त्यांच्या शाळांना पुरेसे अनुदान मिळाल्यास त्यांच्याकडून भरीव कामगिरी होईलही. परंतु सरकारी माध्यमिक शाळांची गरज त्यांनी भरून निघणे, कधीही शक्य होणार नाही.

मिशनरी शाळांपैकी काही शाळा अतिशय कार्यक्षमपणे चालविलेल्या असल्या, तरी त्या शाळांकडून निम्मेशिम्मेसुद्धा कार्य साधत नाही. शिवाय सरकारी शाळांकडे विद्यार्थिवर्ग ज्या प्रमाणात आकर्षिला जातो, त्याच्या निम्म्यानेही या शाळांकडे आकर्षिला जात नाही. सरकारी शाळांचे हे श्रेष्ठत्व, भरपूर वेतन देऊन ठेवलेल्या शिक्षकांवर आणि प्राध्यापकांवरच प्रामुख्याने अवलंबून आहे. असे वेतन देणे खाजगी शाळांना परवडणारे नाही.

सरकारी महाविद्यालयांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप सर्वसाधारण जीवनांतील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे, असे व्यावहारिक नाही. कारकून आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर पैदा होण्यास मात्र ते उपयुक्त ठरणारे आहे. शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचेही सारे लक्ष वाजवीहून फाजील प्रमाणात मॅट्रिकच्या परीक्षेवर केंद्रित झालेले असते. विद्यार्थ्याला त्याच्या भावी आयुष्यक्रमात स्वतंत्र जीवन आक्रमिण्यास लायक बनविण्यास उपयोगी पडावे, असे व्यावहारिक अंगच या अभ्यासक्रमाला नसते. एकंदर देशातील ज्ञानप्रसाराचा विचार केल्यास प्रवेशपरीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फारशी मोठी नसली, तरी सरकारी नोकऱ्यांच्या गरजेचा विचार केल्यास, ही संख्या मोठीच म्हणावी लागेल. शिक्षण सार्वत्रिक आणि सर्वांच्या सहज आवांक्यातले असते, तर ही संख्या याहूनही मोठी होऊ शकली असती. यापुढील काळात ती तशी

वाढावी आणि ती तशी वाढेल, अशी मला आशा आहे. उच्च शिक्षणाची व्यवस्था अशी असावी की, ते घेणे सर्वांना सुलभपणे परवडावे. मॅट्रिक परीक्षेला नेमलेल्या विविध विषयावरील पुस्तकांच्या याद्या मद्रास आणि बंगाल या प्रांतांतील सरकारी गॅझेटांत जशा प्रसिद्ध केल्या जातात, तशाच येथेही प्रसिद्ध करण्यात याव्या. त्यामुळे खाजगी रीतीने अभ्यास करून परीक्षेला बसणारांस उत्तेजन मिळून देशातील शिक्षणप्रसारास अधिक मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल. खाजगी रीत्या अभ्यास करून प्रवेशपरीक्षेला बसण्यास मान्यता देऊन मुंबई विद्यापीठाने जनतेला एक प्रकारचे वरदानच दिले आहे. असेच वरदान अधिक उच्चतर परीक्षांच्या बाबतीतही विद्यापीठाचे अधिकारी उपलब्ध करून देतील, अशी मी आशा बाळगतों. बी. ए. आणि एम्. ए. वगैरे पदवीपरिक्षांच्या बाबतीत खाजगी रीतीने अभ्यासाला मान्यता मिळाल्यास अनेक तरुण खाजगी रीतीने अभ्यास करण्यात आपला वेळ सार्थकी लावतील आणि त्यामुळे ज्ञानप्रसारास आणखी मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल. अनेक प्रकारच्या कारणांस्तव ज्यांना कॉलेजमध्ये जाऊन पुढील शिक्षण सुरू ठेवणे परवडत नाही, अशी कित्येक उदाहरणे सध्या दिसून येतात. विद्यापीठाने खाजगी अभ्यासाला मान्यता दिल्यास एकंदर देशाचे कोटकल्याण होईल व उच्चशिक्षणाप्रीत्यर्थ सरकारी खजिन्यावर पडणारा बोजाही पुष्कळ प्रमाणात हलका होईल.

सरकारी शाळांमधून सरकारी शिष्यवृत्त्या देण्याची जी पद्धती सध्या अवलंबिण्यात येते, ती सदोष आहे. कारण तीमुळे इतर वर्गांची आबाळ होऊन, ज्या वर्गांमध्ये शिक्षणाची गोडी आधीच निर्माण झालेली आहे, त्याच वर्गांना व्यर्थ उत्तेजन दिल्यासारखे होते. ही पद्धती अशा रीतीने व्यवहारात आणावी की, त्यायोगे ज्या वर्गांत शिक्षणाची प्रगती मुळीच झालेली नाही, अशा वर्गांतील मुलांच्या वाट्याला त्यांतल्या काही तरी शिष्यवृत्त्या येतील.

चढाओढीच्या तत्त्वावर शिष्यवृत्त्या देण्याची पद्धत तात्त्विक दृष्ट्या कितीही न्याय्य वाटली, तरी तीमुळे इतर वर्गांतील ज्ञानप्रसाराला हातभार लागत नाही.

सुशिक्षितांना पगारी नोकऱ्या मिळण्याच्या प्रश्नासंबंधी विचार करता असे दिसून येते की, देशी सुशिक्षित लोक हे प्रायः ब्राह्मण वा इतर उच्चवर्णीयच असतात आणि त्यांचा कल सर्वस्वी नोकऱ्या मिळविण्याकडे असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे. शाळाकॉलेजांतून जेवढे देशी लोक शिकून बाहेर पडतात, तेवढ्या सर्वांना सरकारी नोकऱ्या मिळणे, शक्यच नसते. शिवाय त्यांच्या अभ्यासक्रमात तांत्रिक आणि व्यवहारोपयोगी शिक्षणाचा अंतर्भाव नसतो. परिणामी हाताने कष्टाची कामे करणे किंवा अन्य रोजगारधंदे स्वीकारणे त्यांना अतिशय अवघड जाते. नोकरीच्या बाजारात भाऊगर्दी आहे आणि सुशिक्षित हिंदी लोकांस पगारी नोकऱ्या मिळणे मुष्किल झाले आहे, अशी जी हाकाटी सध्या ऐकू येते, ती याच पायीं होय. आता काही अंशी एक गोष्ट खरी आहे की, काही विशिष्ट उद्योगधंद्यांत खरोखरच फाजील गर्दी झालेली आहे. पण त्यावरून या लोकांना करता येण्याजोगे अन्य

रोजगारधंदेच उपलब्ध नाहीत, असे सिद्ध होत नाही. सर्व देशाचा विचार केल्यास, शिकून तयार झालेल्या लोकांची सांप्रतची संख्या अत्यल्पच म्हणावी लागेल. ही सुशिक्षितांची संख्या शेकडो पटीने वाढेल व केवळ नोकरीच्या पाठीमागे लागण्याची गरज न पडता, त्या सर्वांना उपयुक्त व्यवसाय आणि रोजगारधंदे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, असा काळ फारसा दूर नाही.

सरते शेवटी मला शिक्षणआयोगाला एक विनंती करावयाची आहे. ती ही आहे की, त्याने स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर होईल, अशा प्रकारच्या उपाययोजनांना संमती द्यावी.

**जोतीराव गोविंदराव फुले**
व्यापारी, शेतकरी आणि नगरपिते
पेठ जुनागंज, पुणे

पुणे
१९ आक्टोबर १८८२

[*एज्युकेशन कमिशन, बॉम्बे*, खं० २ रा, कलकत्ता, १८८४, पृ. १४०–१५४]

# कै. जोतीराव गोविंदराव फुले यांच्या चरित्राचा कालपट
## (१८२७–१८९०)

| घटना | वर्ष |
|---|---|
| जन्म | १८२७ |
| पंतोजीच्या शाळेत मराठी शिक्षण | १८३४–३८ |
| कावडी येथील झगडेपाटील यांच्या कन्येशीं विवाह | १८४० |
| मिशनरी शाळेंतील माध्यमिक (इंग्रजी) शिक्षण | १८४१–४७ |
| लहुजीबुवाकडे तालीम आणि क्रांतिकारक विचार | १८४७ |
| टॉमस पेनकृत 'राइट्स् ऑफ् मॅन्' या ग्रंथाचे मनन | १८४७ |
| उच्चवर्णीय लग्नाच्या मिरवणुकीत झालेला अपमान | १८४८ |
| शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची शाळा | १८४८ |
| शूद्रादिकांना शिक्षणदान करण्याचें व्रत घेतल्याने करावा लागलेला सौभाग्यवतीसह गृहत्याग | १८४९ |
| मराठी प्रकाशनांना अनुदान देण्याची मागणी करणाऱ्या सुधारकांच्या सभेला दिलेले संरक्षण | १८४९ |
| चिपळूणकरांच्या वाड्यांतील व रास्तापेठेतील मुलींच्या शाळांची स्थापना | १८५१ |
| मे. कँडी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणकार्याबद्दल सरकारी विद्याखात्याकडून सत्कार | १८५२ |
| स्कॉटिश मिशनऱ्यांच्या शाळेत अर्धवेळ शिक्षकाची नोकरी | १८५४ |
| 'तृतीय रत्न' नाटकाचे लेखन | १८५५ |
| रात्रीच्या शाळेची स्थापना | १८५५ |
| मारेकऱ्यांकडून हत्येचा प्रयत्न | १८५६ |
| शाळांच्या व्यवस्थापकमंडळातून निवृत्ती | १८५८ |
| विधवा–पुनर्विवाहास साहाय्य | १८६० |
| बालहत्या–प्रतिबंधक–गृहाची स्थापना | १८६३ |
| तुकाराम तात्या पडवळकृत 'जातिभेदविवेकसार' या ग्रंथाच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन | १८६५ |

| | |
|---|---|
| वडील गोविंदराव यांचा मृत्यू | १८६८ |
| घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करणे | १८६८ |
| ‘छत्रपति शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा’, ‘ब्राह्मणांचे कसब’ | १८६९ |
| ‘गुलामगिरी’ | १८७३ |
| सत्यशोधक समाजाची स्थापना | १८७३ |
| दयानंद सरस्वतींची मिरवणूक | १८७५ |
| पुणे नगरपालिकेचे सदस्यत्व | १८७६–८२ |
| दारूची दुकाने उघडण्यास नवे परवाने देऊ नयेत, म्हणून प्रयत्न | १८८० |
| ‘हंटर–शिक्षणआयोगापुढे सादर केलेले निवेदन’ | १८८२ |
| बंदिशाळेतून सुटलेल्या टिळक–आगरकरांचा सत्कार | १८८२ |
| ‘शेतकऱ्याचा असूड’ | १८८३ |
| ‘सत्सार क्र० १’ | १८८५ |
| ‘सत्सार क्र० २’, ‘इशारा’ | १८८५ |
| ‘सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा–विधि | १८८७ |
| ड्यूक ऑफ कनॉटचा सत्कार आणि फुलेकृत दंभस्फोट | १८८८ |
| जनतेकडून सत्कार आणि ‘महात्मा’ ही पदवी अर्पण | १८८८ |
| ‘सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक’ या मरणोत्तर (स. १८९१) प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचे लेखन | १८८९ |
| मृत्यु | २८ नोव्हेंबर १८९० |

# निवडक संदर्भसूची

*अंकल टाम्स क्याबिन*, ३०२.
अटकबंदी, ११२, २०५.
अठरा पगड, २२१.
अंबिका (आंबिका) ३०२.
*अथर्व वेद*, ३८३.
अफझलखान, १७–१८, ३२५.
*अमरकोश*, १२२.
अमेरिकेतील गुलामगिरी, ७७, ८४, ८६, १२५, १३४, २५०.
अमेरिकन लोकसत्ताक, २०३.
अय्यावारु, रामय्या व्यंकय्या, १५९.
अर्जुन, १२१, ३०१, ३८२.
अश्वत्थामा, ३७२.
*असूड (शेतकऱ्याचा असूड)*, ३२५–३२६
*अस्पृश्यांची कैफियत*, ५०५.
अहीमही, ३८०.
आडाव, बाळाजी खंडेराव, १५३, १५५.
आनंदराव रणछोडजी, १५६.
आबदुल करीम, ३३.
आर्यसमाज, २९६.
आर्यांचे मांसाशन, १२, १२२, २०१, २१७, २४७, ३७४, ३९२, ४०१, ४०२, ४५४, ४८५, ४९१.
आर्यांचे भारताक्रमण, ७–८, १२–१३, ७२, ८३, ९८, १००, १०२–१०३, १०५, १०६, १०७–१११, १४५, २२१–२२३, २८२, २८७, ३६७–३६९, ४८६–८७ इ०
आलारिक, ७४.
ऑथेल्लो, ७९.
औरंगजेब, २७–२९, ३०, ३१.
इंग्रजांच्या व्यापारविषयक धोरणाची अनिष्ट फलश्रुती, २०४, २२८, २३०–२३१, २४७–२४८.
इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणाची अनिष्ट फलश्रुती, ८०–८१.
इंग्रजी राज्यांतील न्यायव्यवस्था आणि-शेतकरी, ७८–७९, १३२, २०७–२०९.
इंग्रजी राज्याच्या अस्ताविषयी सूचक भविष्य, १३६.
इंग्रजी राज्याविषयी कृतज्ञता, ७, ९०, १३६, २६४, ३१५–३१९, ४८६–८७.
इंजिनियरखाते, १४७–१४८.
*इंडिया थ्री थाउजंड इयर्स ॲगो*, (जॉन वुइल्सन), २१९, २२१, २२२.
इंद्रजित, ३८०.
इनामकमिशन, १२६.
इराणी (आर्य) २२१, ३१३, ४४८, ४९६.
इरिगेशनखाते, २२८–२२९.
इलायजा शालमेन, १५३.

'*इसापनीती*' १२१, २९६, ३८२.
उदेभान, ३१.
उपाध्ये (शब्दोत्पत्ती), १०९.
उमाजी (रामोशी), १२४.
उरवणे, रामशेट बाबूशेट, १५३, १५५, १५६, १६०, १६४.
एकराष्ट्रीयत्वाची कल्पना, ४०७, ४०९.
एतद्देशीय राजे आणि रयतेच्या सुखसोयी, २२९.
कंक, येसाजी, १४.
कच्छ (कूर्म) १००, ४९०.
कडलक, नारायण गोविंद, १५३.
कबीरपंथ २६९.
कबीलर (ऋषी), ४३६.
कराडे, निळोबा रामजी, १५६.
कर्ण, १९४.
कलगी–तुरा, १९३.
कश्यप, १००.
कंस, १२०, ३८२.
कॅम्बेल, सर जॉर्ज, ८२, ५११.
कॉंग्रेस (न्याशनल सभा, राष्ट्रसभा) ४०५, ४०७, ४०८, ४०९, ४७५, ४७८, ४९१, ४९२, ४९४, ४९६, ४९७.
कानडा (कॅनडा) २२२.
कालयवन, ३८७.
काळभैरव १०६, १०७, २२१.
काळे ख्रिस्ती–धर्मप्रचारक, २३९–२४०, २५०.
काळेवार, व्यंकु बाळोजी, १५९.
कुंभकर्ण, ३८०.
*कुराण*, २०१, २५१, ३८२, ३९५, ४७६, ४८२, ४८९.
कुऱ्हाडे, गणपत तुकाराम, १५६.
कुशा घोंगड्या, २७१.
कुळकर्णी, ७८, ११३, १२५, १२७, १२८, १२९, १३०, १३१, २०६, २२४, ३९७.
कुळवाडी (कुणबी), ७९, ११३.
कूकसाहेब (एंजिनियरिंग कॉलेजचे प्रिन्सिपल) १५६.
कृष्ण, १२०, ३०१, ३७१, ३७२, ३८१, ३८२, ३८४, ३८६–३८९, ४५३, ४५४, ४८२.
केशवपन, १४२, ३०२, ४०५, ४६५.
कोंकणस्थ, २२४, ३९७.
कोटकर, गणपत भास्कर, १५३, १५५.
कोठावळे, आनंदराव रामचंद्र, १५३.
क्यासका, ४३१.
खंडोबा (खंडेराव), १०५, १०७, ११६, १८९, २२१, ४८९.
खते, २४७, २६१–२६२.
खर्डे (लढाई), ३००.
खानजहान, ३२.
खोती, १३४, २१३.
ख्रिस्त, येशू, ३६४, ३७०, ३७७, ३८५, ४१५, ४३३, ४८२.
ख्रिस्ती धर्म, ख्रिस्ती–धर्मप्रचारक, १०४, ११७, १२३, १२७, १३७, १३९, १४०, २०२, २१४, २१६–२१७, २२५, २५०, २७०, २८४–२८५, ३११, ४०४, ४०५, ४१७, ४४९, ४५०, ४६५, ४७८, ४८२, ४९१. इ०
ख्रिस्ती वृत्तपत्रकार, ११४, १३९, १४६.
गंगाधरशास्त्री, ८.
*गरुडपुराण* ६१, २००, ४३७.
गागाभट (गंगाभट), ३४, १९६, २०१.

गायकवाड, सयाजीराव, १९१, ३११, ३२५, ४४१, ४४२, ४९२, ४९३.
गायत्री मंत्र. ११३, १२९.
गीता, ३६९, ३८२, ३८४.
गुजर, प्रतापराव, ३१–३३.
*गुरुचरित्र*, ४८२.
*गुलामगिरी* १५४, १६९, ५०९.
गोपिनाथपंत, १७–१८.
गोमांसभक्षणावर (अहिंदूंच्या) बंदी, २६१.
गोरे अधिकारी, २४९.
गोऱ्या सैनिकांची स्थिती, २३१–२३३, २६३.
गोवर्धन, ३८१, ३८९.
ग्रँट डफ (ग्रांडफ), ७.
ग्रामजोशी, २७५.
ग्लॅडस्टन आणि अस्पृश्यांचे जीवन, २५१.
घाशीराम कोतवाल, २११.
घोरपडे, बाजी, २२.
घोले, गोपाळ विश्राम, १५६.
घोले, डॉ. विश्राम रामजी, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १६४, ४४२.
चॅटफिल्डसाहेब, १५६.
चव्हाण, तुकाराम विठूजी, १५७.
चांद्रायण प्रायश्चित्त, ६५, २२४.
चिपळूणकर, विष्णुशास्त्री, १७९, ५१७.
चिपळूणकर, हरी रावजी, १५७.
चोखामेळा, २३९.
जनक राजा. ११७, ३७९.
जंगम (ज्यू)—येथें ‘जंगम’ ऐवजी ‘जंगल’ असा मुद्रणदोष आहे. –, २२५.
जन्मेजय, १२१.
जंबुमाळी, ३८०.
जयसिंग, २७.
*जर्नल ऑफ दि ईस्ट इंडिया असोसिएशन* क्र. ३, खं. ७, २३०.
जाणाई, ११६.
जातिभेद, ८, ७४, ९०, ९१, ११४, १८९, २००, २०२, २२३, २४५–२४६, २५०, २५४, २५७, २५९, २६०, २६४, ३६५–३७०, ४७२, ४८५. इ.
जार्व्हिससाहेब, १२८.
जिजाई, ९, १०, ११, १८, २४, २५.
जेकब, कर्नल, लिग्ग्याड, ४००, ४०४, ४०५.
जेजुरी, १८९, १९५.
जैन धर्म, २१५, ४५५.
जोतीबा (दैवत), १०५, १०७, ४८९.
जोन्स, सर वुइल्यम, ४०४, ४०५.
जोशीबुवा (सार्वजनिक सभेचे), २०२.
ज्युलियस सीझर, २२६–२२७, ३०२, ४३१, ४३२.
ज्युलियस सीझरचा वध, २२६–२२७.
झरक्सिस, २२६.
झांशीची राणी, ३०२.
झांशीचा राजा, ३०२.
टक्कर (जज्ज, साल्वेशन आर्मीचे), २१४, २५१.
टरकांडसाहेब, १२६.
टेंपल (गव्हर्नर), २५०.
टोपे, तात्या, १२४.
डंखीण, १०१.
डारविन, २१५.
डिटेक्टिव्ह डॉक्टर्स, २६०.
डुमरे, बाळाजी ऊर्फ काशीबा कुशाजी, २७५.
डेंगळे, त्रिंबकजी, २५७.

ढमढेरे, सरदार, १२६.
ढवरे, रामचंद्र मनसाराम, १५७.
ढेंगळे, विनायक बाबाजी, १५३, १५५.
तानसेन, २१, १०६, २२७.
तानाजी, १४, १८, ३०, ३१, ३२५.
तुकाराम, २०१.
*तुळशी आख्यान*, २५२.
तुळशीची पूजा, १९८, २५१, २५२.
थरमापलीची खिंड, २२६.
दक्षिणा प्राईज कमिटी, १४०.
दयाराम आत्माराम, २६६.
दसनामी, ३९७.
दस्यु–दुष्मन–दोस्त, २१९, २२१–२३, २२५, २५५, ३९७, ३९८, ४९६.
दस्युसंस्कृती आणि अमेरिका, २२२.
दादोजी कोंडदेव, १४, ३२५, ४७१.
*दासबोध*, ३८४.
दिलेरखान, १६, २७.
*दीनबंधु*, ३३०.
दुदुंभी (राक्षसनाम) , ३८१, ३८२.
दीनानाथ नारायणराव, १५३.
देव (महालक्ष्मी), १९९.
देशमूख, गोपाळ (लोकहितवादी) ४९६.
देशस्थ, २२४, ३९७.
दैत्य (शब्दोत्पत्ती) ११६.
द्रवीड, ७४.
द्रोणागिरी, ३८१.
द्रोणाचार्य, ३७२.
द्रौपदी, ३८७.
धरणे–पाटबंधारे, २६२.
धर्मराज, ३७२.
धर्मभेदातीत उदार कुटुंबकल्पना, ४१७.
धोंडीराम नामदेव, १५४.
धोंडोपंत (उमाजीच्या बंडातील) १२४.
नगरकर, नारायण तुकाराम, १५३, १६१.
नरकासुर, ३८७.
नरसिंह, १०२, १०३, १०४, २२२, ४९२.
नाच–तमाशे, १९३, १९४, २००, २०१, २४६, २६३, २७१–२७२, ३००.
नायक, शेषाप्पा, ११.
नारद, ९८, १०१, १२०, १२९, २०६, २०८, ३००, ४०८, ४९१.
निजाम, ३२, ३१८.
नीरो, ७४.
नीळमालकांचा जुलूम, ११५.
पंचायत, २३०, २५३.
पटवर्धन, हरी गणेश, (आप्पासाहेब सांगलीकर), १५७.
पडवळ, तुकाराम तात्या, १५८.
पंढरपूर, १९६, २४१, २६९, ४७७, ४९१.
पदमनजी, रे० बाबा, ८.
पद्मा, १०१.
परभू (प्रभु जात), ११६, १७८.
परशुराम, ७, १३, ७३, ७४, ८७–८९, ११५–११६, ११७, ११८–११९, २२२–२२३, ३०२, ३१३, ३७९, ३८०, ४३२, ४४८, ४७६, ४८० इ.
पराशर, ४३६.
परिवारी (शब्दोत्पत्ती), ११२.
पाटील, ७८, १२८, २०८, २१८ (शब्दोत्पत्ती), २४९, २५२, २६०.
पाटील, रामप्पा (पांचगणीचे), ३२५.
*पांडवप्रताप*, १९९.
पाडवे, पांडुरंग किसन, १५७.
पारकर, २१५.
पार्लमेंट, ४८४, ५००.

पालेकर (सरनोबद), २१.
पासलकर, बाजी, १४, १९.
पुनर्विवाहाची बंदी, ११६, १४२, ३६१, ४५२.
पुणे म्युनिसिपालिटी, १३७–१४०, २२९, ४३०.
पुरुषोत्तम मारुती, २९२.
पेन, (पेन्स) टॉमस, १२१, १३५, २१५, २५५.
पेरी, सर अर्स्किन, १६८, ५०८.
पेशवे, पेशवाई, ३८, ७७, २०१, २२४, २३०, २५६, ३१४–३१६, ३२२, ३६५, ३९७, ४२६, ४९५, ४९७.
पेशवे, नानासाहेब (बंडवाले), १२३, १२४, १२८, २२३, २८४, ३०३–३०४, ३७२, ३७३, ३९२, ४३२, ४४८, ४५४, ४७४, ४७६, ४८०, ४९५.
पेशवे, रावबाजी, १२३, १२६, २०१–२०२, २५७, ३१४, ३९९, ४४८.
पेशवे, सवाई माधवराव, ४१९.
पोर्तुगीज, २२, २४, ३२, २२५, २५६, ३१३, ४१४.
प्रजापती, ११५, १२३.
प्रतिबृहस्पती पुणेकर विद्वान, १०४, १३७, २८६.
प्रल्हाद, १०२, १०४, २२२, २२४.
प्रार्थनासमाज, २८१–२८४, २९६, ४०५.
प्रिचार्ड, डॉ. (मानववंशशास्त्रज्ञ), ७१.
प्रिन्स ऑफ वेल्स, १५४.
फडके (वासुदेव बळवंत), २१२, २३०, २४४, ३७२, ३७३, ३९९, ४२६.
फॉरेस्टखाते, २०४, २२८, २४७, २६२.
फासेटसाहेब, २५१.
फिरंगोजी, १५, २३.
फुले, जोतीराव गोविंदराव
अतिशूद्रांसाठी शाळा, १४०, मुलींसाठी शाळा १४०, बालहत्त्याप्रतिबंधक–गृह, १४२, शिक्षण प्रसारांत पत्नीचा सहभाग, १६८, ५०८, क्रांतिप्रवण विचारांत परिवर्तन, १३५, ब्राह्मण सहकाऱ्यांशी मतभेद, १४१, युरोपियन हितचिंतकांची इतराजी, १४१, शैक्षणिक कार्याविषयी माहिती, १४०–१४१, १६८–१६९, ५०८, 'गुलामगिरी' १५४, १६९, 'तृतीय रत्न नाटक' १४०, 'ब्राह्मणांचें कसब', १४०, १५४, 'शिवाजीचा पवाडा' ११७, १२१, ३२५, 'शेतकऱ्याचा असूड', ३२५–३२६, 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक', ४४१, ४६४, साध्यसाधनविवेक, १४०, धर्मग्रंथ-विषयक मत, ४१५–४१६, देवविषयक मत, ३७५–३७७. दैवविषयक मत, ३९३, ४१९, मद्यपाननिषेध, ४६६, ५०६–०७. युद्धनिषेध, ३००–३०२. ४२५, ४६४, ४६६.
फुले, यशवंत जोतीराव, ३४३, ३४५.
फ्रँकलिन (फ्यांकलिन) बेंजामिन, २५५.
बह्लोलखान, २२.
बहुपत्नीकत्व, २५२, २६०, २९९.
बळी, ७२, १०५–११, १२१–२५, १३५, १९८, २२०, २२१–२२२, ४८९. इ.
बाजी, प्रभू (परभू) २०, २७, २८.
बाजी शामराज, १६.
बाणासुर, १०८, १०९, ११२, ११९, १२०.

बानाबाई, १८९.
*बायबल*, २१५, २१६, २५१, ३७७, ३९५, ४०३, ४१७.
बारा बलुते, ४०६.
बालविवाह, २५१, २५२, २६०.
बालहत्या, १४२, ३५६.
बुवा, नागेश्वरगीर कल्याणगीर, ४४२.
बृहस्पती, ३६७, ३७०, ४३७, ४३८.
बेणी (पशूंची), २४७, २६२.
बेहरिंगची सामुद्रधुनी, २२२.
बोस, प्रमथनाथ, ४७९.
बौद्ध, १२२, २०१, २१०, २१५, २१६, २१७, ४८८.
बौद्धधर्म आणि मुसलमान, १२२.
ब्रह्मदेव (ब्रंह्मा), ७, ८, १२–१३, ७३, ९५–१०१, ११५, १२०, १२४, १३५, २१५, ३५५, ३६३, ३९३, ३९४ इ.
ब्रह्मसूत्र (यज्ञोपवीत), ११३.
ब्रह्मोसमाज, २८१–२८४, २९६, ४०५.
ब्रॅडलॉ (ब्रॉडला), ४७६.
ब्राह्मण (शब्दोत्पत्ती), ९८, ३६९.
ब्राह्मणांचे नैतिक अधःपतन, १९७, २४५–२४६, २४८, २५७.
ब्रूटस, २२६, ४३१.
भट (शब्दोत्पत्ती), १०२.
भंडारकर (भांडारकर), विनायक बापजी, ८, ९२, १५९.
*भागवत*, ९८, १००, १११, १२१, २०१, ३७३, ३८०, ३८१, ३८२, ३८४, ३९३, ३९९.
भागवतमास्तर, ३२५.
भावे, (शाळाचालक), १७९, ५१७.
भालेकर, (कृष्णराव), १५४, १५५, ३०४.
भृगुऋषी, ५४, ११९.
भोंगळे, सखाराम सटवाजी, १५८.
मचाले, सखाराम, १५८.
मत्स्य, ९८–९९, ४९०.
मनु, *मनुसंहिता*, ९५, ९६, ९७, १०१, ११४, १२०, १२१, १२६, १४९, २०१, २१५, २२३–२२४, २४६, २८१, २८२, २८७, ३१३, ३६३, ४१०, ४३७, ४८० ४८५, ४९० इ.
मराठी ग्रंथकारसभा, ३०७.
मराठे आणि तुर्क, १२२, २०१.
मरी (इतिहासकार), ७.
मस्तानी, ३६५.
महंमद (पैगंबर), २०१, २२७, २५७, ४१५, ४३३, ४७८, ४८९–९०.
मल्हारी, १०५, १०६, १०७.
महादेव श्रीधर (न्यायाधीश), २७५.
महाभारत (भारथ), ११, २५८, ३६४, ३८१, ३८६.
महार (शब्दोत्पत्ती), ७, ७२, ११३, ११४, ३९७.
महाराष्ट्र, १०५.
महासुभा (म्हसोबा), ८, ४५, १०५, १०६.
मॅक्समुल्लर (म्याक्सम्युलर), २००, २७०.
*मॅक्समुलर, एम. ए., लेक्चर ३ रे*, २१७.
मॅचिएव्हेली, ७४.
मामा परमानंद, ३२५.
मारवाडी, २१०, २११, २३०, २४३, २४५, २४९, २६९, २८५, ४७१.
मारुती, १२४, ३८०, ३८१.
मार्तंड, १०५.
मालोजी (भोसले), ९, १०.

मिचेल (मिसेस्), १६९, ५०८.
मिठावरील कर, २२८.
*मिस्तरीज् आफ् दि कोर्ट आफ् लंडन*, २१३.
मीड, हेन्री, ७१.
मुकुंदराज, १२२, २०१, २५७, ३८४, ३९८.
मुसलमान आणि मुसलमानी धर्म, ११७. १२२, २०२, २१६, २१७, २२५, २२७, २५०, २५५, २५७, २८४, २८५, ३६४, ३६९, ३७७, ३७८, ३७९, ३८०, ३८३, ३८४, ३८५, ३९५, ४०४, ४१५, ४४९, ४५०, ४६५, ४७२, ४७८, ४८९–९० इ.
मुसलमान बादशहा, १२४, २२७, २५६, ३००–३०१, ३१३.
मूर्तिपूजा, १४४, १९२–२००, २०२, २४०, २४८, २५१, २५७, २८७, ३८२, ३८३, ४८२, ४८९, ५०५.
मेरियन, २१५.
मोरे, चंद्रराव, १६.
मोरोपंत, ३९८.
मोरोबा (मोरोपंत पिंगळे), ३१.
मोहबतखान, ३१–३२.
मोहिते, हंबिरराव, ३३–३५.
म्युईर, डॉ. जॉन, २२२.
म्हसके, गंगाराम भाऊ, १५७, १५९ ४९४–९५.
म्हाळसाई, १८९.
यंत्रद्वारे शेती, २६१, ४१७.
यशवंतसिंग (येशवंतसिंग), २३.
युरोपची यांत्रिक प्रगती, २५६.
रघुनाथ (शिवकालीन सरदार), १९.
रमणा, १२६, १४८, २०२, २५७, ३६०, ३९९.
रमाबाई (पंडिता), २७०, २८१, २८२–२८७, २९६–२९८.
राघवेंद्रराव रामचंद्रराव, १५४.
राघू भरारी, २३९.
राजन्ना बाळू (कॉंट्रॅक्टर), २९२.
राधा, ३०१.
रानडे, म० गो०, २९७, ३०७.
रानडे, रमाबाई, २९७.
राम, ८४, १२२, २०१, २७१, ३५१–३५२, ३६८, ३८४, ३८९, ३९३–३९४, ३९८, ४७१, ४८२.
रामचंद्र बाळकृष्णजी (जयकर, परमहंस-सभेचे अध्यक्ष), ४, ५.
रामदास, २१, ८४, १२२, २०१, २७१ ३५१, ३५२, ३६८, ३८४, ३८९, ३९३, ३९४, ३९८, ४७१, ४८२.
रामशिंग करणशिंग, १५३.
*रामायण*, १२०, २५८, ३७८–३८०, ३८२, ३९३, ३९९.
रामेश्वर, २४९.
राम्युलस आणि रीमस, २१५.
रावण, ११६, १२०, ३७८, ३७९, ३८०.
राक्षस (शब्दोत्पत्ती), ११२.
रिपन (गव्हर्नर जनरल), ४०७, ४०८, ४३०.
रीव्हज् (रेव्हिन्यू कमिशनर), १४१.
रुक्मिणी, ३८७.
*रुक्मिणी स्वयंवर*, २५२.
रुस्तुम जमाला, १९.
रेड इंडियन्स, २१४.
रेणुका, ११५, ४९६.

लक्ष्मण जगन्नाथ (दिवाण), ४९३.
लक्ष्मी (रमा–विष्णुपत्नी), ९७, २४९–२५०, २८०, ४८०.
लफेटे (लाफायेत्), १३५.
लाकुडतोडीविरुद्ध कायदा करण्याची आवश्यकता, २६२.
लॉक इस्पितळे, २६३.
*लॉज् ऑफ् मनू, सन ऑफ् ब्रह्मा* (सर वुइल्यम जोन्स) २२३, २२४.
लिंगू, एल्लप्पा, १५८.
लिंगू, जाया एल्लाप्पा, १५८.
लिंगू, जाया काराडी, १५८, २९२.
लिंगू, राजन्ना, ९२, १५३, १५९.
ली वार्नेर, ४९६, ४९७.
लूम्सडेन, १६८, ५०८.
*लोककल्याणेच्छु*, १४६.
लोकसत्ताक राज्य, २१४, २२१, २२५, २२६, २२७, ४३१.
लोखंडे नारायण मेघाजी, २७६, ३२९.
वडनाला, नरसिंगराव सायबु, १५६.
वराह, १०१, १०२, २२१.
*वर्क्स ऑफ् लेट होरेस हेमन वुइल्सन*, २१७.
वसिष्ठ, १२१, २८३.
वामन, ९७, ९८, १०४, १०७, १०८–११०, २२२, ३८१, ४८९, ४९०.
वामनपंडित, ३९८.
वारकरी, ४७७.
वाल्मिकी, ४३६.
वाशिंग्टन, जॉर्ज, १३५, २०३, २१५.
वाळवेकर, मोरो विठ्ठल, ४४२, ४६४.
विक्रम (राजा), २५३.
विठोजी (भोसले), १०.
विठोजी (होळकर) ३१४.
विठ्ठल, ४७७.
विद्यापीठातील उच्चवर्णीय सुशिक्षित पदवीधर ८१, ५१०.
विधवांची दुःस्थिती, ३०२–३०३.
विंध्यावली, १०७–१०८.
विप्र (शब्दोत्पत्ती) १०९.
विरोचन, १०४.
विलायतेतील स्त्रियांचे स्थान, २४९.
विविधज्ञानी ('विविधज्ञानविस्तार'कर्ते) ११८.
*विवेकसिंधू*, २०१, २५७, ३८४.
विश्वनाथ दाजी, २८८.
विश्वामित्र, ११८, १२१.
विष्णु, ११९, ३५५, ४७७, ४८०, ४९४.
वुइल्सन, ४००.
वृत्तपत्रे–मासिके १३५, १३९, १५७, २३३, २४२, २५१, २५४–२५५, २६३, २९७–२९९, ३३०.
वेडरबर्न, २३१.
वेद, १२०, २१७, २१९, २५८, २६९–२७०, ३८४, ३८५, ३९५–३९६, ३९८, ३९९, ४०१, ४४३, ४८८, ४९७.
वेसकर, २१८, ४१५.
*व्यंकटेशस्तोत्र*, २५२.
व्यंकोजी (भोसले), २२, ३४, ३६.
व्यापाऱ्यांवर कडक देखरेख, २६१.
व्यास, २८२, २८३, ४३६.
व्रतवैकल्ये, विधिविधाने, सणोत्सव, ४९–६४, १०९, १२९, १९२–२००, २१२, २३९, २४१, २५७, २५८ इ०
*व्हॉयेजिस राउंड दि वर्ल्ड* (कॅप्टन जेम्स कुक), २१५, २१६.

मिचेल (मिसेस्), १६९, ५०८.
मिठावरील कर, २२८.
*मिस्तरीज् आफ् दि कोर्ट आफ् लंडन*, २१३.
मीड, हेन्री, ७१.
मुकुंदराज, १२२, २०१, २५७, ३८४, ३९८.
मुसलमान आणि मुसलमानी धर्म, ११७. १२२, २०२, २१६, २१७, २२५, २२७, २५०, २५५, २५७, २८४, २८५, ३६४, ३६९, ३७७, ३७८, ३७९, ३८०, ३८३, ३८४, ३८५, ३९५, ४०४, ४१५, ४४९, ४५०, ४६५, ४७२, ४७८, ४८९–९० इ.
मुसलमान बादशहा, १२४, २२७, २५६, ३००–३०१, ३१३.
मूर्तिपूजा, १४४, १९२–२००, २०२, २४०, २४८, २५१, २५७, २८७, ३८२, ३८३, ४८२, ४८९, ५०५.
मेरियन, २१५.
मोरे, चंद्रराव, १६.
मोरोपंत, ३९८.
मोरोबा (मोरोपंत पिंगळे), ३१.
मोहबतखान, ३१–३२.
मोहिते, हंबिरराव, ३३–३५.
म्युईर, डॉ. जॉन, २२२.
म्हसके, गंगाराम भाऊ, १५७, १५९, ४९४–९५.
म्हाळसाई, १८९.
यंत्रद्वारे शेती, २६१, ४१७.
यशवंतसिंग (येशवंतसिंग), २३.
युरोपची यांत्रिक प्रगती, २५६.
रघुनाथ (शिवकालीन सरदार), १९.
रमणा, १२६, १४८, २०२, २५७, ३६०, ३९९.
रमाबाई (पंडिता), २७०, २८१, २८२–२८७, २९६–२९८.
राघवेंद्रराव रामचंद्रराव, १५४.
राघू भरारी, २३९.
राजन्ना वाळू (कॉंट्रॅक्टर), २९२.
राधा, ३०१.
रानडे, म० गो०, २९७, ३०७.
रानडे, रमाबाई, २९७.
राम, ८४, १२२, २०१, २७१, ३५१–३५२, ३६८, ३८४, ३८९, ३९३–३९४, ३९८, ४७१, ४८२.
रामचंद्र बाळकृष्णजी (जयकर, परमहंस-सभेचे अध्यक्ष), ४, ५.
रामदास, २१, ८४, १२२, २०१, २७१ ३५१, ३५२, ३६८, ३८४, ३८९, ३९३, ३९४, ३९८, ४७१, ४८२.
रामशिंग करणशिंग, १५३.
*रामायण*, १२०, २५८, ३७८–३८०, ३८२, ३९३, ३९९.
रामेश्वर, २४९.
राम्युलस आणि रीमस, २१५.
रावण, ११६, १२०, ३७८, ३७९, ३८०.
राक्षस (शब्दोत्पत्ती), ११२.
रिपन (गव्हर्नर जनरल), ४०७, ४०८, ४३०.
रीव्हज् (रेव्हिन्यू कमिशनर), १४१.
रुक्मिणी, ३८७.
*रुक्मिणी स्वयंवर*, २५२.
रुस्तुम जमाला, १९.
रेड इंडियन्स, २१४.
रेणुका, ११५, ४९६.

लक्ष्मण जगन्नाथ (दिवाण), ४९३.
लक्ष्मी (रमा-विष्णुपत्नी), ९७, २४९-२५०, २८०, ४८०.
लफेटे (लाफायेत्), १३५.
लाकुडतोडीविरुद्ध कायदा करण्याची आवश्यकता, २६२.
लॉक इस्पितळे, २६३.
*लॉज् ऑफ् मनू, सन ऑफ् ब्रह्मा* (सर वुइल्यम जोन्स) २२३, २२४.
लिंगू, एल्लप्पा, १५८.
लिंगू, जाया एल्लाप्पा, १५८.
लिंगू, जाया काराडी, १५८, २९२.
लिंगू, राजन्ना, ९२, १५३, १५९.
ली वार्नेर, ४९६, ४९७.
लूम्सडेन, १६८, ५०८.
*लोककल्याणेच्छु*, १४६.
लोकसत्ताक राज्य, २१४, २२१, २२५, २२६, २२७, ४३१.
लोखंडे नारायण मेघाजी, २७६, ३२९.
वडनाला, नरसिंगराव सायबु, १५६.
वराह, १०१, १०२, २२१.
*वर्क्स ऑफ् लेट होरेस हेमन वुइल्सन*, २१७.
वसिष्ठ, १२१, २८३.
वामन, ९७, ९८, १०४, १०७, १०८-११०, २२२, ३८१, ४८९, ४९०.
वामनपंडित, ३९८.
वारकरी, ४७७.
वाल्मिकी, ४३६.
वाशिंग्टन, जॉर्ज, १३५, २०३, २१५.
वाळवेकर, मोरो विठ्ठल, ४४२, ४६४.
विक्रम (राजा), २५३.
विठोजी (भोसले), १०.
विठोजी (होळकर) ३१४.
विठ्ठल, ४७७.
विद्यापीठातील उच्चवर्णीय सुशिक्षित पदवीधर ८१, ५१०.
विधवांची दुःस्थिती, ३०२-३०३.
विंध्यावली, १०७-१०८.
विप्र (शब्दोत्पत्ती) १०९.
विरोचन, १०४.
विलायतेतील स्त्रियांचे स्थान, २४९.
विविधज्ञानी ('विविधज्ञानविस्तार'कर्ते) ११८.
*विवेकसिंधू*, २०१, २५७, ३८४.
विश्वनाथ दाजी, २८८.
विश्वामित्र, ११८, १२१.
विष्णु, ११९, ३५५, ४७७, ४८०, ४९४.
वुइल्सन, ४००.
वृत्तपत्रे-मासिके १३५, १३९, १५७, २३३, २४२, २५१, २५४-२५५, २६३, २९७-२९९, ३३०.
वेडरबर्न, २३१.
वेद, १२०, २१७, २१९, २५८, २६९-२७०, ३८४, ३८५, ३९५-३९६, ३९८, ३९९, ४०१, ४४३, ४८८, ४९७.
वेसकर, २१८, ४१५.
*व्यंकटेशस्तोत्र*, २५२.
व्यंकोजी (भोसले), २२, ३४, ३६.
व्यापाऱ्यांवर कडक देखरेख, २६१.
व्यास, २८२, २८३, ४३६.
व्रतवैकल्ये, विधिविधाने, सणोत्सव, ४९-६४, १०९, १२९, १९२-२००, २१२, २३९, २४१, २५७, २५८ इ०
*व्हॉयेजिस राउंड द वर्ल्ड* (कॅप्टन जेम्स कुक), २१५, २१६.

व्हिक्टोरिया (विक्टोरिया) महाराणी, ३८, ४८, ४९, ५८, १०८, १२४, १३९, ३००, ४०८, ४२६, ५००, ५०५, ५१२.
शंकर तुकाराम (पोवाड्यांचे संपादक) ३२५.
शंकराचार्य, १२२, १२५, २०१, २८४, २८८, ३११, ३५४.
शंखासूर, ९९.
शंबर, ३८७.
शहाजी, ९, १६, २२, २५.
शहाण्णव कुळी, २२१.
शाइस्तेखान, २३, २४.
शाक्त, २५७, ४८०.
शाहदावल (शादावल) १२५, १३६, २३८.
शाहाजहान ३६.
शिंदे, ताराबाई, २९७–२९८.
शिंदे, रामचंद्र हरी, १५३, १५४.
शिंदे, लक्ष्मण हरी, १५३, १५९.
शिंपी, दामोदर बापूजी, १५६.
*शिवलीलामृत* १९८.
शिवाजी, ७–३८ (पोवाडा), ७१, ८४, ११४, १९६, २०१, २७१, ३२५, ३५२, ३८४, ४७१, ४७४.
*शिवाजीचा पवाडा*, ११७, १२१, ३२५.
शिशुपाल, ३८७.
शिक्षणखाते, ८१, १२८, १३४, १३६, १३७, १७२–१८१, २०६, २१३, २४२, २६८.
शूद्र (शब्दोत्पत्ती), ११३, ४७२, ४९६.
शूद्रांचे नैतिक अधःपतन, २४३–२४४, २६३.
शूद्रांपैकी शिक्षकांची आवश्यकता, १४३, १७२, १७४, ४०९, ४८६–८७, ५१३.
*शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविध संग्रह*, १४६.
शूर्पणखा, ३७९.
शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा, ६१–६२, २११, २२७–२२८, २३०, २६१, ३२०–३२१.
शेतकऱ्याच्या गृहस्थितीचे चित्र, २३१–२४८.
शेतकरी आणि गोरे शिपाई: तुलना, २३१–२३२.
शेतकरी मुलांना विलायतेतील शेतकी शाळांची पाहणी करण्यासाठी पाठविण्याची मागणी, २६३.
शेतकऱ्यांतील उपजाती, १८९.
शेतकऱ्यांतील लग्न आणि मडमा, २४६.
शेतकरी स्त्रिया आणि ब्राह्मण स्त्रिया: तुलना, २४५–२४६.
शेतकी–प्रदर्शन, २६२.
शेषशायी, ९७–९८, ३६३, ३७४, ४८०.
शेषाद्री, रे० नारायणराव, ३९७.
सईबाई (भोसले), १६.
सक्तीचे शिक्षण, ६८, १७३, २५४, २६०, ४२७, ५१२.
संख्याप्रमाणात सरकारी नोकऱ्या, १४८, २६०, ५०१.
संतवाङ्मय, २१, १२३, १९६, १९८, २००, २०१, २४१, २४६, २४७, २५२, २५७, ३८१–३८२, ३८३, ३८४, ३८६–३८९ इ०
संताजी (शहाजीचा दासीपुत्र), ३५.
सती ३०३, ३५९, ४३४, ४८०.
सतीर ऋषी, ४२६.

सत्तावनचे बंड १२४, १२८, १४१, २३०, ३०२–३०४, ४३२, ४५४, ४७४, ४७६.
*सत्यदीपिका*, १५७.
सत्यनारायण १९९, २३९, २४०, २४१, ३९९.
सत्यशोधकसमाजाचे ब्रीद, ३९६.
संभाजी (शिवाजीचा बंधू) ११.
सध्यदबंधू, १८.
*सर वुइल्यम जोन्स*; खंड २ रा, २५७.
सरस्वती, ९८.
*सर्वदर्शन, कलकत्ता आवृत्ती*, खंड ५ वा, २१७.
संस्थानिक आणि देशी राजेरजवाडे, १२४, १९०, १९७, २०३, २०४, २१२, २२५, २२९, २३०, २३३, २५१, २५६, २५७, २५८, २६४, २७०, २७१, २७२, ३६५, ३६७, ३७४, ३९९ इ.
*सह्याद्रिखंड*, ४७७.
सॉक्रेटिस, ४३३, ४६३.
सांख्यमुनी, १२२, ४३६.
सातारकर, आप्पासाहेब महाराज, २६६.
साती आश्रय, ११६.
सार्वजनिक मानवधर्म, २५५.
*सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक* ४४१, ४६४.
सार्वजनिक सभा, १२७, २०२, २३०, २४५, ३०७, ४०५, ४०६, ४०७, ४९६.
सालरजंग, २४८.
सावंत (वाडीकर), २२.
सावित्री, ९६, ९७, ४८०.
साहाणे, हणमंत बापूजी, १५२.
सिद्दी (जंजिरेकर) १७, ३१.
सिद्दी जोहार, १९–२०.
सिपियो, २२६.
सीता, ११७, ३७८–३८०.
*सीपॉय* ˜व्हॉल्ट (हेन्री मीड) ७१, १२८, २००, २०२, २१२, २२३, २३०, २३३, २४१, २४२, २४५, २४६, २४७, २४९, २५०, २५८, २५९, २६४.
सुदामन, १२१.
*सुबोधपत्रिका*, १५७.
सुलोचना, ३८०.
सुशिक्षित शूद्रांचे वर्तन, २४२–२४३.
सूरदास, ३५२.
सूर्यपूजा, ४०१.
सूर्याजी (मालुसरे), ३०–३१.
सेमीरेमी, ३०२.
सोनपत पानपत, ३००, ४४८.
सोनार, द्वारकानाथ त्रिंबक, १५६.
सोमनाथ, सोरटी २०१, ३८४.
सोमरस, ७९, ११९, ४९२.
स्कॉच, १२७, २२७, २६४, २७०.
स्पार्टा, २२६.
स्याक्सन, २२७.
*स्त्री-पुरुष तुलना*, २९७.
हंटरसाहेब, १६८, २१४, २६८, ४०७, ४०८.
हनीबाल, २२६.
*हरिविजय*, १९६, २४१.
हातिमताई, २९.
हाली, कोल जी. जे., ७१.
हिरण्यकश्यपु, १०२, १०४.
हिरण्याक्ष, १०२, ११६.
हिरवे, विठ्ठलराव, १५५.

हिराबाग, २५९.
*हिस्टरी ऑफ् पेरू अँड ब्राझील*, खंड १ व खंड २, (डब्ल्यू. एच. प्रेस्कॉट), २२२.
होमर, ७१.
*ज्ञानप्रकाश*, १५७.
ज्ञानेश्वर, १२२, २०१, २६३, ३८१, ३८४, ३८६, ३९८.
*ज्ञानेश्वरी*, २०१, ३८१-३८२, ३८३, ३८४, ३८६-३८९.

# निवडक शब्दांचा कोश

सूचना : (१) शब्दांपुढील अंक पृष्ठांचे आहेत.
(२) संक्षेपाक्षरांचे स्पष्टीकरण :–अर० = अरबी, इं० = इंग्रजी, का० = कानडी, गु० = गुजराती, देप्रा० = देशी प्राकृत, ध्व० = ध्वनिशब्द, महाराष्ट्र प्रा० = प्राकृत, फा० = फारशी, मशाको० = शब्दकोश – दाते – कर्वे – चांदोरकर – दातार, मोको० = A Dictionary, Marathi and English, 2nd ed., Bombay, 1957—J. T. Molesworth, ल० = लक्षणेने, हिं० =हिंदी.

**अखर** १४३ [अर० आखिर] गुरे एकत्र करण्याची गाव–सीमेवरची जागा.

**अगळ** ४४९, ४५३ [सं. अर्गल] अडसर, बंधन.

**अग्रिकलचर** २४७ [इं०] शेतकी.

**अगोचरपणा** ३८५ [अगोचर° = ज्ञानेंद्रियांनी ग्रहण करण्यास अशक्य] अविचारीपणा, मूर्खपणा.

**अजी** २११ [फा० अज्] अजिबात, समूळ.

**अडता** २४९ [सं० अट्ट + पति, तेलगू– अडिति] दलाल, एजंट.

**अडवंका** ४९२ [का० अड + बंकी = आंकडा] आडमुठा.

**अदा** २२७ [अर. अदा] आवक; येणे– "लोकलफंडाचे हप्ते अदा करण्याकरितां" (येथे 'बिदा'शी साम्याभ्यास False Analogy होऊन 'देणे' हा अर्थ अभिप्रेत दिसतो.)

**अदावतीनें** १९८ [अर. अदावत] आकसाने, दुष्टाव्याने.

**अपस्वार्थी** २२५ [सं० आत्मन् + स्वार्थ] आपमतलबी.

**अभीयंक** ४८३ [सं० अभ्यंग] तैलमर्दन.

**अयोनिसंभव** ३०१ [सं० अ + योनि + + संभव] शुक्रशोणितसंयोगाने उत्पन्न न झालेला.

**अलायबलाय घेणे** ३३१ [अर० बला = दुर्दैव. द्विरुक्त शब्द. तु० सं० अलात- अलाय = कोलीत] दृष्ट काढणे.

**अबदागीर** २४५ [फा० आफ्ताब = सूर्य + गिरफ्तन् = पकडणे] मिरवणुकीमधून सूर्याचे ऊन निवारण्यासाठी धरावयाचे मोठ्या पंख्यासारखे छत्र.

**अबाद** २२० [फा० आबाद] संपन्न.– ('आबाद' आणि 'अबाध' या शब्दांतील साम्याभास.)

**अभंड** ४७४ अमर्याद, फार.

**अर्व** २३१ [सं. अर्बुद, हिं, अर्व] दहा कोटी.

अशौच, अशौच्य २५७, ३०२ [सं० अ + शुचि] अपवित्र, पापी.

अस्मानीसुलतानी २१३ [फा.] दैवी अवकृपा आणि राजाची अवकृपा.

आगोली १९२ [सं० अग्र + ल] नांगराच्या धुरी पुढच्या बैलजोडीची जागा.

आजानुबाहु १० [सं० आ + जानु + बाहु] उभा राहिला असता ज्याचे हात गुढघ्यापर्यंत पोहोचतात असा;- (भाग्याचे लक्षण.)

आजेचीर ३३६ लग्नात आजीला द्यावयाचे मानाचे लुगडे, आजीची चिरडी.

आड २०० [सं० अवट = खळगा; कूप > अअड > आड] पायऱ्या नसलेली लहान तोंडाची विहीर, विहीर.

आडफाटे घालणे २५८ अडचणी आणणें.

आनरेबल २९७[इं०] माननीय, आदरणीय.

आबादानी ४६ [फा० आबादान्] समृद्धी, भरभराट.

आभंड ४५ [अ + भंड] सलग, अमर्याद.

आमान्न ४३७ [सं० आम = कच्चे, न शिजलेले + अन्न] कोरान्न, शिधा.

आमेन २०६ [इं० आमेन = सत्य] तथास्तु.

आयब २३४ [अर० अयब, आइब] व्यंग; फट.

आराधिणी २६३ [सं० आ + राध्°] संतिणी; भगतकी करणाऱ्या स्त्रिया.

आललटप्पू १९५ [फा० हलाल्° = योग्य, प्रामाणिक ?] स्वैर, बेजबाबदार.

आवडनिवड १२४, १४२, २५८, २७६ पंक्तिप्रपंच

आर्जवी १३८ हांजीखोर, खुषमस्कऱ्या.

आवल २३७ [सं० विलग्न > वईल > आवल] वैल.

आळपलेला २३२ आवळलेला, बांधलेला.

आळाशी ११४ [एक पेंढी-जुडी बांधता येईल इतके शेतांत कापून वाळत ठेवलेलें पीक.—मशको० १९२-१९३.- A few handfulls (of reaped corn) lying along to dry, the qnantity of sheaf or bundle, a reap-मोको० ५८] पेंढी, लहान भारा.

इंगळ २४८ [सं० अग्नि] निखारा, विस्तव.

इदर थापडी तिदर थापडी करणे २५४ इथे तिथे गिलावा करून गाबडी मारणे, (ल०) तात्पुरती उपाययोजना करणे.

इनसाफ २६० [अर० इन्साफ्] न्याय.

इन्स्टिटयूशन २६४ [इं० ] संस्था.

इरिगेशनखाते २२८ [इं. इरिगेशन + अर० खत्त, खित्त] पाटबंधारे खाते.

इस्तरा; इस्तारा १९७, २४४ [सं० वि + स्तृ° ?] पत्रावळ.

उजवणे १९२ [सं० उद्यापन > उज्जावण] पार पडणे, नव्या स्वरूपात लकाकी देणे.

उदमळून ३०२ [सं०उद् + मिल्°] फुगून.

उधडणे [सं० उद् + धृ० > प्रा०उद्धडण]- To open the seam, to tear off roughly मोको० ९६.- उसवणे, फाडणे.

उपणणे २४५ [उत् + पू = पवन > प्रा० उपणण] वारवणे; वरून वारा घालून दाणा आणि भूस वेगळे करणे.

उराड २५३, २६६ [सं० उरस् + ड- कुत्सार्थे] पुढें काढलेली छाती.

उसवास १४४ [सं० उच्छ्वास] उंचावरून

आणलेल्या पाण्याची उंची कायम राहावी, पाणी दूर अंतरावर नेता यावे व आतील दूषित हवा बाहेर जावी, म्हणून बांधलेला पाण्याचा हौद.

**उस्तवारी** २४७ [फा. उस्तुवारी] व्यवस्था, दुरुस्ती.

**ओंमण** २३८ [सं. उद्‌बंधन > प्रा० उब्बंधण, सं. उल्ब > ओंब°] घराच्या छपरावर आडव्या रचलेल्या रिफा, कामट्या इ०

**ओसांगळी घालणें** ३३६ [सं० उत्संग > प्रा० ओच्छङ्ग > ओसंग°] आश्रयाखाली देणे, हवाली करणे.

**कचकुल** ४८ [फा० कचकोल] फुटक्या मडक्याचा खालचा अर्धा भाग, एक प्रकारचे मातीचे भिक्षापात्र.

**कटवून** २४० [का कट्टु < म० कट°] अप्रामाणिकपणें पुढे करून; थापा देऊन.

**कडकली** ५७ कठोर झाली.

**कढई** ४२६ [गु० कडिया] गवंडी

**कणकणीच्या** ४९० [कणक्या ?] धष्टपुष्ट, बळकट ?

**कणुरा, कणूरा** २३७, २४० [कण] कणी.

**कणोसरीस** १९४ कडोसरीस

**कंदुरी** ४९१ [फा०] सागुती, प्रसाद.

**कथाडा** २५३, २६०, २६३ [कथा + डा - कुत्सार्थे] कीर्तनकार.

**कनाल, क्यॉनाल** २५०, ३१८, ३९१ [इं. कॅनाल] कालवा.

**कमटे** ९ [सं० कमठ = बांबू] धनुष्य.

**कर्बल** ४९० [कर्बल = हुसेनचे मृत्युस्थान] मोहरमांत हिंदूंनीं काढलेले मेळे, लेजिमचे खेळ.

**कलखंड** ४७८ [कलह + भंड > खंड] भांडखोर. - (कदाचित् ‘कलभंड’ वा ‘कलभांड’ ऐवजी मुळातच हा हस्तदोष वा मुद्रणदोष असावा.)

**कलगी** १९५ प्रश्नोत्तररूप लावणीचा एक प्रकार; तुरासंप्रदायाचा प्रतिस्पर्धी.

**कलम** १३२ [अर० कलम] मुद्दा.

**कलमकसाई** १२५, १२९, १३१ लेखणीने गळा कापणारा.- (कुळकर्णी - कारकून इत्यादिकांना हा शब्द निंदाव्यंजक रीतीने लावतात.)

**कलमा** ३८३ इस्लामी धर्मसूत्र.

**कलवड** २३६ ढीग, रास.

**कसबीण** १९७ [अर० कस्ब्] वेश्या, नर्तकी.

**कहीवाले** ३०१ [फा० कही = दाणावैरण गोळा करून आणणारी पेंढाऱ्यांसारखी लष्करी तुकडी] दाणावैरण आणणारे लोक वा जमात.

**कळचेटा** ४०८ [कळ + चेट] कळलाव्या, कलागती.

**कळाशी** १९५ दोन लाकडे जोडून तयार केलेला सांधा,-किंवा असे सांधे जोडून तयार केलेली शिडी.

**कळी** २३७ [सं० कलिका] चुनातंबाकूची लहान गोळी.

**काडवासुडया** १९४ [सं० काष्ठ + वर्तिका] काडवाती, काकडे.

**काडीमहाल** २४४, २७० [सं० काष्ठ + अर० महल्ल] बावनखणी ?-(हवा यावी म्हणून पेशवाईत काड्यांसारख्या बारीक गजांच्या इमारती असत, त्यांना ‘काडीमहाल’ म्हणत असत.)

**कांतीण** २३८ कोळयांच्या वर्गातील एक किडा.

**काथवट** २४० भाकरीचे पीठ मळण्याचे कान असलेले परातीसारखे लांकडी भांडे, काथोट.

**कानांत सुंठी फुंकणे** २५३ चुगल्या करणे.

**कांभीरे** २३८ [कमठ > कंबि > कांबिर] आढे किंवा पाखे यांना तुळईपासून दिलेला लाकडी धिरा.

**कारटा** ५८ [सं० करट°] मृताचे कर्म चालवणारा ब्राह्मण.

**काला** २३७ मिश्रण.

**कालाकित्ता** २२७ निरनिराळया वस्तूंचा संग्रह; भिन्नभिन्न प्रकारची सामग्री.

**काशीफळ भोपळा** २३८ तांबडा भोपळा.

**काळा उन्हाळा** १३८ अत्यंत कडकडीत उन्हाळा, सर्व पदार्थ रखरखीत करून टाकणारा उन्हाळा.

**काहाराचा पाषाण** ८६ [का० कार = काळा°] एक प्रकारचा काळा आणि टणक दगड.

**किरडी** २३९ [किर् = किरण + डी – कुत्सार्थे] ज्योत.

**किरमिट** २४३ करपट.

**कुकूचकू करणे** १९९, ३६३ [लपंडावाच्या खेळातील-ध्व०] झाकपाक करणे, चोरटा व्यभिचार करणे.

**कुचित्** ३९३ [कुचित्त] दुष्ट, कुश्चित.

**कुणबाया** २३१ कुणबी काम, शेतकी.

**कुंदी निघणे** २४९ मारपीट होणे; दुर्दशा होणे.

**कुंभारी गौरी** १९७ कुंभाराने घडविलेल्या किंवा मातीच्या गौरी.

**कुमक** ४६ [फा०] मदत.

**कुरकुल** २३६ किरकोळ वस्तूंसाठी केलेले बुरडी, टोपला, करंडी यासारखे कळकाच्या कांबींचे (येथे तुराठयांचे) पात्र.

**कुलपत** २३४ कुचमत; लंगडत; झेपालत.

**कुल्ली** ४७३ घोडा किंवा घोडी यांच्यामधील प्रबळ कामेच्छा, (ल०) माजोरीपणा.

**कुळव** २४० नांगरलेली भुई सारखी करण्याचे शेतीचे हत्यार.

**कृत्रिम, कृत्रीम** २२१, २५४, २५९ खोटेपणा; मतलबीपणा.

**केळा** १९९ [का० केळा = मातीची घागर] कऱ्हा, मडके.

**कैकाडी झांप** २३६ कैकाडयांनी विणलेले झांप; कामचलाऊ झाप.

**कोडत** ५५, २०९, २१० [इं० कोर्ट्] न्यायालय.

**कोडबुळे** २२७ कडबोळे.

**कोठे** ३३६ [सं कोटर] पक्षाचे घरटे.

**कोरड्यास** २४३, २६७ [कोरड्यासह ?] तोंडी लावण्याचा पातळ पदार्थ; कालवणाइतका ओलावा नसलेला खाद्य पदार्थ,

**कोर्ट मार्शल** २१५ [इं०] सैनिकी न्यायलयातील खटला.

**कोर्तुशी बंड** ३०३ [इटालियन–कार्तोसिओ° > इं० कार्त्रिज्°] काडतुसांचे निमित्त होऊन झालेले बंड, सत्तावनचे बंड.

**कोल्हेभुकीदाखल** १९५ कोल्ह्याच्या भुंकण्याप्रमाणे.

**कोळपी** २३८, २४१, २६० [कोळ° = फाळ, दात] वीतभर पीक उभे असता पिकातील जमीन भुसभुशीत करण्या-

करिता किंवा तण काढण्याकरिता उपयोगात आणले जाणारे हत्यार.

**क्रमीन** ४८५ [फा० कमीन्] कृतघ्न, नीच.

**खंगार** २११ [फा० कंगाल, सं० क्षयिक > प्रा० खंग°] कंगाल, खंगलेले.

**खत** २५२ [अर० खत्] हातचा लेख.

**खपले** २४० गव्हाची एक जात.

**खंब ठोकणे** ९८ [स्तंभ°] दंड थोपटणे, नामोहरम करणे.

**खबुत्र** ३७८ कबुतर.

**खमठोकी** ११ [सं. स्तंभ°?] दांडगी, जोरदार.

**खरड्याच्या बाळ्या** २४१ [खरडा = खाणीत असंस्कारित स्थितीत सापडणारे रत्न] कानातला हलका दागिना.

**खरपड** १३८ [ध्व०] खडखडाट, टंचाई.

**खर्ची** २३३ [= वेश्येला संभोगास्तव द्यावे लागणारे धन] अनौरस.

**खल्लड** १९५, २४७, ३५६ क्षीण, कृश, खप्पड.

**खळगुट** २३२, २४३ [सं० खल् = एकत्र करणे + कूट?] पीठ, भाजीपाला, चिंच इ० एकत्र करून तयार केलेले कालवण.

**खानेखराबी** [फा० खाना = घर, खाते + इ + खराब्] घरादाराची वाताहत.

**खापरी** २२९ [सं० खर्पर > खप्पर] (ल०) लादी, फरशी.

**खारवा** २३२, २३४ [फा० खारा°] एक प्रकारचे गडद लाल कापड.

**खाशा** २३३ [अर० खस्स्] औरस.

**खिदाडणें** २८४ [ध्व०] हुंदडणे, लुटणे.

**खिदाडे घालणे** २९७ [ध्व०] बोकाळणे, हुंदडणे.

**खिसका** ३३१ [देप्रा० खिच्च > खिस?] एक प्रकारचा कोंबडे बकऱ्याचा नैवेद्य. –'शेतकरी सुगीच्या हंगामात बाजरी अगर ज्वारीची थाटे एकत्र बांधून परडी करतो, तीत कणकेचे भांडे ठेवतो, त्यांत खोबरे, खारका तुपाचे दिवे ठेवतो आणि म्हसोबाला नैवेद्य दाखवतो, व नंतर ती परडी सर्व साहित्यासह पाण्यात नेऊन सोडतो, हा 'खिस्क्याचा'चा नैवेद्य होय, असे समजते.

**खुदाई गहजब** २५३ [फा० खुदा + अर० घझब्] ईश्वरी संकट.

**खुदापास्त** २५६ [फा० खुदा + सं० पास्त? – 'दुरापास्त'च्या धर्तीवर साम्याभास] धर्मवेडा, दुराराध्य धर्मभोळा.

**खुपस दशम्या** २०३ [येथे 'खुपरा' हा पहिल्या आवृत्तीतच मुद्रणदोष आहे. 'खुपरा' ऐवजी 'खुपस' असे पाहिजे.] जळते लाकूड कणकेत किंवा भाकरीच्या पिठात खुपसून केलेल्या दशम्या.

**खेट्या** १९२, २६९ फेऱ्या, खेटे.

**खैचाताणी** ३०१ खेचाखेच, ओढाताण, त्रास.

**खोंगळ्या** २१६, २६२ [का० कोंके = वांकडा] लहान खड्डे, चर.

**खोरीस आणणे** १९९ नुकसान करणे, बुडवणे.

**गंज, गंजी,** २३५, २३६, २३७ [फा०] ढीग, रास.

**गडगनेर** २४४, ३११ [गड + नीर] लग्नामुंजीपूर्वी होणारा केळवणाचा समारंभ.

गडगळ २३६, २४१ ओबडधोबड, आकारहीन.

गडी १९५ जोडीदार, मित्र.

गफलती २४० [अर० घफ्लत्] लबाड, अविश्वासू.

गरती २४६ [सं० गृहरत, गृहवर्ती, गृहस्थी] कुलीन, घरंदाज.

गलोल्या २४३ [सं० गल्ल°] अजागल, शेळीच्या गळ्यातील स्तन.

गवाळे २८६ पोथ्या वगैरे सामानसुमानाचे बासन किंवा बोचके.

गव्हार २९७ [फा० गवार] खेडवळ, अडाणी.

गारोळे २३४ [घारे + डोळे] घारे.

गिध ४५४ [गृध्र > गीध] गिधाड.

गिर्वाण ४९० [सं० गीर्वाण] संस्कृत भाषा.

गुढघेमेटी येणे २१७, २६६ गुढघे टेकणे.

गुल्या देणे २१० विनंती मान्य करणे, विनंती मान्य केल्याची खूण करणे.

गोंडचाळे करणे [का० गोंडे, प्रा० गोंडी = मंजिरी] गोंडा घोळणे, (ल०) खुशामत करणे.

गोंधणी २३७ मोकरासारखी बारीक लाल फळे येणारे एक रानटी झाड.

गोची २३८ गुंता.

गोम, गोमा ३९७ [सं० गुल्म] दोष, वैगुण्य, (ल०) लबाडी.

गोमुखी २४८, २५९ गाईच्या तोंडा-सारखी जपमाळेची काटकोनी पिशवी.

गोल्ह्या ५३, ५५, २३८, २४१, २६७ कोळप्याच्या दांतावरील आडवी लोखंडी पट्टी.

गोळकभट्ट ३५८ [गोळक = ब्राह्मण विधवेची संतती] अनौरस ब्राह्मण.

ग्याझिट २०६ [इं० गॅझेट] सरकारी बातमीपत्र, राजपत्र.

घमंडी २५२ [हिं० घमंड] गर्व, घमेंड.

घागरी २३६ एक प्रकारचे मोठ्या जातीचे गोचीड.

घुला २३८ [देप्रा० घुल्ल] सुरवंट, कुसरूड.

चघळ २०४ रगड, भरपूर.

चबिना १९३ [सं० चर्वण°] हरभरे, फुटाणे यांसारखे चावून खाण्याचे पदार्थ.

चवाळें २३७ एकसंध विणलेले चार पंचे, जाडेभरडे वस्त्र.

चाडें २३८ बी पेरण्यासाठी पाभरीवर बसविलेली वाटी.

चांद्रायण प्रायश्चित्त ६५, २२४ अन्न-ग्रहणासंबंधीचे एक व्रत.–(पौर्णिमेस पंधरा घास खाणे व नंतर वद्यपक्षात प्रतिदिनी एकेक घास कमी कमी करीत पुन्हा शुक्लपक्षात दर तिथीगणिक एकेक घास वाढवीत नेणे.)

चापसणे २०७, २०९ [सं० चप्०] चांचपडणे, अंदाज घेणे.

चारट १२९, २३० छकडा, सारवट.–(बेळगांवकडे दोन बैलांच्या धामणीस 'चारट' म्हणतात.)

चावडी भरणे ६४ (ल०) पट्टी वा कर भरणे.

चाळक चेष्टा २०९ चावटपणा, खठ्याळ चाळे.

चिकसा २४४ एक प्रकारचे उटणे, जोंधळा इ० धान्ये वाटून अंगास लावण्यासाठी केलेले सुगंधी द्रव्य.

चितरकथा २५२ [चित्र + कथा] चित्रांच्या

द्वारे दाखविलेल्या पौराणिक कथा.
**चिरीमिरी** २०८, २३५ लहानशी लांच, बेकायदेशीर बक्षिशी.
**चुंच** ३२१ [सं. क्षुरिकाबंध–शूद्र लग्ना-मुंजीच्या स्थानी केला जाणारा एक संस्कार ?] हजामत, 'लगीनचेहेरा.'
**चुमण** ४७८ चुंबन.
**चुरमा** २४६ कणकेचे गाकर करून त्यात तूपसाखर घालून केलेले लाडू.
**चेक** १२५ (इं०) दाब, अटकाव.
**चेंधा** २४१ गदळ, पसारा.
**चोखड** ४७८ [सं०चोक्ष > प्रा० चोक्ख°] शुद्ध.
**चोटी** २३४ (प्रा० चोट्टी, हिं० चोटी] शेंडी.
**चौगर्दा** २१८ [हिं० चहुं+फा० गिर्द] चोहो बाजूंनी.
**छाकटा** २५१ [सं० शठ°] छचोर, उनाड.
**छाट दिवाली** २३६ छपर नसलेल्या, भुंडया किंवा उघडया भिंती.
**छाता** २३४ [छत्र ?] पंजा ?–'हाताच्या कांबी रुंद असून छाता पसरट होता.'
**जती** ४४५ [सं० यति] जैन साधु.
**जन्नत** १८, ४६६ [फा० जन्नत्] स्वर्ग.
**जहामर्द** २०३, २१२ [जवान+मर्द] पराक्रमी.
**जामा** २२६ [फा०] अंगरखा, उत्तरीय (?).
**जितरात्र** २२८ पिकलेले उभे शेत.
**जिराइती पीक** २४७ [अर० झिराअत्] पावसाच्या पाण्यावरचे पीक.
**जिल्हई** २६३ [अर० जिला] लकाकी. पॉलिश.
**जीन घालणे** ६१ [फा० झीन] खोगीर घालणे. (ल०) तयार करणे, चढवणे.
**जुगल** २१५ [सं०युगुल] द्वैत, जोडी.
**जुटास** १२८ [सं० यूथ < जूट] ऐक्यास, जुटीस.
**जुरत** २१७ [फा० जुर्अत] धाडस, छाती.
**जुव्वेबाज** ४६७ [सं० द्यूत°] जुगारी.
**जुलयी** २०४ [फा० जौलाह] विणकर.
**जेन** २३८ [फा० झीन] जीन, घोड्याच्या पाठीवरचा उशीसारखा खोगीर.
**जेरदस्त** ४६५ [फा० झेरदस्त] हैराण, उध्वस्त.
**जोगतिणी** २६३ [सं० योग°] जोगवा मागणाऱ्या योगेश्वरी, यल्लमा अथवा रेणुका यांच्या भक्तिणी.
**जोगल्या** २४० [जोगली (स्त्री०)—कर्नाटकात प्रचलित] मातीचा लहानसा परळ.
**जोट** २३३ [सं० जटा, हिं० जूट] खादीचे जाडेभरडे पांघरूण, पासोडा.
**झटे घेणे** २३१ झगडणे.
**झडका** ३०३ झटका.
**झील धरणे** २७१ [सं. झिल्ली, हिं० झील, फा० झील] तमाशातील पालुपदाला 'जी जी' सह साथ करणे.
**झुऱ्या** २१६ [क्षुणतर°–निंदाव्यंजक शब्द ?] खुरटी रोपटी, पर्णहीन झुडपे.
**झोळणा** २३८ [सं० झौलिक=लहान पिशवी] औषधादि किरकोळ वस्तू ठेवण्याचा चार तोंडांचा आणि चार दोऱ्यांचा बटवा, लोंबती पिशवी.
**टंकोचें** १० [कुंच°?] डोके, कान झाकणारे टोपरे, कुंची.
**टहाळे** २४४ [सं० दल] टाळे, डहाळ्या.

**टाऊन हाल** २१८ [इं०] नगर-सभागृह.

**टांक** २३८, ३३१ धातूच्या पत्र्यावरील देवदेवतांचा ठसा.

**टिकोरी** २०८, २२८, ४७३ जाड व आखूड काठी.

**टिंगरें** २४४ [सं० टंगा] टांगरे, तंगड्या.

**टेपा** २०९, २६७ शिक्षेचा ठरविलेला काळ, मुदतीची शिक्षा.

**डंग** ३०३ [ध्व० हिं० डंखी] पोहे इ० कुटण्याची लाट, कुटण्या-कांडण्याचे लाकडी यंत्र.

**डहुरा** २३२ पाण्याचा खड्डा.

**डामीस** २६२ [इं० कॅराबीन > कडामीन > डमी > डमीस ?, डयूमेनिको > डामीस ?, डमी > डामीज् > डामीस ?] देखाव्याच्या (बंदुका), निकामी (बंदुका).

**डिटेक्टिव्ह** २६० [इं०] गुप्तचर, गुप्तपोलीस.

**डिरेक्टर** २०६ [इं०] खातेप्रमुख.

**डीपो** २०० [इं० डेपो] (ल०) अंत्यविधीच्या सामानाचे दुकान.

**डोमल्यावर** १२९ (कुत्सार्थे) डोक्यावर, डोंबलावर.

**डोया** २१८ डोकी, (ल०) पिढ्या.

**डोला मिरविणे** २३९ [सं० दोला°] पालखी मिरवणे, सोपस्कार करून भजनी लागणे.

**डोली** २३२ [सं० दोला] डोळी.

**डोले** २३६ गोळे.

**ढवरे** १२२ [सं० धवल+अगार > धवळार ?] झोपडी, दुकानाची राहुटी ? 'ढोरे' याचा अपभ्रंश (?), 'ढावळी = जमाव, गर्दी' या शब्दावरून उत्सव, जत्रा असा अर्थ (?).

**तखलादी** २३७ [अर० तक्लिदि] हलकी, बनावट.

**तटाकीं** २१६ [सं० तटाक] काठीं.

**तडाडा** १३२ तातडीने, तडकाफडकी.

**तबेत जाणे** २११ [अर० तबीअत्] संतापणे, भडकणे.

**तरफडे** ५९ तडफडे.

**तलखी** २३९ [फा० तल्ख्] आग, गरमा.

**तलाख** ११३ [अर० तलक् = काडीमोड] शपथ, शाप, बंदी.

**तवली** २४० [का० टवळी] पणतीच्या आकाराचे भांडे.

**तहात** १३४ [फा० ता + हायात्] मरेपर्यंत, आजन्म.

**ताःगाईत** २४२ [फा० ता + घायत्] पर्यंत, पावेतों.

**ताजीमतवाजा** २४८ [अर० तअझीम + तवाजू] आदरसत्कार.

**ताराज** २१ [फा० ताराज्] उध्वस्त, बेचिराख.

**ताली** २६१ [सं० तल°] बंधारे.

**तितंबा** १३९ [फा०, हिं०] थोतांड, कुभांड.

**तिरगुळ** १३३ [त्रैकूटक ? = बाण तयार करण्याचा धंदा करणारी जात] विड्याच्या पानांचा धंदा करणारा, (ल०) पहारेकरी.

**तिराचे फळाने** ३३१ [सं० त्रि + फल = वृक्षविशेष,] चिरफळाने.

**तिवडा** २४५ [त्रि + वर्त°] वेटोळे, तीन पायांवरील फळी किंवा माच.

**तीन धारी** १४१ [तीन + धारा = कांठ] तिफडी.

तुकडेमोडू २५३ परोपजीवी, रिकामटेकडे.
तुटी पडणे २५३ ताटातूट होणे.
तुरंगी वतनदार ५७ शिलेदार, पदरी घोडा बाळगणारा सैनिक.
तुरा १९५ तमाशांतील एक संप्रदाय: कलगी संप्रदायाचा प्रतिस्पर्धी. –(प्रकृतीवर (स्त्रीवर) पुरुषाचे (देवाचे) वर्चस्व वर्णन करणारा लावणीचा प्रकार या संप्रदायात अधिक रूढ आहे. या लावणीवाल्यांच्या डफावर 'तुरा' लावलेला असतो.)
तुराठ्या २३६, २३८, २४० [तूर+काठ्या] तुरीच्या झाडाच्या काठ्या.
तेजी १२६ [फा० ताझी] अरबी घोडा.
तेलच्या २४४, २५३ तेलात वा तुपात तळलेल्या गोड पुऱ्या.
तोता २८८ [हिं०] पोपट.
तोस्तान २३२ [फा० तोशा+दान्] काडतुसे, बंदुकीची दारू इ० सामग्री ठेवण्याची कमरेला बांधण्याजोगी चामडयाची पिशवी.
त्रिपाद शोधून काढणे ६० [सं० त्रि+पाद=पाव भाग: एका राशीत, ज्याच्या तीन चतुर्थांश अंशाचा समावेश झालेला आहे, असा कृत्तिका, पुनर्वसु इ० नक्षत्रांचा योग: अशुभ योग.] मृत्युयोग असल्याचे ग्रहमान शोधून काढणे.
दंड २४१ कापडाला एका रेषेत शिवणीने घातलेला गोट.
दरज २३६ [फा० दर्झ्] फट, सांधा.
दरड २९९ [फा० दर्द] उपद्रव.
दालीबंद २३३ [दाली=कमरपट्टा+बंद] कमरपट्ट्याला तलवार लटकावून सज्ज.
दिक्क ४८८ [अर० दिक्] चिंताग्रस्त.
दिडीवाले २४९ [सं०द्व्यर्ध०] दिढोत्रा म्ह० दरमहा दर शेकडा दीड रु० प्रमाणे व्याज घेणारे सावकार, अवाच्या सवा व्याज आकारणारे सावकार.
दिवस २५३ (ल०) क्रियाकर्मांतराचे दिवस.
दुमाला पुस्त ५६ [फा०] पूर्वीच्या मालकाची मालमत्ता वंशपरंपरा फिरवून घेण्याचे करारपत्र.
दुलन कर्दैन ४७९ [फा. दुल्हन=नवरी+कर्दन=करणे] विवाह करणे.
दूरसें होणे ९६ बाजूस बसणे, विटाळसे होणे.
देखेदेखीने २६७ अनुकरणाने.
देवऋषि २५१ भुते, वारी इ० उतरविणारा मांत्रिक, भगत.
देवळी २३७ [सं० देव+आलय] कोनाडा.
दोनग्या २६२ [गोमंतकी–कुडाळी शब्द] लहान दोणींनी युक्त, लाकडाचा कोठिंबा असलेल्या.
दोम दोम करणे ११३, १३८, १९०, २५०, भीक मागत फिरणे, बोंब मारीत फिरणे.–(दावलमलकाच्या पीराचे भक्त अथवा मुसलमान, यांच्या भिक्षेच्या सवालाचा शब्द 'दोम, दोम' असा असतो.)
दोहरा २५२ हिंदी वा फारशी कवितेचा एक छंद.
धगडी २५१ जारिणी, व्यभिचारी स्त्री.
धडपा २४१ [सं० धटि; फा० दर्पा] फडके, वस्त्र.
धडांत टाकणे १३८ गिळंकृत करणे.

**धनतेरस** ५६ [धन+त्रयोदशी] आश्विन वद्य त्रयोदशी.
**धसकट** २३१ कुसळ, अग्र.
**धाणे** ३०३ [सं० घ्रात > प्रा० धाय] तृप्त होणे.
**धाना** ४५५ [सं० धान] दाणा, धान्य.
**धुडके** २०० घुटके.
**धुमाळी** २२३ गडबड, लढाई.
**धुवासाखर** १९९ धुऊन स्वच्छ केलेली साखर.
**धोटाबांड** २४१ साळवटी, जाडेभरडे.
**नकटा** २३३ न वळवलेला, सपाट म्हणून नाक नसलेला.
**नफा हल** ४६७ [अर० नफर् ?] हलकी चाकरी ?
**नवलोबा** ४५ [नवल°] नवलाई, आश्चर्य.
**नवाटकें** २९८ [नऊ+टांक] नवटाकें. शेराच्या अष्टमांशाचे माप.
**नवारी** २५२ [फा० नवार] सुती जाड पट्टी.
**नळ दाटवणे** ५२ आंतड्याच्या नळ्या भरपूर भरणे, यथेच्छ जेवणे.
**नाकाला चुना लावणे** २७० विरोधाची पर्वा न करता पुढे जाणे, नक्षा उतरणे, कमीपणा आणणे.
**नाकास नळ येणे** १३३, २३५ नाकी नऊ (प्राण) येणे, मेटाकुटीस येणे.
**नाडबंद** [नाडी+बंध] (ल०) चारित्र्यवान, कामोपभोगविन्मुख.
**नापिक** ३०२ [ सं० नापित] न्हावी,
**नाळपडी** २३६ [अर० नअल्+पडी] नाळ पडलेली, निकामी.
**निकोपी** २३२ [सं० निः+कफ?] अव्यंग, निर्दोष.
**निमरॉड** २१३ [इं०] निष्णात पारधी मोठा शिकारी.
**निर्णश होणे** ४२६ ['निर्वंश' आणि 'विनाश' यातील साम्याभास. कदाचित मूळ प्रतीत मुद्रणदोष असू शकेल.] नायनाट होणे.
**निर्मिक, निर्मीक** ३४९ निर्माणकर्ता.
**नीका** ६४ [सं० निष्कल] शुद्ध, पवित्र.
**नीयत** २९७ [अर० नीयत्] नीती, दानत.
**नीर काढणे** २६, १७७ निकाल लावणे, नायनाट करणे.
**नेटिव्ह** २३० [इं०] देशी, एतद्देशीय.
**नोकदार** २३१ [फा. नौक+दार] टोकदार.
**पंचखाजें** ३३१ [सं. पंच+खाद्य] पाच प्रकारचे खाद्य, 'ख' या अक्षराने प्रारंभ होणारे पाच खाद्य पदार्थ : खारीक, खोबरे, खसखस किंवा खवा, खिसमिस आणि खडीसाखर.
**पटई** २३८ [सं. पट्ट°] कडीपाट, छपरी तख्तपोशी.
**पट्टाधूळ** २१० फजीती, रेवडी.
**पडझड** ३७४ टाकाऊ, क्षुल्लक.
**पडदी** १४४ एक विटेची भिंत.
**पडोसा** १३६, १९२, ४५९ [सं० प्रति+वास, का० पाडु=समता] नमुना, तुलनेसाठी उदाहरण, पडताळा.
**पद्मसाळी** २०४ कोष्ट्यांची एक जमात.
**परळ** २४० [प्रा० परिअल] मातीचे उथळ भांडे.
**पल्हाटी** ३७१ [प्रा० पलहि=कापूस+काठी] कापशी.

**पस्त करणे** २६ [फा० पस्त्°] उद्ध्वस्त करणे, नायनाट करणे.

**पाखाडी** २३८ [सं० पक्ष>पक्ख>पाख°] छपराची उतरती बाजू, पाखे.

**पांच पाटीं दिक्षा** ४७४ (धिंड काढण्यापूर्वी वस्तऱ्याने डोकीवर पांच पाट काढीत असत.) पांच पाट काढण्याची शिक्षा

**पांजरपुरा** ४२९ [सं. पंजर°] पांजरपोळ.

**पाणई** २३६, २४१ [पाणपोई ?] पाण्याचा रांजण पुरून ठेवण्यासाठी तयार केलेला वेदीसारखा किंवा कट्ट्यासारखा भाग.

**पाणडा, पाणाडा** २६२ पाणीपरीक्षक, भूगर्भात पाणी कोठे लागेल हे जाणणारा तज्ज्ञ.

**पात्रा** ३००, ३७५ [सं० पात्र°] नर्तकी, वेश्या.

**पाभर, पाभार** १३१, २०४, २३८, २४५, २६० शेतात बी पेरण्याचे औत, –याचे दुफणी, तिफणी, चौफणी, सहा फणी असे प्रकार असतात.

**पायपाट्या** [पाय+पाटी] लग्नाच्या वेळी वधूवरांनी पाय ठेवून उभे राहावयाच्या पाट्या, शिपतरे इ०

**पारडी** २३२ म्हशीचे वासरू (स्त्री.), रेडी.

**पारणे** ९ [सं० पारण–णा] उपवासादि व्रतानंतरचे भोजन.

**पाल** १२२ दुकानासाठी बांधलेली राहुटी, तंबू इ.

**पाष्टया** २८५ [प्रा० पाष्टा=सुताची गुंडी] जाड सुताची जानवी.

**पेटवणे** १९४, १९८, १९९ भरीस घालणे, चेतवणे.

**पैमाष** २३४, २४७ [फा० पैमाइश्] जमीन मोजणी व नोंदणी.

**पोटबाबू** ५२, २११, २५९ पोटभरू, स्वार्थी माणस.

**पोत्यांतून** ४२७ [फा० पोता=पिशवी] (ल०) खजिना.

**प्याजी** ९ [फा० पियाज्=कांदा] कांद्याच्या रंगासारखे किंचित् गुलाबी.

**प्यादेमात** १३४, २४६ [बुद्धिबळात प्याद्यासारख्याच्या शहाने राजाची कोंडी केली की, त्या डावाला 'प्यादी' किंवा 'प्यादेमात' म्हणतात, त्यावरून] (ल०) कोंडमारा, पराभव.

**प्राकृत** १९० (ल०) मराठी.

**प्रेसिडेन्सी** २१३ [इं०] इलाखा.

**फटकावणे** १९५ [सं० फट+कृ°] फडकवणे.

**फट्टा उडवणे** २५७ ['थट्टा' शब्दाशी साम्याभास] फजीती करणे.

**फरें** १२१ [सं० फल > प्रा० फर] खांद्याचे किंवा मांडीचे हाड.

**फर्मे** १२८ [इं० फॉर्म°] फॉर्मस्, नमुनापत्रे.

**फसक्या** १९३ श्रावण महिन्यात सोमवारी स्त्रिया शंकराला धान्याच्या मुठी वाहतात त्या शिवामुठी.

**फस्के** २१० [ध्व०] चूर्णादिकांच्या लहानशा चिमट्या.

**फाके** २४७ [फा० फाका] उपवास.

**फारेस्ट खाते** २०४ [इं० फॉरेस्ट +अर० खत्त, खत्ति] जंगलखाते, वनविषयक खाते.

**फास** २३८, २४१ कुळवाला बसविलेली लोखंडी पट्टी.

**फिल्टर** २३२ [इं०] जलशुद्धि, पाणी

गाळण्याची कृति.

**फुंदणे** ३०२ [सं० स्फुंदन°] रडणे.

**फुरका** २४५ [ध्व० फुर्] भुरका.

**फुरफुरीं** २४३ हरभऱ्याच्या पिठाचे तळून तयार केलेले तोंडी लावणे.

**फूल** २४७ (ल०) कस, सुपीकपणा.

**फेरपाळ्या** २५३ एकावरून दुसऱ्यावर अशी फिरत येणारी पाळी.

**फैलास** २०८ [इं० फाइल्] फायलीस.

**फैल जामीन** १३१ [फा० फिइल-इ-झामिनी] दुर्वर्तनाबद्दल घेतलेला जामीन.

**फ्रीडर** [इं०] वकील.

**बगल्या** २०७, २११ हस्तक, अंकित, होयबा.

**बंदछोड** २५९ [हिं० बनछोड] आंब्याची एक जात.-(पुणे जिल्ह्यात कडूस, धायरी येथे हा आंबा होतो.)

**बनाऊ** २०९ बनावट, खोटे.

**बनात** २३१ एक लोकरीचे वस्त्र.

**बयती** ११२ [अर० बैत] सयमक कवितेच्या दोन ओळी, फारशी भाषेतील एक छंद.

**बरबट** २४५ आंबे, चिंचा इ० कोळून तयार केलेले दाट पाणी, एक पळीवाढा पदार्थ.

**बराकी** २३२ [इं० बॅरॅक] खोल्यांची रांग असलेल्या इमारती, छावण्या.

**बाजींदी** ४७८ [फा० बाझन्दा] हट्टी.

**बांधपेंडवला** २६७ [बन्ध+पिण्ड+आवलि] बांधपेंडोळा, वंशाची परंपरा.

**बारव** २३४ पायविहीर, पायऱ्यांची विहीर.

**बारीबारीनें** १४३ आळीपाळीने.

**बावनखणी** २४८ (पुण्याच्या शुक्रवार पेठेत बावनखणांच्या चाळीत पूर्वी वेश्या राहात त्यावरून) वेश्यांची गल्ली.

**बालोबाल** ३७१ [सं० वाल°] बालंबाल,

**बासें** २६८ [सं० वास] शिळे.

**बाळगें** २३५ छोटे आवार? परसू?

**बिवड्या** २४० [सं०बीज+वटि]बीबियाणी.

**बिसमिल्ला हिर रहिमान् निर्रहिम** ३८३ [फा०] दयाळू परमेश्वराच्या नांवाने प्रारंभ करून.

**बुचके** २३६ [सं० पुंज°] पुंजके, झुपके.

**बुचबूच** २३६ बुजबुजाट, घाणींची गर्दी.

**बुचाडणे** १९९ लुबाडणे, हिरावणे.

**बुधली** २३८ कातडी बाटली.

**बुरदंडा** २२९ [सं० भूरि+दंड] जादा दंड,

**बेणें** २४७, २६२ [सं० बीज > बीय] पशूंची बियाणी, वेते.

**बेदावा** ५८ [फा०] सोडचिठ्ठी, हक्क सोडून देणे.

**बेंदूर** ५६ बैलांची पूजा करण्याचा पोळ्याचा सण.

**बोजवार** २४० हिंग, जिरे, मिरी, हळद इ० घालून केलेला लोणच्याचा मसाला.

**बोजवार करणे** २०१ बोजवारा उडवणे, दुर्दशा करणे.

**बोथऱ्या, बोथलेल्या** २०८, ३५६ [का० बोच्चु = दंतविहीन] बोथटलेल्या, धारहीन, दात पडलेल्या.

**ब्यांकी** २३१ [इं० बँक्] पेढ्या.

**भंड** ३५१ [सं०] कपट, कुभांड.

**भंडारी** २३८ [सं० भांडागार] पेटी.

**भरंसा** २२९, २५१ भरवसा, विश्वास.

**भरावर असणे** २३३ [सं० भृ°] पूर्ण होण्याच्या बेतात असणे, सीमेवर असणे.

**भवया** ९ [सं० भूवर्तिका > भुवया] भुवया.

**भवूक** २३४ [सं० बहुक] बहुत, पुष्कळ.

**भांग्या** १९९ [सं० भंगा] भंगड, भांगेचे व्यसन जडलेला.

**भाणुशी, भानवशी** २३७, २४०, ३०३ [सं० महानस] चुलीच्या मागील ओटा.

**भालदोरी** ४६७ पिशाच्चादिकांचा उपद्रव न व्हावा म्हणून बांधावयाची मंत्रविलेली दोरी.

**भालेराई** २२६ बंड, बेबंदशाही.

**भेकड बाहुले** ३२५ भित्रे, दुबळे.

**भेंड** १३३ वृक्षविशेष, (ल०) त्याची पाने.

**भोइफुगडी** २९७ [सं० भूमि + फुगडी] भुईफुगडी, लोळण फुगडी.

**भोंदणे** ३३ कपटाने वश करून फसवणे.

**भौताचे** ६० [सं० प्रभूत > बहुत°]पुष्कळांचे.

**मजलस** १९०, २२५, २६५ [अर० मन्झिल्] शेवटचे टोक, शेवटचा पल्ला, विकोपाची अवस्था.—('मजल' आणि 'मजला' यांत साम्याभ्यास झालेला दिसतो.)

**मदाग्नि** २४३ [सं० मद + अग्नि] कामाग्नि.

**मनुती** २११ [फा० मुनोत] व्याजाव्यतिरिक्त दिलेला मोबदला, रकम कर्जाऊ घेताना आगाऊ कापून दिलेले व्याज.

**मलमा** १९५ [फा० मल्हम्] मळलेला चुना-चिखल इ०

**महामूर** २२७, २२८ खूप, भरपूर.

**महिझीत** ३८३ [अर० मस्जिद्] मशीद.

**माखण** १२२, १९७ [सं० म्रक्षण] चोपडणें.

**माठला** ५५ सुस्त झाला.

**माराकुट्टे होणे** २६७ मारामारी होणे.

**मारु** १३२, २०७ [फा० मा = चंद्र + रू = मुख] आकर्षक (ल०) महत्वाचे, मुख्य.

**मार्टर** ४६६ [इं. मार्टिर] हुतात्मा.

**माविताचं** ३९२ [अर० मौत° ?] मयताचे, मृत गुराढोरांचे (?), मायेचे (?)

**माली मागणे** १९८ [फा० माली° = जकात] हक्कदारासारखी भिक्षा मागणे, शिक्षेची रक्कम भरण्यासाठी भिक्षा मागणे, (ल०) दक्षिणा वसूल करणे.

**मावंदे** २०० यात्रेनंतरचा गंगापूजन, नैवेद्य समर्पण, ब्राह्मणभोजन इ० विधी.

**माळवें** २२९ [मळा°] बागायती माल.

**मिजाज** २४८ [फा० मिझाज] मिजास.

**मुकरर** ५६, १९३ [अर० मुकर्रर्] नियोजित, निश्चित.

**मुरदा** २२६ [सं० मृत°, फा० मुर्दा] प्रेत, मढे.

**मुरळी** १९५, २५१ [सं० मैराल > मल्लारि > मैरालि, का० मरळी] खंडोबाला वाहिलेली स्त्री, खंडोबाची देवदासी.

**मुलाजा** २९८ [अर० मुलाहझा] पर्वा, मान.

**मुल्लाना** २१५ [अर० मौलाना = मुसलमान धर्मगुरु] मुसलमान खाटिक.

**मुस्तकीम** २६४ [अर० मुस्तकीम्] कायम, मजबूत, प्रस्थापित.

**मृतप** ३५१ प्रेतावरचे कपडे घेणारा.

**मेंढके** २१५ मेंढपाळ.

**मैंद** ४७९ घातकी, दांभिक.

**मोकलणे** २५२ [मुक्त > मोकल°] सोडचिठी देणे, टाकणे.

**मोखा** २४० [मोघा] मातीचा लोटा.

**मोघणे** २४५ शेतीच्या आउताने भूमीस तास पाडून बी बेरणे.

मोधीले १० [मुक्त > मोकळ°?] मोकळे ?
मोडशी २३२, २३३ हगवण, पोटदुखी.
मोमीन २०४ [अर० मुमीन] मुसलमान कोष्टी.
मोहरा २५२ [सं० मुख°] तोंड, चेहरा.
मोहा २०४ [सं० मधु] पिवळी फुले येणारे • एक झाड.
मोळ २३८ [सं० मृदुल > मोआळ > मोळ] एक प्रकारचे गवत (याचे कुंचले, शिपतरे, केरसुण्या, शिंकी इ० बनवितात.)
यवनी गायत्री १२९, १३० (ल०) लांच.
रगडून २५३, ३०१ [अर० रघद् > रगड°] यथेच्छ, भरपूर.
रती ३८४, ३८५ [सं० रति] दैव, सद्दी.
रमणा १४८, २०२, २५७ [सं० रम्° > रमणा = क्रीडास्थान, बाग] पेशवाईत पर्वतीजवळील बागेत होणारा ब्राह्मणांस दक्षिणा वाटण्याचा समारंभ.
रमूजी २४१ [अर० रमूज = गंमत] मौज.
रांडमुंड १९७, २०२ अनाथ विधवा.
रायटरी १८९ [इं० रायटर = कारकून] कारकुनीचा धंदा.
राळ ४४९, ४८२ [सं० राल] फजिती.
राळा २३८, ३७१ लालसर रंगाची वरी.
रिपोर्ट १२७ [इं०] अहवाल, प्रतिवृत्त.
रेविन्यू ३८ [इं०] महसूल.
लंगडखुंट घालणें ३०२ एक पाय लंगडत चालणे.
लटक्या मुटक्यांचा खेळ ८ (ल०) छपून केलेले वर्तन, चोरटा व्यभिचार.
लंपास जागे २०३ [सं० लंघ्० = लांघवणे] लयास जाणे.
लवंगी काठी २३८ [सं० लोहांग°] जागोजागी लोखंडाची वेटोळी लावून मजबूत बनविलेली प्राणघातक काठी.
लवेंडर २४८ [इं०] सुवासिक पाणी.
लॉक इस्पितळे २६३ [इं०] बाहेर जाण्यास बंदी असलेली रुग्णालये.
लालपडून २४२ गबर होऊन.
लुटुमुटु ३०२ लटका, खोटा.
लोटन ३७८ कबुतराची एक जात.
वकल ४६६ रखेली, वेश्या.
वकाण २३८ [सं० उत् + कृ°] कड्यांमधील लाकडी वशावी.
वजवणे २३१, २६७ [सं० उद्यापन > उज्जावण] मशागत करणे, कमावणे.
वम फुस ४९६ [ध्व०] ओम्फस, निष्फळ.
वरकांती १२०, २०८ वरपांगी, दिखाऊ.
वराती १३७ [अर० बरात्] पैसा मिळण्याबद्दलचे हमी-पत्र, हुंडी.
वरु २३२ [सं० उर्वरित > ऊर] कणी.
वलण २३४ [सं० वल्°] पालखीच्या दांड्यासारखे बाक असलेली चिरगुटे ठेवण्याची दांडी.
वसू २३८ दोऱ्या, वाद्या.—'चवथ्या, ठिकाणी नळयासुद्धा चाडे व पाभरीची वसू टांगली असून...'
वळनी २४१ गुरे वळवून आणण्याचा धंदा.
वळी २३८, २३९ [सं० वलय] वळकटी.
वापी १२६ पायऱ्यांची विहीर.
वारणे २३४ भरणे, निवारणे.
वारंगुळा २६७ अदलाबदल, आळीपाळी.
वावड्यावर २४५ [वावडा° ?] धान्य वारवताना उभे राहण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या तिपाईवर.

विसर्जन ८३, [येथे 'विस्मरण' शब्द पाहिजे. मुळातला 'विसर्जन' शब्द चुकून पडलेला दिसतो.]-'पुढे काही काळानंतर लोकांस या गोष्टीचे विसर्जन झालेसे पाहून...'

विळपळे ४९० धुंडाळे, लपले.

वेरुवार २४४ सुगंधी वाटण, उटणे.

वेसवा २०० [सं० वेश्या] व्यभिचारी स्त्री.

वैचा २३७ [सं० विच्° = वेगळे करणे.] कोंडा वगैरे गदळ.

व्यंगित २५५, २९६ [सं० व्यंग°] व्यंग, उणीव, दोष.

शादावल १२५, १२६, २३८ [शाह + दावल] शाह दावलनामक पीर.

शालबिसनी १४३ [शाल + व्यसन° ? शाल + बासन ?] शाल पांघरणारा, सोवळा.

शिंगट २३७ [सं० शृंग > सिंग°] एक प्रकारचा मासा.

शिंदी २०५ जंगली खजुरीचा मादक रस, शिंदीची दारू.

शिपतर २४५ कळकाच्या चिपाटांची विणलेली पसरट परडी, उथळ टोपली, सुपली.

शिवराई १९५, १९६ [शिवाजी महाराजांचे 'शिवराई' म्हणून नाणे होते.] पैसा.

शेकला ४६५ [सं० शिल् = वेचणे : वर्णविपर्यय] शेलका, उत्कृष्ट.

शेकार २१८, २३८ छपराचे आच्छादन.

शेजेनीं २३७ ओळींनी, रांगांनी,

शेणखई २३६ [सं० छगन + खनि] शेणाचा खड्डा.

शेर २३८ [फा० शीर] वृक्षविशेष.

शेराचे काळांत २१८ मंदीच्या काळात, 'शेरा'ची धारण असताना.

श्लाघ्य १९५ [सं०] श्रेष्ठ.

सचकार २११ [सं० सत्य > सच्च°] वयाणा, विसार, सौद्यात आगाऊ द्यावयाची रक्कम.

सट्टल ६१, २०१ साटेलोटे, कारस्थान.

सडकुन २४९ यथेच्छ, खूप.

सणी १९४, ३३४ ढब्बू पैसा, दोन पैशांचे नाणे.

सदर २०८ [अर० सद्र] मुख्य.

संदर्प २०९ [सं० संदर्भ] अनुसंधान, संगती.

सपताळ ३७६ [फा० शफ्ताल्] एक प्रकारचे फळ.

समाने, सामाने, २०६, २०९ [इं० समन्स] न्यायालयीन बोलावणे.

सरभड २३६ [फा० सरबराह] राखीव, बेगमीचे.

सराटा ४२५ गोखरू, काटेरी वनस्पती, (ल०) अडचण.

सवाना २३८ [सं० संवाहन] झरोका.

सल्ला २८२ [अर० सलाह] तह, ऐक्य.

संवस्कार ५७ [सं० संस्कार] संस्कार, विधी.

साई ४९१ [सं० सार > साय ?] मुद्याची गोष्ट, सार.

साठप २४० साठवण.

साडा १९४ विवाहोत्तर चौथ्या दिवशी ऐरणीपूजनाच्या वेळी वधुवरांस वस्त्रे अर्पण करण्याचा विधी.

साडेभावार्थी ४०८ वरून भोळा, पण

१५३१५

आतून पक्का लबाड.

साचगी २५१ भूत किंवा वारे उतरविण्यासाठी ओवाळून टाकण्याचे उंड्यासारखे पदार्थ, सिद्धीसाठी भगतमांत्रिकांनी सांगितलेले उतारे.

सापटी २३९ [सं० संधि + पट] फट, भेग.

साबडा ३८ [साव°] साधा, निष्कपट.

सारून १९५ [सं० सृ–सर°] पूर्ण करून.

साल्वेशन आर्मी २१४ [इं०] मुक्तिफौज.

सुताडी २४१ [सं० सूत्र > सूत°] सुती, साळवटी, (ल०) जाडेभरडे.

सुरत १९७ [अर० सुरत्] चेहरा.

सोकटा २३७ [सारी + काष्ठ] सोंगटा, ठोकळा.

सोंवळेचाव १४४, २००, २०६ सोवळ्याचे अवडंबर.

सोहोम कोहोम ४९ [सोहं कोहं] तो मी आहे; मी कोण आहे.

स्टेट सेक्रेटरी २३० [इं०] भारतमंत्री.

स्लेव्ह होल्डर १३४ [इं०] गुलामाचा मालक.

स्वलंब २२६ स्वतंत्र.

हकल्या १३१ हाका.

हरभास ३२५ [हर + भाषा] अष्टपैलू, बहुगुणी, चतुरस्र.

हलाल ४९१ [अर० हलाल्] शास्त्रानुसार, पवित्र.

हलालखोर ४३० [फा० हलालखुर्] भंगी.

हलक ८६ [अर० हलाक्] क्षीण, थकलेला.

हारनिसे २०४ [इं० हार्नेस] खोगीर.–'तऱ्हेतऱ्हेच्या गाडया, हारनिसे, खोगरें, लगाम व शेवटीं पायपोस यंत्रद्वारें तयार करून...'– डीडर वकील, तलावकनाल असे समानार्थी वा अर्धसमानार्थी शब्द उपयोजण्याच्या लकबीनुसार येथे 'हारनिसे, खोगरे' शब्द योजलेले आहेत. मध्ये स्वल्प विराम दिलेला आहे, तो अनावश्यक असून या शब्दांचा विषम समास मानणे योग्य ठरेल.

हाळ्यापाळ्या २५२ [आळीपाळी] एकामागून एक अशा केलेल्या कामाच्या खेपा, अदलाबदलीने केलेल्या पाळ्या.

हिमायती १२३, २०२, २५७ [अर० हिमायत्] आश्रित, (ल०) वशिल्याचा.

हिरात २८८ [हिजरात = सामुदायिक देशत्याग ?] पळापळ, गळती.

हुंदाडा २४५–अर्थ नीट लागत नाही.–'तो (शेवटचा) भात ज्या आमटीबरोबर खातात, त्याला 'हुंदाडा' किंवा 'घुटं' म्हणतात. ज्या भागात जे धान्य विशेषत्वाने पिकते, त्याच्या डाळीची ही आमटी असते' असे एक माहितगार कळवतात.

हुन्नर २३५ [फा० हुनर] उद्योग, धंदा.

हुबू ४८० [अर० हूबहू] हुबेहुब.

हुलगा २३८, २४० कुळीथ.

हुलथापा २५८ ['हूल', 'भूल' यांतील साम्याभासाने घडण] भुलथापा.

हुळा २४० भाजलेल्या हरभऱ्याचे घाटे.

हेकड १९४, ३५७, ३६२ हेकट, छांदिष्ट.

हेले २६७ [सं० हल्य] रेडे.

हेल्थ आफीसर ४३० [इं०] आरोग्याधिकारी.

REFBK-0017315